जगाचा इतिहास

९५३

म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
सं. क्र. ६६३

प. ह. बर्वे

REFBK-0008062

दा.स -
C0642

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम 20466 वि. 4.2
क्रमांक ...... नों. दि. .....

ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. ठाणे
अनुक्रमांक 20422 दि. 31/12/15
क्रमांक 263 नोंद दि. 7/01/2016

जगाचा इतिहास

जगाचा इतिहास

(इतिहासपूर्व कालापासून इ. स. १९५३ पर्यंत)

मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर. स्थलमत
अनुक्रमांक 20926 वि. इतिहास
क्रमांक 253 नोंद दि. 24.8.54

लेखक :

परशुराम हरि बर्वे, एम. ए., बी. टी.

'इंग्लंडचा अर्वाचीन इतिहास' या पुस्तकाचे लेखक



किंमत रु. ७-४-०



REFBK-0008062

१९५६

प्रकाशक :
परशुराम हरि बर्वे
४३१ अ–६, सर्कल सिनेमासमोर, नाशिक.

आवृत्ति पहिली : जुलै १९५६

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

मुद्रक :
केशव गणेश शारंगपाणी
आर्यभूषण मुद्रणालय,
९१५।१ शिवाजीनगर, पुणे ४.

प्र स्ता व ना

आपल्या देशाच्या इतिहासाप्रमाणें जगाच्या इतिहासाकडे लक्ष देणें जरूर असतें, कारण त्यामुळें व्यापक दृष्टि येऊन जगांत आपल्या देशाचें स्थान काय आहे तें स्पष्ट होतें. अतिप्राचीन काळापासून सध्यांच्या काळापर्यंत मानवी संस्कृति कशी प्रगत होत गेली, जगांतील निरनिराळ्या राष्ट्रांचा उदय, उत्कर्ष कसा होत गेला व त्यांपैकीं कांहींचा ऱ्हास कां झाला, निरनिराळ्या कालखंडांत कोणकोणते तत्त्ववेत्ते, धर्मसंस्थापक, पराक्रमी पुरुष, संशोधक, शास्त्रज्ञ, कल्पक स्त्रीपुरुष होऊन गेले, त्यांनीं कोणतीं ध्येयें जनतेपुढें ठेविलीं, कोणते शोध लावले, कोणत्या गोष्टी उपयोगांत आणिल्या व त्यांचे मानवी जीवनावर काय परिणाम घडले यांची माहिती जागतिक इतिहासाच्या अध्ययनानें मिळते. भारत स्वतंत्र झाल्यावर भारताचा संबंध जगांतील बहुतेक राष्ट्रांशीं येऊन निरनिराळ्या प्रगत व वैभवशाली राष्ट्रांशीं भारताचे संबंध बरोबरीच्या नात्यानें सुरू झालेले आहेत. तेव्हां या सर्व राष्ट्रांची ऐतिहासिक पार्श्वभूमि काय आहे त्याची माहिती सामान्य नागरिकांस त्याचप्रमाणें कॉलेजें व विद्यालयें यांतील विद्यार्थ्यांस असणें आवश्यक असल्यामुळें कॉलेजें व विद्यालयें यांच्या अभ्यासक्रमांत जगाच्या इतिहासाचा समावेश केलेला असतो.

पुणें विद्यापीठ, मुंबई, गुजराथ, कर्नाटक विद्यापीठें यांच्या अभ्यासक्रमांत इंटर ऑर्टस्‌च्या परीक्षेसाठीं 'जगाचा इतिहास' हा विषय नेमलेला आहे. नागपूर विद्यापीठ, अजमीर व मध्यभारत येथील विद्यापीठ, त्याचप्रमाणें श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी स्त्रियांचें विद्यापीठ यांच्या कॉलेजमधील अभ्यास-क्रमांत 'जगाचा इतिहास' व 'यूरोपचा इतिहास' व त्यांचे कालखंड यांचा समावेश केलेला आहे. तसेंच शाळांतील विद्यार्थ्यांची दृष्टि व्यापक व जागतिक व्हावी या उद्देशानें जगाच्या इतिहासांतील कांहीं प्रमुख घटनांचा समावेश शाळेच्या इतिहासविषयक अभ्यासक्रमांत केलेला आहे. पुणें विद्यापीठानें इंटर आर्टस्‌च्या विद्यार्थ्यांस जगाचा इतिहास हा विषय मराठींतून शिकविण्याची व इतिहास या विषयाचीं उत्तरें मराठींतून देण्याची सवलत नुकतीच दिलेली आहे. तेव्हां कॉलेजमधील इंटर आर्टस्‌चे विद्यार्थी, शाळांतील शिक्षक व सामान्य

वाचक वांस उपयुक्त व्हावें या दृष्टीनें ' जगाचा इतिहास ' या पुस्तकाची मांडणी केलेली आहे. विद्यार्थ्यांस उजळणीच्या वेळीं उपयोग व्हावा म्हणून प्रकरणांच्या शेवटीं सारांश दिलेला आहे. मी यापूर्वी लिहिलेलें ' इंग्लंडचा अर्वाचीन इतिहास ' हें पुस्तक विद्यार्थ्यांत लोकप्रिय झालेलें होतें, त्याचप्रमाणें जगाचा इतिहास हें पुस्तक विद्यार्थ्यांस उपयुक्त करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

आर्यभूषण मुद्रणालय, पुणें ४ याचे व्यवस्थापक श्री. के. ग. शारंगपाणी व त्यांचे साहाय्यक श्री. वि. अ. पटवर्धन यांनीं हें पुस्तक अल्पावधींत सुबक रीतिनें छापून दिलें त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

१२–७–१९५६ प. ह. बर्वे

प्रस्तुत पुस्तक लिहितांना मला अनेक ग्रंथांचा उपयोग झाला. त्यांपैकीं कांहीं प्रमुख ग्रंथांचा उल्लेख खालीं केला आहे. या सर्व ग्रंथांच्या लेखकांचा मी अत्यंत ऋणी आहें.

1. The Outline of History—H. G. Wells.
2. History of the World—W. N. Weech.
3. World History—Hayes, Moone, Wayland.
4. World History — Emma Peters Smith, David Saville, Muzzey and Minnie Lloyd.
5. A History of World Civilization—James Edger Swain.
6. Glimpses of World History—Jawahirlal Nehru.
7. Discovery of India—Jawahirlal Nehru.
8. Cambridge Shorter History of India—Dodwell.
9. Hindu Civilization—R. K. Mukerji.
10. Rise and fulfilment of British rule in Indiaa—Thomas and Garret.
11. Foundations of India Civics—Puntambekar.
12. Prehistoric, Ancient and Hindu India—R. D. Bannerji.

१२–७–१९५६. परशुराम हरी बर्वे.

अनुक्रमणिका

प्रकरण		पृष्ठ
१ लें	विषय–प्रवेश	१
२ रें	अतिप्राचीन काळांतील मानवी जीवन	७
३ रें	प्राचीन काळांतील संस्कृति	१६
	(अ) इजिप्तमधील प्राचीन संस्कृति (इ. स. पू. ५००० ते इ. स. पू. ३३२).	१७
	(ब) मेसापोटेमियाचा प्राचीन इतिहास व संस्कृति (सुमेरिया, बॅबिलोनिया व असेरिया) (इ. स. पू. ५००० ते इ. स. पू. ५३९).	२६
	(क) भारतांतील प्राचीन संस्कृति (इ. स. पू. ५००० ते इ. स. पू. ३२२).	३३
	(१) द्रविड संस्कृति	
	(२) सिंधु संस्कृति	
	(३) आर्य संस्कृति	
	(४) हिंदू (भारतीय) संस्कृति	
	(५) नवीन धर्मपंथांची स्थापना	
	(ड) चीनमधील प्राचीन संस्कृति (इ. स. पू. ५००० ते इ. स. पू. २०६).	५७
४ थें	जगांतील प्राचीन काळचे इतर लोक, त्यांचा इतिहास व संस्कृति (इ. स. पू. ३००० ते इ. स. पू. १००).	६९
	(१) इजियन समुद्रालगतच्या प्रदेशांतील प्राचीन संस्कृति	६९
	(२) फिनीशियन लोक, त्यांचें कार्य व संस्कृति	७०
	(३) हिब्रू लोक (ज्यू, इस्राएल) त्यांचा इतिहास व संस्कृति	७३

प्रकरण ४ थें चालू पृष्ठ

(४) आर्य लोकांची पश्चिम आशियांतील राज्यें व साम्राज्यें :— ७५

(अ) हिटाइट लोक (ब) मीड लोक (मेटिनी) ७५

(क) इराणचा उदय, उत्कर्ष व ऱ्हास. ७७

(५) अमेरिकेंतील प्राचीन संस्कृति. ८०

५ वें ग्रीस व रोम येथील प्राचीन संस्कृत्या व त्यांचे जागतिक परिणाम (इ. स. पू. १८०० ते इ. स. ४७६). ८५

(अ) ग्रीसमधील प्राचीन संस्कृति व इतिहास. ८५
(इ. स. पू. १८०० ते इ. स. पू. ३२३).

(ब) रोमचा उदय, उत्कर्ष, विस्तार व ऱ्हास. १०८
(इ. स. पू. १८०० ते इ. स. ४७६).

(क) ख्रिस्ती धर्माची स्थापना व त्याचा रोमन साम्राज्यांत व इतरत्र प्रसार. १३२

६ वें प्राचीन काळांतील पौर्वात्य देश, तेथील राज्यें व घडामोडी (इ. स. पू. ३०० ते इ. स. १२५० सुमारें). १४४

(१) प्राचीन भारत—
(इ. स. पू. ३२२ ते इ. स. १२०६). १४४

(२) प्राचीन चीन—
(इ. स. पू. २०६ ते इ. स. १२८०). १६४

(३) प्राचीन इराण—
(इ. स. पू. ३३१ ते इ. स. १२६०). १६८

(४) महंमद, इस्लामी धर्माची स्थापना व खिलाफत १७२

७ वें मध्ययुगांतील युरोप (इ. स. ४७६–१४५३) १८५

(१) वन्य जमातींच्या रोमन साम्राज्यावर स्वाऱ्या व त्यांचे परिणाम १८५

(२) पवित्र रोमन साम्राज्य १८७

(३) ख्रिस्ती धर्माचा प्रसार व पोपच्या सत्तेची वाढ १९०

प्रकरण		पृष्ठ
	(४) सरंजामी पद्धत	१९३
	(५) प्रादेशिक राज्यांची स्थापना	१९५
	(६) पूर्व रोमन साम्राज्य व क्रुसेडस	२०२
	(७) युरोपमधील सांस्कृतिक व सामाजिक जीवन	२०६
८ वें	मध्ययुगांतील पौर्वात्य देश व त्यांचा इतिहास (इ. स. १२५० ते १८४० सुमारें)	२११
	(अ) मध्ययुगांतील भारत	२११
	(ब) मंगोल व तुर्क	२२८
	(क) मध्ययुगांतील चीन	२३२
	(ड) प्राचीन व मध्ययुगांतील जपान	२३७
९ वें	युरोपमध्यें प्राचीन कलाविद्यांचें पुनरुज्जीवन, ख्रिस्ती धर्मसुधारणा व नवीन गोष्टींचा व प्रदेशांचा शोध (१४५० ते १७४०)	२४३
	(१) प्राचीन कलाविद्यांचें पुनरुज्जीवन	२४३
	(२) ख्रिस्ती धर्मसुधारणा	२४५
	(३) नवीन गोष्टींचा शोध	२५१
	(४) नवीन जलमार्गांचा व प्रदेशांचा शोध; व्यापारी ठाणीं वसाहती व प्रदेशविस्तार	२५५
१० वें	युरोपमधील प्रमुख राज्यें, फ्रान्समधील राज्यक्रांति व तिचे जागतिक परिणाम	२७२
	(१) स्पेन	२७४
	(२) फ्रान्स	२७८
	(३) इंग्लंड (ग्रेट ब्रिटन)	२८४
	(४) रशिया	२९४
	(५) आस्ट्रिया	२९८
	(६) प्रशिया	२९९
	(७) फ्रान्समधील राज्यक्रान्ति व तिचे जागतिक परिणाम	३०१

प्रकरण पृष्ठ

११ वें युरोपियन राष्ट्रांचीं युरोपच्या बाहेर व्यापारी ठाणीं, प्रदेशविस्तार व वसाहती ३१७

१२ वें यंत्रयुग, औद्योगिक क्रान्ति, शास्त्रीय व यांत्रिक शोध व त्यांचे परिणाम ३३६

(१) यंत्रयुग, व औद्योगिक क्रान्ति व त्यांचे परिणाम ३३६

(२) शास्त्रीय व यांत्रिक शोध व त्यांचे परिणाम ३४६

१३ वें १९ व्या व २० व्या शतकांतील जगांतील प्रमुख राज्यें व घडामोडी ३५०

(अ) युरोपमधील घडामोडी व संघटित राज्यांची स्थापना

(१) स्वातंत्र्य, राष्ट्रीयत्व व सत्ता संपादन करण्यासाठीं चळवळी ३५०

(२) इटलीचें एकीकरण व प्रगति ३६०

(३) जर्मन साम्राज्याची स्थापना व उत्कर्ष ३६६

(४) फ्रान्समधील तिसरें लोकसत्ताक राज्य ३७२

(५) आस्ट्रियाहंगेरीचें साम्राज्य ३७५

(६) रशिया, तुर्कस्थान व आग्नेय युरोप ३७६

(७) बर्लिनच्या तहानंतर युरोपमधील राजकारण ३८८

(ब) ग्रेट ब्रिटन, ब्रिटिश साम्राज्य व कॉमनवेल्थ (ब्रिटिश स्वसत्ताक राष्ट्रांचा संघ) ३९२

(क) अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें या राष्ट्राची स्थापना, विस्तार व उत्कर्ष ४१०

प्रकरण १३ वें चालू — पृष्ठ

(ड) मध्य व दक्षिण अमेरिकेंतील लोकसत्ताक राज्यें. ४१९

(प) आशियांतील राष्ट्रें ४२४

(१) अर्वाचीन भारत ४२५

(२) अर्वाचीन जपान ४३७

(३) अर्वाचीन चीन ४४०

१४ वें १ लें महायुद्ध व युद्धोत्तर जग ४५५

१ लें महायुद्ध ४५५

युद्धोत्तर जग—

(१) राष्ट्र-संघ ४६५

(२) सुरक्षिततेसाठीं तहनामे व करार ४६७

(३) जागतिक घडामोडी ४६९

(४) निरनिराळीं राजकीय तत्त्वें ४७०

(५) रशियामधील सोव्हिएट राज्य ४७३

(६) इटली व तेथील फॅसिस्ट राज्य ४७९

(७) युद्धोत्तर जर्मनी व तेथील नाझी राज्य ४८३

१५ वें २ रें महायुद्ध व युद्धोत्तर जग ४९२

(१) २ रें महायुद्ध ४९२

(२) संयुक्त राष्ट्रसंघटना ४९६

(३) जागतिक घडामोडी ५०४

परिशिष्ट — १ महत्त्वाचे सन १३ सुरुवातीचें

२ पारिभाषिक शब्दांची यादी ५०९

शुद्धिपत्र १२ सुरुवातीचें

शुद्धिपत्र

पान	ओळ	अशुद्ध	शुद्ध व सूचना
५८	१५	कंपास्त	शब्द खोडणें
६७	२६	कंपास	शब्द खोडणें
११९	२	१७०	२५०
११९	२	सॅसानडि	पार्थियन
११९	४	व इराणी	पार्थियन व इराणी
११९	४ व ५	व इराणच्या...दिलें	वाक्य खोडणें
१७५	१३	६२४	६३४

परिशिष्ट–१

महत्त्वाचे सन

(इ. स. पू. ८०० च्या पूर्वीचे सन अंदाजीं समजावेत)

इ. स. पू.	
५०००	इजिप्त, मेसापोटेमिया, भारत व चीन प्राचीन संस्कृति सुरू.
४००० पासून	भारतांत द्रविड संस्कृति.
३४००	इजिप्तमधील नगरराज्यांचें मीनसकडून एकीकरण.
३४००–२०००	सिंधु संस्कृति
३०००	इजिप्तचा खुफू सम्राट यानें प्रचंड पिरॅमिड बांधला
३०००–१२००	इजियन समुद्रालगतची (क्रीट) प्राचीन संस्कृति
२५००–२०००	आर्यांचें भारतांत आगमन
२५००–१२००	हिटाइट लोक आशियामायनरमध्यें
२५०० पासून	मिटानी (मीड) लोक इराणच्या वायव्य भागांत
२२००–१४६	फिर्नीशियन लोक
२०००–३३१	इराणी लोक
२०००–५८६	हिब्रू लोक (ज्यू, इझ्राएल)
२०००	आर्य संस्कृति सुरू
१८००–१५८०	इजिप्तवर हिक्सोस राजांचा अंमल
१७००	रामायण काळ
१५००	मध्य व दक्षिण अमेरिकेंतील प्राचीन संस्कृति
१४००	महाभारत काळ
१३७५–५८	४ था ॲमेनेहोटेप
१२९२–१२२५	२ रा रॅमसीस
११२२–२४९	जो (Chou) घराणें चीनमध्यें
८१४	कार्थेजची स्थापना
८००	झरतुष्ट्र

७७६	आलेंपिक क्रिडासत्रें सुरू
७५३	रोमची स्थापना

इ. स. पू.

६२४–५४४	गौतम बुद्ध
५९४	सोनलचे कायदे, अथेन्स
५५०–३३१	इराणचें साम्राज्य
५५०–४७९	कन–फू–त्से
५२२–४८६	डरायस, भारताच्या सीमेपर्यंत राज्यविस्तार.
५०९–२७	रोमचें लोकसत्ताक राज्य
५०७	क्लिस्थनीसच्या सुधारणा
४७०–३९९	सॉक्रेटीस
४६१–४२९	पेरिक्लिसचें नेतृत्व, अथेन्सचें सुवर्णयुग
३८४–३२२	ॲरिस्टॉटल
३३४–३२३	अलेक्झांडरचा प्रदेशविस्तार
२७४–२३२	अशोक
२६४–३१	भूमध्य समुद्राभोंवतालच्या प्रदेशावर रोमचें वर्चस्व
२४९–२१२	शी हाँग टी चीनचा सम्राट
१००–४४	ज्यूलिअस सीझर
२७-इ. स. ४७६	रोमचें साम्राज्य
४–इ. स. २९	येशू ख्रिस्त

इ. स.

१२०–१६२	कुशाण सम्राट कनिष्क
१२६–६४२	इराणमध्यें सॅसनिडझ घराणें
३३०–३७५	समुद्रगुप्त
३७५–४१३	२ रा चंद्रगुप्त गुप्त
४७६	पश्चिम रोमन साम्राज्याचा नाश
५७०–६३२	महंमद
६०६–६४७	हर्ष

६१८–९०७	चीनमध्यें टँग घराणें
७३२	टूर्सची लढाई : युरोपमध्यें मुसलमानी सत्तेस प्रतिबंध
८००	चार्लमेन : पवित्र रोमन सम्राट म्हणून राज्याभिषेक
१२१५	मॅग्ना चार्टा
१२२७	जेंगिसखानाच्या मृत्यु
१२७१–९५	मार्को पोलोचा प्रवास
१४५०	सुट्या अक्षराच्या टाईपनें छापण्याची पद्धत, गुटेनबर्ग
१४९२	कोलंबस, अमेरिकेचा शोध
१४९८	वास्को डी गामा, भारताकडे जाणारा थेटचा जलमार्ग
१५५६–१६०५	अकबराची कारकीर्द
१५५८	स्पेनच्या आरमाराचा इंग्लंडकडून पराभव
१६४३–१७१५	१४ वा लुई फ्रान्सचा राजा
१६४४–१९११	चीनमध्यें मांचू घराणें
१६७४	शिवाजीचा राज्याभिषेक
१६८९	बिल ऑफ राइटस, ग्रेट ब्रिटनमध्यें पार्लमेंटची सत्ता प्रमुख
१६८९–१७२५	पीटर दी ग्रेट
१७०७	औरंगजेबाचा मृत्यु
१७६१	पानिपतची तिसरी लढाई, मराठ्यांचा पराभव
१७६३	पॅरिसचा तह
१७७३	रेग्युलेटिंग ॲक्ट
१७७६, ४ जुलै	अ. सं. संस्थानाची स्वातंत्र्यघोषणा
१७८९, १४ जुलै	फ्रान्समधील राज्यक्रान्ति
१८०४–१८१५	नेपोलियन, फ्रेंचांचा बादशहा
१८२९	स्टीफनसन, इंग्लंडमध्यें रेल्वे सुरू
१८३२	विजेनें तारा पाठविणें सुरू तारायंत्र
१८३३	गुलामगिरीची पद्धत बंद ब्रिटिश साम्राज्यांतून
१८४७	कार्ल मार्क्स, कम्युनिस्ट (मॅनिफेस्टो) जाहीरनामा.
१८५७	भारतांत ब्रिटिशाविरुद्ध स्वातंत्र्यप्राप्तीचा प्रयत्न

१८६१	इटलीचें एकीकरण, व्हिक्टर इम्मॅनूल २ रा–राजा
१८७१	जर्मन साम्राज्याची स्थापना
१८८५	हिंदी राष्ट्रीय सभेची स्थापना
१८८७	फ्रान्समध्यें पेट्रौलनें चालणारी पहिली मोटारगाडी
१८९५	क्ष किरणांचा शोध, रॉंटजेन
१९०१	बिनतारी संदेश, युरोप व अमेरिका यांमध्यें, मार्कोनी
१९०९	ब्लेरिएट या फ्रेंच वैमानिकानें ब्रिटिश खाडी ओलांडिली
१९१२	चीनमध्यें लोकसत्ताक राज्य
१९१४–१८	पहिलें महायुद्ध
१९१७	रशियांत राज्यक्रान्ति, कम्युनिस्ट राज्य
१९२०	राष्ट्रसंघाची स्थापना
१९३९–४५	२ रें महायुद्ध
१९४५ आगस्ट	हिरोशामा व नागासाकी यांवर ॲटमबाँब.
१९४५	संयुक्त राष्ट्रसंघटनेची स्थापना.
१९४९	चीनमध्यें कम्युनिस्ट राज्य.
१९५०	भारताचें लोकसत्ताक संघराज्य

अनुक्रम 2048 वि. ऐतिहास
क्रमांक 4483 दि: 2/8/1962

जगाचा इतिहास

ग्रंथालय
ता. क. C.G.2...

प्रकरण १ लें

विषय-प्रवेश

इतिहास म्हणजे काय—अन्न, वस्त्र व निवाऱ्याची जागा या मनुष्याच्या तीन प्राथमिक गरजा आहेत. या गरजा भागविण्यासाठी यदृच्छेनें ज्या गोष्टी उपलब्ध होतील त्यांवर संतुष्ट न राहतां त्या गरजा भागविण्यासाठीं व आपलें जीवन अधिक सुखकर करण्यासाठीं मनुष्यास अतिप्राचीन काळापासून प्रयत्न करावे लागले. हे प्रयत्न करतांना त्यास निरनिराळे शोध लागून त्यांचा त्यानें उपयोग करून घेतला. त्याचा वेगवेगळ्या लोकसमूहांशीं संबंध आला व त्यामुळें त्याच्या आचारविचारांत बदल होत गेला. त्यानें निरनिराळ्या राजकीय, सामाजिक व आर्थिक संस्था स्थापन केल्या. त्यानें विविध प्रकारच्या कलाकौशल्याच्या गोष्टी केल्या व वाङ्मय निर्माण केलें. या गोष्टी करतांना त्यास निसर्गाशीं, प्रतिकूल परिस्थितीशीं व इतर लोकसमूहांशीं झगडावें लागलें, निरनिराळ्या संस्कृतींच्या लोकांचा एकमेकांशीं संबंध येऊन संस्कृति–संघर्ष व संस्कृति–संगम होत गेला. अशा रीतीनें मानवी समाजाची सध्यांची स्थिति कशी बनली गेली या सर्वांची हकीगत म्हणजेच इतिहास होय.

इतिहासाचे कालखंड—जगाच्या इतिहासाचे प्राचीन युग, मध्ययुग व अर्वाचीन युग असे सामान्यतः तीन प्रमुख कालखंड पाडण्यांत येतात. एखाद्या संथ वाहणाऱ्या नदीप्रमाणें इतिहासाचा ओघ सतत चालू असून त्यांतील मागील भाग पुढील भागाशीं जोडला गेलेला असला, तरी एकदम सोसाट्याचा पाऊस पडून भोंवतालच्या गढूळ पाण्याचे प्रवाह त्या नदीमध्यें मिसळून तिचें सर्व पाणी जसें गढूळ होऊन जातें, त्याप्रमाणें इतिहासांतील कांहीं घटनांमुळें कांहीं वैभवशाली देशांच्या प्रगत होत जाणाऱ्या संस्कृतीमध्यें मलीनता येऊन तिचा विकास थांबतो व तिला जीर्णत्व येतें; तेव्हां विषयविवेचनाच्या सोयीसाठीं

आपणास इतिहासाचे विभाग पाडावे लागतात, हें लक्षांत ठेवणें जरूर आहे. हे विभाग निरनिराळ्या देशांतील विशिष्ट घटनांमुळें वेगवेगळे असूं शकतील.

जगाच्या विशेषतः युरोप खंडाच्या बाबतींत हे विभाग स्थूल मानानें खालील-प्रमाणें पाडण्यांत येतातः—

(अ) प्राचीन युग इ. स. पू. १००००० ते इ. स. ५००

(ब) मध्ययुग इ. स. ५०० ते इ. स. १५००

(क) अर्वाचीन युग इ. स. १५०० ते आतांपर्यंत

[हिंदुस्थानांत इ. स. १२०० च्या सुमारास प्राचीन युगाचा लोप झाला व इ. स. १८०० च्या सुमारास अर्वाचीन युग सुरू झालें.]

पृथ्वीची उत्पत्ति व तीवरील वनस्पति व प्राणी यांची उत्क्रांति— (इ. स. पू. २०० कोटी ते इ. स. पू. १०००००).

पृथ्वीची उत्पत्ति— अंधाऱ्या रात्रीं निरभ्र अशा आकाशांत पाहिलें तर त्यांत पुष्कळ तारे व तारकापुंज दिसतात. आपल्या सूर्याच्या मानानें हे पुष्कळ लहान व त्यांचा प्रकाश थोडा वाटतो. पण हे तारे म्हणजे आपल्या सूर्याप्रमाणेंच सूर्य आहेत. आपला सूर्य पृथ्वीपासून सुमारें ९ कोटी मैल दूर आहे. पण हे तारे कितीतरी पट अधिक दूर असल्यामुळें फारच लहान दिसतात व त्यांचा प्रकाशही फारच थोडा वाटतो. पण या तान्यांपैकीं कांहीं तारे आपल्या सूर्यापेक्षां अधिक मोठे व प्रकाशमान आहेत. या असंख्य तान्यांपैकीं आपला सूर्य हा तारा प्रकाशाच्या दृष्टीनें दुय्यम दर्जाचा तारा आहे. हे सर्व तारे आपल्या आंसाभोंवतीं कोट्यवधी वर्षांपासून फिरत आले व फिरत राहणार आहेत. आपला सूर्य असाच आपल्या आंसाभोंवतीं फिरत असतां शास्त्रज्ञांच्या मतें सुमारें २०० कोटी वर्षांपूर्वी आपल्या सूर्यापेक्षां फार मोठ्या अशा एखाद्या तान्याच्या आपल्या सूर्यावरील आकर्षणामुळें सूर्यावरील कांहीं भाग दूर ओढले गेले व ते आपल्या आंसाभोंवतीं व सूर्याभोंवतीं फिरत राहिले. हे दूर फेकले गेलेले भाग म्हणजे आपल्या सूर्यमालेंतील ग्रह होत. हे सूर्यापेक्षां पुष्कळच लहान असल्यामुळें लवकर निवले गेले व घन झाले व त्यांच्या भोंवतीं हवामान निर्माण झालें. आपली पृथ्वी ही यांपैकींच एक ग्रह आहे.

वनस्पति व प्राणी यांच्या जीवनास सुरवात व उत्क्रांति— (इ. स. पू. ३० कोटी ते इ. स. पू. १०००००) पृथ्वीवर जिवाची उत्पत्ति पहिल्यानें केव्हां व कोठें झाली हें नक्की सांगतां येत नाहीं. पण शास्त्रज्ञांनीं कांहीं अनुमानें काढलीं आहेत, त्यांवरून इ. स. पू. ३० कोटी वर्षांपूर्वी दलदलीच्या कोंबट पाणथळ अशा समुद्रकिनाऱ्यानजिकच्या जागीं अति सूक्ष्म अशा जिवाची उत्पत्ति होऊन त्यापासून पृथ्वीवर सुरुवातीस वनस्पति–जीवन सुरू झालें व तें उत्क्रान्त होत गेलें. तसेंच प्राणी-जीवनही सुरू होऊन तेंही उत्क्रान्त होत गेलें. इ. स. पू. २०० कोटी ते इ. स. पू. १७० कोटी सुमारें या काळांत पृथ्वीवर वनस्पति व प्राणी यांचें अस्तित्व मुळींच नव्हतें. या काळांत पृथ्वी अचेतन स्थितींत होती. पण आतां तिच्यावर सचेनत्व आलें. अनुकूल परिस्थिति असतां त्या ठिकाणीं जीव उत्पन्न होणें ही एक स्वाभाविकच गोष्ट होती. त्यांत कांहीं अद्‌भुत चमत्कार घडला असें मानण्याचें कारण नाहीं. वनस्पति–जीवन असो किंवा प्राणी-जीवन असो त्यांत सजीवतेचीं खालील लक्षणें असावीं लागतात, व तीं म्हणजे (१) जिवांत वाढ होण्याची शक्ति असणें, (२) स्वतःच्या पोषणासाठीं अन्न घेतां येणें, (३) हालचाल करणें (वनस्पतींच्या बाबतींत मुळ्या किंवा फांद्या पसरणें ही त्यांची हालचाल होय), (४) उत्पादन करणें, (५) जीव चिरकाल न टिकतां त्याचा पुढें नाश होणें हीं होत. हवामानाप्रमाणें व भोंवतालच्या परिस्थितीप्रमाणें आपल्यांत जरूर तो फेरबदल घडवून आणून भोंवतालच्या परिस्थितीशीं जुळवून घेण्याची जिवाची धडपड एकसारखी सुरू असते. या धडपडीमध्यें यश न मिळाल्यास असंख्य जीव नाश पावतात. तसेंच हजारों जीव परिस्थितीशीं जुळवून घेऊन उत्क्रान्त पावत जातात व हजारों नवीन जीवांची उत्पत्ति करून नष्ट पावतात. अशारीतीनें पृथ्वीवर वनस्पति–जीवन व प्राणी-जीवन यांची उत्क्रान्ति होत गेली.

पहिल्यानें पाण्यांत व त्यानंतर जमिनीवर वनस्पति व प्राणी निर्माण झाले व ते उत्क्रान्त पावत गेले. लाखों वर्षांचा काळ लोटल्यावर जमिनीवरील कांहीं झाडें मोठालीं होऊन त्यांस पानें, फुलें व फळें येऊं लागलीं. मोठमोठे अजस्र व जमिनीवर सरपटणारे असे प्राणी निर्माण झाले. या काळांत सुमारें चार लाख वर्षांपूर्वी पृथ्वीवरील हवामान खूप थंड होऊन हिम पडूं लागलें व त्याचा संथ

प्रवाह ध्रुवप्रदेशापासून समशीतोष्ण प्रदेशापर्यंत पसरला. या काळास हिमयुग असें म्हणतात.

या अतिशय थंडीच्या काळांत सरपटणाऱ्या अजस्र प्राण्यांस जगणें अशक्य झालें, व त्यांतले बहुतेक सर्व मृत्युमुखीं पडले. या काळांत पृथ्वीवर उत्पन्न झालेली सर्व प्राणिसृष्टि नाहींशी व्हावयाची, पण तसें झालें नाहीं. कारण कांहीं प्राण्यांच्या अंगावर केस होते व कांहींच्या अंगावर पिसें होतीं. त्यामुळें उबदारपणा मिळून अतिशय थंडीपासून त्यांस आपला बचाव करून घेतां आला. तसेंच कांहीं प्राण्यांनीं वरील दोन्हीपैकीं कोणतीही गोष्ट नसतांनाही तशा परिस्थितींत आपला बचाव करून घेतला. वरील हिमयुग संपून पुनः उबदार हवामान पृथ्वीवर अस्तित्वांत आल्यावर वनस्पति व प्राणी यांची झपाट्यानें वाढ होऊन उत्क्रान्ति होत गेली व सस्तन प्राणी व पक्षी निर्माण झाले. पक्षांमध्यें अंडीं उबवून पिलें झाल्यावर त्यांची काळजी घेण्याची त्याचप्रमाणें सस्तन प्राण्यांमध्यें आपल्या पिलांची काळजी घेण्याची उपजत बुद्धि व आपलें ज्ञान पिलांस देण्याची इच्छा निर्माण झाली. ज्ञान संपादन करणें व तें पुढील पिढीस देणें ही गोष्ट अधिक चांगल्या रीतीनें करतां येण्यासाठीं मेंदूची वाढ प्राण्यांमध्यें होत गेली.

मनुष्यसदृश व मनुष्यप्राण्याची उत्क्रान्ति—(इ. स. पू. ३ लाख ते इ. स. पू. १०००००) अशाप्रकारें निरनिराळे प्राणी निर्माण होत असतां मनुष्यसदृश प्राणी उत्क्रान्त पावला. या प्राण्याचे अवशेष जगांत निरनिराळ्या ठिकाणीं सांपडले आहेत; व ज्या ठिकाणीं हे अवशेष सांपडले त्या ठिकाणांवरून त्या प्राण्यास शास्त्रज्ञांनीं निरनिराळीं नांवें दिलीं आहेत. जर्मनीमध्यें हायडेलबर्ग येथें असा एक अवशेष सांपडला. तो इ. स. पू. सुमारें ३ लाख वर्षांपूर्वीच्या काळांतील असावा. हा प्राणी मनुष्यप्राणी नसून मनुष्यास खूप जवळचा होता. हा मनुष्यापेक्षां खूपच ओबडधोबड व धट्टाकट्टा होता. त्यास हनुवटी नव्हती. त्यास निरनिराळे आवाज करणें शक्य असलें तरी शब्दोच्चार करणें शक्य नव्हतें. त्याच्या मेंदूची वाढ बरीच झाली असली तरी ती माणसाच्या मेंदूपेक्षां पुष्कळच कमी होती. त्याचे दांत मात्र मानवी प्राण्याच्या दांतांसारखे होते. तो जमिनीवर चाले, पण त्यास सरळ उभें राहून चालतां येत नव्हतें तर वांकून चालावें लागे. तो चवड्यावर चाले. हत्ती, घोडा,

गवा वगैरे प्राण्यांच्या मांसावर तो आपली उपजीविका करी. दगड हातांत धरून फेकणें त्यास येत असावें. त्यास शेपटी नव्हती. त्याच्या सर्वांगावर केस होते. हा प्राणी मनुष्यप्राण्यास पुष्कळ जवळचा असला तरी तो मनुष्यप्राणी नव्हता. अशाप्रकारें उत्क्रान्ति होत असतां जर्मनीमधील नेआनडेरताल (Neanderthal) येथें ज्या प्राण्याचे अवशेष सांपडले तो प्राणी मात्र मनुष्यप्राणी होता. हा अवशेष इ. स. पू. १००००० च्या सुमाराचा असावा. यानंतरही मनुष्यप्राण्यांत उत्क्रान्ति होत गेली. अशा उत्क्रान्त पावलेल्या मनुष्यप्राण्याचे अवशेष फ्रान्समधील क्रो-मॅगनॉन (Cro-Magnon) व ग्रिमल्डी येथें सांपडले. हे अवशेष इ. स. पू. सुमारें ३५००० वर्षांपूर्वीचे असावेत. याच्या सर्वांगांवर केस होते. हा दिसावयास पूर्वीच्या मनुष्यप्राण्यापेक्षां पुष्कळ बरा, पण ओबडधोबड होता. मॅमाथ (रानटी हत्ती), गवा, घोडा वगैरे प्राण्यांची शिकार करून तो आपली उपजीविका करी.

पृथ्वीच्या पोटांत गाडल्या गेलेल्या खडकांच्या थरांमध्यें वनस्पति व प्राणी यांचे अवशेष गाडले गेले व त्या खडकांचा छेद घेऊन व त्याचा अभ्यास करून पृथ्वीवर वनस्पतिसृष्टि व प्राणिसृष्टि कोणत्या क्रमानें उत्पन्न झाली असावी व नष्ट झाली असावी यासंबंधींचीं अनुमानें भूगर्भशास्त्रज्ञांनीं काढलेलीं आहेत व त्यावरून आपणांस त्यासंबंधाची माहिती मिळते.

हिमयुगें—शास्त्रज्ञांच्या मतें पृथ्वीवर सुमारें चार हिमयुगें होऊन गेलीं. त्यांचा काल प्रत्येकीं सुमारें २५००० वर्षांचा असावा. दोन हिमयुगांमध्यें उबदार युग होऊन गेलें व त्याचा काळ सुमारें १ लाख १॥ लाख वर्षांचा असावा. सध्यां आपण गेल्या हिमयुगाच्या काळांतून बाहेर आलों असून अधिक उबदार युगाकडे जात आहोंत. त्यामुळें आणखी ५०-७५ हजार वर्षांनीं पृथ्वीवर हल्लींपेक्षां अधिक उबदारपणा येईल. हीं हिमयुगें कां होत असावींत याचीं कारणें शास्त्रज्ञांसही समाधानकारकरीतीनें अवगत झालेली नाहींत.

सारांश

इतिहास म्हणजे अतिप्राचीन काळापासून आतांपर्यंत मनुष्याचा निसर्गाशीं, प्रतिकूल परिस्थितीशीं व इतर लोकसमूहांशीं संबंध येऊन संस्कृति-संघर्ष व संस्कृति-संगम कसा होत गेला व मानवी समाजाची सध्यांची स्थिति कशी बनली याची हकीगत.

प्रवाह ध्रुवप्रदेशापासून समशीतोष्ण प्रदेशापर्यंत पसरला. या काळास हिमयुग असें म्हणतात.

या अतिशय थंडीच्या काळांत सरपटणाऱ्या अजस्र प्राण्यांस जगणें अशक्य झालें, व त्यांतले बहुतेक सर्व मृत्युमुखीं पडले. या काळांत पृथ्वीवर उत्पन्न झालेली सर्व प्राणिसृष्टि नाहींशी व्हावयाची, पण तसें झालें नाहीं. कारण कांहीं प्राण्यांच्या अंगावर केस होते व कांहींच्या अंगावर पिसें होतीं. त्यामुळें उबदारपणा मिळून अतिशय थंडीपासून त्यांस आपला बचाव करून घेतां आला. तसेंच कांहीं प्राण्यांनीं वरील दोन्हींपैकीं कोणतीही गोष्ट नसतांनाही तशा परिस्थितींत आपला बचाव करून घेतला. वरील हिमयुग संपून पुनः उबदार हवामान पृथ्वीवर अस्तित्वांत आल्यावर वनस्पति व प्राणी यांची झपाट्यानें वाढ होऊन उत्क्रान्ति होत गेली व सस्तन प्राणी व पक्षी निर्माण झाले. पक्षांमध्यें अंडीं उबवून पिलें झाल्यावर त्यांची काळजी घेण्याची त्याचप्रमाणें सस्तन प्राण्यांमध्यें आपल्या पिलांची काळजी घेण्याची उपजत बुद्धि व आपलें ज्ञान पिलांस देण्याची इच्छा निर्माण झाली. ज्ञान संपादन करणें व तें पुढील पिढीस देणें ही गोष्ट अधिक चांगल्या रीतीनें करतां येण्यासाठीं मेंदूची वाढ प्राण्यांमध्यें होत गेली.

मनुष्यसदृश व मनुष्यप्राण्याची उत्क्रान्ति—(इ. स. पू. ३ लाख ते इ. स. पू. १०००००) अशाप्रकारें निरनिराळे प्राणी निर्माण होत असतां मनुष्यसदृश प्राणी उत्क्रान्त पावला. या प्राण्याचे अवशेष जगांत निरनिराळ्या ठिकाणीं सांपडले आहेत; व ज्या ठिकाणीं हे अवशेष सांपडले त्या ठिकाणांवरून त्या प्राण्यास शास्त्रज्ञांनीं निरनिराळीं नांवें दिलीं आहेत. जर्मनीमध्यें हायडेलबर्ग येथें असा एक अवशेष सांपडला. तो इ. स. पू. सुमारें ३ लाख वर्षांपूर्वीच्या काळांतील असावा. हा प्राणी मनुष्यप्राणी नसून मनुष्यास खूप जवळचा होता. हा मनुष्यापेक्षां खूपच ओबडधोबड व धट्टाकट्टा होता. त्यास हनुवटी नव्हती. त्यास निरनिराळे आवाज करणें शक्य असलें तरी शब्दोच्चार करणें शक्य नव्हतें. त्याच्या मेंदूची वाढ बरीच झाली असली तरी ती माणसाच्या मेंदूपेक्षां पुष्कळच कमी होती. त्याचे दांत मात्र मानवी प्राण्याच्या दांतांसारखे होते. तो जमिनीवर चाले, पण त्यास सरळ उभें राहून चालतां येत नव्हतें तर वांकून चालावें लागे. तो चवड्यावर चाले. हत्ती, घोडा,

गवा वगैरे प्राण्यांच्या मांसावर तो आपली उपजीविका करी. दगड हातांत धरून फेकणें त्यास येत असावें. त्यास शेपटी नव्हती. त्याच्या सर्वांगावर केस होते. हा प्राणी मनुष्यप्राण्यास पुष्कळ जवळचा असला तरी तो मनुष्यप्राणी नव्हता. अशाप्रकारें उत्क्रान्ति होत असतां जर्मनीमधील नेआनडेरताल (Neanderthal) येथें ज्या प्राण्याचे अवशेष सांपडले तो प्राणी मात्र मनुष्यप्राणी होता. हा अवशेष इ. स. पू. १००००० च्या सुमाराचा असावा. यानंतरही मनुष्यप्राण्यांत उत्क्रान्ति होत गेली. अशा उत्क्रान्त पावलेल्या मनुष्यप्राण्याचे अवशेष फ्रान्समधील क्रो-मॅगनॉन (Cro-Magnon) व ग्रिमल्डी येथें सांपडले. हे अवशेष इ. स. पू. सुमारें ३५००० वर्षांपूर्वीचे असावेत. याच्या सर्वांगांवर केस होते. हा दिसावयास पूर्वीच्या मनुष्यप्राण्यापेक्षां पुष्कळ बरा, पण ओबडधोबड होता. मॅमाथ (रानटी हत्ती), गवा, घोडा वगैरे प्राण्यांची शिकार करून तो आपली उपजीविका करी.

पृथ्वीच्या पोटांत गाडल्या गेलेल्या खडकांच्या थरांमध्यें वनस्पति व प्राणी यांचे अवशेष गाडले गेले व त्या खडकांचा छेद घेऊन व त्याचा अभ्यास करून पृथ्वीवर वनस्पतिसृष्टि व प्राणिसृष्टि कोणत्या क्रमानें उत्पन्न झाली असावी व नष्ट झाली असावी यासंबंधींचीं अनुमानें भूगर्भशास्त्रज्ञांनीं काढलेलीं आहेत व त्यावरून आपणांस त्यासंबंधाची माहिती मिळते.

हिमयुगें—शास्त्रज्ञांच्या मतें पृथ्वीवर सुमारें चार हिमयुगें होऊन गेलीं. त्यांचा काल प्रत्येकीं सुमारें २५००० वर्षांचा असावा. दोन हिमयुगांमध्यें उबदार युग होऊन गेलें व त्याचा काळ सुमारें १ लाख १॥ लाख वर्षांचा असावा. सध्यां आपण गेल्या हिमयुगाच्या काळांतून बाहेर आलों असून अधिक उबदार युगाकडे जात आहोंत. त्यामुळें आणखी ५०–७५ हजार वर्षांनीं पृथ्वीवर हल्लींपेक्षां अधिक उबदारपणा येईल. हीं हिमयुगें कां होत असावींत याचीं कारणें शास्त्रज्ञांसही समाधानकारकरीतीनें अवगत झालेली नाहींत.

सारांश

इतिहास म्हणजे अतिप्राचीन काळापासून आतांपर्यंत मनुष्याचा निसर्गाशीं, प्रतिकूल परिस्थितीशीं व इतर लोकसमूहांशीं संबंध येऊन संस्कृति-संघर्ष व संस्कृति-संगम कसा होत गेला व मानवी समाजाची सध्यांची स्थिति कशी बनली याची हकीगत.

कालखंड—जगाच्या इतिहासाचे विशेषतः युरोपच्या इतिहासाचे प्रमुख कालखंड. (१) प्राचीन विभाग इ. स. पू. १००००० ते इ. स. ५००; (२) मध्ययुग इ. स. ५०० ते इ. स. १५००; (३) अर्वाचीन विभाग इ. स. १५०० पासून.

पृथ्वीची उत्पत्ति व तीवरील वनस्पति व प्राणी यांची उत्क्रान्ति—

२०० कोटी वर्षांपूर्वी सूर्याचा कांहीं भाग दूर फेकला गेला व त्याचे ग्रह बनले.

२०० कोटी ते ३० कोटी पृथ्वी अचेतन स्थितींत.

३० कोटी ते इ. स. पू. १००००० पृथ्वीवर वनस्पति व मनुष्याखेरीज इतर प्राणी-जीवनाची उत्क्रान्ति. इ. स. पू. १००००० सुमारें मनुष्याची उत्पत्ति.

प्रकरण २ रें

अतिप्राचीन काळांतील मानवी जीवन

(इ. स. पू. १००००० ते इ. स. पू. ५०००)

पाषाणयुग—इ. स. पू. १००००० पासून इ. स. पू. ५००० वर्षांपर्यंतच्या काळास पाषाणयुग असें म्हणतात. या काळांत मनुष्य सुरुवातीस अगदीं रानटी स्थितींत असून त्यास धातूंचा शोध लागलेला नव्हता. तेव्हां आपलें संरक्षण करण्यासाठीं त्यास उपलब्ध असलेल्या कठीण पदार्थांची म्हणजे पाषाण किंवा दगड त्याचप्रमाणें लाकडें यांचीं आयुधें करावीं लागत. म्हणून या काळास स्थूलमानानें पाषाणयुग असें म्हणण्यांत येतें. या प्रदीर्घ काळाचें साधारणतः दोन विभाग पाडण्यांत येतात व ते म्हणजे (अ) जुनें पाषाणयुग व (ब) नवें पाषाणयुग हे होत. जुन्या पाषाणयुगांतील त्याचीं दगडी आयुधें ओबडधोबड होतीं. पण नव्या पाषाणयुगांत तो तीं तीक्ष्ण व सुबक बनवूं लागला.

(अ) जुन्या पाषाणयुगांतील मानवी जीवन (इ. स. पू. १००००० ते इ. स. पू. १००००) — अन्न, आच्छादन, निवाऱ्याची जागा या इतर प्राण्यांप्रमाणें मनुष्याच्याही प्राथमिक गरजा आहेत. रानावनांत राहणारे लांडगे, वाघ, रेडे, माकडें, यांस आपल्या प्राथमिक गरजांमध्यें व त्या मिळविण्याच्या साधनांमध्यें बदल करतां आला नाहीं व प्राचीन काळीं त्यांचें जसें जीवन होतें तसें सध्यांही आहे. पण मनुष्यानें आपल्या बुद्धिसामर्थ्यानें आपल्या गरजांमध्यें व त्या मिळविण्याच्या साधनांमध्यें कितीतरी बदल घडवून आणला आहे. पण हा बदल घडवून आणतांना त्यास प्रतिकूल परिस्थितीशीं सहस्रावधी वर्षें झगडावें लागलें. इतर प्राण्यांच्या मानानें मनुष्य हा शारीरिकदृष्ट्या दुर्बल असा प्राणी असल्यामुळें रानावनांतील इतर हिंस्र प्राण्यांपासून आपलें संरक्षण करून घेतांना पुष्कळ मृत्युमुखीं पडत. त्यामुळें अतिप्राचीन काळीं मनुष्य हा क्वचितच आढळणारा प्राणी होता. त्यावेळची त्याची वृत्ति शिकारी व भटकी होती. रानावनांत यदृच्छेनें सांपडणारीं कंद, मुळें, फळें व पशुपक्षी यांच्यावर त्यास आपली उपजीविका करावी लागून या गोष्टी जेथें

उपलब्ध होत अशा ठिकाणाजवळ राहावें लागें. त्याचें त्यावेळचें राहणें स्थाईक नव्हतें. एका ठिकाणचें उपजीविकेचें साधन कमी झालें म्हणजे तो तें ठिकाण सोडून दुसरीकडे जाई. डोंगराच्या गुहेंत किंवा झाडांच्या कपारींत राहून तो थंडीवाऱ्यापासून आपलें निवारण करी. त्यास आपल्या रक्षणासाठीं झाडांच्या डहाळ्या, हाडें, त्यानें केलेलीं दगडाचीं ओबडधोबड आयुधें यांवरच मुख्यत्वें अवलंबून राहावें लागे. म्हणून सुमारें १०००० वर्षांच्या या प्रदीर्घ काळास **जुनें पाषाणयुग** असें म्हणण्यांत येतें. पण इतर प्राण्यांच्या मानानें मनुष्याचा मेंदू मोठा होता. त्यास हात व बोटें हेोतीं. त्यामुळें त्यानें आपल्या बुद्धिसामर्थ्यानें व हातानें, इतर प्राण्यांस ज्या गोष्टी साध्य करून घेतां आल्या नाहींत, त्या साध्य करून घेतल्या व आपली प्रगति करून घेतली. या काळांत मनुष्य गट करून राहूं लागला व कुटुंबसंस्था नैसर्गिकरीत्या अस्तित्वांत आली. कुटुंबांत मुलांचा सांभाळ करण्याचें काम स्त्रीकडे असे. कुटुंबांतील अधिक धट्टाकट्टा मनुष्य कुटुंबाचा मुख्य असे. पण तो वृद्ध किंवा कमकुवत झाला म्हणजे त्याला दूर करून दुसरा अधिक प्रबळ मनुष्य कुटुंबाचा प्रमुख होई. कालांतरानें जवळजवळ राहणाऱ्या कुटुंबाची जमात किंवा टोळी बनली जाई. मानवी प्राण्याची राहणी अशी प्राथमिक स्वरूपाची असतां त्याला हळकें हळकें पुढील गोष्टी करतां येऊं लागल्या : (१) हिंस्र पशूंपासून आपलें व आपल्या कुटुंबांतील माणसांचें संरक्षण करण्यासाठीं यदृच्छेनें सांपडणाऱ्या कठीण पदार्थांचीं— गारगोटी, दगड, हाडें, झाडांच्या फांद्या—तो ओबडधोबड आयुधें करूं लागला. (२) थंडीवाऱ्यापासून आपलें संरक्षण करण्यासाठीं मेलेल्या जनावरांच्या कातड्यांचा व झाडांच्या सालींचा त्यास उपयोग करतां येऊं लागला. (३) आपल्या मनांतील आशय दुसऱ्यास कळविण्यासाठीं खुणा करणें, वेगवेगळे आवाज करणें या गोष्टी त्यास करतां येऊं लागल्या. कालांतरानें यापासूनच ओबडधोबड बोली व भाषा निर्माण झाली. (४) आपल्या गुहेंत तो पाहिलेलीं जनावरें व पक्षी चितारून ठेवी. यापासून पुढें चित्रकला व लिपी निर्माण झाली. (५) अरण्यांत बीज पडून किंवा झाडांच्या फांद्यांच्या घर्षणामुळें वणवा लागून त्यास विस्तवाची माहिती झाली; व त्याचा उपयोग करतां येऊं लागला. त्याचप्रमाणें गारगोट्यांचें एकमेकांवर घर्षण केल्यास विस्तव उत्पन्न होतो हाही शोध त्यास लागला. **विस्तवाचा शोध** हा जुन्या पाषाण–युगांतील अतिशय

महत्त्वाचा शोध होता. विस्तवाच्या या शोधानें त्याच्या गुहेंत रात्रीच्या वेळीं उष्णता व उजेड करणें त्यास शक्य झालें. आतांपर्यंत त्यास उजेड व उष्णता यासाठीं सूर्यप्रकाशावरच अवलंबून राहावें लागे. विस्तवाच्या शोधामुळें त्यास आपली पुढील प्रगति झपाट्यानें करतां येणें शक्य झालें. जुन्या पाषाणयुगांत मनुष्याची वृत्ति शिकारी व भटकी असल्यामुळें या युगास "शिकारी युग" असेंही म्हणण्यांत येतें.

(ब) नव्या पाषाणयुगांतील मानवी जीवन (इ. स. पू. १०००० ते इ. स. पू. ५०००)—या काळांत मनुष्यास आणखी महत्त्वाचे शोध लागले व त्यामुळें त्यास आपली प्रगति अधिक झपाट्यानें करितां आली.

मातीचीं भांडीं—विस्तवाच्या शोधामुळें ओल्या मातीचीं भांडीं करून त्यास उष्णता दिल्यास तीं खूप टणक होतात हें त्यास कळून आलें. त्यामुळें पाणी सांठविणें, अन्न शिजविणें, निरनिराळ्या जिनसांचा संग्रह करून ठेवणें यासाठीं तो मातीचीं भांडीं करूं लागला. त्याचा हा एक प्रमुख उद्योग झाला.

शेतीची कला—मनुष्य हा डोंगराच्या गुहेंत किंवा झाडाच्या कपारींत राहात असतां वाऱ्यानें किंवा पक्ष्याच्या चोचींतून ओलसर अशा भुसभुशीत जमिनीवर बीं पडल्यास त्यास अंकुर येतो, व त्याचें रोपटें व झाड होऊन त्यास फळेंही येतात हें त्यानें पाहिलें. तेव्हां तो स्वतः बीं पेरण्याचा प्रयोग करूं लागला व त्यासही धान्य व फळें येतात हें त्यास दिसून आलें. या शोधामुळें यदृच्छेनें सांपडणाऱ्या कंदमुळें-फळें यांवर अवलंबून न राहतां आपणांस इच्छित ठिकाणीं धान्य व कंदमुळें-फळें पिकविणें शक्य आहे हें त्यास कळून आलें. त्यामुळें आपली शिकारी व भटकी वृत्ति सोडून जेथें पाण्याचा मुबलक सांठा आहे, अशा नदीच्या कांठीं राहून तो शेती करूं लागला.

पशुपालन कला—मनुष्यप्राणी पूर्वी गुहेंत किंवा झाडाच्या ढोलींत राहात असतां तेथें टाकून दिलेले पदार्थ खाण्यासाठीं कुत्रा, शेळी, गाढव, गाय वगैरे प्राणी येतात व ते माणसाळतात हें त्यानें अवलोकन केलें. या शोधावरून तो आपणांस उपयुक्त असे प्राणी माणसाळवूं लागला व त्यांचे कळप पाळूं लागला. या शोधामुळें दूध, मांस, राखण व वाहतुक या बाबींसंबंधानें त्याची काळजी दूर झाली.

विणण्याची कला—अरण्यांत सांपडणाऱ्या कांहीं झाडांपासून व वनस्पतीपासून धागे निघतात व ते उभे आडवे गुंफल्यास त्यांपासून आपणांस उपयुक्त जिनसा करतां येतील हें त्यास कळून आलें. अशा रीतीनें ओबडधोबड चटया करणें व वस्त्रें विणणें आणि त्याचोगें थंडीवाऱ्यापासून आपलें निवारण करणें त्यास शक्य झालें.

झोपड्या बांधणें—शेती व पशुसंगोपन या गोष्टींमुळें मनुष्याच्या जीवनास स्थायिकपणा आला. तो आतां डोंगरांतील गुहा किंवा झाडांची ढोली यांत न राहतां, माती, लांकूड, पालापाचोळा यांच्या योगानें शेतीच्या ठिकाणीं व नदीजवळ झोपडी बांधून राहूं लागला.

धातूंचा शोध—स्वसंरक्षणार्थ मनुष्यास दगडाचीं आयुधें करावीं लागत व त्यासाठीं टणक अणकुचीदार अशा दगडांचा उपयोग करावा लागे. हीं दगडाचीं आयुधेंही तो तीक्ष्ण व सुबक करूं लागला. अशा प्रकारें चांगले दगड शोधून काढून ते घासून अणकुचीदार करीत असतां दगडामध्यें असलेलें पण दगडापेक्षां वेगळे व चमकणारे कण त्याच्या नजरेस आले. ते दगडापेक्षां अधिक टणक आहेत व विस्तवांत खूप तापविले असतां ते एकजीव होऊन त्यांस वाटेल तो आकार देतां येतो, हें त्यानें पाहिलें. अशारीतीनें तांबें, लोखंड, सोनें वगैरे निरनिराळ्या धातूंचा त्यास शोध लागला व त्याच्या निरनिराळ्या उपयुक्त वस्तू करतां येतील हें त्यास कळून आलें. विस्तवाच्या शोधाप्रमाणें **धातूंचा शोधहि** महत्त्वाचा होता. कारण त्यामुळें मानवी जीवनांत मोठी क्रांति झाली व त्यामुळें त्यास यापुढील प्रगति अधिक लवकर करतां आली. धातूंचा शोध लागल्यावर त्यास धातूपासून कुऱ्हाड, पहार, तलवार, भाला, कुदळ, भांडींकुडीं वगैरे वेगवेगळ्या जिनसा करतां येऊन त्यामुळें स्वसंरक्षण, शत्रूवर हल्ला, शेती, प्रवाही पदार्थ सांठविण्यास व अन्न शिजविण्यास भांडींकुंडीं, लाकडें तोडणें वगैरे कितीतरी गोष्टी करतां येऊन त्याचें जीवन पूर्वीपेक्षां कितीतरी पटींनें अधिक सुखकर होऊं लागलें. धातूच्या या शोधामुळें स्वसंरक्षणार्थ दगडाच्या आयुधावर अवलंबून न राहतां त्यास धातूचीं भक्कम व तीक्ष्ण आयुधें करतां येऊन आपलें संरक्षण अधिक चांगल्या रीतीनें करणें शक्य झालें.

गाडा—इकडून तिकडे जाण्यासाठीं व ओझें नेण्यासाठीं बैल, गाढव

2045 वि. 3078 वि.
क्रमांक ... 6483 ... नां: दि: 2.4.1988

वगैरे जनावरांचा तो उपयोग करूं लागला होता. त्याचप्रमाणें त्यास चाकाची युक्ति सुचून थोडक्या श्रमानें बरेंच ओझें इकडून तिकडें नेणें शक्य आहे हें त्यास कळून आलें व तो चाकें असलेले गाडे तयार करूं लागला. या चाकाच्या शोधामुळें वाहतुकीच्या कामीं मोठीच क्रांति झाली.

नावा—पाण्यांत लाकडाचे ओंडके तरंगतात हें पाहून तो नदींतून इकडून तिकडे जाण्यासाठीं व सामान वाहून नेण्यासाठीं लाकडाचे तरफ व ओबडधोबड नावाही करूं लागला. त्यामुळें नदीपासून अडथळा होण्याऐवजीं मोठमोठ्या संथ प्रवाहाच्या नद्या वहातुकीच्या कामीं उपयुक्त होऊं लागल्या.

लेखनकला— मनुष्यप्राणी आपल्या मनांतील आशय दुसऱ्यास खाणाखुणा करून व वेगवेगळे आवाज करून कळवी. त्यामुळें अगदीं प्राथमिक अवस्थेतील ओबडधोंबड बोली निर्माण झाली व तिचीच प्रगति होऊन भाषा बनत चालली. पण मनुष्यास लेखनकला अवगत नसल्यामुळें त्याच्या मनांतील आशय, त्याचा विचार, त्याचा अनुभव, त्याचें ज्ञान, त्याच्या अपरोक्ष किंवा त्याच्या मृत्यूनंतर इतरांस किंवा पुढील पिढीस कळविण्याचें साधन नव्हतें. तेव्हां प्रत्येक पिढीस तेंच तेंच ज्ञान पुन्हां मिळवावें लागे व त्यामुळें ज्ञानाची प्रगति होणें बरेंच अवघड होतें. पण हळकें हळकें मनुष्य आपल्या मनांतील आशय दुसऱ्यास कळविण्यासाठीं दगडावर, लाकडावर अगर दुसऱ्या एखाद्या टणक वस्तूवर खुणा करूं लागला. या खुणा ज्या वस्तूबद्दल त्याला सांगावयाचें आहे अशा वस्तूंचीं चित्रें काढून बनविल्या जाऊं लागल्या. यापासून चित्रालिपीचा उगम झाला. पण हजारों वस्तूंस वेगवेगळ्या खुणा देणें व त्या ओळखणें बरेंच अवघड होतें. तेव्हां कांहीं ठिकाणीं वस्तूच्या ऐवजीं उच्चारास खूण देण्याचा प्रघात पडला. कांहीं ठिकाणीं सर्व शब्दांच्या उच्चारास किंवा त्याच्या अवयवाच्या उच्चारास खूण देण्यांत येऊं लागली. यानंतर कांहीं ठिकाणीं सुट्या मुळाक्षरास वेगवेगळी खूण देण्याची पद्धत सुरू झाली. या सर्व पद्धति वेगवेगळ्या ठिकाणीं सुरू झाल्या व त्या उपयोगांत येऊं लागण्यास हजारों वर्षेंही घालवावीं लागलीं. पण एकदां चित्रलिपी किंवा त्याहून अधिक सुटसुटीत असलेली **अक्षरलिपी** उपयोगांत आणली जाऊं लागल्यावर आपला अनुभव, आपलें ज्ञान, आपले विचार, आपल्या अपरोक्ष किंवा आपल्या

मृत्यूनंतर पुढील पिढीस कळविण्याचें प्रभावी साधन निर्माण झालें व त्यामुळें मिळालेलें ज्ञान जतन करून ठेवणें व त्यांत नवीन भर घालणें मानवी समाजास शक्य झालें व त्याची कल्पनातीत प्रगति होऊं लागली.

धर्मकल्पना—निसर्गांत दिसणाऱ्या व आढळून येणाऱ्या निरनिराळ्या गोष्टींमुळें मनुष्यप्राणी पहिल्यानें भांबावून गेला, व या गोष्टींचें कार्यकारण काय असावें याचा विचार करूं लागला. पाऊस कां पडतो व तो कोण पाडतो, सूर्य कांहीं वेळ आकाशांत असतो व त्यावेळीं त्याच्यापासून आपणांस प्रकाश मिळतो, पण नंतर तो नाहींसा होतो तेव्हां तो कोठें जातो, आकाशांत वीज कां चमकते, गारगोट्यांचें एकमेकांवर घर्षण केल्यास अग्निस्फुलिंग कां निर्माण होतो व तो कोण निर्माण करतो ? मनुष्य मरतो म्हणजे काय होतें, तो पुनः जिवंत होईल काय वगैरे अनेक गोष्टींबद्दल मनुष्य विचार करूं लागला. ज्या गोष्टीमुळें व ज्या वस्तुमुळें आपलें जीवन सुखकर झालें त्यांकडे तो कृतज्ञता-बुद्धीनें पाहूं लागला व त्याबद्दल त्यास एक प्रकारचा आदर वाटून त्या गोष्टी पूज्य व वंदनीय वाटूं लागल्या. उष्णता देणारा विस्तव, प्रकाश देणारा सूर्य, दूध देणारी गाय, फळें देणारा वृक्ष, पाणी देणारी नदी वगैरे गोष्टी पूजनीय, वंदनीय आहेत असें वाटून कृतज्ञताबुद्धीनें तो त्यांची पूजा करूं लागला. तसेंच या सर्व गोष्टी निर्माण करणारी व हा सृष्टीचा पसारा नियमितपणें चालविणारी एकादी शक्ति आहे कीं काय, असल्यास तिचें स्वरूप काय असावें याविषयीं तो विचार करूं लागला. अशारीतीनें धर्मकल्पनांचा उगम झाला.

राज्यसंस्था—मनुष्य पहिल्यानें कुटुंब करून राहूं लागला. अशीं वेगवेगळीं कुटुंबें जवळ जवळ राहात गेलीं. एकमेकांच्या सान्निध्यानें त्यांच्यांत कांहीं प्रसंगीं तंटे होत तरी बऱ्याच प्रसंगीं एकमेकांपासून मदत होई. त्यामुळें त्यांच्या जमाती, टोळ्या बनल्या. त्यांच्यांतील व्यवहार, उद्योगधंदेही वाढत गेले. निरनिराळ्या जमातींतील लोक आपल्यांतील एखाद्या कर्तबगार, पराक्रमी पुरुषास आपल्या जमातीचा प्रमुख समजत. सर्व जमातीचा कारभार व्यवस्थितपणें चालावा म्हणून पूर्वापार चालत आलेल्या रूढी, चालीरिती योग्य रीतीनें पाळल्या जातात कीं नाहीं, हें पाहण्यांत येऊं लागलें. तसेंच या सर्व गोष्टी नीट रीतीनें अमलांत आणण्यासाठीं व जमातीचें संरक्षण करण्यासाठीं राज्यसंस्था निर्माण झाली.

नव्या पाषाणयुगांत मनुष्यास शेतीचें ज्ञान मिळून तो स्थाइक झाल्यामुळें या युगास 'शेतकी–युग' असेंही म्हणण्यांत येतें.

निरनिराळ्या ठिकाणच्या जमातींची प्रगति—अशारीतीनें इ. स. पू. १०००० पासून इ. स. पू. ५००० पर्यंतच्या काळांत पृथ्वीवर निरनिराळ्या ठिकाणीं विखुरलेल्या जमातींस शेती करणें, वस्त्रें विणणें, मातीचीं मडकीं करणें, धातूंचीं भांडीं, शेतीस उपयोगी पडणारीं आयुधें, शस्त्रें करणें, आपले विचार दुसऱ्यास कळविण्यासाठीं भाषा वापरणें, आपलें ज्ञान जतन करून ठेवण्यास लेखनकला उपयोगांत आणणें वगैरे गोष्टी येऊं लागल्या. त्याचप्रमाणें, कुटुंब, जमात, टोळी वाढून तिचा कारभार व्यवस्थित व्हावा म्हणून प्राथमिक स्वरूपाची राज्यव्यवस्था व इतर सामाजिक संस्थाही स्थापन झाल्या. वर निर्देश केलेले सर्व शोध निरनिराळ्या ठिकाणीं विखुरलेल्या सर्व जमातीस लागले असतील व ते एका क्रमानेंच लागले असतील असें नाहीं. तर कांहीं ठिकाणच्या जमातींस तेथील विशेष परिस्थितीमुळें कांहीं शोध अगोदर लागले तर कांहींस ते मागून लागले, तर कांहीं ठिकाणच्या जमातींस यांपैकीं फारच थोडे शोध लागून त्यांचें जीवन पाषाणयुगांतील मनुष्यांप्रमाणें रानटी स्थितींतच राहिलें.

निरनिराळे मानववंश व त्यांचें मूळ ठिकाण—वनस्पतिसृष्टि व प्राणिसृष्टि यांची उत्क्रांति होऊन लक्षावधी वनस्पति व प्राणी निर्माण होत असतां इ. स. पू. १००००० वर्षांच्या सुमारास मनुष्यप्राणी निर्माण झाला. पण तो पहिल्यानें कोठें निर्माण झाला हें सांगतां येत नाहीं. आशिया, युरोप, आफ्रिका या खंडांच्या निरनिराळ्या भागांत अति प्राचीनकाळच्या मानवी प्राण्यांचे अवशेष इ. स. पू. १००००० पासून इ. स. पू. ३५००० या काळांतील आहेत. रानावनांत सांपडणारीं कंदमुळें, फळें व पशुपक्षी यांवर उपजीविका करावी लागल्यामुळें त्यास आपल्या भक्ष्याच्या शोधार्थ हिंडावें लागे. त्यामुळें जरी तो पहिल्यानें विशिष्ट ठिकाणीं निर्माण झाला असला तरी त्यास भोंवतालच्या दूर ठिकाणींही जावें लागलें. अशा रीतीनें मानवी जमाती प्राचीन काळीं पृथ्वीच्या सर्व भागांत पसरल्या गेल्या. या जमाती रंग, रूप, शरिराची ठेवण या बाबतींत पहिल्यानें एकमेकांपासून वेगवेगळ्या असल्या तरी प्राचीन

काळीं निरनिराळ्या जमातींचा एकमेकांशीं संबंध येऊन त्यांच्यामध्यें वर्णसंकर होणें, एकमेकांच्या भाषेंतील कांहीं शब्द दुसऱ्या जमातीच्या भाषेंत जाणें शक्य झालें. तेव्हां मूळचे मानवी वंश कोणते, त्यांच्या मूळ भाषा कोणत्या व त्यांचें मूळ ठिकाण कोणतें हें अनिश्चित आहे. तरी या बाबतींत उपलब्ध असलेल्या माहितीवरून शास्त्रज्ञांनीं कांहीं अनुमानें काढलीं आहेत. त्यावरून आर्यांचें मूळ वसतिस्थान मध्य आशियाचा पश्चिम भाग, मंगोलियन लोकांचें मंगोलिया, सेमिटिक (Semitic) लोकांचें अरबस्तान, ऑस्ट्रिक लोकांचें आग्नेय आशिया व निग्रोईट लोकांचें मध्य आफ्रिका हें असावें.

सारांश

पाषाणयुग—इ. स. पू. १०००००० ते इ. स. पू. ५००० (अ) जुनें पाषाणयुग—इ. स. पू. १०००००० ते इ. स. पू. १०००० (ब) नवें पाषाणयुग—इ. स. पू. १०००० ते इ. स. पू. ५०००

(अ) जुन्या पाषाणयुगांतील मानवी जीवन—

(१) शिकारी वृत्ति—भटकी वृत्ति;

अन्न—पशु, पक्षी, मासे, कंद, मूळ, फळें यांची शिकार

वस्त्र—पशूंचीं कातडीं, झाडांच्या साली.

निवाऱ्याची जागा—डोंगरांतील गुहा. झाडांच्या ढोली.

स्वसंरक्षणार्थ दगडाचीं व लाकडाचीं ओबडधोबड आयुधें. यांपैकीं कठीण असा पदार्थ म्हणजे दगड म्हणून या युगास पाषाणयुग हें नांव.

बोली—आपल्या मनांतील आशय दुसऱ्यास कळविण्यासाठीं वेगवेगळे आवाज करणें.

शोध—जुन्या पाषाणयुगाच्या शेवटीं शेवटीं **विस्तवाचा शोध** हा महत्त्वाचा शोध व त्यामुळें मानवी जीवनांत क्रान्ति. या शोधामुळें (१) उष्णता व रात्रीच्या वेळीं उजेड मिळूं लागला. (२) पदार्थ भाजणें या गोष्टी करतां येऊं लागल्या.

(ब) नव्या पाषाणयुगांतील मानवी जीवन—

(१) मातीचीं भांडीं—मडकीं, रांजण करणें. पदार्थांचा साठा करून ठेवणें व अन्न शिजविणें

(२) शेती—धान्य व फळें पिकविणें-सातू, गहूं, बाजरी.

(३) पशुपालन–कुत्रा, गाय, शेळी, गाढव, घोडा
अन्न–दूध व मांस; रक्षण; कष्टाचीं कामें करणें; वहातूक.

(४) वस्त्र–धागे व तंतू यांचीं ओबडधोबड वस्त्रें व चटाया विणणें.

(५) संरक्षण–दगडाचीं व गारगोटीचीं सुबक व अणकुचीदार हत्यारें करणें, धनुष्यबाण.

(६) निवाऱ्याची जागा–झोपड्या बांधणें.

(७) भाषा–आपलें मनोगत कळविण्यासाठीं निरनिराळ्या आवाजापासून बोली व भाषा निर्माण झाली.

(८) जमात–कुटुंब, जमात, टोळी करून राहणें.

(९) धर्मकल्पना–नैसर्गिक घडामोडींबद्दल अचंबा. निसर्ग पूजा, पूर्वज पूजा.

या नव्या पाषाणयुगाच्या शेवटीं मनुष्यास खालील महत्त्वाचे शोध लागले व त्यामुळें त्याची यापुढील प्रगति झपाट्यानें होऊं लागल्यामुळें पाषाणयुग संपुष्टांत आलें.

(१) धातूंचा शोध–धातूंचीं हत्यारें व भांडींकुंडीं होऊं लागलीं.

प्रकरण ३ रें

प्राचीन काळांतील संस्कृत्या

(इ. स. पू. ५००० ते इ. स. पू. ३०० सुमारें)

(अ) इजिप्तमधील प्राचीन संस्कृति (इ. स. पू. ५००० ते इ. स. पू. ३३२)

(ब) मेसापोटेमियांतील प्राचीन संस्कृति (इ. स. पू. ५००० ते इ. स. पू. ५३९)

(क) भारतांतील प्राचीन संस्कृति (इ. स. पू. ५००० ते इ. स. पू. ३२२)

(ड) चीनमधील प्राचीन संस्कृति (इ. स. पू. ५००० ते इ. स. पू. २०६)

प्राचीन संस्कृति – प्रास्ताविक :

संस्कृति म्हणजे काय — संस्कृति हा बराच व्यापक शब्द आहे. एखाद्या समाजाची संस्कृति म्हणजे त्या समाजाचे आचारविचार होत. आचारांमध्यें त्याची राहणी, त्याचे सामाजिक, राजकीय व आर्थिक व्यवहार, त्याच्या रीतीभाती, त्याचीं घरेंदारें, त्यार्चे बांधकाम, त्याच्या कलाकौशल्याच्या गोष्टी, त्याचे उद्योगधंदे या सर्व गोष्टींचा विचार केलेला असतो. विचारांमध्यें त्याच्या सामाजिक, धार्मिक, राजकीय व आर्थिक बाबींसंबंधाच्या कल्पना, त्याच्या दंतकथा, आख्यायिका, पुराणें, वाङ्मय, त्यानें स्थापिलेल्या राजकीय, सामाजिक व धार्मिक बाबींसंबंधाच्या संस्था वगैरे गोष्टींचा समावेश होतो.

संस्कृति कोठें उगम पावते व वाढीस लागते — अन्न, वस्त्र व निवाऱ्याची जागा या मनुष्याच्या तीन प्राथमिक गरजा आहेत. या भागविण्यासाठीं त्यास अतिप्राचीन काळीं ठिकठिकाणीं भटकावें लागे. त्यामुळें मनुष्याची पहिली वृत्ति भटकी व शिकारी होती. पण मनुष्याच्या ज्ञानांत भर पडून पिण्यास व शेतीस जेथें मुबलक व सतत गोडें पाणी मिळण्याची शक्यता असते अशा ठिकाणीं म्हणजे मोठ्या नद्यांच्या कांठच्या सुपीक प्रदेशामध्यें मनुष्य राहूं

लागतो. त्यास तेथें फुरसत मिळून केवळ प्राथमिक गरजा भागविण्यावर तो संतुष्ट न राहतां इतर गोष्टींसंबंधींहि तो विचार करूं लागतो. म्हणून प्राचीन काळीं मोठ्या नद्यांच्या कांठीं संस्कृत्यांचा उगम झाला व त्या वाढीस लागून समृद्ध झाल्या. या मोठ्या नद्यांचा कांठचा प्रदेश सुपीक व सोयीस्कर असल्यामुळें तो आपल्या ताब्यांत आणण्यासाठीं इतर जमातींचे व टोळ्यांचेहि प्रयत्न होऊं लागत. त्यामुळें तेथें निरनिराळ्या जमातींमध्यें वारंवार युद्धप्रसंग होऊन प्रबळ असलेली जमात कमकुवत जमातीवर आपलें वर्चस्व बसवी. दोन जमातींमध्यें असा संघर्ष होत असतां कांहीं वेळां दोन्ही जमातींच्या संस्कृतींचा एकमेकांवर परिणाम होऊन संस्कृति ती संगम होई व संस्कृतींच्या मिश्रणानें एक विशिष्ट प्रकारची संस्कृतिही निर्माण होई.

प्राचीन काळीं इजिप्त (मिसर) मध्यें नाईल नदीच्या कांठीं, टायग्रीस व युफ्रेटीस या नद्यांमधील मेसापोटेमिया या प्रदेशांत, सिंधु नदीच्या कांठीं भारतामध्यें व चीनमध्यें होआँग-हो या नदीच्या कांठीं संस्कृत्या अस्तित्वांत आल्या. त्या सर्वांची माहिती एकत्र व एकाच ठिकाणीं देणें योग्य झालें असते. पण त्यामुळें गोंधळ होण्याचा संभव असल्यामुळें विषयविवेचनाच्या सोयीसाठीं ती एकाच प्रकरणांत पण वेगवेगळ्या विभागांत दिली आहे. तरी या निरनिराळ्या ठिकाणच्या प्राचीन संस्कृत्या समकालीन होत्या हें लक्षांत ठेवणें जरूर आहे. या प्राचीन संस्कृत्यांपैकीं इजिप्त, मेसापोटेमिया (सुमेर, बॅबिलोनिया, असेरिया) येथील प्राचीन संस्कृत्या कालाच्या ओघांत नष्ट झाल्या. पण जगाच्या पाठीवर भारत व चीन हे दोनच देश असे आहेत कीं, प्राचीन काळीं तेथील संस्कृत्या ज्यांनीं घडविल्या व त्यांची जोपासना केली त्या लोकांचे वंशज आजहीं अस्तित्वांत असून त्यांनीं आपल्या प्राचीन संस्कृतींची परंपरा अखंड चालूं ठेविली आहे.

(अ) इजिप्तमधील प्राचीन संस्कृति

(इ. स. पू. ५००० ते इ. स. पू. ३३२)

इजिप्तची भौगोलिक परिस्थिति—आफ्रिका खंडाच्या ईशान्य भागांत समशीतोष्ण कटिबंधांत असलेला व क्षेत्रफळाच्या दृष्टीनें भारताचा चवथा

भाग होईल असा इजिप्त देश आहे. या देशाच्या उत्तरेला भूमध्य समुद्र व पूर्वेस तांबडा समुद्र आहे. या देशामध्यें पाऊस फार कमी पडतो, त्यामुळें या देशाचा बराच भाग ओसाड आहे. पण पाण्यानें दुथडी भरलेली व चार हजार मैल वहात आलेली अशी मोठी नाईल नदी या देशामधून दक्षिणोत्तर वहात जाते. सुरुवातीस या नदीस दोन फांटे असून एकाचा उगम अबिसिनीयाच्या बर्फाच्छादित पर्वतावर होतो व दुसऱ्याचा व्हिक्टोरिया नांझा या मोठ्या सरोवरापासून होतो. त्यामुळें उन्हाळ्यांत बर्फ वितळल्यामुळें व पावसाळ्यांत पाऊस पडल्यामुळें या नदीस नेहमीं भरपूर पाणी असतें व मधून मधून मोठमोठे पूर येतात. या पुराबरोबर वहात आलेल्या गाळानें या नदीच्या कांठचा दक्षिणोत्तर असा चिंचोळा प्रदेश फार प्राचीन काळापासून सुपीक बनलेला आहे. पण हा सुपीक प्रदेश देशाच्या एकंदर क्षेत्रफळाच्या मानानें फारच लहान म्हणजे $\frac{1}{३००}$ भाग आहे. तसेंच ही नाईल नदी दळणवळणाचा मार्ग व उत्तरेकडील भूमध्यसमुद्राकडे जाण्याचा मार्ग म्हणूनही प्राचीन काळीं उपयोगांत आणली जाऊं लागली. या देशाच्या ईशान्य भागीं इ. स. १८६९ मध्यें सुएझचा कालवा खणण्यापूर्वी संयोगभूमि होती, व तिनें हा देश आशिया खंडास जोडला गेला होता.

इजिप्तच्या प्राचीन इतिहासाचे प्रमुख कालखंड—इ. स. पू. ५००० पासून इ. स. पू. ३३२ वर्षांपर्यंतच्या काळाचे प्रमुख पांच कालखंड किंवा विभाग पडतात. या काळांत इ. स. पू. ३४०० पासून या देशांत ३२ राजवंशांनीं राज्य केलें.

(१) राजघराणीं स्थापन होण्यापूर्वीचा काळ (इ. स. पू. ५००० ते इ. स. पू. ३४००)— या काळांत नाईल नदीचें भरपूर पाणी व कांठची सुपीक जमीन पाहून तेथें हेमेटिक मानववंशाचे लोक स्थायिक झाले व शेतकी करूं लागले (हेमेटिक हें सेमिटिक या श्वेतवर्णी मानववंशापैकीं असावेत). ते गुरेंढोरें पाळूं लागले व घरेंदारें बांधून राहूं लागले. जमीन भुसभुशीत करण्यासाठीं ते नांगर वापरीत. तसेंच नाईल नदीचें पाणी आपल्या शेतांत यावें म्हणून त्यांनीं बांध घालून कालवे खणले. ईशान्येकडील साईनाई (Sinai) प्रदेशांत तांबें या धातूचा त्यांस शोध लागला असून ते त्याची शेतीस व घरगुती कामासाठीं उपयोगी पडतील अशीं आयुधें व भांडींकुंडीं करूं लागले. तसेंच

स्वसंरक्षणार्थ शस्त्रेंही बनवूं लागले. तांब्याचीं हत्यारें करण्यांत येऊं लागलीं व त्यांच्या साहाय्यानें दगड कापणें व त्यास आकार देणें या गोष्टीही त्यांस करितां येऊं लागल्या. नाईल नदीच्या कांठीं बरींच शतकें राहिल्यावर त्यांनीं तेथें लहान लहान नगरराज्यें स्थापन केलीं. ते अनेक देवतांची पूजा करीत. निसर्गाच्या शक्तींस देवता कल्पून त्यांची पूजा केली जाई. 'रे' हा सूर्यदेव, ओसाइरिस (Osiris) ही नाईल नदीची देवता असें मानण्यांत येई.. या देवतांचीं देवळें बांधण्यांत येत. माणसाप्रमाणें देवतांसही राग, लोभ, वगैरे विकार आहेत असें समजून त्यावर आधारलेल्या आख्यायिकाही निर्माण झाल्या. वृक्ष, मगर, यांचीही पूजा करीत. देवतांस संतुष्ट करण्यासाठीं बळी देत. त्यांच्यांत वस्तूस पहिल्यानें चित्रयुक्त खुणा देऊन व नंतर त्या वस्तूच्या शब्दाच्या उच्चारास व नंतर अवयवाच्या उच्चारास चित्रयुक्त खुणा देऊन त्यांच्यामध्यें चित्रलिपी (Hieroglyphics) सुरू झाली. ते आपलें लिखाण पेपिरस नांवाच्या वनस्पतीपासून तयार केलेल्या तक्त्यावर बोरूच्या साहाय्यानें व शाईनें लिहीत किंवा दगडावर कोरून ठेवीत. त्यांचें सर्वांत प्राचीन लिखाण इ. स. पू. ३५०० च्या सुमाराचें आहे. वर्षगणना करण्यासाठीं ३० दिवसांचा महिना, १२ महिन्यांचें वर्ष व याखेरीज सणांचे पांच दिवस असें ३६५ दिवसांचें वर्ष त्यांच्या पंचांगाप्रमाणें होई. तसेंच चार महिन्यांचा एक ऋतु व असें वर्षांतील तीन ऋतु व त्यांत पूर येणें, पेरणी करणें व मळणी करणें या गोष्टी होत.

(२) **जुन्या राज्यांचा काळ**—(इ. स. पू. ३४०० ते इ. स. पू. २१६०)—या काळांत सात घराण्यांनीं राज्य केलें. नाईल नदीच्या कांठीं असलेल्या नगरराज्यांचें **मीनस** या राजानें इ. स. पू. ३४०० च्या सुमारास एकीकरण केलें व उत्तर भागांत असलेलें मेंफिस हें आपलें राजधानीचें ठिकाण केलें. येथें राज्य करणाऱ्या राजाची सत्ता खूप वाढली. त्यास पॅरोहा (सम्राट्) असें म्हणत. मरणोत्तर जीवन आहे अशी इजिप्तमधील लोकांची व सम्राटांची पूर्वीपासून समजूत असे. तेव्हां मृत शरीर चांगल्या स्थितींत ठेवणें जरूर आहे, तें कुजूं देतां उपयोगीं नाहीं असें वाटून निरनिराळे औषधी व मसालेयुक्त पदार्थ शरीरास लावून तीं मृत शरीरें भक्कम अशा शवपेटिकेंत ठेवून त्यावर मोठमोठीं थडगीं बांधण्याचा प्रघात त्यांच्यामध्यें सुरू झाला. या थडग्यांस 'पिरॅमिड' (वर निमुळतें होत गेलेलें मनोऱ्याच्या आकाराची इमारत) म्हणत. पहिल्या

पहिल्यानें हे पिरॅमिड विटांचे बांधीत, पण पुढें बांझचीं हत्यारें (तांबें व टिन यांच्या मिश्रणानें अधिक टणक अशा हत्यारांनीं) उपयोगांत आणलीं जाऊं लागल्यानें पिरॅमिड बांधण्यास दगडाचा उपयोग करण्यांत येऊं लागला. मोठमोठे सम्राट्, सरदार व श्रीमान् लोक यासाठीं आपल्या ऐपतीप्रमाणें खर्च करीत. पॅरोहा (सम्राट्) यांच्या हातीं खूप सत्ता व संपत्ति असल्यामुळें ते या कामीं अतोनात खर्च करीत. पॅरोहा गादीवर आला म्हणजे तो आपलें थडगें बांधण्याचें काम सुरू करी व तें कितीतरी वर्षें चाले. इजिप्तमध्यें होऊन गेलेल्या खूफू (Khufu) या सम्राटानें मेंफिसजवळ गीज (Gizeh) येथें इ. स. पू. ३००० च्या सुमारास आपल्यासाठीं प्रचंड असा पिरॅमिड बांधला. हा पिरॅमिड बांधण्यास २ लक्ष माणसें २० वर्षें खपत होतीं असें हिरॉडोटस या प्राचीन ग्रीक इतिहासकारानें नमूद करून ठेवलें आहे. या पिरॅमिडनें एकूण १३ एकर जमीन व्यापली असून तो सुमारें ४५० फूट उंचीचा सर्वांत मोठा असा पिरॅमिड आहे. हा पिरॅमिड जेथें बांधला तेथें जवळपास दगड उपलब्ध नसल्यामुळें ६०० मैल अंतरावरून प्रत्येकीं सुमारें २ टन वजनाचे असे सुमारें २० लक्षांहून अधिक दगड लांकडाच्या ओंडक्यावर घालून नाईल नदीच्या मार्गें आणावे लागले. आजच्यासारखीं यांत्रिक साधनें उपलब्ध नसतां नुसत्या मानवी व जनावरांच्या शक्तीनें एवढें मोठें प्रचंड काम पांच हजार वर्षांपूर्वी बांधण्यांत यावें ही खरोखर अचंबा वाटण्याजोगी गोष्ट आहे. खूफू सम्राटानें बांधलेला हा पिरॅमिड सर्वांत मोठा आहे. या काळांत इतर पॅरोहांनींही अनेक लहान मोठे पिरॅमिडस बांधले. त्याचप्रमाणें मनुष्याचें तोंड असलेला असा प्रचंड सिंहाचा पुतळा तयार करून तो पिरॅमिडचा रखवालदार म्हणून पिरॅमिडच्या जवळ उभारण्याचा प्रघातही रूढ झाला. अशा पुतळ्यास, स्फिनक्स (Sphinx) (नरसिंह) असें म्हणत. गीज येथें असा एक प्रचंड दगडी 'स्फिनक्स' उभारलेला आहे. त्याची लांबी १६० फूट असून उंची ७० फूट आहे.

अशा पिरॅमिडमध्यें तळघरांत एक दालन असून तेथें शवपेटिका ठेवण्यांत येई. त्याचप्रमाणें वरच्या बाजूसही एक दालन ठेवलेलें असून मृतास उपयोग व्हावा म्हणून त्याचे नातेवाईक त्यांत अन्न व पेय ठेवीत. त्याचप्रमाणें अलंकार, भांडींकुंडीं, फर्निचर वगैरे गोष्टी मृत मनुष्यास पुढें उपयोगी पडतील म्हणून ठेवीत. या दालनाच्या भिंतींवर मृत मनुष्याच्या जीवनांतील अनेक प्रसंगांचीं चित्रें

सुबक रीतीनें काढलेलीं असत; व त्या प्रसंगाचा वृत्तांत चित्रलिपीमध्यें लिहून ठेवलेला असे. त्यावरून इ. स. पू. ३०००–२५०० वर्षांच्या सुमारास इजिप्तमधील सामाजिक जीवनाची, रीतीभातीची व राज्यकारभाराची चांगली कल्पना येते, व त्यावरून त्या काळांत शेतकी, पशुसंवर्धन, सुतारकी, शिल्पकला वगैरे बाबतींत इजिप्तनें किती प्रगति केली होती हें समजतें.

(३) **मध्य राज्याचा काळ** (इ. स. पू. २१६० ते इ. स. पू. १५८०)—या काळांत ८ ते १७ राजघराण्यांनीं राज्य केलें. उत्तरेकडील मेंफिस या ठिकाणाहून नाईल नदीच्या कांठीं दक्षिणेस थीब्स येथें राजधानी हालवण्यांत आली. या काळांत नाईल नदीपासून तांबड्या समुद्रापर्यंत कालवा खणण्यांत आला व त्यामुळें तांबड्या समुद्रांतून नाईल नदीच्या मार्गें भूमध्य समुद्रांत जाणें शक्य झालें. त्याचप्रमाणें **अमान** देवाच्या पूजेसाठीं थीब्सजवळ कारनॅक (Karnak) येथें एक **प्रचंड देवालय** बांधण्याचें काम सुरू झालें. हें देवालय बांधण्याचें काम यापुढील निरनिराळ्या राजांच्या कारकीर्दीत चालूं राहून तें सुमारें १५०० वर्षांनंतर पुरें झालें. जगांतील अतिशय मोठें असें हें देवालय आहे. या देवळाचा परिघ सुमारें पावणेदोन मैल इतका मोठा आहे. याच्या बाहेरच्या भिंती ८० फूट उंच व २५ फूट रुंदीच्या आहेत. इजिप्तमधील निरनिराळ्या राजांनीं देवळांतील निरनिराळीं दालनें व सभामंडप निरनिराळ्या काळीं बांधले. मधला सभामंडप फारच भव्य व विस्तीर्ण असून त्याच्या दोहों बाजूंस मोठमोठ्या भव्य खांबाच्या रांगा असून त्यांची उंची ७५ फुटांहून अधिक आहे. इजिप्तमधील सम्राटांनीं तेथील खांबावर व भिंतीवर आपापल्या कारकीर्दीत घडलेल्या महत्त्वाच्या गोष्टी चित्रलिपींत लिहून ठेविल्या. त्याचप्रमाणें पेपिरसच्या भिंडोळ्यावरही तत्कालीन महत्त्वाच्या गोष्टी चित्रलिपींत लिहून ठेविल्या असून तीं भिंडोळीं या देवालयांत जतन करून ठेवलीं आहेत. तसेंच या काळांत या देवळापासून सुमारें १ मैलावर लक्सर (Luxor) येथें मोठें देऊळ बांधण्याचें काम सुरू झालें.

हिक्सोस राजांचा अंमल (इ. स. पू. १८०० ते इ. स. पू. १५८०)—इजिप्तचें वैभव अशारीतीनें वाढत असतां इ. स. पू. १८०० च्या सुमारास हिक्सोस टोळ्यांनीं पूर्वेकडून इजिप्तवर स्वारी केली. हे लोक युद्धामध्यें घोडे व रथ यांचा उपयोग करीत व त्यामुळें त्यांच्यापुढें पायीं युद्ध करणाऱ्या इजिप्त-

मधील लोकांचें कांहीं चाललें नाहीं. या हिक्सोस लोकांनीं इजिप्तवर सुमारें २२५ वर्षें राज्य केलें. त्यांच्या राजांस धनगर राजे असें म्हणत. या लोकांच्या वेळीं हिब्रू (ज्यू) लोकही इजिप्तमध्यें येऊन राहूं लागले. पण यानंतर १५८० च्या सुमारास दक्षिणेकडील थीब्स येथील राजाच्या नेतृत्वाखालीं इजिप्तमधील लोकांनीं युद्धाच्या कामीं घोड्यांचा व रथांचा उपयोग केला व हिक्सोस लोकांस इजिप्तमधून घालवून लाविलें.

(४) **साम्राज्यकाळ** (इ. स. पू. १५८० ते इ. स. पू. ११५०)– हिक्सोस लोकांचा पराभव झाल्यावर इजिप्तच्या इतिहासांतील मोठ्या वैभवाचा काळ झाला. यावेळीं राजधानींचें ठिकाण थीब्स हें होतें. युद्धाच्या कामीं तसेंच दूरदूरच्या प्रदेशाशीं दळणवळण ठेवण्याच्या कामीं घोड्यांचा उपयोग होऊं लागला.

या काळांत हॅटशेप्सट (Hatshepsut) ही प्रसिद्ध राणी होऊन गेली. हिनें इ. स. पू. १५०१–१४७९ पर्यंत राज्य केलें. हिक्सोस राज्यांच्या कारकीर्दींत उध्वस्त झालेलीं देवळें हिनें दुरुस्त केलीं व नवीं बांधलीं. हिनें कारनॅकच्या मंदिराजवळ व इतर मंदिरांजवळ मोठमोठे स्तंभ उभारले व त्यावर आपल्या कारकीर्दींत घडलेल्या महत्त्वाच्या गोष्टी कोरून ठेवल्या. इजिप्तचा परराष्ट्राशीं व्यापार वाढावा म्हणून तिनें व्यापारी जहाजें बांधविलीं. हिनें ३ रा थूटमोज (Thutmose) याच्याशीं लग्न केलें; व हॅटशेप्सटनंतर त्यानें राज्य केलें (इ. स पू. १४७९–१४४७). ३ रा थूटमोज हा मोठा पराक्रमी सम्राट् होता. त्यानें सीरिया, फिनिशिया व पॅलेस्टाईन हे देश जिंकले व आपलें साम्राज्य आशियांत वाढविलें. त्यानें आपलें आरमार प्रबळ करून इजिअन (Aegean) समुद्रांतील बेटांवर आपलें वर्चस्व बसविलें. त्यानें आपण केलेल्या शौर्याच्या गोष्टींचीं वर्णनें स्तंभांवर व कारनॅकच्या देवळांतील भिंतींवर कोरून ठेवलीं.

यानंतर तिसरा आमेनहोटेप (Amenhotep) हा प्रसिद्ध सम्राट् होऊन गेला (इ. स. पू. १४२० ते १३७६). त्यानें लक्सर येथील देवळाजवळ स्तंभ उभारले. याच्या कारकीर्दींत इजिप्तची साम्राज्यसत्ता कळसास पोहोंचली. आशिया मायनर व त्याच्या पूर्वेकडील भागांत हिटाइट, मीडस (मिटानी), इराणी हीं

आर्य लोकांचीं राज्यें स्थापन झालेलीं होतीं. यांपैकीं मिटानी या जमातीच्या राजघराण्याशीं इजिप्तच्या राजघराण्याचा सोयरिकीचा संबंध स्थापन झाला होता. इजिप्तमधील संस्कृतीचा प्रसार भोंवताच्या प्रदेशांत होत होता.

निरनिराळ्या देवतांसाठीं मंदिरें बांधण्याचा प्रघातही वाढूं लागला. या मंदिरांतील पूजा, देवस्थानच्या मालकीची मालमत्ता व इतर धार्मिक बाबींची व्यवस्था ठेवण्याचें काम पुरोहितवर्गाकडे येऊन त्यांचें समाजांतील महत्त्व वाढलें. कालांतरानें त्यांच्यांत सुखलोलुपता आली व अनाचारही वाढूं लागले. तेव्हां या प्रकारास आळा घालावा व निरनिराळ्या देवदेवतांच्या पूजा–अर्चा करण्याऐवजीं एकाच '**ॲटन**' नांवाच्या सूर्यदेवतेची पूजा सुरू असावी व पुरोहितवर्गाचें धार्मिक वर्चस्व कमी व्हावें या हेतूनें ४ था **आमेनहोटेप** (इ. स. पू. १३७५-५८) या सम्राटानें प्रयत्न केला व आपल्या कारकीर्दीत एकाच देवाची पूजा प्रचारांत आणली. त्यानें इख्नाटन हें नांव धारण केलें. पण त्याच्या मृत्यूनंतर सनातनी वृत्तीच्या लोकांनीं उचल केली व पूर्वीप्रमाणें अनेक देवतांची पूजा सुरू झाली.

इ. स. पू. १३६० च्या नंतर टूटेनखामन (Tutenkhamon) या सम्राटानें कांहीं वर्षें राज्य केलें. याच्या थडग्याचा १९२२ मध्यें शोध लागला व त्यांतील दालनांत ठेवलेल्या सुबक वस्तू त्या ज्यावेळीं तेथें ठेवल्या त्या स्थितींतच तेथें असलेल्या सांपडल्या व त्यावरून त्यांच्या सुबकपणाची चांगली कल्पना येते.

यानंतर **२ रा रॅमसीस** (Ramases) नांवाचा मोठा पराक्रमी राजा होऊन गेला (इ. स. पू. १२९२–१२२५). त्यानें इजिप्तचा दरारा पश्चिम आशिया व भोंवतालच्या प्रदेशामध्यें वाढविला. कलाकौशल्यास उत्तेजन दिलें. कारनॅकच्या देवालयापासून सुमारें एक मैलावर लक्सर येथें दुसरें एक मोठें देवालय बांधण्याचें काम सुरू झालें होतें तें त्यानें पुरें केलें. या देवालयाच्या आवारांत २ ऱ्या रॅमसीसचा १६६ फूट उंचीचा प्रचंड पुतळा आहे. या काळांत इजियन समुद्रांतील क्रीट वगैरे बेटें, आशिया मायनर, सीरिया, बॅबिलोन, भारत वगैरे देशांशीं इजिप्तचा मोठ्या प्रमाणांत व्यापार चाले. रॅमसीसनें बांधलेल्या देवळांतील भिंतींवर त्याच्या कारकीर्दीत घडलेल्या महत्त्वाच्या गोष्टी चित्रलिपीमध्यें खोदून ठेवलेल्या आहेत.

(५) इजिप्तचा ऱ्हासकाळ (इ. स. पू. ११५० ते इ. स. पू. ३३२)—या काळांत २१ ते ३१ राजवंशांनीं राज्य केलें. पण इजिप्तचें वैभव कमी होत गेलें. इ. स. पू. ६७० मध्यें असेरियन सम्राटानें इजिप्तवर स्वारी करून त्यावर आपलें वर्चस्व बसविलें. असेरियन लोकांनीं युद्धाच्या वेळीं लोखंडाच्या शस्त्रांचा उपयोग केला होता. या वेळेपूर्वी इजिप्तमधील लोकांस लोखंडाचीं शस्त्रें माहीत नव्हतीं. असेरियन लोकांची सत्ता इजिप्तवर सुमारें १५० वर्षें टिकली. यानंतर इराणच्या सम्राटानें इजिप्तवर आपला अंमल बसविला (इ. स. पू. ५२५). पण पुढें ग्रीक सम्राट् अलेक्झांडर यानें इराणी सम्राटाचा पराभव करून इ. स. पू. ३३२ मध्यें इजिप्तवर आपलें वर्चस्व बसविलें.

इजिप्तमधील संस्कृति—प्राचीन काळीं सांस्कृतिक व कलाकौशल्याच्या बाबतींत इजिप्तनें पुष्कळ प्रगति केलेली होती. इजिप्तमध्यें खनिज द्रव्यें फारशीं सांपडत नसत, त्यामुळें शेजारच्या देशांतून तीं आणवावीं लागत. पण हीं खनिज द्रव्यें—तांबें, सोनें, रुपें, टिन, जस्त वगैरे धातू देशांत आणल्यावर त्याचीं निरनिराळीं शस्त्रास्त्रें, भांडींकुंडीं, शेतकीचीं आयुधें वगैरे गोष्टी केल्या जात. त्याचप्रमाणें सोन्या-चांदीचे सुबक अलंकार, दागिनेही बनविले जात. स्थापत्य शास्त्रामध्यें इजिप्तनें बरीच प्रगति केलेली होती. त्यांस चुन्याचा उपयोग माहीत होता. मोठमोठे पिरॅमिड, देवालयें व राजवाडे बांधणें, तसेंच नाईल नदीपासून तांबड्या समुद्रापर्यंत कालवा खणणें वगैरे प्रचंड कामें त्यांनीं केलीं. यासाठीं गुलामांचा उपयोग केला जाई. तसेंच इतर लोकांसही वेठीस धरलें जाई. शिल्पकलेमध्येंही त्यांनीं बरीच प्रगति केली असून ८०-९० फूट उंचीचे मोठे दगडी पुतळे त्यांनीं घडविले. लाकडाचीं कोचें, खुर्च्या, पलंग, शवपेटिका वगैरे सुबक गोष्टी ते करीत व पॉलिश करून त्यास चकाकी आणीत. प्राचीन काळीं त्यांनीं केलेल्या या गोष्टींपैकीं कांहीं पिरॅमिड्समध्यें नीट जतन करून ठेवलेल्या असल्यामुळें त्या आजही पाहावयास मिळतात व त्यांचा सुबकपणा दिसून येतो. ते मातीचीं सुबक भांडीं करून त्यांस रंग देत व त्यांवर नक्षीकाम करीत. कातडीं कमाविणें व त्याच्या सुबक जिनसा करणें, तलम वस्त्रें विणणें, पेपिरसपासून लिहिण्यासाठीं तक्ते तयार करणें वगैरे गोष्टी त्यांस माहीत होत्या. त्यांनीं चित्रलिपी उपयोगांत आणली व त्यापासून पुढें सुधारणा होऊन अक्षरलिपी तयार झाली व तिचा युरोपमध्यें

प्रसार झाला. ज्योतिष, भूमिति, वैद्यकी, चित्रकला वगैरे बाबतींत त्यांनीं प्रगति केलेली होती. निसर्गदेवता, त्याचप्रमाणें सूर्य, नदी, वृक्ष यांची ते पूजा करीत. त्यांचा भोंवतालच्या इतर देशांशीं जलमार्गानें व खुष्कीच्या मार्गानें मोठा व्यापार चाले. भारताशींही त्यांचा प्राचीन काळापासून व्यापार होता व तलम कापड, मसाल्याचे पदार्थ, हस्तीदंती वस्तू व सुवासिक पदार्थ भारतांतून जात. खुष्कीच्या मार्गानें होणारा व्यापार गाढवांच्या तांड्यामार्फत होई. इजिप्तमधील संस्कृतीचा पश्चिम आशिया, इजियन समुद्रांतील बेटें यांमध्यें प्राचीन काळीं प्रसार झाला होता.

इजिप्तच्या संस्कृतीचें प्राचीनत्व— इजिप्तमधील प्राचीन काळच्या सम्राटांनीं बांधलेले प्रचंड पिरॅमिडस, तसेच देवदेवतांसाठीं बांधलेलीं मोठीं व भव्य देवळें आहेत व त्यामधील भिंतींवर लिहिलेले, दगडावर खोदलेले, पेपिरसच्या भिंडोळ्यावर लिहिलेले असे पुष्कळ लेख इजिप्तमधील लोकांच्या प्राचीन चित्रलिपीमध्यें लिहून ठेवलेले होते, पण इ. स. १८२२ पूर्वी ती प्राचीन चित्रलिपी कोणासही अवगत नसल्यामुळें हे पिरॅमिड्स व देवळें किती प्राचीन आहेत, त्यावरील व तेथें जतन करून ठेवलेल्या लिखाणामध्यें काय लिहिलेलें आहे हें कोणासही सांगतां येत नव्हतें. पण १७९९ मध्यें नाईल नदीच्या रोझेटा या मुखाजवळ एक शीला सांपडली व तीवर इजिप्तवर इ. स. पू. ३२३ च्या सुमारापासून राज्य करणाऱ्या टॉलेमी या ग्रीक राजघराण्यांच्या काळांतील इजिप्तची प्राचीन चित्रलिपी, त्याचप्रमाणें इजिप्तमधील प्राचीन डेमॉटिक लिपी (लोकलिपी) व ग्रीक लिपी अशा तिन्ही लिप्यांत लिहिलेलें लिखाण खोदलेलें होतें. ग्रीक व डेमॉटिक या लिप्या अवगत होत्या व त्या लिप्यांमध्यें लिहिलेला मजकूर एकच आहे हें आढळून आल्यामुळें त्या शिलेवर इजिप्तच्या प्राचीन चित्रलिपीमध्यें खोदलेला मजकूरही तोच असावा असें वाटून नेपोलियनच्या इजिप्तच्या स्वारीच्या वेळीं त्याच्याबरोबर आलेल्या शॉनपॉलयॉन (Champollion) या फ्रेंच संशोधकानें त्या लिपीचा बरींच वर्षें अभ्यास केला व चित्रलिपीमध्यें लिहिलेल्या मजकुराचा इ. स. १८२२ च्या सुमारास अर्थ लाविला. यानंतर इतर संशोधकांनीही इजिप्तमध्यें इतरत्र असलेल्या चित्रलिपींत लिहिलेल्या लिखाणांचा अर्थ लाविला. अशाप्रकारें शॉनपॉलयॉन यानें केलेल्या संशोधनामुळें इजिप्तमधील प्राचीन चित्रलिपीमध्यें लिहिलेल्या लिखाणांचा अर्थबोध

होऊन इ. स. पू. ३५०० वर्षांपूर्वीपासूनच्या इजिप्तच्या इतिहासावर प्रकाश पडला आहे.

(ब) मेसापोटेमियाचा प्राचीन इतिहास व संस्कृति

(सुमेरिया, बॅबिलोनिया व असेरिया)

(इ. स. पू. ५००० ते इ. स. पू. ३३२)

मेसापोटेमियाची भौगोलिक परिस्थिति—पश्चिम आशियामध्यें उत्तरेकडील अर्मेनियाच्या बर्फाच्छादित प्रदेशांत टायग्रीस व युफ्रेटिस या नद्या उगम पावतात व सुमारें १८०० मैल वाहत जाऊन दक्षिणेकडील इराणच्या आखातास मिळतात. उन्हाळ्यांत डोंगराळ पर्वतावरील बर्फ वितळण्यानें व पावसाळ्यांत पाऊस पडल्यानें या नद्यांस नेहमींच भरपूर पाणी असतें. नद्यांनीं वाहून आणलेल्या गाळानें या नद्यांच्या कांठचा व या नद्यांमधील प्रदेश सुपीक बनलेला आहे. या प्रदेशास दोन नद्यांमधील प्रदेश म्हणजेच मेसापोटेमिया (दुआब) असें म्हणण्यांत येतें. या सुपीक प्रदेशाची लांबी सुमारें ८०० मैल आहे. या प्रदेशाच्या दक्षिण भागास सुमेरिया, मधल्या भागास बॅबिलोनिया व उत्तरेकडील भागास असेरिया असें म्हणण्यांत येई. याच्या पश्चिमेस सीरिया, पॅलेस्टाईन व फिनीशिया व पूर्वेस मीडिया व इराण हे देश आहेत. मेसापोटेमिया हा प्रदेश सुपीक व नाक्यावर असल्यामुळें हा प्रदेश आपल्या ताब्यांत आणण्यासाठीं या प्रदेशाच्या भोंवतालीं असलेल्या लोकांनीं प्राचीन काळापासून यावर वारंवार स्वाऱ्या केल्या व त्यामुळें येथें मोठमोठीं राज्यें व साम्राज्यें स्थापन झालीं.

मेसापोटेमियाचे प्रमुख कालखंड—या प्रदेशाच्या इतिहासाचे खालील प्रमुख कालखंड पाडण्यांत येतात :—

(१) इ. स. पू. ५००० ते इ. स. पू. २७५० – सुमेरियन लोकांचीं नगरराज्यें व संस्कृति.

(२) इ. स. पू. २७५० ते इ. स. पू. २२०० – अकाडियन – सुमेरियन साम्राज्य.

(३) इ. स. पू. २२०० ते इ. स. पू. ७५० – बॅबिलोनियाचें (जुनें) साम्राज्य.

(४) इ. स. पू. ७५० ते इ. स. पू. ६१२ – असेरियन साम्राज्य.

(५) इ. स. पू. ६१२ ते इ. स. पू. ५३९ – बॅबिलोनियाचें (नवें) साम्राज्य (खाल्डियन)

(६) इ. स. पू. ५३९ ते इ. स. पू. ३३१ – इराणी साम्राज्य.

(१) सुमेरियन लोकांचीं नगरराज्यें व संस्कृति (इ. स. पू. ५००० ते इ. स. पू. २७५०)—मेसापोटेमियाच्या दक्षिणेकडील भागांत इ. स. पू. ५००० पासून सुमेरियन लोक स्थायिक झालेले होते. हे लोक मूळचे येथील किंवा बाहेरून येथें आले हें नक्की सांगतां येत नाहीं, पण ते बाहेरून येथें आले असावेत. येथें स्थायिक झाल्यावर ते शेती करूं लागले. त्याचप्रमाणें गुरेंढोरें पाळणें, कापड विणणें, मातीचीं भांडीं करणें वगैरे उद्योगधंदेही त्यांनीं सुरू केले. वहातुकीसाठीं ते चाकें असलेले गाडे वापरीत. हे गाडे विशेषतः गाढवांच्या साहाय्यानें ओढले जात. नौकानयन कलाही त्यांस येत होती व ते नदींतून व समुद्रांतून दूरदूरच्या प्रदेशास जात. नदीस कालवे खणून शेतीस पाणी घेण्याची त्यांनीं व्यवस्था केली. त्यांस धातूंचा विशेषतः तांब्याचा शोध लागला होता; व त्यांचीं ते शस्त्रास्त्रें, आयुधें व उपकरणीं करीत. त्यांच्यांत लिपी व लेखनकलाही उदयास पावली. ही उच्चारावर आधारलेली होती, पण सुट्या अक्षरास खूण असण्याऐवजीं तींत शब्दोच्चारास खूण असे. त्यांची लिपी पाचरीसारखी (V) कोनयुक्त असल्यामुळें तींस पाचरी लिपी (Cuneiform) असें म्हणण्यांत येतें. मेसापोटेमियांत दगड दुर्मिळ असल्यामुळें व इजिप्तप्रमाणें पेपिरस वनस्पति उगवत नसल्यामुळें सुमेरियन लोक मातीच्या विटांवर आपलें लिखाण लिहून ठेवीत. देवघेवी, करारनामें, पत्रें, राज्यकारभारविषयक आज्ञापत्रें वगैरे गोष्टी विटांवरच लिहून ठेवीत. या विटा भाजून पक्क्या केलेल्या असल्यामुळें त्यावरील लिखाण दीर्घकालपर्यंत टिके व सहा हजार वर्षांनंतरही तें वाचतां येतें. त्यांस संख्येची कल्पना होती, पण ती १०, २०, ३०, याप्रमाणें दशकांवर बसविलेली नसून ६० व साठाच्या पटीवर बसविलेली होती. या त्यांच्या परिमाणावरून ६० सेकंदाचें मिनिट, ६० मिनिटांचा तास, वर्तुळाचे ३६० डिग्री

वगैरे परिमाणें पुढें रूढ झालीं. टैग्रिस व युफ्रेटिस नद्यांच्या मुखाजवळ त्यांनीं लहान लहान नगरराज्यें स्थापन केलीं. हीं नगरराज्यें म्हणजे उर, निप्पूर, किश, लागेश, वगैरे होत. हीं नगरराज्यें एकमेकांपासून स्वतंत्र असून त्यांत निरनिराळे राजे असत. या नगरराज्यांपैकीं युफ्रेटिस नदीच्या कांठचें 'उर' हें सुमेरियन लोकांचें प्रमुख नगरराज्य होतें. या ठिकाणीं कांहीं वर्षांपूर्वी उत्खनन करण्यांत आलें व त्यावरून इ. स. पू. ३९०० च्या सुमारास हें विशेष भरभराटीस असल्याचें दिसून येतें. या काळांतील राजे व सरदार यांचीं जमिनींत गाडलीं गेलेलीं थडगीं सांपडलीं असून त्यांत पुरल्या गेलेल्या वस्तुंवरून तीं इजिप्तमधील पिरॅमिडमधील वस्तूंप्रमाणें सुबक होतीं हें दृष्टोत्पत्तीस येतें. या नगरराज्यांचा एकमेकांशीं त्याचप्रमाणें भारताशींही व्यापार चाले. ईशान्येकडील डोंगराळ प्रदेशांतून त्यांना इमारतीचें लाकूड मिळे. आग्नेयेकडील भारत वगैरे प्रदेशांकडून मसाल्याचे पदार्थ मिळत व पश्चिमेकडील तांबड्या समुद्राच्या किनाऱ्यावरील प्रदेशांकडून त्यांस तांबें, मोल्यवान दगड व पोवळीं मिळत. या वस्तुंच्या मोबदल्यांत धान्य, खजूर, खारका, लोंकर, लोंकरीचीं वस्त्रें वगैरे जिनसांची निर्यात होई. हा व्यापार सुरुवातीस गाढवांचे तांडे व नावा यांवरून चाले. उंट व घोडा हें वहान त्यावेळीं माहीत नव्हतें.

या नगरराज्यांत पुरोहितवर्गाचें वर्चस्व व महत्त्व बरेंच होतें. प्रत्येक शहराची वेगळी अशी देवता असे. त्या देवतेभोंवतीं देवस्थान निर्माण होई. लोकांनीं श्रद्धापूर्वक दिलेल्या दानधर्मामुळें देवस्थानांची मिळकत विशेष वाढे. देवस्थानचा प्रमुख पुरोहित हा त्या शहराचा राजा असे. त्याचप्रमाणें गांवाच्या व्यापारावरही त्याची देखरेख असे. नदीस पूर आला तरी धोका येणार नाहीं अशी उंचवट्याची जागा देवस्थानासाठीं निवडीत. त्यावर मोठें जोतें घेऊन देऊळ बांधीत. त्यास झिगरूट असें म्हणत. तो चौकोनी असून वर निमूळता होत गेलेला असे. वर जाण्यासाठीं त्यास बाहेरच्या बाजूनें जिना असे. याच्या वरच्या मजल्यावर देवाची स्थापना करीत. या देवालयाच्या आवारांत मुख्य पुरोहिताची राहण्याची जागा असे. भोंवतालीं देवस्थानचे नोकर, चाकर, गवंडी, सुतार वगैरे राहात असत. हे पुरोहित देवघेवीचाही व्यवहार करीत. तेव्हां हा झिगरूट म्हणजे गांवांतील धार्मिक, सामाजिक व व्यापारविषयक बाबींचें केंद्रस्थान होतें.

(२) अकाडियन-सुमेरियन साम्राज्य (इ. स. पू. २७५० ते इ. स. पू. २२००) – सुमेरियन लोक उद्योगी व शांतताप्रिय होते. त्यांचीं वेगवेगळीं नगरराज्यें भरभराटीस असतां पश्चिमेकडे अस्तेल्या भटक्या सेमिटिक टोळ्यांपैकीं अॅकाडियन टोळीचा पुढारी १ ला सारगॉन (Sargon) यानें सुमेरियावर स्वारी करून (इ. स. पू. २७५० च्या सुमारास) तेथील सर्व नगर राज्यांवर आपलें वर्चस्व बसविलें व आपलें साम्राज्य इराणच्या आखाता-पासून पश्चिमेस भूमध्य समुद्रापर्यंत वाढविलें. त्यानें सुमेरियांतील अॅक्कड येथें (हल्लींच्या बगदादजवळ) आपली राजधानी स्थापन केली. याच्या साम्राज्यास अॅकॅडियन-सुमेरियन साम्राज्य असें म्हणत. हे सेमिटिक टोळ्यांपैकीं अकाडियन लोक मागासलेले असल्यामुळें सुमेरियन लोकांवर जरी त्यांस जय मिळाला होता, तरी सांस्कृतिक दृष्ट्या सुमेरियन लोकांचाच त्यांच्यावर पगडा बसला, व सुमेरियन लोकांची भाषा, लिपी, रीतिरिवाज त्यांनीं स्वीकारले. सुमेरियांत सुमेरियन नगरराज्यांवर ते आपले अधिकारी नेमीत, व त्या राज्यां-कडून खंडणी घेत. त्यामुळें राजकीय दृष्ट्या सुमेरियन लोक अकाडियन लोकांचे अंकित झाले होते, तरी त्यांचा व्यापार, उद्योगधंदे व कलाकौशल्य पूर्वीप्रमाणेंच चालूं राहिलें. इ. स. पू. २३०० च्या सुमारास या अकाडियन-सुमेरियन साम्राज्यास उतरती कळा येऊं लागली व इ. स. पू. २२०० च्या सुमारास सीरियाच्या बाजूनें आलेल्या सेमिटिक वंशाच्या अमोराइट टोळीनें हें साम्राज्य उध्वस्त केलें व तेथें आपलें वर्चस्व स्थापन केलें.

(३) बॅबिलोनचें जुनें साम्राज्य—(इ. स. पू. २२०० ते इ. स. पू. ७५०) इ.स.पू. २२००च्या सुमारास सेमिटिक वंशापैकीं अमोराइट या टोळीनें सीरियामधून अकाडियन-सुमेरियन साम्राज्यावर स्वारी केली व तें साम्राज्य उध्वस्त करून टायग्रीस व युफ्रेटीस नद्यांच्या मधल्या प्रदेशांत आपलें साम्राज्य स्थापन केलें, व तें इराणी आखातापासून भूमध्य समुद्रापर्यंत वाढविलें. त्यांनीं युफ्रेटीस नदीच्या कांठीं **बॅबिलोन** येथें राजधानी केली. हें शहर पुढें मोठें वाढलें व या साम्राज्याची भरभराट झाली, म्हणून या साम्राज्यास बॅबिलोन या राजधानीवरून **बॅबिलोनियन साम्राज्य** असें म्हणण्यांत येऊं लागलें. यांच्यामध्यें हामुराबी (Hammurabi इ. स. पू. २०६७–२०२५) हा मोठा पराक्रमी व प्रसिद्ध सम्राट् होऊन गेला. यानें पुष्कळ देवळें बांधलीं.

टायग्रीस व युफ्रेटीस या नद्यांस कालवे खणून शेतीस उत्तेजन दिलें. त्यानें सुमेरियांत पूर्वापार चालत असलेले कायदेकानू व रीतिरिवाज यांचें संकलन करून ते प्रसिद्ध केले (इ. स. पू. २०६७ च्या सुमारास). या कायदेकानूंची सुमेरियन लोकांच्या पाचरी लिपींत व त्या वेळच्या बॅबिलोनियन भाषेंत लिहिलेली व दगडावर खोदलेली प्रत उपलब्ध झालेली आहे. त्यांत २८५ कलमें असून लग्नसंबंध, गरीब लोक, अनाथ विधवा वगैरे सामाजिक गोष्टी, चोरी, खून वगैरे गुन्हे, मजुरी, देणींघेणीं, व्यापार उदीम वगैरे आर्थिक बाबी, यासंबंधाचे कायदे ग्रथित केलेले असल्यामुळें त्यांचें महत्त्व विशेष आहे. हामुराबी यानें सुमेरियन लोकांची भाषा, लिपी, उद्योगधंदे, कलाकौशल्य, विद्या, धर्म, रीतिरिवाज यांस प्रोत्साहन दिल्यामुळें बॅबिलोनियन साम्राज्याची सर्व बाजूंनीं प्रगति झाली व इजिप्त, क्रीट, इराण व भारत या देशांशीं व्यापार व दळणवळण सुरू होऊन बॅबिलोनचें वैभव वाढत गेलें. हामुराबीनंतर येणाऱ्या सम्राटांनींही बॅबिलोनच्या कलाविद्यांस प्रोत्साहन दिलें.

कासाइट लोकांचें बॅबिलोनियन साम्राज्यावर वर्चस्व (इ. स. पू. १७५० ते इ. स. पू. १२००)— बॅबिलोनियांतील अगोदरचे सुमेरियन, नंतर आलेले सेमिटिक वंशाचे लोक यांच्यामध्यें हलकें हलकें वर्णसंकरही होत गेला. विद्या, कलाकौशल्य, उद्योगधंदे व व्यापार यांमध्यें प्रगति होत होती तरी लोक सुखासीन बनत चालले होते; व त्यांच्यांतील पूर्वीचें शौर्य कमी होत गेलें. अशी स्थिति असतां टायग्रीस नदीच्या उत्तरेकडील प्रदेशांत अनेक जमाती राहात होत्या. कासाइट व इराणी या त्या जमाती होत. हे लोक धट्टेकट्टे व कणखर वृत्तीचे होते. यांपैकीं कासाईट लोक मेसापोटेमियाच्या ईशान्येकडील भागांत स्थायिक झालेले होते. हे पहिल्यानें रोजंदारीचे मजूर म्हणून व नंतर लूटमार करण्यासाठीं बॅबिलोनियांत चेऊं लागले. नंतर त्यांनीं बॅबिलोनियन साम्राज्यावर स्वारी केली. त्यांनीं आपलें वाहन म्हणून घोड्यांचा उपयोग केला होता. पण बॅबिलोनियन लोकांस या वेळेपर्यंत घोडा माहीत नव्हता, व त्यास तें 'ईशान्येकडील गाढव' असें म्हणत. पण घोड्यासारखें शीघ्र गतीनें जाणारें वहान व कासाइट लोकांचा कणखरपणा यापुढें सुखासीन झालेल्या सेमिटिक व सुमेरियन लोकांचें कांहीं चाललें नाहीं व त्यामुळें कासाइट लोकांनीं बॅबिलोनियन साम्राज्यावर आपलें वर्चस्व स्थापन केलें (इ. स. पू. १७५० च्या

सुमारास). या लोकांचे सहा-सात शतकेंपर्यंत बॅबिलोनियावर वर्चस्व होतें. हे लोक शूर व लढवय्ये होते, तरी कलाकौशल्यामध्यें मागासलेले असल्यामुळें बॅबिलोनियांतील लोकांचे आचारविचार, धर्मकल्पना, चालीरीति, भाषा व लिपी यांचा त्यांच्यावर पूर्णपणें पगडा बसला व ते तेथील लोकांत कालांतरानें मिसळून गेलें. यानंतर मेसापोटेमियाच्या उत्तर भागांत राहणाऱ्या असेरियन लोकांचे बॅबिलोनियन साम्राज्यावर हल्ले होऊं लागले (इ. स. पू. ८०० च्या सुमारास) व इ. स. पू. ७५० च्या सुमारास बॅबिलोनियन साम्राज्यावर त्यांनीं आपलें वर्चस्व बसविलें.

(४) असेरियन संस्कृति व साम्राज्य (इ. स. पू. ११०० ते इ. स. पू. ६१२)—मेसापोटेमियाच्या उत्तर भागांतील प्रदेशांत असेरियन लोक राहात असत. ते राहात असलेल्या प्रदेशास असेरिया असें म्हणत. टायग्रीस नदीच्या कांठचीं असूर व निनेव्हा हीं त्यांचीं प्रमुख शहरें होतीं. इ. स. पू. ११०० पासून हे लोक पुढें येऊं लागले. हे युद्धामध्यें घोडे व घोडे जुंपलेल्या गाड्यांचा उपयोग करीत. त्यांचीं पूर्वीचीं शस्त्रास्त्रें ब्रांझचीं असत. पण इ. स. पू. ११०० च्या सुमारास ते लोखंडाचीं व पोलादाचीं तलवारी, भाले, बाण वगैरे शस्त्रास्त्रें करूं लागले. हे लोक युद्धामध्यें फार क्रूरपणानें वागत. त्यांनीं ८ व्या शतकांत असेरियाच्या उत्तरेकडे राहणाऱ्या आर्मेनियन लोकांचा पराभव करून आर्मेनियांतील लोखंड व तांबें यांच्या खाणी हस्तगत केल्या. त्यांच्यांत ८ व्या शतकांत तिगलथ पिलेसर ३ रा हा पराक्रमी सम्राट् होऊन गेला. त्यानें बॅबिलोनवर आपलें वर्चस्व बसविलें (इ. स. पू. ७५०) व आपली सत्ता सीरियापर्यंत वाढविली (इ. स. पू. ७३२). यानंतर **२ रा सारगॉन** (इ. स. पू. ७२२-७०५) व **सेनॅकरीब** (इ. स. पू. ७०५-६८१ Sennacherib) हे प्रसिद्ध सम्राट् होऊन गेले व त्यांनीं आपली सत्ता खूप वाढविली. या सम्राटांनीं भव्य बांधकामही केलें. २ रा सारगॉन यानें निनेव्हाजवळ २५एकर जमिनीवर एक मोठा राजवाडा बांधला. सेनॅकरीब यानें निनेव्हा शहरांत मोठमोठे राजवाडे व मंदिरें बांधलीं व त्यामुळें निनेव्हा शहराचें वैभव वाढून तें प्रमुख शहर बनलें. सेनॅकरीबचा मुलगा एसरहॅडन यानें इजिप्त देश जिंकला (इ. स. पू. ५७०). अशाप्रकारें पूर्वेकडील इराणपासून पश्चिमेकडील भूमध्यसमुद्रापर्यंत, त्याचप्रमाणें इजिप्त व आशिया-मायनरचा पूर्वभाग, आर्मेनिया एवढ्या विस्तृत प्रदेशावर असेरियन साम्राज्य

पसरलें. साम्राज्यांतील दूरदूरचीं ठिकाणें एकमेकांशीं जोडण्यासाठीं त्यांनीं रस्ते बांधले. त्यांचा राज्यकारभार कडक असे. जिंकलेल्या प्रदेशांतील लोकांकडून ते खंडणी वसूल करीत. मेसापोटेमियांतील उद्योगधंदे व कलाकौशल्य यांस त्यांनीं उत्तेजन दिलें. शिल्पकलेमध्यें असेरियन लोकांनीं बरीच प्रगति केलेली होती व जनावरांचे पुतळे दगडांत खोदून ठिकठिकाणीं उभारले होते. त्याचप्रमाणें विटांस झिलाई देऊन त्यांवर सुंदर नक्षीकाम करण्यांतही त्यांनीं प्राविण्य संपादन केलें होतें. सेनॅकरीबचा नातू **आसूर बानीपाल** यानें ग्रंथसंग्रहालय स्थापन केलें (हे ग्रंथ विटावर लिहिलेल्या लिखाणाचे असत.). असेरियन सम्राटांच्या कारकीर्दीत शिल्पकला, सुतारकी वगैरे बाबतींत पुष्कळ चांगलीं कामें झालीं. आसूर बानीपालानंतर असेरियन साम्राज्यास उतरती कळा लागली. पूर्वेकडील मीड लोक व इराणी लोक, दक्षिणेकडील बॅबिलोनियन लोक (यांस खाल्डियन म्हणत) यांनीं इ. स. पू. ६१२ मध्यें निनेव्हा शहरावर स्वारी करून तें उध्वस्त करून टाकलें व त्यामुळें असेरियन साम्राज्य मोडकळीस आलें.

(५) २ रें बॅबिलोनियन साम्राज्य (खाल्डियनं साम्राज्य व तेथील संस्कृति–इ. स. पू. ६१२ ते इ. स. पू. ५३९)—बॅबिलोनियावर असेरियन सम्राटांचें वर्चस्व होतें. पण सेमिटिक लोकांच्या खाल्डियन या जमातीनें इ. स. पू. ६१२ मध्यें असेरियाच्या पूर्वेकडील मीड व इराणी लोकांशीं संगनमत करून निनेव्हा शहरावर स्वारी केली व तें उध्वस्त केलें. यानंतर त्यांनीं बॅबिलोनियामध्यें आपलें साम्राज्य स्थापन केलें. बॅबिलोनियाच्या या नव्या साम्राज्यास खाल्डियन साम्राज्य असें म्हणण्यांत येऊं लागलें. यांच्यामध्यें नेबकॅडनेझर (Nebuchadnezzar इ. स. पू. ६०४–५६१) हा प्रसिद्ध सम्राट् होऊन गेला. यानें जेरूसलेम शहरावर स्वारी करून तें शहर उध्वस्त केलें व तेथील ज्यू (हिब्रू) लोकांस कैद करून बॅबिलोनियास आणलें. त्यानें आपल्या राणीसाठीं बॅबिलोनला मोठा राजवाडा बांधला व एक झुलतें उद्यान तयार केलें. त्यानें कला व विद्या यांस प्रोत्साहन दिलें. याच्यानंतर येणारे सम्राट् कमकुवत होते, त्यामुळें हें साम्राज्य थोड्याच काळांत मोडकळीस आलें. इ. स. पू. ५३९ मध्यें इराणी लोकांनीं या साम्राज्यावर स्वारी करून त्यावर आपलें वर्चस्व बसविलें.

खाल्डियन लोकांनीं ज्योतिषशास्त्रांत पुष्कळ प्रगति केली. ग्रहावर मनुष्याचें नशीब अवलंबून आहे अशी त्यांची समजूत होती. या ग्रहास व चंद्रास त्याच-

आगमन क्रमांक 20/12/10 दि. 31/12/10
क्रमांक ... नों: दि: 24.1.2011

प्रमाणें सूर्यांस देवता समजून त्यांची ते निरनिराळ्या दिवशीं पूजा करीत व त्यावरून आठवड्यांतील दिवसांचीं नांवें रूढ होऊन त्यांचा पश्चिम आशियांत व ग्रीकांमार्फत युरोपमध्यें प्रसार झाला. आकाशांतील ग्रहांचे व गोलांचे वेध घेऊन वर्षाचे दिवस किती, चंद्रास पृथ्वी-भोंवतालच्या परिभ्रमणास किती दिवस लागतात वगैरे निदानें त्यांनीं केलीं. खाल्डियन लोकांनीं ज्योतिषशास्त्रांत केलेले प्रयोग पुढें चालवून ग्रीक लोकांनीं ज्योतिषशास्त्रांत भर घातली.

(६) इराणी (पर्शियन) लोकांचें वर्चस्व (इ. स. पू. ५३९ ते इ. स. पू. ३३१)—मेसापोटेमियाच्या पूर्वेकडे इराणमध्यें इराणी लोकांचें साम्राज्य स्थापन होऊन इ. स. पू. ५३९ मध्यें त्यांनीं बॅबिलोनियन साम्राज्यावर आपलें वर्चस्व बसविलें, व पुढें इ. स. पू. ३३१ मध्यें अलेक्झांडरनें इराणी लोकांचा पराभव करून पश्चिम आशिया व इजिप्तवर आपलें वर्चस्व बसविलें. इराणी साम्राज्यासंबंधी हकीकत पुढें वेगळी दिली आहे.

(क) भारतांतील प्राचीन संस्कृति

(इ. स. पू. ५००० ते इ. स. पू. ३२२).

(१) द्रविड संस्कृति (इ. स. पू. ५००० ते इ. स. पू. ७००)

(२) सिंधु संस्कृति (मोहेंजेदडो, हरप्पा. इ. स. पू. ३५०० ते इ. स. पू. २०००).

(३) आर्यसंस्कृति (इ. स. पू. २५०० ते इ. स. पू. ७००).

(४) हिंदु (भारतीय) संस्कृति (इ. स. पू. ७०० ते इ. स. पू. ३००).

(५) नवीन धर्मपंथांची स्थापना— जैन धर्म व बौद्ध धर्म (इ. स. पू. ६ वें शतक).

भारतांतील अति प्राचीन काळचे लोक : आदिवासी— भारत हा मोठा असा खंडप्राय देश आहे. याच्या निरनिराळ्या भागांत अतिशय प्राचीन काळापासून मनुष्यवस्ती होती. जुन्या पाषाणयुगांत त्यांनीं केलेली ओबडधोबड दगडी आयुधें व त्याचप्रमाणें नवीन पाषाणयुगांत झालेलीं सुबक दगडी आयुधें, मद्रास प्रदेशांतील बेल्लारी व तिनवेल्ली जिल्ह्यांत, त्याचप्रमाणें उत्तर प्रदेशांतील

पसरलें. साम्राज्यांतील दूरदूरचीं ठिकाणें एकमेकांशीं जोडण्यासाठीं त्यांनीं रस्ते बांधले. त्यांचा राज्यकारभार कडक असे. जिंकलेल्या प्रदेशांतील लोकांकडून ते खंडणी वसूल करीत. मेसापोटेमियांतील उद्योगधंदे व कलाकौशल्य यांस त्यांनीं उत्तेजन दिलें. शिल्पकलेमध्यें असेरियन लोकांनीं बरीच प्रगति केलेली होती व जनावरांचे पुतळे दगडांत खोदून ठिकठिकाणीं उभारले होते. त्याचप्रमाणें विटांस झिलाई देऊन त्यांवर सुंदर नक्षीकाम करण्यांतही त्यांनीं प्राविण्य संपादन केलें होतें. सेनॅकरीबचा नातू **आसूर बानीपाल** यानें ग्रंथसंग्रहालय स्थापन केलें (हे ग्रंथ विटावर लिहिलेल्या लिखाणाचे असत.). असेरियन सम्राटांच्या कारकीर्दीत शिल्पकला, सुतारकी वगैरे बाबतींत पुष्कळ चांगलीं कामें झालीं. आसूर बानीपालानंतर असेरियन साम्राज्यास उतरती कळा लागली. पूर्वेकडील मीड लोक व इराणी लोक, दक्षिणेकडील बॅबिलोनियन लोक (यांस खाल्डियन म्हणत) यांनीं इ. स. पू. ६१२ मध्यें निनेव्हा शहरावर स्वारी करून तें उध्वस्त करून टाकलें व त्यामुळें असेरियन साम्राज्य मोडकळीस आलें.

(५) २ रें बॅबिलोनियन साम्राज्य (खाल्डियनं साम्राज्य व तेथील संस्कृति–इ. स. पू. ६१२ ते इ. स. पू. ५३९)—बॅबिलोनियावर असेरियन सम्राटांचें वर्चस्व होतें. पण सेमिटिक लोकांच्या खाल्डियन या जमातीनें इ. स. पू. ६१२ मध्यें असेरियाच्या पूर्वेकडील मीड व इराणी लोकांशीं संगनमत करून निनेव्हा शहरावर स्वारी केली व तें उध्वस्त केलें. यानंतर त्यांनीं बॅबिलोनियामध्यें आपलें साम्राज्य स्थापन केलें. बॅबिलोनियाच्या या नव्या साम्राज्यास खाल्डियन साम्राज्य असें म्हणण्यांत येऊं लागलें. यांच्यामध्यें नेबकॅडनेझर (Nebuchadnezzar इ. स. पू. ६०४–५६१) हा प्रसिद्ध सम्राट् होऊन गेला. यानें जेरूसलेम शहरावर स्वारी करून तें शहर उध्वस्त केलें व तेथील ज्यू (हिब्रू) लोकांस कैद करून बॅबिलोनियास आणलें. त्यानें आपल्या राणीसाठीं बॅबिलोनला मोठा राजवाडा बांधला व एक झुलतें उद्यान तयार केलें. त्यानें कला व विद्या यांस प्रोत्साहन दिलें. याच्यानंतर येणारे सम्राट् कमकुवत होते, त्यामुळें हें साम्राज्य थोड्याच काळांत मोडकळीस आलें. इ. स. पू. ५३९ मध्यें इराणी लोकांनीं या साम्राज्यावर स्वारी करून त्यावर आपलें वर्चस्व बसविलें.

खाल्डियन लोकांनीं ज्योतिषशास्त्रांत पुष्कळ प्रगति केली. ग्रहावर मनुष्याचें नशीब अवलंबून आहे अशी त्यांची समजूत होती. या ग्रहास व चंद्रास त्याच-

प्रमाणें सूर्यास देवता समजून त्यांची ते निरनिराळ्या दिवशीं पूजा करीत व त्यावरून आठवड्यांतील दिवसांचीं नांवें रूढ होऊन त्यांचा पश्चिम आशियांत व ग्रीकांमार्फत युरोपमध्यें प्रसार झाला. आकाशांतील ग्रहांचे व गोलांचे वेध घेऊन वर्षाचे दिवस किती, चंद्रास पृथ्वी-भोंवतालच्या परिभ्रमणास किती दिवस लागतात वगैरे निदानें त्यांनीं केलीं. खाल्डियन लोकांनीं ज्योतिषशास्त्रांत केलेले प्रयोग पुढें चालवून ग्रीक लोकांनीं ज्योतिषशास्त्रांत भर घातली.

(६) इराणी (पर्शियन) लोकांचें वर्चस्व (इ. स. पू. ५३९ ते इ. स. पू. ३३१)—मेसापोटेमियाच्या पूर्वेकडे इराणमध्यें इराणी लोकांचें साम्राज्य स्थापन होऊन इ. स. पू. ५३९ मध्यें त्यांनीं बॅबिलोनियन साम्राज्यावर आपलें वर्चस्व बसविलें, व पुढें इ. स. पू. ३३१ मध्यें अलेक्झांडरनें इराणी लोकांचा पराभव करून पश्चिम आशिया व इजिप्तवर आपलें वर्चस्व बसविलें. इराणी साम्राज्यासंबंधी हकीकत पुढें वेगळी दिली आहे.

(क) भारतांतील प्राचीन संस्कृति

(इ. स. पू. ५००० ते इ. स. पू. ३२२).

(१) द्रविड संस्कृति (इ. स. पू. ५००० ते इ. स. पू. ७००)

(२) सिंधु संस्कृति (मोहेंजेदडो, हरप्पा. इ. स. पू. ३५०० ते इ. स. पू. २०००).

(३) आर्यसंस्कृति (इ. स. पू. २५०० ते इ. स. पू. ७००).

(४) हिंदु (भारतीय) संस्कृति (इ. स. पू. ७०० ते इ. स. पू. ३००).

(५) नवीन धर्मपंथांची स्थापना— जैन धर्म व बौद्ध धर्म (इ. स. पू. ६ वें शतक).

भारतांतील अति प्राचीन काळचे लोक : आदिवासी— भारत हा मोठा असा खंडप्राय देश आहे. याच्या निरनिराळ्या भागांत अतिशय प्राचीन काळापासून मनुष्यवस्ती होती. जुन्या पाषाणयुगांत त्यांनीं केलेली ओबडधोबड दगडी आयुधें व त्याचप्रमाणें नवीन पाषाणयुगांत झालेलीं सुबक दगडी आयुधें, मद्रास प्रदेशांतील बेल्लारी व तिनवेल्ली जिल्ह्यांत, त्याचप्रमाणें उत्तर प्रदेशांतील

मिरझापूर जिल्ह्यांत व भारतांतील इतर ठिकाणीं सांपडलीं आहेत. हीं आयुधें भारतांत फार प्राचीन काळापासून वस्ती असलेल्या म्हणजे आदिवासी लोकांचीं असावींत. भारताच्या निरनिराळ्या भागांत विशेषतः डोंगराळ प्रदेशांत राहाणारे भिल्ल, संताळ, कातकरी, मुंड, किरात वगैरे लोक भारतांत अतिप्राचीन काळापासून रहात असलेल्या लोकांचे-आदिवासी-वंशज आहेत. हे रंगानें काळे आहेत. अतिप्राचीन काळापासून म्हणजे इ. स. पू. १५-१० हजार वर्षांपासून त्यांची भारतांत वस्ती असावी. जगांत इतर ठिकाणच्या मानवी समाजास जुन्या व नव्या पाषाणयुगांत जे शोध लागले होते त्यांपैकीं बरेच शोध यांसही लागले होते. मातीचीं भांडीं करणें, गाय, गाढव, कुत्रा, शेळी वगैरे पशू माणसाळवणें, कंद, मुळें, फळें व धान्य यांची लागवड करून शेती करणें, ओबडधोबड विणकाम करणें, कुटुंब करून व निरनिराळ्या जमाती व टोळ्या करून रहाणें वगैरे गोष्टी त्यांस येत होत्या. पण प्राचीन काळीं त्यांस धातूंचा शोध लागला नव्हता, त्यामुळें त्यांची पुढील प्रगति झाली नाहीं व त्यांचें जीवन पूर्वीप्रमाणेंच चालू राहिलें.

(१) द्रविड संस्कृति (इ. स. पू. ५००० ते इ. स. पू. ७००)— द्रविड लोक अतिप्राचीन काळापासून भारतांत रहात आहेत. हे लोक फार प्राचीन काळीं बाहेरून भारतांत आले असावेत असें मानण्यांत येतें. द्रविड येण्यापूर्वी भिल्ल, संताळ, मुंड वगैरे लोकांची भारतांत वस्ती होती, म्हणून त्यांस द्रविडांच्या पूर्वीचे म्हणजे आदिवासी असें म्हणण्यांत येतें. द्रविड लोक रंगानें काळे, रुंद नाकाचे व धडधाकट असे होते. जुन्या व नव्या पाषाणयुगांतील शोध त्यांस लागले होते. त्यांस लोखंड, तांबे, सोनें वगैरे धातूंचा शोध लागला होता व त्यामुळें त्यांनीं आपली बरीच प्रगति करून घेतली होती. धातूंची भांडीकुंडीं करणें, शेतीस उपयोगीं अशीं आयुधें करणें व शस्त्रास्त्रें करणें वगैरे गोष्टी त्यांस येत होत्या. भारतांत पूर्वीपासून रहात असलेल्या आदिवासी जमातींचें यांच्यापुढें कांहीं चाललें नाहीं. त्यामुळें आदिवासी लोकांस डोंगराळ प्रदेशाचा आश्रय घ्यावा लागला. शेती करणें, नदीस बांध घालून शेतीस पाणी पुरविणें, गुराढोरांचे कळप पाळणें, मातीचीं मडकीं तयार करणें व तीं भाजून पक्कीं करणें, घरेंदारें बांधून रहाणें, विणकाम करणें, वगैरे गोष्टी द्रविडांस येत होत्या. त्यांचीं निरनिराळीं कुटुंबें असून गांवें स्थापून ते रहात. गांवांस संरक्षणा-

साठीं कोटही बांधीत. त्यांनीं राज्यसंस्थाही स्थापन केल्या होत्या. ते लिंगपूजा करीत. तामीळ, तेलगू, मल्याळी, कानडी वगैरे त्यांच्या वेगवेगळ्या भाषा होत्या. त्यांस नौकानयन येत होतें व त्यांत त्यांनीं बरीच प्रगति केलेली होती. त्यांचीं जहाजें समुद्रावरून दूरदूरच्या ठिकाणीं जात. त्यांचीं निरानिराळीं राज्यें असून तीं भारतांतील निरनिराळ्या भागांत पसरलेलीं होतीं. सिंधू नदीच्या कांठची —मोहेंजदाडो व हरप्पा संस्कृति कदाचित् द्रविडांची असावी. इ. स. पू. २५०० च्या सुमारास आर्य लोक वायव्येच्या बाजूनें भारतांत आल्यावर त्यांच्याशीं द्रविडांचा संबंध आला. हे आर्य लोक द्रविडांस दस्यू, नाक नसलेले, तटबंदी करून राहणारे, लिंगपूजा करणारे असें म्हणत. द्रविडांचा त्यांच्याशीं बराच संघर्ष झाला, तेव्हां द्रविडांस मागें हटावें लागले. आर्य संस्कृतीचा द्रविड संस्कृतीवर बराच परिणाम घडला. तसाच द्रविड संस्कृतीचाही आर्य संस्कृतीवर परिणाम घडला. त्याचप्रमाणें भारताच्या ईशान्य दिशेकडून पीतवर्णी मंगोलियन वंशांच्या कांहीं जमातीही इ. स. पू. १००० च्या सुमारास भारतांत येऊन त्या ईशान्य व पूर्व भागांतील नेपाळ, भूतान, आसाम वगैरे भागांत स्थायिक झाल्या. अशारीतीनें या निरनिराळ्या जमातींचा, विशेषतः आर्य व द्रविड यांच्या संस्कृतींचा एकमेकांवर परिणाम होऊन एक विशिष्ट प्रकारची भारतीय संस्कृति निर्माण झाली व तिला पुढें **हिंदु संस्कृति** असें म्हणण्यांत येऊं लागलें (इ. स. पू. ७००).

(२) सिंधू संस्कृति–मोहेंजेदाडो व हरप्पा (इ. स. पू. ३५०० ते इ. स. पू. २०००)—भारतामध्यें सिंधु नदीच्या कांठीं सिंधमध्यें लारखाना जिल्ह्यांत मोहेंजेदाडो (मृतांचें नगर) येथें व त्याचप्रमाणें त्यापासून सुमारें ४०० मैल दूर उत्तरेच्या बाजूस पंजाबमध्यें रावी नदीच्या कांठीं (सिंधूला मिळणारी नदी) हरप्पा येथें उत्खननाचें काम चालू असतां तेथें गाडल्या गेलेल्या प्राचीन शहराचे अवशेष, व प्राचीन काळच्या कांहीं वस्तू सांपडल्या; व त्यावरून तेथील संस्कृतीविषयीं व ती कोणत्या काळांतील असावी याविषयीं पुराणवस्तुसंशोधकांनीं कांहीं अनुमानें काढलीं आहेत. त्यावरून तेथील संस्कृती-विषयीं कांहीं माहिती मिळते.

सिंधू संस्कृतीचा काल—मोहेंजदाडो व हरप्पा येथील उत्खननांत कांहीं भांडीं व मुद्रा सांपडल्या. या मुद्रांवर बैल, रेडा, काल्पनिक एक शिंगाचा

प्राणी यांचीं सुबक चित्रें व चित्रयुक्त लिपींत खोदलेलें कांहीं लिखाण आहे. हें लिखाण ज्या लिपींत खोदलेलें आहे त्या लिपीचा अर्थबोध होत नाहीं व त्यामुळें त्यावरील मजकुराचा अर्थ काय हें सांगतां येत नाहीं. पण येथील मुद्रांसारख्या कांहीं मुद्रा टायग्रिस व युफ्रेटिस या नद्यांमधील मेसापोटेमिया या प्रदेशांतील ऊर येथें झालेल्या उत्खननांत सांपडल्या. ऊर येथील कांहीं मुद्राही मोहेंजदाडो व हरप्पा येथें सांपडल्या. मेसापोटेमियांतील ऊर या ठिकाणच्या संस्कृतीचा काळ इ. स. पू. सुमारें ३५०० चा होता व त्यावरून मोहेंजदाडो व हरप्पा येथील संस्कृति इ. स. पू. ३५०० च्या सुमाराची असावी हें स्पष्ट होतें. ही संस्कृति त्यावेळीं बरीच प्रगत झालेली असल्यामुळें त्यापूर्वी सुमारें तीन चार शतकें तरी सुरू झाली असावी.

मोहेंजदाडोची नगररचना व बांधकाम—तेथील शहराची मांडणी व्यवस्थित व योजनाबद्ध होती. रस्ते मोठे व रुंद म्हणजे २५–३० फूट रुंदीचे व एकमेकांस काटकोनांत जोडलेले असे होते. रस्त्यांच्या कडेचीं घरें दोन मजली व पक्क्या विटांनीं बांधलेलीं होतीं. बहुतेक सर्व घरांस विहिरी असून त्यामध्यें सिंधू नदीचें पाणी झिरपून येत असावें. मोहेंजदाडो येथील एक वाडा ८५ फूट रुंद व ९५ फूट लांबीचा व मध्यें ३२ फूट चौरस चौक असलेला असा होता. तसेंच एक मोठा दिवाणखाना ९० चौरस फुटांचा व आंत २० खांब (विटांचे) असलेला होता. त्याचप्रमाणें ३९ फूट लांब व २३ फूट रुंद व ८ फूट खोलीचा एक तलावही पक्क्या विटांनीं बांधलेला व आंतून चुनेगचीं केलेला असा होता. या तलावांतील पाणी झिरपून बाहेर जाऊं नये या दृष्टीनें त्याचें बांधकाम पक्कें केलेलें होतें. मोहेंजदाडो व हरप्पा येथील बांधकामानें मेसापोटेमियांतील ऊर येथील बांधकामापेक्षां जास्ती जागा व्यापिली होती; त्याचप्रमाणें येथील सामान्य लोकांच्या घरांचें बांधकामही अधिक चांगलें होतें. मोहेंजदाडो व हडप्पा येथील बांधकामापैकीं हडप्पा येथील बांधकाम अधिक जुनें असावें.

तेथील लोक त्यांचे उद्योगधंदे व करमणुकीचे प्रकार—तेथील लोकांचा उद्योगधंदा मुख्यतः व्यापार व शेतकी हा होता. तेथील लोकांचा दूरदूरच्या प्रदेशांशीं–मेसापोटेमियाशीं–व्यापार व दळणवळण होतें. गहूं व बाजरी हीं धान्यें त्यांस माहीत होतीं. बैल, रेडा, उंट, हत्ती, हरीण, माकड हे प्राणी त्यांस माहीत होते. बैल, उंट, हत्ती व बैलांच्या गाड्या यांवरून वहातुक होई.

घोडा त्यांस माहीत नव्हता. नौकानयन त्यांस माहित होतें. कापूस व लोकर यांचीं वस्त्रें विणणें त्यांस माहित होतें. धनुष्य बाण, कुऱ्हाड, गोफण, भाला खंजिर हीं त्यांचीं शस्त्रास्त्रें होतीं. चांदी, सोनें, तांबें, पंचरशी धातु (तांबें व टिन यांच्या मिश्रणानें) त्यांस माहीत होत्या. वजनें, मापें, तराजू, मोजणपट्टी, धातुंच्या चिपा यांचा व्यापारांत व देवघेवींत ते उपयोग करीत.

पुरुष छोट्या दाढ्या ठेवीत व मिशा काढून टाकीत. स्त्रिया कर्णभूषणें, बांगड्या, वांकी, चमक्या, आंगठ्या, नूपुरें वापरीत. पॉलिश केलेल्या धातूंच्या पत्र्यांचा आरशासारखा उपयोग करीत. शिकार, कोंबडयांच्या झुंजी, सोंगट्या हे त्यांचे करमणुकीचे प्रकार होते. लहान मुलांचीं खेळणीं, शिंपलें हस्तीदंत यांचीं केलेलीं असत. ते शाकाहारी व मांसाहारी होते.

दगडाचे व धातूंचे लहान लहान पुतळे ते करीत. भांड्यावर नक्षीकाम करीत. मुद्रांवर निरनिराळ्या प्राण्यांचीं चित्रें ते खोदीत. चित्रयुक्त लिपीमध्यें लिहिण्याची कला त्यांस माहीत होती व तसें लिखाण त्यांनीं मुद्रांवर व भांड्यावर कोरलेलें होतें. पण या लिपींचा बोध होत नसल्यामुळें त्यावर काय लिहिलेलें आहे तें समजत नाहीं.

ते लिंगपूजा, शिवाची पूजा, देवीची पूजा, वृक्षपूजा करीत. ध्यानस्त असलेला योगी, पशुपति, शिवलिंग यांच्या मूर्ती तेथें सांपडलेल्या आहेत. प्रचलित हिंदुधर्मातील कांहीं गोष्टी या लोकांत होत्या.

ही संस्कृति कोणत्या लोकांची—ही संस्कृति कोणत्या लोकांची हें नक्की सांगतां येत नाहीं. ही द्रविड लोकांची असूं शकेल. प्रचलित हिंदुधर्मातील शिवपूजा, लिंगपूजा, देवीपूजा, वृक्षपूजा येथील लोकांतही सुरू होती. तेव्हां ही संस्कृति भारतांमधील द्रविड लोकांची असावी. आर्यांचें इ. स. पू. २५०० च्या सुमारास भारतांत आगमन झालें, तेव्हां त्यांस या संस्कृतीबद्दल माहिती असावी. ऋग्वेदांत मोठालीं शहरें, व्यापार करणारे लोक वगैरे लोकांसंबंधानें जो उल्लेख आहे, तो या संस्कृतीच्या लोकांसंबंधाचा असावा.

ही संस्कृति कशामुळें नष्ट झाली हें नक्की सांगतां येत नाहीं. सिंधू नदीला येणाऱ्या पुरामुळें, सिंधू नदीचें पात्र बदलल्यामुळें, रोगराईमुळें, शत्रूंच्या

हल्ल्यामुळें किंवा धरणीकंपामुळें यांपैकीं एका किंवा अनेक कारणांमुळें भारतांतील ही प्राचीन संस्कृति इ. स. पू. २००० च्या सुमारास नष्ट झाली असावी.

(३) आर्यसंस्कृति (इ. स. पू. २५०० ते इ. स. पू. ७००). भारतीय लोकांच्या धार्मिक कल्पना, त्यांच्या राजकीय संस्था, सामाजिक चालीरीती, त्यांचे आर्थिक व्यवहार, त्यांची भाषा, त्यांचें वाङ्मय, यांवर आर्यसंस्कृतीचा फार मोठा परिणाम झाला आहे. कालांतरानें आर्य संस्कृति व आर्यांच्या पूर्वी भारतांत असलेली द्रविड संस्कृति व इतर आर्येतर संस्कृत्या यांचा एकमेकांवर परिणाम होऊन भारतीय संस्कृति किंवा हिंदु संस्कृति निर्माण झाली. आर्यांचें मूळ वसतिस्थान कोणतें व त्यांचें भारतांत केव्हां आगमन झालें याबद्दल विद्वानांमध्यें मतभेद आहेत. तरी बऱ्याच विद्वान् लोकांच्या मतें आर्यांचें मूळ वसतिस्थान भारताच्या बाहेर असून ते इ. स. पू. २५०० च्या सुमारास भारतांत आले असावेत. तेव्हां इ. स. पू. २५०० पासून इ. स. पू. ७०० वर्षांपर्यंतच्या काळाचें स्थूल मानानें दोन विभाग पाडण्यांत येतात व ते म्हणजे (१) वेदसंहिता काळ–इ. स. पू. २५०० ते इ. स. पू. १४००. या काळांत वेदसंहिता हा भाग रचण्यांत आला. या विभागांतील इ. स. पू. १७०० पासून इ. स. पू. १४०० वर्षांपर्यंतच्या काळांत रामायण व महाभारत यांत वर्णिलेल्या घटना घडल्या असाव्यात. (२) ब्राह्मण, काळ–इ. स. पू. १४०० ते इ. स. पू. ७०० या काळांत वेदांतील ब्राह्मणें आरण्यकें व उपनिषदें हा भाग रचण्यांत आला. या काळांत महाभारत व रामायण हीं काव्यें पहिल्यानें रचण्यांत आलीं असावींत. यांत पुढील काळांत आणखी भर घालण्यांत आली.

आर्य लोकांचें प्राचीन वसतिस्थान व तेथून त्यांचें परिभ्रमण (इ. स. पू. २५०० ते इ. स. पू. १८००)–फार प्राचीन काळीं आर्य लोक मध्य आशियांतील कॅस्पियन समुद्राच्या उत्तरेकडील प्रदेशांत रहात होते. कालांतरानें पावसाच्या कमतरतेमुळें तो प्रदेश ओसाड बनत चालला व त्यामुळें त्यांस तो प्रदेश सोडावा लागला. तेव्हां त्यांपैकीं कांहीं जमाती इ. स. पू. २५०० पासून इ. स. पू. १८०० वर्षांपर्यंतच्या काळांत भारत, इराण, आर्मेनिया, आशिया मायनर, ग्रीस व इटली या प्रदेशांत गेल्या व तेथें स्थायिक झाल्या व त्यांस तेथें निरनिराळीं नांवें मिळालीं. भारतांत आलेल्या जमातीस आर्य,

इराणमध्यें गेलेल्या जमातीस इराणी, इराणचा वायव्य भाग व आर्मेनिया यांत गेलेल्यास मिटानी (मीड), आशिया मायनरमध्यें गेलेल्यांस हिटाइट ग्रीसमध्यें गेलेल्यांस हेलनीज व इटालीमध्यें गेलेल्यांस लॅटिनस असें म्हणण्यांत येऊं लागले. मध्य आशियांत आर्यांची वस्ती असतांना त्या सर्वांची एक भाषा होती, पण आर्यांच्या जमाती निरनिराळ्या ठिकाणीं जाऊन त्या स्थायिक झाल्यावर त्यांच्या भाषेंत फरक पडत जाऊन त्या वेगळ्या बनल्या गेल्या. तरी या निरनिराळ्या भाषांतील विशेषतः कौटुंबिक नात्याच्या कांहीं शब्दांमध्यें विलक्षण साम्य आढळतें.

आर्यांचें भारतांत आगमन (इ. स. पू. २५०० ते इ.स. पू. २०००)— आर्य लोकांस मध्य आशियांतील प्रदेश सोडावा लागल्यावर आर्यांच्या कांहीं जमाती आपल्या कुटुंबांतील बायका-मुलांसह, त्याचप्रमाणें आपलीं गुरेंढोरें व सामानसुमान घेऊन पामीरच्या पठारच्या लगतच्या मार्गानें दक्षिणेकडील गांधार प्रदेशांत (हल्लींचें अफगाणिस्थान) आल्या व तेथून कांहीं जमाती पश्चिमेस इराणमध्यें गेल्या व कांहीं पूर्वेकडे भारतांत इ. स. पू. २५०० च्या सुमारास आल्या. त्यांनीं गांधारमधील कुंभ (काबूल) नदीपासून पंजाबमधील सतलज नदीपर्यंतच्या प्रदेशांत आपल्या वसाहती केल्या. आर्य जमातींचें वसाहत करण्यासाठीं भारतांत येणें चारपांच शतकें चालूं होतें. नवीन टोळ्यांच्या आगमनानें पूर्वीच्या कांहीं टोळ्या पुढें सरकत व त्यामुळें पूर्वेकडील प्रदेशांपर्यंत वसाहती स्थापन होत गेल्या.

(१) वेदसंहिता काळ (इ. स. पू. २५०० ते इ. स. पू. १४००)—

वेदसंहिता—आर्यांसंबंधीं प्राचीनकाळची माहिती त्यांच्या वेदग्रंथावरून मिळते. वेद चार आहेत व ते म्हणजे ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद व अथर्ववेद हे होत. यांपैकीं ऋग्वेद हा पहिल्यानें रचण्यांत आला. या प्रत्येक वेदांत संहिता (निसर्ग-देवतांस उद्देशून केलेल्या प्रार्थनांचा संग्रह), ब्राह्मणें, अरण्यकें व उपनिषदें असे चार विभाग आहेत. यांपैकीं संहिता (प्रार्थनांचा संग्रह) हा भाग पहिल्यानें (म्हणजे इ. स. पू. २५०० ते इ.स.पू. १४०० या काळांत) रचण्यांत आला. वेदांतील ब्राह्मणें, आरण्यकें व उपनिषदें हे तीन भाग यानंतरच्या काळांत रचण्यांत आले. आर्यांची प्राचीन भाषा संस्कृत ही होती, व या भाषेमध्यें वेदग्रंथांची रचना झाली.

हे वेदग्रंथ मुखोद्गत करून ठेवण्याची प्राचीन काळच्या विद्वानांची पद्धत होती. त्यामुळें प्राचीन काळीं लेखनकला उदयास येण्यापूर्वी व लेखनकला उदयास आल्यानंतरही हे ग्रंथ मुखोद्गत केले गेले असल्यामुळें ते कितीतरी शतकें प्राचीन उच्चारांसह टिकून राहिले. जगाच्या ज्ञात इतिहासांतील अतिशय प्राचीन काळच्या लोकांनीं त्यांच्या भाषेंत रचलेला जगांतील अतिप्राचीन ग्रंथ म्हणून जगांतील विद्वान लोक **ऋग्वेदास** व त्यांतील संहिता या भागास महत्त्व देतात. ऋग्वेद हा ग्रंथ आर्यांचा इतिहास म्हणून रचण्यांत आला नव्हता, तर तो आर्यांचा धार्मिक ग्रंथ म्हणून रचण्यांत आला. तरी त्यामध्यें आर्यांच्या धार्मिक कल्पनांप्रमाणें त्यांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय बाबींसंबंधानें जे उल्लेख आलेले आहेत त्यावरून त्यावेळच्या आर्यांसंबंधीं इतर माहितीहि मिळते.

आर्यांच्या धर्मकल्पना—निसर्ग व पंचमहाभूतें (पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश) यांच्या अधिष्ठात्री देवदेवता असून त्यांच्या प्रेरणेनेंच निरनिराळ्या गोष्टी घडून येतात अशी कल्पना करून आर्य लोक त्यांस उद्देशून प्रार्थना करीत. यानंतर या देवदेवतांस अग्नीच्या द्वारां (अग्नि हे देवदेवतांचें मुख आहे अशी कल्पना करून) धृत, सोम (एका वनस्पतीचा रस. पेय) यांचें हवन करण्यांत येऊं लागलें. तसेंच पुढें बोकड, घोडा, मेंढी, वगैरे पशूंचेंही हवन करण्याचा प्रघात रूढ होऊं लागला. या हवन करण्याच्या कृत्यास यज्ञयागादि कृत्य असें म्हणण्यांत येऊं लागलें.

आर्य लोक निरनिराळ्या देवदेवता कल्पून त्यांस उद्देशून प्रार्थना करीत, तरी या सर्व देवदेवतांस प्रेरणा देणारी अशी प्रजापति, विश्वकर्मा हिरण्यगर्भा, आदिती वगैरे निरनिराळ्या नांवांनीं संबोधिली जाणारी अशी एकच शक्ति आहे असें मानीत.

भारतामध्यें आलेल्या आर्यांचा ऋग्वेद हा धर्मग्रंथ व इराणमध्यें गेलेल्या आर्यांचा अवेस्ता हा धर्मग्रंथ, यांतील इंद्र, वायू, मित्र वगैरे देवदेवता एकच आहेत.

राज्यसंस्थांची उत्क्रान्ति व राजकीय बाबी — आर्यांच्या वेगवेगळ्या जमातींपैकीं पुरु व भारत या जमाती प्रमुख होत्या. आर्यांच्या

वसाहतींजवळच आर्येतरांचींही गांवें व वसाहती असत. त्यामुळें त्यांचा एकमेकांशीं संबंध येई. कांहीं वेळां आर्यांच्या वसाहती व आर्येतरांच्या वसाहती यांच्यामध्यें तंटेबखेडे उत्पन्न होत व युद्धप्रसंगही होत. त्याचप्रमाणें आर्यांच्या निरनिराळ्या जमातींमध्येंही आपलें वर्चस्व स्थापण्यासाठीं युद्धें होत. अशा-प्रकारें झालेल्या एका युद्धाचा उल्लेख ऋग्वेदांत आलेला आहे. सप्तसिंधु प्रदेशांत असलेल्या **पुरु** वगैरे दहा आर्य जमातींच्या राजांचें सरस्वती नदीजवळील ब्रह्मावर्त प्रदेशांतील **भरत** जमातीचा राजा **सुदास** याच्याशीं युद्ध झालें. या युद्धास '**दाशराज्ञ युद्ध**' असें म्हणण्यांत येतें. या युद्धांत पुरु व त्याचे साहाय्यक इतर राजे यांचा पराभव होऊन भरत जमातीचा राजा सुदास यास जय मिळाल्यामुळें सुदासचें महत्त्व विशेष वाढून तो सम्राट झाला. व इतर राजे त्याचे मांडलिक झाले. कालांतरानें भरत व पुरु या दोन आर्य जमातींचें एकीकरण होऊन त्यांस **कुरु** असें म्हणण्यांत येऊं लागलें. या युद्धाच्या वेळीं आर्येतर राजांनीं दोन्ही पक्षांच्या बाजूनें भाग घेतला होता व त्यामुळें आर्य व आर्येतर हा वांशिक व सांस्कृतिक भेद कमी व्हावयास लागून आर्य व आर्येतर यांमधील संघट्टन वाढूं लागलें.

आर्यांची समाजरचना व सामाजिक बाबी—

वर्णाश्रमपद्धत—वेदकाळीं आर्यांमध्यें निरनिराळ्या व्यवसायांवरून समाजाचे तीन वर्ग पडले होते व त्यांस **वर्ण** असें म्हणत. हे वर्ग म्हणजे (१) ब्राह्मण वर्ग (२) क्षत्रिय वर्ग (संरक्षण करणें, राज्यकारभार करणें) (३) वैश्यवर्ग (शेतकी, पशूसंगोपन) हे होत. हे व्यवसाय त्यावेळीं गुणांप्रमाणें विभागलेले होते, व आपणांस वाटेल तो व्यवसाय करण्याची प्रत्येकास मुभा होती. यासेरीज इतर किरकोळ व्यवसाय करणें व मोलमजुरी करणें हा व्यवसाय करणारांस शूद्र असें म्हणत. यांमध्यें आर्येतरांचा विशेष भरणा असे.

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यांस त्रैवर्णिक म्हणत. या वर्णांच्या-वर्गांच्या-लोकांस आपल्या व्यवसायासंबंधीं शिक्षण घ्यावें लागे. हें शिक्षण गुरुमार्फत मिळे.

त्रैवर्णिकांच्या आयुष्याचे चार विभाग गणले जात व त्यांस आश्रमधर्म असें म्हणण्यांत येई. हे चार आश्रम म्हणजे—(१) ब्रह्मचर्याश्रम-या आश्रमांत विद्यार्जन करावयाचें (२) गृहस्थाश्रम-लग्न करून संसार करावयाचा व

मिळविलेल्या ज्ञानाचा आपल्या चरितार्थासाठीं उपयोग करावयाचा (३) वानप्रस्थाश्रम – घर सोडून आरण्यांत जाणें व तेथें कंद, मुळें व फळें यांवर राहणें व तप आचरणें (४) संन्यासाश्रम–एके ठिकाणीं न राहतां संचार करणें, भिक्षा मागून उदरनिर्वाह करणें, ईश्वरचिंतन व परोपकार करून कालक्रमणा करणें हे होत.

सामाजिक बाबी—समाजाचा कुटुंब हा शेवटचा घटक आहे. हें कुटुंब पितृप्रधान असे. सामान्यतः एकच पत्नि करण्याची पद्धत होती. पति व पत्नि दोघेही घराचे मालक व दोघांचा दर्जा सारखा असे. स्त्रियांना शिक्षण मिळे. गृहव्यवस्था हें स्त्रियांचें मुख्य काम असे.

शेतकी व पशूसंगोपन हे पहिले उद्योगधंदे होते. समाज प्रगल्भ होऊन त्याच्या गरजा जशा वाढूं लागल्या तसे आणखी उद्योगधंदे सुरू झाले.

(२) ब्राह्मण काळ (इ. स. पू. १४०० ते इ. स. पू. ७००)—ब्राह्मण काळांत वेदवाङ्मयांतील ब्राह्मणें, आरण्यकें व उपनिषदें हा भाग रचण्यांत आला. ब्राह्मणें यांत यज्ञयागादि कृत्यांचें महत्त्व वर्णन केलेलें आहे. हीं ब्राह्मणें निरनिराळ्या वेदसंहिता भागास जोडलेलीं आहेत. सामवेदाच्या पंचविंश ब्राह्मणामध्यें आर्येतरांचा आर्य समाजांत समावेश करून घेतांना करावयास लागणाऱ्या व्रात्यस्तोम विधींचें वर्णन आहे.

आरण्यकें–या भागांत गूढ गोष्टींसंबंधीं चर्चा केली असून ती अरण्यामध्यें, गुरूजवळ, एकाग्र मनानें करावयाची म्हणून त्यास आरण्यकें असें म्हणण्यांत येतें.

उपनिषदें–या भागांत गूढ तत्त्वज्ञानासंबंधीं चर्चा केलेली असून आत्मा, परमात्मा, मोक्ष व वेदांत यासंबधी विचार केला असून यज्ञयागादि कृत्यांच्या उपयुक्ततेविषयीं कांहीं ठिकाणीं शंका प्रदर्शित केलेली आहे.

श्रुति वाङ्मय—वेदांतील वरील वेदसंहिता, ब्राह्मणें, आरण्यकें व उपनिषदें यांस वेदवाङ्मय असें म्हणण्यांत येऊन त्यास श्रुति–ऐकलेलें–ईश्वरी प्रेरणेनें निर्माण झालेलें म्हणून मनुष्यनिर्मित नसलेलें किंवा अपौरुषेय असें मानण्यांत येतें.

राजकीय बाबी—निरनिराळीं राज्यें स्थापन होऊन तीं मोठीं व प्रगल्भ होत होतीं. हीं राज्यें राजसत्ताक असण्याकडे कल होता. पण राजा अनियंत्रित व जुलमी होऊं नये यासाठीं त्यावर बंधनें घालण्यांत आलीं होतीं.

ऐतरेय ब्राह्मणामध्यें राजाच्या राज्यारोहणप्रसंगीं करण्यांत येणाऱ्या धार्मिक विधींचें वर्णन दिलेलें आहे त्यावरून कोणत्या कामासाठीं राजाची नियुक्ति करण्यांत येते, राजाचीं कर्तव्यें कोणतीं व प्रजेचीं कर्तव्यें कोणतीं व यासंबंधीं धर्मग्रंथांची अपेक्षा कोणती यांची माहिती मिळते.

हिंदु धर्मशास्त्राप्रमाणें राजास ईश्वरी अंश मानण्यांत येत नसे, तर कायदा सत्य, नीतिनियमन व जनता यांचें पालन करणारा श्रेष्ठ अधिकारी असें त्यास मानीत, व त्यास दैवी शक्ति प्राप्त होवो अशी प्रार्थना केली जाई. अशा कर्तव्यदक्ष राजाच्या ठिकाणीं लोकांची निष्ठा आहे याचें प्रतिक म्हणून समुद्र, सरोवर, नदी वगैरे १७ ठिकाणचें जल आणून राज्यांतील तीन वर्ग-ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांच्या एकेक प्रतिनिधीकडून राजावर जलाचें सिंचन केलें जाई. 'धर्म, कायदा, सत्य, नीतिनियम यांचें आपण पालन करूं व जनतेच्या उत्कर्षासाठीं झटूं व तसें आपल्या हातून न झाल्यास आपण आपलें सर्वस्व गमविण्यास तयार आहोंत' अशी राजास शपथ घ्यावी लागे. यानंतर राजास अभ्यंगस्नान घालण्यांत येऊन त्याचें राज्यारोहण होई. त्याचें राज्यारोहण झाल्यावर हें राज्य राजास जनतेच्या व राज्याच्या सर्वांगीण भरभराटीसाठीं दिलेलें आहे असें म्हणून अध्वर्यूनें (समारंभाचा मुख्य अधिकारी) राजाच्या पाठीवर ताडण करावयाचें व राजानें कायद्याचें पालन करण्याचें वचन दिलें असल्यामुळें कायद्याचें उल्लंघन करणारांस शिक्षा करण्यास तो समर्थ आहे व त्याचें प्रतिक म्हणून तो दंड **'राजदंड'** म्हणून त्यास देण्यांत येई. तसेंच राजाचें राज्यारोहण झाल्यावर या राजाचें **'राष्ट्रीय ठेवा'** म्हणून जतन करण्याची जनतेस प्रार्थना करण्यांत येई.

अश्वमेध यज्ञ—ठिकठिकाणीं मोठमोठीं राज्यें स्थापन झालेलीं होतीं. तरी कांहीं राजांची आपलें राज्य अधिक विस्तृत प्रदेशावर स्थापन होऊन आपण सार्वभौम व्हावें ही महत्त्वाकांक्षा असे. तेव्हां मोठा पराक्रम करून आपण सार्वभौम झालों हें सर्वांस विदित व्हावें म्हणून ते अश्वमेध यज्ञ करीत.

यज्ञयागादि कृत्यें— यज्ञयागादि कृत्यें करण्याचा प्रघात प्राचीन काळीं बराच रूढ होता. या यज्ञाच्या वेळीं घृत, सोम यांचें किंवा बोकड, घोडा वगैरे पशूंचें हवन करण्यांत येई. लहान लहान यज्ञ एका दिवसापासून १० दिवसांपर्यंत टिकत, पण मोठाले यज्ञसमारंभ एक वर्ष देखील चालत. सामान्य लोक, त्याचप्रमाणें सरदार, राजे आपल्या ऐपतीप्रमाणें हे यज्ञसमारंभ करीत. मोठमोठे राजे व सम्राट युद्धांत जय मिळाला, किंवा सार्वभौम सत्ता प्राप्त झाली म्हणजे पुष्कळ खर्च करून अश्वमेध यज्ञ, किंवा राजसूय यज्ञ अशासारखे मोठे यज्ञ करीत. त्यावेळीं मोठा उत्सव व परिषद् भरविण्यांत येऊन ठिकठिकाणचे शास्त्री, पंडित, विद्वान लोक बोलावून धर्म, तत्त्वज्ञान, वाङ्मय, शास्त्र वगैरे निरनिराळ्या विषयांवर त्यांचीं प्रवचनें, चर्चा व वादविवाद घडवून आणीत. त्याचप्रमाणें या सभारंभांत पूर्वी होऊन गेलेल्या शूर पराक्रमी राजांच्या चरित्रांतील महत्त्वाच्या प्रसंगावर रचलेलीं काव्यें ही म्हणून दाखविण्यांत येत. रथांच्या शर्यती, मल्लयुद्धें वगैरे निरनिराळे करमणुकीचे व मर्दूमकीचे प्रकारही करण्यांत येत. या निरनिराळ्या गोष्टींमध्यें नैपुण्य दाखविणाऱ्या शास्त्री, पंडित वगैरे विद्वान् गृहस्थांस त्याचप्रमाणें कलावंतांस बिदागीही मिळे. गोरगरिबांस दानधर्मही करण्यांत येई. अशाप्रकारें विद्याकलांस उत्तेजन मिळे. राजे व सम्राट यांचीं हीं यज्ञयागाचीं कृत्यें म्हणजे राष्ट्रीय उत्सवाचेच प्रसंग मानले जात व त्यामध्यें भाग घेण्यासाठीं निरनिराळ्या राज्यांतील शास्त्री, पंडित व कलावंत जमा होत. त्यामुळें राजकीय बाबतींत आपण वेगवेगळाले असलों तरी सांस्कृतिक बाबतींत आपण एक आहोंत असें तेथें जमलेल्या भारतांमधील निरनिराळ्या राज्यांतील लोकांस वाटे.

आर्यसंस्कृतीचा भारतांत प्रसार— प्राचीन काळीं आर्यांच्या वसाहती पहिल्यानें सप्तसिंधू प्रदेश (गांधार व पंजाब), नंतर ब्रह्मर्षि प्रदेश व त्यानंतर गंगा-यमुना या नद्यांच्या काठचा प्रदेश यांमध्यें स्थापन झाल्या. यानंतर उत्तर भारतांतील इतर प्रदेश यांमध्यें आर्यांच्या वसाहती स्थापन झाल्या; व त्यास आर्यावर्त असें म्हणण्यांत येऊं लागलें. मध्यभारतांतील विंध्य पर्वतापासून दक्षिण भारतांतील किष्किन्धेपर्यंतचा (सध्याचा बेल्लारी) बराच भाग अरण्यांनीं व्यापला असून त्यांत दंडकारण्य नांवाचें मोठें आरण्य होतें. या भागामध्यें आर्यमुनींनीं ठिकठिकाणीं आपलें आश्रम स्थापन केलेलें असून त्यांमार्फत आर्यसंस्कृतीचा

दक्षिण भारतांमध्येंही प्रसार होत होता. यांपैकीं आगस्ति ऋषीनें दक्षिण भारतामध्यें आर्यसंस्कृतीचा प्रसार करण्याच्या कामीं महत्त्वाचा भाग घेतला. भारतांतील पर्वांची द्रविड संस्कृति हिचा आर्यसंस्कृतीवर परिणाम होत होता. त्याचप्रमाणें भारतांतील ठिकठिकाणच्या वन्य जमाती (आदिवासी लोक) यांच्या चालीरीतींचाहि आर्य व द्रविड यांच्या संस्कृतीवर परिणाम होत होता. तरी आर्यसंस्कृतीचा आर्येतर संस्कृतीवर मोठा परिणाम घडला.

अशारीतीनें आर्यसंस्कृतीचा भारतामध्यें प्रसार होत असतां आर्य, द्रविड, व आदिवासी वन्य जमाती यांचीं लहानमोठीं अनेक राज्यें भारताच्या निरनिराळ्या भागांत अस्तित्वांत होतीं. या निरनिराळ्या राज्यांतील ऐतिहासिक घटना इतिहास म्हणून कालक्रमानें लिहून ठेवण्याचा भारतियांत प्रघात नव्हता. पण प्राचीन काळीं निरनिराळ्या राज्यांत घडलेल्या कांहीं महत्त्वाच्या ऐतिहासिक घटना, तेथील राजांनीं व आदर्शभूत पुरुषांनीं केलेलीं थोर कृत्यें यासंबंधाची हकीकत, आख्यायिका, दंतकथा, पुराणकथा, इतिहास म्हणून लोकांत प्रसृत होतीं. या प्राचीन काळच्या राज्यांतील कांहीं राजघराणीं (कुलें) विशेष प्रसिद्ध होतीं. सूर्यवंशी कुलाचें राज्य अयोध्या येथें असून त्यामध्यें रघु, भागिरथ, हरिश्चंद्र, दिलीप, रामचंद्र वगैरे थोर व आदर्शभूत राजे होऊन गेले. चंद्रवंशीय कुलाचे राज्य हस्तिनापूर येथें होतें. या राज्यांतील राजांनीं केलेल्या पराक्रमी कृत्यांचीं वर्णनें काव्यरूपानें करून तीं राष्ट्रीय व धार्मिक महोत्सवाच्या प्रसंगीं गाऊन दाखविण्याचा प्रघात होता. या काव्यग्रंथांवरून त्या काळच्या कांहीं ऐतिहासिक घटना, तत्कालीन, सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक स्थिति यांबद्दल माहिती मिळते. या काव्यामध्यें कांहीं ठिकाणीं अतिशयोक्ति व असंभाव्य घटना यांचाही उल्लेख असला तरी त्यामध्यें काल्पनिक व अतिशयोक्तीचा भाग कोणता असावा हें समजून घेऊन तत्कालीन समाजाचें खरें स्वरूप काय असावें याचीही कल्पना करितां येते. या काव्यांपैकीं भारतामधील बहुसंख्य लोकांच्या चालीरीतींवर व आचारविचारांवर ज्यांचा फार मोठ्या प्रमाणावर प्राचीन काळापासून परिणाम होत आला आहे अशीं काव्यें म्हणजे **रामायण** व **महाभारत** हीं महाकाव्यें होत व म्हणूनच त्यांस 'पांचवा वेद' असें म्हणण्यांत येतें. हीं महाकाव्यें ऐतिहासिक घटनांवर आधारलेलीं असून त्या घटनांचा काळ इ. स. पू. १७०० पासून इ. स. पू. १४०० पर्यंतचा असावा. यांपैकीं रामायणांतील

घटना अगोदरच्या काळांतील व महाभारतांतील घटना नंतरच्या काळांतील आहेत, या घटना होऊन गेल्यावर त्यावर आधारलेलीं वरील महाकाव्यें पुढील ब्राह्मण काळांत म्हणजे इ. स. पू. १४०० ते इ. स. पू. ७०० च्या दरम्यान रचण्यांत आलीं; व त्यांपैकीं महाभारत पहिल्यानें व रामायण नंतर रचण्यांत आलें असें विद्वानांचें मत आहे.

महाकाव्यें : रामायण व महाभारत : रामायण हें महाकाव्य वाल्मिकि यानें रचिलें. यांत नंतर वेळोवेळीं भर घालण्यांत आली. यांत एकंदर सात कांडे (भाग) आहेत व त्यांपैकीं मधलीं पांच कांडें वाल्मिकीचीं असून पहिलें व शेवटचें कांड नंतर घालण्यांत आलें.

महाभारत हें महाकाव्य फार मोठें असून जगांत एवढा मोठा काव्यग्रंथ नाहीं. यांत एक लाखांहून अधिक श्लोक आहेत. हें काव्य पहिल्यानें व्यासानें रचिलें व त्यास 'जय' असें म्हणत. यांत कौरव-पांडवांचीच कथा होती. यानंतर जनमेजय यानें यांत आणखी कांहीं आख्यानांची भर घातली, व त्यास 'भारत' असें म्हणण्यांत येऊं लागलें. यांत वर्णन केलेलें 'महाभारत युद्ध' इ. स. पू. १४०० च्या सुमारास झालें असावें असें कांहीं विद्वानांचें मत आहे. या महाकाव्यांतील कथानकें सर्वांच्या परिचयाचीं आहेत. महाभारतांत मुख्य कथासूत्रास जोडून पूर्वापार प्रचलित असलेलीं पुष्कळशीं आख्यानें, दंतकथा, राजकरण, राजनीति व राजाचीं कर्तव्यें याबद्दल विचार, धर्म, तत्त्वज्ञान, यांची चर्चा करणारी गीता, समाजधारणा त्याचप्रमाणें व्यावहारिक उपयोगाच्या इतर पुष्कळ गोष्टींसंबंधीं चर्चा घातली गेली असल्यामुळें हें महाकाव्य 'ज्ञानकोशा'-सारखा उपयुक्त व त्याचप्रमाणें स्फूर्तीदायक असा ग्रंथ झाला आहे. हें महाकाव्य जागतिक वाङ्मयामध्यें अतिशय महत्त्वाचें मानलें गेलें असून जगांतील निरनिराळ्या भाषांत त्याचीं भाषांतरें झालीं आहेत.

रामायण व महाभारत या महाकाव्यांत वर्णन केलेलें कांहीं स्त्री-पुरुष, त्यांचीं चरित्रें व वागणुकीचे प्रकार भारतीय संस्कृतीचे-हिंदू संस्कृति-आदर्श मानले जाऊन त्यांचे भारतीय लोकांच्या आचारविचारांवर महत्त्वाचे परिणाम होऊन भारतांतील कोणत्याही भागांतील जनतेस हीं महाकाव्यें म्हणजे आपला पूर्वापार चालत आलेला सांस्कृतिक ठेवा आहे असें वाटत आलें आहे.

रामायण व महाभारत या महाकाव्यकालीन संस्कृति (इ. स. पू. १४०० ते इ. स. पू. ७००)—

राजकीय स्थिति—या काळांत आर्य व आर्येतर यांचीं लहान मोठीं राज्यें भारताच्या निरनिराळ्या भागांत अस्तित्वांत होतीं. बरींच राज्यें राजसत्ताक असत, पण राजा नसलेलीं गणराज्येंही कांहीं ठिकाणीं होतीं. पराक्रमी राजे, सम्राट सार्वभौम होण्याचा प्रयत्न करीत. अश्वमेध, राजसूय व वाजपेय वगैरे यज्ञ मोठ्या समारंभानें केलें जात. राजा राज्यकारभाराचे कामीं पुरोहित, मंत्री, सेनापति वगैरे अधिकारी नेमून त्यांचा सल्ला घेई. त्याचप्रमाणें जरूर वाटल्यास राज्यांतील विद्वान् लोकांची परिषद् बोलावून त्यांचाही सल्ला घेण्यांत येई. राजानें धर्मशास्त्रांत सांगितल्याप्रमाणें प्रजेचें हित डोळ्यांपुढें ठेवून राज्यकारभार करावा असें समजलें जाई. व त्याप्रमाणें राज्यकारभार न करणाऱ्या राजास पदच्युत करणें योग्य आहे असें मानण्यांत येई. निरनिराळ्या राज्यांचे एकमेकांशीं असलेलें तंटे साम, दाम, दंड, भेद यांनीं शक्य तो मिटविले जावेत व हे सर्व उपाय थकले म्हणजेच मग युद्ध केलें जाई. युद्धासंबंधीं व युद्धांतील वागणुकीसंबंधीं कांहीं संकेत असून ते योग्यप्रकारें पाळले जाणें इष्ट समजत. हे संकेत व नियम म्हणजे रात्रींच्या वेळीं युद्ध बंद ठेवणें, शस्त्ररहित सैनिकांवर शस्त्रधारी सैनिकानें वार न करणें, शरणागतास अभय देणें वगैरे होत. सैन्यामध्यें पायदळ, घोडेस्वार, हत्तीदल व रथी असे चार विभाग असत व म्हणून त्यास चतुरंग सैन्य असें म्हणत. शत्रूपासून संरक्षण व्हावें म्हणून निरनिराळ्या प्रकारचें किल्ले बांधीत व त्याभोंवताली खंदकही खणीत. राजा वृद्ध झाला म्हणजे तो आपण होऊन राज्यकारभारांतून निवृत्त होई व राज्यकारभाराचें काम युवराजाकडे सोंपवी.

सामाजिक व आर्थिक स्थिति—आर्यांमधील निरनिराळे वर्ण त्याचप्रमाणें आर्य व आर्येतर यांच्यामध्यें लग्नसंबंध होऊन अनेक संकर जाती निर्माण होत होत्या व त्यांचे निरनिराळे व्यवसाय ठरले जात असून ते वंशपरंपरा करण्याचा प्रघात रूढ होत होता. ज्ञान, बुद्धिमत्ता, त्यागी वृत्ति, संपत्तीबद्दल अनासक्ति व निस्पृहता हीं अंगीं असलेल्या ब्राह्मणाबद्दल समाजास आदर वाटे, त्याचप्रमाणें कर्तव्यदक्ष, पराक्रमी व प्रजेचें हित करणाऱ्या क्षत्रिय राजाबद्दल प्रजेस प्रेम वाटे, पण हे गुण ज्यांच्यांत नाहींत अशा ब्राह्मण व क्षत्रियाबद्दल जनतेच्या मनांतील आदर व प्रेम कमी होई. मुलींचे प्रौढपणीं विवाह होत व ते मातापितरांच्या

सल्ल्यानें होत. राजे लोकांच्या मुली कांहीं वेळां स्वयंवर करून वराची निवड करीत. त्यासाठीं एखादा पण लाविलेला असल्यामुळें वराचें शौर्य किंवा एखाद्या गोष्टींतील प्राविण्यता पाहून त्याची निवड होई. श्रीमंत कुटुंबांतील मुलींस व स्त्रियांस लिहिणें, वाचणें व ललितकला यांचें शिक्षण मिळे. सती गेलेल्या स्त्रियांचा उल्लेख आहे व तसें करणें आदर्श मानलें जाई; पण हा प्रघात सार्वत्रिक नव्हता व सती न गेल्यास कमीपणा मानला जात नसें. पुरुष दोन वस्त्रें वापरीत, एक नेसण्याचें व दुसरें पांघरण्याचें. संन्यासी, मुनी, ऋषी हे वल्कले, हरिणाचें कातडें वापरीत. वर्णाश्रम व्यवस्था रूढ होती; व सर्व आश्रमांत गृहस्थाश्रम श्रेष्ठ मानला जाई. त्यामुळें समाज ऐहिक गोष्टींसंबंधीं उदासीन नसून वर्धिष्णु असे. पुरुष आपल्या ऐपतीप्रमाणें कुंडले, आंगठ्या, हार वगैरे अलंकार वापरीत. स्त्रियांच्या अलंकाराचे अनेक प्रकार होते. इकडून तिकडे जाण्यास घोडा, हत्ती, रथ, पालखी, नावा यांचा उपयोग करीत. निरनिराळीं कलाकुसरीचीं कामें करणें, कापुस व रेशीम यांचीं वस्त्रें विणणें व इतर निरनिराळे उद्योगधंदे सुरू होते. भारतांतील निरनिराळ्या राज्यांत त्याचप्रमाणें भारताबाहेरील राज्यांशीं खुष्कीच्या मार्गें, मोठ्या नद्यांच्या मार्गें व समुद्रमार्गें व्यापार सुरू होता. वजनें, मापें, त्याचप्रमाणें सोनें, रुपें व तांबें यांचीं नाणीं यांचा देवघेवीच्या कामीं उपयोग केला जाई. वेदांतील निसर्ग देवतांची उपासना मागें पडून ब्रह्मा, विष्णु, महेश, पार्वती (दुर्गा) या देवदेवतांची उपासना करण्याचा प्रघात रूढ होत होता. पण कोणत्याही देवदेवतेची उपासना केली तरी ती एका ईश्वराच्या ठिकाणीं रुजू होते असें मानलें जाई. पुनर्जन्मावर विश्वास होता व त्यामुळें या जन्मांतील आचरण चांगलें ठेवून पुढील जन्मीं सुस्थिति मिळविण्याचा प्रयत्न करावा असें वाटे. ज्योतिष, शकुन, दिव्य करणें, मुहूर्त पहाणें वगैरे गोष्टींवर लोकांचा विश्वास असे.

(४) हिंदु (भारतीय) संस्कृति (इ. स. पू. ७०० ते इ. स. पू. ३००)

स्मृति-वाङ्मय—(इ. स. पू. ७०० ते इ. स. पू. ३१०) वेदसंहिता, ब्राह्मणें, आरण्यकें व उपनिषदें या वाङ्मयास श्रुति-ऐकलेले-ईश्वरी प्रेरणेनें निर्माण झालेलें वाङ्मय असें म्हणण्यांत येतें. यास्खेरीज आर्यांच्या इतर वाङ्मयास स्मृति--वाङ्मय असें मानण्यांत येतें. या स्मृति-वाङ्मयांत वाढ होत गेली व देशकालपरिस्थितिप्रमाणें त्यांत सांगितलेल्या नियमांत व

निर्बंधांत पुनर्घटना व फेरबदल होत गेले. या स्मृतिग्रंथांत खालील भाग येतात व ते म्हणजे सहा वेदांगें व सहा दर्शनें (तत्त्वज्ञानाच्या शाखा) हे होत. यांतील विवेचन थोडक्यांत धागारूपानें केलेलें असल्यामुळें त्यास सूत्र–वाङ्मय असेंही म्हणण्यांत येतें. यांपैकीं वेदांगांतील धर्मसूत्रांत समाजधारणा, राज्यकारभार या-संबंधीचे नियम येतात. मनु, याज्ञवल्क्य, विष्णु, नारद, पाराशर वगैरेंनीं यांवर आधारलेले व देशकालपरिस्थिति यांस योग्य होतील असे स्मृतिग्रंथ नंतरच्या काळांत तयार केले.

भारतीयांचें ज्ञान जसजसें वाढत गेलें तसतशी धार्मिक बाबींप्रमाणें व्याकरण, ज्योतिष, गणित, वैद्यकी, राजनीति, समाजधारणा, युद्धकला, संगीत, स्थापत्य वगैरे निरनिराळ्या विषयांवरही ग्रंथरचना होऊं लागली व संस्कृत वाङ्मय अधिक समृद्ध होऊं लागलें.

पुराणें—प्राचीन काळच्या धार्मिक वाङ्मयामध्यें पुराणांची गणना करण्यांत आलेली आहे. हीं पुराणें एकूण १८ आहेत व या खेरीज १७ उपपुराणें आहेत. त्यांपैकीं बहुतेकांची रचना इ. स. पू. ७०० पासून इ. स. पू. ३०० वर्षांपर्यंतच्या काळांत झाली. यामध्यें पुढें इ. स. ५ व्या शतकापर्यंतच्या काळांतही अधिक मजकूर घालण्यांत आला. या पुराणांमध्यें साधारणतः खालील बाबींसंबंधाची माहिती आहे. (१) पृथ्वीची उत्पत्ति कशी झाली हें त्यावेळच्या कल्पनेप्रमाणें (२) प्रलय–पृथ्वीचा विनाश (३) राजघराण्यांच्या वंशावळी व त्यांचा इतिहास. असा इतिहास फक्त ७ पुराणांतच आहे. (४) निरनिराळ्या देवतांचें महात्म्य.

सामाजिक स्थिति— आर्येतरांतील निरनिराळे व्यवसाय करणाऱ्या जमाती आपल्या व्यवसायाप्रमाणें आर्यांतील ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यांपैकीं गणले जात व आपल्या पूर्वापार चालत आलेल्या रूढीप्रमाणें वागत. आर्य व आर्येतर यांच्यांत वर्णसंकरही होत गेला व त्यामुळें निरनिराळ्या जातीं निर्माण झाल्या. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे वर्ण जन्मावर अवलंबून नसून ते व्यवसायपरत्वें प्रत्येकाच्या गुणांवर व लायकीवर अवलंबून असावेत हें ध्येय होतें, तरी त्यास हळके हळके वंशपरत्वें जातीचें स्वरूप येऊं लागलें; व प्रत्येकाचा व्यवसाय जन्मावरून ठरला जाऊं लागला. त्यामुळें निरनिराळ्या वर्णांतील लायक गृहस्थाची आपल्याला योग्य असा व्यवसाय करण्याच्या बाबतींत कुचंबणा होऊं लागली.

हिंदुधर्म— (इ. स. पू. ७०० ते इ. स. पू. ३००) आर्य, द्रविड व आर्येतर जमाती यांच्या धार्मिक कल्पनांचा एकमेकांवर परिणाम होऊन हिंदू धर्म निर्माण झाला. वेदांतील पूर्वीच्या इंद्र, वरुण, उषा, मरुत वगैरे देवता मागें पडून ब्रह्मा, विष्णू, महेश हे देव पुढें आले. पृथ्वीची उत्पत्ति करणारा ब्रह्मदेव, पालन करणारा विष्णू व संहार करणारा महेश असें मानण्यांत येऊं लागलें. त्याचप्रमाणें दुर्गा व इतर देवतांच्या पूजाही रूढ होऊं लागल्या. तसेंच राम, कृष्ण यांसही विष्णूचे अवतार मानण्यांत येऊन त्यांच्याही पूजा रूढ झाल्या. त्यामुळें वैष्णव व भागवत हे विष्णु किंवा त्याचे अवतार यांची उपासना करणारे सांप्रदाय, शैव म्हणजे शिवाची उपासना करणारा सांप्रदाय निर्माण झाला. देवदेवतांच्या मूर्ती करून त्यांची सगुण उपासना करण्याचाही प्रघात रूढ होऊं लागला. या निरनिराळ्या देवदेवतांच्या पूजा केल्या जात, तरी कोणत्याहि देवाची पूजा केली तरी एका ईश्वराप्रत रुजू होते अशी सर्वांचीच समजूत होती. कांहीं थोड्या अडाणी लोकांखेरीज इतरांकडून मूर्तीत देव आहे असें न मानतां ती दैवी शक्तींचें प्रतीक किंवा खूण मानण्यांत येई व तिला धार्मिक भावनेचा मानबिंदु समजण्यांत येई. अशारीतीनें हिंदू धर्म व हिंदू संस्कृति यांस समावेशक असें व्यापक स्वरूप प्राप्त होऊन आस्तिक वादापासून नास्तिक वादापर्यंत, निर्गुण उपासनेपासून सगुण उपासनेपर्यंत, यज्ञयागादि कर्ममार्गापासून वेदसंहितेंतील प्रार्थनामार्ग, उपनिषदांतील ज्ञानमार्ग व मूर्तिपूजेंतील भक्तिमार्ग यांपर्यंत सर्व प्रकारच्या धार्मिक विचारांचा हिंदुधर्मामध्यें अंतर्भाव होऊन हिंदु धर्म व्यापक व सहिष्णु असा संघधर्म बनला आणि त्यामुळें इतर देशांप्रमाणें भारतांत धार्मिक बाबतींत कडवटपणा निर्माण झाला नाहीं.

(५) नवीन धर्मपंथांची स्थापना : जैन धर्म व बौद्ध धर्म—

भारतांत इ. स. पू. ८०० पासून इ. स. पू. ४०० वर्षांपर्यंतच्या काळांत वैचारिक क्रान्ति होत होती. रूढ असलेलीं धर्मतत्त्वें, देवदेवता, आचारविचार यांच्या उपयुक्ततेबद्दल एक प्रकारची साशंकता उत्पन्न होऊन त्यांवरील श्रद्धा कमी होऊं लागली. वेदांतील उपनिषद् या भागांत यज्ञयागादि कृत्यांच्या उपयुक्ततेबद्दल व कर्मकांडांतील आचारविचारांच्या इष्टतेबद्दल शंका व्यक्त करण्यांत येत होती. विचारी लोक या बाबतींत विचार करूं लागले. यांपैकीं कांहींनीं धर्मास आलेली ग्लानी व मलीनता दूर करून धर्माचें उदात्त स्वरूप

लोकांस कळावें या हेतूनें रूढ असलेल्या धर्मतत्त्वांत व आचारविचारांत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यामुळें नवीन तत्त्वज्ञान व धर्मपंथ पुढें आले. अशा विचारी लोकांपैकीं महावीर व बुद्ध हे असून त्यांनीं नवीन तत्त्वज्ञान व नवीन ध्येयें लोकांपुढें मांडलीं.

महावीर वर्धमान (इ. स. पू. ५९९ ते इ. स. पू. ५२७)—जैन धर्मपंथ—जैन धर्मग्रंथाप्रमाणें जैन धर्म पुष्कळ प्राचीन असून त्या धर्माचा प्रसार निरनिराळ्या तीर्थकारांनीं (धर्मप्रसार करणारी अधिकारी व्यक्ति) वेळोवेळीं केला होता. त्यापैकीं २३ वा तीर्थंकार पार्श्वनाथ हा होता. इ. स. पू. ८ व्या शतकांत हा होऊन गेला. याच्यानंतर सुमारें २५० वर्षांनीं महावीर वर्धमान हा तीर्थंकार झाला. यानें या धर्माची नीट मांडणी करून त्याचा बराच प्रसार केला म्हणून त्यास जैन धर्माचा संस्थापक मानण्यांत येते. वर्धमानाचा जन्म मगधमधील वैशालीजवळ एका क्षत्रिय कुळांत झाला (इ. स. पू. ५९९). त्याचें योग्य वेळीं लग्न झालें पण संसारांत त्याचें लक्ष लागलें नाहीं व त्याच्या मनास शांति मिळेना. तेव्हां तिसाव्या वर्षीच त्यानें मगधची राजधानी राजगृह व इतर ठिकाणीं १२ वर्षें प्रवास केला. या काळांत इंद्रियदमन, सदाचार, अहिंसाव्रताचें पालन केल्यावर आपणांस मनःशांति मिळविण्याचा मार्ग सांपडला व दिव्य ज्ञान प्राप्त झालें असें त्यास वाटलें. त्यानें इंद्रियावर ताबा मिळविला होता म्हणून त्यास 'जिन' किंवा 'महावीर' असें म्हणण्यांत आलें. यापुढील तीस वर्षें त्यानें ठिकठिकाणीं प्रवास करून आपल्या मताचा प्रसार करण्यांत घालविलीं. मगधचा राजा बिंबिसार व त्यानंतर गादीवर येणारा अजातशत्रू यांचा त्यास पाठिंबा होता. त्यावेळीं मगधमध्यें बोलली जाणारी अर्धमागधी (पाली भाषेची पोटभाषा) या भाषेमध्यें त्यानें आपल्या धर्मपंथाचा प्रसार केला. त्यास पुष्कळ अनुयायी मिळाले. यांपैकीं कांहीं गृहस्थाश्रमी असून कांहीं प्रचारक होते. ते त्याच्या धार्मिक संघांत सामील झाले. संघांत सामील होणारास (१) अहिंसा (२) सत्य (३) अनासक्ति व (४) पवित्र आचरण यांचें पालन करण्याची शपथ घ्यावी लागे.

जैन धर्माचीं तत्त्वें :

(१) शरीरास कष्ट देऊन व तपश्चर्या करून मनावर व शरीरावर पूर्ण ताबा मिळविणें, अहिंसा व्रत पाळणें.

(२) ईश्वराचें अस्तित्व मान्य करण्याची जरूरी नाहीं. तेव्हां त्याची प्रार्थना नको व त्याच्या प्रतिमेची पूजा नको.

(३) जग हें जड देह व आत्मा यांनीं भरलेलें आहे. कर्मानें आत्मा हा जड देहांत गुरफटला जाणें हेंच दुःखाचें कारण आहे. तेव्हां त्याची देहापासून मुक्तता करणें व शांति मिळवणें हें ध्येय आहे.

(४) यज्ञयागादि कृत्यें निरर्थक आहेत. त्यामुळें मुक्ति किंवा निर्वाण मिळावयाचें नाहीं.

(५) नीतिमार्गानें चालणें हेंच श्रेयस्कर आहे.

ठिकठिकाणीं हिंडून व आपल्या मताचा प्रसार करून वयाच्या ७२ व्या वर्षीं महावीर राजगृहाजवळ पावा या ठिकाणीं मरण पावला (इ. स. पू. ५२७). त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या धर्माचा फारसा प्रसार झाला नाहीं. पुढें त्याचे अनुयायी तो दैवी होता असें मानून त्याची व त्याच्यापूर्वी होऊन गेलेल्या २३ तीर्थंकरांची पूजा करूं लागले.

जैनधर्माचा प्रसार मगध, कलिंग, कर्नाटक, अजमीर व मारवाड या ठिकाणीं विशेष झाला. पुढें इ. स. ३०० च्या सुमारास त्यांच्यांत दिगंबर व श्वेतांबर असे दोन पंथ निर्माण झाले. अहिंसा व्रताचें योग्य पालन करितां यावें म्हणून जैनांनीं शेतकी वगैरे धंदे सोडून दिले व व्यापारांत लक्ष घालून नांव मिळविलें.

जैनांनीं अजमीर, अबू, काठेवाड वगैरे ठिकाणीं उत्तम मंदिरें बांधलीं. वेरूळच्या लेण्यांपैकीं कांहीं लेणीं व ओरिसामधील कांहीं लेणी जैनांचीं आहेत. दक्षिण भारतामध्यें श्रवणबेलगोला येथें गोमाता या जैन साधूचा ५६ फूट उंचीचा प्रचंड पुतळा उभारलेला आहे. जैन हा हिंदुधर्मांतील एक पंथ मानण्यांत येतो.

गौतम बुद्ध—(इ. स. पू. ६२४ ते इ. स. पू. ५४४)—बौद्ध धर्माचा संस्थापक सिद्धार्थ हा होय. याचा जन्म इ. स. पू. ६२४ च्या सुमारास शाक्य देशाची राजधानी कपिलवस्तुजवळ झाला. याचा बाप शाक्यांचा राजा होता. सिद्धार्थाचा जन्म झाल्यावर त्याची आई मरण पावल्यामुळें त्याची सावत्र आई व मावशी गौतमी हिनें लहानपणीं त्याचें पालनपोषण केलें, म्हणून त्यास

गौतमीपुत्र असें म्हणतात. तो राजपुत्र असल्यामुळें राजपुत्रास योग्य असें त्यास शिक्षण देण्यांत आलें. योग्य वेळीं यशोधरा या राजकन्येशीं त्याचें लग्न झालें. या लग्नसंबंधापासून त्यास राहूल हा मुलगा झाला. सिद्धार्थाचें लहानपण व तरुणपण सुखामध्यें व आनंदामध्यें जात असल्यासारखें दिसत होतें. पण तो विचारी होता. राजवाड्याच्या बाहेर गेला असतां सभोंवतालीं दृष्टीस पडणाऱ्या गोष्टींनीं त्याचें मन उद्विग्न होई व तो विचार करूं लागे. एकदां स्थांतून बाहेर गेला असतां एक वार्धक्यानें जर्जर झालेला भिक्षेकरी भिक्षेची याचना करीत रस्त्याच्या कडेला बसलेला त्यानें पाहिला. तसेंच मृत शरीर, त्याचे नातेवाईक अत्यंविधीसाठीं नेत असलेलें त्याच्या दृष्टीस पडलें. अशा प्रकारचीं दृश्यें पाहिल्यावर त्याच्या मनावर अतोनात परिणाम होई व तो विचार करूं लागे. जगांत दुःख असण्याचें कारण काय ? सर्व मानवतेस सुख व शांति यांचा लाभ कशामुळें मिळेल. मरण कोणासही चुकवितां येत नाहीं, तेव्हां जिवंत असतांना योग्य प्रकारें जीवनक्रम घालविण्याचा मार्ग कोणता ? स्वार्थी दृष्टि व जीवनकलह यांमुळें गरीब लोकांच्या असाहाय्य स्थितीचा बलवत्तर लोक फायदा घेतात, तेव्हां ती स्थिति बदलण्याचा कांहीं मार्ग आहे का ? यांविषयीं तो विचार करूं लागे. राजवाड्यांतील सुखोपभोगांमध्यें त्याचें मन रमेना. अशी स्थिति असतां एके दिवशीं त्यानें गृहत्याग केला व तो गयेस गेला. यावेळीं त्याचें वय २९ वर्षांचें होतें. तेथें त्यानें ६ वर्षें शरीर कष्टवून तपश्चर्या केली. पण त्यास शांति मिळाली नाहीं. त्यानें निरनिराळ्या धार्मिक गृहस्थांचें, तपस्यांचें, विद्वांनांचें शिष्यत्व पतकरून जगांतील दुःख नाहींसें करण्याचा मार्ग त्यांच्या उदाहरणानें सांपडतो का हें पाहिलें. पण तसा मार्ग त्यास आढळला नाहीं व त्याची तीव्र निराशा झाली. त्यानें ठिकठिकाणीं प्रवास केला. अशी स्थिति असतां एके दिवशीं गयेमध्यें नदींत स्नान करून तो पिंपळाच्या झाडाखालीं ध्यानस्त बसला असतां आपणांस दिव्य दृष्टि प्राप्त झाली व योग्य मार्ग सांपडला असें त्यास वाटलें. त्याच्या मनास शांति प्राप्त झाली. आपणास मिळालेलें हें दिव्य ज्ञान इतरांसही द्यावें व जगांतील दुःख घालविण्याचा प्रयत्न करावा असें त्यास वाटलें. त्यानें ठिकठिकाणीं प्रवास केला व त्यास पुष्कळ शिष्य मिळाले. त्यानें त्यास आपल्या या मार्गाची माहिती दिली. त्यानें केलेल्या उपदेशामुळें लोक सिद्धार्थास **'बुद्ध'** म्हणजे 'ज्ञानी' असें म्हणूं लागले.

बुद्धाचा संदेश व शिकवणूक—वासनेचा अतिरेक हें दुःखाचें कारण होय. तेव्हां वासनेवर ताबा ठेवल्यास दुःखाचें कारण नाहींसें होईल. तसेंच शरीर कष्टवून तपश्चर्या करणेंही योग्य नाहीं. तेव्हां हे दोन्ही अतिरेक टाकून मधल्या मार्गाचा अवलंब करणें योग्य आहे. हा मार्ग नीट पाळतां यावा म्हणून खालील आठ गोष्टींचें पालन प्रत्येकानें करावें. (१) योग्य विचार (२) योग्य ध्येय (३) योग्य भाषण (४) योग्य वागणूक (५) योग्य मार्गानें उपजीविका (६) योग्य प्रयत्न (७) योग्य चिंतन (९) योग्य मनोनिग्रह.

या मार्गाचा अवलंब केल्यास मनुष्य क्षणभंगुरत्वापासून शाश्वत स्थितिप्रत व दुःखमय स्थितिपासून आनंदमय स्थितिप्रत पोहोंचेल. ही आनंदमय स्थिति म्हणजेच निर्वाण होय.

ईश्वराचें अस्तित्व आहे कीं नाहीं याविषयीं त्यानें विचार केला नाहीं. पुनर्जन्माची कल्पना त्यानें गृहित धरली व आपल्या कर्माप्रमाणें प्रत्येकास जन्म-मरणाच्या फेऱ्यांतून जावें लागतें असें मानिलें. देवता, देवतेची कृपा, याची जरूरी नाहीं. निर्वाण पदाप्रत जाणें हें प्रत्येकाच्या स्वाधीन आहे. त्यानें यज्ञयाग, मानवी ज्ञानाच्या पलीकडील शक्ति यांस महत्त्व दिलें नाहीं. 'ब्रह्म प्रत्यक्ष कोणींच पाहिलें नाहीं' असें तो म्हणे. "जगांतील प्रत्येकाबद्दल करुणा बाळगून मानवजातीचें कल्याण करण्यासाठीं तुम्ही जा, प्रत्येकानें वेगवेगळ्या दिशेस जावें." असा त्यानें आपल्या साठ शिष्यांस उपदेश केला. अशाप्रकारें दया, क्षमा, शांति हे गुण बुद्धाच्या ठिकाणीं असल्यामुळें व लोकांपुढें उच्च ध्येय ठेविल्यामुळें तो आदरणीय झाला.

बुद्धानें पुढील सर्व आयुष्य आपल्या धर्मपंथाचा, मगध, कोसल व शाक्य या राज्यांत प्रसार करण्यांत घालविलें. तेथील लोकांच्या भाषेंत त्यानें धर्माचा प्रसार केला. त्यास ठिकठिकाणीं पुष्कळ शिष्य मिळाले. नेपाळच्या सरहद्दीजवळ कुशीनगर येथें इ. स. पू. ५४४ च्या सुमारास तो मृत्यु पावला.

बौद्ध धर्मीयांच्या परिषदा व धर्मग्रंथ वगैरे—बुद्धानें स्वतः कांहीं लिहिलें नव्हतें. बुद्धाच्या मृत्यूनंतर त्याच्या अनुयायांनी ठिकठिकाणीं निरनिराळ्या वेळीं परिषदा भरवून त्याचीं वचनें, त्याच्या शिकवणुकींतील तत्त्वें एकत्रित करून त्यांची नीट मांडणी केली. बुद्ध वचनांच्या या संग्रहास '**त्रिपिटीक**'

अनुक्रम 20722 वि: 31/12/17
नोंक 643 नों: दि: 24.5.18

(तीन टोपल्या) असें म्हणण्यांत येतें. त्यांत (१) बुद्ध वचनें (२) बुद्धाचें जीवन (३) बौद्ध धर्मीयांनीं अमलांत आणावयाचे नियम आहेत. हे ग्रंथ पाली भाषेंत लिहिलेले होते. सीलोन, ब्रह्मदेश व सयाम येथें ही भाषा प्रचलित होती. नंतर ते संस्कृतमध्यें लिहिण्यांत आले व नेपाळांत गेले. या संस्कृत भाषेंतील भाषांतराचा चीन, जपान, तिबेट या देशांत प्रसार झाला.

पुढें अशोक व कनिष्क यांच्या कारकीर्दीत बौद्ध धर्माचा भारतांत व भारताबाहेरही खूप प्रसार झाला. बुद्धाच्या मृत्यूनंतर कांहीं शतकें बौद्ध धर्मामध्यें कांहीं बदल झाला नाहीं. पण इ. स. १०० च्या सुमारास बुद्धाची मूर्ति करून त्याची पूजा करण्याचा प्रघात रूढ झाला. त्यामुळें बौद्ध धर्मीयांमध्यें दोन पंथ पडले व ते म्हणजे हीनयान व महायान हे होत. हीनयान पंथाचे लोक बुद्धाच्या मूर्तीची पूजा करीत नाहींत. महायान पंथाचे लोक बुद्धाच्या मूर्तीची पूजा करितात. महायान पंथीयांनीं बौद्ध धर्मासंबंधाचें वाङ्मय संस्कृत भाषेंत लिहिलें.

भारतांतील प्राचीन काळचीं राज्यें— प्राचीन काळीं भारताच्या निरनिराळ्या भागांत अनेक लहानमोठीं राज्यें अस्तित्वांत होतीं. त्यांपैकीं कांहीं राज्यें राजसत्ताक, कांहीं सरदारसत्ताक व कांहीं लोकसत्ताक होतीं. यांपैकीं कांहींनीं आपसांत संघहि स्थापन केलेले होते. यांच्यामध्यें अनेक वेळां आपसांत युद्धप्रसंग होत. यांपैकीं बऱ्याच राज्यांसंबंधीं त्यांच्या नांवाखेरीज फारशी माहिती उपलब्ध नाहीं. इ स. पू. ७ व्या शतकापासून यांपैकीं कांहीं राज्यांसंबंधीं माहिती मिळते. यांपैकीं अवंती (उज्जयनीच्या भोंवतालचें), वत्स (प्रयागच्या सभोंवतालचें) कोसल (अयोध्येचें) व मगध (दक्षिण बहार) हीं राज्यें प्रमुख असून भोवतालचीं लहान लहान राज्यें पादाक्रान्त करून आपली सत्ता वाढवावी अशी त्यांच्यामध्यें स्पर्धा होती. पण यांपैकीं मगधचें राज्य पुष्कळ वाढून तें प्रबळ झालें.

मगधच्या सत्तेची वाढ (इ. स. पू. ६५० ते इ. स. पू. ३२२)— इ. स. पू. ६५० पासून इ. स. पू. ३२२ वर्षापर्यंतच्या काळांत मगध येथें दोन घराण्यांनीं राज्य केलें. हीं दोन घराणीं म्हणजे शिशुनाग (इ. स. पू. ६५० ते इ. स. पू. ४१३) व नंद (इ. स. पू. ४१३ ते इ. स. पू. ३२२) हीं होत. शिशुनाग घराण्यांतील ५ वा राजा बिंबिसार व त्याचा मुलगा अजातशत्रु हे महत्त्वाकांक्षी व पराक्रमी होते व त्यांनीं शेजारचीं कांहीं राज्यें जिंकून घेतल्यामुळें

त्यांच्या कारकीर्दीत मगधच्या राज्याची खूप वाढ झाली. गिरिव्राज ही या राज्याची राजधानी होती व या राजधानीस चांगला कोट व भोंवतालीं ५ टेंकड्या असल्यामुळें ती अभेद्य अशी होती. पण अजातशत्रूनें गंगा व शोण या नद्यांच्या संगमावर एक भक्कम किल्ला बांधला व हें मध्यवर्ती ठिकाण असल्यामुळें या भोंवतीं मोठें शहर स्थापन होऊन तें पाटलीपुत्र या नांवानें प्रसिद्धीस आलें. पुढील कारकीर्दीत **पाटलीपुत्र** (सध्यांचें पाटणा) हें मगधच्या राजधानीचें ठिकाण झालें व त्यानंतर जवळ जवळ एक हजार वर्षे तें भारतांतील प्रमुख असें राजधानीचें ठिकाण म्हणून राहिलें.

नंद घराणें (इ. स. पू. ४१३ ते इ. स. पू. ३२२)—इ. स. पू. ४१३ मध्यें महापद्मनंद यानें शिशुनाग घराण्यांतील राजास दूर करून मगधचें राज्य बळकाविलें. हा पराक्रमी राजा होता. त्यानें गंगा व यमुना यांमधील राज्यांवर आपलें वर्चस्व स्थापन करून आपली सत्ता बरीच वाढविली. त्याच्यानंतर आठ राजे झाले. त्यांपैकीं शेवटच्या राजाचें नांव धनानंद असें होतें. त्यावेळीं मगधचें साम्राज्य मोठें झालें असून सर्व उत्तर भारतांत तें प्रमुख व बलाढ्य मानलें जाई. त्यावेळीं या साम्राज्याच्या सैन्यांत २००० रथ, ३००० हत्ती, २०००० घोडेस्वार व २ लाख पायदळ ही संख्या असून या राज्याचा खजिनाही संपत्तीनें भरलेला होता. अशारीतीनें शिशुनाग व नंद या घराण्यांच्या कारकीर्दीत मगधचें साम्राज्य प्रबळ होत असतां भारताच्या वायव्येकडील भागावर परकीयांच्या स्वाऱ्या सुरू झाल्या.

इराणच्या सम्राटाची स्वारी—इ. स. पू. ६ व्या शतकांत सायरस (Cyrus) यानें भोंवतालचीं राज्यें जिंकून इराणी लोकांचें एक प्रबळ राज्य स्थापन केलें. सायरसनंतर डारायस (Darius इ. स. पू. ५२२–४८६) यानें तें राज्य बरेंच वाढवून गांधार (अफगाणिस्थान) प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणला, व सिंधू नदीच्या पश्चिमेकडील प्रदेशावर आपलें वर्चस्व बसविलें. सिंधू नदीवरून ते भारतांतील लोकांस सिंधूच्या पलीकडे वास्तव्य करणारे म्हणून '**हिंदु**' असें म्हणत.

अलेक्झांडरची स्वारी (इ. स. पू. ३२७–२६)—यानंतर ग्रीकांचा सम्राट अलेक्झांडर यानें भूमध्यसमुद्रापासून भारताच्या सीमेपर्यंत पसरलेल्या इराणच्या साम्राज्यावर इ. स. पू. ३३४ मध्यें स्वारी केली. त्यानें इराणच्या

सम्राटाचा पराभव केला व इ. स. पू. ३२७ मध्यें हिंदुकुश पर्वत ओलांडून तो भारताच्या वायव्यसीमेपर्यंत आला. तेथें लहान लहान अशीं अनेक भारतीय राज्यें होतीं. तो सिंधू नदी ओलांडून तक्षशीला येथें आला. तेथें त्याच्या सैन्यास पुरु राजानें तोंड दिलें. पुरु राजाच्या सैन्यानें शौर्यानें अलेक्झांडरचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला, पण त्याचा पराभव झाला. तरी भारतांत पुढें जाऊन मगधच्या प्रबल साम्राज्यावर स्वारी करण्याचा विचार न करितां तो परत गेला व बॅबिलोनला पोहोंचल्यावर आजारी पडून मरण पावला (इ. स. पू. ३२३). भारताच्या इतिहासाच्या दृष्टीनें अलेक्झांडरची स्वारी ही सरहद्दीच्या प्रदेशावरील एका लहानशा हल्ल्याप्रमाणें झाली व भारताच्या राजकीय इतिहासावर त्याचा परिणाम घडला नाहीं. अलेक्झांडरच्या (शिकंदर) मृत्यूनंतर त्याचें विस्तृत साम्राज्य त्याच्या सरदारांनीं आपसांत वांटून घेतलें. भारताच्या सीमेपासून भूमध्य समुद्रापर्यंतचा प्रदेश त्याचा सरदार सील्यूकस निकेटर (Seleucus) याच्या वर्चस्वाखालीं आला.

(ड) चीनमधील प्राचीन संस्कृति

(इ. स. पू. ५००० ते इ. स. पू. २०६)

चीनची भौगोलिक परिस्थिति—आशिया खंडाच्या पूर्वभागीं बऱ्याच मोठ्या विस्तृत प्रदेशावर पसरलेला व समशीतोष्ण कटिबंधांत असलेला चीन हा एक मोठा खंडप्राय देश आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीनें हा भारताच्या सुमारें दुप्पट व अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें या राष्ट्राच्या सुमारें १।पट मोठा आहे. याचे चीन, मंगोलिया, सीकयाँग व तिबेट असे चार मोठे विभाग आहेत. चीनच्या पूर्वभागीं पॅसिफिक समुद्रालगत दक्षिणोत्तर पसरलेल्या व जवळजवळ भारताएवढ्या मोठ्या चीन या विभागाखेरीज बाकीचे विभाग ओसाड व डोंगराळ आहेत. या देशाच्या फक्त पूर्वभागालगत समुद्रकिनारा आहे. पश्चिमेकडील बर्फाच्छादित अशा पर्वतावरून पूर्वेकडे वहात जाणाऱ्या हो-आंगहो, यांगत्सेकँग व सिकँग या तीन मोठ्या नद्या असून त्यांतून वहात आलेल्या गाळामुळें या नद्यांच्या कांठचा प्रदेश सुपीक बनलेला आहे. या देशाच्या उत्तरेस गोबीचा ओसाड प्रदेश, पश्चिमेस तिबेटचें ओसाड पठार व नैर्ऋत्येस हिमालयासारखा दुर्लंघ्य पर्वत असल्यामुळें प्राचीन काळीं हा देश आशिया खंडांतील इतर देशांहून अलग पडल्यासारखाच

झाला. या देशाची संस्कृति फार प्राचीन म्हणजे म्हणजे इ. स. पू. ५००० वर्षांपासूनची आहे व या संस्कृतीवर भारत, मेसापोटेमिया, इजिप्त या देशांच्या संस्कृतींचा परिणाम न होतां ती स्वतंत्र रीतीनेंच वाढत गेली, व तिचा प्रसार पूर्वेकडील कोरिया, जपान, व दक्षिणेकडील ब्रह्मदेश, भारतीय चीन या प्रदेशांमध्यें प्राचीन काळीं झाला. चिनी लोक मुख्यत्वेंकरून मंगोलियन वंशाचे, वर्णानें पिवळटसर, बसक्या नाकाचे, थंड प्रकृतीचे व सामान्यतः शांततापिय असे आहेत.

चीनची प्राचीन संस्कृति—चीनची संस्कृति फार प्राचीन आहे. इ. स. पू. ५००० वर्षांपर्यंतच्या काळांत पाषाणयुगांतील इतर ठिकाणीं लागलेले शोध त्यांस लागले होते. नंतर त्यांस धातूचाहि शोध लागला. व त्यांची प्रगति झपाट्यानें होत गेली. यानंतर इ. स. पू. २८५२ पासून इ. स. पू. २०६ पर्यंत पांच घराण्यांनीं राज्य केलें. यांपैकीं फू-सी (Fu-Hsi) व सिआ (Hsia) या घराण्यांच्या कारकीर्दीत (इ. स. पू. २८५२ ते १७६६) चीनमध्यें विवाह संस्था, शेतकी, पशुपालन, रेशमी किडयांची जोपासना, लेखनकला, व्यापार, वैद्यकी, चाक असलेले गाडे, घरांची बांधणी, कंपास, गायन वगैरे गोष्टी सुरू झाल्या व त्यामुळें सांस्कृतिक बाबतींत त्यांची बरीच प्रगति झाली. या संस्कृतीचा उगम होआंगहो या नदीच्या खोऱ्यांत झाला. यानंतर आलेल्या शांग घराण्याच्या कारकीर्दीत १७६६–११२२ या संस्कृतीची जोपासना होऊन ती प्रगल्भ होऊं लागली. यावेळीं राजधानीचें ठिकाण होआंगहो या नदीच्या कांठचें सिंगन फू हें ठिकाण होतें, व राज्याचा विस्तार या नदीच्या खोऱ्याभोंवतालच्या प्रदेशांत होता. या राज्याभोंवतालच्या प्रदेशांत अनेक सरंजामी सरदार होते. यावेळीं उत्तरेकडील मंगोलिया, मंचुरिया, पश्चिमेकडील तिबेट व दक्षिणेकडील यांगत्से नदीकांठचा प्रदेश चिनिच्या राज्यांत मोडत नव्हता. उत्तरेकडील प्रदेशांतून रानटी टोळ्यांचे वरचेवर हल्ले होत व त्यापासून राज्याचें रक्षण करण्याचें काम या सरंजामी सरदारांकडे असे.

यानंतर जो (Chou जो) घराण्यानें इ. स. पू. ११२२ ते २४९ पर्यंत म्हणजे नऊ शतकें राज्य केलें. जो घराण्याच्या काळांत चीनची सर्व दृष्टीनें प्रगति झाल्यामुळें त्यास सुवर्णयुग असें म्हणण्यांत येतें. या काळांत राज्याचा विस्तार बराच वाढला व पूर्वेकडील समुद्र व दक्षिणेकडील यांग त्सी कँग नदी

या प्रदेशापर्यंत राज्याचा विस्तार होऊन तें मोठें साम्राज्य झालें. सम्राट यास राजकीय व धार्मिक बाबतींत मुख्य अधिकार आहेत असें मानण्यांत येत असे. ईश्वरी शक्तीची त्याचप्रमाणें पूर्वज यांची पूजा करण्याचा प्रघात होता. या काळांत उद्योगधंदे व कलाकौशल्य या बाबतींत बरीच प्रगति झाली. चिनी लोकांत प्राचीनकाळापासून लेखनकला सुरू झाली होती तरी त्यांच्यांत सुट्या अक्षरावर आधारलेली अक्षरालिपि अस्तित्वांत आली नाहीं व त्यांच्या लिपींत वस्तु, कल्पना व उच्चार यांस वेगवेगळ्या अशा हजारों खुणा असल्यामुळें ती बरीच क्लिष्ट होती व त्या सर्व खुणा अवगत करून त्यांत प्राविण्य संपादन करणें बरेंच कठीण होतें. त्यामुळें कांहीं थोडे बुद्धिमान् लोक शिक्षणाच्या बाबतींत पुढें येत, तरी बहुजन समाज शिक्षणाच्या बाबतींत मागासलेलाच राहिला.

सम्राट् हा ईश्वरानियुक्त आहे असें मानण्यांत येई, तरी त्यानें प्रजेच्या सुखदुःखाशीं समरस व्हावें, त्याचें आचरण आदर्शभूत असावें व लोकांच्या भरभराटीसाठीं त्यानें आपलें लक्ष द्यावें अशी अपेक्षा असे व तसें न झाल्यास त्यास पदच्युत करण्याचा लोकांस अधिकार आहे असें मानण्यांत येई. राज्यकारभार करण्याचे कामीं योग्य, कर्तबगार व ज्ञानसंपन्न अधिकारी असावेत या उद्देशानें बौद्धिक व सामान्य ज्ञान या बाबतींत त्यांची परीक्षा घेऊन नेमणूक करण्याचा प्रघात जो घराण्याच्या काळांत रूढ झाला. घोड्यावर बसणें, तिरंदाजी घेणें, गणित, लेखनकला, कलाविद्यांचें ज्ञान या बाबतींत त्यांची परीक्षा घेतली जाई. या काळांत उद्योगधंदे व कलाकौशल्य या बाबतींत बरीच प्रगति झाली. वाङ्मयांत वृद्धि करण्यांत आली. लोखंडाचीं आयुधें व शस्त्रास्त्रें उपयोगांत आणलीं जाऊं लागली. पावसाच्या कमतरतेमुळें वरचेवर दुष्काळ पडत, तेव्हां त्यापासून निभाव लागावा म्हणून नद्यांस कालवे खणून भोंवतालच्या जमिनीस पाणी पुरविण्याची व्यवस्था सुरू झाली. जो घराण्याचें साम्राज्य मोठ्या विस्तृत प्रदेशावर पसरलेलें होतें, पण इ. स. पू. ६ व्या शतकापासून तेथील सम्राटांची सत्ता कमी होऊन ठिकठिकाणचे सुभेदार, राजेरजवाडे स्वतंत्र होऊन त्यांचे एकमेकांशीं युद्धप्रसंग होऊं लागल्यामुळें साम्राज्यांत अंदाधुंदी सुरू झाली. समाजबंधनें शिथिल होऊं लागली. अशी परिस्थिति असतां या काळांत कांहीं मोठे तत्त्ववेत्ते निर्माण होऊन त्यांपैकीं कांहीं तत्त्ववेत्त्यांनीं प्रतिपादलेल्या नीतितत्त्वांचा व आचारविचारांसंबंधाच्या

शिकवणुकीचा चिनी लोकांवर मोठा परिणाम होऊन त्यांस धर्माचें स्वरूप प्राप्त झालें. या तत्त्ववेत्त्यांपैकीं **लिओत्से** व **कन्-फू-त्से** हे प्रमुख होत.

लिओत्से (Lao Tse) --इ. स. पू. ६०२ च्या सुमारास **लिअर्च** याचा जन्म झाला. त्यानें प्रसृत केलेल्या तत्त्वज्ञानामुळें त्यास 'जुना तत्त्ववेत्ता' म्हणजे 'ली ओत्से' असें म्हणूं लागले व याच नांवानें तो प्रसिद्धीस आला. चीनमध्यें प्राचीन काळापासून संस्कृति नांदत होती. लोकांमध्यें ज्ञानाचा प्रसार वाढत होता, पण या ज्ञानानें लोकांचें नैतिक आचरण सुधारलें नाहीं. मोठें साम्राज्य स्थापन होऊन कांहीं काळ शांततेंत व सुखासमाधानांत जाई, तरी पुढें अंदाधुंदी होऊन राजेरजवाडे एकमेकांशीं लढूं लागत. श्रीमंत गरिबांवर जुलूम करीत. सदाचाराचा लोप झाला व बहुजनसमाज चिरडला जाऊं लागला. तेव्हां ज्ञानप्राप्तीमुळें समाजधारणा नीट होण्याऐवजीं ती वाईट होत चालली. आपल्या भोंवतालची ही स्थिति पाहून लि-ओ-त्सेनें असें प्रतिपादिलें कीं, "फार प्राचीन काळची, मनुष्यास ज्ञान प्राप्त होण्यापूर्वीची स्थिति, तत्कालीन स्थितिपेक्षां फार बरी. तेव्हां परत निसर्गाकडे जा. ज्ञानानें मनुष्याची तृष्णा वाढत जाते व तो असंतुष्ट होऊन स्वार्थी बनतो. तेव्हां प्रत्येकानें वासना आपल्या ताब्यांत ठेऊन आहे त्या स्थितींत समाधान मानून राहावें. प्रत्येकानें आपल्या सभोंवतालच्या माणसांविषयीं प्रेम बाळगिलें, वासनेवर ताबा मिळविला, अधिक ज्ञान व अधिक गरजा वाढविण्याचा प्रयत्न केला नाहीं, तर जगामध्यें सुख, समाधान व शांतता नांदेल." लिओत्सेनें वागणुकीचा हा 'मार्ग' म्हणजे 'ता-ओ' सांगितला. म्हणून त्याच्या धर्मास '**ता-ओ**' असें म्हणतात. चिनी लोकांच्या पूर्वापार चालत आलेल्या चालरीति, धर्मकल्पना यांचे लि-ओ-त्सेनें प्रतिपादिलेल्या धर्मांत मिश्रण झालें. चिनी लोक पुढें याचीं देवळें बांधून त्यांत त्याची पूजा करूं लागले.

कन-फू-त्से (Confucius कन्फ्यूसिअस) (इ. स. पू. ५५० ते इ. स. पू. ४७९)--चिनी लोकांच्या जीवनक्रमावर ज्याच्या तत्त्वज्ञानाचा व शिकवणुकीचा सर्वांत अधिक परिणाम घडला असा दुसरा तत्त्ववेत्ता व विद्वान् गृहस्थ म्हणजे कन-फू-त्से हा होय. याचा जन्म इ. स. पू. ५५० मध्यें एका सरदार घराण्यांत झाला. याचा बाप लू या संस्थानांत एक दुय्यम दर्जाचा अधिकारी होता. तो

तीन वर्षांचा असतांनाच त्याचा बाप मरण पावला. तेव्हां त्यास गरिबींत दिवस काढावे लागले, तरी त्याचें शिक्षण योग्यप्रकारें झालें. लिहिणें, वाचणें, तिरंदाजी, घोड्यावर बसणें, गायन-वादन, योग्यप्रकारें वागणुकीची पद्धत वगैरे गोष्टी त्यास चेत होत्या. तो लहानपणींच लू संस्थानांतील सरकारी नोकरींत शिरला. त्याच्याकडे सोंपविलेलीं सर्व कामें चांगल्याप्रकारें केल्यामुळें हळकें हळकें तो मुख्य न्यायाधीश झाला. पण लू संस्थानाचा संस्थानिक त्याच्याकडे सोंपविलेल्या कामामध्यें कांहीं वेळां व्यर्थ ढवळाढवळ करी, त्यामुळें आपल्या स्वतःच्या कल्पनेप्रमाणें आपल्या खात्यांत जरूर त्या सुधारणा करणें त्यास शक्य झालें नाहीं. एकदां लू संस्थानिकास शेजारच्या संस्थानिकाकडून ऐषआरामाच्या व चैनीच्या गोष्टींची भेट आली. तेव्हां आपल्या संस्थानचा कारभार वेळेवर व योग्यप्रकारें करण्याऐवजीं तो संस्थानिक कांहीं दिवस चैनींत व ऐषआरामांत गढून गेला व त्यामुळें संस्थानच्या कारभाराकडे त्याचें दुर्लक्ष झालें. ही गोष्ट कन्-फू-त्सेला मुळींच आवडली नाहीं. तेव्हां अशा संस्थानांत नोकरीवर राहण्याऐवजीं ती सोडणेंच बरें असें वाटून त्यानें तेथील मुख्य न्यायाधीशाच्या जागेचा राजिनामा दिला व तें संस्थान सोडून तो बाहेर गेला. त्यावेळीं त्याचें वय ५२ वर्षांचें होतें. तरी त्यानें यापुढील १४ वर्षें निरनिराळ्या संस्थानांत जाऊन आपल्या कल्पनेप्रमाणें राज्यकारभारांत योग्य त्या सुधारणा करण्याची पूर्ण मुभा देऊन आपणांस अधिकाराची जागा देण्यास एखादा संस्थानिक तयार आहे का हें पहाण्याचा प्रयत्न केला. पण त्यास तशी संधि कोणत्याच संस्थानिकानें दिली नाहीं. तेव्हां वृद्धपणीं तो आपल्या लू संस्थानांत परत आला. त्यावेळीं त्याचें वय ६७ वर्षांचें होतें, तरी त्या वयांत त्यानें तेथें एक विद्यापीठ काढलें व राजकीय तत्त्वज्ञान शिकविण्यास सुरवात केली. त्याच्या विद्वत्तेबद्दल व शिकवणुकीबद्दल लोकांची इतकी श्रद्धा होती कीं, यापुढील ४-५ वर्षांत त्याच्याकडे जवळ जवळ २००० लोक ज्ञान संपादन करून गेले. चीनमध्यें प्राचीन काळीं होऊन गेलेल्या विद्वानांच्या ग्रंथांचें तेथें अध्ययन केलें जाई. अशाप्रकारें आपलें शेवटचें आयुष्य विद्यादानांत घालवीत असतां कन-फू-त्से हा इ. स. पू. ४७९ मध्यें मरण पावला. राज्यकारभाराची पद्धत आपल्या कल्पनेप्रमाणें सुधारण्याची संधि आपणांस मिळाली नाहीं याबद्दल आपली निराशा झाली असल्याचें मरणसमयीं त्यानें उद्गार काढले. कन-फू-त्से यास चीनची प्राचीन

संस्कृति, पूर्वापार चालत आलेल्या रूढी व चालीरीती यांबद्दल अभिमान वाटे. कन-फू-त्से यानें धार्मिक बाबींसंबंधानें नवीन विचार लोकांपुढें मांडले नाहींत. पण राजा, जनता, लोकांचे आपापसांतील व्यवहार कोणत्या नीतितत्त्वांवर आधारलेले असावेत याबद्दल विचार लोकांपुढे मांडले. त्यांपैकीं कांहीं विचार पुढें दिले आहेत :—

(१) एखाद्यानें सत्ता बळकावून आपल्याकडे राजसत्ता घेतली व तो स्वतःस राजा म्हणवून घेऊं लागला तरी चालेल, पण त्यानें राजाप्रमाणें न्यायानें प्रजेचें हित लक्षांत आणून राज्यकारभार केला पाहिजे. प्रजेवर जुलूम करणें म्हणजे राज्यकारभार करणें नव्हे.

(२) राजानें व राज्यांतील अधिकाऱ्यानें आपल्या नैतिक आचरणानें प्रजेस गुन्हेगारीपासून परावृत्त केलें पाहिजे. नुसता कायदा व शिक्षा यांनीं प्रजा सुधारणार नाहीं, तर कायद्याच्या कचाट्यांत न सांपडतां गुन्हे कसे करावेत हेच शिकेल. पण राजाचे किंवा राजाच्या अधिकाऱ्याचें नैतिक आचरण प्रजेपुढें आदर्शभूत असल्यास प्रजेस गुन्हेगारीबद्दल शरम वाटेल व ती सुधारेल.

(३) राजापासून प्रजेंतील सामान्य माणसापर्यंत प्रत्येकानें आपलें शील व आचरण चांगलें ठेविलें पाहिजे.

(४) प्रत्येकानें इतरांशीं सदाचाराची व नम्रतेची वागणूक ठेवावी. इतरांनीं तुमच्याशीं ज्याप्रमाणें वागणूक ठेवूं नये असें तुम्हांस वाटतें, तशी वागणूक तुम्ही इतरांशीं ठेवूं नका.

(५) आपलें ज्ञान वाढवून योग्य विचार करण्याचा व मन पवित्र करण्याचा प्रत्येकानें प्रयत्न करावा.

(६) आध्यात्मिक व पारलौकिक गोष्टींचा विचार करण्याची जरूरी नाहीं, कारण आपणांस या जगांतील लोकांशींच कर्तव्य आहे.

(७) वाजवीपेक्षां जास्ती काळजी घेणारा मनुष्य क्वचितच चुकतो.

(८) योग्य गोष्ट कोणती ती ओळखणें व ती अमलांत आणण्याचा प्रयत्न न करणें म्हणजे भित्रेपणा आहे.

(९) ज्ञान आत्मसात् करून विचारपूर्वक त्याचा योग्य उपयोग केला नाहीं तर तें ज्ञान धोक्याचें होय.

अशा प्रकारें कन-फू-त्सेनें प्रतिपादिलेल्या नीतितत्वांचा व व्यावहारिक उपदेशाचा चिनी लोकांच्या सामाजिक व धार्मिक जीवनावर पुष्कळ परिणाम झाला. त्याच्या मृत्यूनंतर चिनी लोक त्याचीं देवळें बांधून त्यांत त्याची पूजा करूं लागले.

कन-फू-त्से हा वाङ्मयभक्त होता. त्यानें निरनिराळ्या विषयांवर बरेच ग्रंथ लिहिले, त्याचप्रमाणें पूर्वी होऊन गेलेल्या विद्वान् लोकांच्या ग्रंथांतील विचार जतन करून ठेवले. यास चीनच्या प्राचीन संस्कृतीचा व परंपरेचा अभिमान होता व त्यांत शक्य तो बदल होऊं नये असें वाटत होतें, त्यामुळें त्याच्या शिकवणुकीनें चीनमध्यें सनातनी वृत्ति बळावली व पूर्वीच्या पद्धतींत बदल करण्याची आवश्यकता नाहीं असें लोकांस वाटूं लागलें. त्यामुळें नवीन ज्ञान संपादन करण्याच्या कामीं लोक उदासीन राहूं लागले.

इ. स. पू. ६ व्या शतकापासून चीनमध्यें सुरू झालेली अस्वस्थता पुढील दोन तीन शतकांत वाढत गेली व इ. स. पू. २४९ मध्यें जो (chou) घराण्याची सत्ता संपुष्टांत आली व ठिकठिकाणीं अनेक राज्यें स्थापन झालीं. शेवटीं चीन प्रांतांतील चीन घराण्यांतील एका सरदारानें आपली सत्ता प्रस्थापित करून सर्वत्र स्थिरस्थावरता केली. त्यानें आपलें राज्य खूप वाढविलें व मोठें साम्राज्य स्थापन केलें. तेव्हां त्यांस पहिला सम्राट् (**शी–हाँग-टी**) असें म्हणण्यांत येऊं लागले (इ. स. पू. २४९–२१२). त्यानें ठिकठिकाणीं अधिकारी नेमले व आपलें सैन्य प्रबळ केलें. ठिकठिकाणीं रस्ते व कालवे बांधून साम्राज्यांतील निरनिराळे भाग एकमेकांस जोडले. त्यामुळें दळणवळण व व्यापार यांची वाढ झाली. त्यानें यांगत्से नदीच्या दक्षिणेकडील भाग आपल्या वर्चस्वाखालीं आणला. उत्तरेकडे मंगोलियाच्या बाजूला असलेल्या रानटी टोळ्यांस पिटाळून लाविलें, व त्यांनीं त्या बाजूनें चीनवर पुनः स्वारी करूं नये म्हणून पूर्वेकडील पीत समुद्रापासून पश्चिमेकडील डोंगराळ भागापर्यंत (चीनच्या उत्तर व वायव्य सरहद्दीवर) एक प्रचंड व लांब भिंत बांधली (इ. स. पू. २२१–२१२). ही भिंत १५०० मैल लांब, २० ते ३३ फूट उंच व १२ ते १५ फूट रुंदीची आहे.

दर १०० यार्डांवर ४० फूट उंचीचे बुरूज त्यांमध्यें आहेत. ही बांधण्यास लाखों माणसें १० वर्षें खपत होतीं; व तिला जगांतील एक आश्चर्य मानण्यांत येतें.

शी-हॉंग-टी यानें विद्वानास उत्तेजन दिलें. चिनी लोकांच्या मनावर जुन्या चालीरीतींचा व आचारविचारांचा फार पगडा आहे, तेव्हां तो दूर करण्यासाठीं त्यानें कन-फू-त्से व इतर सनातनी विचारांचे लोक यांचे वैद्यकी व शेतकी-खेरीज इतर विषयांचे ग्रंथ नष्ट करण्याचें ठरवून त्याविरुद्ध फर्मान काढलें. हा इ. स. पू. २१२ मध्यें मरण पावला. याच्या मृत्यूनंतर पुनः अंदाधुंदी होऊन इ. स. पू. २०६ मध्यें हॅन घराणें स्थापन झालें.

सारांश

संस्कृति म्हणजे-मानवी समाजाचे आचार विचार, रहाण्याची पद्धत, त्यानें स्थापन केलेल्या राजकीय, सामाजिक, धार्मिक व आर्थिक संस्था.
(इ. स. पू. ५००० ते इ. स. पू. ३००)

(अ) **इजिप्तमधील प्राचीन संस्कृति**-इ. स. पू. ५००० ते इ. स. पू. ३३२; पांच कालखंड.

(१) इ. स. पू. ५००० ते इ. स. पू. ३४०० शेतकी, पशुसंवर्धन, वीणकाम, खाणकाम, पंचांग, देवदेवतांची पूजा, नगरराज्यें, चित्रलिपी.

(२) जुन्या राज्यांचा काळ-इ. स. पू. ३४०० ते इ.स. पू. २१६०. वेगवेगळ्या राज्यांचें एकीकरण, सम्राट व सरदार थडगीं बांधीत. मरणोत्तर जीवन यांवर विश्वास, खूफू राजाचा भव्य पिरॅमिड. तेथें सांपडलेल्या (पिरॅमिड) वस्तूंवरून इजिप्तच्या प्राचीन संस्कृतीची कल्पना.

(३) मध्य राज्यांचा काळ इ. स. पू. २१६०-१५८० कारनॅक येथील प्रचंड देवालयाचें व लक्सर येथील देवालयाचें बांधकाम सुरू. नाईल ते तांबडा समुद्र कालवा. घोडें व रथ यांचा उपयोग करणाऱ्या हिक्सोस लोकांचें राज्य (इ. स. पू. १८००-१५८०).

(४) साम्राज्यकाळ-इ. स. पू. १५८०-११५० वैभवाचा काळ. सीरिया, पॅलेस्टाईन, न्युबिया, लीबीया साइनाई प्रदेशांवर वर्चस्व. इजियन समुद्रांतील बेटें यांमध्यें इजिप्तमधील संस्कृतीच्या प्रसार व व्यापारवृद्धि. पूर्वेकडील भारत, अरबस्थान, मेसापोटेमिया व इराण वगैरे प्रदेशांशीं व्यापार, इजिप्तच्या राजघराण्याची मीड लोकांच्या राजघराण्याशीं सोयरीक.

कारनॅक व लक्सर येथील देवालयांचें बांधकाम पुरे. स्तंभावर भिंतींवर व पॅपिरसच्या भिंडोळ्यांवर पराक्रमाचीं वर्णनें. मोठाले दगडी पुतळे. हॅट-शेप्सट ही प्रसिद्ध राणी. देवळें बांधणें, व्यापार वृद्धि; ३ रा थूटमोज, तिसरा ॲमेनहोटेप व २ रा रॅमसीस हे पराक्रमी राजे.

(५) ऱ्हासकाळ इ. स. पू. ११५०–३३२; इ. स. पू. ६७०–५५२ असेरियनांचें वर्चस्व; इ. स. पू. ५५२ ते इ. स. पू. ३३२ इराणी लोकांचें वर्चस्व; नंतर ग्रीकांचें.

शॉनपॉलयॉन यानें रॉझेटा शिलेवरील चित्रलिपीचा पहिल्यानें अर्थ लाविला.

(ब) **मेसापोटेमियांतील प्राचीन संस्कृति** इ. स. पू. ५००० ते इ. स. पू. ३३१; सहा प्रमुख कालखंड–

(१) सुमेरियन संस्कृति (इ. स. पू. ५००० ते २७५०) उर, लागेश वगैरे नगरराज्यें. शेतकी, पशुपालन, व्यापार, शब्दास खुणा असलेली कोन-लिपी. विटांवर लिखाण; झिगरूट देवस्थान, ६० च्या पटीवर संख्या गणणें.

(२) ॲक्कॅडियन–सुमेरियन साम्राज्य (इ. स. पू. २७५० ते २२००) ॲक्केडियनांचें सुमेरियन जमातीवर वर्चस्व पण सुमेरियन संस्कृतीचा स्वीकार. १ ला सारगॉन प्रसिद्ध सम्राट.

(३) बॅबिलोनियाचें साम्राज्य (जुनें) (इ. स. पू. २२००–७५०) अमोराईट या सेमेटिक जमातीचें वर्चस्व. बॅबिलोन राजधानी, हामुराबी (इ. स. पू. २०६७-२०२५) प्रसिद्ध सम्राट, सुमेरियन संस्कृतीचा स्वीकार, कायद्यांचें संकलन, दगडावर कोरलेली प्रत उपलब्ध. ईशान्येकडून कासाईटांची स्वारी. घोडे व रथ यांचा उपयोग व कासाईटांचें वर्चस्व, सुमेरियन संस्कृतीचा स्वीकार व बॅबिलोनियन लोकांत मिसळून गेले (इ. स. पू. १७५० ते ११००).

(४) असेरियन साम्राज्य (इ. स. पू. ७५० ते ६१२) : निनेव्हा हें राजधानीचें ठिकाण. इ. स. पू. ११०० पासून पुढें. लोखंडाचीं आयुधें; आर्मेनियावर वर्चस्व. इ. स. पू. ७५० बॅबिलोनियन साम्राज्यावर वर्चस्व. सीरिया, पॅलेस्टाइन व इजिप्त (इ. स. पू. ६७०) प्रदेशावर साम्राज्य विस्तार-२ रा सारगॉन प्रसिद्ध सम्राट, निनेव्हा येथें मोठा राजवाडा व वैभवशाली शहर; सेनॅकरीब राजवाडे व मंदिरें बांधलीं, आसूर बानीपाल ग्रंथ-संग्रहालय. बांधकाम, शिल्पकला–जनावरांचे पुतळे यांत प्रगति. रस्ते

बांधणें, जिंकलेल्या प्रदेशाकडून खंडणी, युद्धाच्या वेळीं क्रूरपणा. कडक राज्यकारभार.

(५) बॅबिलोनियाचें साम्राज्य–नवें (खाल्डियाचें साम्राज्य) सेमिटिक खाल्डियन जमातीचें साम्राज्य इ. स. पू. ६१२ ते ५३९- नेबूछाडनेझर प्रसिद्ध सम्राट, जेरूसलेम उध्वस्त; ज्यू लोकांस बॅबिलोनियांत हद्दपार, झुलतें उद्यान. बॅबिलोन राजधानी. ज्योतिष शास्त्रांत प्रगति. ग्रह व आकाशस्थ गोल यांस देवता समजून त्यांची पूजा.

(६) इराणचें बॅबिलोनियावर वर्चस्व (इ. स. पू. ५३९ ते ३३१).

(क) भारतांतील प्राचीन संस्कृति (इ. स. पू. ५००० ते इ. स. पू. ३००)

आदिवासी-भिल्ल, कोळी, संताळ वगैरे आदिवासी. धातूचा शोध लागला नाहीं, प्रगति झाली नाहीं, व द्रविड लोकांपुढें माघार, डोंगराळ प्रदेशांचा आश्रय. (इ. स. पू. १५००० ते इ. स. पू. ७००).

द्रविड संस्कृति–इ. स. पू. ५००० ते इ. स. पू. ७००

(१) तांबें, लोखंड, सोनें वगैरे धातूंचा शोध. त्यामुळें त्यांचीं हत्यारें, आयुधें, भांडीकुंडीं व आदिवासी लोकांवर विजय

(२) किल्ले बांधून व गांवें स्थापून रहाणें. शासनसंस्था

(३) शेती, विणकाम, नौकानयन हे उद्योगधंदे, पशूपालन व संवर्धन.

(४) लिंगपूजा, देवताची पूजा,

(५) आर्यांपुढें त्यांस माघार घ्यावी लागली.

(६) आर्य संस्कृति, द्रविड संस्कृति व आदिवासी चालीरीति, व इतर आर्येतर संस्कृत्या यांच्या मिश्रणानें हिंदु संस्कृति.

सिंधू संस्कृति-(इ. स. पू. ३५०० ते इ. स. पू. २०००) सिंधु नदीच्या काठील मोहेंजदाडो व रावीच्या काठीं हरप्पा, नगररचना व बांधकाम, वृत्ति व्यापारी धातूंचा उपयोग माहीत. शस्त्रास्त्रें, भांडीकुंडीं, अलंकार. मुद्रावरील लिपीचा अर्थबोध नाहीं. सुमेरियन लोकांचे समकालीन; उर येथें सिंधू संस्कृतीच्या व मोहेंजेदाडो व हरप्पा येथें सुमेरियन मुद्रांचा शोध. संस्कृति कोणाची हें निश्चित नाहीं. द्रविडांची असूं शकेल. कां नाश पावली हें अनिश्चित.

आर्य संस्कृति (इ. स. पू. २५०० ते इ. स. पू. ७००)-पूर्वीचें वसतिस्थान कॅस्पियन समुद्राच्या उत्तरेस. लॅटिन, ग्रीक, पेहलवी व संस्कृत या भाषांतील कांहीं शब्दांत विलक्षण साम्य.

आर्यांचा ऋग्वेद जगांतील अतिशय प्राचीन ग्रंथ–प्रार्थना, यज्ञयाग व तत्वज्ञान विषयक चर्चा ही उत्क्रान्ति. आर्य संस्कृतीचा भारतांत प्रसार. द्रविड, आर्य व इतर संस्कृतींचा एकमेकांवर परिणाम–हिंदु–संस्कृति. इ. स. पू. १७००–१४०० रामायण व महाभारत यांतील घटना. रामायण व महाभारत महाकाव्यें नंतर इ. स. पू. १४०० ते इ. स. पू. ७०० च्या काळांतील. आर्य संस्कृतीचा ठेवा. निर्गुण उपासनेपासून सगुण उपासनेपर्यंत धर्मप्रकार पण एकच प्रेरक शक्ति आहे यांवर विश्वास.

नवीन धर्मपंथ–जैन पंथ–महावीर (इ. स. पू. ५९९–५२७); अहिंसा व्रत पाळणें. शरीरास कष्ट देऊन त्यावर ताबा

बौद्ध पंथ-गौतम बुद्ध (इ. स, पू. ६२४-५४४)–शरिरास कष्ट व विषय-वासना हे अतिरेक टाकून मधला मार्ग. अहिंसा, सद्वर्तन, मनोनिग्रह, परोपकार.

प्राचीन काळांतील प्रमुख राज्यें

–मगधचें साम्राज्य (इ. स. पू. ६५० ते इ. स. पू. ३२२)

–शिशुनाग व नंद घराणीं. इराणी सम्राट साईरस व डरायस इ. स.पू. ५ वे शतक व ग्रीक सम्राट अलेक्झांडर (इ. स. पू. ३२७-२६) यांच्या सिंधू नदीजवळच्या प्रदेशावर स्वाऱ्या.

(ड) चीनमधील प्राचीन संस्कृति–(इ. स. पू. ५००० ते इ. स. पू. २०६)

चीन–मोठा खंडप्राय देश, भारताच्या दुप्पट, इतर देशांपासून नैसर्गिक दृष्ट्या अलग. तेथील संस्कृतीची स्वतंत्र वाढ व तिचा कोरिया, जपान, ब्रह्मदेश व भारतीय चीन यांत पुढें प्रसार.

चीनची संस्कृति–प्राचीन, पाषाण युगांतील शोध व नंतर धातूंचा शोध व पुढील प्रगति झपाट्यानें,

इ. स. पू. २८५२–१७६६ फू-सी व सि-आ घराण्यांची कारकीर्द–विवाहसंस्था, शेतकी, पशूपालन रेशमी किड्यांची जोपासना, लेखनकला, व्यापार, वैद्यकी, चाक असलेला गाडा, घरांची बांधणी, काँपस, गायन वगैरे गोष्टी सुरू. संस्कृतीचा उगम होआंगहोच्या खोऱ्यांत.

इ. स. पू. १७६६–११२२ शांग घराण्याची कारकीर्द. संस्कृति प्रगल्भ. होआंगहो-वरील सिंगन फू ही राजधानी; व त्या नदीच्या खोऱ्याभोंवतालच्या प्रदेशांत राज्य. भोंवतालीं सरंजामी सरदार. उत्तरेकडील रानटी टोळ्यांपासून संरक्षण करण्याची जरूरी.

इ. स. पू. ११२२ ते इ. स. पू. २४९ जो (chou जो) घराणें. सर्व दृष्टीनें

प्रगति म्हणून सुवर्णयुग. पूर्वेकडे समुद्र व दक्षिणेकडे यांगत्से नदीपर्यंत विस्तार म्हणून साम्राज्य.

सम्राट ईश्वरनिर्मित पण प्रजेचें हित करणें ही त्याच्याकडून अपेक्षा.

दैवी शक्तीची व पूर्वजांची पूजा.

लेखनकला–लीपींत हजारों खुणा त्यामुळें क्लिष्ट व अवघड. बहुजन समाज अशिक्षित. उद्योगधंदे व कलाकौशल्य यांत प्रगति.

सरकारी अधिकारी कार्यक्षम, वाकबगार व बुद्धिमान असावेत म्हणून बौद्धिक व सामान्य ज्ञानाची चढाओढीची परीक्षा घेऊन नेमणूक.

इ. स. पू. सहाव्या शतकांत सरंजामी सरदारांत बंडाळी व अंदाधुंदी. या काळांत लि ओ त्से व कन-फू-त्से हे मोठे तत्वज्ञानी उदयास. त्यांच्या तत्त्वज्ञानाचा लोकांच्या जीवनावर परिणाम. लि-ओ-त्से ची 'परत निसर्गाकडे जा' ही शिकवण 'ता ओ' धर्मपंथ. कन-फू-त्से ची शिकवण 'लोकांनीं आपले सामाजिक व्यवहार योग्य नीतितत्त्वांवर आधारले ले ठेवावेत. कन-फू-त्से हा वाङमयभक्त व त्याचे विविध विषयांवर ग्रंथ; प्राचीन ग्रंथांतील विचारांचें संकलन. जुन्या परंपरेचा अभिमानी; त्यामुळें त्याच्या अनुयायांत सनातनी वृत्ति.

यानंतर या काळांतील अंदाधुंदी संपुष्टांत व शि-हॉंग-टी यांच्याकडून स्थीरस्थावरता. तो मोठा सम्राट (इ. स. पू. २४९– इ. स. २११) साम्राज्य वृद्धि. कालवे खणले. उत्तरेकडील रानटी टोळ्यांपासून संरक्षणासाठीं प्रचंड भिंत, १५०० मैल लांबीची. विद्येस उत्तेजन.

प्रकरण ४ थें

जगांतील प्राचीन काळचे इतर लोक, त्यांचा इतिहास व संस्कृति (इ. स. पू. ३००० ते इ. स. १००)

(१) इजियन समुद्रालगतच्या प्रदेशांतील प्राचीन संस्कृति (२) फिनीशियन लोक, त्यांचें कार्य व संस्कृति (३) हिब्रू लोक (ज्यू, इस्त्राएल) त्यांचा इतिहास व संस्कृति (४) आर्य लोकांचीं पश्चिम आशियांतील राज्यें व साम्राज्यें :— (अ) हिटाइट लोक (ब) मीड लोक (मेटिनी) (क) इराणचा उदय, उत्कर्ष व ऱ्हास (५) अमेरिकेंतील प्राचीन संस्कृति.

(१) इजिअन समुद्रा लगतच्या प्रदेशांतील प्राचीन संस्कृति

(इ. स. पू. ३००० व इ. स. पू. १२००)

इजिअन समुद्रालगतचा प्रदेश-भौगोलिक परिस्थिति—भूमध्य समुद्राच्या ईशान्येकडे पूर्वेस आशिया मायनर व सीरिया व पश्चिमेस युरोपमधील ग्रीस यांमध्यें असलेल्या समुद्रास इजीअन समुद्र असें म्हणतात. या समुद्रामध्यें अनेक बेटें आहेत. या बेटांपैकीं **क्रीट** हें बेट प्रसिद्ध असून तें प्राचीन काळीं त्या भागांतील संस्कृतीचें आगर होतें. क्रीटमधील लोक इ. स. पू ३००० पासून सांस्कृतिक बाबतींत पुढें गेलेले असून त्यांनीं आपल्या संस्कृतींतील पुष्कळ गोष्टी इजिप्त व मेसापोटेमिया येथील संस्कृतींपासून घेतलेल्या होत्या. क्रीटमधील लोकांचा इजिप्त, मेसापोटेमिया, भूमध्य समुद्राच्या पूर्व किनाऱ्यावरील प्रदेश, आशिया मायनर, ग्रीस, इटलीचा दक्षिण किनारा वगैरे प्रदेशांशीं मोठ व्यापार चाले व त्यामुळें क्रीटचें वैभव बरेंच वाढलें. ग्रीसच्या नैर्ऋत्य भागांतील डोंगरमाथ्यावर व इतरत्र त्यांनीं भक्कम किल्ले बांधले. त्यांपैकीं **मायसीन** व **टिरीन्स** हें प्रमुख होते, त्याचप्रमाणें आशिया मायनरच्या पश्चिम किनाऱ्यावर डार्डानेल्सच्या सामुद्रधुनीजवळही त्यांनीं **ट्रॉय** येथें भक्कम किल्ला बांधला असून तेथेंहि आपलें ठाणें स्थापन केलें होतें. अशाप्रकारें क्रीटमधील लोकांची संस्कृति इतर ठिकाणींहि पसरत होती. क्रीटमधील राजास मायनॉस असें म्हणत. क्रीटमधील नॉसस (knossos) येथें त्याचा मोठा राजवाडा

प्रगति म्हणून सुवर्णयुग. पूर्वेकडे समुद्र व दक्षिणेकडे यांगत्से नदीपर्यंत विस्तार म्हणून साम्राज्य.

सम्राट ईश्वरनिर्मित पण प्रजेचें हित करणें ही त्याच्याकडून अपेक्षा. दैवी शक्तीची व पूर्वजांची पूजा.

लेखनकला–लीपींत हजारों खुणा त्यामुळें क्लिष्ट व अवघड. बहुजन समाज अशिक्षित. उद्योगधंदे व कलाकौशल्य यांत प्रगति.

सरकारी अधिकारी कार्यक्षम, वाकबगार व बुद्धिमान असावेत म्हणून बौद्धिक व सामान्य ज्ञानाची चढाओढीची परीक्षा घेऊन नेमणूक.

इ. स. पू. सहाव्या शतकांत सरंजामी सरदारांत बंडाळी व अंदाधुंदी. या काळांत लि ओ त्से व कन-फू-त्से हे मोठे तत्वज्ञानी उदयास. त्यांच्या तत्त्वज्ञानाचा लोकांच्या जीवनावर परिणाम. लि-ओ-त्से ची 'परत निसर्गाकडे जा' ही शिकवण 'ता ओ' धर्मपंथ. कन-फू-त्से ची शिकवण 'लोकांनीं आपले सामाजिक व्यवहार योग्य नीतितत्त्वांवर आधारले ले ठेवावेत. कन-फू-त्से हा वाङमयभक्त व त्याचे विविध विषयांवर ग्रंथ; प्राचीन ग्रंथांतील वि चारांचें संकलन. जुन्या परंपरेचा अभिमानी; त्यामुळें त्याच्या अनुयायांत सनातनी वृत्ति.

यानंतर या काळांतील अंदाधुंदी संपुष्टांत व शि-हॉंग-टी यांच्याकडून स्थीरस्थावरता. तो मोठा सम्राट (इ. स. पू. २४९– इ. स. २११) साम्राज्य वृद्धि. कालवे खणले. उत्तरेकडील रानटी टोळ्यांपासून संरक्षणासाठीं प्रचंड भिंत, १५०० मैल लांबीची. विद्येस उत्तेजन.

प्रकरण ४ थें

जगांतील प्राचीन काळचे इतर लोक, त्यांचा इतिहास व संस्कृति (इ. स. पू. ३००० ते इ. स. १००)

(१) इजियन समुद्रालगतच्या प्रदेशांतील प्राचीन संस्कृति (२) फिनीशियन लोक, त्यांचें कार्य व संस्कृति (३) हिब्रू लोक (ज्यू, इस्राएल) त्यांचा इतिहास व संस्कृति (४) आर्य लोकांची पश्चिम आशियांतील राज्यें व साम्राज्यें :— (अ) हिटाइट लोक (ब) मीड लोक (मेटिनी) (क) इराणचा उदय, उत्कर्ष व ऱ्हास (५) अमेरिकेंतील प्राचीन संस्कृति.

(१) इजिअन समुद्रा लगतच्या प्रदेशांतील प्राचीन संस्कृति

(इ. स. पू. ३००० व इ. स. पू. १२००)

इजिअन समुद्रालगतचा प्रदेश-भौगोलिक परिस्थिति—भूमध्य समुद्राच्या ईशान्येकडे पूर्वेस आशिया मायनर व सीरिया व पश्चिमेस युरोपमधील ग्रीस यांमध्यें असलेल्या समुद्रास इजीअन समुद्र असें म्हणतात. या समुद्रामध्यें अनेक बेटें आहेत. या बेटांपैकीं **क्रीट** हें बेट प्रसिद्ध असून तें प्राचीन काळीं त्या भागांतील संस्कृतीचें आगर होतें. क्रीटमधील लोक इ. स. पू ३००० पासून सांस्कृतिक बाबतींत पुढें गेलेले असून त्यांनीं आपल्या संस्कृतींतील पुष्कळ गोष्टी इजिप्त व मेसापोटेमिया येथील संस्कृतीपासून घेतलेल्या होत्या. क्रीटमधील लोकांचा इजिप्त, मेसापोटेमिया, भूमध्य समुद्राच्या पूर्व किनाऱ्यावरील प्रदेश, आशिया मायनर, ग्रीस, इटलीचा दक्षिण किनारा वगैरे प्रदेशांशीं मोठ व्यापार चाले व त्यामुळें क्रीटचें वैभव बरेंच वाढलें. ग्रीसच्या नैर्ऋत्य भागांतील डोंगरमाथ्यावर व इतरत्र त्यांनीं भक्कम किल्ले बांधले. त्यांपैकीं **मायसीन** व **टिरीन्स** हें प्रमुख होते, त्याचप्रमाणें आशिया मायनरच्या पश्चिम किनाऱ्यावर डार्डानेल्सच्या सामुद्रधुनीजवळही त्यांनीं **ट्रॉय** येथें भक्कम किल्ला बांधला असून तेथेंहि आपलें ठाणें स्थापन केलें होतें. अशाप्रकारें क्रीटमधील लोकांची संस्कृति इतर ठिकाणींहि पसरत होती. क्रीटमधील राजास मायनॉस असें म्हणत. क्रीटमधील नॉसस (knossos) येथें त्याचा मोठा राजवाडा

असून त्यांत कितीतरी प्रशस्त दालनें व सुखसोयी केलेल्या होत्या. राजवाड्यांत बाहेरून पाणी आणण्यासाठीं चुन्यांत बांधलेले नळ होते. तसेंच सांडपाण्याचा निकाल लावण्यासाठीं भक्कम रीतीनें बांधलेलीं गटारें होतीं. राजवाड्यांतील भिंतीवर सुबक रीतीनें काढलेलीं चित्रें होतीं. त्यांस लेखनकलाहि अवगत होती व ते आपलें लिखाण मेसापोटेमियाप्रमाणें मातीच्या विटांवर लिहून ठेवीत. या लिखाणांतील लिपीचा अर्थबोध होत नाहीं. अशाप्रकारें इ. स. पू. २५०० पासून इ. स. पू. १४०० वर्षांपर्यंतच्या काळांत क्रीटमधील संस्कृति पुष्कळ प्रगत झाली होती. ग्रीसमध्यें इ. स. पू. १८०० पासून स्थाइक झालेल्या हेलनीज (ग्रीक) लोकांच्या वसाहतींकडून क्रीटचा राजा खंडणी घेत असावा व ही खंडणी बरीच वाढत गेल्यामुळें क्रीटचा राजा व ग्रीसमधील ग्रीक वसाहती यांच्यामध्यें वितुष्ट येऊन ग्रीसमधील ग्रीक लोकांनीं क्रीटमधील लोकांच्या कला, विद्या, शस्त्रास्त्रें आत्मसात् केल्यावर ग्रीसमधील मायसीन व टिरीन्स हीं ठाणीं हस्तगत केलीं व शेवटीं क्रीटवर हल्ला करून इ. स. पू. १४०० च्या सुमारास तेथील राजा मायनास (Minos) याचा विस्तीर्ण व भव्य राजवाडा उध्वस्त करून टाकला. यानंतर यापुढील दोन शतकें क्रीटवर हल्ले होऊन तेथील प्राचीन संस्कृति लयास गेली. क्रीटच्या पाडावानंतर क्रीट संस्कृतीचें आशियामायनरमधील केंद्र ट्रॉय हें ठिकाणही इ. स. पू. १२०० च्या सुमारास ग्रीक लोकांनीं उध्वस्त केलें. क्रीट व ट्रॉय हीं ठिकाणें उध्वस्त झाल्यावर तेथील बऱ्याच लोकांस तीं ठिकाणें सोडून इतर दूरदूरच्या ठिकाणीं निर्वासित म्हणून जावें लागलें. तरी कांहीं लोक तेथें स्थायिक झालेल्या ग्रीक लोकांत मिसळून गेले. अशा रीतीनें ही प्राचीन संस्कृति इ. स. पू. १४०० पासून १२०० वर्षांपर्यंतच्या काळांत लयास गेली.

(२) फिनीशियन लोक व त्यांचें कार्य (इ. स. २२०० ते इ. स. पू. १४६)—प्राचीन काळीं अरबस्तानांत भटक्या वृत्तीच्या अनेक जमाती रहात होत्या, त्यापैकींच फिनीशियन लोकांची एक जमात होती. हें फिनीशियन लोक सेमिटिक मानववंशाचे होते. प्राचीन काळीं इ. स. पू. २२०० च्या सुमारास ते अरबस्थानांतून बाहेर पडले व भूमध्यसमुद्राच्या पूर्व किनाऱ्यावरील सीरियामध्यें लॅबॅनॉन पर्वताच्या दक्षिणेकडील भागांत राहूं लागले. त्यांच्या नांवावरून त्या प्रदेशाला फिनीशिया असें म्हणण्यांत येऊं लागलें. याच्या दक्षिणेकडे पॅलेस्टाइन

हा प्रदेश असून त्यांत हिब्रू (ज्यू) लोक रहात असत. फिर्नीशियन लोकांनीं भूमध्यसमुद्राच्या पूर्व किनाऱ्यावर टायर, सिडॉन, एकर, बायरट वगैरे शहरें स्थापन केलीं. दर्यावर्दी कामामध्यें ते पुढें आले व समुद्रावरून मालाची नेआण करणें हा त्यांचा मुख्य व्यवसाय झाला. भूमध्यसमुद्र व काळा समुद्र यांवरील इजिप्त, सीरिया, क्रीट, आशियामायनर, इजिअन समुद्रांतील बेटें, सिसली, स्पेन, वगैरे देशांचा माल इकडून तिकडे नेण्याचें काम ते करीत असत. ब्रिटनमधील टीन, स्पेनमधून टिन, रूपें, सोनें इजिप्तमधून जवस, अंबाडी, तसेंच निरनिराळ्या ठिकाणीं तयार होणारें कांचसामान, मातीचीं सुबक भांडीं, बाँझचीं भांडीं, हस्तीदंतावरील कोरीव काम केलेल्या वस्तू, लांकडी सामान, लेखनसाहित्य, रंगीत वस्त्रें वगैरे वस्तू जमा करून त्या इतर देशांस पुरविण्याचें काम ते करीत असत. क्रीटच्या पाडावानंतर (इ. स. पू. १४०० च्या सुमारास) व इजिप्तच्या वैभवास उतरती कळा लागल्यावर व्यापाराच्या सोयीसाठीं, कार्थेज, कॅडिझ, साय्प्रस, ग्रीस, सिसली, कॉर्सिका या ठिकाणींही त्यांनीं आपल्या वसाहती स्थापन केल्या. यापैकीं आफ्रिकेच्या उत्तर किनाऱ्यावर **कार्थेज** (सध्यांच्या ट्यूनिस जवळचा भाग) येथें त्यांनीं इ. स. पू. ८१४ मध्यें वसाहत स्थापन केली व पश्चिम आशियांतील त्यांचें स्वतंत्र अस्तित्व नष्ट झाल्यावर कार्थेज हें त्यांचें प्रमुख ठिकाण झालें. यानंतर स्पेनचा पूर्व किनारा, कार्सिका, सार्डिनिया व सिसली या भूमध्य समुद्रांतील बेटांतहि त्यांनीं आपल्या वसाहती स्थापन केल्या व व्यापारांत आपली प्रगति करून घेतली.

ते 'बाल' नांवाच्या सूर्यदेवतेची पूजा करीत. देवतेस संतुष्ट करण्यासाठीं ते पशूंचा बळी देत. एका ठिकाणचे आचार-विचार, पोषाखाची पद्धत, चाली-रीति व संस्कृति यांचा प्रसार इतर ठिकाणीं करण्याचें कार्य त्यांनीं केलें. प्राचीन काळीं इजिप्त व मेसापोटेमिया येथें जीं वैभवशाली साम्राज्यें झालीं तेथील संस्कृतीचा प्रसार यांच्या मार्फतच आशियामायनर, क्रीट, ग्रीस वगैरे दूरदूरच्या ठिकाणीं झाला. प्राचीन काळीं निरनिराळ्या देशांत चित्रलिपी, कोन-लिपी (पाचरी लिपी) वगैरे लिप्या प्रचारांत असत. पण त्या वस्तू व त्यांचे शब्दोच्चार यांवर आधारलेल्या असल्यामुळें बोजड असत, पण पुढें एक सुटे मुळाक्षर व त्याचा उच्चार यावर आधारलेली अक्षरलिपीहि प्रचारांत येऊं लागली व तिचा प्रसार यांनीं केला. यांच्यापासून ही लिपी ग्रीकांनीं घेतली. त्यावेळीं

या लिपीमध्यें स्वर नव्हते; पण ग्रीक लोकांनीं त्यांत स्वर घातले. ग्रीकांपासून रोमन लोकांनीं या लिपीचा स्वीकार केला व अशारीतीनें २१ व्यंजनें व पांच स्वर असलेली रोमन लिपी प्रचारांत आली. ही सुटसुटीत लिपी प्रचारांत आल्यामुळें लेखनकलेंत क्रान्ति झाली. पण ही लिपी पूर्वीच्या लिपीपेक्षां सुटसुटीत होती, तरी त्यांत पांचच स्वर असल्यामुळें सर्व प्रकारचे उच्चार त्यांत लिहून दाखवितां येत नाहींत व एका स्वरास दोन किंवा अधिक उच्चार असल्यामुळें त्यांत संदिग्धता आलेली आहे. पूर्वेकडे भारतांत सुट्या अक्षराच्या उच्चारावर आधारलेली अशी ब्राम्ही लिपी उपयोगांत आणली जाई. या लिपीपासून ३६ व्यंजनें व १६ स्वरांची देवनागरी लिपी रूढ झाली. या लिपीमध्यें आणखी दोन स्वरांच्या खुणा (ॲ, ऑ) घातल्या गेल्यामुळें जगांतील, कोणत्याहि भाषेमधील बहुतेक सर्व उच्चार या लिपींत लिहून दाखवितां येतात व त्यांत एका स्वरास एकच उच्चार असल्यामुळें त्यांत संदिग्धता नाहीं. तेव्हां देवनागरी लिपी ही इतर कोणत्याहि लिपीपेक्षां श्रेष्ठ आहे असें म्हणतां येईल.

फिनीशियन लोक व्यापारी असल्यामुळें त्यांनीं बरींच वजनें मापें उपयोगांत आणली, त्यांच्यापासून हीं मापें ग्रीकांनीं घेतलीं व त्यांचा युरोपमध्यें प्रसार केला. कागद, लेखणी व शाई या लेखन साहित्याचा फिनिशियन लोकांमार्फतच प्रसार झाला. फिनीशियन लोक चांगले कारागीर होते व इतर उद्योगधंदेहि करीत. काचेचा माल तयार करणें, वस्त्रें विणणें व रंगविणें, धातूवरील नक्षीकाम करणें हे उद्योगधंदेहि ते करीत. त्याचप्रमाणें मोठमोठ्या राजांच्या पदरीं कारागीर म्हणून काम करीत. ग्रीक लोकांमध्यें कारागिरीच्या ज्ञानाचा यांनीं प्रसार केला.

फिनीशियन लोकांचें पहिल्यानें स्वतंत्र राज्य होतें. पण इ. स. पू. १६ व्या शतकांत ते इजिप्तचे अंकित झाले. यानंतर इ. स. पू. ११ व्या व १० व्या शतकांत ते स्वतंत्र झाले. पण यानंतर पश्चिम आशियांतील त्यांचें स्वतंत्र अस्तित्व नष्ट होऊन इ. स. पू. ८७६ पासून ते असेरिया, खाल्डिया (नवे बॅबिलोनियन साम्राज्य), इराण, ग्रीक व रोमन लोकांचे अंकित झाले (इ. स. पू. ६४). इ. स. पू. १४६ मध्यें आफ्रिकेच्या उत्तर किनाऱ्यावरील त्यांची कार्थेज ही वसाहत रोमनें जिंकून घेतल्यावर त्याचें स्वतंत्र अस्तित्व नष्ट झालें.

हिब्रू लोक (ज्यू. इझराएल), यांचा इतिहास व संस्कृति

(इ. स. पू. २००० ते इ. स. पू. ५८६).

हिब्रू लोक—हिब्रू लोक मूळचे अरबस्थानांत राहणारे असून ते सेमेटिक वंशाचे होते. त्यांची वृत्ति भटकी असे. ते आपल्या शेळ्यामेंढ्यांचे कळप घेऊन एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं हिंडत असत. त्यांस 'ज्यू' व 'इझराएल' लोक असेंहि म्हणत. प्राचीन काळीं सेमिटिक लोकांचें राज्य मेसापोटेमियांत स्थापन झाल्यावर ते युफ्रेटिस नदीच्या मुखाजवळील प्रदेशांत रहावयास गेले. पण तेथील जागा त्यांच्या शेळ्या मेंढ्यांच्या कळपास चरण्यास अपुरी असल्यामुळें बॅबिलोनियन साम्राज्यांत इतर सोईस्कर ठिकाणीं वस्ती करावी म्हणून ते तेथून इ. स. पू. २००० च्या सुमारास **आब्राहामच्या** नेतृत्वाखालीं बाहेर पडले. पश्चिमेकडे असलेल्या सीरिया प्रदेशांत वस्ती करण्याचा त्यांचा विचार होता, पण तेथें वस्ती करणें शक्य न झाल्यामुळें ते इजिप्तमध्यें गेले. ते इजिप्तमध्यें असतांना हिक्सोस लोकांनीं इजिप्तवर स्वारी करून तेथें पांच शतकें (इ. स. पू. १८०० ते इ. स. पू. १३००) राज्य केलें. या नव्या राजकर्त्यांच्या ते उपयोगी पडल्यामुळें त्यांस त्यांच्यापासून त्रास झाला नाहीं. पण इजिप्तमधील लोकांनीं पुनः आपलें स्वातंत्र्य मिळवून हिक्सोस लोकांस इजिप्तमधून घालवून लावल्यावर हिब्रू लोकांस इजिप्तमधील लोकांपासून त्रास होऊ लागला, व त्यांस तेथील निरनिराळीं कामें करावयास लागून गुलामासारखें राबावें लागलें. तेव्हां तो देश सोडून दुसरीकडे जाण्याचा त्यांचा विचार होता. पण इजिप्तमधील सैनिकांची नजर चुकवून तेथून निसटणें बरेंच अवघड होतें, पण शेवटीं **मोझेस** नांवाच्या त्यांच्या एका पुढाऱ्याच्या नेतृत्वाखालीं त्यांनीं तो देश सोडला. इजिप्तच्या पूर्वेकडील ओसाड प्रदेशांतून जात असतां पुष्कळ हालअपेष्टा सोसून ते सीरियामधील पॅलेस्टाइन प्रांतांत आले. त्या प्रांतांत कीटमधून निर्वासित झालेले फिलिस्टाईन लोक समुद्रकिनाऱ्यावरील प्रदेशांत रहात होते; व कॅननाईट नांवाचे सेमिटिक वंशाचे लोक इतर भागांत रहात असत. तरी हिब्रू लोकांनीं (ज्यू लोकांनीं) तेथें आपली वस्ती केली व हळके हळके तेथें त्यांनीं शहरें स्थापन

केलीं. त्यांपैकीं एकास शांततेचें स्थान म्हणून '**जेरुसलेम**' असें त्यांनीं नांव दिलें. इजिप्तमधून ज्यू लोकांची सुटका केल्यावर मोझेस मरण पावला. पॅलेस्टाईन भागांत हिब्रू लोकांनीं आपलें राज्य स्थापिलें. डेव्हिड व सालोमन हे हें त्यांच्यांतील मोठे राजे होऊन गेले. सालोमनच्या कारकीर्दींत (इ. स. पू. ९७० ते ९३०) समुद्रावरून व खुष्कीच्या मार्गानें व्यापार करून हिब्रू लोकांनीं बरीच संपत्ति मिळविली. पॅलेस्टाइन हा देश नाक्यावरचा असल्यामुळें त्यांतून इजिप्त, सीरिया, बॅबिलोनिया व इराणचें आखात यांकडे रस्ते जातात व त्यावरून जाणाऱ्या व्यापारी तांड्यावर ते जकात बसवीत. सालोमनच्या कारकीर्दींत हिब्रू लोकांची भरभराट होत असतां त्यानें जेरुसलेम येथें 'जिहोव्हा' (Jehovah) या देवासाठीं एक भव्य मंदिर बांधलें. त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या राज्याची उत्तरेकडील **इस्त्राएल** व दक्षिणेकडील **जूडा** अशीं दोन वेगवेगळीं राज्यें स्थापन झालीं. यांपैकीं इस्त्राएल हें राज्य इ. स. पू. ७२२ मध्यें असेरियन लोकांनीं जिंकून घेतलें. यानंतर खाल्डियाच्या (नवे बॅबिलोनिया) राजा नेबूचाडनेझर यानें जुडा हेंहि राज्य जिंकून घेतलें व तेथील लोकांपैकीं पुष्कळ लोकांस कैदी म्हणून बॅबिलोनला नेलें (इ. स. पू. ५८६). अशारीतीनें हिब्रू लोकांचें स्वातंत्र्य नष्ट झालें. इ. स. पू. ५३९ मध्यें इराणचा सम्राट साइरस यानें बॅबिलोनियाच्या (खाल्डिया) सम्राटाचा पराभव करून बॅबिलोनियावर आपलें वर्चस्व बसविलें, व ज्यू लोकांची मुक्तता करून पॅलेस्टाइनमध्यें जाण्यास त्यांस परवानगी दिली. तेथें आल्यावर त्यांनीं जेरुसलेम शहराची पुन्हां बांधणी केली व 'जिहोव्हा' च्या देवळाचा जीर्णोद्धार केला (इ. स. पू. ५१६). देव प्रसन्न व्हावा म्हणून देवास बळी देण्याची त्यांच्यांत चाल होती. राजकीय बाबतींत त्यांचें स्वातंत्र्य नष्ट झालें होतें. इराणी लोकांनंतर ग्रीक व नंतर रोमन लोकांचे अंकित म्हणून त्यांस रहावें लागलें.

धार्मिक बाबतींत पुरोहितवर्गाकडून त्यांच्या आचारविचारांचें नियमन होत होतें. बॅबिलोनमधून पॅलेस्टाईनमध्यें आल्यावर ज्यू लोकांनीं (हिब्रू लोक) आपला इतिहास, दंतकथा, ठिकठिकाणीं झालेल्या स्थलांतराची हकीकत, धार्मिक व सामाजिक कल्पना व रीतीरिवाज यांचें एका ग्रंथांत संकलन केलें. या ग्रंथांत ज्यू लोकांस पृथ्वीचें साम्राज्य प्राप्त करून देण्यासाठीं व त्यांचा उद्धार करण्यासाठीं एक मेसेया (त्राता, देवदूत, प्रेषित, उद्धारक)

अवतीर्ण होणार आहे असें भाकित करण्यांत आलें आहे. त्यांच्या या ग्रंथास जुना करार (ओल्ड टेस्टॉमेंट) असें म्हणण्यांत येऊन तो त्यांचा प्रमुख धार्मिक ग्रंथ मानण्यांत येतो. ज्यू लोकांमध्यें निरनिराळ्या काळांत ईश्वरी संदेश मानव समाजास देण्यासाठीं 'प्रॉफेटस' (त्रिकालज्ञ) असें लोकोत्तर पुरुष होऊन गेले व ते म्हणजे ॲमास, होसिआ, इशेआ, जेरेमा व एझिकेल हे होत, असें ज्यू लोक मानतात. त्यांनीं "जिहोव्हा न्यायी आहे, तेव्हां लोकांनीं तसेंच असावे, जिहोव्हा दयाशील आहे, तेव्हां बळी देण्याच्या तो विरुद्ध आहे, ईश्वर सर्व जगावर सत्ता चालविणारा आहे, तेव्हां एका देशानें दुसऱ्यास अंकित करूं नये, ईश्वर बाह्य तांत्रिक गोष्टींनीं प्रसन्न होत नसून अंतःकरणांतील भावनेवर प्रसन्न होतो, व्यक्ति आपल्या कर्मांचीं फळें भोगते व आयुष्यांतील पापपुण्याचा निवाडा करण्याचा दिवस येणार, ज्यू लोकांस व राष्ट्रास उज्ज्वल भवितव्य आहे, ईश्वर मोठा असल्यामुळें देवळांत ईश्वराचें मोठेपण मावणें शक्य नाहीं" अशा प्रकारचे विचार ज्यू लोकांत प्रसृत करून दिले, व स्थानिक देवापासून सार्वत्रिक ईश्वराची कल्पना पुढें मांडली.

आर्य लोकांचीं पश्चिम आशियांतील राज्यें व साम्राज्यें

हिटाईट लोक व त्यांचें साम्राज्य

(इ. स. पू. २५०० ते इ. स. पू. १२००)

आर्य लोक प्राचीन काळीं कॅस्पियन समुद्राच्या उत्तरेकडील प्रदेशांत रहात होते. त्यांपैकीं कांहीं टोळ्या भारतांत गेल्या व कांहीं आशिया मायनर व इराणच्या पश्चिम भागांत इ. स. पू. २५००–२००० च्या सुमारास आल्या. आशिया मायनरमध्यें आलेल्या जमातींस हिटाईट असें म्हणत. हे लोक युद्धाच्या व दळणवळणाच्या कामीं घोड्यांचा उपयोग करीत. यांच्यापुढें आशिया मायनरमधील लोकांचें कांहीं चाललें नाहीं व त्यानीं तेथें आपलें राज्य स्थापन केलें. आशिया मायनरपध्यें आल्यावर हिटाइट लोकांचा मेसापोटेमियांतील संस्कृतीशीं संबंध आला व त्यापासून त्यांनीं पाचरी लिपीचा स्वीकार केला व ते आपली भाषा पाचरी लिपींत लिहूं लागले. राज्यकारभार, शिल्पकला, स्थापत्य व इतर गोष्टींत त्यांची प्रगति होऊन त्यांची संस्कृति प्रगल्भ झाली. आशिया

मायनरमध्यें लोखंडाच्या खाणींचा शोध लागून ते युद्धाच्या कामीं लोखंडाच्या शस्त्रांचा उपयोग करूं लागले. यानंतर त्यांनीं आपलें साम्राज्य मेसापोटेमिया-पर्यंत वाढविलें (इ. स. पू. १४००). त्यांचें हें साम्राज्य सुमारें २०० वर्षें टिकलें. त्यांनीं ठिकठिकाणीं मोठमोठ्या दगडी इमारती बांधल्या, त्याचप्रमाणें ठिकठिकाणीं पशूंचे दगडी पुतळे उभारले. पुढे इ. स. पू. १२०० च्या सुमारास हें साम्राज्य मोडकळीस आलें.

मिटानी (मीड) साम्राज्य

आर्यांच्या कांहीं टोळ्या इ. स. पू. २५०० पासून इ. स. पू. २००० वर्षा-पर्यंतच्या काळांत इराणच्या वायव्य भागांत गेल्या व तेथें त्यांनीं आपलीं राज्यें स्थापन केलीं; व त्यांचें पुढे मोठें साम्राज्य झालें. या लोकांच्या साम्राज्यास मिटानीचें साम्राज्य किंवा मीडचें साम्राज्य असें म्हणत. या साम्राज्यासंबंधीं कांहीं ताम्रलेख इजिप्तमधील टेल-एल-अमार्ना त्याचप्रमाणें आशिया मायनर-मधील बाय्यास-कोई येथें उपलब्ध झाले आहेत. त्यावरून मिटानी लोकांच्या 'मित्र, वरुण, इंद्र, नासात्य व अश्विन' या देवता असल्याचें, त्याचप्रमाणें दशरथ, आर्तनाम, यशदत्त वगैरे नांवें त्यांच्यांत रूढ असल्याचें दिसून येतें. हे लोक युद्धामध्यें घोडे व घोडे जुंपलेल्या रथांचा उपयोग करीत. इजिप्तचें साम्राज्य पाश्चिम आशियांतील सीरिया या भागांत पसरल्यावर इजिप्शियन लोकांशीं मिटानी साम्राज्याचा संबंध आला. सीरियामधील बंडाळीस उत्तेजन दिल्यामुळें इजिप्तच्या सम्राटानें मिटानी लोकांशीं युद्ध केलें व त्यांचा पराभव करून त्यांस आपलें मांडलीक केलें. यानंतर मिटानीचें राजघराणें व इजिप्तचें राजघराणें यांची सोयरिक होऊन ४ था थूटमोस यानें मिटानी राजा अर्तनाम याच्या मूतेमाया या मुलीशीं लग्न केलें, व त्यांचा मुलगा ३ रा अमेनहोटेप हा नंतर इजिप्तचा सम्राट झाला.

टायग्रीस नदीच्या पूर्वेकडील व उत्तरेकडील भागांत त्यांचें एक प्रबळ साम्राज्य स्थापन झालेलें होतें; या राज्याच्या पुर्वेकडील प्रदेशांत इराणी लोकांचीं राज्यें होतीं व तीं मीड साम्राज्याचीं मांडलिक असत. इ. स. ६१२ मध्यें असेरियाचें साम्राज्य मोडण्याच्या कामीं मीड लोकांनीं खाल्डियन लोकांस मदत केली.

20922 31/7/14
क्रमांक ..... नों. दि.

इराणचा उदय, उत्कर्ष व ऱ्हास

(इ. स. पू. २००० ते इ. स. पू. ३३१)

मेसापोटेमियाच्या : पूर्वेस, कॅस्पियन समुद्राच्या दक्षिणेस असलेल्या देशास इराण किंवा पर्शिया असें म्हणतात. या प्रदेशांत प्राचीन काळापासून इराणी (पर्शियन) लोक रहात असत. या भागाच्या वायव्येकडील भागांत मिटानी किंवा मीड लोक राहत होते. इराणी व मीड लोक आर्य या मानव वंशापैकीं आहेत. इ. स. पू. २५०० च्या सुमारास कॅस्पियन समुद्राच्या उत्तरेकडील प्रदेशांतून आर्य लोक गांधार (अफगाणिस्थान) प्रदेशांत आले. त्यांपैकीं कांहीं जमाती पूर्वेकडे भारतांत गेल्या व कांहीं जमाती पश्चिमेकडील प्रदेशांत जाऊन तेथें त्यांनीं आपली वस्ती केली. आर्यांवरूनच या प्रदेशास इराण हें नांव मिळालें. आर्यांचा प्राचीन ग्रंथ ऋग्वेद व इराणी लोकांचा प्राचीन ग्रंथ अवेस्था यांत वर्णिलेल्या कांहीं देवतांचीं नांवें एकच आहेत. तसेंच या दोन्ही ग्रंथांतील कांहीं शब्द, तसेंच कांहीं वाक्येंहि एकच आहेत. या देवता म्हणजे आर्यांच्या वेदांतील इंद्र, वायु, मित्र, वित्रघ्न, नात्स्य व अवेस्थामधील–इंद्र, वायु, मिथ्र, वेरेथ्रघ्न, नानहत्य या होत. इराणमध्यें आल्यावर त्यांनीं तो सर्व प्रदेश व्यापला व ठिकठिकाणीं आपल्या वसाहती स्थापिल्या. इराणी लोकांची प्राचीन काळची फारशी माहिती उपलब्ध नाहीं.

झरतुष्ट्र—प्राचीन काळीं त्यांच्यांत झरतुष्ट्र (झोरोस्टर Zoroaster) हा एक धर्मसुधारक व धर्मसंस्थापक होऊन गेला. हा नक्की केव्हां होऊन गेला हें निश्चित नाहीं; पण तो इ. स. पू. ८ व्या शतकांत होऊन गेला असें मानण्यांत येतें. त्यावेळीं इराणमध्यें लहान मोठीं अशीं अनेक राज्यें होतीं व त्यांच्यामध्यें सत्ता मिळविण्यासाठीं झगडे होत. इराणमधील प्राचीन धर्म अवेस्था या धर्मग्रंथावर आधारलेला होता. निसर्गाच्या निरनिराळ्या देवता असून त्यांच्या प्रेरणेनेंच निरनिराळ्या गोष्टी घडून येतात असें समजून त्यांस उद्देशून प्रार्थना करण्याचा प्रघात होता. पण हळके हळके या देवतांच्या मूर्ती करून त्यांची पूजा करण्याचा प्रघात रूढ होऊं लागला व मूर्तीत देव आहे असें मानण्यांत येऊं लागले. त्याचप्रमाणें सामाजिक बाबतींत उच्चनीच भाव पसरून स्वार्थीपणा बोकाळला होता. तेव्हां धर्मास आलेली मलीनता घालवून सद्धर्माची महती

लोकांस पटवून देण्याचा व सामाजिक बाबतींत बंधुभाव निर्माण करण्याचा झरतुष्ट्र यानें प्रयत्न केला.

झरतुष्ट्र याच्या बापाचें नांव पुरुशास्प व आईचें नांव दुग्धोवा असें होतें. लहानपणीं त्यास योग्य अशा शिक्षकाकडे पाठविण्यांत आलें व तेथें त्यानें निरनिराळ्या विषयांचें ज्ञान मिळविलें. पण धार्मिक बाबींकडे त्याचें विशेष लक्ष असे. मूर्तींत देव आहे असें समजून त्यांची पूजा करणें, त्याचप्रमाणें लोकांच्या कांहीं खुळ्या समजुतीबद्दल त्यास तिटकारा वाटे. तेव्हां धर्मसमजुतींमध्यें व सामाजिक रीतीभातींमध्यें सुधारणा करणें जरूर आहे असें वाटून तो विचारमग्न व ध्यानस्थ बसे. अशाप्रकारें विचार करण्यांत दहा वर्षे घालविल्यावर सद्धर्माचा प्रसार करण्याची आपणांस प्रेरणा झाली आहे असें त्यास वाटलें व या आपल्या धर्माचा प्रसार करण्याचा त्यानें विचार केला.

झरतुष्ट्राचीं धर्मतत्त्वें व शिकवणूक—त्याचीं धर्मतत्त्वें गाथा या ग्रंथांत ग्रथित केलेलीं आहेत.**आहूर मझद** हा विश्वनिर्माता असून तो सर्व शक्तिमान, ज्ञानी आहे. तो प्रकाश, जीवन, सत्य यांचा देव आहे. खरें ज्ञान संपादन करणें किंवा असत्य पत्करणें हा मानवापुढें प्रश्न आहे. पृथ्वी, सूर्य, चंद्र, तारे, वायु, पर्जन्य या सर्वांची प्रेरक शक्ति म्हणजे अहूर मझद ही आहे. मनुष्यानें चांगले विचार, चांगले आचार व सत्य याप्रमाणें आपलें आचरण ठेवून आपला विकास करून घ्यावा व सामर्थ्यवान् व्हावें. स्त्री व पुरुष या दोघांसहि समान संधि दिलेली आहे. आहूर मझद् यास विरोध करणारा राक्षस म्हणजे अहिर्मन हा असून तो गुप्तपणा, अहंकार, दुटप्पीपणा, असत्य याकडे मनुष्याची प्रवृत्ति व्हावी म्हणून प्रयत्न करतो. मनुष्यानें आयुष्यांत केलेल्या पापपुण्याप्रमाणें त्यास मरणोत्तर सुख किंवा दुःख भोगावें लागतें. त्यानें सदाचाराचा अवलंब करून पुण्यकर्म केलें असल्यास त्यास स्वर्गांत सुख मिळतें व त्यानें दुष्कृत्यें केलीं असल्यास त्यास नरकांत खिचपत पडावें लागतें.

मूर्तिपूजा या धर्मास मान्य नाहीं. पण प्रकाश, सूर्य यांचें प्रतीक म्हणून वेदीवर अग्नीची पूजा केली जाते. त्यासाठीं मंदिरें बांधण्यांत येतात. तसेंच त्यांच्यांत धर्माधिकारी असतात. या धर्माचे लोक प्रेतें पुरीत नाहींत किंवा त्यांचें दहनहि करीत नाहींत. प्रेतें वरून मोकळ्या असलेल्या एका बुरजामध्यें

तशींच ठेवून देतात; व तेथें गिधाडें येऊन त्यांचा नाश करतात. त्यास शांततेचा बुरुज असें म्हणण्यांत येतें.

या धर्माचा प्रसार झरतुष्ट्र यानें केला व हा प्रसार करीत असतां तो बहुधा मारला गेला.

इराणचें साम्राज्य—इ. स. पू. ६१२ मध्यें इराणी व मीडस लोकांनीं खाल्डियाच्या (बॅबिलोनिया) राजाशीं संगनमत करून असीरीयावर स्वारी केली व असेरियन लोकांचा पराभव करून त्यांची वैभवशाली राजधानी निनेव्हा ही उध्वस्त करून टाकली. यानंतर इ. स. पू. ५५० च्या सुमारास इराणच्या **साइरस** (Cyrus) या राजानें मीडस लोकांच्या राजाचा पराभव करून त्यांच्यावर वर्चस्व बसविलें. अशा रीतीनें इराणमधील सर्व प्रदेशावर साइरसचें वर्चस्व स्थापन झालें. त्याची राजधानी इराणच्या आखाताजवळ सुसा ही होती. याच सुमारास उत्तरेकडील सीथियन लोकांच्या इराणवर स्वाऱ्या होत होत्या, पण साइरसनें त्यांचा पराभव करून त्यांस पिटाळून लाविलें. त्यानंतर त्यानें वायव्येकडील आशिया मायनर हा भाग जिंकून घेतला व तेथें समुद्र किनाऱ्यावर असलेल्या ग्रीक लोकांच्या वसाहतींस आपले मांडलिक करून त्यांस खंडणी देणें भाग पाडलें. यानंतर इ. स. पू. ५३९ मध्यें बॅबिलोनियावर आपलें वर्चस्व बसविलें. साइरसनंतर त्याचा मुलगा कँबासीझ हा गादीवर आला. हाही पराक्रमी होता. त्यानें सीरिया प्रदेश जिंकून घेतला व इजिप्तचाही पराभव केला (इ. स. पू. ५२५) व पूर्वेकडे भारताच्या सीमेपर्यंतचा प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणला. अशा रीतीनें पश्चिमेकडे इजिप्त, सीरिया, आशियामायनर व पूर्वेकडे भारताच्या सरहद्दीपर्यंतचा विस्तृत प्रदेश यांवर इराणी साम्राज्य स्थापन झालें. यानंतर **डरायस** (इ. स. पू. ५२१–४८५) हा इराणचा सम्राट झाला. त्याच्या कारकीर्दीत आशिया मायनरच्या किनाऱ्यावर असलेल्या अयोनियन ग्रीक वसाहतींनीं बंडाळी केली व त्यास ग्रीसमधील अथेन्स, इरिट्रिया या नगरराज्यांनीं मदत पाठविली म्हणून त्यानें इ. स. पु. ४९४ मध्यें आशिया मायनरमधील मीलेटस हें ग्रीक नगरराज्य उद्ध्वस्त करून टाकलें. यानंतर त्यानें ग्रीसमधील नगरराज्यें आपल्या वर्चस्वाखालीं आणण्याचा बेत केला व मोठ्या सैन्यानिशीं ग्रीसवर दोन स्वाऱ्या केल्या. पण त्यास यश

लोकांस पटवून देण्याचा व सामाजिक बाबतींत बंधुभाव निर्माण करण्याचा झरतुष्ट्र यानें प्रयत्न केला.

झरतुष्ट्र याच्या बापाचें नांव पुरुशास्प व आईचें नांव दुग्धोवा असें होतें. लहानपणीं त्यास योग्य अशा शिक्षकाकडे पाठविण्यांत आलें व तेथें त्यानें निरनिराळ्या विषयांचें ज्ञान मिळविलें. पण धार्मिक बाबींकडे त्याचें विशेष लक्ष असे. मूर्तींत देव आहे असें समजून त्यांची पूजा करणें, त्याचप्रमाणें लोकांच्या कांहीं खुळ्या समजुतीबद्दल त्यास तिटकारा वाटे. तेव्हां धर्मसमजुतीमध्यें व सामाजिक रीतीभातींमध्यें सुधारणा करणें जरूर आहे असें वाटून तो विचारमग्न व ध्यानस्थ बसे. अशाप्रकारें विचार करण्यांत दहा वर्षें घालविल्यावर सद्धर्माचा प्रसार करण्याची आपणांस प्रेरणा झाली आहे असें त्यास वाटलें व या आपल्या धर्माचा प्रसार करण्याचा त्यानें विचार केला.

झरतुष्ट्राचीं धर्मतत्त्वें व शिकवणूक—त्याचीं धर्मतत्त्वें गाथा या ग्रंथांत ग्रथित केलेलीं आहेत.**आहूर मझद** हा विश्वनिर्माता असून तो सर्व शक्तिमान, ज्ञानी आहे. तो प्रकाश, जीवन, सत्य यांचा देव आहे. खरें ज्ञान संपादन करणें किंवा असत्य पत्करणें हा मानवापुढें प्रश्न आहे. पृथ्वी, सूर्य, चंद्र, तारे, वायु, पर्जन्य या सर्वांची प्रेरक शक्ति म्हणजे अहूर मझद ही आहे. मनुष्यानें चांगले विचार, चांगले आचार व सत्य याप्रमाणें आपलें आचरण ठेवून आपला विकास करून घ्यावा व सामर्थ्यवान् व्हावें. स्त्री व पुरुष या दोघांसहि समान संधि दिलेली आहे. आहूर मझद् यास विरोध करणारा राक्षस म्हणजे अहिर्मन हा असून तो गुप्तपणा, अहंकार, दुटप्पीपणा, असत्य याकडे मनुष्याची प्रवृत्ति व्हावी म्हणून प्रयत्न करतो. मनुष्यानें आयुष्यांत केलेल्या पापपुण्याप्रमाणें त्यास मरणोत्तर सुख किंवा दुःख भोगावें लागतें. त्यानें सदाचाराचा अवलंब करून पुण्यकर्म केलें असल्यास त्यास स्वर्गांत सुख मिळतें व त्यानें दुष्कृत्यें केलीं असल्यास त्यास नरकांत खिचपत पडावें लागतें.

मूर्तिपूजा या धर्मास मान्य नाहीं. पण प्रकाश, सूर्य यांचें प्रतीक म्हणून वेदीवर अग्नीची पूजा केली जाते. त्यासाठीं मंदिरें बांधण्यांत येतात. तसेंच त्यांच्यांत धर्माधिकारी असतात. या धर्माचे लोक प्रेतें पुरीत नाहींत किंवा त्यांचें दहनहि करीत नाहींत. प्रेतें वरून मोकळ्या असलेल्या एका बुरजामध्यें

तशींच ठेवून देतात; व तेथें गिधाडें येऊन त्यांचा नाश करतात. त्यास शांततेचा बुरुज असें म्हणण्यांत येतें.

या धर्माचा प्रसार झरतुष्ट्र यानें केला व हा प्रसार करीत असतां तो बहुधा मारला गेला.

इराणचें साम्राज्य—इ. स. पू. ६१२ मध्यें इराणी व मीडस लोकांनीं खाल्डियाच्या (बॅबिलोनिया) राजाशीं संगनमत करून असीरीयावर स्वारी केली व असेरियन लोकांचा पराभव करून त्यांची वैभवशाली राजधानी निनेव्हा ही उध्वस्त करून टाकली. यानंतर इ. स. पू. ५५० च्या सुमारास इराणच्या **साइरस** (Cyrus) या राजानें मीडस लोकांच्या राजाचा पराभव करून त्यांच्यावर वर्चस्व बसविलें. अशा रीतीनें इराणमधील सर्व प्रदेशावर साइरसचें वर्चस्व स्थापन झालें. त्याची राजधानी इराणच्या आखाताजवळ सुसा ही होती. याच सुमारास उत्तरेकडील सीथियन लोकांच्या इराणवर स्वाऱ्या होत होत्या, पण साइरसनें त्यांचा पराभव करून त्यांस पिटाळून लाविलें. त्यानंतर त्यानें बाबिलोनियाकडील आशिया मायनर हा भाग जिंकून घेतला व तेथें समुद्र किनाऱ्यावर असलेल्या ग्रीक लोकांच्या वसाहतींस आपले मांडलिक करून त्यांस खंडणी देणें भाग पाडलें. यानंतर इ. स. पू. ५३९ मध्यें बॅबिलोनियावर आपलें वर्चस्व बसविलें. साइरसनंतर त्याचा मुलगा कँबासीझ हा गादीवर आला. हाही पराक्रमी होता. त्यानें सीरिया प्रदेश जिंकून घेतला व इजिप्तचाही पराभव केला (इ. स. पू. ५२५) व पूर्वेकडे भारताच्या सीमेपर्यंतचा प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणला. अशा रीतीनें पश्चिमेकडे इजिप्त, सीरिया, आशियामायनर व पूर्वेकडे भारताच्या सरहद्दीपर्यंतचा विस्तृत प्रदेश यांवर इराणी साम्राज्य स्थापन झालें. यानंतर **डरायस** (इ. स. पू. ५२१–४८५) हा इराणचा सम्राट झाला. त्याच्या कारकीर्दीत आशिया मायनरच्या किनाऱ्यावर असलेल्या अयोनियन ग्रीक वसाहतींनीं बंडाळी केली व त्यास ग्रीसमधील अथेन्स, इरिट्रिया या नगरराज्यांनीं मदत पाठविली म्हणून त्यानें इ. स. पु. ४९४ मध्यें आशिया मायनरमधील मीलेटस हें ग्रीक नगरराज्य उद्ध्वस्त करून टाकलें. यानंतर त्यानें ग्रीसमधील नगरराज्यें आपल्या वर्चस्वाखालीं आणण्याचा बेत केला व मोठ्या सैन्यानिशीं ग्रीसवर दोन स्वाऱ्या केल्या. पण त्यास यश

मिळालें नाहीं. (ग्रीक नगरराज्यांशीं झालेल्या युद्धाची हकीकत पुढें ५ व्या प्रकरणांत देण्यांत आली आहे.)

राज्यव्यवस्था व राज्यकारभार--ग्रीस देश काबीज करतां आला नाहीं तरी मोठ्या विस्तृत प्रदेशावर इराणचें साम्राज्य पसरलेलें होतें. डरायस यानें दूरदूरच्या प्रदेशावर आपलें सुभेदार (क्षत्रप) नेमले व केंद्रीभूत अशी राज्यव्यवस्था अमलांत आणली. त्यानें सर्व इराणी साम्राज्यांत नाण्याची पद्धत सुरू केली. इजिप्तमधील नाईल नदीपासून तांबड्या समुद्रापर्यंत पुर्वी खणण्यांत आलेला कालवा दुरुस्त करून तो उपयोगांत आणला. इराणी लोकांनीं आपले आरमार तयार केलें. त्याचप्रमाणें साम्राज्यांतील दूरदूरचीं ठिकाणें जोडणारे रस्ते दुरुस्त केले, व त्यामुळें साम्राज्यांतील निरनिराळ्या भागांमधील संघट्टन वाढलें. इराणी लोकांची जुनी राजधानी **सुसा** व नवी राजधानी **परसेपोलिस** हीं मोठीं वैभवशाली शहरें झालीं. इराणी लोकांनीं सुमेरियन लोकांच्या कोनलिपीचा अंगीकार केला. त्याचप्रमाणें असेरियन लोकांची शिल्पकला आत्मसात केली. झर्सिसनंतर (इ. स. पू. ४८५ – ४६५) त्याचा मुलगा अर्टाझर्सिस हा सम्राट झाला. पण त्याच्या वेळेपासून इराणच्या वैभवास उतरती कळा लागली. ३ रा डरायस हा इराणचा सम्राट असतांना अलेक्झांडर यानें सर्व ग्रीक नगरराज्यांवर आपलें वर्चस्व बसवून ग्रीक लोकांस आपलेसे केले व ग्रीक संस्कृति आत्मसात केली. यानंतर त्यानें मोठें सैन्य घेऊन इराणी साम्राज्यावर स्वारी केली (इ. स. प. ३३६); इ. स. पू. ३३३ मध्यें इसूस येथें व इ. स. पू. ३३१ मध्यें अराबेला येथें इराणच्या सैन्याचा पराभव करून इराणी साम्राज्यावर आपलें वर्चस्व बसविलें. अशारीतीनें इ. स. पू. ३३१ मध्यें इराणचें साम्राज्य लयास गेलें व इराण हा ग्रीक साम्राज्याचा भाग बनला.

अमेरिकेंतील प्राचीन संस्कृति

(इ. स. पू. १५०० ते इ. स. १५००).

अमेरिकेंतील प्राचीन काळचे लोक—१५ व्या शतकाच्या शेवटीं युरोपमधील लोकांस अमेरिका खंडाचा शोध लागेपर्यंत या खंडाच्या अस्तित्वाची कोणासच कल्पना नव्हती. प्राचीन काळापासून या खंडांत लोकवस्ती होती,

पण या खंडाच्या विस्ताराच्या मानानें ती फारच तुरळक व विखुरलेली आहे. येथील लोक मूळचे अमेरिकेंतील किंवा इतर खंडांतून येथें आलें हें सांगतां येत नाहीं. येथें असलेल्या लोकांस इतर खंडांतील लोकासंबंधीं माहिती नव्हती. अमेरिकेंत फार प्राचीन काळापासून असलेल्या जमातींपैकीं बऱ्याच जमाती मागासलेल्या स्थितींतच राहिल्या व पाषाणयुगांतील संस्कृतीपेक्षां त्याची संस्कृति फारशी प्रगत झाली नाहीं. पण कांहीं जमातींनीं स्वतंत्र रीतीनें आपली बरीच प्रगति करून सांस्कृतिक दृष्ट्या त्या बऱ्याच पुढें आल्या. या जमातींचीं तीन प्रमुख संस्कृति केंद्रें होतीं व तीं म्हणजे मेक्सिकोचा दक्षिण भाग, मध्य अमेरिकेंतील युटाकन द्वीपकल्प व दक्षिण अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील पेरू हा प्रदेश होय. या ठिकाणच्या जमातींस पाषाण युगांत लागलेले सर्व शोध लागले. ते शेती करणें, मातीचीं भांडी करणें, वस्त्रें विणणें, घरें दारे बांधून रहाणें वगैरे गोष्टी करूं लागले व त्यांस इ. स. पू. १५०० च्या सुमारास सोनें, रुपें, तांबें वगैरे धातूचाही शोध लागला व त्यामुळें त्याची पुढील प्रगति बरीच झपाट्यानें झाली, पण त्यास लोखंडाचा शोध लागला नव्हता.

मय लोक व त्यांची संस्कृति—मध्य अमेरिकेच्या डोंगराळ प्रदेशाच्या पायथ्याशीं राहणाऱ्या लोकांस मय लोक व त्यांच्या संस्कृतीस मय संस्कृति असें म्हणण्यांत येते. त्यांनीं तेथें घरें व इमारती बांधून शहरें वसविली. त्यांस सोनें, रुपें, तांबें या धातूंचा शोध लागला होता. इ. स. पू. ६१३ पासून ते वर्ष गणना करीत. त्यांच्या अनेक वसाहती होत्या. इ. स. नाच्या सुरुवातीस गौतेमाला या प्रदेशावर त्यांचें मोठें साम्राज्य स्थापन झालें; व ५ व्या व ६ व्या शतकांत या साम्राज्याची खूप भरभराट झाली. त्यांनीं मोठमोठीं शहरें स्थापन केलीं व त्यांत सुंदर देवळें व भव्य व शोभिवान् इमारती बांधल्या. त्यांची शिल्पकलेंत बरीच प्रगति झाली असून त्यांनीं दगडावर सुबक नक्षीकाम केलें. त्यांच्यांत हलके हलके चित्रलिपी सुरू झाली. त्यांचा भोंवतालच्या प्रदेशांशीं व्यापार चाले.

मेक्सिकोच्या दक्षिण भागांतील पठारावर टॉलटेक्स लोक रहात होते. त्यांनीं १२ व्या शतकांत मय लोकांवर स्वारी करून त्यांचा पराभव केला व त्या

मिळालें नाहीं. (ग्रीक नगरराज्यांशीं झालेल्या युद्धाची हकीकत पुढें ५ व्या प्रकरणांत देण्यांत आली आहे.)

राज्यव्यवस्था व राज्यकारभार--ग्रीस देश काबीज करतां आला नाहीं तरी मोठ्या विस्तृत प्रदेशावर इराणचें साम्राज्य पसरलेलें होतें. डारायस यानें दूरदूरच्या प्रदेशावर आपलें सुभेदार (क्षत्रप) नेमले व केंद्रीभूत अशी राज्यव्यवस्था अमलांत आणली. त्यानें सर्व इराणी साम्राज्यांत नाण्याची पद्धत सुरू केली. इजिप्तमधील नाईल नदीपासून तांबड्या समुद्रापर्यंत पुर्वी खणण्यांत आलेला कालवा दुरुस्त करून तो उपयोगांत आणला. इराणी लोकांनीं आपले आरमार तयार केलें. त्याचप्रमाणें साम्राज्यांतील दूरदूरचीं ठिकाणें जोडणारे रस्ते दुरुस्त केले, व त्यामुळें साम्राज्यांतील निरनिराळ्या भागांमधील संघटन वाढलें. इराणी लोकांची जुनी राजधानी **सुसा** व नवी राजधानी **परसेपोलिस** हीं मोठीं वैभवशाली शहरें झालीं. इराणी लोकांनीं सुमेरियन लोकांच्या कोनलिपीचा अंगीकार केला. त्याचप्रमाणें असेरियन लोकांची शिल्पकला आत्मसात केली. झर्सिसनंतर (इ. स. पू. ४८५ – ४६५) त्याचा मुलगा अर्टाझर्सिस हा सम्राट झाला. पण त्याच्या वेळेपासून इराणच्या वैभवास उतरती कळा लागली. ३ रा डारायस हा इराणचा सम्राट असतांना अलेक्झांडर यानें सर्व ग्रीक नगरराज्यांवर आपलें वर्चस्व बसवून ग्रीक लोकांस आपलेसे केले व ग्रीक संस्कृति आत्मसात केली. यानंतर त्यानें मोठें सैन्य घेऊन इराणी साम्राज्यावर स्वारी केली (इ. स. प. ३३६); इ. स. पू. ३३३ मध्यें इसूस येथें व इ. स. पू. ३३१ मध्यें अराबेला येथें इराणच्या सैन्याचा पराभव करून इराणी साम्राज्यावर आपलें वर्चस्व बसविलें. अशारीतीनें इ. स. पू. ३३१ मध्यें इराणचें साम्राज्य लयास गेलें व इराण हा ग्रीक साम्राज्याचा भाग बनला.

अमेरिकेंतील प्राचीन संस्कृति

(इ. स. पू. १५०० ते इ. स. १५००).

अमेरिकेंतील प्राचीन काळचे लोक—१५ व्या शतकाच्या शेवटीं युरोपमधील लोकांस अमेरिका खंडाचा शोध लागेपर्यंत या खंडाच्या अस्तित्वाची कोणासच कल्पना नव्हती. प्राचीन काळापासून या खंडांत लोकवस्ती होती,

पण या खंडाच्या विस्ताराच्या मानानें ती फारच तुरळक व विखुरलेली आहे. येथील लोक मूळचे अमेरिकेंतील किंवा इतर खंडांतून येथें आलें हें सांगतां येत नाहीं. येथें असलेल्या लोकांस इतर खंडांतील लोकासंबंधीं माहिती नव्हती. अमेरिकेंत फार प्राचीन काळापासून असलेल्या जमातींपैकीं बऱ्याच जमाती मागासलेल्या स्थितींतच राहिल्या व पाषाणयुगांतील संस्कृती-पेक्षां त्यांची संस्कृति फारशी प्रगत झाली नाहीं. पण कांहीं जमातींनीं स्वतंत्र रीतीनें आपली बरीच प्रगति करून सांस्कृतिक दृष्ट्या त्या बऱ्याच पुढें आल्या. या जमातींचीं तीन प्रमुख संस्कृति केंद्रें होतीं व तीं म्हणजे मेक्सिकोचा दक्षिण भाग, मध्य अमेरिकेंतील युटाकन द्वीपकल्प व दक्षिण अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील पेरू हा प्रदेश होय. या ठिकाणच्या जमातींस पाषाण युगांत लागलेले सर्व शोध लागले. ते शेती करणें, मातीचीं भांडी करणें, वस्त्रें विणणें, घरें दारे बांधून रहाणें वगैरे गोष्टी करूं लागले व त्यांस इ. स. पू. १५०० च्या सुमारास सोनें, रुपें, तांबें वगैरे धातूचाही शोध लागला व त्यामुळें त्यांची पुढील प्रगति बरीच झपाट्यानें झाली, पण त्यास लोखंडाचा शोध लागला नव्हता.

मय लोक व त्यांची संस्कृति—मध्य अमेरिकेच्या डोंगराळ प्रदेशाच्या पायथ्याशीं राहणाऱ्या लोकांस मय लोक व त्यांच्या संस्कृतीस मय संस्कृति असें म्हणण्यांत येते. त्यांनीं तेथें घरें व इमारती बांधून शहरें वसाविलीं. त्यांस सोनें, रुपें, तांबें या धातूंचा शोध लागला होता. इ. स. पू. ६१३ पासून ते वर्ष गणना करीत. त्यांच्या अनेक वसाहती होत्या. इ. स. नाच्या सुरुवातीस गौतेमाला या प्रदेशावर त्यांचें मोठें साम्राज्य स्थापन झालें; व ५ व्या व ६ व्या शतकांत या साम्राज्याची खूप भरभराट झाली. त्यांनीं मोठमोठीं शहरें स्थापन केलीं व त्यांत सुंदर देवळें व भव्य व शोभिवान् इमारती बांधल्या. त्यांची शिल्पकलेंत बरीच प्रगति झाली असून त्यांनीं दगडावर सुबक नक्षीकाम केलें. त्यांच्यांत हलके हलके चित्रलिपी सुरू झाली. त्यांचा भोंवतालच्या प्रदेशांशीं व्यापार चाले.

मेक्सिकोच्या दक्षिण भागांतील पठारावर टॉलटेक्स लोक रहात होते. त्यांनीं १२ व्या शतकांत मय लोकांवर स्वारी करून त्यांचा पराभव केला व त्या

प्रदेशावर आपलें वर्चस्व बसविलें. दोन शतकें राज्य केल्यावर टालटेक्स लोकांची सत्ताही कमकुवत व्हावयास लागली. तेव्हां उत्तरेकडील भागांत राहणाऱ्या अझटेक्स लोकांनीं १३ व्या शतकांत त्यांच्यावर स्वारी केली व त्यांचा पराभव केला व त्या प्रदेशावर आपली सत्ता स्थापन केली. १६ व्या शतकाच्या सुरवातीपर्यंत अझटेक्स लोकांचें मेक्सिको व मध्य अमेरिकेंतील प्रदेश यांवर वर्चस्व होतें.

मय लोक, टॉल्टेक्स लोक व अझटेक्स लोक अनेक देवदेवतांची पूजा करीत. देवदेवता प्रसन्न व्हाव्यात व त्यांनीं आपल्या इच्छित गोष्टी पुऱ्या कराव्यात म्हणून पशूंचे त्याप्रमाणें माणसांचेही बळी देण्याची पद्धत यांच्यांत रूढ होती. १५१९ मध्यें स्पॅनिश सरदार कोर्टेझ यानें बंदुका, तोफा या आधुनिक साधनांनीं मध्य अमेरिका व मेक्सिको यांतील अझटेक्स लोकांचा पराभव केला व तेथें स्पेनचें राज्य स्थापन केलें.

इनकस संस्कृति— दक्षिण अमेरिकेच्या पश्चिम भागांतील पेरू या प्रदेशांत तिसरें संस्कृति केंद्र होतें. तेथील लोकांस इनकस व त्यांच्या संस्कृतीस इनकस संस्कृति असें म्हणण्यांत येतें. अमेरिकेंतील इतर ठिकाणच्या संस्कृतीच्या मानानें ही संस्कृति उच्च दर्जाची होती. शेतकी, बांधकाम, राज्यकारभार या बाबतींत त्यांनीं बरीच प्रगति केली होती. दूरदूरचे भाग एकमेकांशीं जोडण्यासाठीं त्यांनीं दगड घालून हजारों मैल लांबीचे रस्ते बांधले. तसेच त्यांनीं मोठमोठ्या इमारती, देवळें बांधलीं. ते अनेक देवदेवतांची पूजा करीत व देव प्रसन्न व्हावा म्हणून त्यास पशूंचे व माणसांचे बळी देत.

पेरू प्रदेशांत त्यांनीं मोठें साम्राज्य स्थापन केलें होतें. पण स्पॅनिश सरदार पिझारो याच्या बंदुका व तोफा यांपुढें इनकस साम्राज्यांतील लोकांचें कांहीं चाललें नाहीं व १५२४ च्या सुमारास त्या प्रदेशावर स्पेनेचें वर्चस्व स्थापन झालें.

सारांश

इजियन समुद्रालगतच्या प्रदेशांतील संस्कृति-(इ. स. पू. ३००० ते इ. स. पू. १२००) इजिप्त व मेसापोटेमिया येथील संस्कृतीशीं संबंध व त्या संस्कृतींचा प्रसार. क्रीट बेट हें आगर. तेथून ट्रॉय व मायसीन व टिरीन्स येथें ठाणीं व

संस्कृति प्रसार. क्रीटमधील नॉसस येथील राजवाडा, सुबक बांधकाम व कलाकौशल्याच्या गोष्टींचे अवशेष. सुखसोयी. विटांवर लिखाण पण लिपीचा अर्थबोध नाहीं. फिनीशियन लोकांमार्फत व्यापार व कलाकौशल्याच्या गोष्टींची देवघेव. हेलनीज (ग्रीक) लोकांवर वर्चस्व. क्रीटमधील संस्कृति व शस्त्रास्त्रें हेलनीजकडून आत्मसात. त्यांच्याशीं वितुष्ट. हेलनीज (ग्रीक) यांच्याकडून टिरीन्स, मायसीन, क्रीट या संस्कृतीचा विध्वंस इ.स. पू. १४०० च्या सुमारास. ट्रायचा विध्वंस इ. स. पू. १२०० च्या सुमारास.

फिनीशियन लोक व त्यांचें कार्य–इ. स. पू. २२०० ते इ. स. पू. १४६ फिनीशियन लोक सेमेटिक वंशाचे. मूळ ठिकाण अरबस्थान. इ. स. पू. २२०० च्या सुमारास बाहेर पडलेले. भूमध्य समुद्राच्या पूर्व किनाऱ्यावर स्थाईक व तेथें टायर, सीडोन, एकर, बायरट या ठिकाणीं वसाहती. दर्यावर्दी काम व समुद्रावरून व्यापार यांत पुढें आलेले. इजिप्त, भूमध्य समुद्राचा पूर्व किनारा, इजियन समुद्र, काळा समुद्र या लगतच्या प्रदेशांतील मालाची ने-आण करणें. ठिकठिकाणच्या संस्कृतीचा प्रसार. अक्षर लिपीचा ग्रीसमध्यें प्रसार. इ. स. पू. १६ व्या शतकांत इजिप्तचे अंकित. इ. स. पू. ११ व्या शतकांत स्वतंत्र. नंतर कार्थेज, कॅडिझ, सिसली, कॉर्सिका वगैरे ठिकाणीं वसाहती व ठाणीं. इ. स. पू. ८७६ असेरियाचे अंकित. नगर राज्यांचा अनियंत्रित कारभार. चांगले कारागिर. वस्त्रें विणणें, रंगविणें, धातूवरील नक्षीकाम हे उद्योगधंदे. पुढें कार्थेज हें प्रमुख ठिकाण. इ. स. पू. १४६ मध्यें रोमकडून उध्वस्त.

हिटाइट–इ. स. पू. २५००–१२०० आर्य वंशाचे. इ. स. पू. २५००–२००० आशिया-मायनरमध्यें आगमन. मेसापोटेमिया येथील संस्कृतीशीं संबंध. कोन लिपीचा स्वीकार. लोखंडाच्या खाणींचा शोध व त्याचीं शस्त्रास्त्रें. साम्राज्य मेसापोटेमियापर्यंत, दगडी इमारती, पशूंचे दगडी पुतळे. इ. स. पू. १२०० च्या सुमारास ऱ्हास.

मीडलोक (मिटानी) इ. स. पू. २५०० ते इ. स. पू. ५५०–आर्य वंशाचे. इराणच्या वायव्य भागांत आगमन व वसाहती, (इ. स. पू. २५००–२०००). त्यांचें साम्राज्य; पण पुढें इजिप्तचे मांडलिक, इजिप्तच्या राजघराण्याशीं सोयरीक. पुढें ८ व्या शतकापासून स्वतंत्र. इराणचा साइरस यांचें त्यांच्यावर वर्चस्व इ. स. पू. ५५० च्या सुमारास.

इराणचा उदय, उत्कर्ष व ऱ्हास–इ. स. पू. २५०० ते इ. स. पू. ३३१ आर्य वंशाचे. इराणमध्यें आगमन व वसाहती (इ. स. पू. २५००–२०००). झरतुष्ट्र धर्मसंस्थापक व सुधारक इ. स. पू. ८ व्या शतकांत. आहूर मझद् हा सर्व

शक्तीमान ईश्वर. अहिरमन राक्षस. मीड लोकांचें वर्चस्व. इ. स. पू. ५५० च्या सुमारास सायरस यानें इराणी लोकांचें एकीकरण केलें. मीड लोकांचा पराभव व साम्राज्य. इ. स. पू. ५३९ बॅबिलोनियावर वर्चस्व. कॅबसिस यानें सीरिया व इजिप्त जिंकला. डरायस (इ. स. पू. ५२१–४८५) आशिया मायनरमधील ग्रीक राज्यावर वर्चस्व. ग्रीसवर स्वाऱ्या पण अपयश. इराणचें इजिप्त ते भारताची सरहद्द एवढें विस्तृत साम्राज्य. केंद्रीभूत राज्यव्यवस्था. दूरदूरचीं ठिकाणें जोडण्यास रस्ते. नाण्यांचा उपयोग. आरमार. पुसा ही जुनी व परसेपीलीस नवी वैभवशाली राजधानी. कोन लीपीचा स्वीकार इ. स. पू. ४५० पासून उतरती कळा. इ. स. पू. ३३३ मध्यें इस्सस व ३३१ मध्यें अराबेला येथें अलेक्झांडरकडून पराभव व ग्रीकांचें वर्चस्व.

अमेरिकेंतील प्राचीन संस्कृति–(इ. स. पू. १५०० पासून ते इ. स. १५००) अमेरिकेंतील बऱ्याच जमाती मागसलेल्या, पण मेक्सिकोचा दक्षिण भाग, मध्य अमेरिकेंतील युटाकन द्वीपकल्प व दक्षिण अमेरिकेंतील पेरू येथील लोक सांस्कृतिक बाबतींत पुढें. मध्य अमेरिका व मेक्सिको येथें इ. स. पू. १५०० ते १२ व्या शतकांपर्यंत मय संस्कृति, चित्रलिपी, इमारती, खोदकाम. १३ व्या शतकांत मय लोकांवर टॉल्टेक्स लोकांचें वर्चस्व. नंतर टॉल्टेक्स लोकांवर अझटेक्स लोकांचें वर्चस्व. धातूंचा शोध, राज्यव्यवस्था, इमारती व देवळें बांधणें. देवदेवतांची पूजा व त्यास पशूंचे व माणसांचे बळी. १५१९ नंतर स्पेनच्या वर्चस्वाखालीं पेरू येथील लोकांची इनकस संस्कृति. खूप लांबीचे रस्ते बांधले. इमारती, देवळें, शेतकींत प्रगति. १५२४ नंतर स्पेनचें वर्चस्व.

प्रकरण ५ वें

ग्रीस व रोम येथील प्राचीन संस्कृत्या व त्यांचे जागतिक परिणाम (इ. स. पू. १८०० ते इ. स. ४७६)

(अ) ग्रीसमधील प्राचीन संस्कृति व इतिहास

(इ. स. पू. १८०० ते इ. स. पू. ३२३).

ग्रीसची भौगोलिक परिस्थिति—ग्रीस देश म्हणजे युरोपच्या आग्नेयेस व भूमध्य समुद्राच्या उत्तरेस असलेलें एक द्वीपकल्प आहे. या द्वीपकल्पालगत पूर्व, पश्चिम व दक्षिण या दिशांकडे लहान लहान अशीं अनेक बेटें असून त्यांचाहि समावेश ग्रीसमध्येंच करण्यांत येतो. ग्रीसमधील थेसेली यामध्यें ओलिंपस हा मोठा पर्वत असून तो बर्फाच्छादित असतो. ग्रीसचा बाकीचा भाग डोंगराळ असून ठिकठिकाणीं समुद्राचे फांटे आंत आल्यामुळें तेथें अनेक द्वीपकल्पें निर्माण झालीं असून किनारा दंतुर बनलेला आहे. यामुळें तेथें सखल प्रदेश थोडा आहे व प्राचीन काळीं निरनिराळ्या भागांतील लोकांचें एकमेकांशीं दळणवळण होणें अवघड गेलें. त्यामुळें सर्व प्रदेशावर एक अशी सत्ता स्थापन न होतां निरनिराळीं लहान लहान राज्यें निर्माण झालीं.

हेलनीज (ग्रीक) लोकांचें ग्रीसमध्यें आगमन—(इ. स. पू. १८०० ते इ. स. पू. १२००) इ. स. पू. १८०० ते इ. स. पू. १२०० च्या दरम्यान आर्य लोकांच्या कांहीं जमाती आपलीं बायकामुलें, त्याचप्रमाणें आपलें सामानसुमान व गुरेंढोरें घेऊन उत्तरेच्या बाजूनें ग्रीसमध्यें वसाहत करण्यास आल्या. त्यांचें हें येणें अनेक शतकें चालूं होतें. या जमातींपैकीं प्रमुख जमाती म्हणजे अकीअन्झ, अयोनियन, फोसियन, थेसेनियन व डोरियन या होत्या. या जमाती वेगवेगळ्या वेळीं ग्रीसमध्यें आल्या, तरी या सर्वांचा मूळ पुरुष हेलन हा होता व त्यामुळें त्या सर्व आपणांस '**हेलनीज**' असें म्हणत. पुढें पुष्कळ वर्षांनीं रोमन लोक या सर्वांस ग्रीक असें म्हणूं लागलें व त्यावरून त्यांचें **ग्रीक** हें नांव व त्यांनीं जो प्रदेश व्यापला होता त्यास '**ग्रीस**' हें नांव रूढ झालें. ग्रीसमध्यें आल्यावर तेथील निरनिराळ्या भागांत त्यांच्या वसाहती

स्थापन झाल्या. हेलनीज किंवा ग्रीक लोकांच्या ज्या निरनिराळ्या जमाती पांच शतकें ग्रीसमध्यें येत होत्या, त्यांपैकीं पहिल्यानें आलेली जमात म्हणजे अकीअन्स व शेवटीं आलेली जमात डोरियन्स ही होय.

क्रीटच्या संस्कृतीचा नाश--हेलनीज लोकांच्या (ग्रीक) निरनिराळ्या जमाती इ. स. पू. १८०० ते १२०० च्या दरम्यान ग्रीसमध्यें आल्या त्यावेळीं तेथें अनेक जमाती रहात होत्या. त्यांपैकीं कांहीं जमाती पुष्कळच सुधारलेल्या होत्या व त्यामानानें हेलनीज (ग्रीक) जमाती मागासलेल्या होत्या. ग्रीसमध्यें पूर्वीपासून असलेल्या जमातींच्या लोकांस मातीचीं भांडीं करून त्यांवर सुबक नक्षीकाम करणें, बाँझचीं शस्त्रें करणें, इतर धातूंचीं भांडीं करणें, जहाजें बांधणें, घरेंदारें करून रहाणें, वस्त्रें विणणें वगैरे किती तरी गोष्टी येत होत्या. या सुधारलेल्या लोकांशीं हेलनीज (ग्रीक) लोकांचा संबंध आल्यामुळें त्यांनीं त्यांपैकीं पुष्कळ गोष्टी आत्मसात केल्या व ते सुधारूं लागले. ग्रीसमधील पूर्वी असलेल्या जमातींतील लोक विशेषतः व्यापारी पेशाचे होते, तरी त्यांनीं ग्रीसमध्यें नैऋत्येकडील पेलोपनीशिया या भागांत डोंगरमाथ्यावर व इतरत्र भक्कम किल्ले बांधले होते व त्यांपैकीं **मायसीन** व **टिरिन्स** हे प्रमुख होते. हेलनीज लोकांना या किल्ल्यांचा व तेथें राहणाऱ्या सशस्त्र लोकांचा दरारा वाटे. ग्रीसमध्यें असलेले हे किल्ले म्हणजे ग्रीसच्या दक्षिणेला असलेल्या क्रीट बेटावरील राजाचीं ग्रीसमधील ठाणीं होत. ग्रीसच्या पूर्व व आग्नेय या बाजूला असलेल्या इजीअन समुद्रांत पसरलेल्या निरनिराळ्या बेटांपैकीं **क्रीट** हें बेट प्रमुख असून तें त्या भागांतील संस्कृतीचें आगर होतें. या इजीअन समुद्रांतील संस्कृतिसंबंधीं माहिती यापुर्वी देण्यांत आलेली आहे. ग्रीसमध्यें स्थाइक झालेल्या आर्यांच्या हेलनीज (ग्रीक) जमातींच्या वसाहतींकिडून क्रीटचा राजा खंडणी घेत असावा व ही खंडणी बरीच वाढत गेल्यामुळें क्रीटचा राजा व ग्रीसमधील ग्रीक (हेलनीज) वसाहती यांच्यामध्यें वितुष्ट येऊन ग्रीसमधील ग्रीक लोकांनीं क्रीटमधील लोकांच्या कला, विद्या, शस्त्रास्त्रें आत्मसात केल्यावर ग्रीसमधील मायसीन व टिरिन्स हीं ठाणीं हस्तगत केलीं व शेवटीं क्रीटवर हल्ला करून इ. स. पू. १४०० च्या सुमारास तेथील राजा मायनॉस याचा भव्य व विस्तीर्ण राजवाडा उद्ध्वस्त करून टाकला. यानंतर यापुढील दोन शतकें क्रीटवर हल्ले होऊन तेथील प्राचीन संस्कृति लयास

गेली. क्रीटच्या पाडावानंतर क्रीट संस्कृतीचें आशियामायनरमधाल केंद्र ट्राय हें ठिकाणही इ. स. पु. १२०० च्या सुमारास ग्रीक लोकांनीं उध्वस्त केलें. तेव्हां क्रीट व ट्रॉय तेथील बऱ्याच लोकांस तीं ठिकाणें सोडून इतर दूरदूरच्या ठिकाणीं निर्वासीत म्हणून जावें लागलें. ट्रायच्या पाडावासंबंधी व त्या-वेळीं शौर्य गाजविणाऱ्या शूर वीरांसंबंधीं त्यानंतर अनेक काव्यें ग्रीसमध्यें प्रसृत झालीं. या सर्व काव्यांचें संकलन करून **होमर** या ग्रीक कवीनें इ. स. पू. ७ व्या शतकांत '**इलिअड**' व '**ऑडिसी**' हीं महा-काव्यें रचिलीं. इलिअड या महाकाव्यांत ट्रायच्या पाडावासंबंधीं हकीकत आहे व ऑडीसी या महाकाव्यांत ट्रायच्या पाडावानंतर ऑडीसीस या शूर वीरानें ठिकठिकाणीं केलेल्या सफरीचें वर्णन आहे. भारतांतील रामायण व महाभारत या महाकाव्यांप्रमाणें हीं काव्यें ग्रीक लोक आपल्या प्राचीन संस्कृतीचा राष्ट्रीय ठेवा व स्फूर्तीस्थान समजतात.

ग्रीक लोकांच्या वसाहती व त्यांचीं नगरराज्यें— (इ. स. पू. १२०० ते इ. स. पू. ६५०)—ग्रीक लोकांनीं इ. स. पू. १२०० ते इ. स. पू. ६५० च्या दरम्यान ग्रीस, इजीयन समुद्रांतील बेटें, ट्रायच्या पाडावानंतर आशियामायनरचा किनारा, त्याचप्रमाणें इटलीचा दक्षिण भाग व सिसली बेट, आफ्रिकेचा उत्तर किनारा, काळ्या समुद्राच्या भोंवतालचा प्रदेश अशा दूरदूरच्या ठिकाणींही आपल्या वसाहती स्थापल्या. तेथील पूर्वीच्या लोकांशीं निरनिराळ्या प्रमाणांत त्यांचे लग्नसंबंध होत. त्यामुळें कालांतरानें ग्रीक ही मिश्र जमात झाली. या वसाहती म्हणजे लहान लहान नगर राज्येंच असत. वसाहती-तील साधारण उंचवट्याच्या जागीं गांव स्थापन करावयाचें व भोंवतालचा सुमारें ५–१० मैलांपर्यंतचा प्रदेश लागवडीस आणावयाचा असा प्रघात असे. तेथील पहिला व्यवसाय शेती करणें हा असे. पण हळके हळके निरनिराळे उद्योगधंदेही सुरू होत. त्याप्रमाणें निरनिराळ्या नगरराज्यांत देवघेव सुरू होऊन व्यापारही सुरू होई. धातूंचीं नाणीं पाडून व्यापारांत त्यांचा उपयोग करण्याचा प्रघात सुरू झाल्यामुळें व्यापारवृद्धीस मदत झाली. भूमध्य समुद्राच्या पूर्व किनाऱ्यावर असलेले फिनीशियन लोक व्यापारामध्यें फार पुढें गेलेले असत. ठिकठिकाणच्या मालानें भरलेलीं त्यांचीं जहाजें ग्रीक वसाहतींस जात. त्यांच्याशीं संबंध आल्यामुळें ग्रीक लोकहि निरनिराळे उद्योगधंदे शिकले

व व्यापारहि करूं लागले. फिनीशियन लोकांपासून निरनिराळ्या वजन-मापांचाहि प्रसार ग्रीक नगरराज्यांत झाला. इ. स. पू. १००० च्या सुमारापासून उच्चारावर आधारलेली व सुट्या अक्षरास वेगळी खूण अशी मूळाक्षराची लिपि फिनीशियन लोकांस अवगत होती. या मुळाक्षराच्या लिपीचा फिनीशियन लोकांमार्फत ग्रीसमध्यें प्रसार झाला. या लिपीमध्यें त्यावेळीं स्वर नव्हते, पण ग्रीक लोकांनीं त्यांत स्वर घातले. अशाप्रकारें या सुट्या मुळाक्षराच्या लिपीमुळें लेखनकलेंत क्रान्ति होऊन ग्रीक लोकांची संस्कृति झपाट्यानें वाढूं लागली.

ग्रीक नगरराज्यांत पहिल्यानें राजसत्ता होती. पण हलके हलके ही सत्ता मोठमोठे जमीनदार, सरदार यांच्या हातीं जाऊन तेथील राजसत्तेचें उच्चाटन झालें. पुढें या सरदारवर्गाच्या स्वार्थी धोरणामुळें त्यांच्याविरुद्ध असंतोष निर्माण होऊन कांहीं ठिकाणीं ही सत्ता सामान्य लोकांच्या हातीं गेली. हीं नगरराज्यें राजकीय बाबतींत एकमेकांपासून अगदीं स्वतंत्र असत, व त्यामुळें त्यांच्यांत कधीं कधीं वितुष्ट उत्पन्न होऊन युद्धप्रसंगही होत.

ग्रीक नगरराज्यांतील सांस्कृतिक ऐक्यः—ग्रीक नगरराज्यें वेगवेगळीं व राजकीय बाबतींत स्वतंत्र असत, तरी सांस्कृतिक बाबतींत त्यांच्यांत खालील गोष्टींमुळें ऐक्य होतें.

(१) एक मूळ पुरुषः–सर्व ग्रीक लोकांचा मूळपुरुष हेलन हा असल्यामुळें ते आपणांस हेलनीज असें म्हणत, व त्यांच्याखेरीज इतरांना परकीय किंवा जंगली (barbarians) असें मानीत.

(२) धर्मः–त्यांच्या देवदेवता, धार्मिक कल्पना, पुराणें एकच असत. निरनिराळ्या देवस्थानांसंबंधीं उत्सव केले जात व त्यांची व्यवस्था पहाण्यास एक मंडळ असून त्यांत निरनिराळ्या नगरराज्यांचे प्रतिनिधी असत. सूर्यापासून प्रकाश मिळणें, पाऊस पडणें, वादळ येणें या सर्व नैसर्गिक गोष्टी ईश्वरप्रेरणेनें होतात व त्यांचा वेगवेगळा देव आहे असें ते मानीत व त्यांची पूजा करीत. **झेऊस** हा सर्व देवांचा राजा व **हेरा** ही त्याची पत्नी, ॲरस हा युद्धाचा देव, ॲपोलो हा सूर्य देव असें ते मानीत. ग्रीसमध्यें **डेल्फि** हें एक देवस्थान होतें. तेथील पुजाऱ्याचे अंगांत येत असे, व त्यावेळीं त्यास प्रश्न विचारल्यास तो भविष्य सांगतो यांवर त्यांचा विश्वास होता. राष्ट्रीय महत्त्वाच्या किंवा इतर

प्रसंगीं त्यास प्रश्न विचारून पुढें होणाऱ्या गोष्टींसंबंधीं भविष्य विचारण्याचा प्रघात रूढ होता. मनुष्याप्रमाणें देवतांसहि राग, लोभ वगैरे विकार असून त्यावर आधारलेल्या त्यांच्या पराक्रमाबद्दलच्या अनेक कथा, आख्यायिका व पुराणें होतीं. थेसलीमधील बर्फाच्छादित ओलिंपस पर्वत हें देव देवतांचें निवासस्थान आहे असें ते मानीत.

(३) ओलिंपिक क्रीडासत्रें (टूर्नमेंटस)– झेऊस या मुख्य देवाच्या सन्मानार्थ दर चार वर्षांनीं ओलिंपिआ येथें वेगवेगळ्या प्रकारच्या शर्यती होत. त्यामध्यें रथांची शर्यत, पळण्याची शर्यत, मुष्टियुद्ध, मल्लयुद्ध, थाळी फेकणें, उड्या मारणें वगैरे शारीरिक व मर्दानी कौशल्याच्या चढाओढी होत व त्यांत निरनिराळ्या नगरराज्यांतील लोक येत. या शर्यती इ. स. पू. ७७६ पासून सुरू झाल्या व त्या दर चार वर्षांनीं भरविण्यांत येत. या वर्षापासून कालगणना करण्याचा ग्रीसमध्यें प्रघात होता. या क्रीडासत्रामुळें ग्रीक लोकांमधील लढाऊबाणा, काटकपणा, शरीरसौष्ठव वगैरे गोष्टींस उत्तेजन मिळें.

महाकाव्यें—इलियड व ऑडीसी हीं होमरनें रचलेलीं महाकाव्यें ग्रीक लोकांच्या प्राचीन संस्कृतीचा व चालीरीतींचा ठेवा समजला जाई व त्यांतील वीर पुरुषांचे पराक्रम स्फूर्तिस्थान मानलें जाई.

अशा रीतीनें राजकीयदृष्ट्या ग्रीसमधील नगरराज्यें स्वतंत्र असलीं तरी सांस्कृतिकदृष्ट्या तीं एक आहेत ही भावना होती.

ग्रीसमधील प्रमुख नगरराज्यें व तेथील राज्यघटना (इ. स. पू. ६५० ते इ. स. पू. ५००)—ग्रीक लोकांनीं ग्रीसमध्यें व ग्रीसच्या बाहेर दूरदूरच्या ठिकाणीं अनेक नगरराज्यें स्थापन केली होतीं, व त्यांत अयोनियन जमातींनीं प्रमुख भाग घेतला होता. त्यांनीं ग्रीसमध्यें ॲटिका या प्रदेशांत **अथेन्स** हें नगरराज्य स्थापन केलें. तसेंच ट्रायच्या पाडावानंतर आशिया मायनरच्या किनाऱ्यावर अनेक नगरराज्यें स्थापिलीं; त्यामुळें या नगरराज्यांना अयोनियन नगरराज्यें म्हणत व कलाकौशल्य, उद्योगधंदे, व सांस्कृतिक बाबी यांमध्यें तीं बरीच प्रसिद्धीस आलीं. एका ठिकाणचें नगरराज्य वाढूं लागलें व मोठें होऊं लागलें म्हणजे तेथील कांहीं धाडसी लोक दूरच्या सोयिस्कर ठिकाणीं दुसरें नगरराज्य स्थापन करीत व राजकीयदृष्ट्या तें आपल्या मूळ नगरराज्याहून

व व्यापारहि करूं लागले. फिनीशियन लोकांपासून निरनिराळ्या वजन-मापांचाहि प्रसार ग्रीक नगरराज्यांत झाला. इ. स. पू. १००० च्या सुमारापासून उच्चारावर आधारलेली व सुट्या अक्षरास वेगळी खूण अशी मूळाक्षराची लिपि फिनीशियन लोकांस अवगत होती. या मुळाक्षराच्या लिपीचा फिनीशियन लोकांमार्फत ग्रीसमध्यें प्रसार झाला. या लिपीमध्यें त्यावेळीं स्वर नव्हते, पण ग्रीक लोकांनीं त्यांत स्वर घातले. अशाप्रकारें या सुट्या मुळाक्षराच्या लिपीमुळें लेखनकलेंत क्रान्ति होऊन ग्रीक लोकांची संस्कृति झपाट्यानें वाढूं लागली.

ग्रीक नगरराज्यांत पहिल्यानें राजसत्ता होती. पण हलके हलके ही सत्ता मोठमोठे जमीनदार, सरदार यांच्या हातीं जाऊन तेथील राजसत्तेचें उच्चाटन झालें. पुढें या सरदारवर्गाच्या स्वार्थी धोरणामुळें त्यांच्याविरुद्ध असंतोष निर्माण होऊन कांहीं ठिकाणीं ही सत्ता सामान्य लोकांच्या हातीं गेली. हीं नगरराज्यें राजकीय बाबतींत एकमेकांपासून अगदीं स्वतंत्र असत, व त्यामुळें त्यांच्यांत कधीं कधीं वितुष्ट उत्पन्न होऊन युद्धप्रसंगहीं होत.

ग्रीक नगरराज्यांतील सांस्कृतिक ऐक्यः—ग्रीक नगरराज्यें वेगवेगळीं व राजकीय बाबतींत स्वतंत्र असत, तरी सांस्कृतिक बाबतींत त्यांच्यांत खालील गोष्टींमुळें ऐक्य होतें.

(१) एक मूळ पुरुषः–सर्व ग्रीक लोकांचा मूळपुरुष हेलन हा असल्यामुळें ते आपणांस हेलनीज असें म्हणत, व त्यांच्यासेरीज इतरांना परकीय किंवा जंगली (barbarians) असें मानीत.

(२) धर्मः–त्यांच्या देवदेवता, धार्मिक कल्पना, पुराणें एकच असत. निरनिराळ्या देवस्थानांसंबंधीं उत्सव केले जात व त्यांची व्यवस्था पहाण्यास एक मंडळ असून त्यांत निरनिराळ्या नगरराज्यांचे प्रतिनिधी असत. सूर्यापासून प्रकाश मिळणें, पाऊस पडणें, वादळ येणें या सर्व नैसर्गिक गोष्टी ईश्वरप्रेरणेनें होतात व त्यांचा वेगवेगळा देव आहे असें ते मानीत व त्यांची पूजा करीत. **झेऊस** हा सर्व देवांचा राजा व **हेरा** ही त्याची पत्नी, ॲरस हा युद्धाचा देव, ॲपोलो हा सूर्य देव असें ते मानीत. ग्रीसमध्यें **डेल्फि** हें एक देवस्थान होतें. तेथील पुजाऱ्याचे अंगांत येत असे, व त्यावेळीं त्यास प्रश्न विचारल्यास तो भविष्य सांगतो यांवर त्यांचा विश्वास होता. राष्ट्रीय महत्त्वाच्या किंवा इतर

प्रसंगीं त्यास प्रश्न विचारून पुढें होणाऱ्या गोष्टींसंबंधीं भविष्य विचारण्याचा प्रघात रूढ होता. मनुष्याप्रमाणें देवतांसहि राग, लोभ वगैरे विकार असून त्यावर आधारलेल्या त्यांच्या पराक्रमाबद्दलच्या अनेक कथा, आख्यायिका व पुराणें होतीं. थेसलीमधील बर्फाच्छादित ओलिंपस पर्वत हें देव देवतांचें निवासस्थान आहे असें ते मानीत.

(३) ओलिंपिक क्रीडासत्रें (टूर्नमेंटस)– झेऊस या मुख्य देवाच्या सन्मानार्थ दर चार वर्षांनीं ओलिंपिआ येथें वेगवेगळ्या प्रकारच्या शर्यती होत. त्यामध्यें रथांची शर्यत, पळण्याची शर्यत, मुष्टियुद्ध, मल्लयुद्ध, थाळी फेकणें, उड्या मारणें वगैरे शारीरिक व मर्दानी कौशल्याच्या चढाओढी होत व त्यांत निरनिराळ्या नगरराज्यांतील लोक येत. या शर्यती इ. स. पू. ७७६ पासून सुरू झाल्या व त्या दर चार वर्षांनीं भरविण्यांत येत. या वर्षापासून कालगणना करण्याचा ग्रीसमध्यें प्रघात होता. या क्रीडासत्रामुळें ग्रीक लोकांमधील लढाऊबाणा, काटकपणा, शरीरसौष्ठव वगैरे गोष्टींस उत्तेजन मिळें.

महाकाव्यें—इलियड व ऑडीसी हीं होमरनें रचलेलीं महाकाव्यें ग्रीक लोकांच्या प्राचीन संस्कृतीचा व चालीरीतींचा ठेवा समजला जाई व त्यांतील वीर पुरुषांचे पराक्रम स्फूर्तिस्थान मानलें जाई.

अशा रीतीनें राजकीयदृष्ट्या ग्रीसमधील नगरराज्यें स्वतंत्र असलीं तरी सांस्कृतिकदृष्ट्या तीं एक आहेत ही भावना होती.

ग्रीसमधील प्रमुख नगरराज्यें व तेथील राज्यघटना (इ. स. पू. ६५० ते इ. स. पू. ५००)—ग्रीक लोकांनीं ग्रीसमध्यें व ग्रीसच्या बाहेर दूरदूरच्या ठिकाणीं अनेक नगरराज्यें स्थापन केली होतीं, व त्यांत अयोनियन जमातींनीं प्रमुख भाग घेतला होता. त्यांनीं ग्रीसमध्यें ॲटिका या प्रदेशांत **अथेन्स** हें नगरराज्य स्थापन केलें. तसेंच ट्रायच्या पाडावानंतर आशिया मायनरच्या किनाऱ्यावर अनेक नगरराज्यें स्थापिलीं; त्यामुळें या नगरराज्यांना अयोनियन नगरराज्यें म्हणत व कलाकौशल्य, उद्योगधंदे, व सांस्कृतिक बाबी यांमध्यें तीं बरीच प्रसिद्धीस आलीं. एका ठिकाणचें नगरराज्य वाढूं लागलें व मोठें होऊं लागलें म्हणजे तेथील कांहीं धाडसी लोक दूरच्या सोयिस्कर ठिकाणीं दुसरें नगरराज्य स्थापन करीत व राजकीयदृष्ट्या तें आपल्या मूळ नगरराज्याहून

स्वतंत्र असें. अयोनियन जमातीनें आशियामायनरच्या किनाऱ्यावर स्थापन केलेलें मायलेटस हें नगरराज्य तेथील नगरराज्यांमध्यें प्रमुख होतें. व्यापार, कलाकौशल्य व उद्योगधंदे या बाबतींत तें लवकरच फार पुढें आलें व त्यांचीं व्यापारी जहाजें इजिप्त, इटली, सार्डिनिया, काळासमुद्र वगैरे दूरदूरच्या ठिकाणीं जात. हेलनीज लोकांच्या इतर जमातींनींही ग्रीसमध्यें त्याचप्रमाणें आशियामायनर, सिसली, दक्षिण इटली वगैरे दूरदूरच्या प्रदेशांतही नगरराज्यें स्थापन केलीं होतीं. या सर्व नगरराज्यांचें एकमेकांशीं व परकीय लोकांशीं दळणवळण सुरू असे.

ग्रीस या द्वीपकल्पामध्यें ग्रीक लोकांनीं अनेक नगरराज्यें स्थापन केलीं. या नगरराज्यांतील सर्व स्वतंत्र नागरिकांस राज्यकारभारामध्यें प्रत्यक्ष भाग घेतां यावा म्हणून या नगरराज्याचें क्षेत्र मर्यादित म्हणजे फार तर २०० ते ४०० चौरस मैल असे. या सर्व नगरराज्यांत अथेन्स व स्पार्टा हीं नगरराज्यें तेथील विशिष्ट राज्यघटनेमुळें विशेष प्रसिद्धीस आलीं. स्पार्टामध्यें सरदारसत्ताक राज्यपद्धति तर अथेन्समध्यें लोकसत्ताक राज्यपद्धति सुरू झाली. पण ही पद्धति तेथें अमलांत येण्यापूर्वी बरींच वर्षें गेलीं.

स्पार्टाचें नगरराज्य—ग्रीकांची डोरीयन ही जमात ग्रीसच्या दक्षिण भागांत आल्यावर तिनें तेथील मूळच्या रहिवाशांकडून तेथील जमीन आपल्या ताब्यांत घेऊन आपसांत वांटून टाकली व तेथील मूळच्या रहिवाशांत शेतांवर काबाडकष्ट करणारीं कुळें बनविलीं. तेथें डोरियन जमातीच्या लोकांनीं स्थापलेल्या निरनिराळ्या खेड्यांचें स्पार्टा हें शहर बनलें. या स्पार्टा नगरराज्यांत पहिल्यानें राजसत्ता होती. हे राजे मोठमोठे सरदार व जमीनदार यांच्या सल्ल्यानें राज्यकारभार करीत. पण पुढे राजे सरदारवर्गाकडून आपल्या हातांत अधिक सत्ता घेण्याचा व सरदारवर्गाचा सल्ला धुडकावून लावण्याचा प्रयत्न करूं लागले. तेव्हां सरदार लोकांनीं एका राजाचा दुसऱ्या राजावर वचक असावा म्हणून एका राजाऐवजीं **दोन राजे** नेमण्याची पद्धत सुरू केली. प्रत्यक्ष राज्यकारभार करण्यास '**एफॉर्स**' नांवाचे पांच अधिकारी नेमण्यांत येत. यांची नेमणूक एक वर्षाची असे, व ती सर्व स्वतंत्र नागरिकांच्या लोकसभेकडून होई. पण या लोकसभेमध्यें मोठमोठ्या सरदार व जमीनदार वर्गाचें बरेंच प्रस्थ असल्यामुळें

तेथील सत्ता सरदारवर्गाच्या हातीं होती. डोरीयन जमातींतील ग्रीक (हेलनीज) लोकांनांच नागरिकत्वाचे अधिकार असत. शेतावर काबाडकष्ट करणाऱ्या ग्रीकेतर कुळांस नागरिकत्वाचे अधिकार नसत, तसेंच त्यांस आपली शेतवाडी सोडूनहि जातां येत नसे. अशा रीतीनें त्यांस गुलामासारखें शेतावर राबावें लागे. याखेरीज स्पार्टा या नगरराज्याभोंवतीं अनेक खेडीं असून तेथें इतर पुष्कळ लोक रहात. मोलमजुरी करण्यास, खाणींत काम करण्यास ते स्पार्टामध्यें येत, पण त्यांस स्पार्टाचे नागरिक समजण्यांत येत नसे. स्पार्टावर परचक्र आलें किंवा स्पार्टास युद्ध करावें लागलें तर या सभोंवतालीं राहणाऱ्या लोकांस स्पार्टास सैनिकांची मदत करावी लागे.

स्पार्टा हें अशाप्रकारें सरदारसत्ताक नगरराज्य झालें होतें. हळके हळके स्पार्टाची लोकसंख्या वाढूं लागली. तेव्हां स्पार्टाच्या लोकांनीं शेजारी असलेल्या इतर नगरराज्यांच्या जमिनी बळकावल्या. तेव्हां त्यांनीं बंडाळीं केली, पण स्पार्टानें कडक उपाय योजून ती मोडून टाकिली. पण अशीं बंडाळीं पुनः झाल्यास ती तात्काळ मोडतां यावी म्हणून स्पार्टानें नेहमीं युद्धाच्या तयारींत असणें जरूर आहे असें वाटून प्रत्येक नागरिकास सक्तीचें लष्करी शिक्षण देण्याची व्यवस्था केली. त्याचप्रमाणें मुलांस लहानपणापासूनच शारीरिक व लष्करी शिक्षण देण्याची पद्धत सुरू केली. मुलांस लहानपणापासून घरीं राहूं न देतां दूर ठिकाणीं रहावें लागे व तेथें शारीरिक व्यायाम, शास्त्रास्त्रांचा उपयोग या गोष्टींचें शिक्षण मिळे. तसेंच त्यांच्या अंगीं काटकपणा यावा व कष्ट सोसण्याची ताकद यावी म्हणून मधून मधून त्यांस झोडपून काढण्यांत येई. चांगलीं आरोग्यसंपन्न व सशक्त प्रजा निर्माण व्हावी म्हणून मुलींनाहि लहानपणीं शारीरिक शिक्षण देण्यांत येई. स्पार्टामध्यें **लायकर्गस** नांवाचा एक कायदेपंडित व विद्वान गृहस्थ होऊन गेला. त्याच्या सूचनेवरून वरील पद्धत सुरू करण्यांत आली होती. स्पार्टाच्या वरील शिक्षण-पद्धतीमुळें लष्करी बाबतींत स्पार्टा इतर सर्व ग्रीक नगरराज्यांत प्रमुख ठरलें, तरी कलाकौशल्य, उद्योगधंदे व इतर सांस्कृतिक बाबीं यांमध्यें तें मागासलेलेंच राहिले.

अथेन्सचें लोकसत्ताक नगरराज्य—ग्रीक लोकांच्या अयोनियन या जमातीनें ग्रीसच्या आग्नेय भागांतील अटिका येथें आपली वसाहत स्थापन केली होती. ही अयोनियन जमात तेथील मूळच्या रहिवाशांत बरीच मिसळून

गेली. त्यांनीं तेथील जमीन लागवडीस आणिली व उंचवट्याच्या प्रदेशालगत त्यांचीं लहान लहान खेडीं स्थापन झालीं. हळूंहळूं या खेड्यांचें **अथेन्स** हें एक नगरराज्य बनलें. येथें पहिल्यानें राजसत्ता होती. मोठमोठे सरदार व जमीनदार यांचें एक मंडळ असून तें राजास राज्यकारभाराचे कामीं सल्ला देई. तसेंच नागरिकांची एक लोकसभा होती. अशी पद्धत होती तरी राजाच्या हातीं बरीच सत्ता होती व ती अरेरावीची असे. तेव्हां तेथील सरदारांनीं इ. स. पू. ६५० च्या सुमारास राजसत्ता नाहींशी केली. राजाच्या ऐवजीं राज्यकारभार करण्यासाठीं लोकसभेकडून निवडलेले असे अधिकारी नेमण्यांत येऊं लागले. या अधिकाऱ्यांस **आर्चन** असें म्हणत. त्यांची मुदत एक वर्षाचीच असे. राज्यकारभार करण्यासाठीं व न्यायनिवाडा देण्यासाठीं जरी अधिकारी नेमण्यांत येत होते तरी राज्यांतील कायदे स्पष्ट व निश्चित नसत. पूर्वापार चालत आलेल्या रूढी व रीतीरिवाज हेच ते कायदे असत. पण ते निश्चित स्वरूपाचें नसल्यामुळें मोठमोठे जमिनदार आपल्या शेतावरील कुळांकडून पूर्वापार चालत आलेल्या रूढीपेक्षां अधिक खंड घेत. त्याचप्रमाणें इतर ठिकाणाहून स्वस्त मिळणारें धान्यहि आणविलें जाऊं लागल्यामुळें अथेन्स नगर राज्यांतील शेतांवर पिकणाऱ्या धान्याची किंमत कमी झाली व लहान लहान शेतकऱ्यांची स्थिति कर्जबाजारी होऊन त्यांस आपल्या जमिनी विकाव्या लागल्या व कर्जापायीं गुलामगिरीहि पतकरावी लागली. तेव्हां बहुजनसमाजामध्यें असंतोष पसरला व ही हलाखीची स्थिति नाहींशी व्हावी व योग्य प्रकारचे कायदे असून ते निश्चित असावेत म्हणून चळवळ सुरू झाली. तेव्हां ही स्थिति सुधारण्यासाठीं **ड्रेकन** या आर्चननें (अधिकारी) पूर्वापार चालत आलेली रूढी, रीतीरिवाज यांवर आधारलेले असे कायदे करून ते इ. स. पू. ६२१ मध्यें प्रसिद्ध केले. हे कायदे कडक होते व गरीब वर्गापेक्षां श्रीमान व सरदार वर्गाच्या हितसंबंधाकडे अधिक लक्ष देणारे होते, तरी ते प्रसिद्ध झाल्यामुळें कायदे नक्की कोणते आहेत ते लोकांस माहीत झालें. तरी या कायद्यांमुळें गरीब वर्गाची स्थिति सुधारली नाहीं म्हणून लोकांमधील असंतोष नाहींसा झाला नाहीं. यानंतर १७ वर्षांनीं **सोलन** हा आर्चन झाला, तेव्हां त्यानें या स्थितींत सुधारणा घडवून आणण्यासाठीं इ. स. पू. ५९४ मध्यें कायदा केला. या कायद्यानें शेत गहाण टाकून काढलेलें कर्ज रद्द केलें. कर्जामुळें ज्यांस गुलामगिरी पतकरावी लागली होती त्या सर्वांस मुक्त केले.

सोलनच्या या सुधारणांमुळें गरीब वर्गाची कर्जबाजारी स्थिति नाहींशी झाली व राज्यकारभारांत भाग घेण्याचा त्यांस अधिकार मिळाला तरी अधिकाराच्या व महत्त्वाच्या सर्व जागा सरदार व धनाढ्य वर्गाच्याच हातांत राहिल्या. तेव्हां लोकांमधील असंतोष पूर्णपणें नाहींसा झाला नाहीं. तेव्हां या संधीचा फायदा घेऊन **फिझीड्टेस** यानें बहुजनसमाजाचे (सामान्य लोक) आपणांस पाठबळ मिळेल असें वाटून अथेन्समधील सत्ता बळकाविली व तो सर्वाधिकारी (टायरंट) झाला. हातांत सत्ता आल्यावर त्यानें पुष्कळ लोकोपयोगी गोष्टी केल्या. अथेन्स शहर सोडून गेलेल्या श्रीमान गृहस्थांच्या जमिनी जप्त करून त्यानें त्या गरीब शेतकऱ्यांस वांटून टाकल्या. शेतीची सुधारणा करण्यासाठीं शेतकऱ्यांस कर्जे दिलीं. राज्यांतील धार्मिक उत्सवाचे प्रसंग वाढविले. गरीब लोकांस कामधंदा मिळावा म्हणून निरनिराळीं बांधकामें सुरू केलीं. सत्ता बळकावून तो सर्वाधिकारी झाला होता, तरी त्यानें केलेल्या गरीब वर्गाच्या हिताच्या गोष्टीमुळें तो लोकप्रिय झाला. त्यानें जवळजवळ ४६ वर्षे राज्यकारभार केला. इ. स. पू. ५१४ मध्यें तो मरण पावल्यावर त्याच्या मुलांकडे सत्ता आली. पण ते कर्तृत्ववान नसल्यामुळें एकाचा खून झाला व दुसऱ्यास अथेन्समधून पळ काढावा लागला.

अथेन्समध्यें लोकशाहीची स्थापना— यानंतर **क्लिस्थीनीझ** हा उदार धोरणी सरदार पुढें आला. अथेन्समधील सर्व नागरिकांस राज्याबद्दल आपलेपणा वाटावयास पाहिजे असेल तर अधिकाऱ्याच्या जागा सर्वांस खुल्या ठेवणें व राज्यकारभारांत भाग घेण्याची संधि सर्व नागरिकांस देणें जरूर आहे हें पाहून त्यानें अथेन्सच्या राज्यघटनेंत महत्त्वाच्या सुधारणा केल्या. म्हणून त्यास **लोकशाहीचा जनक** असें म्हणण्यांत येतें. त्यानें खालील सुधारणा केल्या (इ. स. पू. ५०७) :—

(१) त्यानें मालमत्तेवर व समाजांतील निरनिराळे वर्ग यांवर आधारलेले विभाग रद्द करून अथेन्स या नगरराज्याचे दहा प्रादेशिक विभाग पाडले व त्या विभागांत रहाणाऱ्यांस नागरिकत्वाचे हक्क दिले. त्यामुळें सरदार व जमीनदार वर्गाचें वजन कमी झालें. या दहा विभागांनीं प्रत्येकीं एक याप्रमाणें दरवर्षी दहा अधिकाऱ्यांची निवडणूक करावयाची. या अधिकाऱ्यांस 'जनरल'

(सेनापति) असें म्हणत व त्याच्या मंडळांस युद्धाच्या वेळीं आणि शांततेच्या वेळीं राज्यकारभाराचे सर्व अधिकार असावयाचे.

(२) या दहा विभागांतून प्रत्येकीं ५० असें चिठ्या टाकून नेमलेलें एक कौन्सिल होतें. या ५०० सभासदांच्या कौंसिलकडे राज्यकारभारावर देखरेख ठेवण्याचा अधिकार होता.

(३) सर्व नागरिकांची एक लोकसभा होती. कौंसिलनें पुढें मांडलेल्या सूचनांवर चर्चा करण्याचा या सभेस अधिकार होता. तसेंच युद्ध करणें, तह करणें, त्याचप्रमाणें राष्ट्रांतील श्रेष्ठ अधिकाऱ्यास पदच्युत करणें अशा महत्त्वाच्या प्रसंगीं लोकसभेची संमति घेतली जाई.

(५) ऑस्ट्रेसिझमची पद्धत—सर्व नागरिकांचें मत घेण्यांत येऊन राज्यांतील कोणता गृहस्थ त्यांस नको आहे हें विचारण्यांत येई व ज्याच्याविरुद्ध ६००० नागरिकांनीं आपलें मत दिलें असेल अशा गृहस्थास दहा वर्षें राज्यांतून हद्दपार करीत. या पद्धतीस ऑस्ट्रेसिझमची पद्धत म्हणत. लोकप्रिय महत्त्वाकांक्षी गृहस्थानें बेकायदेशीर रीतीनें सर्व सत्ता बळकावून 'सर्वाधिकारी' (टायरंट) होऊं नये म्हणून ही पद्धत सुरू केली होती.

अशाप्रकारें अथेन्समध्यें 'लोकशाही' निर्माण झाली. पण या लोकशाहीमध्यें अथेन्समधील त्यावेळच्या सुमारें २ लाख ८० हजार लोकसंख्येपैकीं ५०००० लोकांसच नागरिकत्वाचे अधिकार होते. कारण या लोकसंख्येपैकीं १ लाख गुलाम होते, व त्यांस नागरिकत्वाचे अधिकार नव्हते. त्याचप्रमाणें स्त्रियानांही नागरिकत्वाचे अधिकार नव्हते. त्याखेरीज लहान मुलें अज्ञान असल्यामुळें त्यांस हा अधिकार नव्हता. पण राज्यांतील लोकसंख्येपैकीं इतक्या लोकांसही नागरिकत्वाचे वरीलप्रमाणें अधिकार इतरत्र:कोठें नव्हते.

इराणच्या साम्राज्याशीं युद्धें—(इ. स. पू. ४९२–४९० व इ. स. पू. ४८०–४७९).

कारणें—आशिया मायनरच्या पश्चिम किनाऱ्यावर व लगतच्या बेटांवर अयोनियन ग्रीक लोकांनीं आपलीं नगरराज्यें स्थापन केलीं होतीं. त्यांपैकीं मायलेटस हें प्रमुख होतें. इ. स. पू. ५४६–४० च्या सुमारास इराणचा सम्राट साइरस यानें हीं राज्यें जिंकून घेतलीं व त्यांस आपले मांडलिक करून इराणला

खंडणी देणें, इराणी सैन्यास सैनिक पुरविणें वगैरे गोष्टी करण्यास त्यांस भाग पाडलें. तेव्हां इ. स. पू. ४९९ मध्यें या नगरराज्यांनीं बंडाळी केली व अथेन्स व इरिट्रिया यांची मदत मिळवून लिडियामधील इराणच्या सम्राटाच्या सुभेदाराची राजधानी सार्डिस यावर हल्ला करून ती उध्वस्त केली. तेव्हां त्याचा सूड घेण्यासाठीं साइरसनें इ. स. पू. ४९४ मध्यें मायलेटसवर स्वारी करून तें उध्वस्त केलें व तेथील लोकांची कत्तल केली. ग्रीसमधील अथेन्स, इरिट्रिया या नगरराज्यांनीं या बंडाळीस मदत केली असल्यामुळें इराणचा सम्राट डरायस यानें ग्रीसवर स्वारी करण्याचें ठरविलें व मोठें सैन्य व आरमार पाठविलें (इ. स. पू. ४९२).

इराणशीं पहिलें युद्ध—इराणकडून होणाऱ्या स्वारीची बातमी समजतांच अथेन्स व इरिट्रिया यांनीं सैन्याची व आरमाराची जमवाजमव करून इराणच्या स्वारीचा प्रतिकार करण्याचें ठरविलें. तसेंच अथेन्सनें स्पार्टानें मदत पाठवावी म्हणून निरोप पाठविला. इकडे इराणी सैन्याच्या एका विभागानें इरिट्रियावर स्वारी केली व त्याचा विध्वंस केला. दुसरा विभाग मॅरेथॉन येथें उतरला. त्यास तोंड देण्यासाठीं अथेन्सनें **मिलटिआडिस** याच्या नेतृत्वाखालीं शस्त्र व चिलखत यानीं सज्ज असलेलें दहा हजार सैन्य पाठविलें. हें सैन्य इराणी सैन्याच्या धनुष्य-बाणांच्या जोराच्या हल्ल्यास न जुमानतां इराणी सैन्यावर मोठ्या वीरश्रीनें तुटून पडलें व त्यामुळें चिलखतांनीं सज्ज नसलेल्या इराणी सैन्यास माघार घ्यावी लागली (इ. स. पू. ४९०) इराणी लोकांच्या सैन्याचा तिसरा विभाग समुद्र मार्गें अथेन्सजवळच्या किनाऱ्यावर उतरणार होता पण तेथेंही अथेन्सचें सशस्त्र सैन्य जमून तयार आहे हें पाहून इराणच्या सैन्यानें माघार घेतली व तें परत गेलें. अशारीतीनें इराणच्या स्वारीपासून अथेन्सचा बचाव झाला.

इराणशीं दुसरें युद्ध (इ. स. पू. ४८०–४७९)—इराणचें सैन्य परत गेलें तरी सैन्याची व आरमाराची जमवाजमव करून इराणकडून अथेन्सवर समुद्रमार्गें पुनः स्वारी होईल व त्यासाठीं आपलें आरमार प्रबळ करून तें सज्ज ठेवणें जरूर आहे असें अथेन्समधील पुढारी थीमिस्टोक्लिझ यास वाटत होतें. तसेंच या आरमारामुळें शांततेच्या वेळीं अथेन्सच्या समुद्रावरील व्यापारासही संरक्षण मिळणार होतें. इकडे इराणचा सम्राट डरायस यानें ग्रीसवर दुसरी मोठी स्वारी करण्याच्या उद्देशानें सैन्याची व आरमाराची जमवाजमव

चालविली. पण ती पूर्ण होण्यापूर्वीच तो मरण पावला. तेव्हां त्याचा मुलगा **झर्सिस** हा इराणचा सम्राट झाला व त्यानें तें काम पुढें चालविलें. यानंतर इ. स. पू. ४८० मध्यें उत्तरेकडून खुष्कीच्या मार्गानें व पूर्वेकडून समुद्रमार्गें ग्रीसवर स्वारी करण्यासाठीं त्यानें मोठें सैन्य व आरमार पाठविलें. इराणच्या स्वारीची बातमी समजतांच ग्रीसमधील नगरराज्यांनीं इराणी सैन्यास जमिनीवर व समुद्रावर तोंड देण्याचें ठरविलें. जमिनीवरील सैन्याचें अधिपत्य स्पार्टाकडे व आरमारावरील सैन्याचें अधिपत्य अथेन्सकडे देण्यांत आलें. इकडे इराणी सैन्य डार्डानेल्सची सामुद्रधुनी ओलांडून उत्तरेकडून ग्रीसकडे येत होतें व त्यास तोंड देण्यासाठीं स्पार्टाचा राजा लिओडिनास हा १०००० स्पार्टन लढवय्या सैन्यासह उत्तरेकडे तांतडीनें गेला व त्यानें थरमॉपीलीच्या खिंडींत आपल्यापेक्षां खूप मोठ्या अशा इराणी सैन्यास थोपवून धरिलें. पण ग्रीसमधील एकानें फितूर होऊन इराणी सैन्यास ग्रीसमध्यें जाण्यासाठीं दुसरा मार्ग दाखविल्यामुळें इराणी लोकांनीं त्या बाजूनें आपल्या सैन्याचा कांहीं भाग पाठविला. तेव्हां त्यास तोंड देण्यासाठीं **लिओडिनासनें** आपलें बरेंच सैन्य त्या बाजूस पाठविलें व आपल्या थोड्या सैनिकासह मोठ्या इराणी सैन्यास थोपवून धरीत असतां तो व त्याचे सर्व सैनिक मारले गेले. झर्सिस यानें अटिका व अथेन्स यांवर स्वारी करण्यासाठीं मोठे आरमार पाठविलें होतें. त्याच सुमारास उत्तरेकडून जमिनीवरून अथेन्सकडे सैन्य येत आहे हें पाहून थीमिस्टोक्लिझनें सर्वांस अथेन्स सोडून देऊन शेजारच्या बेटांचा व आरमाराचा आश्रय घेण्यास सांगितलें. इकडे जमिनीवरून आलेल्या इराणी सैन्यानें अथेन्सवर स्वारी करून तेथील सैन्याचा पराभव केला व अथेन्स आपल्या ताब्यांत घेतलें आणि तेथील देवळांचा व इमारतींचा विध्वंस करून टाकला.

सॅलामीस व प्लॅटाच्या लढाया—(इ. स. पू. ४८० व ४७९)—इकडे थीमिस्टोक्लिझ यानें समुद्रमार्गें येणाऱ्या इराणी आरमाराशीं तोंड देण्यासाठीं आपलें आरमार सज्ज ठेवून तें ग्रीसच्या दक्षिणेकडील सॅलामीस बेटांनजीक नेलें. इराणी आरमार अथेन्सच्या किनाऱ्याकडे येत होतें, पण यावेळीं समुद्रावर मोठें वादळ होऊन इराणच्या आरमारांतील ४०० जहाजें नादुरुस्त झालीं; तरी इराणी आरमारानें सॅलेमीस बेटानजीक असलेल्या ग्रीक आरमारावर स्वारी केली. तेव्हां तेथें या दोन्ही आरमारांमध्यें युद्ध होऊन त्यांत इराणी आरमाराचा पूर्ण

पराभव झाला (इ. स. पू. ४८०) व समुद्रावर ग्रीसचें वर्चस्व स्थापन झालें. या ग्रीक आरमाराकडून डार्डानेल्सच्या सामुद्रधुनीची नाकेबंदी होईल असें वाटून मार्सिडोनिअस याच्या हाताखालीं अथेन्समध्यें कांहीं सैन्य ठेवून बाकीचें सैन्य झर्सिसनें परत नेलें. तेव्हां इराणी सैन्यावर हल्ला करण्यास ही संधि बरी आहे हें पाहून स्पार्टानें इराणी सैन्यावर हल्ला करून प्लॅटाच्या लढाईत इराणी सैन्याचा फडशा उडविला (इ. स. पू. ४७९). यानंतर आशिया मायनरच्या किनाऱ्यालगतच्या सॅमास बेटानजीक **मॅयकेल** येथेंही ग्रीक आरमारानें इराणी आरमाराचा पराभव केला. त्यामुळें आशियामायनरच्या किनाऱ्यावरील अयोनियन नगरराज्येंही इराणच्या वर्चस्वापासून मुक्त झालीं.

डेलियन संघाची स्थापना (इ. स. पू. ४७७)—इराणचा पराभव झाला होता तरी आशियामायनर, इजियन समुद्र व ग्रीस येथील लहान लहान ग्रीक नगरराज्यांस इराणची भीति वाटत होती; व इराणकडून केव्हां स्वारी होईल याचा नेम नव्हता. तेव्हां एकमेकांच्या संरक्षणार्थ संघ स्थापन करणें व प्रबल असें आरमार ठेवणें जरूर होतें. ग्रीसमध्यें स्पार्टा व अथेन्स हीं राज्यें प्रबल होतीं व लष्करी बाबतींत जरी स्पार्टा प्रबल होतें, तरी स्पार्टाजवळ आरमार नसल्यामुळें या संघाचें पुढारीपण अथेन्सकडे आलें. या संघांत स्पार्टा सामील झालें नाहीं व स्पार्टाच्या नेतृत्वाखालीं पेलोपनशिन द्वीपकल्पांतील नगरराज्यांचा दुसरा एक संघ स्थापन झाला. तेव्हां अथेन्सच्या नेतृत्वाखालीं इजीअन समुद्रालगतच्या ग्रीक नगरराज्यांचा एक आरमारी संघ स्थापन झाला. या संघाचें मुख्य ठिकाण इजीअन समुद्रांतील मध्यवर्ती बेट **डेलॉस** हें करण्यांत आल्यामुळें या संघास **डेलियन संघ** असें म्हणत. या संघाचे सभासद असलेल्या राज्यांकडून युद्धनौका व पैसा यांच्या रूपानें वर्गणी घेतली जाई व यांपैकीं युद्धनौका पुरविण्याऐवजीं पैशाच्या रूपानेंच वर्गणी देणें पुष्कळांस सोईचें वाटल्यामुळें या संघासाठीं लढाऊ नौका पुरविण्याची व संरक्षणाची व्यवस्था करण्याची जबाबदारी अथेन्सकडेच येऊन या संघाचें रूपांतर अथेन्सच्या साम्राज्यांत झालें. हलके हलके संघाचें मुख्य ठिकाण डेलासहून हालवून तें अथेन्सला आणण्यांत आलें.

इराणचा पराभव होऊन अथेन्सच्या नेतृत्वाखालीं डेलियन संघ स्थापन झाल्यावर अथेन्सचें महत्त्व व दरारा खूप वाढला. अथेन्समधील कलाकौशल्यास

व उद्योगधंद्यास उत्तेजन मिळून अथेन्सचा व्यापार वाढला व संपत्तीचा ओघ अथेन्सकडे वाहूं लागला. थीमीस्टोक्लिझ हा अथेन्समधील प्रमुख पुरुष होता व त्यास न्यायी म्हणून प्रसिद्ध असलेला अरिस्टाइडिस व सीमन यांचें साहाय्य होतें. अथेन्समध्यें या काळीं मोठमोठ्या सुंदर इमारती व मंदिरें बांधण्यांत आलीं. अथेन्सभोंवतीं तट बांधण्यांत आला. तसेंच अथेन्सपासून पांच मैलांवर असलेलें पायरिअस हें अथेन्सचें बंदरही भक्कम करण्यांत आलें.

अथेन्सचें सुवर्णयुग-पेरीक्लिझचें नेतृत्व (इ. स. पू. ४६१–४२९)—इ. स. पू. ४६१ च्या सुमारास अथेन्सच्या राजकारणांत पेरिक्लिझ हा पुढें येऊं लागला. हा क्लिस्थनिझचा नातू असून सरदार घराण्यांतील होता; पण त्यास बहुजनसमाजाबद्दल आपलेपणा वाटे. त्यावेळीं त्याचें वय तीस वर्षांचें होतें. अथेन्सचें आरमार वाढवून तें प्रबळ करणें हे थीमीस्टोक्लिझचें धोरण त्यानें पुढें चालविलें. तो तीस वर्षें सेनापती म्हणून निवडला गेला. असे एकंदर दहा सेनापती निवडले जात व तें अथेन्सचें मंत्रिमंडळ असे. या मंडळाचें पुढारीपण पेरिक्लिझ याच्याकडे असे. तो प्रभावी वक्ता होता व लोकांवर त्याचें खूप वजन होतें. अथेन्समध्यें लोकशाही नांदावी असें त्यास वाटत होतें व अगदीं गरीब स्थितींतील नागरिकासहि अथेन्सच्या कारभारांत भाग घेतां यावा म्हणून त्यानें अथेन्समधील कौंसिलचे सभासद, ज्यूरीमधील सभासद यांस तेथील कामाबद्दल अल्प वेतन देण्यांत यावें अशी व्यवस्था केली. अथेन्समधील कलाकौशल्य, उद्योगधंदे व व्यापार यांस पेरिक्लिझकडून उत्तेजन मिळे. त्यामुळें या काळांत अथेन्सची खूप भरभराट होऊन अथेन्सचें वैभव वाढलें म्हणून या काळास अथेन्सचें सुवर्णयुग असें म्हणण्यांत येतें.

बांधकाम—पेरिक्लिझच्या काळीं पुष्कळ सुंदर व भव्य इमारती बांधण्यांत आल्या. त्यापैकीं ॲक्रॉपोलिसवर (अथेन्समधील उंचवट्याचा भाग) पार्थीनॉन नांवाचें अथेना या कला व विद्यादेवीचें मंदीर प्रमुख होय. तेथील अथेना देवीचा सुंदर पुतळा **फीडीअस** या प्रसिद्ध शिल्पकारानें घडाविला. त्याचप्रमाणें फीडिअस यानें ओलिंपस येथील झेऊस या देवाचा भव्य पुतळाही केला. अथेन्स येथें डायनिशचें भव्य नाट्यगृह बांधण्यांत आलें. या नाट्यगृहांत १४००० प्रेक्षकांस बसतां येईल अशी व्यवस्था केली होती.

वाङ्मय—मोठमोठ्या राष्ट्रीय उत्सवाचे प्रसंगीं मैदानी व मर्दानी खेळ व शर्यती होत, त्याचप्रमाणें नाट्यग्रंथासंबंधाच्याहि चढाओढी होत; आणि नवीन नाटकें तयार करून तीं जनतेपुढें मांडलीं जात. एश्चिलस, सोफोक्लिस व युरोपायडीस यांनीं दुःखपर्यवसायी नाटकें लिहून कीर्ति मिळविली, तर ॲरिस्टोफेन यानें सुखपर्यवसायी नाटक लिहून नांव मिळविलें.

इतिहास लेखक—हॅरॉडोटस हा एक प्रसिद्ध इतिहास लेखक याच काळांत होऊन गेला. त्यानें ग्रीक लोकांचें इराणी लोकांशीं झालेल्या युद्धाची हकीकत, त्याचप्रमाणें ग्रीसच्या भोंवतालच्या ग्रीकेतर लोकांच्या चालीरीति व त्यांचा इतिहास लिहून ठेविला आहे. थ्यूसीडायडीस हा दुसरा एक इतिहास लेखक होता. त्यानें ग्रीस व स्पार्टा यांमध्यें झालेल्या युद्धाची हकीकत लिहून ठेविली आहे.

ग्रीस जगतांतील प्रमुख विद्यापीठ-अथेन्स—अथेन्सचें वैभव वाढत जाऊन तेथें कलाकौशल्य, काव्य, शास्त्र व इतर वाङ्मय प्रकार यांस मिळणारें उत्तेजन पाहून ग्रीक जगतांतील ठिकठिकाणच्या नगरराज्यांतील कल्पक, व्यासंगी, बुद्धिमान व प्रतिभावान पुरुष अथेन्समध्यें येऊन राहूं लागले. त्याचप्रमाणें निरनिराळ्या कला शिकणें, विद्येचें अध्ययन करणें, वगैरेंसाठींही ठिकठिकाणचे विद्यार्थी तेथें येऊन रहात. त्यामुळें विद्या, कला, शास्त्र या बाबतींत अथेन्स हें ग्रीक जगतांतील प्रमुख विद्यापीठ म्हणून त्याची कीर्ति सर्वत्र पसरली.

अथेन्स व स्पार्टा यांमधील युद्ध (इ. स. पू. ४३१-४०४)—ग्रीसमध्यें लष्करी बाबतींत स्पार्टाकडे पुढारीपण होतें, पेलोपनीशन संघाचें नेतृत्व स्पार्टाकडेच होतें. पण इराणी युद्धानंतर अथेन्सनें आपलें आरमार वाढविलें व डेलियन संघाचें नेतृत्व अथेन्सकडे आलें. तसेंच व्यापार, उद्योगधंदे या बाबतींतही अथेन्सची भरभराट होत होती. पण अथेन्सच्या या वैभवाबद्दल स्पार्टाला अथेन्सचा हेवा वाटत होता. अशी परिस्थिति असतां पेलोपनीशन संघाचें अथेन्सशीं वितुष्ट येऊन त्या संघांतील स्पार्टा, कॉरिंथ वगैरे नगरराज्यांनीं अथेन्सविरुद्ध युद्ध पुकारिलें (इ. स. पू. ४३१). हें युद्ध २७ वर्षें टिकलें. हें युद्ध सुरू झाल्यावर दोनच वर्षांनीं पेरिक्लिझ मरण पावला. अथेन्सच्या कांहीं वसाहतींनीं बंडाळी केली. या संधीचा फायदा घेऊन इराणनेंही अथेन्सविरुद्ध स्पार्टाला मदत केली. तेव्हां सरतेशेवटीं अथेन्सचा पराभव होऊन त्यास अपमानास्पद तह

करावा लागला. या तहानें अथेन्सला आपली नटबंदी पाडून टाकावी लागली व आपल्या आरमारांत १२ लढाऊ जहाजांपेक्षां अधिक जहाजें ठेवावयाचीं नाहींत या गोष्टीस मान्यता द्यावी लागली. तसेंच मोठी खंडणीहि द्यावी लागून स्पार्टाचें पुढारीपण मान्य करावें लागलें. अशारीतीनें अथेन्सचें आरमारी व लष्करी श्रेष्ठत्व नाहींसें झालें, तरी विद्या, कलाकौशल्य, शास्त्रीय ज्ञान, प्रमुख विद्यापीठ व सांस्कृतिक केंद्र म्हणून अथेन्सची कीर्ति या पराभवानंतरहि वाढतच गेली.

स्पार्टाच्या पुढारीपणास उतरती कळा—पेलोपर्नीशन युद्धांत अथेन्सचा पराभव झाला व स्पार्टाकडे सर्व ग्रीसचें पुढारीपण आलें तरी स्पार्टाचें हें वैभव फार काळ टिकलें नाहीं. स्पार्टा इतर नगरराज्यांच्या अंतस्थ राज्यकारभारांतहि हात घालूं लागलें व त्यामुळें इतर नगरराज्यांकडून स्पार्टाला या बाबतींत विरोध होऊं लागला. अशाप्रकारें स्पार्टाविरुद्ध असंतोष पसरत असतां **थीब्ज** या नगरराज्यानें या कामीं पुढाकार घेऊन व इतर कांहीं नगरराज्यांचें साहाय्य मिळवून इ.स. पू. ३७१ मध्यें स्पार्टाचा पराभव केला. तेव्हां ग्रीसमधील नगरराज्यांचें पुढारीपण थीब्सकडे आलें, पण थीब्सचें हें श्रेष्ठत्व फार काळ टिकलें नाहीं. ग्रीसमधील निरनिराळीं नगरराज्यें यांच्यामध्यें एकजूट होऊन त्यांचें एक संघराज्य स्थापन झालें नाहीं व हीं नगरराज्यें एकमेकांशीं भांडतच राहिलीं. तेव्हां या परिस्थितीचा फायदा घेण्याचें ग्रीसच्या उत्तरेकडे असलेल्या मॅसिडोनिया या देशाचा राजा फिलीप यानें ठरविलें.

फिलीपच्या नेतृत्वाखालीं ग्रीक राज्यें—ग्रीसच्या उत्तरेला मॅसिडोनियाचें राज्य होतें. ग्रीसच्या मानानें तेथील लोक विद्याकलांमध्यें मागासलेले होतें; तरी हलकें हलकें त्यांच्यावर ग्रीक संस्कृतीचा परिणाम होऊं लागला. मॅसिडोनियाचा राजपुत्र **फिलिप** यास लहानपणीं थीब्स या ग्रीसमधील नगरराज्यांत ओलीस रहावें लागलें असतां तेथील सैन्य, लष्करी शिस्त, शस्त्रास्त्रें, त्याचप्रमाणें तेथील कलाकौशल्य, संस्कृति व वैभव जवळून पाहण्याची संधि मिळाली. त्याचप्रमाणें ग्रीसमधील नगरराज्याचें एकमेकांशीं वितुष्ट असलेलेंही त्याच्या निदर्शनास आलें. ग्रीसच्या संस्कृतीबद्दल त्यांस आदर वाटत असून ती आत्मसात करावी असें त्यास वाटत होतें. तेव्हां पुढें मॅसिडोनियाचा राजा

झाल्यावर त्यानें आपलें घोडदळ व पायदळ सैन्य शस्त्रास्त्रांनीं सज्ज केलें व आपल्या नेतृत्वाखालीं ग्रीक नगरराज्यांचें एकीकरण करण्याचें योजिलें व त्यासाठीं प्रयत्न चालविला. त्यावेळीं अथेन्समध्यें **डेमॉस्थेनिस** हा प्रसिद्ध वक्ता होता. फिलीपच्या योजनेप्रमाणें वागल्यास ग्रीसमधील नगरराज्यांस आपलें स्वातंत्र्य गमवावें लागेल हें सर्वांच्या मनांत बिंबविण्याचा त्यानें आपल्या प्रभावी वक्तृत्वानें प्रयत्न केला व अथेन्सच्या नेतृत्वाखालीं ग्रीसमधील नगरराज्यांचा एक संघ स्थापन केला. पण फिलीपनें आपल्या प्रबळ सैन्यानिशीं ग्रीसवर स्वारी केली. या सैन्यास ग्रीसमधील नगरराज्यांनीं तोंड दिलें, व इ. स. पू. ३३८ मध्यें **चेरोनीज** येथें मोठी लढाई होऊन त्यांत ग्रीक नगरराज्यांचा पराभव झाला व ग्रीसवर फिलीपचें वर्चस्व स्थापन झालें. ग्रीक संस्कृति, ग्रीक आचारविचार, कलाकौशल्य यांचा फिलीपला अभिमान वाटत होता. तो स्वतःस ग्रीक समजे व या ग्रीक (हेलनीज) संस्कृतीची जोपासना करून तिचा प्रसार करणें हें आपलें कर्तव्य आहे असें त्यास वाटे. तेव्हां ग्रीक नगरराज्यांचें राजकीय स्वातंत्र्य जरी नष्ट झालें (इ. स. पू. ३३८), तरी त्यांच्या अंतस्थ बाबतींत त्यानें मुळींच ढवळाढवळ केली नाहीं व त्यामुळें निरनिराळ्या ग्रीक नगरराज्यांतील अंतस्थ स्पर्धा व तंटे नाहींसे होऊन ग्रीक संस्कृतीचा विकास होण्यास मदत झाली. यानंतर फिलीपनें मॅसिडोनियाच्या नेतृत्वाखालीं सर्व ग्रीक नगरराज्यांचा एक मोठा संघ स्थापन केला व त्यामुळें निरनिराळ्या ग्रीक नगरराज्यांचा राष्ट्राभिमान त्यांच्या लहान राज्यांपुरताच मर्यादित न रहातां तो ग्रीक जगतापर्यंत विस्तृत झाला.

अलेक्झांडरचा पराक्रम व साम्राज्य (इ. स. पू. ३३४ ते इ. स. पू. ३२३)—सर्व ग्रीक नगरराज्यांचें एकीकरण करून मॅसिडोनियाच्या नेतृत्वाखालीं ग्रीसचें एक प्रबल राज्य केल्यावर इराणच्या वैभवशाली साम्राज्यावर स्वारी करण्याचा फिलीपनें बेत केला, व त्यासंबंधाची तयारी सुरू असता इ. स. पू. ३३६ मध्यें त्याचा खून झाला. त्यानंतर त्याचा पुत्र **अलेक्झांडर** हा ग्रीकांचा सम्राट झाला. त्यावेळीं त्याचें वय वीस वर्षांचेंच होतें. राजपुत्रास योग्य असें त्याचें लहानपणचें शिक्षण झालेलें होतें. घोड्यावर बसणें, तलवार, भाला, धनुष्यबाण वगैरे शस्त्रास्त्रांचा योग्य उपयोग करणें यांमध्यें तो पारंगत झाला होता. त्याचप्रमाणें ग्रीक पुराणें, दंतकथा, इतिहास, होमरची इलियड व

ऑडेसी हीं महाकाव्यें व त्यांतील वीर पुरुषांनीं केलेलीं पराक्रमाचीं कृत्यें, राज्यशास्त्र, राजनीति वगैरे वेगवेगळ्या सांस्कृतिक गोष्टींबद्दल बौद्धिक व व्यावहारिक ज्ञान त्यानें मिळविलें होतें. प्रसिद्ध ग्रीक तत्त्ववेत्ता, विद्वान् व बहुश्रुत गृहस्थ **ॲरिस्टॉटल** याच्या देखरेखीखालीं त्याचें हें शिक्षण झालें होतें. त्यामुळें ग्रीक संस्कृतीबद्दल त्यास अभिमान वाटत असून तिचा प्रसार जगांत सर्वत्र व्हावा असें त्यास वाटत होतें. त्याचप्रमाणें इराणनें ग्रीसवर केलेल्या स्वारीचा सूड म्हणून इराणी साम्राज्यावर स्वारी करण्याची फिलीपची मनीषा पूर्ण करण्याची त्यानें तयारी चालविली.

त्यानें घोडदळ व पायदळ यांचें सुसज्ज असें मोठें सैन्य तयार केलें. यामध्यें ग्रीसमधील निरनिराळ्या नगर राज्यांतून निवडक सैनिक स्वयंस्फूर्तीनें आलेले होते. या मोठ्या व सुसज्ज सैन्यासह त्यानें इ. स. पू. ३३४ मध्यें डार्डानेल्सची सामुद्रधुनी ओलांडिली व आशियामायनरमधील इराणच्या सुभेदाराचा पराभव केला. यानंतर त्यानें सीरियावर स्वारी केली. तेथें इराणचा सम्राट ३ रा डरायस आपल्या मोठ्या सैन्यानिशीं त्यास तोंड देण्यास सज्ज होता, तेव्हां **इसूस** येथें मोठी लढाई होऊन त्यांत डरायसचा पराभव झाला (इ. स. पू. ३३३). यानंतर अलेक्झांडरनें ग्रीसवरील स्वारीच्या वेळीं इराणला जहाजांची मदत करणाऱ्या फिनीशियन लोकांचीं सर्व ठाणीं काबीज केलीं.

यानंतर इराणच्या वर्चस्वाखालीं असलेल्या इजिप्तवर स्वारी केली व तेथील इराणच्या सुभेदाराचा पराभव केला व इजिप्त देश आपल्या वर्चस्वाखालीं आणिला. तेव्हां इजिप्तचा पॅरोहा (सम्राट) म्हणून त्याला तेथें राज्याभिषेक करण्यांत आला. यानंतर त्यानें नाइल नदीच्या मुखाजवळ एक शहर स्थापन केलें व तेंच पुढें **अलेक्झांड्रिया** हें प्रसिद्ध शहर झालें.

यानंतर अलेक्झांडरनें मेसापोटेमियावर स्वारी केली. तेथें इराणचा सम्राट ३ रा डरायस यानें अलेक्झांडरला तोंड देण्यासाठीं हत्ती, घोडे, व पायदळ यांचें मोठें सुसज्ज सैन्य तयार ठेवलें होतें. अलेक्झांडरच्या व त्याच्या सैन्याची टायग्रीस नदीच्या कांठीं असलेल्या निनेव्हा शहराजवळ **ॲराबेला** येथें गांठ पडली व मोठे तुंबळ युद्ध झालें. ३ रा डरायसनें आपल्याकडून शिकस्त केली, पण अलेक्झांडरच्या कणखर व जिवावर उदार होऊन

लढणाऱ्या सैन्यापुढें त्याचें कांहीं चाललें नाहीं व त्याचा पूर्ण पराभव झाला (इ. स. पू. ३३१). यानंतर अलेक्झांडरनें इराणी साम्राज्याची जुनी राजधानी सुसा व नवी राजधानी पेरसेपोलीस हीं शहरें जिंकून घेतलीं व तेथील संपत्ति हस्तगत केली.

भारताची प्राचीन संस्कृति, वैभव व संपत्ति यांविषयीं अलेक्झांडरनें बरेंच ऐकलें होतें व भारताच्या सीमेपर्यंत इराणचें साम्राज्य पसरलें असल्यामुळें भारतावर स्वारी करण्याचें ठरविलें. तेव्हां इराण व अफगाणिस्थान (गांधार) हे देश जिंकून तो भारताच्या सीमेपर्यंत आला व तेथें असलेल्या पुरु राजाशीं त्याचें युद्ध झालें. त्यांत पुरु राजाचा पराभव झाला (इ. स. पू. ३२६). पण पुरु राजाच्या सैन्याचें शौर्य त्याच्या निदर्शनास येऊन त्यानें त्याच्याशीं मैत्रीचा तह केला. यावेळीं भारतांत पाटलीपुत्र येथें नंदांचें वैभवशाली व प्रबळ राज्य होतें. त्यावर स्वारी करण्याचा त्याचा विचार होता. पण सरहद्दीवरील एका चारक्या राज्याच्या सैन्यानें केलेला प्रतिकार पाहून नंदाच्या प्रबळ सैन्याविरुद्ध आपला टिकाव लागेल कीं नाहीं, याची त्यास शंका वाटूं लागली. तसेंच गेलीं दहा वर्षें एका देशांतून दुसऱ्या देशांत युद्ध करीत हिंडत असलेल्या त्याच्या सैन्यासही नंदाच्या साम्राज्यावर स्वारी करण्याचा विचार पसंत पडला नाहीं, व परत ग्रीसला केव्हां पोहोंचतों असें त्यांस वाटत होतें. तेव्हां अलेक्झांडरनें परत फिरण्याचें ठरविलें व तो बलुचिस्थानाच्या मार्गानें इराणमधील सुसा व त्यानंतर बॅबिलोन येथें आला. तेथें आल्यावर तो आजारी पडला व वयाच्या ३३ व्या वर्षी इ. स. पू. ३२३ मध्यें मरण पावला.

अलेक्झांडरच्या विस्तृत साम्राज्याचीं छकलें--अलेक्झांडरनें ११ वर्षांच्या अवधींत ग्रीसपासून भारतापर्यंत व उत्तरेस कॅस्पियन समुद्रापासून दक्षिणेस इराणचें आखात व अरबस्थानपर्यंतचा प्रदेश व इजिप्त देश आपल्या वर्चस्वाखालीं आणला होता. त्याचा हा सर्व काळ युद्ध करण्यांतच गेला, तरी त्यानें हीं निरनिराळीं राज्यें काबीज करीत असतां तेथें ग्रीक ठाणीं स्थापन करून तेथें आपले सैनिक व सुभेदार ठेवले व हे सर्व प्रदेश ग्रीक वर्चस्वापासून दूर होऊं नयेत असा प्रयत्न केला. तरी या विस्तृत साम्राज्याचें संघटन करण्यास त्यास वेळ मिळाला नाहीं. तेव्हां त्याच्या मृत्यूनंतर त्यानें ठिकठिकाणीं नेमलेले सेनापति व सुभेदार एकमेकांशीं

मांडून स्वतंत्र झाले व त्यांनीं त्याचें विस्तृत साम्राज्य आपसांत वांटून घेतलें. (१) लीसिमॅचस या सुभेदाराच्या अमलाखालीं मॅसिडोनिया व युरोपमधील प्रदेश आला (२) टॉलेमी या सरदारानें इजिप्त आपल्या ताब्यांत घेतला (३) व सेल्यूकस या सेनापतीच्या वर्चस्वाखालीं भूमध्य समुद्रापासून भारताच्या सीमेपर्यंतचा पश्चिम आशियांतील मुलुख आला.

ग्रीक जगतांतील संस्कृति—ग्रीक जगत हें ग्रीसपुरतेंच मर्यादित नसून त्यांमध्यें इजिअन समुद्र, आशिया मायनर, इटली, आफ्रिकेचा उत्तर किनारा, फ्रान्स व स्पेनचा किनारा, काळ्या समुद्राच्या लगतचा प्रदेश या सर्व विस्तृत प्रदेशांवर पसरलेल्या ग्रीक नगरराज्यांच्या कक्षेखालील प्रदेश येत होता. या सर्व ठिकाणीं पसरलेल्या ग्रीक लोकांचा मेसापोटेमिया व इजिप्त येथील प्राचीन संस्कृतीशीं संबंध येऊन विद्या, कलाकौशल्य व वाङ्मय या सर्व बाबतींत त्यांनीं आपली प्रगति केली. अथेन्सप्रमाणें इजिप्तमधील अलेक्झांड्रिया हेंहि एक प्रमुख विद्याकेंद्र बनलें. त्याचप्रमाणें आशिया मायनर, सीरिया, मेसापोटेमिया, इजिप्त व इराण या विस्तृत प्रदेशांवर पसरलेल्या अलेक्झांडरच्या साम्राज्याची त्याच्या मृत्यूनंतर छकलें झालीं, तरी हे सर्व प्रदेश ग्रीक सेनापतींच्याच वर्चस्वाखालीं असून ठिकठिकाणीं ग्रीक ठाणीं स्थापन झालेलीं असल्यामुळें ग्रीक संस्कृतीचा या भागांतही प्रसार होत गेला.

बांधकाम व शिल्पकला—पूर्वी देवदेतांच्या मूर्ती घडाविणें व मंदिरें बांधणें या कामाकडेच कलावंताचें लक्ष असे. पण इ. स. पू. ४ थ्या शतकापासून नाट्यगृहें, लोकांचीं रहाण्याचीं शोभिवंत घरें बांधणें, माणसाचे पुतळे करणें यांकडेही कलावंताचें लक्ष जाऊन पुष्कळ सुंदर, इमारती, भव्य सभागृहें व पुतळे तयार करण्यांत आले. खांबाची घडण यांमध्येंही डॉरिक, अयोनियन व कॉरिंथ या पद्धती रूढ होऊं लागल्या.

वाङ्मय—पूर्वीचीं नाटकें ग्रीक पौराणिक कथांवर आधारलेलीं असत. पण यानंतर तीं तत्कालीन समाजस्थितिनिदर्शक होऊं लागलीं व त्यांमध्यें तत्कालीन राजकारणी पुरुषांवर उपरोधिक टीका होऊं लागली. पूर्वी नाट्यगृहें फारच थोड्या ठिकाणीं होतीं; आतां बहुतेक मोठ्या शहरांत नाट्यगृहें बांधण्यांत येऊं लागली व नाट्य हा लोकांचा आवडता असा करमणुकीचा प्रकार झाला.

वक्तृत्वकला—या कलेमध्यें पुष्कळ वाढ होऊं लागली व मोठमोठे प्रभावी वक्ते इ. स. पू. ५ व्या शतकापासून पुढें येऊं लागलें. डेमॉस्थेनिस हा प्रसिद्ध वक्ता याच काळांत होऊन गेला (इ. स. पू. ३८४–३२२). त्यावेळीं वृत्तपत्रें अस्तित्वांत नव्हतीं. तेव्हां लोकशाहीमध्यें निरनिराळ्या प्रश्नांसंबंधीं लोकमत तयार करणें व आपल्या मताचा लोकांवर पगडा पाडणें या गोष्टीची आवश्यकता असल्यामुळें वक्तृत्वकलेचें महत्त्व वाढून इतर विषयांप्रमाणें वक्तृत्वकला व तर्कशास्त्र शिकविण्याचा प्रघात रूढ झाला.

शास्त्र—इजिप्त, मेसापोटेमिया, इराण, भारत, वगैरे प्रदेश प्राचीन काळापासून सांस्कृतिक बाबतींत पुढें गेलेले होते व या प्रदेशांशीं ग्रीक लोकांचा संबंध आल्यामुळें गणित, ज्योतिष, वैद्यकी व भौतिक शास्त्रें यासंबंधीं ग्रीक लोकांमध्यें आवड उत्पन्न होऊन त्या शास्त्रांचाही अभ्यास होऊं लागला. वैद्यकीमध्यें हेरोफीलस व गणितामध्यें पॅथागोरस हे विद्वान प्रसिद्धीस येऊन शास्त्रीय विषयांत पुष्कळ प्रगति होऊं लागली.

तत्त्वज्ञानी व विद्वान् लोक—या काळांत पुष्कळ विद्वान्, तत्त्वज्ञानी व विचारवंत पुरुष पुढें येऊन त्यांनीं तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राजकारण, तर्कशास्त्र व कायदा वगैरे बाबींसंबंधानें प्रवचनें देऊन व ग्रंथलेखन करून लोकांच्या पुढें नवीन विचार व नवीन ध्येयें मांडलीं व त्यामुळें सामान्य जनतेची बौद्धिक पातळी उंचावण्यास मदत झाली. या विद्वान् लोकांपैकीं कांहींची माहिती खालीं दिली आहे.

साक्रेटीस (इ. स. पू. ४७०–३९९)—अथेन्समध्यें इ. स. पू. ५ व्या शतकांत सॉक्रेटीस हा एक मोठा तत्त्वज्ञानी व विचारवंत पुरुष होऊन गेला. त्याच्या विचारांचे केवळ अथेन्स व ग्रीस येथीलच नव्हे तर युरोपच्या सांस्कृतिक जीवनांवर महत्त्वाचे परिणाम घडले. याचा जन्म इ. स. पू. ४७० या वर्षीं झाला. त्याची रहाणी साधी होती व तो साधे कपडे वापरी व अनवाणी हिंडे. तो शरीरानें धट्टाकट्टा होता. त्याचें बसकें व बोजड नाक आणि बटबटीत डोळे यामुळें तो दिसावयास कुरूप होता. पण त्याच्या विद्वत्तेमुळें तो लोकांचा आवडता झाला. त्यानें आपलीं मतें व विचार ग्रथित करून ठेविले नाहींत. पण त्याचा शिष्य प्रसिद्ध तत्त्ववेत्ता प्लेटो यानें आपल्या 'संवाद' (Dialogues) या ग्रंथामध्यें साक्रेटिसचे विचार,

निरनिराळ्या प्रश्नांसंबंधीं त्याचीं मतें, त्याच्या आयुष्यांतील महत्त्वाचे प्रसंग व घटना ग्रथित करून ठेविल्या आहेत. त्यावरून साक्रेटिसाच्या विचारांसंबंधीं व कार्यासंबंधीं माहिती मिळते. अथेन्स शहरीं चवाठ्यावर तो विद्यार्थ्यांशीं निरनिराळ्या विषयांवर चर्चा करी व ती ऐकण्यास इतरही पुष्कळ लोक जमत. विद्यार्थ्यांस योग्य ते प्रश्न विचारून त्यांच्या विचारशक्तीस चालना देऊन त्यांच्याकडून जरूर तीं उत्तरें घेऊन त्यांच्या ज्ञानांत भर घालण्याची सॉक्रेटिसाची पद्धत असे. ज्ञान प्राप्त करून देण्याच्या कामीं ही पद्धत फारच उपयुक्त असल्यामुळें ही पुढें शिक्षणशास्त्रांत मान्यता पावली, व पुढें या पद्धतीस सॉक्रेटिसाच्या नांवावरून '**सॉक्रेटीस पद्धत**' असें म्हणण्यांत येऊं लागलें. 'एखाद्या गोष्टीसंबंधीं सत्य समजून घ्यावयाचें असेल तर त्याच्या खरेपणाविषयीं पहिल्यानें शंका प्रदर्शित करा' असें त्याचें सांगणें असे. अथेन्समधील कांहीं कायदे योग्य नाहींत व आपल्या विचारास पटणारे नाहींत असें जरी त्यास वाटे, तरी अथेन्सचा नागरिक म्हणून त्या कायद्यांचें पालन करणें आपलें कर्तव्य आहे असें तो समजे. तो विरक्त नव्हता तर सर्व प्रकारच्या सामाजिक कार्यक्रमांत भाग घेई. प्रत्येकानें विचार करून सत्य समजून घेण्याचा प्रयत्न करावा, 'बाबा वाक्यं', म्हणून कोणतीही गोष्ट प्रमाण मानूं नये असें तो म्हणे. ग्रीक लोकांचीं पुराणें, त्यांतील देवदेवता व कांहीं धर्मकल्पना यांवर त्याचा विश्वास नव्हता व तसें उघडपणें सांगण्यास तो कचरत नसे. ग्रीक लोकांच्या त्यावेळच्या भोळ्या समजुती व खुळ्या कल्पना यांवर तो प्रखर टीका करी. त्याच्या या मतांमुळें त्यास पुष्कळ विरोधक व शत्रूहि निर्माण झाले. त्यांनीं त्याच्यावर पाखंडीपणाचा व अथेन्समधील तरुणांस बिघडवून टाकण्याचा आरोप केला व अथेन्समधील न्यायमंडळाकडे त्याच्याविरुद्ध तक्रार केली. तेव्हां अथेन्समधील न्याय देणाऱ्या मंडळानें (ज्यूरीनें) सॉक्रेटिसानें आपल्या पाखंडी मतामुळें अथेन्समधील तरुणांस बिघडवून टाकलें आहे या आरोपाच्या बाबतींत त्यास दोषी ठरवून 'सॉक्रेटिसानें विष प्राशन करून आपली हत्त्या करून घ्यावी' अशी शिक्षा त्यास ठोठाविली. साक्रेटिसानें न्यायमंडळाचा हा निकाल शांतपणें मान्य करून विष प्राशन केलें व आपली हत्त्या करून घेतली (इ. स. पू. ३९९). विष प्राशन करण्याच्या वेळेपर्यंत हा महान तत्त्वज्ञानी प्लेटो, झेनोफोन, वगैरे आपल्या शिष्यांशीं शांतपणें व मोकळेपणानें तत्त्वज्ञानविषयक प्रश्नासंबंधीं चर्चा करीत होता.

प्लेटो (इ. स. पू. ४२७–३४७)—हा मोठा तत्त्वज्ञानी व विचारी पुरुष होता. हा सॉक्रेटीसचा शिष्य होता, सॉक्रेटीसच्या मृत्यूनंतर त्यानें वेगवेगळ्या देशांमध्यें प्रवास केला व नंतर अथेन्स येथें येऊन तत्त्वज्ञान शिकविण्यासाठीं विद्यापीठ स्थापन केलें. त्यास अॅकाडमी म्हणत. त्यानें चाळीस वर्षें तत्त्वज्ञानावर प्रवचनें दिलीं व तीं ऐकण्यास अथेन्समधील विद्वान् लोक जमत. 'खरें सुख ज्ञान मिळविण्यांत आहे. कोणतीही गोष्ट त्रिकालाबाधित नाहीं, व मनुष्यानें परिस्थितीप्रमाणें त्यांत बदल घडवून आणला पाहिजे' असें त्याचें सांगणें असे. त्यानें 'संवाद' (Dialogues) हा ग्रंथ लिहून त्यांत सॉक्रेटिसाचीं वेगवेगळ्या विषयांवरील विचार ग्रथित करून ठेविले आहेत व त्यावरून सॉक्रेटिसाच्या विचारांची जगास माहिती झाली. हा ग्रंथ प्रश्न व उत्तर या स्वरूपांत लिहिलेला आहे. प्लेटोनें 'लोकसत्ताक राज्य' (Republic) हा ग्रंथ लिहिला व यांत आदर्श राज्य कसें असावें यासंबंधाचे विचार ग्रथित केले. त्याचप्रमाणें त्यानें अमरत्व, अध्यात्म वगैरे ग्रंथ लिहिले (Immortality). प्लेटोच्या तात्त्विक, राजकीय व धार्मिक मतांचा पुढील लोकांवर बराच परिणाम घडला व त्याच्या ग्रंथांचें सध्यांहि अध्ययन केलें जातें.

ॲरिस्टॉटल (इ. स. पू. ३८४–३२२)—ग्रीसमध्यें हा विद्वान, ज्ञानी, शास्त्रज्ञ व बहुश्रुत पुरुष होऊन गेला. हा प्लेटोचा शिष्य होता. त्यानें निरनिराळ्या अनेक विषयांवर ग्रंथरचना केली व त्यामुळें त्यास प्राचीन काळीं होऊन गेलेला सर्वांत श्रेष्ठ, विद्वान् व ज्ञानी पुरुष असें मानण्यांत येतें. त्याची ग्रंथरचना राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, पदार्थविज्ञान, तत्त्वज्ञान, रसायनशास्त्र, प्राणिशास्त्र, ज्योतिष, भाषाशास्त्र, नाट्य, काव्य या विविध विषयांवर होती. याच्याच देखरेखीखालीं फिलीप राजानें अलेक्झांडरचें शिक्षण करविलें. ॲरिस्टॉटलच्या अभ्यासाच्या शास्त्रीय पद्धतीमुळें व भौतिक शास्त्रावरील ग्रंथांमुळें नवीन शास्त्रीय शोध करण्यास लोकांस चालना मिळाली. अरिस्टॉटलच्या ग्रंथांचा जगांतील निरनिराळ्या ठिकाणच्या विश्वविद्यालयांतून अजूनही अभ्यास केला जातो.

झेनो—(इ. स. पू. ३४०–२६५) हा एक तत्त्वज्ञानी होऊन गेला. यानें प्रसृत केलेलें तत्त्वज्ञान 'स्टोइसिझम' या नांवानें ओळखिलें जातें. 'वासनेचा त्याग करून विचारपूर्वक जीवन जगणें' हाच जीवनाचा हेतु असें त्याचें सांगणें असे.

एपिक्यूरस (इ. स. पू. ३४१–२७०)—हा एक तत्त्वज्ञानी होऊन गेला. त्यानें असें प्रतिपादिलें कीं मनुष्यानें सुखी जीवन जगण्याचा प्रयत्न करावा व ही सुखप्राप्ति योग्य मार्गानें मिळवावी. ग्रीक देवदेवतांवर त्याचा विश्वास नव्हता. तसेंच मरणोत्तर जीवन आहे या कल्पनेवरही त्याचा विश्वास नव्हता. मृत्यु हाच शेवट असें तो मानी. 'प्रत्येकानें सुखी जीवन जगण्याचा प्रयत्न करावा' या त्याच्या मताचा पुढें विपर्यास करण्यांत आला व 'खाणें, पिणें, मजा करणें' हेंच त्याचें मत होतें असें मानण्यांत येऊं लागलें.

यासेरीज अनेक वाङ्मयभक्त, विद्वान् गृहस्थ व कलावंत ग्रीसमध्यें त्या काळांत होऊन गेले. यांपैकीं कांहींची माहिती 'पेरिक्लिझकालीन सुवर्णयुग' या भागांत मागें आलेली आहे.

(ब) रोमचा उदय, उत्कर्ष, विस्तार व ऱ्हास

(इ. स. पू. १८०० ते इ. स. ४७६)

इटली–भौगोलिक स्थान–युरोप खंडाच्या दक्षिण भागीं भूमध्य समुद्रांत गेलेलीं अशीं तीन द्वीकल्पें आहेत. त्यांत मध्यवर्ती जें द्वीपकल्प आहे त्यास इटली असें म्हणतात. या द्वीपकल्पाच्या पश्चिमेस कॉर्सिका व सार्डिनिया हीं बेटें असून दक्षिणेस सिसली हें एक मोठें बेट आहे. सिसली बेटापासून आफ्रिका खंडाच्या किनाऱ्यावरील जवळचें टोंक सुमारें ९० मैल अंतरावर आहे. त्या ठिकाणास सध्यां ट्यूनिस असें म्हणतात. प्राचीन काळीं या ठिकाणाजवळ फिनीशियन लोकांची कार्थेज ही वसाहत होती. क्षेत्रफळाच्या दृष्टीनें इटली हें ग्रीस या द्वीपकल्पाच्या सुमारें चौपटीनें मोठें आहे. इटलीची दक्षिणोत्तर लांबी पूर्वपश्चिम रुंदीपेक्षां पुष्कळ मोठी असून त्यामधून अपेनाईन हा पर्वत दक्षिणोत्तर गेलेला आहे. या पर्वताच्या दोन्ही बाजूस दऱ्या व सखल मैदानें आहेत. इटलीच्या उत्तरेकडे नेहमीं बर्फाच्छादित असलेला आल्प पर्वत आहे. त्यांतून 'पो' ही नदी उगम पावते. अपेनाइन पर्वतावर उगम पावणारी नदी म्हणजे टायबर ही असून ती पूर्वपश्चिम वाहते.

इटलींतील प्राचीन काळच्या जमाती—प्राचीन काळीं इटलीमध्यें सॅबिन्स, सॅमनाइट्स, व्होल्स्की वगैरे जमाती रहात होत्या. त्यांची वस्ती तुरळक

असून त्या रानटी स्थितींत होत्या. त्यांची वृत्ति भटकी असून रानावनांत सांपडणाऱ्या कंदमुळ फळांवर व प्राण्यांच्या शिकारीवर त्या आपली उवजीविका करीत. यानंतर इ. स. पू. १८०० ते १२०० च्या दरम्यान आर्य लोकांच्या कांहीं जमाती उत्तरेकडून इटलीमध्यें वस्ती करण्यासाठीं आल्या व त्या इटलीच्या मध्य भागांत पश्चिम किनाऱ्यावरील सखल प्रदेशांत राहूं लागल्या. या जमातींस लॅटिन्स असें म्हणण्यांत येऊं लागलें व त्यांनीं व्यापलेल्या प्रदेशास लेशिअम (Latium) हें नांव मिळालें.

इटली हा मोठा देश असून त्या मानानें तेथील वस्ती तुरळकच होती. अशी स्थिति असतां इ. स. पू. १००० च्या सुमारास पश्चिमेकडील समुद्रमार्गानें **इट्रस्कन्झ** (Etruscans) नांवाची धाडसी जमात जहाजांतून इटलीमध्यें आली व पश्चिम किनाऱ्यावरील लेशिअम या प्रदेशाच्या उत्तरेकडील भागांत त्यांनीं आपली वस्ती केली. त्यांनीं जो प्रदेश व्यापला त्यास इट्रिया असें म्हणत. त्यांचें येणें बरींच वर्षें चालूं होतें. ग्रीक लोकांनीं आशियामायनरमधील ट्रॉय हें ठिकाण उध्वस्त केल्यावर हे त्या प्रदेशांतून आले असावेत. इटलींत यांच्यापूर्वी असलेल्या जमातींपेक्षां हे पुष्कळच सुधारलेले होते. त्यांस शेती करणें, भांडींकुंडीं करणें, शस्त्रास्त्रें करणें, वीणकाम करणें, दगड, विटा व चुना यांचीं घरें बांधणें वगैरे गोष्टी येत होत्या. ते आशियामायनरमध्यें असतांना मेसापोटेमिया (बॅबिलोनिया) इजिप्त वगैरे सांस्कृतिक बाबतींत पुढें गेलेल्या प्रदेशांशीं त्यांचा संबंध आला असल्यामुळें सांस्कृतिक बाबतींत ते पुढें गेलेले होते. इटलीमध्यें आल्यावर त्यांनीं लहान लहान शहरें स्थापन केलीं. इटलीमध्यें असलेल्या लॅटिन्स, सबाइन्स, व सॅबनाइटस या जमातींशीं त्याचा संबंध येऊन त्या जमातीही सुधारूं लागल्या.

इट्रस्कन्झ जमातीप्रमाणें ग्रीक (हेलनीज) लोकांच्या कांहीं धाडसी जमातीही वसाहत करण्यासाठीं इ. स. पू. ८०० ते इ. स. पू. ६०० च्या दरम्यान इटलीमध्यें आल्या. त्यांनीं इटलीच्या दक्षिण भागांत व दक्षिणेकडे असलेल्या सिसली बेटांत आपलीं अनेक नगरराज्यें स्थापन केलीं. त्यांपैकीं सिसलीमधील सॅराक्यूज, इटलीमधील टॅरेंटम व क्यूमा हीं विशेष प्रसिद्ध होतीं. इटलीच्या दक्षिण भागांत अनेक ग्रीक नगरराज्यें स्थापन होऊन व्यापार, कलाकौशल्य व राज्य-

एपिक्यूरस (इ. स. पू. ३४१–२७०)—हा एक तत्त्वज्ञानी होऊन गेला. त्यानें असें प्रतिपादिलें कीं मनुष्यानें सुखी जीवन जगण्याचा प्रयत्न करावा व ही सुखप्राप्ति योग्य मार्गानें मिळवावी. ग्रीक देवदेवतांवर त्याचा विश्वास नव्हता. तसेंच मरणोत्तर जीवन आहे या कल्पनेवरही त्याचा विश्वास नव्हता. मृत्यु हाच शेवट असें तो मानी. 'प्रत्येकानें सुखी जीवन जगण्याचा प्रयत्न करावा' या त्याच्या मताचा पुढें विपर्यास करण्यांत आला व 'खाणें, पिणें, मजा करणें' हेंच त्याचें मत होतें असें मानण्यांत येऊं लागलें.

यासेरीज अनेक वाङ्मयभक्त, विद्वान् गृहस्थ व कलावंत ग्रीसमध्यें त्या काळांत होऊन गेले. यांपैकीं कांहींची माहिती 'पेरिक्लिझकालीन सुवर्णयुग' या भागांत मागें आलेली आहे.

(ब) रोमचा उदय, उत्कर्ष, विस्तार व ऱ्हास

(इ. स. पू. १८०० ते इ. स. ४७६)

इटली–भौगोलिक स्थान–युरोप खंडाच्या दक्षिण भागीं भूमध्य समुद्रांत गेलेलीं अशीं तीन द्वीकल्पें आहेत. त्यांत मध्यवर्ती जें द्वीपकल्प आहे त्यास इटली असें म्हणतात. या द्वीपकल्पाच्या पश्चिमेस कॉर्सिका व सार्डिनिया हीं बेटें असून दक्षिणेस सिसली हें एक मोठें बेट आहे. सिसली बेटापासून आफ्रिका खंडाच्या किनाऱ्यावरील जवळचें टोंक सुमारें ९० मैल अंतरावर आहे. त्या ठिकाणास सध्यां ट्यूनिस असें म्हणतात. प्राचीन काळीं या ठिकाणाजवळ फिनीशियन लोकांची कार्थेज ही वसाहत होती. क्षेत्रफळाच्या दृष्टीनें इटली हें ग्रीस या द्वीपकल्पाच्या सुमारें चौपटीनें मोठें आहे. इटलीची दक्षिणोत्तर लांबी पूर्वपश्चिम रुंदीपेक्षां पुष्कळ मोठी असून त्यामधून अपेनाईन हा पर्वत दक्षिणोत्तर गेलेला आहे. या पर्वताच्या दोन्ही बाजूस दऱ्या व सखल मैदानें आहेत. इटलीच्या उत्तरेकडे नेहमीं बर्फाच्छादित असलेला आल्प पर्वत आहे. त्यांतून 'पो' ही नदी उगम पावते. अपेनाइन पर्वतावर उगम पावणारी नदी म्हणजे टायबर ही असून ती पूर्वपश्चिम वाहते.

इटलींतील प्राचीन काळच्या जमाती—प्राचीन काळीं इटलीमध्यें सॅबिन्स, सॅमनाइटस, व्होल्स्की वगैरे जमाती रहात होत्या. त्यांची वस्ती तुरळक

असून त्या रानटी स्थितींत होत्या. त्यांची वृत्ति भटकी असून रानावनांत सांपडणाऱ्या कंदमुळ फळांवर व प्राण्यांच्या शिकारीवर त्या आपली उवजीविका करीत. यानंतर इ. स. पू. १८०० ते १२०० च्या दरम्यान आर्य लोकांच्या कांहीं जमाती उत्तरेकडून इटलीमध्यें वस्ती करण्यासाठीं आल्या व त्या इटलीच्या मध्य भागांत पश्चिम किनाऱ्यावरील सखल प्रदेशांत राहूं लागल्या. या जमातींस लॅटिन्स असें म्हणण्यांत येऊं लागलें व त्यांनीं व्यापलेल्या प्रदेशास लेशिअम (Latium) हें नांव मिळालें.

इटली हा मोठा देश असून त्या मानानें तेथील वस्ती तुरळकच होती. अशी स्थिति असतां इ. स. पू. १००० च्या सुमारास पश्चिमेकडील समुद्रमार्गानें **इट्रस्कन्झ** (Etruscans) नांवाची धाडसी जमात जहाजांतून इटलीमध्यें आली व पश्चिम किनाऱ्यावरील लेशिअम या प्रदेशाच्या उत्तरेकडील भागांत त्यांनीं आपली वस्ती केली. त्यांनीं जो प्रदेश व्यापला त्यास इट्ररिया असें म्हणत. त्यांचें येणें बरींच वर्षें चालूं होतें. ग्रीक लोकांनीं आशियामायनरमधील ट्रॉय हें ठिकाण उध्वस्त केल्यावर हे त्या प्रदेशांतून आले असावेत. इटलींत यांच्यापूर्वी असलेल्या जमातींपेक्षां हे पुष्कळच सुधारलेले होते. त्यांस शेती करणें, भांडींकुंडीं करणें, शस्त्रास्त्रें करणें, वीणकाम करणें, दगड, विटा व चुना यांचीं घरें बांधणें वगैरे गोष्टी येत होत्या. ते आशियामायनरमध्यें असतांना मेसापोटेमिया (बॅबिलोनिया) इजिप्त वगैरे सांस्कृतिक बाबतींत पुढें गेलेल्या प्रदेशांशीं त्यांचा संबंध आला असल्यामुळें सांस्कृतिक बाबतींत ते पुढें गेलेले होते. इटलीमध्यें आल्यावर त्यांनीं लहान लहान शहरें स्थापन केलीं. इटलीमध्यें असलेल्या लॅटिन्स, सबाइन्स, व सॅबनाइटस या जमातींशीं त्याचा संबंध येऊन त्या जमातीही सुधारूं लागल्या.

इट्रस्कन्झ जमातीप्रमाणें ग्रीक (हेलनीज) लोकांच्या कांहीं धाडसी जमातीहीं वसाहत करण्यासाठीं इ. स. पू. ८०० ते इ. स. पू. ६०० च्या दरम्यान इटलीमध्यें आल्या. त्यांनीं इटलीच्या दक्षिण भागांत व दक्षिणेकडे असलेल्या सिसली बेटांत आपलीं अनेक नगरराज्यें स्थापन केलीं. त्यांपैकीं सिसलीमधील सॅराक्यूज, इटलीमधील टॅरेंटम व क्यूमा हीं विशेष प्रसिद्ध होतीं. इटलीच्या दक्षिण भागांत अनेक ग्रीक नगरराज्यें स्थापन होऊन व्यापार, कलाकौशल्य व राज्य-

कारभार या बाबतींत त्यांनीं बरीच प्रगति केली. ग्रीक नगरराज्यांनीं व्यापलेल्या प्रदेशास 'विशाल ग्रीस' असें म्हणण्यांत येई. या ग्रीक वसाहतींतील लोकांचा इटलीच्या मध्य व उत्तर भागांत राहणाऱ्या लॅटिन्स, इट्रस्कन्झ या लोकांशींहीं व्यापार चाले. ग्रीक लोकांपासून रोमन लोक लिपी शिकले व त्यापासून रोमन लिपी बनली. तसेंच व्यापारांत उपयोगी पडणारीं वजनें-मापेंही ग्रीक लोकांकडून रोमन लोकांकडे आलीं.

रोमची स्थापना व तेथील राजसत्ता (इ. स. पू. ७५३ ते इ. स. पू. ५०९)—लेशिअम प्रदेशाच्या उत्तर सरहद्दीवरून टायबरनदी पूर्व-पश्चिम वहात गेली होती. या नदीच्या उत्तरेकडील प्रदेशांत इट्रस्कन्झ लोकांचीं नगरराज्यें होतीं. या टायबर नदीस वरचेवर पूर येई व त्यामुळें नदीच्या मुखाजवळचा प्रदेश जलमय होई. परंतु मुखापासून सुमारें १२ मैलांवर नदीस चांगला उतार असून त्यालगत सात लहान लहान टेकड्या होत्या व पाण्यापासून सुरक्षित असा तो उंचवट्यास प्रदेश असल्यामुळें लॅटिन्स लोकांनीं त्या ठिकाणीं आपलीं लहान लहान गांवें वसविली व त्यांचेंच हळकें हळकें शहर बनलें. इट्रस्कन्स लोकांशीं व्यापार करण्यास, त्याचप्रमाणें त्यांच्याशीं किंवा पूर्वेकडील डोंगराळ प्रदेशांत राहणाऱ्या सॅबिन्स लोकांशीं तंटाबखेडा झाल्यास त्यांच्या हल्ल्यांपासून आपलें रक्षण करण्यास तें सोयीस्कर असें ठिकाण होतें. हें ठिकाण म्हणजेच **रोमचें नगरराज्य** असून त्याची स्थापना इ. स. पू. ७५३ या वर्षीं झाली. रोममध्यें त्यावेळीं राजसत्ता होती व राजाच्या हातीं धार्मिक बाबी, सैन्य व कायदे या बाबतींत बरीच सत्ता होती. लोकांमध्यें सरदार, मोठमोठे जमीनदार त्याचप्रमाणें सामान्य लोक असे दोन वर्ग होते. सरदार व जमनिदार यांच्या वर्गास **पट्रिशन्झ** (Patricians) व सामान्य लोकांच्या वर्गास **प्लीबीयन्स** (Plebeians) असें म्हणत. या नगरराज्यावर पूर्वी निरनिराळ्या राजवंशांनीं राज्य केलें. त्यांच्या कारकीर्दीत रोम या शहराचा विस्तार वाढला व रोमभोंवतीं तटबंदीही करण्यांत आली. यांपैकीं कांहीं राजांची सत्ता बरीच जुलमी झाली. शेवटीं टारक्विन्स या राजघराण्याची सत्ता तेथें असतां पट्रिशन्झ लोकांनीं प्लीबीयन लोकांची मदत घेऊन तेथें राज्यक्रान्ति घडवून आणली व तेथें लोकसत्ताक राज्य स्थापन केलें (इ. स. पू. ५०९).

रोमचें लोकसत्ताक राज्य व तेथील राज्यघटना—हें लोकसत्ताक राज्य सुमारें ५०० वर्षें म्हणजे इ. स. पू. २७ पर्यंत टिकलें. रोममध्यें राजसत्ता नाहींशी होऊन लोकसत्ताक राज्य स्थापन झालें तरी सुरवातीस सरदार व मोठाले जमीनदार या वर्गाच्या (पट्रिशन्झ) हातांत बरींच सत्ता होती व राज्यकारभारांतील सर्व महत्त्वाच्या जागांवर या वर्गांतील लोकच नेमले जात. पण त्यामुळें सामान्य लोकांत (प्लीबीयन्स) असंतोष उत्पन्न होत गेल्यामुळें निरनिराळे कायदे करावे लागले व त्यामुळें पहिल्या सुमारें दोनशें वर्षांच्या काळांत (इ. स. पू. ५०९ ते २८७) पट्रिशन्झ वर्गाच्या लोकांस प्लीबीयन वर्गांतील लोकांस राज्यकारभारांत आपल्या बरोबरीचें स्थान द्यावें लागलें. सुरवातीस रोमन लोकांमधील कायदे व निर्बंध निश्चित स्वरूपाचे नव्हते, तर ते पूर्वापार चालत आलेल्या रूढी, समजुती व आचारविचार यांवर आधारिलेले होते. त्यामुळें त्यांत संदिग्धता उत्पन्न होई व वेगवेगळ्या न्यायाधिशांकडून त्यांचा वेगवेगळा अर्थ केला जाई. तेव्हां कायदे व निर्बंध कोणतें आहेत हें सर्वांस समजणें जरूर आहे म्हणून एक मंडळ नेमण्यांत आलें व त्या मार्फत त्यावेळीं अस्तित्वांत असलेल्या सर्व कायद्यांचें संकलन करण्यांत येऊन त्यांची बारा कोष्टकांत (Twelve tables) व्यवस्थित मांडणी करण्यांत आली व ते बारा बांझपटावर कोरण्यांत येऊन जाहीर करण्यांत आले (इ. स. पू. ४५०). पट्रिशन्झ व प्लीबीयन्स हे वर्ग एकमेकांपासून भिन्न असून त्यांच्या मध्यें लग्नसंबंध होत नसत. पण या बाबतींतही कायदा करण्यांत येऊन असा लग्नसंबंध झाल्यास ती गोष्ट कायदेशीर आहे असें ठरविण्यांत आलें. त्यामुळें रोमन समाज एकजीव होण्यास मदत झाली.

लोकसभा (असेंब्ली) व सीनेट—लोकसभा ही सर्व नागरिकांची सभा होती व तिच्याकडून राज्यकारभार करणारे अधिकारी नेमले जात व कायदे करण्यांत येत. नागरिकांचे त्यांच्या मालमत्तेवरून पांच विभाग केलेले असत व या विभागांचें लोकसभेमध्यें वेगवेगळें मत घेतलें जाई. त्यामुळें लोकसभेमध्यें समाजांतील संपत्तिमान व मध्यम स्थितींतील नागरिकांचें अधिक महत्त्व असे. सीनेट ही मोठमोठ्या सरदारांची सभा होती व ती राज्यांतील प्रमुख अधिकाऱ्यांस सल्ला देई. राज्यांतील प्रमुख अधिकाऱ्यांस आपल्या अधिकाराची मुदत संपल्यावर सीनेटचे सभासद नेमण्यांत येई. त्यामुळें ज्यांस राज्यकारभाराचा

अनुभव आहे अशा लोकांचा, त्याचप्रमाणें समाजांतील वजनदार व श्रीमंत लोकांचा सीनेटमध्यें भरणा होई, व तिचें महत्त्व वाढे.

राज्यांतील अधिकारी—राज्यांतील प्रमुख सत्ता दोन अधिकाऱ्यांकडे असून त्यांस **कॉंसल** असें म्हणत. या दोघांस सारखेच अधिकार असून, परराष्ट्रीय धोरण, सैन्य व राज्यकारभार या बाबींचा कारभार ते पहात. सीनेटच्या अनुमतीनें लोकसभेकडून (असेंब्ली) त्यांची निवडणूक होई व त्यांची मुदत एक वर्षाची असे. आणीबाणीची स्थिति प्राप्त झाली म्हणजे एक **सर्वाधिकारी** नेमीत. त्याची मुदत सहा महिने असे. खजिना, सार्वजनिक रस्ते, बाजारपेठा, पाणीपुरवठा, खानेसुमारी, कोणते कर बसवावयाचे तें सुचविणें, न्यायाधिशाचें काम करणें वगैरे वेगवेगळ्या कामाच्या अधिकाऱ्यांच्या नेमणूका असेंब्लीकडून (लोकसभा) करण्यांत येत. प्लीबीयन लोकांवर अन्याय होतो कीं काय हे पहाण्यासाठीं व त्यांचें हितरक्षण करण्यासाठीं **ट्रिब्यून** हा अधिकारी नेमण्यांत येई.

रोमची लष्करी सज्जता—रोमचें राज्य लोकसत्ताक झाल्यावर टायबर नदीच्या उत्तरेकडे असलेल्या इट्रस्कन्स लोकांच्या नगरराज्याशीं रोमचे वारंवार तंटे व युद्धप्रसंग होत. त्याचप्रमाणें पूर्वेकडील डोंगराळ प्रदेशांत राहणाऱ्या सॅबिन्स या वन्य जमातींच्या मधून मधून होणाऱ्या हल्ल्यापासूनही त्यांस आपलें संरक्षण करावें लागे. त्यामुळें रोमन लोकांस नेहमीं युद्धाच्या तयारींत रहावे लागे. तेव्हां त्यांनीं आपल्या सैन्यांतील शिपायास ढाल, तलवार, भाला, बरची, चिलखत, शिरस्त्राण वगैरे हल्ला करण्यास व संरक्षण करण्यास उपयोगीं पडतील अशीं आयुधें पुरवून आपलें सैन्य सज्ज ठेविलें होतें. हें सर्व सैन्य रोमच्या नागरिकांचेंच बनलेलें असून आपल्या शहराच्या अभिमानानें प्रेरित झालें असल्यामुळें प्रबळ झालें होतें. अशी स्थिति असतां इ.स. पू. ३९० च्या सुमारांस उत्तरेकडून रोमवर निराळेंच संकट आलें.

गॉल लोकांची रोमवर स्वारी (इ. स. पू. ३९०)—इ. स. पू. ५०० च्या सुमारास गॉल लोकांनीं आल्पस् पर्वत ओलांडून आल्पसच्या दक्षिणेकडील प्रदेशांत वस्ती केली होती. हे लोक केल्ट वंशाचे असून त्यांचे पूर्वज व इटलीमध्यें स्थाइक झालेले लॅटिन्स यांचे पूर्वज एकाच आर्य मानववंशाचे होते. आल्प्स पर्वताच्या दक्षिण भागांत सुमारें शंभर वर्षे राहिल्यावर ते दक्षिणेकडे सरकले

व तेथें रहात असलेल्या इट्रस्कन्झ लोकांच्या प्रदेशावर त्यांनीं स्वारी केली. त्यांच्यापुढें इट्रस्कन्झ लोकांचें कांहीं चाललें नाहीं व इट्रस्कन्झ लोकांवर त्यांनीं आपलें वर्चस्व बसविलें. यानंतर त्यांनीं रोमवर हल्ला केला. रोम शहरास तटबंदी केलेली होती व रोमनें आपलें सैन्यही जय्यत तयार ठेविलें होतें. तरी गॉल लोकांच्या हल्ल्यामुळें रोमची तटबंदी उध्वस्त झाली व रोमचें संरक्षण करितांना पुष्कळ रोमन सैनिक मृत्युमुखीं पडले. गॉल लोकांच्या सैन्याचीही बरीच हानी झाली होती. तेव्हां रोमन लोकांनीं बरीच खंडणी देण्याचें कबूल केल्यामुळें गॉल लोकांनीं खंडणी घेऊन रोमचा वेढा उठविला व ते परत उत्तरेकडे गेले. गॉल लोकांच्या स्वारीमुळें इट्रस्कन्झ लोकांची सत्ता बरीच कमकुवत होऊन त्यांचें महत्त्व बरेंच कमी झालें होतें. गॉल लोकांच्या हल्ल्यामुळें रोम शहराची उध्वस्त झालेल्या तटबंदीची डागडुजी करण्यांत आली व रोमचें सैन्यहि शस्त्रास्त्रांनीं युक्त व प्रबळ करून जय्यत तयार ठेवण्यांत आलें.

रोमच्या नेतृत्वाखालीं लेशिअम—(इ. स. पू. ३३८ ते इ. स. पू. ३३६) लेशिअममध्यें रोम या नगरराज्याप्रमाणें लॅटिन्स लोकांचीं अनेक नगरराज्यें होतीं. या राज्यांस पूर्वेकडील डोंगराळ मुलखांत राहणाऱ्या सॅबिन्स, सॅमनाइटस, व्होल्स्की या वन्य जमातींच्या हल्ल्यांपासून बरीच भीति वाटे. राजकीयदृष्ट्या या नगरराज्यांतील लोक व रोमच्या नगरराज्यांतील लोक वेगवेगळे असले तरी वांशिक व सांस्कृतिक दृष्टीनें ते एकच असल्यामुळें त्यांस एकमेकांविषयीं आपलेपणा वाटून वन्य टोळ्यांकडून हल्ला झाल्यास एकमेकांस मदत करण्याची भावना त्यांच्यांत निर्माण झालेली होती. तरी रोम व हीं नगरराज्यें यांच्यामध्यें तंटेबखेडे होऊन युद्धप्रसंग होत. इ. स. पू. ३३८–३६ च्या दरम्यान रोम व हीं नगरराज्यें यांच्यामध्यें तंटेबखेडे होऊन युद्ध झालें. पण रोमचें सैन्य प्रबळ असल्यामुळें रोमनें त्यांचा पराभव केला व त्यांच्यावर आपलें वर्चस्व बसविलें. पण रोमनें त्यांच्याशीं जित व जेता ही भावना न ठेवतां त्यांस पुष्कळच सवलती दिल्या व रोमच्या नागरिकत्वाचे हक्क दिले. त्यामुळें हीं नगरराज्यें व रोम यांच्यामध्यें मित्रत्वाचे व आपलेपणाचे संबंध उत्पन्न होऊन युद्धाच्या वेळीं या नगरराज्यांकडून रोमच्या सैन्यांत सैनिकांचा पुरवठा होऊं लागला.

सॅमनाइटस लोकांविरुद्ध युद्ध (इ. स. पू. ३२५–इ. स. पू. २९०) लेशिअमच्या पूर्वेस असलेल्या अपेनाइन पर्वताच्या डोंगराळ प्रदेशांत सॅमनाइटस

या वन्य जमाती रहात होत्या. यांपैकीं कांहीं पायथ्याच्या सखल प्रदेशांत राहून सुधारत होत्या. या टोळ्यांपैकीं कांहीं लोक दक्षिणेकडे ग्रीक लोकांनीं स्थापन केलेल्या नगरराज्यांत जाऊन भाडोत्री सैनिक म्हणून काम करीत. पण पुष्कळ टोळ्या डोंगराळ भागांत रहात असून त्यांच्यापासून रोम नगरराज्यास त्याचप्रमाणें लेशिअममधील इतर नगरराज्यांस उपद्रव होई. तेव्हां त्यांच्यावर स्वारी करून त्यांस आपलें अंकित करण्याचें रोमनें ठरविलें. या वन्य टोळ्या लढवय्या असल्यामुळें रोमचें सैन्य प्रबल होतें तरी त्यांस पूर्णपणें अंकित करण्यास रोमला त्यांच्याशीं ३५ वर्षें युद्ध करावें लागलें. त्यांचा पराभव केल्यावर रोमनें त्यांच्यावर डोईजड अटी न लादतां त्यांस पुष्कळ सवलती दिल्या. त्यामुळें या सर्व वन्य टोळ्या रोमच्या मित्रच बनल्या.

इट्रस्कन्झ लोकांवर रोमचें वर्चस्व (इ. स. पू.–२९० इ. स. पू. २८०)—गॉल लोकांच्या स्वारीमुळें इट्रस्कन्झ लोकांचीं नगरराज्यें कमकुवत झालीं होतीं. तेव्हां रोमनें इ. स. पू. २९०–२८० च्या दरम्यान त्यांच्यावर स्वारी करून त्यांचा पराभव केला व त्यांच्याशीं मैत्रीचा तह करून त्यांस आपलेसें केलें.

दक्षिण इटलींतील ग्रीक वसाहतींवर रोमचें वर्चस्व—दक्षिण इटली व सिसली यांमध्यें ग्रीक लोकांचीं अनेक नगरराज्यें स्थापन झालेलीं होतीं. राजकीयदृष्ट्या हीं नगरराज्यें एकमेकांपासून स्वतंत्र असून त्यांचे आपसांत तंटे होऊन युद्धप्रसंगही होत. त्यांच्यांत एकजूट झाली नाहीं. इटलीच्या दक्षिण भागांत असलेल्या टॅरेंटम व थ्यूरी या ग्रीक नगरराज्यांत तंटा उपस्थित झाला व थ्यूरीनें रोमची मदत मागितली. तेव्हां टॅरेंटम या नगरराज्यानें ग्रीक द्वीपकल्पांतील एपिरस या नगरराज्याचा राजा **पायऱ्हस** यास आपल्या मदतीस बोलाविलें. पायऱ्हस हा महत्त्वाकांक्षी होता व दक्षिण इटलीमधील नगरराज्यांच्या राजकारणांत हात घालण्यास ही संधि चांगली आहे हें पाहून आपलें लढाऊ सैन्य व हत्तींचें पथक घेऊन तो तात्काळ दक्षिण इटलींत आला. थ्यूरीसला मदत करण्यासाठीं रोमनें आपलें सैन्य पाठविलें होतें; पण रोमच्या सैन्याचा पराभव झाला. तेव्हां रोमच्या सैन्यास उत्तरेकडे माघार घ्यावी लागली. पण यानंतर रोमन सैन्याचा पाठलाग करून रोमवर स्वारी करण्याऐवजीं इटलीच्या दक्षिणेकडील सिसली बेट हस्तगत करण्यासाठीं पायऱ्हस दक्षिणेकडे गेला.

सिसली बेटाच्या पूर्व भागांत सॅराक्यूज हें ग्रीक नगरराज्य होतें, तरी पश्चिमेकडील तीन चतुर्थांश भाग कार्थेजच्या (फिनीशियन लोकांचें आफ्रिकेच्या उत्तर टोकांवरील नगरराज्य) वर्चस्वाखालीं होता. पायऱ्हसची सत्ता सिसलीमध्यें स्थापन झाल्यास त्यापासून आपणांस रोमच्या सत्तेपेक्षां अधिक धोका आहे हें पाहून कार्थेजनें पायऱ्हसशीं युद्ध करण्याचें ठरविलें व उत्तरेकडून रोमनेंही पायऱ्हसवर स्वारी करावी म्हणून रोमचें मन वळविलें. कार्थेजचें आरमार प्रबळ असल्यामुळें त्यानें पायऱ्हसच्या आरमाराचा पराभव केला. तेव्हां त्यास इटलीमध्यें जावें लागलें. तेथें आल्यावर रोमच्या सैन्यानेंहि त्याचा पराभव केला; तेव्हां त्यास माघार घ्यावी लागून तो एपिरसला परत गेला. तेव्हां टॅरेंटम या ग्रीक नगरराज्यानें रोमचें मांडलिकत्व पतकरलें. त्याचप्रमाणें दक्षिण इटलींतील इतर ग्रीक नगरराज्यांनींही रोमचें मांडलिकत्व पतकरल्यामुळें बहुतेक सर्व इटली रोमच्या वर्चस्वाखालीं आला (इ. स. पू. २७०).

जिंकलेल्या प्रदेशासंबंधीं रोमचें धोरण—जिंकलेल्या प्रदेशासंबंधीं व तेथील नगरराज्यांसंबंधीं रोमचें धोरण उदार व मुत्सद्देगिरीचें असे. जिंकलेलीं नगरराज्यें खालसा न करितां रोम त्यांच्याकडून वार्षिक खंडणी घेई व त्यांस आपलें मांडलिक बनवी. त्यांच्या अंतस्थ बाबतींत रोम ढवळाढवळ करीत नसे. त्यांस आपल्या रीतिरिवाजाप्रमाणें व कायद्यांप्रमाणें राज्यकारभार करण्याची मुभा असे. या नगरराज्यांच्या जमीनीपैकीं जी थोडी जमीन रोमकडे येई तेथें रोम आपलें ठाणें स्थापन करी. या ठाण्यांत जाऊन तेथें वसाहत करण्यासाठीं रोमकडून आपल्या वाढत्या लोकसंख्येस उत्तेजन दिले जाई व तेथें वसाहत करणारांस तेथील जमीन वांटून टाकण्यांत येई. रोमपासून या रोमन ठाण्याकडे जाणें सुलभ व्हावें म्हणून तिकडे जाणारे रस्ते बांधण्यांत येत. जीं मांडलीक नगरराज्यें रोमशीं निष्ठापूर्वक व मैत्रीनें वागत त्यांस अधिक सवलती दिल्या जात. त्यामुळें या नगरराज्यांस रोमबद्दल आपलेपणा वाटून रोमवर आलेलें संकट तें आपल्यावरच आलेलें संकट आहे असें वाटून युद्धाच्या वेळीं या दूरदूरच्या नगरराज्यांकडून रोमच्या सैन्यास नागरिकत्वाच्या भावनेनें लढणारे सैनिकहि मिळत. त्याचप्रमाणें ठिकठिकाणीं स्थापन झालेल्या रोमन ठाण्यांमुळें रोमन रीतिरिवाज, लॅटिन भाषा, रोमन कलाकौशल्य यांचा प्रसार होण्यासही मदत होई.

कार्थेजशीं युद्धें (प्यूनिक-फिनीशियन-युद्धें)—इ. स. पू. २६४ ते इ. स. पू. १४६.

कार्थेज व रोम यांमधील स्पर्धा—भूमध्य समुद्राच्या पूर्व किनाऱ्यावर फिनीशियन लोकांचीं अनेक व्यापारीं ठाणीं प्राचीन काळापासून होतीं. पण इ. स. पू. ६ व्या शतकांत बॅबिलोनियाच्या सम्राटानें त्यांवर आपलें वर्चस्व बसविल्यामुळें आफ्रिकेच्या उत्तरेकडील टोकांवर इ. स. पू. ८१४ मध्यें स्थापन झालेल्या **कार्थेज** या फिनीशियन लोकांच्या नगरराज्याचा भूमध्य समुद्राच्या पूर्व किनाऱ्यावरील आपल्या ठाण्यांचा संबंध सुटला व फिनीशियन लोकांचें कार्थेज हें एक प्रमुख स्वतंत्र नगरराज्य राहून त्याची झपाट्यानें भरभराट होत गेली. फिनीशियन लोकांच्या सिसली, सार्डिनिया, कॉर्सिका, स्पेनचा पूर्व किनारा या ठिकाणीं स्थापन झालेल्या वसाहतींहीं कार्थेजच्या वर्चस्वाखालीं आल्या. भूमध्य समुद्रांतून व्यापार करण्यासाठीं दूरदूरच्या ठिकाणीं कार्थेजचीं गलबतें जात व व्यापारामुळें कार्थेज हें खूपच श्रीमंत असें नगरराज्य झालें. व्यापाराच्या रक्षणासाठीं कार्थेजनें आपलें आरमारहि प्रबळ केलें, त्याचप्रमाणें सैन्यही खूप वाढविलें. सैन्यांत व आरमारांत कार्थेजचे नागरिक नसलेल्या अशा भाडोत्री सैनिकांचा व खलाशांचा भरणा अधिक असे, पण आरमारावरचे प्रमुख अधिकारी व सेनापति हे कार्थेजचे नागरिक असून ते घरंदाज व श्रीमान घराण्यांतील असत. कार्थेजच्या नगरराज्यांतील प्रमुख सत्ता कांहीं थोड्या धनाढ्य घराण्यांकडे असे. व्यापारामुळें कार्थेजचें वैभव पुष्कळ वाढलें. ग्रीस, इजियन समुद्र, आशिया मायनरचा किनारा येथील नगरराज्यें व्यापारामध्यें भाग घेत, पण त्यांच्या चढाओढीची कार्थेजला भीति वाटत नव्हती. पण रोम या नगरराज्याचें सर्व इटलीवर वर्चस्व स्थापन होऊन रोमनें व्यापारांतहि लक्ष घातल्यामुळें आपल्या व्यापारी व आरमारी वर्चस्वास रोमपासून धोका येण्याची भीति कार्थेजला वाटूं लागली. तेव्हां रोम व कार्थेज या दोन प्रमुख सत्तांमध्यें थोडेसें निमित्तकारण सांपडतांच संघर्ष उत्पन्न होणार हें दिसूं लागलें. हें निमित्तकारण लवकरच उत्पन्न झालें व या दोन राज्यांमध्यें वितुष्ट उत्पन्न होऊन तें इ. स. पू. २६४ पासून इ. स. पू. १४६ पर्यंत टिकलें व तीन युद्धें झालीं. रोम व कार्थेज यांमध्यें झालेल्या युद्धांस 'प्यूनिक युद्धें' (फिनीशियन लोकांस लॅटिन भाषेंत प्यूनिक असें म्हणत) असें म्हणण्यांत येतें. या युद्धांच्या शेवटीं कार्थेजचा पाडाव

होऊन भूमध्य समुद्राच्या पश्चिम भागावर व त्या लगतच्या प्रदेशावर रोमची सत्ता स्थापन झाली.

पहिलें प्यूनिक युद्ध (इ. स. पू. २६४ ते इ. स. पू. २४१)— पायऱ्हसचा पराभव केल्यावर कार्थेजनें सिसली बेटाचा बहुतेक भाग आपल्या वर्चस्वाखालीं आणला व इटली व सिसली यामधील समुद्रधुनीजवळ मेसेना येथें आपलें सैन्य ठेविलें. तेव्हां रोमनें कार्थेजला विरोध करण्याचें ठरविलें. कार्थेजशीं युद्ध करावयाचें तर चांगलें आरमार असणें जरूर आहे म्हणून दक्षिण इटलींतील ग्रीक दर्यावर्दी लोकांच्या मदतीनें रोमनें आपलें आरमार प्रबल केलें. यानंतर इ. स. पू. २६० मध्यें मायलेजवळील कार्थेजच्या आरमारावर हल्ला करून त्याचा पराभव केला. यानंतर बरींच वर्षें हें युद्ध रेंगाळत चाललें. तेव्हां कार्थेजला रोमशीं तह करावा लागला (इ. स. पू. २४१). या तहानें रोमला सिसली बेट व मोठी खंडणी मिळाली.

दुसरें प्यूनिक युद्ध (इ. स. पू. २१८ ते इ. स. पू. २०१)—रोम व कार्थेज यांच्यामध्यें तह झाला होता तरी युद्धाचीं कारणें नष्ट झालीं नव्हतीं व दोन्हीं राज्यें युद्धाची तयारी करून योग्य संधीची वाट पहात होतीं. **हॅनिबल** (Hannibal) हा कार्थेजचा प्रमुख सेनापति होता. त्यानें इ. स. पू. २१९ मध्यें स्पेनच्या पूर्व किनाऱ्यावरील रोमशीं मैत्री असलेल्या सॅगनटम या नगरराज्यावर स्वारी करून तें आपल्या वर्चस्वाखालीं आणलें. तेव्हां रोमनें कार्थेजविरुद्ध युद्ध पुकारलें. हॅनिबल यानें स्पेनमध्यें मोठें सैन्य उभारलें व फ्रान्स व स्वित्झर्लंडमार्गें आल्प्स पर्वत ओलांडून तो मोठ्या सैन्यानिशीं इटलीमध्यें आला. या मार्गानें येत असतां त्याचें कांहीं सैन्य वाटेंत मृत्यूमुखीं पडलें तरी त्यानें इ. स. पू. २१६ मध्यें इटलीच्या पूर्व किनाऱ्याजवळ **कॅनी** (Cannae) येथें रोमन सैन्यावर मोठा विजय मिळविला. पण यानंतर रोमन सेनापतीनें त्यास खुल्या मैदानावर तोंड देण्याऐवजीं गनिमी काव्यानें लढण्याचें ठरविलें. तेव्हां हें युद्ध बरेंच दिवस रेंगाळत चाललें. इकडे रोमनें **स्किपो** याच्या नेतृत्वाखालीं खुद्द कार्थेजवर स्वारी करण्यासाठी सैन्य पाठविलें होतें. त्या सैन्यानें पहिल्यानें स्पेनमध्यें जाऊन कार्थेजची तेथील वसाहत काबीज केली, व तेथून पुढें कार्थेजवर स्वारी केली. तेव्हां कार्थेजनें रोमशीं तह करून हॅनिबलला परत बोलाविलें. हॅनिबल कार्थेजला गेला, पण तेथें गेल्यावर त्यानें तेथील अधिकाऱ्यांचें मन वळवून रोमशीं पुनः युद्ध सुरू

केलें. पण स्किपो यानें **झामा** येथें त्याचा पराभव केला (इ. स. पू. २०१). तेव्हां कार्थेजला रोमशीं तह करावा लागला. या तहानें रोमला मोठी खंडणी मिळाली, स्पेनमधील प्रदेश मिळाला व कार्थेजचीं लढाऊ जहाजेंही मिळालीं.

तिसरें प्यूनिक युद्ध (इ. स. पू. १४९ ते इ. स. पू. १४६)—२ ऱ्या प्यूनिक युद्धानें कार्थेजची लष्करी व आरमारी सत्ता व राजकीय महत्व कमी झालें होतें पण व्यापार व शेतीचें उत्पादन या बाबतींत रोमशीं स्पर्धा सुरू होती तेव्हां कार्थेजचें व्यापारी श्रेष्ठत्व नाहींसें करावें या हेतूनें रोममधील **कॅटो** या राजकारणी गृहस्थाच्या प्रोत्साहनानें 'पूर्वी झालेल्या तहांतील अट कार्थेजनें मोडली' हें निमित्तकारण पुढें करून कार्थेजचा पूर्ण पाडाव करण्यासाठीं रोमनें आपलें सैन्य कार्थेजवर पाठविलें. कार्थेजची लष्करी व आरमारी सत्ता कमी झाली होती तरी कार्थेजनें दोन वर्षेपर्यंत रोमन सैन्याविरुद्ध टिकाव धरिला, पण शेवटीं कार्थेजचा पाडाव झाला (इ. स. पू. १४६). रोमन लोकांनीं कार्थेज या नगरराज्याचा उच्छेद करून त्यावर नांगर फिरविला व तेथें राहिलेल्या लोकांस गुलाम म्हणून विकलें. अशारीतीनें फिनीशियन लोकांचें वैभवशाली नगरराज्य व प्रमुख व्यापारी ठाणें नष्ट झालें.

प्यूनिक युद्धाचे परिणाम—लष्करी व आरमारी या दोन्हीं बाबतींत रोमची सत्ता प्रबळ झाली. भूमध्य समुद्राच्या पश्चिम भागांतील बेटें व आफ्रिकेच्या वायव्य किनाऱ्यावरील प्रदेश रोमच्या वर्चस्वाखालीं आला. सिसली व दक्षिण इटली येथील कांहीं ग्रीक नगरराज्यांनीं प्युनिक युद्धाच्या वेळीं कार्थेजला मदत केली होती. तेव्हां त्या नगरराज्यांतील ग्रीक संस्कृतीच्या व कलाकौशल्याच्या वस्तू जप्त करून त्या रोमला पाठविण्यांत आल्या. रोममध्यें आर्थिक विषमता वाढून वर्गकलह सुरू झाले.

पूर्व भूमध्य समुद्रालगतच्या प्रदेशांवर रोमचें वर्चस्व—अलेक्झांडरच्या मृत्यूनंतर (इ. स. पू. ३२३) त्याचें विस्तृत साम्राज्य त्याच्या सरदारांनीं आपसांत विभागून तेथें आपली सत्ता स्थापन केली होती. मॉसिडोनिया व ग्रीस यावर लीसीमॅचसनें आपलें वर्चस्व बसविलें होतें. टॉलेमीकडे इजिप्त हा प्रदेश आला होता व सील्यूकस यानें सीरिया, मेसापोटेमिया व इराण हे प्रदेश आपणाकडे घेतले होते. यास्तेरीज आणखी लहान लहान राज्यें ठिकठिकाणीं निर्माण

झालीं होतीं, त्यांपैकीं आशियामायनरमधील पेरगॅमम व काळ्या समुद्राजवळच्या प्रदेशांतील पाँटस हीं प्रमुख होतीं. इ. स. पू. १७० च्या सुमारांस सॅसानीड घराण्याच्या नेतृत्वाखालीं इराणनें ग्रीक लोकांच्या वर्चस्वापासून आपली मुक्तता केली व इराणी लोकांचें स्वतंत्र राज्य स्थापन केलें व इराणच्या प्राचीन झोरोस्ट्रियन धर्मास प्रोत्साहन दिलें. रोमचें भूमध्य समुद्राच्या पूर्व किनाऱ्यालगतच्या प्रदेशांतील घडामोडींकडे लक्ष होतें व त्या भागावरही रोमचें वर्चस्व स्थापन करावें म्हणून स्किपो या सेनापतीच्या नेतृत्वाखालीं तिकडे सैन्य पाठविलें.

स्किपो यानें मॅसिडोनियाचा राजा ५ वा फिलीप याचा इ. स. पू. १९७ मध्यें सायनॉससेफेली येथें पराभव केला, तेव्हां फिलीपनें रोमचें मांडलिक म्हणून रोमशीं तह केला. तेव्हां ग्रीसमधील नगरराज्यें मॅसिडोनियाच्या वर्चस्वापासून मुक्त होऊन रोमचीं मांडलिक बनलीं. यानंतर स्किपो यानें सीरियाचा राजा **अँटिओचस** याचा पराभव करून (इ. स. पू. १९०) त्यास रोमचा मांडलिक केलें. अशी स्थिति असतां इ. स. पू. १४८ च्या सुमारास ग्रीसच्या बाजूस बंडाळी माजल्यामुळें रोमनें मॅसिडोनियाच्या राजास पदच्युत केलें व बंडाळी केल्यामुळें ग्रीसमधील नगरराज्येंहि खालसा करून तो सर्व प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणला (इ. स. पू. १४६). यानंतर आशियामायनर व सीरिया येथील राजांस पदच्यूत करून तो प्रदेशही खालसा केला व तेथें आपले प्रांताधिकारी नेमले (इ. स. पू. ७० च्या सुमारास).

इटलीमधील राजकीय, सामाजिक व आर्थिक स्थिति—भूमध्यसमुद्राच्या भोंवतालच्या बऱ्याच प्रदेशांवर रोमचें वर्चस्व स्थापन होऊन रोमची सत्ता वाढत असतां इटलीमधील रोमन लोकांच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक बाबींमध्यें महत्त्वाचे बदल होत होते.

(१) **राजकीय स्थिति**—रोम हें लोकसत्ताक राज्य होतें. या राज्याचा सुरवातीचा विस्तार रोम व रोमच्या भोंवतालच्या सुमारें १०० चौरस मैलांचा प्रदेश (पंचक्रोशींतील प्रदेश) एवढ्याच भागावर होता व तेथें असलेले लॅटिन जमातीचे लोक रोमचे नागरिक होते. यानंतर लेशिअम प्रदेशांतील इतर लॅटिन जमातीचीं नगरराज्यें रोमच्या वर्चस्वाखालीं आल्यावर तेथील नागरिकांसहि रोमच्या नागरिकत्वाचे हक्क देण्यांत आले. नंतर इटलीमधील सर्व लोकांस

(गुलाम व ज्यांची ठराविक मालमत्ता नाहीं अशांस वगळून) रोमन नागरिकत्वाचे अधिकार देण्यांत आले (इ. स. पू. ८८). पुढे ज्यूलीअस सीझर हा सर्वाधिकारी असतां इटलीच्या बाहेरील रोमच्या वर्चस्वाखालीं असलेल्या प्रदेशांतील वेगवेगळ्या जमातींतील लोकांसही रोमन नागरिकत्वाचे अधिकार मिळाले. अशा रीतीनें रोमन नागरिकत्वाचा हक्क पुष्कळ लोकांस मिळाला होता, तरी त्यावेळीं ह्ल्लींच्याप्रमाणें असेंब्लीच्या सभेसाठीं निवडणूक करून आपले प्रतिनिधी पाठविण्याची पद्धत नव्हती तर सर्व नागरिकांस रोमला प्रत्यक्ष हजर रहावें लागे. तसेंच प्रवासाचीं साधनेंही ह्ल्लींच्याप्रमाणें नसल्यानें खुद्द रोममध्यें राहणाऱ्या नागरिकांखेरीज इतरांस हा हक्क बजावणें व असेंब्लीच्या (लोकसभा) बैठकीस हजर रहाणें शक्य नव्हतें. तसेंच लोकसभेमध्यें (असेंब्ली) मालमत्तेवर आधारलेले असे निरनिराळे विभाग असून प्रत्येक विभागाचें निरनिराळें मत घेण्याची पद्धत होती व त्यामुळें समाजांतील सांपत्तिक बाबतींत गरीब असलेल्या वर्गाचा लोकसभेवर कांहींच परिणाम होत नसे. राज्याचे प्रमुख अधिकारी कॉन्सल हे दोन असून त्यांची मुदत एका वर्षाची असे व त्यांच्यामध्यें राज्यकारभाराच्या धोरणासंबंधीं एकमत न झाल्यास त्यांस सीनेटच्या सल्ल्यावर अवलंबून रहावें लागे. या सीनटचे सुमारे ८०० सभासद असून त्यांची मुदत तहहयात असे व त्यांमध्यें श्रीमान् व घरंदाज, त्याचप्रमाणें राज्यकारभाराचा अनुभव असलेल्या अशा सेवानिवृत्त लोकांचा भरणा असल्यामुळें राज्यकारभारांच्या कामांत सीनेटचें महत्त्व विशेष वाढलें होतें.

(२) सामाजिक व आर्थिक स्थिति—रोममधील सामान्य शेतकऱ्यांस सैनिक म्हणून सैन्यांत सामील होऊन रोमचें रक्षण करावें लागे. पण पुढें रोमचा विस्तार वाढत गेल्यावर दूरदूरच्या ठिकाणीं अनेक वर्षें त्यांस जावें लागल्यामुळें त्यांचें शेतीकडे दुर्लक्ष होई व त्या पडीक राहून त्यांची सांपत्तिक स्थिति पुष्कळच कष्टप्रद होई. मोठमोठे सरदार व जमीनदार यांचें सीनेटमध्यें वजन असून त्या सभेमार्फत त्यांस सैन्यांतील अधिकाराच्या जागा, सैन्यास माल पुरविणारें कंत्राटदार, दूरदूरच्या प्रदेशांवरील प्रांताधिकारी, तेथील लोकांकडून कर वसूल करणारे मक्तेदार, वगैरे किफाइतशीर जागांवर आपली नेमणूक करून घेणें शक्य होतें. त्यामुळें त्यांची सांपत्तिक स्थिति व समाजांतील त्यांचा दर्जा खूपच वाढे. हे मोठमोठे सरदार व जमीनदार खुप गबर होत जाऊन पुष्कळ गुलाम विकत

घेत व त्यांच्याकडून आपल्या मालकीच्या जमिनींवर शेती करवीत. त्यामुळें रोमचे नागरिक असलेल्या गरीब शेतकऱ्यांस व शेतावरील कुळांस कामधंदाहि मिळणें कठीण होई. त्यामुळें त्यांची सांपत्तिक स्थिति खूप खालावे व त्यांस आपल्या जमिनी विकाव्या लागत. अशाप्रकारें समाजांत आर्थिक विषमता खूप वाढूं लागली. समाजांतील गबर झालेले वरिष्ठ वर्गांचे लोक ऐषआरामी, चैनी व व्यसनी बनत चालले व ख्यालीखुशालीनें आपले दिवस घालवूं लागले. त्यामुळें सामाजिक नीतिमत्ताहि कमी होऊं लागली. लोकांचे करमणुकीचे प्रकारही क्रूर व निर्दय होऊं लागले. सिंह, वाघ, लांडगे वगैरे रानटी पशू पकडून त्यांच्या टकरी लावीत. त्याचप्रमाणें युद्धांत पकडलेल्या शत्रूकडील लोकांस या रानटी जनावरांविरुद्ध किंवा एकमेकांविरुद्ध शस्त्रें घेऊन प्राण जाईतोंपर्यंत लढावयास लावीत. अशा प्रकारच्या द्वंद्वास 'ग्लडिएटर द्वंद्वें' असें म्हणत व तीं पहाण्यास लोकांची अतोनात गर्दी जमे. अशा प्रकारच्या ग्लॅडिएटर द्वंद्वाचा प्रकार इ.स.पू. २७५ च्या सुमारास सुरू झाला व तो यानंतर पुष्कळ वर्षें चालूं होता.

रोमचें राज्य विस्तृत होऊन संपत्तीचा ओघ रोमकडे वाहूं लागल्यामुळें सामाजिक विषमता वाढणें, लोक ऐषआरामी व चैनी बनणें वगैरे वाईट गोष्टी रोमच्या लोकसत्ताक राज्यांत होत होत्या तशा कांहीं चांगल्या गोष्टीहि होऊन रोमचें वैभव वाढत गेलें. संपत्तीचा ओघ रोमकडे वाहूं लागल्यामुळें रोम व इटली येथें मोठमोठ्या भव्य, सुंदर व उपयुक्त इमारती बांधण्यांत आल्या. रोम शहरास चांगला पाणीपुरवठा व्हावा म्हणून दूरच्या ठिकाणांहून चुना-विटांनीं बांधलेले नळ घालून पाणी आणविण्यांत आलें. दूरदूरच्या शहरांस जोडणारे मोठे रस्ते बांधण्यांत आले. महत्त्वाच्या शहरांस तटबंदी करण्यांत आली. निरनिराळ्या उद्योगधंद्यांस उत्तेजन मिळूं लागलें. ग्रीक लोक विद्याकलांत पुढारलेले असल्यामुळें ग्रीक भाषेचा अभ्यास करण्याची प्रथा पडून ग्रीक भाषेंतील उत्तमोत्तम ग्रंथांचीं लॅटिन भाषेंत भाषांतरें होऊं लागलीं. विकत घेतलेल्या गुलामांमध्यें कांहीं ग्रीक गुलाम असून ते विद्याव्यासंगी, हुशार व कर्तबगार असल्यामुळें त्यांच्याकडून ग्रीक हस्तलिखित ग्रंथांच्या नकला करविणें, मुलांस शिक्षण देणें, शेतीची व्यवस्था ठेवणें, चिटणिसीचीं व कारकुनाचीं कामें करून घेणें वगैरे गोष्टी श्रीमान् वर्गांतील रोमन लोकांकडून होऊं लागल्यामुळें विद्याकलांचा प्रसारही समाजांत होऊं लागला.

सामाजिक व आर्थिक स्थितीमध्यें सुधारणा करण्याचे प्रयत्न– रोमच्या लोकसत्ताक राज्यांतील सामाजिक विषमता व सामान्य लोकांची खालावलेली आर्थिक स्थिति सुधारणें जरूर आहे असें कांहीं सहृदय व उदार अंत:करणाच्या लोकांस वाटत होतें व त्यांनीं त्यांत सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न चालविला.

टायबीरीयस ग्रॅकस (Tiberius Gracchus)—हा इ. स. पू. १३३ मध्यें ट्रिब्यून म्हणून निवडून आला. त्यानें जमिनीसंबंधीच्या कायद्यांत सुधारणा घडवून आणण्याचें योजिलें. ज्यांच्या हातीं सत्ता होती अशा बऱ्याच खानदानींच्या लोकांनीं आपल्या हातीं असलेल्या सत्तेचा दुरुपयोग करून सार्वजनिक मालकीच्या बऱ्याच जमिनी बळकाविल्या होत्या. तेव्हां त्यानें असें सुचविलें कीं, सुमारें ६५० एकरांपेक्षां अधिक जमीन कोणाच्याही मालकीची असूं नये, व यांपेक्षां जास्त असलेली जमीन सरकारनें आपल्याकडे घेऊन ती ज्यांस जमीन नाहीं अशा गरीब लोकांस मोफत द्यावी व शेती करण्यास आऊतें व इतर जरूर असणाऱ्या गोष्टीं त्यांस कर्जे म्हणून द्याव्यात व शेतीच्या उत्पादनांतुम त्याची सवडीप्रमाणें फेड करून घ्यावी. पण या सुधारणांमुळें ज्यांचें नुकसान होणार होतें अशा धनाढ्य लोकांचे सीनेटमध्यें व लोकसभेमध्यें वजन असल्यामुळें या संबंधाचा कायदा पास झाला नाहीं व या लोकांनीं मारेकरी व गुंड धाडून टायबीरीअस ग्रॅकस याचा खून करविला.

गेयस ग्रॅकस (Gaius Gracchus)—टायबीरीयसचा भाऊ गेयस ग्रॅकस हा इ. स. पू. १२३ च्या सुमारास ट्रिब्यून म्हणून निवडून आला. त्यानें आपल्या भावानें सुचविलेला जमिनीसंबंधाचा कायदा पास करवून घेतला. त्यानें इतरहि कांहीं उपयुक्त सुधारणा केल्या. त्यानें रोमच्या आसपासच्या रस्त्यांची दुरुस्ती केली. गरीब वर्गाच्या लोकांस बाजारभावापेक्षां पुष्कळ कमी किंमतींत सरकारनें धान्य विकत द्यावें अशी योजना आंखली. रोमची वाढती लोकसंख्या कमी करण्यासाठीं त्यानें दूरदूरच्या ठिकाणीं असलेल्या रोमन वसाहतींत वसाहत करण्यासाठीं जाण्यास लोकांस प्रोत्साहन दिलें. गेयस ग्रॅकसच्या या सुधारणांमुळें त्याची लोकप्रियता पुष्कळच वाढली, पण वरच्या वर्गाचे लोक त्याचा द्वेष करूं लागले व त्यांनीं मारेकरी घालून त्याचाही खून करविला.

सत्तेसाठीं स्पर्धा व रोममधील लोकशाहीस उतरती कळा—(इ. स. पू. १२२ ते इ. स. पू. २७)—रोमचें राज्य लोकसत्ताक होतें तरी राज्यांतील खरी सत्ता वरिष्ठ वर्गाच्या लोकांचें ज्यांत वर्चस्व आहे अशा सीनेट सभेकडे होती. तेव्हां मोठीं अमीषें दाखवून सामान्य लोकांस आपल्या बाजूस वळविण्याचे, सैन्याचा पाठिंबा मिळवून त्या जोरावर सीनेटवर दडपण आणून राज्यांतील सत्ता आपल्या हातीं घेण्याचे प्रयत्न धूर्त, कर्तबगार व महत्त्वाकांक्षी अशा लोकांकडून होऊं लागले, व या बाबतींत त्यांच्यांत स्पर्धा निर्माण होऊन तिचें पर्यवसान रोममधील लोकसत्ताक राज्य नष्ट होऊन त्याऐवजीं सम्राटसत्ता व साम्राज्यशाही स्थापन होण्यामध्यें झालें.

मेरिअस व सला (Marius and Sulla)—इ. स. पू. १०७ पासून पुढील दहा-पंधरा वर्षांच्या काळांत मेरिअस व सला हे पुरुष रोमच्या राजकारणांत पुढें येऊन त्यांच्यामध्यें सत्तेसाठीं स्पर्धा सुरू झाली. मेरिअस यानें आफ्रिकेच्या उत्तर किनाऱ्यावरील प्रदेशांत झालेल्या बंडाळीचा मोड केला होता. त्याचप्रमाणें उत्तरेकडील ट्यूटन लोकांचा पराभव करून नांव मिळविलें होतें. सैनिकाप्रमाणें सामान्य लोकांतही तो लोकप्रिय होता. तो सहा वर्षें कॉंसल म्हणून निवडून आला होता. त्याच्यानंतर सला हा कॉन्सल झाला. त्यावेळीं आशियामायनरमधील रोमन प्रदेशावर काळ्या समुद्रालगतच्या प्रदेशावर राज्य करणाऱ्या मिथ्राडेटस यानें स्वारी करून तेथील लोकांची कत्तल केली होती; तेव्हां त्याच्याविरुद्ध सैन्य पाठवून त्याचा मोड करणें जरूर होतें. पण या सैन्याचें आधिपत्य कोणाकडे द्यावें याबद्दल सीनेट व असेंब्ली यांच्यांत मतभेद होता. सला हा त्यावेळीं कॉंसल असल्यामुळें त्याच्याकडे सैन्याचें अधिपत्य देणें योग्य आहे असें सीनेटला वाटत होतें, तर मेरिअस यानें आफ्रिकेंत पराक्रम करून नांव मिळविलें असल्यामुळें त्याच्याकडे सैन्याचें अधिपत्य असावें असें असेंब्लीस वाटत होतें. पण शेवटीं सीनेटनें सला यासच पूर्वेकडे पाठविलें व त्यानें मिथ्राडेटस याचा पराभव केला. सला पूर्वेकडे गेला आहे हें पाहून मेरिअस आफ्रिकेंतून आला व त्यानें मोठें सैन्य जमा करून सीनेटमध्यें आपल्या विरुद्ध असलेल्या पुष्कळ लोकांस ठार केलें व आपली कॉंसल म्हणून निवडणूक करून घेतली. पण यानंतर लवकरच तो मरण पावला. यानंतर मिथ्राडेटसचा पराभव करून सला रोमला परत आला व मेरिअसला पाठिंबा देणाऱ्या लोकांची त्यानें कत्तल

केली व सर्वाधिकारी (डिक्टेटर) म्हणून चार वर्षे राज्यकारभार केला. यानंतर तो मरण पावला (इ. स. पू. ७८).

पाँपी, क्रॅसस व ज्यूलिअस सीझर—यानंतर रोमच्या राजकारणांत पाँपी, क्रॅसस व सीझर (Pompy, Crassus and Caesar) हे पुढें आले. पाँपी व क्रॅसस यांनीं सलाच्या हाताखालीं लष्करी अधिकारी म्हणून काम केलें होतें. हे दोघेही महत्त्वाकांक्षी होते. इ. स. पू. ७० या वर्षी कॉंसल म्हणून त्यांची नेमणूक झाली. यानंतर रोमच्या राजकारणांत पुढें येत असलेला ज्यूलिअस सीझर यासही आपल्याकडे वळवून रोममधील सर्व सत्ता आपल्याकडे घेण्याचा त्यांनीं प्रयत्न चालविला. पाँपीचें सीनेटवर वजन असल्यामुळें इ. स. पू. ५९ मध्यें ज्यूलिअस सीझरची कॉंसल म्हणून नेमणूक झाली. कॉंसल म्हणून मुदत संपल्यावर ज्यूलिअस सीझरची गॉल प्रांताचा (हल्लींचा फ्रान्स) गव्हर्नर म्हणून नेमणूक करण्यांत आली. या जागेवर ज्यूलिअस सीझर ८ वर्षे होता. गव्हर्नर असतांना सीझरनें गॉल प्रांत पूर्णपणें रोमच्या वर्चस्वाखालीं आणला, व ऱ्हाईन नदीपर्यंत रोमची सत्ता वाढविली. त्यानें ब्रिटन देशावरही स्वारी केली. गॉलचा गव्हर्नर असतांना त्यानें ज्या मोहिमा केल्या त्यांची हकीकत त्यानें लिहून ठेविली. त्याच्या गॉलमधील वास्तव्यांत लॅटिन भाषेचा फ्रान्समध्यें प्रसार झाला व तिचा तेथील भाषेवर परिणाम होऊन फ्रेंच भाषा उद्भवली.

इकडे पाँपी यानें सीनेटकडून आपली तहहयात सर्वाधिकारी म्हणून नेमणूक करून घेतली. गॉलमध्यें असलेल्या ज्यूलिअस सीझरचा पराक्रम व सैन्यामध्यें त्याची वाढत चाललेली लोकप्रियता पाहून आपल्या सत्तेस ज्यूलिअस सीझरकडून धोका येईल असें वाटून पाँपी यांस त्याच्याबद्दल स्पर्धा वाटूं लागली. तेव्हां तो प्रबळ होऊं नये म्हणून गॉलच्या गव्हर्नरच्या जागेवरून त्यास दूर केलें असल्याचें व त्यानें आपलें सैन्य काढून टाकावें असें त्यास कळविण्यांत आलें. तेव्हां काय करावें हा ज्यूलिअस सीझरपुढें प्रश्नच पडला. पण या वेळीं रोमला असणें जरूर आहे असें वाटून तो ससैन्य इटलीकडे येण्यास निघाला. ज्यूलिअस सीझर सैन्य कमी न करतां ससैन्य इटलीकडे येत आहे व आपल्यापेक्षां सीझरची लोकप्रियता अधिक आहे हें पाहून इटलीमध्यें राहणें धोक्याचें आहे असें पाँपीस वाटलें व त्यानें इटली सोडून ग्रीसकडे पळ काढला. तेव्हां त्याचा पाठलाग करण्यासाठीं सीझरही ससैन्य तिकडे गेला. तेव्हां थेसलीमधील फारसालूस

(Pharsalus) येथें इ. स. पू. ४८ या वर्षी त्याची पाँपीच्या सैन्याशीं गांठ पडून पाँपीचा पराभव केला. तेव्हां त्यानें इजिप्तकडे पळ काढला, पण तेथें पाँपीचा खून झाला. टॉलेमी घराण्यांतील इजिप्तचा राजा आपल्या विरुद्ध आहे हें पाहून सीझरही इजिप्तमध्यें गेला व त्यानें इजिप्तच्या राजाचा मोड करून त्याची बहीण क्लिओपाट्रा हिला तेथील राणी केलें. त्याचप्रमाणें आशिया मायनरमधील बंडाळी मोडून तो इ. स. पू. ४६ मध्यें रोमला परत आला. ज्यूलिअस सीझरनें मोठमोठे पराक्रम केले होते, ठिकठिकाणची बंडाळी मोडली होती व सैन्याचेंही त्यास पाठबळ होतें. तेव्हां सीनेटनें त्याची तहहयात सर्वाधिकारी म्हणून नेमणूक केली (इ. स. पू. ४६).

ज्यूलियस सीझरच्या सुधारणा—त्यानें महत्त्वाच्या सुधारणा केल्या. इटलीच्या बाहेरील रोमच्या वर्चस्वाखालीं असलेल्या प्रदेशांतील लोकांस त्यानें रोमन नागरिकत्वाचे हक्क दिले. दूरदूरच्या प्रांतामध्यें कर वसूल करण्यासाठीं मक्ते देण्याची पद्धत त्यानें बंद केली व ते तेथील प्रांताधिकाऱ्यामार्फत वसूल व्हावेत अशी व्यवस्था केली. रोमन सैन्यांत इटलीच्या बाहेरच्या लोकांचाही त्यानें भरणा केला. दूरदूरच्या ठिकाणीं रोमन लोकांच्या वसाहती व ठाणीं स्थापन केलीं. त्यानें इजिप्तमधील वर्षगणनेची पद्धत सुरू केली, व तिला ज्यूलिअन पद्धत असें म्हणण्यांत येऊं लागलें. त्यानें सार्वजनिक बांधकामाचीं कामें काढून गरीब वर्गांतील लोकांस कामधंदा उपलब्ध करून दिला. ठिकठिकाणच्या प्रमुख शहरांची अंतस्थ व्यवस्था पहाण्यास त्यानें रोमच्या धर्तीवर अधिकारी नेमण्यांत यावेत अशी योजना आंखली.

सीझर हा सर्वाधिकारी होता व राज्यांतील सर्व सत्ता त्याच्या हातीं केंद्रित झाली होती. तेव्हां योग्य वेळ येतांच हें नामधारी लोकसत्ताक राज्य नष्ट करून सीझर स्वतःकडे राज्यपद घेईल अशी कांहीं लोकांस भीति वाटूं लागली व ते सीझरविरुद्ध कट रचूं लागले. त्यापैकीं मार्कस ब्रूटस, कॅअस व कॅशिअस हे प्रमुख होते. तेव्हां त्यांनीं कट रचिला व ज्यूलिअस सीझर हा सीनेटच्या सभागृहांत येत असतां इ. स. पू. ४४ मध्यें त्याचा खून झाला.

ऑक्टेव्हिअन सीझर आगस्टस—ज्यूलिअस सीझरनें आपल्या मृत्यूपत्रांत आपला दत्तकपुत्र ऑक्टेव्हिअन (सीझरच्या बहिणीचा नातू) यांस

आपल्या मालमत्तेचें वारस केलें होतें. यावेळीं त्याचें वय १८ वर्षांचेंच होतें. तेव्हां त्यांस पुढें करून सर्व सत्ता आपल्या हातीं घ्यावी अशी **मार्क अँटनी** या कर्तबगार व महत्त्वाकांक्षी गृहस्थाची मनीषा होती. अँटनीनें सीझरचा चिटणीस म्हणून काम केलें होतें व सीझर सर्वाधिकारी असतां कौंसल म्हणूनही काम केलें होतें. त्यानें सीझरनें केलेले पराक्रम, त्याच्या सुधारणा, जनतेच्या कल्याणाविषयीं त्याची कळकळ यांविषयीं लोकमत अनकूल करून घेतलें. तेव्हां सीझरचा दत्तकपुत्र आक्टेव्हिअन व मार्क अँटनी यांची कौंसल म्हणून नेमणूक करण्यांत आली. ही नेमणूक झाल्यावर सीझरच्या विरुद्ध झालेल्या कटांत अंग असल्याच्या संशयावरून सीसरो (Cicero) व इतर ३०० सीनटचे सभासद यांस ठार करण्यांत आले. यानंतर अँटनी व ऑक्टेव्हिअन यांनी रोमच्या विस्तृत पसरलेल्या प्रदेशाचा कारभार आपसांत वांटून घेतला. इटली व पश्चिमेकडील प्रदेशाचा कारभार ऑक्टेव्हियन यांस देण्यांत आला व पूर्वेकडील ग्रीस, आशियांतील प्रदेश व इजिप्त या प्रदेशांचा कारभार अँटनीकडे आला. यानंतर अँटनी इजिप्तमध्यें गेला व तेथें इजिप्तची राणी क्लिओपाट्रा हिच्या प्रेमपाशांत सांपडला. रोमच्या वर्चस्वाखालील सर्व प्रदेशावर आपला एकट्याचाच अधिकार असावा असें त्यास वाटूं लागले. तेव्हां त्यानें पूर्वेकडील प्रदेश जिंकण्यासाठीं आपल्या मदतीस आणखी सैन्य द्यावें म्हणून ऑक्टेव्हिअनकडे मागणी केली, पण ऑक्टेव्हिअननें ती न ऐकल्यामुळें त्याच्यांत वितुष्ट आलें. तेव्हां ऑक्टेव्हिअसनें त्याच्यावर स्वारी केली व इ. स. पू. ३१ या वर्षी ग्रीसच्या पूर्वेस ॲक्टिअमच्या (Actium) लढाईत त्याचा पराभव केला. तेव्हां अँटनीनें आत्महत्या केली. यानंतर क्लिओपाट्रा हिनेंही आत्महत्या केली. तेव्हां इजिप्त हा प्राचीन देश पूर्णपणें रोमच्या वर्चस्वाखालीं आला (इ. स. पू. ३०).

अशा रीतीनें पराक्रम करून व वैभव संपादन करून ऑक्टेव्हिअन इ. स. पू. २७ व्या वर्षी रोमला परत आला, तेव्हां सीनेटनें त्यास '**आगस्टस**' म्हणजे **प्रतापशाली** ही पदवी दिली व त्यानें केलेला पराक्रम व मिळविलेलें वैभव लक्षांत घेऊन त्यास **मुख्य सेनापती** (Imperator) नेमलें, त्यास राज्यांतील **प्रिन्सेप्स** म्हणजे **प्रमुख पद** व सम्राटपद दिलें (इ. स. पू. २७).

रोमचें साम्राज्य

(इ. स. पू. २७ ते इ. स. ४७६)

रोमन साम्राज्य व रोमन सम्राट—ऑक्टेव्हियन यांस कौंसल व ट्रिब्यून म्हणून अधिकार होते. आतां सैन्याचा प्रमुख सेनापती, राज्यांतील प्रमुख पुरुष, व सम्राट म्हणून त्यांस नेमण्यांत आल्यामुळें त्याच्या हातीं सर्व सत्ता केंद्रीभूत झाली; व सिनेट व असेंब्ली यांचे अधिकार नामधारी होऊन रोमचें लोकसत्ताक राज्य नष्ट झालें व **सम्राटाच्या** नेतृत्वाखालीं **रोमचें साम्राज्य** स्थापन झालें. हें साम्राज्य इ. स. पू. २७ पासून इ. स. ४७६ पर्यंत म्हणजे सुमारें ५०० वर्षें (या विस्तृत साम्राज्याच्या पश्चिम विभागांत) टिकलें. राज्यांतील सर्व सत्ता ज्याच्या हातीं केंद्रीभूत झाली होती अशा सम्राटाची नेमणूक कशी व्हावयाची हें ठरलेलें नसे. पहिल्या पहिल्यानें हें सम्राटपद वंशपरंपरा पद्धतीनें मिळण्याची पद्धत सुरू झाली. पण नंतर सम्राटास औरस किंवा दत्तक पुत्र नसल्यास ठिकठिकाणीं असलेल्या सैन्याकडून एखाद्या सेनापतीचें नांव या पदासाठीं पुढें करण्यांत येई व अशीं अनेक नांवें पुढें आल्यास अंतस्थ युद्ध होऊन विजयी सेनापती सम्राट होण्याचा प्रघात पडला. अशा प्रकारें या ५०० वर्षांच्या काळांत अनेक सम्राट होऊन गेले. खुद्द सम्राट याच्या पदाकडे बरीच मालमत्ता असून तिचें उत्पन्न बरेंच येत असल्यामुळें कांहीं कर्तबगार व कर्तव्यदक्ष सम्राटांनीं त्यांतून लोकोपयोगी गोष्टींसाठीं पुष्कळ खर्च केला. पण कांहीं सम्राट स्वार्थी, जुलमी व व्यसनी असल्यामुळें ते आपल्या स्वतःच्या चैनीसाठीं हें उत्पन्न खर्च करीत व लोकांवर जुलूम करीत आणि त्यामुळें साम्राज्यांत अस्वस्थता निर्माण होई.

या ५०० वर्षांच्या काळाचे साधारणतः तीन विभाग पाडण्यांत येतात. (१) इ. स. पू. २७ ते सुमारें इ. स. १८० या काळांत शांतता होती, व रोमन साम्राज्याची व्यापार व उद्योगधंदे या बाबतींत भरभराट झाली. (२) इ. स. १८० ते इ. स. २८० पर्यंतच्या काळांत सम्राटपदासाठीं निरनिराळ्या सेनापतींत युद्धप्रसंग होत गेले. साम्राज्याच्या उत्तरेकडून रानटी लोकांच्या स्वाऱ्या होऊं लागल्या त्यामुळें अस्वस्थता उत्पन्न झाली. (३) इ. स. २८० ते इ. स. ४७६ पर्यंतच्या काळांत विस्तृत झालेल्या रोमन

साम्राज्याचा कारभार व्यवस्थित व्हावा व रानटी टोळ्यांचा प्रतिकार करितां यावा म्हणून साम्राज्याचे दोन विभाग करण्यांत आले.

कांहीं महत्त्वाचे सम्राट

आक्टेव्हिअन ऑगस्टस (इ. स. पू. २७ ते इ. स. १४)— यानें ४१ वर्षें राज्य केलें. त्याच्या कारकीर्दीत भूमध्य समुद्राभोंवतालच्या विस्तृत प्रदेशावर रोमन साम्राज्य पसरलेलें होतें व उत्तरेकडे ऱ्हाइन व डॅन्यूब, पूर्वेकडे काळा समुद्र, युफ्रेटिस नदी व अरबस्थान, दक्षिणेकडे सहाराचें वाळवंट व पश्चिमेकडे अटलांटिक महासागर या रोमन साम्राज्याच्या सीमा होत्या. त्यावेळीं साम्राज्यांत शांतता व सुरक्षितता असल्यामुळें जमिनीवरून व भूमध्य समुद्रामधून मोठ्या प्रमाणांत व्यापार सुरू होता. ऑगस्टस यानें रोम शहरामध्यें व इतरत्र मोठमोठ्या भव्य इमारती, देवालयें, नाट्यगृहें, स्नानगृहें बांधलीं. विद्याकलांस प्रोत्साहन दिलें. त्याच्या वेळीं व्हर्जिल व होरेस हे कवि, लिव्हि हा इतिहासलेखक, स्ट्रबो हा भूगोलज्ञ वगैरे वाङ्मयभक्त प्रसिद्धीस येऊन त्यांनीं लॅटिन भाषेमध्यें चांगली ग्रंथरचना केली. अलेक्झांड्रिया व अथेन्स हीं शहरें विद्यापीठें म्हणून प्रसिद्धीस आलीं. अशा प्रकारें यावेळीं रोमन साम्राज्यांत सर्वत्र समृद्धता असल्यामुळें ऑगस्टस यांच्या कारकीर्दीस ' सुवर्णयुग ' असें म्हणण्यांत येतें.

ऑगस्टस हा रोमन सम्राट असतां रोमन साम्राज्यांतील पॅलेस्टाईन या प्रांतात बेथलेहेम या गांवांत ख्रिस्ती धर्मसंस्थापक येशू ख्रिस्त याचा इ. स. पू. ४ या वर्षी जन्म झाला. त्याच्या मृत्यूनंतर (इ. स. २९) त्याच्या धर्माचा त्याच्या शिष्यांनीं रोमन साम्राज्यांत व इतरत्र प्रसार केला.

नेरो (इ. स. ३७–६८)—नेरो हा व्यसनी व जुलमी होता. पण इ. स. ६४ मध्यें रोम शहरास आग लागून बराच भाग जळून गेल्यावर नेरो यानें त्या ठिकाणीं रुंद असे रस्ते ठेवून मोठमोठ्या भव्य अशा दगडी इमारती बांधिल्या. व एक भव्य राजवाडा बांधला. त्यास ' सुवर्ण-गृह ' असें म्हणत.

व्हेस्पासिअन (इ. स. ६९–७९)—या सम्राटानें नेरोनें बांधलेला भव्य राजवाडा पाडून टाकला व त्या ठिकाणीं भव्य सर्कसगृह बांधलें. या ठिकाणीं ग्लॅडिएटर लोकांचीं एकमेकांशीं किंवा हिंस्र श्वापदांशीं द्वंद्वयुद्धें होत व तीं पाहण्यास लोकांची अतोनात गर्दी जमे.

ट्रॅजन—(इ. स. ११७–१३८) यानें अथेन्समधील झेऊसच्या मंदिराचें बांधकाम पुरें केलें. त्याचप्रमाणें रोममध्यें सर्व देवतांसाठीं पार्थिनॉन नांवाचें एक भव्य वर्तुळाकृति व वर घुमट असलेलें मंदीर बांधलें.

मर्कस अयुरेलिअस (इ. स. १६१–१८०)—हा एक तत्त्वज्ञानी सम्राट होऊन गेला. त्यानें तत्त्वज्ञानासंबंधीं एक ग्रंथ लिहिला. हा कर्तव्यदक्ष सम्राट होता; व त्याची राहणी साधी असे.

डायोक्लेशिअन (इ. स. २८४–३०५)—हा सम्राट होण्यापूर्वी साम्राज्यांत अंदाधुंदी व अस्वस्थता होती ती यानें नाहींशी केली. यानें राज्यकारभाराच्या सोयीसाठीं साम्राज्याचे चार विभाग केले. त्यांवर आपणांस जबाबदार असणारे अधिकारी नेमले व तेथील कारभार त्यांच्याकडे सोंपविला. त्यानें साम्राज्यावर उत्तरेकडून होणाऱ्या रानटी जमातींच्या स्वाऱ्यांचा प्रतिकार करण्याची व्यवस्था केली. त्यास सैन्याचा पाठिंबा होता. त्यानें सीनेटची सत्ता कमी करून आपली सत्ता अनियंत्रित केली.

कॉन्स्टंटाईन (इ. स. ३०६–३३७)—हा एक प्रसिद्ध सम्राट होऊन गेला. ख्रिश्चन धर्मी लोकांचा छळ होत असे तो त्यानें बंद केला व आपल्या कारकीर्दीच्या शेवटीं ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला. त्यामुळें पुढें ख्रिश्चन धर्म हा साम्राज्यांतील एक अधिकृत असा धर्म झाला. त्यानें साम्राज्याचा कारभार व्यवस्थित रीतीनें व्हावा म्हणून साम्राज्याचे पश्चिमेकडील विभाग व पूर्वेकडील विभाग असे दोन विभाग केले; व डार्डानेल्सच्या सामुद्रधुनीवरील बिझॅन्शिअम (Byzantium) हें शहर पूर्वेकडील विभागाची राजधानी केली (इ. स. ३३०). या शहरास कॉन्स्टन्टाइन याच्या नांवावरून कॉन्स्टाटिनोपल असें म्हणण्यांत येऊं लागलें. त्याचें या ठिकाणीं वास्तव्य असल्यामुळें व रोमपेक्षां हें मध्यवर्ती ठिकाण असल्यामुळें या शहराचें महत्त्व वाढलें व तें रोमन साम्राज्याची प्रमुख राजधानी झालें व ग्रीक व रोमन संस्कृतीचें केंद्र बनलें.

रोमन साम्राज्याचे दोन विभाग व पश्चिम रोमन साम्राज्याचा नाश (इ. स. ४७६)—कॉन्स्टाटिनोपल हें राजधानीचें ठिकाण झाल्यावर रोमन साम्राज्याचे पश्चिम व पूर्व असे दोन विभाग होऊन या दोन्ही ठिकाणीं वेगवेगळे सम्राट नेमण्याचा प्रघात इ. स. ३९५ च्या सुमारास सुरू झाला व त्यामुळें या दोन

विभागांची एकमेकांपासून फारकत झाल्यासारखें झालें. अशी परिस्थिति असतां उत्तरेच्या बाजूनें येणाऱ्या वन्य जमातींचा लोंढा पश्चिम रोमन साम्राज्यास आवरता आला नाहीं व साम्राज्याच्या निरनिराळ्या भागांत या वन्य जमाती घुसून त्यांपैकीं एका जमातीचा नेता ओडोआकर यानें इ. स. ४७६ मध्यें पश्चिम रोमन साम्राज्याच्या सम्राटास पदच्युत करून ठार केल्यामुळें पश्चिमेकडील रोमन साम्राज्य लयास गेलें व त्या विभागांत वन्य जमातींचीं राज्यें स्थापन झालीं. तरी पूर्वेकडील कॉन्टाटिनोपल राजधानी असलेलें रोमन साम्राज्य यापुढें जवळजवळ एक हजार वर्षें वैभवशाली स्थितींत टिकून राहिलें. नंतर इस्लामी धर्मांची पश्चिम आशियांत स्थापना झाल्यावर या साम्राज्याचे निरनिराळे प्रदेश इस्लाम धर्मीय लोकांनीं जिंकून घेतलें व शेवटीं इ. स. १४५३ मध्यें कॉन्टाटिनोपल शहर उस्मानी तुर्कांनीं (Ottoman) जिंकून घेतल्यावर पूर्व रोमन साम्राज्य (बिझॅंटिन Byzantine साम्राज्य) लयास गेलें.

रोमचा सांस्कृतिक ठेवा—इ. स. ४७६ मध्यें पश्चिम रोमन साम्राज्य नाहींसें होऊन त्या प्रदेशांत वन्य जमातींचीं निरनिराळीं राज्यें स्थापन झालीं. रोमन लोकांच्या राजकीय संस्था, त्यांची भाषा, त्यांचें बांधकाम, त्यांचे कायदेकानु व त्यांनीं अमलांत आणलेली राज्यकारभाराची पद्धत यांचें या वन्य जमातींवर व त्यांमार्फत सर्व जगावर विशेषतः युरोपवर महत्त्वाचे असे परिणाम घडले व पाश्चात्य किंवा युरोपियन संस्कृति त्यापासून निर्माण झाली. रोमन साम्राज्यावर स्वारी करून त्या ठिकाणीं आपलीं राज्यें स्थापन करणाऱ्या वन्य जमातींतील लोक म्हणजे सध्यां युरोपमधील पुढारलेल्या अशा जर्मन, फ्रेंच, स्पॅनिश, इंग्लिश व इटालियन वगैरे लोकांचे पूर्वजच होत. त्यांना रोमपासून खालील बाबतींत सांस्कृतिक ठेवा मिळाला.

(१) जागतिक राज्याची कल्पना व राज्यकारभाराची पद्धत—खूप मोठ्या विस्तृत प्रदेशावर पसरलेलें जगांतील पहिलें मोठें साम्राज्य म्हणजे रोमचेंच होय. या साम्राज्यांत किती तरी वर्षें शांतता नांदत असल्यामुळें व्यापार व उद्योगधंदे यांस प्रोत्साहन मिळत गेलें. तसेंच त्यावेळीं विमान, रेल्वे, तारायंत्र, मोटार, वृत्तपत्रें छापण्याची कला वगैरे हल्लींच्यासारखीं दळणवळणाचीं साधनें नव्हतीं, तरी देखील एवढ्या विस्तृत साम्राज्याचा राज्यकारभार व्यवस्थितपणें चालविण्याची पद्धत रोमनें अमलांत आणल्यामुळें जागतिक संघ राज्याची कल्पना

पुढें येऊन त्या दृष्टीनें राष्ट्रसंघ व त्यानंतर संयुक्त राष्ट्रसंघटना या संस्था स्थापन झाल्या व राष्ट्राराष्ट्रांतील तंटे युद्धासारख्या रानटी मार्गानें न सोडवितां ते सामोपचारानें व तडजोडीनें सोडविण्याचा प्रयत्न पुढें सुरू झाला.

(१) **कायदा**—रोमन साम्राज्य विस्तृत अशा प्रदेशावर पसरलेलें होतें, व त्यामध्यें वेगवेगळ्या वंशाचे, धर्मांचे, चालीरीतींचे, संस्कृतींचे, वर्णांचे लोक रहात होते. रोमचा राजकर्ते म्हणून या सर्वांशीं संबंध आला, त्यामुळें रोमची त्यांच्याकडे पहाण्याची दृष्टी संकुचित न रहातां ती विशाल झाली. या सर्व लोकांस योग्य प्रकारें न्याय दिला जाईल अशी कायद्याची पद्धत अमलांत आणणें जरूर झालें व त्यामुळें रोमन रीतीरिवाज त्याचप्रमाणें रोमन नसलेल्यांचे रीतीरिवाज या दोघांनाहि उपयुक्त होईल अशी कायद्याची पद्धत रोमनें अमलांत आणली. रोमचे पहिले कायदे प्राचीन काळीं १२ कोष्टकांत ग्रथित केलेले होते. यानंतर पूर्व रोमन साम्राज्याचा सम्राट **जस्टीनियन** (इ. स. ५२७ ते इ. स. ५६५) यानें कायदेपंडितांचें एक मंडळ नेमून त्या मार्फत त्यावेळीं अस्तित्वांत असलेले सर्व कायदे, न्यायाधिशांनीं वेगवेगळ्या बाबींत दिलेलीं निकालपत्रें, या सर्वांचें संकलन करून कायद्याची व्यवस्थितरीतीनें मांडणी केली व ते 'जस्टिनियनचे कायदे' म्हणून प्रसिद्ध आहेत. रोमन साम्राज्य नाहींसें झालें तरी युरोपमधील निरनिराळ्या देशांतील कायदे या रोमन कायद्यांवरच आधारिलेले आहेत, इतकेच नव्हे तर युरोपच्या बाहेरील देशांमध्येंही या कायद्यांचा अभ्यास करून त्यांतील तत्त्वांवरच बऱ्याच देशांतील कायद्यांची मांडणी करण्यांत आली आहे. तेव्हां रोमन कायदा हा रोमनें जगाला दिलेला मोठा सांस्कृतिक ठेवा होय.

(२) **रोमन बांधकाम**— रोमन लोकांनीं शोभिवंत भव्य व उपयुक्त अशा मोठमोठ्या इमारती ठिकठिकाणीं बांधल्या. वाटोळ्या कमानी बांधण्याची पद्धत सुरू करून त्यावर आधारलेले मोठमोठे पूल, मोठमोठ्या इमारती व पाणी नेण्याचे नळ बांधले. साम्राज्यांतील दूरदूरचीं ठिकाणें जोडण्यासाठीं मोठ्या व पक्क्या सडका बांधिल्या. कांक्रीटचा उपयोग करण्याची पद्धत अमलांत आणिली. या सर्व गोष्टींमुळें मानवी संस्कृतींत भर पडून तसें उपयुक्त व मजबूत बांधकाम इतर ठिकाणींहि बांधण्यांत यावें अशी इतर लोकांमध्यें स्फूर्ति उत्पन्न झाली.

(४) **लॅटिन भाषा**—रोमन लोकांची भाषा लॅटिन ही होती. ती बोलण्यांत असल्यामुळें लॅटिन भाषेचा युरोपमध्यें प्रसार झाला. मध्ययुगांमध्यें धर्माधिकारी, शिक्षित लोक, कायद्याच्या कामांत भाग घेणारे लोक, वैद्य, शिक्षक व पंडित या सर्वांची अंतर्राष्ट्रीय भाषा म्हणजे लॅटिन हीच होती. या भाषेमध्येंच ग्रंथ लिहिले जात व त्यामुळें नव्या कल्पना, नवे विचार व ज्ञान यांचा युरोपमध्यें प्रसार झाला. या लॅटिन भाषेपासूनच इटालियन, स्पॅनिश, पोर्तुगीज, फ्रेंच, रुमानियन वगैरे भाषा निर्माण होऊन त्या पुढें प्रगल्भ झाल्या. इंग्रजी व जर्मन या भाषांवरही लॅटिन भाषेचा परिणाम होऊन त्या प्रगल्भ झाल्या.

(५) **ग्रीक व रोमन संस्कृतींचा प्रसार**—रोमन लोकांनीं ग्रीक संस्कृति व आचारविचार आत्मसात केले व ग्रीक-रोमन संस्कृतीचा युरोपमध्यें प्रसार केला.

(३) ख्रिस्ती धर्माची स्थापना व त्याचा रोमन साम्राज्यांत व इतरत्र प्रसार

पॅलेस्टाइन व ज्यू लोक—भूमध्य समुद्राच्या पूर्व किनाऱ्यावर पॅलेस्टाईन हा प्रदेश आहे. येथें हिब्रू किंवा ज्यू लोकांची वस्ती असून तेथें इ. स. पू. ९ व्या शतकापासून ज्यू लोकांचीं दोन राज्यें होतीं. पण पुढें आठव्या व सहाव्या शतकांत हीं राज्यें नाहींशी झाल्यावर त्यांचें स्वतंत्र राज्य नाहींसें झालें व तो प्रदेश असेरियन, खाल्डियन, इराणी व ग्रीक लोकांच्या वर्चस्वाखालीं जाऊन इ. स. पू. सुमारें ३० च्या सुमारास तो रोमन लोकांच्या वर्चस्वाखालीं आला व रोमन साम्राज्याचा भाग झाला. हिब्रू किंवा ज्यू लोकांच्या धर्मास ज्यू धर्म असें म्हणत. या धर्मीयांमध्यें वेगवेगळ्या वेळीं ज्ञानी धार्मिक पुरुष (भाकीत सांगणारे–प्रॉफेटस) होऊन गेले, व त्यांनीं अशी समजूत प्रसृत केली कीं, 'ज्यू लोक ईश्वरास विशेष प्रिय असून त्यांस पृथ्वीचें राज्य प्राप्त करून देण्यासाठीं एक मेसेया (त्राता, उद्धारक) अवतीर्ण होणार आहे.' या समजुतीवर ज्यू लोकांचा विश्वास होता, व असा त्राता निर्माण होऊन आपण पुनः स्वतंत्र होऊं असें त्यांस वाटत होतें.

येशू ख्रिस्त व त्याचा उपदेश—अशी परिस्थिति असतां इ. स. पू.

४ व्या वर्षी पॅलेस्टाइनमधील ज्यूडा (Judah) या विभागांतील बेथलहेम या गांवीं येशू ख्रिस्त याचा जन्म झाला. त्याचे आईबाप ज्यू असून त्यांचा धर्म ज्यू होता. तेव्हां **येशू ख्रिस्त** यास लहानपणीं ज्यू धर्माची दीक्षा मिळाली. धार्मिक गोष्टींसंबंधीं तो लहानपणीं विचार करी. सामाजिक बाबींकडेहि त्याचें लक्ष असे. येशू ख्रिस्त हा धर्मानें ज्यू होता, पण ज्यू धर्मांतील कर्मठपणा, धर्माधिकाऱ्यांचें स्वार्थी आचरण, ईश्वरास संतुष्ट करण्यासाठीं देण्यांत येणारे पशूंचे बळी वगैरे गोष्टी त्यास आवडल्या नाहींत. त्याचप्रमाणें समाजांत दिसून येणारी विषमता, ज्यू लोकांचा संकुचितपणा; श्रीमंत लोकांचा लोभीपणा व गरीब व दलित वर्गांशीं तुच्छतापूर्वक वागण्याची त्यांची वृत्ति वगैरे गोष्टी त्यास आवडल्या नाहींत. त्यानें धार्मिक गोष्टींसंबंधीं व समाजस्थितीसंबंधी विचार केला. जॉन बॅप्टिस्ट या साधुपुरुषाच्या आचरणाचा त्याच्यावर परिणाम झाला. शेवटीं तीस वर्षांचा असतां आपणांस ईश्वरी साक्षात्कार झाला आहे व आपण ईश्वराचे प्रेषित (मेसेया) असून खरा धर्म स्थापन करण्याची ईश्वरानें आपणांस प्रेरणा केली आहे असें त्यांस वाटूं लागलें. तेव्हां लोकांस धार्मिक व नैतिक उपदेश करण्यास, आजाऱ्यांची शुश्रूषा करण्यास, दलित व गरीब वर्गांतील लोकांचीं दुःखें समजावून घेऊन ती शक्य तो निवारण करण्यास त्यानें सुरवात केली. "ईश्वर एकच आहे व तो सर्वांवर प्रेम करतो, सर्व माणसें ईश्वराचीं लेकरें आहेंत, त्यामुळें प्रत्येकानें इतरांशीं बंधूभावानें वागावें, दुःखितांस मदत करावी व आपलें आचरण शुद्ध ठेवावें. जे नम्र, लीन व दयाशील आहेत ते धन्य होत, व तेच स्वर्गाचें राज्य मिळवतील. लोकांनीं आपली स्तुती करावी म्हणून दानधर्म करूं नका, तर दलित वर्गास मदत करणें आपलें कर्तव्य आहे समजून दानधर्म करा. आपल्या शत्रूवरही प्रेम करा. या प्रेमानेंच तुम्ही शत्रूचीं अंतःकरणें जिंकाल. स्वतःच्या सुखासाठीं संपत्ति मिळवूं नका, कारण ती केव्हां नाहींशी होईल याचा नेम नाहीं. ढोंगी धर्मोपदेशकांपासून सावध रहा, कारण मेंढरांचीं कातडीं पांघरणारे ते लांडगे आहेत. जनसेवा म्हणजेच ईश्वरसेवा. आपल्या हातून वाइट आचरण झाल्यास त्याबद्दल पश्चात्ताप करावा व तसें आचरण पुनः होणार नाहीं असा प्रयत्न करावा. पूर्वीच्या धार्मिक पुरुषांनीं भाकीत केल्याप्रमाणें लोकांचा उद्धार करणारे व त्यांस योग्य मार्गदर्शन दाखविणारे प्रेषित आपण आहोंत. आपण मोठें राज्य मिळविणार आहोंत, पण तें राज्य

लोकांच्या अंतःकरणाचे आहे." वगैरे गोष्टी येशू ख्रिस्त उपदेश करतांना व प्रवचन देतांना लोकांस सांगे. येशू ख्रिस्त याच्या या सहानुभूतीच्या उपदेशामुळें व प्रेमळ वागणुकीमुळें त्याचें प्रवचन ऐकण्यास पुष्कळ लोक जमा होत. ज्यू लोकांचा उद्धार करून त्यांस स्वातंत्र्य व जगाचें राज्य मिळवून देणारा त्राता–प्रेषित (मेसेया)–पृथ्वीवर अवतीर्ण होणार आहे असें भाकीत पूर्वीच्या धार्मिक पुरुषांनीं केलें होतें, तो खरोखरीच हाच असावा असेंही कांहींना वाटूं लागलें व येशू ख्रिस्त याची लोकप्रियता खूप वाढूं लागली. अशारीतीनें तीन वर्षे मौंवतालच्या प्रदेशांत प्रवचनें देत हिंडल्यावर येशू ख्रिस्त पॅलेस्टाइन प्रांताची राजधानी जेरुसलेम येथें गेला, व तेथेंही लोकांस उपदेश करूं लागला. तेथेंही त्याच्या प्रवचनास अतोनात गर्दी होऊन त्याची लोकप्रियता वाढूं लागली. पुष्कळ ज्यू लोक त्याचे अनुयायी होऊं लागले. ही गोष्ट ज्यू लोकांच्या धर्माधिकाऱ्यांस आवडली नाहीं. येशू ख्रिस्त याच्या उपदेशामुळें व त्याच्या सदाचाराच्या व सहानुभूतीच्या वागणुकीमुळें समाजांतील ज्यू धर्माधिकाऱ्यांचें धार्मिक महत्त्व व श्रेष्ठत्व यांस कमीपणा येणार होता. ज्यू लोकांच्या धर्मग्रंथांत सांगितल्याप्रमाणें त्यांस पृथ्वीचें राज्य प्राप्त करून देण्यास येणारा प्रेषित येशू ख्रिस्ता सारख्या एखाद्या सामान्य व दरिद्री अवस्थेंत अवतीर्ण न होतां तो मोठ्या वैभवानें व उच्च कुळांत जन्मास यावयास पाहिजे असें त्यांस वाटत होतें. तेव्हां पूर्वापार चालत आलेल्या धार्मिक समजुतीचा फायदा घेऊन आपण प्रेषित आहोंत अशी लोकांची समजूत करून देणारा हा भोंदू गृहस्थ आहे, तेव्हां त्यास त्याच्या पाखंडी मताबद्दल शिक्षा करणें जरूर आहे असें त्यांस वाटूं लागलें. येशू ख्रिस्त हा ज्यू लोकांस स्वातंत्र्य व त्यांस पृथ्वीचें राज्य प्राप्त करून देणारा त्राता आहे अशी लोकांची समजूत करून देत असतो, व त्याच्या प्रवचनास अतोनात गर्दी जमते ही गोष्ट पॅलेस्टाईनच्या रोमन गव्हर्नरच्या कानावर गेल्यास राजद्रोही म्हणून सर्व ज्यू लोकांचा रोमन गव्हर्नरकडून छळ होईल असें वाटून येशू ख्रिस्त यास त्याच्या पाखंडी व राजद्रोही प्रवचनांबद्दल शिक्षा करावी, अशी ज्यू धर्माधिकाऱ्यांनीं रोमन गव्हर्नर पायलेट (Pilate) याच्याकडे मागणी केली. तेव्हां येशू ख्रिस्त यास पकडण्यांत येऊन पायलेटकडे नेण्यांत आलें. येशू ख्रिस्त याच्याशीं झालेल्या संभाषणावरून राजद्रोही म्हणून त्याच्या प्रवचनाकडे लक्ष देण्याचें कारण नाहीं असें जरी पायलेट यास वाटत

होतें, तरी त्यास शिक्षा केल्यास ज्यू लोकांमधील खळबळ नाहींशी होईल व ज्यू धर्माधिकाऱ्यांचेंही समाधान होईल असें वाटून येशू ख्रिस्त यास त्याच्या राजद्रोही व पाखंडीपणाच्या प्रवचनांबद्दल दोषी ठरविण्यांत येऊन त्यास फांशीची शिक्षा सांगण्यांत आली; व वधस्तंभावर त्यास चढवून त्याच्या शरिरांत खिळे ठोकून त्यास ठार करण्यांत आले (इ. स. २९). येशू ख्रिस्त यास असें निर्दयपणें ठार करण्यांत आलें, तरी मरणसमयीं 'परमेश्वरा! यांना क्षमा कर. आपण काय करीत आहोंत हें यांस समजत नाहीं' असें सहनशीलतेचे उद्गार त्याच्या तोंडून निघत होते.

येशू ख्रिस्ताचे प्रमुख शिष्य व त्यांचें कार्य—येशू ख्रिस्त यास ठार करण्यांत आल्यावर येशू ख्रिस्तास व त्याच्या शिकवणुकीस लोक विसरून जातील, असें ज्यू लोकांतील धर्माधिकाऱ्यांस व रोमन गव्हर्नरास वाटत होतें. येशू ख्रिस्तास ठार करण्यांत आल्यावर जगाचा उद्धार करणारा त्राता (प्रेषित) म्हणून येशूवर श्रद्धा ठेवणाऱ्या त्याच्या शिष्यांची व अनुयायांची तीव्र निराशा झाली. येशू ख्रिस्तानें निरनिराळ्या ठिकाणीं अनेक प्रवचनें दिलीं होतीं; उपदेश केला होता, पण त्या प्रवचनांतील प्रमुख मुद्दे, उपदेशाचें सार लिहून ठेविलें नव्हतें. त्याचा उपदेश व त्याची शिकवणूक त्याच्या प्रमुख शिष्यांनीं ऐकली होती व त्याचें आचरण जवळून पाहिलें होतें. येशू ख्रिस्त मरण पावल्यावर ते स्तंभितच झाले, पण त्यांनीं धीर सोडला नाहीं.

येशू ख्रिस्त याच्या शिष्यांपैकीं बारा शिष्य विशेष प्रमुख होते व त्यांस ॲपोस्टल्स असें म्हणत. त्यांनीं मोठ्या उत्साहानें येशु ख्रिस्त याच्या शिकवणुकीचा पॅलेस्टाईन, इजिप्त आशियामायनर व इतर दूरदूरच्या देशांत प्रसार केला, तेव्हां त्यांस पुष्कळ अनुयायी मिळत गेले. पहिल्या पहिल्यानें ज्यू लोकांतच येशू ख्रिस्त याच्या धर्माचा प्रसार झाला व त्याचे पहिले अनुयायी ज्यूच होते. पण येशू ख्रिस्त याची शिकवणूक फक्त ज्यू लोकांसाठीं नसून ती सर्वांसाठीं होती, अशी खुद्द येशू ख्रिस्ताचीं वचनें उद्धृत करून ज्यू नसलेल्यांनाही ख्रिस्ती धर्मांत घेण्यांत आलें. या कामामध्यें **पॉल** या त्याच्या अनुयायानें विशेष भाग घेतला. सीरियामधील ॲंटिऑक हें महत्त्वाचें शहर ख्रिस्ती धर्माच्या प्रसाराचें केंद्रस्थान बनलें. या ठिकाणीं येशू ख्रिस्त यास '**ख्राइस्ट**' किंवा 'त्राता' असें म्हणण्यांत येऊन त्याच्या अनुयायांस ख्रिश्चन असें पहिल्यानें म्हणण्यांत आलें

(इ. स. ४२). या धर्माचा प्रसार करीत असतां येशू ख्रिस्ताच्या शिष्यांचा ठिकठिकाणीं छळ होऊन त्यांस हालअपेष्टा भोगाव्या लागत पण त्यांस न जुमानतां त्याच्या शिष्यांनीं धर्मप्रसाराची कामगिरी चालविली व खुद्द रोम शहरीं हें धर्मप्रसाराचें लोण नेलें. तेव्हां इ. स. ६२ मध्यें पॉल यास पकडण्यांत येऊन रोम शहरीं ठार करण्यांत आलें. पॉल हा विद्वान् होता व त्याचीं ख्रिस्ती धर्माच्या तत्त्वासंबंधीं पत्रें (एपिस्टल्स) महत्त्वाचीं मानली जाऊन तीं ख्रिस्ती लोकांच्या धर्मग्रंथाच्या–बायबलच्या–नवा करार या भागांत ग्रथित केलेलीं आहेत.

बायबल—हें ख्रिस्ती धर्मी लोकांचें पवित्र पुस्तक आहे. त्यांत दोन भाग आहेत. पहिल्या भागास जुना करार व दुसऱ्या भागास नवा करार असें म्हणण्यांत येतें. जुन्या करारांत ज्यू (हिब्रू) लोकांचा प्राचीन इतिहास असून त्यांच्या त्यावेळच्या कल्पनेप्रमाणें सृष्टीच्या उत्पत्तीपासूनची हकिकत आहे. त्यामध्यें ज्यू लोकांस पृथ्वीचें राज्य प्राप्त करून देण्यासाठीं व मानव जातीचा उद्धार करण्यासाठीं एक मेसेया–त्राता–जगामध्यें अवतीर्ण होणार आहे अशी कल्पना मांडलेली आहे. नव्या करारांत मानव जातीचा उद्धार करण्यासाठीं येणारा प्रेषित (मेसेया–त्राता) म्हणजे येशू ख्रिस्तच आहे असें सांगितलें आहे. येशू ख्रिस्त यानें आपल्या उपदेशांतील प्रमुख तत्त्वें, आपल्या शिकवणुकींतील महत्त्वाच्या गोष्टी लिहून ठेविल्या नव्हत्या, पण येशू ख्रिस्त यानें लोकांस वेळोवेळीं केलेला उपदेश, त्याचीं वचनें व मतें त्याच्या प्रमुख शिष्यांनीं ऐकलीं होतीं व त्याच्या आयुष्यांतील महत्त्वाच्या गोष्टी व त्याचें आचरण जवळून पाहिलें होतें. तेव्हां पॉल, मॅथ्यू, मार्क, ल्यूक व जॉन या त्याच्या शिष्यांनीं येशू ख्रिस्त याच्या शिकवणुकींसंबंधीं व आयुष्यांतील महत्त्वाच्या प्रश्नांसंबंधीं माहिती संग्रहित करून ती नवीन करारांत ग्रथित केलेली आहे. बायबलमधील वरील सर्व मजकुराचें संकलन इ. स. च्या १ ल्या शतकाच्या शेवटीं झालें. हें पहिल्यानें हिब्रू व ग्रीक भाषेंत लिहिलेलें होतें. त्यानंतर इ. स. ४०० च्या सुमारास त्याचें लॅटिन भाषेंत भाषांतर करण्यांत आलें.

ख्रिस्ती धर्माचा प्रसार—(इ. स. ४० ते इ. स. ३९५) येशू ख्रिस्ताच्या प्रमुख शिष्यांनीं इ. स. पहिल्या शतकांत जेरूसलेम, अँटिऑक,

अलेक्झांड्रिया, कॉरिंथ व रोम या रोमन साम्राज्यांतील प्रमुख व महत्त्वाच्या शहरीं ख्रिस्ती धर्माची स्थापना करून त्याचा प्रसार करण्यास सुरवात केली. रोमन साम्राज्यांतील अधिकारी वर्गाकडून व जनतेकडून ज्यू धर्मीतील हा एक पंथ आहे व तो निरुपद्रवी आहे म्हणून त्याची उपेक्षा करण्यांत आली. पण त्यावेळीं लोकप्रिय असलेल्या रथांच्या शर्यती, ग्लॅडिएटरांचीं द्वंद्वयुद्धें, रोमन बादशहास दैवी मानून त्याच्या मूर्तीची पूजा करण्याचा प्रघात, देवदेवतांच्या मूर्तीची पूजा वगैरे गोष्टींविरुद्ध ख्रिस्ती धर्मीयांचें मत असून धार्मिक प्रार्थनेच्या व प्रवचनांच्या वेळीं या गोष्टीविरुद्ध ख्रिस्ती धर्मोपदेशक लोकमत तयार करूं लागल्यामुळें त्यांच्याकडे रोमन अधिकाऱ्यांचें व जनतेचें लक्ष जाऊं लागलें व या धर्माचा फैलाव होऊं नये म्हणून ख्रिस्ती धर्मीय लोकांचा छळ होऊं लागला. त्याचप्रमाणें रोमन सम्राट नेरो याच्या कारकीर्दींत रोम शहराला लागलेली आग, रोगराई वगैरे आपत्ति ख्रिश्चन धर्मीय लोकांच्या पाखंडीपणामुळेंच उद्भवल्या, असा ख्रिश्चन धर्माविरुद्ध असलेले लोक इतरांचा समज करून देऊं लागले. त्यामुळें रोमन राजकर्त्यांकडून व जनतेकडून ख्रिस्तीधर्मी लोकांचा ते पाखंडी आहेत व राजद्रोही आहेत म्हणून छळ होऊं लागला; व त्यांपैकीं कित्येकांस तुरुंगांत टाकण्यांत आलें, फांशीं देण्यांत आलें, जिवंत जाळण्यांत आलें, व लोकांच्या करमणुकीसाठीं हिंस्रश्वापदांपुढेंही टाकण्यांत आलें. ख्रिस्तीधर्मी लोकांवर हें अत्याचार होत असूनही त्यांच्यांतील निग्रही लोकांनीं येशू ख्रिस्त याचा उपदेश; त्याचें नैतिक आचरण व सर्व मानवजातीकडे सहानुभूतीनें पहाण्याची त्याची दृष्टि लोकांच्या मनावर बिंबविण्याचें व्रत तसेंच पुढें चालविलें. तेव्हां या ख्रिस्ती धर्मास व त्याच्या प्रसारास जरी पहिल्यानें विरोध होत होता तरी या धर्माकडे सहानुभूतीनें पहाण्याकडे हळकें हळकें लोकांची प्रवृत्ति होऊं लागली. त्याचप्रमाणें ग्रीक व रोमन पुराणांतील देवदेवतांची पूजाअर्चा, देवदेवतांना संतुष्ट करण्यासाठीं देण्यांत येणारे पशूंचे बळी वगैरे गोष्टी आपलें इच्छित मनोरथ पूर्ण करण्यास कितपत उपयुक्त आहेत याबद्दलही लोकांस साशंकता वाटूं लागली. तेव्हां विश्वबंधुत्वाचा उपदेश करणाऱ्या या नव्या ख्रिस्ती धर्माबद्दल रोमन साम्राज्यांतील गरीब दलित लोकांप्रमाणें सरदार व सुखवस्तु घराण्यांतील लोकांसही सहानुभूति वाटून तेहि हळकें हळकें या धर्माचे अनुयायी होऊं लागले. तेव्हां या गोष्टीस आळा घालावा

म्हणून रोमन सम्राट डायाक्लोशियन यानें ४ थ्या शतकाच्या सुरवातीस एक फर्मान काढलें, व त्यामुळें ख्रिस्तीधर्मीय लोकांचा बराच छळ करण्यांत आला; पण त्यामुळें या धर्माचा नायनाट झाला नाहीं. तेव्हां त्याच्या मागून येणारा रोमन सम्राट गलेरियस यानें तें फर्मान रद्द केलें. शेवटीं **कॉन्स्टन्टाईन** या रोमन सम्राटानें इ. स. ३३७ च्या सुमारास ख्रिस्ती धर्म स्वीकारला, तेव्हां रोमन साम्राज्यांत सुरू असलेल्या इतर धर्मांप्रमाणें ख्रिस्ती धर्मालाही मान्यता मिळाली. यानंतर **थिओडोशियस** या सम्राटानें (इ. स. ३७९–३९५) ख्रिस्ती धर्म हा रोमन साम्राज्याचा अधिकृत धर्म असल्याचें पत्रक काढलें; व या धर्माच्या अधिकाऱ्यांस सवलती दिल्या. यानंतर या धर्माचा प्रसार होत जाऊन रोमन साम्राज्यांतील बहुसंख्य लोक ख्रिस्ती धर्माचे अनुयायी झाले.

ख्रिस्ती धर्माची व्यवस्था— ख्रिस्ती धर्म हा रोमन साम्राज्यांतील अधिकृत धर्म होण्यापूर्वीपासून या धर्मासंबंधीं खालील व्यवस्था अंमलांत आलेली होती. रोमन साम्राज्यांतील प्रमुख शहरांस बिशप हा एक धर्माधिकारी नेमलेला असून त्याची भोंवतालच्या प्रदेशांतील निरनिराळ्या ठिकाणीं नेमलेल्या कुर्जी या धर्माधिकाऱ्यांवर देखरेख असे. रोमन साम्राज्यांतील निरनिराळ्या शहरांपेक्षां जेरुसलेम, ॲंटिऑक, रोम, कॉन्स्टांटिनोपल, अलेक्झांड्रिया हीं शहरें विशेष महत्त्वाचीं असल्यामुळें येथील बिशप या धर्माधिकाऱ्याचें महत्त्व विशेष वाढूं लागलें. त्यांतही रोमन साम्राज्याच्या राजधानीचें ठिकाण जें रोम शहर तेथील बिशपचें महत्त्व विशेष वाढून तो इतर सर्व बिशपांपेक्षां श्रेष्ठ आहे असें लोक मानूं लागले; व त्यास पोप (पिता–बाबा) असें म्हणण्यांत येऊं लागलें. पूर्व रोमन साम्राज्याची राजधानी कॉन्स्टांटिनोपल येथील बिशपला पॅट्रिआर्च असें म्हणण्यांत येऊं लागलें.

ख्रिस्ती धर्मी लोकांनीं ख्रिस्ती धर्माच्या प्रमुख ठिकाणीं मोठमोठीं भव्य प्रार्थना मंदिरें बांधलीं. यांत रविवारीं व ख्रिस्ती धर्मांतील सणाच्या दिवशीं तेथील धर्माधिकाऱ्याच्या नेतृत्वाखालीं सामुदायिक प्रार्थना करण्याचा, येशू ख्रिस्ताच्या आयुष्यांत घडलेल्या प्रसंगासंबंधानें बायबलमध्यें वर्णिलेल्या गोष्टींवर प्रवचन देण्याचा प्रघात पडला.

सारांश

इ. स. पू. १८००–१२०० हेलनीज (ग्रीक) या आर्य वंशाच्या जमातींचें ग्रीसमध्यें आगमन.

ग्रीसवर वर्चस्व–१४००–६५० हेलनीज लोकांनीं तेथील क्रीट संस्कृति आत्मसात. क्रीटशीं वितुष्ट. ग्रीसमधील मायसीन व टिरीन्स हीं ठाणीं जिंकलीं. क्रीटमधील नॉसस राजधानीचा विध्वंस इ. स. पू. १४०० सुमारास. ट्रॉयचा पोडाव इ. स. पू. १२०० च्या सुमारास. यावर आधारलेलीं–इलिअड, ऑडिसी हीं महाकाव्यें होमरनें रचिलीं. हेलनीज (ग्रीक) लोकांचा सांस्कृतिक ठेवा. कांहीं हेलनीज टोळ्या तेथील पूर्वीच्या लोकांत मिसळून गेल्या–अटिका (अथेन्स येथील), कांहीं वेगळ्या राहिल्या–स्पार्टा येथील.

फिनीशियन लोकांशीं व्यापारी संबंध. इजिप्त व मेसापोटेमिया येथील संस्कृतीचा प्रसार. अक्षर लिपीचा, कलाकौशल्याच्या गोष्टींचा प्रसार. उद्योगधंदे सुरू विशेषतः अथेन्समध्यें. ग्रीस व इजियन समुद्रालगतच्या प्रदेशांत नगर-राज्यें. राजकीय बाबतींत स्वतंत्र पण सांस्कृतिक बाबतींत ऐक्य—एक मूळ पुरुष, धर्मसमजुती व देवदेवता, महाकाव्यें, क्रीडासर्त्रे.

नगरराज्यें व तेथील राज्यघटना–(६५०-५००) राज्याचें क्षेत्र मर्यादित. कांहीं राजसत्ताक व कांहीं सरदार सत्ताक. स्पार्टा व अथेन्स प्रमुख. स्पार्टाची राज्यघटना लायकरगस यानें बनविली. दोन राजे, राज्यकारभार करण्यास एफॉर्स अधिकारी, सरदारांच्या हातीं सत्ता. ग्रीक नसलेल्यांस नागरिकत्व नाहीं; व त्यांस शेतावर इतर गुलामासारखे कायडकष्ट, लष्करी शिक्षण सर्व नागरिकांस. लष्करी बाबतींत प्रबल. उद्योगधंदा, कलाकौशल्य व सांस्कृतिक बाबतींत मागासलेलें.

अथेन्स–६५० च्या सुमारास राजसत्ता नाहींशी. लोकांनीं १ वर्षापुरते निवडलेले आर्चन अधिकारी. लिखीत कायदा नाहीं. ड्रेकन यानें इ. स. पू. ६२१ लिखीत कायदे प्रसिद्ध. कायदे कडक. सरदारवर्गाच्या संरक्षणासाठीं.

इ. स. पू. ५९४ सोलन यानें कायद्यांत बदल केला, कर्जामुळें गुलामगिरींत गेलेल्यांची मुक्तता.

पीझीट्रेटस यानें सत्ता बळकाविली (इ. स. पू. ५६०-५१४)-सर्वाधिकारी. गरीब वर्गाच्या हिताच्या गोष्टी.

इ. स. पू. ५०७ क्लिस्थीनिझनें सामान्य लोकांच्या हिताचे कायदे. लोकशाहीचा जनक, सामान्य लोकांस अधिकार, मालमत्ता व सामाजिक वर्ग या ऐवजीं १० प्रादेशिक मतदारसंघ. त्यांनीं प्रत्येकीं एक असा

प्रमुख अधिकारी (जनरल) राज्यकारभार करण्यासाठीं निवडणें व त्यांचें मंत्रिमंडळ. प्रत्येक विभागातर्फे ५० सभासदांचें देखरेख करण्यासाठीं कौंसिल. लोकशाही तरी $\frac{1}{5}$ लोकांसच मताधिकार. गुलाम, स्त्रिया यांस मताधिकार नाहीं.

आस्ट्रेसीझमची पद्धत–एखाद्याविरुद्ध ६००० माणसें असल्यास त्यास दहा वर्षें हद्दपारी.

इराणशीं युद्धें–इ. स. पू. ४९२-९०–इराणी लोकांचा पराभव. मॅरेथॉन.
४८०-७९–थरमापायली येथें विरोध, पण इराणी सैन्यास जय. अथेन्स उध्वस्त. इराणी आरमाराचा वादळानें नाश. इराणी सैन्याचा व नंतर आरमाराचा पराभव.

डेलियन संघ इ. स. पू. ४७७ अथेन्सच्या नेतृत्वाखालीं इराणविरोधी. अथेन्सच्या साम्राज्यवाढीस मदत.

अथेन्सचें सुवर्णयुग (इ. स. पू. ४६१-४२९)–पेरिक्लिझचें नेतृत्व. मंत्रिमंडळाचा अध्यक्ष (जनरल); प्रभावी वक्ता, लोकशाहीकडे कल. राज्यकारभारांत भाग घेणाऱ्या सामान्य माणसास वेतन. सैन्य व आरमार हें प्रबळ. विद्याकलांस उत्तेजन. सुंदर इमारती, पुतळे, नाट्यग्रंथ, वाङ्मयवृद्धि.

अथेन्स व स्पार्टा यांमधील युद्ध (इ. स. पू. ४३१-४०४) अथेन्सचा पराभव. अथेन्सच्या लष्करी सामर्थ्यास उतरती कळा. पहिल्यानें स्पार्टा नंतर थीब्स यांच्याकडे पुढारीपण.

फिलीपच्या नेतृत्वाखालीं ग्रीक नगरराज्याचें एकीकरण इ. स. पू. ३३८ ग्रीक नगरराज्यांचा फिलीपकडून पराभव.

अलेक्झांडरचा पराक्रम व साम्राज्य (इ. स. पू. ३३४-३२३)–इराणवर स्वारी ३ रा डरायस याचा इस्सस (इ. स. पू. ३३३) व अरावेला (इ. स. पू. ३३१) पराभव व इराणवर वर्चस्व; इजिप्तवर वर्चस्व, इ. स. पू. ३३२ अलेक्झांड्रियाची स्थापना. सिंधू नदीच्या कांठीं पुरु राजाचा पराभव इ. स. पू. ३२६; अलेक्झांडर परत फिरला. बॅबिलोन येथें मृत्यु इ. स. पू. ३२३. त्याच्या साम्राज्याची सरदारांत वाटणी. टॉलेमीस इजिप्त, सील्यूकस यास पश्चिम आशिया. लीसीमॅचसला मॅसिडोनिया.

प्रसिद्ध व्यक्ती–

सॉक्रेटीस–तत्त्ववेत्ता. अंद्ध श्रद्धा नको. स्पष्टवक्ता; प्लेटो–सॉक्रेटसचा शिष्य तत्त्ववेत्ता. वाङ्मयभक्त; ॲरिस्टॉटल–जाडा विद्वान्, बहुश्रुत, वाङ्मयभक्त

झेनो–तत्त्ववेत्ता. 'वासनेचा त्याग करा'; एपिक्यूरस 'योग मार्गानें सुखी जीवन जगा', डेमॉस्थेनीज–प्रख्यात वक्ता; थिमिस्टोक्लिझ–अथेन्समधील पुढारी आरमार प्रबल करणें. फिडीअस शिल्पकार.

रोमचा उदय, उत्कर्ष व ऱ्हास

इटलींतील मूळ जमाती–सॅबिन्स सॅमनाइटस्, व्होल्स्की.

इ. स. पू. १८००–१२०० आर्य वंशाच्या लॅटिन जमातींचें उत्तरेकडून आगमन. टायबर काठच्या प्रदेशांत वस्ती, त्यास लेशिअम.

इ. स. पू. १००० इट्रस्कन्झ जमातीचें समुद्रमार्गें आगमन व लेशियमच्या उत्तरेस पश्चिम किनाऱ्यावरील प्रदेशांत वस्ती व त्यांचीं नगरराज्यें सुधारलेलीं; शेती, विणकाम, घरबांधणी, भांडींकुडीं, शस्त्रास्त्रें वगैरे गोष्टी येत होत्या. त्यांच्या सहवासानें लॅटिन्स व इतर जमाती सुधारूं लागल्या.

इ. स. पू. ८००–६०० ग्रीक (हेलनीज) जमातींनीं इटलीच्या दक्षिण भागांत नगरराज्यें स्थापिलीं. त्यांच्यापासून लॅटिन्सनी लिपी घेतली व ती रोमन लिपी बनली.

इ. स. पू. ७५३ टायबर नदीकांठीं लॅटिन्स जमातीनें रोम या नगरराज्याची स्थापना केली. उत्तरेकडील इट्रस्कन्झ व पूर्वेकडील वन्य जमाती यांच्यांशीं संबंध–व्यापार, दळणवळण व युद्ध प्रसंग. लॅटिन लोकांत पॅट्रिशन्झ (सरदार व अमीरउमराव) व प्लीबीयन्स (सामान्य लोक) हे वर्ग. रोममध्यें पहिल्यानें राजसत्ता, पण पुढें पॅट्रिशन्झनीं प्लीबीयन्सच्या मदतीनें लोकसत्ताक राज्य स्थापिलें (इ. स. पू. ५०९)

इ. स. पू. ५०९–२८७ पॅट्रिशन्झ व प्लीबीयन्स यांमधील भेद कमी झाले. पूर्वी कायदा अलिखीत व रूढीवर आधारलेला. इ. स. ४५० कायदा निश्चित व तो ब्रान्झच्या पटावर १२ कोष्टकांत खोदण्यांत आला. प्लीबियन्सचें हित पहाण्यास ट्रिब्यून अधिकारी. पॅट्रिशन्झ व प्लीबियन्स यांमधील लग्न संबंध कायदेशीर.

इ. स. पू. ३९० गॉल लोकांची रोमवर स्वारी. रोमचा पराभव. मोठी खंडणी घेऊन गॉल लोक परतले. त्यांच्या स्वारीमुळें उत्तरेकडील इट्रस्कन्स लोकांची सत्ता कमकुवत.

रोमचें इटलीवर वर्चस्व इ. स. पू. ३९०–२७०

रोमनें लेशियममधील इतर लॅटिन्स लोकांच्या नगरराज्यांचा पराभव केला.

पण त्यांच्याशीं आपुलकीचें धोरण. त्यांस रोमन नागरिकत्वाचें हक्क (इ. स. पू. ३३८–३३६).

पूर्वेकडील वन्य जमातींचा (सॅमनाइटस) पराभव. त्यांस सवलती व त्यांस आपलेसें केलें (इ. स. पू. २९०–२८०). दक्षिण इटलींतील ग्रीक नगरराज्यांचा पराभव (इ. स. पू. २७०), त्यांच्याशीं तडजोडीचें धोरण.

जिंकलेल्या प्रदेशांसंबंधीं व तेथील लोकांसंबंधीं रोमचें धोरण–जिंकलेलीं राज्यें खालसा न करितां त्यांच्यापासून खंडणी घेणें व त्यांस आपला राज्यकारभार करू देणें, त्या राज्यांत रोमन ठाणीं स्थापन करणें. तेथें जाण्यास रस्ते व दळणवळण. ठाण्यांत रोमन लोकांच्या वसाहती. रोमन संस्कृति, भाषा, रीतीरिवाज यांचा या ठाण्यांमार्फत प्रसार.

कार्थेजशीं (फीनीशियन लोक–प्युनिक लोक) युद्धें–प्युनिक युद्धें (इ. स. पू. २६४–१४६). व्यापार व वसाहती यांबद्दल स्पर्धा.

तीन युद्धें. कार्थेजचा पराभव. पश्चिम भूमध्य समुद्रावर रोमचें वर्चस्व.

पूर्व भूमध्य समुद्रालगतच्या–ग्रीस, आशियामायनर, सीरिया, पॅलेस्टाईन, इजिप्त प्रदेशावर रोमचें वर्चस्व इ. स. पू. २८० ते ३०).

इटलीमधील अंतस्थ बाबी—

(१) रोमचें वैभव वाढलें–संपत्तीचा ओघ रोमकडे. इमारती, पूल, रस्ते, पाणी आणण्यासाठीं बांधीव नळ, व्यापार व कलाकौशल्य यांत वाढ.

(२) राजकीय बाबी–रोमन साम्राज्यांतील लोकांस नागरिकत्वाचे अधिकार, तरी रोममध्यें जाऊन त्यांचा उपयोग करणें पुष्कळांस अशक्य. लोकसभेसाठीं निवडणूक करण्यासाठी मालमत्तेवर आधारलेले विभाग त्यामुळें श्रीमानवर्गाचें महत्त्व. कॉन्सल (राज्यकारभार करणारे वरिष्ठ अधिकारी) दोन, त्यांत मतभेद झाल्यास सीनेटचा सल्ला. सीनेटमध्यें वरिष्ठ वर्गाचे प्रतिनिधी व त्यांत सेवानिवृत्त वरिष्ठ अधिकाऱ्यांची नेमणूक त्यामुळें सीनेटचें महत्त्व.

(३) सामाजिक व आर्थिक–गुलामांकडून शेती, सामान्य शेतकऱ्यांची हलाखीची स्थिति. आर्थिक विषमता. बेकारी, ती नाहींशी करण्याचे टायबिरियस ग्रॅकस व गेयस ग्रॅकस यांचे प्रयत्न. पण त्यांचा खून.

(४) सत्तेसाठीं स्पर्धा–मेरिअस व सला; पाँपी व सीझर

सीझरकडे सर्वाधिकार. त्याचा खून. इ. स. पू. ४४

ऑक्टेव्हिअन व ॲन्टोनी हे कॉन्सल. त्यामध्यें स्पर्धा व वितुष्ट. ॲन्टोनीचा पराभव व आत्महत्या. ऑक्टेव्हिअन हा प्रमुख सेनापति, राज्यप्रमुख व

सम्राट सीनेटच्या इच्छेनें (इ. स. पू. २७). इ. स. पू. ५०९ ते २७ लोकसत्ताक राज्य. इ. स. पू. २७ ते इ. स. पू. ४७६ साम्राज्य. सम्राटाच्या हातीं अनियंत्रित सत्ता. कांहीं सम्राटः–

आक्टेव्हिअन ऑगस्टस (इ. स. पू. २७ ते इ. स. १४)–सुवर्ण युग. वाङ्मय, कलाकौशल्य, व्यापार व उद्योगधंदे यांत वाढ.

डायोक्लेशियन (२८४–३०५)–राज्यकारभाराचे सोयीसाठीं साम्राज्याचे चार विभाग.

कॉन्स्टटाइन (३०६–३३७)–साम्राज्याचे पश्चिम व पूर्व विभाग. पूर्व विभागाची राजधानी बिझँशिअम; व ते प्रमुख केंद्र. ख्रिश्चन धर्मावरील निर्बंध रद्द. कॉन्स्टटाईन ख्रिस्ती धर्मी. वन्य जमातींचे हल्ले व पश्चिम रोमन-साम्राज्याचा नाश. इ. स. ४७६

पूर्व रोमन साम्राज्य ३३० ते १४५३. उस्मानी तुर्कांनीं १४५३ मध्यें नाश केला.

रोमचा सांस्कृतिक ठेवा–जागतिक राज्याची कल्पना; कायदा (जस्टीनियन यानें संकलन केलें); बांधकाम–इमारती, रस्ते, पूल; लॅटिन भाषा; ग्रीक व रोमन संस्कृतीचा प्रसार.

ख्रिस्ती धर्माची स्थापना व त्याचा रोमन साम्राज्यांत व इतरत्र प्रसार

जीसस ख्राइस्ट–इ. स. पू. ४ जन्म. जन्मानें ज्यू. ज्यू लोकांतील कर्मठपणा, संकुचितपणा व विषमता; अधिकाऱ्यांचें स्वार्थी वर्तन यांबद्दल तिटकारा. मानवतेचा उपदेश. समाजसेवा हीच ईश्वरसेवा. ईश्वराचा प्रेषित–स्वर्गाचें राज्य प्राप्त करून देणारा. ज्यू धर्माधिकाऱ्यांचा विरोध. राजद्रोही पाखंडी म्हणून रोमन अधिकाऱ्याकडून फांशी. ख्रिश्चन धर्माचा प्रसार त्यांचे शिष्य व अनुयायी यांजकडून ज्यू नसलेल्यांना ख्रिस्ती धर्मांत प्रवेश पॉलच्या सूचनेवरून. बायबल–जुना करार (ज्यू लोकांचा इतिहास); जगाचा उद्धार करणारा प्रेषित येणार ही कल्पना. नवा करार–हा प्रेषित म्हणजेच येशू ख्रिस्त. त्याचीं वचनें, उपदेश यांचे त्याच्या प्रमुख शिष्यांकडून स्पष्टीकरण.

कॉन्स्टटाईन ख्रिस्ती धर्म स्वीकारतो. इ. स. ३३७. थिओडोशियन याच्या फर्मानानें ख्रिस्ती धर्म रोमन साम्राज्यांतील अधिकृत धर्म.

ख्रिस्ती धर्माची व्यवस्था–प्रमुख शहरीं बिशप हे धर्माधिकारी–जेरूसलेम, रोम, कॉन्स्टाटिनोपल, अँटिऑक. रोम व कॉन्स्टाटिनोपल हीं राजधानीचीं ठिकाणें म्हणून तेथील बिशपांचें विशेष महत्त्व.

प्रकरण ६ वें

प्राचीन काळांतील पौर्वात्य देश, तेथील राज्यें व घडामोडी

(इ. स. पू. ३०० ते इ. स. १२५० सुमारें)

(१) प्राचीन भारत (२) प्राचीन चीन (३) प्राचीन इराण
(४) महंमद, इस्लामी धर्माची स्थापना, प्रसार व खिलाफत

प्राचीन भारत

(इ. स. पू. ३२२ ते इ. स. १२०६)

(अ) भारतांतील राज्यें व साम्राज्यें :—

मौर्य साम्राज्य (इ. स. पू. ३२२ – इ. स. पू. १८४)

मौर्य साम्राज्याची स्थापना व विस्तार—उत्तर भारतामध्यें मगधचें साम्राज्य प्रबल होतें, पण तेथील नंद घराण्यांतील सम्राट धनानंद हा जुलमी असल्यामुळें राज्यांत असंतुष्टता होती. मगधच्या साम्राज्यांतील **चंद्रगुप्त** मौर्य व त्याच्या गुरुस्थानीं असलेला त्याचा सल्लागार **चाणक्य** यांचेंही धनानंदाशीं वितुष्ट आलेलें होतें. तेव्हां त्यांनीं इतर कांहीं राजांची मदत मिळवून मगध येथें राजक्रान्ति घडवून आणून मौर्य घराण्याची स्थापना केली (इ. स. पू. ३२२). चंद्रगुप्तानें चाणक्य यास आपला मुख्य मंत्री नेमिले. चंद्रगुप्तानें पहिल्या पंधरा वर्षांत नर्मदेच्या उत्तरेकडील व पश्चिमेकडील सिंधू नदीपर्यंतच्या प्रदेशांतील सर्व लहानमोठीं राज्यें पादाक्रान्त करून मोठें साम्राज्य स्थापन केलें. अशी स्थिति असतां अलेक्झांडरच्या मृत्यूनंतर पश्चिम आशियांतील प्रदेशावर राज्य करणारा ग्रीक राजा सील्यूकस निकेटर यानें इ. स. पू. ३०५ या वर्षी मोठें सैन्य घेऊन मौर्य साम्राज्यावर स्वारी केली, पण चंद्रगुप्तानें त्याचा पराभव केला. तेव्हां त्यानें चंद्रगुप्ताशीं तह करून सिंधू नदीच्या पलीकडील गांधार प्रदेशांतील हिरातपर्यंतचा प्रदेश चंद्रगुप्तास दिला. सील्यूकसनें **मेगॅस्थेनिस** नांवाचा आपला राजनैतिक वकील चंद्रगुप्ताच्या दरबारीं पाठविला. मेगॅस्थेनिस

येथें असतां त्यानें चंद्रगुप्ताची राज्यव्यवस्था व भारतीय लोक यांसंबंधाची हकीकत लिहून ठेविली.

चंद्रगुप्ताचा मुख्य प्रधान चाणक्य यानें राजनीति, राज्यव्यवस्था, युद्धशास्त्र व अर्थशास्त्र वगैरे विषयांवर 'अर्थशास्त्र' नांवाचा एक वैशिष्ट्यपूर्ण ग्रंथ संस्कृत भाषेत इ. स. पू. ३०० च्या सुमारास लिहिला. हा ग्रंथ राजकारणी पुरुषांकडून आधारभूत मानला जाऊन त्याचें प्राचीन काळीं भारतामध्यें अध्ययन केलें जाई.

चंद्रगुप्त इ. स. पू. २९८ च्या सुमारास मरण पावला.

थोर अशोक (इ.स.पू. २७४–२३२)—चंद्रगुप्ताचा मुलगा बिंदुसार यानें सुमारें २६ वर्षें राज्य केल्यावर त्याचा मुलगा अशोक हा सम्राट झाला. अशोक हा महत्त्वाकांक्षी होता. मौर्य साम्राज्याची वृद्धि दक्षिण भारतांतही करावी या हेतूनें त्यानें कावेरीच्या उत्तरेकडील कांहीं द्रविड राज्यांवर आपलें वर्चस्व बसविलें. यानंतर पूर्वेकडील प्रदेशाशीं व्यापार करून संपन्न व प्रबल झालेल्या कलिंग या राज्यावरही त्यानें स्वारी केली. कलिंगच्या राजानेंही आपल्या मोठ्या सैन्यासह अशोकच्या सैन्यास तोंड दिलें, पण कलिंगचा पराभव झाला (इ. स. पू. २६२). या युद्धांत अशोकाला जय मिळाला, तरी सुमारें दीड लक्ष माणसें युद्धांत ठार झालीं. त्यामुळें अशोकाचें मन उद्विग्न झालें. यानंतर त्यानें युद्ध करून प्रदेश-विस्तार करण्याचा व साम्राज्य वाढविण्याचा प्रयत्न न करितां बौद्धधर्माचा स्वीकार केला व अहिंसेचा संदेश देणाऱ्या बौद्धधर्माचा प्रसार करण्याचा निश्चय केला. त्यामुळें त्याच्या या पुढील धोरणास निराळी दिशा लागून त्याप्रमाणें त्याचें आचरण झाल्यानें जगाच्या इतिहासावर महत्त्वाचे परिणाम घडले. त्यानें आपल्या सर्व अधिकाऱ्यांस नीतितत्त्वांप्रमाणें, दयाशीलपणें व सहृदयतेनें राज्यकारभार करण्यासाठीं सूचना दिल्या. अहिंसाव्रताचें पालन व्हावें म्हणून राजवाड्यांत होणारी प्राणिहत्या व मांसाशन बंद केलें. बुद्धाचें निर्याण होऊन तीन शतकें झालेलीं होतीं व बौद्धपंथाबद्दल जनतेस उदासीनता वाटत होती. तेव्हां बौद्धपंथाचा प्रसार करण्यासाठीं आपल्या साम्राज्यांतील निरनिराळ्या भागांतच नव्हे, तर भारतांतील इतर राज्यांत, त्याचप्रमाणें भारताबाहेरच्या दूरदूरच्या देशांतही त्यानें प्रचारक पाठविले व गौतम बुद्धाचा अहिंसेचा, मानवतेचा व विश्वबंधुत्वाचा संदेश सर्वत्र पाठविला. ज्या ठिकाणीं अशोकानें

प्रचारक पाठविले तीं राज्यें व देश म्हणजे काश्मीर, लंका, ब्रह्मदेश, सीरिया, इजिप्त, मॅसिडोनिया, इपिरस (ग्रीसमधील) हीं होत. पाटलीपुत्र येथें अशोकानें बौद्धधर्मीयांची एक परिषद भरविली (इ. स. पू. २५३). बुद्धाचा संदेश आपल्या साम्राज्यांतील जनतेस नेहमी व चिरकाल मिळत जावा या उद्देशानें अशोकानें गौतमबुद्धाच्या शिकवणुकींतील उच्च नीतितत्त्वें, सदाचार, मानवता, विश्वबंधुत्व, अहिंसा यासंबंधाचीं वचनें सर्वांस समजावींत म्हणून तीं प्राकृत भाषेंत (पाली वगैरे) दगडावर खोदविलीं व हे शिलालेख व स्तंभलेख जेथें पुष्कळसा जनसमूह जमा होतो अशा आपल्या साम्राज्यांतील निरनिराळ्या यात्रेच्या व महत्त्वाच्या ठिकाणीं उभारले. तसेंच अशोकानें सांची (भोपाळजवळ) येथें एक मोठा स्तूप बांधला. बौद्ध भिक्षूंस रहाण्यासाठीं ठिकठिकाणीं विहार व मठ बांधिले. ठिकठिकाणीं माणसांसाठीं, त्याचप्रमाणें इतर प्राण्यांसाठींही ऋग्णालयें काढलीं. अशाप्रकारें ३७ वर्षें राज्य करून व सर्वांचें प्रेम संपादन करून अशोक इ. स. पू. २३७ मध्यें मरण पावला.

अशोकानंतर मौर्य साम्राज्यास उतरती कळा लागली. दक्षिण भारतांत आंध्रांचें राज्य (शालिवाहन घराणें) व कलिंगाचें राज्य (चेदी घराणें) यांनीं इ. स. पू. २२० च्या सुमारास आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें. भारताच्या वायव्य सरहद्दीवरील भाग व पंजाब प्रांत यांवर सरहद्दीवर असलेल्या ग्रीक राजांनीं स्वारी करून तो प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणला (इ. स. पू. १९० च्या सुमारास). इ. स. पू. १८५ मध्यें मौर्यांचा सम्राट बृहद्रथ यास त्याचा सेनापति पुष्पमित्र शुंग यानें ठार मारून मगधचें राज्य बळकाविलें. शुंग व कण्व घराण्यांनीं कांहीं वर्षें राज्य केल्यावर इ. स. पू. २७ मध्यें आंध्रांनीं मगधवर आपलें वर्चस्व बसविलें.

आंध्राचें साम्राज्य (इ. स. पू. २०० ते इ. स. २४९)—कृष्णा व गोदावरी या नद्यांच्या प्रदेशांत आंध्राचें प्रबल राज्य होतें. या राज्यानें आपली सत्ता पश्चिमेस व पूर्वेस बरीच वाढविली व मगधवरहि इ. स. पू. २७ च्या सुमारास आपलें वर्चस्व बसविलें. येथें राज्य करणाऱ्या घराण्यास शालिवाहन घराणें असें म्हणत. त्यांची राजधानी पहिल्यानें धरणीकंटक व नंतर गोदावरीच्या काठीं प्रतिष्ठान (पैठण) ही झाली. शालिवाहन घराण्यांत गौतमीपुत्र शातकर्णी हा प्रसिद्ध राजा होऊन गेला. त्यानें शक लोकांच्या दक्षिण भारतांत होणाऱ्या

आक्रमणास विरोध करून त्यांचा पराभव केला व नर्मदेच्या उत्तरेकडील शकांचा पराभव करून काठेवाड, गुजराथ व माळवा हे प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणले (इ. स. १२० च्या सुमारास). यानंतर त्याचा पुत्र पुलमायी हा आंध्रांचा राजा झाला. याच्या कारकीर्दीत शकांचा क्षत्रप रुद्रदामन यानें नर्मदेच्या उत्तरेकडील प्रदेश पुनः आपल्या वर्चस्वाखालीं आणून उज्जयिनी ही आपली राजधानी केली.

आन्ध्रांच्या कारकीर्दीत बौद्ध भिक्षूंस राहण्यासाठीं पश्चिम भागांतील डोंगरांत अनेक लेणीं खोदण्यांत आलीं. हीं लेणीं खोदण्याचें काम अनेक शतकें चालूं होतें व त्यास राज्यांतील व्यापारीवर्गानें सढळ हातानें मदत केली. या लेण्यांपैकीं कार्ले, कान्हेरे, अजिंठा, नाशिक येथील लेणीं प्रसिद्ध आहेत. आन्ध्रांच्या नाण्यांवर हत्तीचें त्याचप्रमाणें जहाजाचें चित्र असे. पुढें या राज्यास उतरती कळा लागून त्याचीं वेगवेगळीं छकलें झालीं व तें नामशेष झालें (इ. स. २४९ च्या सुमारास).

परकीयांच्या स्वाऱ्या— मौर्य साम्राज्य कमकुवत झाल्यावर वायव्य सरहद्दीवरील प्रदेशांत ग्रीक सरदारांनीं इ. स. पू. १७५ पासून आपलीं राज्यें स्थापन केलीं. यानंतर शकांनीं ग्रीकांचीं राज्यें जिंकून घेतलीं व पंजाब, सिंध, काठेवाड, गुजराथ, माळवा वगैरे प्रदेशांवर आपलें वर्चस्व बसवून तेथें आपलीं राज्यें स्थापन केलीं. अशी परिस्थिति असतां चीनच्या पश्चिम सरहद्दीवरील कुशाण या भटक्या जमातींनीं इ. स. ४८ च्या सुमारास गांधार प्रदेशावर आपलें वर्चस्व बसविलें. यानंतर कांहीं वर्षांनीं त्यांचा राजा २ रा कॅडिफेसस यानें पंजाबवर स्वारी करून शकांचा पराभव केला व तक्षशिला येथें आपलें राज्य स्थापन केलें. तसेंच सिंध, काठेवाड, माळवा या भागांत पसरलेल्या शक जमातींचा पराभव करून त्यांस आपलें मांडलिक केलें. त्याचप्रमाणें ऑक्सस नदीच्या उत्तरेकडील मध्य आशियांतील प्रदेशांतही त्यानें आपल्या राज्याचा विस्तार केला. शक, पार्थियन, कुशाण या सर्व परकीय जमातींस भारतीय लोक शक या नांवानेंच ओळखीत. या सर्व परकीय जमातींनीं भारतांत आल्यावर एकदोन शतकांतच भारतांतील हिंदु, बौद्ध व जैन यांपैकीं एका धर्माचा स्वीकार केला व ते भारतीय संस्कृतींत मिसळून गेले.

कुशाण सम्राट कनिष्क--(इ. स. १२० ते १६२) २ ऱ्या कॅडफिसेसनंतर कनिष्क हा कुशाण लोकांचा राजा झाला. त्याची पुरुषपुर (पेशावर) ही राजधानी होती. त्यानें मध्य आशियांतील खोतान, यारकंद व काशगर हे प्रदेश काबीज केले. चीनपासून युरोपकडे जाणारे व्यापारी मार्ग या प्रदेशांतून जात असल्यामुळें या प्रांताचें व्यापारी महत्त्व मोठें होतें.

कनिष्क व कुशाण लोक यांनीं बौद्धधर्म स्वीकारला व त्याचा प्रसार केला व कुशाणांचें साम्राज्य चीनच्या सरहद्दीपर्यंत पसरलें असल्यामुळें मध्य आशिया, तिबेट, चीन या प्रदेशांत महायानपंथी बौद्ध धर्माचा प्रसार झाला. कनिष्क हा इ. स. १६२ मध्यें मरण पावला. त्याच्यानंतर कुशाण साम्राज्यास उतरती कळा लागली व साम्राज्यांतील निरनिराळ्या भागांत अनेक स्वतंत्र राज्यें निर्माण झालीं (इ. स. २२० च्या सुमारास).

स्मृति-ग्रंथ व इतर वाङ्मय—इ. स. पू. २०० पासून इ. स. २०० वर्षांच्या काळांत ग्रीक, शक, पार्थियन, कुशाण वगैरे परकीय जमातींचें भारतांत मोठ्या प्रमाणांत आगमन होऊन त्यांचीं राज्यें व साम्राज्यें स्थापन झाल्यामुळें वर्णसंकर होऊन पूर्वीची समाजरचना विस्खलित होऊं लागली. तेव्हां त्यावेळच्या परिस्थितीचा विचार करून हिंदुधर्मांतील सामाजिक बाबींसंबंधानें व समाजधारणेसंबंधानें निरनिराळ्या विद्वानांनीं स्मृतिग्रंथ लिहिले. त्यांपैकीं ' मनुस्मृति ' हा ग्रंथ विशेष प्रसिद्ध आहे. यांत हिंदु समाजांतील ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चार वर्णांचीं कर्तव्यें, चार आश्रमांत पाळावयाचे नियम पतिपत्नींचीं कर्तव्यें, पत्नी, अपत्य, वारस यांचे हक्क, प्रायश्चित्त वगैरे बाबींसंबंधाचे आचारधर्म यासंबंधीं सूचना केलेल्या आहेत. सामाजिक व धार्मिक आचारासंबंधीं हा ग्रंथ आधारभूत धरिला जाई.

यासेरीज पतंजलीचें महाभाष्य, अश्वघोषाचें बुद्धचरित्र, गुणाढ्य याचा बृहत्कथा, चरक याचा वैद्यकीवरील ग्रंथ, नागार्जुनाचे तत्त्वज्ञानावरील ग्रंथ, भासाचीं नाटकें, हे ग्रंथ या काळांतील होत.

गुप्तांचें साम्राज्य—(इ. स. ३२० ते ४५५) इ. स. पू. २७ पासून इ. स. २४९ पर्यंत दक्षिणेकडील आन्ध्रांची मगधवर सत्ता होती, पण त्यानंतर आंध्रांचें साम्राज्य मोडकळीस आल्यावर मगधमधील गुप्त वंशांतील चंद्रगुप्त

या नांवाच्या सरदारानें लिच्छवी लोकांची मदत घेऊन पाटलिपुत्र येथें गुप्त घराण्याची सत्ता स्थापन केली (इ. स. ३२०). गादीवर आल्यावर चंद्रगुप्तानें अयोध्या व प्रयागपर्यंतचा प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणून आपलें राज्य वाढविलें. त्याच्यानंतर त्याचा मुलगा समुद्रगुप्त हा गादीवर आला.

समुद्रगुप्त (इ. स. ३३०–३७५)—समुद्रगुप्त हा महत्त्वाकांक्षी होता. गादीवर आल्यावर पहिल्या दहा वर्षांत त्यानें चोहोंबाजूंस आपल्या राज्याची वाढ केली व पंजाब, अवंती (माळवा), सिंध हे प्रदेश सोडून उत्तर भारतांतील उत्तरेस हिमालय पर्वतापासून दक्षिणेस नर्मदा नदीपर्यंतचा सर्व प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणला व आपलें साम्राज्य स्थापन केलें. यांपैकीं कांहीं प्रदेश त्याच्या प्रत्यक्ष वर्चस्वाखालीं होता व कांहींवर मांडलिक राजे होते. त्यानें इ. स. ३४०–४२ च्या दरम्यान दक्षिण भारतावर स्वारी केली व कलिंग, कांचीचे पल्लव, म्हैसूरजवळचा प्रदेश व पश्चिम किनाऱ्यावरील राजांस आपलें मांडलिक करून त्या भागांवर आपलें सार्वभौमत्व प्रस्थापित केलें.

समुद्रगुप्त हा पराक्रमी होता, त्याचप्रमाणें विद्याव्यासंगी व कलाप्रेमीहि होता. हिंदुधर्माच्या, त्याचप्रमाणें बौद्धधर्माच्या विद्वान् व गुणी लोकांस तो आश्रय देई. समुद्रगुप्त इ. स. ३७५ मध्यें मरण पावला.

दुसरा चंद्रगुप्त—(इ. स. ३७५ ते इ. स. ४१३)—समुद्रगुप्तानंतर त्याचा पुत्र चंद्रगुप्त गादीवर आला. त्यानें स्वतःस विक्रमादित्य ही पदवी धारण केली. हाही महत्त्वाकांक्षी व पराक्रमी होता. त्यानें पूर्वेकडील वंग राज्यावर स्वारी करून तो प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणला. यानंतर चंद्रगुप्तानें उज्जयिनी येथें राज्य करणारा प्रबल शक राजा रुद्रसिंह यास ठार मारून शकांचें राज्य जिंकून घेतलें. त्यामुळें पश्चिम भारतांतील माळवा, गुजराथ, सौराष्ट्र या प्रदेशांवर चंद्रगुप्ताचें वर्चस्व स्थापन झालें.

इ. स. १ ल्या शतकांत बौद्धधर्माचा चीनमध्यें शिरकाव होऊन त्याचा तेथें उत्तरोत्तर प्रसार होत गेला व तो चीनमधील एक प्रमुख धर्म बनला. तेव्हां चीनमधील बौद्धधर्मीय भिक्षु यात्रेकरू, त्याचप्रमाणें विद्वान् गृहस्थ गौतम बुद्धाची जन्मभूमि जें भारत त्यामधील गौतमबुद्धाच्या जीवनांतील प्रसंगांशीं निगडित असलेलीं बौद्ध धर्मीयांचीं यात्रेचीं ठिकाणें यांचें दर्शन घेण्यासाठीं,

त्याचप्रमाणें बौद्धधर्मीयांचें संस्कृत, मागधी, पाली या भाषांमध्यें असलेल्या वाङ्मयाचें अध्ययन करण्यासाठीं भारतामध्यें येत असत. २ ऱ्या चंद्रगुप्ताच्या कारकीर्दीत अशाच चिनी लोकांपैकीं **फा-हेन** नांवाचा चिनी भिक्षु व पंडित मध्य आशिया व काश्मीर या मार्गानें भारतांत आला व येथें ९ वर्षें (४०५-४१४) वास्तव्य करून ओरिसामधील ताम्रलिप्ती या बंदरांतून सीलोन व जाव्हा या बेटांस भेटी देऊन समुद्रमार्गें परत गेला. येथें असतांना त्यानें बौद्ध धर्मीयांच्या प्राचीन ग्रंथांचें परिशीलन केलें.

गुप्त साम्राज्याचा ऱ्हास (इ. स. ४१३ ते ४६७)— २ ऱ्या चंद्रगुप्तानंतर १ ला कुमारगुप्त व त्यानंतर स्कंदगुप्त (४५५-६७) हे सम्राट झाले. स्कंदगुप्ताच्या कारकीर्दीत भारताच्या वायव्य सरहद्दीवरून हूण लोकांच्या टोळ्या भारतांत घुसूं लागल्या. हे हूण लोक मध्य आशियांतील गवताळ भागांत रहात असत. त्यांच्यापैकीं कांहीं टोळ्या पश्चिमेकडे यूरोपमध्यें गेल्या व त्यांनीं रोमन साम्राज्यावर स्वारी केली, व कांहीं दक्षिणेकडे येऊन त्यांनीं भारतावर स्वारी केली (४५५ च्या सुमारास). स्कंदगुप्तानें त्यांचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला, पण त्यास यश मिळालें नाहीं. त्यामुळें भारताच्या वायव्य भागांत हूणांचें वर्चस्व स्थापन झालें. त्याचप्रमाणें गुप्तसाम्राज्यांतील ठिकठिकाणचे मांडलिक राजे स्वतंत्र झाले, व गुप्तांची सत्ता मगधपुरतीच मर्यादित झाली.

वायव्य भारतांत हूणांचें वर्चस्व (इ. स. ४७०-५२८)—तोरमण हा हूणांचा नेता होता. त्यानें भारताच्या वायव्येकडील भागांत आपलें वर्चस्व स्थापन केलें. तोरमणाच्या मृत्यूनंतर (५१०) **मिहिरगुल** हा हूणांचा राजा झाला, व त्यानें सकाला (सिआलकोट) येथें आपली राजधानी स्थापून पंजाब, काश्मीर, व सिंध हे प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणले. हा फार क्रूर व जुलमी होता. त्यानें माळव्यावर स्वारी करून आपलें राज्य वाढविण्याचा प्रयत्न केला, पण मध्यभारतांतील राजा **यशोधर्मन्** व आणखी कांहीं राजे यांनीं आपसांत संघ स्थापन करून इ. स. ५२८ मध्यें मीहिरगुलचा पराभव केला, त्यामुळें हूणांच्या वाढत्या सत्तेस आळा बसला. हूणांच्या प्रमाणें गुर्जर लोकांच्याही कांहीं जमाती भारतांत आल्या व त्यांनीं हूणांप्रमाणें राजपुताना काठेवाड, गुजराथ या भागांत लहान लहान राज्यें स्थापन केलीं. यानंतर

हूणांनीं आपली सत्ता वाढविण्याचा प्रयत्न केला, पण यमुनेच्या कांठीं असलेल्या स्थानेश्वर येथील **प्रभाकरवर्धन** या राजानें हूण व गुर्जर यांचा पराभव केल्यामुळें पंजाब, सिंध, राजपुताना व काठेवाड या भागाव्यतिरिक्त भारताच्या इतर भागांत हूणांच्या राज्याचा विस्तार झाला नाहीं.

हर्षाचें साम्राज्य (इ. स. ६०६ ते ६४७)—प्रभाकरवर्धनानंतर त्याचा धाकटा मुलगा हर्ष हा कांहीं दिवसांनीं राजा झाला. हर्ष हा कर्तबगार, शूर व महत्त्वाकांक्षी होता. राजा झाल्यावर त्यानें आपल्या सैन्याची खूप वाढ केली. आसामपासून राजपुतान्यापर्यंत व हिमालयापासून नर्मदानदीपर्यंतचा प्रदेश त्यानें आपल्या वर्चस्वाखालीं आणिला. यानंतर हर्षानें नर्मदा नदीच्या दक्षिणेकडील प्रदेशावर आपलें वर्चस्व बसविण्यासाठीं स्वारी केली, पण त्या प्रदेशाच्या चालुक्य घराण्यांतील राजा २ रा पुलकेशी यानें त्यास तोंड देऊन नर्मदेच्या कांठीं हर्षाचा पराभव केला (इ. स. ६२०). हर्षानें गंगेच्या कांठीं असलेलें **कनोज** हें आपलें राजधानीचें ठिकाण केलें. हर्ष सम्राट होता, तरी राज्यकारभाराचें काम करण्याचा त्यानें कधीं कंटाळा केला नाहीं. आपल्या हाताखालच्या सर्व मंत्र्यांकडून त्याचप्रमाणें निरनिराळ्या खात्यांकडून योग्यप्रकारें काम होतें कीं नाहीं हें तो स्वतः पहात असे व लोकांच्या तक्रारी ऐकून त्यांचें निवारण करी. साम्राज्यांतील निरनिराळ्या भागांस तो स्वतः भेटी देई व तेथील कारभार नीट चालला आहे कीं नाहीं तें पाही.

हर्षानें महायानपंथी बौद्धधर्म स्वीकारिला. त्यानें बौद्ध भिक्षूंसाठीं राज्यांत ठिकठिकाणीं मोठे प्रशस्त विहार बांधले. या विहारांतून हजारों भिक्षू रहात. तो दर पांच वर्षांनीं एक विद्वान् लोकांची परिषद भरवी व त्यावेळीं गेल्या पांच वर्षांत सांठलेली संपत्ति धर्मादाय म्हणून वाटून टाकी. हर्षाच्या कारकीर्दीत ह्युएनत्संग नांवाचा एक चिनी विद्वान् पंडित भारतांत येऊन गेला. त्याचें येथें पंधरा वर्षें (६३०-६४५) वास्तव्य होतें व या काळांत त्यानें भारतांमधील निरनिराळ्या राज्यांस भेटी दिल्या. त्यानें बौद्धधर्मीय तीर्थक्षेत्रांप्रमाणें येथील विद्यापीठें व इतर महत्त्वाचीं ठिकाणें पाहिलीं व येथील लोक, त्यांच्या सामाजिक चालीरीती, रितीरिवाज यांसंबंधीं माहिती ग्रथित करून ठेविली.

येथें १५ वर्षें वास्तव्य करून ह्युएनत्संग परत चीनला गेल्यावर त्यानें

भारतांतून नेलेले हस्तलिखित ग्रंथ, कागदपत्र यांचें संकलन करून त्यांचें चिनी भाषेंत भाषांतर करण्यांत आपलें पुढील आयुष्य खर्च केलें.

सम्राट हर्ष हा इ. स. ६४७ मध्यें मरण पावला.

गुप्त-हर्षांचें सुवर्णयुग (इ. स. ३२० ते ६४७)—गुप्तहर्षांच्या सुमारें ३०० वर्षांच्या काळांत भारताचा राजकीय, व्यापारविषयक, वाङ्मय, विद्या, कला; शास्त्र वगैरे बाबतींत उत्कर्ष होऊन भारताचें सर्वांगीण वैभव वाढल्यामुळें या काळास 'सुवर्णयुग' असें म्हणण्यांत येतें.

व्यापार—गुप्तांची सत्ता स्थापन होण्यापूर्वी उत्तर भारतांतील मगध येथील साम्राज्याचा समुद्रमार्गें होणारा व्यापार पूर्वकिनाऱ्यावरील विशेषतः तांम्रलिप्ती या बंदरांतूनच चाले व तो पूर्वेकडील जाव्हा, सुमात्रा, चंपा, चीन, लंका, या देशांशीं असे. रोमन साम्राज्य, पश्चिम आशियांतील देश व इजिप्त या देशांशीं व्यापार दक्षिणेकडील केरळ, चोल, पांड्य, आन्ध्र हीं राज्यें करीत. पण २ ऱ्या चंद्रगुप्तानें शकांचा पराभव करून उज्जयिनी येथें आपलें वर्चस्व स्थापन केल्यावर पश्चिम किनाऱ्यावरील भडोच, सोपारा, सुरत वगैरे बंदरें गुप्तसाम्राज्याच्या वर्चस्वाखालीं येऊन त्यामार्गें इजिप्त, पश्चिम आशिया व रोमन साम्राज्य या देशांशीं उत्तर भारतांतील गुप्त व हर्ष या साम्राज्यांचा मोठ्या प्रमाणांत व्यापार सुरू झाला व उत्तर भारताची व्यापारविषयक भराभराट होऊन त्याचें वैभव वाढलें. समुद्राप्रमाणें खुष्कीच्या मार्गानें व्यापार चाले. पाटलिपुत्र ते तक्षशीला व तेथून पुढें बॅक्ट्रियापर्यंत मोठा व्यापारी मार्ग होता. माल तेथून पुढें ऑक्सस नदीमार्फत मध्य आशियांत व तेथून काळ्या समुद्रांतून युरोपकडे जाई.

पुराणें—बहुतेक पुराणें इ. स. पू. ७०० ते इ. स. २०० या काळांत रचण्यांत आलीं. गुप्त काळांत या पुराणांचें संकलन करण्यांत येऊन त्यांत आणखी भर घालण्यांत आली.

महाकाव्यें—रामायण व महाभारत हीं महाकाव्यें इ. स. पू. ७ व्या शतकाच्या अगोदरपासून अस्तित्वांत होतीं. नंतरच्या काळांत त्यांत आणखी भर घालण्यांत आली व गुप्त काळांत त्यांचें शेवटचें संकलन झालें. महाभारतामध्यें 'भगवद्गीता' हा तत्त्वज्ञानविषयक भाग असून, जगांतील तत्त्वज्ञानविषयक ग्रंथांत तो विशेष महत्त्वाचा मानला जातो. निरनिराळ्या वर्णांचीं

कर्तव्यें जरीं वेगवेगळीं असलीं तरी ईश्वरास तीं सारखींच मान्य आहेत व मोक्ष मिळविण्यासाठीं सर्वसंगपरित्याग करून तप करण्याचीं किंवा यज्ञ-यागादि रुत्यें करण्याची आवश्यकता नाहीं, तर आपलें कर्तव्य निष्कामबुद्धीनें केल्यास मोक्ष मिळतो, हें भगवद्गीतेंत प्रतिपादिलें आहे.

नाट्य व काव्यग्रंथ—या काळांत मोठमोठे कवी व नाटककार होऊन गेले, व त्यांनीं उत्तमोत्तम नाट्य व काव्यग्रंथ रचिले. त्यामुळें संस्कृत भाषा प्रगल्भ होऊन तिचा विकास झाला. कालिदास हा २ रा चंद्रगुप्त यांच्या काळीं होऊन गेला. त्यानें शाकुंतल, विक्रमोर्वशीय व मालविकाग्निमित्र हीं नाटकें लिहिलीं. त्यांपैकीं शाकुंतल हें नाटक जगप्रसिद्ध असून त्याचीं युरोपियन भाषांत भाषांतरें झालीं आहेत. त्याचप्रमाणें त्यानें रघुवंश, कुमारसंभव, मेघदूत व ऋतुसंहार हीं काव्यें लिहिलीं.

विशाखादत्त यानें मुद्राराक्षस हा नाट्यग्रंथ याच काळांत लिहिला. चाणक्य व चंद्रगुप्त यांनीं मगध येथील नंदांची सत्ता उलथून पाडून राज्यक्रान्ति घडवून आणिली व मौर्यांची सत्ता तेथें स्थापन केली या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर या नाटकाची रचना केलेली आहे. तसेंच शूद्रक यानें 'मृच्छकटिक' हा नाट्यग्रंथ या काळांत लिहिला. विष्णुशर्मा यानें 'पंचतंत्र' हा ग्रंथ लिहून त्यांतील गोष्टींच्या योगें व्यवहार व राजकारण यांसंबंधी उपयुक्त सूचना दिल्या.

नृत्य व गायन यांची मदत घेऊन कृष्ण, व विष्णु यांच्या लीलांचें वर्णन नाट्यरूपानें दाखविण्याचा पूर्वी प्रघात होता, त्यास या काळांत व्यवस्थित स्वरूप आलें व निरनिराळ्या प्रसंगावर नाटकें रचून त्याचें नाट्य करून दाखविण्याचा प्रघात या काळांत रूढ झाला. समाजांतील सुसंस्कृत व विद्वान् लोकांच्या करमणुकीचा नाट्य हा एक प्रकार होता. त्यावेळीं देखावे वगैरे न दाखवितां नुसतें नाट्य करून दाखवीत.

या काळांत हर्षसेन हा एक कवि होऊन गेला. त्यानें समुद्रगुप्तानें केलेल्या पराक्रमाचें वर्णन केलेलें आहे. हर्षाच्या वेळीं बाण हा कवि होऊन गेला. त्यानें 'कादंबरी' नांवाचा संस्कृत भाषेंत कथात्मक ग्रंथ लिहिला. कथेच्या या प्रकारावरूनच कथात्मक मोठ्या ग्रंथास 'कादंबरी' हें नांव पुढें रूढ झालें. तसेंच त्यानें संस्कृत भाषेंत 'हर्ष-चरित' नांवाचा ग्रंथ लिहिला.

शास्त्र—भारतीयांनीं गणितशास्त्रांत बरीच प्रगति केलेली होती. अंकगणितांतील नऊ आंकडे व शून्य, त्याचप्रमाणें संख्येमध्यें स्थानपरत्वें आंकड्यांस प्राप्त होणारी किंमत या शोधांवर केवढ्याहि मोठ्या संख्येची सुलभरीतीनें गणना करण्याची पद्धत भारतीयांनीं इ. स. पू. ३ ऱ्या शतकाच्या अगोदर शोधून काढली होती. हे नऊ आंकडे व शून्य यासंबंधाचें ज्ञान भारतीयांपासून अरबांनीं ८ व्या शतकांत घेतलें. अरबापासून युरोपमधील लोकांस हे नऊ आंकडे व शून्य यांचें ज्ञान मिळालें म्हणून या आंकड्यांस युरोपमध्यें अरबी आंकडे असें म्हणण्यांत येऊं लागलें; व त्यांचा उपयोग करण्यांत येऊं लागला. यापूर्वी तेथें रोमन आंकडे प्रचारांत होते. भूमितीच्या बाबतींतही इ. स. पू. ७ व्या शतकापासून कांहीं सिद्धांत भारतीयांनीं मांडले होते. बीजगणितावर आर्यभट्ट (इ. स. ४७६) व भास्कराचार्य यांनीं ग्रंथ लिहिले.

आर्यभट्ट यानें (१) पृथ्वी आपल्या आंसाभोंवतीं फिरते व (२) चंद्रग्रहण व सूर्यग्रहण यांचीं कारणें कोणतीं या बाबतींत आपलें मत पुढें मांडलें होतें. भास्कराचार्य यानें आकाशांतील गोल आपल्या वजनाच्या मानानें इतर गोलांवर आकर्षण करितात हा सिद्धांत पुढें मांडला.

चरक व सुश्रुत यांचे वैद्यकीवरील ग्रंथ या पूर्वीच्या काळीं तयार झाले होते. वनस्पति व खनिज द्रव्यें यांपासून औषधें तयार करीत. रसायनशास्त्र व वनस्पतिशास्त्र यांत प्रगति होत होती.

भाषा, लिपि, लेखनसाहित्य वगैरे— प्राचीन काळीं आर्यांची प्राचीन संस्कृत ही भाषा होती. वेदवाङ्मय—वेदसंहिता, ब्राह्मणें, उपनिषदें वगैरे– या भाषेंत इ. स. पू. २५०० ते इ. स. पू. ७०० वर्षांपर्यंतच्या काळांत रचण्यांत आलीं. पण या प्रदीर्घ काळांत भाषेचें स्वरूप बदलत चाललें, तेव्हां या भाषेस नियमबद्ध स्वरूप यावें म्हणून पाणिनी यानें इ. स. पू. ७ व्या शतकांत 'अष्टाध्यायी' हा व्याकरण ग्रंथ लिहिला. ही संस्कृत भाषा बोलली जाई व हिच्यांत ग्रंथरचनाही केली जाई. आर्यांचा आर्येतरांशीं संबंध येत गेल्यावर अपभ्रंश स्वरूपांत संस्कृत भाषा बोलली जाई. उत्तर भारतामध्यें पाली भाषा (मागधी) निर्माण झाली व ती बहुजन समाजाच्या बोलण्यांत असे.

गौतमबुद्ध व महावीर यांनीं त्याचप्रमाणें पुढें अशोक यानें बौद्धधर्माच्या प्रसारासाठीं या पाली भाषेचा उपयोग केला व ठिकठिकाणचे शिलालेख व स्तंभलेख पाली भाषेंत व ब्राम्ही लिपींत खोदले. या ब्राम्ही लिपीपासूनच देवनागरी लिपि बनली गेली. अशोकानें वायव्येकडील भागांतील शिलालेखांस फक्त खरोष्ट्री लिपि उपयोगांत आणली होती. बौद्धांच्या जातककथा पाली भाषेंत लिहिलेल्या असत. बौद्धधर्मीय लोकांकडून पाली भाषेंत ग्रंथरचना करण्यांत येत असे, तरी हिंदुधर्मीयांकडून संस्कृत भाषेमध्यें व ब्राम्ही व पुढें देवनागरी लिपीमध्यें ग्रंथरचना करण्यांत येई. महायानपंथी बौद्धवाङ्मय संस्कृत भाषेमध्येंच लिहिण्यांत येऊं लागलें. यानंतर पुढें (९ व्या शतकापासून) भारतांतील निरनिराळ्या भागांत पाली किंवा मागधीप्रमाणें संस्कृतोद्भव प्राकृत भाषा प्रचारांत येऊं लागल्या व त्यांपैकीं प्रमुख म्हणजे शौरसेनी व महाराष्ट्री या होत. चाखेरीज आर्येतरांच्या भाषेस पैशाची असें म्हणत. अशा वेगवेगळ्या भाषा प्रचारांत येत गेल्या तरी भारतांतील सर्व भागांतील विद्वानांचीं, शास्त्रीपंडितांचीं संस्कृत हींच बोलण्याची भाषा होती व आपल्या ग्रंथास विद्वानांकडून मान्यता मिळावी म्हणून बहुसंख्य ग्रंथ संस्कृत भाषेंत लिहिले जात. गुप्त काळांत संस्कृत भाषेस उत्तेजन देण्यांत आल्यामुळें ही भाषा प्रगल्भ होऊन या भाषेंत विपुल ग्रंथरचना करण्यांत आली. संस्कृत नाट्यग्रंथांत ब्राह्मण, राजकर्ते, नायक यांच्या तोंडी संस्कृत भाषा, उच्च कुळांतील स्त्रियांचे तोंडी शौरसेनी भाषा व इतर पात्रांच्या तोंडीं मागधी भाषा घालण्यांत येत असे. भारतीयांनीं आग्नेय आशियांत, जाव्हा, सुमात्रा, इंडोचायना, सीलोन येथें आपल्या वसाहती स्थापन केल्यावर त्या प्रदेशांतही संस्कृत भाषेचा प्रसार झाला. ११ व्या शतकाच्या शेवटीं संस्कृतोद्भव प्राकृत भाषांपासून भारताच्या निरनिराळ्या भागांत सध्यां बोलण्यांत येणाऱ्या हिंदी, बंगाली, मराठी, गुजराथी, काश्मिरी, सिंधी वगैरे भाषा प्रचारांत येऊं लागल्या. द्रविड भाषेपासून निर्माण झालेल्या भाषा म्हणजे तामीळ, तेलगू, कानडी, मल्याली या होत, तरी संस्कृत भाषेच्या व आर्यसंस्कृतीच्या प्रसारामुळें या भाषांतील जवळजवळ निम्मे शब्द संस्कृत भाषेंतीलच आहेत.

प्राचीन काळीं जगांतील इतर देशांप्रमाणें भारतांतील ग्रंथ हे हस्तलिखितच होते. प्राचीन काळीं भारतामध्यें हे ग्रंथ भूर्जपत्र व ताडपत्र यांवर सुवाच्य अक्षरांत लिहीत.

कलाकौशल्य—या कालांतील बांधकाम अधिक भव्य व तसेंच कलाकुसरीचें होऊं लागलें.

देवळें बांधण्याचा प्रकार रूढ झाला असून हिंदु, बौद्ध व जैन यांचीं मंदिरें बांधण्याची धाटणी एकसारखीच असे. उत्तर भारतांत देवालयांतील मूर्ती पहिल्यानें गांधारपद्धतीनें घडविण्यांत येत, व त्यावर सुरुवातीस ग्रीक पद्धतीचा पगडा होता, पण ही पद्धत पुढें भारतीयांनीं आत्मसात् केली व त्यास भारतीय असें विशिष्ट स्वरूप दिलें.

हर्षोत्तरकालीन भारत (इ. स. ६४७ ते सुमारें १२००) हर्षाच्या मृत्यूनंतर उत्तर व दक्षिण भारतांत ठिकठिकाणीं लहान लहान स्वतंत्र राज्यें निर्माण झालीं. इ. स. च्या ७ व्या शतकापासून राजपुताना, काठेवाड, गुजराथ या भागांत रजपूत घराणीं उदयास येऊं लागलीं व त्यांनीं पुढें भारताच्या इतिहासांत महत्त्वाची कामगिरी केली.

भारतांतील निरनिराळीं राज्यें—हर्षोत्तर काळांत भारतांत ठिकठिकाणीं कांहीं राज्यें विशेष प्रसिद्धीस आलीं. बंगालमध्यें पालांचें राज्य सुमारें ४५० वर्षें टिकलें (७५०–११९९). येथील राजांनीं कनोजपर्यंत आपली सत्ता वाढविली व आसाम व कलिंग हे प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणले. पालांनीं बौद्ध धर्मास आश्रय दिल्यामुळें तो बंगालमध्यें बराच काळ टिकून राहिला. त्यांनीं तिबेटमध्यें बौद्धधर्मोपदेशक पाठविले त्यामुळें तिकडे त्या धर्माचा प्रसार होत गेला. मेवाडमध्यें सातव्या शतकांत गुहिलोत हें रजपूत घराणें उदयास आलें. कनोज येथें प्रतिहार घराणें (८१५–९०७) उदयास आलें. या घराण्यांत पहिला भोज हा पराक्रमी राजा होऊन गेला. दक्षिण भारतांत वातापी (बदामी) येथें चालुक्य घराणें (इ. स. ५५०–७५७) प्रसिद्धीस आलें. या घराण्यांतील २ रा पुलकेशी (६०९–६४२) यानें ६२० मध्यें नर्मदेच्या कांठीं हर्षाचा पराभव केला. पश्चिम किनाऱ्यावरील बंदरांतन या राज्याचा पश्चिम आशियांतील प्रदेशांशीं व्यापार चाले. यांच्या कारकीर्दीत हिंदु, बौद्ध व जैन यांनीं ठिकठिकाणीं मंदिरें बांधलीं व लेणीं खोदलीं. बदामी, वेरूळ व घारापुरी किंवा एलिफंटा (मुंबई जवळचें बेट) येथील लेण्यांपैकीं कांहीं भाग यांच्या कारकीर्दीत खोदण्यांत आला. राष्ट्रकुटांनीं (७५३–९७३) चालुक्यांचा मोड केला. राष्ट्रकुटांपैकीं १ ला कृष्ण याच्या कारकीर्दीत

वेरूळच्या लेण्यांपैकीं प्रख्यात कैलास लेण्याचा बराच भाग खोदण्यांत आला. आन्ध्र प्रदेशांत कल्याणी या ठिकाणीं दुसऱ्या चालुक्य घराण्याचें राज्य स्थापन झालें (९७३). ११९० च्या सुमारास हें राज्य मोडकळीस आलें व राज्यांतील निरनिराळ्या प्रदेशांत (१) देवगिरीचें यादव (२) वारंगळचे काकतीय व (३) द्वारसमुद्राचे (म्हैसूर) होयसळ हीं राज्यें स्थापन झालीं. देवगिरीच्या राज्यांत भास्कराचार्य हा विद्वान् पंडित होऊन गेला व त्यानें ज्योतिषशास्त्रावर सिद्धांत शिरोमणी व बीजगणितावर लीलावती हे ग्रंथ लिहिले. प्रसिद्ध पंडित ज्ञानेश्वर याच काळांत होऊन गेला व त्यानें भगवद्गीतेवर 'ज्ञानेश्वरी' हा टीकाग्रंथ मराठी भाषेंत लिहिला. विद्वान् लेखक त्यावेळचीं विद्वानांची भारतांतील भाषा जी संस्कृत तीमध्यें ग्रंथरचना करीत, पण मराठीमध्यें विद्वत्ताप्रचुर ग्रंथरचना करण्याचा प्रघात ज्ञानेश्वरानें सुरू केला. तुंगभद्रेच्या दक्षिणेला द्वारसमुद्राचे (म्हैसूर) होयसळ, कांचीचे पल्लव (३५०–९०७) व चोलांचें राज्य (८७१–१२०० सुमारें) व मदुरेचे (१२५०–१३१०) पांड्य हीं राज्यें विशेष प्रसिद्ध होतीं. चोलांनीं बंगालच्या उपसागरावर आपलें वर्चस्व बसवून बंगाल, ब्रम्हदेश व मलाया या प्रदेशावर वर्चस्व बसविण्यासाठीं आपलें आरमार पाठविलें. मदुरेचे पांड्य यांच्या वेळीं व्हेनिसचा मार्को पोलो हा १२९० च्या सुमारास या राज्यांत येऊन गेला.

अरबस्थानांत इस्लाम धर्माची स्थापना झाल्यावर दमास्कस येथील खलिपाच्या आज्ञेनें महमद कासीमने इ. स. ७१२ मध्यें समुद्रमार्गें सिंधवर स्वारी केली व त्यावर आपलें वर्चस्व बसविलें. यानंतर राजपुताना या प्रदेशांत आपल्या राज्याचा विस्तार करण्याचा अरबांनीं प्रयत्न केला पण त्यांस या कामीं यश आलें नाहीं. यानंतर गिझनीचा महमद यानें लूट मिळविण्याच्या उद्देशानें १००१–१०३० च्या दरम्यान भारताच्या वायव्य व पश्चिम भागावर १७ स्वाऱ्या केल्या, व खूप लूट मिळविली. महमद गिझनीच्या बरोबर अलबुरेनी नांवाचा विद्वान् गृहस्थ असून तो भारतांत आला होता व त्यानें त्यावेळच्या भारतांतील लोकांविषयीं आपले विचार लिहून ठेविले आहेत. यानंतर दीडशें वर्षांनीं महमद घोरी यानें गिझनीवर आपलें वर्चस्व बसवून भारतांतील पंजाब, प्रांतावर आपलें वर्चस्व बसविलें व कुतबुद्दिन ऐबक यास आपला सुभेदार

नेमलें. महमद घोरीच्या मृत्यूनंतर कुतबुद्दीन यानें दिल्ली येथें आपलें स्वतंत्र राज्य स्थापन केलें (१२०६).

(ब) भारतीय संस्कृतीचा भारताबाहेर प्रसार —

भारताच्या वायव्येकडील आशिया—अशोकानें सिलोन, कंभोज याप्रमाणें इजिप्त, सीरिया, ग्रीस वगैरे पश्चिमेकडील दूरदूरच्या देशांकडे आपले धर्मप्रचारक पाठविले व बौद्ध तत्त्वज्ञानाची त्या प्रदेशांतील लोकांस माहिती करून दिली. त्याचप्रमाणें ग्रीक लोकांनीं बौद्ध धर्म स्वीकारल्यावर भारतीय संस्कृतीचा प्रसार सरहद्दीवरील ग्रीक राज्यांतही होऊं लागला. कनिष्काच्या साम्राज्याचा मध्य आशियांत खूप विस्तार झाल्यामुळें या सर्व प्रदेशांत महायानपंथी बौद्ध धर्माचा, हिंदु धर्माचा व भारतीय संस्कृतीचा प्रसार होऊन त्या भागांत भारतीयांची सांस्कृतिक केंद्रें स्थापन झालीं.

इ. स. ६८ मध्यें चीनच्या सम्राटाच्या निमंत्रणावरून **काश्यप मातंग** इतर बौद्ध भिक्षूंसह चीनमध्यें गेला व तेथें त्यानें बौद्धधर्माचा प्रसार केला. यानंतर कुशान सम्राटांच्या कारकीर्दीत महायानपंथी बौद्ध भिक्षू व प्रचारक चीनमध्यें जाऊं लागले. त्यांनीं अश्वमेघ, नागार्जुन, वसुबंधु वगैरे विद्वानांच्या ग्रंथांची चिनी भाषेंत भाषांतरें करून बौद्धधर्माचा चीनमध्यें प्रसार केला; त्यामुळें बौद्ध धर्म हा चीनमधील एक प्रमुख धर्म झाला. जीनगुप्त यानें बऱ्याच संस्कृत ग्रंथांचीं चिनी भाषेंत भाषांतरें केलीं. बौद्धांच्या धार्मिक ग्रंथाप्रमाणें हिंदु धार्मिक ग्रंथ, ज्योतिष, गणित, वैद्यकी या विषयांवरील भारतांतील संस्कृत भाषेंतील ग्रंथांचीहि चिनी भाषेंत भाषांतरें झालीं. चीनप्रमाणें इराक, खोरासान, मोसल वगैरे पश्चिम आशियांतील प्रदेश, त्याचप्रमाणें मध्य आशियांतील प्रदेश, यांमध्येंही बौद्ध धर्माचा व भारतीय संस्कृतीचा ७ व्या शतकापर्यंत प्रसार झाला होता.

आग्नेय आशिया—भारताजवळची लंका, अंदमान, निकोबार हीं बेटें, ब्रह्मदेश, सयाम, अनाम, कोचीन, चंपा हे इंडोचायना (भारतीय चीन) यांमधील प्रदेश, मलाया हें द्वीपकल्प, त्याचप्रमाणें जाव्हा, सुमात्रा, बाली वगैरे द्वीपसमूह (यांस इंडोनेशिया किंवा भारतीय आशिया असें म्हणण्यांत येतें) हे प्रदेश आग्नेय आशियांत असून त्यांची माहिती भारतीयांस इ. स. पू. १००० होती व भारतासह या सर्व प्रदेशास जंबुद्वीप असें प्राचीन काळापासून म्हणण्यांत येई.

हा सर्व प्रदेश खनिज व उद्भिज्ज संपत्तीनें समृद्ध असल्यामुळें इ. स. पू. ५ व्या शतकापासून या प्रदेशाशीं व्यापार करण्यासाठीं भारतीय लोक जात असत. इ. स. पू. ३ ऱ्या शतकांत अशोकानें या प्रदेशाकडे बौद्धधर्मप्रचारक पाठविले. यानंतर इ. स. च्या १ ल्या व २ ऱ्या शतकांत इंडोचायना, मलाया, इंडोनेशिया या प्रदेशांकडे भारतीय लोक वसाहत करण्यासाठीं जाऊं लागले. या प्रदेशांतील मूळचे लोक मागासलेले होते, व भारतांतून तेथें गेलेले धाडसी लोक तेथें स्थायिक झाल्यावर त्यांपैकीं बऱ्याच लोकांनीं तेथील स्त्रियांशीं लग्नें केलीं. त्यामुळें भारतीय संस्कृति, चालीरीती, संस्कृतभाषा, हिंदु व बौद्ध धर्म, रामायण, महाभारत वगैरे भारतीय महाकाव्यें, भारतीय पुराणें, आख्यायिका व भारतीय वाङ्मय यांचाही या प्रदेशांत प्रसार झाला. त्याचप्रमाणें बोर्नियो या बेटांतील शिलालेखांत इ. स. च्या ४ थ्या शतकांत मलवर्मन या राजानें यज्ञयागादि कृत्यें केल्याचा उल्लेख आहे. बोर्नियो बेटाप्रमाणें जाव्हा, सुमात्रा, बाली या बेटांतही इ. स. च्या ४ च्या शतकांत भारतीयांचीं राज्यें स्थापन झालीं, व भारतीय संस्कृति, भारतीय आचार विचार, भारतीय वाङ्मय, दंतकथा, आख्यायिका यांचाहि प्रसार होऊं लागला. हीं राज्यें हळके हळके समृद्ध होऊन त्यांमध्यें भारतीय हिंदु देवदेवतांचीं मंदिरें, बौद्धांचे स्तूप, भारतीय धाटणीप्रमाणें बांधण्यांत येऊं लागले. येथें बांधण्यांत आलेल्या अनेक मंदिरांपैकीं कंभोज (कँबोडिया) येथील **अंग-कोर-वट** हे भव्य शिवमंदिर व जाव्हा बेटांतिल '**बोर बुदर**' हें बौद्ध मंदिर यांचा भव्यपणा, विस्तार, तेथील शिल्पकला, खोदकाम, नक्षीकाम वगैरे गोष्टींमुळें इजिप्तमधील कारनॅकच्या मंदिराप्रमाणें जगप्रसिद्ध आहेत. अंग-कोर-वट या शिवमंदिराच्या तळभागाचा विस्तार एक चौरस मैल असून ठिकठिकाणीं भव्य खांबांच्या रांगा बांधण्यांत आल्या असल्यामुळें या मंदिरास खूपच भव्यपणा आलेला आहे. त्याचप्रमाणें ठिकठिकाणचें नक्षीकामहि सुबक आहे. या मंदिरांतील भिंतीवर महाभारत व हिंदु पुराणें यांतील कथाभाग खोदलेले आहेत. इतर हिंदु देवदेवतांचींहि कंभोजमध्यें मंदिरें आहेत.

जाव्हा बेटांतील बोर-बुदर हें भव्य बौद्ध मंदिर ४७५ चौरस फुटांच्या क्षेत्रफळावर बांधलेलें (७५०) असून तें ७ मजली आहे व त्याची उंची सुमारें ११८ फूट आहे. मंदिराची मांडणी व धाटणी भव्य असून तेथील भिंती-

वर कोरलेलें नक्षीकाम फारच सुचक आहे. त्यांत बुद्धाच्या चरित्रांतील १२० प्रसंग, त्याचप्रमाणें जातक कथांतील तितकेच प्रसंग खोदलेले आहेत.

भारतीयांची कंबोज, चंपा (अनाम) हीं राज्यें पांचव्या शतकामध्यें प्रसिद्धीस आलीं. ८ व्या शतकापासून १३ व्या शतकापर्यंत मलायांतील श्रीविजय येथें शैलेंद्र घराण्याचें साम्राज्य प्रसिद्धीस येऊन आग्नेय आशियांतील मलाया, सुमात्रा, जाव्हाचा कांहीं भाग, चंपा वगैरे विस्तृत प्रदेशावर त्याचें सार्वभौमत्व होतें. याचें आरमार बरेच दिवस प्रबल होतें. या शैलेंद्र साम्राज्याचें दक्षिण भारतांतील चोलांच्या राज्याशीं युद्धप्रसंग होत. ९ व्या शतकामध्यें कंबोडियांतील बारक्या राज्यांचें एकीकरण करून जयवर्धन यानें कंबोडियामध्यें आपलें साम्राज्य स्थापन केलें. अंग-कोर-तट ही याची राजधानी असून ती फारच वैभवशाली व भरभराटीची होती. हें राज्य चार शतकें टिकलें. १२ व्या शतकांत सिंगसरी येथें प्रजापहित राज्य स्थापन झालें व तेराव्या शतकांत हें राज्य विशेष प्रबल झालें. भारत व चीन यांमधील व्यापारामुळें हें राज्य समृद्ध झालें.

१४ व्या शतकाच्या सुरुवातीस अरबांनीं मलाक्का हें ठिकाण घेऊन मलायामध्यें आपलें राज्य स्थापन केलें. यानंतर या प्रदेशांत इस्लामी धर्माचा प्रसार होऊं लागला. पुढें १६ व्या शतकाच्या सुरुवातीस पोर्तुगीज लोकांनीं अरबी समुद्र व हिंदी महासागर यांवर आपलें वर्चस्व स्थापन करून १५११ मध्यें मलाक्का ठिकाण हस्तगत केल्यामुळें या भागांत अरबांची सत्ता नाहींशी होऊन पोर्तुगीजांची सत्ता स्थापन झाली, व पुढें फ्रेंच व डच यांचें त्या प्रदेशावर वर्चस्व बसलें.

(क) भारतांतील सांस्कृतिक जीवन

भारतांतील विद्यापीठें व विद्याकलांचा प्रसार—प्राचीन काळीं भारतांत विद्याकलांचें अध्ययन व प्रसार मोठ्या प्रमाणांत होत असून ही परंपरा इ. स. पू. ८०० पासून इ. स. १२०० वर्षांपर्यंतच्या काळापर्यंत चालूं होती. तत्त्वज्ञानविषयक ग्रंथ व दर्शनें, कथा, नाट्य, काव्य, सुभाषितें वगैरे वाङ्मयाचे निरनिराळे प्रकार, न्याय, व्याकरण, ज्योतिष, गणित, स्थापत्य, अर्थशास्त्र, वैद्यकी, राज्यशास्त्र वगैरे निरनिराळ्या विषयांवरील ग्रंथ, समाजधारणा,

व्यवहारधर्म, निर्बंध वगैरे विषयांवरील स्मृति ग्रंथ, त्याचप्रमाणें धनुर्विद्या, शस्त्रविद्या, शिल्पकला, चित्रकला, गायन, वादन, नृत्य, धातुकाम, विणकाम वगैरे विद्या, कलाकुसरीचीं कामें व समाजाच्या निरनिराळ्या गरजा भागविणाऱ्या कला या सर्वांचें अध्ययन व शिक्षण भारतांमध्यें निरनिराळ्या ठिकाणीं होत असून हें शिक्षण घेण्यासाठीं बाह्यच्या देशांतील विद्यार्थीही भारतांत येत असत. मोठमोठे ज्ञानी व विद्वान् लोक शहरांपासून दूर अशा निवांत ठिकाणीं आश्रम स्थापन करीत. त्याचप्रमाणें राजधानी, तीर्थक्षेत्र, कलाकौशल्यासाठीं प्रसिद्ध असलेल्या ठिकाणीं शास्त्री, पंडित व गुणी माणसें वास्तव्य करीत व ज्ञानदानाचें व विद्याकलांच्या प्रसाराचें काम करीत. त्यामुळें कांहीं ठिकाणें विद्याकेंद्रें बनून त्यांस विद्यापीठांचें स्वरूप येई. या विद्यापीठांतून व विद्याकेंद्रांतून कलाकौशल्याच्या बाबतींत तात्त्विक स्वरूपाचें ज्ञान मिळे, व या बाबतींत व्यावहारिक ज्ञान मिळविण्यासाठीं निरनिराळ्या कलाविद्यांत पारंगत असलेल्या कसबी लोकांच्या हाताखालीं काम करून त्यांतील कलाकुसरेची माहिती मिळवावी लागे. भारताच्या निरनिराळ्या भागांत पसरलेलीं अशी अनेक विद्यापीठें व विद्याकेंद्रें होतीं. त्यांपैकीं तक्षशीला, नालंद, कांची, वल्लभी, विक्रमशीला, काशी, उज्जयनी, पैठण या ठिकाणचीं विशेष प्रसिद्ध होतीं. यांपैकीं कांहीं ठिकाणें एखाद्या विद्येसंबंधीं किंवा कलेसंबंधीं अधिक प्रसिद्ध असत. तक्षशीला हें वैद्यकी, युद्धकला, शिल्पकला या बाबतींत, नालंदा हें बौद्ध धर्मग्रंथ व तत्त्वज्ञान, वल्लभी हें व्यापार, संगीत, नृत्य, जैन धर्मग्रंथ व तत्त्वज्ञान या बाबतींत, मदुरा हें नृत्यकला, वादन यांसाठीं प्रसिद्ध होतें. काशी येथें विद्यापीठ नव्हतें, पण तें क्षेत्राचें ठिकाण असल्यामुळें विद्वान् गृहस्थ, पंडित, शास्त्री, वेदांती व तत्त्ववेत्ते तेथें येऊन वास्तव्य करीत, त्यामुळें त्या ठिकाणास विद्वत्-परिषदेचें स्वरूप आलें होतें व तेथील शास्त्री व पंडितांशीं वादविवाद करून त्यांत आपल्या मताचें श्रेष्ठत्व पटवून देण्याचा प्रघात रूढ झाला. कांची हें स्थापत्य, शिल्पकला या बाबतींत विशेष प्रसिद्ध होतें. या विद्यापीठांस व विद्याकेंद्रांतील विद्वान् लोकांस ठिकठिकाणचे राजे व धनिक यांच्याकडून पैशाची, संपत्तीची व धान्याची मदत मिळे. पण त्यांच्यावर राजकर्त्यांचें नियंत्रण नसून हीं विद्यापीठें स्वतंत्र असल्यामुळें त्यांत वैचित्र्य व प्रगति होण्यास मदत झाली. अशाप्रकारें विद्या-

वर कोरलेलें नक्षीकाम फारच सुबक आहे. त्यांत बुद्धाच्या चरित्रांतील १२० प्रसंग, त्याचप्रमाणें जातक कथांतील तितकेच प्रसंग खोदलेले आहेत.

भारतीयांची कंभोज, चंपा (अनाम) हीं राज्यें पांचव्या शतकामध्यें प्रसिद्धीस आलीं. ८ व्या शतकापासून १३ व्या शतकापर्यंत मलायांतील श्रीविजय येथें शैलेंद्र घराण्याचें साम्राज्य प्रसिद्धीस येऊन आग्नेय आशियांतील मलाया, सुमात्रा, जाव्हाचा कांहीं भाग, चंपा वगैरे विस्तृत प्रदेशावर त्याचें सार्वभौमत्व होतें. याचें आरमार बरेच दिवस प्रबल होतें. या शैलेंद्र साम्राज्याचें दक्षिण भारतांतील चोलांच्या राज्याशीं युद्धप्रसंग होत. ९ व्या शतकामध्यें कंबोडियांतील बारक्या राज्यांचें एकीकरण करून जयवर्धन यानें कंबोडियामध्यें आपलें साम्राज्य स्थापन केलें. अंग-कोर-तट ही याची राजधानी असून ती फारच वैभवशाली व भरभराटीची होती. हें राज्य चार शतकें टिकलें. १२ व्या शतकांत सिंगसरी येथें प्रजापहित राज्य स्थापन झालें व तेराव्या शतकांत हें राज्य विशेष प्रबल झालें. भारत व चीन यांमधील व्यापारामुळें हें राज्य समृद्ध झालें.

१४ व्या शतकाच्या सुरुवातीस अरबांनीं मलाक्का हें ठिकाण घेऊन मलायामध्यें आपलें राज्य स्थापन केलें. यानंतर या प्रदेशांत इस्लामी धर्माचा प्रसार होऊं लागला. पुढें १६ व्या शतकाच्या सुरुवातीस पोर्तुगीज लोकांनीं अरबी समुद्र व हिंदी महासागर यांवर आपलें वर्चस्व स्थापन करून १५११ मध्यें मलाक्का ठिकाण हस्तगत केल्यामुळें या भागांत अरबांची सत्ता नाहींशी होऊन पोर्तुगीजांची सत्ता स्थापन झाली, व पुढें फ्रेंच व डच यांचें त्या प्रदेशावर वर्चस्व बसलें.

(क) भारतांतील सांस्कृतिक जीवन

भारतांतील विद्यापीठें व विद्याकलांचा प्रसार—प्राचीन काळीं भारतांत विद्याकलांचें अध्ययन व प्रसार मोठ्या प्रमाणांत होत असून हीं परंपरा इ. स. पू. ८०० पासून इ. स. १२०० वर्षांपर्यंतच्या काळापर्यंत चालूं होती. तत्त्वज्ञानविषयक ग्रंथ व दर्शनें, कथा, नाट्य, काव्य, सुभाषितें वगैरे वाङ्मयाचे निरनिराळे प्रकार, न्याय, व्याकरण, ज्योतिष, गणित, स्थापत्य, अर्थशास्त्र, वैद्यकी, राज्यशास्त्र वगैरे निरनिराळ्या विषयांवरील ग्रंथ, समाजधारणा,

व्यवहारधर्म, निर्बंध वगैरे विषयांवरील स्मृति ग्रंथ, त्याचप्रमाणें धनुर्विद्या, शस्त्रविद्या, शिल्पकला, चित्रकला, गायन, वादन, नृत्य, धातुकाम, विणकाम वगैरे विद्या, कलाकुसरीचीं कामें व समाजाच्या निरनिराळ्या गरजा भागविणाऱ्या कला या सर्वांचें अध्ययन व शिक्षण भारतांमध्यें निरनिराळ्या ठिकाणीं होत असून हें शिक्षण घेण्यासाठीं बाहेरच्या देशांतील विद्यार्थीही भारतांत येत असत. मोठमोठे ज्ञानी व विद्वान् लोक शहरांपासून दूर अशा निवांत ठिकाणीं आश्रम स्थापन करीत. त्याचप्रमाणें राजधानी, तीर्थक्षेत्र, कलाकौशल्यासाठीं प्रसिद्ध असलेल्या ठिकाणीं शास्त्री, पंडित व गुणी माणसें वास्तव्य करीत व ज्ञानदानाचें व विद्याकलांच्या प्रसाराचें काम करीत. त्यामुळें कांहीं ठिकाणें विद्याकेंद्रें बनून त्यांस विद्यापीठांचें स्वरूप येई. या विद्यापीठांतून व विद्याकेंद्रांतून कलाकौशल्याच्या बाबतींत तात्त्विक स्वरूपाचें ज्ञान मिळे, व या बाबतींत व्यावहारिक ज्ञान मिळविण्यासाठीं निरनिराळ्या कलाविद्यांत पारंगत असलेल्या कसबी लोकांच्या हाताखालीं काम करून त्यांतील कलाकुसरेची माहिती मिळवावी लागे. भारताच्या निरनिराळ्या भागांत पसरलेलीं अशी अनेक विद्यापीठें व विद्याकेंद्रें होतीं. त्यांपैकीं तक्षशीला, नालंद, कांची, वल्लभी, विक्रमशीला, काशी, उज्जयनी, पैठण या ठिकाणचीं विशेष प्रसिद्ध होतीं. यांपैकीं कांहीं ठिकाणें एखाद्या विद्येसंबंधीं किंवा कलेसंबंधीं अधिक प्रसिद्ध असत. तक्षशीला हें वैद्यकी, युद्धकला, शिल्पकला या बाबतींत, नालंदा हें बौद्ध धर्मग्रंथ व तत्त्वज्ञान, वल्लभी हें व्यापार, संगीत, नृत्य, जैन धर्मग्रंथ व तत्त्वज्ञान या बाबतींत, मदुरा हें नृत्यकला, वादन यांसाठीं प्रसिद्ध होतें. काशी येथें विद्यापीठ नव्हतें, पण तें क्षेत्राचें ठिकाण असल्यामुळें विद्वान् गृहस्थ, पंडित, शास्त्री, वेदांती व तत्त्ववेत्ते तेथें येऊन वास्तव्य करीत, त्यामुळें त्या ठिकाणास विद्वत्-परिषदेचें स्वरूप आलें होतें व तेथील शास्त्री व पंडितांशीं वादविवाद करून त्यांत आपल्या मतांचें श्रेष्ठत्व पटवून देण्याचा प्रघात रूढ झाला. कांची हें स्थापत्य, शिल्पकला या बाबतींत विशेष प्रसिद्ध होतें. या विद्यापीठांस व विद्याकेंद्रांतील विद्वान् लोकांस ठिकठिकाणचे राजे व धनिक यांच्याकडून पैशाची, संपत्तीची व धान्याची मदत मिळे. पण त्यांच्यावर राजकर्त्यांचें नियंत्रण नसून हीं विद्यापीठें स्वतंत्र असल्यामुळें त्यांत वैचित्र्य व प्रगति होण्यास मदत झाली. अशाप्रकारें विद्या-

कलांचें (१६ विद्या व ६४ कला) शिक्षण मिळण्याची व्यवस्था असल्यामुळें प्राचीन काळीं त्यांची वाढ होण्यास मदत झाली.

हर्षोत्तरकालीन वाङ्मय व कलाकौशल्य—संस्कृत ही विद्वानांची भाषा असून ती सर्व भारतांतील आंतरराष्ट्रीय भाषा असल्यामुळें प्राचीन काळीं पुष्कळ ग्रंथ संस्कृत भाषेमध्यें लिहिले जात. त्याचप्रमाणें प्राकृत व त्यापासून नवीन निर्माण होणाऱ्या प्रादेशिक भाषांमध्येंहि पुढें पुढें ग्रंथरचना होऊं लागली. काव्य, शास्त्र, नाट्य, कथा वगैरे निरनिराळ्या विषयांवर निरनिराळे ग्रंथ या काळांत रचिले गेले, त्यापैकीं कांहींचा नामनिर्देश खालीं केला आहे. दंडीचें दशकुमारचरित, कल्हणचे राजतरंगिणी, विशाखादत्त याचें मुद्राराक्षस, भवभूति याचें उत्तररामचरित, भास्कराचार्यांचा सिद्धांतशिरोमणी, जयदेव याचें गीत गोविंद, गुणाढ्य याच्या बृहत्कथा या पैशाची भाषेंतील ग्रंथाच्या कांहीं भागावरून सोमदेवानें लिहिलेला कथासरितसागर, वगैरे वाङ्मयाच्या निरनिराळ्या शाखांतील ग्रंथ लिहिले जात होते.

या काळांत मंदिरें, लेणीं, तलाव वगैरे निरनिराळ्या बाबतींत पुष्कळ कार्में होऊन त्यांस राजे लोकांचें व समाजांतील धनाढ्य लोकांचें प्रोत्साहन असे.

धार्मिक स्थिति—भारतामध्यें अशोक, कनिष्क, हर्ष यांच्या आश्रयामुळें व प्रोत्साहनामुळें बौद्ध धर्मास उत्तेजन मिळत गेलें तरी हिंदु धर्म हाच बहुसंख्य लोकांचा धर्म होता. हर्षानंतर बौद्ध धर्मांत मूळ धर्मतत्त्वांस विसंगत असे आचारविचार रूढ होऊं लागले. बौद्ध भिक्षु यांचें वर्तनही शुद्ध राहिलें नाहीं. उत्तर भारतामध्यें इ. स. ७५० च्या सुमारास **कुमारील भट्ट** हा विद्वान् गृहस्थ होऊन गेला, व त्यानें वैदिक धर्माचें श्रेष्ठत्व लोकांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न केला. दक्षिण भारतामध्यें मलबार भागांत इ. स. ७८८ मध्यें **शंकराचार्य** या विद्वान् पुरुषाचा जन्म झाला. त्यानें वेद व धार्मिक ग्रंथ यांचें अध्ययन करून त्यांत पारंगतता मिळविली आणि काशीस जाऊन तेथील पांडितांशीं वादविवाद करून अजिंक्य पत्र मिळविलें. यानंतर त्यानें ज्ञानमार्गी वैदिक धर्माचा व अद्वैत मताचा पुरस्कार केला. बौद्ध धर्मांतील अहिंसा हें तत्त्व आत्मसात केलें. अशाप्रकारें वैदिक धर्माचें पुनरुज्जीवन झालें. ही वैदिक धर्माची परंपरा राखण्यासाठीं शंकराचार्यांनें भारतांतील चार दिशांस-शृंगेरी, जगन्नाथपुरी,

बदरीकेदार व द्वारका–या ठिकाणीं मठांची स्थापना केली. हिंदु धर्मात निर्गुण उपासनेप्रमाणें शिव, विष्णु, कृष्ण यांची सगुण उपासना व देवदेवता यांची पूजाअर्चा रूढ झाली होती, आणि बुद्धासच हिंदुधर्मांतील वेगवेगळ्या अवतारापैकीं एक अवतार मानण्यांत आल्यामुळें बौद्ध धर्मांतील वैशिष्ट्य नाहींसें होऊन तो हिंदुधर्मांतील शैव, वैष्णव, भागवत या पंथाप्रमाणें एक पंथ असल्यासारखा झाला, व स्वतंत्र धर्म म्हणून भारतांतून नाहींसा झाला.

सामाजिक स्थिति— इ. स. पू. १७५ पासून इसवी सन ४५० वर्षांपर्यंतच्या काळांत भारतावर भिन्न आचारविचारांच्या व चालीरीतींच्या अशा ग्रीक, शक, पार्थियन, कुशाण, हूण, गुर्जर या जमातींच्या स्वाऱ्या होऊन त्या येथें स्थायिक झाल्या व त्यांपैकीं बहुतेक सर्वांनीं भारतांत प्रचलित असलेल्या हिंदु, बौद्ध किंवा जैन या धर्मांपैकीं एखाद्या धर्माचा स्वीकार करून आपापल्या व्यवसायाप्रमाणें त्या ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या वर्णांत सामील झाल्यामुळें पुष्कळ जाती व पोटजाती निर्माण झाल्या. प्रत्येक जातीचे आचार व व्यवसाय कायमचे ठरल्यासारखें झालें. रोटी बेटी व्यवहार हे त्या जातीपुरते किंवा पोटजातीपुरते मर्यादित झाले. यांमध्येंही निरनिराळ्या व्यवसायाप्रमाणें स्थानिक भेद पडले. एकेक व्यवसाय वंशपरंपरा एकाच जातींत करण्याचा प्रघात रूढ झाला. त्यामुळें त्या त्या धंद्यांतील कौशल्य, वाकबगारपणा व प्राविण्य येण्याच्या, टिकविण्याच्या व त्यामध्यें वाढ करण्याच्या दृष्टीनें जसा फायदा होत गेला, तसा इतर व्यवसायांत आपल्या गुणानें व कर्तबगारीनें पुढें येऊं पहाणाऱ्या लायक व्यक्तींची कुचंबणा होऊं लागून तोटा झाला. कांहीं धंदे श्रेष्ठ तर कांहीं कनिष्ठ असें मानलें गेल्यानें समाजांत उच्च व नीच असा भेदभाव निर्माण होऊन तो जन्मावर आधारलेला म्हणजे कायम स्वरूपाचा असा ठरला गेला. परदेशगमन हें निषिद्ध असें मानलें गेल्यानें परकीय ज्ञान मिळविण्याचें व त्यामुळें आपली प्रगति करून घेण्याचें साधन नष्ट झालें. त्याचप्रमाणें पूर्वापार चालत आलेल्या रूढि चांगल्या आहेत, त्यांमध्यें बदल करण्याची जरूर नाहीं असें वाटूं लागलें. पुराणांत सांगितलेल्या व्रतवैकल्यांचें स्तोम फार वाढलें. मंत्रतंत्र, दैव, प्राक्तन, शकून–अपशकून यांवरील श्रद्धा वाढून ऐहिक गोष्टींपेक्षां पारलौकिक गोष्टीकडे अधिक लक्ष देण्यांत येऊं लागलें, व त्यामुळें ऐहिक गोष्टींबद्दल उदासीनता वाढूं लागली. इ. स.

१००० नंतरच्या काळांत भारतीय लोकांत शैथिल्य व जीर्णत्व निर्माण झालें व ते संकुचित वृत्तीचे होऊन कूपमंडूक वृत्ति त्यांच्यांत बळावली व भारतीय समाज खुरटल्यासारखा झाला. परकीयांपासून आपणांस कांहीं शिकावयाचें नाहीं, व आपणांस सर्व कांहीं येत आहे असें त्यांस वाटूं लागलें. प्रत्येकजण आपल्या जातीपुरता संकुचित दृष्टीनें पाहूं लागला. या सर्व गोष्टींमुळें भारतीयांचें संरक्षणक्षमत्व कमी झालें, त्यामुळें परकीय लोकांच्या हल्ल्यांस यशस्वीरीतीनें तोंड देण्याचें व परकीयांस आत्मसात करण्याचें सामर्थ्य भारतीयांत उरलें नाहीं. त्यामुळें इ. स. १२०० च्या सुमारास इस्लामधर्मीय तुर्क, अफगाण, पठाण लोकांच्या हल्ल्यापुढें भारत हतबल झाला.

प्राचीन चीन

(इ. स. पू. २०६ ते इ. स. १२८०)

हॅन घराणें (इ. स. पू. २०६ ते इ. स. २२०)—इ. स. पू. २०६ मध्यें चीनमध्यें हॅन घराण्याची स्थापना होऊन ती चार शतकें टिकली. या काळांत प्रदेशविस्तार, वाङ्मय, व्यापार, कलाकौशल्य व उद्योगधंदे यांमध्यें चीनची चांगली प्रगति होऊन भरभराट झाल्यामुळें या काळास 'सुवर्ण युग' असें मानण्यांत येतें. या काळांत वेन टी हा सम्राट होऊन गेला (इ. स. पू. १७९–१५७). त्यानें फौजदारी गुन्ह्यासंबंधाच्या कायद्यांत सुधारणा केल्या. त्याचप्रमाणें ज्ञानवृद्धीस उत्तेजन दिलें.

या घराण्यांत **वू टी** हा एक मोठा सम्राट होऊन गेला (इ. स. पू. १४० ते इ. स. पू. ८७). त्यानें यांगत्से नदीच्या दक्षिणेकडील प्रदेश व कोरिया यांवर आपलें वर्चस्व बसविलें. त्यानें राज्यकारभाराचें केंद्रीकरण केलें; व साम्राज्याचे वेगवेगळे विभाग पाडून त्यावर आपणांस जबाबदार असणारे अधिकारी नेमिले. त्यानें कलाविद्यांस प्रोत्साहन दिलें. सरकारी ग्रंथसंग्रहालयांत त्यावेळीं तत्त्वज्ञान, वाङ्मय, गणित, वैद्यकी वगैरे विषयांवर पुष्कळ ग्रंथ होते. त्यानें मीठ, लोखंड यांचें उत्पादन सरकारी मालकीचें केलें. टांकसाळींतून नाणीं पाडण्याचा मक्ता सरकारकडे ठेविला. बेकार लोकांस कामधंदा मिळावा म्हणून नद्यांस पूल बांधिले व नद्यांस कालवे काढले. चीनच्या पश्चिमेस तिबेटचें पठार व डोंगराळ प्रदेश असल्यामुळें पश्चिमेकडील आशियांतील इतर प्रदेशांशीं

दळणवळण नव्हतें; पण वू टी नें त्या बाजूस माणसें पाठवून तिबेटच्या उत्तरेकडील डोंगराळ मुलखांतून पश्चिमेकडील यार्कंद, बुखारा यांवरून पश्चिम आशिया व युरोपकडे जाणारा खुष्कीचा मार्ग सुरू केला. त्यामुळें चीनचा भारत, इराण, सीरिया, वगैरे प्रदेशांशीं व्यापार सुरू झाला. चीनचा महत्त्वाचा व मौल्यवान असा व्यापारी जिन्नस म्हणजे रेशीम हा होता व त्यास भारत, इराण, रोमन साम्राज्य वगैरे देशांकडून मोठी मागणी असल्यानें त्याची या मार्गानें मोठ्या प्रमाणांत निर्यात होऊं लागली व त्यामुळें या मार्गास **रेशीम मार्ग** असें म्हणण्यांत येऊं लागलें. त्याचप्रमाणें या मार्गानें तुर्कस्थानमधून घोडे, इराण, मेसापोटेमिया व भारत या देशांतील जिनसांची आयात होऊं लागल्यानें चीनचा व्यापार वाढूं लागला.

इ. स. पू. १ ल्या शतकापासून लाकडी ठसे (ब्लॉक्स) करून छापण्याच्या कलेचा चीनमध्यें शोध लागला होता. चित्रें व धार्मिक महत्त्वाच्या गोष्टी अशाप्रकारें छापीत असत. चिनी लोक बांबू व लाकडाच्या पट्यावर लिहीत. पुढें रेशमापासून कागद तयार करण्यांत येऊं लागला; त्यावर बशानें लिहीत. लेखनसाहित्यांत सुधारणा व वाढ होत गेली, तरी चिनी लिपी क्लिष्ट असल्यामुळें शिक्षणाच्या बाबतींत चीनमधील बहुजनसमाज मागासलेलाच राहिला.

चीनमध्यें वॅन मँग हा सम्राट होऊन गेला (इ. स. ८–२३). त्यानें राज्यांतील विषमता नाहींशी करण्यासाठीं गरीब वर्गातील लोकांस जमिनी दिल्या, व आवश्यक वस्तुंच्या किंमतीवर नियंत्रण घातलें. इ. स. ६७ मध्यें मिंग टी या सम्राटानें आपल्या राजधानीच्या ठिकाणीं बौद्ध मठ स्थापन केला व बौद्ध धर्मांतील धार्मिक पुस्तकांचीं चिनी भाषेंत भाषांतरें करविलीं. चीनमध्यें प्रचलित असलेल्या ताओइझम व कनफ्यूसिझम या धर्मांप्रमाणेंच साधारणत: बौद्ध धर्माची शिकवण असल्यानें बौद्ध धर्माचा चीनमध्यें मोठ्या प्रमाणांत प्रसार होऊन तो वरील धर्मांप्रमाणेंच चीनमधील एक महत्त्वाचा धर्म बनला.

चीनमधील नद्यांस मोठाले पूर येऊन त्यापासून मोठी हानी होई. तेव्हां हॅन घराण्याच्या कारकीर्दीत त्यांवर नियंत्रण ठेवण्याची व्यवस्था करण्यांत आली. त्याचप्रमाणें यांगत्से नदीला धरणें बांधून कालव्यानें शेतीस पाणी पुरविण्याची व्यवस्था करण्यांत आली. हॅन घराण्याच्या काळांत चिनी मातीचीं भांडीं, रेशमी वस्त्रें, कांचसामान या उद्योगधंद्याचीही वाढ झाली.

हॅन घराण्याच्या सत्तेस पुढें उतरती कळा लागली. राजधानी यांगत्से नदी-वरील नानकिंग येथें हालविण्यांत आली. इ. स. २२० च्या सुमारास हॅन घराण्याची सत्ता संपुष्टांत येऊन तीन स्वतंत्र राज्यें स्थापन झालीं. यानंतर ३–४ शतकें अंदाधुंदींत गेल्यावर इ. स. ६१८ मध्यें टँग घराण्याची सत्ता स्थापन झाली.

चीनमधील मौल्यवान जिन्नस जें रेशीम तें कसें पैदा होतें याची युरोपमधील लोकांस जिज्ञासा होती. तेव्हां पूर्व रोमन साम्राज्याचा जस्टीनिअन हा सम्राट असतांना इ. स. ५५१ च्या सुमारास दोन ख्रिश्चन साधूंनीं रेशमी किडे चीनमधून गुप्तपणें युरोपमध्यें नेले.

टँग घराणें (इ. स. ६१८–९०७)—या घराण्याच्या कारकीर्दीत चीनमधील निरनिराळ्या स्वतंत्र राज्यांचें एकीकरण करण्यांत आलें. त्यामुळें प्रबल असें साम्राज्य स्थापन झालें. व्यापार, उद्योगधंदे, वगैरे गोष्टींमध्यें वाढ होऊन वाङ्मय, चित्रकला व शिल्पकला यांसही उत्तेजन मिळालें. या घराण्यांतील सम्राट ताईत्संग (६२७–६५०) यानें उत्तेजन दिल्यामुळें बौद्ध धर्म हा चिनी जीवनांत पक्का रुजला. या घराण्याच्या कारकीर्दीत अरब व्यापारी चीनमधील रेशमी माल खरेदी करण्यासाठीं पूर्वेकडील समुद्रमार्गें चिनी बंदरांत येऊं लागले, वायव्येकडील पामीरच्या आसपासच्या तार्तरी प्रदेशांवर, दक्षिणेकडील टाँकिन व अनाम व उत्तरेकडील मांचुरिया या प्रदेशाच्या दक्षिण भागावर चीननें आपलें वर्चस्व बसविलें, त्याचप्रमाणें तिबेट व कोरिया या प्रदेशांस मांडलिक करून त्यांच्यापासून खंडणी घेण्यास सुरवात केली. त्यामुळें चीनची साम्राज्यसत्ता बरीच वाढली. यावेळीं नानकिंग ही चीनच्या साम्राज्याची राजधानी असून तेथें इराण, सीरिया, मेसापोटेमिया, भारत वगैरे देशांतील गुणी व विद्वान् माणसें येऊं लागलीं त्यामुळें भारतांतील कनोज, पूर्व रोमन साम्राज्याचें कॉन्स्टाटिनोपल या शहरांप्रमाणें नानकिंग हें एक सांस्कृतिक केंद्र बनलें; व चिनी संस्कृतीचा पूर्वेकडील जपान, कोरिया व दक्षिणेकडील टाँकिन, इंडोचायना वगैरे प्रदेशांत प्रसार झाला. चीनमध्यें धार्मिक बाबतींत सहिष्णुता होती, त्यामुळें इराणमधील झोरोस्ट्रियन धर्म, अरबस्थानां-तील इस्लाम धर्म, युरोपमधील ख्रिस्ती धर्म यांचे प्रचारकही चीनमध्यें येऊं लागले.

छापण्याच्या कलेची चीनमध्यें वाढ झाली व ब्लॉक करून छापलेलें असें पुस्तक ९ व्या शतकांत प्रसिद्ध झालें.

चीनमध्यें जन्मावरून जाती ठरलेल्या नसत, तर व्यवसायपरत्वें समाजामध्यें चार वर्ग निर्माण झालेले होते. कोणासहि कोणताहि व्यवसाय करण्यास पूर्ण मुभा होती. हे चार वर्ग म्हणजे (१) शिक्षित असा बुद्धिजीवी वर्ग (२) सरदार वर्ग (३) शेतकरी वर्ग व (४) कामकरी वर्ग हे होत.

इ. स. ९०७ मध्यें टँग घराण्याची सत्ता नाहींशी होऊन ती अनेक सरदारांत विभागली गेली व कांहीं वर्षें अस्वस्थतेंत गेलीं, पण यानंतर ९६० मध्यें सुंग घराण्याची सत्ता स्थापन होऊन चीनच्या बहुतेक भागाचें एकीकरण झालें.

सुंग घराणें (इ. स. ९६० ते १२८०)—सुंग घराण्याची सत्ता सुमारें तीन शतकें टिकली. या काळांत वँग ॲन-शीह हा एक कर्तबगार मुख्य प्रधान होऊन गेला (Wang An-Shih १०२१-१०८६). कामकरी व गरीब वर्गांची स्थिति सुधारावी व श्रीमंत वर्गांकडून त्यांची पिळवणूक होऊं नये म्हणून त्यानें शेतकी, उद्योगधंदे व व्यापार या गोष्टी सरकारनें आपल्या हातांत घेण्याचा प्रयोग सुरू केला, पण या बाबतींत त्यास बराच विरोध झाल्यामुळें त्यास आपली मुख्य प्रधानकी सोडावी लागली. या काळांत च्यू सी (Chu Hsi) हा एक विद्वान् व व्यासंगी पुरुष होऊन गेला (११३०-१२००). त्यानें प्राचीन काळीं होऊन गेलेल्या कन फूशिअस वगैरें तत्त्ववेत्यांच्या ग्रंथाचें स्पष्टीकरण करण्यासाठीं टीकाग्रंथ लिहिले; व त्यामुळें प्राचीन तत्त्वज्ञानाविषयीं लोकांत आवड उत्पन्न झाली.

इ. स. १२२५ पासून चिनी साम्राज्याचा उत्तरेकडील भाग व दक्षिणेकडील भाग अशीं छकलें पडावयास लागलीं; व उत्तरेकडे हूण लोकांचें किन साम्राज्य स्थापन झालें, त्याची राजधानी पेकिंग ही होती. चीनच्या दक्षिण भागांत सुंग घराण्याची सत्ता असून कँटन ही राजधानी होती. याच सुमारास चीनच्या वायव्येकडील मंगोलिया या प्रदेशांत खळबळ होऊन तेथील अडदांड अशा मंगोल लोकांच्या झुंडी जेंगिसखान (Genghis Khan) यांच्या नेतृत्वाखालीं एकत्रित होऊन त्यांनीं इ. स. १२३४ मध्यें चीनच्या उत्तर भागावर (किन साम्राज्यावर) आपलें वर्चस्व बसविलें. यानंतर जेंगिझखानाचा नातू

कुब्लाईखान (Kublai Khan) यानें १२८० मध्यें चीनचा दक्षिण भागही जिंकून घेतल्यामुळें सुंग घराण्याची सत्ता संपुष्टांत येऊन चीनमध्य मंगोल लोकांच्या युनान घराण्याची सत्ता स्थापन झाली.

प्राचीन इराण

(इ. स. पू. ३३१ ते इ. स. १२६०)

ग्रीकांच्या वर्चस्वाखालील इराण (इ. स. पू. ३३१ ते इ. स. पू. २५०)— इराणच्या सम्राटाचा इसूस व अरबेला येथील लढायांत अलेक्झांडरनें पराभव केल्यावर इराण हा वैभवशाली देश अलेक्झांडरच्या विस्तृत साम्राज्याचा भाग बनला. अलेक्झांडरच्या मृत्यूनंतर त्याचें विस्तृत साम्राज्य त्याच्या प्रमुख सेनापतींमध्यें विभागलें गेलें, व भूमध्यसमुद्रापासून भारताच्या सरहद्दीपर्यंतचा प्रदेश सील्यूकस निकेटर याच्या वर्चस्वाखालीं आल्यामुळें इराणवर सेल्यूसिड्झ (Seleucids) हें ग्रीक घराणें राज्य करूं लागलें. या घराण्याची सत्ता सुमारें ७५ वर्षें (इ. स. पू. ३२३ ते इ. स. पू. २५०) होती. या काळांत ग्रीक संस्कृतीशीं इराणी संस्कृतीचा परिचय झाला, त्याचप्रमाणें भारतांतील मौर्य घराण्याचा ग्रीकांशीं मैत्रीचा संबंध असल्यामुळें भारताशींही इराणचें दळणवळण वाढलें व सांस्कृतिक संबंध येऊं लागले. इ. स. पू. २७५ च्या सुमारास इराणमधील ग्रीक सत्तेस उतरती कळा लागली व पूर्व व उत्तर सरहद्दीवर ग्रीक सरदारांचीं लहान मोठीं राज्यें स्थापन होऊं लागलीं. अशा प्रकारच्या राज्यांपैकीं बॅक्ट्रिया व गांधार (अफगाणिस्थान) या भागांत मिनांडर या ग्रीक सरदाराचें राज्य स्थापन झालेलें होतें. अशी परिस्थिति इराणच्या उत्तरेकडील तार्तरी (तुर्कस्थान) या प्रदेशांकडून पार्थियन, सीथीयम (शक), कुशाण या भटक्या जमाती दक्षिणेकडील व आग्नेयेकडील इराण, अफगाणिस्थान व भारत या प्रदेशांत बहुसंख्येनें घुसूं लागल्या. या जमाती घोड्यावर बसण्यांत व धनुष्यबाणांनीं युद्ध करण्यांत वाकबगार होत्या. यांपैकीं पार्थियन जमाती इराणमध्यें आल्या व त्या तेथें स्थायिक होऊन हलके हलके इराणी लोकांत मिसळून गेल्या. हलके हलके इराणमधील ग्रीकांची सत्ता कमकुवत होऊन अरसेसिझ या पार्थियन सरदारच्या नेतृत्वाखालीं पार्थियन व इराणी लोकांनीं ग्रीकांची सत्ता नाहींशी करून (इ. स. पू. २५०) तेथें आपलें वर्चस्व बसविलें.

पार्थियन साम्राज्य (इ. स. पू. २५० ते इ. स. २२६)—आरसेसीझ (Arsaces) या पार्थियन सरदाराच्या नेतृत्वाखालीं स्थापन झालेल्या पार्थियन साम्राज्याची सत्ता इराणवर सुमारें चार शतकें होती. हें पार्थियन साम्राज्य व पश्चिमेकडील रोमन साम्राज्य यांच्यामध्यें मेसापोटेमियांतील प्रदेशावरील वर्चस्वासंबंधानें बरेच युद्धप्रसंग होत असत. इ. स. पू. ५३ या वर्षी कॅरीच्या (Carrhae) लढाईत रोमन सेनापति क्रॅसस (Crassus) याचा पुरा मोड झाला, व त्यामुळें मेसापोटेमियाच्या बऱ्याच भागावर पार्थियन साम्राज्याचें वर्चस्व स्थापन झालें.

नवें इराणी साम्राज्य (सॅसानिड्झ घराणें इ. स. १२६ ते इ. स. ६४२). इराणवर पार्थियन लोकांचें साम्राज्य स्थापन झालें असतां इराणी जनतेंत जागृति होत होती व इ. स. २२६ मध्यें इराणमध्यें अंतस्थ खळबळ झाली. पार्थियन या परकीय लोकांची सत्ता नाहींशी होऊन १ आर्देसर याच्या नेतृत्वाखालीं इराणी लोकांच्या सॅसानीड्झ (Sassanids) घराण्याची सत्ता इराणमध्यें स्थापन झाली व ती सुमारें चार शतकें टिकली. आर्देसर यानें इराणमधील प्राचीन झरतुष्ट धर्मास (झोरोस्ट्रिअन) प्रोत्साहन दिलें व तो इराणचा राष्ट्रीय धर्म केला. त्याचप्रमाणें जुन्या चालीरीतींचें व आचारविचारांचें पुनरुज्जीवन केलें.

इराणमधील प्रमुख धर्म झोरोस्ट्रिअन हा होता. या धर्माचे लोक अग्नीची उपासना करीत. या धर्मामध्येंही कांहीं पंथ निर्माण झाले, त्यांपैकीं मैथ्रेझम हा प्रमुख होता. मैथ्रेझ हा प्रकाशाचा देव असून तो आर्मूझपासून उत्पन्न झालेला होता. या पंथाचे लोक सूर्याची उपासना करीत. या पंथाचा इराणप्रमाणें इराणच्या बाहेर सीरिया, इजिप्त, युरोप या रोमन साम्राज्यांत मोडणाऱ्या प्रदेशांतहि प्रसार होत होता. रोमन साम्राज्यांत या वेळीं ख्रिस्ती धर्माचा प्रसार होत होता, तरी ख्रिस्ती धर्मीयांचा रोमन साम्राज्यांत छळच होत होता. मैथ्रेझमप्रमाणें मनीझम नांवाचा धर्मपंथही इ. स. च्या तिसऱ्या शतकांत सुरू झाला. हा पंथ मनी यानें स्थापन केला. मनी हा एक तत्त्वज्ञानी होता. त्यानें त्यावेळीं पश्चिम आशियांत प्रचलित असलेल्या निरनिराळ्या धर्माचें अध्ययन केलें व आपणास दिव्य ज्ञान प्राप्त झालें असून नवीन धर्मपंथाची स्थापना करण्याची प्रेरणा झाली आहे असें त्यानें सांगितलें. पूर्वी होऊन

गेलेले मोझेस, झरतुष्ट्र, बुद्ध, येशू ख्रिस्त हे सर्व द्रष्टे व ईश्वराचे प्रेषित होते, पण त्यांच्या शिकवणीमुळें लोकांच्या धार्मिक समजुतींमध्यें जो गोंधळ उत्पन्न झाला आहे तो नाहींसा करून सद्धर्माचा प्रसार करण्याची प्रेरणा आपणांस झाली आहे असें त्यानें प्रतिपादन केलें, व आपल्या धर्मपंथाचा प्रसार करण्यासाठीं त्यानें इराणच्या शेजारचे तुर्कस्थान चीन, भारत या देशांमध्येंही संचार केला, व नंतर इराणची राजधानी टेसीफॉन (Ctesiphon) येथें येऊन (इ. स. २७०) आपल्या धर्मपंथाचा प्रसार करण्याचें कार्य त्यानें सुरू केलें. मनी याचा हा पाखंडीपणा इराणचा सम्राट व झोरोस्ट्रियन धर्मगुरु यांस पसंत पडला नाहीं व इ. स. २७७ मध्यें त्यास ठार करण्यांत आलें, व त्याच्या अनुयायांचा छळ करण्यांत आला; तरी या पंथाचे बरेच अनुयायी इराणमध्यें होते.

सॅसानीड्झ घराण्याची सत्ता इराणमध्यें स्थापन झाल्यावर पूर्वी होऊन गेलेल्या साइरस व डरायस या सम्राटांप्रमाणें आपलें साम्राज्य विस्तृत करावें व पूर्वीचें वैभव प्राप्त करून घ्यावें असें या घराण्यांतील राजकर्त्यांस वाटूं लागलें. पश्चिमेकडे असलेल्या रोमन सम्राटासही पूर्वेकडे आपली सत्ता वृद्धिंगत व्हावी असें वाटत होतें. झोरोस्ट्रियन धर्म हा इराणी साम्राज्याचा अधिकृत धर्म होता तसा ख्रिश्चन धर्मही चवथ्या शतकांत रोमन साम्राज्याचा अधिकृत धर्म झालेला होता. तेव्हां या दोन्ही प्रबल साम्राज्यांत सीरिया, आर्मेनिया, मेसापोटेमिया या प्रदेशांवरील वर्चस्वासंबंधीं त्याचप्रमाणें धार्मिक कारणासाठीं या पुढील तीनचार शतकांत युद्धप्रसंग होत गेले. १ ल्या अर्देसरचा मुलगा १ सपॉर यानें रोमन साम्राज्यांतील सीरियावर स्वारी केली व अँटिऑक (Antioch) शहर जिंकून घेतलें व रोमन सम्राट व्हॅलेरियन याचा पराभव करून त्यास कैद केले (इ. स. २६०).

सॅसानीडझ घराण्यांत कर्तृत्ववान सम्राट होऊन गेले, व त्यांनीं इराणी (पर्शियन) साम्राज्याचा दरारा वाढविला. १ ला खुश्रु (५३१–५९०) यानें उत्तरेकडील तार्तरी व दक्षिणेकडील अरबस्थान या प्रदेशाच्या कांहीं भागांवर आपली सत्ता स्थापन केली व पूर्व रोमन साम्राज्यांतील प्रदेशावर स्वारी केली. तसेंच त्यानें कलाविद्यांत प्रोत्साहन दिलें, त्यामुळें दूरदूरच्या राज्यांतील विद्वान् व गुणी माणसें त्याच्या दरबारीं येऊं लागलीं. यानंतर २ रा खुश्रु (५९० ते ६२८)

हा पराक्रमी सम्राट होऊन गेला. त्यानें सातव्या शतकाच्या सुरवातीस रोमन साम्राज्यांतील सीरिया, आशिया मायनर, पॅलेस्टाइन, इजिप्त या प्रदेशावर स्वाऱ्या करून त्यांपैकीं बऱ्याच भागांवर आपलें वर्चस्व स्थापन केलें, पण रोमन सम्राट हेराक्लायस (Heraclius) यानें मोठें सैन्य जमा फेलें, व चिकाटीचा प्रयत्न करून इराणी सैन्याचा ठिकठिकाणीं पराभव केला व शेवटीं इ. स. ६२७ मध्यें निनेव्हा येथें इराणी सैन्यावर मोठा विजय मिळवून हे प्रदेश परत मिळविले. यानंतर इराणी साम्राज्य व पूर्व रोमन साम्राज्य यांच्यामध्यें तह होऊन त्यांमधील युद्धप्रसंग थांबले. पण गेल्या दोन तीन शतकामध्यें निरनिराळ्या वेळीं झालेल्या या युद्धामुळें हीं दोन्हीं साम्राज्यें हतबल होऊन कमकुवत झालीं. इराणच्या सॅसानिड्झ घराण्यांतील यानंतर येणारे सम्राटही अकर्तृत्ववान, चैनी व विलासी असे होते. राजघराण्यांत अंतस्थ दुही व साम्राज्यांत बंडाळी सुरू होऊन इराणचें वैभवशाली साम्राज्य आंतून पोखरलें जाऊं लागलें.

अशी स्थिति असतां इ. स. ६२२ मध्यें अरबस्थानांत महंमद यानें इस्लामी धर्माची स्थापना केली होती. महमद ६३२ मध्यें मरण पावल्यावर इस्लामी धर्म व अरबांचें राज्य यांची वृद्धि करण्यासाठीं उमर या खलिफानें मोंवतालच्या प्रदेशावर स्वारी करण्याचें ठरविलें, व पॅलेस्टाईन व सीरिया या पूर्व रोमन साम्राज्याच्या प्रदेशांवर स्वारी केली. केडेसिया (Kedessia) येथें अरब सैन्य व इराणी सैन्य यांच्यामध्यें लढाई होऊन (६३७) त्यामध्यें इराणी सैन्याचा पराभव झाला व इराणी साम्राज्यांतील मेसापोटेमिया या प्रदेशांवर अरबांचें वर्चस्व स्थापन झालें. यानंतर अरब सैन्यानें इराणवर स्वारी करून इराणच्या सैन्याचा मोड केला व तेथील सॅसानिडझ घराण्यांतील सम्राटास पदच्युत करून इराणवर आपलें वर्चस्व स्थापन केलें, व इराण हा अरब साम्राज्याचा भाग झाला. तेथील बहुसंख्य लोक आपल्या पूर्वीच्या झोरोस्ट्रियन धर्माचा त्याग करून इस्लाम धर्मीय बनले. ज्यांस आपला पूर्वीचा झोरोस्ट्रियन धर्म सोडावयाचा नव्हता, त्यांपैकीं बरेच निर्वासित म्हणून इ. स. ७३५ मध्यें भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील संजान या ठिकाणीं आले व भारताचे कायमचे रहिवासी झाले. भारतांत असलेल्या पारशी जमातीचे हे पूर्वज होत.

इराण हा अरब साम्राज्याचा भाग झाल्यावर खलिफाची व अरब साम्राज्याची राजधानी अरबस्थानांतील मदिनेहून सीरियामधील दमास्कस

येथें आणण्यांत आली (६६१), व यानंतर ७५९ मध्यें ती मेसापोटेमियांतील टॅयग्रीस नदीच्या काठचें बगदाद येथें नेण्यांत आली. खिलाफतची राजधानी बगदाद येथें आल्यावर खिलाफतवर इराणी संस्कृतीची छाप पडली. पुढें १० व्या शतकांत खिलाफतची व अरब साम्राज्याची कॉर्डोव्हा, कायरो व बगदाद हीं केंद्रें असलेलीं तीन छकलें झालीं. यानंतर बगदाद येथील खिलाफतमध्यें लष्करी बाबतींत सेलज्यूक तुर्कांचें महत्त्व बरेंच वाढलें. अरब साम्राज्यांतील दूरदूरचे प्रदेश स्वतंत्र होत असतां इराण व अफगाणिस्थान यांवरील अरबांची सत्ता नाहींशी होऊन तेथें ११ व्या व बाराव्या शतकांत उत्तरेकडील तार्तरी प्रदेशांतील तुर्क सरदारांनीं आपलीं राज्यें स्थापन केलीं, व त्यांचें खेरेसमन नांवाचें एक साम्राज्य बनलें. अशी परिस्थिति असतां मध्य आशियांत मंगोल या आडदांड लोकांची सत्ता स्थापन झाली व त्यांनीं दक्षिणेकडील इराण, मेसापोटेमिया व सीरिया या प्रदेशावर स्वारी करून इ. स. १२५८ मध्यें बगदादच्या खलिपास ठार केले, व मेसापोटेमिया, इराण व सीरिया या प्रदेशांवर आपली सत्ता स्थापन केली, व त्यामुळें इराण हा मंगोल साम्राज्याचा भाग बनला.

महंमद, इस्लामी धर्माची स्थापना व खिलाफत

(इ. स. ५७० ते १२५८)

अरबस्तान व तेथील जमाती—आशिया खंडांत भारताच्या पश्चिमेस अरबस्थान हें क्षेत्रफळाच्या दृष्टीनें भारताच्या सुमारें $\frac{2}{3}$ एवढें मोठें द्वीपकल्प आहे. यांतील बराच भाग रुक्ष व ओसाड आहे. नैऋत्य व अग्नेयेकडील समुद्रकिनाऱ्यावरील प्रदेश कांहींसा सुपीक आहे व तेथील लोक शेती व व्यापार करून रहातात. इतर ठिकाणचे लोक भटक्या वृत्तीचे आहेत. शेळ्या, मेंढ्या व गुरेंढोरें यांचे कळप पाळणें, वहातुक करणें व वाटमारी करणें हा त्यांचा व्यवसाय होता. हे लोक सेमिटिक या प्रमुख मानववंशाचे आहेत व त्यांचें मूळ ठिकाण अरबस्थान हें होय. येथील बराच प्रदेश रुक्ष व नापिक असल्यामुळें प्राचीन काळापासून निरनिराळ्या वेळीं येथील लोक वायव्य, ईशान्य व उत्तर दिशेकडे जाऊन तेथें स्थायिक झाले. फीनीशियन, हिब्रू (ज्यू), खाल्डियन हे लोक मूळचे अरबस्थानांतीलच होत. अशारीतीनें निरनिराळ्या वेळीं येथील

बरेच लोक बाहेर पडून ते तेथें स्थायिक झाले, तरी अरबस्थानांत राहिलेल्या लोकांचा जीवनक्रम पूर्वीप्रमाणेंच होता. या लोकांस 'बदाऊन' असें म्हणत. त्यांच्यांत निरनिराळ्या जमाती असून त्यांच्यामध्यें तंटें, युद्धप्रसंग वारंवार होत. या जमातींपैकीं कांहीं जमाती बऱ्याच मागासलेल्या असून मूर्तीत देव आहे असें समजून मूर्तिपूजा करीत. देव प्रसन्न व्हावा म्हणून ते बळी देत. दारू पिणें, जुगार खेळणें, वगैरे व्यसनें त्यांच्यांत रूढ होतीं. त्यांच्या सामाजिक चालीरीती बऱ्याच मागासलेल्या होत्या. स्त्री ही गुराढोरांप्रमाणें वस्तू मानली जाई. त्यांच्यांत गुलामगिरीची पद्धत होती. पण अरबस्थानांत असणाऱ्या कांहीं जमाती पुढारलेल्या असून व्यापार करण्यासाठीं त्यांच्यांतील लोक दूरदूरच्या प्रदेशांकडे खुष्कीनें व समुद्रमार्गानें जात असत. अरबस्थानच्या पश्चिम भागांतील समुद्रालगतच्या प्रदेशांतून दक्षिणेकडून उत्तरेकडे जाणारे व्यापारी मार्ग असून मालाचे तांडे या मार्गावरून जात. या मार्गावर मक्का व मदिना हीं शहरें असून तीं पूर्वीपासून बरीच प्रसिद्ध होतीं. यांपैकीं मक्का हें शहर तेथील लोकांचें एक प्रमुख धर्मक्षेत्र मानलें जाई. तेथें काबा नांवाचें एक प्रसिद्ध देवस्थान असून त्यांत एक मोठा उल्केचा दगड होता, व त्यास देव मानून त्याची पूजा केली जाई. तेथें वर्षांतील कांहीं दिवस मोठी जत्रा भरे व त्यावेळीं अरबस्थानांतील निरनिराळ्या ठिकाणचे लोक आपसांतील तंटेबखेडे विसरून तेथें जमत. तेथें गायन, खेळ, काव्य वगैरे गोष्टींच्या चढाओढी होत. अशा जत्रेच्या वेळीं काबा मंदिराच्या पुजाऱ्यास त्याचप्रमाणें मक्केतील व्यापाऱ्यांस व उद्योगधंदे करणाऱ्या लोकांस बरीच प्राप्ति होई.

इस्लाम धर्माची स्थापना—इ. स. ५७० मध्यें मक्का शहरांत महंमदाचा जन्म झाला. त्याचे आईबाप गरीब होते. त्याच्या जन्मापूर्वीच त्याचा बाप मरण पावला होता व तो लहान असतांना त्याची आईही मरण पावली. तेव्हां त्याचा चुलता अबू तालीब यानें लहानपणीं त्याचा सांभाळ केला. मक्केपासून सीरियाकडे मालाची ने-आण करण्याचा धंदा तो करूं लागला. वयाच्या २५ व्या वर्षी तो एका श्रीमंत व्यापाऱ्याच्या खजिदा नांवाच्या स्त्रीच्या पदरीं मुनीम म्हणून नोकरीस राहिला व तिची मर्जी संपादन करून त्यानें तिच्याशीं लग्न केलें. तिच्यापासून त्यास फातिमा ही मुलगी झाली. व्यापाराच्या कामासाठीं महंमद यास मदिना, दमास्कस, जेरूसलेम वगैरे ठिकाणीं जावें लागे व तेथें सुरू असलेल्या

येथें आणण्यांत आली (६६१), व यानंतर ७५९ मध्यें ती मेसापोटेमियांतील टॅयग्रीस नदीच्या काठचें बगदाद येथें नेण्यांत आली. खिलाफतची राजधानी बगदाद येथें आल्यावर खिलाफतवर इराणी संस्कृतीची छाप पडली. पुढें १० व्या शतकांत खिलाफतची व अरब साम्राज्याची कॉर्डोव्हा, कायरो व बगदाद हीं केंद्रें असलेलीं तीन छकलें झालीं. यानंतर बगदाद येथील खिलाफतमध्यें लष्करी बाबतींत सेलज्युक तुर्कांचें महत्त्व बरेंच वाढलें. अरब साम्राज्यांतील दूरदूरचे प्रदेश स्वतंत्र होत असतां इराण व अफगाणिस्थान यांवरील अरबांची सत्ता नाहींशी होऊन तेथें ११ व्या व बाराव्या शतकांत उत्तरेकडील तार्तरी प्रदेशांतील तुर्क सरदारांनीं आपलीं राज्यें स्थापन केलीं, व त्यांचें खेरेसमन नांवाचें एक साम्राज्य बनलें. अशी परिस्थिति असतां मध्य आशियांत मंगोल या आडदांड लोकांची सत्ता स्थापन झाली व त्यांनीं दक्षिणेकडील इराण, मेसापोटेमिया व सीरिया या प्रदेशावर स्वारी करून इ. स. १२५८ मध्यें बगदादच्या खलिपास ठार केले, व मेसापोटेमिया, इराण व सीरिया या प्रदेशांवर आपली सत्ता स्थापन केली, व त्यामुळें इराण हा मंगोल साम्राज्याचा भाग बनला.

महंमद, इस्लामी धर्माची स्थापना व खिलाफत

(इ. स. ५७० ते १२५८)

अरबस्तान व तेथील जमाती—आशिया खंडांत भारताच्या पश्चिमेस अरबस्थान हें क्षेत्रफळाच्या दृष्टीनें भारताच्या सुमारें $\frac{2}{3}$ एवढें मोठें द्वीपकल्प आहे. यांतील बराच भाग रुक्ष व ओसाड आहे. नैऋत्य व अग्नेयेकडील समुद्रकिनाऱ्यावरील प्रदेश कांहींसा सुपीक आहे व तेथील लोक शेती व व्यापार करून रहातात. इतर ठिकाणचे लोक भटक्या वृत्तीचे आहेत. शेळ्या, मेंढ्या व गुरेंढोरें यांचे कळप पाळणें, वहातुक करणें व वाटमारी करणें हा त्यांचा व्यवसाय होता. हे लोक सेमिटिक या प्रमुख मानववंशाचे आहेत व त्यांचें मूळ ठिकाण अरबस्थान हें होय. येथील बराच प्रदेश रुक्ष व नापिक असल्यामुळें प्राचीन काळापासून निरनिराळ्या वेळीं येथील लोक वायव्य, ईशान्य व उत्तर दिशेकडे जाऊन तेथें स्थायिक झाले. फीनीशियन, हिब्रू (ज्यू), खाल्डियन हे लोक मूळचे अरबस्थानांतीलच होत. अशारीतीनें निरनिराळ्या वेळीं येथील

बरेच लोक बाहेर पडून ते तेथें स्थायिक झाले, तरी अरबस्थानांत राहिलेल्या लोकांचा जीवनक्रम पूर्वीप्रमाणेंच होता. या लोकांस 'बदाऊन' असें म्हणत. त्यांच्यांत निरनिराळ्या जमाती असून त्यांच्यामध्यें तंटें, युद्धप्रसंग वारंवार होत. या जमातींपैकीं कांहीं जमाती बऱ्याच मागासलेल्या असून मूर्तीत देव आहे असें समजून मूर्तिपूजा करीत. देव प्रसन्न व्हावा म्हणून ते बळी देत. दारू पिणें, जुगार खेळणें, वगैरे व्यसनें त्यांच्यांत रूढ होतीं. त्यांच्या सामाजिक चालीरीती बऱ्याच मागासलेल्या होत्या. स्त्री ही गुराढोरांप्रमाणें वस्तु मानली जाई. त्यांच्यांत गुलामगिरीची पद्धत होती. पण अरबस्थानांत असणाऱ्या कांहीं जमाती पुढारलेल्या असून व्यापार करण्यासाठीं त्यांच्यांतील लोक दूरदूरच्या प्रदेशांकडे खुष्कीनें व समुद्रमार्गानें जात असत. अरबस्थानच्या पश्चिम भागांतील समुद्रालगतच्या प्रदेशांतून दक्षिणेकडून उत्तरेकडे जाणारे व्यापारी मार्ग असून मालाचे तांडे या मार्गावरून जात. या मार्गावर मक्का व मदिना हीं शहरें असून तीं पूर्वीपासून बरीच प्रसिद्ध होतीं. यांपैकीं मक्का हें शहर तेथील लोकांचें एक प्रमुख धर्मक्षेत्र मानलें जाई. तेथें काबा नांवाचें एक प्रसिद्ध देवस्थान असून त्यांत एक मोठा उल्केचा दगड होता, व त्यास देव मानून त्याची पूजा केली जाई. तेथें वर्षांतील कांहीं दिवस मोठी जत्रा भरे व त्यावेळीं अरबस्थानांतील निरनिराळ्या ठिकाणचे लोक आपसांतील तंटेबखेडे विसरून तेथें जमत. तेथें गायन, खेळ, काव्य वगैरे गोष्टींच्या चढाओढी होत. अशा जत्रेच्या वेळीं काबा मंदिराच्या पुजाऱ्यास त्याचप्रमाणें मक्केंतील व्यापाऱ्यांस व उद्योगधंदे करणाऱ्या लोकांस बरीच प्राप्ति होई.

इस्लाम धर्माची स्थापना—इ. स. ५७० मध्यें मक्का शहरांत महंमदाचा जन्म झाला. त्याचे आईबाप गरीब होते. त्याच्या जन्मापूर्वीच त्याचा बाप मरण पावला होता व तो लहान असतांना त्याची आईही मरण पावली. तेव्हां त्याचा चुलता अबू तालीब यानें लहानपणीं त्याचा सांभाळ केला. मक्केपासून सीरियाकडे मालाची ने-आण करण्याचा धंदा तो करूं लागला. वयाच्या २५ व्या वर्षी तो एका श्रीमंत व्यापाऱ्याच्या खजिदा नांवाच्या स्त्रीच्या पदरीं मुनीम म्हणून नोकरीस राहिला व तिची मर्जी संपादन करून त्यानें तिच्याशीं लग्न केलें. तिच्यापासून त्यास फातिमा ही मुलगी झाली. व्यापाराच्या कामासाठीं महंमद यास मदिना, दमास्कस, जेरूसलेम वगैरे ठिकाणीं जावें लागे व तेथें सुरू असलेल्या

ज्यु, ख्रिश्चन वगैरे धर्मांशीं त्याचा परिचय होऊन त्यांतील एकेश्वरी मताचा व त्यांतील चालीरीतींचा त्याच्या मनावर अतोनात परिणाम झाला. तेव्हां अंतर्मुख होऊन तो अरबस्थानांत सुरू असलेल्या धर्मांचा व तेथें रूढ असलेल्या सामाजिक चालीरीतींचा विचार करूं लागला. अशा स्थितींत असतांना मक्केजवळील हिरा टेकडीजवळ विचार करीत बसला असतांना आपणास ईश्वरी साक्षात्कार झाला आहे व नवीन एकेश्वरी धर्माची स्थापना करण्याची प्रेरणा झाली आहे असें तो सांगूं लागला; व मूर्तीपूजेविरुद्ध बोलूं लागला. काबा मंदिराच्या पुजाऱ्यानें त्याच्या या पाखंडी मताबद्दल पहिल्यानें त्याच्याकडे दुर्लक्ष केलें. पण त्याच्या नवीन धर्ममताचा लोकांवर परिणाम होऊन त्यास बरेंच अनुयायी मिळत आहेत हें पाहून तो महमदाचा व त्याच्या अनुयायांचा छळ करूं लागला. तेव्हां आपल्या प्राणावरहि संकट येईल हें पाहून त्यानें शुक्रवार ता. १६ जुलै ६२२ मध्यें मक्का सोडून मदिनेस प्रयाण केलें. या प्रयाणास हिजरत (Hijira) असें म्हणतात व या वर्षापासून इस्लामी (मुसलमान) धर्माची स्थापना झाली असें समजून मुसलमानी राज्यें पुढें वर्षगणना करूं लागलीं. मदिनेस आल्यावर महंमदास पुष्कळ अनुयायी मिळाले. त्यानें तेथील लोकांमधील आपसांतील तंटे मोडून आपल्या नेतृत्वाखालीं राज्य स्थापन केलें व सैन्यही उभारलें. लोकांमध्यें उत्साह उत्पन्न केला. कायद्याची नीट मांडणी केली. यानंतर मक्केवर स्वारी केली (इ. स. ६३०). तेव्हां तेथील लोक शरण येऊन त्यांनींही इस्लाम धर्म स्वीकारिला; व काबाच्या देवळाच्या ठिकाणीं देवळाऐवजीं मशीद स्थापन करण्यांत आली.

कुराण— इस्लाम धर्मीयांचें पवित्र पुस्तक म्हणजे **कुराण** हें होय. महंमद निरनिराळ्या वेळीं ध्यानस्त बसला असतां त्यास तंद्री येत असे. त्यावेळीं आपणांस दिव्य दृष्टि प्राप्त झाली आहे व आपल्या मुखानेंच ईश्वरी संदेश सांगण्यांत येत आहे असें त्यास वाटे. तेव्हां तो अशा तंद्रीमय स्थितींत असतां त्याच्या मुखांतून निरनिराळ्या विषयांवर जे उद्गार निघत ते ईश्वरी प्रेरणेनेंच निघत असें वाटून त्याचे अनुयायी ते उतरून ठेवीत. हीं उतरून ठेवलेलीं त्याचीं सर्व वचनें त्याच्या अनुयायांनीं त्याच्या मृत्यूनंतर एकत्रित करून प्रसिद्ध केलीं, व त्यासच कुराण असें म्हणतात. त्यांत मुसलमानी धर्माचीं पुढील तत्त्वें ग्रथित केलेलीं आहेत :—

(१) ईश्वर एकच आहे व तो म्हणजे अल्ला व महंमद हा त्याचा प्रेषित आहे. ईश्वर सर्व शक्तिमान, ज्ञानी व दयाळू आहे.

(२) आत्मा अमर आहे. इस्लाम धर्माचे अनुयायी असलेल्यांच्या आत्म्यास स्वर्गांमध्यें सुखप्राप्ति होते. इतरांच्या आत्म्यांस नरकांत खिचपत पडावें लागतें.

(३) दिवसांतून पांच वेळां ईश्वराची प्रार्थना करावी. शुक्रवारीं सामुदायिक प्रार्थना करावी. रमझान महिन्यांत सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत उपवास करावा. गरिबांस दानधर्म करावा. मक्केची यात्रा करावी.

इ. स. ६३२ मध्यें महंमद मरण पावला.

खिलाफत व मुसलमानी सत्तेची वाढ— महंमदाच्या मृत्यूनंतर त्याच्या अनुयायांनीं **अबू बकर** या कर्तबगार व अनुभवी गृहस्थाची आपला पुढारी म्हणून नेमणूक केली. अरबांचें राज्य व इस्लाम धर्म यांचा नेता व महंमदाचा प्रतिनिधी म्हणून त्यास **खलिफा** असें म्हणण्यांत येऊं लागलें. हा इ. स. ६२४ मध्यें मरण पावला. त्याच्यानंतर महंमदाचा मेव्हणा **उमर** याची खलिफा म्हणून नेमणूक झाली. हिजरत सन त्यानें सुरू केला. मदिना हें राजधानीचें ठिकाण होतें, व अरबांचें राज्य अरबस्थानांतच होतें. आपलें राज्य शेजारच्या प्रदेशांत विस्तृत करून त्या ठिकाणीं इस्लामी धर्माची स्थापना करण्याचें उमर यानें ठरविलें. शेजारचे प्रदेश म्हणजे पूर्व रोमन साम्राज्यांत मोडणारे सीरिया, आशिया मायनगर, इजिप्त हे होत. त्याचप्रमाणें पूर्वेच्या बाजूस इराणचें मोठें साम्राज्य असून ते मेसापोटेमियांपर्यंत पसरलें होतें. सातव्या शतकाच्या सुरवातीपर्यंत पूर्व रोमन साम्राज्य व इराणचें साम्राज्य यांमध्यें वितुष्ट येऊन युद्धप्रसंग झालेले होते, व त्यामुळें हीं दोन्हीं साम्राज्यें कमकुवत झालीं होतीं. त्याचप्रमाणें या दोन्ही साम्राज्यांस उत्तरेकडील रानटी टोळ्यांच्या हल्ल्यांपासून आपलें संरक्षण करणें जरूर होतें. तेव्हां मदिना येथें स्थापन झालेल्या अरब राष्ट्रास रोमन साम्राज्यांत मोडणाऱ्या प्रदेशांवर व त्याचप्रमाणें इराणी साम्राज्यावर स्वारी करण्यास ही अनकूल संधि होती.

सीरिया व आर्मेनिया (६३५-३८)—अरब सैन्यानें सीरियावर स्वारी करून तीन वर्षांत सीरिया व पॅलेस्टाईन प्रांत आपल्या ताब्यांत आणिले. रोमन सैन्यानें अरब सैन्याचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला, पण त्यास यश आलें नाहीं. यानंतर अरब सैन्यानें शेजारचा आर्मेनिया प्रांतहि जिंकून घेतला.

आफ्रिका खंडांतील प्रदेश—(६४६–४७) यानंतर कांहीं वर्षांनीं अरब सैन्यानें उत्तर आफ्रिकेंतील पूर्व रोमन साम्राज्याच्या वर्चस्वाखालील इजिप्त, त्रिपोली, ट्यूनिस, मोरोक्को वगैरे प्रदेश जिंकून घेऊन उत्तर आफ्रिकेंतील रोमन सत्ता नाहींशी केली व या जिंकलेल्या प्रदेशांतील बहुतेक लोकांस इस्लामी धर्माची दीक्षा दिली. या प्रदेशांत यापूर्वी ख्रिश्चन धर्माचा बराच प्रसार झाला होता, पण ख्रिश्चन धर्मामध्यें निरनिराळे पंथ निर्माण होऊन त्यामध्यें तंटे सुरू असल्यामुळें तेथील लोकांस ख्रिश्चन धर्माबद्दल उदासीनता वाटत होती.

इराणचें साम्राज्य—इ. स. ६३७ मध्यें अरब सैन्यानें इराणच्या साम्राज्यावर स्वारी केली. तेथील सॅसानिडस घराण्यांतील इराणच्या सम्राटानें अरब सैन्यास थोपवून धरण्याची पराकाष्ठा केली; पण त्यास यश मिळालें नाहीं व इराणी साम्राज्यांत मोडणारा सर्व प्रदेश अरबांनीं जिंकून घेतला व तेथें इस्लामी धर्माचा प्रसार केला. ज्यांस तेथील झोरोस्ट्रियन धर्म सोडावयाचा नव्हता अशा लोकांपैकीं बरेच लोक नंतर निर्वासित म्हणून भारतांत गेले.

सायप्रस—अरबांनीं आरमार तयार करवून भूमध्यसमुद्रांतील सायप्रस बेटही आपल्या वर्चस्वाखालीं आणलें ६४६.

स्पेन—इ. स. ७११ मध्यें उत्तर आफ्रिकेंतील बर्बर व मूर टोळ्यांनीं अरब सेनापतीच्या नेतृत्वाखालीं स्पेनवर हल्ला केला, व तेथील व्हिजीगॉथ लोकांचें राज्य धुळीस मिळविलें. पूर्व रोमन साम्राज्याची राजधानी कॉन्स्टाटिनोपल शहर जिंकून घेण्याचा त्यांनीं इ. स. ७०८ च्या सुमारास मोठा प्रयत्न केला व त्यासाठीं त्यांनीं खुष्कीच्या मार्गानें व समुद्रावरूनही कॉन्स्टाटिनोपलवर हल्ले केले, पण पूर्व रोमन सम्राट ३ लिओ यानें अरब लोकांचे हल्ले परतावून लाविले. त्याचप्रमाणें स्पेनमधून उत्तरेकडे घुसून फ्रान्स देश काबीज करण्याचाही अरबांनीं प्रयत्न केला, पण इ. स. ७३२ मध्यें फ्रँकिश लोकांचा राजा **चार्लस मार्टेल** यानें फ्रान्समधील टूर्स येथें अरबांचा पराभव करून त्यांस पिरनीज पर्वतापलीकडे पिटाळून लाविलें.

अशा रीतीनें महंमदाच्या मृत्यूनंतर १०० वर्षांच्या काळांत अरबांनीं युरोपमधील स्पेन, भूमध्यसमुद्राच्या दक्षिण किनाऱ्यावरील आफ्रिकेंतील सर्व

प्रदेश व पश्चिम आशियांतील सीरिया, आर्मेनिया, मेसापोटेमिया, इराण हे प्रदेश जिंकून घेऊन बऱ्याच मोठ्या विस्तृत प्रदेशावर आपलें साम्राज्य स्थापन केलें, त्यामुळें ख्रिश्चन धर्मीयांचीं पवित्र ठिकाणें जेरूसलेम, अँटिऑक वगैरे मुसलमान धर्मीयांकडे गेलीं.

शिया व सुनी—उमरनंतर उस्मान घराण्यांतील उस्मान यास खलिफा नेमण्यांत आलें. हा ६४४ पासून ६५६ पर्यंत खलिफा होता. पण महंमदाचा जावई अल्ली (महमदाच्या फतिमा या मुलीचा पति) यास ही गोष्ट आवडली नाहीं. उस्मानचा इ. स. ६५६ मध्यें खून झाल्यावर अल्ली हा खलिफा झाला व तो इ. स. ६६१ पर्यंत खलिफा होता. पण त्याचाही खून झाला, तेव्हां उस्मान घराण्यांतील मौविया खलिफा झाला (६६१-६८०). याच सुमारास इस्लाम धर्मीयांमध्यें शिया व सुनी हे दोन पंथ निर्माण झाले. खलिफाचा अधिकार महंमदाच्या नातलगाकडे असावा असें म्हणणारे ते शिया व तो अधिकार धर्मसभेनें निवडून दिलेल्यांकडे असावा असे म्हणणारे ते सुनी होत. तेव्हां या दोन पंथीयांमध्यें वितुष्ट येऊन महंमदाचा जावई व चवथा खलिफा जो अल्ली त्याचा मुलगा हुसेन हा मारला गेला. (इराणांत करबला येथें हुसेन याची कबर असून तिची प्रतिमा म्हणजे ताबूत करण्याचा प्रघात पुढें बाबरानें भारतांत सुरू केला.)

खिलाफतची राजधानी—अरब साम्राज्याची व खिलाफतची राजधानी पहिल्यानें मदिना हें शहर होतें व इस्लाम धर्मीयांचें प्रमुख ठिकाण मक्का असून हीं दोन्हीं ठिकाणें अरबस्थानांत होतीं. पण अरब साम्राज्य ज्या विस्तृत प्रदेशावर पसरलेलें होतें, त्या मानानें हीं दोन्हीं ठिकाणें एका बाजूला असल्यासारखीं होतीं. पण राज्यकारभाराच्या दृष्टीनें राजधानीचें ठिकाण मध्यवर्ती असणें जरूर आहे असें वाटून इ. स. ६६१ मध्यें राजधानी सीरियामधील प्रमुख शहर जें दमास्कस येथें नेण्यांत आली. इ. स. ७५९ पर्यंत तेथें राजधानी होती. यानंतर मेसापोटेमियांतील **बगदाद** हें राजधानीचें ठिकाण झालें व इ. १२५८ पर्यंत येथें खलिफाची राजधानी होती. बगदादला राजधानी आल्यावर इराणी संस्कृतीची अरब संस्कृतीवर बरीच छाप पडली. इराणी लोक सांस्कृतिक व कलाकौशल्याच्या

बाबतींत पुढारलेले होते. बगदाद ही खिलाफतची राजधानी असतांना खलिफा **अल-मनसूर** (७१२-७५) व **हरुन-अल-रशीद** (७८६-८०९) हे प्रसिद्ध खलिफा होऊन गेले. त्यांच्या कारकीर्दीत बगदाद या शहराची खूप भरभराट होऊन तें कॉन्स्टाटिनोपल प्रमाणें वैभवशाली शहर बनलें व व्यापाराचें केंद्रस्थान झालें. ठिकठिकाणचे विद्वान् व गुणी लोक या शहराकडे लोटूं लागले व तें कलाविद्यांचें आगरस्थान झालें. खलिफ-अल-मनसूर यानें बगदाद येथें एक संशोधन केंद्र व विद्याकेंद्र स्थापन केलें व त्यावेळीं विद्याकलांच्या बाबतींत प्रमुख असलेल्या निरनिराळ्या देशांतील विद्वान व व्यासंगी लोकांस बोलावून ग्रीक, लॅटिन, संस्कृत, सीरियन झेंड वगैरे भाषांतील ज्योतिष, गणित, वैद्यकी, तत्त्वज्ञान, कथाग्रंथ वगैरे शास्त्रींय व इतर विषयांवरील ग्रंथांचीं अरबी भाषेंत भाषांतरें करवून घेतलीं. त्यामुळें खिलाफतच्या वर्चस्वाखालीं असलेल्या प्रदेशांत विद्या, कला यांस प्रोत्साहन मिळून तेथील लोक सुसंस्कृत बनूं लागले. यावेळीं भारतामधील शास्त्री, पंडित, धन्वंतरी बगदाद वगैरे दूरच्या ठिकाणीं जाऊन तेथें वास्तव्य करीत असत. खलिफाचें सैन्य प्रबळ व सुसज्ज होतें. राज्यकारभाराची पद्धत नीट आंखलेली होती. पण नंतर येणाऱ्या खलिफांचा पूर्वीचा साधेपणा जाऊन ऐषआरामानें व ख्यालीखुशीनें राहण्याकडे त्यांची वृत्ति होऊं लागली. राज्यांतील श्रीमान् वर्गाची धर्मावरील श्रद्धा कमी होऊन ते छानछुकीनें व व्यसनांत काळ घालवूं लागले. हरुन-अल-रशीदच्या मृत्यूनंतर स्पेनपासून भारताच्या सरहद्दीपर्यंत पसरलेल्या विस्तृत अरब साम्राज्यास व बगदादच्या सत्तेस १० व्या शतकापासून उतरती कळा लागली. उस्मान घराण्यांतील एका वंशजानें स्पेनमध्यें जाऊन तेथील मूर व बर्बर जमातींतील तंट्याचा फायदा घेऊन तेथील सत्ता बळकाविली व स्पेनमधील कार्डोव्हा येथें उस्मानी खिलाफत स्थापन केली. महंमदाची मुलगी फातिमा हिच्या वंशजानें इजिप्तमधील कायरो येथें फतिमिड खिलाफत स्थापन केली, व बगदाद येथें पूर्वीची आबासी खिलाफत राहिली. अशारीतीनें दहाव्या शतकांत खिलाफतचीं तीन छकलें झालीं. त्याचप्रमाणें विस्तृत अरब साम्राज्यांतील ठिकठिकाणचे प्रदेश स्वतंत्र होऊं लागले. बगदादच्या खिलाफतच्या ईशान्य दिशेस असलेल्या तार्तरी किंवा तुर्कस्थान या प्रदेशांत तुराणी किंवा तुर्क या अडदांड, भटक्या लोकांची वस्ती होती. लूटमार करणें व दंगेधोपे

करणें हा त्यांचा व्यवसाय होता. बगदादच्या खिलाफतशीं यांचा संबंध आल्यावर ते इस्लाम धर्मीय बनले व कडवे धर्मवेडे मुसलमान झाले. या तुर्क लोकांपैकीं कांहींनीं इराणपासून भारताच्या सरहद्दीपर्यंतच्या भागांत आपलीं स्वतंत्र राज्यें स्थापलीं.

सेलज्यूक तुर्क— बगदादच्या खलिफाकडे सरदारकी व सैनिकाची नोकरी करण्यासही तुर्कांपैकीं कांहीं जमाती जात असत; व खलिफानें आपल्या साम्राज्यांतील ठिकठिकाणचे प्रदेश स्वतंत्र होऊं लागल्यामुळें आपल्या स्वतःच्या संरक्षणासाठीं तुर्क लोकांचें खडें सैन्य ठेविलें. बगदादच्या खलिफाची सत्ता कमकुवत झालेली पाहून त्याच्या पदरीं असलेल्या तुर्क लोकांचा पुढारी सेलज्यूक यानें तेथील आपलें प्रस्थ बरेंच वाढविलें. तेव्हां खलिफानें आपली सर्व राजकीय सत्ता सेलज्यूकच्या हवाली केली व फक्त धार्मिक सत्ताच स्वतःकडे ठेविली. यानंतर या सेलज्यूक तुर्कांनीं पॅलेस्टाईन, सीरिया या प्रदेशांवर आपलें वर्चस्व बसविलें व आशियामायनर या प्रांताचा बहुतेक भाग जिंकून घेतला. त्यांचा पुढारी सेलज्यूक यांवरून त्यांस सेलज्यूक तुर्क असें म्हणण्यांत येतें. त्यांस तेथून घालवून लावण्याचे पूर्व रोमन साम्राज्याचे सम्राट यांनीं प्रयत्न केले पण त्यांस या कामीं यश आलें नाहीं. पॅलेस्टाईन हा प्रांत येशू ख्रिस्त याची जन्मभूमि व कर्मभूमि असल्यामुळें तेथील पवित्र ठिकाणांचें दर्शन घेण्यासाठीं युरोपमधून पुष्कळ यात्रेकरू जात. पॅलेस्टाईन प्रांतावर अरबांचें वर्चस्व असतांना तेथें जाणाऱ्या ख्रिश्चन यात्रेकरूंस त्रास होत नसे; पण सेलज्यूक तुर्कांचें त्यावर वर्चस्व स्थापन झाल्यावर तेथील ख्रिश्चन प्रजेस व तेथें जाणाऱ्या ख्रिश्चन धर्मीय यात्रेकरूंवर अत्याचार होऊं लागले. तेव्हां तो प्रदेश इस्लाम धर्मीय तुर्क लोकांकडून जिंकून घेण्याचा युरोपमधील ख्रिश्चन धर्मीयांनीं प्रयत्न केला व त्यासाठीं १०९५ पासून १२७२ पर्यंतच्या काळांत सात धर्मयुद्धें (क्रूसेडस) झालीं, पण पॅलेस्टाईन प्रांत ख्रिस्ती धर्मी लोकांस जिंकून घेतां आला नाहीं. मुसलमान व ख्रिश्चन यांमध्यें पॅलेस्टाईन प्रांतासंबंधानें धर्मयुद्धें सुरू असतां मध्य आशियांत चीनच्या वायव्येकडील मंगोलिया प्रदेशांत मंगोल या दणगट व भटक्या लोकांची सत्ता स्थापन झाली (१२०६ च्या सुमारास). त्यांनीं बगदादच्या खलिफाच्या प्रदेशावर स्वारी करून इ. स. १२५८ मध्यें बगदादच्या खलिफास ठार मारलें, व सेलक्यूज तुर्कांचा पराभव करून

मेसापोटेमिया; आर्मेनिया व सीरिया हे प्रदेश काबीज केले. यानंतर पॅलेस्टाईन प्रांताकडे जाण्याचा त्यांचा विचार होता, पण इजिप्तच्या मुस्लिम सैन्यानें त्यांचा एकर नजीक पराभव करून (१२६०) त्यांस थोपवून धरिलें. मंगोल लोकांच्या या स्वारीमुळें व त्यांनीं केलेल्या नासधुसीमुळें अरब संस्कृतीस (मुस्लिम संस्कृति) उतरती कळा लागली. सेलज्यूक तुर्कांची लष्करी व राजकीय सत्ता संपुष्टांत येऊन बगदादच्या खलिफाच्या साम्राज्यांत मोडणारे प्रदेश अरबस्थान, इराण, तुर्कस्थान, मेसापोटेमिया पूर्णपणें स्वतंत्र होऊन तेथें निरनिराळीं स्वतंत्र राज्यें स्थापन झालीं, व त्यांचीं एकमेकांत युद्धें व्हावयास लागलीं.

अरब संस्कृति—इ. स. ६४० पासून १२६० पर्यंतच्या म्हणजे सहाशें वर्षांच्या काळांत अरब साम्राज्य विस्तृत प्रदेशावर पसरलें होतें; व त्यामध्यें वंश, धर्म, संस्कृति, चालीरीति, आचारविचार व भाषा वगैरे बाबतींत वेगवेगळे असलेले लोक रहात होते. अरबांचा धर्म इस्लाम हा होता, व साम्राज्यांतील अधिकाऱ्यांच्या जागा, निरनिराळ्या प्रकारच्या सवलती इस्लाम धर्मीयांना मिळत असल्यामुळें सीरिया, मेसापोटेमिया, इजिप्त, इराण, आशिया मायनर, आफ्रिकेचा उत्तर किनारा यांमधील बहुसंख्य लोक आपला पूर्वीचा ख्रिश्चन, झोरोस्ट्रिअन, व इतर धर्माचा त्याग करून इस्लाम धर्मीय बनले. अरबांचें साम्राज्य मोठ्या विस्तृत प्रदेशावर पसरून प्राचीन काळापासून सांस्कृतिक बाबतींत पुढें असलेल्या इजिप्त, मेसापोटेमिया, इराण, सीरिया, पॅलेस्टाइन वगैरे प्रदेश या साम्राज्यांत मोडूं लागले. त्याचप्रमाणें ग्रीक व रोमन संस्कृतीचाही या भागांत प्रसार झालेला होता. तसेंच अरब लोक व्यापारी पेशाचे असल्यामुळें त्यांस दूरदूरच्या प्रदेशांस जावें लागलें व भारतांतील संस्कृतीशींही त्यांचा परिचय झाला. अरब लोक या प्रदेशांतील लोकांच्या मानानें सांस्कृतिक बाबतींत मागासलेले होते, पण या सर्व प्राचीन संस्कृतींतील लोकांशीं त्यांचा संबंध आला व त्यांतील बऱ्याच गोष्टी त्यांनीं आत्मसात केल्या. त्यामुळें या संस्कृत्यांचें मिश्रण होऊन हे सर्व लोक धर्मानें इस्लामी असल्यानें एक विशिष्ट मुस्लिम संस्कृति निर्माण झाली व या सर्व प्रदेशांवर अरबांचें वर्चस्व असल्यामुळें त्यास अरब संस्कृति असें म्हणण्यांत येऊं लागलें. आपल्या वर्चस्वाखालीं आलेल्या प्रदेशांत अरबांनीं मोठमोठ्या मशिदी बांधल्या. त्यांपैकीं जेरूसलेम येथील ओमार मशीद व दमास्कस येथील ओमायड मशीद या प्रसिद्ध आहेत.

मशीदींस जोडून कुराण वाचतां यावें या उद्देशानें शाळा काढली जाई. त्यामध्यें हलके हलके वाङ्मय, शास्त्र, कलाकौशल्य वगैरे गोष्टीही शिकविल्या जात. बगदाद येथें खिलाफतची राजधानी असतांना तेथील कांहीं खलिफांच्या कारकीर्दीत ग्रीक, लॅटिन, संस्कृत, हिब्रू, झेंड वगैरे भाषांतील निरनिराळ्या विषयांवरील ग्रंथांची अरबी भाषेंत भाषांतरें करविण्यांत आलीं व त्यामुळें ग्रीक, रोमन व इतर लोकांचें ज्ञान टिकून राहिलें व अरबांमार्फत मध्ययुगाच्या शेवटीं युरोपमधील जनतेस मिळालें. शेतकी, वैद्यकी, गणित, ज्योतिष, रसायनशास्त्र, वगैरे गोष्टींमध्यें अरबांनीं बरीच प्रगति केली होती व त्यांच्यामार्फत वरील बाबतींत युरोपमधील लोकांमध्यें ज्ञानाचा प्रसार झाला.

सारांश

प्राचीन भारत (इ. स. पू. ३२२ ते इ. स. १२०६)

भारतांतील राज्यें व साम्राज्यें–मौर्य साम्राज्य (इ. स. पू. ३२२–१८४); गुप्त साम्राज्य (इ. स. ३२०–४५५); हर्षाचें साम्राज्य (इ. स. ६०६–६४७); आन्ध्रांचें साम्राज्य (इ. स. पू. २०० ते इ. स. २४९); कुषाणांचें साम्राज्य (इ. स. ४८ ते इ. स. २२०).

मौर्यसाम्राज्य––चंद्रगुप्ताकडून सिल्यूकसचा पराभव; गांधारवर वर्चस्व; मेगॅस्थेनिस ग्रीक वकील चंद्रगुप्ताचे दरबारीं. चाणक्याचा 'अर्थशास्त्र' हा ग्रंथ. अशोकचें (इ. स. पू. २७४–२३२) कलिंगवर वर्चस्व; बौद्धधर्माचा स्वीकार व प्रसार–भारतांत व भारताबाहेरील देशांत. शिलालेख व स्तंभलेख यांवर मानवतेचा संदेश; चैत्य, विहार, ऋणालयें.

गुप्तसाम्राज्य–समुद्रगुप्त (३३०-३७५) दक्षिण भारतावर स्वारी व सार्वभौमत्व. विद्याकलांस उत्तेजन; २ रा चंद्रगुप्त (३७५-४१३) शकांचा पराभव, माळवा, सौराष्ट्र वगैरेंवर वर्चस्व, पश्चिम किनाऱ्यावरील बंदरांमार्फत व्यापार, विद्याकलांस प्रोत्साहन. हूणांच्या स्वाऱ्या ४५५ पासून. त्यांचीं पंजाब, सिंध, काठेवाड येथें राज्यें. प्रभाकरवर्धन यानें त्यांच्या विस्तारास थोपवून धरलें.

आन्ध्रांचें साम्राज्य–शकांच्या दक्षिण भारतांतील विस्तारास प्रतिबंध.

कुषाणांचें साम्राज्य–भारताचा वायव्य भाग व मध्यआशियापर्यंत साम्राज्यविस्तार व त्यांत महायानपंथी बौद्धधर्माचा व भारतीय संस्कृतीचा प्रसार, संस्कृत वाङ्मयास प्रोत्साहन.

स्मृतिग्रंथ–परकीय जमातींचें आगमन व वर्णसंकर, त्यामुळें समाजधारणेसंबंधीं स्मृतिग्रंथ, मनुस्मृति प्रमुख ग्रंथ.

गुप्तहर्षांचें सुवर्णयुग–(इ. स. ३२०-६४७) मोठीं साम्राज्यें, व्यापारवृद्धि, संस्कृत भाषेंत वाङ्मयवृद्धि, पुराणांचें संकलन. रामायण व महाभारत या महाकाव्यांत भर, काव्य व नाटचग्रंथ–कालीदास, भवभूति, शूद्रक, शास्त्र व गणित–आर्यभट्ट सगुण व निर्गुण उपासना. देवळें बांधणें; संस्कृत-पासून अपभ्रष्ट भाषा निर्माण.

हर्षोत्तरकालांत-ज्योतिष व गणित-भास्कराचार्य; ज्ञानेश्वरी-ज्ञानेश्वर; इतर गोष्टी: चिनी यात्रेकरू-फाहेन ५ वें शतक, व ह्वहेनसँग ७ वें शतक, महमद कासीमची सिंधवर स्वारी इ. स. ७११.

भारतीय संस्कृतीचा भारताबाहेर प्रसार–कुषाण साम्राज्यामार्फत मध्यआशियांत; आग्नेय आशियांत भारतीयांच्या वसाहती–कंबोज, जाव्हा, सुमात्रा, बाली. भारतीय संस्कृति, संस्कृत भाषा व महाकाव्यें यांचा प्रसार. हिंदू व बौद्ध-धर्माचा प्रसार.

भारतांतील सांस्कृतिक जीवन–विद्याकलांचें शिक्षण व प्रसार. बौद्धधर्मास उतरती कळा, व बुद्ध हिंदुधर्मातील एक अवतार व बौद्धधर्माचें स्वतंत्र अस्तित्व नष्ट, शंकराचार्य हिंदुधर्मास प्रोत्साहन. ११ व्या शतकापासून भारतीय लोक कूपमंडूक वृत्तीचे, जिवंत झऱ्याचें स्वरूप नष्ट. इस्लामधर्मीय तुर्कांच्या स्वाऱ्यांपुढें हतबल.

प्राचीन चीन (इ. स. पू. २०६ ते इ. स. १२८०)

प्रमुख घराणीं–हॅन घराणें (इ. स. पू. २०६ ते इ. स. २२०); टँग घराणें (इ. स. ६१८–९०७), सुंग घराणें (९६०–१२८०).

हॅन घराणें–वाङ्मय, व्यापार, कलाकौशल्य, उद्योगधंदे यांची वाढ, सुवर्ण युग; वू–टी (इ. स. पू. १४०–८७) केंद्रीभूत राज्यव्यवस्था, कलाविद्यांस प्रोत्साहन, मीठ, लोखंड व नाणीं पाडणें सरकारच्या मालकीचे. रेशीम मार्ग, नद्यांस पूल व कालवे. ठसे करून (ब्लॉक) छापण्याची पद्धत इ. स. पू. १ ल्या शतकापासून; बांबू, लाकूड यांच्या पट्ट्यांवर लिहिणें, रेशमापासून कागद, ब्रशनें लिहिणें; नद्यांस येणाऱ्या पुरावर नियंत्रण ठेवणें, कालवे खणणें. मिंग टी च्या कारकीर्दीत इ. स. ६७ मध्यें चीनमध्यें बौद्ध धर्माचा प्रवेश. बौद्धधर्मीय पुस्तकांचीं चिनी भाषेंत भाषांतरें.

टँग घराणें–ताइत्संग (६२७–६५०) बौद्धधर्म चीनमध्यें रुजला. या काळांत तार्तरी, टाँकीन, अनाम, तिबेट, मांचुरियाचा दक्षिण भाग या प्रदेशांत साम्राज्यविस्तार. नानकिंग राजधानी, सांस्कृतिक केंद्र, चिनी

संस्कृतीचा पूर्वेकडील व दक्षिणेकडील प्रदेशांत प्रसार. ९ व्या शतकांत ठसे करून (ब्लॉक) छापलेलें पुस्तक.

सुंग घराणें-(९६०-१२८०) चू-सी याचा कन-फू-त्से याच्या ग्रंथावर टीकात्मक ग्रंथ. १२२५ नंतर चीनच्या उत्तर भागांवर हूणांचें वर्चस्व व त्यांचें किन साम्राज्य. नंतर मंगोल लोकांचें उत्तर चीनवर वर्चस्व. कुबलाई-खानाचे दक्षिण चीनवर वर्चस्व (१२८०).

प्राचीन इराण (इ. स. पू. ३३१ ते इ. स. १२६०).

इराणवर इ. स. पू. ३३१ ते इ. स. पू. २५० सेल्यूसीडस या ग्रीक घराण्याची सत्ता, ग्रीक संस्कृतीचा प्रसार; इ. स. पू. २५० ते इ. स. २२६ आरसेसिडेनें स्थापलेलें पार्थियन घराणें, मेसापोटेमियाच्या वर्चस्वासंबंधानें रोमन साम्राज्याशीं युद्ध, रोमचा क्रॅसस याचा पराभव व मेसापोटेमियाच्या कांहीं भागावर वर्चस्व. इ. स. २२६-६४२ १ ला अरदेसरच्या नेतृत्वाखालीं सॅसानिडझ या इराणी घराण्याची स्थापना. झोरोस्ट्रियन धर्मास प्रोत्साहन (अग्निउपासक), मैथ्रेइझम (सूर्याची उपासना) व मनीइझम हे नवीन धर्मपंथ. इराणी साम्राज्य व रोमन साम्राज्य यांमध्यें मेसापोटेमिया हा प्रदेश व धार्मिक बाबी (झोरोस्ट्रिअन विरुद्ध खिश्चन) यासंबंधीं वितुष्ट. दोन्ही साम्राज्यें कमकुवत. २ रा खुश्रु (५९०-६२८) पराक्रमी सम्राट. इस्लाम-धर्मीय अरब लोकांकडून इराणी सैन्याचा पराभव-केडेसिया (६३७), मेसापोटेमियावर व नंतर इराणवर वर्चस्व. इराणमध्यें इस्लाम धर्माचा प्रसार. झोरोस्ट्रियन धर्माचे कांहीं भारतांत निर्वासित म्हणून गेले (७३५), भारतांतील पारशी जमातीचे पूर्वज. बगदाद ही खिलाफतची राजधानी व तीवर इराणी संस्कृतीची छाप. मंगोल लोकांची स्वारी व इराणवर मंगोल लोकांचें वर्चस्व; नंतर तुर्क सरदारांचीं राज्यें.

इस्लाम धर्माची स्थापना व खिलाफत-(इ. स. ५७०-१२६०)

अरबस्थान व तेथील जमाती. रूक्ष प्रदेश. व्यापार व लूटमार हे उद्योग. मक्का येथील काबा हें पवित्र देवस्थान.

महंमद (५७०-६३२)-मुनीम म्हणून व्यवसाय. व्यापाराचे कामासाठीं मदिना दमास्कस, जेरूसलेम येथें जाणें. खिश्चन व ज्यू धर्मांशीं परिचय. धार्मिक गोष्टींकडे लक्ष. मक्केस असतांना साक्षात्कार, मूर्तीपूजेविरुद्ध धोरण, एकेश्वरी धर्माचा पुरस्कार, काबा देवस्थानच्या पूजाऱ्याकडून विरोध; मदीनेस प्रयाण ६२२. इस्लाम धर्माची स्थापना व त्याचा मक्का व इतरत्र प्रसार. तत्त्वें-एक ईश्वर-अल्ला; प्रार्थना, दानधर्म, मक्केची यात्रा करणें.

मुसलमानी सत्तेची वाढ व खिलाफत-अबु बकर हा पुढारी. महमदाचा

प्रतिनिधी म्हणून खलिफा; धार्मिक व राजकीय प्रमुख उमर २ रा खलिफा, राज्यविस्ताराचें धोरण–सीरिया व आर्मेनिया (६३५–३८), इराण ६३७. उत्तर आफ्रिका ६४६–४७, स्पेन ७११, चार्लस मार्टेलकडून पराभव ७३२. कॅन्स्टाटिनोपल घेण्याचा प्रयत्न फसतो. खिलाफतची राजधानी मदिना (६२२–६६१), दमास्कस (६६१–७५९) बगदाद ७५९ ते १२५८. बगदाद येथें इराणी संस्कृतीची छाप.

बगदाद–विद्याकलांचें आगर. प्रख्यात सांस्कृतिक केंद्र. प्रसिद्ध खलिफा–अल् मनसूर (७१२–७५) ग्रीक, लॅटिन, संस्कृत, झेंड वगैरे भाषेंतील ग्रंथांची अरबी भाषेंत भाषांतर करविली. हरून अल् रशिद (७८६–८०९) विद्या-कलांचा भोक्ता. पुढील खलिफा चैनी. १० शतकांत खिलाफतीची (अरब साम्राज्याची) तीन छकलें–कार्डोव्हा, कायरो, बगदाद. सेलज्यूक तुर्क इस्लाम धर्मीय. बगदादच्या खलिफास पाठबळ. सेलज्यूक तुर्कांकडून पॅलेस्टाईन येथें येणाऱ्या ख्रिश्चन यात्रेकरूस उपद्रव. धर्मयुद्धें (क्रुसेडस); मध्यआशियांत जेंगिझखानाच्या नेतृत्वाखालीं मंगोल लोकांचें वर्चस्व. बगदादच्या खिलाफतवर स्वारी. खलिफा ठार १२५८. सेलज्यूक तुर्कांचा पराभव. खिलाफतच्या प्रदेशांत स्वतंत्र राज्यें.

अरब व मुस्लिम संस्कृति–अरबांचा इजिप्त, मेसापोटेमिया, ग्रीक, भारतीय संस्कृतीशीं परिचय, व त्या आत्मसात, मिश्र संस्कृति, अरबामार्फत तिचा युरोपमध्यें मध्ययुगाच्या शेवटीं प्रसार. इमारती, शेतकी, वैद्यकी, कलाकौशल्य यांत अरबांची प्रगति.

प्रकरण ७ वें

मध्ययुगांतील युरोप

(इ. स. ४७६–१४५३)

(१) वन्य जमातींच्या रोमन साम्राज्यावर स्वाऱ्या व त्यांचे परिणाम.

(२) पवित्र रोमन साम्राज्य.

(३) ख्रिस्ती धर्माचा प्रसार व पोपच्या सत्तेची वाढ.

(४) सरंजामी पद्धत.

(५) प्रादेशिक राज्यांची स्थापना.

(६) पूर्व रोमन साम्राज्य.

(७) क्रूसेडस (धर्मयुद्धें) व त्यांचा युरोपवर परिणाम.

(८) पूर्व रोमन साम्राज्याचा नाश.

(९) युरोपमधील सांस्कृतिक व सामाजिक जीवन.

(१) वन्य जमातींच्या रोमन साम्राज्यावर स्वाऱ्या व त्यांचे परिणाम—प्राचीन काळीं रोमन साम्राज्याचा खूप विस्तार झाल्यावर या मोठ्या साम्राज्याचें राज्यकारभाराच्या सोयीसाठीं दोन विभाग करण्यांत आल (इ. स. ३३०). यांपैकीं पश्चिमेकडील विभागाची रोम व पूर्वेकडील विभागाची कॉन्स्टाटिनोपल या राजधान्या असून यानंतर कांहीं काळानें या दोन ठिकाणीं वेगवेगळे सम्राट नेमण्याचा प्रघात रूढ झाला. या विस्तृत रोमन साम्राज्याची उत्तर सरहद्द म्हणजे साधारणपणें ऱ्हाइन व डॅन्यूब या नद्या असून त्या पलीकडे अनेक वन्य जमाती रहात होत्या. या जमाती म्हणजे फ्रँक्स, बर्गंडियन्स हँडॉल्स, व्हीजीगॉथस, आस्ट्रोगॉथस होत. या सर्व वन्य जमाती आडदांड व अडाणी असून त्यांस सुधारणेचा गंध नव्हता. इ. स. च्या ४ थ्या शतकापासून या जमातींपैकीं कांहीं लोक सैनिक, शेतकरी, मजूर म्हणून रोमन साम्राज्यांतील प्रदेशांत येऊं लागले होते. रोमन लोक सुखासीन होत गेल्यामुळें शेतावर काबाडकष्ट करावयास या वन्य जमातींपैकीं लोकांस नेमण्याचा प्रघात रूढ झाला व त्यामुळें हलके हलके त्यांची रोमन साम्राज्यांतील

संख्या वाढूं लागली. रोमन साम्राज्यांत आल्यावर रोमन आचारविचारांचा त्यांच्यावर परिणाम होऊन त्या सुधारूं लागल्या. अशी स्थिति असतां मध्य आशियांतील गवताळ प्रदेशांत राहणाऱ्या हूण नांवाच्या भटक्या वन्य जमातींची धाड इ. स. ५ च्या शतकाच्या सुरुवातीस युरोपकडे वळली. हे लोक आडदांड, धट्टेकट्टे व क्रूर होते. ते घोड्यावर बसण्यांत पटाईत असून त्यांची संख्या खूप होती. **अटिला** हा त्यांचा पुढारी होता. हे जेथें जात तेथील प्रदेश जाळपोळ करून उध्वस्त करीत. या हूणांच्या हल्ल्यांमुळें रोमन साम्राज्याच्या उत्तर सरहद्दीवर असलेल्या वन्य जमाती मोठ्या संख्येनें रोमन साम्राज्यांतील निरनिराळ्या भागांत घुसूं लागल्या व त्यांना प्रतिबंध करणें रोमन सम्राटास शक्य झालें नाहीं. तेव्हां त्यांस थोपवून धरण्यासाठीं रोमन सम्राटांनीं आपलें दूरदूरच्या भागांत ठेवलेलें सैन्य परत बोलाविलें, तेव्हां ब्रिटनवर चार शतकें (इ. स. पू. ५५ ते इ. स. ४१०) राज्य केल्यावर तेथील रोमन सैन्यही परत आलें. हूण लोकांचा प्रतिकार करण्याच्या कामीं रोमन सैन्यांनीं व वन्य जमातींनीं प्रयत्न केल्यामुळें हूणांच्या टोळ्यांस प्रतिबंध होऊन (४५१) त्या परत आशियांत गेल्या. पण रोमन साम्राज्याच्या उत्तरेकडील प्रदेशांतून रोमन सामाज्यांत शिरलेल्या वन्य जमाती रोमन साम्राज्यांतच राहिल्या व त्यांनीं रोमन साम्राज्यांत मोडणारे निरनिराळे प्रदेश व्यापले. यांपैकीं व्हीजीगॉथ यांनीं आफ्रिकेचा उत्तर किनारा, सार्डिनिया व कॉर्सिका या ठिकाणीं वस्ती केली. आस्ट्रोगॉथ यांनीं इटली, सिसली, आड्रियाटिक समुद्राच्या पूर्व किनाऱ्यावरील प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणला. बर्गंडियन्स यांनीं स्विट्झर्लंडच्या भोंवतालचा प्रदेश व्यापला. फ्रँक्स यांनीं फ्रान्स, जर्मनी हॉलंड, बेलजम वगैरे प्रदेशांवर आपलें वर्चस्व बसविलें, व अँगल्स व सॅक्सन्स यांनीं ब्रिटनमध्यें वस्ती केली. अशी परिस्थिति असतां इटलीमध्यें आलेल्या वन्य जमातीच्या ओडोआकर या पुढाऱ्यानें पश्चिम रोमन सम्राटास पदच्युत करून ठार केल्यामुळें (इ. स. ४७६) रोम राजधानी असलेलें पश्चिम रोमन साम्राज्य लयास गेलें. रोमन साम्राज्यांत आल्यावर या वन्य जमातींनीं खूप नासधूस केली व त्यांचें आपसांतही युद्धप्रसंग होऊं लागले. त्यामुळें प्राचीन रोमन संस्कृति, आचारविचार कलाकौशल्य उद्योगधंदे, विद्या व ज्ञान मागें पडून सर्वच अंदाधुंदी सुरू झाली व त्यामुळें युरोपमध्यें प्राचीन युग संपुष्टांत येऊन मध्ययुग सुरू झालें. या मध्य-

युगाचा काळ इ. स. ४७६ पासून इ. स. १४५३ पर्यंत मानण्यांत येतो. यांपैकीं इ. स. ४७६ पासून इ. स. ८०० पर्यंतच्या काळांत सर्वत्र अंदाधुंदी व विद्याकलांचा लोप झाला असल्यामुळें त्यास मध्ययुगांतील अंधारयुग असें म्हणण्यांत येतें.

विद्या, धर्म यांचा प्रसार—या वन्य जमाती मागासलेल्या होत्या. त्यांना लिहितां वाचतां येत नव्हतें. रोमन साम्राज्यांत ख्रिश्चन धर्माचा प्रसार झाल्यानंतर शिक्षित व लिहितां वाचतां येणारे लोक म्हणजे ख्रिश्चन धर्माधिकारी होत. त्यांची भाषा लॅटिन होती. त्यांनीं या अंधकारयुगांत धर्मप्रसाराचें काम चालूं ठेवलें व शिक्षणाचा प्रसार केला. त्यामुळें ठिकठिकाणीं पसरलेले लोक ख्रिश्चन धर्मी बनले व त्यांच्यामध्यें हलके हलके विद्येचा प्रसार होऊं लागला. या रानटी लोकांच्या ज्या वेगवेगळ्या बोली होत्या त्यांचा लॅटिन भाषेशीं संबंध येऊन त्यांच्या स्पॅनिश, फ्रेंच, इटालियन वगैरे वेगवेगळ्या भाषा निर्माण झाल्या. रोमन साम्राज्यांतील प्रदेशांपासून दूर असलेल्या जर्मनी, ब्रिटन वगैरे ठिकाणीं असलेल्या लोकांच्या भाषेवरही लॅटिन भाषेचा परिणाम होऊन इंग्लिश, जर्मन या भाषाही प्रगल्भ होऊं लागल्या. रोममध्यें असलेल्या धर्माधिकाऱ्याच्या–बिशपच्या–प्रोत्साहनानें पश्चिम युरोपमध्यें ख्रिश्चन धर्माचा प्रसार झाल्यामुळें व इ. स. ४७६ पासून पश्चिम रोमन साम्राज्य नष्ट झालें असल्यानें रोममधील बिशपचें महत्त्व विशेष वाढलें व त्यास धार्मिक बाबतींत प्रमुख समजण्यांत येऊन त्यास '**पोप**' (बाबा) असें म्हणण्यांत येऊं लागलें.

(२) पवित्र रोमन साम्राज्य (इ. स. ८०० ते १५००)—पश्चिम रोमन साम्राज्यांतील प्रदेशांत वस्ती केलेल्या वन्य टोळ्यांचा आपापली सत्ता वाढविण्याचा प्रयत्न सुरू होता व त्यासाठीं त्यांचे एकमेकांशीं अनेक युद्धप्रसंगही होत होते. यांपैकीं फँक जमातीची सत्ता हलके हलके वाढूं लागली. यांपैकीं चार्लस मार्टेल हा फ्रँक टोळीचा प्रधान असतां त्यानें स्पेन देश पादाक्रान्त करून फ्रान्सकडे येणाऱ्या मुसलमानी सैन्याचा इ. स. ७३२ मध्यें टूर्सच्या लढाईत पराभव केल्यामुळें स्पेनच्या बाजूनें युरोपमध्यें होणाऱ्या मुसलमानी आक्रमणास प्रतिबंध झाला. पुढें चार्लस मार्टेलचा नातू चार्लमेन (Charlemagne) हा फ्रँक लोकांचा राजा झाला (इ. स. ७६८–८१४). हा फार पराक्रमी होता. त्यानें आपलें साम्राज्य खूप वाढविलें व फ्रान्स,

इटालीचा उत्तरार्ध, जर्मनी, बेलजम, स्वित्झर्लंड वगैरे विस्तृत मुलूख आपल्या वर्चस्वाखालीं आणला. त्याची राजधानी एक्स-ला-चापेल ही होती. तो ख्रिश्चन धर्माचा अनुयायी होता. रोम हें शहर पोपच्या वर्चस्वाखालीं होतें. तरी पोपचें इटालीमधील इतर राजकर्त्यांशीं वितुष्ट असे व त्यांतील कलह मिटविण्यासाठीं त्यास रोमला जावें लागें. चार्लमेन हा इ. स. ८०० मध्यें रोममध्यें जाऊन तेथील सेंट पीटर चर्चमध्यें ख्रिस्टमसच्या दिवशीं प्रार्थना करीत असता रोममधील पोप **तिसरा लिओ** यानें अवचितपणें त्याच्या डोक्यावर राजमुगुट ठेवला व त्यास राज्याभिषेक केल्याचें जाहीर केलें, व तेथें जमलेल्या लोकांनीं "**रोमन सम्राट**" म्हणून त्याचा जयजयकार केला. या घटनेनें इ. स. ४७६ मध्यें लयास गेलेल्या 'पश्चिम रोमन साम्राज्याचें' पुनरुज्जीवन झाल्यासारखें झालें व तें पोपच्या प्रोत्साहनानें झालें म्हणून या साम्राज्यास '**पवित्र रोमन साम्राज्य**' व चार्लमेन यास '**पवित्र रोमन सम्राट**' असें म्हणण्यांत येऊं लागलें. त्याचप्रमाणें सम्राटास राज्याभिषेक करण्याचा अधिकार पोपचा आहे असें पुढें समजण्यांत येऊन पोपचें राजकीय महत्त्वही वाढूं लागलें. चार्लमेन हा पराक्रमी होता, त्याप्रमाणें तो विद्याव्यासंगीही होता. त्यानें ठिकठिकाणीं विद्यालयें स्थापन केलीं व ख्रिश्चन धर्ममठ यांस देणग्या दिल्या. चार्लमेनच्या मृत्यूनंतर युरोपच्या बऱ्याच मोठ्या विस्तृत भागावर पसरलेलें त्याचें विस्तृत साम्राज्य फार काळ टिकलें नाहीं. इ. स. ८४३ मध्यें व्हर्डूनच्या तहानें त्याच्या विस्तृत साम्राज्याचें (१) पश्चिम फ्रँक (सध्यांचा फ्रान्स) (व्हाइनच्या पश्चिमेकडील प्रदेश) (२) पूर्व फ्रँक (जर्मनी व आस्ट्रिया) व्हाईनच्या पूर्वेकडील प्रदेश व (३) मध्याचा बेलजम, हॉलंड, स्वित्झर्लंड व इटली हा प्रदेश असे तीन विभाग होऊन ते त्याच्या नातवांमध्यें विभागले गेले. या तीन विभागांपैकीं इटलीमध्यें पुढें अनेक राज्यें स्थापन होऊन त्यांचे आपापसांत युद्धप्रसंग होऊं लागले. इ. स. ९३६ मध्यें १ ला आटो हा पूर्व फ्रँकिश (जर्मनी) राज्याचा राजा झाला. हा महत्त्वाकांक्षी होता. त्यानें ९५१ मध्यें इटलीवर स्वारी करून तेथें आपलें वर्चस्व बसविलें, तेव्हा त्यास 'इटलीचा राजा' असें म्हणण्यांत येऊं लागलें. पुढे रोममधील पोपचें इटलीमधील इतर राजकर्त्यांशीं वितुष्ट आलें, तेव्हां त्यानें १ ल्या आटोची मदत मागितली. तेव्हां

आटो हा इटलीमध्यें गेला व त्यानें तेथें स्थिरस्थावरता केली. तेव्हां ९६२ मध्यें पोपनें त्यास 'रोमन सम्राट' म्हणून राज्याभिषेक केला. अशा रीतीनें चार्लमेनच्या पवित्र रोमन साम्राज्याचें पुनरुज्जीवन झालें. पण या घटनेनें जर्मनीच्या (पूर्व फ्रँक) इतिहासावर व पवित्र रोमन सम्राट व पोप यांमधील संबंधावर महत्त्वाचे परिणाम घडले.

जर्मनीचे राजे आपल्या राज्यांतील सरदार, अमीरउमराव, धर्माधिकारी यांची सत्ता नाहींशी करून फ्रान्स (पश्चिम फ्रँक) प्रमाणें जर्मनीचें एक संघटित राष्ट्र स्थापन करण्याचा प्रयत्न करण्याऐवजीं त्यांस 'पवित्र रोमन सम्राट' हा हुद्दा प्राप्त झाल्यामुळें जर्मनीपेक्षां इटलीच्या राजकारणाकडे अधिक लक्ष देऊं लागले, त्यामुळें जर्मनीचें एक संघटित राष्ट्र स्थापन झालें नाहीं व तें लहान लहान राज्यकर्त्यांमध्यें विभागलेलें राहिलें. जर्मनीच्या राजास 'रोमन सम्राट' हा हुद्दा प्राप्त झाल्यामुळें पवित्र रोमन साम्राज्यांत मोडणाऱ्या प्रदेशावर त्याचे नामधारी वर्चस्व स्थापित झालें व पोपच्या निवडणुकीच्या वेळीं मत देण्याचा त्यास अधिकार मिळाला. रोमचा पोप यास धार्मिक बाबतींत प्रमुख दर्जा प्राप्त झाल्यामुळें पवित्र रोमन साम्राज्यांत मोडणाऱ्या प्रदेशांतील बिशप, ॲबट, वगैरे धर्माधिकारी यांच्या नेमणुका करण्याचा व त्यांच्याकडे असलेल्या जमीनींच्या उत्पन्नाचा हिस्सा मागण्याचा अधिकार प्राप्त झाला. जर्मनीचा राजा व पवित्र रोमन सम्राट यास पवित्र रोमन साम्राज्यांतील बिशप व ॲबट वगैरे धर्माधिकारी यांच्याकडे इतर अमीरउमरावांप्रमाणें मोठमोठ्या जमिनी असल्यामुळें त्यांची नेमणूक आपल्या संमतीनें व्हावी असें वाटे. तेव्हां या प्रश्नावरून रोमचा पोप व पवित्र रोमन सम्राट यांच्यामध्यें वितुष्ट उत्पन्न होऊन तें कितीतरी वर्षें टिकलें. अशी परिस्थिति असतां इ. स. १०५० मध्यें रोमच्या पोपनें एक फर्मान काढून पोपच्या निवडणुकीच्या वेळीं पवित्र रोमन सम्राटास असलेला मत देण्याचा अधिकार रद्द केला असल्याचें जाहीर केलें. यानंतर **७ वा ग्रेगरी** या कर्तबगार महत्त्वाकांक्षी पोपनें एक फर्मान काढून असें जाहीर केलें कीं धार्मिक बाबतींतच नव्हे तर राजकीय बाबतींतही पवित्र रोमन सम्राट व इतर राज्यकर्ते यांस आपल्या अधिकारपदावरून दूर करण्याचा, त्याचप्रमाणें त्यांच्या राज्यांतील प्रजेस राज्यकर्ता म्हणून त्यांची सत्ता न मानण्याचा आदेश देण्याचाही पोपला

अधिकार आहे. यानंतर पवित्र रोमन सम्राट व रोमचा पोप यांमध्यें तडजोड होऊन हें वितुष्ट नाहींसें झालें.

(३) ख्रिस्ती धर्माचा प्रसार व पोपच्या सत्तेची वाढ—

रोमन साम्राज्यांत ख्रिस्ती धर्माचा प्रसार—रोमन साम्राज्य युरोपप्रमाणें आफ्रिकेचा उत्तर किनारा, इजिप्त, पॅलेस्टाईन, सीरिया, आशिया मायनर, आर्मेनिया, मेसापोटेमिया या विस्तृत प्रदेशावर पसरलें असल्यामुळें त्या प्रदेशांतील बहुसंख्य लोक ख्रिस्ती धर्मी बनले; उरलेल्या लोकांपैकीं बरेचसे लोक ज्यू धर्माचे होते. याखेरीज कांहीं भागांत दुसरे जुने धर्म सुरू होते. रोमन साम्राज्यांत मोडणाऱ्या वरील प्रदेशाप्रमाणें रोमन साम्राज्याच्या बाहेरील आफ्रिकेंतील ॲबीसीनिआ या देशांतहीं ख्रिस्ती धर्माचा प्रसार झाला होता. पुढें ख्रिस्ती धर्मांतील कांहीं तात्त्विक प्रश्नासंबंधीं आशिया व आफ्रिका खंडांतील देशांमध्यें मतभेद होऊन इजिप्त, सीरिया, ॲबिसीनिया, मेसापोटेमिया, आर्मेनिया या प्रदेशांत त्या त्या प्रदेशांपुरते वेगळे त्यामुळें राष्ट्रीय असे ख्रिश्चन धर्मपंथ इ. स. च्या ७ व्या शतकापर्यंतच्या काळांत निर्माण झाले. यानंतर ७ व्या शतकामध्यें इस्लामी धर्म स्थापन होऊन आफ्रिकेचा उत्तर किनारा, इजिप्त व पश्चिम आशिया या भागांतील रोमन साम्राज्य नष्ट होऊन तेथें अरबांचें राज्य स्थापन झाल्यामुळें तेथील बहुसंख्य लोकांनीं ख्रिस्ती धर्माचा त्याग करून इस्लामी धर्माचा स्वीकार केला. अबिसीनियांतील लोक त्याचप्रमाणें रोमन साम्राज्यांतील युरोपमधील भागांतील लोक ख्रिस्तीधर्मी राहिले.

ख्रिश्चन धर्मांतील ऑर्थोडॉक्स चर्च व कॅथलिक चर्च—रोमन साम्राज्याचें रोम राजधानी असलेलें पश्चिम रोमन साम्राज्य व कॉन्स्टाटिनोपल राजधानी असलेलें पूर्व रोमन साम्राज्य असे दोन विभाग स्थापन झालेले होते, (इ. स. ३०० च्या सुमारास). रोम व कॉन्स्टाटिनोपल हीं राजधानींचीं ठिकाणें असल्यामुळें तेथील बिशप म्हणजे धर्माधिकारी यांचें महत्त्व विशेष वाढून त्या त्या विभागांत धार्मिक बाबतींत ते प्रमुख आहेत असें मानण्यांत येऊं लागलें. रोमच्या बिशपला **पोप** व कॉन्स्टाटिनोपलच्या बिशपला **पॅट्रिआर्च** असें म्हणत. पश्चिम रोमन साम्राज्याची भाषा **लॅटिन** व पूर्व रोमन साम्राज्याची

भाषा **ग्रीक** होती त्यामुळें या दोन्ही ठिकाणांमधला फरक अधिक वाढत गेला. शेवटीं या दोन्ही ठिकाणच्या धार्मिक संघटनेंत व व्यवस्थेंत फारकत होऊन ११ व्या शतकांत कॉन्स्टाटिनोपल येथील पॅट्रिआर्च याच्या कक्षेंतील ग्रीक चर्चला (धर्मव्यवस्था) **ऑर्थोडॉक्स** (सनातनी) **चर्च** व **रोम** येथील पोपच्या कक्षेंतील लॅटिन चर्चला **कॅथालिक** (जागतिक किंवा सार्वत्रिक) **चर्च** असें म्हणण्यांत येऊं लागलें व ख्रिस्तीधर्मीय संघटनेंत दोन तट पडले. ख्रिस्ती धर्माचा संस्थापक **येशू ख्रिस्त** व त्या धर्माचें पवित्र पुस्तक **बायबल** याबद्दल या दोन्ही संघटनांस आदर व अभिमान वाटत होता.

पश्चिम युरोपमध्यें पोपच्या रोमन कॅथालिक चर्चचें वाढतें महत्त्व—पूर्व रोमन साम्राज्यांत कॉन्स्टाटिनोपल येथें पूर्व रोमन सम्राटाचें वास्तव्य असल्यामुळें कॉन्स्टाटिनोपल येथील पॅट्रिआर्च याच्या धार्मिक व त्याचप्रमाणें राजकीय (ऐहिक) सत्तेमध्यें वाढ झाली नाहीं. पण इ. स. ४७६ मध्यें रोम ही राजधानी असलेलें पश्चिम रोमन साम्राज्य नष्ट झाल्यामुळें तेथील पोपची धार्मिक व ऐहिक सत्ता यापुढील काळांत खूपच वाढली. ही सत्ता वाढण्यास पुढील गोष्टी कारणीभूत झाल्या. पश्चिम रोमन साम्राज्य नष्ट होऊन त्या भागांत रानटी टोळ्यांचीं वेगवेगळीं स्वतंत्र राज्यें स्थापन झाल्यावर निरनिराळ्या ठिकाणीं चर्च स्थापन करून तेथें कुर्जी हे धर्माधिकारी नेमणें व त्यांच्यामार्फत या वन्य जमातींमध्यें ख्रिस्ती धर्माचा प्रसार करणें, ठिकठिकाणीं शाळा व कॉलेजें काढून तेथें शिक्षक नेमून शिक्षणाचा प्रसार करणें, ठिकठिकाणीं धर्ममठ स्थापन करून त्या ठिकाणीं अनाथांस आश्रय, रोग्यांची शुश्रूषा, धर्मप्रसार, हस्तलिखित ग्रंथांच्या नकला करणें, शेतकी करून जमीन लागवडीस आणणें वगैरे विविध समाजोन्नतीचीं, परोपकाराचीं, धर्मप्रसाराचीं व उपयुक्त कामें रोमच्या पोपकडून किंवा त्याच्या प्रोत्साहनानें होत गेलीं. धर्ममठ व चर्च यांस भाविक लोकांकडून देणग्या म्हणून मोठमोठ्या सुपीक जमिनी व इतर मालमत्ता मिळूं लागली. रोममध्यें पोपचें वास्तव्य होतें व त्याभोंवतालचा बराच प्रदेश पोपला मिळून त्याचें पोपच्या देखरेखीखालीं राज्य बनलें. फ्रँक लोकांचा पराक्रमी राजा चार्लेमेन यास इ. स. ८०० मध्यें पोपनें रोममध्यें राज्याभिषेक केला व त्यास 'पवित्र रोमन सम्राट' असें म्हणण्यांत येऊं लागलें. या घटनेनें सम्राटास राज्याभिषेक करण्याचा अधिकार पोपचा आहे

असें सर्वांस वाटून राजकीय सत्तेपेक्षां धार्मिक सत्ता श्रेष्ठ असा सर्वांचा समज होऊं लागला. पश्चिम युरोपमध्यें निरनिराळीं स्वतंत्र प्रादेशिक राज्यें स्थापन झालीं तरी त्या राज्यांतील प्रमुख धर्माधिकाऱ्यांच्या नेमणुका करणें व जरूर वाटल्यास त्यांस कामावरून दूर करणें, तेथील धर्माधिकाऱ्यांमधील तंट्यांचा निकाल आपल्या वर्चस्वाखालील धार्मिक कोर्टांमार्फत चालावा असा आग्रह धरणें, ख्रिश्चन धर्मतत्त्वांविरुद्ध कोणी मत प्रदर्शित केल्यास किंवा तसें आचरण केल्यास पाखंडी म्हणून त्यास शिक्षा करणें, तसेंच एकाद्या देशाच्या राजानें पोपच्या विरुद्ध आचरण केल्यास त्या राजास धर्मबहिष्कृत करणें व त्या राज्यांतील धर्माधिकाऱ्यांमार्फत होणारे सर्व धार्मिक विधि व संस्कार बंद पाडणें वगैरे अधिकारही पोपकडे आले. वरील धार्मिक गोष्टीप्रमाणें मध्ययुगांत युरोपमधील निरनिराळ्या राज्यांतील स्थावर व जंगम मालमत्ता व संपत्ति, ठिकठिकाणीं बांधलेलीं मोठीं भव्य प्रार्थना मंदिरें व इटलीमधील पोपच्या वर्चस्वाखालीं असलेलें राज्य या गोष्टीही पोपच्या ताब्यांत असल्यामुळें पश्चिम युरोपमधील 'पवित्र रोमन सम्राटा' प्रमाणें पोपचा दरारा व वैभव मध्ययुगांत खूप वाढलें. त्यामुळें युरोपमधील निरनिराळ्या देशांतील राज्यकर्ते त्याचप्रमाणें पवित्र रोमन सम्राट पोपला वचकून राहूं लागले.

ख्रिस्ती धर्मीय लोकांस ख्रिस्ती धर्मातील प्रमुख तत्त्वांस मान्यता द्यावी लागे. त्याचप्रमाणें ख्रिस्ती धर्मातील कांहीं संस्कार, विधी, प्रार्थना व आचार करावे लागत. हे संस्कार म्हणजे ख्रिस्ती धर्मात प्रवेश करतांना करावा लागणारा 'बाप्तिस्मा' हा संस्कार, आपणांस सद्गति मिळावी म्हणून मृत्यूपूर्वी धर्माधिकाऱ्यापुढें आपल्या आयुष्यांत घडलेल्या पापकृत्यांचा पश्चात्तापपूर्वक उल्लेख करणें, रविवारीं प्रार्थनामंदिरांत प्रार्थना करणें, येशू ख्रिस्त याच्या जन्मदिनीं देण्यांत येणाऱ्या मेजवानीच्या प्रसंगीं सेवन केलेली दारु व ब्रेड यांचें येशू ख्रिस्त याचें मांस व रक्त यांत रूपांतर होतें असें मानणें, लग्नाच्या वेळीं धार्मिक विधी करणें वगैरे गोष्टी होत. यांपैकीं बऱ्याच गोष्टी पोपनें ठिकठिकाणीं नेमलेल्या बिशप, क्लर्जी वगैरे धर्माधिकाऱ्यांमार्फत किंवा त्यांच्या हाताखालील अधिकाऱ्यांमार्फत करण्याचा प्रघात रूढ झाला होता. त्यावेळीं बायबल हें हिब्रू, ग्रीक व लॅटिन या भाषांतच असून पश्चिम युरोपमध्यें लॅटिन भाषेतील बायबलचा उपयोग केला जाई, व सर्व धार्मिक विधी लॅटिन भाषेमार्फतच केले

जात. पण मध्ययुगामध्यें लॅटिन ही भाषा बोलण्यांत नव्हती व ती फारच थोड्या लोकांस समजे. तेव्हां लॅटिन भाषेंतील बायबलाचा व धार्मिक विधींचा अर्थ समजून घेण्याची जरूरी वाटल्यास बहुजन समाजास धर्माधिकाऱ्यांवर अवलंबून रहावें लागें.

(४) सरंजामी पद्धत (इ. स. ८०० ते १३००)—पश्चिम रोमन साम्राज्याचा नाश होऊन त्या ठिकाणीं वन्य जमातीच्या निरनिराळ्या टोळ्या आल्या व नंतर त्यांचीं आपसांत युद्धें होऊं लागल्यामुळें सर्वत्र अंदाधुंदी व बेबंदशाही माजली व बळी तो कान पिळी अशी स्थिति झाली. जीवित, मालमत्ता व वित्त हीं धोक्यांत आलीं व त्यांचें रक्षण व्हावें या हेतूनें जमिनीवर आधारलेली अशी सरंजामी पद्धत रूढ झाली. ही पद्धत कोणा एका व्यक्तीनें योजनाबद्ध रीतीनें काढलेली नसून ती तत्कालीन राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थितीप्रमाणें निरनिराळ्या ठिकाणीं स्थानिक परिस्थितीप्रमाणें किरकोळ फरक होऊन बनली गेली. वन्य टोळीच्या प्रमुखानें एखादा प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणल्यावर तो त्या प्रदेशाचा मालक झाला असें मानण्यांत येई. हा प्रमुख आपल्या वर्चस्वाखालीं असलेल्या जमिनींचा कांहीं भाग स्वत:कडे ठेवून इतर भाग आपल्या सरदारांमध्यें लष्करी नोकरीच्या करारानें वांटून टाकी. लष्करी नोकरीच्या कराराप्रमाणें कांहीं प्रसंगीं नजराणे देणें, व इतर आणखी कांहीं गोष्टींची मदतही या सरंजामी सरदारांस आपल्या प्रमुखास द्यावी लागे. हे सरंजामी सरदारही वरील अटींवर आपल्या ताब्यांतील जमिनी इतर लहान सरंजामी सरदारांस देत. या जमिनी ज्यांच्याकडून मिळत त्यांस स्वामीनिष्ठ रहाण्याची शपथ या सरंजामी सरदारांस घ्यावी लागे. अशारीतीनें शेवटीं जमिनी लष्करी नोकरीच्या कराराऐवजीं शेती करण्याच्या अटींवर शेतकऱ्यांस मिळत. या शेतकऱ्यांस आपल्या मालकाच्या शेतावर कांहीं ठराविक दिवस विनामूल्य काम करावें लागें व त्यास कांहीं नजराणे व देणग्या द्याव्या लागत. यांपैकीं कांहीं कुळांस आपली शेती सोडून जाण्याची त्याचप्रमाणें शेतीखेरीज इतर व्यवसाय करण्याची बंदी असे; व त्यामुळें हीं कुळें जमिनीशीं निगडित असत. जमिनीचे मालक असलेल्या सरंजामी सरदारांस आपल्या जमिनीवरील कुळांसंबंधीं सर्व व्यवस्था करणें, कुळांचें जीवित व मालमत्ता यांचें रक्षण करणें, त्यांच्यांतील तंटे बखेड्यांचा निवाडा करणें वगैरे गोष्टी

कराव्या लागत. या सरंजामी पद्धतींमध्यें ठिकठिकाणीं व्यापार व उद्योगधंदे यांमध्यें पुढें आलेल्या शहरांचा त्याचप्रमाणें धर्माधिकाऱ्यांचाही समावेश झालेला असे. ठिकठिकाणीं व्यापार व उद्योगधंदे यामुळें निर्माण झालेलीं गांवें एखाद्या सरंजामी सरदाराच्या जमिनीवर वसलेलीं असत. तेव्हां त्या गांवास या सरंजामी सरदाराकडून संरक्षण मिळण्याच्या अटीवर त्या गांवांतील लोकांस युद्धाच्या वेळीं कांहीं सैनिक पुरवावे लागत. धर्माधिकारी व धार्मिक कामांत गुंतलेले लोक यांस सैनिक म्हणून युद्धांत भाग घ्यावा लागत नसे, पण ते त्याऐवजीं चर्चच्या ताब्यांत असलेल्या जमिनीवर काम करणाऱ्या कुळांस सैनिक म्हणून पाठवीत. अशा प्रकारें त्या अंदाधुंदीच्या काळांत या सरंजामी पद्धतीमुळें समाजाच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक व्यवस्थेसंबंधीं व कारभारासंबंधीं एक नवी घडी निर्माण झाली, व समाजामध्यें उच्च व कनिष्ठ असे दोन वर्ग निर्माण होऊन त्यांमधील भेद अधिकें स्पष्ट होऊं लागले. हे वर्ग म्हणजे (१) प्रमुख सरंजामी सरदार (२) धर्माधिकारी व धार्मिक कामांत गुंतलेले लोक (३) खालचे सरंजामी सरदार (४) युद्धकलेचें शिक्षण घेतलेले सशस्त्र सैनिक (५) शेती करण्याच्या अटीवर शेती करणारे शेतकरी (६) जमिनीशीं निगडित असलेले व ज्यांस आपल्या जमिनी सोडून जातां येत नाहीं अशीं कुळें किंवा 'सर्फ' हे होत. ही सरंजामी पद्धत पश्चिम रोमन साम्राज्यांत मोडणाऱ्या सर्व प्रदेशांत पसरली व ती इ. स. ८०० पासून १३०० वर्षांपर्यंतच्या काळांत सुरू होती. पण यानंतर ही पद्धत हळके हळके नाहींशी होऊं लागली. ही पद्धत नाहींशी होण्यास खालील कारणें घडलीं. (१) व्यापार व उद्योगधंदे वाढून पैशाचा उपयोग वाढूं लागल्यामुळें लष्करी नोकरी किंवा शेती करण्याची मदत देण्याऐवजीं पैशाच्या रूपानें मदत करणें व ती घेणें, कुळांस व सरंजामी सरदारांस सोईचें वाटूं लागलें. (१) ठिकठिकाणीं प्रादेशिक राज्यें स्थापन होऊन तेथील राज्यकर्त्यांनीं सरंजामी सरदारांचें महत्त्व कमी करण्यासाठीं पगारी सैनिक ठेवण्याचा प्रघात सुरू केला. (३) पॅलेस्टाईनमधील ख्रिस्ती धर्मीयांचीं पवित्र ठिकाणें मुसलमानांपासून सोडविण्यासाठीं झालेल्या क्रूसेडस (धर्मयुद्धें) मध्यें भाग घेण्यासाठीं कांहीं सरंजामी सरदारांनीं आपले सरंजाम विकून टाकले. (४) बंदुकीच्या दारूचा शोध लागून युद्धाचें साहित्य व पद्धति बदलल्यामुळें चिलखती घोडेस्वारांचें व सशस्त्र सरदारांचें महत्त्व कमी होऊं लागलें.

(५) प्रादेशिक राज्यांची स्थापना— युरोपमध्यें मध्ययुगांतील अंदाधुंदीच्या काळांत (इ. स. ८०० ते १५००) जीवित व मालमत्ता यांचें संरक्षण व्हावें म्हणून 'सरंजामी पद्धत' निर्माण झाली होती. राष्ट्रभक्तीच्या ऐवजीं स्वामिभक्ति श्रेष्ठ मानली जाई. हल्लींच्या सारखीं लहानमोठीं प्रादेशिक राज्यें त्यावेळीं स्थापन झालीं नव्हतीं; तर लहानमोठ्या सरंजामी जहागिरदारांत युरोपमधील प्रदेश विभागला गेला होता. हे सरंजामी जहागिरदार आपल्या जहागिरीच्या प्रदेशावर राहणाऱ्या धर्माधिकारी, इतर सरदार व सामान्य लोक या तिन वर्गांचा जरूर वाटेल त्यावेळीं सल्ला घेऊन कारभार करीत, कायदे करीत, नाणीं पाडीत, कर वसूल करीत व न्यायनिवाडा देत. अशी स्थिति होती तरी कांहीं ठिकाणीं त्या प्रदेशाच्या सरंजामी सरदारांस पैशाची मदत करून तेथें स्थापन झालेल्या शहरांनीं नगरराज्यें स्थापन केलीं होतीं, व त्यांस बरेच अधिकार प्राप्त करून घेतले होते. हीं नगरराज्यें आपल्या शहराचा कारभार करीत, कायदे कानू करीत, शहरांत राहणाऱ्या लोकांचा न्यायनिवाडा करीत व कर वसूल करीत. तसेंच कांहीं नगरराज्यें खुष्कीच्या मार्गें व समुद्रमार्गें व्यापार करीत व या व्यापाराच्या संरक्षणासाठीं सैन्य व आरमारही ठेवीत, व समुद्रांत असलेलीं बेटें आपल्या वर्चस्वाखालीं आणून आपलें साम्राज्यही स्थापन करीत. हीं नगरराज्यें लोकसत्ताक असत, तरी तेथील सत्ता कांहीं थोड्या घरंदाज व धनाढ्य अशा घराण्यांकडे असून तेथील राज्यकारभार करणारे अधिकारी या थोड्या घराण्यांतील नेमण्यांत येत असल्यानें तेथें असलेल्या निरनिराळ्या वर्गांमध्यें तंटे बखेडे व कलह होत. त्याचप्रमाणें कांहीं प्रदेशांत राजे होते, पण त्यांच्या हातीं फार थोडी सत्ता होती. तेथील सरंजामी सरदारच प्रबल असत, व त्यांच्यापासून त्या प्रदेशांतील व्यापारी लोक, शहरें, गांवें व सामान्य जनता यांस फार उपद्रव होई. तेव्हां हा उपद्रव नाहींसा व्हावा म्हणून तेथील सरंजामी सरदारांच्या हातांतील सत्ता काढून घेऊन राजसत्ता प्रबल करून तिला पाठिंबा देण्याकडे इतर वर्गांचा कल असे. त्यामुळें तेथील राजाच्या नेतृत्वाखालीं लहानमोठीं प्रादेशिक राज्यें अस्तित्वांत येत होतीं. अशा राज्यांपैकीं फ्रान्स, इंग्लंड, स्पेन हीं संघटित प्रादेशिक राज्यें व व्हेनिस, जेनोआ, फ्लॉरेन्स हीं नगरराज्यें महत्त्वाचीं होतीं. त्याचप्रमाणें व्यापारामुळें पुढें आलेल्या कांहीं शहरांनीं व्यापारवृद्धीसाठीं व सरंजामी सरदारांपासून आपलें संरक्षण करण्यासाठीं आपापले संघ स्थापन केलेले होते.

कांहीं प्रमुख प्रादेशिक राज्यें—

फ्रान्स (९८७-१४५०)—पवित्र रोमन सम्राट चार्लेमेन याच्या मृत्यूनंतर कांहीं वर्षांनीं त्याचें विस्तृत साम्राज्य त्याच्या तीन नातवांमध्यें विभागलें गेलें. त्यांपैकीं चार्लस याच्याकडे व्हाईन नदीच्या पश्चिमेकडील प्रदेश (म्हणजे सध्याचा फ्रान्स) आला. १०व्या शतकांत या प्रदेशावर उत्तरेकडील डेन्मार्क, नॉर्वे, स्वीडन वगैरे परदेशांतील रानटी टोळ्यांनीं स्वाऱ्या करून खूप लुटमार केली व बराच प्रदेश उध्वस्त करून टाकला, व नंतर त्यांनीं फ्रान्समध्यें समुद्रकिनाऱ्यावरील प्रदेशांत आपली वस्ती केली. हे लोक उत्तरेकडून आले होते म्हणून त्यांस नॉर्थमेन किंवा नॉर्मन असें म्हणत व त्यांनीं फ्रान्सचा जो भाग व्यापला त्यास नॉर्मंडी असें म्हणण्यांत येऊं लागलें. फ्रान्समधील इतर सरंजामी सरदारांप्रमाणें हे नॉर्मन लोकही तेथील सरंजामी सरदार बनले. अशी स्थिति असतां ह्यूज केपेट हा फ्रान्समधील एक सरदार राजा झाला (९८७) व त्याच्या केपेट या घराण्याकडे तेथील राजसत्ता सुमारें साडे तीनशें वर्षें राहिली. ह्यूज केपेट राजा झाला तेव्हां त्याचे सरंजामी सरदार प्रबल असून त्यांच्याकडे मोठमोठ्या सरंजामी जमिनी होत्या. त्याचप्रमाणें फ्रान्समधील कांहीं घराण्यांशीं इंग्लंडमधील राजघराण्यांचा नात्याचा संबंध असल्यामुळें फ्रान्समधील बराच प्रदेश इंग्लंडच्या राजघराण्याच्या मालकीचा होता. पण फिलीप आगस्टस हा फ्रान्सचा राजा झाल्यावर (११८०-१२२३) त्यानें तो हक्क रद्द केला. त्यामुळें समुद्रकिनाऱ्यावरील विस्तृत प्रदेश फ्रान्सच्या राजाच्या वर्चस्वाखालीं आला.त्याचप्रमाणें या घराण्यांतील राजांनीं सरंजामी सरदारांकडे असलेला बराच प्रदेश काढून घेऊन तो आपल्या वर्चस्वाखालीं आणला. फ्रान्सचा राजा ४ था फिलीप यानें (१२८४-१३१४) पोपनें फ्रान्सच्या राजकारणांत ढवळाढवळ करूं नये म्हणून धर्माधिकाऱ्यांवरील खटले पूर्वीच्या प्रघाताप्रमाणें चर्चच्या कोर्टापुढें न चालवितां ते राजाच्या कोर्टापुढें चालावेत असें ठरविलें, व राज्यकारभाराच्या कामासाठीं पैसा लागल्यास तो इतर वर्गांप्रमाणें धर्माधिकाऱ्यांकडूनही कराच्या रूपानें वसूल करण्याचा राजास अधिकार आहे हें जाहीर केलें. तसेंच त्यानें राज्यकारभाराचें कामीं फ्रान्समधील तीन वर्गांच्या-धर्माधिकारी, सरदार व सामान्य लोक-या सभांचा सल्ला घेण्याचा प्रघात सुरू केला (१३१४) व त्या सभेस स्टेटस जनरल असें म्हणण्यांत येऊं लागलें.

पॅलेस्टाइनमधील धर्मयुद्धासाठीं फ्रान्समधील बरेच सरंजामी सरदार जाऊं लागून पैसा जमा करण्यासाठीं त्यांपैकीं कांहींस आपले सरंजाम विकावे लागले, त्यामुळें सरदारवर्गाचें महत्त्व कमी होत गेलें. इंग्लंडशीं झालेल्या 'शतवार्षिक युद्धांत' (१३३७–१४५३) कॅलेखेरीज फ्रान्समध्यें इंग्लंडच्या राजघराण्याकडे असलेला सर्व प्रदेश फ्रान्सनें जिंकून घेतला. अशाप्रकारें फ्रान्सच्या राजाच्या ताब्यांत फ्रान्समधील बराच प्रदेश येऊन फ्रान्सचें एक प्रादेशिक राज्य स्थापन झालें; तरी तेथें बरेच सरंजामी सरदार असून त्यांच्या हातीं बरीच सत्ता असल्यामुळें फ्रान्सच्या राजाची सत्ता कमकुवतच राहिली.

इंग्लंड (ब्रिटन)—(इ. स. पू. ५५ ते इ. स. १४८५)

प्राचीन काळीं इंग्लंडला ब्रिटन असें म्हणत, व तेथें केल्ट लोकांची वस्ती होती. त्यांस ब्रिटन्स असेंही म्हणत. इ. स. पू. ५५ या वर्षीं ज्यूलिअस सीझर या रोमन सेनापतीनें ब्रिटनवर स्वारी करून त्यावर रोमचें वर्चस्व बसविलें. पण तेथें रोमन संस्कृतीचा प्रसार करण्याचा फारसा प्रयत्न झाला नाहीं. चार शतकें ब्रिटन रोमच्या वर्चस्वाखालीं राहिल्यावर रोमन साम्राज्यावर रानटी जमातींचे हल्ले सुरू झाल्यामुळें रोमन सम्राटानें इ. स. ४१० मध्यें ब्रिटनमध्यें असलेलें रोमन सैन्य काढून घेतलें. यानंतर युरोपच्या वायव्येकडील भागांत रहात असलेल्या अँगल्स, सॅक्सन्स, ज्यूट्स वगैरे वन्य जमातींनीं ब्रिटनवर स्वाऱ्या केल्या व तेथील केल्ट लोकांचा पराभव करून ब्रिटनमध्यें आपलीं वेगवेगळीं राज्यें स्थापन केलीं. तेव्हां केल्ट लोकांपैकीं कांहींस पश्चिमेकडील डोंगराळ प्रदेशाचा आश्रय घ्यावा लागला व कांहीं या अँगल्स व सॅक्सन लोकांत मिसळून गेले. अँगल्स लोकांवरूनच ब्रिटन देशास अँगल्स–लँड किंवा इंग्लंड असें म्हणण्यांत येऊं लागलें. इ. स. ८३० च्या सुमारास या सर्व राज्यांचें एकीकरण झालें. या राज्याचा थोर आल्फ्रेड हा राजा असतां डेन्मार्कमध्यें राहणाऱ्या डेन्स लोकांनीं इंग्लंडवर स्वाऱ्या केल्या, पण आल्फ्रेडनें त्यांचा पराभव केला. या लोकांनीं फ्रान्सवरही स्वाऱ्या करून फ्रान्समधील नॉर्मंडी या प्रदेशांत वस्ती केली. हे लोक उत्तरेकडून आले म्हणून त्यांस नॉर्थमेन (नॉर्मन) असें म्हणत. आल्फ्रेडचा वंशज एडवर्ड याचा फ्रान्समधील नॉर्मंडी येथील सरदारांशीं नात्याचा संबंध होता. एडवर्डनंतर

त्याचा मुलगा हॅरोल्ड हा इंग्लंडचा राजा झाल्यावर नॉर्मंडी येथील सरदार विल्यम यानें आपला नातलग एडवर्ड यानें आपणांस इंग्लंडचें राज्य दिलें असल्याचें वचन दिलें होतें ही सबब पुढें करून इंग्लंडवर स्वारी केली. तेव्हां युद्धांत इंग्लंडचा राजा हॅरोल्ड हा मारला गेला. तेव्हां इंग्लंडमधील लोकांनीं विल्यम यास इंग्लंडचा राजा केले (१०६६). राजा झाल्यावर विल्यम यानें अँग्लो सॅक्सन लोकांच्या वेळचे 'विटॅनगेमॉट' हे सरदार व धर्माधिकारी यांचें मंडळ कायम ठेवलें व महत्त्वाच्या प्रसंगीं त्याचा सल्ला घेण्याचा प्रघात चालू ठेवला. या मंडळास पुढें ग्रेट कौन्सिल असें म्हणूं लागले. त्यानें इंग्लंड देश जिंकून घेतल्यावर तेथील जमिनी आपल्याबरोबर आलेल्या नॉर्मन सरदारांस संरंजामी सरदार म्हणून वांटून दिल्या. पण ते प्रबल होऊं नयेत म्हणून त्यांच्याकडून व त्यांनीं ज्यास पोटजमिनी दिल्या होत्या त्या सर्व सरंजामी सरदारांकडून आपण पहिल्यानें विल्यमशीं (इंग्लंडच्या राजाशीं) राजनिष्ठ राहूं अशी शपथ घेवविली. तसेंच त्यानें आपल्या राज्यांतील लोक, त्यांची इस्टेट, त्यांची आर्थिक स्थिति यासंबंधाची परिपूर्ण नोंद करविली, व त्यास 'डूमस्डे बुक' असें म्हणतात. तसेंच रोमच्या पोपनें इंग्लंडच्या राजकारणांत ढवळाढवळ करूं नये म्हणून इंग्लंडमधील धर्माधिकाऱ्यांनीं पहिल्यानें इंग्लंडच्या राजास राजनिष्ठ असावे, अशी त्यांच्याकडून शपथ घेवविली व धर्माधिकाऱ्यांवरील खटले धर्माधिकाऱ्यांच्या कोर्टापुढें न चालतां पहिल्यानें राजाच्या कोर्टापुढें चालावेत असें ठरविलें.

इंग्लंडमध्यें नॉर्मन घराणें स्थापन झाल्यावर नॉर्मन लोकांची फ्रेंच भाषा ही दरबारी भाषा म्हणून सुरू झाली; व त्यांतील पुष्कळ शब्द इंग्लिश भाषेमध्यें शिरले. युरोपमधील फ्लँडर्स प्रांतांतील कोष्टी व इतर किरकोळ उद्योगधंदे करणारे लोकही इंग्लंडमध्यें आले, व त्यांनीं नवीन उद्योगधंदे इंग्लंडमध्यें सुरू केले.

इंग्लंडच्या गादीवर पुढें अँजो घराणें आलें. या घराण्याचा फ्रान्सच्या राजघराण्याशीं नात्याचा संबंध होता, त्याचप्रमाणें फ्रान्समधील बराच प्रदेश इंग्लंडच्या राजघराण्याच्या मालकीचा होता, तेव्हां पुढें फ्रान्सच्या गादीवरही इंग्लंडचा राजा आपला हक्क सांगूं लागल्यामुळें इंग्लंड व फ्रान्स यांच्यामध्यें शंभर वर्षें (१३३७–१४५३) टिकणारें युद्ध सुरू झालें व त्यांत इंग्लंडचा पराभव होऊन फ्रान्समधील कॅले या बंदराखेरीज बाकीचा सर्व प्रदेश फ्रान्सच्या राजानें जिंकून घेतला.

यानंतर इंग्लंडमधील गादीवर हक्क सांगणाऱ्या यॉर्क व लँकेस्टर या घराण्यांमध्यें (१४५५–८५) युद्ध होऊन त्यांत बरेचसे अमीरउमराव मारले गेले. शेवटीं लँकेस्टर घराण्यांतील हेन्री ट्यूडर यास जय मिळून तो ७ वा हेन्री म्हणून इंग्लंडचा राजा झाला. गादीवर आल्यावर त्यानें यॉर्क घराण्यांतील राजकन्येशीं लग्न केल्यामुळें या दोन प्रतिस्पर्धी घराण्यांचें एकीकरण झालें, व इंग्लंड हें एक संघटित राष्ट्र बनलें.

इंग्लंडमधील राज्यघटनेची उत्क्रान्ति (१२१५–१४८५)— अँजो घराण्यांतील राजा २ रा हेन्री यानें फिरते न्यायाधीश नेमून सर्व देशास एक न्यायपद्धति अमलांत आणिली. त्याचप्रमाणें न्याय देतांना ज्याच्यावर आरोप आहे त्याचा खटला उघड रीतीनें व त्याच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांसमोर चालवून व त्याच्यावरील आरोप सिद्ध झाला आहे कीं नाहीं या बाबतींत त्यांचें मत घेऊन निकाल देण्याची पद्धत–**ज्यूरी पद्धत**–सुरू केली.

२ ऱ्या हेन्रीनंतर त्याचा मुलगा जॉन हा इंग्लंडचा राजा झाला. हा राज्यकारभाराचे कामीं आपल्या ग्रेट कौंसिलचा सल्ला घेत नसे. तो जुलमी होता व अनियंत्रितपणें राज्यकारभार करी. तेव्हां राज्यांतील सरदार, मोठाले बिशप यांस ही गोष्ट आवडली नाहीं, व त्यांनीं त्याच्या विरुद्ध कट करून त्यास एका सनदेवर सही करणें भाग पाडलें (१२१५). या सनदेस '**मॅग्नाचार्टा**' (मोठी सनद) असें म्हणण्यांत येतें. इंग्लंडच्या राज्यघटनेच्या इतिहासांत ही महत्त्वाची मानण्यांत येते. या सनदेमध्यें जॉनला खालील गोष्टींस मान्यता द्यावी लागली. (१) सरदारांच्या संमतिशिवाय त्यांच्यावर कर बसविले जाणार नाहींत. (२) ज्यांच्यावर आरोप आहे अशा लोकांस न्यायकोर्टापुढें ताबडतोब आणून त्यांच्यावरील आरोप सिद्ध झाला तरच त्यांस तुरुंगांत टाकण्यांत येईल. (३) देशांतील कायदे लोकांप्रमाणें राजासही बंधनकारक आहेत.

राजे लोक राज्यकारभाराचे कामीं व लोकांवर कोणते कर बसवावयाचे या बाबतींत 'ग्रेट कौंसिल' (अमीर–उमराव मंडळ) चा सल्ला घेत. या मंडळामध्यें अमीर–उमरावांप्रमाणें मोठमोठे धर्माधिकारीही असत. १३ व्या शतकामध्यें इंग्लंडचा व्यापार व उद्योगधंदे बरेच वाढले व त्यामुळें मोठमोठीं शहरें अस्तित्वांत येऊन सरदारवर्गाप्रमाणें व्यापारीवर्गाचें महत्त्व

वाढत गेलें. तेव्हां लोकांचा आपणांस पाठिंबा मिळावा व त्यांस आपलेसें करावें या हेतूनें राजाचा सल्लागार सायमन डी मॉंटफोर्ड यानें १२६५ मध्यें व त्यानंतर १ ल्या एडवर्ड राजानें १२९५ मध्यें कर बसविण्याच्या व कायदे करण्याच्या वेळीं अमीरउमराव मंडळाप्रमाणें निरनिराळ्या परगण्यांतील लोकांचे त्याचप्रमाणें शहरांचे प्रतिनिधी (सामान्य लोकांचे प्रतिनिधी) बोलावण्यास सुरुवात केली. या सभेस **पार्लमेंट** (विचारविनिमय करणारें मंडळ) असें म्हणण्यांत येऊं लागलें. अमीरउमराव व हे प्रतिनिधी पहिल्यानें एकाच सभागृहांत बसून विचारविनिमय करीत. परंतु पुढें अमीरउमराव व मोठाले धर्माधिकारी यांच्यापेक्षां आपले हितसंबंध वेगळे आहेत असें सामान्य लोकांच्या प्रतिनिधींस वाटूं लागलें व हे प्रतिनिधी वेगळ्या सभागृहांत बसूं लागले. अशारीतीनें पार्लमेंटसभेचे **लॉर्डांची सभा** (अमीरउमरावांची सभा) व **कॉमन्स सभा** (सामान्य लोकांची सभा) असें १३३० च्या सुमारास दोन विभाग झाले. कर बसविणें व कायदे करणें यांसाठीं पार्लमेंट सभा बोलावण्यांत येई. पण राजा नेहमींच्या राज्यकारभाराचे कामीं ग्रेट कौंसीलमधील आपल्या मर्जीतील गृहस्थांस मंत्री नेमून त्यांच्या सल्ल्यानें राज्यकारभार करी म्हणून या 'सल्लागार मंडळास' **'प्रीव्ही कौन्सिल'** (Privy खाजगी) असें इ. स.१४४० च्या सुमारास म्हणण्यांत येऊं लागलें.

पहिल्यानें पार्लमेंटसभेच्या हातांत फारच थोडी सत्ता होती, पण हळके हळके १५ व्या शतकांत ही सत्ता वाढत गेली. पार्लमेंटचा ज्यांच्यावर विश्वास आहे अशा गृहस्थांस प्रीव्ही कौंसिलमध्यें नेमून त्यांच्या सल्ल्यानें राजानें राज्यकारभार करावा, या मंत्र्यांनीं योग्यप्रकारें राज्यकारभार केला नाहीं तर पार्लमेंटसभेपैकीं कॉमन्स सभेनें या मंत्र्यांवर आरोप करून त्यांची चौकशी (Impeachment) लॉर्डांच्या सभेपुढें व्हावी असा प्रघात रूढ होऊं लागला. यावेळीं पार्लमेंट सभेचें पुढारीपण लॉर्डांच्या सभेकडे होतें. १४ व्या शतकांत पार्लमेंट सभेची सत्ता बरीच वाढली होती, पण या शतकाच्या शेवटीं इंग्लंडच्या गादीवर हक्क सांगणाऱ्या घराण्यांमध्यें युद्ध होऊन (१४५५–८५) त्यांत बरेच अमीरउमराव मारले गेल्यामुळें नंतर आलेल्या ट्यूडर घराण्याच्या अमदानींत (१४८५–१६०३) पार्लमेंटसभेचें महत्त्व कमी होऊन इंग्लंडमधील राजसत्ता अनियंत्रित झाली.

स्पेन व पोर्तुगॉल (इ. स. पू. २६४–१४९१)—

युरोपच्या नैर्ऋत्य भागांत इबेरियन किंवा स्पेनचें द्वीपकल्प आहे. त्यांत सध्यां स्पेन व पोर्तुगॉल हीं राष्ट्रें आहेत. फार प्राचीन काळीं यांत इबेरियन लोक रहात होते. नंतर फ्रान्समधून केल्ट, कार्थेजमधून फिनीशियन, नंतर इ. स. पू. २ ऱ्या शतकांत रोमन व त्यानंतर व्हीजी गॉथ (४००–६००) हे लोक आले. निरनिराळ्या काळीं आलेल्या लोकांत लग्नसंबंध होऊन त्या सर्वांची एक मिश्र जमात बनली. ७ व्या शतकांत इस्लामधर्मीय मूर लोक उत्तर आफ्रिकेतून स्पेनमध्यें आले व त्यांनीं ७११ च्या सुमारापर्यंत ईशान्य व उत्तरेकडील डोंगराळ प्रदेशाखेरीज स्पेनच्या बऱ्याच भागावर आपलें वर्चस्व बसविलें. स्पेनवर इस्लामधर्मीय मूर लोकांचें (अरब साम्राज्यांतील) सुमारें ७ शतकें वर्चस्व होतें. मूर लोक हे त्यावेळच्या स्पॅनिअर्ड लोकांपेक्षां सुधारलेले होते, व त्यामुळें मूर संस्कृतीचा स्पॅनिअर्ड लोकांवर परिणाम होऊन ते सुधारत गेले. इस्लामधर्मीय अरब साम्राज्याचा स्पेन हा कांहीं काळ भाग असल्यामुळें स्पॅनिअर्ड लोकांचा पौर्वात्य संस्कृति व वस्तू यांच्याशीं परिचय होत गेला. मूर लोकांचा राज्यकारभार जुलमी व अरेरावीचा होता. त्यांच्यांत पुढें दुफळी निर्माण झाली व मूर लोकांच्या सत्तेस उतरती कळा लागली. इस्लामधर्मीय मूर लोकांकडून आपलें स्वातंत्र्य मिळविण्याचा स्पॅनिअर्ड लोकांकडून प्रयत्न सुरू होता व १३ व्या शतकाच्या शेवटापर्यंत दक्षिणेकडील ग्रॅनडा या मूर लोकांच्या राज्याखेरीज बाकीचा प्रदेश स्पॅनिअर्ड लोकांनीं जिंकून घेतला. यावेळीं स्पेनमध्यें कॅस्टाइल, ॲरेगॉन व पोर्तुगॉल हीं राज्यें होतीं. १४६९ मध्यें ॲरेगॉनचा राजा फर्डिनंड व कॅस्टाइलची राणी इझाबेला यांच्या लग्नसंबंधामुळें या दोन राज्यांचें एकीकरण झालें. या नंतर १४९२ मध्यें दक्षिणेकडील ग्रॅनडा हें मूर राज्यही फर्डिनंडनें जिंकून घेतलें, व स्पेनचें एक संघटित प्रादेशिक राज्य स्थापन झालें. पश्चिमेकडील भागांत असलेलें पोर्तुगॉलचें राज्य स्पेनपासून वेगळें राहिलें.

वरील प्रादेशिक संघटित राज्यांप्रमाणें मध्ययुगामध्यें हंगेरी, पोलंड, स्कॉटलंड, डेन्मार्क, नॉर्वे, स्वीडन वगैरे संघटित राज्यें स्थापन झालीं. इटली व जर्मनीमध्यें अनेक लहान लहान राज्यें होतीं, व त्यांचे आपसांत कलह सुरू असत; तेव्हां त्यांचें एकीकरण होऊन मध्ययुगांत तेथें संघटित अशीं प्रादेशिक राज्यें स्थापन झालीं नाहींत.

कांहीं प्रमुख नगरराज्यें

मध्ययुगामध्यें कांहीं नगरराज्यें प्रसिद्धीस आलीं होतीं. त्यापैकीं इटलीच्या ईशान्य भागांत समुद्रकिनाऱ्यावरील **व्हेनिस**, वायव्येकडील भागांत समुद्रकिनाऱ्यावरील **जेनोआ** व **फ्लॉरेन्स** हीं प्रमुख होतीं. परराष्ट्रीय व्यापाराच्या बाबतींत व्हेनिस व जिनोआ हीं प्रसिद्ध होतीं. पूर्वेकडील प्रदेशांतील मसाल्याचे पदार्थ व इतर जिन्नस भूमध्यसमुद्राच्या पूर्व किनाऱ्यावरील व्यापाऱ्यांकडून घेऊन ते युरोपखंडांतील देशांस पुरविण्यांत त्यांनीं नांव मिळविलें होतें. या व्यापारामुळें व्हेनिस व जिनोआ हीं सधन झालीं. आपल्या व्यापाराच्या संरक्षणासाठीं त्यांनीं आरमार ठेविलें होतें, त्याचप्रमाणें भूमध्यसमुद्राच्या किनाऱ्यावर व इतरत्र आपलीं व्यापारी ठाणीं स्थापन केलीं होतीं. व्हेनिसनें सायप्रस व क्रीट हीं बेटें व जेनोआनें कॉर्सिका व सार्डिनिया हीं बेटें आपल्या वर्चस्वाखालीं आणून आपलें साम्राज्य स्थापन केलें. दर्यावर्दी कामांत येथील नाविक विशेष प्रसिद्ध होते. फ्लॉरेन्स हें नगरराज्य कलाकौशल्याच्या गोष्टी व पेढीचा (बँक) धंदा यांमध्यें प्रसिद्ध होतें. हीं नगरराज्यें लोकसत्ताक होतीं, तरी तेथील कारभार कांहीं थोड्या धनाढ्य व घरंदाज अशा घराण्यांकडे होता.

(६) पूर्व रोमन साम्राज्य व क्रूसेडस (इ.स. ३३० ते १४५३)— उत्तरेकडील वन्य जमातींच्या स्वाऱ्यामुळें रोम राजधानी असलेला रोमन साम्राज्याचा पश्चिम विभाग इ. स. ४७६ मध्यें नष्ट झाला. तरी पूर्वेकडे बिझॅनशिअम (Byzantium) किंवा कॉन्स्टाटिनोपल राजधानी असलेला पूर्व रोमन साम्राज्य किंवा बिझँटिन (Byzantine) हा विभाग यापुढें जवळजवळ एक हजार वर्षें म्हणजे इ. स. १४५३ पर्यंत अस्तित्वांत होता. या ठिकाणीं निरनिराळ्या सम्राटांनीं राज्य करून रोमन साम्राज्याची परंपरा व संस्कृति कायम ठेवली, त्यामुळें पूर्व युरोप, आशिया व आफ्रिका येथील राज्यकर्ते व लोक बिझँटिन साम्राज्यासच रोमन साम्राज्य असें मानीत. बिझँशिअम (कॉन्स्टाटिनोपल) हें राजधानीचें ठिकाण पूर्वेकडील व्यापाराची प्रमुख बाजारपेठ, त्याचप्रमाणें रोमन संस्कृति, कलाकौशल्य, विद्या यांचें प्रमुख केंद्र झालें होतें. उत्तरेकडील रशियामधून लोकर, कातडीं, मध व मेण वगैरे पदार्थ, ईशान्येकडील चीनमधून रेशमी तलम कापड, पूर्वेकडील इराण व मेसापोटेमिया यांमधून द्राक्षें, मध व सुकी फळें, व भारत व मसाल्याचीं बेटें यांमधून मसाल्याचे

पदार्थ, हस्तिदंत, मौल्यवान् दगड, औषधी माल, कापसाचीं तलम वस्त्रें कॉन्स्टाटिनोपलला येत. ठिकठिकाणच्या व्यापाऱ्यांच्या वखारी येथें स्थापन झालेल्या होत्या. या शहरांमध्यें मोठमोठे शोभिवान् राजवाडे, भव्य व सुंदर प्रार्थनामंदिरें, कलाकौशल्याच्या इमारती बांधण्यांत आल्या होत्या. विद्यालयें व विश्वविद्यालय येथें स्थापन झालें असून त्यामध्यें कायदा, ज्योतिष, वैद्यकी, शिल्पकला, चित्रकला व शास्त्र वगैरे विद्या शिकविल्या जात व विद्याकलांस उत्तेजन मिळें. पश्चिमेकडे रोम येथें चार्लेमेन याच्या नेतृत्वाखालीं रोमच्या पोपच्या प्रोत्साहनानें इ. स. ८०० मध्यें पश्चिम रोमन साम्राज्याचें (पवित्र रोमन साम्राज्य) पुनरुज्जीवन झाल्यानंतर पश्चिम व पूर्व रोमन साम्राज्य यामध्यें स्पर्धा उत्पन्न होऊन ग्रीक भाषा बोलणाऱ्या पूर्व युरोपमधील लोकांचें हें साम्राज्य झाल्यासारखें झालें.

या पूर्व रोमन साम्राज्यावरही पांचव्या शतकाच्या सुरवातीपासून ७ व्या शतकापर्यंतच्या काळांत उत्तरेकडील मेगेयार, हंगेरियन, बल्गर, स्लाव्ह वगैरे आडदांड व रानटी टोळ्यांनीं हल्ले केले व त्यांपैकीं कांहीं जमातींनीं साम्राज्याच्या उत्तरेकडील प्रदेशांत आपली वस्ती केली. त्याचप्रमाणें पूर्वेकडे असलेल्या प्रबळ पार्थियन व नंतर इराणी साम्राज्यांशींही या साम्राज्यास वरचेवर युद्धें करावीं लागलीं. त्यामुळें हीं दोन्हीं साम्राज्यें कमकुवत झालीं. अशी स्थिति असतां ७ व्या शतकाच्या सुरुवातीस अरबस्थानांत इस्लामी धर्माची स्थापना झाल्यावर (६२२) अरब लोकांनीं इ. स. ६३२ पासून ६४९ च्या दरम्यान पूर्व रोमन साम्राज्यांत मोडणारे सीरिया, पॅलेस्टाईन, इजिप्त, आर्मीनिया, मेसापोटेमिया वगैरे प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणले. यानंतर त्यांनीं यापुढील दोनशें वर्षांच्या काळांत पूर्व रोमन साम्राज्यांतील आशिया मायनर हा प्रांत व कॉन्स्टाटिनोपल हें राजधानीचें ठिकाण जिंकून घेण्याचा अनेकदां प्रयत्न केला पण त्यांस या कामीं यश आलें नाहीं. यानंतर ईशान्येकडील आडदांड तुर्क लोकांनीं आपला पुढारी सेलज्यूक याच्या नेतृत्वाखालीं अरब साम्राज्यांतील इराण व मेसापोटेमिया, सीरिया व पॅलेस्टाईन या भागावर आपलें वर्चस्व बसविलें व इस्लामी धर्माचा स्वीकार केला. सेलज्यूक तुर्क कडवे इस्लामधर्मीय बनले व त्यांनीं पूर्व रोमन साम्राज्यांतील आशिया मायनर या प्रांतावर स्वारी करून त्याचा बराच भाग आपल्या वर्चस्वाखालीं आणला (इ. स. १०७१). त्यांच्यापासून हा प्रांत परत

मिळविण्याचा बिझँटिन साम्राज्यानें प्रयत्न केला पण त्यास या कामीं यश आलें नाहीं.

क्रूसेडस (धर्मयुद्धें १०९५-१२७१) व त्यांचा युरोपवर परिणाम– पॅलेस्टाईन हा प्रांत येशू ख्रिस्त याची जन्मभूमि व कर्मभूमि असल्यामुळें तेथील पवित्र ठिकाणांचें दर्शन घेण्यासाठीं युरोपमधून पुष्कळ यात्रेकरू जात. बगदादच्या खिलाफतवर अरबांचें वर्चस्व असतांना पॅलेस्टाईनमध्यें जाणाऱ्या ख्रिश्चन यात्रेकरूंस त्रास होत नसे; पण सेलज्यूक तुर्कांचें त्यावर वर्चस्व स्थापन झाल्यावर त्यांच्यापासून ख्रिस्तीधर्मीय यात्रेकरूंवर अत्याचार व जुलूम होऊं लागले व त्याची हकीकत युरोपमधील ख्रिस्ती धर्मीयांस समजली. तुर्कांचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य पूर्व रोमन सम्राटांत नव्हतें. तेव्हां त्यानें या कामीं रोमच्या पोपमार्फत पश्चिम युरोपमधील ख्रिस्तीधर्मीय लोकांची मदत मागितली. तेव्हां रोमचा पोप ३ रा अर्बन यानें युरोपमधील राजेरजवाडे, धर्माधिकारी व इतर लोक यांची एक परिषद भरवून ख्रिश्चन धर्मीयांचीं पवित्र ठिकाणें इस्लाम-धर्मीय तुर्कांपासून सोडविण्यासाठीं सैन्य पाठविण्याचें ठरविलें. या सैन्यांत भाग घेणारे लोक धार्मिक कामासाठीं युद्धावर जात असल्यामुळें त्यांस क्रॉसची खूण पोपकडून मिळे म्हणून या सैनिकांस क्रूसेडर्स असें म्हणत. अशा रीतीनें ख्रिश्चन धर्मीयांनीं मुसलमान धर्मीयांविरुद्ध धर्मयुद्ध पुकारलें. इ. स. १०९५ पासून १२७२ पर्यंतच्या काळांत सात धर्मयुद्धें झालीं; यांपैकीं चार धर्मयुद्धें महत्त्वाचीं होतीं (पहिलें धर्मयुद्ध १०९६–९९; २ रें ११४७–४८; ३ रें ११८९–९२; ४ थें १२०१–१२०४). पण पॅलेस्टाईन प्रांत ख्रिस्तीधर्मी लोकांस जिंकून घेतां आला नाहीं. तरी या क्रूसेडसमुळें युरोपवर खालील महत्त्वाचे परिणाम झाले.

(१) युरोपमध्यें सरंजामी पद्धत रूढ होती. पुष्कळ सरंजामी सरदारांनीं क्रूसेडवर जाण्यासाठीं पैसा मिळावा म्हणून आपला सरंजाम व मालमत्ता विकून टाकली व त्यामुळें सरंजामी पद्धत नाहींशी होण्यास मदत झाली. (२) क्रूसेडसमुळें युद्धाच्या वेळीं उपयोगांत आणल्या जाणाऱ्या पुष्कळ पौर्वात्य गोष्टींचीं व पद्धतींची युरोपमधील राजेरजवाड्यांस माहिती झाली. (३) जहाजें बांधण्याची कला, पाटबंधारे, खतें, पवनचक्क्या, नवीन पिकें व वनस्पती यांची युरोपमधील लोकांस माहिती झाली. (४) रेशमी व बुट्टेदार कापड, पडदे, ऊस, तांदूळ, कापूस, मसाल्याचे पदार्थ, कापूर, हस्तीदंत, मोतीं, कोलंगडें,

अत्तरें वगैरे पौर्वात्य पदार्थांचा युरोपमधील लोकांस परिचय होऊन त्या पदार्थांसंबंधीं आवड निर्माण झाली व त्या पदार्थांचा व्यापार वाढला. (५) देवघेवीस नाण्यांचा उपयोग करण्याचा प्रघात वाढला व त्यामुळें पेढ्यांचा (बँका) धंदा सुरू झाला. (६) व्यापारी, कारागीर, शहरांत राहणारे लोक यांचें महत्त्वं वाढून त्या मानानें शेतीचें महत्त्व कमी झालें. (७) रोमन कॅथलिक चर्चचें महत्त्व वाढलें. (८) पौर्वात्य वाङ्मयांतील लिखाणांचा युरोपियन जनतेमध्यें फैलाव होण्यास मदत झाली. (९) पौर्वात्य प्राचीन संस्कृतींतील महत्त्वाच्या गोष्टी, शिल्पकलेचे व बांधकामाचे नमुने, भूगोल, रसायन, गणित, ज्योतिष यासंबंधीं युरोपमधील लोकांचें ज्ञान वाढण्यास मदत झाली.

पूर्व रोमन साम्राज्याचा नाश (१४५३)—ख्रिश्चन व मुसलमान यांमध्ये पॅलेस्टाईन प्रांतासंबंधानें धर्मयुद्धें सुरू असतां मध्य आशियांत मंगोल लोकांची सत्ता स्थापन झाली (१२०६ च्या सुमारास). त्यांनीं यानंतर बगदादच्या खलिफास ठार केलें व सेलज्यूक तुर्कांची सत्ता नाहींशी केली. तेव्हां आशिया मायनरमधील उस्मान नांवाच्या तुर्की जमातीच्या प्रमुखानें तेथें आपली सत्ता स्थापन केली (१३५० च्या सुमारास). या पुढाऱ्याच्या नांवावरूनच या जमातीच्या तुर्कांस **उस्मानी तुर्क** असें म्हणण्यांत येतें. या उस्मानी तुर्कांनीं पूर्व रोमन साम्राज्य नाहींसें करण्याचा प्रयत्न चालविला. त्यांनीं १४०२ पर्यंतच्या काळांत बाल्कन प्रदेशावर आपलें वर्चस्व बसविलें. शेवटीं उस्मानी तुर्कांचा सुलतान २ रा महमद यानें दीड लाख सैन्य व मोठी युद्धसामुग्री जमा करून कान्स्टाटिनोपलवर हल्ला केला. या शहराचें रक्षण करण्याचा पूर्व रोमन साम्राज्याच्या सम्राटानें आपल्या ८००० सैन्याच्या सहाय्यानें प्रयत्न केला, पण त्यास यश न येऊन इ. स. १४५३ मध्यें उस्मानी तुर्कांनीं कॉन्स्टाटिनोपल शहर जिंकून घेतलें, व पूर्व रोमन साम्राज्य नष्ट केलें. तेव्हां तेथें केंद्रीभूत झालेली ग्रीक-रोमन संस्कृति नष्ट झाली, व तेथें वास्तव्य करून राहिलेल्या शास्त्री, पंडित, विद्वान् व कलाप्रेमी गृहस्थांस आपले हस्तलिखित ग्रंथ, पोथ्या व ज्ञानभांडार घेऊन पश्चिम युरोपमधील प्रदेशांत पळ काढावा लागला.

(७) युरोपमधील सांस्कृतिक व सामाजिक जीवन—

सांस्कृतिक जीवन—पश्चिम रोमन साम्राज्यांत मोडणाऱ्या प्रदेशांत वन्य जमाती स्थायिक झाल्यावर तेथें त्यांच्या निरनिराळ्या भाषा प्रादेशिक भाषा म्हणून प्रचारांत येऊं लागल्या. या वन्य जमातींतील बहुतेक सर्व लोक ख्रिस्तीधर्मी बनले. ख्रिस्ती धर्माचे धार्मिक ग्रंथ लॅटिन भाषेंत असून धर्माधिकाऱ्यांची भाषा लॅटिन ही असल्यामुळें या लॅटिन भाषेचा वन्य जमातींच्या स्पॅनिश, फ्रेंच, इटालियन, जर्मन व इंग्लिश या भाषांवर परिणाम झाला. चौथेकीं इटलीच्या जवळ असलेल्या प्रदेशांतील भाषांवर लॅटिन भाषेचा अधिक परिणाम होऊन वन्य जमातीच्या बोली लॅटिनच्या मदतीनें प्रगल्भ होऊ लागल्या. तरी ख्रिश्चन धर्माचे धार्मिक ग्रंथ व धर्माधिकाऱ्यांची भाषा लॅटिन असल्यामुळें विद्वान् लोक लॅटिन भाषेमध्येंच ग्रंथरचना करीत, कारण ही भाषा आंतर्राष्ट्रीय स्वरूपाची व प्रगल्भ होती. त्याचप्रमाणें युरोपमधील विद्वान् लोकांचा अरब लोकांशीं संबंध येऊन अरबी भाषेंतील ग्रंथांचें लॅटिन भाषेंत भाषांतर केलें जाई. खलिफ-अल-मन्सूर (७१२-७५) व हरून-अल-राशिद हे बगदादचे खलिफा असतां त्यांनीं संस्कृतमधील पुष्कळ ग्रंथांचीं अरबी भाषेंत भाषांतरें करून घेतलीं होतीं व यांपैकीं कांहीं ग्रंथांचीं अरबीमधून लॅटिनमध्यें भाषांतरें झाल्यामुळें हें ज्ञान मूळचें अरब लोकांचें होतें अशी युरोपियन लोकांची समजूत झाली. युरोपमधील स्पॅनिश, फ्रेंच, इंग्लिश, जर्मन या प्रादेशिक भाषांमध्यें ग्रंथरचना करणें कमी प्रतीचें असें पहिल्यानें मानण्यांत येत होतें, पण हलके हलके या भाषा प्रगल्भ झाल्यावर या भाषांमध्यें ग्रंथरचना करण्याकडे विद्वान् लोकांचें लक्ष जाऊं लागलें व त्यामुळें या भाषांच्या द्वारें बहुजनसमाजामध्यें ज्ञानाचा प्रसार होण्यास मदत झाली.

मध्ययुगामध्यें फारच थोड्या लोकांस लिहितां वाचतां येत होतें. त्यावेळीं छापण्याच्या कलेचा शोध लागला नव्हता व सर्व ग्रंथ हस्तलिखितच असत. पण हलके हलके ठिकठिकाणीं शाळा, कॉलेजें, धर्ममठ व विश्वविद्यालयें स्थापन होऊन त्या ठिकाणीं शिक्षण मिळण्याची व्यवस्था सुरू झाली. या ठिकाणीं शिकविण्यांत येणारे विषय पहिल्या पहिल्यानें धार्मिक स्वरूपाचे व धार्मिक कामांत पडणाऱ्यांस उपयोगी होण्यासारखे असत. पण हलके हलके तत्त्वज्ञान, कायदा भूगोल, शास्त्र, गणित, ज्योतिष, वैद्यकी वगैरे निरनिराळे विषयही यांमधून

क्रमांक ६.५.३ नोंद: दि: २.६.१९५५

शिकविण्यांत चेऊं लागले. पॅरिस, ऑक्सफर्ड हीं विश्वविद्यालयें प्रसिद्धीस चेऊं लागलीं.बौद्धिक शिक्षणाव्यतिरिक्त निरनिराळे उद्योगधंदे,कला त्या त्या धंद्यांतील वाकबगार लोकांच्या हाताखालीं उमेदवार म्हणून शिक्षण घेऊन साध्य करून घेण्याचा प्रघात होता.

अशाप्रकारें शिक्षणाची व्यवस्था होती, तरी शिक्षित असलेल्या लोकांचीं संख्या फारच थोडी होती. या शिक्षित लोकांपैकीं पुष्कळांचें जगासंबंधीं ज्ञानही अगदीं तुटपुंजी असें, व तें चुकीचेंही असें. पूर्वापार चालत आलेल्या रूढ समजुती, मंत्रतंत्र, जादूटोणा, शकून अपशकून यांवर पुष्कळांचा विश्वास होता व रूढ असलेल्या ग्रंथांतील सर्वच गोष्टी खऱ्या आहेत असें मानण्याकडे लोकांची प्रवृत्ति होती.

सामाजिक जीवन

समाजाचे (१) सरदार व अमीरउमराव (२) धर्माधिकारी व धार्मिक कामांत गुंतलेले लोक (३) निरनिराळे उद्योगधंदे करणारे लोक (४) शेतावरील कुळें, मोलमजुरी करणारे बहुसंख्य लोक असे चार प्रमुख वर्ग होते. मोठमोठे सरंजामी सरदार आपल्या शेतवाडीजवळ असणाऱ्या आपल्या किल्ल्यांमध्यें किंवा मोठमोठ्या वाड्यांमध्यें रहात. हे किल्ले किंवा वाडे साधारणतः टेकाडावर किंवा उंच जागीं बांधलेले असून त्यांच्याभोंवतीं कडेकोट बंदोबस्त केलेला असे. या वाड्यांस खिडक्या नसत, कारण तसें करणें सुरक्षित नव्हतें. वाड्यांस झरोके ठेवलेले असत व त्यांतून टेहळणी करितां येई व शत्रूंवर बाणांचा वर्षाव करितां येई. बंदुकीच्या दारूचा शोध लागून तोफा व बंदुका उपयोगांत येण्यापूर्वी हे किल्ले सुरक्षित समजले जात. त्यावेळीं खुर्चा वापरण्यांत येत नव्हत्या, व त्यामुळें बसण्यासाठीं ओबडधोबड बाकें व स्टुलें यांचा उपयोग करीत असत. सरदार लोक एकमेकांकडे पाहुणे म्हणुन गेल्यास मोठ्या मेजवान्या देत व त्यावेळीं निरनिराळ्या पशुपक्षांच्या मांसांचा व मद्याचा उपयोग करीत. हे पदार्थ हल्लींच्या मानानें कमी रुचकर असत. जेवणाच्या वेळीं काटे व चमचे यांचा उपयोग करीत नसत, तर हातानेंच जेवीत. १४ व्या शतकापासून काटे चमच्यांचा उपयोग करण्यांत चेऊं लागला. चहा, कॉफी वगैरे पेयें, त्याचप्रमाणें तंबाखू, बटाटे वगैरे जिन्नस माहीत नव्हते; त्यामुळें त्यांचा उपयोग करीत नसत. घोड्यावर बसणें, निरनिराळी शस्त्रें वापरण्यास शिकणें, निरनिराळ्या क्रीडासत्रांमध्यें

(टूर्नमेंटस) भाग घेणें हे सरदार लोकांचे करमणुकींचे व मर्दानी प्रकार होते. पैज मारणें व जुगार खेळणें हे प्रकारही चालत.

व्यापार, उद्योगधंदे व शहरें—मध्ययुगाच्या सुरुवातीस व्यापार व उद्योगधंदे कमी प्रमाणांत होते. रस्ते थोडे होते व ते चांगले नसल्यामुळें प्रवासाच्या कामीं त्रास होई. हलके हलके लोकांच्या गरजा वाढूं लागल्यावर व्यापार व उद्योगधंदे यांतही वाढ होऊं लागली व पुष्कळसे लोक शेती सोडून या धंद्यांत पडूं लागले.

शेतावरील कुळें व मोलमजुरी करणाऱ्या लोकांचें जीवन—या कामांत गुंतलेल्या लोकांचें जीवन कष्टप्रद असें. यांपैकीं पुष्कळांस आपली शेती सोडून जाणें किंवा इतर व्यवसाय पतकरणें या गोष्टी करतां येत नव्हत्या. त्यांस आपल्या जमिनींवर राबावें लागें व शेतीपासून उत्पन्न होणारे निरनिराळे पदार्थ व इतर देणग्या सरंजामी सरदारांस द्याव्या लागत. त्यांस आपल्या सरदाराच्या शेतावरही आठवड्यांतील कांहीं दिवस काम करावें लागें. त्यांस विश्रांति अशी नसेच. त्यांच्यामध्यें तंटेबखेडे झाले तर त्याचा निकाल सरदारांच्या कोर्टाकडून करून घ्यावा लागे. अशाप्रकारें त्यांचें जीवन परावलंबी व कष्टप्रद असें. बहुजन समाज अशिक्षित होता.

सारांश

वन्य जमातींच्या रोमन साम्राज्यावर स्वाऱ्या—पश्चिम रोमन साम्राज्याचा नाश. सर्वत्र अंदाधुंदी, नासधूस. रोमन संस्कृतीचा नाश.

पवित्र रोमन साम्राज्याची स्थापना—८००. वन्य जमातीमध्यें रोमच्या पोपकडून ख्रिस्ती धर्माचा व शिक्षणाचा प्रसार. पोपचें महत्त्व वाढतें. वन्य जमातींपैकीं फ्रँक जमात प्रबळ. त्यांचा पराक्रमी राजा चार्लेमेन याचें विस्तृत प्रदेशावर वर्चस्व. इ. स. ८०० मध्यें त्यास रोमन सम्राट म्हणून पोपकडून राज्याभिषेक. पश्चिम रोमन साम्राज्याचें पुनरुज्जीवन व तें पोपच्या सहकार्यानें म्हणून पवित्र रोमन साम्राज्य.

पोपच्या सत्तेची वाढ (४७६–१४५०)—वन्य जमातींत ख्रिस्ती धर्माचा प्रसार, शिक्षणाची, परोपकाराचीं व समाजोन्नतीचीं कामें, धार्मिक व्यवस्था, धर्माधिकाऱ्यांची नेमणूक करणें, निरनिराळ्या देशांतील धार्मिक बाबींवर नियंत्रण.

रोमन सम्राटास राज्याभिषेक करणें म्हणून पोपचें महत्त्व वाढलें. धार्मिक कृत्यांस लॅटिन भाषेचा उपयोग, त्यामुळें वन्य जमातींच्या प्रादेशिक भाषा प्रगल्भ. ख्रिस्ती चर्चचें, कॉन्स्टाटिनोपलचें ग्रीक ऑर्थडॉक्स चर्च व रोमचें कॅथलिक चर्च असे दोन प्रमुख विभाग.

सरंजामी पद्धत (८००-१३००)–अंदाधुंदीमुळें लष्करी नोकरीच्या करारानें जमीनीवर आधारलेली सरंजामी पद्धत. सरंजामी सरदारांस बरेच अधिकार. व्यापार व उद्योगधंदे यांची वाढ व त्यांचें महत्त्व. क्रूसेडसमुळें कांहीं सरंजामी सरदारांस आपल्या जमीनी विकावयास लागल्या. बंदुकीच्या दारूचा शोध. चिलखिती घोडेस्वारांचें, किल्ल्यांचें व सरंजामी सरदारांचें महत्त्व कमी. सरंजामी सरदारांविरुद्ध सामान्य जनतेचा राजसत्तेस पाठिंबा.

प्रादेशिक राज्यांची स्थापना—

फ्रान्स–९८७-१४५०—ह्यूज कॅपेट राजा ९८७. फिलिप आगस्टस (११८०-१२२३) व ४ था फिलीप (१२८४–१३१४) यांच्या कारकीर्दींत व शतसांवत्सरिक युद्धांत (१३३७–१४५३) फ्रान्समधील इंग्लंडच्या राजाच्या वर्चस्वाखालील कॅलेखेरीज सर्व प्रदेश फ्रान्सनें मिळविला. फ्रान्सचें प्रादेशिक राज्य, पण सरंजामी सरदारांच्या हातांत बरीच सत्ता म्हणून कमकुवत. राज्यकारभाराचें कामीं व कर बसवितांना स्टेटस जनरलचा–सरदार, धर्माधिकारी व सामान्य लोक–यांचा सल्ला घेण्याचा प्रघात सुरू (१३१४).

इंग्लंड (इ. स. पू. ५५–१४८५)–ब्रिटनवर इ. स. पू. ५५ ते इ. स. ४१० रोमन साम्राज्याचें वर्चस्व. ४०० ते ६०० अँगल्स, सॅक्सन्स यांच्या स्वाऱ्या व त्यांचीं राज्यें व म्हणून इंग्लंड हें नांव. पुढे डेन्स व नंतर नॉर्मन लोकांचें वर्चस्व. १ ला विल्यम यानें सरंजामी सरदारांची सत्ता कमी केली व पोपच्या इंग्लंडमधील सत्तेवर नियंत्रण. इंग्लंडमध्यें सर्वत्र एक न्यायपद्धत व सारखे कायदे. सरदार घराण्यांत युद्ध व सरदारांची सत्ता कमकुवत. राजसत्तेस सामान्य लोकांचा पाठिंबा म्हणून ट्यूडर राजसत्ता प्रबळ (१४८५).

सरंजामी सरदारांकडून राजसत्तेवर नियंत्रण (१२१५)–मॅग्ना चार्टा. कर बसवितांना व राज्यकारभार करतांना अमीर उमरावांच्या मंडळाप्रमाणें परगणे व शहरें यांचे प्रतिनिधी बोलावण्याचा प्रघात (१२९५); या सर्वांचें पार्लमेंट, १३३० च्या सुमारास. त्याचे लॉर्डांची सभा व सामान्य लोकांची सभा असे दोन विभाग. लॉर्डांच्या सभेकडे पार्लमेंटचें पुढारीपण, राजाच्या मंत्र्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठीं त्यांची चौकशी करण्याचा अधिकार पार्लमेंटकडे.

स्पेन (२६४–१४९२) : इबेरियन लोक, नंतर केल्ट, फिनीशियन, व्हीजी गॉथ या जमातींचें आगमन. पुढें मिश्र जमात. ७ ते १४ शतकांपर्यंत इस्लामधर्मीय

मूर लोकांचें वर्चस्व. अरब साम्राज्याचा व खिलाफतचा भाग. अरब व मूर लोक सुधारलेले म्हणून स्पेनमधील लोक सुधारूं लागले, त्यांच्यांत सांस्कृतिक बाबतींत प्रगति; पौर्वात्य विद्याकलांशीं व गोष्टींशीं परिचय. स्पॅनिअर्ड लोकांचा स्वातंत्र्यप्राप्तीचा प्रयत्न, व त्यांस यश व तेथें स्पॅनिअर्ड लोकांची प्रमुख राज्यें अरगाइल व कॅस्टाईल. अरगाइलचा फर्डिनंड व कॅस्टाईलची इझाबेला यांचा लग्नसंबंध; व त्यांच्या राज्यांचें एकीकरण. पुढें १४९२ मूर लोकांचें ग्रॅनडा हें राज्य जिंकल्यावर स्पेनचें प्रादेशिक राज्य. पोर्तुगॉलचें वेगळें राज्य.

इतर प्रादेशिक राज्यें–हंगेरी, पोलंड, स्कॉटलंड, डेन्मार्क, स्वीडन, नॉर्वे वगैरे.

नगरराज्यें–इटलीमधील व्हेनिस, जेनोआ (Genoa) व फ्लॉरेन्स हीं प्रमुख. लोकसत्ताक राज्यें पण धनाढ्य घराण्यांकडे सत्ता. व्यापाराचे व दर्यावर्दीपणाचे बाबतींत व्हेनिस व जेनोआ प्रमुख. पौर्वात्य देशांतील भूमध्यसमुद्राच्या पूर्व भागांत आलेला माल युरोपला पुरविणें हा व्यवसाय, त्यामुळें श्रीमंत. त्यांचीं दूरदूरच्या ठिकाणीं व्यापारी ठाणीं व व्यापाराचें संरक्षण करण्यास आरमार. फ्लॉरेन्स हें कलाविद्यांमध्यें प्रसिद्ध.

पूर्व रोमन साम्राज्य व क्रूसेडस (३३०–१४५३)—पश्चिम रोमन साम्राज्य नष्ट झाल्यावर रोमन साम्राज्याची परंपरा चालू. सांस्कतिक बाबी, व्यापार व उद्योगधंदे यांत प्रगति व कॉन्स्टाटिनोपल हें महत्त्वाचें केंद्र. उत्तरेकडील वन्य जमातींच्या हल्ल्यांस प्रतिकार. पूर्वेकडील पार्थियन व इराणी साम्राज्याशीं युद्धें. दोन्हीं साम्राज्यें हतबल. इस्लाम धर्माची स्थापना व पूर्व रोमन साम्राज्यांतील बराच प्रदेश अरबांच्या नंतर सेलजूक तुर्कांच्या वर्चस्वाखालीं. ख्रिश्चन यात्रेकरूंवर जुलूम म्हणून धर्मयुद्धें, पण ख्रिश्चन राष्ट्रांस अपयश. युरोपमधील लोकांचा पौर्वात्य पदार्थ, रीतिरिवाज, संस्कृति, ज्ञान यांच्याशीं परिचय. मंगोल लोकांनीं शेलजूक तुर्कांची व खिलाफतीची सत्ता नष्ट केली. उस्मानी तुर्क उदयास, पूर्व रोमन साम्राज्यावर स्वाऱ्या व साम्राज्यांतील प्रदेशावर वर्चस्व. शेवटीं १४५३ मध्यें पूर्व रोमन साम्राज्य नष्ट. तेथील विद्वन् लोक पश्चिम युरोपमध्यें गेले,

सांस्कृतिक व सामाजिक जीवन–विद्वानांची लॅटिन भाषा, व त्यांत ग्रंथ. लॅटिनच्या मदतीनें प्रादेशिक भाषा प्रगल्भ. बहुजन समाज अशिक्षित. समाजांत निरनिराळे वर्ग; सरदार व जमीनदार वर्ग श्रेष्ठ प्रतीचा. व्यापार व उद्योगधंद्यांत वाढ; व सरदारांचें महत्त्व हलके हलके कमी. शेतावरील कुळांची स्थिति कष्टप्रद.

प्रकरण ८ वें

मध्ययुगांतील पौर्वात्य देश व त्यांचा इतिहास

(इ. स. १२५० ते १८४० सुमारें)

(अ) मध्ययुगांतील भारत (ब) मंगोल व तुर्क (क) मध्ययुगांतील चीन (ड) मध्ययुगांतील जपान.

मध्ययुगांतील भारत

(१२०६–१८१८)

प्रास्ताविक— कुतबुद्दीन ऐबक यानें दिल्ली येथें स्वतंत्र राज्य स्थापन केल्यावर इ. स. १२०६ पासून १५२६ पर्यंतच्या काळांत गुलाम, खिलजी, तघलख, सय्यद व लोदी या घराण्यांनीं राज्य केलें. या काळांत अल्लाउद्दीनाच्या वेळीं दक्षिण भारतांतील कांहीं प्रदेशावरही दिल्लीच्या सुलतानाची सत्ता स्थापन झाली होती, पण महमद तघलखाच्या कारकीर्दीत तेथील सुभेदारानें बहामनी हें स्वतंत्र राज्य स्थापलें (१३४७) तसेच हिंदूंचें विजयानगर हें राज्य स्थापन झालें (१३३६). उत्तर भारतामध्येंही ठिकठिकाणच्या सुभेदारांनीं स्वतंत्र राज्यें स्थापन केलीं. १५२६ मध्यें दिल्लीस मोंगलांचें राज्य स्थापन झालें व अकबराच्या कारकीर्दीत त्याचें साम्राज्य बनलें, पण पुढें औरंगजेबाच्या कारकीर्दीत त्याच्या असहिष्णुतेच्या धोरणामुळें ठिकठिकाणीं बंडाळी झाली. शिवाजीनें दक्षिणेंत मराठ्यांचें स्वतंत्र राज्य स्थापन केलें; व औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मोगल साम्राज्याचा ऱ्हास होऊन मराठ्यांची सत्ता उत्तर भारतांतही स्थापन झाली. याच सुमारास भारताशीं व्यापार करण्यासाठीं आलेल्या युरोपियन कंपन्यांपैकीं इंग्लिश कंपनीनें बंगालमध्यें आपलें राज्य स्थापून आपल्या तोफा, बंदुका वगैरे आधुनिक शस्त्रास्त्रांनीं हिंदी राजेरजवाड्यांचा पराभव केला व १९ व्या शतकाच्या सुरुवातीस आपली सत्ता प्रबल केली; या काळांत होऊन गेलेल्या राज्यांत खालील राज्यकर्त्यांची कारकीर्द विशेष महत्त्वाची होती.

अल्लाउद्दीन खिलजी (१२९६–१३१५)—खिलजी घराण्यांत अल्ला-

मूर लोकांचें वर्चस्व. अरब साम्राज्याचा व खिलाफतचा भाग. अरब व मूर लोक सुधारलेले म्हणून स्पेनमधील लोक सुधारूं लागले, त्यांच्यांत सांस्कृतिक बाबतींत प्रगति; पौर्वात्य विद्याकलांशीं व गोटींशीं परिचय. स्पॅनिअर्ड लोकांचा स्वातंत्र्यप्राप्तीचा प्रयत्न, व त्यांस यश व तेथें स्पॅनिअर्ड लोकांची प्रमुख राज्यें अरगाइल व कॅस्टाईल. अरगाइलचा फर्डिनंड व कॅस्टाईलची इझाबेला यांचा लग्नसंबंध; व त्यांच्या राज्यांचें एकीकरण. पुढें १४९२ मूर लोकांचें ग्रॅनडा हें राज्य जिंकल्यावर स्पेनचें प्रादेशिक राज्य. पोर्तुगॉलचें वेगळें राज्य.

इतर प्रादेशिक राज्यें–हंगेरी, पोलंड, स्कॉटलंड, डेन्मार्क, स्वीडन, नॉर्वे वगैरे.

नगरराज्यें–इटलीमधील व्हेनिस, जेनोआ (Genoa) व फ्लॉरेन्स हीं प्रमुख. लोकसत्ताक राज्यें पण धनाढ्य घराण्यांकडे सत्ता. व्यापाराचे व दर्यावर्दीपणाचे बाबतींत व्हेनिस व जेनोआ प्रमुख. पौर्वात्य देशांतील भूमध्यसमुद्राच्या पूर्व भागांत आलेला माल युरोपला पुरविणें हा व्यवसाय, त्यामुळें श्रीमंत. त्यांचीं दूरदूरच्या ठिकाणीं व्यापारी ठाणीं व व्यापाराचें संरक्षण करण्यास आरमार. फ्लॉरेन्स हें कलाविद्यांमध्यें प्रसिद्ध.

पूर्व रोमन साम्राज्य व क्रूसेडस (३३०–१४५३)–पश्चिम रोमन साम्राज्य नष्ट झाल्यावर रोमन साम्राज्याची परंपरा चालू. सांस्कतिक बाबी, व्यापार व उद्योगधंदे यांत प्रगति व कॉन्स्टाटिनोपल हें महत्त्वाचें केंद्र. उत्तरेकडील वन्य जमातींच्या हल्ल्यांस प्रतिकार. पूर्वेकडील पार्थियन व इराणी साम्राज्याशीं युद्धें. दोन्हीं साम्राज्यें हतबल. इस्लाम धर्माची स्थापना व पूर्व रोमन साम्राज्यांतील बराच प्रदेश अरबांच्या नंतर सेलजूक तुर्कांच्या वर्चस्वाखालीं. ख्रिश्चन यात्रेकरूंवर जुलूम म्हणून धर्मयुद्धें, पण ख्रिश्चन राष्ट्रांस अपयश. युरोपमधील लोकांचा पौर्वात्य पदार्थ, रीतिरिवाज, संस्कृति, ज्ञान यांच्याशीं परिचय. मंगोल लोकांनीं शेलजूक तुर्कांची व खिलाफतीची सत्ता नष्ट केली. उस्मानी तुर्क उदयास, पूर्व रोमन साम्राज्यावर स्वाऱ्या व साम्राज्यांतील प्रदेशावर वर्चस्व. शेवटीं १४५३ मध्यें पूर्व रोमन साम्राज्य नष्ट. तेथील विद्वन् लोक पश्चिम युरोपमध्यें गेले,

सांस्कृतिक व सामाजिक जीवन–विद्वानांची लॅटिन भाषा, व त्यांत ग्रंथ. लॅटिनच्या मदतीनें प्रादेशिक भाषा प्रगल्भ. बहुजन समाज अशिक्षित. समाजांत निरनिराळे वर्ग; सरदार व जमीनदार वर्ग श्रेष्ठ प्रतीचा. व्यापार व उद्योगधंद्यांत वाढ; व सरदारांचें महत्त्व हलके हलके कमी. शेतावरील कुळांची स्थिति कष्टप्रद.

प्रकरण ८ वें

मध्ययुगांतील पौर्वात्य देश व त्यांचा इतिहास

(इ. स. १२५० ते १८४० सुमारें)

(अ) मध्ययुगांतील भारत (ब) मंगोल व तुर्क (क) मध्ययुगांतील चीन (ड) मध्ययुगांतील जपान.

मध्ययुगांतील भारत

(१२०६–१८१८)

प्रास्ताविक— कुतबुद्दीन ऐबक यानें दिल्ली येथें स्वतंत्र राज्य स्थापन केल्यावर इ. स. १२०६ पासून १५२६ पर्यंतच्या काळांत गुलाम, खिलजी, तघलख, सय्यद व लोदी या घराण्यांनीं राज्य केलें. या काळांत अल्लाउद्दीनाच्या वेळीं दक्षिण भारतांतील कांहीं प्रदेशावरही दिल्लीच्या सुलतानाची सत्ता स्थापन झाली होती, पण महमद तघलखाच्या कारकीर्दीत तेथील सुभेदारानें बहामनी हें स्वतंत्र राज्य स्थापलें (१३४७) तसेच हिंदूंचें विजयानगर हें राज्य स्थापन झालें (१३३६). उत्तर भारतामध्येंही ठिकठिकाणच्या सुभेदारांनीं स्वतंत्र राज्यें स्थापन केलीं. १५२६ मध्यें दिल्लीस मोंगलांचें राज्य स्थापन झालें व अकबराच्या कारकीर्दीत त्याचें साम्राज्य बनलें, पण पुढें औरंगजेबाच्या कारकीर्दीत त्याच्या असहिष्णुतेच्या धोरणामुळें ठिकठिकाणीं बंडाळी झाली. शिवाजीनें दक्षिणेंत मराठ्यांचें स्वतंत्र राज्य स्थापन केलें; व औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मोगल साम्राज्याचा ऱ्हास होऊन मराठ्यांची सत्ता उत्तर भारतांतही स्थापन झाली. याच सुमारास भारताशीं व्यापार करण्यासाठीं आलेल्या युरोपियन कंपन्यांपैकीं इंग्लिश कंपनीनें बंगालमध्यें आपलें राज्य स्थापून आपल्या तोफा, बंदुका वगैरे आधुनिक शस्त्रास्त्रांनीं हिंदी राजेरजवाड्यांचा पराभव केला व १९ व्या शतकाच्या सुरुवातीस आपली सत्ता प्रबल केली; या काळांत होऊन गेलेल्या राज्यांत खालील राज्यकर्त्यांची कारकीर्द विशेष महत्त्वाची होती.

अल्लाउद्दीन खिलजी (१२९६–१३१५)—खिलजी घराण्यांत अल्ला-

उद्दीन हा प्रसिद्ध सुलतान होऊन गेला. त्याच्या कारकीर्दीत मंगोल लोकांनीं वायव्य सरहद्दीवर स्वाऱ्या केल्या पण त्यांचा मोड करण्यांत आला. अल्लाउद्दीनानें दरबारांतील श्रीमंत मुसलमान अमीर उमराव मंडळीस त्यांच्याजवळ असलेल्या संपत्तीमुळें बंडाळी करण्यास फावते व मोठमोठे अमीर उमराव त्यांच्यांत झालेल्या लग्नसंबंधामुळें एक होऊन प्रबळ होतात, तेव्हां त्या गोष्टीस आळा बसावा म्हणून आपल्या संमतीशिवाय मोठमोठ्या अमीर उमराव घराण्यांत लग्नसंबंध होऊं नयेत असें फर्मान काढलें. त्यानें हेरांचें खातें काढलें, व अमीर उमरावांच्या हालचालीवर नजर ठेविली व चळवळ्या अमीर उमरावांच्या मोठमोठ्या इस्टेटी जप्त केल्या. त्यांच्यांतील संघटन वाढूं नये म्हणून मेजवान्या बंद केल्या. आपलें सैन्य कार्यक्षम करण्यासाठीं सैनिकांस देण्यांत येणारा पगार निश्चित केला. अन्न व आवश्यक वस्तूंच्या किंमती कमी करून त्या कायम केल्या. त्यानें आपल्या राज्यांतील हिंदू जनतेविरुद्ध कडक कायदे केले. इ. स. १२९७ मध्यें अल्लाउद्दीनानें गुजराथचें राज्य, १३०३ मध्यें चितोड, १३०५ मध्यें माळवा व १३०७ मध्यें मारवाड हे प्रदेश जिंकून घेतले. अल्लाउद्दीनाचा सरदार मलीक काफूर यानें दक्षिण भारतावर स्वारी करून १३०७ मध्यें देवगिरीच्या यादवांचें राज्य, १३१० मध्यें पूर्वेकडील वरंगळचें राज्य व १३११ मध्यें होयसळचें राज्य जिंकून घेतलें. नंतर त्यानें मदुरा व कांची हीं शहरें लुटलीं. अशा रीतीनें अल्लाउद्दीनाचें दक्षिण भारताच्या विस्तृत प्रदेशावर राज्य स्थापन झालें. अल्लाउद्दीन १३१५ मध्यें मरण पावला.

यानंतर तघलक घराण्यांत **महमद तघलक** हा एक प्रसिद्ध राजा होऊन गेला (१३२५–५१). याच्या कांहीं योजना चांगल्या होत्या, पण त्या साध्य करण्यासाठीं योग्य ती खबरदारी न घेतल्यामुळें त्यास अपयश आलें, व बराच खर्च होऊन गोंधळ झाला. या योजना म्हणजे राजधानी दिल्लीहून हालवून दक्षिणेस देवगिरी येथें नेणें, तांब्यांचीं नाणीं रुप्याच्या किंमतीनें चालावींत असें फर्मान काढणें, चीन देश जिंकण्यासाठीं उत्तरेकडील डोंगराळ प्रदेशांतून सैन्य पाठविणें या होत. तो लहरी व उतावळा होता. या सर्व गोष्टींमुळें त्याच्या कारकीर्दीत ठिकठिकाणीं बंडाळी झाली व स्वतंत्र राज्यें स्थापन झालीं.

महमदानंतर त्याचा पुतण्या फिरोज हा सुलतान झाला. त्यानें यमुना व सतलज नदीस पाटबंधारे काढले व विहीरी खोदल्या, व तळीं बांधलीं.

त्यांचें पाणी शेतकऱ्यांस पुरविल्याबद्दल पाणीपट्टी घेतली जाई, पण ती माफक असल्यामुळें शेतीचें उत्पन्न वाढून राज्याचें उत्पन्न वाढलें.

१३९८ मध्यें मध्य आशियांत समरकंद येथें मोठें राज्य स्थापन करणारा तुर्क वं मंगोल वंशांतील तैमूरलंग यानें भारतावर स्वारी करून दिल्ली घेतली व लक्षावधि माणसांची कत्तल करून व खूप लूट घेऊन तो परत गेला. त्याच्या स्वारीनंतर मुस्लीम संस्कृतीचें केंद्र म्हणून दिल्लीचें महत्त्व कमी झालें व जोनपूर, मंडू, अहमदाबाद हीं ठिकाणें सांस्कृतिक केंद्रें म्हणून पुढें आलीं.

स्वतंत्र राज्यें—महंमद तघलकाच्या वेळेपासून ठिकठिकाणीं स्वतंत्र राज्यें स्थापन झालीं. शमसुद्दीन इलिआर यानें बंगालमध्यें (१३४५–६५), खानजहान यानें काशीच्या उत्तरेस जोनपूर येथें (१३९४–१४७६), दिवारखान लोदी यानें माळव्यामध्यें (१४०१–१५३१), व झाफरखान यानें गुजराथ येथें (१४०१–१५७२) स्वतंत्र राज्यें स्थापिलीं. गुजराथच्या सुलतानांनीं अहमदाबाद, खंबायत व इतर ठिकाणीं पुष्कळ सुंदर इमारती बांधल्या. त्यावेळीं कापूस, रेशीम व जर यांच्या कापडाच्या बाबतींत अहमदाबाद फार प्रसिद्ध होतें व पश्चिम भारतांत तें प्रमुख शहर मानलें जाई.

बहामनी राज्य—दक्षिण भारतांत जाफरखान यानें गुलबर्गा येथें स्वतंत्र राज्य (बहामनी राज्य) स्थापन केलें (१३४७). या राज्याचे दक्षिणेकडील विजयानगरच्या राज्याशीं कृष्णा व तुंगभद्रा या नद्यांमधील सुपीक प्रदेशासंबंधानें युद्धें होत असत. बहामनी सुलतानांनीं ठिकठिकाणीं भक्कम किल्ले बांधले व पूर्वी अस्तित्वांत असलेल्या किल्ल्यांची डागडुगी करून ते भक्कम केले. या किल्ल्यांपैकीं दौलताबाद, बेदर, गोवळकोंडा हे प्रसिद्ध होते. पश्चिमेकडील किनाऱ्यावर त्यावेळीं गोवा, दाभोळ, चौल, दमण हीं बंदरें विशेष प्रमुख होतीं व त्यामार्फत इजिप्त, अरबस्थान, इराण वगैरे देशांशीं मोठा व्यापार चाले. या राज्यांत महमद गवान हा एक हुशार व कर्तबगार सरदार होऊन गेला. त्यानें मुख्य मंत्री म्हणून काम केलें होतें. महमद गवानानंतर (१४८० चा सुमार) बहामनी राज्याची विजापूर, अहमदनगर, गोवळकोंडे, वऱ्हाड व बीदर हीं पांच छकलें झालीं. यांपैकीं यूसफ अदिलशहा यानें विजापूर येथें १४८९ मध्यें स्वतंत्र राज्य स्थापलें. त्यानें विद्या व कला यांस उत्तेजन दिलें. त्यानें

शोभिवान् इमारती बांधल्या. त्याच्या दरबारीं तुर्कस्थान, इराण, येथून बरेच कारागीर आलेले होते. १५१० मध्यें पोर्तुगीज लोकांनीं गोवें बंदर त्याच्यापासून जिंकून घेतलें. बहामनी राज्यांतील मलिक अहमद यानें १४९० मध्यें अहमदनगरचें राज्य स्थापन केलें. त्यानें अहमदनगर हें शहर वसाविलें. या राज्यांत पुढें अबिसीनीयांतून आलेला मलिकंबर हा कर्तबगार गृहस्थ पुढे येऊन त्यानें तेथील मोडकळीस येत चाललेल्या राज्याची घडी नीट बसविली. हा १६२५ मध्यें मरण पावला. इ. स. १५१२ मध्यें कुलीकुत्ब उल मुल्ख या बहामनी राज्यांतील सरदारानें गोवळकोंड्याची कुतुबशाही (१५१२–१६८७) स्थापन केली. त्याचा नातू महमद यानें १५९१ मध्यें हैद्राबाद या शहराची स्थापना केली.

विजयानगरचें साम्राज्य (१३३६–१५६५)— दक्षिण भारतामध्यें वाढत चाललेल्या मुसलमानी सत्तेला प्रतिबंध करण्यासाठीं वारंगळ येथील संगम राजाच्या मुलांपैकीं हरिहर व बुक्क यांनीं विद्यारण्य स्वामीच्या सल्ल्यानें तुंगभद्रेच्या काठीं विजयानगरच्या राज्याची स्थापना केली. या ठिकाणीं संगम घराणें (१३३६–१४८७), साळुव घराणें (१४८७–१५०९) व तुळव घराणें (१५०९–१५६५) या तीन घराण्यांनीं राज्य केलें. संगम घराण्यांत **२ रा देवराय** (१४२१–४८) हा प्रतापशाली राजा होऊन गेला. त्यानें हें राज्य उत्तरेस कृष्णा नदीपासून दक्षिणेस कन्याकुमारीपर्यंत वाढविलें. याच्या कारकीर्दीत व्हेनिसमधील उमराव निकोलो कौंटी, (१४३९) त्याचप्रमाणें समरकंदाच्या सुलतानातर्फे अबदुल रझक (१४४२) हे प्रवासी व प्रतिनिधी आले होते. त्यांनीं लिहून ठेवलेल्या वर्णनावरूनें हें राज्य खूप वैभवशाली होतें. विजयनगर शहर जगांतील प्रमुख शहरांप्रमाणें शोभिवंत व भरभराटीचें होतें. विजयनगरचा विस्तार ६० मैल होता. शहराला तटबंदी होती. शहरांतील रस्ते रुंद असून ठिकठिकाणीं भव्य इमारती व सुंदर देवालयें बांधलेलीं होतीं. तुंगभद्रा नदीला बांध घालून तिचें पाणी शहरांत आणलें होतें. शहरामध्यें राजवाड्याचें क्षेत्र खूप विस्तृत असून तेथें पुष्कळ इमारती होत्या. धार्मिक व इतर उत्सवाच्या प्रसंगीं नाट्यप्रयोग, नाच, गाणीं, त्याचप्रमाणें पशूंच्या टकरी व मल्लयुद्धें होत. ठिकठिकाणचे शिल्पकार, चित्रकार, व सोन्याचांदीचें काम करणारे कारागीर विजयनगरकडे चेत असत व त्यांस तेथील राजाकडून उत्तेजन मिळें.

तुलव घराण्यांत **कृष्णदेवराय** हा प्रसिद्ध सम्राट होऊन गेला (१५०९–२९). याच्या कारकीर्दीत विजयनगरचें वैभव खूप वाढलें. विद्या व कला यांस त्याचें उत्तेजन होतें. परकीय प्रवासी व व्यापारी यांस आपल्या राज्यांत येण्यास व व्यापार करण्यास त्यानें प्रोत्साहन दिलें. त्यामुळें पोर्तुगीज लोकांशीं या राज्याचा मोठ्या प्रमाणांत व्यापार चाले. कृष्णदेवराय याच्यानंतरचे राजे कमकुवत असल्यामुळें त्याच्या मंत्र्याचा मुलगा रामराजा यानें सर्व सत्ता आपल्या हातीं घेतली (१५४२). या विजयनगरच्या राज्याबद्दल दक्षिणेंतील मुसलमान राज्यांस वैषम्य वाटे व सरतेशेवटीं २३ जुलै १५६५ रोजीं तालीकोटपासून ३० मैलांवर राक्षसतागडी येथें विजापूर, गोवळकोंडे, अहमदनगर व बीदर येथील सुलतानांनीं संगनमत करून विजयानगरवर स्वारी केली. या युद्धांत मुसलमान सुलतानांनीं तोफांचा उपयोग केला व तुंबळ युद्ध होऊन विजयनगरच्या सैन्याचा पराभव झाला. नंतर विजयनगर हें शोभिवान् व वैभवशाली शहर उद्ध्वस्त करून टाकण्यांत आलें. अशा रीतीनें दक्षिण भारतांत स्थापन झालेलें हिंदूंचें प्रबळ साम्राज्य नाहींसें झालें.

दिल्ली येथें इब्राहिम लोदी हा राज्य करीत असतां तैमूरलंगाचा वंशज बाबर यानें काबूल येथें राज्य स्थापन केलें व तोफखान्याची मदत घेऊन दिल्लीच्या सुलतानाविरुद्ध स्वारी केली. तोफांच्या माऱ्यापुढें इब्राहिमचें न चालून त्याचा पानिपत येथें पराभव झाला (१५२६) व दिल्ली येथें मोगल सत्ता स्थापन झाली.

मोगल साम्राज्याची स्थापना, उत्कर्ष व ऱ्हास (१५२६–१७०७) दिल्ली येथें बाबरची सत्ता स्थापन झाल्यावर राणा संग्रामसिंह यानें रजपूत राज्यांची एकी करून बाबरशीं युद्ध केलें, पण बाबरच्या तोफखान्याच्या माऱ्यापुढें संग्रामसिंहाचें न चालून त्याचा पराभव झाला (१५२७).

बाबरनंतर त्याचा मुलगा हुमायून हा राजा झाला. त्याचा १५३९ मध्यें बक्सार येथें व १५४० मध्यें कनोज येथें शेरशहानें पराभव केल्यामुळें त्यास आपल्या कुटुंबांतील मंडळीसह सिंधमध्यें पळ काढावा लागला. तेथें उमरकोट येथें असतांना अकबराचा जन्म झाला. यानंतर अफगाणिस्थानमध्यें राज्य करीत असलेला त्याचा भाऊ कामरान यानें त्यास आश्रय न दिल्यामुळें हुमायून इराणमध्यें गेला.

शेरशहाचें सूर घराणें (१५४०–१५५६)—शेरशहानें हुमायूनचा पराभव केल्यावर दिल्ली येथें आपलें राज्य स्थापन केलें व ५ वर्षें राज्यकारभार केला (१५४०–१५४५). त्यानें खालील महत्त्वाच्या सुधारणा केल्याः—(१) त्यानें राज्याचे निरनिराळे भाग पाडून त्यांवर आपल्या देखरेखीखालीं अधिकारी नेमले (२) त्यानें बंगालपासून वायव्य सरहद्दीपर्यंत राजरस्ता तयार करून त्यावर ठिकठिकाणीं धर्मशाळा बांधल्या व छायेसाठीं झाडें लाविलीं. (३) घोड्यांवरून टपाल पाठविण्याची व्यवस्था केली (४) त्यानें शेतीस उत्तेजन दिलें. शेतीस उपयोगी असणाऱ्या सर्व जमिनींची मोजणी करून त्यावर त्यानें उत्पन्नाच्या $\frac{1}{4}$ हिस्सा शेतसारा ठरविला व तो रोखीनें किंवा धान्याच्या रूपानें द्यावा अशी सवलत ठेविली. (५) त्यानें न्याय देण्याची चांगली व्यवस्था केली व सरकारी अधिकाऱ्यांकडून प्रजेवर जुलूम होणार नाहीं अशी दक्षता घेतली. (६) त्यानें रुप्याच्या नाण्यामध्यें सुधारणा केली व व्यापारास उत्तेजन दिलें. (७) त्यानें सैन्यामध्यें सुधारणा केली, व अफरातफर होऊं नये म्हणून घोड्यास डाग देण्याची पद्धत काढली.

इ. स. १५४५ मध्यें शेरशहा मरण पावला. त्याचे वंशज कर्तृत्ववान् नव्हते. व राज्यांत अंतस्थ कलह निर्माण झाले. ही संधि पाहून हुमायूननें १५५६ मध्यें शेरशहाचा वंशज शिकंदर सूर याचा पराभव केला व दिल्ली येथें पुनः मोगलांचें राज्य स्थापन केलें (१५५६), पण यानंतर लवकरच तो मरण पावला.

अकबर (१५५६–१६०५)—हुमायूननंतर त्याचा मुलगा अकबर गादीवर आला. त्यावेळीं त्याचें वय १३ वर्षांचें होतें. पण हुमायुनचा एकनिष्ठ सेनापति बहिरामखान याचें त्यास पाठबळ होतें. अकबरानें आपल्या ५० वर्षांच्या कारकीर्दीत मोगल राज्याचा विस्तार करून त्याचें साम्राज्य केलें. आपल्या उदार व धार्मिक बाबतींत सहिष्णुतेच्या धोरणानें त्यानें अफगाण सरदार, त्याचप्रमाणें रजपूत सरदार यांस आपलेसें करून आपल्या साम्राज्यास स्थैर्य आणलें.

अकबराचा राज्यविस्तार—त्यानें पूर्वी हुमायूनच्या ताब्यांत असलेले पंजाब, मुलतान, गंगा व यमुना या नद्यांमधील प्रदेश व माळवा हे प्रदेश जिंकून घेतले. राजपुतान्यामध्यें रजपुतांचीं अनेक राज्यें असून तो प्रदेश काबीज केल्याखेरीज आपल्या साम्राज्यास स्थैर्य यावयाचें नाहीं हें पाहून त्यानें

राजपुतान्यावर मोहीम काढली.अंबरचा (जयपूर) राजा बिहारीमल अकबरास शरण आला (१५६२). राजपुतान्यामध्यें मेवाडचें राज्य प्रमुख होतें, पण तेथील राणा अकबरास शरण न आल्यामुळें अकबरानें मेवाडवर स्वारी केली. राणा संग्रामसिंहाचा मुलगा उदयसिंह तेथील राणा होता, पण त्यानें पळ काढला. पण तेथील राजधानी चितोड हिचा बचाव करण्याचा तेथील लोकांनीं प्रयत्न केला, व चार महिने टिकाव धरल्यावर ती मोगलांनीं जिंकून घेतली. यानंतर अकबरानें रतनभोर, कालिंजर, बिकानेर येथील रजपूत राजांचा पराभव करून त्यांस आपले मांडलिक केले. मेवाडचा राजा उदयसिंह यानें उदेपूर येथें आपली राजधानी स्थापन केली. उदयसिंहानंतर त्याचा मुलगा प्रतापसिंह हा मेवाडचा राणा झाला. तो शूर असून त्यानें अकबराविरुद्ध युद्ध चालूं ठेवलें. सरतेशेवटीं १५७६ मध्यें हळदीघाटाच्या युद्धांत मोंगल सैन्याचा सेनापति अंबरचा मानसिंह यानें त्याचा पराभव केला, तेव्हां तो तेथून निसटून मारवाडच्या डोंगराळ भागांत गेला व तेथून आपला प्रदेश पुनः जिंकण्याचा त्यानें प्रयत्न चालविला.

यानंतर अकबरानें गुजराथ, बंगाल, व ओरिसा हे प्रदेश जिंकून घेतले. त्याचप्रमाणें वायव्य सरहद्दीवरील काश्मीर, पेशावर, सिंध हे प्रदेश जिंकून अफगाणिस्थानांतील कंदाहारपर्यंतचा मुलुख आपल्या वर्चस्वाखाली आणला. यानंतर १६०० मध्यें अहमदनगरचें राज्य जिंकून घेतलें.

अकबराचा राज्यकारभार—अकबरानें आपल्या विस्तृत साम्राज्याचे १५ सुभे पाडले होते. प्रत्येक सुभ्यावर सुभेदार हा एक अधिकारी असे. सुभेदाराच्या हाताखालीं प्रत्येक जिल्ह्यावर फौजदार, मनसबदार हे अधिकारी असत व त्यांच्याकडे लष्करी व मुलकी अशीं दोन्हीं कामें असत. सुभेदार व मनसबदार यांस जहागीर न देतां पगार दिला जाई. ठिकठिकाणीं जीं मोठीं शहरें होतीं त्यांच्यावरच्या मुख्य अधिकाऱ्यांस कोतवाल असें म्हणत.

लिखित कायदा नसे. मुसलमानांमधील दिवाणी कज्जे मुसलमानी कायद्याप्रमाणें व हिंदूंचे जातिपंचायत किंवा गांव पंचायत यामार्फत सोडविले जात. फौजदारी गुन्ह्यासंबंधीं शिक्षा कडक जसत. फांशीची शिक्षा, त्याचप्रमाणें हातपाय तोडणें, डोळे काढणें वगैरे शिक्षा गुन्ह्यांच्या मानानें दिल्या जात.

अकबराच्या हातीं अनियंत्रित सत्ता होती व राज्यांतील कोणत्याही

अधिकाऱ्यास त्यास काढतां येत असे. अकबरानें आपणांस सल्लामसलत देण्यासाठीं ४ मंत्र्यांचें एक मंत्रिमंडळ नेमलें होतें:—(१) मुख्य मंत्री–वकील (२) दिवाण–वझीर (३) बक्शी–युद्धमंत्री (४) धार्मिक मंत्री.

सुभेदारास राज्यकारभारचे कामीं मदत करण्यासाठीं (१) दिवाण (२) धार्मिक मंत्री (३) सारा वसूल करणारा आधिकारी (४) पोतदार–खाजिनदार (५) बातमी लिहिणारा असे अधिकारी असत.

सैन्य—सैन्यामध्यें मुख्य भरणा घोडेस्वारांचा असे. तोफखाना ओढण्यास हत्ती लावत. पायदळ सैन्य असें, पण त्याचें महत्त्व कमी मानलें जाई. खडें सैन्य २५००० असे. याखेरीज मनसबदारास युद्धाच्या वेळीं ससैन्य हजर व्हावें लागे. सैनिकास रोख पगार दिला जाई.

जमीनमहसूल–या खात्याचा मुख्य अधिकारी तोडरमल हा होता. त्यानें सर्व जमिनीची मोजणी करून जमिनीच्या प्रती ठरविल्या व सारा उत्पन्नाच्या $\frac{1}{3}$ व रोखीनें देण्यांत यावा असें ठरविलें.

अकबर हा सुसंस्कृत होता व कलाविद्यांस प्रोत्साहन देई. त्याचें प्रत्येक खात्याकडे व त्यांतील कारभाराकडे लक्ष असें व हिंदू व मुसलमान असा भेदभाव तो करीत नसे. त्यानें जिझिया कर रद्द केला. त्याचप्रमाणें हिंदू यात्रेकरूंवरीलही कर रद्द केला. धार्मिक बाबतींत सहिष्णुता हें त्यांचें धोरण होतें.

दिने इलाही—सर्व धर्मांतील चांगलीं तत्त्वें घेऊन एक विश्वधर्म स्थापन करण्याचा त्यानें प्रयत्न केला. या धर्मास दिने इलाही असें म्हणत. तो निरनिराळ्या धर्मांच्या प्रवक्त्यांस बोलावून त्यांच्यामध्यें धार्मिक बाबतींत चर्चा घडवून आणी. त्यासाठीं त्यानें फत्तेपूर–शिक्री येथें एक इमारत बांधली होती.

सामाजिक सुधारणा—सती जाण्यास कोणावरही जबरदस्ती करूं नये असें त्यानें फर्माविलें. बालविवाहास बंदी केली.

इतर गोष्टी—आग्र्यापासून १० मैलांवर फत्तेपूर–शिक्री येथें शहर वसवून तें त्यानें आपलें निवासस्थान केलें. तेथें शेख सलीम खिस्ती हा एक साधु रहात होता. १५७०–८५ पर्यंत अकबराचें वास्तव्य लाहोर येथें होतें. त्याच्या पदरीं तानसेन व बाजबहादूर हे गवई व संगीतज्ञ होते. फैजी हा कवी व अबुल फजल

हा त्याचा सल्लागार होता. अबुल फजल यानें अकबराच्या राज्यकारभारासंबंधानें 'ऐने अकबरी' हा ग्रंथ लिहिला. बदौनी व निझाम उद्दीन हे इतिहासलेखक होते. त्याच्या पदरीं असलेल्या विद्वान् मुसलमान लोकांनीं संस्कृत शिकून रामायण, महाभारत, भास्कराचार्यांचा गणितावरील 'लीलावती' हा ग्रंथ व अथर्ववेद या ग्रंथांचीं फारशी भाषेंत भाषांतरें केलीं. फैजीनें भगवद्गीतेचें फारशींत भाषांतर केलें. बिरबल हा हजरजबाबी व विनोदी गृहस्थ त्याच्या पदरीं होता. अकबराच्या काळीं तुळशीदास हा कवि होऊन गेला, त्यानें हिंदीमध्यें 'रामचरितमानस' हें काव्य लिहिलें.

तोडरमल हा लष्करी अधिकारी होता. अंबरचा मानसिंह हा चांगला सेनापति होता. अकबराच्या कारकीर्दींत शेती, व्यापार, उद्योगधंदे त्याचप्रमाणें वाङ्मय व कलाकौशल्य या बाबतींत प्रगति होत गेली.

१५८५ मध्यें अकबराचें वास्तव्य फत्तेपूर-शिक्री येथें असतां एलिझाबेद राणीचें पत्र घेऊन इंग्लिश वकील अकबराच्या दरबारीं गेले होते.

अकबराच्या कारकीर्दींत आग्रा येथील किल्ला, हुमायूनचें थडगें, व फत्तेपूर-शिक्री येथील इमारती बांधण्यांत आल्या.

जहांगीर (१६०५-१६२७)—१६०५ मध्यें अकबर मरण पावला. अकबरानंतर त्याचा मुलगा सलीम हा जहांगीर (जगज्जेता) ही पदवी घेऊन गादीवर आला.

इ. स. १६०० मध्यें पूर्वेकडील प्रदेशांशीं व्यापार करण्यासाठीं इंग्लंडमध्यें स्थापन झालेल्या इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीचा प्रतिनिधी हॉकिन्स आग्र्यास आला. सुरत येथें व्यापार करण्यासाठीं वखार काढण्याची परवानगी मिळावी हा त्याचा हेतु होता. १६१५ मध्यें इंग्लंडचा राजा जेम्स याचा प्रतिनिधी म्हणून सर थॉमस रो हा आग्र्यास आला (१६१५-१९).

शहाजहान (१६२७-५८)—जहांगीरनंतर त्याचा मुलगा शहाजहान हा गादीवर आला. त्यानें दिल्ली येथें शहाजहानाबाद हें नवीन शहर वसवून तेथें पुष्कळ शोभिवंत इमारती बांधल्या. त्यांपैकीं दिवाण-इ-आम ही एक इमारत होय. त्यानें राजधानी आग्र्याहून दिल्ली येथें आणिली. दिल्ली येथें जुम्मा मशीद बांधली. त्यानें आपली पत्नी मुमताजमहाल हिच्या मृत्यूनंतर (१६३१)

आग्रा येथें ताजमहाल हें तिचें सुंदर थडगें बांधलें. त्यानें रत्नांचें मयुरासन हें सिंहासन तयार करविलें. त्याच्या कारकीर्दीत मोगल साम्राज्याचें वैभव खूप वाढलें.

१६५८ च्या सुमारास शहाजहान आजारी पडल्यावर औरंगजेब यानें कारस्थान करून गादी मिळविली व शहाजहान यास कैदेंत ठेविलें.

औरंगजेब (१६५८–१७०७)—यानें सुमारें ५० वर्षें राज्य केलें. याच्या कारकीर्दीत मोंगल साम्राज्याचा विस्तार सर्वांत जास्त झाला, तरी त्याची संशयी वृत्ति, जुलमी राज्यकारभार व धार्मिक बाबतींत असहिष्णुतेचें धोरण यांमुळें सर्वत्र असंतोष निर्माण होऊन त्याच्या साम्राज्यांत निरनिराळ्या ठिकाणीं बंडें उत्पन्न झालीं व दक्षिण भारतांत शिवाजीनें स्थापन केलेल्या मराठी राज्याशीं युद्ध करतांना मोंगल साम्राज्य खिळखिळे झालें आणि औरंगजेबच्या मृत्यूनंतर त्या साम्राज्याचा लवकरच नाश झाला.

औरंगजेबचें धार्मिक धोरण—त्यानें धार्मिक बाबतींत असहिष्णुतेचें धोरण स्वीकारून जिझिया कर देणें हिंदूंस भाग पाडलें. हिंदूंचीं देवळें उध्वस्त करण्यांत आलीं. त्यानें हिंदूंच्यावर आणखीही जाचक निर्बंध घातलें. त्यामुळें मथुरा विभागांतील लोकांनी बंडाळी केली, पण औरंगजेबनें कडक उपाय योजून ती मोडून टाकली. बुंदेलखंडमध्यें छत्रसाल यानें आपलें राज्य स्थापन करून हिंदूंच्या विरुद्ध होत असलेल्या जुलमाचा प्रतिकार केला. औरंगजेबच्या या धार्मिक असहिष्णुतेच्या धोरणामुळें राजपुतान्यालगतच्या प्रदेशांतील सतनामी लोकांनीं बंड केलें. हे लोक शेतकी व इतर किरकोळ उद्योगधंदे करीत असत. पण औरंगजेबनें सैन्य पाठवून व कडक उपाय योजून या बंडाळीचा मोड केला (१६७२). पंजाबमध्यें शीखपंथाचा प्रसार होत होता, तेव्हां त्यास आळा घालावा म्हणून औरंगजेबनें त्यांचा नववा गुरु तेजबहादूर यास पकडलें व मुसलमान धर्म स्वीकारण्याचें त्यानें कबूल न केल्यामुळें त्यास ठार मारलें (१६७५). त्यामुळें औरंगजेबच्या सत्तेस शीखधर्मीयांचा विरोध वाढत गेला.

औरंगजेबच्या धार्मिक धोरणाविरुद्ध राजपुतान्यांत बंडाळी सुरू झाली, तेव्हां ती मोडण्यासाठीं त्यानें राजपुतान्यांत सैन्य पाठविलें. तेव्हां रजपूत लोकांनीं

गनिमी काव्याच्या पद्धतीनें लढून मोंगल सैन्यास जेरीस आणलें. तेव्हां मेवाडचा राणा जयसिंह याच्याशीं त्यास तह करावा लागला. याच सुमारास औरंगजेबचा मुलगा अकबर यानें बंडाळी करून रजपुतांच्या मदतीनें दिल्लीची गादी हस्तगत करण्याचा विचार केला, तेव्हां औरंगजेबास त्याच्याविरुद्ध सैन्य पाठवावें लागलें. तेव्हां तो पहिल्यानें राजपुतान्यांत, नंतर मराठ्यांचा राजा संभाजी याच्या आश्रयास गेला व तेथून त्यानें इराणांत पळ काढला (१६८१). शिवाजी मरण पावला असून संभाजी हा मराठ्यांचा राजा झाला होता, तेव्हां मराठ्यांवर स्वारी करण्यास ही अनुकूल सांधि आहे हें पाहून औरंगजेबनें मराठ्यांवर स्वारी करण्याचें ठरविलें व तो स्वतः मोठें सैन्य घेऊन दक्षिणेंत आला.

तेव्हां मराठ्यांनीं मोंगल सैन्याशीं समोरासमोर युद्ध न करितां गनिमी काव्याच्या पद्धतीनें युद्ध करून त्यास जेरीस आणण्याचें ठरविल्यामुळें बादशाही सैन्यास मराठ्यांचा मोड करतां येईना. तेव्हां औरंगजेबनें दक्षिणेंतील विजापूर व गोवळकोंडें हीं शियापंथीय राज्यें जिंकून घेतलीं. मराठ्यांचा राजा संभाजी हा शूर होता, पण तो व्यसनी होता. त्यानें गनिमी काव्याच्या पद्धतीनें लढून मोगल सैन्यास जेरीस आणलें होतें. पण १६८९ मध्यें संगमेश्वर येथें संभाजी मोगल सैन्याच्या ताब्यांत सांपडला व त्यास ठार मारण्यांत आलें (१६८९). यानंतर मोंगल सैन्यानें मराठ्यांची राजधानी रायगड हीं काबीज करून संभाजीची पत्नी येसूबाई व मुलगा शाहू यांस कैद केलें. पण शिवाजीचा दुसरा मुलगा राजाराम याच्या नेतृत्वाखालीं मराठ्यांनीं मोंगल सैन्याविरुद्ध युद्ध चालविलें. तें मोडण्याच्या कामीं औरंगजेबास यश मिळालें नाहीं व तो अहमदनगर येथें असतां मरण पावला (१७०७). त्याच्यानंतर गादीसंबंधीं तंटे उपस्थित होऊन मोंगल साम्राज्याचा ऱ्हास झाला.

मराठी साम्राज्याचा उदय, उत्कर्ष व ऱ्हास (१६४८ ते १८१८) महाराष्ट्रांत यादवांचें राज्य नाहींसें झाल्यावर मराठ्यांचें स्वतंत्र अस्तित्व नष्ट झालें, व दक्षिण भारतांत इस्लामधर्मीय राज्यकर्त्यांचीं राज्यें स्थापन होऊं लागलीं. या आक्रमणास विरोध करण्यासाठीं विजयनगरचें हिंदु साम्राज्य स्थापन झालें होतें, पण १५६५ तें नष्ट झालें. अशी परिस्थिति असतां आपलें स्वातंत्र्य परत मिळवावें व हिंदूंचें एक स्वतंत्र राज्य स्थापन करावें, अशी विजापूरचा सरदार शहाजी याचा मुलगा शिवाजी यास स्फूर्ति झाली. त्यानें

आपल्या जहागिरीतील आपल्या विचाराचे तरुण लोक जमवून महाराष्ट्रांतील खेड्यांत व डोंगराळ भागांत राहणाऱ्या मावळ्यांचें सैन्य जमविलें व इ. स. १६४६ मध्यें विजापूरच्या अमलाखाली असलेला तोरणा किल्ला जिंकून घेतला. यानंतर कोंडाणा, पुरंदर व घाटमाथ्यावरील कांहीं डोंगरी किल्लेही हस्तगत केले. शिवाजीचे हे धाडसी उद्योग पाहून त्याचा कायमचा बंदोबस्त करून टाकण्यासाठीं विजापुरकरांनीं अफजुलखान यास पाठविलें व मोठें सैन्य घेऊन तो शिवाजीवर चालून आला. पण अफजुलखान ठार झाला व यानंतर अफजुलखानाचें सैन्य व शिवाजीचें सैन्य यांमध्यें युद्ध होऊन अफजुलखानाच्या सैन्याचा मोड झाला व त्याचें पुष्कळ युद्धोपयोगी सामान शिवाजीच्या हातीं सांपडलें. अशा प्रकारें विजापुरच्या सैन्याचा पराभव झाल्यामुळें कल्याणपासून गोव्यापर्यंतच्या कोंकणपट्टीवर शिवाजीची सत्ता स्थापन झाली.

यानंतर शिवाजीनें मोगलांच्या मुलखावर स्वाऱ्या करण्यास सुरवात केली. या वेळीं औरंगजेब हा दिल्लीस मोंगल बादशहा झाला होता. त्यानें पाठविलेल्या शाईस्तेखानाचा शिवाजीनें मोड केला. यानंतर शिवाजीनें १६६४ मध्यें पश्चिम किनाऱ्यावरील मोगलांच्या ताब्यांतील प्रसिद्ध बंदर जें सुरत त्यावर हल्ला करून तें लुटलें. या प्रकारामुळें दक्षिणेकडील मोगलांचा दरारा पुष्कळच कमी झाला. यानंतर औरंगजेबनें जयसिंग व दिलेरखान यांस शिवाजीविरुद्ध पाठविलें. जयसिंगानें औरंगजेबाशीं तह करण्यासाठीं शिवाजीचें मन वळविलें. तेव्हां तह होऊन शिवाजी आपला मुलगा संभाजी व कांहीं लवाजमा घेऊन आग्र्यास गेला. तेथें शिवाजीस योग्य तो मान न मिळाल्यामुळें तो नाराज झाला व औरंगजेबनें त्यास व त्याचा मुलगा संभाजी यांस अटकेंत ठेविलें. पण शिवाजी तेथून मोठ्या युक्तीनें निसटला व संन्याशाच्या वेषांत दक्षिणेंत आला (१६६६). मध्यंतरीं शहाजी मरण पावला होता. परत आल्यावर शिवाजीनें आपले गेलेले किल्ले परत मिळविले व राज्याची घडी नीट बसविली. इ. स. १६७० मध्यें शिवाजीनें सुरतेवर दुसरी स्वारी केली व तें लुटलें. १६७२ मध्यें त्यानें सुरतेवर स्वारी करून चौथाईची मागणी केली. यानंतर १६७४ मध्यें मोठ्या डामडौलानें व प्राचीन हिंदूपद्धतीप्रमाणें रायगड येथें मराठ्यांचा राजा म्हणून शिवाजीस राज्याभिषेक करण्यांत आला. अशा रीतीनें दक्षिण भारतामध्यें स्वतंत्र

मराठी राज्याची स्थापना झाली. यानंतर शिवाजीनें कर्नाटकावर स्वारी करून जिंजी, वेलोर वगैरे ठिकाणें घेतलीं (१६७७-७८).

शिवाजीचा राज्यकारभार— शिवाजीची सत्ता अनियंत्रित होती. पण त्यानें राज्यकारभाराचें कामीं आपणांस मदत करण्यासाठीं अष्टप्रधान पद्धत सुरू केली. या आठ प्रधानांकडे मुख्य प्रधानकी, जमाबंदी, परराष्ट्रीय धोरण, सैन्य, न्याय, धार्मिक बाबी व दप्तर हीं कामें होतीं. यांपैकीं सहा प्रधानांकडे लष्करी अधिकारही होते. शिवाजीनें आपल्या राज्याचे १४ विभाग पाडलेले होते. या विभागांस प्रांत असें म्हणत. सरकारी अधिकाऱ्यांमार्फत शेतसारा वसूल केला जाई व तो उत्पन्नाच्या साधारणतः $\frac{2}{5}$ असे. शिवाजीच्या प्रत्यक्ष अमलाखालीं असलेल्या प्रदेशास स्वराज्य असें म्हणत. परकीय मुलखाकडून चौथाई व सरदेशमुखी म्हणजे वसुलाचा $\frac{1}{4}$ व $\frac{1}{10}$ हिस्सा घेतला जाई. शिवाजीनें जहागीर देण्याची पद्धत बंद केली व त्याऐवजीं सर्व अधिकाऱ्यांस सरकारी खजिन्यांतून पगार मिळे. हे अधिकारी वंशपरंपरा असूं नयेत अशी दक्षता त्यानें बाळगली होती. त्याची शिस्त चांगली होती. शिवाजी शूर, राजकारणी, मुत्सद्दी व राज्यकारभारदक्ष होता. हिंदुधर्माचा तो अभिमानी होता, पण इतर धर्मीयांबद्दल सहिष्णुता दाखवी व त्या धर्मांचीं पवित्र ठिकाणें व ग्रंथ उध्वस्त केले जाऊं नयेत अशी त्याची सर्वांस ताकीद असे. त्याच्या सैन्यांत बारगीर व शिलेदार असे दोन प्रकार होते. बारगीर यांस सरकारांतून शस्त्रास्त्रें व युद्धोपयोगी सामान मिळें. शिलेदारांस सशस्त्र हजर रहावें लागें व त्याबद्दल त्यास सरकारांतून पैसे मिळत. पण शिलेदारीची पद्धत कमी करण्याकडे त्याचें धोरण होतें.

अशा रीतीनें मराठ्यांचें स्वतंत्र राज्य स्थापन करून व राज्याची घडी नीट बसविल्यावर इ. स. १६८० मध्यें शिवाजी मरण पावला.

संभाजी व राजाराम (१६८०-१७०७)—शिवाजीनंतर त्याचा वडील मुलगा संभाजी गादीवर आला. तेव्हां मराठ्यांचें राज्य जिंकून घेण्यास अनकूल संधि आहे हें पाहून औरंगजेब दक्षिणेंत आला. पण त्यास संभाजीनें व त्यानंतर राजारामानें व नंतर त्याची पत्नी ताराबाई यांच्या नेतृत्वाखालीं मराठे सरदारांनीं तोंड दिलें, व मोंगल सैन्यास हैराण केलें. २५ वर्षें औरंगजेबचें दक्षिणेंत

वास्तव्य होतें, तरी मराठ्यांचा पराभव झाला नाहीं, व औरंगजेब १७०७ मध्यें मरण पावला. तेव्हां त्याचा पुत्र बहादुरशहा मोगल बादशहा झाला. बहादुरशहानें मराठी राज्यांत दुफळी माजविण्याच्या उद्देशानें शाहूची मुक्तता केली. शाहू दक्षिणेंत आल्यावर मराठी राज्यांत दुफळी होऊन शाहूनें सातारा येथें आपली गादी स्थापली व ताराबाई हिनें आपला मुलगा शिवाजी याच्यातर्फे कोल्हापूर येथें गादी स्थापिली.

शाहू (१७०८–१७४९)—बाळाजी विश्वनाथ हा कर्तबगार गृहस्थ त्यास शाहूनें आपला मुख्य प्रधान नेमले. त्यानें मोगलांच्या दक्षिण भारतांतील मुलखांतून चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्यासंबंधीं मोगल बादशहाकडून सनद मिळविली. त्यानें सैन्याची नीट उभारणी केली व राज्याची घडी नीट बसविली. बाळाजी विश्वनाथ १७२० मध्यें मरण पावल्यावर त्याचा मुलगा बाजीराव यास शाहूनें पेशवेपद दिलें.

पहिला बाजीराव (१७२०–१७४०)—बाजीराव हा शूर, कर्तबगार व धडाडीनें काम करणारा होता. मोगल साम्राज्य कमकुवत झालें होतें, तेव्हां उत्तर भारतामध्यें आपलें वर्चस्व स्थापन करून दिल्ली जवळच्या प्रदेशावर घाव घालावा म्हणजे सर्व मोगल साम्राज्य मराठ्यांच्या वर्चस्वाखालीं येईल असें त्यास वाटत होतें. तेव्हां १७२३ पासून मोंगलांच्या उत्तर भारतांतील माळवा प्रदेशावर स्वाऱ्या करून त्यानें तेथें मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे या आपल्या सरदारांस नेमलें. तेव्हां दिल्लीच्या बादशहानें घाबरून जाऊन दक्षिणेकडे हैद्राबाद येथें असलेला सुभेदार असफजहा (निजाम उलमुल्ख) यास तांतडीनें उत्तरेकडे बोलाविलें. तेव्हां तो ससैन्य उत्तर भारतांत गेला. तेव्हां त्याची व पहिला बाजीराव याची भोपाळजवळ गांठ पडून निजाम उलमुल्ख याचा पराभव झाला (१७३७). तेव्हां माळवा प्रांतांत चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याची सनद दिल्लीच्या बादशहानें मराठ्यांस दिली. पश्चिम किनाऱ्यावर पोर्तुगीजांच्या ताब्यांत गोवें, वसई, दीव, दमण हीं ठिकाणें होतीं. त्यांपैकीं वसई हस्तगत करण्यासाठीं बाजीरावानें आपला भाऊ चिमाजी अप्पा यास पाठविलें व त्यानें चिकाटीनें युद्ध करून १७३९ मध्यें वसई जिंकून घेतली. याच सुमारास इराणचा नादीरशहा यानें दिल्लीवर स्वारी केली असल्याचें समजल्यावरून पहिला बाजीराव

हा त्याचा प्रतिकार करण्यासाठीं ससैन्य उत्तरेकडे जात असतां वाटेंत आजारी पडून नर्मदेच्या कांठीं १७४० मध्यें मरण पावला.

मराठी साम्राज्यांत नवीन मराठी राज्यांची स्थापना—शाहूच्या कारकीर्दीत रघूजी भोसले यानें वऱ्हाडमध्यें आपलें राज्य स्थापन केलें. गुजराथ प्रांताची व्यवस्था दाभाडे याच्याकडे होती, पण दाभाडे याचें महत्त्व कमी झाल्यावर त्याचा सरदार दमाजी गायकवाड यानें बडोदें येथें आपलें राज्य स्थापलें. माळवा प्रांतांत चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचा हक्क मोगल बादशहाकडून मिळविल्यावर त्या ठिकाणीं व्यवस्था पहाण्यास बाजीरावानें शिंदे व होळकर या आपल्या सरदारांस नेमलें. यांपैकीं मल्हारराव होळकर यानें इंदूर येथें व राणोजी शिंदे यानें ग्वाल्हेर येथें आपलीं राज्यें स्थापिलीं. त्याचप्रमाणें धार येथें पवार यानें राज्य स्थापलें.

बाळाजी बाजीराव (१७२०–१७६१) पहिल्या बाजीरावानंतर त्याचा थोरला मुलगा बाळाजी हा पेशवा झाला. बाजीराव पेशवा असतांना त्याचा प्रतिनिधी म्हणून त्यानें शाहूच्या दरबारीं काम केलें असल्यामुळें त्यास राज्यकारभाराचा अनुभव होता. बाळाजी पेशवा झाल्यावर शाहू १७४९ मध्यें मरण पावला, पण मरणापूर्वी त्यानें मृत्यूपत्र करून राज्याचा सर्व कारभार पेशव्यांकडे सोंपविला होता. शाहूच्या मृत्यूनंतर ताराबाई हिनें सुचविल्याप्रमाणें तिचा नातू रामराजा यास सातारच्या गादीवर बसविण्यांत आलें, पण तो अल्पवयी असल्यामुळें राज्याचा कारभार पुण्याहून सुरू केला. याच सुमारास निजाम उल्मुल्क मरण पावल्यामुळें हैद्राबाद येथें गादीसंबंधीं तंटा सुरू झाला व या संधीचा फायदा घेऊन मराठ्यांनीं निजामच्या ताब्यांतील औरंगाबाद, दौलताबाद व विजापूर हीं ठिकाणें घेतलीं व पुढें उदगीरच्या लढाईत निजामाचा पराभव केला (१७६०).

उत्तर भारतांतही मराठ्यांची सत्ता वाढत होती. नागपूरचे भोसले यांनीं ओरिसा प्रांतांवर आपलें वर्चस्व बसविलें व बंगाल प्रांतांतही आपली सत्ता वाढविली. पेशव्याचा भाऊ राघोबा यानें अहमदशहा अबदाली याच्या लोकांस पंजाबमधून हांकून लाविलें व तेथें आपलें वर्चस्व बसविलें (१७५८). पेशव्यांनीं कर्नाटक, म्हैसूर या प्रदेशांवर स्वारी करून आपली सत्ता वाढविली.

पंजाबवर आपली सत्ता पुनः स्थापन करण्यासाठीं अहमदशहा अबदालीनें पंजाबवर पुनः स्वारी केली (१७६०). तेव्हां त्यास तोंड देण्यासाठीं मराठ्यांनीं मोठें सैन्य पाठविलें. पानिपत येथें १७६१ मध्यें लढाई होऊन त्यांत मराठ्यांचा पराभव झाला व खूप प्राणहानी झाली. या पराभवामुळें मराठ्यांच्या सत्तेला मोठा धक्का बसला. अहमदशहा अबदालीस जय मिळाला, तरी त्याचीही खूप हानी झाली, त्यामुळें दिल्ली येथें आपली सत्ता स्थापन करण्याचा प्रयत्न न करतां तो परत गेला. बंगालमध्यें इंग्लिशांची सत्ता स्थापन झाली होती तिची वाढ होण्यास मदत झाली. बाळाजी बाजीराव हा १७६१ मध्यें मरण पावला.

पहिला माधवराव (१७६१–१७७२)—बाळाजी नंतर त्याचा धाकटा मुलगा माधवराव हा पेशवा झाला. त्यानें १७६४ मध्यें हैदरवर व त्यानंतर १७७१ मध्यें टिपूंवर स्वारी करून त्यांचा पराभव केला व त्यानें घेतलेला मुलुख त्याच्याकडून मिळवून त्यास खंडणी देणें भाग पाडले. उत्तर भारतांत महादजी शिंदे यानें युरोपियन लोकांच्या कवाइती सैन्याचें व तोफखान्याचें महत्त्व ओळखून डी बॉयने या फ्रेंच सरदाराच्या मदतीनें आपल्या सैन्यास कवाइती शिक्षण देऊन तें प्रबळ केलें. तेव्हां उत्तर भारतामध्यें राघोबानें मोहीम करून त्याचप्रमाणें महादजी शिंदे व होळकर यांनीं मराठ्यांची सत्ता पुनः स्थापन केली (१७६४–१७७१). तसेंच मोंगल दरबारांत सुरू असलेल्या अंतस्थ कलहांत हात घालून महादजी शिंदे यानें शहाअलम बादशहास आपल्या संरक्षणाखालीं आणलें (१७७२). मराठ्यांचें उत्तर भारतांत पुनः वर्चस्व स्थापन होत असतां १७७२ मध्यें १ ला माधवराव मरण पावला.

सवई माधवराव (१७७४–९५)—माधवरावास पुत्र नसल्यामुळें त्याचा भाऊ नारायणराव हा पेशवा झाला. पण तो १८ वर्षांचा असल्यामुळें राघोबा राज्यकारभार करूं लागला. पुढें दंगल होऊन नारायणरावाचा खून झाला व तो राघोबाच्या चिथावणीनें झाला असें नाना फडणवीस, सखाराम बापू या प्रमुख मुत्सद्यांस वाटूं लागल्यामुळें पुण्यास राहणें धोक्याचें आहे हें पाहून राघोबानें पळ काढला व सुरत येथें इंग्रजांशीं तह केला. त्यांनीं त्यास मदत करून पेशव्याच्या गादीवर बसविण्याचें कबूल केलें. तेव्हां मराठ्यांचें इंग्रजांशीं पहिलें युद्ध झालें (१७७५-८२). यांत तह होऊन इंग्रजांनीं नारायणरावाचा अल्पवयी पुत्र सवाई माधवराव यास मान्यता देण्याचें व राघोबाचा पक्ष सोडण्याचें कबूल केलें. इंग्रजांना साष्टी बेट

देण्यांत आलें. सवाई माधवरावाच्या कारकीर्दीत तो अल्पवयी असल्यामुळें नाना फडणविसानें राज्यकारभार केला. उत्तर भारतांत महादजी शिंदे यानें आपलें महत्त्व वाढविलें. पुढें १७९४ मध्यें महादजी शिंदे मरण पावला; व त्यानंतर सवई माधवरावही मृत्यु पावला (१७९५). नाना फडणवीस १८०० मध्यें मरण पावला. तेव्हां राघोबाचा पुत्र २ रा बाजीराव हा पेशवा झाला. त्याच्या कारकीर्दीत मराठे सरदारांत कलह सुरू झाले व आपल्या विरुद्ध इतर मराठे सरदार आहेत हें पाहून बाजीरावानें वसई येथें इंग्लिशांशीं तैनाती फौजेच्या पद्धतीचा तह केला. पण तो इतर मराठे सरदारांस पसंत नसल्यानें इंग्रजांचें मराठ्यांशीं दुसरें युद्ध झालें (१८०३–०५). पण तें थांबविण्यांत आलें. यानंतर २ रा बाजीराव यानें इतर मराठे सरदारांशीं इंग्रजांविरुद्ध कारस्थान सुरू केल्यामुळें मराठ्याचें इंग्रजांशीं तिसरें युद्ध झालें (१८१७–१८). यांत पेशव्यांचा पराभव होऊन त्यांच्या ताब्यांतील प्रदेश इंग्रजांनीं खालसा केला; सातारचा राजा प्रतापसिंह व शिंदे, होळकर, भोसले वगैरे मराठे सरदार यांच्याशीं तैनाती फौजेच्या पद्धतीचे तह केल्यामुळें ते इंग्लिशांचे मांडलिक झाले. कोल्हापूरकरांशीं यापूर्वी इंग्लिशांनीं तैनाती फौजेच्या पद्धतीचा तह केला होता. अशा प्रकारें मराठी सत्तेचा ऱ्हास होऊन भारतामध्यें ब्रिटिशांची सत्ता प्रमुख झाली (१८१८).

भारतांत इंग्लिशांची राज्यस्थापना व राज्यविस्तार (१७५८ ते १८१८)—भारताशीं व्यापार करण्यासाठीं स्थापन झालेल्या इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीनें भारतांतील राजेरजवाड्यांच्या अंतस्थ कलहांत हात घालून कर्नाटक व बंगाल या प्रांतात आपलें महत्त्व स्थापन केलें, व बंगालमध्यें आपलें राज्य स्थापन केलें (१७५७). त्यांस प्रतिस्पर्धी असलेल्या फ्रेंचांचा वाँदिवाशच्या लढाईंत (१७६०) पराभव करून त्यांचें राजकीय महत्त्व कमी केलें. यानंतर पानपत येथें मराठे व अफगाण यामध्यें युद्ध होऊन मराठ्यांचा पराभव झाल्यामुळें इंग्लिशांना आपलें राज्य वाढविण्यास अनकूल संधि मिळाली. भारतामध्यें इंग्लिशांचें राज्य स्थापन झाल्यामुळें त्याचा राज्यकारभार व्यवस्थित रीतीनें व्हावा म्हणून ब्रिटिश पार्लमेंटनें १७७३ मध्यें रेग्यूलेटिंग ॲक्ट व १७८४ मध्यें पिटचा कायदा हे कायदे पास केले. यानंतर मार्किस ऑफ वेलस्ली (१७९८–१८०५) याच्या कारकीर्दीत त्याच्या तैनाती फौजेच्या पद्धतीनें भारतांतील बरेच

राजेरजवाडे इंग्लिशांचे मांडलिक झाले. इंग्लिशांचीं मराठ्यांशीं तीन युद्धें होऊन त्यांत १८१७–१८१८ मध्यें झालेल्या युद्धांत मराठ्यांचा पराभव झाल्यामुळें इंग्लिशांची भारतामधील सत्ता प्रबळ झाली.

मंगोल व तुर्क

(१२०० ते १८१८)

मंगोल लोक—मंगोल लोक हे भटक्या वृत्तीचे असून त्यांचें मूळ ठिकाण चीनच्या वायव्येकडील मंगोलिया हें आहे. वंशानें हे हूण, तुराणी किंवा तुर्क लोकांशीं संबधित होते. त्यांची संख्या खूप असून घोड्यावर बसण्यांत व त्यावरून लांब लांब मजला मारण्यांत व युद्ध करण्यांत ते पटाईत होते. इ. स. १२०६ च्या सुमारास जेंगिसखान (Genghis Khan) हा त्यांचा पुढारी झाला. त्याच्या नेतृत्वाखालीं त्यांनीं चीनचा उत्तर भाग, आशियांतील तुर्कस्थानचा पूर्व भाग आपल्या वर्चस्वाखालीं आणला, व समरकंद शहर आपल्या ताब्यांत घेतलें; व काळ्या समुद्रापर्यंतच्या प्रदेशावर आपलें वर्चस्व बसविलें. यावेळीं त्यांची राजधानी मंगोलियांतील काराकोरम ही होती. जेंगिसखान हा फार क्रूर होता, व युद्धामध्यें विरोध करणाऱ्या लोकांची तो कत्तल करी. इ. स. १२२७ मध्यें तो मरण पावल्यावर त्याचा मुलगा ओगडाईखान (Ogdai Khan) हा त्यांचा मुख्य खान (नेता, पुढारी) झाला. त्याच्या अमदानींत त्यांनीं रशियावर आपलें वर्चस्व बसविलें, पोलंडवर स्वाऱ्या केल्या व जर्मनीपर्यंत आपली सत्ता वाढविली. इ. स. १२४२ च्या सुमारास ओगडाइखान मरण पावला व त्यानंतर मंगोल लोकांचा पुढारी कोणी व्हावयाचे या बाबतींत तंटे सुरू होऊन त्याचा मुलगा मंगूखान (Mangu Khan) हा पुढारी झाला (१२५१) व त्यानें आपला भाऊ कुबलाईखान (Kublai Khan) यास चीनमधील प्रदेशाचा सुभेदार नेमलें, व आपला दुसरा भाऊ हुलागू (Hulagu) याच्याकडे इराण, मेसापोटेमिया व सीरिया हे प्रदेश जिंकण्याची कामगिरी सोपविली. त्यानें बगदादच्या खलिफास ठार मारून त्याच्या वर्चस्वाखालील मेसापोटेमिया, इराण, सीरिया व आशिया मायनर या प्रदेशांवर आपलें वर्चस्व बसविलें. यानंतर इजिप्त देश जिंकण्यासाठीं त्यानें आपल्या सरदारांस पाठविलें, पण इजिप्तच्या सुलतानानें १२६० मध्यें

पॅलेस्टाईन प्रांतांत त्याचा पराभव केला, व त्यामुळें मंगोल लोकांचा त्या बाजूस विस्तार झाला नाहीं. १२५९ मध्यें मंगू मरण पावला व त्यानंतर चीनचा सुभेदार असलेला कबुलाई खान यास मंगोल लोकांचा मुख्य खान (पुढारी) नेमण्यांत आलें (१२६०). कबुलाईखानाचें चीनच्या राजकारणाकडे विशेष लक्ष होतें, व त्यांनीं काराकोरम ऐवजीं चीनमधील पेकिंग ही आपली राजधानी केली. तो १२९४ मध्यें मरण पावला. त्याच्या हयातींतच पूर्वेकडे पॅसिफिक महासागरापासून पश्चिमेस जर्मनी व भूमध्य समुद्रापर्यंत, उत्तरेस रशियाच्या मध्यभागापासून दक्षिणेस हिमालय पर्वत व इराणी आखातापर्यंत पसरलेल्या मंगोल लोकांच्या विस्तृत साम्राज्याचीं छकलें होण्यास सुरुवात झाली व त्याच्या मृत्यूनंतर त्याचे पांच स्वतंत्र विभाग पडले. चीन, मंगोलिया, तिबेट, उत्तर ब्रह्मदेश हा भाग कुबलाईखानाच्या चीनमधील युऑन घराण्याच्या वर्चस्वाखालीं राहिला, व तेथील मंगोल लोकांनीं बौद्ध धर्माचा स्वीकार केला. २ रा सैबेरिया, ३ रा रशियांतील प्रदेश या विभागांतील लोक ख्रिश्चन धर्मी बनले. ४ था मध्य आशियांतील तुर्कस्थान (तार्तरी) व ५ वा विभाग म्हणजे इराण, अफगाणिस्थान, मेसोपोटेमिया, सीरिया, आमनिया हे होत; या विभागांतील मंगोल लोक इस्लाम धर्मीय झाले.

तैमूरलंग (१३३६–१४०५) यानंतर जेंगिसखानाच्या मुलीकडून वंशज असलेला तैमूरलंग हा पुढें आला. हा तुर्क किंवा तार्तर असून इस्लाम धर्मीय होता. त्यानें आशियांतील तुर्कस्थानमध्यें (तार्तरी) आपलें राज्य स्थापलें व समरकंद ही आपली राजधानी केली. त्यानें आपल्या राज्याचा खूप विस्तार करून इराण, अफगाणिस्थान, मेसापोटेमिया, सीरिया, आर्मेनिया, आशियामायनर, पंजाब व दिल्ली एवढ्या विस्तृत प्रदेशावर आपलें वर्चस्व स्थापन केलें. त्यानें जिंकून घेतलेल्या प्रदेशांतील लोकांची (इस्पाहान, दिल्ली वगैरे) कत्तल केली व आपला दरारा सर्वत्र बसविला. रशियामधील मंगोल राज्यास त्याचप्रमाणें इजिप्तच्या सुलतानास त्यानें आपले मांडलिक केले. मंगोल लोकांच्या ताब्यांत असलेला सर्व प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणावा अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती. हा १४०५ मध्यें मृत्यु पावल्यावर त्याच्या विस्तृत साम्राज्यांतील धर्मानें मुसलमान, पण वंशानें निरनिराळ्या असणाऱ्या तुर्क, इराणी, खुर्द, अफगाण, अरब सरदारांचीं ठिकठिकाणीं वेगवेगळीं स्वतंत्र राज्यें स्थापन झालीं व त्यांचे आपसांत युद्धप्रसंग होऊं लागले. याचपैकीं त्याचा वंशज असलेला बाबर

यास तार्तरीमधील (आशियांतील तुर्कस्थान) समरकंद येथील राज्य मिळवीण्याच्या प्रयत्नांत यश न आल्यामुळें त्यानें अफगाणिस्थानांत काबूल येथें राज्य स्थापलें. नंतर दिल्लीच्या सुलतानाच्या राज्यांतील अंतस्थ कलहाचा फायदा घेऊन इ. स. १५२६ मध्यें शिकंदर लोदीचा पानिपत येथें पराभव करून त्यानें दिल्ली येथें मोगल सत्ता स्थापन केली.

उस्मानी तुर्क व त्यांचें साम्राज्य (१२८८–१८१८)—तुर्कांचें मूळ ठिकाण मध्य आशियांतील तार्तरी किंवा तुर्कस्थान हें होतें. जेंगिसखानाच्या नेतृत्वाखालीं मध्य आशियांतील तार्तरी प्रदेशावर मंगोल लोकांचें वर्चस्व स्थापन झाल्यावर कांहीं तुर्क जमातींनीं तो प्रदेश सोडला व त्या वेगवेगळ्या प्रदेशांत गेल्या. यांपैकीं उस्मान या सरदाराच्या नेतृत्वाखालीं एक जमात आशिया मायनरमध्यें येऊन त्यांनीं तेथें आपलें राज्य स्थापलें (१२८८–१३२६). उस्मान या पुढाऱ्यावरून त्यांस उस्मानी (Ottoman) तुर्क असें म्हणण्यांत येऊं लागलें. मध्य आशियांत मंगोल लोकांचें व त्यानंतर तैमूरलंगचें वर्चस्व असतांना हे तुर्क लोक त्यांचे मांडलिक असल्यासारखें होतें. पण तैमूरलंगाच्या मृत्यूनंतर ते स्वतंत्र झाले, व त्यांनीं आपल्या राज्याचा विस्तार करण्यास प्रारंभ केला. कॉन्स्टांटिनोपल राजधानी असलेलें पूर्व रोमन साम्राज्य कमकुवत झालेलें होतें, तेव्हां त्यांनीं १४०५–१४५३ च्या दरम्यान या साम्राज्यांतील आशियामायनरमधील प्रदेश व त्यानंतर उत्तरेकडील मॅसेडोनिया, सर्बिया, बल्गेरिया वगैरे प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणले. या काळांत कॉन्स्टांटिनोपल राजधानी जिंकून घेण्याचा त्यांनीं बऱ्याच वेळा प्रयत्न केला पण त्यांस यश आलें नाहीं. पण यानंतर २ रा महमद हा त्यांचा सुलतान असतांना उस्मानी तुर्कांनीं दीड लाख सैन्य व मोठी युद्धसामुग्री जमा करून १४५३ मध्यें कॉन्स्टांटिनोपलवर हल्ला केला. यावेळीं पूर्व रोमन साम्राज्याचें सैन्य ८००० च होतें, तरी तुर्कांपासून कॉन्स्टांटिनोपलचा बचाव करण्याचा पूर्व रोमन सम्राटानें शिकस्तीचा प्रयत्न केला, पण त्यास यश न येऊन तो मारला गेला. तेव्हां तुर्कांनीं कॉन्स्टांटिनोपल शहर जिंकून घेतलें व पूर्व रोमन साम्राज्य नष्ट केलें. इ. स. ४७६ मध्यें पश्चिम रोमन साम्राज्य नष्ट झाल्यावर सुमारें एक हजार वर्षें उत्तरेकडील वन्य जमाती व पूर्वेकडील इराणी साम्राज्य व त्यानंतर इस्लामधर्मीय अरब, तुर्क यांच्या स्वाऱ्यांस तोंड देत असतां पूर्व रोमन साम्राज्याची

राजधानी कॉन्स्टांटिनोपल येथें प्राचीन ग्रीक-रोमन संस्कृति केंद्रीभूत झालेली होती. पण कॉन्स्टांटिनोपलचा पाडाव झाल्यावर ती नाहींशी होऊन तेथील विद्वान पांडितांस आपले ग्रंथ व ज्ञानभांडार घेऊन बहुसंख्येनें कॉन्स्टांटिनोपल सोडून युरोपमधील इटलीमध्यें जावें लागलें.

उस्मानी तुर्कांचें साम्राज्य (१४५३-१८१८)— कॉन्स्टांटिनोपल राजधानी जिंकून घेऊन पूर्व रोमन साम्राज्य नाहींसें केल्यावर तुर्कांनीं कॉन्स्टांटिनोपल हेंच आपलें राजधानीचें ठिकाण केलें. यानंतर पुढील १५० वर्षांच्या काळांत त्यांनीं आपल्या राज्याची खूप वाढ करून तें एक साम्राज्य केलें. तुर्कांनीं आशियामायनरमधील आर्मेनिया हा प्रांत आपल्या वर्चस्वाखालीं आणिला. इराणच्या राजकर्त्यांकडून मेसापोटेमिया हा प्रांत जिंकून घेतला. तुर्कांमध्यें सुलेमान हा एक प्रतापशाली सम्राट होऊन गेला (Suleman, the Magnificent १५२०-१५६६). याच्या कारकीर्दीत तुर्कांनीं काकेशस पर्वताजवळचा प्रदेश, व काळ्या समुद्राच्या उत्तरेकडील प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणला. त्यानें सीरिया, इजिप्त व अरबस्थान यांवर आपलें वर्चस्व बसविलें. युरोपमधील डॅन्यूब नदीच्या उत्तरेकडील हंगेरी, वायलेशिया, मोलेव्हिया हे प्रदेश जिंकून आस्ट्रियाच्या सरहद्दीपर्यंत आपल्या साम्राज्याचा विस्तार केला. तसेंच ग्रीस देशावरही वर्चस्व बसविलें. यानंतर आफ्रिकेच्या उत्तर भागांतील त्रिपोली, ट्यूनीस, अलजेरिया हे प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणिले. इस्लाम धर्मीय राष्ट्रांच्या मोठ्या विस्तृत प्रदेशावर तुर्कांचें साम्राज्य स्थापन झालें असल्यामुळें तुर्कस्थानच्या सुलतानानें स्वतःस अरब साम्राज्यांतील पूर्वीची राजकीय व धार्मिक बाबतींत प्रमुख म्हणून **खलिफा** ही पदवी धारण केली. यानंतर तुर्क लोकांनीं १५७० मध्यें भूमध्य समुद्रांतील सायप्रस बेट जिंकून घेतलें, व भूमध्य समुद्रांत आपली आरमारी सत्ता स्थापन करण्याचा प्रयत्न केला. पण १५७१ मध्यें व्हेनिस, जेनोआ व स्पेन यांच्या संयुक्त आरमारानें लिपँटोजवळ तुर्कांच्या आरमाराचा पराभव केल्यामुळें भूमध्य समुद्रांतील तुर्कस्थानचें महत्त्व कमी झालें. तरी १८ व्या शतकाच्या अखेरीस आग्नेय युरोप, पश्चिम आशिया व उत्तर आफ्रिका या भागामध्यें तुर्कांचें एक मोठें साम्राज्य अस्तित्वांत आलेलें होतें. या विस्तृत साम्राज्यांत इस्लाम, ख्रिश्चन व ज्यू या धर्मांचे लोक होते. तुर्कस्थानच्या सुलतानाची सत्ता अनियंत्रित होती.

राजकर्ते इस्लामधर्मीय होते. त्यांनीं कॉन्स्टांटिनोपलमधील सेंट सोफिया या प्रसिद्ध चर्चची मशीद केली. इस्लामधर्मीय नसलेल्या प्रजेकडून अधिक कर घेतला जाई, व राज्यकारभारांतील महत्त्वाच्या जागांवर इस्लामधर्मीयांनाच नेमण्यांत येई. इस्लाम धर्मीय नसलेल्या लोकांस शस्त्रें बाळगण्यास बंदी करण्यांत आली होती. त्यामुळें कांहीं लोक ख्रिश्चन धर्म सोडून इस्लामधर्मीय बनत. इस्लामधर्मी नसलेल्या ख्रिश्चन लोकांतील लायक व हुशार तरुणांची आपल्या सैन्यांत व राज्यकारभाराचे कामांत भरती व्हावी म्हणून १५ व्या शतकापासून एक प्रघात सुरू करण्यांत आला होता. हा प्रघात म्हणजे ठिकठिकाणच्या गांवांतील ख्रिश्चन प्रजेनें ८ वर्षांच्या वयाचीं हुषार व तरतरीत मुलें सरकारकडे द्यावयाचीं, व तुर्कस्थानच्या सरकारनें त्यांस इस्लामधर्माची दीक्षा देऊन चांगल्या प्रकारचें शारीरिक व बौद्धिक शिक्षण कांहीं वर्षें दिल्यानंतर त्यांतून सैन्यांत भरती करावयाची हा होता. याप्रमाणें नेमणूक झालेल्या सैनिकांस जेनेसरीज असें म्हणत.

तुर्कस्थानच्या सुलतानाच्या हातांतील अनियंत्रित सत्ता, व इस्लामधर्मी नसलेल्या प्रजेसंबंधाच्या त्याच्या धोरणामुळें ख्रिश्चनधर्मीय प्रजेमध्यें सुलतानाबद्दल असंतोष वाढत होता, व युरोपमधील ख्रिश्चन धर्मीय राष्ट्रांनीं तुर्कांना युरोपमधून घालवून लावावें असें त्यांस वाटत होतें. १८ व्या शतकामध्यें आस्ट्रियानें हंगेरी हा प्रदेश परत मिळविला व रशियाची राणी कॅथेराईन हिनें काळ्या समुद्राच्या उत्तरेकडील प्रदेश तुर्कस्थानपासून आपल्या वर्चस्वाखालीं आणला, तरी रुमानिया बल्गेरिया, सर्बिया, ग्रीस हे ख्रिश्चनधर्मीय देश तुर्कस्थानच्या साम्राज्यांतच होते.

मध्ययुगांतील चीन

(१२८० ते १९००)

युऑन घराणें—(इ. स. १२८० ते १३६८) कुबलाईखानानें चीनवर आपलें वर्चस्व बसविल्यावर त्याच्या युऑन (Yuan) घराण्याची सत्ता चीनवर स्थापन झाली, व तो चीनचा सम्राट् झाला (१२५९–१२९४). मंगोल लोकांच्या जमाती चीनमध्यें मोठ्या संख्येनें आल्या व त्यांनीं चीनमधील

बौद्धधर्माचा स्वीकार करून त्या चिनी संस्कृतींत मिसळून गेल्या. कुबलाई-खानानें मंगोलियांत काराकोरम येथें असलेली आपली राजधानी पेकिन येथें आणली. त्यानें आपल्या कारकीर्दीत चीनच्या पश्चिम, उत्तर व दक्षिण सरहद्दीवरील तिबेट, तार्तरी, मंगोलिया, ब्रह्मदेश, टोकिन, अनाम वगैरे प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणून चीनचें साम्राज्य खूप विस्तृत केलें. या सर्व प्रदेशांवर एकछत्री अंमल सुरू झाल्यामुळें साम्राज्यांतील निरनिराळ्या प्रदेशांत दळणवळण सुरू झालें, त्याचप्रमाणें पश्चिमेकडील आशियांतील इतर देश व युरोप यांमधील संबंध पूर्ववत सुरू होऊन युरोपमधील साहसी प्रवासी चीनमध्यें येऊं लागले. त्यांच्यापासून चीनची प्राचीन संस्कृति, कलाकौशल्याच्या गोष्टींमध्यें चीननें केलेली प्रगति, चीनचें वैभव व संपत्ति यांसंबंधाची माहिती युरोपमधील लोकांस मिळूं लागली व चीनसंबंधीं जिज्ञासा वाढत गेली. अशा लोकांपैकीं व्हेनिसचा **मार्को पोलो** हा होता. त्यानें कुबलाई-खानाची मर्जी संपादन केल्यामुळें कुबलाईखानानें त्यास महत्त्वाच्या अधिकाराच्या जागांवर नेमले. त्याचें चीनमध्यें सुमारें १२ वर्षें वास्तव्य होतें. तो इराण, तार्तरी या खुष्कीच्या मार्गानें चीनला गेला व जाव्हा, सुमात्रा, भारत व इराणचें आखात या समुद्रमार्गानें युरोपला परत गेला. त्यानें लिहिलेल्या प्रवासवृत्तामुळें प्रेरणा होऊन आणखी पुष्कळ धाडसी लोक चीनला जाऊं लागले. चीनला त्यावेळीं कॅथे (Cathe) असें युरोपमधील लोक म्हणत. कुबलाईखानाच्या नंतर युआन घराण्यांतील राजकर्ते कर्तृत्ववान नव्हते. गादीसंबंधीं या घराण्यांतील वारसांमध्यें कलह उत्पन्न झाले व साम्राज्यांतील निरनिराळ्या विभागांत बंडाळी सुरू झाली. युआन हें घराणें परकीय असल्यामुळें या घराण्याबद्दल चीनमधील लोकांस आपलेपणा वाटला नाहीं, व शेवटीं १३६८ मध्यें मिंग घराण्यांतील एका सरदारानें युआन घराण्याची सत्ता नाहींशी करून चीनवर आपलें वर्चस्व बसविलें.

मिंग घराणें (१३६८–१६४४)—या घराण्याची सत्ता जवळ जवळ तीन शतकें टिकली. कुबलाईखानाच्या मृत्यूनंतर चीनच्या वायव्येकडील मध्य-आशियांतील प्रदेशांत खळबळ सुरू झाल्यामुळें युरोप व इतर देशांचें त्यामार्गें चीनशीं असलेलें दळणवळण बंद पडलें, पण पूर्व व दक्षिणेकडील प्रदेशांशीं खुष्कीच्या व समुद्रमार्गें दळणवळण वाढलें. चिनी लोक कोरिया, फिलीपाईन्स

बेटें (या बेटांस त्यावेळीं हें नांव नव्हतें, स्पेनचें पुढें त्यांवर वर्चस्व बसल्यावर हें नांव त्यांस देण्यांत आलें.), अनाम, इंडोचायना, मलाया वगैरे ठिकाणीं जाऊं लागून तेथें वास्तव्य करूं लागले. चीनमधील मातीचीं भांडीं, बांझ, धातूचीं भांडीं, लाखकाम, रेशमी कापड वगैरे उद्योगधंद्यांस उत्तेजन मिळून त्यांचा व्यापार वाढला. वरील प्रदेशांतून चीनला व्यापारवृद्धीसाठीं व सांस्कृतिक बाबींसंबंधीं शिष्टमंडळें येऊं लागलीं व पूर्वेकडील प्रदेशांत चीनचें महत्त्व व दरारा वाढत गेला. वास्को डी गामा यानें १४९८ मध्यें आफ्रिकेला वळसा घालून युरोपपासून भारताकडे जाणारा थेटचा समुद्रमार्ग शोधून काढल्यावर पोर्तुगीज लोक जाव्हा, सुमात्रा या समुद्रमार्गानें चीनच्या पूर्वकिनाऱ्यावरील कँटन या बंदरास व्यापारासाठीं इ. स. १५१७ मध्यें आले. इ. स. १५५७ मध्यें कँटनजवळचें बेट मकाओ (Macao) हें त्यांस भाडेपट्टीनें मिळून तेथें त्यांनीं आपलें व्यापारी ठाणें स्थापन केलें (१५५७). स्पेनचा मजेलन (Magellan) यास फिलीपाईन बेटांचा शोध लागल्यावर (१५२०) त्या बेटांकडे स्पॅनिश लोक येऊन त्यांवर त्यांनीं आपलें वर्चस्व बसविलें व त्यांस आपला राजा फिलीप यावरून ' फिलीपाईन बेटें ' हें नांव दिलें. पोर्तुगीज लोकांनीं चीनच्या किनाऱ्यावर व्यापारी ठाणें स्थापन केल्यावर जेझुईट ख्रिश्चन मिशनरी धर्मप्रसार करण्यासाठीं चीनलीं येऊं लागले. हे जेझुइट मिशनरी विद्वान व व्यासंगी होते व त्यामुळें त्यांच्याबद्दल अनुकूल मत होऊन मिंग घराण्यांतील राज्यकर्त्यांनीं चीनमध्यें ख्रिस्तीधर्माचा प्रसार करण्यास त्यांस परवानगी दिली.

मांचू घराणें (१६४४ ते १९१२)—१७ व्या शतकाच्या सुरवातीपासून मिंग घराण्यास उतरती कळा लागली, व ठिकठिकाणीं बंडाळीं सुरू झाली. तेव्हां तिचा मोड करण्यासाठीं उत्तरेकडील मांचुरिया या भागांत वास्तव्य करणाऱ्या मंगोल व तार्तार जमातींच्या पुढाऱ्याची मदत घेण्यांत आली. त्यामुळें चीनमधील बंडाळीं मोडलीं, पण या पुढाऱ्यानें चीनमधील सत्ता बळकावून आपल्या मांचू घराण्याची सत्ता चीनमध्यें स्थापन केली. या घराण्यानें चीनवर सुमारें २५० वर्षें राज्य केलें. या घराण्यांतील राजकर्ते कर्तृत्ववान होते. त्यांनीं चीनमध्यें पूर्वापार चालत आलेले कायदेकानू, बौद्धिक चढाओढींची परीक्षा घेऊन राज्यकारभार करणारे अधिकारी नेमण्याची पद्धत चालू ठेवली. चीनमधील उद्योगधंदे, कलाकौशल्य, व शिक्षण यांस

उत्तेजन दिलें. यांच्या कारकीर्दीत उत्तरेकडील विस्तृत असा मंगोलिया हा प्रदेश, पश्चिमेकडील तार्तरी, मध्यआशियांतील प्रदेश, तिबेट वगैरे प्रदेश चीनच्या पूर्णपणें वर्चस्वाखालीं आले. दक्षिणेकडील ब्रह्मदेश, अनाम वगैरे प्रदेशांतील राजकर्त्यांनीं चीनचें मांडलिकत्व पतकरलें.

चीनचा इतर देशांशीं सुरू असलेला व्यापार वाढावा या उद्देशानें त्यांनीं पोर्तुगीज लोकांप्रमाणें इंग्लिश, डच वगैरे व्यापाऱ्यांसही चीनच्या किनाऱ्यावर व्यापारीं ठाणीं स्थापन करण्यास परवानगी दिली. त्यामुळें या व्यापाऱ्यांमार्फत चीनचा युरोपमधील त्याचप्रमाणें इतर देशांतील पदार्थांच्या बाबतींतील व्यापार वाढला. चीनमधील चहा, चिनी मातीचीं सुबक भांडीं, रेशमी तलम कापड, सुंठ, हा माल या व्यापाऱ्यांमार्फत मोठ्या प्रमाणांत युरोपला रवाना होऊं लागला, व त्या मोबदला लोकर, लोकरीचे जिन्नस, कांच सामान, सोनें, रुपें वगैरे जिन्नस चीनमध्यें येऊं लागले. व्यापाराप्रमाणें चीनमध्यें ख्रिस्तीधर्माचा प्रसार करण्यास मिंग घराण्याच्या कारकीर्दीत ख्रिस्ती धर्मोपदेशकांस परवानगी देण्यांत आलेली होती, व त्यांच्या मार्फत ख्रिस्तीधर्माचा चीनमध्यें प्रसार होत होता. पण धर्मोपदेशकांकडून चिनी जनतेच्या सामाजिक चालीरीतींमध्यें ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न होऊं लागल्यामुळें १७४४ मध्यें सरकारी परवानगीवांचून धर्मप्रसार करण्यास त्यांस बंदी करण्यांत आली. १८ व्या शतकाच्या शेवटीं यंत्रयुग सुरू होऊन इंग्लंडमध्यें औद्योगिक क्रान्ति झाल्यावर यंत्राच्या साहायानें मुबलक प्रमाणांत तयार झालेल्या मालाचा चीनमध्यें मोठ्या प्रमाणांत व्यापार करावा असें इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीस वाटून १९ व्या शतकाच्या सुरवातीपासून त्यांचे त्या दृष्टीनें प्रयत्न होऊं लागले. या व्यापाराप्रमाणें भारतांत पिकविण्यांत येणाऱ्या 'अफू' या मादक पदार्थाचाही चीनमध्यें प्रसार करण्याचें त्यांनीं ठरविलें. भारतांतील अफूच्या व चीनमधील चहाच्या व्यापारापासून इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीस बराच फायदा होत होता. अफूच्या व्यसनाचा चीनमध्यें प्रसार होऊं नये असें चीनमधील राजकर्त्यांस वाटत होतें. तेव्हां जकातीवरच्या चिनी अधिकाऱ्यांनीं कँटन बंदरांतून होणाऱ्या या व्यापारावर बरेच निर्बंध घातले. इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांची वागणूक अरेरावाची होती. तेव्हां चीन व इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनी यांच्यामध्यें व्यापारासंबंधीं वितुष्ट उत्पन्न होऊन ग्रेट बिटननें चीनशीं युद्ध पुकारलें (१८३९). या युद्धांत (१८३९–४२)

ग्रेट ब्रिटनच्या तोफा, बंदुका वगैरे आधुनिक शस्त्रास्त्रांपुढें चीनचें न चालून चीनचा पराभव झाला. तेव्हां नानकिंग येथें तह होऊन ग्रेट ब्रिटननें चीनकडून नुकसानभरपाई म्हणून मोठी रक्कम घेतली, कँटन बंदराजवळचें हाँगकाँग हें बेट मिळविलें. चीनच्या किनाऱ्यावरील कँटन खेरीज आणखी चार बंदरांतुन व्यापार करणें व तेथें जाऊन राहणें यांस परवानगी मिळविली; त्याचप्रमाणें जकातीबद्दल सवलती मिळविल्या. चीनशीं फ्रान्स व अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें या राष्ट्रांचाही व्यापार सुरू झालेला होता, तेव्हां या राष्ट्रांनींही चीनशीं करार करून व्यापारविषयक सवलती मिळविल्या. अ. स. सं. या राष्ट्रानें चीनमध्यें असलेल्या अमेरिकन नागरिकांवर खटला झाल्यास तो चीनमधील न्यायाधिशासमोर न चालतां अमेरिकन न्यायाधिशापुढें चालवा ही चीनच्या स्वातंत्र्यास कमीपणा आणणारी सवलतही मिळविली. नानकिंगच्या तहामुळें चीनमधील आणखी चार बंदरें युरोपियन व अमेरिकन व्यापाऱ्यांस खुलीं झाल्यावर परकीयांचा चीनशीं व्यापार वाढला; व परकीय व्यापाऱ्यांची चीनशीं अरेरावीची वागणूक सुरू होऊन जकातीसंबंधाचे तंटे वाढूं लागले. तेव्हां इंग्लंडनें १८५६ मध्यें चीनशीं दुसरें युद्ध पुकारलें, व त्यांत फ्रान्स अ. सं. सं. व रशिया यांनीं इंग्लंडला मदत केली. या युद्धांत (१८५६-६०) चीनचा पराभव होऊन नंतर झालेल्या तहानें चीनमधील आणखी दहा बंदरें वरील राष्ट्रांच्या व्यापाऱ्यांस खुली करण्यांत आलीं, चीनच्या आंतील भागांत जाण्याची त्यांस परवानगी मिळाली, रशियाला व्हॅडिओस्टॉक हें बंदर मिळालें, व पेकिनमध्यें या परकीय राष्ट्रांस आपल्या वकीलायती स्थापन करण्यास परवानगी मिळाली. पाश्चात्य राष्ट्रांना चीनमध्यें सवलती मिळून त्यांचा चीनमध्यें हात शिरत असलेला पाहून पाश्चात्य ज्ञान व शस्त्रास्त्रें आत्मसात केल्यावर जपाननें चीनशीं युद्ध जाहीर केलें, व चीनचा पराभव करून फोर्मोसा बेट मिळविलें (१८९५) व कोरियावर आपलें नियंत्रण बसविलें. जर्मनीनेंही चीनशीं व्यापार सुरू करून तेथें आपलें ठाणें स्थापन केलें. चीन हें अवाढव्य व मोठें राष्ट्र असलें तरी तें लष्करी बाबतींत कमकुवत आहे हें पाहून चीनशीं व्यापार करण्यासाठीं सवलती मिळविणें, चीनच्या किनाऱ्यावर आपलीं ठाणीं स्थापन करणें, व शक्य झाल्यास चीनची विभागणी करून त्यावर आपलें राजकीय वर्चस्व बसविणें वगैरे बाबतींत ग्रेट ब्रिटन,

फ्रान्स, जर्मनी, रशिया, जपान वगैरे राष्ट्रांचे प्रयत्न सुरू झाले. तेव्हां इतर राष्ट्रांचें चीनवर राजकीय वर्चस्व स्थापन होऊन चीनची विभागणी होईल, व तसें होणें इष्ट नाहीं हें पाहून चीनशीं व्यापार करण्यास सर्वांस सारखी संधि मिळावी म्हणून चीनमधील बंदरें सर्वांस खुलीं असावींत, चीनमध्यें रेल्वे रस्ते बांधणें, खाणीं खोदणें, कारखाने उभारणें वगैरे बाबतींत भांडवल गुंतविण्यास सर्वांस संधि मिळावी असें अ. सं. संस्थानें या राष्ट्रानें सुचविलें.

परकीयांचा चीनमध्यें हात शिरत असलेला चिनी लोकांस आवडला नाहीं; व परकीय लोकांस चीनमधून घालवून देण्यासाठीं चीनमध्यें एक गुप्त मंडळ स्थापन झालें. या मंडळाच्या प्रेरणेनें १९०० मध्यें पेकिन व इतर ठिकाणचें परकीय व्यापारी, मिशनरी यांच्यावर हल्ले करण्यांत येऊन पुष्कळांस ठार करण्यांत आले; व त्यांच्या मालमत्तेचा नाश करण्यांत आला. या गोष्टीस चिनी सरकारची फूस होती. तेव्हां ग्रेट ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, रशिया व जपान या राष्ट्रांनीं एक संयुक्त आरमार पेकिनकडे पाठविलें व चीनचा पराभव करून चीनला मोठी खंडणी देणें भाग पाडलें. या युद्धास **बाक्सर युद्ध** असें म्हणण्यांत आलें. यानंतर परकीय वकीलायतींचें संरक्षण करण्यासाठीं परकीय सैन्यही पेकिन या राजधानीच्या ठिकाणीं ठेवण्यांत आलें. चीनच्या कमकुवतपणाचा फायदा घेऊन चीनच्या साम्राज्यांतील प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणण्याचें रशिया व जपान या चीनच्या शेजारच्या राष्ट्रांचे प्रयत्न सुरू झाले.

प्राचीन व मध्ययुगांतील जपान

(इ. स. पू. ६०० ते इ. स. १८७०)

जपान—जपानी लोक मिश्रवंशाचे आहेत. प्राचीन काळीं मंगोलियन वंशाच्या अनेक जमातींनीं जपानमध्यें वस्ती केली. या जमातींपैकीं यामोटा जमातीचा राजा जपानचा सम्राट झाला. जपानचा प्राचीन धर्म म्हणजे निसर्गपूजा हा होता. यानंतर पूर्वजांची पूजा करण्याचा प्रघातही जपानमध्यें सुरू झाला. या दोहोंचें मिश्रण होऊन त्यांच्या धर्मास 'शिंटो धर्म' असें म्हणण्यांत येऊं लागलें. सम्राटाच्या पूर्वजांची सार्वत्रिक पूजा होऊं लागल्यामुळें बादशहास दैवी मानण्यांत येऊन त्याच्याबद्दलचा आदर वाढत गेला. जपानचें

राजघराणें इ. स. पू. ६०० च्या पूर्वीपासूनचें प्राचीन आहे. चीनच्या संस्कृतीचा व चालीरीतींचा जपानवर बराच पगडा बसला. रेशमी किड्यांची जोपासना करणें व रेशीम तयार करणें हा उद्योगधंदा व इतर अनेक उद्योगधंदे जपानी लोक चीनपासून शिकलें. बौद्ध धर्माचा जपानमध्यें चीनमधून ६ व्या शतकांत प्रवेश झाला व प्रसार होत गेला. जपानच्या समाजाचे शस्त्रधारी लढवय्या वर्ग, कारागीर वर्ग, व्यापारी वर्ग व शेतकरी वर्ग असे चार वर्ग निर्माण झाले. चीनमधील टँग घराण्याच्या काळांत जपानी लोक विद्याकलांचें ज्ञान संपादन करण्यास चीनमध्यें जाऊं लागले. जपानमधील कायदेकानू व राज्यकारभाराची पद्धत यांवर चीनची बरीच छाप पडली.

हलके हलके जपानमध्यें सरंजामी पद्धत स्थापन होऊन सम्राटाच्या ताब्यांतील बरीच जमीन सरंजामी सरदारांमध्यें विभागली गेली. हे सरंजामी सरदार आपल्या पदरीं पुष्कळ सशस्त्र सैनिक ठेवीत त्यामुळें जपानच्या सम्राटाची सत्ता कमकुवत होत गेली. या सशस्त्र सैनिकांस **सामूरी** असें म्हणत. हे सरंजामी सरदार आपल्या जहागिरींतिल कुळांवर डोईजड कर बसवीत. या सरंजामी सरदारांपैकीं फूजीवारा या घराण्याची सत्ता इ. स. ९ व्या शतकांत प्रबल झाली व ती एक दोन शतके वंशपरंपरा या घराण्याकडे राहिली व राज्यकारभारही या घराण्याकडे आला. पुढें या घराण्यांतील सरदार चैनी व विलासी झाले. तेव्हां त्यांच्याबद्दल इतर सरंजामी सरदारांस वैषम्य वाटून आपल्या हातीं सत्ता घेण्याचे त्यांचे प्रयत्न सुरू झाले. पुढें १२ व्या शतकांत या सरंजामी सरदारांपैकीं एकानें आपल्या पदरीं असलेल्या सशस्त्र सैनिकांत खूप वाढ करून त्या जोरावर जपानच्या बादशहाकडून मुख्य सेनापती (**शोगून**) हा हुद्दा मिळविला व जपानमधील सैन्याचा कारभार स्वतःकडे घेतला. हा मुख्य सेनापतीचा अधिकार (**शोगूनेट**) त्याच्या घराण्याकडे वंशपरंपरा कांहीं काळ गेला व त्यानंतर आणखी एक दोन घराण्यांकडे आला. ज्या घराण्याकडे हा अधिकार असे त्यास 'शोगून' असें म्हणत. या शोगूनांकडून सैन्य, सुसज्ज व प्रबल ठेवण्यांत येत असल्यामुळें मध्ययुगांमध्यें परकीय शत्रूपासून जपाननें आपलें संरक्षण केलें.

युरोपियन व्यापाऱ्यांचें जपानमध्यें आगमन— इ. स. १५४२ मध्यें पोर्तुगीज व्यापारी जपानच्या बंदरांत व्यापारासाठीं आले. त्यांनीं मसाल्याचे बेटांतून मसाल्याचे पदार्थ, चीनमधून रेशीम व युरोपमधून बंदुका

विक्रीसाठीं आणल्या होत्या. यांपैकीं बंदुका व तोफा यांचा खप जपानमधील लढवय्या जमातींत होऊं लागला. १५९२ पर्यंत व्यापाराचे बाबतींत त्यांना युरोपमधील प्रतिस्पर्धी नव्हते, पण त्यानंतर इंग्लिश व डच व्यापारीही येऊं लागले. १५४९ च्या सुमारास जेझुइट मिशनरी जपानमध्यें येऊं लागले, व त्यामुळें ख्रिस्तीधर्माचा जपानमध्यें प्रसार होऊं लागला. पण या ख्रिश्चन मिशनऱ्यांकडून राजकीय बाबतींत हात घातला जात आहे हें पाहून १५८७ मध्यें एक फर्मान काढण्यांत येऊन सर्व मिशनऱ्यांस जपान सोडून जाण्यास सांगण्यांत आलें. यानंतर १६३६ मध्यें युरोपियन व्यापाऱ्यांसही जपानमध्यें येऊन व्यापार करण्यास बंदी घालण्यांत आली. तसेंच जपानमधील लोकांसही परदेशगमन करण्यास प्रतिबंध करण्यांत आला.

अशा प्रकारें पाश्चात्य व्यापाऱ्यांस जपानी बंदरें बंद करण्यांत आल्यावर, जपानशीं व्यापार करण्यासाठीं परवानगी मिळविण्याचे त्यांचे प्रयत्न १९ व्या शतकांत पुनः सुरू झाले. १८५३ मध्यें अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें या राष्ट्राचा एक आरमारी अधिकारी कॅप्टन पेरी हा जपानमध्यें येऊन त्यानें अ. सं. सं. च्या अध्यक्षाचें पत्र जपानच्या बादशहास दिलें, व जपानशीं व्यापार करण्याची परवानगी मागितली. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. तेव्हां यानंतर कांहीं महिन्यांनीं तो लढाऊ जहाजें घेऊन जपानच्या किनाऱ्याकडे आला. तेव्हां त्याचा परिणाम होऊन जपानमधील दोन बंदरें अमेरिकन व्यापाऱ्यांसाठीं खुलीं करण्यांत आलीं. अमेरिकेच्या व्यापारी प्रतिनिधींस जपानच्या बंदरांत वास्तव्य करण्यास परवानगी देण्यांत आली. यानंतर १५५८ मध्यें अमेरिकन व्यापाऱ्यांसाठीं ५ बंदरें खुलीं करण्यांत आलीं, जकातीचे दर माफक करण्यांत आले. जपानमधील अमेरिकन नागरिकांवर खटला झाल्यास तो अमेरिकन न्यायाधिशांपुढें व अमेरिकन कायद्याप्रमाणें चालावा (Extra Territorial Rights) अशा सवलती अमेरिकेनें मिळविल्या. अमेरिकेप्रमाणें इंग्लंड, फ्रान्स, डच, रशिया वगैरे देशांच्या व्यापारासंबंधानें वरील प्रकारचे तह करण्यांत आले. पण जपानच्या शोगननें आपल्या स्वातंत्र्यास बाध आणणारे केलेले तह शोगनच्या विरुद्ध असलेल्या सरदारांस आवडले नाहींत; व जपानमध्यें असंतुष्टता पसरली. तेव्हां शोगनचे अधिकारी, परकीय युरोपियन व अमेरिकन लोक व परकीय जहाजें यांवर आच्याचार व हल्ले होऊं लागले. तेव्हां याविरुद्ध परकीय

व्यापाऱ्यांनीं जपानच्या सरकारकडे तक्रार केली, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. तेव्हां इंग्लिश, फ्रेंच, डच व अमेरिकन या राष्ट्रांच्या संयुक्त आरमारानें जपानच्या कांहीं ठिकाणांवर हल्ला करून तीं उध्वस्त करून टाकलीं (१८६४). यानंतर जपानमध्यें अंतस्थ क्रांति होऊन शोगनच्या हातांतील सत्ता जाऊन ती बादशहाकडे देण्यांत आली (१८६८).

सारांश

मध्ययुगांतील भारत (१२०६–१८१८)

सुलतानशाही (१२०६–१५२६)–गुलाम, खिलजी, तघलघ, सय्यद व लोदी हीं घराणीं. अल्लाउद्दीनाच्या कारकीर्दींत दक्षिण भारतांतही सत्ता. महमद तघलघाच्या योजना. पण योग्य खबरदारी न घेतल्यानें अव्यवहार्य. ठिकठिकाणीं बंडाळीं व स्वतंत्र राज्यें. दक्षिणेंत बहामनी राज्य. हिंदूंचें विजयानगरचें साम्राज्य. (१३३६–१५६५). फिरोज तघलघ कालवे व पाटबंधारे.

मोगल साम्राज्य (१५२६–१७०७)–संस्थापक बाबर. अकबरानें राज्याचें साम्राज्य (१५५६–१६०५), उदार व सहिष्णुतेचें धोरण. सुधारणा. व्यवस्थित राज्यकारभार. शहाजहाननें शोभिवंत इमारती बांधल्या. औरंगजेबच्या (१६५८–१७०७) कारकीर्दींत साम्राज्यविस्तार, पण असहिष्णुतेमुळें ठिकठिकाणीं बंडाळीं. मराठ्यांचा मोड करण्याच्या कार्मी अपयश. त्याच्या मृत्यूनंतर (१७०७) मोगल साम्राज्याचा ऱ्हास.

मराठी साम्राज्याचा उदय, उत्कर्ष व ऱ्हास (१६७४–१८१८)–संस्थापक शिवाजी, शूर, धोरणी व मुत्सद्दी. अष्टप्रधान पद्धत. व्यवस्थित राज्यकारभार. धार्मिक बाबतींत सहिष्णुता. १ ला बाजीराव यानें उत्तर भारतांत राज्याचें साम्राज्य. पुढील काळांत विस्तार. पानिपत येथील पराभवामुळें मराठी साम्राज्यास हादरा. पुढे १ ला माधवराव, महादजी शिंदे यांनीं पूर्वीचें महत्त्व मिळविलें.

इंग्लिशांची सत्ता (१७५७–१८१८)–इंग्लिशांचें बंगालमध्यें राज्य. रेग्युलेटिंक कायदा व पिटचा कायदा यानें राज्यव्यवस्था. मार्क्विस ऑफ वेलस्लीच्या तैनाती फौजेच्या पद्धतीनें राजेरजवाडे मांडलिक. मराठ्यांचा पराभव १८१८. इंग्लिशांची सत्ता प्रबळ.

गोल व तुर्क (१२०० ते १८१५)

गोल भटक्या वृत्तीचे. जेंगिसखानाच्या (११५५–१२२७) नेतृत्वाखालीं एकी-

करण, मध्य आशियांत मोठें साम्राज्य. मुलगा ओगडाईखान व नातू मंगू यांच्या कारकीर्दीत मेसापोटेमिया, इराण, सीरिया, चीनचा उत्तर भाग यांत राज्यविस्तार. बगदादची खिलापत उध्वस्त, सेलज्यूक तुर्कांचा पराभव. कुबलाईखान (१२५९–१२९४) चीनचा सम्राट, व साम्राज्यविस्तार, पेकिंग ही राजधानी. त्यानंतर मंगोल साम्राज्यांत खळबळ व त्याचीं पांच छकलें.

तैमूरलंग (१३३६–१४०५) मध्य आशियांत साम्राज्यविस्तार. समरकंद राजधानी. भारतावर स्वारी (१३९८). त्याच्यानंतर त्याच्या साम्राज्याचीं छकलें व ठिकठिकाणीं स्वतंत्र राज्यें. आशिया मायनरमध्यें उस्मानी तुर्कांची सत्ता. पूर्व रोमन साम्राज्यांतील कांहीं प्रदेश ताब्यांत. २ रा महंमदनें पूर्व रोमन साम्राज्याचा नाश (१४५३) केला. आग्नेय युरोपमध्यें तुर्कांचें वर्चस्व (१४५३–१८१५). सुलेमान प्रतापशाली सुलतान (१५२०–६६), युरोप, आशिया व आफ्रिकेंतील प्रदेशांमध्यें राज्यविस्तार. सुलतानास खलिफा ही पदवी. तुर्कांची वाढती सत्ता, पण लीपँटो येथील पराभव व भूमध्य समुद्रावरील वर्चस्वास अडथळा.

मध्ययुगांतील चीन (१२८०–१९००).

युआन घराणें (१२८०–१३६८)–कुबलाइखानाचा तिबेट, तार्तरी, ब्रह्मदेश, टाँकिन, अनाम या प्रदेशांत राज्यविस्तार. युरोपशीं दळणवळण सुरू. व्हेनिसचा मार्को पोलो याचें त्याच्या दरबारीं १२ वर्षें वास्तव्य. चीनच्या वैभवाची युरोपला माहिती. नंतरचे सम्राट कमकुवत.

मिंग घराणें (१३६८–१६४४)–मध्य आशियांत तैमुरलंगमुळें खळबळ, व त्यामार्गे युरोपशीं दळणवळण बंद, पण पूर्व व दक्षिण या भागांतील प्रदेशांशीं दळणवळणाची वाढ. चीनच्या संस्कृतीचा प्रसार. १५१७ कँटन बंदरांत पोर्तुगीज व्यापारी. १५५७ मकाओ बेट भाड्यानें. फिलीपाइन बेटांवर स्पेनचें वर्चस्व. जेझुइट मिशनऱ्यांस चीनमध्यें धर्मप्रसार करण्यास परवानगी.

मांचू घराणें (१६४४–१९१२) चीनमध्यें अस्वस्थता. मंगोल व तार्तरी लोकांचें मांचू घराणें. कर्तृत्ववान् राजकर्ते, उद्योगधंदे व शिक्षण यांस उत्तेजन. चीनचें साम्राज्य पूर्वीप्रमाणें विस्तृत. पोर्तुगीज, डच, इंग्लिश व्यापाऱ्यांस चीनच्या बंदरांत व्यापार करण्यास परवानगी. व्यापारवृद्धि. खिस्ती धर्माधिकाऱ्यांचा चीनच्या राजकारणांत हात म्हणून त्यांच्यावर बंदी १७४४. औद्योगिक क्रान्तीमुळें इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यापारांत वाढ. इंग्लिशांचा अफूचा व्यापार व चिनी अधिकाऱ्यांशीं तंटा. युद्ध १८३९–४२. चीनचा पराभव, नुकसानभरपाई. आणखी ५ बंदरें इंग्लिश व्यापारास खुलीं. हाँगकांग बेट इंग्लिशांस. अ. सं. संस्थानें यास व्यापाराविषयक सवलती, १८५६–६० चीनशीं इंग्लिशांचें २ रें युद्ध. चीनचा पराभव. आणखी १० बंदरें खुलीं. रशियास

व्हॅडिओस्टाक, जपाननें फोर्मोसा मिळविलें, व कोरियावर नियंत्रण. चीनमध्यें भांडवल गुंतविण्यास सर्वांस मुक्तद्वार हें अ. सं. संस्थानें याचें धोरण. परकीयांस चीनमधून हाकलून देण्यास बॉक्सर दंगल (१९००), चीनचा पराभव. इतर देशांस मोठी खंडणी व चीनच्या राजकारणांत त्यांचा हात.

प्राचीन व मध्ययुगांतील जपान (इ. स. पू. ६०० ते इ. स. १८७०). जपानी लोक मिश्र, पण मंगोल वंश प्रमुख. यामोटा घराणें. चीनच्या संस्कृतीचा प्रसार. बौद्ध धर्माचा प्रसार ६ व्या शतकांत. जपानी लोक शिक्षणासाठीं चीनमध्यें टँग घराण्याच्या काळांत. जपानमध्यें सरंजामी पद्धत. सम्राटाची सत्ता कमकुवत. मुख्य सेनापति म्हणजे शोगून हा हुद्दा निरनिराळ्या घराण्यांकडे गेला. परप्रवेशापासून संरक्षण. १५४२ पोर्तुगीज व्यापाऱ्यांचें आगमन. १५४९ जेझुइट मिशनऱ्यांचें आगमन. १५८७ मिशनऱ्यांचा राजकारणांत हात व त्यांस बंदी. १५९२ नंतर डच व इंग्लिश व्यापारी. १६३६ परकीय व्यापाऱ्यांस जपानमध्यें येण्यास बंदी. १८५४ अमेरिकेच्या पेरी या लष्करी आरमारी अधिकाऱ्यानें जपानशीं व्यापार करण्यास परवानगी मिळविली. १८६४ परकीय व्यापाऱ्यांवर हल्ले, तेव्हां जपानशीं युद्ध व संयुक्त आरमाराकडून तोफांच्या माऱ्यानें पराभव. १८६८ शोगनकडून जपानच्या सम्राटाकडे सत्ता.

प्रकरण ९ वें

युरोपमध्यें प्राचीन कलाविद्यांचें पुनरुज्जीवन, धर्मसुधारणा व नवीन गोष्टींचा व प्रदेशांचा शोध

(१४५० ते १७४०)

(१) प्राचीन कलाविद्यांचें पुनरुज्जीवन. (२) ख्रिस्ती धर्मसुधारणा.
(३) नवीन गोष्टींचा शोध. (४) नवीन जलमार्गांचा व प्रदेशांचा शोध.

प्राचीन कलाविद्यांचें पुनरुज्जीवन

मध्ययुगांमध्यें युरोपमधील लोक अज्ञानांधकारांत असून त्यांच्यांत कूपमंडूक वृत्ति बळावली होती. युरोपमधील बऱ्याच देशांत सरंजामी पद्धत रूढ असल्यामुळें त्यांचें राजकीय, सामाजिक व आर्थिक जीवन जखडल्यासारखें झालें होतें. धर्माधिकारी लोकांची शिकवणूक 'जग हें दुःखाचें मूळ असून प्रत्येकानें ऐहिक सुख मिळविण्यापेक्षां पारमार्थिक गोष्टींकडे अधिक लक्ष द्यावें' अशी असल्यामुळें जनतेमध्यें ऐहिक गोष्टीबद्दल उदासीनता पसरली होती. पण १४ व्या शतकाच्या सुरवातीपासून या स्थितींत बदल होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. युरोपमधील लोकांस पॅलेस्टाइनमधील ख्रिस्तीधर्मीयांचीं पवित्र ठिकाणें इस्लामधर्मीयांच्या ताब्यांतून सोडविण्याच्या उद्देशानें मुसलमानधर्मीय तुर्क, अरब वगैरे लोकांशीं धर्मयुद्धें (क्रूसेडस) करावी लागल्यामुळें त्यांस पश्चिम आशियांतील प्रदेशांस जावें लागून पौर्वात्य प्रदेश, तेथील संस्कृति, तेथील लोकांचे आचारविचार त्यांचें ज्ञान, निरनिराळ्या बाबतींत त्यांनीं केलेली प्रगति याकडे युरोपियन जनतेचें लक्ष जाऊं लागलें. १३ व्या शतकाच्या शेवटीं सरंजामी पद्धत युरोपमधील बऱ्याच देशांत मोडकळीस येऊन ठिकठिकाणीं प्रादेशिक राज्यें निर्माण झालीं व त्यामुळें युद्ध व शेतकी यांसेरीज इतर व्यवसाय करण्याकडे बहुजनसमाजाची वृत्ति वाढूं लागली. अशी स्थिति असतां पूर्व रोमन साम्राज्यावर उस्मानी तुर्क लोकांचें दडपण वाढत जाऊन त्यांचे निरनिराळे प्रदेश तुर्क लोकांनीं घेतले व शेवटीं इ. स. १४५३ मध्यें त्यांनीं पूर्व रोमन साम्राज्याची राजधानी कॉन्स्टांटिनोपल हें शहर हस्तगत केल्यामुळें पूर्व रोमन साम्राज्य नष्ट

झालें. इ. स. ४७६ मध्यें पश्चिम रोमन साम्राज्य नष्ट झाल्यावर जवळ जवळ एक हजार वर्षें कॉन्स्टांटिनोपल किंवा बिझँशिअम हें शहर प्राचीन ग्रीक व रोमन संस्कृतीचें केंद्रस्थान झालेलें होतें. पण शेवटीं तें ठिकाणही इस्लामधर्मीयांच्या ताब्यांत गेल्यावर तेथें वास्तव्य करणारे विद्वान् लोक व पंडित आपल्या जवळचे ग्रीक व लॅटिन भाषेंत लिहिलेले हस्तलिखित ग्रंथ व पोथ्या घेऊन युरोपमध्यें-विशेषतः इटलीमध्यें गेले. पूर्व रोमन साम्राज्यांतील प्रदेशांतून विद्वान लोकांचें युरोपमध्यें येणें १५ व्या शतकाच्या सुरवातीपासूनच सुरू होतें, व १४५३ मध्यें पूर्व रोमन साम्राज्य नष्ट झाल्यावर ते मोठ्या संख्येनें आले.

युरोपमधील इतर देशांच्या मानानें इटली हा देश त्या वेळीं पुढारलेला होता. इटली त्यावेळीं एक राष्ट्र नसून त्यांत अनेक स्वतंत्र राज्यें होतीं. तीं म्हणजे रोमचा पोप याचें राज्य, नेपल्स व सिसलीचें राज्य (हें स्पेनमधील ॲरागॉन या घराण्याकडे होतें), व्हेनिस, जेनोआ, फ्लॉरेन्स, मीलॅन (Milan) व सेव्हॉय हीं राज्यें होत. यांपैकीं व्हेनिस व जेनोआ हीं व्यापाराच्या बाबतींत व फ्लॉरेन्स हें शिल्पकला, चित्रकला, कलाकौशल्य वगैरे बाबतींत प्रसिद्ध होतें. हे विद्वान् लोक इटलीमध्यें येऊं लागल्यानें प्राचीन कलाविद्यांचें पुनरुज्जीवन पहिल्यानें इटलीमध्यें होऊन नंतर तें युरोपमधील इतर देशांत पसरलें. प्राचीन कलाविद्यांच्या पुनरुज्जीवनानें लोकांच्या ख्रिस्तपूर्व प्राचीन काळांतील धर्मसमजुती बळावतील व त्यामुळें ख्रिश्चन धर्माबद्दल अनादर उत्पन्न होईल अशी भीति वाटून पहिल्यानें ख्रिश्चन धर्माधिकाऱ्यांचा त्यास विरोध होता. पण हळके हळके तो विरोध कमी होऊन त्यांच्याकडून प्राचीन कलाविद्येस उत्तेजन मिळत गेलें. सॉक्रेटीस, ॲरिस्टॉटल, प्लेटो वगैरे प्राचीन ग्रीक लोकांचें तत्त्वज्ञान, त्यांची राजकीय मतें, वैद्यकी, ज्योतिषशास्त्र वगैरे बाबतींत त्यांनीं केलेली प्रगति, त्यांची शिल्पकला, चित्रकला, रोमन लोकांचे कायदे, राज्यकारभाराची पद्धत, बांधकाम यांकडे युरोपियन जनतेचें लक्ष जाऊन या सर्व गोष्टी आत्मसात् कराव्यात असें त्यांस वाटूं लागलें. युरोपमधील लोकांस नवी दृष्टि येऊन त्यांच्यांत वैचारिक क्रान्ति झाली. ग्रीक व रोमन लोकांच्या ज्ञानावर अंधश्रद्धा ठेवण्याऐवजीं तें ज्ञान त्यांनीं ज्या पद्धतीनें मिळविलें त्याकडे लोकांचें लक्ष जाऊं लागलें. कोणतीही गोष्ट 'बाबा-वाक्यं' म्हणून प्रमाण न मानतां चिकित्सक पद्धतीनें तिचें अध्ययन होऊं लागलें. ईश्वरानें निर्माण केलेल्या जगाकडे आश्चर्यानें किंवा

किंकर्तव्यमूढ होऊन पाहण्याऐवजीं या जगांतील गोष्टींसंबंधीं नवीन ज्ञान मिळवून त्यायोगें सध्यांच्या परिस्थितीमध्यें आपणांस सुखकर होईल, असा बदल घडवून आणण्याकडे लोकांचें लक्ष जाऊं लागलें. अशा प्रकारें लोकांच्या जगाकडे पाहण्याच्या वृत्तींत बदल होऊं लागल्यामुळें युरोपमध्यें इ. स. १४५० ते १५०० च्या सुमारास मध्ययुग संपून अर्वाचीन युग सुरू झालें असें स्थूलमानानें मानण्यांत येतें.

जगाकडे पाहण्याच्या या वृत्तींत बदल झाल्यामुळें युरोपमधील लोकांच्या अंगीं (१) चिकित्सक व शास्त्रीय पद्धत, (२) धाडसी वृत्ति, (३) ऐहिक बाबतींत समृद्धता प्राप्त करून घेण्याची इच्छा, (४) खुळ्या कल्पना व अंधश्रद्धा याबद्दल तिटकारा वगैरे गोष्टी येऊन युरोपमधील लोकांनीं यापुढील तीनचार शतकांमध्यें नवीन ज्ञान संपादन केलें. नवीन गोष्टींचे व प्रदेशांचे शोध लाविले, भौतिक शास्त्रांत प्रगति केली, राजकीय, सामाजिक, धार्मिक व आर्थिक गोष्टींत इष्ट तो बदल घडवून आणला व जगांमध्यें आपलें श्रेष्ठत्व स्थापन केलें.

ख्रिस्ती धर्मसुधारणा

युरोपमधील लोकांस नवी दृष्टी आल्यासारखें होऊन ते सर्वच प्रश्नांसंबंधीं शास्त्रीय व चिकित्सक पद्धतीनें, त्याचप्रमाणें धाडसी व निर्भीड वृत्तीनें विचार करूं लागले. धार्मिक प्रश्नांकडे पाहण्याच्या त्यांच्या या वृत्तीमुळें पश्चिम व उत्तर युरोपमध्यें पोपच्या नेतृत्वाखालीं सर्वत्र रूढ असलेल्या कॅथलिक (जागतिक व सार्वत्रिक) ख्रिस्ती संघटनेमध्यें व धार्मिक व्यवस्थेमध्यें सुधारणा घडवून आणण्याच्या प्रयत्नांत कॅथलिक ख्रिस्ती संघटनेंत दुफळी होऊन निरनिराळे प्रॉटेस्टंट (पोपच्या धार्मिक सत्तेस विरोध करणारे) पंथ स्थापन झाले. या गोष्टीसच धर्मसुधारणा (Reformation) असें म्हणण्यांत येतें.

पोपच्या धार्मिक व ऐहिक सत्तेस विरोध—मध्ययुगामध्यें पोपची धार्मिक व ऐहिक सत्ता खूप वाढली. ही सत्ता कशी वाढत गेली याची हकीकत पूर्वी आलेली आहे (पृष्ठ १९१–९२). हलके हलके पोपच्या सत्तेस विरोध होत गेला. हा विरोध जास्त तीव्र होण्यास पुढील गोष्टीही कारणीभूत झाल्या. पोप, ठिकठिकाणीं नेमलेले बिशप, कुर्जी, धर्ममठांतील साधु वगैरे धार्मिक कामांत

गुंतलेले लोक हे पहिल्या पहिल्यानें धार्मिक वृत्तीचे, विद्वान्, परोपकारी, चांगल्या आचरणाचे व त्यागी वृत्तीचे होते. तरी पुढें या धर्माधिकाऱ्यांच्या जागांवर अज्ञानी, व्यसनी, अनीतिमान्, ढोंगी, धार्मिक गोष्टींऐवजीं ऐहिक गोष्टींकडे अधिक लक्ष देणारे, चैनींत व ख्यालीखुशालींत वेळ घालविणारे असे लोकही नेमण्यांत येऊं लागले व त्यामुळें धर्माधिकाऱ्यांबद्दल बहुजन समाजामध्यें पूर्वी जो आदर व प्रेम होतें, तें नाहींसें होऊन त्यांच्याबद्दल अनादर व तिटकारा वाटूं लागला. त्याचप्रमाणें रोमचा पोप व त्याच्या हाताखालचे धर्माधिकारी यांच्याकडून धर्माच्या नांवाखालीं बायबलला संमत नसलेल्या व बायबलमधील तत्त्वांच्या विरुद्धही कांहीं गोष्टी होऊं लागल्या. अशी परिस्थिति असतां ठिकठिकाणीं संघटित राज्यें स्थापन झाल्यावर तेथील राजकर्त्यांस व जनतेस पोपनें आपल्या राज्यांतील अंतःस्थ कारभारांत ढवळाढवळ करणें, राज्यांतील बिशप व आर्चबिशप या जागांवर त्या त्या राज्यांतील लायक, हुशार, धार्मिक वृत्तीच्या विद्वान् गृहस्थांचा हक्क बाजूस सारून इटलीमधील किंवा इतर ठिकाणचें आपल्या मर्जीतील अधिकारी नेमणें, नवीन नेमणूक झाल्यास ठिकठिकाणच्या चर्चचें पहिल्या वर्षाचें उत्पन्न रोममधील चर्चच्या व्यवस्थेसाठीं घेणें वगैरे गोष्टी आवडत नव्हत्या. त्याचप्रमाणें 'थाइथ' नांवाचा धार्मिक कर गोळा करणें, धर्माधिकारी व इतर सामान्य लोक यांच्यामध्यें तंटा उपस्थित झाल्यास त्याबद्दलचा खटला त्या त्या देशांतील नेहमीच्या न्यायकोर्टाकडे न चालवितां आपल्या वर्चस्वाखालीं असलेल्या धार्मिक कोर्टाकडे चालविण्याचा आग्रह धरणें वगैरे गोष्टी पसंत नसत. त्याचप्रमाणें चर्च, धर्ममठ यांच्या मालकीच्या मोठमोठ्या शेतवाड्या, इस्टेटी व मालमत्ता यांबद्दलही त्यांस हेवा वाटत होता.

तेव्हां या स्थितींत बदल घडवून आणण्याचे प्रयत्न युरोपमधील निरनिराळ्या देशांतील राजकर्त्यांकडून व लोकांकडून सुरूं होते. पोप व कांहीं धर्माधिकारी तसेंच कांहीं विद्वान् व धार्मिक वृत्तीचे गृहस्थ यांसही आहे त्या स्थितींत सुधारणा होणें जरूर आहे असें वाटत होतें. चौदाव्या शतकांत इंग्लंडमध्यें **जॉन विक्लिफ** (Wycliffe १३२५–१३८४) हा एक विद्वान् व धार्मिक वृत्तीचा गृहस्थ होऊन गेला. तो ऑक्सफर्ड विश्वविद्यालयांत प्रोफेसर होता. त्यानें असें प्रतिपादिलें कीं, मठसंस्था ख्रिस्तीधर्मतत्त्वांस संमत नाहीं. अनीतिमान् व व्यसनी अशा धर्माधिकाऱ्यांकडून धार्मिक संस्कार केले गेल्यास त्यांचा

क्रांहींच उपयोग नाहीं. प्रत्येकानें आपलें धार्मिक आचरण पोप किंवा धर्माधिकारी यांच्या सांगण्यावरून न ठरवितां स्वतः बायबल वाचून त्याप्रमाणें ठरवावें. चर्च व धर्ममठ यांच्या ताब्यांतील मालमत्ता जप्त करून ती बहुजनसमाजाच्या उपयोगासाठीं राष्ट्रांतील सरकारनें आपणांकडे घ्यावी. विक्लिफची जरी अशीं मतें होतीं, तरी त्या वेळचा बहुजनसमाज अज्ञानी असल्यामुळें त्याच्या मताचा इष्ट परिणाम घडून आला नाहीं. जर्मनीमध्यें **जॉन हस** (John Huss) हा एक विद्वान् व धार्मिक वृत्तीचा गृहस्थ होऊन गेला. त्याचीं मतेंही विक्लिफ सारखींच होतीं, पण त्यास त्याच्या अशा मताबद्दल पाखंडी समजण्यांत येऊन धर्माधिकाऱ्यांकडून जिवंत जाळण्यांत आलें (१४१५). हॉलंडमध्यें **इरॅझमस** (१४६९–१५३६) नांवाचा एक जाडा विद्वान्, बहुश्रुत व युरोपमधील निरनिराळ्या देशांत जाऊन आलेला व धार्मिक वृत्तीचा तत्त्वज्ञानी गृहस्थ होऊन गेला. त्यानें त्यावेळच्या सर्व साधारण धर्माधिकाऱ्यांच्या अज्ञानावर उपरोधिक टीका करण्यासाठीं 'मूर्ख स्तुति' या नांवाचा एक ग्रंथ लिहिला व बहुजन समाजामध्यें शिक्षणाचा फैलाव झाल्याखेरीज ढोंगी, व्यसनी व नालायक धर्माधिकाऱ्यांच्या वर्चस्वापासून जनतेची मुक्तता व्हावयाची नाहीं असें प्रतिपादिलें.

पोपच्या नेतृत्वाखालील कॅथलिक चर्चविरुद्ध प्रॉटेस्टंट पंथाची स्थापना–मार्टिन ल्यूथर, झ्विंगली व कॅल्व्हिन—इ. स. १५१७ च्या सुमारास १० वा लिओ हा पोप होता. त्यावेळीं रोम येथें सेंट पीटरचें भव्य चर्च बांधण्याचें काम सुरू होतें. तें काम पुरें करण्यासाठीं पैशाची जरूरी होती. तेव्हां रोमच्या पोपनें युरोपमधील निरनिराळ्या देशांत आपले हस्तक पाठविले व त्यांच्याजवळ 'पातकापासून मुक्त करणारीं पत्रकें' (Indulgences) दिलीं. हे हस्तक टिकठिकाणीं गेले व तेथें 'रोममधील सेंट पीटर चर्च बांधण्याचें काम पुरें करण्यास मदत म्हणून हीं पत्रकें विकत घेतल्यास पातकापासून मुक्त होतां येतें' अशीं प्रवचनें देऊन भाविक व धार्मिक वृत्तीच्या स्त्रिस्ती लोकांकडून पैसा गोळा करूं लागले. पोपचा **टेटझेल** नांवाचा एक हस्तक जर्मनीमधील विटेनबर्ग येथें गेला व वरील प्रकारचें प्रवचन देऊन 'पातकापासून मुक्त करणारीं पत्रकें' विकून पैसे गोळा करू लागला. त्यावेळीं विटेनबर्ग येथील विश्वविद्यालयांत **मार्टिन ल्यूथर** (Martin Luther) नांवाचा एक विद्वान, व्यासंगी व धार्मिक वृत्तीचा तरुण गृहस्थ तत्त्वज्ञान व धार्मिक बाबी

यांचा प्राध्यापक (प्रोफेसर) होता. भाविक, धार्मिक पण अज्ञानी अशा लोकांकडून धर्माच्या नांवावर 'पत्रकें' विकून पैसे गोळा केलेले त्यास आवडलें नाहीं. केलेल्या पापरुत्यांबद्दल अंतःकरणपूर्वक पश्चात्ताप झाल्यास व तशीं रुत्यें पुनः होऊं न देण्याचा निश्चय केला तरच पातकापासून मुक्त होतां येतें, पत्रकें विकत घेऊन नव्हे, असें त्याचें मत होतें. अशा प्रकारचीं पत्रकें विकून पैसा गोळा करणें बायबलला संमत नाहीं व ही गोष्ट ख्रिस्ती धर्मतत्त्वांविरुद्ध आहे वगैरे गोष्टी विस्तृतपणें प्रतिपादन करणारे ९५ मुद्दे त्यानें जाहीरपणें विटेनबर्ग येथील चर्चच्या दरवाजावर प्रसिद्ध केले (१५१७). मार्टिन ल्यूथरच्या या धाडसी रुत्यानें विटेनबर्ग येथेंच नव्हे तर जर्मनीमध्यें सर्वत्र या प्रश्नासंबंधीं खळबळ झाली. या प्रश्नासंबंधीं जर्मनीमध्यें दोन तट पडून त्यांपैकीं एकानें मार्टिन ल्यूथर यास पाठिंबा दिला व अशा रीतीनें ही चळवळ पसरूं लागली. मार्टिन ल्यूथरच्या या पाखंडी रुत्यास आळा घातला नाहीं तर ही चळवळ युरोपमधील इतर देशांतही पसरेल, असें पोप १० वा लिओ यास वाटून त्यानें मार्टिन ल्यूथर यांस धर्मबहिष्कृत केलें असल्याचें जाहीर केलें (१५२०). त्याचप्रमाणें पवित्र रोमन साम्राज्याचा सम्राट यानें मार्टिन ल्यूथर यांस त्यांच्या पाखंडी मताबद्दल योग्य ती शिक्षा द्यावी अशी त्यास विनंती केली. पण मार्टिन ल्यूथरच्या बाजूचें जर्मनीमध्यें बरेंच राजेरजवाडे व लोक असल्यामुळें त्यानें ल्यूथरला शिक्षा केली नाहीं. मार्टिन ल्यूथर यास ख्रिस्ती धर्मांत शिरलेले कांहीं खुळे आचारविचार व समजुती काढून टाकून ख्रिस्ती धर्माची आंतून सुधारणा व्हावी असें वाटत होतें. पण त्यानें पत्रकांविरुद्ध निर्भिडपणें जी गोष्ट जाहीर केली ती पोपला पाखंडीपणाची वाटून त्याबद्दल पोपनें त्यास धर्मबहिष्कृत केलें असल्याचें जाहीर केल्यामुळें त्यानेंही 'ख्रिश्चन धर्माचा मुख्य म्हणून पोपला कोणी अधिकार दिलेला नाहीं व पोपनें तो बळकाविला आहे; पोपच्या मतापेक्षां बायबल अधिक ग्राह्य धरावयास पाहिजे' अशा प्रकारचें आपलें मत जाहीर केलें, तेव्हां जर्मनीमध्यें या धार्मिक प्रश्नासंबधीं दोन तट पडले. मार्टिन ल्यूथर व त्याचे अनुयायी हे पोपच्या धार्मिक सत्तेचे **विरोधक** होते म्हणून त्यांस '**प्रॉटेस्टंट**' असें म्हणण्यांत आलें. पोपची धार्मिक सत्ता ज्यांस मान्य होती त्यांस '**कॅथॉलिक**' किंवा **रोमन कॅथॉलिक** असें म्हणण्यांत येऊं लागलें.

जर्मनीप्रमाणें स्वित्झर्लंडमध्येंही 'पातकापासून मुक्त करणारीं पत्रकें' व 'धर्मयात्रा' या प्रश्नांसंबधीं झ्विंगली (१४८४–१५३१) यानें चळवळ सुरू केली. ल्यूथरप्रमाणें त्यासही पोपची धार्मिक सत्ता व वर्चस्व मान्य नव्हतें. बायबल हाच ख्रिस्ती धर्माचा प्रमाणभूत ग्रंथ असून त्याचा अर्थ स्वतः लावून त्याप्रमाणें आचरण करावें, असें त्याचें म्हणणें होतें. ख्रिश्चन धर्मातील कांहीं धार्मिक संस्कारांच्या बाबतींत त्याचा ल्यूथरशीं मतभेद होता. त्याच्या धर्मपंथाचा स्वित्झरलंडमध्यें प्रसार झाला व तेथील बहुसंख्य लोक प्रॉटेस्टंटपंथिय बनले.

यानंतर फ्रान्समध्यें जॉन कॅल्व्हिन (१५०९–१५६४) हा धर्मसुधारक प्रसिद्धीस आला; पण त्याच्या धार्मिक मतांमुळें त्यास फ्रान्समधून हद्दपार करण्यांत आलें. यानंतर तो स्वित्झर्लंडमधील जिनेव्हा येथें गेला. त्याच्या धर्मपंथाचा मार्टिन ल्यूथरपेक्षां जास्त प्रसार झाला व युरोपमधील स्वित्झर्लंड, हॉलंड, स्कॉटलंड, त्याचप्रमाणें अमेरिकेंत इंग्लंडची 'न्यू इंग्लंड' ही वसाहत स्थापन करणारे लोक त्याचे अनुयायी झाले. 'ईश्वरावर पूर्णपणें श्रद्धा ठेवून वागावें, बायबल हें ख्रिस्ती-धर्मीयांचें प्रमाणपुस्तक आहे व त्याचें अध्ययन करून त्याचा अर्थ प्रत्येकानें स्वतः लावावा व त्याप्रमाणें आचरण करावें;' धार्मिक संस्कार, विधि व प्रार्थना करण्यास धर्माधिकाऱ्यांची मध्यस्थी नको; समाजांतील वयस्क, पोक्त व अनुभवी लोकांचा सल्ला घेऊन धार्मिक आचरण करावें, अशी त्याची शिकवण होती. त्यासही पोपचें धार्मिक वर्चस्व व श्रेष्ठत्व मान्य नव्हतें. त्याच्या धर्मपंथास 'प्रेसबिटेरियन पंथ' असें म्हणत.

इंग्लंडचा राजा ८ वा हेन्री यानें पोपशीं कांहीं खाजगी कारणामुळें वितुष्ट आल्यामुळें त्याच्या सूचनेवरून इंग्लंडच्या पार्लमेंटनें 'ॲक्ट ऑफ सुप्रिमसी' हा कायदा पास करून इंग्लंडवर असलेली पोपची धार्मिक सत्ता झुगारून दिली, व इंग्लंडमध्यें धार्मिक बाबतींत पोपच्या ऐवजीं इंग्लंडचा राज्यकर्ता हाच प्रमुख असें जाहीर केलें. यानंतर इंग्लंडमध्यें त्याच्या मुलानें व मुलींनीं राज्य केलें. इंग्रजी भाषेमध्यें बायबलचें भाषांतर करण्यांत आलें. त्याच्या एलिझाबेद या मुलीच्या कारकीर्दीत (१५५८–१६०३) पुनः 'ॲक्ट ऑफ सुप्रीमसी' हा कायदा पास करण्यांत येऊन पोपचें धार्मिक श्रेष्ठत्व झुगारून देण्यांत आलें व इंग्लंडमध्यें धार्मिक बाबतींत इंग्लंडचा राज्यकर्ता हा प्रमुख असें ठराविण्यांत

आलें. राज्यकर्त्यांच्या नियंत्रणाखालीं धार्मिक व्यवस्था पाहण्यास आर्चबिशप व बिशप हे धर्माधिकारी नेमण्यांत आले. इंग्लंडमधील धर्मपंथास 'एपिस्कोपेलियन पंथ' असें नांव मिळालें.

अशा प्रकारें धार्मिक बाबतींत ज्यांस पोपची सत्ता मान्य नाहीं असें ल्यूथरचा पंथ, झ्विंगलीचा पंथ, कॅल्व्हिनचा प्रेसबिटेरियन पंथ व इंग्लंडमधील एपिस्कोपेलियन पंथ' असे निरनिराळे धर्मपंथ निर्माण झालें व त्यांस **'प्रॉटेस्टंट पंथ'** म्हणजे 'पोप विरोधक पंथ' असें म्हणण्यांत येऊं लागलें. यानंतर प्युरिटन, क्वेकर वगैरे आणखी प्रॉटेस्टंट पंथही स्थापन झाले. अशा प्रकारें मध्य युगामध्यें पोपच्या वर्चस्वाखालीं युरोपच्या पश्चिम व उत्तर भागांत जी ख्रिस्ती धर्माची धार्मिक संघटना होती तींत दुफळी झाली.

रोमन कॅथॉलिक पंथाचीं राष्ट्रें व लोक—पश्चिम युरोपमधील ख्रिस्ती धर्मामध्यें दुफळी होऊन निरनिराळे प्रॉटेस्टंट पंथ जरी निर्माण झाले, तरी ज्यांस पोपच्या वर्चस्वाखालील धार्मिक संघटना मान्य होती अशीं कांहीं राज्यें, तेथील राज्यकर्ते व लोक होते व ते म्हणजे स्पेन, फ्रान्स, पोर्टुगॉल, बेल्जम, इटलीमधील वेगवेगळीं राज्यें यांतील राज्यकर्ते व तेथील बहुसंख्य जनता व आयर्लंडमधील लोक हे होत. या सर्वांस **कॅथॉलिक** किंवा **रोमन कॅथॉलिक** असें म्हणण्यांत येऊं लागलें. पण यांपैकीं कांहींस रोमन कॅथालिक पंथांत शिरलेल्या कांहीं अनिष्ट गोष्टी दूर व्हाव्यात, व या पंथाची सुधारणा व्हावी असें वाटत होतें. यांपैकीं **इग्नेशियस लायोला** (Ignatious Loyola) नांवाचा एक उत्साही गृहस्थ होता. त्यानें कॅथॉलिक पंथाची आंतून सुधारणा करण्यासाठीं व या पंथाच्या लोकांस कार्यप्रवृत्त करण्यासाठीं **'जेझूइट'** नांवाचा पंथ काढिला (१५३४). या जेझूइट पंथाच्या लोकांनीं ठिकठिकाणीं शाळा व कॉलेजें काढलीं. कांहीं युरोपच्या बाहेर अमेरिका व आशिया खंडांतील देशांत गेले व तेथें त्यांनीं रोमन कॅथलिकपंथीय ख्रिस्ती धर्माचा प्रसार केला. या पंथाच्या लोकांच्या स्वार्थत्यागानें व चिकाटीनें काम करण्याच्या पद्धतीनें युरोपमधील पुष्कळ लोकांचें रोमन कॅथलिक पंथाबद्दल अनुकूल मत होऊं लागलें.

त्याचप्रमाणें कॅथलिक पंथी लोकांनीं ट्रेंट येथें एक परिषद् भरविली

(१५४५-६५). या परिषदेनें प्रार्थनेच्या पुस्तकाची सुधारणा केली, लॅटिन भाषेंतील बायबलची नवी आवृत्ति प्रसिद्ध केली व पाखंडी मताच्या लोकांस शिक्षा करण्यासाठीं '**इन्क्विझेशन**' नांवाचें धार्मिक कोर्ट स्थापन केलें.

धार्मिक असहिष्णुता, छळ व युद्धें— ख्रिस्ती धर्मामध्यें दुफळी होऊन रोमन कॅथलिक व प्रॉटेस्टंट असे एकमेकांस विरोधी असे दोन पंथ निर्माण झाल्यावर ठिकठिकाणीं धार्मिक बाबतींत असहिष्णुता निर्माण होऊन या दोन्ही पंथांतील राज्यकर्ते आपल्या विरुद्ध असलेल्या पंथाच्या लोकांचा छळ करूं लागले व या धार्मिक प्रश्नांसंबंधीं निरनिराळ्या राष्ट्रांत १७ व्या शतकाच्या पूर्वार्धांत युद्धें झालीं. हीं युद्धें कांहीं काळानें बंद झालीं तरी एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत युरोपमध्यें धार्मिक बाबतींत सहिष्णुता पूर्णपणें स्थापन झाली नाहीं.

नवीन गोष्टींचा शोध

मध्ययुगाच्या उत्तरार्धांत कांहीं नवे शोध लागून, त्याचप्रमाणें कांहीं गोष्टींचा नवा उपयोग प्रचारांत येऊन युद्धकला, नौकानयन व ज्ञानाचा प्रसार या बाबतींत क्रान्ति झाली, व त्यामुळें जगाच्या इतिहासावर महत्त्वाचे परिणाम घडले.

स्फोटक (बंदुकीच्या) दारूचा शोध-तोफा व बंदुका—स्फोटक दारूची माहिती चिनी लोकांस फार पूर्वीपासून होती. पण चिनी लोक तिचा उपयोग फटाके, चंद्रज्योति, भुइनळे वगैरे करमणुकीच्या गोष्टी करण्याकडे करीत. विध्वंसक साधन म्हणून युद्धाच्या वेळीं तिचा उपयोग केला जात नसे. चिनी लोकांपासून या स्फोटक दारूची माहिती मंगोल लोकांस मिळाली. १३ व्या शतकांत मंगोल लोकांकडून युद्धाच्या वेळीं विध्वंसक साधन म्हणून तिचा उपयोग करण्यांत आला असावा. मंगोल लोकांमार्फत १३ व्या शतकामध्यें या स्फोटक दारूची माहिती युरोपियन लोकांस होऊन तिच्या मदतीनें १४ व्या शतकांत तोफा व बंदुका यांचा विध्वंसक साधन म्हणून उपयोग होऊं लागला. त्या वेळच्या तोफा व बंदुका ओबडधोबड असत, तरी त्यामुळें युद्धाच्या साधनां-

मध्यें क्रांति झाल्यासारखें झालें व या विध्वंसक साधनांमध्यें वाढ करण्याची युरोपमधील राजेरजवाड्यांमध्यें चढाओढ सुरू झाली. तोफा व बंदुका या नवीन साधनांमुळें धनुष्यबाण, भाला, तलवार हीं शस्त्रास्त्रें मागें पडलीं. त्याचप्रमाणें चिलखत घातलेल्या घोडेस्वारांचें व मोठमोठ्या किल्ल्यांचें महत्त्व कमी झालें; कारण बंदुकधारी व तोफा वापरणाऱ्या सैनिकांकडून चिलखती घोडेस्वाराचा पराभव करणें, त्याचप्रमाणें मोठमोठ्या किल्ल्यांची तटबंदी मोडून टाकणें शक्य झालें. युरोपखंडांतील राजेरजवाडे तोफा व बंदुका यांचा उपयोग युद्धाच्या वेळीं करूं लागले तरी भारत व आशिया खंडांतील इतर देशांतील राजेरजवाडे या बाबतींत मागासलेलेच राहिले.

छापण्याची कला—लांकडाचे ठसे करून त्यायोगें छापण्याच्या पद्धतीचा शोध चिनी लोकांस इ. स. पू. १ ल्या शतकांत लागला होता, व या पद्धतीनें ठसे करून चित्रें छापण्यांत येत. पण ९ व्या शतकापर्यंत पुस्तकांतील मजकूर छापण्याकडे या पद्धतीचा उपयोग केला जात नव्हता. पण यानंतर पुस्तकाच्या पृष्ठावरील मजकुराचा ठसा करून तो मजकूर छापण्याचा प्रघात चीनमध्यें रूढ झाला. युरोपमध्यें १२ व्या शतकांत अशाच पद्धतीनें छापीत. पण या पद्धतीनें मजकुरांत बदल करावयाचा असल्यास पहिला खोदलेला ठसा वायां जाऊन नवीन ठसा करावा लागे. तेव्हां या पद्धतींत सुधारणा करून दुसरी सोयीस्कर पद्धत अमलांत आणणें जरूर आहे असें वाटूं लागून या बाबतींत सुधारणा होत गेली. शेवटीं सुट्या अक्षरांचे ठसे करण्यांत येऊं लागले. या सुधारणेमुळें सुट्या अक्षरांच्या ठश्यांची वेगवेगळी मांडणी करतां येणें व हे ठसे निरनिराळ्या प्रकारच्या मजकुरासाठीं पुनः पुनः वापरतां येणें शक्य झालें. सुट्या अक्षरांचे ठसे करून छापण्याची पद्धत नक्की केव्हां सुरू झाली हें सांगतां येत नाहीं. पण इ. स. १४५० च्या सुमारास जर्मनीमध्यें मेंझ या ठिकाणीं **जॉन गूटेनबर्ग** (Gutenberg 1400–1468) हा गृहस्थ सुट्या अक्षरांच्या ठशांनीं आपल्या छापखान्यांत छापण्याचें काम करीत होता. इ. स. १४५४ मध्यें त्यानें सुट्या अक्षरांच्या ठशांनीं लॅटिन भाषेंत बायबल छापिलें. तेव्हां ही पद्धत सोयिस्कर असल्यामुळें तिचा इतर ठिकाणींही प्रसार होत गेला. इंग्लंडमध्यें **कॅक्स्टन** (Caxton) यानें या पद्धतीनें छापण्याचा छापखाना १४७७ मध्यें सुरू केला. भारतामध्यें १८ व्या शतकाच्या शेवटीं श्रीरामपूरच्या (कलकत्त्या-

जवळ) मिशनरी लोकांनीं या पद्धतीनें पहिल्यानें पुस्तक छापलें. सुट्या अक्षरांची लिपी उपयोगांत आणली गेल्यामुळें प्राचीन काळीं लेखनकलेंत जशी क्रान्ति झाली त्याप्रमाणें सुट्या अक्षरांच्या ठश्यामुळें (टाइप) छापण्याच्या कलेंत क्रान्ति झाली.

छापण्याच्या कलेमध्यें अशी सुधारणा होत असतां, ज्यावर मजकूर छापावयाचा त्या कागद करण्याच्या प्रकारामध्येंही सुधारणा होत गेली. प्राचीन काळचे इजिप्तमधील लोक, त्याचप्रमाणें ग्रीक व रोमन लोक लिहिण्याच्या कामीं पेपिरस या वनस्पतीपासून तयार केलेल्या पट्ट्या व भिंडोळीं वापरीत. महत्त्वाचे करारनामे व दस्तऐवज हे शेळीच्या किंवा मेंढीच्या कातड्यापासून तयार केलेल्या कातड्यावर (पार्चमेंट) लिहीत. पण हीं पेपिरसपासून तयार केलेलीं भिंडोळीं किंवा मेंढ्याच्या कातड्यापासून तयार केलेलें 'पार्चमेंट' हातानें लिहिण्याच्या दृष्टीनें सोयीचें असलें तरी छापण्याच्या दृष्टीनें सोयीचें नसे. पार्चमेंटला खर्चही खूप येई. तेव्हां छापण्याच्या दृष्टीनें उपयोगी पडेल अशा कागदाच्या बाबतींतही सुधारणा होत गेली. चिनी लोक इ. स. च्या २ ऱ्या शतकापासून रेशमापासून कागद तयार करीत. चिनी लोकांपासून अरब लोकांसही कागद करण्याची पद्धत माहीत झाली व ते रेशमाऐवजीं कापसापासून दमास्कस येथें कागद तयार करूं लागले. यानंतर युरोपमध्येंही अंबाडी, वाख यांपासून कागद तयार करण्यांत येऊं लागला. हा कागद नवीन शोध लाविलेल्या छापण्याच्या पद्धतीला अधिक उपयोगी होऊं लागला व त्यास त्यामुळें मागणीही खूप येऊं लागली.

इ. स. १४५० पर्यंतच्या काळांत बहुतेक सर्व ग्रंथ हस्तलिखित असत. अशा हस्तलिखित ग्रंथांची नक्कल करण्यास पुष्कळ वेळ लागे व त्यास पुष्कळ श्रमही पडत. तेव्हां अशी हस्तलिखित प्रत करण्यास खूप खर्च येई व त्याची किंमतही बरीच असे. तेव्हां श्रीमंत लोकांस, पैशाचें आनुकूल्य असलेल्या ग्रंथसंग्रहालयांस व विश्वविद्यालयांस असे हस्तलिखित ग्रंथ खरेदी करून आपल्या संग्रहीं ठेवतां येणें शक्य होई. त्यामुळें ज्ञानाचा प्रसार होणें कठीण जाई. पण सुट्या अक्षरांच्या टाईपनें (ठसा) छापण्याची पद्धत इ. स. १४५० नंतर सुरू झाल्यामुळें पुस्तकाच्या पुष्कळ प्रती व त्याही थोड्या वेळांत तयार करणें शक्य झालें व त्यामुळें पुस्तकांच्या किंमती पूर्वीच्या

मानानें पुष्कळच कमी झाल्या. त्यामुळें पुस्तकांचा संग्रह करणें पुष्कळांस शक्य होऊन ज्ञान हें बहुजन समाजाच्या आटोक्यांत येऊं लागलें व त्याचा फैलाव होण्यास मदत झाली. यानंतर गेल्या २–३ शतकांत यंत्रशक्तीनें छापण्याच्या कलेंत कितीतरी प्रगति झाली आहे.

नाविक कंपास—चिनी लोकांस नाविक कंपासाची इ. स. च्या ५ व्या शतकापासून माहिती होती. परंतु नौकानयनाकडे चिनी लोकांचें व राज्यकर्त्यांचें लक्ष नसल्यामुळें कंपासच्या साहाय्यानें नौकानयनामध्यें त्यांनीं प्रगति केली नाहीं. चिनी लोकांपासून अरब लोकांस कंपासची माहिती झाली व १३ व्या शतकांत अरब लोकांकडून युरोपमधील लोकांस नाविक कंपासाची माहिती झाली. कोणत्या बाजूस उत्तर दिशा आहे, हें पाहण्यासाठीं चिनी लोक एका टांगलेल्या सुईचा उपयोग करीत. या सुईस लोहचुंबकाचा स्पर्श केल्यावर ती सुई हलूं लागे, पण ती हलण्याचें थांबून स्थिर झाल्यावर ती उत्तर दिशा दाखवी. जमिनीपासून दूर समुद्रामध्यें असतांना अंधाऱ्या रात्रीं किंवा ढगानें सर्व आकाश व्याप्त होऊन सूर्य दिसेनासा झाल्यावर दिवसांही आपण कोणत्या दिशेस चाललों आहोंत हें कळणें नावाड्यास अवघड जाई. पण कंपासाच्या या शोधामुळें उत्तर दिशा नक्की कोणती हें समजणें शक्य झाल्यामुळें नावाड्यांची मोठी सोय झाली व नावाडी किनाऱ्यापासून खूप दूरवर भर समुद्रांत जाण्याचें धाडस करूं लागले. त्यामुळें मोठ्या महासागरापलीकडच्या प्रदेशांचा शोध लागण्याच्या कामीं मदत झाली. हा शोध माहीत नव्हता तेव्हां नावाड्यांस किनारा सोडून दूरवर जातां येत नसे व त्यांस किनाऱ्या किनाऱ्यानेंच आपलीं जहाजें हांकारावीं लागत.

सूर्य हा ग्रहमालेचा केंद्र—प्राचीन काळीं २ ऱ्या शतकांत अलेक्झांड्रिया येथें **टॉलेमी** (Ptolemy) नांवाचा ज्योतिषशास्त्रज्ञ होऊन गेला. त्यानें असें प्रतिपादिलें होतें कीं, पृथ्वी ही सर्व विश्वाच्या केंद्रस्थानीं आहे व चंद्र, सूर्य व तारे हे पृथ्वीभोंवतीं फिरतात. ही गोष्ट गृहीत धरून त्यानें पुष्कळ अनुमानें केलीं होतीं. टॉलेमीचें हें मत खरें आहे असेंच प्राचीन काळापासून मानण्यांत येत होतें. पण प्राचीन काळच्या कलाविद्यांचें १५ व्या शतकांत पुनरुज्जीवन झाल्यावर प्राचीन काळच्या इतर ग्रीक ज्योतिषशास्त्रज्ञांचींही मतें लोकांपुढें आलीं, व त्यावर आधारलेले असे कांहीं प्रयोग

पोलंडमधील ज्योतिषशास्त्रज्ञ **कोपर्निकस** (१४७४–१५४३) यानें केले व त्यास असें आढळून आलें कीं टॉलेमीचें मत चुकीचें आहे व सूर्य हा ग्रह-मालेचें केंद्र आहे व पृथ्वी वगैरे ग्रह सूर्याभोंवतीं फिरतात. कोपर्निकस याची या बाबतींत खात्री होऊन या नवीन सिद्धांतावर आधारलेलें एक पुस्तक त्यानें लिहिलें. पण टॉलेमीचें मत चुकीचें आहे असें म्हणणें पाखंडीपणाचें समजलें जाईल व त्याबद्दल पोपकडून शिक्षा होईल या भीतीनें कोपर्निकसला आपलें पुस्तक प्रसिद्ध करण्याचें धाडस झालें नाहीं. पण त्याच्या मृत्यूनंतर १५४३ मध्यें तें प्रसिद्ध करण्यांत आलें. यानंतर १७ व्या शतकांत **केपलर** या जर्मन शास्त्रज्ञानें व **गॅलिलिओ** या इटालियन शास्त्रज्ञानें कोपर्निकसाच्या मताचा पुरस्कार केला. गॅलिलिओनें १६०९ मध्यें एक दुर्बिण बनविली व त्यायोगें आकाशस्थ गोल पाहाण्याची व्यवस्था केली, व ते पहाण्यास किती-तरी शास्त्रज्ञ व विद्वान् येऊं लागले. केपलर यानें असें प्रतिपादलें कीं, ग्रह हे सूर्याभोंवतीं वर्तुळाकार फिरत नसून दीर्घ वर्तुळाकार फिरतात.

नवीन जलमार्गांचा व प्रदेशांचा शोध— मसाल्याच्या पदार्थां-ची आवश्यकता—प्राचीन : काळीं जगांत दूरदूरच्या भागांत राहणाऱ्या लोकांस एकमेकांविषयीं प्रत्यक्ष अशी फारच थोडी माहिती होती. पण गेल्या चारपांच शतकांत लागलेल्या शोधामुळें ही माहिती उपलब्ध झालेली आहे व ती विशेषतः युरोपमधील लोकांनीं इतर जगासंबंधीं मिळविली आहे. प्राचीन काळीं पूर्वेकडील भारत, सीलोन, जाव्हा, सुमात्रा वगैरे प्रदेशांतून उपलब्ध होणाऱ्या मसाल्याच्या पदार्थांवर युरोपमधील लोकांस अवलंबून रहावें लागे. मांसाचे पदार्थ टिकविण्यास व त्यांस रुचि आणण्यास हे मसाल्याचे पदार्थ अत्यंत आवश्यक असत. हे पदार्थ पहिल्यानें फिनीशियन व्यापारी, नंतर अरब व्यापारी यांच्यामार्फत हिंदी महासागर, अरबी समुद्र, इराणचें आखात, तांबडा समुद्र यामार्गें भूमध्यसमुद्राच्या पूर्व व आग्नेय किनाऱ्यापर्यंत येत व तेथून ते इटलीमधील व्हेनिस व जेनोआ येथील व्यापाऱ्यांमार्फत युरोपमधील निरनिराळ्या देशांत रवाना होत. हे जिन्नस अत्यंत आवश्यक असल्यामुळें त्यांस मागणीही खूप असे व त्यामुळें या व्यापारावर इटलीमधील व्हेनिस व जेनोआ हीं नगरराज्यें खूप गबर झालेलीं होतीं. येथील व्यापाऱ्यांचीं जहाजेंही खूप असून दर्यावर्दी कामांत ते पुढें आलेले होते. पण

१४५३ मध्यें पूर्व रोमन साम्राज्याचा नाश होऊन तुर्कांची सत्ता भूमध्य-समुद्राच्या पूर्व व आग्नेय किनाऱ्यावरील प्रदेशांवर स्थापन झाल्यामुळें व्हेनिस व जेनोआ येथील व्यापाऱ्यांच्या व्यापारास अडथळा येऊं लागला व युरोपमधील लोकांसही पूर्वेकडील मसाल्याच्या प्रदेशाकडे जाणारे नवीन जलमार्ग शोधून काढण्याची आवश्यकता वाटूं लागली.

मध्य आशिया व चीन यांकडे जाणारे युरोपियन लोक— मसाल्याचे पदार्थ पुरविणाऱ्या प्रदेशांप्रमाणें रेशीम पुरविणाऱ्या चीन देशासंबंधीही युरोपमधील लोकांस कुतूहल होतें व त्यासंबंधीं माहिती मिळविण्याचा त्यांनीं यापूर्वीच प्रयत्न केला होता. १३ व्या शतकांत आशिया खंडाच्या पश्चिम व उत्तर भागांत मंगोल लोकांची सत्ता स्थापन झाल्यावर त्यांच्यामध्यें ख्रिस्तीधर्माचा प्रसार करावा या उद्देशानें १२४५ च्या सुमारास एका साधूस पाठविण्यांत आलें होतें. हा साधु कॉंस्टाटिनोपल, काळा समुद्र व कॅस्पियन समुद्र या मार्गानें मंगोलियांत गेला व त्यानें मंगोल लोकांच्या बड्या खानाची (पुढाऱ्याची) भेट घेतली. त्यानें आपले अनुभव व प्रवासवृत्त लिहून ठेवलें व त्यामुळें त्या प्रदेशासंबंधींची युरोपियन लोकांची जिज्ञासा वाढूं लागली. मंगोल लोकांचा एक पुढारी कुबलाईखान याचें चीनवर राज्य स्थापन झाल्यावर व्हेनीसमधील पोलो बंधु हे व्यापारी खुष्कीच्या मार्गानें चीनला गेले व त्यांनीं कुबलाईखानाची भेट घेतली, व तें १२६९ मध्यें परत आले. या पोलोबंधूंनीं चीनला पुनः जाण्याचें ठरविलें व त्यांनीं त्यावेळीं त्यांच्यापैकीं एकाचा मुलगा **मार्को पोलो** (Marco Polo १२५४–१३२४) यासही आपल्या बरोबर घेतलें. ते आर्मेनिया, इराणच्या मार्गें चीनला जाण्यासाठीं निघाले (१२७१). त्यांनीं चीनमध्यें १७ वर्षें वास्तव्य केलें (१२७५–१२९२) व या काळांत त्यांनीं तेथील लोकांविषयीं माहिती मिळविली. यांपैकीं तरुण मार्कोपोलो याजवर कुबलाईलखानाची विशेष मर्जी होती व त्यानें त्यास आपल्या राज्यांतील पुष्कळ महत्त्वाच्या कामगिरीवर नेमलें. पोलो हे १२९५ मध्यें जाव्हा, सुमात्रा, भारत व इराण या मार्गें व्हेनिसला परत आले. यांपैकीं मार्को पोलो यानें आपलें प्रवासवृत्त लिहून ठेविलें. त्यावरून चीनसंबंधीं युरोपमधील लोकांस माहिती मिळून धाडसी प्रवासी व धर्मप्रसारक चीनला जाऊं लागले. पण १४५३ मध्यें पूर्व रोमनसाम्राज्य नष्ट

होऊन त्या ठिकाणीं तुर्कांची सत्ता स्थापन झाल्यामुळें खुष्कीच्या मार्गानें चीनला जाण्याचा मार्ग बंद झाला.

तेव्हां पूर्वेकडील प्रदेशांकडे मसाल्याचे पदार्थ मिळविण्यासाठीं त्याचप्रमाणें धर्मप्रसार करण्यास जाण्यासाठीं दुसरा मार्ग शोधून काढण्याची आवश्यकता युरोपियन लोकांस वाटूं लागली.

भारताकडे जाणाऱ्या जलमार्गाचा शोध (१४९८)—पूर्वेकडील प्रदेशाकडे जाणारा नवीन जलमार्ग शोधून काढण्याच्या कामीं युरोपमधील पोर्तुगॉल व स्पेन येथील राजकर्त्यांनीं बरेच प्रयत्न केले. पोर्तुगालचा राजा **हेन्री** (१३९४–१४६०) यानें या कामाकडे विशेष लक्ष असून त्यानें पोर्तुगालमध्यें एक नाविक शाळा काढली व नौकानयन कलेंत वाकबगार असलेल्या व्हेनीस व जेनोआ येथील धाडसी नावाड्यांस आश्रय देऊन समुद्रमार्गें दूरदूरच्या सफरी करण्यास उत्तेजन दिलें. आफ्रिका खंडास वळसा घालून पुढें गेल्यास भारत, मसाल्याचा प्रदेश व चीन यांकडे जाणारा मार्ग सांपडेल असें त्यांस वाटत होतें. पण आफ्रिका खंड किती मोठें आहे, त्यास वळसा घालतां येईल कीं नाहीं याबद्दल त्यांस कांहींच कल्पना नव्हती. सरतेशेवटीं १४८८ मध्यें (Bortholomeu Diaz) बार्टूलूमेऊ डिॲश या धाडसी नावाड्यानें आफ्रिकेच्या दक्षिण टोंकाचा शोध लाविला. या शोधानें भारताकडे व पूर्वेकडील प्रदेशाकडे जाणारा थेटचा जलमार्ग सांपडण्याची आशा वाटूं लागल्यानें आफ्रिकेच्या दक्षिण टोंकास 'केप ऑफ गुड होप'– चांगल्या आशेचें भूशिर–असें म्हणण्यांत येऊं लागलें. यानंतर आणखी प्रयत्न होऊन **वास्को-डी-गामा** हा आफ्रिका खंडाच्या दक्षिण टोंकास वळसा घालून किनाऱ्या किनाऱ्यानें पुढें गेल्यावर एका अरब नावाड्यानें भारताकडे जाण्याचा मार्ग त्यास दाखविला व तो १४९८ मध्यें भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील **कालिकत** बंदरीं आला. वास्को–डी–गामा यानें कालिकत येथील राजा झामोरीन याची मुलाखत घेतली. यानंतर पोर्तुगॉलचे व्यापारी व्यापार करण्यासाठीं या जलमार्गानें भारताकडे येऊं लागले.

अमेरिका खंडाचा शोध—प्राचीन काळीं पृथ्वीच्या आकारासंबंधींची लोकांची कल्पना पुष्कळ चुकीची होती. इ. स. च्या ३ ऱ्या शतकांत

अलेक्झांड्रिया येथें टॉलेमी हा एक ज्योतिष व भूगोलशास्त्रज्ञ होऊन गेला. पृथ्वी सपाट असून पृथ्वीच्या सभोंवतालीं समुद्राचें वेष्टन असावें अशी त्याची कल्पना होती व त्या कल्पनेवर आधारलेला पृथ्वीचा एक नकाशाही त्यानें तयार केला होता. भूगोलासंबंधीं जास्त माहिती असणाऱ्या शास्त्रज्ञाची ही समजूत होती, तर इतरांची ती कितीतरी चुकीची असेल. पण प्राचीन काळींही कांहीं शास्त्रज्ञांस पृथ्वी गोलाकार असावी असें वाटत होतें, पण या बाबतींत प्रत्यक्ष अनुभवानें ज्ञान मिळविणें त्या काळीं शक्य झालें नाहीं. नौकानयनशास्त्रांत प्रगति झाली नसल्यानें या बाबतींत प्रत्यक्ष जलपर्यटन करून अनुभव घेण्याचें धाडस कोणास झालें नाहीं. पण नौकानयनशास्त्रांत प्रगति होऊन नाविक कंपास वगैरे गोष्टींची माहिती झाल्यानें या बाबतींत प्रयत्न करावा असें अर्वाचीन युगाच्या सुरवातीस कांहीं धाडसी नावाड्यांस वाटूं लागलें. इटलीमधील जेनोआ येथील एक धाडसी नावाडी कोलंबस यास पृथ्वी गोलाकार असावी व युरोपच्या पश्चिमेकडील अटलांटिक महासागरांतून पुढें गेल्यास आपणांस भारताकडे जातां येईल असें वाटत होतें, पण आपल्या कल्पनेप्रमाणें या बाबतींत खर्च करून पश्चिमेकडे सफर करणें त्यास शक्य नव्हतें. तेव्हां आपल्या समजुतीप्रमाणें अशा प्रकारें प्रयत्न करण्यास युरापमधील एखाद्या राज्यकर्त्याकडून आपणांस मदत मिळते का, हें पहाण्यास तो पहिल्यानें पोर्तुगॉलच्या राजाकडे गेला. पण आफ्रिकेच्या दक्षिण किनाऱ्यास वळसा घालून भारत व चीन यांकडे जाणारा जलमार्ग शोधण्याचा त्याचा प्रयत्न सुरू असल्यामुळें कोलंबस यास त्याच्याकडून मदत मिळाली नाहीं. यानंतर कोलंबस स्पेनकडे गेला, व बरीच खटपट केल्यावर व आपली कल्पना तेथील राज्यकर्त्यांस पटवून दिल्यावर त्यास स्पेनकडून मदत मिळाली व तो १४९२ च्या ऑगस्टमध्यें तीन जहाजें घेऊन या सफरीवर निघाला. हीं जहाजें हल्लींच्या जहाजांच्या मानानें फारच लहान होतीं, तरी त्यांच्या साहाय्यानें ही सफर करण्याचें त्यानें धाडस केलें. पश्चिमेकडे अटलांटिक महासागरावरून दोन महिने सफर केली तरी जमीन दिसेना, त्यामुळें जहाजांवरील सर्व खलाशी निराश झालें व परत फिरण्यासाठीं कोलंबसला आग्रह करूं लागले. पण आणखी कांहीं दिवस प्रयत्न करावा असें वाटून तीं जहाजें तशींच पुढें नेत असतां १४९२ च्या ऑक्टोबरमध्यें **कोलंबस** व इतर खलाशी यांस जहाजांवरून लांबून जमीन दिसली. हा प्रदेश इंडियाचा

(भारत) भाग असावा असें वाटून त्यांनीं त्या प्रदेशास **इंडिज** असें नांव दिलें. पण तो प्रदेश म्हणजे भारताचा किंवा आशियाचाही भाग नसून मध्य **अमेरिका** खंडाच्या पूर्व किनाऱ्याजवळील वेस्ट इंडिज बेटांपैकीं बहामा या बेटाचा भाग होता. पण याबद्दल कोलंबस यास कांहींच कल्पना नव्हती; व आपणांस शोध लागलेला प्रदेश हा इंडियाचा (भारताचा) भाग आहे असें त्यास वाटत होतें. अशाप्रकारें या नवीन प्रदेशाचा शोध लावल्यावर कोलंबस परत स्पेनला गेला. यानंतर कोलंबसनें १४९३–१५०३ च्या दरम्यान या प्रदेशाकडे आणखी सफरी करून मध्य अमेरिकेचा शोध लाविला.

कॅबट याच्या सफरी—कोलंबसप्रमाणें इटलीमधील जॉन कॅबट व त्याचा मुलगा सेबॅस्टिअन कॅबट या धाडसी नावाड्यांनीं इंग्लंडचा राजा ७ वा हेन्री याची मदत मिळवून पश्चिमेकडे अटलांटिक महासागरांतून सफर केली व १४९७ मध्यें उत्तर अमेरिकेचा शोध लाविला.

कॅब्रेलच्या सफरी—कॅब्रेल या पोर्तुगीज धाडसी नावाड्यानें पश्चिमेकडे अटलांटिक महासागरांतून सफर करून इ. स. १५०० मध्यें दक्षिण अमेरिकेचा शोध लाविला व तो प्रदेश पोर्तुगाल या देशाच्या मालकीचा झाला असें जाहीर केलें. हा शोध लागलेला प्रदेश म्हणजे दक्षिण अमेरिकेंतील ब्राझिल हा प्रदेश होय.

अमेरिगो व्हेस्प्यूसी (Amerigo Vespucci) कोलंबस, कॅबट, कॅब्रेल या धाडसी नावाड्यांनीं शोध लाविलेले प्रदेश भारताचा (इंडिया भाग) आहे अशी या सर्वांची कल्पना होती म्हणून तेथील लोकांस 'इंडियन्स' असें त्यांच्याकडून म्हणण्यांत येई. इटलीमधील फॉरेन्स येथील एक धाडसी नावाडी अमेरिगो व्हेस्प्यूसी यानें पोर्तुगाल व स्पेन येथील राजांच्या पदरीं कांहीं दिवस नोकरी केल्यावर इ. स. १५०० च्या सुमारास अमेरिकेच्या किनाऱ्याकडे कांहीं सफरी केल्या व त्या प्रदेशासंबंधानें कांहीं लिखाण प्रसिद्ध केलें व असें प्रतिपादलें कीं हा नवीन शोध लागलेला प्रदेश इंडियाचा (भारताचा) व आशियाचा भाग नसून तें एक नवीनच खंड आहे. त्याच्या लिखाणाचा युरोपमध्यें पुष्कळ प्रसार झाला व हें एक नवीनच खंड असल्याचें त्यानें पहिल्यानें प्रतिपादिल्यामुळें या नवीन खंडास त्याच्या अमेरिगो या नांवावरून **अमेरिका** असें म्हणण्यांत येऊं लागलें.

माजेलॅन (Magellan १४८०–१५२१)— इ. स. १५१९ मध्यें फर्डिनंड माजेलॅन या धाडसी नावाड्यानें स्पेनच्या राजाच्या आश्रयानें आपलें जहाज स्पेनपासून पश्चिमेच्या दिशेनें अटलांटिक महासागरांतून पण खूप दक्षिणेकडून हाकारिलें व दक्षिण अमेरिकेला वळसा घालून तसेंच पुढें चालविलें. तें नंतर पॅसिफिक महासागर ओलांडून फिलीपाइन बेटांजवळ आलें. त्या ठिकाणीं चकमक होऊन माजेलॅन हा मारला गेला. पण त्याचीं जहाजें त्याच्या बरोबरच्या इतर नावाड्यांनीं तशींच पुढें हाकारिलीं व तीं आशिया खंडाच्या दक्षिणेकडून आफ्रिकेच्या दक्षिण टोंकास वळसा घालून १५२२ मध्यें स्पेनला परत आलीं. अशाप्रकारें पृथ्वीभोंवतीं प्रदक्षिणा घातली गेल्यानें पृथ्वी सपाट नसून गोलाकार आहे हें प्रत्यक्ष अनुभवानें सिद्ध झालें. त्याचप्रमाणें अमेरिका हा प्रदेश आशियाचा भाग नसून तें एक निराळेंच खंड आहे, हेंही स्पष्ट झालें.

युरोपमधील राष्ट्रांचीं व्यापारी ठाणीं, प्रदेशविस्तार व वसाहती

(१४९२–१७४० सुमारें)

पोर्तुगॉलचीं व्यापारीं ठाणीं, प्रदेशविस्तार व वसाहती— (१४९८–१७४०) वास्को-डी-गामा यानें भारताकडे जाणाऱ्या जलमार्गाचा शोध लाविल्यावर (१४९८) पोर्तुगॉलचीं व्यापारीं जहाजें भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील कालिकत व इतर बंदरांकडे जाऊं लागलीं. भारतामध्यें त्यावेळीं अनेक स्वतंत्र लहानमोठीं राज्यें होतीं. दक्षिण भारतामध्यें विजयानगरचें राज्य, बहामनी राज्य व त्याच्या शाखा, झामोरीनचें राज्य व कोचीनचें राज्य वगैरे राज्यें होतीं. तेव्हां त्यांपैकीं भारताच्या पश्चिमेकडील समुद्रकिनाऱ्यावरील असणाऱ्या राज्यांशीं तह करून पोर्तुगॉलनें त्यांच्या बंदरांत आपलीं व्यापारी ठाणीं स्थापन करण्याची व व्यापार करण्याची परवानगी मिळविली. यानंतर पोर्तुगॉलचीं जहाजें युरोपमधील व्यापारी माल घेऊन भारतांतील बंदरांत जाऊं लागलीं व भारतांतील मसाल्याचे पदार्थ, कापसाचें तलम कापड व इतर जिनसा घेऊन परत पोर्तुगॉलला जाऊं लागलीं. हा माल पोर्तुगीज व्यापाऱ्यांकडून खरेदी करून तो युरोपमधील बाजारपेठांत विकण्यासाठीं युरोपमधील डच, इंग्लिश, जर्मन

व्यापारी पोर्तुगॉलच्या लिस्बन बंदरीं येऊं लागले. या मालास बरीच किंमत येऊं लागल्यामुळें हा व्यापार पोर्तुगॉलला फारच किफायतशीर होऊं लागला. पूर्वेकडील प्रदेशांशीं हा व्यापार यापूर्वी अरब व्यापाऱ्यांच्या हातीं होता, पण या व्यापारांत पोर्तुगॉलनें हात घातल्यामुळें अरब व्यापाऱ्यांचा व्यापार खूपच खालावला. तेव्हां पोर्तुगॉलला विरोध करावा व त्यांच्या व्यापारी ठाण्यांचें उच्चाटन करावें या हेतूनें अरबांनीं आपलीं लढाऊ जहाजें त्या बाजूकडे पाठविलीं. पूर्वेकडील व्यापाराचे बाबतींत अरबांकडून आपणांस विरोध होणार हें जाणून पोर्तुगीज लोकांनींही आपलीं लढाऊ जहाजें व आरमारी अधिकारी पूर्वेकडे पाठविले. तेव्हां पोर्तुगीज व अरब यांच्या आरमारामध्यें भारताच्या पश्चिमेकडील अरबी समुद्रांत अनेक चकमकी झाल्या व त्यांत कांहीं वेळां अरबांना जय तर कांहीं वेळां पोर्तुगीजांना जय मिळत जाऊन सरतेशेवटीं पोर्तुगॉलनें अरबांच्या आरमाराचा पराभव केला व अरबी समुद्रांतील साकोट्रा व इराणी आखातांतील आर्मूझ हीं महत्त्वाचीं ठिकाणें जिंकून घेऊन अरबी समुद्रावर आपलें वर्चस्व स्थापन केलें. त्याचप्रमाणें पोर्तुगॉलनें विजापूरच्या आदिलशाही राज्याकडून भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील **गोवें** हें ठिकाण घेऊन तें आपल्या पूर्वेकडील व्यापाराचें केंद्र केलें (१५१०). यानंतर पोर्तुगीज लोकांनीं सीलोन, जाव्हा, सुमात्रा, मलाया या पूर्वेकडील प्रदेशांच्या किनाऱ्यांकडे जाऊन तेथील अरबांच्या सत्तेचें उच्चाटन केलें. यानंतर पोर्तुगीज जहाजें चीनकडे गेलीं व चीनशीं व्यापार करण्याची परवानगी मिळवून चीनच्या पूर्व किनाऱ्यावरील कँटननजीक मकाओ (Macao) येथें आपलें व्यापारी ठाणें स्थापन केलें. तसेंच १५४२ मध्यें जपानशीं व्यापार करण्याची परवानगी मिळवून जपानच्या किनाऱ्यावर आपलें व्यापारी ठाणें स्थापन केलें. व्यापाराप्रमाणें ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्यासाठीं रोमन कॅथलिक पंथी ख्रिस्ती धर्मोपदेशकही या पोर्तुगीज ठाण्यांकडे जाऊं लागले. भारतांतील गोवें हें ठिकाण पोर्तुगीजांच्या पूर्वेकडील व्यापाराचें, त्याचप्रमाणें आरमाराचें केंद्र करण्यांत आलें. भारतांत त्यांनीं मच्छलीपट्टण, काशिमबझार, हुगळी, ढाक्का; दीव, दमण, वसई, मुंबई या ठिकाणीं आपल्या वखारी काढल्या. यापैकीं गोवें येथें वस्ती करण्यासाठींही पोर्तुगॉलमधून कांहीं लोक जाऊं लागले, तसेंच तेथें ख्रिस्ती धर्मोपदेशकही आले व त्यांनीं रोमन कॅथलिक पंथी ख्रिस्ती

धर्माचा प्रसार केला. युरोपपासून भारताकडे जाणाऱ्या या जलमार्गावर पोर्तुगीज लोक आपलाच हक्क सांगून युरोपमधील इतर राष्ट्रांस त्या मार्गानें पूर्वेकडील प्रदेशांशीं व्यापार करण्यास आपल्या आरभारी सामर्थ्यानें प्रतिबंध करीत. अशारीतीनें १६ व्या शतकाच्या पूर्वार्धांत पूर्वेकडील व्यापाराच्या बाबतींत पोर्तुगॉल हें राष्ट्र पुढें आलें व या किफायतशीर व्यापारावर खूप गबर झालें.

पोर्तुगालमधील कॅबेल यानें इ. स. १५०० मध्यें दक्षिण अमेरिकेंतील ब्राझील या विस्तृत प्रदेशाचा शोध लावला होता. त्या ठिकाणीं लोकवस्ती फारच तुरळक असून तेथील लोक मागासलेले होते. त्या प्रदेशांतही आपली वसाहत करण्यासाठीं पोर्तुगॉलहून धाडसी लोक जाऊ लागले. तेथील जर्मानी त्या ठिकाणच्या लोकांकडून लागवडीस आणून पोर्तुगीज लोकांनीं तेथें आपल्या वसाहती स्थापल्या. पोर्तुगीज लोकांनीं तेथील स्त्रियांशीं लग्नसंबंध केले व अशारीतीनें दक्षिण अमेरिकेंत ब्राझिल या प्रदेशांत मिश्र प्रजा निर्माण होऊं लागली.

अशा रीतीनें पश्चिमेकडे दक्षिण अमेरिकेंतील ब्राझिल व पूर्वेकडील भारत, मसाल्याचीं बेटें, चीन व जपान यांच्याशीं पोर्तुगालचा संबंध येऊन पूर्वेकडील किफायतशीर व्यापारामुळें पोर्तुगॉल हें राष्ट्र गबर झाल्यामुळें युरोपमधील व्यापारी पेशाच्या हॉलंड (डच) इंग्लंड वगैरे राष्ट्रांस पोर्तुगॉलचा हेवा वाटावयास लागला व पोर्तुगॉलच्या विरोधास न जुमानता पोर्तुगॉलनें शोधून काढलेल्या मार्गानेंच पूर्वेकडील प्रदेशांशीं व्यापार करावा, असें वाटून १७ व्या शतकाच्या सुरवातीपासून त्यांचे त्या दिशेनें प्रयत्न सुरू झाले.

स्पेनच्या वसाहती व साम्राज्य (१४९२–१७४०)— स्पेनच्या राजाच्या आश्रयानें कोलंबस यानें १४९२ मध्यें मध्य अमेरिकेचा शोध लावून १५०२ पर्यंतच्या काळांत त्या प्रदेशाकडे आणखी सफरी केल्या. मध्य अमेरिका मेक्सिको व दक्षिण अमेरिकेंतील पश्चिम किनाऱ्यावरील पेरू या प्रदेशामध्यें लोकवस्ती असून तेथील लोक सांस्कृतिक बाबतींत बरेंच पुढें गेले होते. त्यांची संस्कृति इ. स. पू. १५०० पासूनची प्राचीन होती. यापैकीं दक्षिण अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील पेरू या प्रदेशांतील लोकांच्या संस्कृतीस 'इनकस संस्कृति' असें म्हणण्यांत येई व ती अधिक प्रगत व उच्च दर्जाची होती. या

सर्वांस रूपें, सोनें, तांबें या धातूंचा शोध लागला होता, पण लोखंडाचा शोध लागला नव्हता. शेती करणें, घरें व मोठमोठ्या इमारती बांधणें, शेंकडो मैल लांबीचे रस्ते बांधणें, त्यांस माहीत होतें. त्यांनीं राज्यसंस्थाही स्थापन केलेल्या होत्या. स्पेनच्या राजाच्या आश्रयानें मध्य अमेरिकेचा व त्या लगतच्या प्रदेशाचा शोध लागल्यावर धाडसी स्पॅनिअर्ड लोक त्या प्रदेशाकडे गेले. तेथील लोक सुधारलेले होते; पण त्यांस तोफा बंदुका वगैरे शस्त्रास्त्रांची कांहींच माहिती नव्हती. त्यांची वस्ती तुरळक होती. तेव्हां स्पेनमधील धाडसी सरदार **कॉर्टेस** (Cortes) व त्याच्या बरोबरच्या लोकांनीं बंदुकीच्या सहाय्यानें १५१९ मध्यें मेक्सिको व मध्य अमेरिका हे प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणले. **पिझारो** (Pizarro) या स्पॅनिश सरदारानें १५३१ मध्यें पेरू हा प्रदेश जिंकून घेतला. हे प्रदेश जिंकून घेतांना या लोकांनीं क्रूरपणाचीं कृत्यें केलीं. अशाच रीतीनें आणखी बरेंच धाडसी स्पॅनिअर्ड लोक अमेरिकेंत गेले व त्यांनीं तेथील बराच प्रदेश व वेस्ट इंडिज बेटांपैकीं कांहीं बेटें आपल्या वर्चस्वाखालीं आणलीं. यानंतर स्पेनमधून बरेच स्पॅनिअर्ड लोक अमेरिकेंतील त्यांच्या वर्चस्वाखालीं असलेल्या प्रदेशांत वसाहत करण्यासाठीं गेले. तेथें शेती करण्यास मुबलक जमीन होती. तरी त्याकडे त्यांनीं पहिल्यानें फारसें लक्ष दिलें नाहीं. रुपें, सोनें यांच्या खाणी तेथें असून या जिनसा विपुल प्रमाणांत तेथें सांपडत असल्यामुळें त्या जमा करण्याकडेच त्यांचें लक्ष असे. तेथील मूळच्या पुरुषवर्गास तें खाणींतील काम करण्यास, त्याचप्रमाणें मजूर म्हणून इतर कामास लावीत. या स्पॅनिअर्ड लोकांनीं तेथील स्त्रियांशीं लग्नसंबंध केले, त्यामुळें त्यांनीं वस्ती केलेल्या मध्य अमेरिका, मेक्सिको, पेरू, वेस्ट इंडिज बेटें, फ्लॉरिडा वगैरे ठिकाणीं मिश्र प्रजा निर्माण झाली. या ठिकाणीं स्पेनमधून स्पॅनिअर्ड लोक त्या मानानें थोडे गेल्यामुळें या मिश्र प्रजेची संख्या तेथें बरीच वाढत गेली व हे लोक तेथें बहुसंख्याक झाले. स्पॅनिअर्ड लोकांनीं तेथें रोमन कॅथलिक पंथीय ख्रिस्ती धर्माचा प्रसार केला व शाळा कॉलेजें काढून शिक्षणाचाहि प्रसार केला. त्याचप्रमाणें त्यांनीं तेथें गांवें व शहरें वसविलीं. त्यामुळें तेथील लोक ख्रिस्ती धर्मी व स्पॅनिश भाषा बोलणारे झाले. हलके हलके तेथें शेतकीचीही वाढ होत गेली.

स्पेनच्या आश्रयाखालीं माजेलॅन यानें सफर करून इ. स. १५१९ मध्यें

धर्माचा प्रसार केला. युरोपपासून भारताकडे जाणाऱ्या या जलमार्गावर पोर्तुगीज लोक आपलाच हक्क सांगून युरोपमधील इतर राष्ट्रांस त्या मार्गानें पूर्वेकडील प्रदेशांशीं व्यापार करण्यास आपल्या आरभारी सामर्थ्यानें प्रतिबंध करीत. अशारीतीनें १६ व्या शतकाच्या पूर्वार्धांत पूर्वेकडील व्यापाराच्या बाबतींत पोर्तुगॉल हें राष्ट्र पुढें आलें व या किफायतशीर व्यापारावर खूप गबर झालें.

पोर्तुगालमधील कॅब्रेल यानें इ. स. १५०० मध्यें दक्षिण अमेरिकेंतील ब्राझील या विस्तृत प्रदेशाचा शोध लावला होता. त्या ठिकाणीं लोकवस्ती फारच तुरळक असून तेथील लोक मागासलेले होते. त्या प्रदेशांतही आपली वसाहत करण्यासाठीं पोर्तुगॉलहून धाडसी लोक जाऊ लागले. तेथील जमीनी त्या ठिकाणच्या लोकांकडून लागवडीस आणून पोर्तुगीज लोकांनीं तेथें आपल्या वसाहती स्थापल्या. पोर्तुगीज लोकांनीं तेथील स्त्रियांशीं लग्नसंबंध केले व अशारीतीनें दक्षिण अमेरिकेंत ब्राझिल या प्रदेशांत मिश्र प्रजा निर्माण होऊं लागली.

अशा रीतीनें पश्चिमेकडे दक्षिण अमेरिकेंतील ब्राझिल व पूर्वेकडील भारत, मसाल्याचीं बेटें, चिन व जपान यांच्याशीं पोर्तुगालचा संबंध येऊन पूर्वेकडील किफायतशीर व्यापारामुळें पोर्तुगॉल हें राष्ट्र गबर झाल्यामुळें युरोपमधील व्यापारी पेशाच्या हॉलंड (डच) इंग्लंड वगैरे राष्ट्रांस पोर्तुगॉलचा हेवा वाटावयास लागला व पोर्तुगॉलच्या विरोधास न जुमानता पोर्तुगॉलनें शोधून काढलेल्या मार्गानेंच पूर्वेकडील प्रदेशांशीं व्यापार करावा, असें वाटून १७ व्या शतकाच्या सुरवातीपासून त्यांचे त्या दिशेनें प्रयत्न सुरू झाले.

स्पेनच्या वसाहती व साम्राज्य (१४९२–१७४०)— स्पेनच्या राजाच्या आश्रयानें कोलंबस यानें १४९२ मध्यें मध्य अमेरिकेचा शोध लावून १५०२ पर्यंतच्या काळांत त्या प्रदेशाकडे आणखी सफरी केल्या. मध्य अमेरिका मेक्सिको व दक्षिण अमेरिकेंतील पश्चिम किनाऱ्यावरील पेरू या प्रदेशामध्यें लोकवस्ती असून तेथील लोक सांस्कृतिक बाबतींत बरेंच पुढें गेले होते. त्यांची संस्कृति इ. स. पू. १५०० पासूनची प्राचीन होती. यापैकीं दक्षिण अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील पेरू या प्रदेशांतील लोकांच्या संस्कृतीस 'इनकस संस्कृति' असें म्हणण्यांत येई व ती अधिक प्रगत व उच्च दर्जाची होती. या

सर्वांस रूपें, सोनें, तांबें या धातूंचा शोध लागला होता, पण लोखंडाचा शोध लागला नव्हता. शेती करणें, घरें व मोठमोठ्या इमारती बांधणें, शेंकडो मैल लांबीचे रस्ते बांधणें, त्यांस माहीत होतें. त्यांनीं राज्यसंस्थाही स्थापन केलेल्या होत्या. स्पेनच्या राजाच्या आश्रयानें मध्य अमेरिकेचा व त्या लगतच्या प्रदेशाचा शोध लागल्यावर धाडसी स्पॅनिअर्ड लोक त्या प्रदेशाकडे गेले. तेथील लोक सुधारलेले होते; पण त्यांस तोफा बंदुका वगैरे शस्त्रास्त्रांची कांहींच माहिती नव्हती. त्यांची वस्ती तुरळक होती. तेव्हां स्पेनमधील धाडसी सरदार **कॉर्टेस** (Cortes) व त्याच्या बरोबरच्या लोकांनीं बंदुकीच्या सहाय्यानें १५१९ मध्यें मेक्सिको व मध्य अमेरिका हे प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणले. **पिझारो** (Pizarro) या स्पॅनिश सरदारानें १५३१ मध्यें पेरू हा प्रदेश जिंकून घेतला. हे प्रदेश जिंकून घेतांना या लोकांनीं क्रूरपणाचीं कृत्यें केलीं. अशाच रीतीनें आणखी बरेंच धाडसी स्पॅनिअर्ड लोक अमेरिकेंत गेले व त्यांनीं तेथील बराच प्रदेश व वेस्ट इंडिज बेटांपैकीं कांहीं बेटें आपल्या वर्चस्वाखालीं आणलीं. यानंतर स्पेनमधून बरेच स्पॅनिअर्ड लोक अमेरिकेंतील त्यांच्या वर्चस्वाखालीं असलेल्या प्रदेशांत वसाहत करण्यासाठीं गेले. तेथें शेती करण्यास मुबलक जमीन होती. तरी त्याकडे त्यांनीं पहिल्यानें फारसें लक्ष दिलें नाहीं. रुपें, सोनें यांच्या खाणीं तेथें असून या जिनसा विपुल प्रमाणांत तेथें सांपडत असल्यामुळें त्या जमा करण्याकडेच त्यांचें लक्ष असे. तेथील मूळच्या पुरुषवर्गास तें खाणींतील काम करण्यास, त्याचप्रमाणें मजूर म्हणून इतर कामास लावीत. या स्पॅनिअर्ड लोकांनीं तेथील स्त्रियांशीं लग्नसंबंध केलें, त्यामुळें त्यांनीं वस्ती केलेल्या मध्य अमेरिका, मेक्सिको, पेरू, वेस्ट इंडिज बेटें, फ्लॉरिडा वगैरे ठिकाणीं मिश्र प्रजा निर्माण झाली. या ठिकाणीं स्पेनमधून स्पॅनिअर्ड लोक त्या मानानें थोडें गेल्यामुळें या मिश्र प्रजेची संख्या तेथें बरीच वाढत गेली व हे लोक तेथें बहुसंख्याक झाले. स्पॅनिअर्ड लोकांनीं तेथें रोमन कॅथलिक पंथीय ख्रिस्ती धर्माचा प्रसार केला व शाळा कॉलेजें काढून शिक्षणाचाहि प्रसार केला. त्याचप्रमाणें त्यांनीं तेथें गांवें व शहरें वसविलीं. त्यामुळें तेथील लोक ख्रिस्ती धर्मी व स्पॅनिश भाषा बोलणारे झाले. हलके हलके तेथें शेतकीचीही वाढ होत गेली.

स्पेनच्या आश्रयाखालीं माजेलॅन यानें सफर करून इ. स. १५१९ मध्यें

आशियां खंडांतील फिलीपाईन बेटांचा शोध लाविला होता. तेव्हां स्पेनने १५४२ मध्यें ती बेटेंही आपल्या वर्चस्वाखालीं आणलीं व १५७१ मध्यें मॅनिला शहराची स्थापना करून तें तेथील राजधानीचें ठिकाण केलें. येथें रोमन कॅथलिक पंथी ख्रिस्ती धर्माचा प्रसार केल्यामुळें तेथील लोक ख्रिस्ती धर्मी झाले. तसेंच त्यांच्यांत शिक्षणाचाही प्रसार करण्यांत आला.

अशारीतीनें स्पेनचें १६ व्या शतकांत मध्य व दक्षिण अमेरिकेंतील विस्तृत प्रदेशावर व आशियाखंडांतील फिलीपाईन बेटांवर वर्चस्व स्थापन होऊन मोठें साम्राज्य स्थापन झालें. यांपैकीं अमेरिकेंतील प्रदेशांतून तेथील खाणींत सांपडलेलें रुपें व सोनें हे मौल्यवान पदार्थ घेऊन स्पॅनिश जहाजें मोठ्या प्रमाणांत स्पेनला येऊं लागलीं. त्यामुळे स्पेन हें लष्करी व आरमारी दृष्टीनें जसे युरोपमध्यें प्रबळ राष्ट्र होतें, तसें तें श्रीमान् राष्ट्रहि झालें. औद्योगिक बाबतींत स्पेन हें मागासलेलें असल्यामुळें अमेरिकेंतून संपत्तीचा ओघ स्पेनकडे येत चालला, तरी त्याची ही संपत्ति युरोपमधील उद्योगप्रधान अशा हॉलंड, इंग्लंड, जर्मनींतील संस्थानें वगैरे देशांतील माल खरेदी करण्यांत खर्च होऊन युरोपमधील इतर राष्ट्रेंही हलके हलके गबर होऊं लागलीं. अशी स्थिति असतां युरोपमध्यें समुद्रावरील वर्चस्वासंबंधानें, त्याचप्रमाणें धार्मिक प्रश्नासंबंधानें २ ऱ्या फिलीपच्या कारकीर्दीतील रोमन कॅथलिक पंथीय स्पेन व एलिझाबेथच्या कारकीर्दीतील प्रॉटेस्टंट पंथीय इंग्लंड यांच्यामध्यें वैमनस्य सुरू झालें. इंग्लंडमधील धाडसी नावाड्यांनीं अमेरिकेहून सोनें, रूपें घेऊन येणारीं स्पेनचीं जहाजें लुटलीं. तेव्हां इंग्लंडवर स्वारी करण्यासाठीं २ रा फिलीप यानें एक मोठें आरमार तयार केलें व इंग्लंडवर स्वारी केली. पण त्यावेळीं समुद्रावर मोठें वादळ होऊन स्पेनचीं बरींच अवजड जहाजें निकामीं झालीं व इंग्लंडच्या लहान व चपळ जहाजांनीं व धाडसी नावाड्यांनीं स्पेनच्या जहाजांवर हल्ले करून इंग्लिश खाडींत झालेल्या आरमारी लढाईत स्पेनचा पराभव केला (१५८८). या पराभवामुळें स्पेनची समुद्रावरील सत्ता नाहींशी होऊन इंग्लंड हें राष्ट्र आरमारी सत्तेच्या बाबतींत पुढें आलें. तसेंच हॉलंड हें राष्ट्रही व्यापार व समुद्रावरील सत्तेच्या बाबतींत पुढें येऊं लागलें.

डचांची (हॉलंडमधील लोक) व्यापारी ठाणीं व प्रदेशविस्तार (१६०० ते १७४०)—डच लोक रहात असलेल्या देशास 'नेदर्लंड' किंवा

सखल प्रदेश असें म्हणत. हा देश रोमन कॅथलिक पंथी २ रा फिलीप या स्पेनच्या राजाच्या वर्चस्वाखालीं होता. डच लोक हे प्रॉटेस्टंट पंथाचे होते. या नेदर्लंडच्या दक्षिणेकडील कांहीं भागांस बेल्जम असें म्हणत व तेथील लोक रोमन कॅथलिक पंथाचे होते. स्पेनच्या वर्चस्वापासून आपला देश स्वतंत्र करावा अशी डच लोकांची इच्छा होती. त्यासाठीं त्यांनीं प्रयत्न केला व त्यास यश येऊन १५८१ मध्यें त्यांनीं आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें; व त्यांच्या बेल्जम सोडून उरलेल्या भागास 'हॉलंड' असें म्हणण्यांत येऊं लागलें. डच लोकांनीं व्यापारविषयक बाबतींत व दर्यावर्दी कामांत बरीच प्रगति केली होती. पूर्वेकडील प्रदेशाचा व्यापार पोर्तुगालच्या हातांत असून त्या व्यापारावर पोर्तुगॉल गबर झाले होते व त्याबद्दल त्यांस पोर्तुगालचा हेवा वाटे. भारताकडे जाणाऱ्या येटच्या जलमार्गावर पोर्तुगाल लोक आपलाच हक्क सांगत व इतर कोणत्याही राष्ट्रास त्या मार्गानें जाण्यास प्रतिबंध करीत. परंतु या त्यांच्या विरोधास न जुमानतां पोर्तुगालनें शोध लाविलेल्या मार्गानेंच जाऊन पूर्वेकडील प्रदेशांशीं व्यापार करण्याचें डच लोकांनीं ठरविलें. १५८० मध्यें पोर्तुगालवर स्पेनचें वर्चस्व स्थापन झालेलें होतें. यानंतर १५८८ मध्यें स्पेनच्या प्रबळ अशा आरमाराचा इंग्लंडनें पराभव केल्यावर स्पेनची समुद्रावरील सत्ता नष्ट झाली. तेव्हां या संधीचा फायदा घेऊन डचांचीं जहाजें पूर्वेकडील प्रदेशाकडे जाऊं लागलीं. पूर्वेकडील प्रदेशांशीं व्यापार करण्यासाठीं त्यांनीं १६०२ मध्यें 'डच ईस्ट इंडिज' ही कंपनी स्थापन केली. स्पेनची आरमारी सत्ता कमी होऊन स्पेनच्या वर्चस्वाखालील पोर्तुगालची आरमारी सत्ताही कमी झाल्यामुळें डच लोकांनीं पूर्वेकडील प्रदेशांत असलेल्या सीलोन, मलाया, जाव्हा, सुमात्रा या पोर्तुगीजांच्या व्यापारी ठाण्यांवर व वसाहतींवर हल्ले करून तीं ठिकाणें जिंकून घेतलीं व त्या प्रदेशांवर आपलें वर्चस्व बसविलें. त्याचप्रमाणें आपल्या वर्चस्वाखालीं असलेल्या पूर्वेकडील प्रदेशांकडे जाण्याच्या मार्गावरील मध्यवर्ती ठिकाण म्हणून १६६१ मध्यें आफ्रिकेच्या दक्षिण टोकांवर **केप कॉलनी** ही वसाहत स्थापन केली. त्यामुळें पूर्वेकडील मसाल्याच्या बेटांकडील किफायतशीर व्यापार डचांच्या हातीं आला व तेथें **बटेव्हिया** हें त्यांनीं आपलें केंद्र केलें. पूर्वेकडील व्यापारामुळें हॉलंड हें राष्ट्र सधन झालें.

पूर्वेकडील व्यापाराप्रमाणें डच लोकांनीं उत्तर अमेरिकेमध्येंही न्यू हॉलंड, न्यू अमस्टरडाम या आपल्या वसाहती स्थापन केल्या. भारतामध्यें डच लोकांनीं

१६७० पर्यंतच्या काळांत पोर्तुगीज लोकांकडून मच्छलीपट्टण, कासिमबझार, डाक्का, हुगळी हीं ठिकाणें जिंकून घेतलीं. तेव्हां पोर्तुगीजांच्या ताब्यांत भारतांतील गोवें, दीव, दमण व वसई एवढींच ठिकाणें राहिलीं.

फ्रान्सच्या वसाहती व प्रदेशविस्तार (१६०० ते १७४०)—युरोपमधील राजकारणाकडे फ्रान्सचें अधिक लक्ष असल्यामुळें अमेरिका खंडांतील प्रदेशामध्यें वसाहती स्थापन करण्याच्या कामीं फ्रान्सनें पहिल्यानें फारसें लक्ष दिलें नाहीं. पण १७ व्या शतकाच्या सुरवातीपासून फ्रान्सनें त्यांत लक्ष घातलें. **सॅम्युएल चॅपलेन** यानें उत्तर अमेरिकेंत सेंट लॉरेन्स या नदीच्या काठीं क्वेबेक ही वसाहत १६०८ मध्यें स्थापन केली. उत्तर अमेरिकेंत तेथील रेड इंडियन्स लोकांशीं तेथील लोकरीच्या बाबतींत व्यापार करण्यासाठीं १६२७ मध्यें न्यू फ्रान्स ही कंपनी फ्रान्समध्यें स्थापन झाली. १६४० मध्यें मॉंट्रेल येथें फ्रेंचांनीं वसाहत स्थापन केली. या वसाहतींना कॅनडा असें म्हणण्यांत आलें. **ला साली** या धाडसी गृहस्थानें मिसीसीपी या नदीच्या सर्भोवतालच्या प्रदेशाची पहाणी केली व या नदीच्या मुखाजवळ न्यू आर्लेन्सपासून उत्तरेकडे कॅनडापर्यंतच्या भागांत आपल्या वसाहती स्थापन केल्या.

पूर्वेकडील प्रदेशांशीं व्यापार करण्यासाठीं १६६४ मध्यें फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनी स्थापन झाली. भारतामध्यें या कंपनीनें सुरत, मच्छलीपट्टण, माही, पांडेचरी वगैरे ठिकाणीं आपलीं ठाणीं स्थापन केलीं. १७२१ मध्यें फ्रेंचानीं हिंदी महासागरांतील मॉरिशस बेट आपल्या ताब्यांत घेतलें.

इंग्लंडचीं व्यापारी ठाणीं, प्रदेश विस्तार व वसाहती (१६००–१७४०)—इ. स. १४९७ मध्यें इंग्लंडच्या आश्रयाखालीं कॅबेट यानें उत्तर अमेरिकेचा शोध लाविला होता; पण त्या ठिकाणीं वसाहत स्थापन करण्याचा इंग्लंडनें बराच काळ प्रयत्न केला नाहीं. इंग्लंडचें स्पेनशीं वैर असल्यामुळें इंग्लंडमधील धाडसी नावाडी स्पेनच्या अमेरिकेंतील प्रदेशाकडून रुपें, सोनें वगैरे मौल्यवान पदार्थ घेऊन येणाऱ्या जहाजांवर हल्ले करीत. ड्रेक या इंग्लंडच्या धाडसी नावाड्यानें १५७७–८० च्या दरम्यान पृथ्वीप्रदक्षिणा केली. १५८४–९० च्या दरम्यान इंग्लंडमधील धाडसी नावाडी **सर वाल्टर रॅले** यानें उत्तर अमेरिकेमध्यें व्हर्जिनिया ही वसाहत स्थापन करण्याचा प्रयत्न केला,

पण तेथील वाइट हवा व तेथील लोकांशीं युद्धें झाल्यामुळें त्यास या कामीं यश आलें नाहीं. पण १५८८ मध्यें इंग्लंडनें स्पेनच्या प्रबळ आरमाराचा पराभव केल्यावर स्पेनचें समुद्रावरील वर्चस्व नाहींसें झालें, व दर्यावर्दी कामांत इंग्लंड पुढें आलें व वसाहती स्थापन करण्याच्या कामांत इंग्लंडकडून जोरानें प्रयत्न सुरू झाले.

१६०७ मध्यें इंग्लंडमधील व्यापाऱ्यांनीं उत्तर अमेरिकेंत जेम्स टाऊन ही वसाहत स्थापन केली. १६२० मध्यें इंग्लंडमधील प्युरिटन पंथी (प्रॉटेस्टंट पंथांतील उपपंथ) धाडसी लोकांनीं उत्तर अमेरिकेंत '**न्यू इंग्लंड**' ही वसाहत स्थापन केली. यानंतर पुढील शंभर वर्षांच्या काळांत उत्तर अमेरिकेमध्यें इंग्लंडच्या एकूण १३ वसाहती स्थापन झाल्या. या वसाहतींत कापूस, तंबाखू वगैरे पिकांची लागवड होऊं लागली. तसेंच मध्य अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यालगतच्या वेस्ट इंडीज बेटांपैकीं कांहीं बेटेंही इंग्लंडच्या वर्चस्वाखालीं येऊन तेथें ऊंस, तंबाखू, कापूस वगैरे पदार्थांची लागवड होऊं लागली. हीं वेस्ट इंडिज बेटें तेथील उष्ण हवेमुळें वसाहत करण्यास सोयीचीं नव्हतीं. अमेरिकेंतील इंग्लिश वसाहतींत व वेस्ट इंडीज बेटांवर शेतीचें काम करण्यास मजुरांची गरज वाटूं लागली. तेव्हां मध्य आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यालगतच्या प्रदेशांतील निग्रो या धट्ट्याकट्ट्या लोकांस गुलाम म्हणून पकडून, उत्तर अमेरिकेंतील इंग्लिश वसाहतींतील व वेस्ट इंडीज बेटांवरील मळ्यांत पाठविण्याचा प्रघात सुरू झाला, व अशारीतीनें हजारों निग्रो लोकांस आफ्रिकेंतून उत्तर अमेरिकेंत आणविण्यांत आलें. गुलाम म्हणून आणलेल्या या निग्रो लोकांस फार वाईट रीतीनें वागविलें जाई.

पूर्वेकडील प्रदेशांशीं व्यापार करण्यासाठीं इंग्लंडमध्यें १६०० मध्यें ईस्ट इंडिया कंपनी स्थापन करण्यांत आली. या कंपनीनें १६०० ते १७४० पर्यंतच्या कालांत भारतामध्यें सुरत, मद्रास, कलकत्ता, मुंबई वगैरे ठिकाणीं आपलीं व्यापारीं ठाणीं स्थापन केलीं व त्यांचा भारताशीं व्यापार सुरू झाला. इंग्लंडप्रमाणें भारतांत पोर्तुगॉल, हॉलंड व फ्रान्स या युरोपियन राष्ट्रांचींहि व्यापारी ठाणीं होतीं. यांपैकीं पोर्तुगॉलनें आपला व्यापार वाढविण्याचा पुढें फारसा प्रयत्न केला नाहीं. डच लोकांनीं आपलें लक्ष पूर्वेकडील मसाल्याच्या बेटांकडे केंद्रित केलें. तेव्हां इंग्लंड व फ्रान्स यांचीं व्यापारीं ठाणीं भारतामध्यें

पुढें आलीं व त्यांनीं व्यापाराप्रमाणें येथील राजेरजवाड्यांच्या अंतस्थ कलहांत हात घातल्यामुळें इंग्लंड व फ्रान्स यांच्यामध्यें स्पर्धा उत्पन्न झाली (१७४०).

युरोपियन राष्ट्रांचें आपल्या वसाहतीसंबंधीं धोरण—युरोपमधील पोर्तुगॉल, स्पेन, हॉलंड, फ्रान्स व इंग्लंड या राष्ट्रांनीं अमेरिका खंडांत आपल्या वसाहती स्थापन केल्या होत्या. या वसाहती ज्या राष्ट्रांतील लोकांनीं स्थापन केल्या होत्या त्या देशांतील लोक तेथें कायमचे जाऊन रहात म्हणून त्यांस वसाहती असे म्हणत. स्पेनची मेक्सिको, मध्य अमेरिका, पेरू, अर्जेंटिना या वसाहती, पोर्तुगॉलची ब्राझिल ही वसाहत या वसाहतीमध्यें स्पेन व पोर्तुगॉल या देशांतून थोडे लोकच गेले व जे गेले त्यांपैकीं बऱ्याच लोकांनीं तेथील स्त्रियांशीं लग्नें केल्यामुळें तेथें मिश्र प्रजा निर्माण झाली. फ्रान्स, इंग्लंड व डच यांच्या उत्तर अमेरिकेंत स्थापन झालेल्या वसाहतींत मातृभूमींतून बरेच लोक रहावयास गेले. पण त्यांनीं तेथील स्त्रियांशीं लग्नसंबंध केले नाहींत, म्हणून या राष्ट्रांच्या वसाहतींत मिश्र प्रजा निर्माण झाली नाहीं. पण उत्तर अमेरिकेंतील इंग्लंडच्या वसाहतींत निग्रो गुलामांची संख्या बरीच होती. युरोपियन राष्ट्रांच्या सर्व वसाहतींसंबंधानें मातृभूमीचें धोरण साधारणपणें पुढील प्रकारचें होतें. पुष्कळ धाडस प्राणहानी व खर्च करून या वसाहती स्थापन केलेल्या असल्यामुळें व त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी मातृभूमीकडे असल्यामुळें या वसाहती मातृभूमीच्या फायद्यासाठींच असावयास पाहिजेत. वसाहतींनीं मातृभूमींत न पिकणारा कच्चा माल पिकवावा व तो मातृभूमीसच पाठवावा. मातृभूमींत तयार होणारा पक्का माल वसाहतींनीं खरेदी करावा. पक्का माल तयार करण्याच्या बाबतींत मातृभूमीशीं चढाओढ करूं नये. वसाहतींनीं परराष्ट्रांशीं किंवा त्यांच्या वसाहतींशीं व्यापार करूं नये. मातृभूमीकडून वसाहतींचा कारभार करण्यासाठीं जे गव्हर्नर येतील त्यांनीं बसविलेले कर व जकाती द्याव्यात. युरोपमधील सर्व राष्ट्रांचें आपल्या वसाहतीसंबंधानें वरील प्रकारचें धोरण होतें, तरी इतर राष्ट्रांच्या मानानें इंग्लंडमधील लोकांस आपल्या देशाच्या कारभारांत अधिक हक्क असल्यामुळें इंग्लंडचें आपल्या वसाहतीसंबंधाचें धोरण इतर राष्ट्रांच्या मानानें अधिक उदार होतें. इंग्लंडच्या वसाहतींत तेथील कायदे करण्यासाठीं एक कायदेमंडळ असून त्यांत दोन सभा असत. त्यांपैकीं खालच्या सभेंतील सभासद तेथील लोकांनीं निवडलेले असत व वरच्या सभेंतील सभासद गव्हर्नरनें नेमलेले असत. या दोन

सभांत मतभेद झाल्यास गव्हर्नरच्या मताप्रमाणें राज्यकारभार करण्यांत येई. तेव्हां या कायदेमंडळाचा अधिकार सल्लागार स्वरूपाचा होता. पण इंग्लंडखेरीज इतर राष्ट्रांच्या वसाहतींस एवढाही अधिकार नव्हता.

वसाहती व व्यापारी ठाणीं स्थापन झाल्यामुळें युरोपवर झालेला परिणाम—युरोपमधील राष्ट्रांचीं अमेरिका खंड व पूर्वेकडील प्रदेश या ठिकाणीं वसाहती व व्यापारी ठाणीं स्थापन झाल्यामुळें युरोपचें युरोपच्या बाहेरील प्रदेशांशीं दळणवळण वाढलें व व्यापार व उद्योगधंदे यांस उत्तेजन मिळालें. स्पेनमार्फत अमेरिकेंतील रुपें, सोनें वगैरे मौल्यवान जिनसा स्पेनमध्यें आल्या व व्यापाराच्या योगानें त्यांचा युरोपमधील इतर राष्ट्रांत प्रसार झाला. त्यामुळें निरनिराळ्या राष्ट्रांतील पैशाचा सांठा वाढून मालाच्या किंमती व मजुरीचे दर वाढले व पैशाचा भरपूर पुरवठा झाल्यानें उद्योगधंद्यांत वाढ झाली. चहा, कॉफी, कोको, बटाटे, उसाची साखर, तंबाखू, मसाल्याचे निरनिराळे पदार्थ, मका, कापूस वगैरे पदार्थ मोठ्या प्रमाणांत उपयोगांत येऊं लागले व त्यामुळें लोकांच्या सुखसोई व रहाणींचें मान वाढलें. वसाहती स्थापणें व दूरदूरचे प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं ठेवणें किफायतशीर आहे असें वाटून ज्या राष्ट्रांच्या वसाहती नव्हत्या किंवा फारच थोड्या होत्या अशा राष्ट्रांसही आपण व्यापारी ठाणीं व वसाहती स्थापाव्यात व प्रदेशविस्तार करावा असें वाटूं लागलें. त्यामुळें व्यापार, वसाहती व अंकित प्रदेश या बाबतींत निरनिराळ्या राष्ट्रांत स्पर्धा सुरू झाली व त्यामुळें युद्धाचे प्रसंग अधिक येऊं लागले.

सारांश

प्राचीन कलाविद्यांचें पुनरुज्जीवन—मध्ययुगांत लोकांमध्यें कूपमंडूक वृत्ति, ऐहिक गोष्टीबद्दल उदासीनता. कान्स्टांटिनोपलच्या पाडावानंतर तेथील विद्वान पंडितांचें युरोपमध्यें आगमन. प्राचीन ग्रीक विद्वानांच्या ग्रंथांचें अध्ययन—चिकित्सा वृत्तीची वाढ, अंधश्रद्धा टाकणें, नवीन ज्ञान मिळविण्याची इच्छा. वैचारिक क्रान्ति.

ख्रिस्ती धर्मसुधारणा—पोप व धर्माधिकारी यांची चैनीची वागणूक. बायबलला संमत नसलेले आचरण. त्यांत बदल करण्याची जरूरी—जॉन विक्लिफ याचा १४ व्या शतकांत प्रयत्न, लोक अज्ञानी म्हणून अपयश. इरॅझमस याचा ग्रंथ. पोपची पातकापासून मुक्त करणारीं पत्रकें—त्यांस मार्टिन ल्यूथरचा विरोध व

त्यास धर्मबहिष्कृत. ह्विंगली व कॅल्व्हिन यांचाही विरोध. पोपच्या धार्मिक सत्तेस विरोध करणारे वेगवेगळे प्रॉटेस्टंट पंथ व त्यांचा प्रसार. युरोपमधील राष्ट्रांत धार्मिक बाबतींत दोन तट. इग्नेशिअस लायोला यानें जेझुइट पंथ स्थापून रोमन कॅथलिक पंथाचा प्रसार. धार्मिक असहिष्णुता व युद्धें.

नवीन गोष्टींचा शोध—

बंदुकीची (स्पोटक) **दारू**–पूर्वीपासून चिनी लोकांस माहीत. १३ व्या शतकांत युरोपमधील लोकांस माहीत–तोफा व बंदुका यांत उपयोग–चिलखती घोडेस्वारांचें व किल्यांचें महत्त्व नाहींसें.

छापण्याची कला–ठसे करून (ब्लॉक) छापण्याची कला चीनमध्यें इ. स. पू. १ ल्या शतकांत. ९ व्या शतकांत छापील पुस्तक. सुट्या अक्षरांचे ठसे व छापण्याची पद्धत जर्मनींत गूटेनबर्ग (१४५०), इंग्लंडमध्यें कॅक्स्टन १४७७. इतरत्र प्रसार. कागद तयार करण्याच्या कलेंत वाढ. छापील पुस्तकें स्वस्त. ज्ञानाचा फैलाव व तें बहुजन समाजाच्या आटोक्यांत.

नाविक कॉंपस–चिनी लोकांस ५ व्या शतकापासून माहीत. महासागरांत असतांना दिशा निश्चित करण्यास उपयोगी. चिनी लोकांपासून अरब लोकांस व त्यांच्यापासून १३ व्या शतकांत युरोपमधील लोकांस माहीत. भर महासागरांतून दूर दूरच्या सफरी करणें शक्य.

सूर्य हा ग्रहमालेचा मध्यः–ग्रीक टॉलेमीच्या विरुद्ध कोपर्निकस याचा सिद्धांत (१५४३). इटलींत केपलर. गॉलिलिओची दुर्बिण, आकाशस्थ गोल पहाणें.

नवीन प्रदेशांचा शोध–युरोपमधील लोकांस मसाल्याच्या पदार्थांची आवश्यकता. पश्चिम आशियांत तुर्कांचें वर्चस्व, तांबडा समुद्र व इराणचें आखात या बाजूच्या मार्गास अडथळा; व्हेनिस व जिनेव्हा यांच्या व्यापारास ओहटी. भारताकडे व पूर्वेकडील प्रदेशाकडे जाण्यास दुसऱ्या मार्गाची जरूरी. पोर्टुगॉलच्या आश्रयानें वास्कोडिगामा यास आफ्रिकेस वळसा घालून येटच्या जलमार्गाचा शोध १४९८. स्पेनच्या आश्रयानें कोलंबसाच्या पश्चिमेकडून जाणाऱ्या मार्गाचा शोध लावण्याच्या प्रयत्नांत अमेरिकेचा शोध १४९२. पृथ्वी प्रदक्षिणा माजेलॅन.

युरोपियन राष्ट्रांचीं व्यापारी ठाणीं व वसाहती-पोर्तुगीज—भारतांत दीव-दमण, गोवें, मुंबई. अरबांचा पराभव. अरबी व हिंदीमहासागरावर वर्चस्व. सीलोन, जाव्हा, सुमात्रा, मलाया, मकाओ. धर्मोपदेशक पाठविणें. व्यापारामुळें गबर. द. अमेरिकेंत ब्राझील; तेथें मिश्र प्रजा, शेतकी. **स्पेन**–मध्य व दक्षिण अमेरिकेंतील प्रदेश, वेस्ट इंडिज व फिलीपाईन बेटांवर स्पेनचें वर्चस्व. मध्य व दक्षिण अमेरिकेंत स्पेनच्या वसाहती, तेथील स्त्रियांशीं लग्नसंबंध, मिश्र प्रजा,

या सर्व प्रदेशांत कॅथलिकपंथी खिस्ती धर्माचा प्रसार. विस्तृत साम्राज्य. १५८८ मध्यें इंग्लडनें स्पॅनिश आरमाराचा पराभव केल्यावर स्पेनच्या सत्तेस, उतरती कळा. **डच**–१७ व्या शतकांत पुढें. पोर्तुगीजांचा पराभव. सीलोन जाव्हा, सुमात्रा हीं डचांकडे. केप कॉलनी वसाहत. व्यापार वृद्धि. **ब्रिटिश**–भारतांत सुरत, मच्छलपिट्टण, मद्रास, कलकत्ता, मुंबई हीं व्यापारीं ठाणीं. फ्रेंचांशीं स्पर्धा. उत्तर अमेरिकेंत वसाहती–तंबाकू कापूस यांचीं लागवड. **फ्रेंच**–उत्तर अमेरिकेंत वसाहती–कॅनडा, मिसीसिपीलगत. रेड इंडियन्सशीं केसाळ कातड्यांचा व्यापार. भारतांत पांडेचरी, माही, चंद्रनगर व्यापारी ठाणीं. ब्रिटिशांशीं स्पर्धा.

युरोपियन राष्ट्रांचें वसाहतीसंबंधीं धोरण–मातृभूमीनें पैसा, प्राणहानी, हालअपेष्टा सोसून वसाहती स्थापन केलेल्या. वसाहतींचा कारभार मातृभूमीच्या फायद्याच्या दृष्टीनें चालविणें. वसाहतींच्या व्यापारावर नियंत्रण.

प्रकरण १० वें

युरोपमधील प्रमुख राज्यें, फ्रान्समधील राज्यक्रान्ति व तिचे जागतिक परिणाम

(इ. स. १५००–१८१५)

(१) स्पेन (२) फ्रान्स (३) ग्रेट ब्रिटन (४) रशिया, (५) आस्ट्रिया, (६) प्रशिया, (७) फ्रान्समधील राज्यक्रान्ति व तिचे जागतिक परिणाम.

प्रास्ताविक—इ. स. १५०० पासून १८१५ पर्यंतच्या म्हणजे सुमारें ३०० वर्षांच्या काळांत युरोपमध्यें स्थापन झालेलीं प्रादेशिक राज्यें संघटित व प्रबल होत गेलीं. १५ व्या शतकाच्या शेवटीं यांपैकीं प्रमुख, संघटित व प्रबल असें राष्ट्र म्हणजे स्पेनचें होतें. या राष्ट्राच्या आश्रयानें कोलंबसानें अमेरिका खंडाचा शोध लाविल्यावर तिकडील प्रदेश स्पेननें आपल्या वर्चस्वाखालीं आणला. स्पेनच्या शेजारच्या पोर्टुगॉल या राज्याच्या आश्रयानें वास्को-डि-गामा यानें भारताकडे थेट जाणाऱ्या जलमार्गाचा शोध लाविल्यानंतर पोर्तुगॉलनें आपलीं व्यापारीं ठाणीं पूर्वेकडील प्रदेशांत स्थापन केलीं, व त्यामुळें पोर्तुगॉल हें राष्ट्र पूर्वेकडील व्यापाराचे बाबतींत प्रसिद्धीस आलें व युरोपची बाजारपेठ झालें. यामुळें या दोन्हीं राष्ट्रांचें वैभव खूप वाढलें. हे नवीन शोध लाविलेले प्रदेश व तिकडे जाणारे जलमार्ग यांवर आपलाच हक्क आहे असें या राष्ट्रांकडून प्रतिपादन करण्यांत येऊन त्या मार्गाचा इतर युरोपियन राष्ट्रांनीं उपयोग केला तर त्यास प्रतिबंध करण्यांत येईल असें त्यांनीं जाहीर केलें. अशी परिस्थिति असतां १६ व्या शतकाच्या पूर्वार्धांत जर्मनीमध्यें ख्रिस्ती धर्मसुधारणेची चळवळ सुरू होऊन ती युरोपमधील इतर राष्ट्रांतही पसरली व या धार्मिक प्रश्नासंबधीं युरोपमधील राष्ट्रांत रोमन कॅथलिक व प्रॉटेस्टंट असे दोन तट पडले. स्पेनकडे रोमन कॅथलिक पंथाचें व इंग्लंडकडे प्रॉटेस्टंट पंथाचें पुढारीपण येऊन या दोन राष्ट्रांमधील वितुष्ट वाढत गेलें. तेव्हां स्पेनचा राजा दुसरा फिलीप यानें इंग्लंडवर

स्वारी करण्यासाठीं मोठें बलाढ्य आरमार पाठविलें, पण त्या आरमाराचा पराभव झाल्यामुळें स्पेनची आरमारी सत्ता व समुद्रावरील वर्चस्व नाहींसें झालें, व इंग्लंडची आरमारी सत्ता वाढूं लागली. तेव्हां या संधीचा फायदा इंग्लंड, हॉलंड व फ्रान्स या राष्ट्रांनीं घेऊन स्पेन व पोर्टुगॉल यांच्या विरोधास न जुमानतां त्यांनीं शोध लाविलेल्या मार्गांनीं अमेरिका खंडांत वसाहती स्थापन करण्याचे व पूर्वेकडील प्रदेशांत आपलीं व्यापारीं ठाणीं स्थापन करण्याचे प्रयत्न चालविले. १६ व्या शतकामध्यें ट्यूडर घराण्याच्या अमदानींत इंग्लंडमधील राजकर्त्यांची सत्ता अनियंत्रित झाली. पण त्यांचें धोरण सरदार व अमीर उमराव यांचें वर्चस्व कमी करून इंग्लंडचा व्यापार, उद्योगधंदे व कलाकौशल्य यांस उत्तेजन देण्याकडे असल्यामुळें त्यांची अनियंत्रित सत्ताही लोकप्रियच झाली. फ्रान्समधील राजकर्त्यांची सत्ता अनियंत्रित झाली, व १७ व्या शतकांत १४ व्या लुईच्या कारकीर्दींत फ्रान्सचें वैभव व दरारा खूप वाढून फ्रान्स हें युरोपमध्यें प्रमुख व बलाढ्य असें राष्ट्र झालें. १७ व्या शतकामध्यें स्टुअर्ट घराण्याच्या अमदानींत राजाच्या अनियंत्रित सत्तेस इंग्लंडमध्यें विरोध होऊन १ ल्या चार्लस राजास देशद्रोही म्हणून फांशीं देण्यांत आल्यावर तेथें लोकसत्ताक राज्यपद्धति स्थापन करण्याचा प्रयत्न यशस्वी झाला नाहीं, तरी पुढें २ ऱ्या जेम्स राजास पदच्युत करून पार्लमेंटच्या कायद्यानें विल्यम व मेरी यांस राज्यपद दिलें गेल्यानें इंग्लंडमध्यें राज्यक्रान्ति झाली (१६८९) व इंग्लंडमध्यें लोकनियंत्रित राजसत्ता किंवा सदनशीर राजसत्ता स्थापन होऊन व्यक्तिस्वातंत्र्य, लोकशाही व जनतेस जबाबदार असणारी राजसत्ता स्थापन होण्यास मदत झाली. जर्मनीचें प्रबल व संघटित राष्ट्र न होतां तें लहानमोठ्या अशा अनेक संस्थानांमध्यें विभागलेलें राहिलें, व पवित्र रोमन सम्राटाची सत्ता कमकुवतच राहिली. तरी तेथील निरनिराळ्या संस्थानांपैकीं आस्ट्रिया व प्राशिया हीं दोन संस्थानें प्रबल होऊन जर्मनीमधील वर्चस्वासंबंधीं त्यांच्यांत स्पर्धा सुरू झाली. इटलीचें एकीकरण न होतां, इटलीचा बराच भाग निरनिराळ्या परकीय राष्ट्रांमध्यें विभागलेलाच राहिला. कॉन्स्टॉंटिनोपल जिंकून घेतल्यावर उस्मानी तुर्कांनीं आग्नेय युरोपमध्यें आपलें साम्राज्य विस्तृत केलें. मागासलेल्या अशा रशिया या राष्ट्राची रोमॅनॉफ घराण्याच्या अमदानींत सत्ता वाढून युरोपमधील राष्ट्रांत त्याचें महत्त्व वाढूं लागलें. युरोपमध्यें अशी परिस्थिति असतां व्यापार, वसाहती व

साम्राज्यवृद्धि या बाबतींत १८ व्या शतकांत इंग्लंड व फ्रान्स या राष्ट्रांमध्यें स्पर्धा सुरू होऊन या दोन राष्ट्रांमध्यें झालेल्या सप्तवार्षिक युद्धांत (१७५६–६३) फ्रान्सची उत्तर अमेरिकेंतील विस्तृत अशी कॅनडा वसाहत इंग्लिशांनीं जिंकून घेतली व भारतांतील फ्रान्सचें महत्त्व कमी केलें; त्यामुळें इंग्लंडच्या वसाहती व साम्राज्य यामध्यें वाढ झाली. पण इतर युरोपियन राष्ट्रांप्रमाणें इंग्लंडनें आपल्या वसाहतींचा कारभार वसाहतींच्या हितसंबंधापेक्षां वसाहती या मातृभूमीच्या फायद्यासाठीं आहेत या धोरणानें चालविल्यामुळें उत्तर अमेरिकेंतील इंग्लिश वसाहतींमध्यें असंतोष निर्माण होऊन त्यांनीं फ्रान्स व स्पेन या राष्ट्रांची मदत मिळवून इंग्लंडशीं युद्ध केलें व त्या स्वतंत्र झाल्या (१७८३).

अशी स्थिति असतां १७ व्या शतकांमध्यें वैभवशाली असलेल्या फ्रान्स या राष्ट्राची स्थिति १८ व्या शतकामध्यें खालावत जाऊन तेथील राजाच्या हातीं असलेल्या अनियंत्रित सत्तेविरुद्ध तेथें मोठा प्रक्षोभ होऊन राज्यक्रान्ति झाली (१७८९) व स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुत्व या घोषणांनीं सर्व युरोपखंड हादरून गेलें. या प्रक्षोभानंतर फ्रान्समध्यें लोकसत्ताक राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न अयशस्वी ठरून तेथें अंदाधुंदी व अराजकता निर्माण झाली, व शेवटीं नेपोलियनच्या नेतृत्वाखालीं अनियंत्रित राजसत्ता स्थापन होऊन सर्व युरोपवर नेपोलियनचें वर्चस्व स्थापन होऊं लागलें, पण त्यास इंग्लंडच्या नेतृत्वाखालीं युरोपमधील राष्ट्रांनीं विरोध केल्यामुळें नेपोलियनचा पराभव झाला. यानंतर युरोपमधील राज्यकर्त्यांच्या हातीं फ्रान्सच्या राज्यक्रान्तीच्या पूर्वीप्रमाणें अनियंत्रित सत्ता आली, व त्यांनीं आपापल्या राज्यांत प्रतिगामी धोरण अंमलांत आणिलें. पण फ्रान्सच्या राज्यक्रान्तीनें उद्भूत झालेल्या स्वातंत्र्य, समता, विश्वबंधुत्व या कल्पना नाहींशा न होतां त्या धुमसत राहिल्या व त्यामुळें १९ व्या शतकांत युरोपमधील निरनिराळ्या राष्ट्रांत क्रांतिकारक चळवळी होऊन पुढें लोकशाही व राष्ट्रीयत्व स्थापन होण्यास मदत झाली.

स्पेन

(इ. स. १४९२–१८१५)

स्पेन— १४९२ मध्यें मूर लोकांच्या वर्चस्वाखालील ग्रॅनडा हा भाग जिंकून घेतल्यावर स्पेनचें एक संघटित राष्ट्र स्थापन झालें. याच सुमारास स्पेनच्या

आश्रयानें सफरीवर गेलेल्या कोलंबस यास अमेरिकेचा शोध लागल्यावर १६ व्या शतकाच्या सुरवातीपासून स्पॅनिश लोक तिकडे जाऊं लागले व त्यांनीं मध्य व दक्षिण अमेरिकेंतील विस्तृत प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणिला; व तेथें सोनें व रूपें या मौल्यवान जिनसांच्या खाणीं सांपडून स्पेनचें राष्ट्र गबर होऊं लागलें. स्पेनचा राजा फर्डिनंड हा कर्तबगार होता, व त्यानें आपल्या मुत्सद्देगिरीनें युरोपमधील राष्ट्रांत स्पेनला महत्वाचें स्थान प्राप्त करून दिलें. त्यास पुत्र संतान नसून मुली होत्या व त्यापैकीं वडील मुलगी जोअॅना (Joanna) हिचें आस्ट्रियाचा हॅप्सबर्ग घराण्यांतील राजा, व पवित्र रोमन साम्राज्याचा बादशहा मॅक्झिमीलन याचा एकुलता एक मुलगा फिलीप याच्याशीं लग्न झालें. या लग्नसंबंधापासून झालेला चार्लस हा १५१६ मध्यें स्पेनचा राजा झाला (१५१६–५६). अशा रीतीनें स्पेनच्या राजघराण्याचें आस्ट्रियाच्या हॅप्सबर्ग घराण्याशीं नात्याचा संबंध आला; व त्यानंतर १५१९ मध्यें चार्लस यास पवित्र रोमन साम्राज्याचा बादशहा म्हणून नेमण्यांत आल्यामुळें युरोपमध्यें स्पेनचें महत्त्व व दरारा खूप वाढला. १६ व्या शतकाच्या पूर्वार्धांत जर्मनीमध्यें ख्रिस्ती धर्मसुधारणेची चळवळ सुरू झाली व ती सर्वत्र पसरून युरोपमधील राष्ट्रांत या धार्मिक प्रश्नासंबंधीं दोन गट पडले, व स्पेनकडे रोमन कॅथलिक पंथाच्या गटाचें पुढारीपण आलें.

२ रा फिलीप (इ. स. १५५६–१५९८)—५ व्या चार्लसनें इ.स.१५५६ मध्यें राजत्याग केला व त्यानंतर त्याचा पुत्र फिलिप हा २ रा फिलीप म्हणून स्पेनचा राजा झाला. चार्लसचा भाऊ फर्डिनड हा आस्ट्रियाचा राजा व पवित्र रोमन साम्राज्याचा बादशहा झाला. २ रा फिलीप हा कर्तबगार होता. तो रोमन कॅथलिक पंथाचा कट्टा अनुयायी होता. त्याचप्रमाणें अनियंत्रितपणें राज्यकारभार करण्याचा आपणास अधिकार आहे असें त्यास वाटत होतें. त्यामुळें स्पेनमधील अमीरउमरावांचें 'कोर्टस्' (सल्लागार मंडळ) यांचा सल्ला न घेतां त्यानें लोकांवर कर बसविले. स्पेनमधील उद्योगधंद्यावर निर्बंध घातले. प्रॉटेस्टंट पंथाचा व पाखंडी लोकांचा नायनाट करण्यासाठीं त्यानें 'इन्क्विझेशन' नांवाचें धर्मकोर्ट अस्तित्वांत आणलें. या कोर्टामार्फत रोमन कॅथलिक पंथी नसलेल्या लोकांचा छळ करण्यांत आला व पुष्कळांस देहांत शिक्षा देण्यांत आली. त्यामुळें स्पेनमध्यें स्थाईक झालेल्या इस्लामधर्मीय मूर लोकांस त्याचप्रमाणें ज्यू लोकांस

स्पेन देश सोडावा लागला. हे लोक शेतकी, निरनिराळे उद्योगधंदे व पेढ्यांचा (बँकांचा) व्यवहार वगैरे बाबतींत वाकबगार होते, व ते स्पेन देश सोडून गेल्यामुळें स्पेनचें औद्योगिक बाबतींत नुकसान झालें.

२ रा फिलीप यानें १५८० मध्यें शेजारच्या पोर्टुगॉलच्या गादीवर आपला वारस हक्क सांगून त्या राज्यावर आपलें वर्चस्व बसविलें. त्यामुळें पोर्टुगॉलची अमेरिकेंतील ब्राझील ही वसाहत, त्याचप्रमाणें पूर्वेकडील प्रदेशांतील व्यापारी ठाणीं स्पेनच्या वर्चस्वाखालीं येऊन स्पेनचें महत्त्व व दरारा यांत खूप वाढ झाली. हॅप्सबर्ग घराण्याशीं त्याचा नात्याचा संबंध असल्यामुळें त्यास तो गादींवर येतांच नेदर्लंड हा प्रदेश, इटालीमधील नेपल्स, सीसली व मीलॅन हे प्रदेश मिळाले होते. यांपैकीं नेदर्लंड देशांतील बहुसंख्य लोक प्रॉटेस्टंट पंथाचे असून ते उत्तर विभागांत रहात असत; त्यांस डच असें म्हणत व त्यांच्या प्रदेशास हॉलंड असें म्हणण्यांत येई. दक्षिण विभागास बेलजम् असें म्हणत व तेथील बहुसंख्य लोक रोमन कॅथलिक पंथाचे होते. नेदरलंडमधील डच लोक व्यापार व उद्योगधंदे यांमुळें पुढे आलेले होते. तेथील कांहीं शहरें बाजारपेठा म्हणून व्यापारांत भरभराटीस येऊन सधन झालेलीं होतीं. हे डच लोक प्रॉटेस्टंट-पंथी असल्यामुळें फिलीपनें त्यांच्यावर जाचक निर्बंध घातले व कर बसविले. तेथील अधिकाराच्या व महत्त्वाच्या जागांवर स्पॅनिअर्ड लोकांची नेमणूक करण्यांत आली. त्याचप्रमाणें ते प्रॉटेस्टंट पंथी असल्यामुळें इन्क्विझेशन कोर्टा-मार्फत त्यानें त्यांचा छळ केला. तेथें ॲल्व्हाचा ड्यूक या गव्हर्नरास पाठविलें, व त्यानें तेथील लोकांवर जुलूम केला. फिलीपच्या या कृत्यामुळें हॉलंडमध्यें असंतोष निर्माण होऊन परकीय स्पॅनिश सत्ता झुगारून देण्यासाठीं ऑरेंजचा सरदार विल्यम याच्या नेतृत्वाखालीं मोठी चळवळ सुरू झाली. नेदर्लंडमधील चळवळीस इंग्लंडकडून मदत मिळत होती. ही चळवळ दडपून टाकण्यासाठीं स्पेननें कडक उपाय योजले, पण त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. तेथील डच लोकांनीं स्पेनची सत्ता झुगारून देऊन १५८१ मध्यें आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें; व हॉलंडचें स्वतंत्र राष्ट्र स्थापन झालें. नेदर्लंडमधील दक्षिणेकडील विभाग स्पेनच्या वर्चस्वाखालीं राहिला व त्यास बेल्जम असें म्हणण्यांत येऊं लागलें.

ट्यूडर घराण्याच्या अमदानींत इंग्लंड हें राष्ट्र व्यापार व दर्यावर्दीपणा या

बाबतींत पुढें येत होतें. त्यास स्पेनच्या अमेरिकेंतील वसाहती व तेथें उपलब्ध होणारी संपत्ति याबद्दल हेवा वाटत होता, व त्यामुळें इंग्लंडमधील धाडसी नावाडी भर समुद्रावर स्पेनच्या जहाजांवर हल्ला करून लूट मिळवीत असत. त्याचप्रमाणें नेदर्लंडमधील डच लोकांसही त्यांची मदत होती. एलिझाबेद्च्या कारकीर्दीत इंग्लंडनें पोपचें धार्मिक वर्चस्व झुगारून देऊन एपिस्कोपेलियन पंथ (प्रॉटेस्टंट पंथांतील उपपंथ) हा आपला राष्ट्रधर्म असल्याचा कायदा केला होता. तेव्हां इंग्लंडवर आरमारी स्वारी करून त्यास आपलें अंकित करण्याचा फिलीपनें बेत केला, व त्यासाठीं एक मोठें आरमार तयार करून इंग्लंडवर आरमारी स्वारी केली. या आरमारी स्वारीचा प्रतिकार करण्यासाठीं इंग्लंडनेंहि मोठी तयारी केली. १५८८ मध्यें स्पेनचें आरमार इंग्लंडवर चाल करून आलें, पण त्यावेळीं मोठें तुफान व वादळ झाल्यानें मोठमोठीं जहाजें असलेल्या स्पॅनिश आरमाराचा वादळानें नाश झाला, व इंग्लिश लहान जहाजांनीं त्यांस अडचणीच्या ठिकाणीं गांठून त्यांचा पराभव केला. या पराभवामुळें स्पेनची आरमारी सत्ता व समुद्रावरील वर्चस्व नष्ट झालें व त्या बाबतींत इंग्लंड पुढें आलें.

२ रा फिलीप १५९८ मध्यें मरण पावला. त्याच्यानंतर स्पेनच्या गादीवर येणारे राजे कर्तृत्ववान् नव्हते व त्यामुळें स्पेनला उतरती कळा लागली. १६०९ मध्यें डच लोकांच्या स्वातंत्र्यास स्पेननें मान्यता दिली. १६४० मध्यें पोर्तुगॉल हें राष्ट्र स्पेनपासून पूर्वीप्रमाणें वेगळें झालें व त्यामुळें पोर्तुगॉलच्या वसाहती व व्यापारी ठाणीं यांवरील स्पेनचें वर्चस्व नाहींसें झालें. स्पेनचा फ्रान्सला हेवा वाटत होता, व स्पेनचे राजे कमकुवत आहेत हें पाहून फ्रान्सनें सरहद्दीवरील कांहीं प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणून पिरीनीज पर्वतापर्यंत आपलें राज्य वाढविलें.

१७०० मध्यें स्पेनचा हॅप्सबर्ग घराण्यांतील राजा मरण पावला व त्यास पुत्र नसल्यामुळें वारस हक्कासंबंधीं युद्ध होऊन (१७०१–१३) फ्रान्सच्या बूरबॉन (Bourbon) घराण्यांतील राजपुत्र फिलीप (१४ व्या लुईचा नातू) हा ५ वा फिलीप म्हणून स्पेनचा राजा झाला (१७१४), पण त्याचा फ्रान्सच्या गादीवरील हक्क रद्द करण्यांत आला. अशा रीतीनें स्पेनचें युरोपमधील महत्त्व कमी होत होतें तरी त्याचें वसाहतीचें साम्राज्य मोठें होतें. अमेरिकेंतील मेक्सिको, चिली, अर्जेंटिना, पेरू, व्हेनिझूला, फ्लॉरिडा या विस्तृत वसाहती व आशियांतील फिलीपाईन बेटें स्पेनच्या साम्राज्यांत मोडत होतीं. या वसाहती स्पेनच्या फायद्या-

साठीं आहेत असें समजून त्याप्रमाणें वसाहतींचा कारभार होत असल्यामुळें वसाहतींमध्यें असंतोष होता. उत्तर अमेरिकेंतील इंग्लिश वसाहती इंग्लंडपासून स्वतंत्र झाल्यावर आपणहि तसें करावें असें त्यांस वाटूं लागलें व त्या अनुकूल संधीची वाट पहात होत्या. फ्रान्समध्यें राज्यक्रान्ति झाल्यावर अमेरिकेंतील स्पॅनिश वसाहतींमध्यें स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं चळवळ सुरू झाली; व ती मोडण्यासाठीं स्पेननें कडक उपाय योजले. पण १८०८ मध्यें नेपोलियननें स्पेनचा राजा फर्डिनंड यास पदच्युत करून आपला भाऊ जोसेफ बोनापार्ट यास स्पेनचा राजा केल्यावर अमेरिकेंतील स्पॅनिश वसाहतींनीं आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें. यानंतर नेपोलियनचा पराभव होऊन फर्डिनंड हा स्पेनचा पुनः राजा झाल्यावर या वसाहती स्पेनच्या वर्चस्वाखालीं आणण्याचा प्रयत्न करावा असा स्पेनचा विचार होता, पण अमेरिकेंतील राजकारणांत हात घालून या स्पॅनिश वसाहती परत आपल्या वर्चस्वाखालीं आणण्याचा प्रयत्न झाल्यास त्यास अमेरिकेंतील संयुक्त संस्थान या राष्ट्राचा विरोध होईल असें प्रेसिडेंट मनरो यानें जाहीर केल्यामुळें (१८२३) व समुद्रावर प्रबल असलेल्या इंग्लंडचा त्यास पाठिंबा असल्यामुळें या वसाहती जिंकून घेण्याचा स्पेनकडून प्रयत्न झाला नाहीं. या वसाहती नंतर स्वतंत्र झाल्या व त्यांनीं तेथें आपलीं लोकसत्ताक राज्यें स्थापन केलीं.

अशाप्रकारें स्पेनचें साम्राज्य नष्ट झाल्यामुळें युरोपच्या व जगाच्या राजकारणांतील स्पेनचें महत्त्व नाहींसें होऊन तें दुसऱ्या किंवा तिसऱ्या प्रतीचें राष्ट्र बनलें.

फ्रान्स

(१४५३–१७७४)

फ्रान्स—१५ व्या शतकाच्या मध्याच्या सुमारास फ्रान्सचें एक प्रादेशिक राज्य स्थापन झालें होतें. परंतु तेथें लहानमोठे असे अनेक सरंजामी सरदार असून त्यांच्या हातीं बरीच सत्ता असल्यामुळें राजसत्ता बरीच कमकुवत झालेली होती. पण ११ वा लुई (१४६१–१४८३) यानें सरदारांची सत्ता कमी केली, व बर्गंडी व ब्रिटनी हे प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणून फ्रान्सचें राष्ट्र संघटित

केलें. फ्रान्समधील राजास राज्यकारभाराचे कामीं व कोणते कर बसवावेत या कामीं सल्लामसलत देण्यासाठीं धर्माधिकारी, अमीरउमराव व सामान्य लोक हे तीन विभाग असलेली **स्टेट्स जनरल** नांवाची सभा होती, पण फ्रान्सचे राजे या सभेचा सल्ला न घेतां राज्यकारभार करीत. १६ व्या शतकाच्या पूर्वार्धांत युरोपमध्यें धर्मसुधारणेची चळवळ सुरू होऊन तिच्या लाटा फ्रान्समध्येंही येऊं लागल्या. पण फ्रान्समधील बहुसंख्य लोक व तेथील राज्यकर्ते रोमन कॅथलिकपंथीच राहिले. तरी फ्रान्समधील कांहीं लोकांनीं प्रॉटेस्टंट पंथाचा स्वीकार करून ते कॅल्हिनचे अनुयायी झाले होते. या लोकांस ह्यूगेनॉटस असें म्हणत. त्यांमध्यें सरदार व अमीर उमराव लोकांचा विशेष भरणा होता व त्यांस धार्मिक बाबींप्रमाणें राजकीय बाबींमध्येंही सुधारणा होऊन राजाच्या हातांत अनियंत्रित सत्ता असूं नये असें वाटत होतें. त्यांच्या ताब्यांत कांहीं किल्ले व तटबंदीचीं ठिकाणें होतीं. तेव्हां या लोकांचा नायनाट करणें जरूर आहे असें फ्रान्समधील राजास वाटत होतें, व त्यांचे त्या दिशेनें प्रयत्न सुरू होते. अशी परिस्थिति असतां या प्रॉटेस्टंटपंथीय युगेनॉट लोकांविरुद्ध लोकमत क्षुब्ध करविण्यांत येऊन १५७२ मध्यें त्यांची ठिकठिकाणीं कत्तल करण्यांत आली. यानंतर फ्रान्सचे पूर्वीचें राजघराणें संपुष्टांत येऊन त्या घराण्याशीं नात्याचा संबंध असलेल्या बूरबॉन घराण्यांतील नॅव्हेरीचा हेन्री हा **४ था हेन्री** म्हणून फ्रान्सचा राजा झाला (१५८९–१६१०). हा राजा उदार, धोरणी होता व त्यास ह्यूगेनॉट लोकांबद्दल सहानुभूति वाटत होती. त्यानें १५९८ मध्यें '**नांटिजचा जाहीरनामा**' प्रसिद्ध करून ह्यूगेनॉट लोकांस आपल्या धर्मपंथाप्रमाणें वागण्यास पूर्ण मुभा दिली. ४ था हेन्रीनंतर त्याचा मुलगा १३ वा लुई हा फ्रान्सचा राजा झाला. हा कर्तृत्ववान् नव्हता पण त्यानें राज्यकारभार कार्डिनल रिशल्यू (Richelieu) चा प्रधानाकडे सोंपविला (१६१०–४३). रिशल्यू हा कर्तबगार, हुशार व कर्तव्यदक्ष होता. त्यानें फ्रान्समधील राज्यव्यवस्था सुव्यवस्थित व भक्कम पायावर उभारून फ्रान्समधील राजसत्ता प्रबळ व अनियंत्रित केली. फ्रान्समधील ह्यूगेनॉट लोकांच्या ताब्यांत कांहीं भक्कम किल्ले असून राजकीय बाबतींत त्यांस कांहीं विशेष अधिकार असल्यामुळें राजसत्तेस त्यांच्याकडून धोका येण्याचा संभव आहे असें वाटून त्यानें त्यांचे तटबंदीचे किल्ले जप्त केले व राजकीय बाबतींत त्यांस असलेले विशेष अधिकार रद्द केले.

पण धार्मिक बाबतींत त्यांस देण्यांत आलेल्या सवलती चालू ठेवल्या. फ्रान्समधील स्टेटस जनरल या सभेची बैठक बोलाविण्याचा प्रघात १६१४ पासून बंद पडला; व १३ वा लुईच्या कारकीर्दीत राजानें स्वतःच्या अधिकारानें लोकांवर कर बसविण्याचा व राज्यकारभार करण्याचा प्रघात सुरू झाला. रिशल्यू हा १६४२ मध्यें मरण पावल्यावर कार्डिनल मॅझेरीन हा प्रमुख प्रधान झाला.

१४ वा लुई (१६४३–१७१५)—१३ व्या लुईनंतर १४ वा लुई हा फ्रान्सचा राजा झाला. त्यावेळीं तो अल्पवयी होता; पण मॅझरिन (१६४२–६१) या कर्तृत्ववान् प्रधानाकडे राज्यकारभाराचीं सूत्रें होतीं. त्यानें रिशल्यूचें धोरण पुढें चालविलें व १४ वा लुई अल्पवयी होता तरी फ्रान्समधील राजसत्ता प्रबळ व अनियंत्रित केली. १६६१ मध्यें वयांत आल्यावर १४ व्या लुईनें राज्यकारभाराचीं सूत्रें आपल्या हातीं घेतलीं व यापुढें ५४ वर्षें राज्यकारभार केला व फ्रान्स राष्ट्र प्रबळ करून फ्रान्सचें वैभव व दरारा युरोपमध्यें वाढविला म्हणून त्यास 'मोठा सम्राट' (Grand monarch) असें म्हणण्यांत येतें. १४ वा लुई हा महत्त्वाकांक्षी होता. युरोपमध्यें फ्रान्सचें राष्ट्र प्रबळ व वैभवशाली करावें ही त्याची महत्त्वाकांक्षा होती. त्यानें आपल्या राष्ट्राचें सैन्य व आरमार यांवर तज्ज्ञ अधिकारी नेमून तें उत्कृष्ट प्रतीचें व कार्यक्षम केलें. जमाबंदीच्या खात्यांत जो गोंधळ माजलेला होता तो नाहींसा करून त्याची भक्कम पायावर उभारणी केली. सरंजामी सरदार यांस राज्यकारभारासंबंधीं जे कांहीं हक्क होते ते रद्द करून आपणांस जबाबदार असलेले कर्तबगार अधिकारी राज्यकारभाराच्या निरनिराळ्या खात्यांत नेमिले. राज्यकारभाराचें काभीं त्यानें नेमलेल्या मंत्र्यांमध्यें **कोलबर्ट** (Colbert) हा अर्थमंत्री होता (१६६१-८३). त्यानें राज्यकारभारांतील लांचलुचपतपणा मोडून टाकला. सरदार, धर्माधिकारी या वर्गांस सरंजामी पद्धतीप्रमाणें करापासून माफी होती, व कराचा बोजा बहुजनसमाज व शेतकरीवर्ग यांवर पडे तो त्यास दूर करतां आला नाहीं, तरी त्यानें नवीन जकाती बसवून फ्रान्सचें उत्पन्न वाढविलें. उद्योगधंदे व व्यापार यांस उत्तेजन दिलें.आयात मालापेक्षां निर्यात माल जास्ती असावा व त्यायोगें फ्रान्सची **सांपत्तिक** स्थिति सुधारावी या त्यावेळच्या व्यापारी तत्त्वाप्रमाणें (Mercantile Theory) त्यानें आयात मालावरील जकाती वाढवून निर्यात मालावरील जकाती कमी केल्या, त्यामुळें फ्रान्स सधन झाला. त्यानें परराष्ट्रांशीं व्यापार करणाऱ्या कंपन्यांस

उत्तेजन दिलें. त्यामुळें त्याच्या कारकीर्दीत भारत व पूर्वेकडील प्रदेशांशीं व्यापार करण्यासाठीं फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनी स्थापन झाली. व्यापार व उद्योगधंदे यांस उत्तेजन मिळावें व अंतर्गत दळणवळण वाढावें म्हणून त्यानें रस्त्यांची व कालव्यांची डागडुजी केली व नवे रस्ते बांधले. त्यानें शास्त्र, कला विद्या यांस उत्तेजन दिलें व त्यांचें अध्ययन नीट व्हावें म्हणून विद्याकेंद्रें स्थापन केलीं. अशा प्रकारें मंत्री म्हणून बीस वर्षें राज्यकारभार केल्यावर तो मरण पावला.

१४ व्या लुईचें धार्मिक धोरण— १४ वा लुई हा रोमन कॅथलिक पंथाचा कट्टा अभिमानी होता. या पंथाचा युरोपमधील निरनिराळ्या राज्यांमध्यें प्रसार व्हावा म्हणून युरोपधील राजेरजवाड्यांशीं त्यानें गुप्तपणें करार केले व त्यांस पैशाची मदत केली. ह्युगेनॉट लोकांस धार्मिक बाबतींत आपल्या धर्मपंथाप्रमाणें वागण्यास १५९८ च्या नाँटिजच्या जाहीरनाम्यानें ज्या सवलती देण्यांत आल्या होत्या त्या त्यानें रद्द केल्या (१६८५). त्यामुळें उद्योगप्रिय व उद्योगधंद्यांत भाग घेणारे हजारों ह्यूगेनॉट लोक फ्रान्स देश सोडून इंग्लंड, हॉलंड व जर्मनी या देशांत गेले व त्यामुळें फ्रान्सचें नुकसान झालें.

लुईचें परराष्ट्रीय धोरण व प्रदेशविस्तार— उत्तरेकडे व्हाईन नदी, पूर्वेकडे आल्पस पर्वत या फ्रान्सच्या नैसर्गिक सरहद्दी होत्या, व त्यापर्यंत फ्रान्सचा विस्तार करून युरोपमध्यें फ्रान्सचें राष्ट्र लष्करी बाबतींत प्रबल करावें असें त्यास वाटत होतें. ही गोष्ट साध्य करण्यासाठीं युद्ध करून व कांहीं राजेरजवाड्यांशीं करार करून त्यानें प्रयत्न केले. युरोपमधील निरनिराळ्या राजांच्या दरबारीं त्याचे राजनैतिक वकील असून तेथील घडामोडींची व परिस्थितीची त्यास नीट माहिती मिळत असे. स्पेन राष्ट्र कमकुवत झालें आहे हें पाहून त्यानें १६६७ मध्यें आपली पत्नी स्पेनच्या राजाची वडील बहीण असून ती हॅप्सबर्ग घराण्यांतील असल्यामुळें बेलजम (स्पॅनिश नेदर्लंड) या प्रांतावर तिचा वारसा हक्क आहे म्हणून बेलजमवर स्वारी केली. पण इंग्लंड, स्वीडन व हॉलंड यांनीं त्यास विरोध केला, त्यामुळें त्यास माघार घ्यावी लागली. इंग्लंडचा राजा २ रा चार्लस याच्याशीं डोव्हर येथें गुप्त तह करून (१६७०) व त्यास पैशाची मदत देऊन त्यानें प्रॉटेस्टंटपंथी हॉलंड या राष्ट्रावर १६७२ मध्यें स्वारी केली. पण डच लोकांनीं चिकाटीनें प्रयत्न करून त्यास विरोध केला व समुद्राचें पाणी थोपवून

धरण्यासाठीं जें धरण बांधलें होतें तें उखडून टाकलें. त्यामुळें बराच प्रदेश जलमय होऊन फ्रेंच सैन्यास माघार घ्यावी लागली.

१७०१ मध्यें स्पेनचा राजा मरण पावला. त्यानें मृत्युपत्र केलें असून त्यांत त्यानें १४ व्या लुईचा नातू अँजोचा फिलीप यास स्पेन, स्पेनच्या वसाहती व स्पेनच्या ताब्यांत असलेला बेलजम व इटलीमधील नेपल्स, सिसली, मीलॅन या सर्व प्रदेशाचा वारस केलें होतें. तसेंच स्पेनचें राष्ट्र फ्रान्सपासून वेगळें असावें व तें फ्रान्सला जोडलें जाऊं नये अशी इच्छा प्रदर्शित केली होती. फ्रान्स व स्पेन हीं दोन राष्ट्रें वेगळीं राहिलीं तरी फ्रान्सच्या बूरबॉन या राजघराण्यांतील पुरुषांकडे बराच प्रदेश जाईल व त्यामुळें फ्रान्सचें युरोपमध्यें प्रस्थ बरेंच वाढेल म्हणून युरोपमधील इतर राष्ट्रांनीं मृत्युपत्रांतील या योजनेस विरोध केला व त्यामुळें फ्रान्स व स्पेनविरुद्ध स्पेनच्या गादीवरील वारस हक्कासंबंधीं युद्ध उपस्थित झालें (१७०१ –१३). या युद्धानंतर झालेल्या युट्रेक्टच्या तहानें १४ वा लुईचा नातू फिलीप हा स्पेनचा राजा झाला व त्यास स्पेन व स्पेनच्या अमेरिकेंतील वसाहती मिळाल्या, पण फ्रान्सच्या गादीवरील त्याचा वारस हक्क रद्द करण्यांत आला. स्पेनच्या राजघराण्याशीं संबंध असलेल्या आस्ट्रियाच्या हॅप्सबर्ग घराण्यांतील राजास स्पेनच्या वर्चस्वाखालील बेलजम (नेदर्लंड) हा भाग व इटलीमधील मीलॅन, नेपल्स व सार्डिनिया हे प्रदेश मिळाले. इंग्लंडला स्पेनच्या किनाऱ्यावरील भूमध्य समुद्र व अटलांटिक महासागर यांमधील खाडीवरील महत्त्वाचा असा जिब्राल्टर हा किल्ला मिळाला. अशा रीतीनें स्पेनच्या साम्राज्याची विभागणी होऊन स्पेनचें युरोपमधील महत्त्व कमी झालें.

१४ व्या लुईचा दरबार व कलाविद्यांस प्रोत्साहन—१४ व्या लुईनें पॅरिसपासून १०–११ मैलांवर व्हर्सेल्स येथें एक भव्य व शोभिवान राजवाडा बांधला. हा राजवाडा एका विस्तीर्ण बागेंत असून त्यांमध्यें भव्य अशीं अनेक दालनें होतीं, व तो त्यावेळच्या सुखसोयींनीं समृद्ध होता. १४ व्या लुईचें येथें वास्तव्य असून त्याचा दरबारही तेथें भरत असल्यामुळें सरदार व अमीरउमराव लोक, त्याचप्रमाणें कलाकार व गुणी माणसें त्याच्या दरबारीं जमा होऊन राजवाड्याभोंवतीं एक सुंदर शहर वसलें गेलें. १४ व्या लुईनें कलाविद्यांस उत्तेजन दिलें. त्यामुळें गुणी, विद्वान् व कलाप्रिय माणसें तेथें जमा होऊं

लागलीं. फ्रेंच भाषा व वाङ्मय समृद्ध होऊं लागलें. फ्रान्समधील फॅशन आदर्श समजली जाऊन युरोपमधील इतर राष्ट्रांत तिचें अनुकरण होऊं लागलें.

अशा रीतीनें ७२ वर्षे राज्य केल्यावर १४ वा लुई १७१५ मध्यें मरण पावला. त्याच्या कारकीर्दीत फ्रान्सचें वैभव बरेंच वाढलें, तरी त्याच्या कारकीर्दीत झालेल्या युद्धामुळें व दरबारच्या अवाढव्य खर्चामुळें फ्रान्सची सांपत्तिक स्थिति बरीच खालावली.

१४ व्या लुईनंतर १५ वा लुई फ्रान्सचा राजा झाला (१७१५–७४). १७ व्या शतकांत फ्रान्सनें उत्तर अमेरिकेमध्यें आपल्या वसाहती स्थापन करण्यास सुरवात केली होती. १८ व्या शतकामध्यें या वसाहतीमध्यें बरीच वाढ होऊन उत्तर अमेरिकेमध्यें फ्रान्सच्या कॅनडा व ल्यूसीआना या विस्तृत वसाहती स्थापन झालेल्या होत्या. त्या ठिकाणीं वसाहत करण्यासाठीं फ्रान्समधून पुष्कळ लोक जाऊं लागले. पूर्वेकडील प्रदेशांशीं व्यापार करण्यासाठीं स्थापन झालेल्या (१६६४) फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीनें भारतामध्यें आपलीं व्यापारी ठाणीं स्थापन केलीं, व त्यानंतर १८ व्या शतकामध्यें तेथील राजेरजवाड्यांच्या अंतस्थ राजकारणांत हात घालण्याचा व भारतामधील प्रदेशावर आपलें राजकीय वर्चस्व बसविण्याचा फ्रेंचांनीं प्रयत्न सुरू केला. त्यामुळें त्यांचें भारतामधील महत्त्व बरेंच वाढूं लागलें व अमेरिकेमध्यें त्याचप्रमाणें भारतामध्यें फ्रान्सची इंग्लंडबरोबर स्पर्धा सुरू झाली. १७४०–४८ पर्यंत युरोपमध्यें आस्ट्रियाच्या गादीवरील वारसहक्कासंबंधीं युद्ध सुरू झाल्यावर भारतामध्येंहि फ्रेंच व इंग्लिश ईस्ट इंडिया कंपन्यांमध्यें युद्ध उपस्थित झालें. यानंतर युरोपमध्यें सप्तवार्षिक युद्ध (१७५६–६३) सुरू झालें, त्यावेळीं युरोपमध्यें फ्रान्स व इंग्लंड हीं राष्ट्रें प्रतिस्पर्धी होऊन त्याचें व्यापार-वसाहती व अंकित प्रदेश यांसंबधीं उत्तर अमेरिकेंत व भारतांत युद्ध होऊन त्यांत फ्रान्सचा पूर्ण पराभव झाला व फ्रान्सची उत्तर अमेरिकेंतील कॅनडा ही विस्तृत वसाहत इंग्लिशांनीं जिंकून घेतली. त्याचप्रमाणें वाँदिवाशच्या लढाईत (१७६०) भारतामध्यें फ्रान्सचा पूर्ण पराभव होऊन भारतामधील त्याचें राजकीय महत्त्व नष्ट झालें. युद्धानंतर झालेल्या तहानें फ्रान्सला आपलें मित्र राष्ट्र जें स्पेन त्यास ल्युसियाना ही उत्तर अमेरिकेंतील विस्तृत वसाहत द्यावी लागली. त्यामुळें

सप्तवार्षिक युद्धानंतर फ्रान्सचें साम्राज्य नष्ट होऊन फ्रान्सचें वैभव नाहींसें झालें, व फ्रान्सला उतरती कळा लागली.

१५ वा लुई हा व्यसनी, ऐषआरामी व उधळ्या होता व १४ व्या लुईप्रमाणें दरबारचा अवाढव्य खर्च चालू होता, त्यामुळें व त्याच्या कारकीर्दीत झालेल्या युद्धामुळें फ्रान्सची सांपत्तिक स्थिति खालावत गेली व फ्रान्सचें राष्ट्रीय कर्ज बेसुमार वाढत गेलें. फ्रान्समधील जनता कराच्या ओझ्यानें गांजून गेली.

इंग्लंड (ग्रेट ब्रिटन)

(१४८५–१८२०)

इंग्लंड (ग्रेटब्रिटन)—या काळांत इंग्लंडवर (ग्रेटब्रिटन) ट्यूडर, स्टुअर्ट व हॅनोवर घराण्यांनीं राज्य केलें. ट्यूडर घराण्यांतील १ ला राजा ७ वा हेन्री यानें सरदार व अमीरउमराव यांचें प्रस्थ कमी केलें. ७ व्या हेन्रीच्या आश्रयानें सफर करावयास गेलेल्या कॅबट यास उत्तरअमेरिकाचा शोध लागला (१४९७). ७ व्या हेन्रीनें युरोपमधील प्रमुख राज्य स्पेन येथील राजकन्येशीं आपल्या मुलाचें लग्न केलें व त्या घराण्याशीं नात्याचा संबंध जोडला. आपली मुलगी मार्गारेट हिचें स्कॉटलंडच्या राजाशीं लग्न केलें, व त्यामुळें पुढें तेथील स्टुअर्ट घराण्यांतील राजा इंग्लंडचा राजा होऊन स्कॉटलंड व इंग्लंड यांचें ग्रेटब्रिटन हें एक राज्य झालें. त्याचा मुलगा ८ वा हेन्री हा राजा असतां युरोपमध्यें धर्मसुधारणेची चळवळ सुरू झाली व पुढें त्याची मुलगी एलिझाबेथ राणी असतां (१५५८–१६०३) तिच्या कारकीर्दीत पार्लमेंटनें ॲक्ट ऑफ सुप्रीमसी हा कायदा पास करून (१५५९) रोमच्या पोपचें इंग्लंडवरील धार्मिक वर्चस्व रद्द केलें व इंग्लंडचा राजा हा धार्मिक बाबतींतही इंग्लंडमधील प्रमुख आहे असें ठरवून एपिस्कोपेलियन पंथाची (बिशपांच्या मार्फत धर्मव्यवस्था) इंग्लंडमध्यें स्थापन केली; तरी इंग्लंडच्या वर्चस्वाखालीं असलेल्या आयर्लंडमधील लोक रोमन कॅथालिक पंथाचेच राहिले.

एलिझाबेथ ही इंग्लंडची राणी झाल्यावर (१५५८–१६०३) तिनें कला विद्यांस उत्तेजन दिलें, धाडसी नावाड्यास दूरदूरच्या सफरी करण्यास उत्तेजन

दिलें; त्याचप्रमाणें व्यापार व उद्योगधंदे करण्यास प्रोत्साहन देऊन इतर देशांतील उद्योगप्रिय व निरनिराळे उद्योगधंदे करणाऱ्या लोकांस आपल्या देशांत आश्रय दिला. त्यामुळें इंग्लंडचा व्यापार व उद्योगधंदे यांत वाढ होऊं लागली, व धाडसी नावाडी दूरदूरच्या सफरी करूं लागले. ड्रेक यानें पृथ्वीप्रदक्षिणा केली. इंग्लंडला स्पेनच्या वसाहतींचा व तेथील संपत्तीचा हेवा वाटूं लागला, व स्पेनच्या अमेरिकेहून सोनें व रूपें घेऊन येणाऱ्या जहाजांवर धाडसी इंग्लिश नावाडी भर समुद्रावर हल्ले करूं लागले. तसेंच इंग्लंडनें हॉलंडमधील डच लोकांनीं स्वातंत्र्य प्राप्तीसाठीं स्पेनविरुद्ध केलेल्या चळवळीसही मदत केली. त्यामुळें व्यापार, वसाहती धार्मिक प्रश्न यांसंबंधीं इंग्लंड व स्पेन यांमधील वितुष्ट वाढत जाऊन इंग्लंडवर आरमारी स्वारी करण्यासाठीं स्पेननें मोठें आरमार धाडलें, पण या आरमाराची वादळानें दुर्दशा होऊन इंग्लंडच्या लहान व चपळ जहाजांनीं व धाडसी नावाड्यांनीं त्यांचेवर हल्ले केल्यामुळें स्पेनच्या आरमाराचा पराभव झाला (१५८८); व समुद्रावर इंग्लंडचें वर्चस्व स्थापन झालें. इ. स. १६०० मध्यें पूर्वेकडील प्रदेशाशीं व्यापार करण्यासाठीं इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनी स्थापन झाली.

एलिझाबेदच्या आमदानींत शेक्सपियर, ड्रायडन, बेकन, रॅले वगैरे विद्वान् लोकांनीं इंग्लिश वाङ्मयांत भर घातली. अशाप्रकारें तिच्या अमदानींत इंग्लंडची सर्व बाजूंनीं भरभराट झाल्यामुळें त्या आमदानीस 'सुवर्णयुग' असें म्हणण्यांत येतें.

ट्यूडर घराण्याच्या कारकीर्दींत राजसत्ता अनियंत्रित झाली, पण या घराण्यांतील राज्यकर्त्यांचें धोरण सरदार व अमीरउमराव यांचें प्रस्थ कमी करून व्यापार, उद्योगधंदे, कलाकौशल्य, नौकानयन यांस उत्तेजन देऊन इंग्लंडचें वैभव व दरारा वाढविण्याकडे असल्यामुळें ही अनियंत्रित सत्ताही लोकप्रियच झाली.

स्टुअर्ट घराणें (१६०३–१७१४)—या घराण्यांतील पहिला राजा १ ला जेम्स यास वंशपरंपरा हक्कानें इंग्लंडची गादी मिळाली. त्यामुळें आपणांस राज्य करण्याचा जो हक्क मिळाला तो प्रजेच्या इच्छेनें नव्हे तर ईश्वरीयोजनेनें होय (Divine Right theory – **राजाचा ईश्वरदत्त अधिकार**) असें त्यास वाटत होतें. आपण पार्लमेंटला जबाबदार नाहीं, तर पार्लमेंटनें केलेले कायदे रद्द करण्याचा व नवीन कायदे करण्याचा आपणांस अधिकार आहे असें त्यास वाटत होतें. त्याच्यानंतर गादीवर येणारा त्याचा पुत्र १ ला चार्लस (१६२५–४९) याचें १ ल्या जेम्सप्रमाणें मत होतें, व त्यानें पार्लमेंटनें केलेले

कायदे झुगारून देऊन बेकायदेशीरपणें राज्यकारभार करण्यास सुरवात केली. त्यामुळें त्याच्या अनियंत्रित राज्यकारभारास आळा घालण्यासाठीं पार्लमेंटनें १६२८ मध्यें 'पार्लमेंटच्या संमतीशिवाय कर बसविण्याचा, युद्ध चालू नसतां लष्करी कायदा पुकारण्याचा, न्यायकोर्टानें दोषी ठरवून शिक्षा दिल्याखेरीज कोणास अटकेंत ठेवण्याचा राजास अधिकार नाहीं वगैरे गोष्टी ज्यांत पुनः स्पष्टपणें मांडल्या आहेत असा **'पिटिशन ऑफ राइटस्'** हा कायदा पास करून त्यास राजानें आपली संमति दिल्याखेरीज त्यास पैशाची मंजुरी यावयाची नाहीं असें ठरविलें. राजास पैशाची अत्यंत जरूरी असल्यामुळें त्यानें या कायद्यास संमति दिली. पण यानंतर त्यानें पुनः बेकायदेशीरपणें व अनियंत्रितपणें राज्यकारभार सुरू केला (१६२९–१६४०). तेव्हां राजा व पार्लमेंट यांच्यामध्यें वितुष्ट येऊन त्यांमध्यें युद्ध झालें (१६४२–४९) व त्यांत राजाचा पराभव केल्यावर पार्लमेंटनें 'जुलमी, देशद्रोही' असा त्याच्यावर आरोप ठेऊन त्यास दोषी ठरविलें व त्यास फांशीं दिलें (१६४९). यानंतर इंग्लंडमध्यें लोकसत्ताक राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न करण्यांत आला (१६४९–६०), पण तो अयशस्वी होऊन राष्ट्रसंरक्षक क्रॉमवेल याच्या कारकीर्दीत सर्वाधिकारी पद्धत स्थापन होऊं लागल्यामुळें क्रॉमवेलच्या मृत्यूनंतर १ ला चार्लसचा पुत्र २ रा चार्लस यास राज्यपद देऊन इंग्लंडमध्यें पुनः राजसत्ता स्थापन झाली (१६६०). क्रॉमवेल हा राष्ट्रसंरक्षक असतां इंग्लिश व डच यांच्यामध्यें व्यापारासंबंधीं स्पर्धा उत्पन्न झाली, तेव्हां क्रॉमवेलनें १६५१ मध्यें नॅव्हिगेशन ॲक्ट नांवाचा कायदा केला. या कायद्यानें इंग्लंडमध्यें येणारा माल इंग्लिश जहाजांतून, किंवा ज्या राष्ट्रांचा तो माल असेल त्या राष्ट्रांच्या जहाजांतून तो आला पाहिजे असें ठरविलें. या कायद्यानें डच लोकांच्या व्यापारास अडथळा आला व इंग्लंडच्या व्यापारास व जहाजें बांधण्याच्या धंद्यास उत्तेजन मिळालें. २ रा चार्लस हा राजा झाल्यावर हा नॅव्हिगेशन कायदा पुनः करण्यांत आला (१६६०).

२ रा चार्लस यानें राजा झाल्यावर पार्लमेंटच्या कायद्यास न जुमानतां राज्यकारभार करण्यास सुरवात केली. त्यानें गुप्तपणें रोमन कॅथलिक पंथाचा स्वीकार केला, व इंग्लंडचें शत्रूराष्ट्र जें फ्रान्स त्याच्याशीं डोव्हर येथें गुप्त तह केला. रोमन कॅथलिकपंथीय फ्रान्स व स्पेन या राष्ट्रांशीं मैत्री करण्याचें त्यानें

परराष्ट्रीय धोरण पार्लमेंटला पसंत नव्हतें. तेव्हां त्याचे सल्लागार प्रॉटेस्टंटपंथी असावेत म्हणून प्रॉटेस्टंटपंथी नसलेल्या गृहस्थास राज्यकारभारांतील हुद्याची जागा देण्यांत येऊं नये हें ठराविणारा 'टेस्ट ॲक्ट' नांवाचा कायदा पार्लमेंटनें पास केला (१६७३). राजकर्ते आपणांस अप्रिय असलेल्या चळवळ्या गृहस्थांस न्यायकोर्टापुढें त्यांच्यावरील आरोप शाबति करून घेण्यापूर्वी नुसत्या संशयावरून बेमुदत अटकेंत ठेवीत असत. तेव्हां या गोष्टीस आळा घालण्यासाठीं व अटक केलेल्या गृहस्थाची ताबडतोब चौकशी केली जावी म्हणून '**हेबिअस कॉर्पस ॲक्ट**' (चौकशीसाठीं न्यायकोर्टापुढें आणा) या नांवाचा व्यक्ति-स्वातंत्र्याचा महत्त्वाचा कायदा पार्लमेंटनें पास केला (१६७९). या कायद्यानें कोणास अटक झाली असल्यास अटक झालेल्या माणसास, त्याच्या नातेवाईकांस किंवा मित्रांस त्याच्यावरील चौकशी करण्यासाठीं त्यास न्यायकोर्टापुढें ताबडतोब किंवा शक्य तितक्या लवकर आणण्यांत यावें याबद्दल न्यायकोर्टाकडून हुकूम मिळविण्याचा हक्क प्राप्त झाला.

२ ऱ्या चार्लसनंतर त्याचा भाऊ जेम्स हा २ रा जेम्स म्हणून इंग्लंडचा राजा झाला (१६८५-८८). हा रोमन कॅथलिक पंथाचा होता. त्यानें पार्लमेंटनें केलेले कायदे झुगारून देऊन अरेरावीनें व बेकायदेशीर रीतीनें राज्यकारभार करण्यास सुरवात केली. तेव्हां पार्लमेंटनें त्यास पदच्युत करून त्याचा अल्पवयी मुलगा जेम्स याचा हक्क बाजूस सारून त्याचा प्रॉटेस्टंटपंथाचा जांवई हॉलंडचा राजा विल्यम व जेम्सची प्रॉटेस्टंटपंथी मुलगी मेरी यांस पार्लमेंटच्या कायद्यानें इंग्लंडचें राज्यपद दिलें (१६८९). अशा रीतीनें पार्लमेंटच्या कायद्यानें ३ रा विल्यम व मेरी यांस इंग्लंडचें राज्यपद मिळाल्यानें वंशपरंपरा हक्क व 'राजाची ईश्वरदत्त सत्ता' हीं दोन्हीं तत्त्वें लयास गेलीं व राज्यपद कोणास द्यावयाचें हें ठरविण्याचा अधिकार पार्लमेंटचा आहे हें सिद्ध झालें.

यानंतर पार्लमेंटनें लोकांचे हक्क ज्यांत ग्रथित केलेले आहेत अशी '**बिल ऑफ राईटस**' नांवाची सनद तयार करून तिला विल्यम व मेरी यांची संमति घेतली (१६८९). या सनदेमध्यें खालील गोष्टींचा प्रामुख्यानें उल्लेख केलेला आहेः— (१) राज्यकर्ता हा इंग्लंडच्या एपिस्कोपेलियन (प्रॉटेस्टंट पंथांतील उपपंथ) पंथाचा असावा. (२) पार्लमेंटच्या संमतीखेरीज कायदा तात्पुरता किंवा कायमचा रद्द करण्याचा राजास अधिकार नाहीं. (३) पार्ल-

मेंटच्या संमतीशिवाय कर बसविण्याचा राजास अधिकार नाहीं. (४) आपणांस वाटतील त्या माणसास आपले प्रतिनिधी म्हणून निवडण्याचा लोकांस अधिकार आहे. पार्लमेंटच्या सभासदांस भाषणस्वातंत्र्य आहे (पार्लमेंटसभेंत कसलेंहि भाषण केलें, तरी त्याबद्दल न्यायकोर्टांत खटला करतां येत नाहीं.) (५) आपलीं गाऱ्हाणीं अर्जद्वारां सरकारपुढें मांडण्याचा लोकांस अधिकार आहे. (६) पार्लमेंटच्या बैठकी वारंवार भरविण्यांत याव्यात.

यानंतर पार्लमेंटनें १६८९ मध्यें 'टॉलरेशन ॲक्ट' नांवाचा कायदा पास केला. या कायद्यानें प्रॉटेस्टंटपंथापैकीं कोणत्याही उपपंथाच्या लोकांस आपल्या उपपंथाप्रमाणें सार्वजनिक रीतीनें प्रार्थना करण्याची परवानगी देण्यांत आली. रोमन कॅथलिक पंथाच्या लोकांस अशी परवानगी पुढें १८२९ मध्यें देण्यांत आली.

स्कॉटलंडशीं एकीकरण १७०७— इंग्लंड व स्कॉटलंड या दोन्ही देशांवर १६०३ पासून एकच राजा होता, तरी तेथील पार्लमेंटसभा वेगवेगळ्या होत्या. तेव्हां १७०७ मध्यें इंग्लंड व स्कॉटलंड येथील पार्लमेंटसभांनीं कायदा करून इंग्लिश व स्कॉटिश पार्लमेंटसभांचें एकीकरण केलें व तें ग्रेटब्रिटनचें पार्लमेंट झालें. यानंतर पुढें १८०० मध्यें ग्रेटब्रिटनच्या पार्लमेंटाशीं आयर्लंडच्या पार्लमेंटचें एकीकरण झाल्यावर इंग्लंड, स्कॉटलंड व आयर्लंड यांसाठीं एकच पार्लमेंटसभा झाली. आयर्लंडमधील बहुसंख्य लोक रोमन कॅथलिकपंथाचे होते, त्यास आयर्लंडचा कारभार वेगळा ठेवून आयर्लंडसाठीं वेगळें पार्लमेंट पाहिजे असें पुढें वाटूं लागलें व त्यासाठीं आयर्लंडमध्यें 'होमरूल' किंवा 'स्वराज्य' मिळविण्यासाठीं मोठी चळवळ सुरू झाली (१८४३ च्या सुमारास). शेवटीं आयर्लंडचे दोन विभाग पाडून दक्षिण भागांतील $\frac{3}{4}$ विभागास 'होमरूल' देण्यांत आलें (१९२२) व त्यासाठीं वेगळें कायदेमंडळ (पार्लमेंट) स्थापन झालें. उत्तरेकडील $\frac{1}{4}$ विभागांतील बहुसंख्य लोक प्रॉटेस्टंटपंथी आहेत व तेथील लोक आपले प्रतिनिधि ब्रिटिश पार्लमेंटांत पाठवितात.

पार्लमेंटची तिजोरीवरील सत्ता— पार्लमेंटची सभा वर्षांतून एकदां तरी भरविण्यांत यावी, व मंजूर केलेले कर योग्य कामासाठीं खर्च व्हावेत यासाठीं पार्लमेंटनें १६८९ पासून नवीन प्रघात पाडला. राजास राज्यकारभारासाठीं लागणारा खर्च व त्यासाठीं करापासून मिळणारें उत्पन्न राजाच्या हयातीपर्यंत एकदांच मंजूर न करतां तें एका वर्षापुरतेंच मंजूर करण्याचा, तसेंच

सैन्याच्या खर्चास एका वर्षापुरतीच मंजुरी देण्याची पद्धत सुरू केली. त्यामुळें राज्यकारभार व संरक्षण यासाठीं लागणाऱ्या खर्चास पार्लमेंटची दरवर्षी संमति घेणें जरूर झाल्यामुळें पार्लमेंट सभेची बैठक दरवर्षी एकदां तरी भरविणें राजास भाग पडूं लागलें.

पार्लमेंटला जबाबदार असणाऱ्या मंत्र्यांमार्फत राज्यकारभार— पार्लमेंटसभेचे लॉर्डांची सभा व कॉमन्स सभा असे दोन विभाग झालेले होते. लॉर्डांच्या सभेंतील मोठमोठ्या धर्माधिकाऱ्यांखेरीज बाकीचे सर्व सभासद वंश-परंपरा हक्कानें तेथें असत. कॉमन्स सभेंतील सर्व सभासद निवडणूक होऊन येत; व हलके हलके या लोकनियुक्त कॉमन्स सभेचें महत्त्व वाढूं लागलें. १७ व्या शतकांच्या शेवटीं राजकीय बाबतींतील मतभेदावरून 'विग व टोरी' असे दोन राजकीय पक्ष निर्माण झाले होते. पार्लमेंटच्या हातीं सत्ता गेली असून त्यामध्यें कॉमन्स सभेचें महत्त्व वाढलें असल्यामुळें कॉमन्स सभेंत ज्या पक्षाचें बहुमत आहे त्या पक्षांतील पुढाऱ्यांचें मंत्रिमंडळ नेमून त्यामार्फत राज्यकारभार करणें सोईचें आहे असें ३ रा विल्यम यांस वाटून हा प्रघात रूढ होऊं लागला.

१७०१ मध्यें पार्लमेंटनें 'ॲक्ट ऑफ़ सेटलमेंट' हा कायदा पास केला. या कायद्यानें विल्यम व मेरी यांच्यानंतर इंग्लंडचें राज्यपद कोणास व कोणत्या क्रमानें द्यावें तें निश्चित करण्यांत आलें. या कायद्यानें राजकर्त्यांच्या कांहीं अधिकारावर मर्यादा घालण्यांत आल्या. या कायद्यानें राजानें पार्लमेंटच्या संमतीशिवाय न्यायाधिशास काढूं नये असें ठरविण्यांत आलें. त्यामुळें आपल्या मर्जीप्रमाणें न वागणाऱ्या न्यायाधिशास कामावरून काढण्याचा राजास जो अधिकार होता तो नष्ट झाला; व न्यायाधिशास आपल्या कामांत कोणाकडून ढवळाढवळ व्हावयाची नाहीं अशी खात्री वाटूं लागली.

हॅनोव्हर घराणें— (पूर्वार्ध १७१४ ते १८२०) १७१४ मध्यें ॲक्ट ऑफ़ सेटलमेंटप्रमाणें जर्मनीमधील हॅनोव्हर या घराण्यांतील जॉर्ज हा १ ला जॉर्ज म्हणून इंग्लंडचा राजा झाला. त्यास इंग्लिश भाषा येत नव्हती व इंग्लंडच्या राजकारणांत लक्ष घालण्याची त्याची इच्छा नव्हती. त्यामुळें मंत्रिमंडळाच्या बैठकीच्या वेळीं तो हजर रहात नसे. तेव्हां अशा बैठकीच्या वेळीं मंत्रिमंडळांतील प्रमुख गृहस्थ अध्यक्ष होऊं लागला व त्यास मुख्य प्रधान असें म्हणण्यांत येऊं

लागलें. राजा हजर नसल्यामुळें राज्यकारभाराचें धोरण ठरविण्याच्या कामांत मंत्रिमंडळास स्वातंत्र्य मिळालें. यावेळीं **रॉबर्ट वॉलपोल** हा विगपक्षांतील कर्तबगार गृहस्थ सुमारें २० वर्षें मुख्य प्रधान होता. त्यामुळें पार्लमेंटांतील कॉमन्स सभेस जबाबदार असलेल्या मंत्रिमंडळामार्फत राज्यकारभार करण्याचा प्रघात रूढ झाला व राजाची सत्ता नामधारी झाली. पण त्यामुळें राज्यकारभाराचें धोरणासंबंधीं राजास जबाबदार न धरतां मंत्रिमंडळास जबाबदार धरण्यांत येऊं लागलें व राजा पक्षातीत (पक्षाबाहेरचा) आहे असें मानण्यांत येऊं लागलें. मंत्रिमंडळास कॅबिनेट असें म्हणण्यांत येऊं लागलें. कॉमन्स सभा लोकनियुक्त सभासदांची असल्यामुळें पैशासंबंधाचें बिल (कोणते कर बसवावयाचें तें ठरविणारें) पहिल्यानें कॉमन्स सभेंत आणलें पाहिजे असें ठरलें गेलें. अशा रीतीनें पार्लमेंटची व पार्लमेंटमधील कॉमन्स सभेची सत्ता खूप वाढली.

हॅनोव्हर घराण्यामध्यें होऊन गेलेल्या राजांपैकीं ३ रा जॉर्ज हा राजा विशेष प्रसिद्ध होता (१७६०–१८२०). त्यानें ६० वर्षें राज्यकारभार केला. कॅबिनेट मार्फत आपण नामधारी राज्य न करतां इंग्लंडमधील पूर्वीच्या राजाप्रमाणें प्रत्यक्ष राज्यकारभार करावा असें त्यास वाटत होतें, व मुख्य प्रधानाकडून आपल्या हातीं कारभार घेण्याचा त्यानें प्रयत्न केला, पण पार्लमेंटला जबाबदार असणाऱ्या कॅबिनेट (मंत्रिमंडळ) मार्फत राज्यकारभार करण्याची पद्धत इंग्लंडमध्यें पूर्णपणें रुजली असल्यामुळें त्यास या कामीं यश आलें नाहीं.

ब्रिटिश साम्राज्याची वाढ— या काळांत ब्रिटिश साम्राज्याची खूप वाढ झाली. १६०० मध्यें स्थापन झालेल्या इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीनें भारतांत व पूर्वेकडील प्रदेशांत पहिल्यानें व्यापारी ठाणीं स्थापन केलीं. नंतर भारतांतील राजेरजवाडयांच्या राजकारणांत हात घालून १७५७ मध्यें बंगाल-प्रांतावर आपलें वर्चस्व बसविलें. उत्तर अमेरिकेंत स्टुअर्ट कारकीर्दीत इंग्लिश वसाहती स्थापन झाल्या. त्याचप्रमाणें इंग्लिशांचा व्यापारही बराच वाढला. तेव्हां उत्तर अमेरिकेंत व भारतांत व्यापार, वसाहती व अंकित प्रदेश या बाबतींत इंग्लंडची फ्रान्सबरोबर स्पर्धा सुरू होऊन १७५६–६३ मध्यें झालेल्या सप्तवार्षिक युद्धांत इंग्लंडनें फ्रान्सचा पराभव करून फ्रान्सची उत्तर अमेरिकेंतील कॅनडा ही विस्तृत वसाहत जिंकून घेतली, व भारतामध्यें वाँदिवॉशच्या लढाईत फ्रेंचांचा पूर्ण पराभव करून भारतांमधील त्यांचें राजकीय महत्त्व

नष्ट केलें. यानंतर १७६०–१८२० पर्यंतच्या काळांत भारतांतील टिपू, मराठे यांच्याशीं युद्धें होऊन त्यांत इंग्लिशांचा जय झाला व १८२० च्या सुमारास इंग्लिशांची सत्ता भारतांतील एक प्रमुख सत्ता बनली. भारतांतील आपल्या वर्चस्वाखालीं असलेल्या प्रदेशाच्या राज्यकारभारासाठीं पार्लमेंटनें रेग्यूलेटिंग ॲक्ट (१७७३) व पिटचा इंडिया कायदा (१७८४) हे कायदे पास केले.

उत्तर अमेरिकेंतील वसाहतीः— उत्तर अमेरिकेच्या पूर्वकिनाऱ्यालगतच्या प्रदेशांत १६०७–१७३२ पर्यंतच्या काळांत इंग्लंडच्या १३ वसाहती स्थापन झालेल्या होत्या. यांपैकीं कांहीं वसाहती कापूस, तंबाखू वगैरे पदार्थांची लागवड करण्यासाठीं, कांहीं आपल्या धर्मपंथाप्रमाणें इंग्लंडमध्यें आपणांस रहातां यावयाचें नाहीं म्हणून स्थापन झालेल्या होत्या. कांहीं वसाहती मूळच्या फ्रेंच व डच लोकांच्या असून त्या इंग्लंडनें जिंकून घेतलेल्या होत्या. या वसाहतीस इंग्लंडच्या राजाकडून वेगवेगळी सनद मिळाली असून वसाहतीसंबंधीं कायदे व नियम करण्यासाठीं कायदेमंडळें होतीं व तेथील राज्यकारभार करण्यास इंग्लंडकडून गव्हर्नर पाठविले जात. या इंग्लंश वसाहतींच्या उत्तरेस फ्रेंच लोकांची कॅनडा वसाहत व पश्चिमेस ल्यूसिआना या विस्तृत वसाहती होत्या. दक्षिणेस स्पेनच्या वसाहती होत्या. तसेंच तेथील रेड इंडियन लोकांचीं ठाणीं ठिकठिकाणीं पसरलेलीं होतीं. त्या सर्वांशीं या वसाहतींचे युद्धप्रसंग होत व त्यांसाठीं त्यांस इंग्लंडच्या मदतीची आवश्यकता वाटे. वसाहती या मातृभूमीच्या फायद्यासाठीं स्थापन करण्यांत आलेल्या आहेत, अशी युरोपमधील सर्व राष्ट्रांची समजूत असे; व त्यामुळें त्यांच्यावर मातृभूमीकडून बरेंच नियंत्रण घालण्यांत येई. इतर युरोपियन राष्ट्रांच्या मानानें इंग्लंडचें आपल्या वसाहतीसंबंधाचें धोरण अधिक उदारपणाचें होतें. वसाहतींनीं फक्त कच्चा माल तयार करावा व तो मातृभूमीस पाठवावा, मातृभूमीचा पक्का माल विकत घ्यावा, इतर परकीय वसाहतींशीं व्यापार करूं नये वगैरे निर्बंध इतर युरोपियन राष्ट्रांप्रमाणें इंग्लंडनेंही आपल्या वसाहतींवर घातले होते. आपल्या व्यापारावर असलेले हे निर्बंध वसाहतींतील लोकांस आवडत नव्हते, पण जवळ असलेल्या फ्रेंच वसाहतींशीं त्यांचे तंटे सुरू असल्यामुळें मातृभूमीच्या मदतीची त्यांना आवश्यकता वाटे व त्यामुळें आपल्या व्यापारावरील निर्बंधास त्यांस विरोध करितां येईना. पण सप्तवार्षिक युद्धांत उत्तरेकडील फ्रेंचाची कॅनडा ही वसाहत इंग्लिशांनीं जिंकून घेतली असल्यामुळें

(१७६३) फ्रेंच वसाहतीकडून वाटणारी भीति नष्ट झाली व त्या इंग्लिश वसाहती मातृभूमीस विरोध करण्याचें धाडस करूं लागल्या.

इंग्लिश वसाहतींचें मातृभूमीशीं युद्ध होण्याचीं कारणें— इंग्लिश वसाहतींचें फ्रेंचापासून संरक्षण करण्याच्या कामीं इंग्लंडला बराच खर्च पडला होता. त्याचप्रमाणें वसाहतींच्या संरक्षणासाठीं ब्रिटिश सैन्यही तेथें ठेवण्यांत आलेलें होतें. तेव्हां त्या खर्चाचा कांहीं भाग वसाहतींनीं सोसणें जरूर आहे म्हणून इंग्लंडच्या पार्लमेंटनें १७६५ मध्यें स्टँप ॲक्ट हा कायदा पास केला. या कायद्यानें खरेदीखत, गहाणखत वगैरे करारनामे व इतर दस्तऐवज हे स्टँपच्या कागदावर नोंदलेले असले पाहिजेत असें ठरविलें. तेव्हां या कायद्याविरुद्ध वसाहतींमध्यें बरीच ओरड झाली व वसाहतींतील कायदेमंडळांनीं त्याविरुद्ध निषेधपर ठराव पास केले. वसाहतींबद्दल सहानुभूति वाटणारे असे बरेच सभासद पार्लमेंट सभेमध्येंही होते. वसाहतींतील लोक हे ब्रिटिश नागरिक असल्यामुळें त्यांस इंग्लिश लोकांप्रमाणें राजकीय हक्क असावयास पाहिजेत असें त्यांस वाटत होतें. स्टँप ॲक्ट विरुद्ध हा विरोध पाहून इंग्लंडनें १७६६ मध्यें हा कायदा रद्द केला. पण वसाहतींच्या व्यापारावर नियंत्रण ठेवण्याचा आपणांस अधिकार आहे हें स्पष्ट करण्यासाठीं वसाहतींत येणाऱ्या मालापैकीं चहा, कागद, कांच वगैरे जिनसांवर आयात जकात बसविली (१७७०). तेव्हां या जकातीविरुद्धही असंतोष पसरून 'ब्रिटिश पार्लमेंटमध्यें वसाहतींचे प्रतिनिधी नाहींत तेव्हां वसाहतींवर कर लादण्याचा पार्लमेंटला अधिकार नाहीं' असें वसाहतींमधील लोक म्हणूं लागले. तेव्हां तेथील खळबळ पाहून तेथें दंगेधोपे झाल्यास त्याचा मोड करितां यावा म्हणून इंग्लंडनें तेथें सैन्य पाठविलें. १७७३ मध्यें ईस्ट इंडिया कंपनीचें चहानें भरलेलें जहाज मॅसाच्यूसेटस या वसाहतीच्या बोस्टन बंदरांत आलें असतां वसाहतींतील कांहीं लोक जहाजावर चढले व त्यांनीं चहाच्या पेट्या समुद्रांत फेकून दिल्या. तेथील लोकांचा हा अत्याचार पाहून त्यांस शिक्षा करण्यासाठीं इंग्लंडच्या पार्लमेंटनें व्यापारासाठीं बोस्टन बंदर बंद केलें असल्याचा कायदा केला तेव्हां ठिकठिकाणीं दंगेधोपे व्हावयास सुरवात झाली. वसाहतींच्या प्रतिनिधींनीं फिलाडेल्फिया येथें आपली परिषद् भरविली व सामोपचारानें हा प्रश्न मिटला नाहीं व इंग्लंडविरुद्ध युद्ध करावें लागलें तर उपयोगी पडावें म्हणून सैन्य उभारण्यास सुरवात केली. इंग्लंडमधील थोरला पिट व बर्क या मुत्सद्यांनीं

इंग्लंडच्या पार्लमेंटनें वसाहतींच्या संमतीखेरीज त्यांच्यावर कर बसवूं नये व हा प्रश्न सामोपचारानें मिटवावा याबद्दल प्रयत्न केला. पण राजा ३ रा जॉर्ज व त्यावेळेचा मुख्य प्रधान लॉर्ड नॉर्थ यांस ही गोष्ट पसंत पडली नाहीं. तेव्हां इंग्लंड व वसाहती यांमधील वितुष्ट विकोपास जाऊन दोहोंमध्यें युद्ध सुरू झालें (१७७५).

वसाहतींचें मातृभूमीशीं युद्ध (१७७५–१७८३)— बोस्टनजवळ युद्धास सुरवात होऊन तें सर्वत्र पसरलें. वसाहतींच्या परिषदेनें **जॉर्ज वॉशिंग्टन** या शूर, धाडसी व शांत वृत्तीच्या गृहस्थास वसाहतींच्या सैन्याचे मुख्य सेनापति नेमले. पूर्वी सप्तवार्षिक युद्धांत त्यानें शूर योद्धा म्हणून कीर्ति मिळविली होती व त्याबद्दल सर्वांस आदर वाटत होता. त्यानें वसाहतींच्या सैन्यांत आत्मविश्वास उत्पन्न केला. सामोपचारानें हा तंटा न मिटतां इंग्लंडशीं युद्ध सुरू झालें आहे हें पाहून वसाहतींची तिसरी परिषद् फिलाडेल्फिया येथें भरली व तिनें स्वातंत्र्य जाहीर केलें (४ जुलै १७७६). यानंतर वसाहतींस फ्रान्स, स्पेन वगैरे राष्ट्रांकडून मदत मिळण्याचा प्रयत्न करण्यांत आला. सप्तवार्षिक युद्धांत इंग्लंडनें फ्रेंचांचा पराभव करून त्यांच्या अमेरिकेंतील वसाहती व हिंदुस्थानांतील महत्त्व कमी केलें असल्यामुळें इंग्लंडचा सूड घेण्यास ही चांगली संधि आहे असें फ्रान्सला वाटत होतें, तेव्हां त्यांनीं इंग्लिश वसाहतींस मदत केली. अमेरिकेंत हें युद्ध सुरू झाल्यावर हाऊ या इंग्लिश सेनापतीनें १७७६ मध्यें न्यूयॉर्कजवळील ब्रुकलिन येथें व १७७७ मध्यें ब्रँडीवाईन येथें वॉशिंग्टनच्या सैन्याचा पराभव केला. पण यानंतर १७७७ मध्यें इंग्लिश सेनापती बरगॉइन याचा **सॅराटोगा** जवळ पराभव होऊन त्यास अमेरिकन सेनापती गेटस् यास शरण जावें लागलें. इंग्लंडच्या सैन्याच्या या पराभवामुळें फ्रान्सनें उघडरीतीनें अमेरिकेंतील इंग्लिश वसाहतींच्या स्वातंत्र्यास मान्यता देऊन त्यांच्याशीं तह केला व इंग्लंडशीं युद्ध जाहीर केलें. यानंतर १७७९ मध्यें स्पेन व १७८० मध्यें हॉलंड यांनींही इंग्लंडशीं युद्ध जाहीर करून वसाहतींस पैसा, सैन्य व जहाजें यांची मदत करण्याचें व इंग्लंडची नाकेबंदी करण्याचें ठरविलें. फ्रान्स, स्पेन व हॉलंड हीं राष्ट्रें इंग्लंडविरुद्ध वसाहतींस मिळाल्यामुळें इंग्लंडहून अमेरिकेस पाठविल्या जाणाऱ्या सैन्यास व युद्धसामुग्रीस अडथळा येऊं लागला. तेव्हां अमेरिकेंतील इंग्लिश सैन्याची स्थिति चमत्कारिक झाली. तेथें १७८१च्या

ऑक्टोबरमध्यें लॉर्ड कॉर्नवॉलिस या इंग्लिश सेनापतीचा यॉर्क टाऊन येथें पराभव होऊन त्यास वसाहतींच्या सैन्यास शरण जावें लागलें. या युद्धाच्या वेळीं स्पेनच्या किनाऱ्यावर जिब्राल्टर हें इंग्लंडच्या ताब्यांत असलेलें आरमारी ठिकाण मिळविण्याचा स्पेननें प्रयत्न केला परंतु त्यास यश मिळालें नाहीं (१७८२). तसेंच इंग्लंडच्या आरमारानें वेस्ट इंडिज बेटानजीक फ्रेंच आरमारावर विजय मिळविला. तेव्हां इतर ठिकाणीं इंग्लिशांस जय मिळत गेला, तरी खुद्द अमेरिकेंत इंग्लिश सैन्याचा पराभव होत गेल्यामुळें फ्रान्समधील व्हर्सेल्स येथें तह होऊन (१७८३) हें युद्ध थांबविण्यांत आलें. या तहानें इंग्लंडनें अमेरिकेंतील इंग्लिश वसाहतींच्या स्वातंत्र्यास मान्यता दिली (२) फ्रान्सला वेस्ट इंडिजमधील टोबॅगो व पश्चिम आफ्रिकेंतील सेनेगाल हीं ठिकाणें परत मिळालीं. स्पेनला फ्लारिडा व मिनॉर्का हीं परत मिळालीं.

अशाप्रकारें इंग्लंडची उत्तर अमेरिकेंतील वसाहत स्वतंत्र झाली.

रशिया

(९००–१८१५)

रशिया— युरोपच्या ईशान्य भागांतील विस्तृत प्रदेशास रशिया असें म्हणतात. फार प्राचीन काळापासून या प्रदेशांत स्लाव्ह या मानववंशाचे लोक रहात असून त्यांची वृत्ति भटकी होती. त्यांची भाषा आर्यन (इंडो आर्यन) भाषेपैकीं होती. इ. सनाच्या ९ व्या शतकांत उत्तरेकडील स्वीडिश लोकांनीं त्यांच्यावर वर्चस्व बसविलें. पुढें ११ व्या शतकापर्यंतच्या काळांत ते कॉन्स्टांटिनोपल येथील ख्रिस्ती धर्मगुरूमार्फत (पॅट्रिआर्च) ख्रिस्ती धर्मी होऊन ग्रीक चर्च किंवा सनातनी ख्रिस्ती धर्मपंथाचे (Orthodox Church) अनुयायी झाले. १३ व्या शतकांत मध्य आशियांत मंगोल लोकांची सत्ता स्थापन झाल्यावर त्यांनीं रशियावर स्वारी करून त्यांस आपल्या वर्चस्वाखालीं आणले; तेव्हां रशियन लोकांचीं लहानमोठीं राज्यें मंगोल लोकांच्या बादशहाची (खान) मांडलिक झालीं. पण पुढें १५ व्या शतकांत मंगोल व तुर्क लोकांची सत्ता क्रमकुवत झाली, तेव्हां मास्को येथील रशियन राज्यानें मंगोल लोकांची सत्ता झुगारून दिली. पण १–२ शतकें त्यांच्यावर मंगोल लोकांचें वर्चस्व असल्यामुळें

पौर्वात्य चालीरीती, पोषाखाची पद्धत व रहाणी यांचा त्यांच्यावर बराच पगडा बसला. तसेंच मंगोल लोकांच्या बऱ्याच जमाती रशियामध्यें स्थायिक होऊन मंगोल लोकांची सत्ता नाहींशी झाल्यावर त्या रशियन लोकांमध्यें मिसळून गेल्या व ख्रिस्तीधर्मी बनल्या. मास्को येथें असलेल्या रशियाच्या राज्यांत थोर इव्हान (१४६२–१५०५) हा एक प्रसिद्ध राजा झाला. त्यानें व त्याच्या मुलानें भोंवतालचीं रशियन राज्यें आपल्या वर्चस्वाखालीं आणून आपलें राज्य बरेच वाढविलें. १४५३ मध्यें तुर्कांनीं पूर्व रोमन साम्राज्याचा नाश करून कॉन्स्टांटिनोपल शहर हस्तगत केल्यावर पूर्व रोमन सम्राटाचा राजकीय व धार्मिक अधिकार आपणाकडे आला आहे असें समजून थोर इव्हॅनचा नातू **पतापी इव्हान** यानें १५४७ मध्यें स्वतःस **रशियाचा झार (सीझर = सम्राट)** म्हणून राज्याभिषेक करवून घेतला. तसेंच त्यानें सरदार व अमीर-उमराव यांच्या जहागिरी जप्त करून आपला प्रदेश वाढविला व आपली सत्ता प्रबळ व अनियंत्रित केली. त्याच्या मृत्यूनंतर कांहीं वर्षें राज्यांत बरीच अंदाधुंदी झाली पण नंतर रोमानॉफ घराणें स्थापन झालें (१६१३).

रोमानॉफ घराण्यांतील थोर पीटर (१६८२–१७२५)— रोमानॉफ (Romanoff) घराण्यांतील पहिला राजा माचकेल हा होता. यानंतर रोमानॉफ घराण्यांत थोर पीटर हा एक प्रसिद्ध राजा होऊन गेला. गादीवर आला त्यावेळीं तो अल्पवयी होता, पण १६८९ मध्यें तो १७ वर्षांचा झाल्यावर त्यानें राज्य-कारभाराचीं सूत्रें आपल्या हातीं घेतलीं. सतराव्या शतकाच्या उत्तरार्धांत रशिया हा एक मागासलेला देश होता. रशियाच्या सरहद्दीवर स्वीडन, पोलंड, तुर्कस्थान, इराण हीं प्रबल अशीं राष्ट्रें असून त्याच्याकडून रशियावर केव्हां स्वारी होईल याचा नेम नव्हता. तसेंच रशियाच्या झारच्या संरक्षणासाठीं असलेलें 'स्ट्रेल्टझी' हें शरीर संरक्षक सैन्य डोईजड झालें असून त्यांच्याकडून झारच्या सत्तेस केव्हां विरोध होईल हें सांगतां येत नव्हतें. तसेंच रशियाला उत्तरेखेरीज समुद्र किनारा नसल्यामुळें इतर राष्ट्रांशीं दळणवळण ठेवून आपली सुधारणा करून घेणें अवघड होतें. पीटर हा महत्त्वाकांक्षी व कर्तृत्ववान् होता. आपल्या राष्ट्रास समुद्रकिनारा मिळवून इतर राष्ट्रांशीं दळणवळण करणें व राष्ट्रांत उद्योगधंद्यांची स्थापना करून आपल्या राष्ट्राची सर्वांगीण उन्नति करण्याचें त्यानें योजलें. पाश्चात्य संस्कृति, उद्योगधंदे, व आचारविचार यांचें प्रत्यक्ष ज्ञान मिळविण्यासाठीं पीटरनें गुप्त

वेशानें १६९७–९८ हीं वर्षें जर्मनी, हॉलंड व इंग्लंड या देशांत घालविलीं. त्यानें ठिकठिकाणचे कारखाने, जहाजें बांधावयाच्या गोद्या, गिरण्या, विद्याकेंद्रें पाहिलीं, व तेथील वाकबगार लोकांकडून माहिती मिळविली. ज्ञान संपादन करण्यासाठीं तो अशाप्रकारें परदेशांत गेला असतां त्याच्या शरीरसंरक्षक सैन्यानें बंडाळी केलीं असल्याची वार्ता त्यास समजली. तेव्हां तो तात्काळ राशियांत आला, व त्यानें ती बंडाळी मोडून टाकली व बंडखोर सैनिकांवर पुरा सूड घेण्यासाठीं व इतरांवर दहशत बसविण्यासाठीं त्यानें हजारों सैनिकांस हालहाल करून ठार मारलें. तसेंच पूर्वापार चालत आलेलें हें सैन्य काढून टाकून आपल्या स्वतःच्या हुकमतीखालीं असलेलें खडें सैन्य उभारलें: व त्यास परराष्ट्रीय तज्ज्ञांकडून लष्करी शिक्षण देऊन व आधुनिक हत्यारें देऊन तें सुसज्ज केलें. झारला राज्यकारभाराचे कामीं सल्लामसलत देण्यासाठीं अमीरउमरावांचें '**डयूमा**' नांवाचें एक मंडळ होतें तें त्यानें रद्द करून आपल्या स्वतःच्या अधिकारानें नवीन सल्लागार मंडळ नेमलें. मास्को येथील सनातनी ख्रिस्ती धर्माचा धर्मगुरु १७०० मध्यें मरण पावल्यावर धर्मगुरूकडून आपणांस विरोध होऊं नये म्हणून मास्को येथील धर्मगुरूची जागा रद्द केली व त्याऐवजीं धार्मिक बाबतींत आपणांस सल्लामसलत देण्यासाठीं एक मंडळ (Synod) नेमिलें. त्यानें आपल्या राज्यांतील दळणवळण वाढावें व व्यापारवृद्धि व्हावी यासाठीं रस्ते बांधले व कालवे खणले. राष्ट्रांतील उद्योगधंद्यास उत्तेजन देऊन नवीन उद्योगधंदे सुरू केले. शास्त्रीय व औद्योगिक शिक्षणासाठीं शाळा काढल्या. त्यानें पौर्वात्य पद्धतीची पायघोळ आंगरखे घालण्याची व दाढीमिशा ठेवण्याची पद्धत बंद करून पाश्चात्य पद्धतीचा आटोपशीर व टापटिपीचा पोशाख करण्याची पद्धत सुरू करण्यास आपल्या राज्यांतील अमीरउमरावांचें व इतरांचें मन वळविण्याचा प्रयत्न केला. पाश्चात्य ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठीं लायक तरुणास त्यानें प्रमुख अशा पाश्चात्य देशांत पाठविलें. दक्षिणेकडे काळ्या समुद्रावरील बंदर व प्रदेश व वायव्येकडील बाल्टिक समुद्रकिनाऱ्यावरील बंदर व प्रदेश मिळविण्याचा त्याचा विचार होता. दक्षिणेकडे तुर्कस्थानचें प्रबल असें साम्राज्य असल्यामुळें काळ्या समुद्रावरील बंदर मिळविण्याच्या कामीं त्यास यश आलें नाहीं, पण त्यानें स्वीडनशीं युद्ध करून बाल्टिक समुद्रकिनाऱ्यावरील एस्टोनिया, लिव्होनिया हे प्रदेश मिळविले. त्यामुळें समुद्रमार्गें पाश्चात्य देशांशीं दळणवळण ठेवणें शक्य

झालें. बाल्टिक समुद्रावरील बंदरावर त्यानें एक सुंदर शहर वसविलें व तें आपलें राजधानींचें ठिकाण केलें. या शहरास सेंट पीटर्स बर्ग असें म्हणण्यांत येऊं लागलें. रशिया हा देश मागासलेला होता, पण थोर पीटरनें केलेल्या सुधारणेमुळें तो देश पुढें येऊं लागला.

थोर पीटरनंतर आलेल्या दोन राजकर्त्यांच्या कारकीर्दीत रशियामध्यें जुन्या मताच्या लोकांचा पगडा बसून पीटरच्या सुधारणा नामशेष करण्याचा प्रयत्न करण्यांत आला, पण त्यानंतरच्या राजकर्त्यांनीं पीटरचें धोरण पुढें चालविल्यामुळें रशियानें मिळविलेलें महत्त्वाचें स्थान टिकून राहून युरोपमधील प्रमुख राष्ट्रांत रशियाची गणना होऊं लागली.

थोर कॅथरीन २ री (१७६२–१७९६)—ही जर्मनीमधील एका संस्थानिकाची मुलगी असून तिचें रशियाचा झार ३ रा पीटर याच्याशीं लग्न झालें होतें. ३ रा पीटर हा नेभळा व अर्धवट होता व कॅथरीननें आपल्या मर्जीतील दोन इसमांकडून त्याचा वध करविला व आपल्या हातीं राज्यकारभार घेतला. अन्यायानें व क्रूरपणानें जरी तिनें राज्यपद मिळविलें तरी गादीवर आल्यावर आपल्या कर्तबगारीनें व मुत्सद्देगिरीनें तिनें रशियास युरोपियन राष्ट्रांत महत्त्वाचें स्थान मिळवून दिलें. तिनें तुर्कस्थानच्या सुलतानाविरुद्ध युद्ध उपस्थित करून काळ्या समुद्राच्या उत्तरेकडील प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणला व तेथील अझाव्ह बंदर मिळविलें. या बंदरामार्फत डार्डानेल्सच्या सामुद्रधुनींतून भूमध्य समुद्रांत जाणें शक्य झालें व त्यामुळें रशियास दक्षिणेकडील राष्ट्रांशीं समुद्रमार्गें दळणवळण ठेवतां येऊं लागलें. तसेंच तिनें आपल्या पश्चिम सरहद्दीवरील पोलंडशीं युद्ध उपस्थित करून १७७२ मध्यें पोलंडचा कांहीं प्रदेश मिळविला व यानंतर आस्ट्रिया व प्रशिया या राष्ट्रांशीं संगनमत करून १७९३ व १७९५ मध्यें पोलंडवर स्वारी केली व पोलंडचा पराभव केला. यानंतर पोलंडचा प्रदेश आपसांत वांटून घेऊन पोलंड देशाचें स्वतंत्र अस्तित्व नाहींसें केलें.

आस्ट्रिया

(१४००–१८१५)

आस्ट्रिया—जर्मनीमध्यें जीं वेगवेगळीं संस्थानें व राज्यें होतीं त्यांत आस्ट्रियाचें राज्य प्रमुख मानलें जाई. इ. स. १२७३ मध्यें तेथील हॅप्सबर्ग घराण्यांतील संस्थानिक रुडोल्फ (Rudolph) यास पवित्र रोमन सम्राट म्हणून नेमण्यांत आलें. त्यावेळेपासून आस्ट्रियाच्या हॅप्सबर्ग घराण्यांतील पुरुषाचीच पवित्र रोमन सम्राट म्हणून नेमणूक होण्याचा प्रघात पडला. १५ व्या शतकाच्या उत्तरार्धांत आस्ट्रियाच्या हॅप्सबर्ग घराण्यांतील मॅक्झीमीलन हा पवित्र रोमन सम्राट् होता. त्यानें आपला एकूलता एक मुलगा फिलीप याचें स्पेनच्या राजाची वडील मुलगी जोअना हिच्याशीं लग्न केलें. त्यास चार्लस व फर्निनंड हें पुत्र झालें. चार्लस हा १५१६ मध्यें स्पेनचा राजा झाला व त्यानंतर १५१९ मध्यें पवित्र रोमन सम्राट म्हणून त्याची नेमणूक झाल्यावर त्याच्या हॅप्सबर्ग घराण्याकडे बराच विस्तृत प्रदेश आला. १५५६ चार्लस यानें राज्यत्याग केल्यावर हॅप्सबर्ग घराण्याच्या स्पॅनिश व आस्ट्रियन अशा २ शाखा झाल्या. ५ व्या चार्लसचा मुलगा फिलीप हा २ रा फिलीप म्हणून स्पेनचा राजा झाला व त्याचा भाऊ फर्डिनंड याच्याकडे आस्ट्रियाचें राज्य आलें व त्यास पवित्र रोमन सम्राट म्हणून नेमण्यांत आलें. तेव्हां त्याच्याकडे आस्ट्रिया, बोहिमिया, हंगेरी हा प्रदेश आला; व १७१३ मध्यें झालेल्या युट्रेक्टच्या तहानें त्याचा पुत्र पवित्र रोमन सम्राट ६ वा चार्लस (१७११-४०) याच्याकडे बेल्जम (आस्ट्रियन नेदर्लंड) हा प्रदेश व इटलीमधील मीलॅन, नेपल्स व सार्डिनिया हे प्रदेश आले. पवित्र रोमन सम्राट म्हणून त्यानें १७४० पर्यंत राज्य केलें. त्यास पुत्र नव्हता, पण **मेरिया थेरेसा** नांवाची मुलगी होती. आस्ट्रियाच्या कायद्याप्रमाणें मुलीस राज्य करतां येत नसे, पण आपल्यानंतर तिला गादी मिळावी म्हणून त्यानें जर्मनीमधील संस्थानें व इतर युरोपियन राष्ट्रें यांची संमति घेतली होती. पण १७४० मध्यें चार्ल्स मरण पावल्यावर प्रशियाचा राजा फ्रेडरिक यानें पूर्वी दिलेली संमति झुगारून देऊन तिच्या राज्यांतील साथलेशिया प्रांत हस्तगत केला, त्यामुळें युरोपमध्यें 'आस्ट्रियाच्या गादीवरील वारसहक्कासंबंधाचें' युद्ध उपस्थित झालें (१७४०–४८). या युद्धांत फ्रान्स, स्पेन या राष्ट्रांनीं प्रशियाला व इंग्लंड व हॉलंड यांनीं मेरिया

थेरेसाला मदत केली. हें युद्ध ८ वर्षें चालून एक्स-ला-चापेल येथें तह झाला. या तहानें तिला आपला सायलेशिया प्रांत प्रशियास द्यावा लागला.

मेरेया थेरेसा हिनें लॉरेनचा फ्रँसिस याच्याशीं लग्न केलें व त्यांच्या मुलाकडे आस्ट्रियाच्या वर्चस्वाखालीं असलेला प्रदेश गेला व त्यास पवित्र रोमन सम्राट नेमण्यांत आले. मेरेया थेरेसा हिची मुलगी मेरेया ॲन्टायनेट (Marie Antoinette) हिनें फ्रान्सचा राजा १६ वा लुई याच्याशीं लग्न केलें, व ती फ्रान्सची राणी झाली; व तिची पणती मेरिआ लुइसा हिनें पुढें नेपोलियन बोनापार्ट याच्याशीं लग्न केलें. आस्ट्रियाच्या हॅप्सबर्ग घराण्याकडे चालत आलेला 'पवित्र रोमन सम्राट' या किताबाचा त्याग करणें आस्ट्रियाच्या राजास नेपोलियननें पुढें भाग पाडलें (१८०६).

प्रशिया

प्रशिया (१४१५ ते १८१५) जर्मनीमध्यें ब्रँडेनबर्ग नांवाचें एक संस्थान असून तेथील संस्थानिकास पवित्र रोमन सम्राटाच्या निवडणुकीच्या वेळीं मत देण्याचा अधिकार होता. १४१५ मध्यें या संस्थानचा कारभार **होहेन-झोलर्न** घराण्याकडे आला. १६१८ मध्यें या घराण्याकडे जर्मनीच्या बाहेरील पूर्वेकडील बाल्टिक समुद्रालगतचा प्रशिया हा प्रदेश वारसहक्कानें आला. या प्रदेशांत स्लाव्ह व जर्मन लोकांची वस्ती होती. १६४० मध्यें फ्रेडरिक विल्यम (१७४०–८८) हा ब्रँडेनबर्ग संस्थानाचा संस्थानिक झाला, तेव्हां त्याच्याकडे प्रशिया हा प्रदेशही आला. फ्रेडरिक विल्यम हा कर्तृत्ववान व मुत्सद्दी होता व त्यानें त्यावेळीं सुरू असलेल्या 'तीस वर्षें टिकलेल्या युद्धाच्या' शेवटीं झालेल्या तहानें ब्रँडेनबर्गच्या ईशान्येकडील बाल्टिक समुद्रकिनाऱ्यावरील प्रदेश मिळविला. त्यामुळें त्याचें राज्य बरेंच विस्तृत झालें. त्यानें आपल्या सर्व प्रदेशांतील वेगवेगळी स्थानिक व्यवस्था रद्द केली व सर्वत्र एका पद्धतीची राज्य-कारभाराची पद्धत अमलांत आणून ती केंद्रीभूत केली. त्यानें आपल्या राज्यांत खडें सैन्य ठेविलें व त्यास चांगलें लष्करी शिक्षण देऊन तें सुसज्ज केलें.

फ्रेडरिक विल्यमनंतर त्याचा पुत्र फ्रेडरिक याच्याकडे वरील विस्तृत प्रदेशाचा कारभार आला. १७०१ मध्यें त्यास ब्रँडेनबर्गचा संस्थानिक याप्रमाणें

'प्रशियाचा राजा' हा हुद्दा धारण करण्याची पवित्र रोमन सम्राटाकडून परवानगी मिळाली, व पुढें युट्रेक्टच्या तहानें (१७१३) या गोष्टीस युरोपमधील इतर राजकर्त्यांचीही मान्यता मिळाली. यानंतर होहेनझोलार्न या घराण्याकडे जर्मनीमधील व जर्मनीच्या बाहेर असलेल्या सर्व प्रदेशांस 'प्रशियाचें राज्य' असें म्हणण्यांत येऊं लागलें व ब्रँडेनबर्गचें राज्य हें नांव मागें पडलें, त्यामुळें **प्रशियाचें राज्य** हें जर्मनीमधील ऑस्ट्रिया, बव्हेरिया वगैरे राज्यांप्रमाणें एक राज्य असल्यासारखें झालें.

फ्रेडरिक १ ला विल्यम (१७१३–१७४०) हा प्रशियाचा राजा झाला. त्यानें राज्यांतील इतर खर्चांत खूप काटकसर करून लष्करी बाबतींत बराच खर्च केला व आपलें सैन्य युरोपमधील इतर राष्ट्रांच्या तोडीचें प्रबल केलें.

थोर २ रा फ्रेडरिक (१७४०–८६)– थोर २ रा फ्रेडरिक हा एक प्रसिद्ध राजा होऊन गेला. त्यानें प्रशियाचें महत्त्व व दरारा खूप वाढविला. त्यानें विद्याकलांसही उत्तेजन दिलें. ऑस्ट्रियाचा राजा व पवित्र रोमन सम्राट ६ वा चार्ल्स हा १७४० मध्यें मरण पावल्यावर त्याची मुलगी मेरेया थेरेसा हिच्याकडे ऑस्ट्रियाचा कारभार आला आहे हें पाहून त्यानें ऑस्ट्रियांतील सायलेशिया प्रांतावर हल्ला करून तो आपल्या ताब्यांत घेतला. त्यामुळें युरोपमध्यें युद्ध उपस्थित झालें, व त्यांत युरोपमधील इतर राष्ट्रांनींही भाग घेतल्यामुळें तें युरोपमध्यें व युरोपच्या बाहेरही पसरलें. या युद्धानंतर जर्मनीमधील वर्चस्वासंबंधीं आस्ट्रिया व प्रशिया या राष्ट्रांमध्यें स्पर्धा उत्पन्न झाली. युरोपमध्यें प्रशियाच्या वाढत्या सत्तेबद्दल रशिया व स्वीडन या राष्ट्रांसही वैषम्य वाटूं लागलें. तेव्हां आस्ट्रियाची मेरेया थेरेसा हिनें रशिया व स्वीडन या राष्ट्रांशीं संगनमत करून प्रशियाकडून सायलेशिया प्रांत परत मिळविण्याचा प्रयत्न केला व त्यामुळें युरोपमध्यें सप्तवार्षिक युद्ध (१७५६–६३) सुरू होऊन व्यापार, वसाहती व अंकित प्रदेश या बाबतींत इंग्लंड व फ्रान्स यांमध्यें असलेल्या स्पर्धेमुळें उत्तर अमेरिका व भारत येथेंही तें पसरलें. या युद्धांत इंग्लंडनें प्रशियाच्या बाजूनें व फ्रान्सनें मेरेया थेरेसा (आस्ट्रिया) हिच्या बाजूनें भाग घेतला. या युद्धानंतर झालेल्या पॅरिसच्या तहानें सायलेशिया प्रांत प्रशियाकडे राहूं देण्यास मेरिया थेरेसा हिला मान्यता द्यावी लागली. यानंतर २ ऱ्या फ्रेडरिक विल्यमनें रशिया व आस्ट्रिया या राष्ट्रांशीं संगनमत करून १७७२, १७९३ व १७९५ मध्यें

पोलंडवर स्वाऱ्या करून त्या राष्ट्राचा प्रदेश आपसांत विभागून घेतला. हा प्रदेश मिळाल्यानें प्रशियाच्या राजाच्या वर्चस्वाखालीं जर्मनींतील व जर्मनीच्या बाहेरील बाल्टिक समुद्रालगतचा विस्तृत प्रदेश येऊन प्रशिया हें मोठें प्रबल राज्य झालें. २ ऱ्या फ्रेडरिक विल्यमनें शास्त्र, कला, विद्या यांस उत्तेजन दिलें. शेतकीमध्यें सुधारणा केली व आर्थिक स्थिति भक्कम पायावर उभारली. तो स्वतःस जबाबदार असणारे कर्तव्यदक्ष व लायक असे अधिकारी नेमून त्यांच्याकडून राज्यकारभार करी, त्यामुळें त्याची सत्ता अनियंत्रित झाली, व प्रशियामधील जनतेला राज्यकारभारामध्यें कांहींच भाग घेतां येत नव्हता.

फ्रान्समधील राज्यक्रांति व तिचे जागतिक परिणाम

(१७८९–१८१५)

प्रास्ताविक—१४व्या लुईनंतर फ्रान्सवर राज्य करणारे राजे अकर्तृत्ववान्, चैनी, व ख्यालीखुशालींत वेळ घालविणारे असल्यानें त्यांनीं आपल्या हातीं असलेल्या सत्तेचा उपयोग आपल्या लहरीप्रमाणें राज्यकारभार करण्याकडे करून लोकांवर जुलूम करण्याकडेच केला. अशी स्थिति असतां १७८९ मध्यें फ्रान्समध्यें मोठा प्रक्षोभ होऊन राज्यक्रान्ति झाली व तिचा युरोपमधील इतर देशांवरही परिणाम होऊन यापुढील २०–२५वर्षें युरोपमध्यें मोठी खळबळ उडाली.

फ्रान्समधील राज्यक्रान्तीचीं कारणें—फ्रान्समध्यें राज्यक्रान्ति होण्यास राजकीय, सामाजिक, वैचारिक व आर्थिक वगैरे अनेक गोष्टी कारणीभूत झाल्या.

(१) राजकीय—फ्रान्समधील राजांच्या हातीं अनियंत्रित सत्ता होती. १४व्या लुईनंतर येणारे राजे १५ वा लुई (१७१५–१७७४) व १६ वा लुई (१७७४–९२) हे अकर्तृत्ववान, चैनी व आपल्या लहरीप्रमाणें राज्य करणारे होते. इंग्लंडच्या पार्लमेंट सभेप्रमाणें फ्रान्समध्यें पूर्वी 'स्टेटस जनरल' नांवाची सभा असून तिचे (१) सरदारांची सभा (२) धर्माधिकाऱ्यांची सभा व (३) सामान्य लोकांची सभा असे तीन विभाग असून या तीन विभागांच्या बैठकी वेगवेगळ्या भरत व त्यांचे वेगवेगळे मत घेतलें जाई. सरदार

व धर्माधिकारी यांचे हितसंबंध एक असल्यामुळें त्यांच्या सभांचें एकमत होई व तें साधारणतः सामान्य लोकांच्या हितसंबंधाविरुद्ध असे. १४ व्या लुईच्या कारकिर्दीत फ्रान्समधील सर्व सत्ता केंद्रीभूत व अनियंत्रित झाली होती व स्टेटस जनरलची बैठक भरविण्याचा प्रघात १७ व्या शतकाच्या सुरुवातीपासून बंद पडला होता. फ्रान्समधील राजे आपण नेमलेल्या व आपणांस जबाबदार असलेल्या मंत्र्यांच्या सल्ल्यानें राज्यकारभार करीत व लोकांवर कर बसवीत. राजकर्त्यांच्या जुलमी सत्तेविरुद्ध कोणी चळवळ केली असल्याचें समजल्यास त्यांस तुसत्या संशयावरून चौकशीविना पॅरिसमधील बॅस्टिल या तुरुंगांत बेमुदत अटकेंत ठेवण्यांत येई.

(२) **सामाजिक**—फ्रान्समधील समाजरचना सरंजामी पद्धतीवर आधारलेली असून तेथील बहुतेक सर्व जमीन मोठमोठे अमीरउमराव व धर्माधिकारी यांच्यामध्यें विभागली होती. पूर्वीच्या काळीं मोठमोठ्या सरदारांस सरंजामी पद्धतीप्रमाणें ससैन्य व सशस्त्र हजर राहून राजास देशरक्षणाच्या कामीं मदत करावी लागे व त्यांसाठीं त्यांस जमिनी देण्यांत आलेल्या होत्या. पण पुढें फ्रान्समधील राजांची सत्ता अनियंत्रित होऊन ते आपण नेमलेल्या अधिकाऱ्यांमार्फत राज्यकारभार करीत व त्यांस सरंजामी सरदारांच्या ससैन्य मदतीची गरज नसे तरी त्यांस करांपासून माफी असे. शेतावर काबाडकष्ट करून शेती करणाऱ्या कुळांस सरंजामी पद्धतीप्रमाणें मोठमोठ्या सरंजामी सरदारांस ठराविक मदत करावी लागे व राजकर्त्यांनीं बसविलेले डोईजड करही द्यावे लागत. शहरांत व मोठाल्या गांवांत रहाणाऱ्या मध्यम वर्गांतील लोकांची स्थिति शेतावरील कुळां-इतकी कष्टप्रद नव्हती, पण त्यांच्यावरही सरकारकडून बरेच जाचक निर्बंध घातले जात. व्यापारउद्योग करून हा वर्ग श्रीमंत होत होता पण जमिनी त्यांच्या मालकीच्या नसल्यामुळें त्यांस खानदानीचा वर्ग मानण्यांत येत नसे, पण शेतावर काबाडकष्ट करणाऱ्या कुळांची स्थिति फारच कष्टप्रद होती. त्यांस शेताबद्दल सरंजामी सरदारांस खंड द्यावा लागे. धर्माधिकाऱ्यांस धार्मिक व्यवस्थेबद्दल थाइथ नांवाचा कर द्यावा लागे. याखेरीज सरंजामी पद्धतीप्रमाणें सरंजामी सरदारांस नजराणे द्यावे लागत व त्यांच्या शेतावर काबाडकष्ट करावे लागत. समाजांतील वरचे वर्ग त्यांच्याकडे तुच्छतेनें पहात व ते इतर वर्गांचा द्वेष करीत. तेव्हां समाजांतील या वर्गांचीं

स्थिति फार हलाखीची झाली असून यांतून आपली सुटका कशी होते या विवंचनेंत हा वर्ग असे.

वैचारिक खळबळ—१८ व्या शतकाच्या मध्यानंतर फ्रान्समध्यें मोठ-मोठे तत्त्ववेत्ते व लेखक उदयास येत होते. यांपैकीं व्हॉल्टेर, रूसो, मॉंटेस्क्यू व डिडेरॉट हे प्रमुख होत. डिडेरॉट यानें आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीनें ज्ञानकोश तयार केला व नवीन ज्ञान व विचार यांचा सर्वत्र फैलाव केला व तत्कालीन राज्यसंस्था यावर टीका केली. मॉंटेस्क्यू यानें आदर्श राज्यपद्धतिसंबंधानें आपले विचार लोकांपुढें मांडले. व्हॉल्टेर यानें लोकांच्या धार्मिक समजुती व खुळे आचारविचार यावर प्रखर टीका केली. रूसो यानें सामाजिक व राजकीय बाबींसंबंधानें टीका करून समाजांतील सर्व वर्ग सारखे व स्वतंत्र आहेत, त्यांत उच्च व कनिष्ठ हे विभाग नाहींत, राज्यकारभारांत प्रत्येकास योग्य तो भाग मिळाला पाहिजे, लोक हे स्वतंत्र असून त्यांनीं आपल्या सोयीसाठीं राज्यसंस्था निर्माण केली, राज्यकर्त्यांकडून योग्यप्रकारें राज्यकारभार होत नसेल तर त्यास आपल्या जागेवरून काढून टाकणें व राज्यकारभार आपल्या हातांत घेणें हा लोकांचा हक्क आहे वगैरे विचार पुढें मांडले. राजांच्या हातीं असलेली अनियंत्रित सत्ता व तिचा त्यांच्याकडून होत असलेला दुरुपयोग, मोठमोठ्या धर्माधिकाऱ्यांची चैनीची व ऐषआरामाची रहाणी व धार्मिक कामाकडे होत असलेलें दुर्लक्ष, सरंजामी जहागिरदारांस असलेले विशेष हक्क व करांपासून त्यांची मुक्तता, समाजांतील विषमता यांवर या लेखकवर्गाकडून प्रखर टीका होऊं लागली व त्यामुळें फ्रान्समध्यें वैचारिक क्रान्ति झाली.

(४) आर्थिक—फ्रान्सची आर्थिक स्थिति फार खालावलेली होती. १४ वा लुई व १५ वा लुई यांच्या कारकीर्दीत झालेल्या युद्धामुळें फ्रान्सला खूप खर्च करावा लागून फ्रान्सचें कर्ज वाढत गेलें. दरबारचा खर्चही खूप वाढलेला होता. फ्रान्सचा खर्च उत्पन्नापेक्षां जास्ती असल्यामुळें खर्च व उत्पन्न यांची तोंडमिळवणी करण्यासाठीं नवीन कर्ज काढावें लागे व त्यामुळें राष्ट्रीय कर्जाची रक्कम वाढतच गेली. तेव्हां फ्रान्सची खालावलेली आर्थिक स्थिति सुधारण्यासाठीं काय करणें जरूर आहे याचा विचार करण्यासाठीं १६ व्या लुईनें आपल्या प्रधानाच्या सूचनेप्रमाणें 'स्टेटस जनरल'ची (फ्रान्समधील पार्लमेंट) बैठक बोलाविली (१७८९).

फ्रान्समधील राज्यक्रांति (१४ जुलै १७८९)—फ्रान्समधील सर्व सत्ता राज्याच्या हातीं केंद्रीभूत होऊन फ्रान्सचे राजे आपल्या स्वतःच्याच अधिकारानें कर बसवीत व राज्यकारभार करीत असल्यामुळें गेल्या १७५ वर्षांत 'स्टेटस जनरल'ची बैठक बोलावण्यांत आलेली नव्हती. या स्टेटस जनरलचे धर्माधिकाऱ्यांची सभा, सरदारवर्गाची सभा व सामान्य लोकांची सभा असे तीन विभाग असून त्यांच्या बैठकी वेगवेगळ्या सभागृहांत भरत. परंतु या बैठकीच्या वेळीं पूर्वीचा प्रघात रद्द समजून राष्ट्राच्या परिस्थितीचा विचार करण्यासाठीं सर्वांनीं एकाच सभागृहांत बसून विचार करणें जरूर आहे असा आग्रह सामान्य लोकांच्या सभेनें धरिला. या गोष्टीस, सरदार व धर्माधिकारी वर्गांपैकीं बऱ्याच लोकांचा विरोध होता तरी सर्वांची बैठक एकाच ठिकाणीं भरविण्यांत यावी असें सामान्य लोकांच्या सभेनें ठरवून या संयुक्त सभेस 'राष्ट्रीय सभा' असें नांव दिलें व फ्रान्सची नवी राज्यघटना तयार केल्याखेरीज आपलें विसर्जन न करण्याची शपथ घेतली (जून १७८९).

फ्रान्सच्या राष्ट्रीय सभेची बैठक सुरू असतां फ्रान्समधील निरनिराळ्या विभागांतील व पॅरिसमधील कष्टप्रद स्थितींत असलेल्या बहुजनसमाजांतील हजारों लोकांनीं ठिकठिकाणीं दंगेधोपे सुरूं केले व सरदार व धर्माधिकारी वर्गांवर अत्याचार होऊं लागले. राजाच्या जुलमी सत्तेविरुद्ध विरोध करणाऱ्या लोकांस राजसत्तेकडून पॅरिसमधील बॅस्टिल तुरुंगांत डांबून ठेवण्यांत येत असे, म्हणून पॅरिसमधील दंगेधोपे करणाऱ्या क्रांतिकारक लोकांनीं १४ जुलै १७८९ रोजीं **बॅस्टिल** तुरुंग फोडून तेथील सर्व कैद्यांस मुक्त केलें. बॅस्टिल तुरुंग हा राजाच्या जुलमी सत्तेचें प्रतीक मानण्यांत येई तेव्हां **१४ जुलै १७८९** ला तो फोडण्यांत आल्यामुळें त्या दिवसास फ्रान्समधील लोक **स्वातंत्र्य दिन** मानतात.

राष्ट्रीय सभेनें केलेल्या सुधारणा (१७८९-९१)—क्रान्तिकारक लोकांकडून वरील गोष्टी होत असतां 'राष्ट्रीय सभेनें' १७८९-९१ च्या दरम्यान खालील सुधारणा केल्या :—

(१) सरदार व मोठमोठे धर्माधिकारी यांच्याकडे सरंजामी पद्धतीप्रमाणें असलेली जमिनीची मालकी व त्यांस असलेले सरंजामी अधिकार रद्द केले. त्यामुळें

शेत कसणारीं कुळें शेतांचे मालक बनले व सरंजामी सरदारांस त्यांस द्यावा लागणारा खंड बंद झाला. मोठमोठ्या सरदारांच्या ताब्यांतील मोठमोठ्या जमिनींचे तुकडे पाडण्यांत येऊन ते भूमिहीन अशा गरीब शेतकऱ्यांस वांटून टाकण्यांत आले. शहरांतील किरकोळ उद्योगधंदे करणाऱ्या लोकांवर जे जाचक निर्बंध होते ते रद्द करण्यांत आले.

(२) **मानवी मूलभूत हक्काची सनद** (Declaration of the Rights of Man) ही सनद जाहीर करण्यांत आली. यांत खालील गोष्टींचा अंतर्भाव करण्यांत आला होता. स्वातंत्र्य हा मनुष्याचा जन्मसिद्ध हक्क आहे. प्रत्येकास मतस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य व धार्मिकस्वातंत्र्य आहे. मनुष्य हा स्वतंत्र असून स्वतः किंवा आपल्या प्रतिनिधीमार्फत आपल्या देशासाठीं जरूर असलेले कायदे करण्याचा त्यास अधिकार आहे. कायदा हा सर्वांस सारखा लागू असून त्यांत गरीब व श्रीमंत हा भेद नाहीं. कोणासही कायद्यानें ठराविलेल्या पद्धतीप्रमाणें त्याच्यावरील आरोप शाबीत झाल्याखेरीज अटकेंत पडावें लागणार नाहीं.

(३) चर्च व धर्ममठ यांच्या मालकीच्या बऱ्याच जमिनी होत्या, त्या जप्त करण्यांत येऊन त्या तारणावर कागदी चलन सुरू करण्यांत आलें.

(४) फ्रान्सची आर्थिक स्थिति फारच खालावलेली होती. ती सुधारण्यासाठीं कर बसविण्यांत आले, व त्यापासून कोणासही माफी नाहीं हें जाहीर करण्यांत आलें.

(५) दहाच्या परिमाणावर आधारलेली वजनें व मापें यासंबंधीं मेट्रिक पद्धत सुरू केली.

(६) फ्रान्सची नवी राज्यघटना तयार करण्यांत येऊन त्यांत राजाच्या हातांतील सत्ता पुष्कळ कमी करण्यांत आली व ती लोकनियंत्रित झाली. कायदे करण्यासाठीं लोकांनीं निवडलेल्या सभासदांची "लोकसभा" स्थापन करण्यांत आली. सैन्य व आरमार यांवरील राजाचा अधिकार रद्द करण्यांत येऊन तो लोकसभेस देण्यांत आला.

अशारीतीनें फ्रान्समध्यें **'लोकनियंत्रित राजसत्ता'** पद्धतीची (Limited Monarchy) राज्यघटना स्थापन झाली.

फ्रान्समधील घडामोडी व युरोपमधील इतर राष्ट्रांचें फ्रान्ससंबंधीं धोरण—पॅरिसप्रमाणें फ्रान्समधील इतर शहरांत त्याचप्रमाणें निरनिराळ्या विभागांत दंगेधोपे व्हावयास लागून सरदारवर्गातील लोकांच्या घरादारांस आगी लागून त्यांचे खून व्हावयास लागले. तेव्हां आपलें जीवित व मालमत्ता सुरक्षित नाहीं हें पाहून सरदारवर्गातील बरेच लोक फ्रान्स सोडून आस्ट्रिया व प्रशिया या देशांत पळ काढूं लागले. फ्रान्समधील राज्यक्रांतीची लाट आपल्या देशांत पसरूं नये म्हणून फ्रान्समधील क्रान्तिकारक लोकांशीं युद्ध करून तेथील क्रान्तिकारक चळवळ दडपून टाकण्यासाठीं आस्ट्रिया व प्रशिया या राष्ट्रांनीं आपलें सैन्य तयार ठेविलें. तेव्हां फ्रान्समधील क्रान्तिकारक लोकांनींही आपलें सैन्य उभारून तें तयार ठेविलें. फ्रान्समधील क्रान्तिकारक लोकांपासून आपल्या जीवितास धोका येईल हें पाहून १६ व्या लुईनें आपल्या कुटुंबांतील मंडळींसह आपला मेव्हणा आस्ट्रियाचा बादशहा याच्याकडे पळून जाण्याचा प्रयत्न केला (जून १७९१), पण त्यास सरहद्दीनजीक पकडण्यांत येऊन पॅरिसमध्यें आणण्यांत आलें व अटकेंत ठेवण्यांत आलें. फ्रान्समधून पळ काढण्याचा १६ व्या लुईनें प्रयत्न केल्यामुळें राष्ट्रसभेनें त्यास पदच्युत करून फ्रान्समध्यें लोकसत्ताक राज्य स्थापन केल्याचें जाहीर केलें (१७९२). तेव्हां आस्ट्रिया व प्रशिया येथील राजांनीं फ्रान्सच्या राज्यक्रान्तीशीं युद्ध जाहीर केलें (१७९२). इकडे फ्रान्समधील सर्वसत्ता डॅन्टॉन, मॅरट व रोबेसपिएर या जहाल क्रान्तिकारक पुढाऱ्यांच्या हातांत जाऊन त्यांच्याकडून अत्याचाराचीं रूत्यें होऊं लागलीं. राजा व सरदार लोक यांच्याबद्दल ज्यांस सहानुभूति वाटते असा संशय येई अशा लोकांस पकडण्यांत येऊन त्यांची कत्तल करण्यांत येऊं लागली. १७९२ च्या सप्टेंबर पासून ३-४ महिन्यांत सुमारें वीस हजार माणसांस फांशीं देण्यांत आलें. फ्रान्सचा राजा १६ वा लुई याच्यावर राष्ट्रद्रोहाचा आरोप करण्यांत येऊन २१ जानेवारी १७९३ रोजीं त्यास फांशीं देण्यांत आलें. यानंतर कांहीं महिन्यांनीं राणी मेरिआ ॲन्टायनेट (Marie Antoinette) हिलाही फांशीं देण्यांत आलें. फ्रान्समधील राज्यक्रान्तीसंबंधीं इंग्लिश जनतेस पहिल्यानें सहानुभूति वाटत असून इंग्लंडच्या धर्तीवर तेथें लोकनियंत्रित राजसत्ता स्थापन होऊन तेथील कारभार सुरळीत चालेल असें वाटत होतें. पण फ्रान्समधील जहाल क्रान्तिकारक लोकांनीं केलेलीं अनन्वित रूत्यें पाहून फ्रान्समधील राज्यक्रान्ती-

बद्दल वाटणारी सहानुभूति नष्ट झाली व १६ व्या लुईला फांशीं देण्यांत आल्यावर इंग्लंडनेंहीं आस्ट्रिया व प्रशिया या राष्ट्रांप्रमाणें फ्रान्समधील राज्यक्रान्तींशीं युद्ध जाहीर केलें (१७९३).

इकडे फ्रान्समधील क्रान्तिकारक लोकांमध्येंही निरनिराळे गट उत्पन्न झाले. रोबेसपिएर (Robespierre) व डॉन्टॉन (Danton) यांच्यामध्यें मतभेद होऊन डॉन्टॉन यांस फांशीं देण्यांत आलें. यानंतर रोबेसपीएर याच्या शत्रूंनीं त्यास फांशीं दिलें (१७९४). यानंतर फ्रान्समधील सत्ता नेमस्त क्रान्तिकारक लोकांच्या हातीं गेली व त्यांनीं फ्रान्सच्या लोकसत्ताक राज्याचा कारभार करण्यास व शत्रूराष्ट्रांशीं सुरू असलेलें युद्ध चालविण्यास पांच सभासदांचें 'डिरेक्टरी' नांवाचें मंडळ स्थापन केलें (१७९५).

फ्रान्समधील सत्ता जहाल क्रान्तिकारक लोकांच्या हातांत असतांना आस्ट्रिया व प्रशिया या शत्रूराष्ट्रांशीं युद्ध करून फ्रान्सचें संरक्षण करण्यासाठीं कार्नोट यांच्या नेतृत्वाखालीं सैन्य उभारण्यांत आलें होतें. या सैन्यानें डूमोरिझ याच्या नेतृत्वाखालीं फ्रान्सवर स्वारी करणाऱ्या आस्ट्रियन व प्रशियन सैन्याचा वाल्मी येथें पराभव केला. या जयामुळें फ्रेंच सैन्यास हुरूप येऊन त्यांनीं फ्रान्सच्या सरहद्दीवरून शत्रु सैन्यास हुसकून लाविलें. यानंतर फ्रेंच सैन्यानें आस्ट्रियाच्या ताब्यांत असलेल्या बेलजमवर स्वारी करून तेथील आस्ट्रियन सैन्याचा पराभव केला, त्यामुळें आस्ट्रियाच्या मगरमिठींतून आपली मुक्तता झाली असें तेथील लोकांस वाटूं लागलें. यानंतर फ्रान्समधील क्रान्तिकारक लोकांनीं युरोपमधील इतर देशांतील लोकांनीं आपल्या देशांतील जुलमी राजसत्ता नाहींशीं करून तेथें लोकसत्ताक राज्य स्थापन केल्यास फ्रान्सकडून मदत मिळेल असें जाहीर केलें. यानंतर फ्रेंच सैन्यानें हॉलंडवर स्वारी केली व त्यावर आपलें वर्चस्व बसविलें. तेथील डच लोकांनीं फ्रान्सशीं तह करून तेथील वंशपरंपरा गव्हर्नर नेमण्याची पद्धत रद्द केली व फ्रान्सच्या देखरेखीखालीं तेथें लोकसत्ताक राज्य स्थापन केलें (१७९५). हॉलंडनें फ्रान्सशीं तह केल्यामुळें इंग्लिश आरमारानें डच लोकांची केप ऑफ् गुड होप (१७९५) व सीलोन (१७९६) हीं ठिकाणें जिंकून घेतलीं. इंग्लंडनें १७९३ मध्यें फ्रान्सच्या राज्यक्रान्तींशीं युद्ध जाहीर केल्यावर फ्रान्सच्या दक्षिण किनाऱ्यावरील टूलोन हें बंदर घेण्याचा प्रयत्न केला. तेव्हां त्याचा बचाव करण्यासाठीं डिरेक्टरीनें **नेपोलियन बोनापार्ट**

या तोफखान्यावरील तरुण अधिकाऱ्यास पाठविलें. तेव्हां नेपोलियननें इंग्लिश सैन्याचा पराभव करून टूलोनचा बचाव केला. यानंतर खुद्द पॅरिसमध्यें दंगा सुरू झाला व तो मोडण्याचें काम नेपोलियनकडे सोपविण्यांत आलें. तेव्हां नेपोलियननें कडक उपाय योजून हा दंगा मोडून तेथें शांतता प्रस्थापित केली व डिरेक्टरीचें संरक्षण केलें. यानंतर डिरेक्टरीनें नेपोलियन यास फ्रेंच सैन्याचा सेनापती नेमून त्यास उत्तर इटलीमधून आस्ट्रियाचें वर्चस्व नाहींसें करण्यासाठीं पाठविलें. नेपोलियननें पहिल्यानें सार्डिनियाचा पराभव केला व यानंतर उत्तर इटलीमधील आस्ट्रियन सैन्याचा पराभव करून आस्ट्रियास कँपो फॉर्मियो येथें तह करणें भाग पाडलें (१७९७). हा विजय मिळवून परत आल्यावर त्यानें इंग्लंडचा पूर्वेकडील व्यापार व हिंदुस्थानांतील ठिकाणें हस्तगत करण्यासाठीं ईजिप्तमार्गें मोहीम करण्यासाठीं डिरेक्टरीचें मन वळविलें. तेव्हां त्यास १७९८ मध्यें इजिप्तमध्यें पाठविण्यांत आले. नेपोलियन इजिप्तकडे गेल्याची बातमी इंग्लंडला समजतांच इंग्लंडनें नेल्सनच्या हाताखालीं आरमार पाठविलें व त्यानें नेपोलियनच्या आरमाराचा नाइलच्या मुखाजवळ पराभव केला. यानंतर नेपोलियननें सीरिया घेण्याचा प्रयत्न केला पण त्यास या कामीं यश मिळालें नाहीं. इकडे युरोपमध्यें फ्रेंच सैन्याचा पराभव होत असल्याची बातमी नेपोलियनला समजल्यावर तो ईजिप्तमधील मोहीम तशीच सोडून आपल्या कांहीं निवडक लोकांसह फ्रान्सला परत आला (१७९९). नेपोलियन ईजिप्तमध्यें गेला असतां युरोपमध्यें फ्रान्सचा पराभव होत गेल्यामुळें डिरेक्टरीची लोकप्रियता नाहींशी झाली होती. गेलीं दहा वर्षें फ्रान्समध्यें सुरू असलेल्या अंदाधुंदीस लोक कंटाळले होते. फ्रान्सच्या शत्रूंवर विजय मिळवून फ्रान्समध्यें स्थिरस्थावरता करण्यास कोणी समर्थ असेल तर तो नेपोलियनच आहे असें सर्वांस वाटत होतें. लोकांचा विश्वास संपादन केल्यावर लोकांनीं डिरेक्टरची सत्ता नष्ट करून नेपोलियनास फ्रान्सच्या लोकसत्ताक राज्याचा मुख्य **कॉंसल** (मुख्य अधिकारी) नेमिलें (१७९९). १८०२ मध्यें हें कॉंसल पद त्यास तहाहयात दिलें. यानंतर १८०४ मध्यें त्यास फ्रेंचांचा बादशहा केलें. अशा रीतीनें फ्रान्समधील लोकसत्ताक राज्य नष्ट होऊन केंद्रीभूत अशी एकतंत्री राजसत्ता स्थापन झाली.

ईजिप्तहून परत आल्यावर नेपोलियननें इटलीमधील आस्ट्रियाच्या सैन्याचा मोड केला (१८०० जून) व त्याच्या एका सेनापतीनें जर्मनीमध्यें आस्ट्रियाच्या

सैन्याचा पराभव केला (१८०० डिसेंबर) व त्यामुळें आस्ट्रियानें फ्रान्सशीं तह केला. त्यानें रशियासही तह करावयास लाविला. फ्रान्स विरुद्ध स्थापन झालेल्या संघांतील राष्ट्रांनीं फ्रान्सशीं तह केल्यामुळें इंग्लंडनेंही १८०२ मध्यें फ्रान्सशीं तह केला (१८०२ एप्रिल). पण हा तह तात्पुरताच ठरून १८०३ च्या मे महिन्यांत इंग्लंडचें फ्रान्सशीं पुनः युद्ध सुरू होऊन तें १८१५ पर्यंत टिकलें.

नेपोलियनच्या सुधारणा— नेपोलियन उत्तम योद्धा होता तसा तो मुत्सद्दी व कर्तबगारही होता. त्यानें फ्रान्समध्यें कांहीं महत्त्वाच्या सुधारणा केल्या. त्यानें फ्रान्सची बँक स्थापन केली. फ्रान्समध्यें सार्वत्रिक शिक्षणासाठीं शाळा स्थापन केल्या. नेपोलियननें चांगल्या कायदेपंडितांचें कमिशन नेमून फ्रान्समधील सर्व कायद्यांची पुनर्रचना व व्यवस्थित मांडणी केली, यांत फ्रान्सच्या राज्यक्रान्तीचीं तत्त्वें समता, स्वातंत्र्य व विश्वबंधुत्व गोवलीं होतीं कायदा हा सर्वांस सारखा लागू आहे व त्यापुढें गरीब व श्रीमंत हा भेद नाहीं हें जाहीर केलें गेलें. फ्रान्समधील या कायद्यांच्या संग्रहास **'कोड नेपोलियन'** असें म्हणण्यांत येऊन जगांतील प्रमुख कायद्यांच्या संग्रहांत त्याची गणना केली जाते. त्यानें रस्ते व कालवे बांधून व्यापार व उद्योगधंदे यांच्या वाढीस मदत केली. त्यानें वाङ्मय, शास्त्र व कलाकौशल्य यांस उत्तेजन दिलें. फ्रान्सच्या बँकेची स्थापना केली.

युरोपवर वर्चस्व स्थापण्याची नेपोलियनची महत्त्वाकांक्षा व त्याचें युरोपमधील राष्ट्रांविरुद्ध युद्ध—फ्रान्समधील सर्व सत्ता आपल्या हातीं आल्यावर सर्व युरोपवर आपलें साम्राज्य स्थापन करावें असें नेपोलियनला वाटूं लागलें. नेपोलियनचें सैन्य प्रबळ असल्यामुळें युरोपवर आपणांस वर्चस्व स्थापन करतां येईल हें नेपोलिनला वाटत होतें, पण समुद्रावर इंग्लंडचें आरमार प्रबळ असल्यामुळें मोठें आरमार तयार ठेवल्याखेरीज इंग्लंडवर स्वारी करतां यावयाची नाहीं हें पाहून त्यानें आरमाराची जमवाजमव करण्यास सुरवात केली. नेपोलियनच्या या बेताची बातमी लागतांच त्याचा प्रतिकार करण्याचा इंग्लंडनें बेत केला. फ्रान्सशीं १७९३ मध्यें युद्ध सुरू झालें त्यावेळीं **पिट** (धाकटा) हा मुख्य प्रधान होता व त्यानें फ्रान्सविरुद्ध युद्ध चालविलें होतें. मध्यंतरीं त्यानें १८०० च्या सुमारास राजिनामा दिल्यामुळें तो मुख्य प्रधान नव्हता. पण तो मुख्य प्रधान असल्याखेरीज फ्रान्सविरुद्ध युद्धाचें धोरण व्यवस्थित

रीतीनें आंखलें जावयाचें नाहीं म्हणून त्यास १८०४ मध्यें मुख्य प्रधान करण्यांत आलें. त्यानें युद्धासंबंधीं चांगली तयारी केली. नेपोलियननें इंग्लंडवर स्वारी करण्यासाठीं मोठें आरमार तयार केलें. तेव्हां इंग्लंडनें या फ्रेंच आरमाराशीं टक्कर देण्यासाठीं **नेल्सन** या आरमारी सेनापतीच्या हाताखालीं आरमार पाठविलें. या दोन्ही आरमाराची स्पेनच्या किनाऱ्यानजीक **ट्रॅफलगार** येथें गांठ पडली व त्यांत फ्रेंच आरमाराचा पराभव झाला (१८०५ आक्टो.), पण नेल्सन गोळी लागून मरण पावला. या विजयामुळें इंग्लंडवर आरमारी स्वारी होण्याची भीति नष्ट झाली. इकडे पिटनें नेपोलियनविरुद्ध युरोपमधील आस्ट्रिया, रशिया, स्वीडन व इंग्लंड यांचा संघ स्थापन केला. नेपोलियनला याची बातमी लागतांच त्यानें आस्ट्रेलिट्झ येथें आस्ट्रिया व प्रशिया यांच्या संयुक्त सैन्याचा पराभव केला (१८०५ डि.) व १८०६ मध्यें आस्ट्रियाच्या राजास पवित्र रोमन साम्राज्याचा बादशहा म्हणून असलेल्या किताबाचा त्याग करणें भाग पाडलें. यानंतर त्यानें प्रशियावर स्वारी करून येनाच्या लढाईत प्रशियाचा (१८०६) व फिन्लंड येथें रशियाचा झार अलेक्झांडर याचा पराभव केला (१८०७) व त्यास टिलझिट येथें तह करावयास लाविला. अशा रीतीनें नेपोलियनचें इंग्लंडखेरीज युरोपमधील इतर राष्ट्रांवर वर्चस्व स्थापन झालें. इंग्लंडविरुद्ध झालेल्या आरमारी लढाईत त्यास यश मिळालें नव्हतें, व प्रबळ आरमार असल्याखेरीज तें मिळणें शक्य नव्हतें. तेव्हां त्यानें इंग्लंडचा व्यापारविषयक कोंडमारा करण्यासाठीं बर्लिन शहरीं असतां फर्मान काढलें (१८०६); या **बर्लिन डिक्रीमुळें** त्यानें आपल्या वर्चस्वाखालीं असलेल्या राष्ट्रांस इंग्लंडशीं व्यापार करण्यास बंदी केली. तेव्हां इंग्लंडनेंहि नेपोलियनच्या वर्चस्वाखालीं असलेल्या राष्ट्रांशीं कोणीं व्यापार केल्यास तीं जहाजें जप्त करण्यांत येतील हें जाहीर केलें. पण फ्रान्स व इंग्लंड यांच्या या फर्मानांमुळें तटस्थ राष्ट्रांस व्यापाराचे बाबतींत त्रास सोसावा लागला. त्याचप्रमाणें नेपोलियनच्या वर्चस्वाखालीं असलेल्या राष्ट्रांचा कोंडमारा होऊं लागून त्यांस नेपोलियनचें फर्मान झुगारून द्यावें असें वाटूं लागलें. पोर्तुगॉलनें नेपोलियनचें फर्मान झुगारून देऊन इंग्लंडशीं व्यापार सुरू ठेवला. तेव्हां फ्रेंच सैन्य पोर्तुगॉलमध्यें पाठविण्यांत आलें व त्यानें तो देश आपल्या ताब्यांत घेतला (१८०८). यावेळीं स्पेनमध्यें तेथील राजा व राजपुत्र यांच्यामध्यें असलेल्या कलहाचा फायदा घेऊन नेपोलियननें स्पेनमध्यें

आपलें सैन्य पाठविलें व तेथील राजास पदच्युत करून आपला भाऊ जोसेफ बोनापार्ट यास स्पेनचा राजा केले. नेपोलियनच्या या कृत्यानें सर्व स्पॅनिश जनतेनें नेपोलियनविरुद्ध बंडाळी सुरू केली. तेव्हां स्पॅनिश लोकांस मदत करण्यासाठीं इंग्लंडनें सर ऑर्थर वेलस्ली व सर जॉन मूर यांच्या हाताखालीं सैन्य पाठविलें. नेपोलियन स्पेन व पोर्तुगॉल येथील युद्धांत गुंतला आहे हें पाहून आस्ट्रियानें नेपोलियनविरुद्ध युद्ध जाहीर केलें. तेव्हां नेपोलियननें आस्ट्रियावर स्वारी करून १८०९ मध्यें वॅग्रामच्या लढाईंत आस्ट्रियाचा पुरा मोड केला. नेपोलियनला पुत्र नव्हता, तेव्हां त्यानें आपली पत्नी जोसेफिन हिच्याशीं घटस्फोट करून आस्ट्रियाची राजकन्या मेरिया लुईसी या हॅप्सबर्ग घराण्यांतील राजकन्येशीं लग्न केलें व अशारीतीनें या प्राचीन घराण्याशीं नेपोलियनचा नात्याचा संबंध आला. सर आर्थर वेलस्लीनें टॅलाव्हेरा येथें फ्रेंच सैन्याचा पराभव केला व त्यामुळें त्यास ड्यूक ऑफ् वेलिंग्टन करण्यांत आलें. यानंतर त्यानें सॅलामांका येथें फ्रेंच सैन्याचा पराभव केला.

पोर्तुगॉलप्रमाणें रशियाचा झार १ ला अलेक्झांडर (१७७७–१८२५) यानेंही त्याचा व्यापारविषयक कोंडमारा होऊं लागल्यामुळें नेपोलियनचें फर्मान झुगारून दिलें. तेव्हां नेपोलियननें ६ लक्ष सैन्य जमा करून रशियावर स्वारी केली (१८१२) पण रशियन सैन्यानें माघार घेतल्यामुळें फ्रेंच सैन्य रशियांत खूप आंत गेलें. त्यावेळीं हिंवाळा असल्यामुळें या सैन्याचे फार हाल झाले. रशियन सैन्यानें त्यावर अडीअडचणीच्या ठिकाणीं हल्ले केले, त्यामुळें बरेच मृत्यूमुखीं पडले. तेव्हां फ्रेंच सैन्यास माघार घेणें भाग पडलें. या माघार घेणाऱ्या सैन्यावर आस्ट्रिया, प्रशिया व रशिया यांच्या संयुक्त सैन्यानें लिपझिप येथें हल्ला करून त्याचा पराभव केला (१८१३). तेव्हां नेपोलियनला पॅरिसकडे यावें लागलें. इकडे वेलिंग्टन फ्रेंच सैन्यास स्पेनमधून घालवून लावून पॅरिसच्या रोखानें आला. तेव्हां शत्रूसैन्याचा पराभव करणें शक्य नाहीं, हें पाहून नेपोलियननें राज्यत्याग केला (१८१४ एप्रिल). तेव्हां त्यास कैद करण्यांत येऊन भूमध्य समुद्रांतील एल्बा बेटांत ठेवण्यांत आलें. इकडे इंग्लंड वगैरे दोस्त राष्ट्रांनीं १६ व्या लुईचा पुत्र लुई मरण पावला असल्यामुळें त्याचा भाऊ लुई यास १८ वा लुई म्हणून फ्रान्सचें राज्यपद दिलें. यानंतर युरोपची नवी मांडणी कशी करावयाची याचा विचार करण्यासाठीं दोस्त राष्ट्रांची व्हिएन्ना येथें

परिषद् भरली असतां नेपोलियन एल्बा बेटांतून आपली सुटका करून घेऊन फ्रान्समध्यें आला व त्यास बरेंच अनुयायी मिळाले. त्यामुळें १८ व्या लुईनें फ्रान्समधून पळ काढला. तेव्हां ड्यूक ऑफ वेलिंगडन यानें फ्रान्सवर स्वारी करण्यासाठीं नेदरलंडमध्यें इंग्लिश, डच व हॅनोव्हर यांचें सैन्य जमा केलें. या सैन्यास प्रशियन सैन्य मिळणार होतें. तेव्हां हीं दोन्हीं सैन्यें मिळण्यापूर्वी त्यांना वेगळ्या ठिकाणीं गाठून त्यांचा पराभव करण्यासाठीं नेपोलियन बेलजममध्यें गेला. पण **वाटर लू** (बेलजम) जवळ नेपोलियनचा ड्यूक ऑफ वेलिंगटन यानें पराभव केला. यानंतर दोस्त राष्ट्रांनीं नेपोलियनास सेंट हेलेना बेटांत (आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्याजवळ) कैदेंत ठेविलें. या ठिकाणीं १८२१ मध्यें नेपोलियन मरण पावला.

इकडे पॅरिस येथें तह होऊन (१८१५) फ्रान्सशीं सुरू असलेलें युद्ध थांबविण्यांत आलें. हा तह घडवून आणणाऱ्या मुत्सद्यांचें धोरण प्रतिगामी स्वरूपाचें होतें, व फ्रान्समधील राज्यक्रान्ति होण्यापूर्वीची स्थिति सर्वत्र स्थापन करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. फ्रान्सच्या गादीवर १८ व्या लुईस बसविण्यांत आलें. फ्रान्सला फ्रान्सच्या ईशान्येकडील आलसेस व लॉरेन हे प्रांत देण्यांत आले. इंग्लंडला डच लोकांचीं केप ऑफ गुडहोप, सीलोन, सिंगापूर, गायना; फ्रान्सचीं मॉरिशस व माल्टा, डेन्मार्कचें हेलीगोलँड हीं ठिकाणें मिळालीं, त्यामुळें ब्रिटिशांच्या साम्राज्याची वाढ झाली. इटलीच्या उत्तर भागांतील व्हेनिस व लॉंबर्डी हीं संस्थानें आस्ट्रियास मिळालीं. मध्य इटलींतील संस्थानें परकीय राजकर्त्यांकडे राहिलीं. नेपल्स व सीसली हें राज्य बूरबॉन घराण्यांतील पुरुषास मिळालें. पोपचें संस्थान व वायव्येकडील पिडमाँट हें संस्थान इटालियन राजकर्त्यांकडे राहिलीं. जर्मनीमध्यें पूर्वी बरीच संस्थानें होतीं, त्यांची संख्या कमी झाली.

फ्रान्सच्या राज्यक्रान्तीचे युरोपवर व जगावर झालेले परिणामः—पॅरिसच्या तहानें फ्रान्समध्यें राज्यक्रान्ति होण्यापूर्वीची स्थिति स्थापन करण्याचा प्रयत्न केला तरी तो यशस्वी झाला नाहीं, व या राज्यक्रांतीमुळें निर्माण झालेल्या तत्त्वांचा—लोकनियंत्रित राज्यपद्धति (लोकशाही), राष्ट्रीयत्व, स्वातंत्र्य, विश्वबंधुत्व, समता—युरोपमध्यें व जगामध्यें इतरत्र प्रसार होऊन त्याप्रमाणें गोष्टी घडून आणण्यासाठीं यापुढील ६०–७० वर्षें ठिकठिकाणीं चळवळी झाल्या :—

(१) लोकशाही—इंग्लंडमध्यें पार्लमेंटचें तेथील राजसत्तेवर नियंत्रण स्थापन झालेलें होतें. पण या पार्लमेंटमधील कॉमन्स सभेवर समाजांतील उच्च खानदानी वर्गाचें वजन होतें, मध्यम वर्ग, मजूरवर्ग, बहुजनसमाज व स्त्रिया यांस मताधिकार नव्हता. पण या बाबतींस खुद्द इंग्लंडमध्यें चळवळ होऊन १८३२, १८६७, १८८४-८५ मध्यें पार्लमेंटच्या सुधारणेचे कायदे पास झाले व १९१८ व १९२८ मध्यें स्त्रियांना मताधिकार मिळाला. त्यामुळें इंग्लंडची कामन्स सभा ही तेथील लोकांची प्रतिनिधी झाली व तेथें लोकशाही स्थापन झाली. ब्रिटिश साम्राज्यांतील कॅनडा, न्यूझीलंड, आस्ट्रेलिया: व दक्षिण आफ्रिका या वसाहतींस स्वराज्याचे हक्क मिळाले.

युरोपमधील इतर देशांतील लोकांचें आपल्या देशाच्या राज्यकारभारावर कांहींच नियंत्रण नव्हतें, तेव्हां तेथें लोकशाही स्थापन व्हावी म्हणून १८३०, १८४८ मध्यें क्रांतिकारक चळवळी झाल्या. फ्रान्समध्यें १८७१ मध्यें लोकसत्ताक राज्य स्थापन झालें.

(२) राष्ट्रीयत्व—परकीय राष्ट्रांचें आपल्यावरील वर्चस्व झुगारून देण्यासाठीं व आपलें स्वतंत्र राष्ट्र स्थापन करण्यासाठीं चळवळी झाल्या. १८१०-१८२५ च्या दरम्यान मध्य व दक्षिण अमेरिकेंतील स्पेन व पोर्तुगाल या राष्ट्रांच्या वसाहतींनीं मातृभूमीचें वर्चस्व झुगारून देऊन आपलीं स्वतंत्र लोकसत्ताक राज्यें स्थापन केलीं. ग्रीसनें तुर्कस्थानचें वर्चस्व झुगारून दिलें (१८२९) व बाल्कन द्वीपकल्पांतील इतर राष्ट्रांनीं तुर्कस्थानचें वर्चस्व झुगारून देण्यासाठीं प्रयत्न सुरूं केले.

(३) स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुत्व—ठिकठिकाणीं सुरू असलेली सरंजामी पद्धत नष्ट होऊन सरदार व धर्माधिकारी यांस असलेले विशिष्ट हक्क नाहींसे झाले. शेतकरी हा जमिनीशीं जखडलेला व अर्धवट गुलामगिरींत होता तो मुक्त होऊं लागला. समाजांतील निरनिराळ्या वर्गांमध्यें उच्चनीच, श्रीमंत व गरीब ही भावना होती ती नष्ट झाली; मत देण्याचा अधिकार हा संपत्तीवर अवलंबून असतां कामा नये व देशाच्या राज्यकारभारामध्यें भाग घेण्याची सर्वांस समान संधि मिळणें जरूर आहे ही भावना दृढ होऊं लागली. मजुरांची स्थिति सुधारण्यासाठीं प्रयत्न होऊं लागले. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीनें हक्क मिळा-

वयास पाहिजेत असें वाटूं लागलें. गुलामगिरीची पद्धत अमानुष आहे व ती बंद करणें जरूर आहे असें वाटून त्या बाबतींत निरनिराळ्या राष्ट्रांमध्यें कायदे होऊं लागले.

(४) **मेट्रिक पद्धत**—वजनें व मापें या बाबतींत दहाच्या परिमाणावर बसविलेलीं व फ्रान्समध्यें सुरू करण्यांत आलेली पद्धत शास्त्रशुद्ध आहे असें वाटून तिचा इतर देशामध्येंही प्रसार होऊं लागला.

सारांश

स्पेन–मोठें प्रबल राष्ट्र. मध्य व दक्षिण अमेरिकेंत वसाहती. फिलीपाईन बेटांवर वर्चस्व. स्पेनची राजकन्या जोअॅनाचें आस्ट्रियाच्या हॅप्सबर्ग घराण्यांतील मॅक्झीमीलन या सम्राटाशीं लग्न. त्यांचा पुत्र ५ वा चार्लस हा पवित्र रोमन सम्राट. त्याचा पुत्र २ रा फिलीप हा स्पेनचा राजा. कॅथलिक पंथीयांचा पुढारी. डच लोक स्वतंत्र १५८१. इंग्लंडशीं वितुष्ट. स्पेनच्या आरमाराचा पराभव १५८८; स्पेनच्या समुद्रावरील सत्तेचा ऱ्हास. स्पेनच्या गादीविरील वारस हक्कासंबंधीं युद्धानंतर १४ व्या लुईचा नातू अॅंजोचा फिलीप हा स्पेनचा राजा. पण फ्रान्स व स्पेन हीं राज्यें वेगळीं. १८१५–२५ च्या दरम्यान स्पेनच्या अमेरिकेंतील वसाहती स्वतंत्र. स्पेनचें महत्त्व कमी.

फ्रान्स–संघटित राष्ट्र. कॅथलिकपंथी, पण तेथिल ह्यूगेनॉट लोक प्रॉटेस्टंटपंथी. त्यांच्या ताब्यांत कांहीं किल्ले. १३ व्या लुईचा मंत्री रिशल्यू यानें ह्यूगेनॉट लोकांचे राजकीय अधिकार नष्ट केले. राजसत्ता सुव्यवस्थित, पण अनियंत्रित. १६१४ पासून स्टेटस जनरलची बैठक बोलावण्याचा प्रघात बंद. १४ वा लुई. (१६४३–१७१५) मोठा राजा. सैन्य सुव्यवस्थित व प्रबळ. स्वतःकडे सर्व अधिकार. अनियंत्रित सत्ता. मंत्री : सुरुवातीस मॅझरीन मंत्री, नंतर राजास जबाबदार, कोलबर्ट मंत्री व त्याच्याकडून व्यापार व उद्योगधंद्यास उत्तेजन. रस्ते व कालवे बांधणें. उत्तर अमेरिकेंत वसाहती. फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना १६६४. १४ व्या लुईचें धोरण. प्रदेशविस्तार करणें, रोमन कॅथलिक पंथास पाठिंबा, कलाविद्यांस प्रोत्साहनं. दरबारचें वैभव, रीतीरिवाज युरोपमधील इतर राज्यकर्त्यांस आदर्श. १५ व्या लुईच्या वेळीं (१७१५–७४) युद्धें व त्यांत पराभव; कॅनडा वसाहत इंग्लिशांस. उ. अमेरिकेंतिल व भारतांतील महत्त्व नष्ट, युद्धामुळें व दरबारच्या खर्चामुळें कर्ज, सांपत्तिक हलाखी.

ग्रेट ब्रिटन–(१४८५–१८२०)—ट्यूडर काळांत राजसत्ता अनियंत्रित पण ती लोकप्रिय. व्यापार, उद्योगधंदे व समुद्रावरील सफरी यांस उत्तेजन. एलिझा-

बेदच्या कारकीर्दीत प्रॉटेस्टंट पंथाची स्थापना, पोपची धार्मिक सत्ता रद्द. स्पेनच्या आरमाराच्या पराभवानंतर इंग्लंडचें समुद्रावर श्रेष्ठत्व. स्टुअर्ट काळांत १६०३–१७१४ राजा व पार्लमेंट यांत वितुष्ट, चार्लस राजास फांशीं. हेबिअस कॉर्पस ॲक्टनें (१६७९) व्यक्तिस्वातंत्र्य. १६८८ पार्लमेंटच्या कायद्यानें ३ रा विल्यम राजा म्हणून राज्यक्रान्ति. राजसत्तेपेक्षां पार्लमेंटची सत्ता श्रेष्ठ. पार्लमेंटची तिजोरीवरील सत्ता. हॅनोवर काळांत पार्लमेंटास जबाबदार असलेल्या मंत्रिमंडळामार्फत (कॅबिनेट) राज्यकारभार करण्याची पद्धत रूढ. साम्राज्यांत वाढ. उत्तर अमेरिकेंत कॅनडा. भारतामध्यें मराठ्यांचा पराभव (१८१८) व राज्यवृद्धि; पण अमेरिकेंतील इंग्लिश वसाहती स्वतंत्र. फ्रान्सची राज्यक्रान्ति नेपोलियनशीं युद्ध व त्याचा पराभव.

रशिया–(९०० ते १८१५)—स्लाव्ह लोकांची वस्ती. कॉन्स्टांटिनोपलच्या ग्रीक चर्चचे अनुयायी. १३ व्या व १४ व्या शतकांत मंगोल व तुर्क लोकांचे मांडालिक. पौर्वात्य चालीरीतींचा पगडा. १५ व्या शतकांत मंगोल व तुर्क लोकांचें वर्चस्व झुगारून दिलें. थोर इव्हॅननें (१४६२–१५०५) राज्यविस्तार केला. प्रतापी इव्हॅननें १५४७ मध्यें कॉन्स्टांटिनोपलच्या सम्राटाची सत्ता नाहींशी झाली म्हणून स्वतःस झार (सीझर=सम्राट) ही पदवी. रोमानॉफ, घराण्यांतील थोर पीटर (१६८२–१७२५)–मागासलेल्या रशियास आधुनिक बनविलें, उद्योगधंद्यांची वाढ, परराष्ट्रांत प्रवास व तेथील प्रगतीचें निरीक्षण, थोर कॅथरिन (१७६२–९६) काळ्या समुद्राच्या उत्तरेकडील प्रदेश, व बंदर मिळविलें, पोलंडच्या राज्याची विभागणी. फ्रान्सच्या राज्यक्रांतीशी व नेपोलियनशीं युद्ध.

आस्ट्रिया–(१४००–१८१५)—१२७३ पासून हॅप्सबर्ग घराण्याकडे राजसत्ता; व त्याकडे पवित्र रोमन सम्राट हा हुद्दा. युद्रेक्टच्या तहानें स्पेनचें बेलजम मीलॅन, नेपल्स, सार्डिनिया हे प्रदेश. मोरिया, थेरेसा हिच्याकडे राज्यपद (१७४०).

प्राशिया–(१४१५–१८१५)—ब्रँडेनबर्ग हें जर्मनींतील संस्थान, त्यावर १४१५ मध्यें होहेनझोलार्न घराण्याचें वर्चस्व. १६१८ मध्यें प्राशियावर वर्चस्व; १७०१ प्राशियाचा राजा हा हुद्दा. फ्रेडरिक विल्यमनें (१७४०–८८) सैन्य सुधारलें, व सत्ता प्रबळ. थोर फ्रेडरिकनें (१७४०–८६) आस्ट्रियाचा सायलेशिया प्रांत घेतला. कलाविद्यांस प्रोत्साहन. पोलंडची विभागणी व त्यांतील प्रदेश. जर्मनी-मधील वर्चस्वासंबंधानें आस्ट्रियाशीं स्पर्धा.

फ्रान्समधील राज्यक्रान्ति व तिचे जागतिक परिणाम (१७८९–१८१५).

कारणें–राजांची अनियंत्रित सत्ता. सरदार व धर्माधिकारी यांस विशेष हक्क,

करापासून माफी, मध्यम व खालच्या वर्गावर कराचा बोजा. राज्यकारभाराचा अवाढव्य खर्च, युद्धांत अपयश व बेसुमार कर्ज. आर्थिक परिस्थिति हलाखीची. सरंजामी पद्धतीवर आधारलेली समाजरचना. व्हॉल्टेर, रुसो, माँटेस्क्यू, यांचे धार्मिक, सामाजिक व राजकीय बाबींवर टीकालेख, वैचारिक क्रान्ति.

फ्रान्समधील घडामोडी–खालावलेल्या आर्थिक परिस्थितीचा विचार करण्यासाठीं स्टेटस जनरलची बैठक १७८९. तिचें राष्ट्रीय सभेंत रूपांतर. सरदार व धर्माधिकारी यांचे विशेष हक्क रद्द. लोकनियंत्रित राजसत्ता ही घटना. स्वातंत्र्य, समता, विश्वबंधुत्व, लोकशाही, मानवी हक्काची सनद, कायद्यापुढें सर्व सारखे हीं तत्त्वें (१७८९–१७९१).

गरीबीनें गांजलेल्या व क्रांन्तिकारक लोकांनीं पॅरिसमध्यें व इतरत्र धुमेधोपे. १४ जुलै १७८९ बॅस्ट्रिल तुरुंग फोडून अटकेंत असलेल्यांची मुक्तता; राज्यक्रान्ति १७८९. १७८९–९२ फ्रान्समध्यें बेबंदशाही. सरदार वर्गातील लोकांवर अत्याचार, व त्यांचे फ्रान्समधून पलायन. राजाचा पळून जाण्याचा प्रयत्न, कैद व फांशी १७९३. जहाल क्रान्तिकारक लोकांच्या हातीं सत्ता, १७९३–९५, इंग्लंड, आस्ट्रिया, व प्रशिया, रशिया व इतर राष्ट्रें यांचें फ्रान्स विरुद्ध युद्ध १७९३–१८०२; १८०३–१८१५. युद्धाच्या वेळीं पिट (धाकटा हा इंग्लंडचा मुख्य प्रधान, व त्याचें धोरण. डिरेक्टरीच्या हातीं सत्ता १७९५–१७९९; डिरेक्टरीच्या आज्ञेनें नेपोलियनकडून स्थीरस्थावरना. नेपोलियन–कॉंसल १७९९–१८०४, फ्रेंचांचा सम्राट १८०४–१५. नेपोलियनच्या सुधारणा. कायद्यांचें संकलन. केंद्रीभूत राज्यव्यवस्था, फ्रान्सची बँक; रस्ते व कालवे; उद्योगधंद्यांस उत्तेजन. शिक्षणासाठीं शाळा स्थापणें. १८०५ फ्रेंच आरमाराचा इंग्लंडनें ट्रॅफलगार येथें पराभव केला. नेपोलियननें आस्ट्रोलिटझ येथें आस्ट्रियाचा (१८०५), येना येथें प्रशियाचा (१८०६), व फ्रीडलंडला रशियाचा (१८०७) पराभव. १८०६ इंग्लंडचा व्यापाराविषयक कोंडमारा करण्यासाठीं बर्लिन डिक्री (फर्मान). फ्रॉन्सचें पोर्टुगॉल व स्पेनविरुद्ध युद्ध १८०८–१४, फ्रान्सचा पराभव. नेपोलियनची रशियावर स्वारी (१८१२), तेथून माघार व पराभव (१८१३). नेपोलियनचा राज्यत्याग १८१४, एल्बा येथें कैदेंत. तेथून सुटका, वॉटर लू येथें नेपोलियनचा पराभव १८१५. सेंट-हेलना येथें कैदेंत १८१५. मृत्यू १८२१.

फ्रान्सच्या राज्यक्रान्तीचे जागतिक परिणाम–मानवी हक्कांची सनद, सरंजामी पद्धत रद्द, सर्व वर्ग सारखे. लोकशाही, स्वातंत्र्य, राष्ट्रीयत्व, समता, विश्व-बंधुत्व या कल्पनांचा प्रसार.

प्रकरण ११ वें

युरोपियन राष्ट्रांचीं युरोपच्या बाहेर व्यापारी ठाणीं, प्रदेशविस्तार व वसाहती

(१७४० ते १९१४)

कोलंबस व वास्को-डी-गामा यांनीं अमेरिकेचा व पूर्वेकडे भारताकडे जाणाऱ्या थेटच्या जलमार्गाचा शोध लाविल्यावर युरोपियन राष्ट्रांनीं इ. स. १५०० ते १७४० पर्यंतच्या काळांत कोठें व्यापारी ठाणीं स्थापन केलीं, प्रदेशविस्तार केला व वसाहती स्थापन केल्या त्यांची हकीकत प्रकरण ९ मध्यें आलेली आहे. या प्रकरणांत १७४० पासून १९१४ पर्यंतच्या काळांतील हकीकत दिलेली आहे.

अमेरिकेंतील ब्रिटिशांचा प्रदेशविस्तार— उत्तर अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावर इंग्लंडच्या १३ वसाहती स्थापन झाल्या होत्या व त्या एकमेकांपासून वेगवेगळ्या होत्या. या वसाहतींच्या उत्तरेस सेंट लॉरेन्स नदी लगतच्या प्रदेशांत फ्रेंचांची कॅनडा किंवा न्यू फ्रान्स ही वसाहत व पश्चिमेस मिसीसिपी नदी लगतच्या प्रदेशांत ल्यूसीआना या दोन विस्तृत वसाहती होत्या. इंग्लिश वसाहतींच्या मानानें फ्रेंचांच्या वसाहतींचा विस्तार मोठा होता तरी त्यांतील फ्रेंच लोकवस्ती फारच थोडी होती. १८ व्या शतकांत युरोपमध्यें इंग्लंड व फ्रान्स हीं प्रमुख राष्ट्रें असून व्यापार, वसाहती व अंकित प्रदेश या बाबतींत त्यांच्यांत स्पर्धा सुरू होती व त्यामुळें त्या राष्ट्रांत वरचेवर युद्धप्रसंग होत. युरोपमध्यें इंग्लंड व फ्रान्स या राष्ट्रांमध्यें सप्तवार्षिक युद्ध सुरू झाल्यावर (१७५६–६३) हिंदुस्थान व उत्तर अमेरिका येथेंही या दोन राष्ट्रांमध्यें युद्ध सुरू झालें. हिंदुस्थानांत वाँदिवाशच्या लढाईत (१७६०) फ्रेंचांचा पराभव होऊन त्यांचें हिंदुस्थानांतील राजकीय महत्त्व नष्ट झालें. उत्तर अमेरिकेंत इंग्लंडनें फ्रेंचांचा पराभव केला व त्यांची कॅनडा ही विस्तृत वसाहत जिंकून घेतली त्यामुळें फ्रेंचांचें अमेरिकेंतील महत्त्वही पुष्कळच कमी झालें. यानंतर थोड्याच वर्षांनीं इंग्लंड व उत्तर अमेरिकेंतील इंग्लंडच्या १३ वसाहती यांमध्यें वितुष्ट येऊन युद्ध झालें व या वसाहती स्वतंत्र होऊन (१७८३) त्यांनीं 'अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें' हें लोकसत्ताक संघराज्य स्थापन केलें (याबद्दलची हकीकत प्रकरण १० मध्यें दिलेली आहे).

उत्तर अमेरिकेंतील इंग्लिश वसाहती स्वतंत्र झाल्यांवर वसाहती स्थापण्याच्या बाबतींत इंग्लंडमध्यें उदासीनता पसरली. मातृभूमीनें मनुष्यबळ, द्रव्यखर्च व साहस करून वसाहती स्थापन केल्या, परशत्रूंपासून त्यांचें संरक्षण केलें, तरी वसाहतींची पूर्ण वाढ होऊन त्या आपल्या पायावर उभ्या राहूं लागल्या म्हणजे त्या मातृभूमीपासून स्वतंत्र होतात, तेव्हां वसाहती स्थापन करावयाच्या तरी कशासाठीं असे इंग्लंडमधील लोकांस वाटूं लागलें. पण यानंतर इंग्लंडनें वसाहती संबंधाच्या धोरणांत बदल केला व त्यामुळें इंग्लंडच्या इतर वसाहती इंग्लंडपासून स्वतंत्र झाल्या नाहींत.

कॅनडा—उत्तर अमेरिकेंतील इंग्लिश वसाहती स्वतंत्र झाल्यावर फ्रेंचांपासून जिंकून घेतलेली कॅनडा ही विस्तृत वसाहत इंग्लंडच्या वर्चस्वाखालीं होती. येथील लोक फ्रेंच असून ते रोमन कॅथॅलिक पंथाचे होते व त्यांची भाषा फ्रेंच होती. इंग्लंडनें त्यांस आपल्या धर्मपंथाप्रमाणें, चालीरीतीप्रमाणें व भाषेप्रमाणें राहण्यास पूर्ण मुभा दिली. उत्तर अमेरिकेंतील इंग्लिश वसाहती स्वतंत्र झाल्यावर ज्यांना मातृभूमीशीं असलेला संबंध सोडावयाचा नव्हता असें बरेच इंग्लिश लोक तेथून कॅनडा या वसाहतींत आले, व त्यांस ग्रेटब्रिटननें जमिनी दिल्या. त्यामुळें कॅनडामध्यें उत्तर व पश्चिमेकडील भागांत त्यांची वस्ती वाढूं लागली. १७९१ मध्यें ग्रेट ब्रिटनच्या पार्लमेंटनें एक कायदा करून कॅनडाचे उत्तर व दक्षिण असे दोन विभाग केले; व तेथें असेंब्ली व कौन्सिल अशा सभा स्थापन केल्या. उत्तर कॅनडामध्यें बहुसंख्य लोक इंग्लिश व दक्षिण कॅनडामध्यें बहुसंख्य लोक फ्रेंच होते. या दोन विभागांचा राज्यकारभार करण्यास इंग्लंडकडून गव्हर्नर पाठविले जात. ते तेथील कायदेमंडळाचा सल्ला घेऊन राज्यकारभार करीत, पण ते तेथील कायदेमंडळास जबाबदार नव्हते. या गव्हर्नरांचें व त्यांनीं नेमलेल्या अधिकाऱ्यांचें धोरण कांहीं वेळां अरेरावीचें असें व त्याबद्दल वसाहतींत असंतोष निर्माण झालेला होता. १८३७ मध्यें उत्तर व दक्षिण कॅनडामध्यें बंडाळी सुरू झाली, तेव्हां कडक उपाय योजून ती मोडून टाकण्यांत आली. पण या बंडाळीचीं कारणें कोणतीं व ती होऊं नये म्हणून काय केलें पाहिजे हें सुचविण्यासाठीं **लॉर्ड डरहॅम** या उदारमतवादी गृहस्थास पाठविण्यांत आलें. त्यानें तेथील स्थिति प्रत्यक्ष पाहून आपला रिपोर्ट सादर केला व त्यांत असें सुचविलें कीं 'वसाहतींच्या गव्हर्नरानें तेथील कायदेमंडळास जबाबदार अस-

लेल्या मंत्रिमंडळामार्फत राज्यकारभार करावा. परराष्ट्रीय बाबींखेरीज इतर सर्व बाबतींत वसाहतींस स्वराज्याचे हक्क असावेत. तसेच तेथील निरनिराळ्या वसाहतींचें एक संघराज्य स्थापन करावें.' लॉर्ड डरहॅम याच्या सूचनेप्रमाणें व्यवस्था करण्यांत आली व तेथें असलेल्या कॅनडा, नोव्हास्कोशिया, न्यू बर्न्सविक वगैरे वसाहतींस स्वराज्याचे अधिकार देण्यांत येऊन (१८४० च्या सुमारास) या सर्व वसाहतींचें १८६७ मध्यें एक संघराज्य (फेडरेशन) स्थापन करण्यांत आलें. यानंतर पश्चिमेकडील पॅसिफिक समुद्रापर्यंतच्या विस्तृत प्रदेशामध्यें आणखी वसाहती स्थापन होऊन त्या या संघराज्यांत सामील झाल्या. कॅनडांतील सुपीक जमीनींत गव्हाचीं पैदास पुढें मोठ्या प्रमाणांत करण्यांत येऊं लागली. १८७०–८० च्या दरम्यान तेथें रेल्वे रस्ते तयार झाल्यावर हा माल त्याचप्रमाणें इतर माल इंग्लंडमध्यें व इतरत्र पाठविणें शक्य होऊन कॅनडाची भरभराट होत गेली व ती ब्रिटिश साम्राज्यांतील महत्त्वाची अशी स्वसत्ताक वसाहत झाली. क्षेत्रफळाच्या दृष्टीनें कॅनडा ही वसाहत भारताच्या दुपटीएवढी मोठी आहे.

वसाहतींच्या राज्यघटनांच्या इतिहासांत लॉर्ड डरहॅमचा रिपोर्ट विशेष महत्त्वाचा मानला जातो. ग्रेट ब्रिटननें आपल्या यापुढील वसाहतींच्या बाबतींत लॉर्ड डरहॅम यानें सुचविलेल्या धोरणाप्रमाणें वागण्याचें ठरविलें, त्यामुळें ग्रेट ब्रिटन व वसाहती यांमध्यें कलह उत्पन्न होण्याचे प्रसंग कमी आले.

मध्य व दक्षिण अमेरिकेंतील स्पॅनिश व पोर्तुगीज वसाहती स्वतंत्र होतात—१८११–१८२२ मध्य व दक्षिण अमेरिकेंत स्पेनच्या मेक्सिको, न्यू ग्रॅनडा (न्यू कोलंबिया), व्हेनीझुला, पेरू, आर्जेंटाईन, चिली व पोर्तुगालची ब्राझील या वसाहती होत्या. स्पॅनिश व पोर्तुगीज लोक या वसाहतींत थोड्या प्रमाणांत येऊन त्यांनीं तेथील स्त्रियांशीं लग्नें केल्यामुळें तेथील बहुसंख्य प्रजा मिश्र अशी होती. या वसाहती मातृभूमीच्या फायद्यासाठीं आहेत अशी स्पेन व पोर्तुगॉल यांची समजूत असून या वसाहतींच्या राजकीय, आर्थिक, व्यापारविषयक बाबींवर बरेच निर्बंध घालण्यांत आलेले होते, त्यामुळें तेथें बराच असंतोष पसरला होता. उत्तर अमेरिकेंतील इंग्लिश वसाहती स्वतंत्र झाल्यावर आपणही तसेंच करावें असें या वसाहतींस वाटूं लागलें, व त्या अनुकूल संधीची वाट पाहूं लागल्या. ही संधि त्यांस लवकरच मिळाली. फ्रान्समध्यें राज्यक्रान्ति

होऊन तेथें उदयास आलेला नेपोलियन यानें स्पेन व पोर्तुगॉल यांवर आपलें वर्चस्व बसविल्यावर व्हेनेझूएला या वसाहतीनें **फ्रॉन्सिस्को मिरांडा** याच्या नेतृत्वाखालीं स्वातंत्र्य चळवळ सुरू केली व आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें (१८११ ७ जुलै रोजीं). तेव्हां ही बंडाळी मोडण्याचा प्रयत्न करण्यांत आला, पण त्यांत यश मिळालें नाहीं नंतर **सायमन बोलीव्हर** याच्या नेतृत्वाखालीं व्हेनीझूला ही वसाहत स्वतंत्र झाली (१८१७). यानंतर १८२२ वर्षांपर्यंतच्या काळांत दक्षिण व मध्य अमेरिकेंतील स्पॅनिश व पोर्तुगीज वसाहती स्वतंत्र झाल्या व त्यांनीं तेथें आपलीं लोकसत्ताक राज्यें स्थापन केलीं. १८१५ मध्यें नेपोलियनचा पराभव झाल्यावर स्पेन व पोर्तुगॉल येथें पुन: पूर्वीच्या राजघराण्यांची सत्ता स्थापन करण्यांत आली व या वसाहती आपल्या वर्चस्वाखालीं आणाव्यात असें तेथील राज्यकर्त्यांस वाटूं लागलें. पण समुद्रावर प्रबल असलेल्या ग्रेट ब्रिटनच्या मदतीशिवाय ही गोष्ट साध्य होणें अवघड होतें; व ग्रेट ब्रिटन या कामीं मदत करण्यास तयार नव्हतें. तेव्हां अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांचा अध्यक्ष मनरो यानें इंग्लंडच्या पाठबळानें अमेरिका खंडांतील राजकारणांत ढवळाढवळ करण्याचा युरोपमधील राज्यकर्त्यांनीं प्रयत्न केल्यास ती गोष्ट.अ. सं. सं. या राष्ट्राच्या शत्रुत्वाचीं आहे असें समजलें जाईल व त्यास विरोध होईल हें जाहीर केलें (१८२३). या घोषणेस **मनरोचें तत्त्व** (डॉक्ट्रिन) असें म्हणण्यांत येतें. तेव्हां दक्षिण व मध्य अमेरिकेंतील स्पॅनिश व पोर्तुगीज वसाहती जिंकून घेण्याचा स्पेन व पोर्तुगॉल येथील राज्यकर्त्यांनीं प्रयत्न केला नाहीं. अशाप्रकारें स्पेन व पोर्तुगाल यांच्या अमेरिकेंतील वसाहती स्वतंत्र झाल्यामुळें त्यांचें समुद्रापलीकडील साम्राज्य खूपच कमी झालें व त्यामुळें त्यांचें युरोपमधील महत्त्व बरेंच कमी झालें.

आस्ट्रेलिया

१८ व्या शतकाच्या उत्तरार्धांत ब्रिटिश आरमारांतील एक अधिकारी **कॅप्टन कुक** यानें दक्षिण गोलार्धांत आशियाच्या आग्नेयेस असलेल्या आस्ट्रेलिया व न्यूझीलंड या प्रदेशांचा शोध लाविला (१७६९–७१). यानंतर ब्रिटिश लोकांचें या प्रदेशाकडे लक्ष गेलें. ग्रेट ब्रिटनमधील गुन्हेगार कैदी पूर्वी उत्तर अमेरिकेंतील इंग्लिश वसाहतींमध्यें पाठविण्यांत येत, पण या वसाहती स्वतंत्र झाल्यावर त्यासाठीं दुसरें ठिकाण पहाणें जरूर झालें. तेव्हां या कामासाठीं आस्ट्रेलिया

हें दूरचें ठिकाण बरें असें वाटून तेथें गुन्हेगार कैदी पाठविण्यांत येऊं लागले. पूर्वी इंग्लंडमध्यें राजकीय कारणांसाठीं, त्याचप्रमाणें किरकोळ गुन्ह्याबद्दलही लांब मुदतीची कैदेची शिक्षा मिळत असे, त्यामुळें या गुन्हेगार कैद्यांमध्यें वरील प्रकारच्या कैद्यांची संख्याही बरीच असें. आस्ट्रेलियांतील प्रदेश मेंढ्यांचे कळप पाळून लोकरीची पैदास करण्यास सोयीचा आहे असें आढळून आल्यामुळें स्पेनमधील मेरिनो जातीच्या मेंढ्या आस्ट्रेलियांत नेण्यांत आल्या व त्यामुळें चांगल्या प्रकारच्या लोकरीच्या धंद्याचा पाया घालण्यांत आला. तसेंच वसाहत करण्यासाठीं आस्ट्रेलियांत जाण्यास पुष्कळांस उत्तेजन देण्यांत आलें. या कामासाठीं एकः व्यवस्थित योजना असावी या हेतूनें गिबन **वेकफिल्ड** या गृहस्थानें १८३० मध्यें 'वसाहत करण्यास उत्तेजन देणारी' एक संस्था काढली; व त्यामार्फत आस्ट्रेलिया व न्यूझीलंड या ठिकाणीं वसाहती करण्यास जाण्यास ब्रिटिश लोकांस प्रोत्साहन देण्यांत आलें. वेकफिल्ड याची अशी सूचना होती कीं आस्ट्रेलिया व न्यूझीलंड येथील जमिनी वसाहत करणाऱ्यांस फुकट न देतां अल्प किंमतींत द्याव्यात, व त्यापासून मिळणाऱ्या पैशाचा विनियोग वसाहत करण्यासाठीं लोकांस प्रोत्साहन देण्याच्या कामीं तसेंच रस्ते व दळणवळणाचे मार्ग तयार करण्याच्या कामीं करण्यांत यावा. या योजनेप्रमाणें वसाहत करण्यासाठीं लोक जाऊं लागले. यानंतर १८५१ च्या सुमारास आस्ट्रेलियांतील व्हिक्टोरिया व न्यू साऊथ वेल्स येथें सोन्याच्या खाणींचा शोध लागल्यामुळें ग्रेट ब्रिटनप्रमाणें जगांतील इतर देशांतील पुष्कळ धाडसी गृहस्थही आस्ट्रेलियांत जाऊं लागले, त्यामुळें त्या प्रदेशांतील लोकवस्ती व संपत्ति वाढूं लागली. १८४० पासून तेथें ग्रेट ब्रिटनमधून गुन्हेगार कैदी पाठविण्याचा प्रघात बंद करण्यांत आला.

आस्ट्रेलिया हा विस्तृत प्रदेश असून त्याचें क्षेत्रफळ जवळ जवळ ३० लक्ष चौरस मैल म्हणजे भारताच्या पावणेदोन पट आहे. यांतील बराच भाग ओसाड आहे, तेथें पाऊसही कमी पडतो व नद्या थोड्या आहेत. या प्रदेशांतील समुद्र किनाऱ्यावरील प्रदेशांत ब्रिटिशांनीं वसाहती स्थापन केल्या व त्यांस १८५५ च्या सुमारास स्वराज्याचे हक्क दिले; व पुढे १९०० मध्यें तेथील सहा वसाहतींचें मिळून एक संघराज्य स्थापन करण्यांत आलें, व त्यास कॉमनवेल्थ ऑफ आस्ट्रेलिया असें म्हणण्यांत येऊं लागलें. कॅनबेरा हें राजधानीचें ठिकाण

ठरविण्यांत आलें. आस्ट्रेलियामध्यें ग्रेट ब्रिटनकडून गव्हर्नर जनरल हा अधिकारी पाठविण्यांत येतो व तो तेथील कायदेमंडळास जबाबदार असलेल्या मंत्रिमंडळामार्फत राज्यकारभार करतो. आस्ट्रेलिया ही कॅनडाप्रमाणें ब्रिटिश साम्राज्यांतील दुसरी मोठी स्वसत्ताक वसाहत आहे.

न्यू झीलंड

आस्ट्रेलियाच्या आग्नेयेस असलेल्या या प्रदेशाचा शोधही कॅप्टन कुक यानें लाविला (१७६९–७१). यानंतर कांहीं धाडसी ब्रिटिश लोक वसाहत करण्यासाठीं तेथें जाऊं लागले. तेथील मूळच्या लोकांस मावरी असें म्हणत. त्यांची वस्ती तुरळक होती. १८१९ मध्यें न्यू झीलंड हें आपल्या वर्चस्वाखालीं असल्याचें ग्रेट ब्रिटननें जाहीर केलें, व त्यास तेथील मूळच्या लोकांस मान्यता द्यावी लागली. या ठिकाणीं वसाहत करण्यासाठीं आलेल्या ब्रिटिशांची संख्याही वाढूं लागली व या प्रदेशाची भरभराट होऊं लागली. १८५२ च्या सुमारास या वसाहतीस स्वराज्याचे हक्क देण्यांत आले. पुढे १८६०–६६ च्या दरम्यान तेथील मूळच्या मावरी लोकांनी बंडाळी केली, पण ती मोडण्यांत आली. ही वसाहत म्हणजे मोठीं दोन बेटें व अनेक लहान बेटांचा समुदाय आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीनें ही ग्रेट ब्रिटन एवढी आहे.

आशियाखंड व त्यावर युरोपियन राष्ट्रांचें वर्चस्व—आशिया खंड हें सर्वांत मोठें खंड आहे. प्राचीन काळापासून या खंडांतील भारत, चीन, मेसापोटेमिया या ठिकाणीं मोठमोठ्या संस्कृत्या वाढल्या पण पुढें १२ व्या शतकापासून त्यास उतरती कळा लागली.

भारत (१७४०–१९१४)—भारतामधील प्रदेशासंबंधानें ग्रेट ब्रिटन व फ्रान्स यांच्यामध्यें स्पर्धा उत्पन्न झाली व १७६१ पासून फ्रेंचांचें भारतांतील राजकीय महत्त्व नाहींसें झालें. यानंतर ब्रिटिशांनीं १८५८ पर्यंतच्या काळांत भारतांतील बहुतेक सर्व प्रदेश आपल्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष वर्चस्वाखाली कसा आणिला याची हकीकत इतरत्र दिलेली आहे. फ्रेंचांच्या वर्चस्वाखालीं भारतांतील पांडेचरी, चंद्रनगर, व पोर्तुगीजांच्या वर्चस्वाखालीं भारतांतील गोवें, दीव, दमण वगैरे ठाणीं राहिली, पण त्यापासून राजकीय दृष्टीनें ब्रिटिशांस धोका येण्याचा संभव नसल्यामुळें ब्रिटिशांनीं तीं तशींच राहूं दिलीं. भारताची लोकसंख्या बरीच होती व

त्यावर ब्रिटिशांचें वर्चस्व स्थापन झाल्यामुळें ब्रिटिशांचें जगांतील महत्त्व खूप वाढलें, व तें श्रेष्ठ प्रतीचें राष्ट्र झालें. भारताच्या पूर्वेस ब्रम्हदेश हा प्रदेश असून तो ब्रिटिशांनीं १८२४–२६, १८५२ व १८८४–८५ मध्यें ब्रम्हदेशाशीं तीन युद्धें करून जिंकून घेतला, व त्यास भारताचा एक प्रांत करून टाकला.

सिलोन—भारताच्या दक्षिणेकडील या बेटावर पहिल्यानें पोर्तुगीजांचें वर्चस्व होतें, नंतर १७ व्या शतकांत डचांनीं तें जिंकून घेतलें, व पुढें नेपोलियनशीं झालेल्या युद्धाच्या वेळीं ब्रिटिशांनीं त्यावर आपलें वर्चस्व बसविलें.

मसाल्याचीं बेटें (जाव्हा, सुमात्रा वगैरे–इंडोनेशिया)—या बेटांवर पोर्तुगीजांनीं आपलें वर्चस्व बसविलें होतें, पण १७ व्या शतकांत डच लोकांनीं तीं पोर्तुगीज लोकांकडून जिंकून घेतलीं; व त्यावर डचांचें वर्चस्व स्थापन झालें.

मलायाचें द्वीपकल्प—आशियाच्या आग्नेय भागांत मलायाचें द्वीपकल्प आहे. या प्रदेशांत तेथील लोकांचीं वेगवेगळीं अशीं अनेक राज्यें होतीं. भारतामध्यें ब्रिटिशांचें राज्य स्थापन झाल्यावर या प्रदेशाकडे ब्रिटिशांचें लक्ष गेलें, व १८ व्या शतकाच्या शेवटीं त्यावर ब्रिटिशांनीं आपलें वर्चस्व बसविलें, व याच्या दक्षिण टोकावरील खाडींत सिंगापूर हें आपलें पूर्वेकडील मोठें आरमारी ठाणें स्थापन केलें. या प्रदेशांत असलेल्या कांहीं राज्यांचें एक संघराज्य स्थापन झालेलें आहे, व तें राज्य व या भागांतील इतर लहान राज्यें ब्रिटिशांचीं मांडलिक असल्यासारखीं असून सिंगापूर येथील ब्रिटिशांचा हाय कमिशनर याच्या देखरेखीखालीं राज्यकारभार करितात. या प्रदेशांतील मळ्यांत काम करण्यासाठीं ब्रिटिश अमदानींत भारतामधून बरेच हिंदी मजूर गेले व त्यांपैकीं कांहीं तेथें स्थाइकही झाले.

इंडो–चायना—भारताच्या आग्नेयेस इंडोचायना नांवाचें मोठें द्वीपकल्प आहे. या प्रदेशाशीं इ. स. पू. २ ऱ्या शतकापासून भारतीयांचा संबध आला होता. प्राचीनकाळीं भारतीयांपैकीं पुष्कळ लोकांनीं तेथें आपल्या वसाहती स्थापन करून भारतीय संस्कृतीचा तेथें प्रसार केला होता (पृष्ठ १५८–१६०). या प्रदेशाकडे प्राचीन काळापासून चिनी लोकही जात असून तेथें चिनी संस्कृतीचा प्रसार झाला होता. अशाप्रकारें या दोन प्राचीन देशांचा या प्रदेशाशीं संबंध आल्यामुळें त्यास इंडो–चायना किंवा भारतीय–चीन असें

म्हणण्यांत येऊं लागलें. मध्ययुगांमध्यें भारतीयांचा या प्रदेशाशीं संबंध सुटल्यासारखा झाला. १३ व्या शतकांत मंगोल लोकांची सत्ता चीनमध्यें स्थापन झाल्यावर हा प्रदेश चीनच्या वर्चस्वाखालीं आला; व तेथें असलेलीं निरनिराळीं राज्यें चीनची मांडलिक समजलीं जाऊं लागलीं. इ. स. १५०० नंतर या प्रदेशाकडे पोर्तुगीज व १९ व्या शतकाच्या मध्याच्या सुमारास फ्रेंच लोक व्यापारासाठीं येऊं लागले. तसेच धर्मप्रसारासाठीं तेथें ख्रिस्ती मिशनरी जाऊं लागले. तेथें असलेल्या ख्रिस्ती मिशनऱ्यांचा छळ होत आहे ही सबब पुढें करून १८६० च्या सुमारास फ्रेंच लोकांनीं चीनशीं युद्ध सुरू केलें, व चीनचा पराभव करून व्यापारविषयक सवलती मिळविल्या. यानंतर इंडोचायनाच्या पूर्व भागांतील अनाम, कोचीन चायना या प्रदेशावर फ्रेंच लोकांनीं १८७३ च्या सुमारास आपलें वर्चस्व बसविलें. तेव्हां या प्रदेशास फ्रेंच इंडोचायना असें म्हणण्यांत येऊं लागलें, व तेथे फ्रेंच रीतीरिवाज व कायदे सुरू झाले. या प्रदेशाच्या वायव्येस ब्रह्मदेश असून १८२६ ते १८८५ च्या दरम्यान तेथें ब्रिटिशांचें वर्चस्व स्थापन होत होतें. फ्रेंचांच्या वर्चस्वाखालीं असलेल्या प्रदेशाच्या पश्चिमेस सयाम (थायलंड) हा प्रदेश असून तो युरोपियन राष्ट्रांच्या वर्चस्वाखालीं न जातां स्वतंत्र राहिला. तेथील राजानें १९ व्या शतकाच्या शेवटीं युरोपियन व अमेरिकन सल्लागार नेमून आपल्या राज्यांत पाश्चात्य पद्धतीच्या पुष्कळ सुधारणा घडवून आणून पोस्ट व तारायंत्र यांचें दळणवळण सुरू केलें.

सैबेरिया—आशियाच्या उत्तर भागांत सैबेरिया हा मोठा विस्तृत प्रदेश आहे. यापैकीं बराच भाग ओसाड आहे व यांतील बराच भाग शीत कटिबंधांत मोडत असल्यामुळें तेथें थंडीही खूप आहे. युरोपमधील रशिया या देशाच्या पूर्व सरहद्दीस लागून हा विस्तृत प्रदेश असल्यामुळें या प्रदेशाशीं १६ व्या शतकापासून रशियाचा संबंध आला, व १७ व्या शतकांत यांतील कांहीं भागावर रशियानें आपलें वर्चस्व बसविलें. १९ व्या शतकांत या प्रदेशामध्यें गुन्हेगार लोकांस कैदी म्हणून पाठविण्यास रशियानें सुरुवात केली व त्यानंतर या विस्तृत प्रदेशांत वसाहत करण्यासाठीं रशियन लोक मोठ्या संख्येनें जाऊं लागले. या प्रदेशाचा दक्षिणेकडील भाग सुपीक आहे व तेथें रशियन लोकांनीं स्थापन केलेल्या वसाहतींची भरभराट होऊं लागली. या प्रदेशांत रशियन लोकांनी १८९१–१९०३ च्या

दरम्यान ट्रॅन्स सैबेरियन रेल्वे हा ५४०० मैल लांबीचा रेल्वेरस्ता बांधल्यामुळें या प्रदेशांशीं दळणवळण वाढण्यास मदत झाली. सैबेरिया या विस्तृत प्रदेशास युरोपखंडांतील रशिया या देशाचा एक विभाग असें मानण्यांत येत असून हा प्रदेश रशियन साम्राज्यांत मोडतो. रशियाचा झार याच्या हातांत अनियंत्रित सत्ता असून रशियामधील लोकांस त्याचप्रमाणे सैबेरियांतील लोकांस राजकीय बाबतींत १९ व्या शतकाच्या अखेरीपर्यंत फारच थोडे हक्क होते.

फिलीपाईन बेटें—माजेलॅन यानें १६ व्या शतकाच्या सुरुवातीस या बेटांचा शोध लाविल्यावर स्पॅनिअर्ड लोक या प्रदेशाकडे गेले व १५४२ च्या सुमारास त्यांनीं या देशावर आपलें वर्चस्व बसवून त्यास आपला राजा फिलीप याच्या नांवावरून फिलीपाईन बेटें हें नांव दिलें. स्पॅनिअर्ड लोकांनीं या बेटांत ख्रिस्ती धर्माचा प्रसार केला, व त्यामुळें तेथील बहुसंख्य लोक रोमन कॅथलिक-पंथी ख्रिस्तीधर्मीय आहेत. त्याचप्रमाणें तेथील लोकांनीं युरोपियन चालीरीतींचाही स्वीकार केला. तेथें कांहीं स्पॅनिअर्ड लोकही रहावयास गेले व त्यांचे फिलीपाईन बेटांतील लोकांशीं लग्नसंबंध होऊन तेथें मिश्रप्रजाही निर्माण झाली. १९ व्या शतकाच्या शेवटीं अ. सं. संस्थानें व स्पेन यांच्यामध्यें युद्ध होऊन त्यांत स्पेनचा पराभव झाला व हीं बेटें अ. सं. सं. या राष्ट्राच्या वर्चस्वाखालीं आलीं. विसाव्या शतकांत त्यास अ. सं. सं. या राष्ट्रानें स्वातंत्र्य दिलें.

चीन—भारताप्रमाणें चीन देश प्राचीन काळापासून सांस्कृतिक बाबतींत पुढें गेलेला होता. १२६० नंतर मध्ययुगांमध्यें हा देश मागें पडला. पुढें १६ व्या शतकांत पोर्तुगीज लोकांचा चीनशीं संबंध आला व त्यांस १५५७ मध्यें पूर्व किनाऱ्यावरील कँटनजवळ मकाओ या बेटावर आपलें व्यापारी ठाणें स्थापन करण्यास परवानगी मिळाली. यानंतर इंग्लिश व डच व्यापारी चीनकडे जाऊं लागले. १७७० ते १८३० च्या दरम्यान इंग्लंडमध्यें औद्योगिक क्रान्ति झाल्यावर व तिचा प्रसार पुढें युरोपमधील इतर देशांत होऊन तेथेंही औद्योगिक क्रान्ति झाल्यावर चीनमध्यें जाऊन यंत्राच्या साहाय्यानें मोठ्या प्रमाणांत तयार होणाऱ्या मालाचा चीनमध्यें खप करण्यासाठीं चीनशीं व्यापार करावा व चीनच्या राजकारणांत हात घालून तेथील आपलें महत्त्व वाढवावें म्हणून इंग्लिश, फ्रेंच, अ. सं. सं. त्याचप्रमाणें पुढें जपान या राष्ट्रांमध्यें स्पर्धा सुरू झाली. त्याचप्रमाणें चीनच्या उत्तर भागांतील प्रदेशावर आपलें वर्चस्व बसवावें या बाबतींत जपान

व रशिया यांमध्यें स्पर्धा उत्पन्न झाली व त्यामुळें चीनमध्यें १९ व्या शतकांत परकीयांचा हात शिरत चालला. (यासंबंधाची माहिती पृष्ठें २३२–३७ आलेली आहे).

जपान—इ. स. १५४० मध्यें पोर्तुगीज व्यापारी पहिल्यानें जपानमध्यें गेले. त्यानंतर ख्रिश्चन मिशनरीही जपानमध्यें जाऊं लागले. पुढें त्यांस तेथें येण्यास प्रतिबंध करण्यांत आला. यानंतर १८५४ मध्यें अमेरिकेच्या आरमारांतील कॅप्टन पेरी यानें जपानशीं व्यापार करण्यास परवानगी मिळविली, व अमेरिकन व युरोपियन राष्ट्रांचा जपानशीं व्यापारी संबंध आला. जपानचा परकीयांशीं संबंध आल्यावर आपलें राष्ट्र प्रबल व संपन्न करावयाचें असेल तर पाश्चात्य ज्ञान आत्मसात् करणें जरूर आहे हें पाहून जपाननें ४०–५० वर्षांत औद्योगिक व लष्करी बाबतींत आपली प्रगति केली. यानंतर इतर परकीय राष्ट्रांप्रमाणें चीनच्या राजकारणांत हात घालून चीनचें फार्मोसा बेट मिळविलें व १९०२ मध्यें ग्रेट ब्रिटनशीं मैत्रीचा तह केला. यानंतर १९०४–०५ मध्यें रशियाचा पराभव केल्यावर पूर्वेकडील राजकारणांत जपानचें महत्त्व खूप वाढलें.

इराण—इराण हें प्राचीन काळीं वैभवशालीं राष्ट्र होतें. ७ व्या शतकांत तें इस्लामधर्मीय बनलें. त्यानंतर तेथें मंगोल व नंतर तुर्कांचें वर्चस्व बसलें व तेथें तुर्की सरदाराचीं राज्यें स्थापन झालीं. १९ व्या शतकांत युरोप व आशियाखंडांतील रशियाच्या वर्चस्वाखालील प्रदेशाची खूप वाढ झाली व इराणच्या उत्तर सरहद्दीपर्यंत रशियाचा विस्तार वाढत गेला, व इराणचा रशियाशीं संबंध आला.

इराणच्या आखातावरील बंदर आपल्या वर्चस्वाखालीं असावें असें रशियास वाटत होतें. पण तसें झाल्यास भारताकडे जाणाऱ्या मार्गास व भारतावरील आपल्या वर्चस्वास धोका उत्पन्न होईल ही ब्रिटिशांना भीति वाटत होती. त्यामुळें तुर्कस्थान, इराण व अफगाणिस्थान यांवर रशियाचें वर्चस्व बसूं नये, निदान समुद्रकिनारा रशियास गांठतां येऊं नये व तसा रशियाकडून प्रयत्न झाल्यास त्यास अडथळा आणावा यासाठीं ब्रिटिशांचे प्रयत्न सुरू होते. अशी स्थिति असतां १९०७ मध्यें रशिया व इंग्लंड यांच्यामध्यें एक करार होऊन इराणचा दक्षिण भाग ब्रिटिशांच्या कक्षेखालीं, उत्तर भाग रशियाच्या कक्षेखालीं व मधला भाग इराणकडे राहूं द्यावा व त्यांत कोणी ढवळाढवळ करूं नये असें ठरलें. अशा प्रकारें इराणच्या राज्यांत परकीयांचा हात शिरला, पण तेथील लोकांस ही गोष्ट

आवडली नाहीं. पण इराण हा देश मागासलेला असल्यामुळें या गोष्टीस आळा घालण्याचें त्याच्यांत सामर्थ्य नव्हतें. तेव्हां पाश्चात्य ज्ञान आत्मसात् करून आपल्या देशाची प्रगति करावी असें इराणमधील कांहीं लोकांस वाटूं लागलें. तेव्हां या लोकांच्या प्रयत्नामुळें इराणच्या शहानें (राजा) एक राज्यघटना तयार केली व लोक प्रतिनिधींचें एक कायदेमंडळ स्थापन केलें. त्याचप्रमाणें युरोपियन व अमेरिकन सल्लागार नेमून राज्यकारभारांत सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न चालविला. इराणमध्यें तेलाच्या खाणींचा शोध लागून ग्रेट ब्रिटननें अँग्लो पर्शियन ऑइल कंपनी नांवाची एक मोठी कंपनी काढली व तेलाचें मोठ्या प्रमाणांत उत्पादन सुरू केलें, त्यामुळें इराणच्या कारभारांत ब्रिटिशांचा हात शिरत चालला. अशा प्रकारें इराण पुढारलेला झाल्यास तेथील राजकारणांत आपणांस हात घालतां यावयाचा नाहीं, तेव्हां तो मागासलेला रहावा असें रशियास वाटत होतें व त्यामुळें रशियाच्या चिथावणीनें तेथें अंतस्थ बंडाळी व अस्वस्थता सुरू असे. पहिलें महायुद्ध सुरू होऊन १९१७ मध्यें रशियांत राज्यक्रान्ति झाल्यावर रशियांतील झारची सत्ता नाहींशी झाली व रशियानें इराणच्या राजकारणांतून आपला हात काढून घेतला. पण ग्रेट ब्रिटननें या संधीचा फायदा घेऊन इराणला नवा तह करावयास लाविला व तो देश आपल्या संरक्षणाखालीं आणला व तेथें आपली फौज ठेविली. अशारीतीनें इराण हा ब्रिटिशांचा संरक्षित राष्ट्र असल्यासारखा झाला. पण ही गोष्ट तेथील देशभक्तांस आवडली नाहीं व **रेझाखान पेहेलवी** याच्या नेतृत्वाखालीं तेथें मोठी चळवळ होऊन इंग्लंडचें संरक्षित राष्ट्र म्हणून केलेला जुना तह रद्द करण्यांत आला. तेव्हां इतर राष्ट्रांचा आपणांस विरोध होईल हें पाहून इंग्लंडनें तेथील आपली फौज काढून घेतली. इराणमधील लोकांनीं तेथील शहास पदच्युत करून १९२५ मध्यें रेझाखान पेहलवी यास तेथील शहा केलें. त्यानें रेल्वे रस्ते बांधणें, रस्त्यांची डागडुजी करणें व राज्यकारभारांत सुधारणा करणें वगैरे गोष्टी केल्या. अशारीतीनें इराणच्या राज्यकारभारांतील परकीयांचा हात नाहींसा झाला.

आफ्रिका खंडावर युरोपियन राष्ट्रांचें वर्चस्व—आफ्रिका खंड हें जगांतील दुसरें मोठें खंड आहे. हें भारताच्या सुमारें चौपटीनें मोठें आहे. या खंडाच्या ईशान्येकडील प्रदेश इजिप्त हा प्राचीन काळीं सांस्कृतिक बाबतींत पुढें गेलेला देश होता. या खंडाच्या उत्तरेकडील भूमध्य समुद्राच्या किनाऱ्यावरील

भागाची प्राचीन काळापासून लोकांस माहिती होती. पण या खंडाच्या इतर भागाची प्राचीन काळांत व मध्ययुगांत लोकांस माहिती नव्हती.

ब्रिटिशांची दक्षिण आफ्रिका ही स्वसत्ताक वसाहत–(१८०५-१९१४)–डच लोकांनीं पूर्वेकडील मसाल्याच्या बेटांकडे जाणाऱ्या मार्गावरील मध्यवर्ती ठिकाण म्हणून आफ्रिकेच्या दक्षिण टोंकावर केप कॉलनी ही वसाहत १७ व्या शतकांत स्थापन केली. नेपोलियनशीं सुरू असलेल्या युद्धांत १८०५ मध्यें ब्रिटिशांनीं ती डचांपासून जिंकून घेतली. तेथें डच लोक वस्ती करून होते. ते शेती करीत व त्यासाठीं गुलामही पाळीत. या डच शेतकऱ्यांस बोअर (शेतकरी) असें म्हणत. ही वसाहत ब्रिटिशांच्या वर्चस्वाखालीं आल्यावर तेथें इंग्लिश लोकही जाऊन रहावयास लागले (१८२०); व त्यांनीं या वसाहतीच्या पूर्वेकडे नाताळ नांवाची दुसरी वसाहत स्थापन केलीं. १८३४ मध्यें ब्रिटिश पार्लमेंटनें कायदा करून ब्रिटिश साम्राज्यांतील गुलामगिरीची पद्धत बंद केली. त्यामुळें केप कॉलनी येथील डच शेतकऱ्यांस आपल्या गुलामांची मुक्तता करणें जरूर झालें. तेव्हां गुलामांची मुक्तता करून ब्रिटिश साम्राज्यांतील केप कॉलनी या वसाहतींत रहाण्यापेक्षां नवीन वसाहत स्थापन करणें बरें, असें वाटून त्यांनीं आपल्या बायकामुलांसह केप कॉलनी ही वसाहत सोडली व या वसाहतीच्या उत्तरेकडे ऑरेंज फ्री स्टेट व ट्रान्सव्हॉल या वसाहती स्थापन केल्या (१८३५–३७), व तेथें लोकसत्ताक राज्यें स्थापन केलीं. ब्रिटिशांनीं या वसाहतींचें स्वातंत्र्य मान्य केलें. या बोअर वसाहतींचें तेथील तद्देशीय लोकांबरोबर वरचेवर युद्धें उपस्थित होत व त्यामुळें केप कॉलनी व नाताळ या वसाहतींसही धोका उत्पन्न होई. दक्षिण आफ्रिकेंतील ब्रिटिश वसाहतींत १८६० पासून तेथील रेल्वे रस्ते, खाणी व इतर कामावर काम करण्यासाठीं कांहीं ठराविक मुदतीपर्यंत काम करण्याचा करार करून ब्रिटिश सरकारनें भारतांतून हिंदी मजूर पाठविले; व त्यांपैकीं कांहीं त्यांची कराराची मुदत संपल्यावर तेथें स्थाइक होऊन राहूं लागले. १८८६ च्या सुमारास ट्रान्सव्हॉल या वसाहतीच्या दक्षिण भागांत जोहान्सबर्ग येथें सोन्याच्या खाणींचा शोध लागला, त्यामुळें त्या वसाहतींत ब्रिटिश लोक त्याचप्रमाणें इतर देशांतील लोकही मोठ्या प्रमाणांत जाऊं लागले व तेथें त्यांची संख्या बोअर लोकांपेक्षां (डच शेतकरी) जास्ती झाली. तेव्हां या

परकीयांचें तेथील राज्यकारभारावर वर्चस्व होऊं नये म्हणून टान्सव्हॉल या वसाहतीचा अध्यक्ष पॉल क्रूगर यानें डच लोकांखेरीज इतरांस तेथें मताधिकार दिला नाहीं. तेव्हां ब्रिटिश वगैरे परकीयांच्या प्रेरणेनें तेथें दंगेधोपे होऊं लागले. तेव्हां तेथें असलेल्या सर्व लोकांस मताधिकार मिळून तेथील राज्यकारभारांत भाग घेतां यावा याबद्दल ब्रिटिशांनीं प्रयत्न केले, पण त्यांस यश न मिळून ब्रिटिश व बोअर यांच्यामध्यें युद्ध झालें (१८९९-१९०२). बोअर लोक लढवय्ये होते, व त्यांनीं चिकाटीनें व गनिमी काव्यानें लढून ब्रिटिशांचा पराभव करण्याचा प्रयत्न केला, पण ब्रिटिशांच्या प्रबल लष्करी सामर्थ्यापुढें बोअर लोकांचें कांहीं चाललें नाहीं व त्यांचा पराभव झाला; व ब्रिटिशांनीं ट्रान्सव्हॉल व ऑरेंज फ्री स्टेट या डच बोअर लोकांच्या वसाहती आपल्या ताब्यांत घेतल्या. पण यानंतर ग्रेट ब्रिटननें त्यांच्याशीं सहानुभूतीचें धोरण ठेवून या वसाहतींस कॅनडा व ऑस्ट्रेलिया या वसाहतींप्रमाणें स्वराज्याचे अधिकार दिले (१९०६). यानंतर दक्षिण आफ्रिकेंतील केप कॉलनी, नाताळ, ट्रान्सव्हॉल व ऑरेंज फ्री स्टेट या चारी वसाहतींचें एकीकरण करण्यांत येऊन 'युनियन ऑफ साऊथ आफ्रिका' हें राज्य ब्रिटिश पार्लमेंटच्या कायद्यानें स्थापन करण्यांत आलें (१९०९) व त्यास स्वराज्याचे हक्क देण्यांत आले. यांत इंग्लिश लोकांपेक्षां डच भाषा बोलणाऱ्या बोअर लोकांची संख्या जास्ती आहे.

इजिप्त—प्राचीन काळीं सांस्कृतिक बाबतींत इजिप्त हा पुढारलेला देश होता. मध्ययुगामध्यें तो मागें पडला. १५०७ मध्यें तो तुर्कस्थानच्या वर्चस्वाखालीं आला. १८ व्या शतकाच्या शेवटीं नेपोलियन यानें इजिप्तवर स्वारी केल्यानंतर तुर्कस्थानच्या सुलतानानें महंमदअल्ली यास इजिप्तचा वंश-परंपरा खेदीव (सुभेदार) नेमिलें. त्यानें इजिप्तमध्यें रेल्वे रस्ते बांधणें, तारायंत्र सुरू करणें, बंदरांची डागडुजी करणें वगैरे बऱ्याच सुधारणा केल्या. त्यानें फ्रेंच इंजिनिअर **लेसेप्स** यास सुएझ कालवा खणण्यास परवानगी दिली व त्या योजनेंत भांडवल घातलें. महमद अल्ली १८६३ मध्यें मरण पावला. त्याच्यानंतर त्याचा नातू इस्माइल पाछा हा इजिप्तचा खेदीव झाला. त्याच्या अमदानींत इ. स. १८६९ मध्यें **सुएझ कालव्याचें** काम पुरें होऊन भूमध्य समुद्रांतून पूर्वेकडील प्रदेशाकडे जाणारा महत्त्वाचा जलमार्ग सुरू झाला. इस्माईल पाच्छा हा उधळ्या असल्यामुळें त्यास बरेच कर्ज झालें, तेव्हां त्यानें लोकांवर बरेच कर

बसविले, तरी त्याची आर्थिक स्थिति सुधारली नाहीं. शेवटीं त्यानें सुएझ कॅनाल कंपनीचे शेअर्स विकावयास काढले. सुएझ कॅनालसारख्या महत्त्वाच्या जलमार्गावर आपलें वर्चस्व ठेवण्यास व इजिप्तच्या राजकारणांत हात शिरकावण्यास ही संधि बरी आहे असें वाटून इंग्लंडचा मुख्य प्रधान डिझरेली यानें इस्माईलनें सुएझ कॅनाल कंपनीचे विकावयास काढलेले शेअर्स ४० लक्ष पौंड खर्च करून ग्रेट ब्रिटनसाठीं खरेदी केले (१८७५). त्यामुळें सुएझ कालवा या महत्त्वाच्या जलमार्गाशीं ग्रेट ब्रिटनचा संबंध येऊन त्यास इजिप्तच्या राजकारणाकडे अधिक लक्ष द्यावें लागलें. इस्माईलनें इंग्लिश व फ्रेंच लोकांस आपले सल्लागार नेमिले, तरी त्याच्या चैनी व उधळ्या वृत्तीमुळें इजिप्तची आर्थिक स्थिति सुधारली नाहीं. तेव्हां त्यास पदच्युत करण्यांत येऊन त्याचा मुलगा ट्यूफिक यास इजिप्तचा खेदीव करण्यांत आलें (१८७९). इजिप्तच्या राजकारणांत परकीयांचा हात शिरलेला पाहून परकीयांना हांकून देण्यासाठीं आराबी पाच्छा याच्या नेतृत्वाखालीं बंडाळी झाली (१८८२). ही बंडाळी मोडण्याच्या कामीं फ्रेंचांनीं कांहीं भाग घेतला नाहीं पण ब्रिटिशांनीं अलेक्झांड्राकडे आरमार पाठविलें. त्याचप्रमाणें आराबी पाच्छा याच्याविरुद्ध सैन्य पाठवून त्याचा पराभव केला; व ईजिप्तमध्यें ट्यूफीकची सत्ता पुनः स्थापन केली (१८८२). ही बंडाळी मोडण्याच्या कामीं फ्रेंचांनीं कांहीं भाग घेतला नव्हता म्हणून फ्रेंचांचें तेथील महत्त्व कमी झालें व तो देश ब्रिटिशांच्या संरक्षणाखालीं आला. यानंतर ईजिप्तच्या वर्चस्वाखालीं असलेल्या सूडानमध्यें बंडाळी झाली (१८८३). ती मोडण्याचा ब्रिटिशांनीं प्रयत्न केला, पण त्यांत यश न येऊन तो देश स्वतंत्र झाला. पण यानंतर तो देश जिंकण्यासाठीं ब्रिटिशांनीं लॉर्ड किचनेर यास पाठविलें. त्यानें तेथील लोकांचा पराभव करून खार्टुम ही राजधानी जिंकून घेतली व व तो प्रदेश ब्रिटिशांच्या वर्चस्वाखालीं आणला.

ईजिप्तमध्यें ग्रेट ब्रिटननें लॉर्ड क्रोमर यास कॉन्सल जनरल म्हणजे खेदीवचा मुख्य सल्लागार म्हणून पाठविलें. त्याच्या देखरेखीखालीं ब्रिटिशांनीं इजिप्तमध्यें बऱ्याच सुधारणा केल्या. ईजिप्तची आर्थिक स्थिति सुधारण्यांत आली. नाइल नदीला आस्वान येथें मोठें धरण बांधण्यांत येऊन त्यास कालवे काढण्यांत आल्यामुळें इजिप्तमधील बरीच जमीन लागवडीस आणण्यांत आली. ईजिप्त

हा देश पूर्वीपासून तुर्कस्थानच्या साम्राज्यांत मोडत होता, पण १ लें महायुद्ध सुरू झाल्यावर (१९१४) तुर्कस्थान हें राष्ट्र शत्रुपक्षास मिळाल्यामुळें ग्रेट ब्रिटननें ईजिप्त हें तुर्कस्थानपासून वेगळें झालें असल्याचें व आपल्या संरक्षणाखालीं असल्याचें जाहीर केलें. १ लें महायुद्ध संपल्यावर स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाप्रमाणें आपणांस स्वातंत्र्य मिळेल असें ईजिप्तमधील लोकांस वाटत होतें. पण तें न मिळाल्यामुळें **झगलुल पाचछा** याच्या नेतृत्त्वाखालीं वफ्त पक्ष स्थापन झाला व त्यानें ईजिप्तला स्वातंत्र्य मिळावें म्हणून मागणी केली. पण त्यास ब्रिटिशांनी हद्दपार केलें. पण त्यामुळें तेथें घातपाती कृत्यें होऊं लागलीं. तेव्हां शेवटीं ब्रिटिशांनीं ईजिप्तमधून जाणारे दळणवळणाचे मार्ग, अल्पसंख्याकांचे हितसंबंध, सूडान या बाबीखेरीज करून ईजिप्तचें स्वातंत्र्य मान्य केलें (१९२२).

आफ्रिका खंडाची युरोपियन राष्ट्रांत विभागणी— अर्वाचीन युगाच्या सुरवातीस पूर्वेकडे जाणाऱ्या जलमार्गांचा शोध लावल्यावर पोर्तुगॉल, ग्रेट ब्रिटन, हॉलंड व फ्रान्स या राष्ट्रांनीं आफ्रिका खंडाच्या पश्चिम व पूर्व किनाऱ्यावर आपलीं कांहीं ठाणीं स्थापन केलीं. त्यापैकीं पश्चिम किनाऱ्यावरील ठाण्यांमार्फत गुलाम, हस्तिदंत वगैरे गोष्टींचा व्यापार सुरू झाला होता. १८७५ पूर्वी पोर्तुगीज लोकांनीं पश्चिम किनाऱ्यावरील पोर्तुगीज गायना, अँगोला व पूर्व किनाऱ्यावर मोझांबिक या ठिकाणीं, ब्रिटिशांनीं पश्चिम किनाऱ्यावरील गँबिया, सीरिअलिओने, गोल्ड कोस्ट, फ्रेंचांनीं पश्चिम किनाऱ्यावरील सेनेगाल, फ्रेंच गायना, आयव्हरी कोस्ट, व भूमध्य समुद्राच्या किनाऱ्यावरील १८३० मध्यें आलजेरिया, डचांनीं केप कॉलनी हे प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणिले होते. आफ्रिकेच्या एकंदर विस्ताराच्या मानानें हा प्रदेश अगदींच थोडा होता. आफ्रिका खंडांतील बाकीच्या विस्तृत प्रदेशासंबंधीं युरोपियन राष्ट्रांस कांहींच माहिती नसून तो प्रदेश अज्ञात होता. १८५० ते १८८० च्या दरम्यान युरोपियन व धाडसी अमेरिकन प्रवाशांनीं आफ्रिकेंतील उष्ण हवामान, रोगराई, रानटी श्वापदें व तेथील रानटी लोक या अडथळ्यांस न जुमानतां आफ्रिकेच्या आंतील भागाची माहिती मिळविली, व त्यामुळें इतरांस या खंडाची माहिती झाली. या शोधकांपैकीं स्कॉटलंडमधील डेव्हिड लिव्हिंगस्टन (१८१३–७३) हा शोधक व मिशनरी व अमेरिकेंतील हेन्री स्टॅन्ले (१८४१–१९०४) हा वृत्तपंडित हे प्रमुख होते. लिव्हिंगस्टननें ३० वर्षें प्रवासांत घालविलीं व न्यासा

सरोवर, झांबेझी नदीचा मार्ग व त्यावरील व्हिक्टोरिया धबधबा, उत्तर कांगो प्रदेश या भागांचा शोध लाविला. स्टॅनले यानें टँगानिका सरोवराच्या उत्तरेकडील प्रदेशाचा शोध लाविला. त्याचप्रमाणें पूर्व किनाऱ्यावरून निघून कांगो नदीच्या मार्गानें तो पश्चिम किनाऱ्यावर आला. स्टॅनलेच्या प्रवासवृत्तामुळें आफ्रिकेच्या आंतील भागाकडे, त्याच्या विस्ताराकडे व तेथील खनिज व उद्भिज संपत्तीकडे युरोपियन लोकांचें लक्ष गेलें. बेल्जमच्या लिओपोल्ड राजानें स्टॅनलेच्या नेतृत्वाखालीं आफ्रिकेंतील मुलुख आपल्या वर्चस्वाखालीं आणण्यासाठीं व तेथें व्यापारी ठाणीं स्थापन करण्यासाठीं एक कंपनी काढली व १८८५ मध्यें कांगोच्या विस्तृत प्रदेशावर आपला हक्क स्थापन केला; व त्यास बेल्जम कांगो असें म्हणण्यांत येऊं लागलें. या प्रदेशांत राहणाऱ्या मूळच्या लोकांस क्रूरपणें वागविण्यांत येऊन त्यांस रबर व हस्तिदंत जमा करण्यास सक्तीनें भाग पाडण्यांत आलें. या गोष्टींमुळें पुष्कळ ओरड झाली तेव्हां लिओपोल्ड यानें या कंपनींतील आपला हात काढून घेतला व ही बेल्जमपेक्षां ८० पटींनें मोठी असलेली वसाहत 'बेल्जम कांगो' म्हणून सरकारच्या मालकीची करण्यांत आली.

इंग्लंडखेरीज इतर युरोपियन राष्ट्रांच्या फारशा वसाहती नव्हत्या. तेव्हां आफ्रिकाखंडांतील प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणून आपलें साम्राज्य वाढवावें यांसाठीं फ्रान्स, बेलजम, इटली, जर्मनी, पोर्तुगाल व ग्रेट ब्रिटन यांच्यामध्यें स्पर्धा उत्पन्न होऊन १८७५ ते १९०५ पर्यंतच्या काळांत आफ्रिका खंडांतील बहुतेक सर्व प्रदेश युरोपियन राष्ट्रांत विभागला गेला व पूर्वेकडील ॲबीसीनिया व पश्चिम किनाऱ्यावरील लिबेरिया हे दोन प्रदेशच आफ्रिकेंतील मूळच्या रहिवाशांच्या वर्चस्वाखालीं राहिले. ग्रेट ब्रिटननें आफ्रिकेच्या दक्षिण भागांतील केप कॉलनी वसाहतीच्या उत्तरेकडे बेचुआनालँड, सेसिस ऱ्होडस या ब्रिटिश धाडसी गृहस्थाच्या प्रयत्नाने ऱ्होडेशिया, सर जॉर्ज गोल्डी याच्या मदतीनें पश्चिम किनाऱ्यावरील नायगेरिया, तसेंच पूर्व किनाऱ्यावरील ब्रिटिश सोमालीलँड, ब्रिटिश पूर्व आफ्रिका कंपनीच्या मदतीनें ब्रिटिश पूर्व आफ्रिका (केनेया) व युगांडा हे विस्तृत प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणले. फ्रान्सनें आफ्रिकेच्या पश्चिम व मध्यभागांतील फ्रेंच सूडान (फ्रेंच वेस्ट आफ्रिका), फ्रेंच कांगो, भूमध्य समुद्राच्या किनाऱ्यावरील ट्यूनिस हे विस्तृत

प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणिले; त्याप्रमाणें आफ्रिकेच्या वायव्य भागांतील मोरोक्को हें राज्य आपल्या संरक्षणाखालीं आणलें. जर्मनीनें नैर्ऋत्येकडील प्रदेश व पूर्वेकडील टॅगानिका या प्रदेशावर व इटलीनें ईशान्येकडील सोमाली लँड व उत्तरेकडील लीबिया या प्रदेशावर आपलें वर्चस्व बसविलें. या सर्व प्रदेशांत तेथील मूळच्या रहिवाशांची संख्या युरोपियन लोकांच्या मानानें खूप जास्ती असून त्यांस राजकीय बाबतींत फारच थोडे अधिकार आहेत; व तेथील सर्व कारभार अल्पसंख्याक असलेल्या युरोपियन लोकांच्या हिताच्या दृष्टीनें चालविण्यांत येतो, व अशारीतीनें आफ्रिका खंडांत युरोपियन राष्ट्रांची साम्राज्यशाही १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत स्थापन झाली. तेव्हां वसाहती व अंकित प्रदेश या बाबतींत ग्रेट ब्रिटन, रशिया व फ्रान्स हीं प्रमुख राष्ट्रें असून २० व्या शतकाच्या सुरवातीस ग्रेट ब्रिटनच्या वर्चस्वाखालीं सुमारे १३६ लाख चौरस मैल, रशियाच्या ६४ लाख व फ्रान्सच्या ४१ लाख चौरस मैल एवढा प्रदेश होता. याखेरीज पोर्टुगाल, बेलजम, अ. सं. संस्थानें यांच्या वर्चस्वाखालीं प्रत्येकीं सुमारें ९ लाख व हॉलंड व इटली यांच्या वर्चस्वाखालीं सुमारें ७॥ लाख चौरस मैल एवढा प्रदेश होता.

सारांश

अमेरिका खंड–सप्तवार्षिक युद्धांत फ्रेंचांचा पराभव, त्यांची कॅनडा वसाहत इंग्लंडला. फ्रेंचांकडे ल्युसीआना राहिला; पण ती पुढे अ. सं. संस्थानें यास विकली. इंग्लंडच्या ड. अमेरिकेंतील १३ वसाहती स्वतंत्र (१७८३), त्यांचें अ. सं. संस्थानें हें राष्ट्र. मध्य व दक्षिण अमेरिकेंतील स्पॅनिश व पोर्तुगीज वसाहती स्वतंत्र (१८११–१८२५), त्यांची लोकसत्ताक राज्यें. कॅनडा वसाहतींत फ्रेंच व इंग्लिश लोक. तेथें बंडाळी १८३७. लॉर्ड डरहॅमचा रिपोर्ट, परराष्ट्रीय बाबींखेरीज कॅनडास स्वराज्याचे हक्क. पश्चिमेकडील प्रदेशांत आणखी वसाहती. रेल्वे रस्ते बांधणे, १८६७ कॅनडाचें संघराज्य. प्रगति व भरभराट. ग्रेट ब्रिटनची प्रमुख वसाहत.

आस्ट्रेलिया–पहिल्यानें गुन्हेगार कैद्यांच्या वसाहती. नंतर इतरांस वसाहत करण्यास उत्तेजन. वेकफील्डची योजना. मेरिनो मेंढ्याची आयात व लोकरीचा प्रमुख धंदा. व्हिक्टोरिया व न्यू साऊथ वेल्स या वसाहतींत १८५१ च्या सुमारास सोन्याच्या खाणींचा शोध. लोकवस्तींत वाढ. आस्ट्रेलिया हा विस्तृत प्रदेश पण बराच भाग ओसाड. १८५५ च्या सुमारास तेथील निरनिराळ्या वसाहतींस स्वराज्याचे हक्क. १९०० मध्यें तेथील सर्व वसाहतींचें संघराज्य.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स

न्यूझीलंड–१८१९ ग्रेट ब्रिटनच्या वर्चस्वाखालीं. तेथें वसाहती. १८५२ च्या सुमारास त्यांस स्वराज्याचे हक्क; १८६०–६६ मुळच्या मावरी लोकांची बंडाळी, पण त्यांचा मोड.

आशिया—ग्रेट ब्रिटनचें–भारतांवर वर्चस्व १८१८–५८. प्रदेशविस्तार व लोकसंख्या या बाबतींत मोठा देश; १८०५ सीलोनवर वर्चस्व, १८२६–८५ ब्रह्मदेशावर वर्चस्व, मलायावर सार्वभौमत्व. **डचांचें** मसाल्याच्या बेटांवर–जाव्हा, सुमात्रा वगैरे (इंडोनोशिया) बेटांवर वर्चस्व. **फ्रेंचांचें** चीनशीं युद्ध १८६०. इंडोचायनांत व्यापारविषयक सवलती. १८७३ मध्यें फ्रेंचांचें इंडोचायनावर वर्चस्व. **थायलंड** (सयाम) हा **स्वतंत्र** देश, तेथील मुळच्या रहिवाशांकडे. अमेरिकन व युरोपियन सल्लागार व तेथें सुधारणा. **रशियाच्या** आशियांतील सैबेरियांत वसाहती. ट्रॅन्स सैबेरियन रेल्वे १८९१–१९०३ व त्या प्रदेशांतील दळणवळणांत वाढ. **स्पेन**–फिलीपाईन बेटांवर वर्चस्व, रोमन कॅथलिक खिस्ती धर्माचा प्रसार. कांहीं मिश्र प्रजा. **अ. सं. संस्थानचें** १८९८ नंतर फिलीपाईन बेटांवर वर्चस्व. २० व्या शतकांत त्यास स्वातंत्र्य.

चीन–ग्रेट ब्रिटन, फ्रान्स, अ. सं. संस्थानें, रशिया व जपान या राष्ट्रांस चीनकडून व्यापार विषयक सवलती. चीनमध्यें परकीयांचा हात, त्यांस घालविण्यासाठीं बॉक्सर बंगल पण अपयश. आधुनिक ज्ञान व शस्त्रास्त्रें आत्मसात् करण्याची जरूरी. **जपान**–कॅप्टन पेरीनें १८५४ मध्यें व्यापाराविषयक सवलती. पाश्चात्य ज्ञान व शस्त्रास्त्रें आत्मसात् करण्याची जरूरी, व पुढील ४०–५० वर्षांत जपानची प्रगति व प्रमुख राष्ट्र. **इराण**–मध्ययुगांत (१२५०–१९००) मंगोल, तुर्क व परकीय घराणीं यांचें वर्चस्व. रशियाचा इराणच्या सरहद्दीपर्यंत विस्तार. इराणवर वर्चस्व ठेवण्यासाठीं रशिया व ग्रेट ब्रिटन यांत स्पर्धा, १९०७ मध्यें त्यासंबधीं तह. अँग्लो–पर्शियन ऑइल कंपनीची स्थापना. इराणच्या राजकारणांत इंग्लंडचा हात. १९१७ मध्यें रशियानें इराणमधून हात काढला, पण इराणमध्यें ब्रिटिश सैन्य व ब्रिटिशांचें संरक्षित राष्ट्र असल्यासारखें; त्याविरुद्ध रेझाखान पेहलवी यांच्या नेतृत्वाखालीं चळवळ; व १९२५ मध्यें तो तेथील शहा (राजा). इराण स्वतंत्र व तेथें आधुनिक सुधारणांस सुरवात.

आफ्रिका—ग्रेट ब्रिटन–डचांची केप कॉलनी वसाहत इंग्लिशांकडे. तेथें इंग्लिशांची नाताळ व डचांची ऑरेंज. फ्री स्टेट व ट्रान्सव्हॉल या वसाहतींची स्थापना. ट्रान्सव्हालमध्यें सोन्याच्या खाणींचा शोध. परकीय युरोपियनांस नागरिकत्वाचें अधिकार नाहींत, इंगे. ब्रिटिशांचें बोअर (डच शेतकरी) लोकांशीं युद्ध, बोअर लोकांचा पराभव, पण त्यांस स्वराज्याचे अधिकार. १९०९ मध्यें या चार वसाहतींचें एकीकरण. **इजिप्त**—तुर्कस्थानच्या वर्चस्वाखालील देश.

महंमद अल्ली वंशपरंपरा खेदीव (सुभेदार). लेसेप्स या फ्रेंच इंजिनिअरनें सुएझचा कालवा खणला व १८६९ मध्यें तो सुरू. इजिप्तच्या राजकारणांत फ्रेंच व इंग्लिश यांचा हात. इस्माइल खेदीव कर्जबाजारी, त्यानें विकावयास काढलेलें सुएझ कंपनीचे शेअर्स इंग्लडनें विकत घेतले, व या प्रमुख जल-मार्गाशीं इंग्लंडचा संबंध. परकीयास घालविण्यासाठीं आराबी पाच्छा याच्या नेतृत्वाखालीं बंडाळी (१८८२), ग्रेट ब्रिटननें खेदीवला मदत करून तीं मोडली. सूडानमध्यें बंडाळी, पण ती इंग्लंडनें मोडली व तो देश इंग्लंडच्या वर्चस्वाखालीं. १ ल्या महायुद्धांत इजिप्त ब्रिटिशांचा संरक्षित देश. १९२२ इजिप्तला सुएझ कॅनाल विभागाखेरीज स्वातंत्र्य.

आफ्रिका खंडाची युरोपियन राष्ट्रांत विभागणी—स्टॅनले व लिव्हिंगस्टग या धाडसी संशोधकांकडून आफ्रिकेच्या आंतील भागांचा शोध (१८५०–८०) आफ्रिकेंत वसाहत स्थापन करण्यासाठीं युरोपियन राष्ट्रांत स्पर्धा, व आफ्रिकेची विभागणी. **ग्रेट ब्रिटन**—गॉबिआ, रिव्हिआलोने, गोल्ड कोस्ट, बेचुआना लॅड, ऱ्होडेशिया, नायगेरिया, सोमाली लँड, ब्रिटिश पूर्व आफ्रिका, युगांडा, वगैरे **फ्रान्स**—सेनेगाल, गायना, आयव्हरी कोस्ट, अलजेरिया, फ्रेंच सूडान (वेस्ट आफ्रिका), फ्रेंच कांगो, ट्यूनिस, मोरोक्को. **पोर्तुगीज**—गायना, अँगोला, मोझांबिक; **बेलजम**—कांगो. **इटली**—सोमाली लँड, लीबीया; **जर्मनी**—नैर्ऋत्य आफ्रिका, टँगांनिका. या सर्व प्रदेशांतील कारभार युरोपियन लोकांच्या हिताच्या दृष्टीनें व म्हणून साम्राज्यशाही.

प्रकरण १२ वें

यंत्रयुग, औद्योगिक क्रान्ति, शास्त्रीय व यांत्रिक शोध व त्यांचे परिणाम

प्रास्ताविक—अठराव्या शतकाच्या उत्तरार्धापासून पुढील २०० वर्षांच्या काळांत रसायन, पदार्थविज्ञान, वैद्यकी, शेतकी, वनस्पतिशास्त्र, प्राणीशास्त्र वगैरे शास्त्रांमध्यें शास्त्रज्ञांनीं नवे शोध लाविले व कल्पक यंत्रज्ञांनीं नवीन मोठमोठीं यंत्रें तयार केलीं. हीं यंत्रें वाफ, तेल व नंतर १९ व्या शतकाच्या शेवटीं वीज यांपासून मिळणाऱ्या शक्तीनें चालविण्यांत येऊं लागलीं. त्यामुळें शेतकी, उद्योगधंदे, वाहतूक, देवघेव या बाबतींत कल्पनातीत वाढ होऊन निरनिराळ्या उद्योगधंद्यांतील मालाची पैदास मोठ्या प्रमाणांत होऊं लागली, व तिचा प्रसार सर्वत्र होऊं लागला. उद्योगधंद्यांच्या बाबतींत हा जो मोठ्या प्रमाणांत बदल झाला त्यास **औद्योगिक क्रान्ति** असें म्हणण्यांत येते. ही क्रान्ति १७७५–१८३० च्या सुमारास पहिल्यानें इंग्लंडमध्यें झाली, व नंतर तिचा जगांतील इतर देशांत प्रसार होत गेला. तसेंच १८३० नंतर नवे शोध व यंत्रें निर्माण होऊन या क्रांतीच्या वाढीस मदत झाली. या औद्योगिक क्रान्तीमुळें मानवी जीवनावर व समाजस्थितिवर महत्त्वाचे परिणाम घडले.

(१) शेतकीच्या पद्धतींत सुधारणा—अठराव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास बऱ्याच देशांत शेती हाच प्रमुख धंदा होता. त्यावेळीं शेती करण्याची पद्धत जुन्या तऱ्हेची होती, व त्यामुळें शेतीपासून पीक पुष्कळ कमी येई. पण गेल्या १५०–२०० वर्षांत नवीन शोध लागून या बाबतींत बरीच सुधारणा झाली. पिकांची अलटापालट केल्यानें व मधून मधून कंदमुळांचें पीक काढल्यानें जमिनीचा कस जात नाहीं, त्याचप्रमाणें योग्य खतांचा उपयोग केल्यानें जमिनीचा कस वाढतो, व पीकही भरपूर येतें वगैरे गोष्टी प्रयोग करून सिद्ध करण्यांत आल्या. नांगरणें, पेरणें, मळणें, खुरपणें या कामासाठीं निरनिराळीं लहान मोठीं यंत्रें उपयोगांत आणलीं जाऊन तीं वाफ, तेल यांच्या साहाय्यानें चालविण्यांत येऊं लागल्यानें शेतकी मोठ्या प्रमाणांत करतां येऊं लागली. त्यामुळें कच्चा माल खूप निर्माण होऊन उद्योगधंद्याच्या वाढीस मदत झाली.

(२) यांत्रिक शोध, यंत्राच्या साहाय्यानें उद्योगधंदे, कारखाने व गिरण्या यांची स्थापना—अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत जगांतील बहुतेक ठिकाणचे धंदे घरगुती स्वरूपाचे होते. परंतु या शतकांत इंग्लंडांत पहिल्यानें कापड तयार करण्याच्या धंद्यांत यंत्रांचा उपयोग करण्यांत येऊन तीं यंत्रें वाफेनें चालविण्यांत येऊं लागल्यामुळें या धंद्यांत क्रांति झाली. वस्त्र ही मनुष्याच्या प्राथमिक गरजांपैकीं एक आहे. वस्त्र तयार करण्यास दोन क्रिया कराव्या लागतात व त्या म्हणजे सूत काढणें व वस्त्र विणणें या होत. हें सूत चरक्यावर काढलें जाई व त्याचे हातमागावर कापड विणलें जाई. या चरक्यावर एका वेळीं एकच धागा निघे. तेव्हां या बाबतींत सुधारणा होण्याची जरूरी वाटूं लागली. तेव्हां १७६७ मध्यें इंग्लंडमधील **हारग्रीव्हज** या कोष्ट्यानें 'स्पिनिंग जेनी' नांवाचें एक यंत्र बनविलें. या यंत्रानें एकाच वेळीं आठ धागे निघतील अशी योजना होती; व त्यामुळें या यंत्रानें आठ माणसांचें काम होऊं लागलें. १७६९ मध्यें इंग्लंडमधील **रिचर्ड आर्कराइट** या गृहस्थानें एक यंत्र शोधून काढलें, व त्या योगें एकाच वेळीं बरेच धागे निघत इतकेंच नव्हें तर ते पिळले जाऊन भक्कम असूं लागले. हें यंत्र बरेंच अवजड होतें, त्यामुळें तें पहिल्यानें घोड्याच्या साहाय्यानें व नंतर पाण्याच्या शक्तीनें चालविण्यांत येऊं लागलें म्हणून त्यास 'वॉटर फ्रेम' असें म्हणत. वरील यंत्रांत सुधारणा होत जाऊन **सॅम्यूएल क्रॉम्पटन** यानें एक यंत्र शोधून काढलें व त्या योगें धागे जाडेभरडे न निघतां तलम व भक्कम असे निघूं लागले. या यंत्रांमध्येंहि सुधारणा होत जाऊन १८ व्या शतकाच्या शेवटीं एकाच वेळीं दोनशें धागे निघतील अशीं मोठीं अवजड सूतकताईचीं यंत्रें तयार करण्यांत येऊं लागलीं. या वेळीं वाफेच्या शक्तीनें चालणाऱ्या एंजिनचा शोध लागला असल्यामुळें हीं अवजड यंत्रें चालण्यास वाफेनें चालणाऱ्या एंजिनचा उपयोग करण्यांत येऊं लागला.

वाफेच्या शक्तीनें चालणारा माग—सूतकताईप्रमाणें विणण्याच्या कामांतही नवीन शोध लागून सुधारणा होत गेली. **एडमंड कार्टराइट** या गृहस्थानें धोटा आपोआप फेकला जाणारा माग शोधून काढला. हें यंत्र अवजड असल्यामुळें तें पाण्याच्या शक्तीनें चालविण्यांत येई. या यंत्रामध्येंही सुधारणा होत गेली व १७८९ च्या सुमारास हें यंत्र चालविण्यास वाफेच्या शक्तीचा उपयोग करण्यांत येऊं लागला.

इतर शोध—१७९२ मध्यें **व्हिटनें** या अमेरिकन गृहस्थानें कापसाच्या बोंडांतील सरकी काढण्याचें यंत्र शोधून काढलें. हातानें काम करून एका माणसाकडून दररोज सुमारें ३ पौंड कापसांतील सरकी निघण्याऐवजीं या यंत्राच्या साहाय्यानें दररोज सुमारें तीनशें पौंड कापसांतील सरकी निघूं लागली. त्याचप्रमाणें कापूस स्वच्छ करणें, पिंजणें वगैरे गोष्टीही यंत्रानें होऊं लागल्या. त्यामुळें थोड्या वेळांत पुष्कळ काम होऊं लागलें. पहिल्या पहिल्यानें हीं यंत्रें लाकडाचीं करीत. पण हीं यंत्रें मजबूत व टिकाऊ व्हावींत म्हणून पुढें तीं लोखंड व पोलादाचीं करण्यांत येऊं लागलीं. त्यामुळें लोखंडास मागणी वाढूं लागली. लोखंड शुद्ध करण्याच्या कामांतही सुधारणा होत गेली. लोखंड वितळविण्यास जास्ती आंच असलेला दगडी कोळसा उपयोगांत आणला जाऊं लागला; व त्यामुळें शुद्ध पोलाद तयार होऊन त्यापासून भक्कम मोठीं अशीं यंत्रें तयार होऊं लागलीं.

वाफेनें चालणाऱ्या एंजिनाचा शोध—१७०५ च्या सुमारास **न्यू कॉमेन** या इंग्लिश गृहस्थानें वाफेनें चालणाऱ्या एंजिनचा शोध लाविला होता व त्या योगें खाणींतील पाणी पंप करून बाहेर काढण्याचें काम होत असें. यानंतर **जेम्स वॅट** या इंग्लिश यांत्रिकानें पुष्कळ प्रयोग करून या यंत्रांत बरीच सुधारणा केली व वाफेच्या शक्तीनें चाकास गति देणाऱ्या एंजिनचा शोध लाविला. १७८९ च्या सुमारास सूत काढणें, विणणें, सरकी काढणें या कामाच्या यंत्रांसही वाफेनें चालणाऱ्या एंजिनाचा उपयोग करण्यांत येऊं लागला.

उद्योगधंद्यास उपयोगांत आणलीं जाणारीं मोठमोठीं अवजड यंत्रें वाफेच्या शक्तीनें चालविलीं जात. वाफ तयार करण्यास जळण म्हणून दगडी कोळशाचा उपयोग करीत. नंतर जळण म्हणून तेलाचा (रॉकेल,) उपयोग करण्यांत येऊं लागला. मायकेल **फॅराडे** (१७९१–१८६७) या ब्रिटिश शास्त्रज्ञानें विजेचा शोध लाविला होता, व त्यांत पुढें संशोधन होऊन यंत्रें चालविण्यास बऱ्याच काळानें १८८० नंतर विजेच्या शक्तीचा उपयोग करण्यांत येऊं लागला.

कापड विणण्याच्या धंद्याप्रमाणें छापखाना, कातडी काम, लाकूडकाम, सुतार काम, लहानमोठीं उपकरणीं व वस्तु तयार करणें, बूट तयार करणें वगैरे

निरनिराळ्या उद्योगधंद्यांतील कामासंबंधीं यंत्रें तयार करण्यांत येऊन तीं यंत्रें वाफ, तेल व वीज यांच्या साहाय्यानें चालविण्यांत येऊं लागल्यानें मालाची पैदास मोठ्या प्रमाणांत होऊं लागली.

नवीन शोध लागून निरनिराळ्या धंद्यांमध्यें मोठमोठीं अवजड अशीं यंत्रें उपयोगांत आणलीं गेल्यानें हे उद्योगधंदे घरगुती सुरू करणें शक्य न होऊन मोठमोठ्या गिरण्या व कारखाने स्थापन झाले. या मोठमोठ्या गिरण्यांत यंत्र-शक्तीनें थोड्या वेळांत बराच पक्का माल तयार होऊं लागला व त्यामुळें गिरणी मालकांस तो स्वस्त विकणें शक्य झालें. यंत्राच्या साहाय्यानें तयार होणारा पक्का माल स्वस्तं मिळूं लागल्यामुळें त्यास मागणीही खूप वाढली. त्यामुळें या कारखान्यांत अधिक भांडवल घातलें जाऊन हे कारखाने मोठ्या स्वरूपाचे होऊं लागले. त्यामुळें ठिकठिकाणच्या घरगुती उद्योगधंद्यांचा ऱ्हास झाला; व त्या धंद्यांतील कारागीर बेकार झाले.

दळणवळणाच्या साधनांमध्यें क्रांति—गाडीरस्ते, कालवे, रेल्वेरस्ते, आगबोटी, विमानें, तारायंत्र, टेलिफोन वगैरे–१८ व्या शतकांत रस्ते बरेंच खराब असत व त्यामुळें वहातुकीच्या कामीं बराच त्रास होई. मॅकडम नांवाच्या इंजिनिअरानें खडी व दगड घालून पक्के रस्ते करण्याची पद्धत इंग्लंडमध्यें सुरू केली. या रस्त्यांवरून प्रवासी माल नेण्याच्या घोड्यांच्या गाड्यांची वहातूक होई. यानंतर वाफेनें चालणाऱ्या एंजिननें चाकास गति देऊन वहातुकीसाठीं त्याचा उपयोग करण्याचें प्रयत्न होत होते. या बाबतींत इंग्लंडमधील यांत्रिक **जॉर्ज स्टीफनसन** (१७८१–१८४८) यानें पुष्कळ प्रयोग केले व त्यास या कामीं यश येऊन त्यानें १८२५ मध्यें रुळावरून जाणारी आगगाडी तयार केली. यानंतर १८२९ मध्यें माणसें वाहून नेणारा जगांतील पहिला रेल्वेमार्ग–लिव्हरपूर ते मँचेस्टर–तयार झाला व त्यावरून ताशीं ३० मैल वेगानें 'रॉकेट' या एंजिनानें माणसें वाहून नेलीं. यापूर्वीच **फूल्टन** या अमेरिकन गृहस्थानें इंग्लंडमध्यें असतांना जेम्स वॅट याच्या एंजिनसंबंधीं माहिती मिळवून अमेरिकेंत आल्यावर वाल्याच्या ऐवजीं चाकास गती देऊन नांव चालविण्याचा शोध लाविला व १८०७ मध्यें हडसन नदीमध्यें वाफेच्या शक्तीनें चालणाऱ्या नावेची वहातूक सुरू केली. १८१२ मध्यें इंग्लंडमध्यें **हेन्री बेल** यानें **कॉमेट** आगबोट सुरू केली. १८३८ मध्यें इंग्लंड ते अमेरिका यामध्यें आगबोटीनें वहातुक होऊं

लागली. १८८५ च्या सुमारास पेट्रोलनें (शुद्ध केलेलें रॉकेल) चालणाऱ्या गॅसोलीन एंजिनचा एका जर्मन शास्त्रज्ञानें शोध लाविला व १८८७ मध्यें फ्रान्स-मध्यें पहिली मोटार गाडी तयार झाली. त्यांत पुढें सुधारणा होत जाऊन २० व्या शतकाच्या सुरवातीपासून मालाची व मनुष्यांची वहातुक मोटार गाड्या, बसेस व ट्रक्स यांनीं होऊं लागली. १८३२ च्या सुमारास विजेनें तारांच्या मार्फत बातमी पाठविण्याचा शोध **मॉर्स** यानें लाविला व १८३७ मध्यें इंग्लंडमध्यें तारायंत्र सुरू होऊन १८५५ च्या सुमारास भारतामध्येंही तारायंत्र सुरू करण्यांत आलें. १८५० मध्यें इंग्लंड ते फ्रान्स या मधील खाडींत समुद्राच्या तळानें केबल्स (पक्के वेष्ठन केलेल्या तारा) घालून तारायंत्र सुरू झालें. १८५८ च्या सुमारास इंग्लंड ते अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें यामध्यें केबल्स घालण्यांत येऊन युरोप व अमेरिका तारायंत्रानें जोडण्यांत आलीं. १८७८ मध्यें टेलिफोनचा शोध लागला. १९०७ मध्यें मार्कोनी या इटालियन शास्त्रज्ञानें बिनतारी संदेश यंत्र शोधून काढलें. १९०८ मध्यें अमेरिकेंतील राइट बंधू यांनीं विमान तयार केलें. १९०९ मध्यें ब्लेरिओट या फ्रेंच वैमानिकानें विमानानें इंग्लिश खाडी ओलांडली व १९१९ च्या सुमारास लंडन ते पॅरिस वैमानिक वहातुक सुरू होऊन पुढें तिचा जगांत सर्वत्र प्रसार झाला. अशाप्रकारें दळणवळणाच्या साधनांमध्यें गेल्या १५० वर्षांत कल्पनातीत प्रगति होऊन त्यामुळें औद्योगिक क्रांतीस खूपच मदत झाली. १८७० पर्यंत झालेल्या यांत्रिक व शास्त्रीय शोधांमध्यें ब्रिटिश यांत्रिक व शास्त्रज्ञ आघाडीस होते पण त्यानंतर फ्रान्स, जर्मनी, अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें व इटली येथील शास्त्रज्ञ व यांत्रिक पुढें येऊं लागले. ही औद्योगिक क्रांति पहिल्यानें इंग्लंडमध्यें सुरू झाली (१७७५ ते १८३०). कारखान्यांत व गिरण्यांत पक्का माल मोठ्या प्रमाणांत तयार होऊन तो स्वस्त मिळूं लागला. आगगाड्या व आगबोटी प्रचारांत येऊन इंग्लंडमध्यें तयार होणाऱ्या मालास युरोप, अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें व इतर देश यांकडून खूप मागणी येऊन तो मोठ्या स्वरूपांत निरनिराळ्या देशांत जाऊं लागला. युरोप-मधील व जगांतील इतर देशांतील धंदे त्यावेळीं घरगुती स्वरूपाचे होते, व त्यांस यंत्राच्या साहाय्यानें व वाफेच्या शक्तीनें चालणाऱ्या उद्योगधंद्यांशीं चढाओढ करणें शक्य नव्हते. त्यामुळें १९ व्या शतकाच्या अखेरपर्यंत उद्योगधंदे व व्यापार या बाबतींत इंग्लंडची खूप भरभराट होऊन इंग्लंड हें जगाची बाजारपेठ

व आर्थिक उलाढालींचें केंद्र बनलें. २० व्या शतकाच्या सुरवातीपासून मात्र या स्थितींत बदल होऊं लागला. १८३० च्या सुमारास युरोपमधील बेल्जम, १८४० च्या सुमारास फ्रान्स, १८७० च्या सुमारास जर्मनी व इतर देश, व त्यानंतर अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें, जपान, भारत वगैरे दूरदूरच्या देशांतही इंग्लंडमध्यें तयार झालेलीं मोठमोठीं यंत्रें मागवून मोठमोठे कारखाने व गिरण्या सुरू झाल्या व त्यांमध्यें वाढ होऊन त्या इंग्लंडशीं चाढाओढ करूं लागल्या. यांपैकीं जर्मनी, अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें, जपान वगैरे कांहीं देशांनीं आपल्या देशांत तयार होणाऱ्या मालास इंग्लंडमध्यें तयार होणाऱ्या स्वस्त मालाची चढाओढ बाधूं नये म्हणून इंग्लंडमधून आयात होणाऱ्या पक्क्या मालावर संरक्षित जकात बसविली व आपल्या देशांतील उद्योगधंद्याच्या वाढीस उत्तेजन दिलें. भारत हा इंग्लंडच्या अंकित असा देश असल्यामुळें भारतांतील उद्योगधंद्यास उत्तेजन देण्यासाठीं इंग्लंडमधील आयात मालावर संरक्षित जकात बसविण्यांत आली नाहीं. या संरक्षित जकातीमुळें निरनिराळ्या देशांतील उद्योगधंद्यांस उत्तेजन मिळून ते खूप वाढले. या बाबतींत २० व्या शतकाच्या सुरवातीपासून जर्मनी, अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें व आशियांतील जपान हे देश बरेच पुढें येऊन उद्योगधंद्यांच्या बाबतींत त्यांची ग्रेट ब्रिटनशीं स्पर्धा सुरू झाली.

औद्योगिक क्रान्तीचे परिणाम—पूर्वी सर्व उद्योगधंदे घरगुती स्वरूपाचे होते. निरनिराळे कारागीर आपल्या मालकीच्या हत्यारांनीं व उपकरणांनीं निरनिराळ्या वस्तू घरीं बनवीत. कुटुंबांतील इतर लहानमोठीं माणसेंही त्यांस या कामीं मदत करीत. फावल्या वेळीं कारागीर जोडधंदा म्हणून शेती, दूधदुभतें, कोंबड्या पाळणें वगैरे धंदेही करीत. हलके हलके भांडवलवाले धाडसी गृहस्थ पुढें येऊन ते या कारागिरांस त्यांच्याशीं करार करून कच्चा माल पुरवीत व त्यांच्याकडून पक्का माल तयार करवून घेऊन तो शक्य तितक्या जास्ती किंमतीस मोठमोठ्या बाजारपेठांत विकीत व फायदा मिळवीत. पण हा पक्का माल कारगीर आपल्या घरच्या मंडळींच्या मदतीनें घरीच करीत म्हणून या उद्योगधंद्यास "घरगुती स्वरूपाचे उद्योगधंदे" असें म्हणत. परंतु नवीन शोध लागून मोठमोठ्या गिरण्या व कारखाने स्थापन झाल्यामुळें कसबी कारागिरांचा, घरगुती स्वरूपाचा धंदा बसला व ते बेकार झाले. त्यांस आपलें गांव सोडून

रोजंदारीचे, कामकरी व मजूर म्हणून मोठमोठ्या कारखान्यांत काम करणें जरूर झालें. हे मोठमोठे कारखाने व गिरण्या भांडवलवाल्यांच्या मालकीच्या असून शक्य तितक्या कमी वेतनावर व जास्त वेळ या मजुरांकडून काम करवून घेण्यांत येऊं लागलें. गिरणींतील कांहीं कामें स्त्रिया व लहान मुलें यांच्याकडून करून घेतां येतील अशीं कमी श्रमाचीं असल्यानें व कमी वेतनावर त्यांस कामास लावणें शक्य झाल्यामुळें मजुरीचा दरही कमी झाला. पुरुषांकडूनच नव्हे तर स्त्रिया व लहान मुलें यांच्याकडूनही दिवसास १२–१४ तास काम करवून घेण्यांत येई. त्यामुळें कारखान्यांत काम करणाऱ्या कारागिरांची व मजुरांची स्थिति हलाखीची झाली. कारखाने व गिरण्या असलेल्या शहरांमध्यें कामानिमित्त मजूर येऊं लागले व त्यामुळें खेडेगांवें ओस पडून शहरांची लोकसंख्या वाढू लागली. या ठिकाणीं जागेच्या कमतरतेमुळें त्यास अपुऱ्या व गलिच्छ अशा जागेंत रहावें लागे. अशाप्रकारें समाजांत भांडवलवाले व मजूर असे दोन वर्ग स्पष्टपणें दिसूं लागले. मजुरांच्या असाहाय्य स्थितीमुळें त्यांस भांडवलवाल्या गिरणीमालकांकडून आपली कष्टमय स्थिति सुधारून घेणें अशक्य होई. मजुरांनीं संघटित होऊन आपला संघ स्थापन करणें व गिरणीमालकांवर दडपण आणणें ही गोष्ट त्यावेळीं अस्तित्वांत असलेल्या कॉंबिनेशन ॲक्टनें (संघासंबंधाचा कायदा) उद्योगधंद्यांस अडथळा येतो म्हणून बेकायदेशिर समजली जाई. सरकारनें उद्योगधंद्यांवर नियंत्रण ठेवून त्यांत ढवळाढवळ करूं नये, मागणी व पुरवठा या तत्त्वाप्रमाणें सर्व गोष्टी आपोआप सुधारतील असें अर्थशास्त्रज्ञ प्रतिपादन करीत. तरी अल्पवयी मुलांस बरेच तास गिरणीमध्यें कामास लावणें योग्य नाहीं असें कांहीं समाजसुधारकांस वाटून त्यांच्या प्रयत्नानें १८३३ मध्यें ब्रिटिश पार्लमेंटनें एक कायदा केला, व त्या अन्वयें ९ वर्षांच्या आंतील मुलांस कारखान्यांत कामास लावण्यांत येऊं नये, त्यावरच्या मुलांस व स्त्रियांस दर रोज १० तासांपेक्षां जास्ती काम देण्यांत येऊं नये, कारखान्याच्या मालकांकडून वरील गोष्टी पाळल्या जातात कीं नाहीं हें पहाण्यासाठीं तपासनीस अधिकारी नेमावेत असें ठरविण्यांत आलें. मजुरांची स्थिति सुधारण्यासाठीं पुढील ६०–७० वर्षांमध्यें आणखी कायदे करण्यांत आले. १८२४ मध्यें ब्रिटिश पार्लमेंटनें मजुरांनीं आपले संघ स्थापन करण्याविरुद्ध असलेला 'कॉंबिनेशन कायदा' रद्द केला, त्यामुळें

आपलें संघ स्थापन करून त्यामार्फत संपाचा धाक दाखवून आपलें वेतन वाढवून घेणें, आपली स्थिति सुधारण्यासाठीं पार्लमेंटकडून कायदे पास करवून घेणें मजूर वर्गास शक्य झालें.

युरोपमधील व जगांतील इतर देशांत औद्योगिक क्रान्तीची लाट पसरून (१८३० ते १९००) त्यांपैकीं ज्या देशांत मोठमोठे कारखाने, गिरण्या वगैरे स्थापण्यांत आल्या त्या ठिकाणींही इंग्लंडप्रमाणें घरगुती उद्योगधंद्यांचा ऱ्हास होऊन औद्योगिक बाबतींत पुढें येणाऱ्या मोठमोठ्या शहरांची लोकसंख्या वाढून तेथें भांडवलवाले व मजूर असे दोन वर्ग, गलिच्छ वस्ती, मजुरांची कष्टप्रद व असाहाय्य स्थिति, तेथील सरकारची मजुरांच्या स्थितीबद्दल उदासीनता वगैरे गोष्टी होऊं लागल्या. तेव्हां ही स्थिति सुधारण्यासाठीं समाजसुधारकांकडून प्रयत्न होऊं लागले. त्यांच्या प्रयत्नामुळें लहान मुलांस गिरण्यांतून कामावर न नेमणें, इतर मुलांचे व स्त्रियांचे गिरणींतील कामाचे तास कमी करणें, आपले संघ स्थापन करण्यास मजुरांस उत्तेजन देणें, वगैरे बाबतींत कायदे करून मजुरांची स्थिति सुधारण्यासाठीं प्रयत्न करण्यांत आले.

समाजसत्तावाद (Socialism) — आपले संघ स्थापन करून आपली स्थिति सुधारण्याचा मजुरांनीं प्रयत्न केला, तरी कारखानदारांच्या व गिरणी मालकांच्या स्वार्थी वृत्तीमुळें मजुरांची व कामकऱ्यांची स्थिति कायमची सुधारणें शक्य नाहीं व त्यासाठीं वेगळी समाजरचना अस्तित्वांत आणणें जरूर आहे असें कांहीं लोकांस वाटूं लागलें. पक्या मालाच्या उत्पादनांत मजुरांचा व कामकऱ्यांचा भाग बराच असतो, पण त्यांस त्यांच्या श्रमाच्या मानानें योग्य वांटा मिळत नाहीं, व स्वार्थी भांडवलवाले व गिरण्यांचे मालक मजुरांच्या व कामकऱ्यांच्या असाहाय्य स्थितीचा फायदा घेऊन संपत्तीचा फारच थोडा वाटा त्यांस देतात, तेव्हां ही स्थिति सुधारण्यासाठीं उत्पादनाचीं साधनें–कारखाने, गिरण्या, यंत्रसामुग्री वगैरे–खाजगी मालकीची न ठेवतां ती समाजाच्या म्हणजे राष्ट्राच्या मालकीचीं करावींत, व संपत्तीच्या उत्पादनांतून मजुरांस व कामकऱ्यांस भरपूर वांटा द्यावा असें कांहीं विचारी लोकांनीं प्रतिपादिलें. या विचाराच्या लोकांस 'समाजसत्तावादी' (Socialists) असें म्हणण्यांत येऊं लागलें. यामध्यें निरनिराळीं मतें निर्माण झालीं. प्रत्येकानें आपल्या शक्तीप्रमाणें मालाचें उत्पादन करावें, व आपल्या जरूरीप्रमाणें त्यांतील वांटा घ्यावा असें कांहींचें मत होतें. हे ध्येयवादी

होते व त्यांच्या मताप्रमाणें गोष्टी घडून आल्यास आदर्श समाज रचना स्थापन होईल असें त्यांस वाटत होतें. **कार्ल मार्क्स** (Karl Marx १८१८–१८८३) नांवाच्या एका जर्मन ज्यू गृहस्थानें समाजसत्तावादासंबंधीं आपलें मत प्रामुख्यानें पुढें मांडलें. कार्ल मार्क्स याचें तेथील सरकारशीं न पटल्यामुळें त्यास जर्मनी देश सोडावा लागला व नंतर तो फ्रान्समध्यें गेला. नंतर त्याचें वास्तव्य बरींच वर्षें इंग्लंडमध्यें होतें. त्यानें १८४७ मध्यें फ्रेडरिक एन्जेल्सच्या सहकाऱ्यानें 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' (समाजसत्तावादी जाहीरनामा) प्रसिद्ध करून आपलें तत्त्व स्पष्ट केलें. या जाहीरनाम्यांत उत्पादनाचीं साधनें—गिरण्या, कारखाने, यंत्रसामुग्री— हीं समाजाच्या म्हणजे राष्ट्राच्या मालकीचीं असावींत व जरूर पडल्यास बळजबरीनें व दंगेधोपे करूनही मजुरांनीं तीं हस्तगत करावींत असें प्रतिपादन केलें होतें. त्याचप्रमाणें कार्ल मार्क्स यानें 'भांडवल' नांवाचा ग्रंथ लिहून 'समाजसत्तावादाचें' त्यांत प्रतिपादन केलें (१८६७). त्याच्या या ग्रंथाचा मोठा परिणाम झाला. त्याचीं सर्व तत्त्वें व विचार व त्यानें सुचविलेले मार्ग जरी सर्वत्र मान्यता पावले नाहींत तरी त्यानें पुढें मांडलेल्या विचारांवर आधारलेले असे निरनिराळे पक्ष औद्योगिक क्रांति झालेल्या देशांमध्यें निर्माण झाले. संपत्तीच्या उत्पादनांत मजुरांस देण्यांत येणारा हिस्सा बराच कमी असून त्यांत वाढ झाली पाहिजे, मजुरांची हलाखीची स्थिति सुधारण्यासाठीं गिरण्या व कारखाने यांवर योग्य तीं नियंत्रणें घालणें जरूर असलें तरी भांडवलवाले आपली संपत्ति कारखान्यांत व गिरण्यांत घालून जो धोका पतकरतात व कारखाने चालविण्यासाठीं धंद्याची व यंत्रांची चांगली माहिती असणाऱ्या तज्ज्ञ व्यवस्थापकांची नेमणूक करतात त्याबद्दल संपत्तीच्या उत्पादनांतील त्यांचा वांटा त्यांस मिळणें जरूर आहे असें कांहीं समाजसत्तावादाबद्दल सहानुभूति असणाऱ्या लोकांसही वाटत होतें.

औद्योगिक क्रांतीचा भारतावर परिणाम—१७७५–१८३० च्या दरम्यान इंग्लंडमध्यें औद्योगिक क्रान्ती झाल्यावर तेथें मोठमोठ्या गिरण्या व कारखाने स्थापन होऊन यंत्रानें व वाफेच्या शक्तीनें मुबलक असा माल तयार होऊन तो स्वस्त मिळूं लागल्यामुळें इंग्लिश व्यापारी भारतांतील तलम कापड इंग्लंडमध्यें नेण्याऐवजीं इंग्लंडमध्यें तयार झालेलें स्वस्त कापड भारतांत विकूं लागले. हें कापड हातमागावर तयार झालेल्या भारतीय कापडापेक्षां स्वस्त व

मुबलक प्रमाणांत मिळूं लागल्यामुळें त्याचा भारतांतील खेड्यापाड्यांतही प्रसार होऊं लागला. भारताचें राज्य ईस्ट इंडिया कंपनीकडे व त्यानंतर इंग्लंडच्या राणीकडे गेल्यावर भारताचें आर्थिक धोरण भारताच्या हिताच्या दृष्टीनें न ठरवितां तें इंग्लंडच्या हिताच्या दृष्टीनें ठरविण्यांत येऊं लागलें. १८६० नंतर भारतांत यंत्राच्या साहाय्यानें व वाफेच्या शक्तीनें चालणाऱ्या कापडाच्या गिरण्या स्थापन झाल्यावर त्यांस उत्तेजन देण्यासाठीं परकीय कापडावर संरक्षित जकात बसविण्याचा भारतांतील ब्रिटिश राज्यकर्त्यांकडून प्रयत्न झाला नाहीं, तर उलट भारतांतील कापड विणण्याच्या धंद्याच्या वाढीस आडथळा आणण्याचा प्रयत्न होऊन इंग्लंडमधील कापडास भारतांतील गिरण्यांमधून तयार झालेल्या कापडाची चढाओढ भासूं नये म्हणून संरक्षित व्यापाराचें धोरण अमलांत न आणतां भारताच्या हिताचें नव्हतें तरी खुल्या व्यापाराचें धोरण अमलांत आणलें इतकेंच नव्हे तर भारतांमधील गिरण्यांत तयार झालेल्या कापडावरही आयात होणाऱ्या इंग्लंडमधील व परकीय कापडाप्रमाणें अंतर्गत जकात (Excise Duty) घेण्यांत येऊं लागली. या धोरणामुळें भारतांतील पूर्वापार चालत आलेला सर्वांत मोठा व भारतांतील सर्व भागांत पसरलेला असा हातमागावर कापड विणण्याच्या धंद्याचा ऱ्हास होऊन तो अजिबात बसला व या धंद्यांत गुंतलेले लक्षावधी कोष्टी बेकार झाले, व त्यांपैकीं बऱ्याच लोकांस शेतकीकडे वळावें लागलें. कापडाप्रमाणें इंग्लंडमध्यें यंत्राच्या साहाय्यानें तयार झालेला पक्का माल व इतर जिनसाही खपविण्याची भारत ही बाजारपेठ बनली; त्यामुळें कापडाच्या धंद्याप्रमाणें भारतांतील इतर धंदेही डबघाईस आले. परदेशांशीं समुद्रावरून होणारी वहातूक, परराष्ट्रांशीं पेढ्यांचा (बँकांचा) व्यवहार, जहाजांचें बांधकाम वगैरे मोठमोठ्या धंद्यांत इंग्लिश कंपन्यांस उत्तेजन मिळत गेलें. भारतांत कच्चा माल तयार व्हावा, पक्का माल तयार होऊं नये हें सरकारचें धोरण ठरल्यासारखें झालें. भारतांमध्यें १८५३ नंतर रेल्वे रस्ते तयार होऊन त्यांनीं भारतांतील मुंबई, मद्रास व कलकत्ता ही प्रमुख बंदरें जोडलीं गेल्यानें यंत्राच्या साहाय्यानें इंग्लंड, जर्मनी, जपान व अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें या उद्योगप्रधान देशांत तयार झालेला पक्का माल भारतांतील खेड्यापाड्यापर्यंत पसरून भारतांतील इतर उद्योगधंद्यांचाही ऱ्हास होत गेला. १८८० च्या सुमारास जर्मन व्यापाऱ्यांनीं हिंदी नमुने नेऊन यंत्रावर जरतारी

किनखापी माल तयार करण्यास सुरवात केल्यामुळें हा धंदा बुडाला. जर्मन स्वस्त रंगामुळें रंगाऱ्यांचा धंदा, रॉकेल तेलामुळें उजेडासाठीं लागणाऱ्या तेलाचा धंदा, परदेशी कमावलेल्या कातड्याच्या आयातीमुळें ढोरांचा धंदा, तांबें, पितळ व इतर धातूंचीं परदेशी भांडीं स्वस्त मिळूं लागल्यामुळें तांबटांचा व कुंभारांचा धंदा वगैरे धंद्यांचा ऱ्हास झाला. त्याचप्रमाणें कांचसामान, कागद, नांवा बांधणें वगैरे धंदेही मोडकळीस येऊन या निरनिराळ्या धंद्यांत गुंतलेल्या कारागिरांस नाइलाजास्तव शेतीच्या धंद्याकडे पडावें लागलें. शेतीच्या धंद्यांतही फार लोक पडल्यामुळें शेतीचे लहान लहान तुकडे, शेतकऱ्यांची कर्जबाजारी स्थिति, भारतांतील बरीच शेती पावसावर अवलंबून व पाऊस कमी पडल्यामुळें व वेळेवर न पडल्यामुळें पडलेले दुष्काळ यामुळें शेतकऱ्यांचा धंदाही किफायतशीर न होऊन शेतकऱ्यांची म्हणजे भारतांतील बहुसंख्य लोकांची हलाखीची स्थिति झाली. भारतांतील सरकार परकीय असल्यामुळें भारतीय लोकांस ही स्थिति सुधारण्यासाठीं कांहीं करतां येणें शक्य झालें नाहीं.

शास्त्रीय व यांत्रिक शोध व त्यांचे परिणाम— गेल्या दीडशें दोनशें वर्षांमध्यें रसायन, पदार्थविज्ञान, वैद्यकी, प्राणिशास्त्र, वनस्पतिशास्त्र, भूगर्भशास्त्र वगैरे बाबतींत महत्त्वाचे शोध लागले. त्याचप्रमाणें नेहमीं उपयोगी पडणारीं अशीं यंत्रें व उपकरणीं तयार करण्यांत आलीं व त्यामुळें मनुष्याचें जीवन अधिक सुखकर होण्यास मदत झाली.

उत्क्रान्ति तत्त्व—डार्विन (१८०२–८२) हा एक प्राणिशास्त्रज्ञ इंग्लंडमध्यें होऊन गेला. त्यानें प्राणिशास्त्रासंबंधीं संशोधन करून सध्यांची प्राणिसृष्टि व वनस्पतिसृष्टि लाखों वर्षांपासून होत आलेल्या उत्क्रान्तीमुळें बनलेली आहे व यांतही लाखों वर्षांनी आणखी बदल होत जाईल या उत्क्रान्ति तत्त्वाचें प्रतिपादन केलें. त्यामुळें मनुष्य हा कनिष्ट प्रतीच्या प्राण्यापासून उत्क्रान्ति पावत गेलेला प्राणी आहे असें मत पुढें मांडण्यांत आलें. त्याच्या या तत्त्वामुळें युरोपमधील रूढ समजुतीस धक्का दिला गेला व त्याबद्दल त्याच्यावर पुष्कळच टीका केली गेली.

जंतुशास्त्र—लुई पाश्चूर (१८२२–९५) हा एक फ्रेंच शास्त्रज्ञ होऊन गेला. त्यानें जंतुशास्त्रासंबंधीं पुष्कळ प्रयोग केले व त्यास असें आढळून आलें कीं पुष्कळसे रोग व रोगांच्या साथी अतिसूक्ष्म अशा रुमी किंवा जंतूंपासून निर्माण

होतात व फैलावतात. तेव्हां त्यासंबंधानें आणखी प्रयोग करण्यांत येऊन निरनिराळ्या रोगांसंबंधीं प्रतिबंधक व उपचारक लसी तयार करण्यांत येऊन त्यांचें इनॉक्युलेशन करून रोगास प्रतिबंध करणें व तें बरें करणें शक्य आहे हें सिद्ध झालें. त्यामुळें प्लेग, कॉलरा, विषमज्वर, घटसर्प, देवी वगैरे निरनिराळ्या रोगांवर प्रतिबंधक उपचार करणें शक्य झालें.

जीवनसत्त्वें (Vitamins) — अन्नामध्यें असणाऱ्या निरनिराळ्या जीवनसत्त्वांमुळें प्राण्यांचें पोषण होतें, व त्यांची वाढ होते व त्यांच्या अभावीं रोग होतात व वाढ खुंटते हें १९०० च्या सुमारास शास्त्रज्ञांस निरनिराळे प्रयोग केल्यावर आढळून आलें. त्यामुळें योग्य जीवनसत्त्वें असणारें अन्न कोणतें याची निवड करतां येऊन मनुष्यास आपलें जीवन अधिक आरोग्यकारक करतां येऊं लागलें.

क्ष (X) किरण—विल्यम रॉंटजेन (Wilhelm Rontgen) या जर्मन शास्त्रज्ञानें १८९५ मध्यें 'क्ष' किरणांचा शोध लावला; व त्यांच्या साहाय्यानें अपारदर्शक अशा पदार्थांपलीकडील पदार्थ दिसणें शक्य झालें. या शोधामुळें प्राण्यास दुखापत व अपाय झाल्यास शरीराच्या आंतील कोणता भाग मोडला आहे व दुखवला आहे व त्यासाठीं कोणता उपाय केला पाहिजे हें शस्त्रक्रिया करणाऱ्या सर्जनला ठरविणें शक्य झालें व त्यामुळें वैद्यकी शास्त्रास पुष्कळच मदत झाली.

बधीरता आणणें—शस्त्रक्रिया करतांना पुष्कळ वेदना सोसाव्या लागत व त्यामुळें जरूर असणारी शस्त्रक्रिया करून घेण्यास पुष्कळ रोगी तयार नसत. पण १८४८ मध्यें क्लोरोफॉर्म या पदार्थाचा शोध लागून मनुष्यास कांहीं वेळ मोहनिद्रा व बधीरता आणणें शक्य झालें. त्याचप्रमाणें पुढें आणखी शोध लागून कोकेन वगैरे औषधानें शरीराचा एखादा भाग बधीर करतां येऊं लागला. त्यामुळें शस्त्रक्रिया करतांना वेदना नाहींसें करणें शक्य झालें व त्यामुळें वैद्यकी शास्त्रास खूपच मदत झाली.

वीज—इंग्लंडमधील फॅराडे, अ. सा. संस्थानांचा फ्रँकलिन व इटलीचा व्होल्टा यांनीं विजेसंबंधीं आणखी प्रयोग करून यंत्रें चालविणें, उष्णता देणें संदेश पाठविणें, पदार्थ थंड ठेवणें वगैरे निरनिराळ्या कामासाठीं विजेचा उपयोग

करतां येईल हें सिद्ध केलें, त्यामुळें त्या बाबतींत विजेचा उपयोग करण्यांत चेऊं लागला.

वरील गोष्टींप्रमाणें रसायनशास्त्रांमध्यें निरनिराळे शोध लागून कृत्रिम रबर, कृत्रिम रेशीम, प्लॅस्टिक मिश्रण व त्यापासून निरनिराळ्या सुबक वस्तु करितां येऊं लागल्या. बायसिकल, स्टोव्ह, सेफ्टी रेझर, टाईप रायटर, कपडे धुण्याचें यंत्र डॅग्यूरींचें (Daguerre) फोटोग्राफींचें यंत्र, थिमोनीअरचें (Thimonnier) शिवण्याचें यंत्र, एडिसनचें ग्रामोफोन व सिनेमा, ली डी फॉरेस्ट यांचें रेडिओ हीं यंत्रें वगैरे कितीतरी उपयुक्त वस्तु बनविण्यांत येऊन त्यांपैकीं बऱ्याच गरीब वर्गांतील लोकांच्या आटोक्यांत आल्यामुळें बहुजनसमाजाचें जीवन पूर्वीपेक्षां कितीतरी पटींनें अधिक सुखकर होण्यास मदत झाली. शास्त्रीय बाबतींत अजूनही महत्त्वाचें शोध लागत आहेत. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीं १९४५ मध्यें जपानमधील हीरोशीमा या शहरावर ६ ऑगष्ट रोजीं व नागासाकी या शहरावर ८ आगष्ट रोजीं टाकण्यांत आलेल्या अणुबाँबमुळें प्रचंड उष्णता निर्माण होऊन त्या शहरांतील लक्षावधी माणसें मृत्युमुखीं पडलीं; व त्यामुळें अणूमध्यें असणाऱ्या या प्रचंड सुप्तशक्तीची जगास कल्पना आली. विध्वंसक साधन म्हणून चा अणुशक्तीचा (Atomic Energy) युद्धाच्या वेळीं उपयोग करण्यांत आला, तरी शांततेच्या वेळीं या प्रचंड शक्तीचा इतर उपयुक्त कामासाठीं वापर करितां येणें शक्य आहे व तसें झाल्यास कोळसा, तेल वगैरे वस्तूंची मोठ्या प्रमाणांत बचत होऊन त्यांचा जगांतील साठा जास्ती दिवस टिकविणें शक्य आहे हें शास्त्रज्ञांच्या निदर्शनास आलें आहे. विस्तवानें आग लावण्याचें विध्वंसक कृत्य करतां येतें, त्याप्रमाणें अन्न शिजविणें, उष्णता देणें वगैरे उपयुक्त गोष्टीही करितां येतात, त्याप्रमाणें अणुशक्तीचा कोणत्या उपयुक्त गोष्टीसाठीं वापर करितां येईल यासंबंधाचे प्रयोग निरनिराळ्या प्रमुख राष्ट्रांकडून करण्यांत येत आहेत.

सारांश

प्रास्ताविक–१७५० ते १९५० च्या दरम्यान यांत्रिक व शास्त्रीय शोध, व यंत्रांचा उपयोग. त्यामुळें औद्योगिक क्रान्ति चालू राहिली. औद्योगिक क्रान्ति पहिल्यानें कापड विणण्याच्या धंद्यांत इंग्लंडमध्यें १७७५–१८३० च्या दरम्यान.

शेतकीच्या पद्धतींत सुधारणा (१७५०–१९५०)–नवीन पद्धति व खतांचा उपयोग. यंत्रांचा उपयोग, कच्च्या मालाची विपुल पैदास. उद्योगधंद्याच्या वाढीस मदत.

यांत्रिक शोध, कारखाने व गिरण्या यांची स्थापना–इंग्लंडमध्यें कापड तयार करण्याच्या धंद्यांत यंत्रांचा उपयोग–हारग्रीव्हज, आर्कराइट, क्रॉमटन. जेम्स वॅट–वाफेच्या शक्तीनें चालणारें एंजिन, व त्यांचा कापड तयार करण्याच्या यंत्रास उपयोग. १८८० नंतर विजेचा उपयोग. मोठे कारखाने व गिरण्या. मालाची विपुल पैदास व तो स्वस्त.

दळणवळणाच्या साधनांत क्रान्ति–मॅकडम–पक्के रस्ते. १८२९ लिव्हिरपूल ते मँचेस्टर जगांतील पहिला रेल्वे रस्ता. वाफेच्या शक्तीनें चालणारी आगगाडी. १८०७ फ्रूल्टन–वाफेच्या शक्तीनें नांव अमेरिकेंत. १८३८ इंग्लंड ते अमेरिका आगबोटीनें वहातुक. १८८७ पेट्रोलवर चालणारी पहिली मोटारगाडी, १९०९ राइट बंधू पहिलें विमान, १९१९ पॅरिस ते लंडन विमानवहातुक.

तारा यंत्र १८३७ इंग्लंडमध्यें. १८५८ इंग्लंड ते अमेरिका केबल्स. टेलीफोन १८७८ मध्यें, १९०७ मार्कोनी बिनतारी संदेश यंत्र.

औद्योगिक क्रान्ति–१७७५–१८३० पहिल्यानें इंग्लंड, नंतर १८३०–१९०० च्या दरम्यान बेलजम, जर्मनी, अमेरिका, जपान, भारत व नंतर इतर देश. २० व्या शतकाच्या सुरवातीपासून औद्योगिक बाबतींत जर्मनी, जपान, अ. सं. संस्थानें यांची ब्रिटिशांशीं स्पर्धा.

औद्योगिक क्रान्तीचे परिणाम-पक्का माल विपुल, स्वस्त, बहुजन समाजाच्या आटोक्यांत. घरगुती उद्योगधंद्यांचा ऱ्हास. कारखाने व गिरण्या शहरांत. लोकवस्तींत वाढ. गलिच्छ वस्ती. मजूर व कामकरी यांस कामाचे जास्ती तास, कमी वेतन. ही स्थिति सुधारण्यास मजुरांचे संघ. सरकारकडून कारखान्यांतील कामासंबधीं कायदे.

समाजसत्तावाद (Socialism)–उत्पादनांत भांडवलवाल्यास मोठा वाटा व कामकरी व मजूर यांस कमी वाटा म्हणून उत्पादनाचीं साधनें राष्ट्राच्या (समाजाच्या) मालकीचीं करणें जरूर. निरनिराळे उपपक्ष. जहाल सोशालिस्ट कार्ल मार्क्स याचा कम्युनिस्ट मॅनिफेस्टो १८४७. कामकरी व मजूर यांनीं उत्पादनाचीं साधनें हस्तगत करावींत हें प्रतिपादन. नेमस्त सोशालिस्ट–सरकारनें योग्य कायदे करावेत.

औद्योगिक क्रान्तीचे भारतावर परिणाम–घरगुती उद्योगधंद्यांचा ऱ्हास. सरकारचे आर्थिक धोरण भारतापेक्षां इंग्लंडच्या हिताचे.

शास्त्रीय व यांत्रिक शोध–निरनिराळ्या शास्त्रांत संशोधन व शोध. उपयुक्त गोष्टींची व यंत्रांची निर्मिति. मनुष्याचें जीवन अधिक सुखकर.

प्रकरण १३ वें

१९ व्या व २० व्या शतकांतील जगांतील प्रमुख राज्यें व घडामोडी

(अ) युरोपमधील घडामोडी व संघटित राज्यांची स्थापना (१) स्वातंत्र्य राष्ट्रीयत्व व लोकशाही संपादन करण्यासाठीं चळवळी (२) इटलीचें एकीकरण व प्रगति (३) जर्मन साम्राज्याची स्थापना व उत्कर्ष (४) फ्रान्समधील तिसरें लोकसत्ताक राज्य, (५) आस्ट्रिया-हंगेरीचें साम्राज्य (६) रशिया, तुर्कस्थान व आग्नेय युरोप (७) युरोपमधील राजकारण. (ब) ग्रेट ब्रिटन, ब्रिटिश साम्राज्य व कॉमनवेल्थ (ब्रिटिश स्वसत्ताक राष्ट्रांचा संघ किंवा राष्ट्रकुटुंब). (क) अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें या राष्ट्राची स्थापना, विस्तार व उत्कर्ष (ड) मध्य व दक्षिण अमेरिकेंतील लोकसत्ताक राज्यें (प) आशियांतील राष्ट्रें (१) अर्वाचीन भारत (२) अर्वाचीन जपान (३) अर्वाचीन चीन.

(अ) युरोपमधील घडामोडी व संघटित राज्यांची स्थापना

(१) स्वातंत्र्य, राष्ट्रीयत्व व सत्ता संपादन करण्यासाठीं चळवळी

व्हिएन्ना येथील परिषद्—नेपोलियनचा पराभव केल्यावर व्हिएन्ना येथें युरोपमधील राष्ट्रांच्या प्रतिनिधींची परिषद् भरून युरोपची नवी मांडणी करण्यांत आली. या परिषदेमध्यें आस्ट्रिया, रशिया, प्रशिया व ग्रेट ब्रिटन या राष्ट्रांच्या प्रतिनिधींनीं प्रमुख भाग घेतला. चांपैकीं आस्ट्रियाचा मुख्य प्रधान मेटर्निक (Metternich) याच्या प्रेरणेनें परिषदेचें धोरण ठरविण्यांत आलें. हें धोरण प्रतिगामी होतें व तें म्हणजे फ्रान्सच्या राजक्रांतीनें उत्पन्न झालेल्या स्वातंत्र्य, समता, विश्वबंधुत्व, राष्ट्रीयत्व व लोकशाही या कल्पना पार दडपून टाकून फ्रान्सच्या राज्यक्रांतीच्या पूर्वीची स्थिति युरोपमध्यें स्थापन करणें हें होय.

या परिषदेनें विजयी झालेल्या राष्ट्रांचा गेल्या २०-२५ वर्षांत गमावलेला

प्रदेश मिळवून देण्याचा प्रयत्न केला. आस्ट्रिया व प्रशिया या राष्ट्रांस आपला पूर्वीचा प्रदेश मिळून इतर कांहीं प्रदेशही मिळाले. इटलीच्या उत्तर भागांतील लॉंबर्डी व व्हेनीस यांवर आस्ट्रियाचें वर्चस्व स्थापन झालें. प्रशियाला पश्चिम जर्मनींतील कांहीं प्रदेश मिळाला. फ्रान्स व स्पेन येथें बूरबॉन घराण्यांतील पूर्वीच्या राजकर्त्यांची सत्ता स्थापन करण्यांत आली. आस्ट्रिया व प्रशिया यांच्या वर्चस्वाखालीं असलेल्या पोलंडपैकीं कांहीं भाग तोडण्यांत येऊन पोलंडचें राज्य निर्माण करण्यांत आलें; पण त्याचें राज्यपद रशियाचा झार अलेक्झांडर यास देण्यांत आलें. इंग्लंडला डच लोकांचीं दक्षिण आफ्रिकेंतील वसाहत मिळाली. इटलीच्या दक्षिण भागांतील नेपल्स-सिसलीचें (दोन सिसलीचें राज्य) राज्य स्पेनच्या बूरबॉन घराण्यांतील एका पुरुषास देण्यांत आलें. पोपला चर्चच्या हुकमतीखालीं असलेला इटलीमधील सर्व प्रदेश मिळाला. टस्कनी, पार्मा, मोडेना या संस्थानांवर हॅप्सबर्ग घराण्यांतील राजकर्ते नेमण्यांत आलें. पिडमांट व जेनोआचें प्रजासत्ताक राज्य एक करून तें सार्डिनियाच्या राजाच्या ताब्यांत देण्यांत आलें, व तें पिडमॉंट-सार्डिनियाचें राज्य बनलें. अशाप्रकारें इटली हा निरनिराळ्या लहान लहान राज्यांत विभागला जाऊन आस्ट्रियाची त्यावरील पकड दृढ झाली. फ्रान्सच्या उत्तर सरहद्दीवर प्रबळ राष्ट्र असणें जरूर आहे म्हणून हॉलंड या राष्ट्रांस आस्ट्रियन नेदर्लंड (बेल्जम) हा प्रदेश जोडण्यांत येऊन नेदर्लंडचें राज्य निर्माण करण्यांत आलें.

जर्मनींवर नामधारी सत्ता असलेल्या पवित्र रोमन साम्राज्याचा नेपोलियननें विनाश केला असून जर्मनीमधील लहानमोठ्या अशा ३०० संस्थानांची संख्या कमी होऊन तेथें ३८ संस्थानें राहिलीं होतीं. या सर्व संस्थानांचें एकीकरण करून संयुक्त जर्मनीचें एक संघटित राज्य स्थापन व्हावें असें कांहींस वाटत होतें, पण जर्मनीमध्यें आस्ट्रिया व प्रशिया हीं दोन प्रबळ व प्रतिस्पर्धी संस्थानें असल्यामुळें सर्व जर्मनीचें एकीकरण होणें शक्य नव्हतें. पण जर्मनीमधील सर्व संस्थानांचा एक संघ स्थापन करण्यांत आला व फ्रँकफर्ट हें त्याचें मुख्य ठिकाण करण्यांत आलें; पण या संघास कांहींच अधिकार नव्हते.

व्हिएन्ना येथील परिषदेंत प्रमुख भाग घेणाऱ्या आस्ट्रिया, प्रशिया व रशिया येथील मुत्सद्यांनीं वरील प्रकारचें प्रतिगामी धोरण आंखलें व त्याविरुद्ध कोणी चळवळ केल्यास ती कडक उपाय योजून दडपून टाकण्याचें ठरविलें.

स्पेन व नेपल्स येथील चळवळी १८२० स्पेनच्या गादीवर पूर्वीच्या बूरबॉन घराण्यांतील ७ वा फर्डिनंड यास बसविलें होतें. फर्डिनंडनें गादीवर आल्यावर स्पेनमधील देशभक्तांनीं १८१२ मध्यें अमलांत आणलेली राज्यघटना रद्द केली. तेथें करण्यांत आलेल्या सुधारणा रद्द केल्या व सर्व सत्ता आपल्या हातीं घेतली व अनियंत्रितपणें राज्यकारभार सुरू केला. तेव्हां स्पेनमध्यें बंडाळी सुरू झाली व ती वाढत आहे हें पाहून ७ व्या फर्डिनंडनें घाबरून जाऊन १८१२ मध्यें केलेल्या घटनेप्रमाणें राज्यकारभार करण्याचें कबूल केलें. स्पेनमधील जनतेनें लोकनियंत्रित राज्यपद्धतीप्रमाणें राज्य करण्यास तेथील राजकर्त्यांस भाग पाडल्याचें पाहून इटलीच्या दक्षिण भागांतील नेपल्स येथेंही चळवळ सुरू होऊन तेथील जनतेनें बूरबॉन घराण्यांतील राजकर्त्याकडून लोकनियंत्रित राज्यपद्धतीप्रमाणें राज्यकारभार करण्याचें अभिवचन घेतलें.

स्पेन व नेपल्स येथें घडून आलेला प्रकार आस्ट्रियाचा मुख्य प्रधान मेटर्निक यास आवडला नाहीं; व त्यानें युरोपमधील राष्ट्रांच्या मुत्सद्यांची सभा बोलावून सनदशीर राज्य व लोकशाही स्थापन करण्यासाठीं स्पेन व नेपल्स येथें सुरू झालेल्या क्रान्तिकारक चळवळी दडपून टाकण्याचा युरोपमधील राष्ट्रांच्या मुत्सद्यांनीं प्रयत्न केला नाहीं तर ही चळवळीची लाट युरोपमधील इतर देशांत पसरून युरोपमध्यें अंदाधुंदी सुरू होईल, तेव्हां या चळवळी दडपून टाकण्याचें ठरविण्यांत आलें. नेपल्समधील चळवळ दडपून टाकण्याचें काम आस्ट्रियाकडे सोंपविण्यांत आलें. तेव्हां आस्ट्रियन सैन्य नेपल्समध्यें गेलें व त्यानें तेथील लोकपक्षीयांचा पाडाव करून तेथील राजा १ ला फर्डिनंड याची अनियंत्रित सत्ता तेथें स्थापन केली. स्पेनमधील क्रान्तिकारक चळवळ मोडण्याचें काम फ्रान्सकडे सोंपविण्यांत आलें, (१८२२), व फ्रेंच सैन्य तेथें गेल्यावर तेथील क्रान्तिकारक चळवळ मोडण्यांत आली व तेथील लोकपक्षीय पुढाऱ्यांस फांशीं देण्यांत आल्यावर स्पेनमध्यें ७ व्या फर्डिनंडची अनियंत्रित सत्ता स्थापन झाली.

ग्रीसमधील स्वातंत्र्यप्राप्तीची चळवळ—इस्लामधर्मीय तुर्कस्थानच्या साम्राज्यांत बाल्कन द्वीपकल्पांतील बरीच ख्रिश्चन राज्यें होतीं, त्यांपैकीं ग्रीसचें राज्य होतें. तुर्कस्थानच्या सुलतानाचा अंमल जुलमी होता. धार्मिक बाबी-संबंधानेंही ख्रिश्चन प्रजेस वाइट रीतीनें वागविण्यांत येई. तेव्हां तुर्कस्थानच्या

वर्चस्वापासून आपली सुटका व्हावी म्हणून ग्रीसमध्यें १८२१ मध्यें स्वातंत्र्य प्राप्तीसाठीं मोठी चळवळ सुरू झाली व ती पसरत गेली तेव्हां तुर्कस्थानच्या सुलतानानें ही चळवळ दडपून टाकण्यासाठीं १८२५ मध्यें कडक उपाय योजले, व पुष्कळ चळवळ्या लोकांस ठार केले. तेव्हां ग्रेट ब्रिटन, रशिया व फ्रान्स या राष्ट्रांनीं तुर्कस्थाननें ग्रीसला स्वराज्याचे हक्क यावेत म्हणून प्रयत्न केला. त्यांत यश न आल्यानें या राष्ट्रांच्या संयुक्त आरमारानें तुर्कस्थानच्या आरमारावर हल्ला करून नाव्हारीनो (Navarino) या ठिकाणीं त्याचा मोड केला (१८२७). युरोपमधील निरनिराळ्या देशांतील लोकांस ग्रीसच्या प्राचीन संस्कृतीबद्दल व वैभवाबद्दल आदर वाटत होता व त्यामुळें पुष्कळ लोक स्वयंसेवक म्हणून ग्रीसच्या सैन्यांत दाखल झाले होते. इकडे रशियानें डॅन्यूब नदीच्या आसपासच्या तुर्कस्थानच्या वर्चस्वाखालीं असलेल्या प्रदेशावर स्वारी केली व तुर्कस्थानच्या सैन्याचा पराभव केला, तेव्हां तुर्कस्थानला ॲड्रिओनोपल येथें तह करणें (१८२९) भाग पडलें. या तहानें तुर्कस्थाननें ग्रीसचें स्वातंत्र्य कबूल केलें. त्याचप्रमाणें बाल्कन द्वीपकल्पांतील सर्बिया, मोल्डेव्हिया, वॉलेचिया या राज्यांतील लोकांस स्वराज्याचे अधिकार देण्याचें कबूल केलें. रशियास कॉकेशस पर्वताजवळचा प्रदेश मिळाला. अशाप्रकारें ग्रीसचें स्वतंत्र राष्ट्र निर्माण होऊन १८३२ मध्यें बव्हेरियाचा राजपुत्र ओटो (Otto) यास ग्रीसचें राज्यपद देण्यांत आलें (१८३२). त्यानें १८६२ पर्यंत राज्य केलें.

फ्रान्समधील क्रांतिकारक चळवळ व तेथील घडामोडी (१८१५–१८४८). नेपोलियनचा पराभव झाल्यावर १६ व्या लुईचा भाऊ लुई यास १८ वा लुई म्हणून फ्रान्सचा राजा करण्यांत आले. लुईबरोबर फ्रान्समधून नेपोलियनच्या अमदानींत पळून गेलेले बरेच अमीरउमरावही फ्रान्समध्यें परत आले. पण गेल्या २५ वर्षांत झालेल्या घडामोडीवरून त्यांनीं कांहींच धडा घेतला नव्हता. फ्रान्समधील राज्यक्रान्तीच्या पूर्वी आपणांस जसें वागतां येत होतें, तसेंच आतांही वागतां येईल असें त्यांस वाटत होतें. परंतु फ्रान्सच्या गादीवर आलेला १८ वा लुई दूरदर्शी होता. लोकमतास मान न देतां त्यांच्या आकांक्षा चेपून टाकण्याचा जर आपण प्रयत्न केला, तर त्याचा परिणाम अनिष्ट होईल हें त्यास कळून चुकलें; व त्यानें सनदशीर रीतीनें राज्य करण्याचें योजलें व एक राज्यघटना तयार केली. या घटनेमध्यें कायदे करण्यासाठीं

दोन गृहांचें एक पार्लमेंट स्थापन करण्यांत यावें, यामध्यें राजानें नेमलेल्या अमीरउमरावांची एक सभा व कांहीं किमान मालमत्ता असलेल्या लोकांना निवडलेल्या प्रतिनिधींची दुसरी सभा अशा दोन सभा असाव्यात, पार्लमेंटच्या संमतीशिवाय कर बसविण्यांत येऊं नयेत, राजाच्या मंत्र्यांची त्यांनीं केलेल्या कारभाराबद्दल चौकशी करण्याचा पार्लमेंटला अधिकार असावा, कायदा सर्वांना सारखा लागू आहे, आरोप शाबीत झाल्याशिवाय कोणास तुरुंगांत टाकण्यांत येऊं नये, प्रत्येकास आपापल्या धर्मपंथांप्रमाणें वागण्याची पूर्ण मुभा आहे वगैरे गोष्टी ग्रथित केलेल्या होत्या. १८व्या लुईनें राज्यघटनेप्रमाणें राज्यकारभार केल्यामुळें त्याच्या अमदानींत सर्व सुरळीत चाललें होतें. १८व्या लुईच्या मृत्यूनंतर (१८२४) त्याचा भाऊ हा १० वा चार्लस म्हणून गादीवर आला. हा अरेरावी व प्रतिगामी धोरणाचा असल्यामुळें त्याच्याबद्दल लोकांस तिटकारा वाटत होता. चार्लसनें गादीवर आल्यावर सरदार व अमीरउमराव यांस खूष करण्यासाठीं गेल्या राज्यक्रान्तीमध्यें त्यांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई करण्यासाठीं १० कोटी फ्रँक रक्कम त्यांना देण्यासाठीं मंजूर करून घेतली. त्यानंतर राष्ट्रांतील छापखाने व शिक्षण यांवर नियंत्रण घालण्यांत आलें. तेव्हां चार्लसच्या या रुत्यांस पाठबळ देण्याचें पार्लमेंटमधील लोकसभेनें नाकारिलें. तेव्हां चार्लसनें कॉमन्स सभा रद्द करून टाकली व आपल्या स्वतःच्या अधिकारानें वटहुकूम काढून अनियंत्रितपणें राज्यकारभार करण्यास सुरुवात केली (१८३०). चार्लसच्या या अरेरावी रुत्याचा सर्वांसच त्वेष आला. प्रधानमंडळ व राजा यांस पदच्युत करावें अशा घोषणा सुरू झाल्या; व पॅरिसशहरीं मोठी दंगल माजली. ही दंगल थांबविण्यास फ्रान्समधील लष्कर अगदींच असमर्थ होतें. फ्रान्समध्यें शांतता राहून सनदशीर राज्यपद्धति असावी असें कामन्ससभेंतील पुढाऱ्यांस वाटत होतें. तेव्हां त्यांनीं चार्लस यास पदच्युत करून लोकपक्षाबद्दल सहानुभूति वाटणाऱ्या लुई फिलीपी या बूरबॉन घराण्यांतील राजपुत्रास ' राज्यपद ' द्यावें असा ठराव लोकसभेकडून करून घेतला. तेव्हां १०व्या चार्लसनें राज्यत्याग करून फ्रान्समधून पळ काढला; व लुई फिलीपी हा फ्रान्सचा राजा झाला (१८३०).

लुई फिलीपी (१८३०–४८) लुई फिलीपी हा धोरणी व दूरदर्शी होता; व सनदशीरपणें राज्य करण्याचें त्यानें योजलें. तो राजा होता तरी त्याची रहाणी व वागणूक सामान्य माणसाप्रमाणें होती. लोकप्रियता संपादन करण्याचा त्यानें

प्रयत्न केला. त्याचा कल मध्यमवर्गीयांकडे होता. लुई फिलीपी गादीवर आल्यानंतर कांहीं वर्षांनीं फ्रान्समध्यें निरनिराळे राजकीय पक्ष अस्तित्वांत येऊं लागले. ते म्हणजे मध्यम वर्गीयांचा पक्ष. यांमध्यें शहरांतील निरनिराळे उद्योग धंदे व व्यापार करणारे लोक यांचा भरणा होता व या पक्षाकडे लुई फिलीपीचा कल होता. दुसरा पक्ष म्हणजे बूरबॉन घराण्याबद्दल ज्यांस सहानुभूति वाटत होती असा राजसत्तावादी पक्ष. त्यांच्या मतें १० व्या चार्लसनंतर त्याच्या वंशजाकडे फ्रान्सचें राज्यपद देणे जरूर होतें. तिसरा पक्ष म्हणजे फ्रान्समध्यें लोकसत्ताक राज्य असावें असें ज्यांस वाटत होतें त्या लोकांचा पक्ष. याच सुमारास फ्रान्समध्यें औद्योगिक क्रांति होण्यास सुरुवात झाली व यंत्रशक्तीनें मोठमोठ्या गिरण्या व कारखाने सुरू होऊन कामकरी व मजूरवर्गाची संख्या वाढूं लागली. या वर्गास राज्यकारभारांत आपणांस भाग घेतां यावा म्हणून निवडणुकीच्या वेळीं मत देण्यास लागणारी मालमत्तेची अट पुष्कळच कमी होणें जरूर आहे असें वाटत होतें. तेव्हां कामकरी व मजूर यांचे हितसंबंधाचें रक्षण करणारा असा 'सोशालिस्ट' (समाजसत्तावादी) पक्ष निर्माण होऊं लागला. या पक्षाचा कल लोकसत्तावादी पक्षाकडे होता. तेव्हां कामकरी व मजूरवर्गाची स्थिति सुधारावी व त्यास मताधिकार असावा याबद्दल मोठी चळवळ सुरू झाली. मताधिकार मिळण्यास मालमत्तेची अट असल्यामुळें जनतेपैकीं थोड्या लोकांसच मताधिकार होता. सरकारच्या राज्यकारभारावर वृत्तपत्रांतून टीका होऊं लागली. मोठमोठ्या सभा भरूं लागल्या, व दंगल होऊं लागली. तेव्हां व्यवस्था राखण्यासाठीं लुई फिलीपीच्या मंत्रिमंडळास कडक उपाय योजावे लागले. पण त्यामुळें लुई फिलीपीबद्दल व मंत्रिमंडळाबद्दल लोकमत अधिकच कलुषित होऊं लागलें. अशी स्थिति असतां समाजसत्तावादी पक्षाच्या पुढाऱ्यांनीं लोकमत आपल्या बाजूचें करण्याचा प्रयत्न चालविला. त्यांनीं ठिकठिकाणीं सभा भरवून सरकारी धोरणाचा निषेध केला. तेव्हां ही चळवळ सुरू असतां १८४८ च्या फेब्रुवारीच्या २२ तारखेस 'मतदार लोकांच्या संख्येंत वाढ करणें जरूर आहे, मंत्रिमंडळाचें धोरण अरेरावीचें व लोकमतास न जुमानणारें आहे, हें दर्शवून त्याचा निषेध करण्यासाठीं पॅरिस शहरीं एक जंगी सभा भरविण्याचें योजण्यांत आलें. पण सैन्याच्या मदतीनें मंत्रिमंडळानें ती सभा भरूं दिली नाहीं. पण या कृत्यानें लोकांमधील संताप अधिकच वाढला.

मंत्रिमंडळाविरुद्ध लोकमत क्षुब्ध झालें आहे हें पाहून लुई फिलीपीनें तें मंत्रिमंडळ रद्द केलें व कोणत्या सुधारणा करणें जरूर आहे याबद्दल समाजसत्तावादी पक्षाच्या पुढाऱ्यांशीं वाटाघाटी करण्याचा प्रयत्न केला. पण शहरांत शांतता रहावी म्हणून दंगा करणाऱ्या लोकांवर सैनिकाकडून गोळ्या झाडण्यांत आल्यामुळें राजाच्या तडजोडीच्या बोलण्याकडे दुर्लक्ष होऊन लोक अधिकच चवताळले; व दंगेधोपे होऊं लागले. मोठमोठीं घरें उध्वस्त करून टाकण्यांत आलीं. टेलेरीझ (Tuileries) राजवाड्याभोंवतीं दंगेखोरांचा गराडा पडला. तेव्हां आतां इतःपर फ्रान्समध्यें राहिल्यास आपल्या जीवितास धोका आहे हें पाहून २४ फेब्रुवारी १८४८ रोजीं लुई फिलीपीनें राज्यत्याग केला व फ्रान्समधून पळ काढला.

फ्रान्समधील राजसत्ता नाहींशी झाल्यावर ही राज्यक्रान्ति घडवून आणण्यांत ज्यांनीं भाग घेतला होता व लोकसभेमध्यें ज्यांचें बहुमत होतें अशा पक्षांपैकीं लोकसत्तावादी व समाजसत्तावादी अशा पक्षांमधील मतभेद अधिक तीव्र झाले- नवीन राज्यघटना ठरविण्यासाठीं घटनासमिति निवडण्यांत आली. या घटना समितींत लोकसत्तावादी पक्षाचें बहुमत असल्यामुळें समाजसत्तावादी पक्षानें सुचविलेल्या व व्यवहाराच्या कसोटीस न उतरणाऱ्या योजना रद्द करण्यांत आल्या. तेव्हां आपल्या म्हणण्याप्रमाणें गोष्टी होत नाहींत हें पाहून समाजवादी- पक्षाच्या प्रेरणेनें लोकसत्तावादी पक्षाविरुद्ध दंगल माजविण्यांत येऊन दंगेधोपे सुरू झाले, व सर्वत्र बेबंदशाही माजली. २३ ते २५ जून १८४८ च्या तीन दिवसांत १० हजारांहून अधिक माणसें मृत्युमुखीं पडलीं. पण या दंगलींत समाजसत्तावादी पक्षाचा पूर्ण पाडाव होऊन लोकसत्तावादी पक्षाचा विजय झाला.

यानंतर राष्ट्रीय सभेनें फ्रान्सच्या लोकसत्ताक राज्याची नवी घटना तयार केली. या घटनेप्रमाणें कायदे करण्यासाठीं एकच सभा असावी, लोकसत्ताक राज्याचा अध्यक्ष लोकनियुक्त असावा, त्याची मुदत चार वर्षांची असावी व त्यानें राज्यकारभाराचें काम करावें असें ठराविण्यांत आलें. यानंतर या लोक- सत्ताक राज्याचा अध्यक्ष म्हणून नेपोलियन बोनापार्ट याचा पुतण्या लुई नेपोलियन याची निवडणूक झाली (डिसें. १८४८).

बेलजमचें स्वतंत्र राज्य १८३०—व्हिएन्ना येथील परिषदेनें बेलजम-

मधील लोकांची इच्छा काय आहे याची विचारपूस न करितां हॉलंडच्या राज्याशीं तें राज्य जखडून टाकून त्या राज्यास नेदर्लंडचें राज्य असें नांव दिलें होतें. बेल्जममधील लोकांचा या योजनेस पहिल्यापासूनच विरोध होता. हॉलंडची लोकसंख्या कमी होती, तेव्हां त्या राज्यानें आपल्यावर हुकमत चालवावी हें त्यांस आवडत नव्हतें. बेलजममधील लोकांची भाषा फ्रेंमिश असून ते रोमन कॅथालिक पंथाचे होते, तर हॉलंडची भाषा डच असून ते प्रॉटेस्टंट पंथाचे होते. राज्यकारभारांतील प्रमुख जागांवर डच लोकांचींच नेमणूक होई. अशी स्थिति असतां जुलै १८३० मध्यें फ्रान्समध्यें दंगल होऊन १० वा चार्लस यास राज्यत्याग करावा लागला. ही बातमी समजतांच ब्रुसेल्समध्येंही दंगेधोपे होऊन स्वातंत्र्य मिळविण्याची चळवळ सुरू झाली, व तीं बेलजममधील इतर ठिकाणींही पसरली. या बंडाळीचा मोड करण्याचा तेथील डच सैन्यानें प्रयत्न केला, पण त्यांस यश आलें नाहीं. यानंतर ऑक्टोबरमध्यें तेथील लोकांनीं बेलजम हें राष्ट्र स्वतंत्र झालें असल्याची घोषणा केली (१८३०). यावेळीं रशिया, प्रशिया व आस्ट्रिया येथील राज्यकर्त्यांस पोलंडमधील दंगलीकडे लक्ष देणें जरूर असल्यामुळें बेलजमधील प्रकरणांत हात घालतां आला नाहीं. यानंतर इंग्लंड व फ्रान्स या राष्ट्रांच्या प्रयत्नानें युरोपमधील प्रमुख राष्ट्रांनीं बेलजमच्या स्वातंत्र्यास मान्यता दिली. बेलजमची राज्यघटना कशाप्रकारची असावी हें ठरविण्यासाठीं बेलजममधील लोकांची एक परिषद भरविण्यांत आली. या परिषदेनें तेथें लोकनियंत्रित राजसत्ता असावी असें ठरवून सॅक्स-कोबर्ग या जर्मनीमधील संस्थानांतील राजपुत्र लिओपोल्ड यास बेलजमचें राज्यपद दिलें. लिओपोल्ड हा परकीय होता तरी त्यानें कुशलरीतीनें राज्यकारभार करून (१८३१-१८६५) बेलजममधील लोकांचें प्रेम संपादन केलें.

पोलंडमधील बंडाळी १८३०—व्हिएन्नाच्या परिषदेनें पोलंडचा कारभार रशियाचा झार अलेक्झांडर याच्याकडे दिला होता, व त्यानें पोलंडची राज्यव्यवस्था वेगळी करून तेथील लोकांस बरेच हक्क दिलेले होते. पण मानीं पोलिश लोकांचें त्यानीं समाधान झालें नव्हतें. रशियाचा झार अलेक्झांडर याच्या हयातींत तेथें असंतोष माजला नाहीं, पण १८२५ मध्यें तो मरण पावल्यावर त्याचा भाऊ निकोलस (१८२५-५५) याच्या कारकीर्दीत त्याच्या अेरावीच्या धोरणामुळें व उद्धाम वागणुकीमुळें पोलंडमधील असंतोष वाढत गेला. त्यानें

पोलंडमधील राज्यकारभाराच्या महत्त्वाच्या जागांवर पोलंडमधील लोक नेमण्याऐवजीं रशियन लोक नेमण्याचा प्रघात सुरू केला, तेथील वृत्तपत्रांवर नियंत्रण घातलें व पोलंडमधील लोकसभेच्या मागण्या व सूचना धुडकावून लाविल्या. १८३० मध्यें फ्रान्समध्यें बूरबॉन घराण्यांतील राज्यकर्त्याविरुद्ध झालेली बंडाळी पाहून रशियाच्या मगरमिठींतून सुटण्याची हीच वेळ आहे असें त्यांस वाटूं लागलें. १८३० च्या नोव्हेंबरमध्यें कांहीं तरुण पुढाऱ्यांच्या चिथावणीवरून पोलिश लोकांनीं बंड उभारलें. आपल्या अंकित असलेल्या पोलिश लोकांनीं बंडाळी केलेली पाहून झार निकोलस यानें बंडाचा मोड करण्यासाठीं आपलें सैन्य पाठविलें. कवाईत शिकवून तयार असलेल्या प्रबल रशियन सैन्यापुढें पोलंडमधील लोकांचें कांहींच चालेना; व कडक उपाय योजून तें बंड मोडण्यांत आलें. या बंडाळीचा बीमोड करण्यांत आल्यावर पुनः दंगा करण्याची पोल्स लोकांना संधि मिळूं न देण्याचें झार निकोलसनें ठरविलें. पोलंडचें वेगळें असें लहान राज्य नाहींसें करून मोठ्या रशियन साम्राज्याचा पोलंड हा एक भाग करून टाकण्यांत आला. पोलंडमधील हजारों कुटुंबांना पोलंडपासून दूर अशा रशियामधील प्रदेशांत वस्ती करण्यास पाठविण्यांत आलें. पोलंडमध्यें पोलिश भाषेऐवजीं रशियन भाषा वापरण्यांत यावी, पोलिश लोकांनीं रोमन कॅथलिक पंथ सोडून ग्रीक सनातनी ख्रिश्चन चर्चचे अनुयायी व्हावें वगैरे गोष्टी करण्यास त्यानें भाग पाडलें. अशा रीतीनें रशियानें पोलंडचें राष्ट्रीयत्व नाहींसें करण्याचा प्रयत्न केला, तरी पोलिश लोकांच्या मनांतील अढी मात्र त्यास नष्ट करितां आली नाहीं.

जर्मनीमधील संस्थानांचा संघ (१८१५–१८६६)—१८१५ मध्यें जर्मनीमध्यें लहानमोठीं अशीं ३८ स्वतंत्र संस्थानें होतीं. या संस्थानांच्या राज्यकर्त्यांनीं आपला एक संघ स्थापन केला होता. त्याचें मुख्य ठिकाण फ्रँकफोर्ट असून तेथें ते आपले प्रतिनिधी पाठवीत. या संस्थानांपैकीं आस्ट्रिया व प्रशिया हीं संस्थानें प्रबळ व महत्त्वाचीं होतीं व या संस्थानांच्या राज्यांतील कांहीं प्रदेश पूर्वीच्या पवित्र रोमन साम्राज्यांत मोडत असल्यामुळें या संघाचें प्रमुखत्व आस्ट्रियाकडे होतें. या संघांतील सर्व संस्थानें जर्मन होतीं तरी त्यांचें मध्यवर्ती असें कायदेमंडळ नसल्यानें हीं संस्थानें संघाचे हितसंबंध पहाण्याऐवजीं स्वतःच्या हितसंबंधाकडे अधिक लक्ष देत. त्यांस इतर परकीय राज्यांशीं

स्वतंत्रपणें तह किंवा युद्ध करितां येत असे. या सर्व जर्मन संस्थानांचें एकीकरण होऊन प्रबळ असें जर्मन राष्ट्र निर्माण व्हावें व तेथें लोकनियंत्रित राज्यपद्धति सुरू व्हावी असें जरी जर्मनीमधील पुढाऱ्यांस वाटत होतें तरी ती गोष्ट घडून आली नाहीं. तेथील बव्हेरिया, बेडन वगैरे कांहीं संस्थानिकांनीं आपल्या राज्यांत सनदशीर राज्यघटना सुरू केली होती. तरी बहुतेक संस्थानांमध्यें राज्यकर्त्यांच्या हातीं अनियंत्रित सत्ताच होती. युरोपमधील निरनिराळ्या राज्यांत क्रान्तिकारक चळवळी सुरू होऊन त्यांपैकीं कांहींत सनदशीर राज्यपद्धति अंमलांत आली तरी ही चळवळीची लाट जर्मनीमध्यें पसरली नाहीं, व ज्या ठिकाणीं पसरली तेथें कडक उपाय योजून दडपून टाकण्यांत आली.

प्रशियांतील राज्यघटना—प्रशियाच्या राज्यकर्त्यानें आपल्या राज्यांत एक राज्यघटना अंमलांत आणिली (१८५०). या घटनेप्रमाणें प्रशियामध्यें दोन गृहांचें एक कायदेमंडळ नेमण्यांत आलें. त्यांपैकीं एकांत अमीरउमराव, विश्वविद्यालयांचे प्रतिनिधी व शहरांचे प्रतिनिधी यावयाचे असून ते राजकर्त्यानें नेमलेले असावयाचे, व दुसऱ्यांमध्यें लोकांनीं निवडलेले प्रतिनिधी यावयाचे होतें. पण निवडणुकीच्या वेळीं मत देण्याचा अधिकार मालमत्ता व संपत्ति असलेल्या लोकांनाच असल्यामुळें समाजांतील वरच्या वर्गाचेंच त्यावर वर्चस्व होतें. राज्यकारभार करण्यास राजास मदत करणारें मंत्रिमंडळ होतें, पण तें पार्लमेंटला जबाबदार नसून राजास जबाबदार होतें.

आस्ट्रियाच्या साम्राज्यांत बंडाळी १८४८—फ्रान्समध्यें सुरू झालेल्या क्रांतिकारक चळवळीची लाट आस्ट्रियाच्या साम्राज्यांतही पसरली. आस्ट्रियाच्या साम्राज्यांतील निरनिराळ्या ठिकाणच्या लोकांनीं बंडाळी करून राज्यकर्त्यांनीं सनदशीरपणें राज्यकारभार करावा अशी मागणी केली. आस्ट्रियाची राजधानी व्हिएन्ना येथें तेथील जर्मन जनतेनें, बोहेमियाची राजधानी प्रेग येथें स्लाव्ह लोकांनीं व हंगेरीची राजधानी बुडापेस्ट येथें मेगेयार लोकांनीं बंडाळी सुरू केली.

१३ मार्च रोजीं व्हिएन्ना येथें दंगल सुरू झाली व ती शहरांत सर्व ठिकाणीं पसरली व राज्यकर्त्याकडे ज्यांचा ओढा आहे अशा लोकांवर हल्ले होऊं लागले. तेव्हां आपल्या जीवितास धोका आहे हें पाहून मेटर्निक या प्रतिगामी धोरणाच्या प्रसिद्ध मुत्सद्यास वेश पालटून आस्ट्रियांतून पळ काढावा लागला; व तो

इंग्लंडला गेला. पण यानंतर आस्ट्रियाच्या सेनापतीनें आपल्या सैन्याच्या मदतीनें कडक उपाय योजून ही बंडाळी मोडून टाकली व फर्डिनंड या बादशहास राज्यत्याग करावयास लावला व त्याचा पुतण्या फ्रँसिस जोसेफ यास आस्ट्रियाचें राज्यपद दिलें. यानंतर सैन्याच्या मदतीनें कडक उपाय योजून बोहिमियांतील बंडाळी मोडून टाकण्यांत आली.

हंगेरीचें राज्य बरींच शतकें आट्रियाच्या हॅप्सबर्ग घराण्याच्या वर्चस्वाखालीं होतें तरी त्यास हंगेरीमधील मेगेयार लोकांचा स्वाभिमान नष्ट करितां आला नाहीं. १८४८ मध्यें हंगेरीमधील मेगेयार लोकांनीं काशूट नांवाच्या पुढाऱ्याच्या नेतृत्वाखालीं बंडाळी सुरू केली. तेव्हां आस्ट्रियाच्या बादशहानें रशियाचा झार निकोलस याची मदत मिळवून हंगेरीमधील बंडाळीचा मोड केला (१८४९ आगस्ट).

---

(२) इटलीचें एकीकरण व प्रगति

(१८१५–१९१४)

इटलीमधील राज्यें— नेपोलियनचा पराभव झाल्यावर व्हिएन्ना येथें भरलेल्या (१८१५) परिषदेच्या धोरणाप्रमाणें इटलीमध्यें निरनिराळ्या राज्यकर्त्यांची अनियंत्रित सत्ता स्थापन झाली. इटलीच्या उत्तर भागांत लॉंबर्डी व व्हेनीस हीं संस्थानें आस्ट्रियाच्या वर्चस्वाखालीं होतीं. मध्य इटलीमध्यें पार्मा, मोडेना व टस्कनी या संस्थानांवर हॅप्सबर्ग घराण्यांतील राजे राज्य करीत होते. इटलीच्या दक्षिण भागांतील नेपल्स व सिसलीचें राज्य बूरबॉन घराण्यांतील राज्यकर्त्यांकडे होते. रोम, मध्य व पूर्व इटलीमध्यें वेगवेगळीं संस्थानें असून तीं पोपच्या वर्चस्वाखालीं होतीं. इटलीच्या वायव्य भागांत पिडमांडचें राज्य असून त्यामध्यें दक्षिणेकडे सार्डिनिया हें बेटही होतें, त्यावर सेव्हाय घराण्यांतील इटालियन राज्यकर्ता होता. तेव्हां पोपच्या वर्चस्वाखालील राज्यें व पिडमांट–सार्डिनियाचें राज्य यांखेरीज बाकीच्या सर्व ठिकाणचे राज्यकर्ते परकीय होते. या राजकर्त्यांची सत्ता अनियंत्रित असून निरनिराळ्या राज्यांतील इटालियन जनतेस कांहींच अधिकार नव्हते. त्यामुळें त्यांच्यामध्यें असंतोष पसरला होता. आपल्या हातांतील सत्ता कमी होऊं नये म्हणून ठिकठिकाणच्या राज्यकर्त्यांनीं भाषणस्वातंत्र्यावर व राजकीय चळवळीवर बंदी घातली होती. त्यामुळें गुप्त

क्रान्तिकारक मंडळें स्थापन होऊं लागलीं. १८२० मध्यें स्पेनमध्यें तेथील राजकर्त्यांविरुद्ध बंडाळी झालेली पाहून नेपल्स व सिसली या राज्यांतही बंडाळी झाली, पण आस्ट्रियाची मदत मिळवून ती मोडून टाकण्यांत आली (१८२१). त्याचप्रमाणें पिडमांटच्या राज्यांत सनदशीर राजसत्ता स्थापन व्हावी म्हणून बंडाळी झाली (१८२१). तेव्हां तेथील राजा १ ला व्हिक्टर इमॅन्यूल यानें राज्यत्याग केला; पण आस्ट्रियानें सैन्य पाठवून तेथिल बंडाळी मोडून टाकली; तरी लोकांमधील असंतोष धुमसत होता. अशाप्रकारें सर्वत्र दडपशाही सुरू असतां पिडमाँटच्या राज्यांतील जिनेआ येथील तरुण देशभक्त **मॅझिनी** (१८०५–१८७२) यानें १८३१ मध्यें **'तरुण इटली'** नांवाची एक संघटना काढून त्यापुढें परकीय सत्तेपासून इटलीची मुक्तता करणें, इटलीचें एकीकरण करणें व इटलीमध्यें लोकसत्ताक राज्य स्थापन करून प्राचीनकाळचें वैभव इटलीस मिळवून देणें हें उद्दिष्ट ठेविलें व आपल्या लेखांनीं व भाषणांनीं लोकजागृतीचें काम सुरू केलें. त्यास बरेच अनुयायी मिळाले व या संघटनेचा इटलीमधील निरनिराळ्या राज्यांतही प्रसार होऊं लागला. **गॅरिबाल्डि** नांवाचा (१८०७–८२) एक तरुण या संघटनेंत सामील झाला व त्यानें या क्रान्तिकारक चळवळीचा पिडमाँटच्या राज्यांत प्रसार करण्यांत प्रमुख भाग घेतल्यामुळें त्यास अटकेंत ठेवण्यांत आलें, पण तेथून निसटून तो दक्षिण अमेरिकेंत गेला व तेथेंही त्यानें हें क्रान्तिकार्य चालूं ठेवलें. १८४८ मध्यें इटलीमधील निरनिराळ्या संस्थांतांत क्रान्तिकारक चळवळीची लाट पसरल्यामुळें नेपल्स, रोमच्या वर्चस्वाखालील संस्थानें, टस्कनी, पिटमांट सार्डिनिया, मोडेना वगैरे संस्थानांच्या राज्यकर्त्यांस आपल्या राज्यांत सनदशीर राज्यघटना सुरू करून राज्यकारभारांत सुधारणा कराव्या लागल्या. याच सुमारास आस्ट्रिया–हंगेरीच्या साम्राज्यांत क्रान्तिकारक लाट पसरून तेथें बंडाळी सुरू झाल्याची बातमी समजतांच आस्ट्रियाच्या जुलमी अमलाखालीं असलेल्या लॉंबर्डी व व्हेनीस या संस्थानांतील लोकांनीं आपल्या मानेवरील परकीय सत्तेचें जूं झुगारून देण्यासाठीं बंडाळी केली, लॉंबर्डीमध्यें असलेल्या आस्ट्रियन सैन्यास हांकून लाविलें; व इटलीमधील आस्ट्रियाचें वर्चस्व समूळ नष्ट करण्यासाठीं इटलीमधील इतर संस्थानांनीं मदत करावी अशी त्यांस विनंती केली. यावेळीं क्रान्तिकारक चळवळीची लाट इटलीमधील सर्व संस्थानांत

पसरली असल्यामुळें लॉंबर्डी व व्हेनीस या संस्थानांस मदत करण्यास इटलीमधील इतर संस्थानांनीं आपल्या फौजा पाठविल्या. त्याचप्रमाणें मॅझिनी व गॅरिबाल्डि या देशभक्तांच्या प्रोत्साहनानें बरेच स्वयंसेवक स्वयंस्फूर्तीनें आस्ट्रियाविरुद्ध युद्धांत सामील झाले. या संयुक्त इटालियन सैन्याचें आधिपत्य पिडमांट-सार्डिनियाचा राजा चार्लस आलबर्ट (१८३१–४९) यास देण्यांत आलें. तेव्हां इटलीमधील निरनिराळ्या संस्थानांच्या संयुक्त सैन्यास तोंड देण्यासाठीं आस्ट्रियानें मोठें सैन्य पाठविलें. चार्लस अलबर्टच्या नेतृत्वाखालीं इटलीमधील निरनिराळ्या संस्थानांचें सैन्य होतें, तरी युद्ध सुरू झाल्यावर त्यांच्यांत दुही उत्पन्न झाली व चार्लस आलबर्टबद्दल मत्सर वाटून निरनिराळया राज्यकर्त्यांनीं युद्धांतून अंग काढून घेतलें. तेव्हां चार्लस अलबर्टच्या सैन्याची आस्ट्रियन सैन्याशीं कस्टोझा येथें गांठ पडून त्यांत चार्लस आलबर्टचा पराभव झाला. तरी त्यानें पुनः उचल करून आस्ट्रियन सैन्यावर हल्ला केला पण नोव्हारा येथें त्याचा पूर्ण पराभव झाला (मार्च १८४९) व त्यास आस्ट्रियाशीं तह करावा लागला. तेव्हां दुःखी व कष्टी होऊन त्यानें राज्यत्याग केला व त्याचा मुलगा २ रा व्हिक्टर इमान्यूल हा सार्डिनिया पिडमांटचा राजा झाला. यानंतर आस्ट्रियानें लॉंबर्डीवर आपलें वर्चस्व बसविलें, व इटलीमधील निरनिराळ्या राज्यकर्त्यास त्यांच्या राज्यांतील क्रांतिकारक चळवळ दडपून टाकण्यास व तेथील सनदशीर राज्यघटना रद्द करण्यांस सांगितलें. त्यामुळें टस्कनी, नेपल्स व सीसली येथील राज्यकर्त्यांनीं आपल्या संस्थानांतील सनदशीर राज्यघटना रद्द केली. पोपच्या वर्चस्वाखालील संस्थानामध्यें क्रान्तिकारक चळवळीचा जोर पाहून पोपनें तेथून पळ काढला व तो सिसलीच्या राजाच्या आश्रयास गेला. तेव्हां मॅझिनीच्या नेतृत्वाखालील क्रांतिकारक सैन्यानें पोपच्या ताब्यांतील संस्थानावर वर्चस्व बसविलें व तेथें लोकसत्ताक राज्य स्थापन झाल्याचें जाहीर केलें. यावेळीं फ्रान्सच्या लोकसत्ताक राज्याचा अध्यक्ष लुई नेपोलियन बोनापार्ट हा होता. त्यानें कॅथलिक पंथीयाचें आपणांबद्दल अनुकूल मत व्हावें म्हणून इटलीमध्यें फ्रेंच सैन्य पाठविलें व मॅझिनीनें रोममध्यें स्थापन केलेलें लोकसत्ताक राज्य जिंकून घेतलें व पोप ९ वा पायस याची सत्ता तेथें स्थापन करून त्याच्या मदतीस फ्रेंच सैन्य तेथें ठेविलें.

पिडमॉंट व सार्डिनियाकडे पुढारीपण—इटलीमधील परकीय राज-

कर्त्यांची सत्ता नाहींशी करून संयुक्त इटलीचें एक स्वतंत्र राज्य स्थापन करण्याचा १८४८ मधील प्रयत्न जरी यशस्वी झाला नाहीं तरी स्वातंत्र्य संपादन करण्याचा प्रयत्न इटालियन देशभक्तांनीं चालूं ठेवला. **व्हिक्टर इमॅन्यूल २ रा** यानें आपल्या राज्यांत सनदशीर राज्यघटना अस्तित्वांत आणून सुधारणा केल्या होत्या व आस्ट्रियाकडून दडपण आणलें गेलें तरी त्यांनीं सनदशीर राज्यघटना रद्द केली नाहीं. सेव्हॉय हें घराणें इटालियन असून त्याच्याबद्दल इटलीमधील जनतेस आपलेपणा वाटत होता. तेव्हां इटलीमधील परकीय राजकर्त्यांची सत्ता नाहींशी करून इटलीचें एकीकरण करणाऱ्या चळवळीचें पुढारीपण घेण्यास तोच योग्य आहे असें इटलीमधील जनतेस वाटत होतें. पण इटलीच्या स्वातंत्र्य प्राप्तीसाठीं कोणते उपाय योजावेत याबद्दल इटलीमधील मॅझिनी, गॅरिबाल्डी वगैरे पुढाऱ्यांत मतभेद होता. परंतु याच सुमारास व्हिक्टर इमॅन्यूल २ रा यानें काऊंट **काव्हूर** (Covour) नांवाच्या मुत्सद्यास आपला मुख्य प्रधान नेमलें. मुख्य प्रधान झाल्यावर त्यानें पुष्कळ सुधारणा केल्या. इटलीमधील सर्व लोकांत आपण एक आहोंत ही भावना निर्माण करण्यासाठीं त्यानें रेल्वे रस्ते बांधले व त्यामुळें इटलीमधील निरनिराळे विभाग एकमेकांस जोडले गेले. यानें आपलें सैन्य वाढवून ते कार्यक्षम केलें. उद्योगधंदे व व्यापार यांस उत्तेजन दिलें. इटलीमधील वेगवेगळ्या संस्थानांचें एकीकरण करून इंग्लंडप्रमाणें इटलीमध्यें लोकनियंत्रित राजसत्ता स्थापन व्हावी असें त्यास वाटत होतें. इटलींतील लॉंबर्डी व व्हेनिस यांवर आपलें वर्चस्व स्थापून इटलीमधील इतर जुलमी राज्यकर्त्यांस आपल्या धोरणाप्रमाणें वागावयास लावणाऱ्या आस्ट्रियाचा इटलीच्या एकीकरणाच्या मार्गांत अडथळा आहे हें त्यानें ओळखलें. पण आस्ट्रियाचा पराभव करण्यास सार्डिनिया-पिडमांटचें राज्य व इटलीमधील देशभक्त व स्वयंसेवक असमर्थ असल्यामुळें दुसऱ्या एखाद्या प्रमुख राष्ट्राची मदत घेणें जरूर आहे असें त्यास वाटूं लागलें. तेव्हां त्यानें आस्ट्रियाचें महत्त्व कमी करण्यासाठीं फ्रान्सचा बादशहा लुई नेपोलियन याच्याशीं १८५८ मध्यें तह केला. सार्डिनिया व फ्रान्स यांच्यामध्यें कोणत्या उद्देशानें तह झाला आहे हें आस्ट्रियाच्या लक्षांत येतांच सार्डिनियानें आपलें सैन्य कमी करावें असें आस्ट्रियानें फर्मावितें. पण सार्डिनियानें ही गोष्ट नाकारतांच आस्ट्रियानें सार्डिनिया-पिडमाँटवर स्वारी केली. तेव्हां फ्रान्सनें सार्डिनियाच्या मदतीस सैन्य पाठविलें. तेव्हां १८५९ च्या मे

महिन्यांत फ्रान्स व सार्डिनिया यांच्या संयुक्त सैन्यानें मॅगेन्टा व सॉलफेरिनो या दोन ठिकाणीं आस्ट्रियन सैन्याचा मोड करून (१८५९) त्यास लॉंबर्डीमधून हांकून लाविलें. यानंतर नेपोलियन आस्ट्रियाचा पूरा मोड करण्यासाठीं आस्ट्रियावर स्वारी करील असें इटालियन लोकांस वाटूं लागलें. पण नेपोलियननें तसें कांहींच न करतां व सार्डिनियाचा विचार न घेतां व्हिला–फ्रँका येथें आस्ट्रियाशीं तह केला व युद्धांतून आपलें अंग काढून घेतलें. त्या वेळची एकंदर परिस्थिति पाहून आस्ट्रियाशीं तह करणें फ्रान्सला हितकर आहे असें नेपोलियनला वाटत होतें. इटालियन लोकांच्या आकांक्षेप्रमाणें संयुक्त इटलीचें बलाढ्य राष्ट्र स्थापन झाल्यास त्यापासून फ्रान्सला धोका येईल, त्याचप्रमाणें व्हाईन नदीच्या उत्तरेकडून प्रशिया आपणांवर स्वारी करील अशी नेपोलियनला भीति वाटत होती. पण नेपोलियननें अचानक रीतीनें आस्ट्रियाशीं केलेल्या तहामुळें सार्डिनियाची स्थिति मात्र चमत्कारिक झाली. आस्ट्रियाशीं युद्ध चालविण्यास एकटें सार्डिनियाचें राज्य असमर्थ असल्यामुळें १८५९ मध्यें सार्डिनियानें आस्ट्रियाशीं तह केला. या तहान्वयें सार्डिनियाला लॉंबर्डी हा प्रदेश मिळाला, पण व्हेनिस मात्र आस्ट्रियाच्या हवालीं करावें लागलें. त्याचप्रमाणें फ्रान्सनें सार्डिनियाला मदत केली असल्यामुळें इटलीच्या वायव्य भागांतील सेव्हाय व नीस हे प्रदेश फ्रान्सला द्यावे लागलें (१८६०).

इटलीच्या वायव्य भागांतील लॉंबर्डी हा प्रदेश सार्डिनियाच्या ताब्यांत आल्यावर इटलीच्या एकीकरणाचा मार्ग सुलभ होईल असें काहूर यास वाटूं लागलें. इटलीच्या एकीकरणाच्या मार्गांत आड येणाऱ्या इटलीमधील लहान लहान संस्थानांतील जुलमी राज्यकर्त्यांचा मोड करण्याचा काहूरनें निश्चय केला. मोडेना, पार्मा, टस्कनी या संस्थानांतील लोकांनीं आपल्या परकीय राज्यकर्त्या-विरुद्ध बंडाळी करून त्यांस तेथून घालवून लाविलें व हीं संस्थानें सार्डिनिया पिडमांटमध्यें सामील झालीं. दक्षिण इटलीमधील नेपल्स व सिसली हें बूरबॉन राजाकडे असलेलें राज्य मोडून टाकण्यासाठीं काहूरनें गॅरिबाल्डी यास प्रोत्साहन दिलें. गॅरिबाल्डीनें आपल्या हाताखालील राष्ट्रभक्त सैन्यानिशीं त्या राज्यावर हल्ला करून तेथील बूरबॉन घराण्याची सत्ता उलथून पाडली व तेथील राजा पळून जातांक्षणीं तें राज्य सार्डिनिया–पिडमांटच्या राज्यास जोडल्याचें जाहीर केलें. इकडे काहूरनें मध्य इटलीमधील पोपच्या वर्चस्वाखालीं असलेलीं संस्थानें

जिंकून घेतलीं. अशाप्रकारें रोम व व्हेनिस यांखेरीज इटलीमधील सर्व संस्थानें सार्डिनिया–पिटमांटच्या राज्यास जोडलीं गेलीं (१८६१). तेव्हां आतां उरलेलीं दोन्ही संस्थानें जिंकून घ्यावींत असें गॅरिबाल्डी यास वाटत होतें, पण तसें केल्यास आस्ट्रिया व फ्रान्स यांच्याशीं वैर उत्पन्न होईल असें काहूरला वाटल्यामुळें तो विचार सोडावा लागला. तेव्हां आतां सार्डिनिया–पिडमांटला जोडल्या गेलेल्या इटलीमधील संस्थानांचें एकीकरण करणेंच तूर्त इष्ट आहे असें इटलीमधील जनतेस वाटून पिडमाँटची राजधानी ट्यूरीन येथें संयुक्त इटलीचें पार्लमेंट १८६१ च्या फेब्रुवारीमध्यें बोलविण्यांत आलें, व संयुक्त इटलीचें राज्यपद व्हिक्टर इमॅन्यूल २ रा यास देण्यांत आलें. यानंतर काहूर जरी मरण पावला तरी त्याचें धोरण पुढें चालविण्यांत आलें. यानंतर व्हिक्टर इमॅन्यूलनें प्रशियाशीं संगनमत करून आस्ट्रिया व प्रशिया यांमध्यें १८६६ मध्यें युद्ध उपस्थित झाल्यावर आस्ट्रियाच्या सैन्यावर हल्ला केला, पण त्यांत सार्डिनियाचा पराभव झाला. तरी पुढें आस्ट्रिया व प्रशिया यांमध्यें झालेल्या तहानें व्हेनिस हें संस्थानही संयुक्त इटलीस मिळालें (१८६६).

आतां फक्त रोम शहरच संयुक्त इटलीमध्यें सामील होण्याचें राहिलें होतें, परंतु तें शहर त्यावेळीं फ्रेंच सैन्याच्या संरक्षणाखालीं असल्यामुळें रोमवर हल्ला केल्यास फ्रान्सशीं युद्ध करावें लागेल असें वाटून चोख्य संधि येईपर्यंत थांबण्याचें २ रा व्हिक्टर इमान्यूल यानें ठरविलें. रोममधील जनतेलाही संयुक्त इटलीस मिळावयाचें होतें, पण फ्रेंच सैन्याच्या भीतीनें तीस तसें करतां येईना. १८७० मध्यें फ्रान्स व जर्मनी यांच्यामध्यें मोठें युद्ध उपस्थित झाल्यामुळें नेपोलियन बादशहास रोम शहरीं असलेलें फ्रेंच सैन्य पॅरिसच्या संरक्षणासाठीं बोलाविणें भाग पडलें. रोममधून फ्रेंच सैन्याचा तळ हालल्यावर २ रा व्हिक्टर इमॅन्यूलनें आपलें सैन्य पाठवून रोम शहर आपल्या ताब्यांत घेतलें. संयुक्त इटलीच्या या कृत्याचा पोप ९ वा पायस यानें निषेध केला. परंतु विजयश्री मिळविणाऱ्या इटालियन सैन्यानें पोपच्या राजवाड्यास हात न लावतां त्यास सुरक्षित ठेवलें. त्या शहरीं जरी पोपचें वास्तव्य होतें, तरी इटालियन जनतेच्या इच्छेवरून पोपचें राजवाडे व त्याचें प्रत्यक्ष वास्तव्य असलेला रोमचा विभाग वगळून इतिहासप्रसिद्ध, पुरातन, वैभवशाली **रोम** शहरास **संयुक्त इटलीच्या राजधानीचा** मान देण्यांत आला.

महिन्यांत फ्रान्स व सार्डिनिया यांच्या संयुक्त सैन्यानें मॅगेन्टा व सॉलफेरिनो या दोन ठिकाणीं आस्ट्रियन सैन्याचा मोड करून (१८५९) त्यास लॉंबर्डीमधून हांकून लाविलें. यानंतर नेपोलियन आस्ट्रियाचा पूरा मोड करण्यासाठीं आस्ट्रियावर स्वारी करील असें इटालियन लोकांस वाटूं लागलें. पण नेपोलियननें तसें कांहींच न करतां व सार्डिनियाचा विचार न घेतां व्हिला–फ्रँका येथें आस्ट्रियाशीं तह केला व युद्धांतून आपलें अंग काढून घेतलें. त्या वेळची एकंदर परिस्थिति पाहून आस्ट्रियाशीं तह करणें फ्रान्सला हितकर आहे असें नेपोलियनला वाटत होतें. इटालियन लोकांच्या आकांक्षेप्रमाणें संयुक्त इटलीचें बलाढ्य राष्ट्र स्थापन झाल्यास त्यापासून फ्रान्सला धोका येईल, त्याचप्रमाणें व्हाईन नदीच्या उत्तरेकडून प्रशिया आपणांवर स्वारी करील अशी नेपोलियनला भीति वाटत होती. पण नेपोलियननें अचानक रीतीनें आस्ट्रियाशीं केलेल्या तहामुळें सार्डिनियाची स्थिति मात्र चमत्कारिक झाली. आस्ट्रियाशीं युद्ध चालविण्यास एकटें सार्डिनियाचें राज्य असमर्थ असल्यामुळें १८५९ मध्यें सार्डिनियानें आस्ट्रियाशीं तह केला. या तहान्वयें सार्डिनियाला लॉंबर्डी हा प्रदेश मिळाला, पण व्हेनिस मात्र आस्ट्रियाच्या हवालीं करावें लागलें. त्याचप्रमाणें फ्रान्सनें सार्डिनियाला मदत केली असल्यामुळें इटलीच्या वायव्य भागांतील सेव्हाय व नीस हे प्रदेश फ्रान्सला द्यावे लागले (१८६०).

इटलीच्या वायव्य भागांतील लॉंबर्डी हा प्रदेश सार्डिनियाच्या ताब्यांत आल्यावर इटलीच्या एकीकरणाचा मार्ग सुलभ होईल असें काहूर यास वाटूं लागलें. इटलीच्या एकीकरणाच्या मार्गांत आड येणाऱ्या इटलीमधील लहान लहान संस्थानांतील जुलमी राज्यकर्त्यांचा मोड करण्याचा काहूरनें निश्चय केला. मोडेना, पार्मा, टस्कनी या संस्थानांतील लोकांनीं आपल्या परकीय राज्यकर्त्यांविरुद्ध बंडाळी करून त्यांस तेथून घालवून लाविलें व हीं संस्थानें सार्डिनिया पिडमांटमध्यें सामील झालीं. दक्षिण इटलीमधील नेपल्स व सिसली हें बूरबॉन राजाकडे असलेलें राज्य मोडून टाकण्यासाठीं काहूरनें गॅरिबाल्डी यास प्रोत्साहन दिलें. गॅरिबाल्डीनें आपल्या हाताखालील राष्ट्रभक्त सैन्यानिशीं त्या राज्यावर हल्ला करून तेथील बूरबॉन घराण्याची सत्ता उलथून पाडली व तेथील राजा पळून जातांक्षणीं तें राज्य सार्डिनिया–पिडमांटच्या राज्यास जोडल्याचें जाहीर केलें. इकडे काहूरनें मध्य इटलीमधील पोपच्या वर्चस्वाखालीं असलेलीं संस्थानें

जिंकून घेतलीं. अशाप्रकारें रोम व व्हेनिस यांखेरीज इटलीमधील सर्व संस्थानें सार्डिनिया–पिटमांटच्या राज्यास जोडलीं गेलीं (१८६१). तेव्हां आतां उरलेलीं दोन्ही संस्थानें जिंकून घ्यावींत असें गॅरिबाल्डी यास वाटत होतें, पण तसें केल्यास आस्ट्रिया व फ्रान्स यांच्याशीं वैर उत्पन्न होईल असें काहूरला वाटल्यामुळें तो विचार सोडावा लागला. तेव्हां आतां सार्डिनिया–पिडमांटला जोडल्या गेलेल्या इटलीमधील संस्थानांचें एकीकरण करणेंच तूर्त इष्ट आहे असें इटलीमधील जनतेस वाटून पिडमाँटची राजधानी ट्यूरीन येथें संयुक्त इटलीचें पार्लमेंट १८६१ च्या फेब्रुवारीमध्यें बोलविण्यांत आलें, व संयुक्त इटलीचें राज्यपद व्हिक्टर इमॅन्यूल २ रा यास देण्यांत आलें. यानंतर काहूर जरी मरण पावला तरी त्याचें धोरण पुढें चालविण्यांत आलें. यानंतर व्हिक्टर इमॅन्यूलनें प्रशियाशीं संगनमत करून आस्ट्रिया व प्रशिया यांमध्यें १८६६ मध्यें युद्ध उपस्थित झाल्यावर आस्ट्रियाच्या सैन्यावर हल्ला केला, पण त्यांत सार्डिनियाचा पराभव झाला. तरी पुढें आस्ट्रिया व प्रशिया यांमध्यें झालेल्या तहानें व्हेनिस हें संस्थानही संयुक्त इटलीस मिळालें (१८६६).

आतां फक्त रोम शहरच संयुक्त इटलीमध्यें सामील होण्याचें राहिलें होतें, परंतु तें शहर त्यावेळीं फ्रेंच सैन्याच्या संरक्षणाखालीं असल्यामुळें रोमवर हल्ला केल्यास फ्रान्सशीं युद्ध करावें लागेल असें वाटून योग्य संधि येईपर्यंत थांबण्याचें २ रा व्हिक्टर इमान्यूल यानें ठरविलें. रोममधील जनतेलाही संयुक्त इटलीस मिळावयाचें होतें, पण फ्रेंच सैन्याच्या भीतीनें तीस तसें करतां येईना. १८७० मध्यें फ्रान्स व जर्मनी यांच्यामध्यें मोठें युद्ध उपस्थित झाल्यामुळें नेपोलियन बादशहास रोम शहरीं असलेलें फ्रेंच सैन्य पॅरिसच्या संरक्षणासाठीं बोलाविणें भाग पडलें. रोममधून फ्रेंच सैन्याचा तळ हालल्यावर २ रा व्हिक्टर इमॅन्यूलनें आपलें सैन्य पाठवून रोम शहर आपल्या ताब्यांत घेतलें. संयुक्त इटलीच्या या कृत्याचा पोप ९ वा पायस यानें निषेध केला. परंतु विजयश्री मिळविणाऱ्या इटालियन सैन्यानें पोपच्या राजवाड्यास हात न लावतां त्यास सुरक्षित ठेवलें. त्या शहरीं जरी पोपचें वास्तव्य होतें, तरी इटालियन जनतेच्या इच्छेवरून पोपचें राजवाडे व त्याचें प्रत्यक्ष वास्तव्य असलेला रोमचा विभाग वगळून इतिहासप्रसिद्ध, पुरातन, वैभवशाली **रोम** शहरास **संयुक्त इटलीच्या राजधानीचा** मान देण्यांत आला.

यानंतर संयुक्त इटलीसाठीं एक राज्यघटना तयार करण्यांत आली. या घटनेप्रमाणें कायदे करण्यासाठीं दोन गृहांचें एक कायदेमंडळ–सीनेट व हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्ह–नेमण्यांत आलें. मताधिकार मालमत्ता असणाऱ्या लोकांस देण्यांत आला. इटलीमध्यें इंग्लंडच्या धर्तीवर लोकनियंत्रित राजसत्ता स्वरूपाची राज्यघटना सुरू झाली. रोमच्या एका भागांत पोपचें वास्तव्य होतें. तेव्हां त्याचा राजवाडा व सभोंवतालची कांहीं जमीन या चिमुकल्या राज्यास (व्हॅटिकन टेकाडावर असलेलें) पोपचें स्वतंत्र राज्य– **व्हॅटिकन राज्य**–म्हणून कायदा करून मान्यता देण्यांत आली, व त्याचा दर्जा स्वतंत्र राजाप्रमाणें मान्य करून परकीय राज्यकर्त्यांशीं व्यवहार करण्यास त्यास पूर्ण मुभा देण्यांत आली. त्याचप्रमाणें रोमच्या राज्याचा बराच भाग संयुक्त इटलीमध्यें आल्यामुळें त्यास कांहीं रक्कम मोबदला म्हणून देण्याचें ठरविलें. पण पोपनें त्या रकमेचा स्वीकार केला नाहीं व रोम शहर संयुक्त इटलीनें आपल्या ताब्यांत घेणें या गोष्टीस पोपनें मान्यता दिली नाहीं.

इटलीमधील सर्व प्रदेशांचें एकीकरण होऊन इटलीचें स्वतंत्र राज्य स्थापन झाल्यावर इटलीनें आपल्या राष्ट्राची औद्योगिक व व्यापारविषयक बाबतींत प्रगति करण्याचें धोरण आंखलें. त्यासाठीं रेल्वे रस्ते, पक्के रस्ते, बंदरांची डागडुजी, यंत्राच्या साहाय्यानें चालणारे मोठमोठे कारखाने व गिरण्या स्थापन केल्या. सैन्य व आरमार यांची पुनर्रचना करण्यांत आली, व सार्वत्रिक लष्करी शिक्षणाची योजना आंखली. त्याचप्रमाणें आफ्रिका खंडांत आपल्या वसाहती स्थापन केल्या. यामुळें थोड्याच वर्षांत युरोपमधील प्रमुख राज्यांपैकीं इटली हें राज्य झालें. इ. स. १८७२ मध्यें २ रा व्हिक्टर इमान्यूल मरण पावला. त्यानंतर हंबर्ट हा इटलीचा राजा झाला. पण इ. स. १९०० मध्यें त्याचा खून झाल्यावर ३ रा व्हिक्टर इमान्यूल हा इटलीचा राजा झाला.

---

(३) जर्मन साम्राज्याची स्थापना व उत्कर्ष

(१८४८ ते १९१४)

झोलव्हेरियन संघ—जर्मनीमधील निरनिराळ्या संस्थानांमध्यें एकीकरण झालें नव्हतें तरी अंतर्गत व्यापार खुला असावा या उद्देशानें "झोलव्हेरियन"

संघ स्थापन होऊन त्यांत १७ संस्थानें सामील झालेलीं होतीं. त्याचप्रमाणें नवीन पद्धतीनें यंत्राच्या साहाय्यानें उद्योगधंदे होऊं लागल्यामुळें मालाची पैदासही मोठ्या प्रमाणांत होऊं लागली. यानंतर देशामध्यें रेल्वे रस्ते बांधण्यांत आले व त्यामुळें दूरदूरच्या प्रदेशांतील संघटन वाढलें.

प्रशियाचा राजा १ ला विल्यम—१८६१ मध्यें १ ला विल्यम हा प्रशियाचा राजा झाला. तो महत्त्वाकांक्षी असून आस्ट्रियाला जर्मनीच्या राजकारणांतून वगळून प्रशियाच्या नेतृत्वाखालीं जर्मनीचें एकीकरण करून एक बलाढ्य राष्ट्र स्थापन करण्याची त्याची मनीषा होती. आपला हेतु साध्य करण्यासाठीं सैन्याची जरूरी आहे हें पाहून त्यानें आपल्या सैन्यांत वाढ केली व कवाईत शिकवून तें उत्कृष्ट केलें. ही गोष्ट अमलांत आणावयास पैशाची जरूरी होती. पण प्रशियाच्या पार्लमेंटमध्यें शांततावादी सभासदांचें मताधिक्य होतें, व त्यांनीं लष्करी खर्चासाठीं जादा रक्कम मंजूर करण्याचें नाकारिलें. याच सुमारास त्यानें आटो व्हॉन **बिस्मार्क** नांवाच्या मुत्सद्यास आपला मुख्य मंत्री म्हणून नेमलें (१८६२). जर्मन राष्ट्र जर बलाढ्य करावयाचें असेल तर तेथील राजसत्ता कमकुवत असून उपयोगी नाहीं, तर तीही प्रबल असणें जरूर आहे असें बिस्मार्क यास वाटत होतें. कार्यक्षम व सुसज्ज सैन्याच्या जोरावरच जर्मन राष्ट्र प्रबळ होईल म्हणून ती गोष्ट साध्य करण्यासाठीं त्यानें पार्लमेंटकडून पैशाची मंजुरी मिळत नाहीं तेव्हां पार्लमेंटला न जुमानतां नवीन कर बसवून पैसे जमा करण्याचा व त्यांतून लष्करासाठीं लागणारा जादा खर्च करण्याचा सल्ला राजास दिला व त्याप्रमाणें पैसे वसूल केले. तेव्हां प्रशियांतील पार्लमेंटची सत्ता संपुष्टांत येऊन राजसत्ता वाढली.

डेन्मार्कशीं युद्ध १८६४—१८६३ मध्यें डेन्मार्कच्या गादीवर आलेला राजा ९ वा ख्रिश्चन यानें जर्मन लोक रहात असलेल्या श्लेझविग व होल्स्टेन या दोन प्रांतांचा कारभार वेगळा ठेवण्यांत यावा असें आंतरराष्ट्रीय कराराप्रमाणें ठरलें होतें, तरी तेथली वेगळी राज्यव्यवस्था रद्द करून तें डेन्मार्कच्या राज्यास पूर्णपणें जोडून टाकलें असल्याचें फर्मान काढलें. तेव्हां तेथील जर्मन प्रजेनें या गोष्टीबद्दल निषेध केला. तेव्हां त्यानें डेन्मार्कवर स्वारी करून ते प्रांत आपल्या वर्चस्वाखालीं आणिले. आस्ट्रियाशीं युद्ध उकरून काढून जर्मनीच्या राजकारणांतून आस्ट्रियाची हकालपट्टी करण्याचें प्रशियाचें धोरण होतें. तेव्हां हा हेतु साध्य

करण्यासाठीं प्रशियानें आस्ट्रियाविरुद्ध इटलीशीं तह केला, व आस्ट्रियानें प्रशिया विरुद्ध जर्मनीच्या दक्षिण भागांतील संस्थानांशीं तह केला.

आस्ट्रियाचा पराभव व जर्मनीच्या राजकारणांतून हकालपट्टी १८६६—तेव्हां प्रशिया व आस्ट्रिया यांमधील कलह विकोपास जाऊन युद्ध सुरू झालें. प्रशियन सेनापति मोल्टके यानें आपल्या सैन्याची नीट रचना करून बोहेमिया प्रांतांतील **सॅडोवा** शहरानजीक आस्ट्रियन सैन्याचा पुरा फडशा पाडला (१८६६). इकडे इटलीमध्येंही आस्ट्रियन सैन्य व इटालियन सैन्य यामध्यें युद्ध होऊन कस्टोझाच्या लढाईंत इटालियन सैन्याचा पराभव झाला होता, तरी सॅडोवाच्या लढाईंत आस्ट्रियाचा पूर्ण पराभव झाल्यामुळें आस्ट्रियास प्रशियाशीं तह करावा लागला. या तहानें श्लेझविंग व होलस्टेन हे दोन्ही प्रांत प्रशियाच्या ताब्यांत असावेत, जर्मनीच्या राजकारणांतून आस्ट्रियानें आपलें अंग काढावें व व्हेनिस संयुक्त इटलीस देण्यांत यावें असें ठरलें. यानंतर बिस्मार्कनें प्रशियाच्या नेतृत्वाखालीं उत्तर जर्मन संस्थानांचा एक संघ स्थापन केला.

जर्मनी व फ्रान्स यांमध्यें वितुष्ट—फ्रान्सचा बादशहा नेपोलियन यानें इटालियन लोकांस मदत करून आस्ट्रियाचा पराभव केला होता. पण यानंतर सार्डिनियाच्या राजाची संमति घेतल्याशिवाय आस्ट्रियाशीं अचानक तह केल्यामुळें नेपोलियनची इटलीमधील लोकप्रियता कमी होत गेली व या खेरीज रोम शहरीं पोपच्या संरक्षणासाठीं त्यानें फ्रेंच सैन्य ठेवलेलें असल्यामुळें त्याच्याबद्दल इटालियन लोकांस तिटकारा वाटूं लागला. यावेळीं अमेरिकेंतील राजकारणांत त्यानें हात घातला. मेक्सिको संस्थानांतील अंतस्थ राजकारणांत हात घालून त्यानें तें लोकसत्ताक राज्य मोडून टाकलें, व आस्ट्रियाच्या राजाचा भाऊ मॅक्झिमीलन यास तेथील राज्यपद देऊन मेक्सिकोमध्यें राजसत्ता स्थापन करण्याचा प्रयत्न केला (१८६३). नेपोलियनच्या या कृत्याचा सर्व अमेरिकन लोकांस तिटकारा वाटून अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें या राष्ट्रांतील अंतस्थ युद्ध संपतांच अ. सं. संस्थानें या राष्ट्रानें अमेरिकेंतील राजकारणांत ढवळाढवळ न करण्याची त्यास ताकीद दिली. तेव्हां आतां दुसरा इलाज नाहीं हें पाहून त्यानें आपलें फ्रेंच सैन्य अमेरिकेंतून परत बोलाविलें. फ्रेंच सैन्य मेक्सिकोंतून जातांक्षणीं

मॅक्झिमीलन राजास मेक्सिकोमधील लोकांनीं फांशी दिलें, व तेथें पुनः लोकसत्ताक राज्य स्थापन केलें (१८६७).

१८७० मध्यें स्पेनचा राजा मरण पावून स्पेनच्या गादीस कोणीच वारस नसल्यानें स्पॅनिश पार्लमेंटनें होहेनझोलर्न घराण्यांतील 'लिओपोल्ड' या राजपुत्रास स्पेनचें राज्यपद देऊं केलें. राजपुत्र लिओपोल्ड हा प्रशियाचा राजा विल्यम याचा नातलग असल्यामुळें स्पेनच्या गादीवरील त्याच्या निवडणुकी-संबंधानें पॅरिस शहरीं बरीच खळबळ उडून गेली. आपल्याविरुद्ध ही खळबळ पाहून लिओपोल्डनें स्पेनचें राज्यपद नाकारिलें. परंतु नेपोलियनचें एवढ्यानें समाधान न होतां पुनः कधींही स्पेनचें राज्यपद लिओपोल्ड स्वीकारणार नाहीं असें अभिवचन प्रशियाचा राजा विल्यम यानें द्यावें अशी त्यानें मागणी केली. प्रशियाचा राजा विल्यम यानें नेपोलियनच्या या मागणीचा निषेध करितांच नेपोलियननें फ्रेंच पार्लमेंटच्या पूर्ण संमतीनें १९ जुलै १८७० रोजीं प्रशियाशीं युद्ध जाहीर केलें. दक्षिण जर्मन संस्थानांना प्रशियाच्या वर्चस्वाबद्दल वैमनस्य वाटत असल्यामुळें तीं या युद्धास आपल्या बाजूस मिळतील असें नेपोलियनला वाटत होतें. पण हीं संस्थानें प्रशियाच्या बाजूनेंच लढण्यास सिद्ध झालीं. अशारीतीनें फ्रान्सशीं लढण्यासाठीं एकटेंच प्रशियाचें राज्यच उद्युक्त झालें नसून आज कितीतरी वर्षांनीं आपल्यांतील कलह विसरून सर्व जर्मन राष्ट्रच उद्युक्त झालें होतें.

फ्रान्स व जर्मनीमधील युद्ध— १८७० च्या आगष्ट महिन्याच्या प्रारंभींच जर्मन सैन्यानें फ्रान्सवर एकदम स्वारी केली. ता. ६ आगष्ट रोजीं प्रशियाचा राजपुत्र फ्रेडरिक याच्या हाताखालील जर्मन सैन्याची मार्शल मॅकमोहन याच्या हातांखालील फ्रेंच सैन्याशीं बर्थ येथें गांठ पडून फ्रेंच सैन्याचा पुरा मोड झाला; व ॲलसॅस प्रांत जर्मनीच्या ताब्यांत आला. फ्रेंच सैन्याचा दुसरा विभाग लरेन प्रांतांत असून मेटझच्या किल्ल्याचा आश्रय धरून होता. जर्मन सेनापति मोल्टके याच्या मनांतून फ्रेंच सैन्य तेथेंच कोंडून धरावयाचें असल्यामुळें त्यानें १८ आगस्ट रोजीं ग्रॅव्हेलोटी येथें फ्रेंच सैन्याचा पराभव करून मेटझ किल्ल्यास गराडा दिला. मेटझच्या वेढ्यासाठीं निम्मे सैन्य ठेवून तो बाकीच्या सैन्यानिशीं मॅकमोहनचा पाठलाग करण्यासाठीं निघाला.

ता. १ सप्टेंबर रोजीं सेडननजीक मॅकमोहनच्या सैन्याशीं जर्मन सैन्याची

करण्यासाठीं प्रशियानें आस्ट्रियाविरुद्ध इटलीशीं तह केला, व आस्ट्रियानें प्रशिया विरुद्ध जर्मनीच्या दक्षिण भागांतील संस्थानांशीं तह केला.

आस्ट्रियाचा पराभव व जर्मनीच्या राजकारणांतून हकालपट्टी १८६६—तेव्हां प्रशिया व आस्ट्रिया यांमधील कलह विकोपास जाऊन युद्ध सुरू झालें. प्रशियन सेनापति मोल्टके यानें आपल्या सैन्याची नीट रचना करून बोहेमिया प्रांतांतील **सॅडोवा** शहरानजीक आस्ट्रियन सैन्याचा पुरा फडशा पाडला (१८६६). इकडे इटलीमध्येंही आस्ट्रियन सैन्य व इटालियन सैन्य यामध्यें युद्ध होऊन कस्टोझाच्या लढाईंत इटालियन सैन्याचा पराभव झाला होता, तरी सॅडोवाच्या लढाईंत आस्ट्रियाचा पूर्ण पराभव झाल्यामुळें आस्ट्रियास प्रशियाशीं तह करावा लागला. या तहानें श्लेझविंग व होलस्टेन हे दोन्ही प्रांत प्रशियाच्या ताब्यांत असावेत, जर्मनीच्या राजकारणांतून आस्ट्रियानें आपलें अंग काढावें व व्हेनिस संयुक्त इटलीस देण्यांत यावें असें ठरलें. यानंतर बिस्मार्कनें प्रशियाच्या नेतृत्वाखालीं उत्तर जर्मन संस्थानांचा एक संघ स्थापन केला.

जर्मनी व फ्रान्स यांमध्यें वितुष्ट—फ्रान्सचा बादशहा नेपोलियन यानें इटालियन लोकांस मदत करून आस्ट्रियाचा पराभव केला होता. पण यानंतर सार्डिनियाच्या राजाची संमति घेतल्याशिवाय आस्ट्रियाशीं अचानक तह केल्यामुळें नेपोलियनची इटलीमधील लोकप्रियता कमी होत गेली व या खेरीज रोम शहरीं पोपच्या संरक्षणासाठीं त्यानें फ्रेंच सैन्य ठेवलेलें असल्यामुळें त्याच्याबद्दल इटालियन लोकांस तिटकारा वाटूं लागला. यावेळीं अमेरिकेंतील राजकारणांत त्यानें हात घातला. मेक्सिको संस्थानांतील अंतस्थ राजकारणांत हात घालून त्यानें तें लोकसत्ताक राज्य मोडून टाकलें, व आस्ट्रियाच्या राजाचा भाऊ मॅक्झिमीलन यास तेथील राज्यपद देऊन मेक्सिकोमध्यें राजसत्ता स्थापन करण्याचा प्रयत्न केला (१८६३). नेपोलियनच्या या कृत्याचा सर्व अमेरिकन लोकांस तिटकारा वाटून अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें या राष्ट्रांतील अंतस्थ युद्ध संपतांच अ. सं. संस्थानें या राष्ट्रानें अमेरिकेंतील राजकारणांत ढवळाढवळ न करण्याची त्यास ताकीद दिली. तेव्हां आतां दुसरा इलाज नाहीं हें पाहून त्यानें आपलें फ्रेंच सैन्य अमेरिकेंतून परत बोलाविलें. फ्रेंच सैन्य मेक्सिकोंतून जातांक्षणीं

मॅक्झिमीलन राजास मेक्सिकोमधील लोकांनीं फांशी दिलें, व तेथें पुनः लोकसत्ताक राज्य स्थापन केलें (१८६७).

१८७० मध्यें स्पेनचा राजा मरण पावून स्पेनच्या गादीस कोणीच वारस नसल्यानें स्पॅनिश पार्लमेंटनें होहेनझोलर्न घराण्यांतील 'लिओपोल्ड' या राजपुत्रास स्पेनचें राज्यपद देऊं केलें. राजपुत्र लिओपोल्ड हा प्रशियाचा राजा विल्यम याचा नातलग असल्यामुळें स्पेनच्या गादीवरील त्याच्या निवडणुकी-संबंधानें पॅरिस शहरीं बरीच खळबळ उडून गेली. आपल्याविरुद्ध ही खळबळ पाहून लिओपोल्डनें स्पेनचें राज्यपद नाकारिलें. परंतु नेपोलियनचें एवढ्यानें समाधान न होतां पुनः कधींही स्पेनचें राज्यपद लिओपोल्ड स्वीकारणार नाहीं असें अभिवचन प्रशियाचा राजा विल्यम यानें द्यावें अशी त्यानें मागणी केली. प्रशियाचा राजा विल्यम यानें नेपोलियनच्या या मागणीचा निषेध करितांच नेपोलियननें फ्रेंच पार्लमेंटच्या पूर्ण संमतीनें १९ जुलै १८७० रोजीं प्रशियाशीं युद्ध जाहीर केलें. दक्षिण जर्मन संस्थानांना प्रशियाच्या वर्चस्वाबद्दल वैमनस्य वाटत असल्यामुळें तीं या युद्धास आपल्या बाजूस मिळतील असें नेपोलियनला वाटत होतें. पण हीं संस्थानें प्रशियाच्या बाजूनेंच लढण्यास सिद्ध झालीं. अशारीतीनें फ्रान्सशीं लढण्यासाठीं एकटेंच प्रशियाचें राज्यच उद्युक्त झालें नसून आज कितीतरी वर्षांनीं आपल्यांतील कलह विसरून सर्व जर्मन राष्ट्रच उद्युक्त झालें होतें.

फ्रान्स व जर्मनीमधील युद्ध— १८७० च्या आगष्ट महिन्याच्या प्रारंभींच जर्मन सैन्यानें फ्रान्सवर एकदम स्वारी केली. ता. ६ आगष्ट रोजीं प्रशियाचा राजपुत्र फ्रेडरिक याच्या हाताखालील जर्मन सैन्याची मार्शल मॅकमोहन याच्या हातांखालील फ्रेंच सैन्याशीं बर्थ येथें गांठ पडून फ्रेंच सैन्याचा पुरा मोड झाला; व ॲलसॅस प्रांत जर्मनीच्या ताब्यांत आला. फ्रेंच सैन्याचा दुसरा विभाग लरेन प्रांतांत असून मेटझच्या किल्ल्याचा आश्रय धरून होता. जर्मन सेनापति मोल्टके याच्या मनांतून फ्रेंच सैन्य तेथेंच कोंडून धरावयाचें असल्यामुळें त्यानें १८ आगस्ट रोजीं ग्रॅव्हेलोटी येथें फ्रेंच सैन्याचा पराभव करून मेटझ किल्ल्यास गराडा दिला. मेटझच्या वेढ्यासाठीं निम्मे सैन्य ठेवून तो बाकीच्या सैन्यानिशीं मॅकमोहनचा पाठलाग करण्यासाठीं निघाला.

ता. १ सप्टेंबर रोजीं सेडननजीक मॅकमोहनच्या सैन्याशीं जर्मन सैन्याची

पुनः गांठ पडली. पण अवाढव्य जर्मन सैन्याशीं टक्कर देणें अगदींच अशक्य झाल्यामुळें मॅकमोहन यास आपल्या सैन्यासह जर्मन सैन्यास शरण जाणें भाग पडलें. यावेळीं बादशहा नेपोलियन मॅकमोहनबरोबर असल्यामुळें त्यास केद करून व्हाईन नदीच्या उत्तरेकडे मोठ्या बंदोबस्तानें पाठविण्यांत आलें व विजयी जर्मन सैन्य सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस पॅरिस शहरानजीक येऊन दाखल झालें, व त्यानें पॅरिसला वेढा घातला.

मध्यंतरी पॅरिस शहरीं बराच गोंधळ माजून राहिला होता. सेडननजीक फ्रेंच सैन्य व बादशहा नेपोलियन शत्रूस शरण गेल्याची बातमी समजतांच पॅरिसमधील जनतेनें नेपोलियनचा धिक्कार केला व तेथील लोकसत्तावादी पक्षाच्या पुढाऱ्यांनीं फ्रान्समधील राजसत्ता नष्ट झाली असून फ्रान्स मध्यें लोकसत्ताक राज्य स्थापन झाल्याचें जाहीर केलें (४ सप्टेंबर १८७०); व शत्रूशीं युद्ध चालविण्यासाठीं गँबेटाच्या नेतृत्वाखालीं 'राष्ट्रसंरक्षक मंडळ' स्थापन केलें. या मंडळानें सैन्य उभारून शत्रूपासून पॅरिस शहराचें संरक्षण करण्याचा मोठ्या शौर्यानें प्रयत्न केला. परंतु प्रशियाच्या प्रबल व सुसज्ज सैन्यापुढें गँबेटाच्या अननुभविक सैन्याचा टिकाव लागला नाहीं. मेटझ किल्ला पडल्याची हकीकत समजल्यावर या फ्रेंच सैन्याचा धीर खचला, व पॅरिस शहराची अन्नसामुग्रीवांचून उपासमार होत असल्यामुळें शत्रूंस शरण जावें लागलें (२८ जानेवारी १८७१).

जर्मन साम्राज्याची स्थापना १८७१—उत्तर व दक्षिण जर्मन संस्थानांच्या संघटित प्रयत्नानें प्रशियाच्या नेतृत्वाखालीं जर्मनीनें विजय संपादन केला असल्यामुळें उत्तर व दक्षिण जर्मन संस्थानांचें एक संघटित राष्ट्र स्थापन व्हावें असें सर्वांसच वाटून, जर्मन सैन्याचा पॅरिसला वेढा असतानांच पॅरिसजवळील व्हर्सेस या शहराच्या राजवाड्यांतील १४ व्या लुईच्या शोभिवान् व प्रशस्त अशा दरबार हॉलमध्यें प्रशियाचा राजा व उत्तर जर्मन संस्थनांच्या संघाचा अध्यक्ष **१ ला विल्यम** हा **संयुक्त जर्मनीचा** बादशहा असल्याचें जाहीर करण्यांत आलें (१८ जानेवारी १८७१). अशा रीतीनें बिस्मार्कची मनीषा पूर्ण झाली.

यानंतर फ्रान्सशीं तह करण्यांत आला. या तहानें फ्रान्सनें जर्मनीस अॅलसॅस व लोरेन (Alsace Lorraine) हें प्रांत व २० कोटी पौंड खंडणी द्यावी व या खंडणीची भरपाई होईपर्यंत जर्मन सैन्य फ्रान्समध्यें असावें असें ठराविण्यांत आलें.

जर्मनीची राज्यघटना—यानंतर संयुक्त जर्मनीची राज्यघटना तयार करण्यांत आली. या घटनेप्रमाणें संयुक्त जर्मनीचें एक राष्ट्र स्थापन करण्यांत आलें. कायदे करण्यासाठीं बुंडेसराथ व राइक्सटाक अशा दोन सभांचें एक कायदेमंडळ (पार्लमेंट) स्थापन करण्यांत आलें. जर्मनींतील २५ संस्थानांनीं बुंडेसराथ या वरच्या सभेसाठीं आपले प्रतिनिधी पाठवावयाचे व राइक्सटाक या सभेसाठीं जर्मन जनतेनें निवडलेले प्रतिनिधी यावयाचे अशी योजना होती. बुडेसराथ व राइक्सटाक या सभांकडून संयुक्त जर्मनीसाठीं कायदे केले जाऊन प्रशियाचा राजा हा जर्मन बादशहा म्हणून त्यांची अंमलबजावणी करी. जर्मनी-मधील सर्व संस्थानांपैकीं प्रशियाचें संस्थान सर्वांपेक्षां फारच मोठें व बलाढ्य होतें. त्या संस्थानाच्या राजासच जर्मनीचा बादशहा होण्याचा मान मिळत असे, त्यामुळें संयुक्त जर्मनीचें धोरण प्रशियाच्या धोरणाप्रमाणें ठरविण्यांत येई. याखेरीज जर्मन बादशहास आपला मुख्य प्रधान (चॅन्सेलर) व इतर मंत्री नेमण्याचा अधिकार असून हे मंत्री कायदेमंडळास जबाबदार नसून जर्मन बादशहास जबाबदार असत. त्यामुळें जर्मन बादशहाची सत्ता अनियंत्रित असल्यासारखी असून कायदे करणाऱ्या सभेचे अधिकार सल्लागार स्वरूपाचे होते. कैसर १ ला विल्यम याच्या कारकीर्दीत प्रिन्स बिस्मार्क हा चॅन्सेलर होता. त्यानें १८९० पर्यंत चॅन्सेलर म्हणून काम केलें; त्यानें जर्मनीमधील निरनिराळ्या संस्थानांचें संघटन करून जर्मनीचें लष्करी बाबतींत एक प्रबल राष्ट्र निर्माण केलें. १८७० नंतर जर्मनीमध्यें औद्योगिक क्रान्ति सुरू झाली व त्या बाबतींत जर्मनीनें आपली प्रगति करून औद्योगिक बाबतींत तें एक पुढारलेलें राष्ट्र झालें. देशांतील उद्योगधंद्यांस उत्तेजन देण्यासाठीं जर्मनीनें संरक्षित व्यापाराची पद्धति स्वीकारली. उद्योगधंद्याप्रमाणें व्यापार, शास्त्रीय प्रगति, शिक्षण या बाबतींतही जर्मनीनें आपली प्रगति केली. देशांत उद्योग-धंद्यांची वाढ झाल्यावर भांडवलवाले व मजूर असे दोन वर्ग निर्माण होऊन मजुरांच्या हितसंबंधाचें रक्षण करणें जरूर वाटून १८७५ च्या सुमारास सोशल डेमोक्रॅटिक पक्ष स्थापन झाला. या पक्षाकडून जर्मनीमध्यें लोकनियंत्रित राज्यसत्ता (किंवा लोकशाही) स्थापन व्हावी म्हणून मागणी होऊं लागली, पण त्याकडे दुर्लक्ष करण्यांत आलें. पण या पक्षाचें महत्त्व वाढूं नये म्हणून सरकारनें मजुरांचा विमा उतरणें, त्यांस वृद्धवेतन देणें, आजारीपणांत मदत

मिळणें वगैरे बाबतींत उपयुक्त कायदे केले. बिस्मार्क चॅन्सेलर असतांना वसाहतींपेक्षां युरोपमधील प्रदेशांचें त्यास जास्त महत्त्व वाटत असल्यामुळें वसाहती स्थापन करण्याकडे त्यानें लक्ष दिलें नाहीं. इ. स. १८८८ मध्यें १ ला विल्यम मरण पावल्यावर त्याचा नातू २ रा विल्यम हा जर्मनीचा कैसर (बादशहा) झाला. हा महत्त्वाकांक्षी होता, व आपल्या हातीं सर्व सत्ता असावी असें त्यास वाटत होतें. त्यानें बिस्मार्कला चॅन्सेलरच्या पदावरून काढून टाकलें व आपल्या इच्छेप्रमाणें वागेल अशा गृहस्थाला चॅन्सेलर नेमलें. कैसर २ रा विल्यमच्या कारकीर्दीत वसाहती व अंकित प्रदेश मिळविण्याचा जर्मनीनें प्रयत्न केला. औद्योगिक बाबतींत जर्मनीनें प्रगति केलेली होती व कच्चा माल पैदा होण्यासाठीं, व्यापारी ठाणीं स्थापन करण्यासाठीं व आपला दरारा इतरत्र वाढविण्यासाठीं वसाहतींची जरूरी होती. तेव्हां जर्मनीनें १८९० नंतर आफ्रिका खंडांत जर्मन पूर्व आफ्रिका व जर्मन नैर्ऋत्य आफ्रिका या वसाहती स्थापन केल्या, व चीनमधील किआ–चिओ (Kiao-chao) हें बंदर हस्तगत केलें. त्यानें बर्लिन-बगदाद रेल्वेची योजना आंखली व आपलें सैन्य व आरमार वाढवून तें प्रबल केलें. तरी व्यापार, उद्योगधंदे, वसाहती व अंकित प्रदेश या बाबतींत जर्मनी हा देश ग्रेट ब्रिटनच्या बराच मागें असल्यामुळें २० व्या शतकाच्या सुरवातीपासून ग्रेट ब्रिटनशीं त्याची स्पर्धा सुरू झाली.

---

(४) फ्रान्समधील घडामोडी व तिसरें लोकसत्ताक राज्य

(१८४८–१९१४)

लुई नेपोलियन—फ्रान्सचा राजा लुई फिलिपी हा अप्रिय होऊन त्यास १८४८ मध्यें राज्यत्याग करावा लागला, व त्यानंतर फ्रान्समध्यें २ ऱ्या लोकसत्ताक राज्याची स्थापना झाली. यानंतर झालेल्या निवडणुकींत बोनापार्ट याचा पुतण्या लुई नेपोलियन यास फ्रेंच जनतेनें आपल्या लोकसत्ताक राज्याचा अध्यक्ष निवडलें, त्यावरून नेपोलियन बोनापार्ट याच्याबद्दल फ्रेंच जनतेमध्यें आदर व प्रेम वाटत होतें हें सिद्ध झालें. लुई नेपोलियन हा धूर्त व महत्त्वाकांक्षी होता. फ्रान्समधील सर्व सत्ता आपल्या हातांत घेऊन फ्रान्सला पूर्वीचें वैभव व मोठेपणा प्राप्त करून द्यावा ही त्याची इच्छा होती. आपल्या चुलत्याबद्दल

फ्रेंच जनतेमध्यें जें प्रेम व आपलेपणा होता त्यामुळेंच आपणांस अध्यक्ष म्हणून निवडण्यांत आलें हें त्यानें पाहिलें. १८४८ च्या घटनेनें फ्रान्समधील प्रत्येक सुबुद्ध माणसास मत देण्याचा अधिकार मिळाला होता. पण फ्रान्समधील लोकसत्तावादी पक्षास त्यांत कांहीं बदल करावयाचा होता. पण त्या गोष्टीस त्यानें विरोध दर्शविला, त्यामुळें बहुजनसमाजांत तो अधिक लोकप्रिय झाला. सैन्य, शहरवासी लोक व धर्माधिकारी यांच्याकडून आपणांस पाठिंबा आहे हें पाहून त्यानें १८५२ च्या डिसेंबरमध्यें लोकसत्तावादी पक्षाच्या पुढाऱ्यांस व चळवळ्या लोकांस तुरुंगांत टाकून नवीन राज्यघटना लोकांपुढें मांडली व फ्रेंच जनतेनें त्यास मान्यता दिली. यानंतर फ्रेंच जनतेचें सार्वमत घेण्यांत आलें, तेव्हां लोकांनीं त्यास फ्रान्सचा बादशहा हा हुद्दा दिला (१८५३). बादशहा नेपोलियन बोनापार्ट याचा मुलगा १८३२ मध्यें मरण पावला होता, व त्यांस २ रा नेपोलियन हा हुद्दा असावयास पाहिजे म्हणून लुई नेपोलियन यानें बादशहा ३ रा नेपोलियन हा हुद्दा धारण केला, तेव्हां फ्रान्समध्यें २ रें लोकसत्ताक राज्य नष्ट होऊन राजसत्ता स्थापन झाली. तिसऱ्या नेपोलियननें १८५३ पासून १८७१ पर्यंत फ्रेंचाचा बादशहा म्हणून राज्यकारभार केला. या काळांत त्यानें आपल्याविरुद्ध असणाऱ्या लोकसत्तावादी पक्षाच्या लोकांस अटकेंत ठेवलें व वृत्तपत्रांवर नियंत्रण ठेवलें तरी लोकहिताच्या व फ्रान्सचें वैभव वाढेल अशा पुष्कळ चांगल्या गोष्टी केल्या. त्यानें फ्रान्सची औद्योगिक प्रगति व्हावी म्हणून रेल्वे रस्ते बांधले, बंदराची दुरुस्ती केली, उद्योगधंद्यांस उत्तेजन दिलें, कामकरी लोकांस आपले संघ स्थापन करण्यास परवानगी दिली. त्यानें इंग्लंडशीं मैत्री संपादन केली व रशियाविरुद्ध इंग्लंडच्या बाजूनें क्रीमीयन युद्धांत भाग घेतला, आस्ट्रियाविरुद्ध इटलीला मदत केली. फ्रान्सची उत्तर सरहद्द व्हाईन नदीपर्यंत वाढविण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती, पण या गोष्टीस प्रशियाचा विरोध होईल हें तो जाणून होता. त्यानें मध्य अमेरिकेंतील मेक्सिको येथील राजकारणांत हात घालून तेथें आपलें वर्चस्व स्थापण्याचा प्रयत्न केला, पण त्यास या कामीं यश आलें नाहीं. त्यानें फ्रान्सच्या वसाहती वाढविल्या. चीनशीं युद्ध करून चीनपासून व्यापारी सवलती मिळविल्या व चीनमध्यें व इंडोचायनांत व्यापारी ठाणीं स्थापन केलीं.

१८७० मध्यें स्पेनचें राज्यपद प्रशियाच्या होहेनझोलार्न घराण्यांतील एका

पुरुषास देण्याचें घाटूं लागलें, व तसें झाल्यास ती गोष्ट फ्रान्सला अनिष्ट आहे म्हणून प्रशियानें ती गोष्ट होणार नाहीं म्हणून हमी द्यावी अशी नेपोलियननें मागणी केली. पण बिस्मार्क यानें तसें करण्याचें नाकारल्यामुळें त्यानें जर्मनी-विरुद्ध युद्ध जाहीर केलें. (१८७०). पण या युद्धांत जर्मन सैन्यानें फ्रान्सचा पराभव केला, व नेपोलियन यास कैद केलें. तेव्हां फ्रान्समध्यें नेपोलियन यास पदच्युत करण्यांत येऊन लोकसत्ताक राज्य स्थापन झाल्याचें जाहीर करण्यांत आलें.

फ्रान्समध्यें लोकसत्ताक राज्याची स्थापना १८७१—फ्रान्समध्यें लोकसत्ताक राज्य स्थापन झाल्याचें जाहीर केल्यानंतर पॅरिसमधील कांहीं चळवळ्या व माथेफिरू लोकांनीं तेथें दंगेधोपे केल्यामुळें तेथें दोन महिने (एप्रिल, मे १८७१) बेबंदशाही माजली व हजारों माणसें मृत्यूमुखीं पडली. पण यानंतर लोकसत्ताक पक्षाच्या पुढाऱ्यांनीं पॅरिस शहरांतील बेबंदशाही मोडण्यासाठीं मार्शल मॅक-मोहनच्या हाताखालीं बरेंच सैन्य पाठविलें. हें सैन्य दाखल होतांच पॅरिस शहराच्या भर रस्त्यावर दंगेखोर लोकांचीं व सैनिकांची निकराची लढाई होऊन त्यांत दंगेखोर लोकांचा पुरा मोड झाला. यानंतर फ्रान्समध्यें लोकनियंत्रित राजसत्ता किंवा लोकसत्ता स्थापन करावयाची याबद्दल तेथील प्रमुख पुढाऱ्यां-मध्यें खल होऊन फ्रान्समध्यें लोकसत्ताक राज्य स्थापन करण्यांत आलें (१८७१) व टायर यास त्याचा अध्यक्ष नेमण्यांत आलें.

यानंतर फ्रान्सनें १८७५ मध्यें नवीन राज्यघटना तयार केली. या घटने-प्रमाणें २ गृहाचें पार्लमेंट–सीनेट व चेंबर ऑफ डेप्यूटीज–निवडणूक करून अस्तित्वांत आणावयाचें, मंत्रीमंडळ चेंबर ऑफ डेप्युटीला जबाबदार असावयाचें, फ्रान्सच्या लोकसत्ताक राज्याच्या अध्यक्षाची मुदत ७ वर्षांची असून तो लोकांनीं निवडलेला असावयाचा अशी योजना होती. फ्रान्समध्यें ग्रेट ब्रिटनप्रमाणें दोन प्रबल राजकीय पक्ष नसून लहान लहान असे अनेक गट असल्यामुळें मंत्रीमंडळ वरचेवर बदललीं जात व त्यामुळें व्यवस्थित धोरण अमलांत आणणें कठीण जाई.

फ्रान्सनें आर्थिक व औद्योगिक बाबतींत बरीच प्रगति केली, व संरक्षित व्यापाराचें धोरण अमलांत आणून परकीय चढाओढीपासून देशांतील उद्योग-

धंद्यांस संरक्षण दिलें. तसेंच रेल्वे रस्ते बांधणें, कालवे खणणें, बंदरांची डागडुजी करणें वगैरे गोष्टींमध्येंही बरीच प्रगति केली.

१८ व्या शतकाच्या अखेरीपर्यंत उत्तर अमेरिका व हिंदुस्थान येथील फ्रेंचांची सत्ता नाहींशी झाली होती, पण १९ व्या शतकामध्यें फ्रान्सनें आफ्रिका खंडांतील अल्जेरिया, ट्यूनिस, मोरोक्को, सोमाली लँड, मेडागास्कर, वायव्य आफ्रिकेंतील विस्तृत प्रदेश, फ्रेंच कांगो हे प्रदेश, आशियांतील कोचीन चायना, कंबोडिया; अनाम, टोंनकिन हा विस्तृत प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणून आपलें वसाहतींचें साम्राज्य ग्रेट ब्रिटन व रशिया यांच्या खालोखाल विस्तृत केलें.

---

(५) आस्ट्रिया–हंगेरीचें साम्राज्य

(१८६७)

१८६६ मध्यें प्रशियाकडून जर्मनीच्या राजकारणांतून आस्ट्रियाची हकालपट्टी झाल्यावर आपलें विस्खलित असलेलें साम्राज्य चिरस्थाई करण्यासाठीं आपल्या साम्राज्याच्या अंतस्थ बाबतींत सुधारणा करणें जरूर आहे असें फ्रँसिस जोसेफ यास वाटूं लागलें. आस्ट्रियाच्या साम्राज्यांत मोडणाऱ्या हंगेरीमधील लोकांस विशिष्ट राजकीय हक्क देणें जरूर आहे असें वाटून त्यानें आपल्या साम्राज्याचें आस्ट्रिया व हंगेरी असे दोन विभाग केले व परराष्ट्रीय बाबी, लष्करी व आरमारी व्यवस्था यांखेरीज हे दोन्ही विभाग वेगळे केले. अशारीतीनें आस्ट्रिया व हंगेरी या दोन्हीं देशांतील कायदेकौन्सिलें, राज्यव्यवस्था वेगवेगळी असून व्हिएन्ना व बुडापेस्ट या त्यांच्या राजधान्या आहेत. आस्ट्रिया-हंगेरीच्या सम्राटास व्हिएन्ना शहरीं आस्ट्रियाचा बादशहा व बुडापेस्ट शहरीं हंगेरीचा राजा हे किताब देण्यांत येतात. या योजनेनें या साम्राज्यांतील आस्ट्रियांतील जर्मन व हंगेरींतील मेगेयार या लोकांचें समाधान झालें तरी साम्राज्यांत असलेल्या स्लाव्ह वंशांतील लोकांचें समाधान झालेलें नाहीं व हंगेरीमधील मेगेयार लोकांप्रमाणें आपणांसहि साम्राज्यांतर्गत स्वराज्य असावें असें त्यांस वाटत होतें.

---

(६) रशिया, तुर्कस्थान व आग्नेय युरोप

(१८१५ ते १९१४)

रशिया (१८१५ ते १९१४)

रशियाचे झार व त्यांची अनियंत्रित सत्ता— १८०१ ते १९१७ पर्यंतच्या काळांत रशियांत पाच झारांनीं राज्य केलें. हे झार म्हणजे १ ला अलेक्झांडर (१८०१–२५), १ ला निकोलस (१८२५–५५), २ रा अलेक्झांडर (१८५५–८१), ३ रा अलेक्झांडर (१८८१–९४) व २ रा निकोलस (१८९४ ते १९१७) हे होत. रशियाच्या झारच्या हातांत अनियंत्रित सत्ता होती. ते आपण स्वत: नेमलेल्या व आपणास जबाबदार असलेल्या मंत्र्यांच्या सल्ल्यानें राज्यकारभार करीत, कायदे करीत, व लोकांवर कर बसवीत व आपणास वाटेल त्या कामासाठीं खर्च करीत. रशियामधील लोकांस राजकीय बाबतींत कांहींच हक्क नव्हते, व राज्यकारभारांत त्यांस भाग घेतां येत नसे. कायदे करतांना, कर बसवितानां व राज्यकारभार करतांना लोकांची संमति किंवा सल्ला घेण्याची जरूरी आहे असें रशियाच्या झारला वाटत नव्हतें. रशियाच्या झारच्या या अनियंत्रित सत्तेविरुद्ध व धोरणाविरुद्ध टीका करणें, आपलें मत व्यक्त करणें हा गुन्हा समजला जाऊन अशा लोकांस झार आपल्या स्वत:च्या अधिकारानें बेमुदत अटकेंत ठेवी, त्यांस दूरच्या सैबेरिया प्रांतांत कैदी म्हणून पाठवी किंवा त्यांस फांशी देई.

रशियाचा विस्तार व रशियामधील लोक—युरोपमध्यें असलेल्या रशियाचा १७ व्या, अठराव्या व १९ व्या शतकांत युरोपमधील बाल्टिक समुद्रालगतचा प्रदेश, त्याचप्रमाणें रशियाला लागून असलेला पूर्वेकडील आशिया खंडांतील रशियाच्या तिपटीहून मोठा अशा सैबेरिया व मध्यआशियांतील तुर्कस्थान या प्रदेशांत विस्तार झाला होता. एकोणिसाव्या शतकांत सैबेरियाच्या प्रदेशांत रशियामधील लोक वसाहत करण्यासाठीं जाऊं लागले. त्याचप्रमाणें तेथील जमिनींवर काबाडकष्ट करण्यासाठी हजारो कैदी पाठविण्यांत येत. तसेंच रशियाच्या सरकाराविरुद्ध बंडाळी केल्याच्या आरोपावरून हजारों कुटुंबांस वस्ती करण्यास तेथें पाठविण्यांत येई. त्यामुळें त्या प्रदेशांतील लोकसंख्या वाढूं लागली. प्रदेशविस्ताराच्या मानानें १९ व्या शतकांत रशियाचें विस्तृत साम्राज्य ग्रेट

ब्रिटनच्या खालोखाल मोठें झालें होतें. ग्रेट ब्रिटनचें साम्राज्य पांचही खंडांत पसरलेलें होतें, पण रशियाचें साम्राज्य सलग असें होतें. या विस्तृत साम्राज्यांतील सैबेरियाचा उत्तर भाग ओसाड व रुक्ष असलेला प्रदेश होता, पण मध्य व दक्षिणेकडील भाग मात्र सुपीक होता. युरोप व आशिया या खंडांच्या विस्तृत प्रदेशावर पसरलेल्या रशियन साम्राज्यांतील बहुसंख्य लोक स्लाव्ह वंशाचे होते व यांपैकीं बरेंच लोक रशियन भाषा बोलणारे व ग्रीक ख्रिश्चन चर्चचे अनुयायी असे होते. पण या खेरीज रशियांमध्यें पोलिश, लिथूएनिअन्स, एस्थोनियन्स, फिनस, युक्रेनियन्स, मंगोल, तुर्क, खुर्ड, ज्यू, उझबेग वगैरे वंश, भाषा, वर्ण, आचारविचार, चालीरीति, राष्ट्रीयत्व या बाबतींत भिन्नत्व असलेले असे लक्षावधी लोक मोडत असत. पण या निरनिराळ्या लोकांची भिन्न भाषा, संस्कृति, धर्मपंथ दडपून टाकून त्यांस रशियन करून टाकण्याचा व रशियन भाषा बोलावयास लावण्याचा पद्धतशीर प्रयत्न रशियाचे झार व त्याचे अधिकारी यांच्याकडून होत होता. रशियामध्यें बहुसंख्य असलेल्या स्लाव्ह लोकांस राजकीय बाबतींत कांहींच हक्क नव्हते त्याप्रमाणें या निरनिराळ्या लोकांसही कांहीं हक्क नव्हते. त्यामुळें रशिया हें राष्ट्र विस्तृत व प्रबळ होऊं लागलें, तरी रशियांतील जनतेस रशियाबद्दल व झारबद्दल आपलेपणा वाटला नाहीं.

१८३० मध्यें पोलंडमधील लोकांनीं बंडाळी केली (१८३०–३१). तेव्हां निकोलसनें बंडाळीचा मोड केला व पोलंडमधील लोकांत राष्ट्रीयत्वाची भावना राहूं नये म्हणून पोलंडमधील हजारों कुटुंबास पोलंडमधून घालवून लावून रशियाच्या पूर्वभागांतील कोकेशस पर्वताजवळच्या दूरच्या प्रदेशांत वस्ती करण्यास सक्तीनें पाठविले. अशा रीतीनें पोलंडचें वेगळें अस्तित्व नष्ट करण्यांत आलें.

रशियामध्यें ५० लाख ज्यू होते. धर्म, भाषा, रीतीरिवाज व संस्कृति या बाबतींत ते वेगवेगळे होते. या ज्यू लोकांविरुद्ध वरचेवर दंगेधोपे होत व त्यांस रशियन सरकारची चिथावणी असे. तेव्हां रशियांत रहाणें ज्यू लोकांना असह्य होई व त्यांपैकीं कांहीं रशिया देश सोडून दूरवर अमेरिका खंडांत वसाहत करण्यास जात.

रशियांतील शेतावरील कुळें (सर्फ) व त्यांची सर्फ पद्धतींतून मुक्तता—रशियांतील बहुतेक शेतजमीन सरदार, अमीरउमराव, रशियाचा

झार यांच्या मालकीची होती. या जमीनींपैकीं कांहीं आपणाकडे ठेवून बाकीची त्याचे लहान लहान भाग पाडून शेतावरील कुळाकडे खंडानें कसण्यास दिली जाई. शेतावरील कुळांस सर्फ असें म्हणत. या कुळांस आठवड्यांतील ३–४ दिवस शेतमालकाच्या जमीनीवर विनावेतन काम करावे लागे. त्यांस आपली शेतवाडी सोडून इतर ठिकाणीं जातां येत नसे. त्यांस जमीन मालकांकडून फार वाईट रीतीनें वागविण्यांत येई व त्याबद्दल कोणाकडेहि तक्रार करितां येत नसे. त्यांच्याकडे कसण्यास देण्यांत आलेली जमीन त्यांच्या जरूरीपेक्षां फारच कमी असे, त्यामुळें त्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नावर त्यांचें जेमतेम भागे, व दुष्काळ पडला तर त्यांची उपासमार होई. तेव्हां शेतावरील कुळांची स्थिति हलाखीची व कष्टप्रद होती. शेताच्या मालकांकडून त्यांस मिळणाऱ्या वाईट वागणुकीमुळें शेतमालक व कुळें यांच्यामध्यें तंटे बखेडे होऊन वरचेवर बंडाळी होई, व ती सरकारास सैन्याच्या मदतीनें मोडावी लागे. तेव्हां शेतावरील कुळांची ही हलाखीची स्थिति नाहींशी व्हावी, म्हणून २ ऱ्या अलेक्झांडरनें १८६१ मध्यें एक फर्मान काढलें. या फर्मानानें कुळांकडे कसावयास असलेल्या जमिनींची किंमत सरकारी खजिन्यांतून शेताच्या मालकांस देण्यांत आली व शेत मालकांचे कुळांवर असलेले सर्व हक्क रद्द करण्यांत आले. त्याचप्रमाणें कुळांकडे असलेल्या जमिनी त्यांस कायमच्या कसण्यास देण्यांत आलेल्या आहेत व हप्त्याहप्त्यानें सरकारांत पैसे भरून त्यांनीं त्या विकत घ्याव्यात असें ठरविलें. पण कुळांची हलाखीची व कष्टप्रद स्थिति असल्यामुळें त्यास त्या विकत घेतां येणें शक्य नव्हतें. तेव्हां पुढें २ रा निकोलस यानें १९०४ मध्यें एक फर्मान काढून त्यांस जमिनींची किंमत माफ केली, त्यामुळें त्या जमिनी कुळांच्या मालकीच्या झाल्या. २ ऱ्या अलेक्झांडरच्या वरील फर्मानामुळें रशियांतील सुमारें ४ कोटी कुळांची सर्फ पद्धतींतुन (गुलामगिरीसारखी पद्धत) मुक्तता झाली.

रशियाच्या राजकर्त्यांची दडपशाही व त्याविरुद्ध क्रान्तिकारक व दहशतवादी चळवळी—रशियाच्या झारची सत्ता अनियंत्रित होती, तशी ती जुलमीही होती. १ ला निकोलस हा जुलमी होता. रशियामधील जनतेस कांहींच अधिकार नव्हता. फ्रान्समधील राज्यक्रांतिमुळें उद्भूत झालेल्या स्वातंत्र्य, समता, विश्वबंधुत्व व लोकशाही या विषयीच्या कल्पना युरोपमधील सर्व राष्ट्रांत पसरून १८३० व १८४८ मध्यें ठिकठिकाणीं क्रान्तिकारक

चळवळी झाल्या व ठिकठिकाणी मोठा प्रक्षोभ झाला तरी रशियामधील जनता या बाबतींत उदासीनच होती. सर्फ पद्धतीमुळें बहुसंख्य जनता जमिनीशीं निगडीत राहून पोट भरण्याइतकें अन्न मिळण्याची तिला भ्रांत असल्यामुळें इतर गोष्टींकडे तिला लक्ष देतां येत नसे. बहुसंख्य लोक खेड्यापाड्यांत व आपल्या शेतीवाडीवर रहात होते, व त्यांच्यांत शिक्षणाचा प्रसार झाला नसल्यानें ते अडाणी व मागासलेलेच राहिले. मोठमोठ्या शहरांतून शेतीखेरीज किरकोळ उद्योगधंदे करणारे, वृत्तपत्र व्यवसाय करणारे, कॉलेज व विश्वविद्यालयें यांत काम करणारे असे शिक्षित मध्यमवर्गीय लोक होते. त्यांस मात्र झारची अनियंत्रित सत्ता व जुलमी राज्यपद्धति मान्य नव्हती. राज्यकारभारांत आपणांस भाग घेतां यावा, व आपल्या प्रतिनिधींच्या सल्ल्यानें कायदे करण्यांत यावेत व कर बसविण्यांत यावेत असें त्यांस वाटत होतें, पण ही गोष्ट कशी साध्य करून घ्यावी हें त्यांस कळत नव्हतें. पण या लोकांच्याकडून लोकशाहीच्या कल्पनांचा हलके हलके बहुजन समाजांत प्रसार होत होता. तेव्हां या गोष्टींस आळा घालण्याचा रशियामधील झारनी व त्यांच्या अधिकाऱ्यांनीं प्रयत्न चालविले. परदेशांतून येणारे ग्रंथ, वृत्तपत्रें यांची तपासणी करून क्रांतिकारक विचारांचा त्यामुळें फैलाव होणार नाहीं अशी खात्री झाल्यावरच त्यांस रशियांत येऊं दिले जाई. झारच्या धोरणावर टीका करणाऱ्या त्याचप्रमाणें व्याख्यानें व वृत्तपत्रें या मार्फत सरकारबद्दल अप्रीति उत्पन्न करणाऱ्या लोकांस बेमुदत अटकेंत ठेवण्यांत येई, त्यांना दूर सैबिरियांत कैदी म्हणून पाठविण्यांत येई किंवा त्यांस फांशीही दिले जाई. प्रागतिक व उदार धोरणी विचारांचा त्याचप्रमाणें क्रांतिकारक विचारांचा राज्यांत प्रसार होऊं नये म्हणून हेरांचें जाळें पसरलेलें होतें. तेव्हां पुष्कळ हुशार, लायक, विचारी व कर्तबगार गृहस्थांस सरकारी हेरांच्या व अधिकाऱ्यांच्या हातीं सांपडूं नये म्हणून रशिया देश सोडून इतर देशांत जावे लागे. सरकारच्या जुलमी व दडपशाहीच्या धोरणामुळें लोकांच्या आशा, आकांक्षा काय आहेत हें व्यक्त करण्यासाठीं उघड रीतीनें संस्था काढून सनदशीर चळवळ करणें शक्य नव्हतें. त्यामुळें ठिकठिकाणीं गुप्तरीतीनें क्रान्तिकारक व दहशतवादीमंडळें स्थापन होऊं लागलीं. यांपैकीं **निहिलिझम** हा गुप्त अराजक पक्ष स्थापन झाला व त्याच्या प्रेरणेनें सरकारी अधिकाऱ्यांचे खून व्हावयास लागले, व अमीर उमरावांच्या घरादारांस आगी

लागूं लागल्या. पण त्यामुळें सरकारची दडपशाही अधिक तीव्र होऊन क्रान्तिकारक कटांत भाग घेतल्याच्या संशयावरून हजारों लोकांस फांशी देण्यांत येई. अशा प्रकारची स्थिति असतां २ रा अलेक्झांडर या झारचा १८८१ मध्यें बाँब टाकून खून करण्यांत आला.

रशियांतील औद्योगिक क्रान्ति (१८८० ते १९१४)— १७७५-१८३० च्या दरम्यान ग्रेट ब्रिटनमध्यें औद्योगिक क्रान्ति होऊन ही लाट १८३० नंतर युरोप व जगांतील इतर देशांत पसरूं लागली. युरोपमधील बेलजम, फ्रान्स, जर्मनी, इटली वगैरे देश संघटित झाल्यावर ही लाट तेथेंही गेली व १९ व्या शतकाच्या शेवटीं रशियांत आली. रशियामध्यें झारची सत्ता अनियंत्रित होती. रशियाचें साम्राज्य विस्तृत व प्रबल झालेलें होतें. तेव्हां यंत्राच्या सहाय्यानें व वाफ, तेल, वीज यांच्या शक्तीनें चालणारे मोठमोठे उद्योगधंदे आपल्याही देशांत सुरू व्हावेत असें रशियाच्या झारला वाटूं लागलें, व परकीय भांडवल व तज्ज्ञ मिळवून हे मोठमोठे धंदे रशियांत सुरू करण्यांत आले. युक्रेन, उरल व इतर ठिकाणीं कोळसा, लोखंड व तेल यांच्या खाणींचा शोध लागला व तेथील खनिज संपत्ति यंत्राच्या सहाय्यानें काढण्याचें काम मोठ्या प्रमाणांत सुरू झालें. त्यामुळें सेंटपीटर्सबर्ग, मास्को, खीव वगैरे ठिकाणें औद्योगिक केंद्रें बनलीं. रशियामध्यें मजुरांचा तुटवडा नव्हता, व मजुरी कमी असल्यामुळें मोठ्या प्रमाणांतील हे उद्योगधंदे फायदेशीर होऊं लागले. रशियाच्या साम्राज्यांतील दूरदूरच्या प्रदेशांतील दळणवळण वाढावें व औद्योगिक क्रान्तिमुळें तयार झालेला माल दूरदूरच्या ठिकाणीं जलद व स्वस्त पाठवितां यावा या हेतूनें रशियाच्या सरकारनें परकीय भांडवल जमा करून १९ व्या शतकाच्या शेवटीं ट्रॅन्स-सैबेरियन रेल्वे (मास्को ते व्हॅडिओस्टाक) हा रेल्वे रस्ता बांधण्याचें काम सुरू करून १९०३ मध्यें तें पुरें केलें व जगांतील सर्वांत जास्त लांबीचा असा (५४०० मैल लांबीचा) रेल्वे मार्ग सुरू झाला.

औद्योगिक क्रान्तीचे परिणाम—औद्योगिक क्रान्तीमुळें व रेल्वेरस्त्यामुळें तयार मालाचें मोठ्या प्रमाणांत उत्पादन होऊन त्याचा प्रसारही जलद रीतीनें होऊं लागला, त्याप्रमाणें नवीन शहरें व उद्योगकेंद्रें स्थापन होऊन तेथील लोकसंख्या झपाट्यानें वाढूं लागली. पण कारखान्यांत व गिरण्यांत मिळणारें कमी वेतन, कामाचे पुष्कळ तास, शहरांतील कोंदट व गलिच्छ वस्ती या बाबतींत

आपली स्थिति सुधारावी असें औद्योगिक शहरांत जमा झालेल्या हजारों मजूरांस वाटूं लागलें. त्याचप्रमाणें राज्यकारभारांत आपणांस भाग घेतां यावा असेंही त्यांस वाटूं लागलें. ही स्थिति सुधारावयाची तर झारची अनियंत्रित सत्ता दूर करणें जरूर आहे हें त्यांस कळून चुकलें. तेव्हां ही स्थिति प्राप्त करून घेण्यासाठीं त्यावेळीं प्रसृत झालेल्या राजकीय तत्त्वांकडे त्यांचें लक्ष गेलें. त्यावेळीं सनदशीर लोकशाही पक्ष (Constitutional Democrats), सामाजिक लोकशाही पक्ष (Social Democrats) १८९८ व सामाजिक क्रान्तिवादी पक्ष (Social Revolutionaries)१९०० असे तीन पक्ष स्थापन झालेले होते. यांपैकीं शहरांत राहणाऱ्या मध्यमवर्गीय लोकांस प्रागतिक धोरणाची व उद्योग-धंदे व व्यापार यांस उत्तेजन देणारी सनदशीर लोकशाही स्थापन व्हावी असें वाटत होतें. सामाजिक लोकशाही पक्ष व सामाजिक क्रान्तीवादी पक्ष हें कार्ल मार्क्सच्या विचाराचे होते. या पक्षांच्या द्वारें समाजसत्तावादाकडे (Socialism) मजूरांचे व त्याचप्रमाणें शेत कसणाऱ्या शेतकऱ्यांचें लक्ष गेलें. या पक्षाचें धोरण रशियामध्यें लोकसत्ताक राज्य स्थापन करून गिरण्या, कारखाने, जमीन, खाणी रेल्वे व पेढ्या या लोकांच्या मालकीच्या करणें हें होतें. तेव्हां रशियामध्यें झारच्या अनियंत्रित सत्तेविरुद्ध खळबळ सुरू झाली. या सुमारास रशियाचें जपानबरोबर युद्ध झालें (१९०४–०५). या युद्धांत जपानकडून रशियाचा पराभव झाल्यावर सरकारची नालायकी दृष्टोत्पत्तीस आली; व सरकारी अधिकाऱ्यांचा लांचलुचपतपणा स्पष्ट दिसूं लागला. त्यामुळें सर्वत्र खळबळ उडाली. अशी स्थिति असतां २२ जानेवारी १९०५ रोजीं झारला आपल्या मागण्या सादर करण्यासाठीं कामगारांनीं झारच्या सेंटपीटर्सबर्ग येथील राजवाड्यावर मोठा मोर्चा नेला, पण तेथील सैनिकांनीं या लोकांवर गोळ्या झाडून तो मोडून टाकला. या प्रकाराची बातमी इतरत्र समजतांच ठिकठिकाणीं दंगेधोपे होऊं लागले. तेव्हां ही परिस्थिति अधिक चिघळूं नये म्हणून लोकांस राज्यकारभारांतील कांहीं अधिकार देणें जरूर आहे असें झारच्या मंत्र्यांनें त्यास सांगितल्यावरून त्यानें २९ आक्टोबर १९०५ ला एक जाहीरनामा प्रसिद्ध केला, व लोकांनीं निवडलेलें ड्यूमा (कायदेमंडळ) आपण स्थापन करणार असून लोकांस भाषणस्वातंत्र्य व व्यक्तिस्वातंत्र्य देण्यांत आलें आहे हें जाहीर केलें. यानंतर १९०६ मध्यें ड्यूमा सभेची बैठक भरविण्यांत आली पण

तिच्या अतिरेकी मागण्या पाहून झारनें ती दोनदां रद्द केली, व १९०७ मध्यें भरलेल्या नेमस्त मताच्या ड्यूमा सभेनें सुचविलेल्या कांहीं सुधारणा अमलात आणिल्या. पण त्यांनीं लोकांचें समाधान झालें नाहीं व झारच्या हातांतील सत्ता अनियंत्रितच राहिली. ड्यूमा सभा अस्तित्वांत होती तरी झारचें मंत्रीमंडळ या सभेस मुळींच जबाबदार नव्हतें. ड्यूमा अस्तित्वांत आल्यामुळें तेथें निरनिराळे राजकीय पक्ष निर्माण झाले. यापैकीं बॉल्शेव्हिकी (Bolsheviki) हा जहाल पक्ष होता, व त्याचें धोरण रशियामध्यें शक्य तितक्या लवकर समाजसत्तावादी लोकसत्ताक राज्य स्थापन करणें हें होतें. पण रशियाचा झार व त्याचा राज्यकारभार यांवर टीका करणाऱ्या बॉल्शव्हीकी पक्षाच्या हजारों लोकांस राजकीय कारणांसाठीं तुरुंगांत ठेवण्यांत येऊं लागलें. त्यामुळें सरकारबद्दल असंतोष वाढत गेला (१९१४).

रशियाचें परराष्ट्रीय धोरण (१८१५–१९१४)—१८ व्या शतकांत रशियास वायव्येकडील बाल्टिक समुद्रावरील व दक्षिणेकडील काळ्या समुद्रावरील प्रदेश मिळाला असून त्या ठिकाणीं रशियानें आपलीं बंदरें स्थापन केलीं होतीं. पण त्यामुळें रशियाच्या झारचें समाधान झालें नव्हतें. तुर्कस्थानचें साम्राज्य कमकुवत झालेलें आहे हें पाहून त्यावर स्वारी करून कॉन्स्टांटिनोपल शहर जिंकून घ्यावें, तुर्कस्थानच्या वर्चस्वाखालीं असलेल्या बाल्कन द्वीपकल्पांतील ख्रिश्चन धर्मीय राज्यांस आपल्या संरक्षणाखालीं आणावें, आग्नेयेच्या बाजूस इराणवर आपलें वर्चस्व बसवून इराणच्या आखातावरील बंदर आपल्या ताब्यांत घ्यावें, अफगाणिस्थानच्या मार्गे हिंदुस्थानच्या सरहद्दीपर्यंत आपला मुलूख वाढवावा, त्याचप्रमाणें अतिपूर्वेकडे आपल्या प्रदेशाचा विस्तार करून चीनचा मंचूरिया व कोरिया हा प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणून पिवळ्या समुद्रावरचें बंदर आपल्या ताब्यांत घ्यावें ही रशियाचे झार यांची महत्त्वाकांक्षा होती, व त्या दृष्टीनें त्यांचे प्रयत्न सुरू झाले. पण भूमध्य समुद्र, इराणचें आखात व अफगाणिस्थान यांवर रशियाचें वर्चस्व स्थापन झाल्यास त्यामुळें सुवेझच्या कालव्यामार्फत पूर्वेकडे हिंदुस्थानला जाणाऱ्या आपल्या जलमार्गास अडथळा होईल व त्यामुळें हिंदुस्थानवरील आपल्या वर्चस्वासही धोका येईल हें पाहून रशियाच्या या महत्त्वाकांक्षेस विरोध करण्याचें धोरण ग्रेट ब्रिटननें आंखलें. तसेंच रशियाच्या मंचुरिया व कोरिया या प्रदेशाकडील धोरणास जपानकडून विरोध झाला.

क्रीमीयन युद्ध (१८५४-५६)—तुर्कस्थानच्या सुलतानाकडून तुर्कस्थानच्या साम्राज्यांतील ख्रिश्चन प्रजेवर जुलूम होतो, व पॅलेस्टाईनमधील धर्मक्षेत्रास जाण्यास आडथळा येतो तेव्हां तुर्कस्थानच्या साम्राज्यांतील सर्व ख्रिस्ती धर्मी प्रजेचें पालकत्व आपणाकडे यावें अशी रशियाच्या झारनें तुर्कस्थानच्या सुलतानाकडे मागणी केली. ही बातमी ग्रेट ब्रिटन व फ्रान्स यांस समजतांच त्यांनीं त्यामुळें आपल्या हितसंबंधास धोका येईल म्हणून रशियाची ही मागणी धुडकावून देण्यास तुर्कस्थानास प्रोत्साहन दिलें. तुर्कस्थाननें रशियाची मागणी मान्य न केल्यामुळें रशियानें क्रीमीयन द्वीपकल्पाकडील प्रदेशावर स्वारी केली, तेव्हां फ्रान्स, इंग्लंड व सार्डिनिया यांनीं तुर्कस्थानला मदत करण्याचें ठरवून रशियाशीं युद्ध जाहीर केलें. तुर्कस्थानला ग्रेट ब्रिटन व फ्रान्स यांची मदत मिळेल ही रशियाची कल्पना नव्हती. हें युद्ध दोन वर्षें चालल्यावर क्रिमीयन द्वीपकल्पांतील रशियाच्या सेव्हॅस्टपूल या महत्त्वाच्या किल्ल्याचा पाडाव झाला व रशियन सैन्याचा पराभव झाला. या युद्धाचे वेळीं **फ्लॉरेन्स नाइटिंगेल** या स्त्रीनें ब्रिटिश सैन्यामध्यें जखमी लोकांस औषधोपचार करून नर्सिंगची महत्त्वाची कामगिरी केली. रशियाचा पराभव झाल्यामुळें पॅरिस येथें १८५६ मध्यें तह होऊन हें युद्ध थांबविण्यांत आलें. तुर्कस्थान हें स्वतंत्र सार्वभौम राज्य असल्यामुळें ख्रिश्चन प्रजेचें संरक्षण करण्यासाठीं त्याच्या अंतस्थ बाबतींत रशियानें हात घालूं नये असें ठरविण्यांत आलें. काळ्या समुद्राच्या वायव्य भागावरील रशियाचा बेसर्बिया हा प्रदेश तुर्कस्थानास मिळाला.

रशिया व तुर्कस्थान यांमधील युद्ध १८७७-७८ —बाल्कन द्वीपकल्पांत स्लाव्ह वंशाच्या व इतर वंशाच्या लोकांची ख्रिस्तीधर्मीय राज्यें असून तीं तुर्कस्थानच्या साम्राज्यांत होतीं. तेथें ख्रिस्ती धर्मीय प्रजेवर तुर्कस्थानच्या इस्लाम धर्मीय अधिकाऱ्यांकडून जुलूम होत असे. तेव्हां तुर्कस्थानपासून स्वतंत्र होण्याची तेथें चळवळ सुरू होती. या त्यांच्या चळवळीला रशियाचा पाठिंबा होता, व या निमित्तानें तुर्कस्थानशीं युद्ध करून कॉन्स्टांटिनोपलवर आपलें वर्चस्व स्थापन करावें असें रशियाला वाटत होतें. जर्मनीच्या राजकारणांतून आस्ट्रियाची हकालपट्टी झाल्यानंतर (१८६६) बाल्कन द्वीपकल्पांतील लहान लहान ख्रिश्चन धर्मीय संस्थानांच्या कारभारांत आपलाहि हात असावा असें आस्ट्रियासहि वाटूं लागलें होतें. अशी परिस्थिति असतां तुर्कस्थानच्या साम्रा-

ज्यांतील बाल्कन द्वीपकल्पांतील बॉस्निया, सर्बिया व माँटेनिग्रो या संस्थानांत स्वातंत्र्य मिळवावें म्हणून तुर्कस्थानविरुद्ध बंडाळी सुरू झाली (१८७६). यानंतर बल्गेरियामध्येंही तुर्कस्थानविरुद्ध बंड झालें. तेव्हां तुर्कस्थाननें बल्गेरियांत आपलें सैन्य पाठविलें व भयंकर कत्तल करून तें बंड मोडून टाकलें. तेव्हां तेथील ख्रिश्चन प्रजेच्या संरक्षणासाठी रशियानें तुर्कस्थानशीं युद्ध जाहीर करून आपल्या प्रबल सैन्यानें तुर्कस्थानवर स्वारी केली (१८७७). रशियाच्या प्रबल सैन्यापुढें तुर्कस्थानचें कांहीं चाललें नाहीं व त्यास माघार घ्यावी लागली. तेव्हां रशियन सैन्यही त्याचा पाठलाग करीत कॉन्स्टांटिनोपलच्या रोखानें निघालें. तेव्हां रशियाला थोपवून धरण्यासाठीं ब्रिटिश आरमार कॉन्स्टांटिनोपल-कडे पाठविण्यांत आलें, तेव्हां रशियानें सॅन स्टेफॅनो येथें तुर्कस्थानशीं तह केला. पण या तहानें बाल्कन द्वीपकल्पांत रशियाचा हात शिरेल असें ग्रेट ब्रिटनला वाटत होतें. आस्ट्रियाचाही या गोष्टीस विरोध होता. तेव्हां तो तह कायम न समजतां युरोपियन राष्ट्रांच्या परिषदेपुढें तहाच्या अटींची वाटाघाट व्हावी अशी ग्रेट ब्रिटननें मागणी केली, व त्यास इतर राष्ट्रांची अनकूलता असल्यामुळें तसें न केल्यास युरोपमधील इतर राष्ट्रांशीं युद्ध करावें लागेल असें वाटून रशियानें त्यास आपली संमति दिली. तेव्हां १८७८ च्या जूनमध्यें बर्लिन येथें युरोपियन राष्ट्रांच्या प्रतिनिधींची परिषद् भरली व तह करण्यांत आला.—(१) माँटेनिग्रो, सर्बिया व रुमानिया हीं राज्यें स्वतंत्र करण्यांत आलीं. (२) बल्गेरियास अंतस्थ बाबतींत कांहीं अधिकार देण्यांत येऊन तें तुर्कस्थानच्या वर्चस्वाखालीं ठेवण्यांत आलें. (३) बॉस्निया व हेर्झेगोविना या प्रांतांची व्यवस्था आस्ट्रियाकडे देण्यांत आली (४) रशियास बेसर्बिया व आर्मेनिया प्रांताचा कांहीं भाग देण्यांत आला. (५) इंग्लंडला भूमध्य समुद्रांतील सायप्रस बेट मिळालें.

रशिया व जपान यांमधील युद्ध (१९०४-०५)—

रशियानें ट्रॅन्स सैबेरियन रेल्वेचा फाटा मांचूरियांतून नेण्याबद्दल चीनची परवानगी मिळवून यानंतर मांचूरिया आपल्या ताब्यांत आणला. त्याचप्रमाणें लाओटंग द्वीपकल्पाच्या टोकांवरील पोर्ट ऑर्थर हें ठिकाण दीर्घ मुदतीच्या भाडेपट्टीनें मिळविलें व ट्रॅन्स-सैबेरियन रेल्वेचा एक फाटा पोर्ट आर्थरपर्यंत नेला. तेव्हां या ठिकाणाजवळ असलेला कोरिया यास धोका उत्पन्न झाला. पण कोरियावर आपलें वर्चस्व बसवावें ही जपानची मनीषा होती. तेव्हां रशियाला

या बाबतींत प्रतिबंध करण्यासाठीं जपाननें १९०४ च्या फेब्रुवारींत रशियाशीं युद्ध जाहीर करून पोर्ट ऑर्थर येथील रशियाच्या आरमारावर हल्ला केला. जपान-सारख्या लहान राष्ट्राविरुद्ध आपणांस सहजरीत्या जय मिळेल असें रशियाला वाटत होतें. पण जपाननें गेल्या चाळीस वर्षांत औद्योगिक व यांत्रिक बाबतींत आपली प्रगति करून आपलें सैन्य व आरमार आधुनिक शस्त्रास्त्रांनीं सज्ज व कार्यक्षम ठेविलें होतें. रशियाला पूर्वेकडील या प्रदेशाकडे लांबून सैन्य आणावें लागलें. व्हॅडिओस्टॉक येथें असलेल्या रशियांच्या आरमारावरही जपाननें हल्ला केला व त्याचा पराभव केला, त्यामुळें पूर्वेकडील समुद्रावर जपानचें वर्चस्व स्थापन झालें. १९०५ च्या फेब्रुवारींत जपाननें रशियाचें पोर्ट आर्थर हें आरमारी ठिकाण जिंकून घेतलें. केप ऑफ गुड होपला वळसा घालून आलेल्या आरमाराचाही मे १९०५ मध्यें जपाननें पूर्व समुद्रांत फडशा उडविला. यानंतर जपानी सैन्यानें मांचुरियांत असलेल्या रशियन सैन्यावर हल्ला करून मुकडेननजीक त्याचा पराभव केला. या लढाईत रशियन सैन्याची खूप प्राणहानि झाली व बऱ्याच युद्धसामुग्रीचा विध्वंस झाला. जमीनीवर लष्करी बाबतींत रशिया हें राष्ट्र बलाढ्य समजलें जाई, पण या पराभवामुळें रशियाच्या सैन्याचे अधिकारी यांची नालायकी दृष्टोत्पत्तीस आली; तेव्हां जमिनीवर व समुद्रावर रशियाचा पराभव झाल्यामुळें अ. सं. संस्थानांचा अध्यक्ष थिओडोर रूझवेल्ट याच्या मध्यस्थीनें पोर्टस्मथ येथें रशिया व जपान यांच्यामध्यें ५ सप्टेंबर १९०५ मध्यें तह झाला. या तहानें पोर्ट आर्थर व त्याभोंवतालचा प्रदेश व सॅखलिन बेटाचा दक्षिण भाग जपानला मिळाला. कोरियाचें स्वातंत्र्य मान्य करण्यांत आलें. मांचुरिया चीनच्या वर्चस्वाखालीं आहे असें ठरविण्यांत आलें.

जपान या नवीन पुढें आलेल्या लहान पौर्वात्य राष्ट्रानें लष्करी बाबतींत बलाढ्य समजल्या जाणाऱ्या रशिया या युरोपियन राष्ट्राचा पराभव केल्यामुळें जपानचें महत्त्व खूप वाढलें, व रशियाचा दरारा बराच कमी झाला.

रशियाचें इराणकडेही लक्ष होतें, व त्या भागाकडे रशियाचा विस्तार होऊन इराणच्या आखातावरील बंदर रशियाच्या ताब्यांत जाऊं नये असें ग्रेट ब्रिटनला वाटत होतें. तेव्हां १९०७ मध्यें ग्रेट ब्रिटननें रशियाशीं तह केला व इराणचा दक्षिण भाग व समुद्र किनारा ग्रेट ब्रिटनच्या कक्षेखाली असावा, उत्तर भाग

रशियाच्या कक्षेखालीं व मधला भाग इराणकडे असूं देऊन तेथील कारभारांत कोणीहीं ढवळाढवळ करूं नये असें ठरविलें.

तुर्कस्थान व आग्नेय युरोप

(१८१५ ते १९१४)

१४५३ मध्यें पूर्व रोमन साम्राज्याचा नाश केल्यावर तुर्कस्थाननें आपली सत्ता खूप वाढवून भूमध्य समुद्राच्या पूर्व भागाभोंवतालच्या युरोप, आशिया व आफ्रिका या खंडांतील प्रदेशामध्यें आपलें मोठें व प्रबल साम्राज्य स्थापन केलें. पण अठराव्या शतकामध्यें या साम्राज्यांतील हंगेरी हा प्रांत आस्ट्रियानें व काळ्या समुद्राच्या उत्तरेकडील प्रदेश रशियानें जिंकून घेतला. १९ व्या शतकापासून तुर्कस्थानच्या साम्राज्यास उतरती कळा लागली. तुर्कस्थानचे सुलतान चैनी व विलासी झाले व त्यामुळें त्यांचें राज्यकारभारांत फारसें लक्ष नसें. सरकारी अधिकारीही अकर्तृत्ववान् व लांचलुचपतीला बळी पडणारे असे होते. तुर्कस्थानचें लष्करी व आरमारी सामर्थ्य कमी होऊं लागलें. तुर्कस्थानच्या साम्राज्यांत युरोपमधील बाल्कन द्वीपकल्प होतें, व तेथील प्रजा ख्रिश्चन होती. त्यांचीं लहान लहान राज्यें असून तीं तुर्कस्थानच्या वर्चस्वाखालीं होतीं. या ख्रिश्चन प्रजेवर तुर्कस्थानच्या अधिकाऱ्यांकडून बराच जुलूम होई. तेव्हां तुर्कस्थानपासून स्वतंत्र होऊन आपलीं वेगळीं राज्यें स्थापन करावींत असें त्यांस वाटत होतें, पण तीं गोष्ट घडवून आणण्याचें सामर्थ्य त्यांच्यापाशीं नव्हतें, व त्यांनीं बंडाळी केल्यास तुर्कस्थानकडून कडक उपाय योजून व अत्याचार करून ती मोडली जाई. या बाल्कन द्वीपकल्पांतील लोक रशियांतील बहुसंख्य लोकांप्रमाणें स्लाव्ह वंशाचे होते. या लोकांबद्दल रशियाला आपलेपणा वाटे, व येथील लोकांनाही रशियानें आपणांस इस्लामधर्मीय तुर्कस्थानच्या जुलमापासून मुक्त करावें असें वाटत होतें. १९ व्या शतकांतील रशियाचे झार महत्त्वाकांक्षी असून तुर्कस्थानची राजधानी कॉन्स्टांटिनोपल शहर जिंकून घ्यावें व बाल्कन द्वीपकल्पांतील ख्रिश्चन राज्यें आपल्या संरक्षणाखालीं आणावींत असें त्यांस वाटत होतें. पण तसें झाल्यास भूमध्यसमुद्रावर रशियाचें वर्चस्व स्थापन होऊन पूर्वेकडील भारताकडे सुएझ कालव्यांतून जाणाऱ्या जलमार्गास व

हिंदुस्थानवरील आपल्या वर्चस्वास धोका उत्पन्न होईल असें वाटून ग्रेटब्रिटननें तुर्कस्थानला मदत करून रशियाची ही महत्त्वाकांक्षा सफल होऊं दिली नाहीं; तरी तुर्कस्थानच्या साम्राज्यांतील बाल्कन द्वीपकल्पांतील ख्रिस्तीधर्मीय राष्ट्रांबद्दल त्यांस सहानुभूति होती. त्यामुळें १९ व्या व २० व्या शतकांत ग्रीस सर्बिया, मॉंटेनिग्रो, रुमानिया व बल्गेरिया हीं राज्यें स्वतंत्र झालीं. तसेंच तुर्कस्थानचें साम्राज्य कमकुवत झालें आहे हें पाहून आफ्रिकेच्या उत्तर किनाऱ्यावरील आल्जेरिया व ट्यूनिस (१८८१) हे प्रदेश फ्रान्सनें, ट्रिपोली हा विस्तृत प्रदेश इटलीनें, व इजिप्त व सुएझ कालव्यानजीकचा प्रदेश ग्रेट ब्रिटननें आपल्या वर्चस्वाखालीं आणला. त्यामुळें तुर्कस्थानचें विस्तृत साम्राज्य खूपच कमी होऊन युरोपमधील कॉन्स्टांटिनोपल जवळचा थोडासा प्रदेश व आशियांतील आशिया मायनर, आर्मेनिया, मेसापोटेमिया, सीरिया, पॅलेस्टाइन व अरबस्थान यापुरतेंच तें मर्यादित झालें.

तुर्कस्थानांत क्रान्ति १९०८—तुर्कस्थानचा सुलतान व अधिकारी अकर्तृत्ववान् व नालायक असल्यामुळें तुर्कस्थानला उतरती कळा लागलेली पाहून "तरुण तुर्क" या नांवाची एक गुप्त संघटना तुर्कस्थानांत स्थापन झाली. या संघटनेचें धोरण पाश्चात्य ज्ञान आत्मसात करून तुर्कस्थानचें राष्ट्र प्रबल करणें व तुर्कस्थानला गतवैभव प्राप्त करून देणें हें होतें. या संघटनेचा प्रसार होऊन १९०८ मध्यें त्यांनीं तुर्कस्थानचा सुलतान २ रा अबदुल हमीद (१८७६ ते १९०८) यास पदच्युत केलें व प्रागतिक विचाराच्या गृहस्थास सुलतान केलें. तुर्कस्थानांतील ही खळबळ पाहून बाल्कन द्वीपकल्पांतील तुर्कस्थानच्या वर्चस्वाखालीं असलेल्या बल्गेरिया या संस्थानानें तुर्कस्थानचें वर्चस्व झुगारून देऊन आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें (१९०८). त्याचप्रमाणें आस्ट्रिया-हंगेरीनें तुर्कस्थानच्या साम्राज्यांतील बॉस्निया व हर्झेगोव्हिना हे स्लाव लोकांची वस्ती असलेले प्रांत आपल्या वर्चस्वाखालीं आणले. अशी स्थिति असतां बाल्कन द्वीपकल्पांतील लहान लहान ख्रिश्चनधर्मीय राज्यांनीं रशियाच्या चिथावणीनें आपसांत संगनमत करून १९१२ मध्यें तुर्कस्थानशीं युद्ध जाहीर केलें. या युद्धांतही तुर्कस्थानचा पराभव होऊन तुर्कस्थानच्या वर्चस्वाखालील मॅसिडोनिया, आल्बेनिया हें प्रदेशही स्वतंत्र झालें (१९१३). त्यामुळें तुर्कस्थानच्या ताब्यांत बाल्कन द्वीपकल्पांतील कॉन्स्टांटिनोपल लगतचाच थोडासा प्रदेश राहिला. तेव्हां आपल्या

राष्ट्राचें लष्करी सामर्थ्य वाढविणें जरूर आहे असें तुर्कस्थानमधील तरुण पक्षास वाटून त्यांनीं या बाबतींत युरोपमध्यें लष्करी बाबतींत प्रबल असलेल्या जर्मनीची मदत घेण्याचें ठरविलें, व जर्मनीच्या लष्करी तज्ज्ञांमार्फत तुर्कस्थानच्या सैन्यास लष्करी शिक्षण दिलें. पण यामुळें तुर्कस्थानच्या राजकारणांत जर्मनीचा हात शिरला, व जर्मनीच्या सूचनेवरून २० व्या शतकाच्या सुरुवातीस बर्लिन बगदाद रेल्वेची योजना आंखण्यांत आली, व एका जर्मन कंपनीनें कॉन्स्टांटिनोपलपासून आशियामायनरमधून बगदादपर्यंत व तेथून इराणी आखातापर्यंत रेल्वे बांधण्यास तुर्कस्थानपासून परवानगी मिळाविली.

---

(७) बर्लिनच्या तहानंतर युरोपमधील राजकारण

(१८७८–१९१४)

बर्लिनच्या तहानें प्रिन्स बिस्मार्कच्या पुढाकारानें केलेल्या व्यवस्थेमुळें आपल्या युरोपमधील महत्त्वाकांक्षेस अडथळा आला असें रशियास वाटूं लागून जर्मनीबद्दल रशियाच्या मनांत अढी उत्पन्न झाली. बाल्कन द्वीपकल्पांमध्यें रशियाच्या मार्गांत जरी अनेक अडचणी उपस्थित करण्यांत आल्या, तरी रशियानें त्या भागाकडील महत्त्वाकांक्षा सोडली नसून बाल्कन संस्थानांतील बहुसंख्य लोक आपणाशीं धर्मपंथ, आचारविचार, वंश यांनीं निगडित असल्यामुळें तुर्कस्थानच्या विरुद्ध युद्ध करण्याचा प्रसंग आल्यास या लहान लहान संस्थानांची आपणांस पूर्ण सहानुभूति मिळेल असें रशियास वाटत होतें. परंतु यावेळीं बाल्कन द्वीपकल्पाकडे आपल्या महत्त्वाकांक्षेस वाव आहे असें आस्ट्रियासही वाटूं लागलें होतें. १८६६ मध्यें प्रिन्स बिस्मार्कच्या मुत्सद्देगिरीनें आस्ट्रियाची जर्मनीच्या राजकारणांतून हकालपट्टी होऊन इटलीवरील आपल्या वर्चस्वास मुकावें लागल्यानें बाल्कन द्वीपकल्पाकडेच आस्ट्रियाच्या महत्त्वाकांक्षेस वाव होता, पण त्या बाबतींत रशियाशीं विसुष्ट करावें लागेल हें आस्ट्रियास कळून चुकलें.

बाल्कन द्वीपकल्पांतील वर्चस्वासंबंधानें आस्ट्रिया व रशिया यांमध्यें स्पर्धा उत्पन्न झालेली आहे हें पाहून फ्रँको–जर्मन युद्धानंतर फ्रान्सकडून घेण्यांत आलेलें

ॲलसॅस व लरेन हे प्रांत परत मिळविण्याचा फ्रान्सकडून प्रयत्न झाल्यास युरोपमधील दुसऱ्या राष्ट्राची मदत असणें आपणास जरूर आहे असें वाटून प्रिन्स बिस्मार्क यानें १८७९ मध्यें जर्मनी व आस्ट्रिया या दोन राष्ट्रांत तह घडवून आणला. या तहांत असें ठरलें कीं, आस्ट्रिया व जर्मनी यांपैकीं एकाद्या राष्ट्रावर युरोपमधील रशिया व फ्रान्स यांकडून हल्ला झाल्यास या राष्ट्रांनीं एकमेकास मदत करावी. पण या तहानें बिस्मार्कचें समाधान झालें नाहीं. या तहांत इटलीला सामील करून घेतां आलें तर आपला संघ युरोपमध्यें प्रबळ होईल व त्याविरुद्ध शस्त्र उपसण्यास युरोपमधील इतर राष्ट्रें धजावणार नाहींत असें त्यास वाटूं लागलें. परंतु इटली व आस्ट्रिया हीं थोड्याच वर्षांपर्यंत एकमेकांशीं हाडवैरी असलेलीं राष्ट्रें एकाच संघांत सामील कशी करून घ्यावयाची हा प्रश्न होता, तेव्हां या बाबतींत योग्य संधि मिळेपर्यंत थांबण्याचें प्रिन्स बिस्मार्क यानें ठरविलें.

फ्रान्सचा बादशहा ३ रा नेपोलियन यानें इटलीला न विचारतां आस्ट्रियाशीं सुरू असलेलें युद्ध थांबविलें व पोपच्या संरक्षणार्थ रोममध्यें फ्रेंच सैन्य ठेवलें, त्यामुळें फ्रान्स व इटली यांमध्यें असलेला स्नेहसंबंध नष्ट झाला होता. यानंतर फँको जर्मन युद्धाच्या वेळीं रोममधील फ्रेंच सैन्य हालविल्यावर संयुक्त इटलीनें रोम शहर आपल्या ताब्यांत घेतल्यावर रोमचें संस्थान पुनः पोपला मिळवून देण्याचा फ्रान्सकडून प्रयत्न होईल ही इटालीला भीति वाटत होती, व त्यामुळें फ्रान्साविषयीं इटलीचें मन साशंक होतें. अशी स्थिति असतां आफ्रिकेच्या उत्तर किनाऱ्यावरील ट्यूनिस हा तुर्कस्थानच्या ताब्यांतील प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणावा असें इटलीला वाटत होतें. परंतु इटलीप्रमाणें फ्रान्सचेंहि या प्रदेशाकडे लक्ष होतें, व हा प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आल्यास अल्जेरियामध्यें असलेली वसाहत अधिक विस्तृत करितां येईल हें पाहून फ्रान्सनें १८८१ मध्यें ट्युनिस हा प्रदेश बळकाविला. फ्रान्सचें हें कृत्य इटलीला आवडलें नाहीं. परंतु फ्रान्सला विरोध करण्यास आपण एकटे असमर्थ आहोंत हें पाहून दुसऱ्या एखाद्या बलाढ्य युरोपियन राष्ट्राची मदत असणें जरूर आहे असें इटलीला वाटूं लागलें. तेव्हां बिस्मार्कनें इटलीला आपल्या बाजूस वळवून घेतलें व १८८३ मध्यें जर्मनी, आस्ट्रिया व इटली या राष्ट्रांचा एक त्रिपुटी संघ (Triple Alliance) स्थापन झाला.

मध्य युरोपमध्यें स्थापन झालेल्या या त्रिपुटी संघामुळें फ्रान्सला भीति वाटूं लागली, व युरोपमधील एखाद्या बलाढ्य राष्ट्राशीं स्नेह प्रस्थापित करणें जरूर झालें. युरोपमधील इतर बलाढ्य राष्ट्रें म्हणजे ग्रेटब्रिटन व रशिया हीं होतीं, यांपैकीं इजिप्तवर ग्रेट ब्रिटननें आपलें वर्चस्व बसविल्यामुळें फ्रान्स व ग्रेट ब्रिटन यांच्यामध्यें वितुष्ट आलेलें होतें, तेव्हां रशियाशीं सख्य संपादन करणें फ्रान्सला जरूर झालें. फ्रान्सप्रमाणें रशियाला देखील मध्य युरोपमध्यें स्थापन झालेल्या त्रिपुटी संघापासून भीति वाटत असून दुसऱ्या एकाद्या बलाढ्य राष्ट्राशीं स्नेह-संबंध स्थापन करणें जरूर झालें होतें. रशियाच्या तुर्कस्थान, इराण व अफगाणिस्थान या बाजूस प्रदेशविस्तार करण्याच्या धोरणास ग्रेट ब्रिटननें विरोध केला असल्यामुळें ग्रेट ब्रिटनशीं मैत्रीचा तह होणें शक्य नव्हतें. पण मध्य युरोपमध्यें जर्मनीच्या नेतृत्वाखालीं स्थापन झालेल्या त्रिपुटी संघाबद्दल रशिया व फ्रान्स या दोन राष्ट्रांस सारखीच भीति वाटत असल्यामुळें या दोन राष्ट्रांस एकमेकांविषयीं सहानुभूति वाटूं लागली व या दोन राष्ट्रांमधील संबंध सलोख्याचे होऊन १८९२ मध्यें व्यापारविषयक तह झाला व पुढें १८९६ मध्यें संरक्षक तह करण्यांत आला. अशा रीतीनें युरोपमध्यें द्विपुटी संघ (Dual Entente) स्थापन झाला.

यावेळीं ग्रेट ब्रिटनखेरीज इतर युरोपियन राष्ट्रें या दोन बलाढ्य संघांपैकीं कोणत्यातरी एका संघाकडे आपली सहानुभूति दर्शवूं लागलीं होतीं. ग्रेट ब्रिटन मात्र या दोन्ही संघापासून अलिप्त होतें, तरी इजिप्तसंबंधीं फ्रान्स व इंग्लंड यांमध्यें वितुष्ट आलें असल्यानें, व रशियाच्या भूमध्यसमुद्र व इराणचें आखात याकडील विस्तारास ग्रेट ब्रिटनचा विरोध असल्यामुळें जर्मनीच्या नेतृत्वाखालीं स्थापन झालेल्या त्रिपुटी संघाकडे ब्रिटनचा कल होता (१८९६).

युरोपमधील राष्ट्रांत वरील तह होत असतां ग्रेट ब्रिटनखेरीज इतर सर्व युरोपियन राष्ट्रांमध्यें आपलें लष्करी सामर्थ्य वाढविण्यासाठीं स्पर्धा उत्पन्न झालेली होती. त्यांनीं आपल्या राष्ट्रांत सक्तीचें लष्करी शिक्षण सुरू करून आपलें लष्करी सामर्थ्य वाढविण्याची खटपट सुरू केली. शिक्षण, सामाजिक व औद्योगिक सुधारणा वगैरे उपयुक्त कामाकडे रक्कम खर्च होण्याऐवजीं युद्धोपयोगी विध्वंसक साधनें व युद्धसामुग्री तयार करण्याकडे कोट्यवधि रुपये खर्च होऊं लागले व त्यामुळें प्रत्येक राष्ट्र लष्करी खर्चाखालीं

दडपून जाऊं लागलें. तेव्हां पैशाचा असा अनावश्यक गोष्टीकडे खर्च होऊं नये म्हणून सूचना येऊं लागल्या. या कामीं रशियाचा झार २ रा निकोलस यानें पुढाकार घेऊन 'प्रत्येक राष्ट्रानें शांतताप्रिय बनून आपला लष्करी खर्च कमी करावा' अशी सूचना करणारें एक पत्रक १८९८ मध्यें प्रसिद्ध केलें. यानंतर या प्रश्नाचा शांतपणें विचार करण्यासाठीं १८९९ मध्यें हॉलंडमधील हेग या ठिकाणीं एक परिषद् भरविण्यांत आली. या परिषदेस २६ राष्ट्रांतर्फे प्रतिनिधी आलेले होते. या परिषदेमध्यें लष्करी खर्च कमी करण्याच्या महत्त्वाच्या प्रश्नासंबंधानें निर्णय घेण्यांत आला नाहीं, पण राष्ट्रांराष्ट्रांतील कलह तडजोडीनें मिटविण्यासाठीं **हेग** येथें एक **आंतर्राष्ट्रीय न्यायकोर्ट** स्थापन करण्यांत आलें (१८९९). तसेंच आंतर्राष्ट्रीय कायद्यांमध्यें कांहीं महत्त्वाच्या सुधारणा करण्यांत आल्या. हेग येथें आंतर्राष्ट्रीय न्यायकोर्ट स्थापन झालें, तरी त्याकडे आपला तंटा नेणें कोणत्याही राष्ट्रास बंधनकारक नसल्यामुळें या न्यायकोर्टाचें महत्त्व वाढलें नाहीं.

युरोपमध्यें वरील दोन प्रबळ संघ स्थापन झालें होते, तरी २० व्या शतकाच्या सुरुवातीस ग्रेट ब्रिटन या दोन्ही संघापासून अलिप्त होतें. परंतु यानंतर ग्रेटब्रिटनला आपला अलगपणा सोडणें जरूर वाटूं लागलें.

ग्रेट ब्रिटननें जगाच्या पांचही खंडांत आपल्या वसाहती स्थापन केल्या असून या वसाहती म्हणजे मोठमोठीं संपन्न राष्ट्रें झालेलीं होतीं. ग्रेट ब्रिटनच्या वर्चस्वाखालीं हिंदुस्थान हा मोठ्या लोकवस्तीचा व महत्त्वाचा देश आलेला होता. आपल्या पांचही खंडांत पसरलेल्या साम्राज्यास परकीय शत्रूपासून धोका पोहचूं नये म्हणून ग्रेट ब्रिटननें आपलें आरमार जय्यत तयार ठेवण्याची खटपट सुरू करून, कोणत्याही दोन प्रबल राष्ट्रांच्या आरमाराच्या तोडीचें आपलें आरमार राखण्याचा प्रयत्न चालविला. परंतु ग्रेट ब्रिटनकडून असा प्रयत्न होत असतां १९०० पासून जर्मनीकडून आपलें आरमार वाढविण्याचे प्रयत्न होऊं लागले; व त्यासाठीं कोट्यवधी रुपये खर्च होऊं लागले. त्याचप्रमाणें आपल्या आरमाराच्या जोरावर आपल्या वसाहतींची वाढ करण्याचा जर्मनीकडून प्रयत्न होऊं लागला. तेव्हां आपल्या पांचही खंडांत पसरलेल्या साम्राज्यास व आपल्या आरमारास जर्मनीपासून धोका आहे असें ग्रेट ब्रिटनला वाटूं लागलें. तेव्हां इतर राष्ट्रांच्या मदतीची ग्रेट ब्रिटनला आवश्यकता वाटूं लागली. रशियाच्या आशिया खंडांतील

विस्तारामुळें ग्रेट ब्रिटन व जपान या दोहोंसहीं भीति वाटत असल्यामुळें ग्रेट ब्रिटननें १९०२ मध्यें जपानशीं तह केला व जपानवर एकापेक्षां अधिक राष्ट्रांकडून हल्ला झाल्यास जपानला मदत करण्याचें अभिवचन दिलें. यानंतर रशिया व जपान यांच्यामध्यें मांचुरियांतील वर्चस्वासंबंधानें युद्ध होऊन (१९०४–०५) त्यांत रशियाचा पराभव झाल्यामुळें रशियाचें महत्त्व बरेंच कमी होऊन त्यापासून आपल्या पूर्वेकडील प्रदेशास धोका येणार नाहीं असें ग्रेट ब्रिटनला वाटूं लागलें. तसेंच ग्रेट ब्रिटन व फ्रान्स यांच्यामध्यें सलोख्याचे संबंध प्रस्थापित होऊं लागले. फ्रान्सचें आफ्रिकेच्या उत्तर किनाऱ्यावरील मोरोक्को या राज्यांमध्यें हितसंबंध होते. तेव्हां इजिप्तसंबंधीं फ्रान्सनें ग्रेट ब्रिटनला पूर्ण मुख्यत्यारी द्यावी व ग्रेट ब्रिटननें फ्रान्सच्या मोरोक्कोसंबंधाच्या धोरणास पाठबळ द्यावें अशी या दोन राष्ट्रांमध्यें तडजोड करण्यांत आली. त्याचप्रमाणें पूर्वेकडील इराण, अफगाणिस्थान या प्रदेशासंबंधीं कोणतें धोरण आखावयाचें यासंबंधीं ग्रेट ब्रिटननें १९०७ मध्यें रशियाशीं तह केला. त्यामुळें जर्मनीच्या नेतृत्वाखालीं स्थापन झालेल्या जर्मनी, आस्ट्रिया व इटली यांच्या त्रिपुटी संघास प्रतिस्पर्धी असें फ्रान्स, रशिया व ग्रेट ब्रिटन यांचें त्रिकूट (Triple Entente) स्थापन झालें (१९०७). अशा रीतीनें जगांत दोन प्रबल गट स्थापन झाले.

(ब) ग्रेट ब्रिटन, ब्रिटिश साम्राज्य व कॉमनवेल्थ (स्वसत्ताक राष्ट्रांचा संघ)

(१८२० ते १९४५)

प्रास्ताविक—१८२० ते १९४५ पर्यंतचा काळ हा ग्रेट ब्रिटनच्या वैभवाचा व भरभराटीचा काळ होय. या काळांत ग्रेट ब्रिटनचें साम्राज्य व वसाहती यामध्यें कल्पनातीत वाढ होऊन तें जगांतील सर्वांत मोठें साम्राज्य झालें. ग्रेट ब्रिटनच्या लोकसभेची (कॉमन्स सभा) सुधारणा होऊन इंग्लंडमध्यें लोकशाही (लोकनियंत्रित राजसत्ता) स्थापन झाली. ग्रेट ब्रिटनमध्यें सुरू झालेल्या औद्योगिक क्रान्तिमुळें यंत्राच्या साह्याच्यानें व वाफेच्या शक्तीनें व पुढें १९ व्या शतकाच्या शेवटीं विजेच्या शक्तीनें चालणारे मोठमोठे कारखाने व

गिरण्या ग्रेट ब्रिटनमध्यें स्थापन होऊन त्यांत मोठ्या प्रमाणांत तयार होणारा माल रेल्वे व आगबोटी यांच्यामार्फत दूरदूरच्या ठिकाणीं पाठविण्यांत येऊं लागला व अशाप्रकारें ग्रेट ब्रिटन हें जगाची बाजारपेठ बनली, व तें संपत्तिमान् राष्ट्र झालें. या गोष्टी होत असतां ग्रेट ब्रिटनमध्यें सामाजिक, औद्योगिक, आर्थिक व व्यापाराविषयक बाबतींत वेळोवेळीं झालेल्या कायद्यांनीं ग्रेट ब्रिटनमधील बहुजन समाजाचें राहणींचें मान, त्यांच्या सुखसोयी यांत वाढ होऊन तें सुखी व समृद्ध असें राष्ट्र बनलें.

ग्रेट ब्रिटनमधील राज्यकर्ते, राजकीय पक्ष व प्रमुख मुख्य प्रधान—या काळांत ग्रेट ब्रिटनमध्यें होऊन गेलेल्या राज्यकर्त्यांपैकीं व्हिक्टोरिया राणीची कारकीर्द दीर्घकाल टिकून (१८३७–१९०१) तिनें आपल्या सनदशीर राज्यकारभारामुळें व ग्रेट ब्रिटनची सर्वांगीण उन्नति व्हावी याकडे आपलें लक्ष केंद्रित केल्यामुळें ब्रिटिश जनतेचें प्रेम संपादन केलें. पांचवा जॉर्ज (१९१०–१९३६) याच्या कारकीर्दीत १ लें महायुद्ध झालें. तें मोडण्याच्या कामीं इंग्लंडला प्रमुख भाग घ्यावा लागला. राष्ट्रांपुढें वेळोवेळीं असलेलें महत्त्वाचे प्रश्न व ते सोडाविण्यासाठीं योजले जाणारे उपाय या बाबतींत असलेल्या मतभेदावरून १७ व्या शतकांत स्थापन झालेल्या टोरी व विग या राजकीय पक्षांचीं पूर्वीचीं नांवें मागें पडून कॉंझरव्हेटिव्ह (जुन्या परंपरेचे अभिमानी) व लिबरल (उदारमतवादी, प्रागतिक) हीं नांवें रूढ झालीं (१८५० च्या सुमारास). लिबरल पक्षाचें धोरण खुल्या व्यापाराची पद्धत अंमलांत आणणें, कॉमन्ससभेची सुधारणा करून लोकशाही स्थापन करणें, कामकरी, मजूर व बहुजनसमाज यांची स्थिति सुधारण्यासाठीं कायदे करून व्यापार व उद्योगधंदे यांस उत्तेजन देणें, हें होतें. कॉंझरव्हेटिव्ह पक्षाचें धोरण इंग्लंडच्या राज्यघटनेंत उतावीळपणें बदल घडवून न आणणें, इंग्लंडमधील उद्योगधंद्याची वाढ करण्यासाठीं संरक्षित व्यापाराची पद्धत चालूं ठेवणें, ग्रेट ब्रिटनचें साम्राज्य व वसाहती यांची वाढ करून इंग्लंडचा दरारा सर्वत्र बसविणें हें होतें, पण या पक्षासहीं पुढें कॉमन्स सभेची सुधारणा करणें व बहुजन समाजाच्या हिताचे कायदे करणें जरूर आहे असें वाटूं लागलें. विसाव्या शतकाच्या सुरुवातीस जरवर्गाच्या हितसंबधाकडे अधिक लक्ष देणारा असा मजर पक्ष निर्माण झाला, व लिबरल पक्षांतील बऱ्याच लोकांचें धोरण मजुरांचो स्थिति सुधारण्याकडे

असल्यामुळें ते मजूर पक्षांत सामील झाले. त्यामुळें लिबरल पक्ष मागें पडून मजूर पक्ष पुढें आला (१९२४), त्यामुळें ग्रेट ब्रिटनच्या राजकारणांत कॉझर-व्हेटिव्ह व मजूर हे दोन पक्ष सध्यां प्रमुख आहेत.

या राजकीय पक्षांमध्यें निरनिराळ्या वेळीं कांहीं प्रमुख मुत्सद्दी व कर्तृत्ववान् मुख्य प्रधान होऊन गेले व त्यांनीं अमलांत आणलेल्या धोरणामुळें ग्रेट ब्रिटनच्या इतिहासावर महत्त्वाचे परिणाम घडले. अशा मुख्य प्रधानांपैकीं कॉझरव्हेटिव्ह पक्षाचे सर रॉबट पील, डिझरेली, बाल्डविन व चर्चिल, लिबरल पक्षाचे रसेल, पामर्स्टन, ग्लॅडस्टन व लॉईड जार्ज व मजूर पक्षाचे सर रॅमसे मॅकडोनल्ड व ॲटली हे विशेष प्रसिद्ध होते.

ग्रेट ब्रिटनमध्यें लोकशाही (डेमॉक्रसी) स्थापन होते (१८३२ ते १९२८)—१८ व्या शतकापासून ग्रेट ब्रिटनचें प्रधानमंडळ कॉमन्स सभेस (लोकसभा) जबाबदार राहूं लागल्यामुळें कॉमन्स सभेचें महत्त्व वाढलें होतें, तरी त्यामुळें इंग्लंडमध्यें लोकशाही पूर्णपणें स्थापन झालेली नव्हती. कॉमन्स सभेतील सर्व सभासद लोकनियुक्त होते, पण निवडणुकीच्या वेळीं मत देण्याचा अधिकार बहुजन समाजास नसून तो जमीनजुमला व मालमत्ता असणाऱ्या थोड्या लोकांनाच होता. मतदारसंघाची मांडणी तीन चार शतकांपूर्वी १४ व्या शतकांत केलेली होती तीच चालूं होती. औद्योगिक क्रान्तीमुळें ठिकठिकाणीं नवीन शहरें व उद्योग केंद्रें स्थापन होऊन जुनीं ठिकाणें मागें पडलीं व ठिकठिकाणच्या लोकसंख्येंत बदल झाला तरी पूर्वीचीच पद्धत कायम होती. त्यामुळें कॉमन्स सभेवर राष्ट्रांतील जमीनजुमला व मालमत्ता असणाऱ्या वर्गाचेंच वजन असे व ती बहुजन समाजाची प्रतिनिधि नव्हती. तेव्हां या बाबतींत सुधारणा होणें जरूर आहे असें इंग्लंडमधील उदार, धोरणी व प्रागतिक मताच्या मुत्सद्यांस वाटूं लागलें, पण टोरी पक्षाचा या गोष्टीस विरोध होता; तेव्हां या प्रश्नासंबंधीं बरीच खळबळ माजली.

१८३२ मध्यें विग पक्षानें कॉमन्स सभेच्या सुधारणेचें बिल पुढें मांडलें व त्यास टोरी पक्षाचा विरोध होता तरी तें पास झालें. या कायद्यानें परगण्यामध्यें शेताच्या मालकाप्रमाणें कांहीं ठराविक रकमेपेक्षां जास्ती खंड देणाऱ्या कुळांस, त्याचप्रमाणें शहरांत वार्षिक १० पौंड किंवा जास्ती भाडें देणाऱ्या भाडेकरूस मत देण्याचा हक्क मिळाला. तसेंच मतदारसंघाची नवीन विभागणी करण्यांत

घेऊन लोकसंख्या कमी झालेल्या परगण्यांतर्फे व शहरातर्फे घेणाऱ्या प्रतिनिधींची संख्या कमी करून लोकवस्ती वाढलेले परगणे व शहरें यांच्यातर्फे घेणाऱ्या प्रतिनिधींची संख्या वाढविण्यांत आली. वरील सुधारणा करण्यांत आली तरी या योजनेनें राष्ट्रांतील सुबुद्ध नागरिकांपैकीं $\frac{1}{7}$ लोकांसच मत देण्याचा अधिकार मिळाला, त्यामुळें या योजनेनें मध्यम वर्गीयांचें समाधान झालें, तरी बहुजनसमाजाचें समाधान झालें नाहीं. तेव्हां या बाबतींत सुधारणा व्हावी म्हणून १८३७ मध्यें मोठी चळवळ सुरू झाली व तिचा प्रसार होऊन ठिकठिकाणीं दंगेधोपेही होऊं लागले. या चळवळ्या लोकांनीं आपल्या प्रमुख मागण्या ज्यांत मांडलेल्या आहेत अशी एक सनद (चार्टर) तयार केली म्हणून या चळवळीस चार्टिस्ट चळवळ असें म्हणतात. १८४८ मध्यें युरोपमधील निरनिराळ्या देशांत क्रांतिकारक चळवळ सुरू झाली त्यावेळीं एक मोठा मोर्चा काढून ही सनद पार्लमेंटला सादर करण्याचा त्यांनीं बेत केला. पण त्यामुळें अस्वस्थता माजून दंगेधोपे होण्याचा संभव आहे म्हणून सरकारनें हजारों पोलिसांच्या मदतीनें हा मोर्चा बंद पाडला.

पार्लमेंट सभेपुढें येणाऱ्या प्रश्नासंबंधीं कोणता सभासद कोणत्या बाजूस मत देतो तें दाखविणारी अधिकृत यादी प्रसिद्ध होऊं लागली, त्यामुळें आपल्या मतदारसंघास पसंत पडेल अशा बाजूस मत देणें सभासदांस जरूर वाटून मतदारसंघाचें वजन पार्लमेंटच्या सभासदावर पडूं लागलें.

कॉमन्स सभेची आणखी सुधारणा होणें जरूर आहे असें लिबरल व कॉंझरव्हेटिव्ह या दोन्ही पक्षांसही वाटूं लागलें होतें, व १८६७ मध्यें डिझरेली यानें मांडलेलें २ रें बिल पार्लमेंटनें पास केलें. या कायद्यानें शहरांतील सर्व भाडेकऱ्यांस मताधिकार मिळाला. यानंतर १८८४ मध्यें ग्लॅडस्टननें मांडलेलें तिसरें रिफॉर्म बिल पार्लमेंटनें पास केलें व त्यानें शहरांप्रमाणें खेडेगांवांतील भाडेकरूसही मताधिकार मिळाला. या तिन्ही रिफॉर्म बिलांनीं मत देण्याची पात्रता घेण्यास जमीनजमुला व मालमत्ता ही लायकी नाहींशी झाली व भाड्यानें राहणाऱ्या गृहस्थासही मताधिकार मिळाला तरी कॉमन्स सभेच्या निवडणुकीच्या वेळीं स्त्रियांस मताधिकार नव्हता. कुटुंबांतील पुरुषास मताधिकार असल्यामुळें स्त्रियांस वेगळा मताधिकार देणें जरूर नाहीं अशी त्यावेळीं लोकांची समजूत होती. पण पुरुषांप्रमाणें आपणासही मताधिकार

मिळावयास पाहिजे असें स्त्रियांना वाटूं लागलें व हा हक्क मिळावा म्हणून त्यांनीं चळवळ सुरू केली. ही चळवळ वाढत गेली व कांहीं स्त्रियांनीं सार्वत्रिक ठिकाणीं बखेडा करून, त्रास देऊन व दंगल करून या चळवळीकडे जनतेचें लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला (१९१४). या चळवळ्या स्त्रियांस "सफ्रेजेटस्" (मताधिकाराची मागणी करणाऱ्या) असें म्हणण्यांत येऊं लागलें. याच सुमारास १ लें महायुद्ध सुरू झालें, त्यामुळें ही चळवळ बंद ठेवण्यांत आली. पण युद्धाच्या वेळीं पुरुष सैनिक म्हणून दूरदूरच्या ठिकाणीं गेले असतां स्त्रियांनीं पोस्ट, तारायंत्र, कचेऱ्या, ट्राम कंडक्टर्स, मोटार ड्रायव्हर वगैरे विविध क्षेत्रांत पुरुषांच्या बरोबरीनें कामें केल्यामुळें स्त्रियांस मताधिकार देण्याच्या बाबतींत जो थोडा विरोध होता तोही पुढें नाहींसा होऊन १९१८ च्या कायद्यानें ३० वर्षांवरील स्त्रियांस व त्यानंतर १९२८ च्या कायद्यानें पुरुषांप्रमाणें २१ वर्षांपेक्षां जास्ती वय असणाऱ्या स्त्रियांस मताधिकार मिळाला. या सर्व सुधारणा कायद्यांमुळें १९२८ नंतर ग्रेट ब्रिटनमधील लोकसंख्येपैकीं निम्म्या लोकांस मताधिकार मिळाल्यामुळें त्यांचें कॉमन्स सभेवर वजन पडून ग्रेट ब्रिटनमध्यें लोकशाही स्थापन झाली.

१८७२ मध्यें बॅलट ॲक्ट किंवा गुप्तरीतीनें मतदान पद्धतीचा कायदा पास झाला; व त्यामुळें मतदारानें कोणास मत दिलेलें आहे हें उमेदवारास कळणें अशक्य झालें. त्यामुळें लांच देऊन किंवा धाकदपटशा दाखवून आपणांस मत देण्यास लावण्याच्या प्रकारास आळा बसला.

१९११ मध्यें 'पार्लमेंट कायदा' पास झाला. या कायद्यानें पार्लमेंटमधील लॉर्डांच्या सभेचा अधिकार पुष्कळच कमी करण्यांत आला. लॉर्डांची सभा लोकनियुक्त नसल्यामुळें लोकनियुक्त कॉमन्स सभेनें पास केलेल्या बिलास लॉर्डांच्या सभेकडून मान्यता न मिळणें योग्य नव्हे, असें सर्वांस वाटूं लागलें. तेव्हां ती अडचण दूर करण्यासाठीं हा कायदा करण्यांत आला. पैशासंबंधाच्या बिलांत फेरफार करणें व तें नामंजूर करणें हा अधिकार लॉर्डांच्या सभेस नाहीं असें ठरविण्यांत आलें. इतर बिलांच्या बाबतींत कॉमन्स सभेनें लागोपाठ तीन अधिवेशनांत एखादें बिल पास केलें तर त्या बिलास लॉर्डांच्या सभेची मंजुरी मिळाली नाहीं तरी तें पास झालें आहे असें समजण्यांत यावें असा कायदा पास करण्यांत आला.

त्याचप्रमाणें पार्लमेंटची मुदत ५ वर्षांपेक्षां जास्त असूं नये, असें ठरविण्यांत आलें. गरीब वर्गांतील लोकांसही आपला उद्योगधंदा सोडून कॉमन्स सभेचे सभासद होतां यावें म्हणून कॉमन्स सभेंतील प्रत्येक सभासदास वार्षिक ४०० पौंड वेतन किंवा भत्ता देण्यांत यावा असें ठरविण्यांत आलें.

कामगार व मजूरवर्गाचे हितसंबंधाचे कायदे— कॉमन्स सभेमध्यें गरीब वर्गाचे प्रतिनिधी मोठ्या संख्येनें येऊं लागल्यामुळें या काळांत कामगार व मजूर यांच्या हितसंबंधाचे बरेच कायदे पार्लमेंटनें पास केले, त्यामुळें त्यांची स्थिति सुधारली.

१८२४ मध्यें मजुरांनीं आपले संघ स्थापण्यास बंदी असलेला कॉंबिनेशन कायदा पार्लमेंटनें रद्द केला; त्यामुळें आपले संघ स्थापन करून गिरणी मालकाकडून कामाचे तास कमी करून घेणें व पगारवाढ करून घेणें शक्य झालें.

१८३३ मध्यें फॅक्टरी ॲक्ट पास होऊन लहान मुलें व स्त्रिया यांना कारखान्यांत देण्यांत येणाऱ्या कामासंबंधीं नियंत्रण घालण्यांत आलें.

१८४२ च्या कायद्यानें १० वर्षांच्या आंतील मुलांस व स्त्रियांस खाणींतील कामावर नेमूं नये असें ठरविलें.

देशांत पिकणाऱ्या धान्याच्या धंद्यास उत्तेजन द्यावें म्हणून परदेशांतून येणाऱ्या धान्यावर जकात बसविलेली असे. त्यामुळें धान्य महाग होई, व दुष्काळ पडल्यास गरीबवर्गाची स्थिति कष्टप्रद होई, तेव्हां १८४६ मध्यें टोरी किंवा कॉंझरव्हेटिव्ह पक्षाचा विरोध होता तरी धान्यावरील आयात जकात रद्द करण्यांत येऊन इंग्लंडमध्यें खुल्या व्यापाराची पद्धत सुरू झाली. त्यामुळें अन्नधान्य व इतर जरूरीच्या वस्तु स्वस्त होऊन गरीब वर्गाच्या रहाणीचा खर्च कमी झाला.

मजूर व कामगारवर्गाच्या लोकांनीं आपल्या उन्नतीसाठीं संघ स्थापन केले होते व पैसे जमा करून फंडही स्थापन केलेले होते. या संघास 'ट्रेड युनिअन' असें म्हणत. तेव्हां १८७१ मध्यें पार्लमेंटनें एक कायदा केला व हे ट्रेड युनिअन कायदेशीर आहेत असें ठरविण्यांत आलें. कामकऱ्यांनीं व मजुरानीं संप करून काम बंद ठेवल्यास व ती गोष्ट शांततेनें केल्यास ती गोष्ट बेकायदेशीर नाहीं असें १८७५ च्या कायद्यानें स्पष्ट केलें, तसेंच संपाच्या

वेळीं इतर कामकऱ्यांस संपांत सामील होण्यासाठीं व कामावर न जावें म्हणून शांततेनें व त्यांच्यावर जबरदस्ती न करून त्यांचें मन वळविणें ही गोष्टही बेकायदेशीर नाहीं, व या प्रसंगीं एखाद्या मजुराकडून दंगाधोपा किंवा बळजबरी झाली तर त्याबद्दल ट्रेड युनियन जबाबदार नसून तो मजूर व्यक्तिशः जबाबदार आहे (१९०६) असें ठरविण्यांत आलें. कामगारांना कारखान्यांत व गिरण्यांत कामावर असतां दुखापत झाल्यास त्याबद्दल नुकसानभरपाई देण्यास मालक जबाबदार आहे.

कोळशाच्या खाणींत दररोज ८½ तासापेक्षां जास्ती वेळ कोणास कामावर नेमण्यांत येऊ नये.

देशांतील गरीब वर्गांतील लोक वृद्ध झाल्यास काम करणें त्यास शक्य होत नाहीं, व गरिबीमुळें त्यांस उपजीविकेचें दुसरें साधन नसतें, त्यामुळें ७० वर्षांपेक्षां जास्त वयाच्या गरीब लोकांस दर आठवड्यास ५ शिलिंग पेन्शन सरकारनें द्यावें असा कायदा करण्यांत आला (१९०८).

बहुजनसमाजाच्या हितसंबंधाचे सामाजिक कायदेः—प्राथमिक शिक्षणाचा कायदा १८७०. राष्ट्रांतील प्रत्येक नागरिकांस लिहितां वाचतां येणें जरूर आहे. गरीब वर्गांतील लोकांस गरीबीमुळें आपल्या मुलांस शिक्षण देणें शक्य होत नाहीं, तेव्हां सरकारनें तें काम आपल्या हातीं घ्यावें म्हणून फॉर्स्टर याच्या सूचनेवरून १८७० मध्यें पार्लमेंटनें सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचा कायदा पास केला व शिक्षणाची व्यवस्था अमलांत आणण्यासाठीं स्कूल बोर्डें स्थापन केलीं. पुढें १८८०–९१ च्या दरम्यान १३ वर्षें वयापर्यंतचें हें प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें केलें, त्यामुळें थोड्याच वर्षांत ग्रेट ब्रिटनमधील बहुजनसमाज साक्षर झाला.

स्त्रियांची उन्नति करण्यासंबंधीं कायदा—स्त्रियांना प्राथमिक शिक्षण देण्यांत येत असें, पण त्यांच्या उच्च शिक्षणाची व्यवस्था नव्हती. स्त्रियांनीं आपल्या मालमत्तेची व्यवस्था करणें, कॉमन्स सभेच्या निवडणुकीच्या वेळीं मत देणें, सार्वजनिक हुद्द्याच्या व अधिकाराच्या जागा पतकरणें, विश्वविद्यालयांत प्रवेश मिळविणें व उच्च शिक्षण घेणें यास आडकाठी होती. स्त्रियांनीं कुटुंबाच्या बाहेर जाऊन स्वतंत्रपणें एखादा व्यवसाय करणें कमी प्रतिष्ठेचे व हलके मानलें

जाई; पण हलके हलके समाजाची स्त्रियांकडे बघण्याची दृष्टि बदलूं लागली व पुरुषांप्रमाणें त्यांस निरनिराळ्या उद्योगधंद्यांत काम करण्यांत आडकाठी असूं नये असें वाटूं लागलें. फ्लॉरेन्स नाइटेंगेल या स्त्रीनें युद्धाच्या वेळीं सैनिकांमध्यें नर्स म्हणून काम करण्याचें धाडस दाखविलें. यानंतर नर्सिंगप्रमाणें इतर उद्योधंद्यांतही स्त्रिया भाग घेऊं लागल्या. १८५० नंतर स्त्रियांसाठीं उच्च शिक्षणाच्या शाळा, १८७० मध्यें कॉलेजें काढण्यांत येऊन विश्वविद्यालयांत व कलाकौशल्याच्या संस्थांत शिक्षण घेऊन स्त्रिया पुढें येऊं लागल्या; व पुरुषांच्या बरोबरीनें शाळा, कॉलेजे, वैद्यकी, वृत्तपत्रव्यवसाय, वकिली वगैरे गोष्टींत भाग घेऊं लागल्या.

सार्वजनिक आरोग्य—पूर्वी रोगाच्या सांथी उत्पन्न होऊन त्या फैलावत व त्यामध्यें पुष्कळ माणसें दगावत. या सांथी कां होतात व त्यांचें निवारण करण्याचे उपाय कोणते या बाबतींत शास्त्रज्ञांनीं कांहीं शोध लाविले. १८१८ मध्यें देवीच्या साथीवर लस टोचण्याचा शोध लाविला. लुई पाश्चूर यानें अतिसूक्ष्म अशा जंतुपासून रोगांचा प्रसार होतो हा शोध लाविला. तेव्हां त्या रोगांचा फैलाव होऊं नये म्हणून प्रतिबंधक उपाय शोधून काढण्यांत आले. त्याचप्रमाणें मोकळी हवा, सांडपाण्याचा योग्य निकाल, स्वच्छता, वगैरे गोष्टींकडे स्थानिक स्वराज्य संस्थांचें लक्ष वेधण्यांत येऊन रोगांचा उद्भव होऊं नये व झाल्यास त्याचा प्रतिबंध करितां यावा या बाबतींत त्यांच्याकडून व्यवस्था करण्यांत आली.

फौजदारी गुन्ह्यासंबंधाचा कायदा—१९ व्या शतकाच्या सुरुवातीस गुन्ह्यांस देण्यांत येणाऱ्या शिक्षा गुन्ह्याच्या मानानें ठरविलेल्या नसून त्या फार कडक असत. त्यावेळीं १५० हून अधिक गुन्ह्यांस फांशीची शिक्षा असे. तेव्हां याबाबतींत सुधारणा होणें जरूर आहे म्हणून १८२४ मध्यें एक कायदा करण्यांत येऊन शिक्षा गुन्ह्याच्या मानानें ठेवण्यांत आल्या; व किरकोळ गुन्ह्याबद्दल फांशीची शिक्षा रद्द करण्यांत आली. यानंतर १८६१ मध्यें खून राजद्रोह वगैरे थोड्या गुन्ह्यांसच फांशीची शिक्षा ठेवण्यांत आली. तसेंच पुढें कर्जबाजारीपणाबद्दल तुरुंगवासाची शिक्षा, व स्त्रियांस फटके मारण्याची शिक्षा बंद करण्यांत आली.

तुरुंगाची स्थिति व तेथें कैद्यांस देण्यांत येणारी वागणूक फारच वाईट होती. तेव्हां या बाबतींत सुधारणा होत जाऊन तुरुंग हे कैद्यांवर सूड घेण्यासाठीं

स्थापन केलेलें नसून ते त्यांस सुधारण्यासाठीं स्थापन केलेलें आहेत या भावनेनें तेथील व्यवस्था असावी असें ठरविण्यांत आलें.

गुलामगिरीची पद्धत ब्रिटिश साम्राज्यांतून बंद करण्यांत येते (१८३३).—अमेरिका खंड व त्यांलगतचीं बेटें यांचा शोध लागल्यावर तेथील उष्ण हवामानाच्या मळ्यांत कष्टाचीं व अवजड कामें करण्यास मध्य आफ्रिकेंतील धट्टेकट्टे निग्रो लोक पकडून नेऊन त्यास गुलाम म्हणून विकण्याचा प्रघात सुरू झाला, व या किफायतशीर धंद्यांत युरोपमधील स्पॅनिश, पोर्तुगीज, डच व इंग्लिश लोक भाग घेऊं लागले. अशाप्रकारें आफ्रिकेंतील लक्षावधि लोकांची अमेरिका व इतरत्र रवानगी करण्यांत आली. या गुलामांस देण्यांत येणारी वागणूक अमानुष व क्रूरपणाची होती. ही गुलामगिरीची पद्धत अमानुष व निर्दयपणाची आहे व ती बंद करणें जरूर आहे असें कित्येक सहृदय लोकांस वाटत होतें. १७८५ च्या सुमारास इंग्लंडमधील विल्यम विल्बरफोर्स या गृहस्थाचें या प्रश्नाकडे लक्ष वेधलें व ही पद्धत बंद करण्यासाठीं त्यानें चळवळ सुरू केली. यावेळीं ब्रिटिश लोकांच्या मालकीचें वेस्ट इंडिज बेटांत व इतरत्र मळें असून तेथें उसाचें पीक काढून साखरेची पैदास मोठ्या प्रमाणांत होत असें. या मळ्यांत कष्टाचीं कामें करण्यास गुलामांची अत्यंत जरूरी होती. या धनिक मळेवाल्यास गुलामगिरीची पद्धत बंद होऊं नये असें वाटत होतें, व कॉमन्स सभेवर त्यांचें वजन असल्यामुळें गुलामगिरीची पद्धत बंद करण्याचा कायदा पार्लमेंटकडून पास होणें अवघड होतें. तरी विल्बरफोर्स यानें या बाबतींत प्रयत्न चालविला व त्यास इतर लोकांचा पाठिंबा मिळून १८०७ मध्यें ब्रिटिश पार्लमेंटनें गुलामांचा व्यापार बंद करण्यासंबंधाचा कायदा पास केला. या कायद्यानें गुलामांचा यापुढील व्यापार बंद झाला तरी गुलामगिरीची पद्धत बंद झालेली नव्हती. गुलामांची संख्याही खूप असून ते विकत घेतांना गुलामांच्या मालकांस खूप खर्च पडला होता. तेव्हां ही गुलामगिरीची पद्धत बंद करण्यांत येण्यासंबंधीं विल्बरफोर्स यानें आपले प्रयत्न चालविले, व शेवटीं त्याच्या प्रयत्नास यश येऊन १८३३ मध्यें ब्रिटिश पार्लमेंटनें १ आगस्ट १८३३ पासून ब्रिटिश साम्राज्यांतील गुलामगिरीची पद्धत बंद करण्यासंबंधाचा कायदा केला. ही पद्धत बंद झाल्यामुळें गुलामांच्या मालकांचें जें नुकसान होणार होतें त्याची भरपाई करण्यासाठीं २ कोटी पौंड एवढी रक्कम पार्लमेंटनें मंजूर केली. यानंतर ग्रेट ब्रिटनच्या प्रोत्साहनानें युरोप व

अमेरिका व इतर ठिकाणच्या राष्ट्रांनीं आपल्या देशांतील गुलामगिरीची पद्धत बंद केली. फ्रान्सनें १८४८ मध्यें व अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें या राष्ट्रानें १८६५ मध्यें ही पद्धत बंद केली.

उद्योगधंदे, व्यापार व दळणवळण—

इंग्लंडच्या व्यापारास व नौका बांधण्याच्या धंद्यास उत्तेजन मिळावें म्हणून १६६० मध्यें नॅव्हिगेशन कायदा पास करण्यांत आला होता, व त्या कायद्याच्या जोरावर इंग्लंडनें व्यापार व उद्योगधंदे या बाबतींत आपली प्रगति केली होती, व आतां त्या कायद्याची जरूरी नव्हती म्हणून १८२३ मध्यें हा कायदा पार्लमेंटनें रद्द केला, व त्यामुळें ग्रेट ब्रिटनच्या व्यापारवृद्धीस मदतच झाली.

१८३७ मध्यें पार्लमेंटनें 'मर्यादित जबाबदारीचा जॉइंट स्टॉक कंपनी-संबंधाचा' (Limited Liabilities) कायदा पास केला. त्यामुळें मोठमोठ्या रेल्वे कंपन्या, आगबोटीच्या कंपन्या, कारखाने, गिरण्या, खाणी, कालवे वगैरे गोष्टींच्या कामांत त्या कंपन्यांचे शेअर्स घेऊन आपलें भांडवल गुंतविणें लोकांस शक्य झालें; व त्यामुळें वरील कामाच्या ब्रिटिश लोकांच्या मालकीच्या मोठमोठ्या कंपन्या स्थापन होऊन ग्रेट ब्रिटनच्या औद्योगिक प्रगतीस मदत झाली. १८२९ मध्यें इंग्लंडमध्यें पहिला रेल्वे रस्ता तयार झाला, पुढील काळांत त्याचा विस्तार झाला. १८३८ मध्यें अटलांटिक महासागर ओलांडून पहिली आगबोट गेली, व यानंतर आगबोटीनें मनुष्यांची व मालाची वहातुक करण्यासाठीं कनार्ड, पी. अँड ओ; आर एन्. एस. पी. या कंपन्या १८४० च्या सुमारास स्थापन झाल्या. १८५१ मध्यें लंडन येथें मोठें औद्योगिक प्रदर्शन भरविण्यांत आलें, व त्यामध्यें जगांतील उद्योगधंद्यांत पुढारलेल्या अशा निरनिराळ्या राष्ट्रांनीं भाग घेतल्यामुळें परस्परस्नेहसंबंध वाढण्यास व उद्योगधंदे व कलाकौशल्य यांच्या ज्ञानाची देवाणघेवाण होण्यास मदत झाली. १८३७ मध्यें विजेच्या साह्याच्यानें तारेनें बातमी पाठविण्यांत येऊं लागली व १८६५ मध्यें युरोप ते अमेरिका यामधील अटलांटिक महासागराच्या तळापासून केबल्स घालण्यांत येऊन हीं दोन्हीं खंडें तारायंत्रानें जोडण्यांत आलीं. १८७० मध्यें रबरी टायरची बायसिकल प्रचारांत येऊन गरीब व मध्यमवर्गीयांचें तें

एक स्वस्त व उपयुक्त वाहन बनलें व त्याचा फैलाव खूप झाला. १८७६ मध्यें टेलिफोनचा उपयोग प्रचारांत आला, १८८० मध्यें विजेचे दिवे प्रचारांत आले. १८९०–९६ च्या दरम्यान विजेच्या शक्तीनें ट्रामगाड्या, आगगाड्या व कारखाने चालविण्यांत येऊं लागले. १८९६ मध्यें × किरणांचा शोध लागून त्याचा वैद्यकी व इतर गोष्टींत खूप उपयोग होऊं लागला. १९०१ मध्यें युरोप व अमेरिका यामध्यें बिनतारानें संदेश पाठविण्यांत आला. विमानांचा शोध लागून हलके हलके निरनिराळ्या राष्ट्रांमध्यें विमानवहातुक सुरू झाली व तीनचार दिवसांत पृथ्वीप्रदक्षिणा करणें शक्य झालें.

फोटोग्राफी, ग्रामोफोन, सिनेमा वगैरे गोष्टीही हलके हलके सुरू झाल्या. अशाप्रकारें या काळांत निरनिराळ्या प्रकारच्या सुखसोयी उपलब्ध होऊन ग्रेट ब्रिटनमधील श्रीमान लोकांप्रमाणें बहुजनसमाजाचें जीवनही सुखी व समृद्ध होऊं लागलें.

ग्रेट ब्रिटन व आयर्लंड

(११००–१९४५)

ग्रेट ब्रिटन व आयर्लंड—ग्रेट ब्रिटनच्या शेजारी आयर्लंड हा देश असून तेथें प्राचीन काळीं केल्ट वंशाच्या लोकांची वस्ती होती. ५ व्या शतकांत तेथील लोक ख्रिस्तीधर्मी बनले. या देशांत अनेक लहान लहान राज्यें असून त्यांमध्यें वरचेवर युद्धें होत; त्यापैकीं एका राजानें इंग्लंडचा राजा २ रा हेन्री याची मदत मागितली, व ती मिळाल्यावर तेथें शांतता प्रस्थापित झाली (११७१). यानंतर तेथील राजे इंग्लंडच्या राजाचे मांडलिक झाले व तेथील कांहीं प्रदेश इंग्लंडच्या राजाच्या वर्चस्वाखालीं आला. यानंतर इंग्लंडमधील कांहीं धाडसी सरदार तेथें वस्ती करण्यास गेले व तेथील लोकांत मिसळून गेलें. १४६७ मध्यें तेथें आयरिश पार्लमेंट ही संस्था स्थापन झाली, पण तिला थोडेच अधिकार असून इंग्लंडच्या राजाच्या संमतिशिवाय कोणताही कायदा करितां येत नसे. इंग्लंडच्या राजास आयर्लंडचा राजा असेंही म्हणण्यांत येऊं लागलें. एलिझाबेदच्या कारकीर्दीत इंग्लंडमध्यें एपिस्कोपेलियन पंथ (प्रॉटेस्टंट पंथांतील उपपंथ) स्थापन झाला व तो इंग्लंडचा अधिकृत धर्म झाला, पण आयरिश लोक रोमन कॅथलिक-पंथीच राहिले. ट्यूडर काळांत तेथें बंडाळी झाली, पण ती मोडून टाकण्यांत

आल्यावर बंडांत भाग घेणाऱ्या लोकांच्या जमिनी जप्त करण्यांत येऊन त्या इंग्लंडमधील सरदारांस देण्यांत आल्या. स्टुअर्ट काळांत आयर्लंडच्या उत्तर भागांतील अल्स्टर परगण्यांत स्कॉटलंडमधील प्रेसबिटेरियन पंथाचे लोक (प्रॉटेस्टंट पंथाचा उपपंथ) मोठ्या संख्येनें वस्ती करण्यास गेले. स्टुअर्ट काळांतही आयर्लंडमध्यें बंडाळी झाली व ती कडक उपाय योजून मोडून टाकण्यांत आली. आयर्लंडमध्यें वेळोवेळीं झालेल्या बंडाळीमुळें बंडांत भाग घेणाऱ्या लोकांच्या जमिनी जप्त करून त्या प्रॉटेस्टंटपंथीयांस देऊन टाकण्यांत आल्यामुळें आयर्लंडमधील बहुजन समाज जरी रोमन कॅथलिकपंथाचा होता तरी तेथील बहुतेक सर्व जमिनी प्रॉटेस्टंटपंथीयांच्या मालकीच्या असून त्यांतील बरेंच लोक ग्रेट ब्रिटनमध्यें राहून आपल्या मुनीमांकडे आयर्लंडमधील शेत-जमीनींची व्यवस्था सोपवीत. हे मुनीम शेतावरील कुळांकडून खंड वसूल करीत, कुळानें शेतींत सुधारणा करून शेतींचें उत्पन्न वाढविलें तर खंडाची रक्कम वाढवीत पण कुळानें शेतीसुधारणा करण्यासाठीं केलेला खर्च त्यास देत नसत, शेतावरील कुळास केव्हां काढण्यांत येईल याचा नेम नसे. आयर्लंडमधील उद्योगधंद्यास उत्तेजन देण्यासाठीं सरकारकडून कांहींच प्रयत्न करण्यांत येत नसे. आयर्लंड-मधील लोकांनीं कच्चा माल पिकवावा व ग्रेट ब्रिटनच्या कारखान्यांत तयार झालेला पक्का माल खरेदी करावा असें ग्रेट ब्रिटनला वाटे. या गोष्टीमुळें आयर्लंडमधील लोकांस शेतावरील कुळें, खंडकरी, मेंढपाळ, मजूर वगैरे किरकोळ कामें करावीं लागत. आयर्लंडमधील बहुसंख्य लोक रोमन कॅथलिकपंथाचे होते, व त्यांस पार्लमेंटचे सभासद होण्यास, वकिली करण्यास, अधिकाराची जागा पतकरण्यास बंदी होती. तसेंच ते रोमन कॅथलिकपंथाचे होते तरी आयर्लंडमधील सरकारमान्य प्रॉटेस्टंट चर्चच्या व्यवस्थेसाठीं थाइथ नांवाचा करही त्यांस द्यावा लागे. तेथील पार्लमेंटसभेवर प्रॉटेस्टंट पंथी लोकांचें वर्चस्व असें व त्यांनीं आयरिश रोमन कॅथलिक लोकांविरुद्ध बरेच कडक कायदे केले होते. इ. स. १८०० मध्यें आयरिश पार्लमेंटचें ग्रेट ब्रिटनच्या पार्लमेंटशीं एकीकरण करण्यांत आलें. अशाप्रकारें आयर्लंडमधील रोमन कॅथलिकपंथी बहुजनसमाजाची स्थिति कष्टप्रद झाली होती व त्यामुळें तेथील असंतोष वाढतच गेला. तेव्हां ही स्थिति सुधारण्यासाठीं **डॉनिएल ओकोनेल** याच्या नेतृत्वाखालीं आयर्लंडमध्यें मोठी चळवळ सुरू झाली. तेव्हां १८२९ मध्यें रोमन

कॅथलिक पंथाच्या लोकांविरुद्ध जे निर्बंध होते ते 'कॅथलिक इमॅन्सिपेशन' बिल ब्रिटिश पार्लमेंटनें पास करून दूर केले, त्यामुळें आयरिश रोमन कॅथलिक-पंथीय लोकांस ब्रिटिश पार्लमेंटचे सभासद होतां आलें. त्यांनीं आयरिश लोकांच्या धार्मिक, आर्थिक व राजकीय बाबतींत ज्या अडचणी होत्या त्या दूर करण्याचा प्रयत्न चालविला. पार्लमेंटमध्यें आयरिश लोक अल्पसंख्याक होते, तरी उदारधोरणी इतर सभासदांचें व मुत्सद्यांचें त्यांस पाठबळ मिळून आयर्लंड-मधील लोकांची स्थिति सुधारण्यासाठीं पार्लमेंटनें कायदे केले.

१८६९ मध्यें लिबरल पक्षाचा पुढारी ग्लॅडस्टन हा मुख्य प्रधान असतां त्यानें आयर्लंडमधील सरकारी मदतीनें चालणारें प्रॉटेस्टंट चर्च बंद करण्याचा कायदा पास केला. १८७० मध्यें शेतजमीनीसंबंधाचा कायदा पार्लमेंटनें पास केला. या कायद्यानें मालकानें कुळाकडून येणारा खंड थकला याखेरीज अन्य कारणावरून कुळास शेतावरून काढून टाकलें तर शेती सुधारण्यासाठीं त्यानें जो खर्च केला असेल तो त्यास मिळावा अशी व्यवस्था केली. शेतजमिनीचे मालक खंडाची रक्कम खूप वाढवीत, त्यास आळा घालण्यासाठीं, त्याचप्रमाणें शेत कसणाऱ्या कुळास शेतजमीन खरेदी करणें शक्य व्हावें यासाठीं १८८१ मध्यें शेतजमिनीसंबंधाचा दुसरा कायदा पार्लमेंटनें पास केला. या कायद्यानें खंडाची रक्कम वाढविण्यावर निर्बंध घालण्यांत आले; कुळास आपला खंडकरी म्हणून हक्क इतरांस विकण्याचा हक्क मिळाला, योग्य किंमत देऊन शेतजमीन खरेदी करतां यावी म्हणून शेतावरील कुळांस कर्जाऊ रक्कम देतां यावी म्हणून सरकारमार्फत फंड स्थापन करण्यांत आला.

धार्मिक व आर्थिक बाबतींत जरी वरील सुधारणा करण्यांत आल्या तरी ब्रिटिश पार्लमेंटमध्यें आयर्लंडचे प्रतिनिधी अल्पसंख्याक असल्यामुळें आयर्लंडचा राज्यकारभार वेगळा असल्याखेरीज आयर्लंडची सर्व दृष्टीनें प्रगति व्हावयाची नाहीं असें आयर्लंडमधील देशभक्तांस वाटूं लागलें. तेव्हां १८०० मध्यें आयरिश पार्लमेंटचें ब्रिटिश पार्लमेंटशीं झालेलें एकीकरण रद्द करावें व आयर्लंडमध्यें वेगळें पार्लमेंट स्थापन करून त्यास जबाबदार असलेल्या मंत्रिमंडळामार्फत आयर्लंडचा राज्यकारभार करण्यांत यावा, म्हणजे आयर्लंडला '**होमरूल**' किंवा 'स्वराज्य' मिळावें यासाठीं १८७५ मध्यें **पार्नेल** याच्या नेतृत्वाखालीं मोठी चळवळ सुरू झाली. ही चळवळ आयर्लंडमध्यें सर्वत्र पसरून तेथील

असंतोष वाढत गेला; व कांहीं जहाल लोकांकडून दंगेधोपेहीं होऊं लागले. तेव्हां आयर्लंडला होमरूल दिल्याखेरीज तेथील असंतोष नाहींसा व्हावयाचा नाहीं व तेथें शांतता नांदावयाची नाहीं असें लिबरल पक्षाचा पुढारी ग्लॅडस्टन यास वाटूं लागलें. पण या प्रश्नासंबंधीं लिबरल पक्षामध्यें मतभेद होता. आयर्लंड हें ग्रेट ब्रिटनच्या जवळ असल्यामुळें त्यास होमरूल मिळून तेथील राज्यकारभार वेगळा होऊं लागल्यास युद्धाच्या वेळीं बिकट परिस्थिति निर्माण होईल असें लिबरल पक्षांतील कांहीं लोकांस वाटत होतें. कॉझरव्हेटिव्ह पक्षाचे लोक होमरूलच्या विरुद्ध होते. आयर्लंडला होमरूल मिळाल्यास आयर्लंडमधील बहुसंख्य असलेल्या रोमन कॅथॅलिक लोकांचें तेथें वर्चस्व स्थापन होईल व आपल्या विरुद्ध त्यांचें धोरण असेल असें अल्स्टर परगण्यांतील प्रॉटेस्टंट पंथीयांस वाटत होतें व आयर्लंडला होमरूल देण्यास त्यांचा विरोध होता. अल्स्टर परगण्यांत प्रॉटेस्टेंट पंथीय बहुसंख्याक होते; पण सर्व आयर्लंडमध्यें त्यांची लोकसंख्या $\frac{1}{3}$ पेक्षां कमी होती. तेव्हां ग्लॅडस्टन यानें १८८६ मध्यें व त्यानंतर १८९३ मध्यें आयर्लंडला होमरूल द्यावें म्हणून पार्लमेंटपुढें बिल आणलें पण तें पास झालें नाहीं. तेव्हां आयर्लंडमधील असंतोष वाढत गेला; व कांहीं लोकांकडून घातपाती रूत्येंहीं व्हावयास लागलीं. सनदशीर मार्गानें आयर्लंडला होमरूल मिळत नाहीं हें पाहून कांहीं जहाल लोकांनीं **'सिन फेन'** (आमचें आम्हीं) या नांवाचा एक वेगळा क्रांतिकारक पक्ष काढला व ग्रेट ब्रिटनशीं संबंध सोडून देऊन आयर्लंडचें एक स्वतंत्र लोकसत्ताक राज्य स्थापन करण्याचें उद्दिष्ट लोकांपुढें ठेवलें, व त्यासाठीं जरूर तर दंगेधोपे व सशस्त्र चळवळ करण्याचें ठरविलें. **डी व्हॅलेरा** हा या पक्षाचा पुढारी होता; व या प्रश्नासंबंधीं मोठी खळबळ माजली. युरोपमध्यें १९१४ मध्यें महायुद्ध सुरू झाल्यावर १९१६ मध्यें आयर्लंडमध्यें बंडाळी झाली. पण कडक उपाय योजून ती मोडण्यांत आली. तेव्हां सिनफेन पक्षानें ग्रेट ब्रिटनशीं असलेला संबंध सोडला व वेगळें पार्लमेंट स्थापन करून डी व्हॅलेरा यास आयर्लंडच्या लोकसत्ताक राज्याचा अध्यक्ष केलें (१९१९). ग्रेट ब्रिटननें आयर्लंडच्या स्वतंत्र राज्यास मान्यता दिली नाहीं, व त्यामुळें आयर्लंडमध्यें आयरिश लोक व ब्रिटिश यांच्यामध्यें चकमकी होऊं लागल्या व पुष्कळ अत्याचाराचीं रूत्यें होऊं लागलीं. उत्तरेकडील अल्टर परगण्यांतील प्रॉटेस्टंट-पंथीयांचा ग्रेट ब्रिटनला पाठिंबा होता. तेव्हां शेवटीं १९२२ मध्यें ग्रेट ब्रिटननें

दक्षिण आयर्लंडला (अल्स्टरखेरीज) होमरूल देण्याचा कायदा पास केला. या कायद्यानें कॅनडा वसाहतीप्रमाणें आयर्लंडला स्वराज्याचे हक्क देण्यांत येऊन त्यास **'आयरिश फ्री स्टेट'** असें म्हणण्यांत आलें. आयर्लंडच्या अधिकाऱ्यांनीं इंग्लंडच्या राजाशीं राजनिष्ठ असावें असें ठरविण्यांत आलें. उत्तर आयर्लंडचा (अल्स्टर) कारभार वेगळा राहून तेथून ब्रिटिश पार्लमेंटला सभासद पाठविण्यांत येतात.

कॅनडाप्रमाणें दक्षिण आयर्लंडला मिळालेल्या 'होमरूल'नें डी व्हॅलेरा याचें समाधान झालें नाहीं. सर्व आयर्लंडचें स्वतंत्र लोकसत्ताक राज्य असावें अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती, व त्यासाठीं त्यानें प्रयत्न चालविले. पण आयर्लंडमध्यें होमरूल स्थापन झाल्यावर होमरूल पक्षाचा कॉसग्रेव्ह हा अध्यक्ष निवडून आला (१९२२ ते १९३१). यांच्या कारकीर्दीत सर्वत्र स्थिरस्थावरता करण्यांत आली व उत्तर आयर्लंड व दक्षिण आयर्लंड यांमधील वैरभाव नष्ट करण्यांत आला. आयर्लंड हें 'राष्ट्रसंघ या संस्थेचे सभासद झालें.

यानंतर होमरूल पक्ष मागें पडून आयर्लंडचें स्वतंत्र लोकसत्ताक राज्य असावें असें वाटणारा लोकसत्ताक पक्ष प्रबळ होऊन त्या पक्षाचा पुढारी डी. व्हॅलेरा हा अध्यक्ष झाला. या पक्षानें इंग्लंडच्या राजाशीं राजनिष्ठ रहाण्याची शपथ रद्द केली (१९३३) व यानंतर १९३७ मध्यें आयर्लंडची वेगळी राज्यघटना करून दक्षिण आयर्लंड हें स्वतंत्र लोकसत्ताक राज्य असल्याचें जाहीर केलें व त्यास एर (Eire) हें प्राचीन नांव दिलें. उत्तर आयर्लंड (अल्स्टर) मात्र वेगळें असून तेथून ब्रिटिश पार्लमेंटमध्यें सभासद जातात.

ग्रेट ब्रिटन व हिंदुस्थान (भारत)– १८१८ पासून १९५२ पर्यंतची भारतासंबंधाची हकीकत या प्रकरणांत पुढें 'अर्वाचीन भारत' या विभागांत दिली आहे.

ब्रिटिश साम्राज्य व कॉमनवेल्थ (स्वसत्ताक राष्ट्रांचा संघ)

ब्रिटिश साम्राज्य व कॉमनवेल्थचें श्रेष्ठत्व— इ. स. १६०० पासून १९४७ पर्यंतच्या काळांत जगांतील पांचही खंडांतील निरनिराळे देश, वसाहती, विस्तृत प्रदेश, महत्त्वाचीं ठाणीं, ग्रेट ब्रिटनच्या वर्चस्वाखालीं आलीं. हा सर्व

प्रदेश ग्रेट ब्रिटनच्या वर्चस्वाखालीं आल्यामुळें जगाच्या एकंदर क्षेत्रफळाच्या $\frac{1}{4}$ भागावर ब्रिटिश साम्राज्य पसरलें; त्याचप्रमाणें जगाच्या एकंदर लोकसंख्येपैकीं सुमारे $\frac{1}{5}$ लोकसंख्या ब्रिटिश साम्राज्यांत मोडूं लागली १९४७ च्या सुमारास ब्रिटिश साम्राज्यांतील एकूण लोकसंख्या सुमारें ५० कोटी होती. त्यांत सुमारें ८ कोटी गौरवर्णाचे असून व बाकीच्या सुमारें ४२ कोटी लोकसंख्येमध्यें तपकिरी, काळ्या व पीत वर्णाचे लोक होते. तसेंच ब्रिटिश साम्राज्यांत हिंदु, ख्रिश्चन, मुसलमान, बौद्ध, झोरोस्ट्रिअन, ज्यू वगैरे निरनिराळ्या धर्माचे लोक आहेत, व त्यांची संस्कृति, राहणी, आचार विचार, भाषा वगैरे बाबतींतहि पुष्कळ भिन्नता आहे. अशाप्रकारें क्षेत्रफळ, लोकसंख्या, संपत्ति व सामर्थ्य या सर्व बाबतींत ब्रिटिश साम्राज्य जगांत होऊन गेलेल्या व अस्तित्वांत असलेल्या कोणत्याहि साम्राज्यापेक्षां श्रेष्ठ होतें.

ग्रेट ब्रिटनचे ब्रिटिश साम्राज्यांतील देशांशीं संबंध— ब्रिटिश साम्राज्यांत मोडणाऱ्या निरनिराळ्या देशांतील राज्यघटना, तेथील राज्यकारभाराची पद्धत व त्यांचे ग्रेट ब्रिटनशीं संबंध यांमध्यें बराच फरक आहे. यांपैकीं कांहीं देशांस ग्रेट ब्रिटनच्या पार्लमेंटनें स्वराज्याचे अधिकार दिलेले असून अंतस्थ बाबींची सर्व व्यवस्था तेथील लोकांकडेच सोंपविली आहे; इतकेंच नव्हें तर १९३१ मध्यें ब्रिटिश पार्लमेंटनें पास केलेल्या '**स्टॅटयूट ऑफ वेस्ट मिनस्टर**' या कायद्यान्वयें त्या वसाहतींचा दर्जा ग्रेट ब्रिटनच्या बरोबरीचा समजण्यांत येऊन साम्राज्यांतून व कॉमनवेल्थमधून फुटून बाहेर पडण्याचाहि त्यांस अधिकार देण्यांत आला आहे. हा अधिकार ज्या देशांस मिळालेला आहे त्यांस '**डोमिनियन**' असें म्हणण्यांत येतें. कांहीं देशांस अंतस्थ बाबींसंबंधाचे थोडे अधिकार देण्यांत आले आहेत, कांहीं देशांस ते मुळींच नसून ते पूर्णपणें ग्रेट ब्रिटनच्या वर्चस्वाखालीं आहेत. ब्रिटिश साम्राज्यांतील निरनिराळ्या देशांतील राज्यपद्धतीमध्यें असा भेद आहे, तरी त्या सर्व देशांवर ग्रेट ब्रिटनचें पार्लमेंट, ग्रेट ब्रिटनचें कॅबिनेट व ग्रेट ब्रिटनचें न्यायकोर्ट यांचें वर्चस्व असून ग्रेट ब्रिटनचा राजा (किंवा राणी) हा साम्राज्यांतील सर्व प्रदेशांचा राजा आहे असें मानण्यांत येतें. ग्रेट ब्रिटनच्या पार्लमेंटनें केलेल्या कायद्यांनींच निरनिराळ्या देशांतील राज्यघटना ठरविण्यांत आल्या. ग्रेट ब्रिटनच्या कॅबिनेटच्या सल्ल्यावरूनच साम्राज्यांतील निरनिराळ्या

देशांवर गव्हर्नर जनरल, व्हॉइसरॉय, गव्हर्नर, हाय कमिशनर, एजंट वगैरे मोठमोठे अधिकारी इंग्लंडचा राजा नेमितो. डोमिनियनांच्या बाबतींत तेथील कॅबिनेट (मंत्रीमंडळ) याच्या सल्ल्यावरून तेथील वरील मोठमोठे अधिकारी राजा नेमितो. ग्रेट ब्रिटनच्या कॅबिनेटमधील डोमिनियन सेक्रेटरी, वसाहतींचा सेक्रेटरी व हिंदुस्थानचा सेक्रेटरी (हिंदुस्थान १९४७ मध्यें स्वतंत्र होण्यापूर्वी) निरनिराळ्या देशांच्या राज्यकारभाराबर देखरेख ठेवितात. ग्रेट ब्रिटनच्या प्रीव्ही कौन्सिलच्या न्यायकोर्टाकडे साम्राज्यांतील निरनिराळ्या देशांतील वरिष्ठ न्यायकोर्टानें दिलेल्या निकालाविरुद्ध अपील करण्यांत येतें.

स्वसत्ताक वसाहतींस (डोमिनियन्स) आपल्या इच्छेप्रमाणें आपलें व्यापास-विषयक धोरण ठरवितां येतें, परंतु राजकीय बाबींसंबंधी परराष्ट्रांशीं व्यवहार करतां येत नाहीं, व आपलें परराष्ट्रीय धोरण ठरवितां येत नाहीं.

ब्रिटिश साम्राज्य व कॉमनवेल्थ यांमधील देश व त्यांस असलेले अधिकार—ब्रिटिश साम्राज्यांतील निरनिराळ्या देशांस जे अधिकार मिळालेले आहेत त्यावरून त्यांचे (१) डोमिनियन्स (२) ताब्यांतील किंवा अंकित प्रदेश (क्राऊन कॉलनीज) (३) संरक्षित राज्यें (Protected States) असें वर्गीकरण करण्यांत येतें.

(१) **डोमीनियन्स**—ग्रेट ब्रिटनच्या पार्लमेंटनें ब्रिटिश साम्राज्यांतील कांहीं वसाहतींस स्वराज्याचे हक्क दिले म्हणून तेथील अंतस्थ बाबींसंबंधानें कायदे करण्याचा अधिकार तेथील लोकनियुक्त कायदेमंडळास आहे. या कायदेमंडळास जबाबदार असलेलें मंत्रीमंडळ तेथील राज्यकारभार करते. सध्या ब्रिटिश कॉमनवेल्थमध्यें (१) कॅनडा (२) आस्ट्रेलिया (३) न्यू झीलंड (४) दक्षिण आफ्रिका (५) न्यू फाऊंडलंड हीं डोमिनियन्स आहेत. परराष्ट्रीय बाबींखेरीज इतर बाबतींत तीं स्वसत्ताक आहेत व त्यांस कॉमनवेल्थमधून फुटून बाहेर पडण्याचा व पूर्णपणें स्वतंत्र होण्याचाही अधिकार आहे. अशा-रीतीनें पूर्णपणें स्वतंत्र होण्याचें त्यांनीं ठरविल्यास त्यांस परराष्ट्रीय राजकीय धोरणही स्वतःच्या इच्छेप्रमाणें ठरवितां येईल.

याखेरीज ब्रिटिश कॉमनवेल्थमध्यें (स्वसत्ताक राष्ट्रांचा संघ) भारत, पाकिस्तान व सीलोन हीं राष्ट्रें आहेत, पण तीं पूर्णपणें स्वतंत्र असून त्यांस आपलें

परराष्ट्रीय राजकीय धोरण आपल्या स्वतःच्या इच्छेप्रमाणें ठरवितां येतें. भारत हें स्वतंत्र लोकसत्ताक संघराज्य आहे, व हें कॉमनवेल्थमध्यें असलें तरी ग्रेट ब्रिटनच्या राज्यकर्त्यास राजा किंवा राणी म्हणून मान्यता न देतां कॉमनवेल्थ-मधील स्वसत्ताक राष्ट्रांपैकीं प्रमुख म्हणून त्याकडून मान्यता देण्यांत येते. ब्रह्मदेश हें राष्ट्र कॉमनवेल्थमधून बाहेर पडलें आहे.

(२) ताब्यांतील किंवा अंकित प्रदेश (क्राऊन कॉलनीज)—यांमध्यें लहानमोठे असे अनेक देश व ठाणीं येतात. यांपैकीं कांहीं ठिकाणीं तेथील सरकार व लोक यांनीं निवडलेलीं कायदेमंडळें आहेत, पण त्यास थोडे अधिकार आहेत. या प्रदेशांस स्वराज्याचे अधिकार मिळालेले नाहींत. यामध्यें खालील प्रदेश मोडतात :—अमेरिकेंतील—ब्रिटिश हांडूरास, ब्रिटिश गयाना, बहामा, जमेका, बारबेडास, लीवर्ड बेटें, विंडवर्ड बेटें, ट्रिनीडाड, टोबॅगो, फॉकलंड बेटें; आस्ट्रेलेशियांतील ब्रिटिश न्यू गयाना; आशिया खंडांतील—स्ट्रेटस सेटलमेंट, मॉरिशस, ब्रिटिश बोर्निओ, हाँग काँग, फिजी बेटें; आफ्रिका खंडांतील बसोटा लँड, ऱ्होडेशिया, गँबिया, सीरिआलोने, गोल्ड कोस्ट, केनेया, ब्रिटिश पूर्व आफ्रिका, सेंट हेलना; युरोप खंडांतील जिब्राल्टर, माल्टा, सायप्रस, हीं होत.

(३) संरक्षित राज्यें—या राज्यांस अंतस्थ बाबींसंबंधानें बरीच स्वतंत्रता आहे, परंतु परराष्ट्रीय बाबींसंबंधानें तीं ग्रेट ब्रिटनच्या वर्चस्वाखालीं आहेत. हीं संरक्षित राज्यें म्हणजे—उत्तर ऱ्होडेशिया, बेचूनालँड, स्वॅझीलिंड, नायजेरिया, युगांडा व झांजीबार, नॅसालँड, सोमालीलँड, (२) आशिया खंडांतील वई-ही-वई, मलाया संस्थानांचा संघ हीं होत.

ग्रेट ब्रिटनच्या देखरेखीखालीं आलेले प्रदेश—(Mandated Territories) यांखेरीज १ ल्या महायुद्धानंतर तुर्कस्थानचें मेसापोटेमिया (इराक) व पॅलेस्टाईन, जर्मनीचे जर्मन ईस्ट आफ्रिका (टँगानिका) हे मोठाले प्रदेश राष्ट्रसंघ या संस्थेमार्फत कांहीं वर्षांपुरतें ग्रेटब्रिटनच्या देखरेखीखालीं आले आहेत.

त्याचप्रमाणें जर्मनींचें नैर्ऋत्य आफ्रिका, पॅसिफिक समुद्रांतील न्यू गायना व सॅमोआ हे प्रदेश अनुक्रमें ब्रिटिश दक्षिण आफ्रिका, आस्ट्रेलिया, व न्यू झीलंड यांच्या देखरेखीखालीं राष्ट्रसंघ या संस्थेकडून देण्यांत आले आहेत.

(क) अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें या राष्ट्राचा उदय विस्तार व वैभव

(१७८३ ते १९५२)

अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें या राज्याची स्थापना—४ जुलै १७७६ रोजीं अमेरिकेंतील इंग्लिश वसाहतींनीं आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें व इंग्लंडशीं युद्ध झाल्यावर १७८३ मध्यें इंग्लंडनें त्यास मान्यता दिली. यानंतर फिलाडेल्फिया येथें एक घटनासमिति नेमण्यांत येऊन तिनें या राष्ट्राची घटना तयार केली व 'अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें' हें एक लोकसत्ताक संघराज्य :(Federation) स्थापन केलें (१७८९). हें राज्य स्थापन झालें त्यावेळीं त्यांत १३ च संस्थानें (वसाहती–राज्यें) होतीं, पण पुढें पश्चिमेकडील पॅसिफिक समुद्रापर्यंतचा विस्तृत प्रदेश या राष्ट्रास मिळून तेथें स्थापन करण्यांत आलेल्या वसाहती या राष्ट्रांत सामील झाल्यामुळें या संघराज्यांत सध्यां ४८ संस्थानें आहेत.

अ. सं. सं. या राष्ट्राची राज्यघटना—या राष्ट्राच्या राज्यघटनेमध्यें कायदा करणें, राज्यकारभार करणें, व न्याय देणें हीं तीन प्रमुख कर्तव्यें करणाऱ्या संस्था एकमेकांपासून वेगळ्या ठेवण्यांत आल्या आहेत. कायदे करण्यासाठीं स्थापन झालेल्या कायदेमंडळास (पार्लमेंटास) काँग्रेस असें म्हणतात. त्यांत सीनेट व हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्ह अशा दोन सभा आहेत व त्यांस सारखेच अधिकार आहेत. सीनेट या सभेमध्यें लहान मोठ्या अशा प्रत्येक संस्थानांच्या कायदेमंडळानें निवडलेले प्रत्येकीं दोन सभासद् असतात. हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्ह या सभेमध्यें वेगवेगळ्या संस्थानांत लोकसंख्येच्या प्रमाणांत निवडलेले सभासद् असतात. या दोन्हीं सभांकडे कायदे करण्याचें काम असतें. राज्यकारभार करण्यासाठीं अध्यक्षाची निवडणूक करण्यांत येतें. अध्यक्ष आपण नेमलेल्या सेक्रेटरी (मंत्री) मार्फत राज्यकारभार करितात. या सेक्रेटरींच्या नेमणुकीस सीनेटची संमति असावी लागते. हे सेक्रेटरी आपल्या कारभाराबद्दल अध्यक्षासच जबाबदार असतात. अध्यक्ष व हे सेक्रेटरी कायदेमंडळाचे सभासद् नसतात, पण सेक्रेटरी यास कायदेमंडळाच्या बैठकींच्या वेळीं हजर रहातां येतें, व तेथील चर्चेमध्यें भाग घेतां येतो, पण हे कायदेमंडळाचे सभासद् नसल्यामुळें

त्यांस तेथें मत देतां येत नाहीं. निरनिराळ्या संस्थानांतील मतदार अध्यक्षाच्या निवडणुकीसाठी आपले प्रतिनिधी निवडतात व हे प्रतिनिधी अध्यक्षाची निवडणूक करतात. अशारीतीनें अध्यक्षाची निवडणूक अप्रत्यक्षपणें होतें. ही निवडणूक दर चार वर्षांनीं होतें. काँग्रेसची (जॉइ) बैठक भरवून त्यापुढें सरकारी धोरण अध्यक्षास मांडतां येते. काँग्रेसनें केलेल्या कायद्याप्रमाणें अध्यक्षास राज्यकारभार करावा लागतो. अध्यक्षाकडून काँग्रेसनें केलेल्या कायद्याप्रमाणें राज्यकारभार करण्यांत येतो कीं नाहीं व अध्यक्षाकडून आपल्या अधिकाराचें अतिक्रमण झालें आहे कां हें पहाण्याचें काम मुख्य न्यायकोर्टाकडे सोंपविलेलें आहे. या मुख्य न्यायकोर्टातील न्यायाधिशांची नेमणूक सीनेटच्या संमतीनें अध्यक्ष करतो व ती तहाहयात असते. या सुप्रीम कोर्टाकडे इतर कोर्टांच्या निकालाविरुद्ध अपील ऐकण्याचें कामही असतें. अशाप्रकारें राज्यकारभार करणारा प्रमुख अधिकारी–अध्यक्ष व कायदे करणारी काँग्रेस या संस्था लोकनियुक्त असून कोणाचेही दुसऱ्यावर दडपण पडूं नये म्हणून त्या एकमेकापासून वेगवेगळ्या ठेविल्या आहेत. पूर्वी राजकीय पक्ष अस्तित्वांत नव्हते त्यावेळीं या संस्था एकमेकांपासून वेगवेगळ्या होत्या, पण पुढें राजकीय पक्ष अस्तित्वांत आल्यामुळें कायदा करणें, राज्यकारभार करणें यांमधील संघटन वाढलें आहे. तरी अध्यक्षाची निवडणूक व काँग्रेसमधील सभासदांची निवडणूक वेगवेगळ्या वेळीं होत असल्यामुळें काँग्रेसमध्यें ज्या पक्षाचें बहुमत आहे त्या पक्षाचाच अध्यक्ष कांहीं काळ तरी असेलच असें नाहीं.

राष्ट्राच्या सुरुवातीच्या अडचणी—अ. सं. सं. हें राष्ट्र स्थापन झाल्यावर ज्यांस इंग्लंडशीं संबंध सोडावयाचा नव्हता असें वसाहतींतील पुष्कळ राजनिष्ठ लोक हें राज्य सोडून उत्तरेकडील इंग्लंडच्या वर्चस्वाखालीं असलेल्या कॅनडा या वसाहतींत गेले. या तेरा वसाहतींचें एक संघराज्य स्थापन झालें तरी त्यांत एकराष्ट्रीयत्वाची भावना निर्माण झाली नव्हती. या निरनिराळ्या वसाहतींचें हितसंबंध वेगवेगळे होते. उत्तर विभागांतील संस्थानांतील उद्योगधंदे म्हणजे मच्छिमारी, केसाळ कातडी जमविणें, किरकोळ कारखाने चालविणें हे होत. १७९३–१८१५ पर्यंत इंग्लंड व फ्रान्स यांच्यामध्यें युद्ध असल्यामुळें इंग्लंडकडून येणारा पक्का माल पुष्कळच कमी झाला व त्यामुळें उत्तर विभागांत असलेल्या संस्थानांतील कारखाने व गिरण्या यांच्या मालास मागणी वाढून त्यांची भरभराट

होत गेली व हलके हलके तेथें मोठमोठे उद्योगधंदे स्थापन झाले. दक्षिण विभागांतील संस्थानांचे उद्योगधंदे म्हणजे कापूस, तंबाखू, ऊस वगैरे पिकांची मोठ्या प्रमाणांत लागवड करणें हे होते. शेतांतील पिकांची लागवड करणें, व शेतावरील काबाड-कष्टाचें काम करणें यासाठीं आफ्रिका खंडांतून आणलेल्या निग्रो गुलामांचा उपयोग करण्यांत येई त्यामुळें तेथील निग्रो गुलामांची संख्या वाढतच गेली. उत्तरेकडील संस्थानांत गुलामांची संख्या कमी होती. गुलामगिरीची अमानुष पद्धत बंद व्हावी असें त्यांस वाटत होतें, व त्यामुळें या संस्थानांनीं गुलामाच्या पद्धतीविरुद्ध कायदे केले. दक्षिणेकडील संस्थानांत मळ्यांतील काबाडकष्टाचीं कामें करण्यांस गुलामांची जरूरी असल्यामुळें गुलामगिरीची पद्धत बंद होऊं नये असें त्यांस वाटत होतें. उत्तरेकडील संस्थानांतील उद्योगधंदे वाढत गेले तरी युरोपमधील युद्ध थांबल्यावर (१८१५) औद्योगिक क्रान्तीमुळें यंत्राच्या साहाय्यानें व मानवेतर शक्तीचा उपयोग करून तयार झालेला मुबलक व स्वस्त माल अ. सं. सं. या देशांत येऊं लागला. तेव्हां अमेरिकेंतील कारखानदारांस इंग्लंडच्या चढाओढीची भीति वाटूं लागली व त्यामुळें देशी उद्योगधंद्यास उत्तेजन द्यावें म्हणून परकीय मालावर संरक्षित जकात ठेवावी अशी उत्तरेकडील संस्थानांची मागणी होती. दक्षिणेकडील संस्थानांत गिरण्या व कारखाने कमी होते, व संरक्षित जकाती ठेवल्यास जिनसा महाग होतील म्हणून संरक्षित जकाती बसवूं नयेत असें त्यांस वाटत होतें. अशा प्रकारें उत्तर विभागांतील संस्थानें व दक्षिण विभागांतील संस्थानें यांच्या धोरणामध्यें विरोध होता.

प्रदेशविस्तार व लोकसंख्येंत वाढ (१८०३-१८७०)—अ. सं. सं. या राष्ट्रांत पूर्वेकडील अटलांटिक महासागराच्या किनाऱ्यावरील १३ वसाहती सुरुवातीस होत्या. यानंतर १८०३ मध्यें या वसाहतीच्या पश्चिमेकडे असलेली ल्यूसीआना ही विस्तृत फ्रेंच वसाहत जेफरसन हा अध्यक्ष असतांना १½ कोट डॉलर किंमतीस फ्रान्सकडून विकत घेण्यांत आली. त्यामुळें पश्चिमेकडील ८ लक्ष चौरस मैलांचा विस्तृत प्रदेश अ. सं. सं. या राष्ट्राच्या वर्चस्वाखालीं आला. १८५५ च्या तहानें फ्लॉरिडा ही वसाहत स्पेनकडून मिळाली होती; व १८४५ मध्यें टेक्सास नांवाचा विस्तृत प्रदेश मेक्सिकोशीं युद्ध करून मिळाला. कॅनडाच्या वायव्येकडील अलास्का हा प्रदेश १८६७ मध्यें रशियाकडून विकत घेण्यांत आला. अशारीतीनें पश्चिमेकडील पॅसिफिक महासागरापर्यंतचा विस्तृत

प्रदेश अ. सं. सं. या राष्ट्राच्या वर्चस्वाखालीं येऊन तेथें टेक्सास, न्यू मेक्सिको, कॅलिफोर्निया, नेवाडा, आरेगॉन, मोनटॅना वगैरे वसाहती स्थापन झाल्या.

हा विस्तृत प्रदेश अ. सं. सं. या राष्ट्राच्या वर्चस्वाखालीं आला तरी तेथें लोकवस्ती फारच कमी होती. तेथील मूळच्या रेड इंडियन लोकांची वस्ती फारच तुरळक होती. पण यानंतर १८५०–१९०० पर्यंतच्या काळांत या प्रदेशांतील वस्ती वाढत गेली. युरोपमधील निरनिराळ्या राष्ट्रांतील लोक तेथील राजकीय, धार्मिक, आर्थिक व सामाजिक जुलमास व परिस्थितीस कंटाळून आपलें नशीब काढण्यासाठीं अ. सं. सं. या राष्ट्रांत येऊं लागले व अ. सं. सं. या राष्ट्रानें त्यांच्या येण्यास प्रोत्साहनच दिलें. अशाप्रकारें युरोपमधील जर्मनी, आस्ट्रिया, आयर्लंड, फ्रान्स, रशिया, बाल्कन द्वीपकल्प, हंगेरी, इटली या निरनिराळ्या देशांतील लोक अ. सं. सं. या देशांत आले. युरोपमधील वेगवेगळ्या देशांतून हे लोक आले होते तरी त्या सर्वांस नागरिकत्वाचे हक्क देण्यांत आले व ते पूर्ण अमेरिकन बनले. त्यांच्या पूर्वीच्या जरी वेगवेगळ्या भाषा होत्या, तरी अमेरिकेंत आल्यावर तेथील बहुसंख्य लोकांची इंग्लिश ही भाषा असल्यामुळें त्यांची भाषाही इंग्लिशच झाली. यांपैकीं बहुतेक लोकांनीं पश्चिमेकडील विस्तृत प्रदेशांत वस्ती केली. तसेंच पूर्वीच्या १३ संस्थानांतील कांहीं लोकही पश्चिमेकडील प्रदेशांत वसाहत करण्यासाठीं जाऊं लागले. तेथें वस्ती करण्यास जाणाऱ्या लोकांस १६० एकराचा एक विभाग असे विभाग पाडून ते अल्प किंमतींत विकण्यांत आले. गुरे पाळणें व शेती करणें हे त्यांचे पहिले उद्योगधंदे होते. त्याचप्रमाणे दक्षिणेकडील संस्थानाप्रमाणें या प्रदेशांतही कापूस, तंबाखू, ऊस, मका, गहूं, फळफळावळ वगैरे पिकांची मोठ्या प्रमाणांत लागवड करण्यांत आली. तसेंच या नवीन प्रदेशांत लोखंड, तांबें, कोळसा, तेल, सोनें, यांच्या खाणीही सांपडल्या. त्यामुळें तेथें खनिज संपत्तीही विपुल प्रमाणांत उपलब्ध होऊं लागली व तेथील लोकसंख्या वाढूं लागली. १८७० पर्यंतच्या काळांत पॅसिफिक महासागरापर्यंत जाणारा रेल्वे रस्ता नव्हता. पण यानंतर ३०–४० वर्षांत रेल्वे रस्त्यांत कल्पनातीत वाढ होऊन अटलांटिक महासागरापासून पॅसिफिक महासागरापर्यंत जाणारे असें पांच रेल्वे मार्ग तयार करण्यांत येऊन ते एकमेकांशीं जोडण्यांत आल्यामुळें २५००० मैल लांबीचा मार्ग तयार झाला. त्याचप्रमाचें पक्के रस्ते तयार होऊन त्यावर पुढें मोटारी, लॉरी व बसेस यांची वाहतूक सुरू झाली.

औद्योगीकरण—अ. सं. सं. या राष्ट्रानें स्वातंत्र्य संपादन केलें त्यावेळीं त्या राष्ट्राचे उद्योगधंदे अगदीं बाल्यावस्थेंत होते व ते घरगुती स्वरूपाचे होते. पक्क्या मालासाठीं त्यांस इंग्लंडवर अवलंबून रहावें लागें. यांपैकीं बहुतेक सर्व उद्योगधंदे उत्तरेकडील संस्थानांत होते. १७७५–१८३० पर्यंतच्या काळांत इंग्लंडमध्यें औद्योगिक क्रान्ति होऊन यंत्रशक्तीनें मोठ्या प्रमाणांत मालाची पैदास होऊं लागली. ही औद्योगिक क्रान्ति अ. सं. सं. या राष्ट्रांतही पसरली. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत उत्तरेकडील संस्थानांत यंत्राच्या साहाय्यानें कापसाचें कापड करण्याच्या गिरण्या व इतर माल तयार करणारे कारखाने निघूं लागले. पण या गिरण्यांस व कारखान्यांस इंग्लंडच्या गिरण्यांशीं व कारखान्यांशीं चढाओढ करावी लागे. तेव्हां तेथील सरकारनें देशी उद्योगधंद्यास उत्तेजन देण्यासाठीं, व परकीय उद्योगधंद्यांची चढाओढ त्यांस भासूं नये म्हणून परकीय मालावर संरक्षित जकात बसविली. या जकातीमुळें जिन्नस महाग होतील म्हणून दक्षिणेकडील संस्थानांतील लोक या जकातीविरुद्ध असत. १८६१–६५ पर्यंत उत्तरेकडील व दक्षिणेकडील संस्थानांत अंतस्थ युद्ध होऊन त्यामध्यें दक्षिणेकडील संस्थानांचा पराभव झाला व अ. सं. संस्थानें या राष्ट्रानें गुलामगिरीची पद्धत कायद्यानें बंद केली (१८६५). यानंतर दक्षिणेकडील संस्थानांतही वाफेच्या शक्तीनें व यंत्राच्या साहाय्यानें चालणारे मोठमोठे कारखाने निर्माण झाले. त्याचप्रमाणें पश्चिमेकडील पॉसिफिक महासागरापर्यंतच्या विस्तृत प्रदेशांतील लोकसंख्या वाढूं लागली. या नवीन संस्थानांतील प्रदेश सुपीक होता, त्याचप्रमाणें खनिज संपत्तीच्या बाबतींतही समृद्ध होता. त्यामुळें मोठ्या प्रमाणांत शेतकी त्याचप्रमाणें कारखाने व गिरण्या त्या प्रदेशांत निघूं लागल्या. वाफेच्या शक्तीप्रमाणें तेल व वीज यांच्या शक्तींचाही पुढें उपयोग करण्यांत येऊं लागला. तारायंत्र, टेलिफोन वगैरे दळणवळणाच्या इतर साधनांचीही पुढें वाढ झाली. या सर्व गोष्टीमुळें मोठमोठ्या उद्योगधंद्यांची पुष्कळच वाढ झाली, व त्यामध्यें मालाची पैदास मोठ्या प्रमाणांत होऊं लागली. या मालास देशी बाजारपेठांप्रमाणें परदेशी बाजारपेठाही उपलब्ध झाल्यामुळें २० व्या शतकाच्या सुरुवातीस इंग्लंड, जर्मनी, जपान या राष्ट्रांप्रमाणें अ. सं. सं. हें राष्ट्रही औद्योगिक बाबतींत पुढें आलें, व पहिलें महायुद्ध सुरू झाल्यावर (१९१४) जगांतील बहुतेक सर्व राष्ट्रें महायुद्धांत गुंतलीं असतां १९१४–१७ पर्यंतच्या काळांत सर्व राष्ट्रांस

पक्का माल पुरविण्याचें काम या राष्ट्राकडे आलें व त्यामुळें इतर सर्व राष्ट्रांस मागें टाकून हें राष्ट्र औद्योगिक बाबतींत अग्रेसर बनून सर्व जगांत संपन्न व श्रीमंत झालें.

राजकीय पक्ष व कांहीं प्रसिद्ध अध्यक्ष— अ. सं. सं. या लोकसत्ताक संघ राज्यापुढें निरनिराळे प्रश्न वेगवेगळ्या वेळीं उपस्थित होते व त्यासंबंधीं कोणतें धोरण अमलांत आणावयाचें या बाबतींत मतभेद होऊन दोन राजकीय पक्ष निर्माण झाले. हे राजकीय पक्ष म्हणजे रिपब्लिक व डेमोक्रॅटिक हे होत. रिपब्लिकन म्हणजे लोकसत्तावादी व डेमोक्रॅटिक म्हणजे लोकशाहीवादी असा त्यांचा अर्थ असल्यामुळें त्यांच्या उद्दिष्टामध्यें फारसा फरक नाहीं. तरी त्यांच्या धोरणामध्यें थोडा फरक आहे. मोठमोठे उद्योगधंदे व कारखाने स्थापन होऊन त्यांची भरभराट व्हावी व त्यासाठीं जरूर पडल्यास संरक्षित जकात बसवावी असें रिपब्लिकन पक्षास (लोकसत्तावादी) वाटतें. डेमोक्रॅटिक पक्षास (लोकशाही) खुला व्यापार असावा असें वाटतें, कारण त्यामुळें जिनसा स्वस्त होऊन गरीब वर्गास त्या घेणें परवडतें. संघराज्यास जास्ती अधिकार असावेत, घटनेंत ज्यांचा उल्लेख नाहीं असे शेषाधिकार म्हणजे उरलेले अधिकार संघराज्याकडे असावेत, इतरांच्या भानगडींत न पडण्याचें अलिप्तपणाचें धोरण ठेवावें, जागतिक राजकारणांत भाग घेऊन आपल्यावरील जबाबदारी वाढवूं नये असें रिपब्लिकन पक्षास वाटतें. डेमोक्रॅटिक पक्षास संघराज्यास घटनेनें दिलेल्या अधिकारांत वाढ होऊं नये, शेषाधिकार घटक राज्यांकडे (संस्थानांकडे) असावेत, जागतिक राजकारणांत भाग घेऊन लोकशाहीच्या वाढीस मदत करावी असें डेमोक्रॅटिक पक्षाचें धोरण आहे.

अमेरिकेच्या गेल्या १७५ वर्षांच्या काळांत स्थूलमानानें खालील पक्षाचें निरनिराळ्या कालखंडांत बहुमत होतें. १७८९ ते १८०१, १८६१–१९१३, १९२१–३३ व १९५३ पासून रिपब्लिकन पक्ष अधिकारारूढ होता; व या काळांतील जॉर्ज वॉशिंग्टन, अब्राहाम लिंकन, हार्डिंग, व एसनहोअर हे महत्त्वाचे अध्यक्ष होत. १८०१–६१; १९१३–२१; १९३३ ते १९५३ पर्यंतच्या कालखंडांत डेमोक्रॅटिक पक्ष अधिकारारूढ होता व जेफरसन, अँड्रयू जॅक्सन, विड्रो विल्सन, फ्रँकलिन रुझवेल्ट हे त्यांतील प्रसिद्ध अध्यक्ष होते.

पहिला अध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन हा दोनदां अध्यक्ष झाल्यानंतर एकाच

गृहस्थाची बऱ्याच वेळां अध्यक्षपदीं निवडणूक होऊं लागल्यास ती गोष्ट लोकशाहीस हानिकारक होईल म्हणून तिसऱ्यांदा अध्यक्षपदासाठीं उभे रहाण्याचें त्यानें नाकारिलें, त्यामुळें फार तर दोन वेळांच अध्यक्ष होण्याचा संकेत (Convention) पडला गेला. २ ऱ्या महायुद्धाच्या वेळीं आणिबाणीची स्थिति उत्पन्न झाल्यामुळें रूझवेल्ट यानें हा संकेत मोडून तो तिसऱ्यांदा अध्यक्षपदासाठीं उभा राहून निवडून आला; पण त्याची मुदत भरण्यापूर्वीच तो मरण पावल्यामुळें उपाध्यक्ष ट्रुमन याच्याकडे उरलेल्या मुदतींत अध्यक्षपद गेलें.

अंतस्थ युद्ध व गुलामगिरीची पद्धत बंद—१८६१-६५ अ. सं. सं. या राष्ट्रांतील दक्षिणेकडील संस्थानांचा मुख्य उद्योगधंदा म्हणजे कापूस, तंबाखू, उस व धान्य यांची मोठ्या प्रमाणावर पैदास करणें हा होता, व शेतावरील काम करण्यास त्यांस गुलामांची आवश्यकता वाटे. पण ही गुलामगिरीची पद्धत अमानुष असून ती बंद व्हावयास पाहिजे असें अ. सं. सं. च्या उत्तरेकडील वसाहतींस वाटत होतें. उत्तरेकडील संस्थानांनीं आपल्या संस्थानांत गुलामगिरीची पद्धत बंद केलेली होती, व दक्षिणेकडील संस्थानांनींही ती बंद करावी म्हणून त्यांचे प्रयत्न सुरू होते. पण दक्षिणेकडील संस्थानांचें आर्थिक जीवन गुलामगिरीच्या पद्धतीवर अवलंबून असल्यामुळें ही पद्धत बंद करण्यास त्यांचा विरोध होता. पश्चिमेकडील प्रदेशांत नवी संस्थानें स्थापन होऊन तेथील लोकांसही गुलामगिरीची पद्धत बंद व्हावी असें वाटत होतें. तेव्हां तेथील संस्थानांतील प्रतिनिधी काँग्रेसमध्यें येऊन त्यांचे व उत्तरेकडील संस्थानांचें बहुमत होऊन गुलामगिरीची पद्धत बंद करण्याचा कायदा काँग्रेसमध्यें पास करून घेण्यांत येईल अशी त्यांस भीति वाटूं लागली; तेव्हां संघराज्यांतून (फेडरेशन) फुटून निघावें असें दक्षिणेकडील संस्थानांस वाटूं लागलें. पण संघराज्यांतून फुटून निघण्याचा अधिकार संस्थानांस नाहीं असें उत्तरेकडील संस्थानांचें म्हणणें होतें. त्याचप्रमाणें संघराज्य स्थापन होण्यापूर्वी दक्षिणेकडील संस्थानांत गुलामगिरीची पद्धत सुरू असल्यामुळें ती कायद्यानें बंद करण्याचा अधिकार संघराज्यास नाहीं असें दक्षिणेकडील संस्थानांचें म्हणणें होतें. १८६१ मध्यें **अब्राहम लिंकन** हा रिपब्लिकन पक्षाचा पुढारी अध्यक्ष म्हणून निवडून आला. गुलामगिरीची पद्धत बंद करावी असें त्याचें मत होतें, व अध्यक्ष झाल्यावर काँग्रेसकडून तो ही पद्धत बंद करण्याचा कायदा करवील असें दक्षिणेकडील

संस्थानांस वाटूं लागले. तेव्हां उत्तरेकडील संस्थानें व दक्षिणेकडील संस्थानें यांमधील वितुष्ट वाढत जाऊन १८६१ मध्यें या संस्थानांत युद्ध सुरू झालें, व तें १८६५ पर्यंत चालून त्यांत दक्षिणेकडील संस्थानांचा पराभव झाला.

यानंतर काँग्रेसनें १८६५ मध्यें कायदा करून अ. सं. संस्थानामधील गुलामगिरीची पद्धत बंद केली. ही पद्धत बंद झाल्यावर निग्रो गुलामांस कोणत्याही संस्थानांत जाऊन रोजंदारीचे मजूर म्हणून किंवा इतर कोणताही व्यवसाय करण्यास मोकळीक मिळाली.

परराष्ट्रीय धोरण व जागतिक राजकारणांत प्रवेश—अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें हें नवीन राष्ट्र निर्माण झालें (१७८३) त्यावेळीं तें अगदींच कमकुवत होतें, व आंतर्राष्ट्रीय राजकारणांत त्यास महत्त्व नव्हतें. १७९३ ते १८१५ पर्यंत इंग्लंड व फ्रान्स यांमध्यें युद्ध सुरू असतांना अ. सं. सं. या राष्ट्रानें कोणत्याही राष्ट्राच्या युद्धांत सामील न होतां अलिप्तपणाचें धोरण स्वीकारिलें. या धोरणामुळें बाल्यावस्थेंत असलेल्या अमेरिकेंतील उद्योगधंद्यांस उत्तेजन मिळालें. मध्यंतरीं १८१२–१४ मध्यें अमेरिकेंतून जाणारा माल शत्रुराष्ट्रास जात आहे कीं काय हें पहाण्याचा इंग्लंडनें आग्रह धरल्यामुळें इंग्लंड व अ. सं. सं. यामध्यें वितुष्ट येऊन किरकोळ युद्ध झालें, पण पुढें आपसांत तडजोड होऊन तें थांबविण्यांत आलें. स्पेनमध्यें बूरबॉन घराण्याची सत्ता स्थापन झाल्यावर दक्षिण अमेरिकेंतील स्वतंत्र झालेल्या स्पॅनिश वसाहती जिंकून घ्याव्यात असें स्पेनला वाटूं लागलें, पण अ. सं. सं. चा अध्यक्ष **मन्रो** यानें १८२३ मध्यें काँग्रेसला पाठविलेल्या संदेशांत 'अमेरिका खंडांतील राजकारणांत युरोपियन राष्ट्रांनीं ढवळाढवळ केल्यास ती गोष्ट शत्रुत्वाची समजली जाईल अशी इंग्लंडच्या पाठबळानें घोषणा केली. यासच **मनरोचें तत्त्व (डॉक्ट्रिन)** असें म्हणण्यांत येतें. मनरोच्या या घोषणेमुळें अमेरिका खंडांत स्थापन झालेल्या निरनिराळ्या लोकसत्ताक राज्यांचें पुढारीपण अ. सं. सं. चा राष्ट्राकडे आल्यासारखें झालें व या राष्ट्राचें महत्त्व वाढूं लागलें. मध्य अमेरिकेंतील मेक्सिको या लोकसत्ताक राज्यापासून टेक्सस हें राज्य स्वतंत्र झाल्यावर (१८३३), अ. सं. संस्थानानें त्यावर १८४३ मध्यें आपलें वर्चस्व बसविलें.

१८९५ मध्यें ग्रेट ब्रिटन व दक्षिण अमेरिकेंतील व्हेनीझुला या लोकसत्ताक

राज्यामध्यें सरहद्दीवरील प्रश्नासंबंधीं तंटा सुरू झाला. त्यावेळीं अ. सं. सं. या राष्ट्रानें मध्यस्ती करून तडजोड घडवून आणली.

मध्य अमेरिकेलगतच्या कॅरेबियन समुद्रांत उसाच्या पिकासंबंधानें प्रसिद्ध असलेलें क्यूबा बेट स्पेनच्या ताब्यांत होतें. १८९८ मध्यें तेथील लोकांनीं स्वातंत्र्य-प्राप्तीसाठीं स्पेनविरुद्ध बंड केलें, व त्यास स्पेनपासून स्वतंत्र होण्यास अ. सं. सं. यानें मदत केली. त्यामुळें अ. सं. सं. व स्पेन यांमध्यें युद्ध उपस्थित झालें. या युद्धांत स्पेनचा पराभव होऊन स्पेनच्या ताब्यांतील चीनच्या पूर्वेकडील पॅसिफिक महासागरांतील फिलीपाईन बेटें, कॅरेबियन समुद्रांतील पोर्टोरिको, गुअम हीं बेटें अ. सं. संस्थानाच्या वर्चस्वाखालीं आलीं, व क्यूबा हें बेट स्पेनपासून स्वतंत्र झालें. पण या बेटाचें स्वातंत्र्य टिकविण्यासाठीं जरूर वाटल्यास अ. सं. सं. या राष्ट्रानें तेथील राजकारणांत हात घालावा असा त्या राज्याशीं करार केला, त्यामुळें तें राज्य स्वतंत्र असलें तरी तें अ. सं. सं. या राष्ट्राचें संरक्षित राष्ट्र असल्यासारखेंच झालें.

यानंतर अ. सं. सं. या राष्ट्रानें पॅसिफिक महासागरांतील हवाई बेटें आपल्या वर्चस्वाखालीं आणलीं व तेथें आपल्या आरमाराचा तळ स्थापन केला.

१८५४ मध्यें अ. सं. सं. या राष्ट्राचा आरमारी अधिकारी पेरी यानें जपानच्या किनाऱ्यावरील दोन बंदरांत व्यापार करण्याची परवानगी मिळविली, यानंतर नागासाकी व याकोहामा या बंदरांत व्यापार करण्याची व त्याचप्रमाणें वस्ती करून राहण्याची परवानगी अ. सं. संस्थानास मिळाली. जपानप्रमाणें चीनच्या किनाऱ्यावरील बंदरांतही व्यापार करण्याची परवानगी अ. सं. सं. या राष्ट्रास मिळाली व त्यामुळें चीनच्या राजकारणांत इतर राष्ट्रांप्रमाणें अ. सं. संस्थानाचाही हात शिरूं लागला.

१९०३ मध्यें अ. सं. सं. या राष्ट्रानें पनामा संयोगभूमीच्या प्रदेशावर आपलें वर्चस्व बसविलें. त्याचप्रमाणें दक्षिण अमेरिकेंतील प्रजासत्ताक राज्यांत बंडाळी सुरू झाल्यास ती मोडण्यासाठीं (Police Action) सैन्य पाठविण्याचा आपणांस हक्क आहे हें जाहीर केलें. तसेंच अ. सं. सं. या राष्ट्रानें व या राष्ट्रांतील श्रीमान् लोकांनीं दक्षिण अमेरिकेंतील प्रजासत्ताक राज्यास रेल्वेरस्ते बांधणें, खाणी खोदणें, शेती सुधारणें वगैरे निरनिराळ्या आर्थिक योजनेस सढळ

हातांनीं मदत करून तेथील राजकारणांत अप्रत्यक्षरीतीनें आपला हात घातला असल्यामुळें या राष्ट्रांवर अ. सं. सं. या राष्ट्राचें बरेंच वजन आहे.

१९१४ मध्यें १ लें महायुद्ध सुरू झाल्यावर अ. सं. सं. या तटस्थ राष्ट्राच्या व्यापारास व जहाजांस जर्मनीपासून उपद्रव होऊं लागल्यामुळें १९१७ मध्यें अ. सं. सं. या राष्ट्रानें जर्मनीविरुद्ध युद्ध जाहीर करून तें महायुद्धांत सामील झालें.

(ड) मध्य व दक्षिण अमेरिकेंतील लोकसत्ताक राज्यें

(१८११ ते १९४५)

लॅटिन अमेरिका—मध्य व दक्षिण अमेरिका हा मोठा विस्तृत प्रदेश असून त्याचें क्षेत्रफळ भारताच्या सुमारें चौपट आहे. कोलंबसानें मध्य अमेरिकेचा शोध लावल्यावर १६ व्या शतकाच्या सुरुवातीपासून पुढील तीन शतकांत स्पेन व पोर्तुगॉल या राष्ट्रांनीं तेथील बहुतेक प्रदेश व मध्य अमेरिकेलगतचीं वेस्ट इंडिज बेटें यांवर आपलें वर्चस्व बसविलें व तेथें आपल्या वसाहती स्थापन केल्या. स्पेननें स्थापन केलेल्या तेथील महत्त्वाच्या वसाहती म्हणजे मध्य अमेरिकेंतील मेक्सिको, कॉस्टारिका, पनामा व दक्षिण अमेरिकेंतील व्हेनीझूला, कोलंबिया (न्यू ग्रनडा), इक्वेडर, पेरू, चिली, व अर्जेंटिना या होत. दक्षिण अमेरिकेंतील पोर्तुगॉलची वसाहत म्हणजे भारताच्या १½ पट मोठी असलेली ब्राझील ही होय. या वसाहतींत वस्ती करण्यास स्पेन व पोर्तुगॉल या देशांतील थोडे लोक गेले व त्यांपेक्षां फार थोड्यांनीं आपल्याबरोबर स्पॅनिश व पोर्तुगीज स्त्रिया नेल्या.त्यामुळें तेथें वसाहत करण्यासाठीं गेलेल्या लोकांपेक्षां बऱ्याच लोकांनीं तेथील मूळच्या लोकांच्या स्त्रियांशीं लग्नसंबंध केले, त्यामुळें तेथें बरीच मिश्र प्रजाही निर्माण झाली. अमेरिकेंतील मूळचे लोक, वसाहत करण्यासाठीं स्पेन व पोर्तुगॉल या देशांमधून गेलेले लोक तेथें होते, त्याचप्रमाणें तेथील मळ्यांत, खाणींत व इतर काबाडकष्टाचीं कामें करण्यास १७ व्या शतकापासून आफ्रिका खंडांतील निग्रो लोकांस गुलाम म्हणून पाठविण्यांत येत होतें, त्यामुळें त्यांचीही संख्या तेथें होती. तेथील स्पेनच्या वसाहतींत स्पॅनिश भाषा, व पोर्तुगीज वसाहतींत पोर्तुगीज भाषा बोलली जाई व या भाषा मुख्यत्वें करून लॅटिन भाषेपासून

निर्माण झाल्या असल्यामुळें मध्य व दक्षिण अमेरिकेच्या विस्तृत प्रदेशास 'लॅटिन अमेरिका' असेंही म्हणण्यांत येतें.

मध्य व दक्षिण अमेरिकेंतील सामाजिक वर्ग— स्पेनच्या वसाहतींत खालील सामाजिक वर्ग निर्माण झाले व त्यांमधील भेद हलके हलके अधिक स्पष्ट झाले. पहिला व श्रेष्ठ समजला जाणारा वर्ग म्हणजे स्पेनमधून गेलेल्या स्पॅनिश लोकांचा वर्ग होय. यांस स्पॅनिश असें म्हणत. दुसरा वर्ग म्हणजे स्पेनमधून गेलेल्या स्पॅनिश मातापित्यांपासून झालेल्या पण अमेरिकेमध्यें जन्म झालेल्यांचा वर्ग. यांस क्रेओल्स (Creoles) असें म्हणत. या वर्गास स्पेनमध्यें जन्म पावलेल्या स्पॅनिश वर्गापेक्षां कनिष्ठ मानलें जाई. तिसरा वर्ग म्हणजे स्पॅनिश पुरुष व अमेरिकेंतील मूळच्या स्त्रिया यांपासून झालेली प्रजा हा होय. या लोकांस मेस्टिझोस (Mestizos) असें म्हणत. चवथा वर्ग स्पॅनिश व निग्रो यापासून झालेली प्रजा व त्यास मलटोस असें म्हणत. पांचवा वर्ग म्हणजे निग्रो व अमेरिकेंतील मूळचे रहिवाशी यांच्यापासून झालेली प्रजा हा होय व त्यास झाँबास असें म्हणत. सहावा वर्ग म्हणजे अमेरिकेंतील मूळच्या रहिवाशांचा होता. यांपैकीं पहिल्या दोन वर्गांची लोकसंख्या फार कमी होती व इतर वर्गांचेच लोक बहुसंख्याक होते. स्पेनच्या वसाहतींप्रमाणें पोर्तुगॉलच्या ब्राझील या वसाहतीमध्येंही वरील प्रकारचे सामाजिक वर्ग निर्माण झालेले होते.

स्पेनमध्यें जन्म झालेल्यांचा वर्ग स्वतःस श्रेष्ठ समजून इतर वर्गांकडे तुच्छतेनें पाही. राज्यकारभाराच्या अधिकाराच्या जागा, व तेथील जमीनी स्पेनमध्यें जन्म पावलेल्या वर्गाकडेच असत. वसाहतीमधील लोकांचा सल्ला न घेतां तेथील राज्यकारभार करण्यांत येई व कर बसविण्यांत येई. तेथील व्यापाराबरही स्पेनचें नियंत्रण असें. तेथील वसाहतींस स्पेनखेरीज इतर देशांशीं किंवा त्यांच्या वसाहतींशीं व्यापार करण्यास बंदी होती. स्पेनकडून तेथें पाठविण्यांत येणारे व्हॉइसरॉय, गव्हर्नर व इतर अधिकारी यांचा वसाहतींतील राज्यकारभार जुलमी व अरेरावीचा असे. पोर्तुगॉलच्या ब्राझिल वसाहतींतही वरील प्रकारचीच स्थिति होती. त्यामुळें मध्य व दक्षिण अमेरिकेंतील स्पॅनिश व पोर्तुगीज वसाहतींमध्यें मातृभूमीबद्दल असंतोष उत्पन्न होऊन तो वाढत गेला, व उत्तर अमेरिकेंतील ब्रिटिश वसाहती ग्रेट ब्रिटनपासून स्वतंत्र झाल्या तसें आपणही व्हावें असें त्यांस वाटूं लागलें, व त्या अनकूल संधीची वाट पाहूं

लागल्यां. फ्रान्समध्यें राज्यक्रान्ति झाल्यावर नेपोलियनचा उदय झाला व त्यानें स्पेन व पोर्तुगॉल येथील राजांस पदच्युत केल्यावर या वसाहतींमध्यें बंडाळी होऊन स्वातंत्र्यप्राप्तीची चळवळ सुरू झाली व नेपोलियनचा पराभव होऊन स्पेन व पोर्तुगॉल येथें पूर्वीच्या राजघराण्यांची सत्ता स्थापन झाली तरी अमेरिकेंतील स्पॅनिश व पोर्तुगीज वसाहतींनीं आपलीं स्वातंत्र्य चळवळ पुढें चालवून १८११–१८२२ च्या दरम्यान स्वातंत्र्य मिळविलें व तेथें त्यांचीं वेगवेगळीं अशीं सुमारें वीस लोकसत्ताक राज्यें स्थापन झालीं. त्यांच्या या स्वातंत्र्य संपादन करण्याच्या प्रयत्नास अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें या राष्ट्रानें प्रत्यक्ष अशी लष्करी व पैशाची मदत केली नाहीं, तरी त्यांच्या प्रयत्नांस त्यांची सहानुभूति होती. या वसाहती परत जिंकून घेण्याचा स्पेन व पोर्तुगॉल या राष्ट्रांचा विचार होता. पण अ. सं. संस्थानें या राष्ट्राचा अध्यक्ष मन्रो यानें ग्रेट ब्रिटनच्या पाठिंब्यानें या गोष्टीस आपला विरोध जाहीर केला (१८२३). त्यामुळें या वसाहती जिंकून घेण्याचा स्पेन व पोर्तुगॉल या राष्ट्रांकडून प्रयत्न झाला नाहीं.

मध्य व दक्षिण अमेरिकेंतील राज्यांची प्रगति—मध्य व दक्षिण अमेरिकेंत व त्या शेजारच्या वेस्ट इंडिज बेटांमध्यें स्पेन व पोर्तुगॉल यांच्या वसाहतींप्रमाणें युरोपमधील ग्रेट ब्रिटन, फ्रान्स वगैरे राष्ट्रांच्याही कांहीं वसाहती होत्या व त्यांस स्वराज्याचे हक्क देण्यांत आले नसूनही त्या स्वतंत्र झालेल्या नव्हत्या. तेथील बहुसंख्य प्रजा युरोपियनेतर आहे. या बेटांमध्यें साखर, कापूस व तंबाखू वगैरे पिकें होतात. पण स्पेन व पोर्तुगॉल यांच्या वसाहतींनीं बहुतेक सर्व प्रदेश व्यापला होता व त्या स्वतंत्र झाल्यावर त्यांनीं अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें या राष्ट्राच्या घटनेप्रमाणें आपलीं लोकशाही पद्धतीची लोकसत्ताक राज्यें स्थापन केलीं. अशीं हीं एकूण सुमारें २० राज्यें असून त्यांपैकीं अर्जेंटिना, पेरु, चिली, व्हेनीझुला, कोलंबिया, बोलेव्हिया, मेक्सिको, ब्राझील हीं प्रमुख व मोठीं आहेत. तेथील विस्तृत प्रदेशाच्या मानानें तेथील लोकसंख्या फारच कमी होती. या राज्यांत युरोपमधील स्पेन, पोर्तुगॉल, आयर्लंड, जर्मनी, रशिया, बाल्कन द्वीपकल्प वगैरे प्रदेशांतून तेथील राजकीय व धार्मिक जुलमास कंटाळून, तसेच तेथील त्यांची आर्थिक स्थिति बिकट झाल्यामुळें दक्षिण अमेरिकेंत जाऊन आपलें नशीब काढण्यासाठीं १८३० ते १९०० च्या

दरम्यान लक्षावधि लोक झाले व ते त्या वेगवेगळ्या देशांचे कायमचे रहिवासी झाले व स्वतःस अमेरिकन समजूं लागले. मध्य व दक्षिण अमेरिकेंतील या राज्यांत लोकशाही पद्धतीची राज्यघटना असून हीं राष्ट्रें लोकसत्ताक होतीं तरी लोकशाही पद्धतीनें व्यवस्थित राज्यकारभार करण्याचा त्यांस अनुभव नसल्यामुळें व तशा प्रकारची पूर्वपरंपरा नसल्यामुळें सुरुवातीची कित्येक वर्षें तेथील राज्यकारभार अव्यवस्थित रीतीनें चालत असे. तेथील जनतेंत शिक्षणाचा प्रसारही कमी होता. त्यामुळें स्वार्थसाधु, संधिसाधु, लांचलुचपतीस बळी पडणारे, लोभी व अकर्तृत्ववान् अशा लोकांच्या हातांत तेथील राज्यकारभार जाऊन ते सार्वजनिक पैसा गिळंकृत करीत किंवा त्याची उधळपट्टी करीत. त्यामुळें कित्येक राज्यांचें दिवाळें वाजें व त्या राज्यांची हलाखीची स्थिति होई. तसेंच तेथें वरचेवर बंडाळी होऊन सर्वाधिकारी पद्धत किंवा हुकुमशाही स्थापन होई. असे प्रकार सुरुवातीस कांहीं राज्यांत होत गेले तरी पुढें ही स्थिति पालटत गेली.

आर्थिक व औद्योगिक प्रगति— हीं लोकसत्ताक राज्यें विस्तृत होतीं व तेथें विपुल उद्भिज व खनिज संपत्ति होती. पण ती उपलब्ध करून घेण्यासाठीं मोठमोठे कारखाने, गिरण्या स्थापन करणें, तेल, लोखंड, कोळसा यांच्या खाणी खोदणें, रेल्वे रस्ते, पक्के रस्ते बांधणें, इमारती बांधणें, धरणें व पाटबंधारे बांधणें, तेल, पाणी व वीज यांच्या शक्तींचा उपयोग करून घेणें जरूर होतें व त्यासाठीं भांडवलाची व तज्ज्ञांचीं जरूरी होती. तेव्हां युरोपमधील ग्रेट ब्रिटन, फ्रान्स, हॉलंड, जर्मनी, बेल्जम, तसेंच अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें या राष्ट्रांनीं व तेथील धनाढ्य नागरिकांनीं आपलें बरेंच भांडवल या राज्यांची वाढ होण्यासाठीं वरील उद्योगधंद्यांत घातलें. त्यामुळें मोठमोठे रेल्वे रस्ते तयार होऊन दळणवळण वाढलें व खाणी सुरू झाल्या. कॉफी व रबर यासाठीं ब्राझील, साखरेसाठीं क्यूबा, रूपें या खनिज पदार्थांसाठीं मेक्सिको, त्याचप्रमाणें गुरेढोरें यासाठीं अर्जेंटिना हीं राज्यें विशेष प्रसिद्धीस आलीं. त्याचप्रमाणें तेथें शाळा, कॉलेजें काढण्यांत येऊन शिक्षणाचा प्रसार झाला. त्यामुळें शेतकी, उद्योगधंदे व सांस्कृतिक बाबी या बाबतींत या राष्ट्रांची प्रगति होऊं लागली. व्यापार, भाषा व सांस्कृतिक संबंध या बाबतींत या राष्ट्रांचे अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें या राष्ट्रापेक्षां युरोपमधील राष्ट्रांशींच सुरुवातीस

बरेच निकट संबंध होते. अ. सं. सं. या राष्ट्राचा अध्यक्ष मन्रो यानें युरोपमधील राष्ट्रांनीं स्वतंत्र झालेल्या या वसाहती परत जिंकून घेण्याचा प्रयत्न केल्यास ती गोष्ट अ. सं. सं. या राष्ट्राच्या शत्रुत्वाची मानली जाईल अशी घोषणा केल्यामुळें अ. सं. सं. या राष्ट्राबद्दल मध्य व दक्षिण अमेरिकेंतील या राज्यांस कृतज्ञता वाटत होती. पण १८९८ मध्यें क्यूबा या स्पेनच्या ताब्यांत असलेल्या बेटांत स्पेनविरुद्ध बंडाळी झाली व कडक उपाय योजून ती मोडण्याचा स्पॅनिश गव्हर्नर यानें प्रयत्न केला. या बेटांत साखरेची व तंबाखूची मोठ्या प्रमाणांत लागवड होत असे व त्यांत अ. सं. सं. मधील धनाढ्य नागरिकांचें बरेंच भांडवल गुंतलेलें होतें. तेव्हां तेथें शांतता असणें जरूर आहे म्हणून अ. सं. सं. यानें स्पेनला कांहीं सूचना केल्या, पण त्या धुडकावून लाविल्यामुळें स्पेनशीं युद्ध झालें व अ. सं. सं. यानें स्पेनचा पराभव करून क्यूबा, पोर्टोरीको, व दक्षिण पॅसिफिक महासागरांतील फिलीपाईन बेटें जिंकून घेतलीं. यापैकीं क्यूबा हें संरक्षित बेट ठरविण्यांत आलें, व त्या ठिकाणीं शांतता ठेवण्यासाठीं अ. सं. सं. नें सैन्याचा उपयोग करण्याचा आपला हक्क आहे हें जाहीर केलें. त्याचप्रमाणें पनामा कालवा खणण्यास सुरुवात करण्यापूर्वी अ. सं. सं. नें तेथें बंडाळी उपस्थित करून तो प्रदेश मिळविला व त्या कालव्याच्या भोवतालच्या व शेजारच्या प्रदेशांमध्यें शांतता असणें जरूर आहे म्हणून तेथें सैन्य पाठवून पोलीस बंदोबस्त ठेवण्याचा आपणांस अधिकार आहे असें अ. सं. सं. या राष्ट्रानें जाहीर केल्यामुळें अ. सं. सं. या राष्ट्राच्या साम्राज्यशाहीच्या धोरणाबद्दल मध्य व दक्षिण अमेरिकेंतील वसाहतींना भीति व साशंकता वाटूं लागली.

अखिल अमेरिकेंतील राष्ट्रांच्या परिषदा —अ. सं. सं. या राष्ट्राबद्दल मध्य व दक्षिण अमेरिकेंतील राष्ट्रांस वाटत असलेली भीति व साशंकता नाहींशी व्हावी व उत्तर व दक्षिण अशा अखिल अमेरिकेंतील राष्ट्रांमध्यें एकमेकांविषयीं आपलेपणा वाटून आर्थिक, सामाजिक व औद्योगिक प्रश्नांबद्दल सहकार्य घडवून यावें या उद्देशानें अ. सं. स. अध्यक्षानें १८८९ मध्यें वॉशिंग्टन येथें एक परिषद बोलाविली. या परिषदेस अखिल अमेरिकेंतील सुमारें तीस राष्ट्रांचे प्रतिनिधी हजर होते. या परिषदेमध्यें सर्वांच्या हितसंबंधाच्या प्रश्नासंबंधीं चर्चा झाली. यानंतर अशाच प्रकारच्या परिषदा मेक्सिको शहर, ब्यूनॉस एरिस,

रिओडी-जानोरे, हॅवाना वगैरे निरनिराळ्या देशांच्या राजधानींच्या व महत्त्वाच्या ठिकाणीं भरविण्यांत आल्या. त्याचप्रमाणें अ. सं. सं. या राष्ट्राचा अध्यक्ष हूअर यानें १९२८ मध्यें अखिल अमेरिकेंतील १२ निरनिराळ्या राष्ट्रांस भेटी दिल्या. अशाप्रकारें अमेरिकेंतील राष्ट्रांमध्यें एकमेकांविषयीं आपलेपणाची भावना निर्माण करण्याचा व व्यापार व उद्योगधंदे या बाबतींत सहकार्य करण्याचा प्रयत्न करण्यांत आला. त्यामुळें अ. सं. सं. या राष्ट्राचें धोरण साम्राज्यशाहीचें आहे कीं काय ही भीति अमेरिकेंतील इतर राष्ट्रांना वाटत होती ती नाहींशी होण्यास मदत झाली.

(प) आशियांतील राष्ट्रें

(१) अर्वाचीन भारत (२) अर्वाचीन जपान व (३) अर्वाचीन चीन

(१८०५ ते १९५२ सुमारें)

युरोपचें आशियावर वर्चस्व व आशियांतील राष्ट्रांत जागृति- आशियांतील भारत, चीन, इराण हीं राष्ट्रें प्राचीन काळीं पुढारलेली होतीं, तरी १३ व्या शतकाच्या सुरुवातीपासून त्यांच्यांत शैथिल्य येऊन कूपमंडुक वृत्ति बळावली, व ती हतबल होऊन त्यांच्यांतील प्रगति खुंटली. १५ व्या शतकांत युरोपमधील राष्ट्रांत प्राचीन कलाविद्यांचें पुनरुज्जीवन होऊन त्यांच्यांत चिकित्सक व शास्त्रीय पद्धत, धाडसी वृत्ति निर्माण होऊन त्यानीं भौतिक शास्त्रांत नवीन शोध लाविले व तोफा, बंदुका वगैरे नवीन परिणामकारक शस्त्रास्त्रें उपयोगांत आणिलीं. त्यांनीं १५ व्या शतकाच्या शेवटीं अमेरिका खंड व भारताकडे थेट जाणाऱ्या जलमार्गांचा शोध लाविल्यावर जगांत निरनिराळ्या ठिकाणीं आपलीं व्यापारीं ठाणीं व वसाहती स्थापन केल्या व प्राचीन काळीं प्रसिद्ध असलेल्या आशियांतील राष्ट्रांवर आपलें राजकीय व आर्थिक वर्चस्व स्थापन केलें. युरोपमधील राष्ट्रांनीं अल्पकाळांत मिळविलेल्या या यशामुळें आशियांतील राष्ट्रें किंकर्तव्यमूढ होऊन गेलीं व त्यांच्यांत न्यूनगंड निर्माण झाला. पण पुढें युरोपियन लोकांचें शास्त्रीय ज्ञान, तोफा, बंदुका वगैरे त्यांचीं आधुनिक शस्त्रास्त्रें, त्यांच्या कलाविद्या यांचा परिचय झाल्यावर त्या आत्मसात् करून त्या जोरावर त्यांचें राजकीय व आर्थिक वर्चस्व नाहींसें करावें व आपलें स्वातंत्र्य प्राप्त करून घ्यावें असें आशियामधील राष्ट्रांस वाटूं लागलें, व त्यांनीं त्यासंबंधीं प्रयत्न

चालविलें. जगांत त्यावेळीं बलाढ्य असलेल्या ग्रेट ब्रिटनविरुद्ध १८५-भारतानें प्रयत्न केला व जपाननें १८६४ व चीननें १९०० मध्यें बॉक्सर दंगल करून पाश्चात्य परकी व्यापाऱ्यांस आपल्या देशांतून घालवून लावण्याचा प्रयत्न केला, पण या तिन्ही प्रयत्नांच्या वेळीं प्रबल अशा पाश्चात्य राष्ट्रांविरुद्ध यश मिळण्यास जरूर असलेलीं आधुनिक शस्त्रास्त्रें, युद्धसामुग्री व सैन्यबळ मिळविलें गेलें नसल्यानें या तिन्ही प्रयत्नांत आशियांतील राष्ट्रांस यश मिळालें नाहीं. पण यानंतर जपाननें पाश्चात्य ज्ञान व शस्त्रास्त्रें पूर्णपणें आत्मसात् करून १९०४–०५ मध्यें रशिया या प्रबल समजल्या जाणाऱ्या राष्ट्राचा पराभव केल्यामुळें आशियामधील राष्ट्रांत आत्मविश्वास निर्माण होऊन परकीय सत्तेचें जूं झुगारून देण्यासंबंधीं ठिकठिकाणीं सुरू असलेल्या राष्ट्रीय व स्वातंत्र्य चळवळीस जोर आला.

(१) अर्वाचीन भारत

(१८१८ ते १९५२)

भारतांत ब्रिटिश राज्याचा विस्तार (१८०५–१८५७)—मार्क्विस ऑफ वेलस्लीनंतर लॉर्ड मिंटो, लॉर्ड हेस्टिंग्ज, लॉर्ड ॲमहर्स्ट, लॉर्ड हार्डिंज व लॉर्ड डलहौसी या गव्हर्नर जनरलांच्या कारकीर्दीत ब्रिटिशांच्या राज्याचा विस्तार होऊन तें सार्वभौम झालें. १८१३–१८२३ पर्यंत लॉर्ड हेस्टिंग्ज यानें मराठ्यांचा पराभव करून (१८१८) पेशव्यांचा प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणला, व सातारचे राजे व इतर मराठे सरदार यांच्याशीं तैनाती फौजेच्या पद्धतीचे तह केले. १८१४–१६ मध्यें नेपाळशीं युद्ध करून यमुना व सतलज या नद्यांमधील प्रदेश मिळविला. यानंतर ब्रिटिशांनीं ब्रम्हदेशांशीं तीन युद्धें करून (१८२४–२६; १८५२; १८८५–८८) ब्रम्हदेशावर आपलें वर्चस्व बसविलें.

नेपोलियनचा पराभव झाल्यावर ब्रिटिशांना फ्रेंचापासून वाटणारी भीति नाहींशी झाली, पण अफगाणिस्थानामध्यें रशियाचा हात शिरूं नये म्हणून ब्रिटिशांनीं अफगाणिस्थानशीं दोन युद्धें करून (१८३८–४२ व १८७८–८०) अफगाणिस्थान व रशिया यांमधील सरहद्द निश्चित केली. १८४३ मध्यें सिंध व शिखांशीं दोन युद्धें करून (१८४५–४६; १८४८–४९) सर्व पंजाब प्रांत ब्रिटिशांना मिळाला.

संस्थानिकांनीं घेतलेले दत्तक वारस नामंजूर करून लॉर्ड डलहौसीनें सातारा, झांशी, नागपूर व संबळपूर हीं संस्थानें खालसा केलीं, २ रा बाजीराव याचा पुत्र नानासाहेब याचें वास्तव्य कानपूरजवळ होतें, त्याचें वर्षासन बंद केलें, गैरव्यवस्था म्हणून अयोध्येचा नबाब याचें राज्य खालसा केलें व त्यास वर्षासन देऊन कलकत्त्यास रहावयास लाविलें. मोगल बादशहाची सत्ता नामधारी झाली होती, तिची इभ्रत आणखी कमी व्हावी म्हणून त्यास मोगल बादशहा न म्हणतां दिल्लीचा राजा असें म्हणण्याचा प्रघात सुरू केला. कर्नाटक व तंजावर येथील वारसांस चालू असलेले हुद्दे बंद केले, व भारतांतील ब्रिटिश सत्ता सार्वभौम झाली आहे हें आपल्या कृतीनें स्पष्ट केलें. लॉर्ड डलहौसीच्या या धोरणामुळें ब्रिटिशसत्तेविरुद्ध ठिकठिकाणचे संस्थानिक व त्यांचे वारस, तसेंच त्यांवर अवलंबून असणारे लोक, भारतामधील जनता यांमध्यें असंतोष पसरत जाऊन ब्रिटिश सत्तेविरुद्ध उठाव करण्याचें कारस्थान शिजत असतां १८५७ मध्यें मीरत येथील सैनिकांमध्यें झालेल्या बंडाळीचें निमित्त कारण होऊन भारतांतील ब्रिटिशांची सत्ता नाहींशी करण्यासाठीं उत्तर भारतामध्यें मोठा सशस्त्र प्रयत्न करण्यांत आला व त्यांत **झांशीची राणी लक्ष्मीबाई** नानासाहेब व त्याचा सरदार तात्या टोपे व सैन्यांतील शिपाई यांनीं प्रमुख भाग घेतला. दक्षिण भारतामध्यें व वायव्येकडे हें युद्ध पसरूं नये म्हणून ब्रिटिशांनीं विशेष काळजी घेतल्यामुळें हें युद्ध उत्तर भारतापुरतेंच मर्यादित राहिलें. या युद्धांत आधुनिक शस्त्रास्त्रांनीं सज्ज असलेल्या ब्रिटिश सत्तेविरुद्ध यश मिळविण्यास जरूर असलेली साधनसामुग्री संपादन करण्यांत आली नव्हती त्यामुळें भारतीयांनीं निकराचा प्रयत्न केला तरी त्यांत त्यांस यश मिळालें नाहीं. या युद्धांत कँपबेल व सर ह्यूरोज या ब्रिटिश सेनापतींनीं ब्रिटिशांना जय मिळवून देण्याच्या कामीं पराकाष्ठा केली. आशियांतील राष्ट्रानें युरोपियनांच्या आशियांतील आक्रमणाविरुद्ध केलेला हा पहिला मोठा प्रयत्न होता व यांत ब्रिटिशांना जय मिळाला तरी त्यानें भारतांतील ब्रिटिश सत्तेस मोठा हादरा बसला.

यानंतर भारतांतील जननेंतील असंतोष नाहींसा करण्याच्या उद्देशानें ग्रेट ब्रिटनची राणी व्हिक्टोरिया हिनें भारताचा राज्यकारभार ईस्ट इंडिया कंपनीकडून आपणाकडे घेतला असल्याचें जाहीर केलें (१ नोव्हें. १८५८). तसेंच हिंदी राजेरजवाड्यांशीं केलेले तहनामे पाळले जातील, लोकांच्या धार्मिक बाबतींत

ढवळाढवंळ केली जावयाची नाहीं, हिंदुस्थानचा राज्यकारभार हिंदी लोकांच्या हिताच्या दृष्टीनें चालविला जाईल, भारतांतील कोणतीही हुद्याची जागा वंश, धर्म यांचा विचार न करतां भारतीयांस खुली आहे वगैरे अभिवचनें दिलीं. १८५८ नंतर ग्रेट ब्रिटनच्या मंत्रिमंडळांतील एक मंत्री (भारतमंत्री) याची हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल याच्या कारभारावर देखरेख सुरू झाली.

भारताच्या राज्यव्यवस्थेसंबंधी कायदे—१८६१ मध्यें ब्रिटिश पार्लमेंटनें हिंदी कौन्सिल ॲक्ट हा कायदा पास केला. आतांपर्यंत कायदे करण्याच्या बाबतींत हिंदी लोकांचा सल्ला घेण्यांत येत नव्हता, पण या कायद्यानें सरकारनें नेमलेल्या कांहीं हिंदी लोकांचा सल्ला घेण्यांत येऊं लागला.

१८८५ मध्यें हिंदी लोकांनीं आपल्या आकांक्षा व्यक्त करण्यासाठीं हिंदी राष्ट्रीय सभा (काँग्रेस) स्थापन केली.

१८९२ मध्यें पार्लमेंटनें हिंदी कौन्सिल ॲक्ट हा कायदा पास केला. या कायद्यानें कायदा करण्यासाठीं गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळाच्या मदतीस १० जादा सभासद असावेत व त्यांतील चार सभासदांची नेमणूक प्रांतिक कायदेमंडळांतील लोकनियुक्त सभासदांच्या शिफारशीवरून करण्यांत यावी असें ठरविण्यांत आलें.

१९०९ मध्यें पार्लमेंटनें हिंदी कौन्सिल ॲक्ट (मोर्ले–मिंटो सुधारणा) पास केला. या कायद्यानें कायदे करण्यासाठीं गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळाच्या मदतीला ६० जादा सभासद नेमण्यांत यावेत व त्यांत २७ लोकनियुक्त व ५ सरकारनियुक्त पण सरकारी नोकर नसलेले असावेत असें ठरविण्यांत आलें. तसेंच गव्हर्नर जनरल व प्रांताचे गव्हर्नर यांच्या कार्यकारी कौन्सिलमध्यें एक हिंदी सभासद असावा अशी व्यवस्था करण्यांत आली. राज्यकारभाराचें धोरण ठरविणाऱ्या व राज्यकारभार करणाऱ्या या कार्यकारी कौन्सिलमध्यें आतांपर्यंत एकही हिंदी मनुष्य नव्हता तर सर्व मंत्री ब्रिटिश असत, पण या वेळपासून या महत्त्वाच्या कौन्सिलमध्यें हिंदी गृहस्थ नेमण्यांत येऊं लागला.

१९१४ मध्यें १ लें महायुद्ध सुरू झालें, त्यांत हिंदुस्थानच्या मदतीची ब्रिटिशांना जरूरी होती. हें युद्ध चालूं असतां हिंदुस्थानमध्यें क्रमाक्रमानें जबाबदार राज्यपद्धति (लोकनियुक्त कायदेमंडळास जबाबदार असणाऱ्या मंत्रीमंडळाकडून

संस्थानिकांनीं घेतलेले दत्तक वारस नामंजूर करून लॉर्ड डलहौसीनें सातारा, झांशी, नागपूर व संबळपूर हीं संस्थानें खालसा केलीं, २ रा बाजीराव याचा पुत्र नानासाहेब याचें वास्तव्य कानपूरजवळ होतें, त्याचें वर्षासन बंद केलें, गैरव्यवस्था म्हणून अयोध्येचा नबाब याचें राज्य खालसा केलें व त्यास वर्षासन देऊन कलकत्त्यास रहावयास लाविलें. मोगल बादशहाची सत्ता नामधारी झाली होती, तिची इभ्रत आणखी कमी व्हावी म्हणून त्यास मोगल बादशहा न म्हणतां दिल्लीचा राजा असें म्हणण्याचा प्रघात सुरू केला. कर्नाटक व तंजावर येथील वारसांस चालू असलेले हुद्दे बंद केले, व भारतांतील ब्रिटिश सत्ता सार्वभौम झाली आहे हें आपल्या रुतीनें स्पष्ट केलें. लॉर्ड डलहौसीच्या या धोरणामुळें ब्रिटिशसत्तेविरुद्ध ठिकठिकाणचे संस्थानिक व त्यांचे वारस, तसेंच त्यांवर अवलंबून असणारे लोक, भारतामधील जनता यांमध्यें असंतोष पसरत जाऊन ब्रिटिश सत्तेविरुद्ध उठाव करण्याचें कारस्थान शिजत असतां १८५७ मध्यें मीरत येथील सैनिकांमध्यें झालेल्या बंडाळीचें निमित्त कारण होऊन भारतांतील ब्रिटिशांची सत्ता नाहींशी करण्यासाठीं उत्तर भारतामध्यें मोठा सशस्त्र प्रयत्न करण्यांत आला व त्यांत **झांशीची राणी लक्ष्मीबाई** नानासाहेब व त्याचा सरदार तात्या टोपे व सैन्यांतील शिपाई यांनीं प्रमुख भाग घेतला. दक्षिण भारतामध्यें व वायव्येकडे हें युद्ध पसरूं नये म्हणून ब्रिटिशांनीं विशेष काळजी घेतल्यामुळें हें युद्ध उत्तर भारतापुरतेंच मर्यादित राहिलें. या युद्धांत आधुनिक शस्त्रास्त्रांनीं सज्ज असलेल्या ब्रिटिश सत्तेविरुद्ध यश मिळविण्यास जरूर असलेली साधनसामुग्री संपादन करण्यांत आली नव्हती त्यामुळें भारतीयांनीं निकराचा प्रयत्न केला तरी त्यांत त्यांस यश मिळालें नाहीं. या युद्धांत कँपबेल व सर ह्यूरोज या ब्रिटिश सेनापतींनीं ब्रिटिशांना जय मिळवून देण्याच्या कामीं पराकाष्ठा केली. आशियांतील राष्ट्रानें युरोपियनांच्या आशियांतील आक्रमणाविरुद्ध केलेला हा पहिला मोठा प्रयत्न होता व यांत ब्रिटिशांना जय मिळाला तरी त्यानें भारतांतील ब्रिटिश सत्तेस मोठा हादरा बसला.

यानंतर भारतांतील जनतेंतील असंतोष नाहींसा करण्याच्या उद्देशानें ग्रेट ब्रिटनची राणी व्हिक्टोरिया हिनें भारताचा राज्यकारभार ईस्ट इंडिया कंपनीकडून आपणाकडे घेतला असल्याचें जाहीर केलें (१ नोव्हें. १८५८). तसेंच हिंदी राजेरजवाड्यांशीं केलेले तहनामे पाळले जातील, लोकांच्या धार्मिक बाबतींत

ढवळाढवळ केली जावयाची नाहीं, हिंदुस्थानचा राज्यकारभार हिंदी लोकांच्या हिताच्या दृष्टीनें चालविला जाईल, भारतांतील कोणतीही हुद्याची जागा वंश, धर्म यांचा विचार न करतां भारतीयांस खुली आहे वगैरे अभिवचनें दिलीं. १८५८ नंतर ग्रेट ब्रिटनच्या मंत्रिमंडळांतील एक मंत्री (भारतमंत्री) याची हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल याच्या कारभारावर देखरेख सुरू झाली.

भारताच्या राज्यव्यवस्थेसंबंधी कायदे—१८६१ मध्यें ब्रिटिश पार्लमेंटनें हिंदी कौन्सिल ॲक्ट हा कायदा पास केला. आतांपर्यंत कायदे करण्याच्या बाबतींत हिंदी लोकांचा सल्ला घेण्यांत येत नव्हता, पण या कायद्यानें सरकारनें नेमलेल्या कांहीं हिंदी लोकांचा सल्ला घेण्यांत येऊं लागला.

१८८५ मध्यें हिंदी लोकांनीं आपल्या आकांक्षा व्यक्त करण्यासाठीं हिंदी राष्ट्रीय सभा (काँग्रेस) स्थापन केली.

१८९२ मध्यें पार्लमेंटनें हिंदी कौन्सिल ॲक्ट हा कायदा पास केला. या कायद्यानें कायदा करण्यासाठीं गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळाच्या मदतीस १० जादा सभासद असावेत व त्यांतील चार सभासदांची नेमणूक प्रांतिक कायदेमंडळांतील लोकनियुक्त सभासदांच्या शिफारशीवरून करण्यांत यावी असें ठरविण्यांत आलें.

१९०९ मध्यें पार्लमेंटनें हिंदी कौन्सिल ॲक्ट (मोर्ले–मिंटो सुधारणा) पास केला. या कायद्यानें कायदे करण्यासाठीं गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळाच्या मदतीला ६० जादा सभासद नेमण्यांत यावेत व त्यांत २७ लोकनियुक्त व ५ सरकारनियुक्त पण सरकारी नोकर नसलेले असावेत असें ठरविण्यांत आलें. तसेंच गव्हर्नर जनरल व प्रांताचे गव्हर्नर यांच्या कार्यकारी कौन्सिलमध्यें एक हिंदी सभासद असावा अशी व्यवस्था करण्यांत आली. राज्यकारभाराचें धोरण ठरविणाऱ्या व राज्यकारभार करणाऱ्या या कार्यकारी कौन्सिलमध्यें आतांपर्यंत एकही हिंदी मनुष्य नव्हता तर सर्व मंत्री ब्रिटिश असत, पण या वेळपासून या महत्त्वाच्या कौन्सिलमध्यें हिंदी गृहस्थ नेमण्यांत येऊं लागला.

१९१४ मध्यें १ लें महायुद्ध सुरू झालें, त्यांत हिंदुस्थानच्या मदतीची ब्रिटिशांना जरूरी होती. हें युद्ध चालूं असतां हिंदुस्थानमध्यें क्रमाक्रमानें जबाबदार राज्यपद्धति (लोकनियुक्त कायदेमंडळास जबाबदार असणाऱ्या मंत्रीमंडळाकडून

राज्यकारभार स्थापन करण्याचें ब्रिटिशांचें उद्दिष्ट आहे) अशी ब्रिटिश मुख्य-मंत्र्यानें पार्लमेंटमध्यें घोषणा केली. महायुद्ध संपल्यावर १९१९ मध्यें ब्रिटिश पार्लमेंटनें हिंदी राज्यघटनेचा कायदा पास केला. या कायद्याने हिंदी राष्ट्रीय सभेचें समाधान न होऊन महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालीं असहकारितेची चळवळ व त्यानंतर १९३० मध्यें कायदेभंगाची चळवळ सुरू झाली.

तेव्हां १९३५ मध्यें पार्लमेंटनें हिंदुस्थानच्या राज्यघटनेचा कायदा पास केला. या कायद्यामध्यें ब्रिटिश हिंदुस्थान व संस्थानी हिंदुस्थान या दोहोंचें मिळून एक संघ राज्य (फेडरेशन) असावें, अशी योजना होती. पण या कायद्यानें हिंदुस्थानचा राज्यकारभार लोकनियुक्त कायदेमंडळास पूर्णपणें जबाबदार असण्याची व्यवस्था नसल्यामुळें या कायद्यानें हिंदी राष्ट्रीय सभेचें समाधान झालें नाहीं; व स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं सुरू असलेली चळवळ चालूं राहिली.

ब्रिटिश अमदानींत दळणवळणाच्या साधनांत वाढ—ब्रिटिशांनीं भारतामध्यें १८५३ मध्यें मुंबई ते ठाणा हा पहिला रेल्वे रस्ता बांधिला, व त्यांत पुढें वाढ होऊन १९४७ पर्यंत सुमारें ५०००० मैल लांबीचे रेल्वे रस्ते बांधण्यांत आले. त्यामुळें रेल्वे रस्त्याच्या बाबतींत जगांत भारताचा ४ था क्रमांक आहे. या रेल्वे रस्त्यांमुळें व्यापार व उद्योगधंदे यांची वाढ होण्यास, भारतांतील निरनिराळ्या प्रांतांतील लोकांचें संघटन वाढण्यास मदत झाली. डलहौसीच्या कारकीर्दीत पोस्ट व टेलिग्राफ या खात्यांची स्थापना झाली. १८४२ पासून तांबड्या समुद्रापर्यंत आगबोटीची. नंतर अलेक्झांड्रापर्यंत जमीनीवरील व तेथून इंग्लंडपर्यंत आगबोटीची वहातुक पेनिन्सुलर व ओरिएंटल स्टीम नॅव्हिगेशन कंपनीमार्फत होऊं लागली व १८६९ मध्यें सुएझ कालवा सुरू झाल्यावर थेट इंग्लंडपर्यंतचा जलमार्ग सुरू झाला. १८५५ मध्यें भारतांतील कांहीं प्रमुख शहरें तारायंत्रानें जोडण्यांत आलीं. १८६५ ते १८६९ च्या दरम्यान कराची ते माल्टापर्यंत समुद्राच्या तळानें केबल्स (तारायंत्राच्या तारा) घालण्यांत आल्या. माल्टा ते युरोपपर्यंत केबल्स होत्या त्यामुळें हिंदुस्थान हें इंग्लंड व युरोपशीं तारायंत्रानें जोडलें गेलें. १९३२ मध्यें लष्करी कामासाठीं हिंदुस्थानांत विमानवहातुक सुरू करण्यांत आली. इंग्लंड ते आस्ट्रेलियापर्यंतची प्रवासी विमानवहातुक ब्रिटिश कंपनी करी व तो मार्ग हिंदुस्थानवरून जाई. नंतर **टाटा** या उद्योगशील व धाडसी हिंदी घराण्यानें भारतांतील निरनिराळ्या

प्रमुख शहरांमध्यें व त्याचप्रमाणें भारतांतून इतर देशांस वैमानिक वहातुक करण्यासाठीं 'एअर इंडिया' ही कंपनी काढल्यामुळें जगांतील इतर प्रमुख देशांप्रमाणें वैमानिक वहातुकीच्या बाबतींतही भारत इतर प्रमुख राष्ट्रांप्रमाणें झाला. बिनतारी संदेश पाठविणारी संस्थाही पहिल्यानें खाजगी प्रयत्नानें स्थापन झाली, पण ती बंद पडल्यामुळें त्याची व्यवस्था सरकारनें आपणाकडे घेतली. अशारीतीनें दळणवळणाच्या व आधुनिक सुखसोईंच्या बाबतींत भारत इतर प्रगत राष्ट्रांप्रमाणें झाला आहे.

ब्रिटिश अमदानींतील शिक्षण—भारतामध्यें पौर्वात्य विद्या, ज्ञान व भाषा शिकविण्याच्या संस्था स्थापन झालेल्या होत्या. तसेंच डॉव्हेड हेअर नांवाच्या गृहस्थानें बंगालमधील बहुश्रुत, विद्वान, सामाजिक व धार्मिक सुधारणा करण्यांत प्रामुख्यानें भाग घेणारा **राजा राममोहन रॉय** याच्या मदतीनें इंग्रजी भाषा व पाश्चात्य ज्ञान शिकविण्यासाठीं कलकत्त्यास 'हिंदु कॉलेज' ही संस्था काढली. अशा संस्था इतर ठिकाणींही स्थापन झाल्या व त्या लोकप्रिय होऊं लागल्या. १८१३ मध्यें ब्रिटिश पार्लमेंटनें भारतामध्यें दरवर्षी १ लाख रुपये उपयुक्त ज्ञानवृद्धीसाठीं खर्च करावेत असें ठरविलें होतें व १८३५ मध्यें गव्हर्नर जनरल लॉर्ड बेंटिक यानें कायदामंत्री मेकॉले याच्या सूचनेवरून ही रक्कम संस्कृत, अरबी, फारशी व पौर्वात्य ज्ञान याऐवजीं इंग्रजी शिक्षणाकडे खर्च करावी असा ठराव केला. त्यामुळें भारतामध्यें इंग्रजी शिक्षण सरकारमार्फत सुरू झालें. यानंतर शिक्षणाची व्यवस्था पहाण्यासाठीं निरनिराळ्या प्रांतांत डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन हे अधिकारी नेमण्यांत आले. अशी व्यवस्था झाली तरी स्थापत्यशास्त्र, शेतकी, वैद्यकी, यंत्रविद्या, धंदेशिक्षण व व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्था फारच थोड्या काढण्यांत आल्यामुळें दुय्यम व उच्च शिक्षण वाङ्मयीन स्वरूपाचें व बुद्धिजीवी वर्गासाठीं देण्यांत येऊं लागलें व त्यांत सरकारच्या राज्यकारभारांत उपयोगी पडणारे कारकून, चिटणीस, हिशेब तपासनीस, असे लोक जास्त प्रमाणांत निर्माण होऊं लागले. १८८२ मध्यें सर विल्यम हंटर यांच्या अध्यक्षतेखालीं शिक्षणविषयक कमिशन नेमण्यांत आलें. या कमिशनच्या सूचनेवरून प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी सरकारकडे, दुय्यम व उच्च शिक्षण देण्याची कामगिरी मुख्यत: खाजगी संस्थांकडे सोपविण्यांत येऊन त्यांस ग्रँट (सरकारी मदत) देण्याची व्यवस्था करण्यांत आली. त्यामुळें बऱ्याच खाजगी

संस्था स्थापन झाल्या. पुढें लॉर्ड कर्झन यानें युनिव्हर्सिटी कमिशन नेमलें व त्याच्या सूचनेप्रमाणें उच्च शिक्षणावर व विश्वविद्यालयांवर अधिक नियंत्रण ठेविलें. १९१९ च्या कायद्यानें 'शिक्षण' हें प्रांतिक कायदेमंडळास जबाबदार ठेवण्यांत आलें, व त्यामुळें शिक्षणाचें धोरण आंखणें व त्याची व्यवस्था ठेवणें हा अधिकार हिंदी लोकांकडे आला. त्यामुळें बऱ्याच प्रांतांनीं प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें करण्याची योजना आंखली. त्याचप्रमाणें भारतांतील शिक्षणाची पुनर्घटना करण्यासाठीं हिंदुस्थानसरकारकडून कमेट्या व कमिशनें नेमण्यांत आलीं.

भारतांतील स्वातंत्र्यचळवळ व लोकसत्ताक संघराज्याची स्थापना—१८५८मध्यें व्हिक्टोरिया राणीनें जाहीरनामा प्रसिद्ध करून भारताचा कारभार हिंदी लोकांच्या हिताच्या दृष्टीनें चालविला जाईल, व कोणतीहीं हुद्याची जागा हिंदी लोकांस खुली आहे वगैरे अभिवचनें दिलीं, तरी त्याप्रमाणें ब्रिटिश राजकर्त्यांकडून कृति न झाल्यामुळें हिंदी लोकांच्या आकांक्षा व्यक्त करण्यासाठीं ठिकठिकाणीं राजकीय संस्था स्थापन होत होत्या, व १८८५ सालीं सर्व हिंदुस्थानसाठीं **राष्ट्रीय सभा (काँग्रेस)** ही संस्था स्थापन झाली व तिची पहिली बैठक मुंबई येथें भरली. ही भरविण्यांत तेलंग, दादाभाई नवरोजी, ह्यूम, फेरोजशहा मेथा, सुब्रह्मण्य अय्यर, न्या. रानडे यांनीं प्रमुख भाग घेतला. १८८५ पासून १९४७ मध्यें स्वातंत्र्य मिळेपर्यंत काँग्रेसकडून वेळोवेळीं जे ठराव झाले व चळवळी होऊन स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं जे प्रयत्न झाले त्याचे मुख्यतः तीन टप्पे पडतात, व ते म्हणजे १८८५ ते १९०७; १९०७ ते १९२० व १९२० ते १९४७ हे होत. यांपैकीं पहिल्या टप्प्याच्या वेळीं काँग्रेसवर नेमस्त पक्षाचे पुढारीपण होतें, दुसऱ्या टप्प्याच्या वेळीं स्वातंत्र्यचळवळीवर लो. टिळक व राष्ट्रीय पक्ष यांच्याकडे पुढारीपण होतें व तिसऱ्या टप्प्याच्या वेळीं महात्मा गांधींकडे पुढारीपण होतें. १८८५ पासून काँग्रेसच्या बैठकी नाताळच्या सुट्टीमध्यें दरवर्षी हिंदुस्थानांतील निरनिराळ्या शहरांत व ठिकाणीं भरविण्यांत येऊं लागल्या. १८८५ पासून १९०७ पर्यंतच्या काळांत ठराव पास करणें, शिष्टमंडळें पाठविणें, कायदेमंडळांत लोकनियुक्तांचें बहुमत असावें अशी मागणी करणें, राज्यकारभारांत कोणत्या सुधारणा पाहिजेत तें जाहीर करणें वगैरे मार्ग काँग्रेसनें अवलंबिले. या काळांत दादाभाई नवरोजी, सर फेरोजशहा मेथा,

ना. गोखले यांनीं महत्त्वाची कामगिरी केली. अशी स्थिति असतां १९०४–०५ मध्यें रुसो–जपानी युद्ध होऊन त्यांत जपान या आशियामधील लहान राष्ट्रानें रशिया या मोठ्या राष्ट्राचा पराभव केल्यामुळें हिंदी लोकांस आत्मविश्वास वाटूं लागला; व त्यांच्यांतील न्यूनगंड नाहींसा झाला. यावेळीं हिंदुस्थानामधील हिंदू व मुसलमान या दोन प्रमुख जमातींमध्यें फूट पाडावी या उद्देशानें लॉर्ड कर्झनच्या कारकीर्दीत बंगाल प्रांताची फाळणी करण्यांत आली (१९०५), व काँग्रेसमधून मुसलमान जमातींस फोडण्याच्या उद्देशानें सरकारच्या प्रोत्साहनानें मुसलमानांच्या हितसंबंधाचें रक्षण करण्यासाठीं ना. आगाखान यांच्या नेतृत्वाखालीं **मुस्लीम लीग** ही संस्था स्थापन झाली (१९०६). १९०६ मध्यें कलकत्ता येथें काँग्रेसची बैठक भरली त्यावेळीं अध्यक्ष दादाभाई नवरोजी यांनीं ब्रिटिश साम्राज्यांतील कॅनडा, ऑस्ट्रेलिया या वसाहतीप्रमाणें साम्राज्यांतर्गत स्वराज्य मिळविणें हें काँग्रेसचें उद्दिष्ट असल्याचें जाहीर केलें. अशाप्रकारें काँग्रेसनें केलेल्या ठरावांचा उपयोग होत नाहीं, तेव्हां स्वावलंबनाचा व लोकजागृतीचा मार्ग स्वीकारून मोठी चळवळ केल्याखेरीज हिंदुस्थानास स्वातंत्र्य मिळावयाचें नाहीं असें **लो. टिळक**, बिपिनचंद्र पाल व लाला लजपतराय वगैरे पुढाऱ्यांस वाटून काँग्रेसमध्यें राष्ट्रीय व नेमस्त (जहाल व मवाळ) असे दोन गट पडले व राष्ट्रीय पक्षानें हिंदुस्थानास निर्भेळ स्वातंत्र्य मिळविण्याचे व ते साध्य करण्यासाठी स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व लोकजागृति या स्वावलंबनाच्या मार्गाचा अवलंब करण्याचें व जरूर ते उपाय योजण्याचे ठरविलें. १९०७ मध्यें सुरत येथें काँग्रेसची बैठक भरली, त्यावेळीं या दोन गटांतील मतभेद विकोपास जाऊन तें अधिवेशन बंद पडलें. यानंतर नेमस्त पक्षानें काँग्रेसचें उद्दीष्ट व तें साध्य करण्याचे मार्ग जाहीर करून ते ज्यांस मान्य आहेत त्यानांच काँग्रेसमध्यें भाग घेतां येईल असें ठरविल्यामुळें लो. टिळक यांच्या नेतृत्वाखालीं राष्ट्रीय पक्ष काँग्रेसमधून बाहेर पडला, व त्यानें आपली वेगळी संघटना काढण्याचा विचार केला. पण सरकारनें हा प्रयत्न यशस्वी होऊं दिला नाहीं. राष्ट्रीय पक्षानें लेख, भाषणें या द्वारां स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण या संबंधानें लोकजागृति केली व चळवळ सुरू केली. अशी परिस्थिति असतां सनदशीर मार्गानें हिंदुस्थानास स्वातंत्र्य मिळावयाचें नाहीं तर त्यासाठीं गुप्त क्रान्तिकारक संस्था स्थापन करून त्यामार्फत सशस्त्र उपाय केले पाहिजेत

असें कांहींस वाटून बंगाल व महाराष्ट्र येथें गुप्त क्रान्तिकारक संस्था स्थापन झाल्या व त्यामार्फत सरकारी वरिष्ठ अधिकाऱ्यांवर बाँब टाकणें व त्यांचा खून करणें वगैरे प्रकार होऊं लागले. तेव्हां सरकारनें कडक उपाय योजून ही क्रांतिकारक चळवळ दडपून टाकण्याचा प्रयत्न केला व त्यांत भाग घेणारांस कडक शिक्षा ठोठावल्या. त्याचप्रमाणें राष्ट्रीय पक्षाच्या पुढाऱ्यांकडून क्रान्तिकारक लोकांस फूस मिळते म्हणून त्यांसही त्यांच्या भाषणाबद्दल व वृत्तपत्रीय लिखाणाबद्दल शिक्षा ठोठावल्या. त्यामुळें लोकमान्य टिळक यांस सहा वर्षांची शिक्षा होऊन मंडाले येथें ठेवण्यांत आलें (१९०८–१४). लाला लजपतराय वगैरे पुढाऱ्यांसही शिक्षा झाल्या. अशी स्थिति असतां नेमस्त पक्षाच्या पुढाऱ्यांस आपलेसे करावें या हेतूनें १९०९ मध्यें ब्रिटिशांनीं हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेचा कायदा केला (मोर्ले–मिंटो सुधारणा). पण या कायद्यानें राष्ट्रीय पक्षाचें समाधान झालें नाहीं. नेमस्त पक्षाचेंही या सुधारणांनीं समाधान झालें नाहीं व काँग्रेसच्या बठकीच्या वेळीं सरकारच्या दडपशाहीच्या धोणाचा निषेध व हिंदुस्थानला साम्राज्यांतर्गत स्वराज्य देण्यांत यावें असे ठराव करण्यांत आले. अशी स्थिति असतां १ लें महायुद्ध सुरू झाले (१९१४). लो. टिळक यांची सहा वर्षांची शिक्षा पुरी होऊन त्यांचीही सुटका झाली. १ ल्या महायुद्धामध्यें तुर्कस्थान हें मुस्लिमधर्मीय राष्ट्र शत्रूपक्षास मिळाल्यामुळें मुसलमानांचेंही सरकारविरोधी धोरण होऊं लागलें व त्यांचा हिंदुस्थानच्या स्वातंत्र चळवळीस पाठिंबा मिळूं लागला. याच सुमारास दक्षिण आफ्रिकेमध्यें बरेच दिवस वास्तव्य करून तेथील हिंदी लोकांवर होणारा अन्याय दूर करण्याच्या कामीं चळवळ करणारे महात्मा गांधी हे हिंदुस्थानांत आले व ते येथील राजकारणांत भाग घेऊं लागले. लो. टिळकांची सुटका झाल्यावर त्यांच्या नेतृत्वाखालीं राष्ट्रीय पक्षानें काँग्रेसमध्यें शिरून तेथें बहुमत संपादन करण्याचें योजलें. याच सुमारास १९१५ मध्यें ना. गोखले व फेरोजशहा मेथा हे नेमस्त पक्षाचे पुढारी मरण पावल्यामुळें नेमस्त पक्ष हतबल झाला. या सुमारास ॲनी बिझंट या थिओसफी पंथाचा प्रसार करणाऱ्या विदुषीचाही हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या चळवळीस पाठिंबा मिळून हें ध्येय साध्य करण्यासाठीं तिनें होमरूल ही संस्था काढली व मोठी चळवळ सुरू केली. अशी परिस्थिति असतां १९१६ मध्यें काँग्रेसचें अधिवेशन लखनौ येथें भरलें. मुस्लीम लीगचेंही अधिवेशन लखनौ येथें भरलें. तेथें काँग्रेस व मुस्लिम लीग

चा संस्थांच्या पुढाऱ्यांमध्यें चर्चा होऊन एक करार झाला (लखनौ पॅक्ट). त्यांत काँग्रेसनें मुसलमानांनीं हिंदुस्थानच्या स्वराज्याच्या मागणीस पाठिंबा दिल्यास त्यांस कायदेमंडळामध्यें त्यांच्या लोकसंख्येपेक्षां जास्त सभासद असूं देण्याचें कबूल केलें व काँग्रेस व मुस्लीम लीग या दोन्हीं संस्थांनीं हिंदुस्थानला स्वराज्य देण्यांत यावें असे ठराव पास केले. अशी परिस्थिति असतां काँग्रेस मुसलमानांस त्यांच्या लोकसंख्येपेक्षां जास्ती प्रतिनिधित्व देऊन हिंदूंचे न्याय हक्क गमावत आहे हें पाहून हिंदूंचे हितसंबंध रक्षण करण्यास वेगळी संस्था असणें जरूर आहे हें पाहून पंडित मदन मोहन मालवीय, डॉ. मुंजे वगैरे पुढाऱ्यांनीं **हिंदुमहासभा** ही संस्था स्थापन केली (१९१६). यावेळीं महायुद्ध सुरू होतें, व हिंदु व मुसलमान या दोन्हीं संस्थानींही हिंदुस्थानास स्वराज्य देण्यांत यावें हा ठराव पास केलेला आहे, हें पाहून महायुद्धामध्यें हिंदुस्थानची पूर्णपणें मदत मिळावी म्हणून १९१७ मध्यें ग्रेट ब्रिटनच्या मुख्य प्रधानानें 'हिंदुस्थानांत क्रमाक्रमानें जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्याचें ग्रेट ब्रिटनचें उद्दिष्ट आहे' ही घोषणा केली. महायुद्ध संपल्यावर ब्रिटिश पार्लमेंटनें १९१९ मध्यें भारताच्या राज्यघटनेचा कायदा केला, व त्यांत प्रांताच्या राज्यकारभाराचे दोन विभाग करून त्यांपैकीं एक विभाग लोकनियुक्तांचें बहुमत असलेल्या कायदेमंडळास जबाबदार असल्याचें ठरविण्यांत आलें. या कायद्यानें प्रांतांतील कांहीं खात्यांमध्यें जबाबदार राज्यपद्धति सुरू व्हावयाची होती, तरी त्यामुळें हिंदुस्थानांत जबाबदार राज्यपद्धति सुरू व्हावयाची नाहीं हें पाहून राष्ट्रीय पक्षास हा कायदा पसंत पडला नाहीं. यावेळीं महात्मा गांधी हे हिंदुस्थानच्या राजकारणांत पुढें आले असून त्यांस या कायद्यावर बहिष्कार घालावा असें वाटत होतें. नेमस्त पक्षास हा कायदा पूर्णपणें पसंत नव्हता, तरी यांत देण्यांत येणाऱ्या सुधारणांचा फायदा घेऊन आणखी हक्क मिळविण्याचा प्रयत्न करावा असें त्यांस वाटत होतें. अशी परिस्थिति असतां अमृतसर येथें भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनांत १९१९ चा कायदा अपुरा, असमाधानकारक व निराशजनक आहे असा काँग्रेसनें ठराव पास केला. त्यामुळें सरकाराविरुद्ध असंतोष पसरून मोठी खळबळ झाली; व दंगेधोपे होऊं लागले तेव्हां हा असंतोष दडपून टाकण्यासाठीं सरकारनें कडक उपाय योजले. अशी परिस्थिति असतां १९२० च्या ऑगष्टमध्यें लो. टिळक मरण पावले. यावेळीं महात्मा गांधी हिंदुस्थानच्या राजकारणांत पुढें

असें कांहींस वाटून बंगाल व महाराष्ट्र येथें गुप्त क्रान्तिकारक संस्था स्थापन झाल्या व त्यामार्फत सरकारी वरिष्ठ अधिकाऱ्यांवर बाँब टाकणें व त्यांचा खून करणें वगैरे प्रकार होऊं लागले. तेव्हां सरकारनें कडक उपाय योजून ही क्रांतिकारक चळवळ दडपून टाकण्याचा प्रयत्न केला व त्यांत भाग घेणारांस कडक शिक्षा ठोठावल्या. त्याचप्रमाणें राष्ट्रीय पक्षाच्या पुढाऱ्यांकडून क्रान्तिकारक लोकांस फूस मिळते म्हणून त्यांसही त्यांच्या भाषणाबद्दल व वृत्तपत्रीय लिखाणाबद्दल शिक्षा ठोठावल्या. त्यामुळें लोकमान्य टिळक यांस सहा वर्षांची शिक्षा होऊन मंडाले येथें ठेवण्यांत आलें (१९०८–१४). लाला लजपतराय वगैरे पुढाऱ्यांसही शिक्षा झाल्या. अशी स्थिति असतां नेमस्त पक्षाच्या पुढाऱ्यांस आपलेसे करावें या हेतूनें १९०९ मध्यें ब्रिटिशांनीं हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेचा कायदा केला (मोर्ले–मिंटो सुधारणा). पण या कायद्यानें राष्ट्रीय पक्षाचें समाधान झालें नाहीं. नेमस्त पक्षाचेंही या सुधारणांनीं समाधान झालें नाहीं व काँग्रेसच्या बठकींच्या वेळीं सरकारच्या दडपशाहीच्या धोणाचा निषेध व हिंदुस्थानला साम्राज्यांतर्गत स्वराज्य देण्यांत यावें असे ठराव करण्यांत आले. अशी स्थिति असतां १ लें महायुद्ध सुरू झाले (१९१४). लो. टिळक यांची सहा वर्षांची शिक्षा पुरी होऊन त्यांचीही सुटका झाली. १ ल्या महायुद्धामध्यें तुर्कस्थान हें मुस्लिमधर्मीय राष्ट्र शत्रूपक्षास मिळाल्यामुळें मुसलमानांचेंही सरकारविरोधी धोरण होऊं लागलें व त्यांचा हिंदुस्थानच्या स्वातंत्र चळवळीस पाठिंबा मिळूं लागला. याच सुमारास दक्षिण आफ्रिकेमध्यें बरेच दिवस वास्तव्य करून तेथील हिंदी लोकांवर होणारा अन्याय दूर करण्याच्या कामीं चळवळ करणारे महात्मा गांधी हे हिंदुस्थानांत आले व ते येथील राजकारणांत भाग घेऊं लागले. लो. टिळकांची सुटका झाल्यावर त्यांच्या नेतृत्वाखालीं राष्ट्रीय पक्षानें काँग्रेसमध्यें शिरून तेथें बहुमत संपादन करण्याचें योजलें. याच सुमारास १९१५ मध्यें ना. गोखले व फेरोजशहा मेथा हे नेमस्त पक्षाचे पुढारी मरण पावल्यामुळें नेमस्त पक्ष हतबल झाला. या सुमारास ॲनी बिझंट या थिओसफी पंथाचा प्रसार करणाऱ्या विदुषीचाही हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या चळवळीस पाठिंबा मिळून हें ध्येय साध्य करण्यासाठीं तिनें होमरूल ही संस्था काढली व मोठी चळवळ सुरू केली. अशी परिस्थिति असतां १९१६ मध्यें काँग्रेसचें अधिवेशन लखनौ येथें भरलें. मुस्लीम लीगचेंही अधिवेशन लखनौ येथें भरलें. तेथें काँग्रेस व मुस्लिम लीग

च्या संस्थांच्या पुढाऱ्यांमध्यें चर्चा होऊन एक करार झाला (लखनौ पॅक्ट). त्यांत काँग्रेसनें मुसलमानांनीं हिंदुस्थानच्या स्वराज्याच्या मागणीस पाठिंबा दिल्यास त्यांस कायदेमंडळामध्यें त्यांच्या लोकसंख्येपेक्षां जास्त सभासद असूं देण्याचें कबूल केलें व काँग्रेस व मुस्लीम लीग या दोन्हीं संस्थांनीं हिंदुस्थानला स्वराज्य देण्यांत यावें असे ठराव पास केले. अशी परिस्थिति असतां काँग्रेस मुसलमानांस त्यांच्या लोकसंख्येपेक्षां जास्ती प्रतिनिधित्व देऊन हिंदूंचे न्याय हक्क गमावत आहे हें पाहून हिंदूंचे हितसंबंध रक्षण करण्यास वेगळी संस्था असणें जरूर आहे हें पाहून पंडित मदन मोहन मालवीय, डॉ. मुंजे वगैरे पुढाऱ्यांनीं **हिंदुमहासभा** ही संस्था स्थापन केली (१९१६). यावेळीं महायुद्ध सुरू होतें, व हिंदु व मुसलमान या दोन्हीं संस्थानींही हिंदुस्थानास स्वराज्य देण्यांत यावें हा ठराव पास केलेला आहे, हें पाहून महायुद्धामध्यें हिंदुस्थानची पूर्णपणें मदत मिळावी म्हणून १९१७ मध्यें ग्रेट ब्रिटनच्या मुख्य प्रधानानें 'हिंदुस्थानांत क्रमाक्रमानें जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्याचें ग्रेट ब्रिटनचें उद्दिष्ट आहे' ही घोषणा केली. महायुद्ध संपल्यावर ब्रिटिश पार्लमेंटनें १९१९ मध्यें भारताच्या राज्यघटनेचा कायदा केला, व त्यांत प्रांताच्या राज्यकारभाराचे दोन विभाग करून त्यांपैकीं एक विभाग लोकनियुक्तांचें बहुमत असलेल्या कायदेमंडळास जबाबदार असल्याचें ठरविण्यांत आलें. या कायद्यानें प्रांतांतील कांहीं खात्यांमध्यें जबाबदार राज्यपद्धति सुरू व्हावयाची होती, तरी त्यामुळें हिंदुस्थानांत जबाबदार राज्यपद्धति सुरू व्हावयाची नाहीं हें पाहून राष्ट्रीय पक्षास हा कायदा पसंत पडला नाहीं. यावेळीं महात्मा गांधी हे हिंदुस्थानच्या राजकारणांत पुढें आले असून त्यांस या कायद्यावर बहिष्कार घालावा असें वाटत होतें. नेमस्त पक्षास हा कायदा पूर्णपणें पसंत नव्हता, तरी यांत देण्यांत येणाऱ्या सुधारणांचा फायदा घेऊन आणखी हक्क मिळविण्याचा प्रयत्न करावा असें त्यांस वाटत होतें. अशी परिस्थिति असतां अमृतसर येथें भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनांत १९१९ चा कायदा अपुरा, असमाधानकारक व निराशजनक आहे असा काँग्रेसनें ठराव पास केला. त्यामुळें सरकाराविरुद्ध असंतोष पसरून मोठी खळबळ झाली; व दंगेधोपे होऊं लागले तेव्हां हा असंतोष दडपून टाकण्यासाठीं सरकारनें कडक उपाय योजले. अशी परिस्थिति असतां १९२० च्या ऑगष्टमध्यें लो. टिळक मरण पावले. यावेळीं महात्मा गांधी हिंदुस्थानच्या राजकारणांत पुढें

असें कांहींस वाटून बंगाल व महाराष्ट्र येथें गुप्त क्रान्तिकारक संस्था स्थापन झाल्या व त्यामार्फत सरकारी वरिष्ठ अधिकाऱ्यांवर बाँब टाकणें व त्यांचा खून करणें वगैरे प्रकार होऊं लागले. तेव्हां सरकारनें कडक उपाय योजून ही क्रांतिकारक चळवळ दडपून टाकण्याचा प्रयत्न केला व त्यांत भाग घेणारांस कडक शिक्षा ठोठावल्या. त्याचप्रमाणें राष्ट्रीय पक्षाच्या पुढाऱ्यांकडून क्रान्तिकारक लोकांस फूस मिळते म्हणून त्यांसही त्यांच्या भाषणाबद्दल व वृत्तपत्रीय लिखाणाबद्दल शिक्षा ठोठावल्या. त्यामुळें लोकमान्य टिळक यांस सहा वर्षांची शिक्षा होऊन मंडाले येथें ठेवण्यांत आलें (१९०८–१४). लाला लजपतराय वगैरे पुढाऱ्यांसही शिक्षा झाल्या. अशी स्थिति असतां नेमस्त पक्षाच्या पुढाऱ्यांस आपलेसे करावें या हेतूनें १९०९ मध्यें ब्रिटिशांनीं हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेचा कायदा केला (मोर्ले–मिंटो सुधारणा). पण या कायद्यानें राष्ट्रीय पक्षाचें समाधान झालें नाहीं. नेमस्त पक्षाचेंही या सुधारणांनीं समाधान झालें नाहीं व काँग्रेसच्या बठकीच्या वेळीं सरकारच्या दडपशाहीच्या धोणाचा निषेध व हिंदुस्थानला साम्राज्यांतर्गत स्वराज्य देण्यांत यावें असे ठराव करण्यांत आले. अशी स्थिति असतां १ लें महायुद्ध सुरू झाले (१९१४). लो. टिळक यांची सहा वर्षांची शिक्षा पुरी होऊन त्यांचीही सुटका झाली. १ ल्या महायुद्धामध्यें तुर्कस्थान हें मुस्लिमधर्मीय राष्ट्र शत्रूपक्षास मिळाल्यामुळें मुसलमानांचेंही सरकारविरोधी धोरण होऊं लागलें व त्यांचा हिंदुस्थानच्या स्वातंत्र चळवळीस पाठिंबा मिळूं लागला. याच सुमारास दक्षिण आफ्रिकेमध्यें बरेच दिवस वास्तव्य करून तेथील हिंदी लोकांवर होणारा अन्याय दूर करण्याच्या कामीं चळवळ करणारे महात्मा गांधी हे हिंदुस्थानांत आले व ते येथील राजकारणांत भाग घेऊं लागले. लो. टिळकांची सुटका झाल्यावर त्यांच्या नेतृत्वाखालीं राष्ट्रीय पक्षानें काँग्रेसमध्यें शिरून तेथें बहुमत संपादन करण्याचें योजलें. याच सुमारास १९१५ मध्यें ना. गोखले व फेरोजशहा मेथा हे नेमस्त पक्षाचे पुढारी मरण पावल्यामुळें नेमस्त पक्ष हतबल झाला. या सुमारास ॲनी बिझंट या थिओसफी पंथाचा प्रसार करणाऱ्या विदुषीचाही हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या चळवळीस पाठिंबा मिळून हें ध्येय साध्य करण्यासाठीं तिनें होमरूल ही संस्था काढली व मोठी चळवळ सुरू केली. अशी परिस्थिति असतां १९१६ मध्यें काँग्रेसचें अधिवेशन लखनौ येथें भरलें. मुस्लीम लीगचेंही अधिवेशन लखनौ येथें भरलें. तेथें काँग्रेस व मुस्लिम लीग

चा संस्थांच्या पुढाऱ्यांमध्यें चर्चा होऊन एक करार झाला (लखनौ पॅक्ट). त्यांत काँग्रेसनें मुसलमानांनीं हिंदुस्थानच्या स्वराज्याच्या मागणीस पाठिंबा दिल्यास त्यांस कायदेमंडळामध्यें त्यांच्या लोकसंख्येपेक्षां जास्त सभासद असूं देण्याचें कबूल केलें व काँग्रेस व मुस्लीम लीग या दोन्हीं संस्थांनीं हिंदुस्थानला स्वराज्य देण्यांत यावें असे ठराव पास केले. अशी परिस्थिति असतां काँग्रेस मुसलमानांस त्यांच्या लोकसंख्येपेक्षां जास्ती प्रतिनिधित्व देऊन हिंदूंचे न्याय हक्क गमावत आहे हें पाहून हिंदूंचे हितसंबंध रक्षण करण्यास वेगळी संस्था असणें जरूर आहे हें पाहून पंडित मदन मोहन मालवीय, डॉ. मुंजे वगैरे पुढाऱ्यांनीं **हिंदुमहासभा** ही संस्था स्थापन केली (१९१६). यावेळीं महायुद्ध सुरू होतें, व हिंदु व मुसलमान या दोन्हीं संस्थानींही हिंदुस्थानास स्वराज्य देण्यांत यावें हा ठराव पास केलेला आहे, हें पाहून महायुद्धामध्यें हिंदुस्थानची पूर्णपणें मदत मिळावी म्हणून १९१७ मध्यें ग्रेट ब्रिटनच्या मुख्य प्रधानानें 'हिंदुस्थानांत क्रमाक्रमानें जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्याचें ग्रेट ब्रिटनचें उद्दिष्ट आहे' ही घोषणा केली. महायुद्ध संपल्यावर ब्रिटिश पार्लमेंटनें १९१९ मध्यें भारताच्या राज्यघटनेचा कायदा केला, व त्यांत प्रांताच्या राज्यकारभाराचे दोन विभाग करून त्यांपैकीं एक विभाग लोकनियुक्तांचें बहुमत असलेल्या कायदे-मंडळास जबाबदार असल्याचें ठरविण्यांत आलें. या कायद्यानें प्रांतांतील कांहीं खात्यांमध्यें जबाबदार राज्यपद्धति सुरू व्हावयाची होती, तरी त्यामुळें हिंदु-स्थानांत जबाबदार राज्यपद्धति सुरू व्हावयाची नाहीं हें पाहून राष्ट्रीय पक्षास हा कायदा पसंत पडला नाहीं. यावेळीं महात्मा गांधी हे हिंदुस्थानच्या राजकारणांत पुढें आले असून त्यांस या कायद्यावर बहिष्कार घालावा असें वाटत होतें. नेमस्त पक्षास हा कायदा पूर्णपणें पसंत नव्हता, तरी यांत देण्यांत येणाऱ्या सुधारणांचा फायदा घेऊन आणखी हक्क मिळविण्याचा प्रयत्न करावा असें त्यांस वाटत होतें. अशी परिस्थिति असतां अमृतसर येथें भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनांत १९१९ चा कायदा अपुरा, असमाधानकारक व निराशजनक आहे असा काँग्रेसनें ठराव पास केला. त्यामुळें सरकारविरुद्ध असंतोष पसरून मोठी खळबळ झाली; व दंगेधोपे होऊं लागले तेव्हां हा असंतोष दडपून टाकण्यासाठीं सरकारनें कडक उपाय योजले. अशी परिस्थिति असतां १९२० च्या ऑगष्टमध्यें लो. टिळक मरण पावले. यावेळीं महात्मा गांधी हिंदुस्थानच्या राजकारणांत पुढें

आलेले होते; व १९२० मध्यें नागपूर येथें भरलेल्या काँग्रेसनें **महात्मा गांधींच्या** सूचनेवरून सरकारविरुद्ध असहकारितेचा ठराव पास केला. यानंतर कायदेभंगाची चळवळ सुरू करून कर न देणें वगैरे गोष्टी अंमलांत आणाव्यात असें कांहींस वाटत होतें, पण अहिंसा व्रत पूर्णपणें पाळलें न जाऊन कांहीं ठिकाणीं दंगेधोपे होऊं लागल्यामुळें सार्वत्रिक कायदेभंग न करतां वैयक्तिक कायदेभंग जरूर वाटल्यास करावा अशी स्थानिक काँग्रेस कमिट्यांस परवानगी देण्यांत आली. यानंतर महात्मा गांधींनीं तरुण भारत (Young India) हें वृत्तपत्र काढून लोकजागृतीचें काम सुरू केलें. तेव्हां सरकारनें सी. आर. दास, मोतीलाल नेहरू वगैरे पुढाऱ्यांस अटकेंत ठेवले व 'यंग इंडिया' या वृत्तपत्रांतील लेखाबद्दल महात्मा गांधीस ६ वर्षांची शिक्षा दिली. यानंतर काँग्रेसमध्यें निरनिराळ्या विचारसरणींचे दोन पक्ष निर्माण झाले. यांपैकीं एका पक्षास महात्मा गांधींनीं प्रतिपादिलेला असहकारितेचा व कायदेभंगाचा मार्ग याचा अवलंब करावा असें वाटत होतें, व दुसऱ्या पक्षास काँग्रेसनें बहिष्कार घातला तरी इतर पक्षाचे लोक प्रतिनिधी म्हणून कायदेमंडळांत शिरत आहेत, तेव्हां कायदे मंडळांत शिरून तेथें सरकारास विरोध करावा असें वाटत होतें. १९२३ मध्यें दिल्ली येथें भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनांत कौंसिल प्रवेशास मान्यता देण्यांत आली. तेव्हां १९२३मध्यें झालेल्या निवडणुकींत प्रांतिक व वरिष्ठ कायदेमंडळांत काँग्रेसचे लोक बहुसंख्येनें निवडून आले. या पक्षास स्वराज्य पक्ष असें म्हणण्यांत येऊन त्याचें पुढारीपण सी. आर. दास व पंडित मोतीलाल नेहरू यांच्याकडे होतें. या पक्षानें कौंसिलमध्यें शिरून तेथें सरकारविरोधी धोरण अंमलांत आणिलें. महात्मा गांधींच्या धोरणाप्रमाणें वागणाऱ्या २ ऱ्या पक्षानें खादीप्रसार, राष्ट्रीय शिक्षण, ग्रामोद्धार, जनतासंपर्क वगैरे बाबतींत लक्ष घालून काँग्रेस चळवळीचें लोण खेड्यापाड्यांपर्यंत पोहोंचविलें. १९२४ मध्यें सरकारनें महात्मा गांधींची मुक्तता केली व या पुढील चार वर्षें महात्मा गांधींनीं राजकारणांत फारसा भाग घेतला नाहीं.

१९२७ मध्यें मद्रास येथें भरलेल्या काँग्रेसनें **श्रीनिवास आयंगार** व पंडित **जवाहिरलाल नेहरू** यांच्या सूचनेप्रमाणें **संपूर्ण स्वातंत्र्य** मिळविणें हें काँग्रेसचें उद्दिष्ट असल्याचें जाहीर केलें.

यानंतर भारतांतील सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची एक बैठक दिल्ली

येथें भरविण्यांत येऊन तिनें नेमलेल्या कमिटीनें पंडित मोतिलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखालीं भारतास इतर स्वसत्ताक वसाहतींप्रमाणें स्वराज्याचे हक्क असावेत (डोमेनियनचा दर्जा) असा राज्यघटनेचा मसुदा तयार केला. या मसुद्यास मुस्लिम लीग खेरीज इतर सर्व पक्षांची मान्यता होती. या नेहरू रिपोर्टास सरकारनें ३१ डिसेंबर १९२९ पर्यंत मान्यता दिली नाहीं तर शांततामय कायदेभंग चळवळ काँग्रेस सुरू करील असा कलकत्ता येथें १९२९ मध्यें भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनांत ठराव पास झाला.

सरकारनें नेहरू रिपोर्टास मान्यता न दिल्यामुळें १२ मार्च १९३० रोजीं महात्मा गांधी यांनीं दांडी येथें कायदेभंग करून मीठ तयार केलें. महात्मा गांधींच्या उदाहरणानें सर्वत्र कायदेभंगाची चळवळ सुरू झाली, व सर्व देशभर मोठी खळबळ उडाली. तेव्हां सरकारनें महात्मा गांधींस १४ मे १९३० रोजीं अटक केली, व काँग्रेस वर्किंग कमेटी बेकायदेशीर ठरविली. पण भारतास इतर स्वसत्ताक वसाहतींचा दर्जा देण्यासाठीं चर्चा करण्यासाठीं लंडन येथें एक गोलमेज परिषद (सर्व सारख्या दर्जाचे समजून होणारी चर्चा) भरविण्याचें ठरवून त्यांत भाग घेण्यास हिंदुस्थानांतील इतर राजकीय पक्षांस बोलाविलें. ही परिषद् भरविण्यांत आली, पण काँग्रेसचा त्यांत भाग नसल्यामुळें तिचें महत्त्व पुष्कळच कमी झालें. तेव्हां काँग्रेस व सरकार यांमध्यें बोलणें होऊन २ री गोलमेज परिषद् १९३१ मध्यें भरविण्यांत आली. त्यांत काँग्रेसचे प्रतिनिधी म्हणून महात्मा गांधी हजर राहिले. पण या परिषदेंत ब्रिटिश सरकार व काँग्रेस यांच्यामध्यें मतभेद झाला. तेव्हां महात्मा गांधी २८ डिसें. १९३१ मध्यें परत आले व १९३२ मध्यें कायदेभंगाची मोठी चळवळ सुरू झाली. तेव्हां सरकारनें महात्मा गांधी व इतर पुढारी यांस अटकेंत ठेवले; पण पुढें त्यांची मुक्तता करण्यांत आली. १९३४ मध्यें काँग्रेसमधील कांहीं पुढाऱ्यांनीं आचार्य नरेंद्र देव यांच्या नेतृत्वाखालीं **सोशालिस्ट** (समाजसत्तावादी) पक्षाची स्थापना केली. यानंतर ब्रिटिश पार्लमेंटनें १९३५ मध्यें हिंदुस्थानच्या राज्यघटनेसंबंधींचा कायदा पास केला. यांत संस्थानीं हिंदुस्थान व ब्रिटिश हिंदुस्थान यांचें एक संघराज्य स्थापन व्हावयाचें होतें. यांत संस्थानांतर्फे घेणारे प्रतिनिधी संस्थानिकांनीं नेमलेले असावयाचे, व मध्यवर्ती सरकारचीं सर्व खातीं कायदेमंडळास जबाबदार रहावयाचीं नसल्यानें या कायद्यास काँग्रेसचा विरोध होता. मध्यवर्ती

आलेले होते; व १९२० मध्यें नागपूर येथें भरलेल्या काँग्रेसनें **महात्मा गांधींच्या** सूचनेवरून सरकारविरुद्ध असहकारितेचा ठराव पास केला. यानंतर कायदेभंगाची चळवळ सुरू करून कर न देणें वगैरे गोष्टी अंमलांत आणाव्यात असें कांहींस वाटत होतें, पण अहिंसा व्रत पूर्णपणें पाळलें न जाऊन कांहीं ठिकाणीं दंगेधोपे होऊं लागल्यामुळें सार्वत्रिक कायदेभंग न करतां वैयक्तिक कायदेभंग जरूर वाटल्यास करावा अशी स्थानिक काँग्रेस कमिट्यांस परवानगी देण्यांत आली. यानंतर महात्मा गांधींनीं तरुण भारत (Young India) हें वृत्तपत्र काढून लोकजागृतीचें काम सुरू केलें. तेव्हां सरकारनें सी. आर. दास, मोतीलाल नेहरू वगैरे पुढाऱ्यांस अटकेंत ठेवले व 'यंग इंडिया' या वृत्तपत्रांतील लेखाबद्दल महात्मा गांधीस ६ वर्षांची शिक्षा दिली. यानंतर काँग्रेसमध्यें निरनिराळ्या विचारसरणींचे दोन पक्ष निर्माण झाले. यांपैकीं एका पक्षास महात्मा गांधींनीं प्रतिपादिलेला असहकारितेचा व कायदेभंगाचा मार्ग याचा अवलंब करावा असें वाटत होतें, व दुसऱ्या पक्षास काँग्रेसनें बहिष्कार घातला तरी इतर पक्षाचे लोक प्रतिनिधी म्हणून कायदेमंडळांत शिरत आहेत, तेव्हां कायदेमंडळांत शिरून तेथें सरकारास विरोध करावा असें वाटत होतें. १९२३ मध्यें दिल्ली येथें भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनांत कौंसिल प्रवेशास मान्यता देण्यांत आली. तेव्हां १९२३मध्यें झालेल्या निवडणुकींत प्रांतिक व वरिष्ठ कायदेमंडळांत काँग्रेसचे लोक बहुसंख्येनें निवडून आले. या पक्षास स्वराज्य पक्ष असें म्हणण्यांत येऊन त्याचें पुढारीपण सी. आर. दास व पंडित मोतीलाल नेहरू यांच्याकडे होतें. या पक्षानें कौंसिलमध्यें शिरून तेथें सरकारविरोधी धोरण अंमलांत आणिलें. महात्मा गांधींच्या धोरणाप्रमाणें वागणाऱ्या २ ऱ्या पक्षानें खादीप्रसार, राष्ट्रीय शिक्षण, ग्रामोद्धार, जनतासंपर्क वगैरे बाबतींत लक्ष घालून काँग्रेस चळवळीचें लोण खेड्यापाड्यांपर्यंत पोहोंचविलें. १९२४ मध्यें सरकारनें महात्मा गांधींची मुक्तता केली व या पुढील चार वर्षें महात्मा गांधींनीं राजकारणांत फारसा भाग घेतला नाहीं.

१९२७ मध्यें मद्रास येथें भरलेल्या काँग्रेसनें **श्रीनिवास आयंगार** व पंडित **जवाहिरलाल नेहरू** यांच्या सूचनेप्रमाणें **संपूर्ण स्वातंत्र्य** मिळविणें हें काँग्रेसचें उद्दिष्ट असल्याचें जाहीर केलें.

यानंतर भारतांतील सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची एक बैठक दिल्ली

येथें भरविण्यांत येऊन तिनें नेमलेल्या कमिटीनें पंडित मोतिलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखालीं भारतास इतर स्वसत्ताक वसाहतींप्रमाणें स्वराज्याचे हक्क असावेत (डोमेनियनचा दर्जा) असा राज्यघटनेचा मसुदा तयार केला. या मसुद्यास मुस्लिम लीग खेरीज इतर सर्व पक्षांची मान्यता होती. या नेहरू रिपोर्टास सरकारनें ३१ डिसेंबर १९२९ पर्यंत मान्यता दिली नाहीं तर शांततामय कायदेभंग चळवळ काँग्रेस सुरू करील असा कलकत्ता येथें १९२९ मध्यें भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनांत ठराव पास झाला.

सरकारनें नेहरू रिपोर्टास मान्यता न दिल्यामुळें १२ मार्च १९३० रोजीं महात्मा गांधी यांनीं दांडी येथें कायदेभंग करून मीठ तयार केलें. महात्मा गांधींच्या उदाहरणानें सर्वत्र कायदेभंगाची चळवळ सुरू झाली, व सर्व देशभर मोठी खळबळ उडाली. तेव्हां सरकारनें महात्मा गांधींस १४ मे १९३० रोजीं अटक केली, व काँग्रेस वर्किंग कमेटी बेकायदेशीर ठरविली. पण भारतास इतर स्वसत्ताक वसाहतींचा दर्जा देण्यासाठीं चर्चा करण्यासाठीं लंडन येथें एक गोलमेज परिषद (सर्व सारख्या दर्जाचे समजून होणारी चर्चा) भरविण्याचें ठरवून त्यांत भाग घेण्यास हिंदुस्थानांतील इतर राजकीय पक्षांस बोलाविलें. ही परिषद भरविण्यांत आली, पण काँग्रेसचा त्यांत भाग नसल्यामुळें तिचें महत्त्व पुष्कळच कमी झालें. तेव्हां काँग्रेस व सरकार यांमध्यें बोलणें होऊन २ री गोलमेज परिषद १९३१ मध्यें भरविण्यांत आली. त्यांत काँग्रेसचे प्रतिनिधी म्हणून महात्मा गांधी हजर राहिले. पण या परिषदेंत ब्रिटिश सरकार व काँग्रेस यांच्यामध्यें मतभेद झाला. तेव्हां महात्मा गांधी २८ डिसें. १९३१ मध्यें परत आले व १९३२ मध्यें कायदेभंगाची मोठी चळवळ सुरू झाली. तेव्हां सरकारनें महात्मा गांधी व इतर पुढारी यांस अटकेंत ठेवले; पण पुढें त्यांची मुक्तता करण्यांत आली. १९३४ मध्यें काँग्रेसमधील कांहीं पुढाऱ्यांनीं आचार्य नरेंद्र देव यांच्या नेतृत्वाखालीं **सोशालिस्ट** (समाजसत्तावादी) पक्षाची स्थापना केली. यानंतर ब्रिटिश पार्लमेंटनें १९३५ मध्यें हिंदुस्थानच्या राज्यघटनेसंबंधींचा कायदा पास केला. यांत संस्थानीं हिंदुस्थान व ब्रिटिश हिंदुस्थान यांचें एक संघराज्य स्थापन व्हावयाचें होतें. यांत संस्थानांतर्फे घेणारे प्रतिनिधी संस्थानिकांनीं नेमलेले असावयाचे, व मध्यवर्ती सरकारचीं सर्व खातीं कायदेमंडळास जबाबदार रहावयाचीं नसल्यानें या कायद्यास काँग्रेसचा विरोध होता. मध्यवर्ती

कायदेमंडळांत संस्थानांतर्फे प्रतिनिधी यावयाचें असल्यामुळें आपण अधिक अल्पसंख्याक होऊं म्हणून मुस्लिम लीगला हा कायदा पसंत नव्हता, व त्यांनीं बॅ. **जिना** यांच्या नेतृत्वाखालीं मुस्लिम बहुसंख्य असलेल्या प्रांतांचें वेगळें '**पाकिस्तान**' हें राज्य स्थापन करण्यांत यावें अशी मागणी केली. तेव्हां या कायद्याचा मध्यवर्ती सरकार स्थापण्याचा भाग अंमलांत आला नाहीं. पुढें १९३९ मध्यें २ रें महायुद्ध सुरू झालें. लोकशाहीच्या संरक्षणासाठीं हें युद्ध आहे असें ब्रिटिशांकडून सांगण्यांत येऊं लागलें. हें युद्ध सुरू असतां नेताजी **सुभाषचंद्र बोस** गुप्त वेषानें भारताच्या बाहेर गेले व त्यांनीं इतर स्वतंत्र राष्ट्रांची सहानुभूति मिळवून परकीयांच्या वर्चस्वापासून भारताची मुक्तता करण्यासाठीं ब्रह्मदेशांत हिंदी राष्ट्रीय सैन्याची उभारणी केली. १९४२ मध्यें मुंबई येथें भरलेल्या काँग्रेसनें 'ब्रिटिशांनीं हिंदुस्थान सोडून चालतें व्हावें' (चले जाव) असा ठराव पास केला. याच सुमारास जपाननें ब्रिटिशांचें पूर्वेकडील ब्रह्मदेश, मलाया, सिंगापूर, फ्रेंचांचा इंडोचायना व डचांचा इंडोनेशिया हे प्रदेश जिंकून घेतले (१९४१-४२) व जपानी सैन्य हिंदुस्थानच्या सीमेपर्यंत आलें. अशा परिस्थितीमुळें भारतास ब्रिटिश स्वसत्ताक वसाहतींप्रमाणें डोमीनियनचा दर्जा देणें जरूर आहे असें ब्रिटिश मुत्सद्यांस वाटूं लागलें व त्यांनीं भारतांतील प्रमुख राजकीय पक्ष जो काँग्रेस त्याच्या पुढाऱ्यांशीं बोलणें करण्यांस सर स्ट्रॅफर्ड क्रिप्स यास पाठविलें. पुढें या युद्धांत जपानचा पराभव होऊन युद्ध थांबल्यावर (१९४५) मजूर मंत्रिमंडळ अधिकारारूढ असतां ब्रिटिश पार्लमेंटनें १९४७ मध्यें हिंदुस्थानसंबंधीं कायदा केला. त्यांत हिंदुस्थानचें भारत व पाकिस्थान असे दोन विभाग पाडून त्यांस ब्रिटिश डोमीनियनचा दर्जा—म्हणजे त्यांस स्वराज्य देऊन ब्रिटिश साम्राज्य व कॉमनवेल्थमधून बाहेर पडून स्वतंत्र होण्याचा अधिकार—दिला, व भारतांतील सत्तेचा त्याग केला; त्यामुळें भारत व पाकिस्तान हीं दोन डोमीनियन्स—स्वसत्ताक राष्ट्रें—निर्माण झालीं (१५ ऑगस्ट १९४७). यानंतर भारतानें आपलीं राज्यघटना तयार करून भारताचें **स्वतंत्र लोकसत्ताक संघराज्य** (Federation) स्थापन केलें (१९५० जाने).

(२) अर्वाचीन जपान

(१८६८–१९३९)

जपानमध्यें जागृति—जपानच्या शोगूननें (वंशपरंपरा मुख्य सेनापति) पाश्चात्य व्यापाऱ्यांशीं अपमानकारक तह करून त्यांस बऱ्याच सवलती दिल्या होत्या, त्यामुळें त्यांचें जपानमध्यें बरेच प्रस्थ माजून त्यांच्याविरुद्ध लोकमत बरेंच क्षुब्ध झालें होतें. तेव्हां त्यांस जपानमधून घालवून लावण्यासाठीं १८६३ मध्यें दंगेधोपे झाले व परकीय लोकांपैकीं कांहीं ठार होऊन त्यांच्या मालमत्तेची नासधूस झाली. तेव्हां इंग्लिश, अमेरिकन, डच या पाश्चात्य व्यापाऱ्यांच्या संयुक्त आरमारानें जपानी बंदरांवर तोफांचा भडिमार करून तीं उध्वस्त करून टाकलीं (१८६४) व दंगेधोपे करणारांचा मोड केला. जपानच्या किनाऱ्यावर थोड्या परकीय जहाजांनीं केलेला हा पराक्रम पाहून जपानी लोकांस आधुनिक परिणामकारक शस्त्रास्त्रें व पाश्चात्य ज्ञान यांच्या अभावीं आपला कमकुवतपणा दिसून आला, व आपलें स्वातंत्र्य व महत्त्व टिकवावयाचें असेल तर पाश्चात्यांचें शास्त्रीय ज्ञान, कला, विद्या व त्यांचीं अधुनिक शस्त्रास्त्रें आत्मसात केली पाहिजेत असें वाटूं लागलें. याच सुमारास जपानमधील शोगन व बादशहा मरण पावल्यामुळें शोगनच्या विरुद्ध असलेल्या अमीरउमरावांनीं शोगनच्या घराण्याकडे असलेली लष्करी सत्ता काढून घेऊन ती जपानच्या गादीवर आलेला तरुण बादशहा **मटसो हिटो** (Mutso Hito १८६७–१९१२) याच्याकडे दिली. मटसो हिटो यानें **मैजी टेनो** (Meiji Tenno) ही पदवी धारण केली.

जपानमधील सुधारणा

पाश्चात्य विद्याकलांचा स्वीकारः—मटसो हिटो हा उत्साही व कर्तृत्ववान् होता व त्यानें आपल्या मंत्र्यांच्या सूचनेप्रमाणें जपानमध्यें सुधारणा घडवून आणण्याचें योजलें. या योजनेप्रमाणें पाश्चात्य राष्ट्रांत यंत्राच्या साहाय्यानें व वाफेच्या शक्तीनें चालणारे मोठमोठे उद्योगधंदे, पाश्चात्य राज्यकारभाराची पद्धत, सैन्य व आरमाराची व्यवस्था, भौतिक शास्त्रांत केलेली प्रगति यांचें निरीक्षण करण्यास परराष्ट्रांत शिष्टमंडळें पाठविण्यांत आलीं. पाश्चात्य ज्ञान मिळविण्यासाठीं परराष्ट्रांत विद्यार्थी पाठविण्यांत आले. परकीय तज्ज्ञ जपानमध्यें बोलावून त्यांच्या साहाय्यानें रेल्वे रस्ते बांधणें, तारायंत्र व

टेलिफोन सुरू करणें, सैन्य व आरमार यांची पुनर्घटना करणें व अर्धुनिक शस्त्रास्त्रांनीं तें सुसज्ज करणें व त्याची वाढ करणें वगैरे गोष्टी करण्यांत आल्या. पाश्चात्य ज्ञान, कला, विद्या व भाषा शिकविण्याच्या शाळा व कॉलेजें काढण्यांत आलीं; पाश्चात्य वर्षगणनेची पद्धत, फ्रान्सच्या कोड नेपोलियन या धर्तीवर जपानमधील कायद्यांची आंखणी केली, पाश्चात्यांशीं सलोख्याचे संबंध ठेवून त्यांस जपानमध्यें येण्यास उत्तेजन दिलें.

सरंजामी पद्धत रद्द (१८७१)— जपानमध्यें सरंजामी पद्धत रूढ होती व निरनिराळे व्यवसाय व धंदे वंशपरंपरा करण्याची पद्धत होती. १८७१ मध्यें सरंजामी पद्धत रद्द करण्यांत आली. त्यामुळें बादशहाची सत्ता वाढली व ती केंद्रीभूत झाली, व त्यास आपण नेमलेल्या व आपणांस जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांमार्फत राज्यकारभार करणें शक्य झालें. त्याचप्रमाणें शेतावरील कुळें मुक्त होऊन त्यांस आपणांस आवडेल तो व्यवसाय करतां येऊं लागला. त्यामुळें सैन्य, आरमार, निरनिराळे उद्योगधंदे यांत लायक तरुणांचा शिरकाव होऊं लागला.

उद्योगधंदे—यंत्राच्या साहाय्यानें व वाफेच्या शक्तीनें चालणारे मोठेमोठे उद्योगधंदे स्थापन करण्यांत आले. त्याचप्रमाणें जपानमध्यें पूर्वापार चालत आलेले घरगुती स्वरूपाचे लहान उद्योगधंदे यांचा ऱ्हास होऊं नये याबद्दल काळजी घेण्यांत आली. या उद्योगधंद्यांच्या वाढीसाठीं कर्जाऊ रकमा देण्याची व्यवस्था करण्यांत आली. देशी उद्योगधंद्यांस परकीय उद्योगधंद्यांची चढाओढ बाधूं नये म्हणून जरूर तेथें संरक्षित व्यापाराची पद्धत अंमलांत आणून परकीय पक्क्या आयात मालावर जकात बसविण्यांत आली.

जपानची राज्यघटना:—१८८९ मध्यें जपानची नवी राज्यघटना करण्यांत आली. या घटनेप्रमाणें कायदे करण्यासाठीं दोन सभांचें कायदेमंडळ नेमण्यांत आलें. यांपैकीं वरच्या गृहाचे सभासद जपानचा बादशहा व मोठेमोठे अमीर-उमराव, सरदार व धनाढ्य वर्गांनीं नेमलेले असावयाचे व खालच्या गृहांतील सभासद जपानमधील सामान्य लोकांनीं निवडलेले असावयाचें. निवडणुकीचा अधिकार हा कांहीं ठराविक मालमत्ता असणाऱ्यांस होता, पण पुढें १९२५ च्या कायद्यानें ती अट रद्द करण्यांत आली. राज्यकारभार करणारें मंत्रिमंडळ या

दोन गृहांच्या कायदेमंडळास (पार्लमेंट) जबाबदार नसे. त्याचप्रमाणें सैन्य व आरमार व त्यावरील अधिकारी हे पार्लमेंटला जबाबदार नसून ते जपानच्या बादशहास जबाबदार होते.

सुधारणांचा परिणाम—जपाननें अमलांत आणलेल्या या सुधारणांमुळें ३०–४० वर्षांच्या आंत जपान हें राष्ट्र औद्योगिक व व्यापारविषयक बाबतींत पुढें आलें, त्याचप्रमाणें लष्करी बाबतींतही प्रबल झालें. या सुधारणांमुळें जपानमध्यें औद्योगिक क्रान्ति होऊन पक्का माल मुबलक प्रमाणांत तयार होऊं लागला व तो खपविण्यासाठीं बाजारपेठांची जरूरी भासूं लागली. त्याचप्रमाणें जपानची लोकसंख्या वाढूं लागल्यामुळें या वाढत्या लोकसंख्येसाठीं नवीन प्रदेश मिळविणें व वसाहती स्थापन करणें यांची आवश्यकता वाटूं लागली. त्यामुळें १९ व्या शतकाच्या शेवटीं व्यापार, वसाहती व अंकित प्रदेश या बाबतींत जपानची इतर पाश्चात्य राष्ट्रांशीं स्पर्धा सुरू झाली.

जपानचें परराष्ट्रीय धोरण व प्रदेशविस्तार—लष्करी व आरमारी बाबतींत जपान प्रबल झाल्यावर जपाननें इतर पाश्चात्य राष्ट्रांशीं अस्तित्वांत असलेले अपमानकारक तह रद्द केले (१८९४) व बरोबरीच्या नात्याचे नवे तह केले. यानंतर जपाननें आपलें साम्राज्य वाढविण्याचें धोरण आंखलें. १८९४ मध्यें जपाननें चीनशीं युद्ध जाहीर केलें व चीनचा पराभव करून फार्मोसा व पेस्काडोरिस हीं बेटें मिळविलीं; व कोरियावर नियंत्रण बसविलें. चीनमध्यें सुरू झालेली बॉक्सर दंगल मोडण्याच्या कामीं पाश्चात्य राष्ट्रांस मदत केली. रशियानें पोर्ट आर्थर या बंदराची केलेली तटबंदी, हार्बिनपासून पोर्ट ऑर्थरपर्यंत बांधलेला रेल्वे फाटा व मांचुरियावर स्थापन केलेलें वर्चस्व पाहून आपल्या साम्राज्य विस्ताराच्या धोरणास रशियाकडून अडथळा येईल हें पाहिलें व १९०२ मध्यें ग्रेट ब्रिटनशीं तह केला. अशी परिस्थिति असतां जपाननें १९०४ मध्यें पोर्ट आर्थरवर हल्ला केला, त्यामुळें रशिया व जपान यांमध्यें युद्ध सुरू झालें. या युद्धांत (१९०४–५) जपानला जय मिळाला व जपानचें महत्त्व व दरारा खूप वाढला. जपाननें लायटुंग द्वीपकल्प भाडेपट्टीनें मिळविलें व साखरीन बेटाचा दक्षिण भाग मिळविला. आपला पक्का माल खपविण्याला जपानला बाजारपेठ पाहिजे होती व चीन ही ती बाजारपेठ झाली. जपाननें १९१० मध्यें कोरिया हस्तगत केला.

१९१४ मध्यें पहिलें महायुद्ध सुरू झाल्यावर जपाननें ग्रेट ब्रिटनच्या बाजूनें जर्मनीविरुद्ध युद्धांत भाग घेतला व जर्मनीचें चीनच्या किनाऱ्यावरील किआचाऊ हें ठाणें हस्तगत करून चीनच्या शानटुंग द्वीपकल्पावर हल्ला केला, व त्यावर आपलें वर्चस्व बसविलें. १ ल्या महायुद्धानंतर झालेल्या तहानें जपानला चीनचें शानटुंग द्वीपकल्प व उत्तर पॅसिफिक महासागरांतील जर्मनीचीं बेटें व ठाणीं मिळालीं (१९१९).

चीनमध्यें अंतस्थ खळबळ व दुफळी झाली होती, तेव्हां त्याचा फायदा घेऊन चीनच्या विस्तृत प्रदेशापैकीं कांहीं आपल्या वर्चस्वाखालीं आणावा असें जपानला वाटूं लागलें. चीनचा मांचुरिया हा प्रांत खनिज व उद्भिज संपत्तीनें समृद्ध असा होता, व त्यावर जपाननें १९३१ मध्यें स्वारी केली, व तो आपल्या वर्चस्वाखालीं आणला. चीननें जपानच्या या आक्रमणाबद्दल राष्ट्रसंघाकडे तक्रार केली, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. जपाननें मांचुरियामध्यें मांचक्यू हें राज्य स्थापन केलें, व चीनचा मांचू घराण्यांतील राज्यत्याग केलेला बादशहा पू-ची (Pu-yi) यास त्याचा राजा केले, व तें राष्ट्र स्वतंत्र असल्याचें जाहीर केलें. यानंतर जपाननें मांचक्यूच्या शेजारीं असलेल्या चीनच्या जेहोल या प्रांतावर स्वारी केली (१९३३). जपाननें चीनवर केलेलें आक्रमण थांबवावें व आपलें सैन्य चीनमधून बाहेर न्यावें म्हणून राष्ट्रसंघानें जपानला सूचना केल्या पण जपाननें त्या धुडकावून लावून राष्ट्रसंघाचे सभासद म्हणून असलेलें आपलें नांव काढून घेतलें. यानंतर चीनचा आणखी कांहीं प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणण्याचा प्रयत्न चालविला (१९३५–३९).

---

(३) अर्वाचीन चीन

(१९०० ते १९३९)

चीनमध्यें जागृति—चीनमधून पाश्चात्य व्यापाऱ्यांस घालवून लावण्याचा बॉक्सर दंगल करून केलेला प्रयत्न फसल्यावर (१९००), पाश्चात्यांचें तोफा बंदुका वगैरे आधुनिक शस्त्रास्त्रांचें सामर्थ्य चीनच्या दृष्टोत्पत्तीस आलें व आपलें स्वातंत्र्य टिकवावयाचें असेल तर पाश्चात्य ज्ञान व शस्त्रास्त्रें आत्मसात करणें

जरूर आहे असें चीनच्या सरकारास वाटूं लागलें. यानंतर जपान या लहान पौर्वात्य राष्ट्रानें पाश्चात्य ज्ञान आत्मसात करून बलाढ्य समजल्या जाणाऱ्या रशिया या पाश्चात्य राष्ट्रावर मिळविलेल्या विजयाचा चीनवर मोठा परिणाम झाला, व चीनमध्यें जागृति होऊन पाश्चात्य ज्ञान आत्मसात करण्याचें धोरण चीननें अंमलांत आणिलें.

चीनमधील सुधारणा—पाश्चात्य ज्ञान व कलाविद्या यांचें अध्ययन करण्यासाठीं चिनी विद्यार्थ्यांस अमेरिका, युरोपमधील प्रमुख देश व जपान यांमध्यें पाठविण्यांत आले. देशाचीं औद्योगिक बाबतींत प्रगति व्हावी म्हणून परकीय तज्ज्ञांच्या मदतीनें चीनमध्यें रेल्वे रस्ते बांधणें, तारायंत्र व टेलिफोन सुरू करून यंत्राच्या साहाय्यानें व वाफ, तेल व वीज यांच्या शक्तीनें चालणारे मोठमोठे कारखाने काढणें, खनिज पदार्थांच्या खाणीं खोदणें वगैरे कामें सुरू करण्यांत आलीं व परराष्ट्रांनीं त्यांत आपलें भांडवल घालावें म्हणून त्यांस प्रोत्साहन देण्यांत आलें. शाळा-कॉलेजांतून पाश्चात्य विद्या व शास्त्रें त्याचप्रमाणें परकीय भाषा, इतिहास, भूगोल, कायदा वगैरे विषय शिकविण्याची व्यवस्था करण्यांत आली. चीनमधील कायदे, न्यायकोर्टांतील कामकाजाची पद्धत यांमध्येंही सुधारणा करण्यांत आली. युआन शीर-काय (Yuan Shih-Kai) या चीनच्या सेनापतीच्या नेतृत्वाखालीं पाश्चात्य तज्ज्ञांची मदत घेऊन चीनच्या सैन्याची पुनर्घटना करण्यांत आली व तें आधुनिक शस्त्रास्त्रांनीं सुसज्ज करण्यांत आलें. आरमारही प्रबल व संरक्षणक्षम करण्यांत आलें. चीननें स्वीकारलेल्या या धोरणामुळें चीनची प्रगति होऊं लागली. पाश्चात्य विचारांचा चीनमधील शिक्षित लोकांवर पगडा बसून चीनच्या बादशहाच्या हातांतील अनियंत्रित सत्ता नाहींशी होऊन लोकांनीं निवडलेल्या कायदे-मंडळाच्या (पार्लमेंट) सल्ल्यानें त्यानें राज्यकारभार करावा असें लोकांस वाटूं लागलें; व तशा प्रकारच्या सूचना चीनच्या बादशहास करण्यांत आल्या. तेव्हां चीनच्या बादशहानें एक फर्मान काढून लोकांनीं निवडलेल्या पार्लमेंटची स्थापना करण्यांत येईल असें आश्वासन दिलें (१९०६). चीनची राजधानी उत्तरेकडील **पेकिंग** हें शहर होतें. यानंतर लवकरच चीनचा बादशहा मरण पावून पू-ची हा अल्पवयी मुलगा चीनचा बादशहा झाला व तो अज्ञान असल्यामुळें राज्यकारभार त्याच्या पालकाकडे गेला. पण तो अप्रिय असल्यामुळें

१९१४ मध्यें पहिलें महायुद्ध सुरू झाल्यावर जपाननें ग्रेट ब्रिटनच्या बाजूनें जर्मनीविरुद्ध युद्धांत भाग घेतला व जर्मनीचें चीनच्या किनाऱ्यावरील किआचाऊ हें ठाणें हस्तगत करून चीनच्या शानटुंग द्वीपकल्पावर हल्ला केला, व त्यावर आपलें वर्चस्व बसविलें. १ ल्या महायुद्धानंतर झालेल्या तहानें जपानला चीनचें शानटुंग द्वीपकल्प व उत्तर पॅसिफिक महासागरांतील जर्मनीचीं बेटें व ठाणीं मिळालीं (१९१९).

चीनमध्यें अंतस्थ खळबळ व दुफळी झाली होती, तेव्हां त्याचा फायदा घेऊन चीनच्या विस्तृत प्रदेशापैकीं कांहीं आपल्या वर्चस्वाखालीं आणावा असें जपानला वाटूं लागलें. चीनचा मांचुरिया हा प्रांत खनिज व उद्भिज संपत्तीनें समृद्ध असा होता, व त्यावर जपाननें १९३१ मध्यें स्वारी केली, व तो आपल्या वर्चस्वाखालीं आणला. चीननें जपानच्या या आक्रमणाबद्दल राष्ट्रसंघाकडे तक्रार केली, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. जपाननें मांचुरियामध्यें मांचक्यू हें राज्य स्थापन केलें, व चीनचा मांचू घराण्यांतील राज्यत्याग केलेला बादशहा पू-यी (Pu-yi) यास त्याचा राजा केले, व तें राष्ट्र स्वतंत्र असल्याचें जाहीर केलें. यानंतर जपाननें मांचक्यूच्या शेजारीं असलेल्या चीनच्या जेहोल या प्रांतावर स्वारी केली (१९३३). जपाननें चीनवर केलेलें आक्रमण थांबवावें व आपलें सैन्य चीनमधून बाहेर न्यावें म्हणून राष्ट्रसंघानें जपानला सूचना केल्या पण जपाननें त्या धुडकावून लावून राष्ट्रसंघाचे सभासद म्हणून असलेलें आपलें नांव काढून घेतलें. यानंतर चीनचा आणखी कांहीं प्रदेश आपल्या वर्चस्वाखाली आणण्याचा प्रयत्न चालविला (१९३५–३९).

---

(३) अर्वाचीन चीन

(१९०० ते १९३९)

चीनमध्यें जागृति—चीनमधून पाश्चात्य व्यापाऱ्यांस घालवून लावण्याचा बॉक्सर दंगल करून केलेला प्रयत्न फसल्यावर (१९००), पाश्चात्यांचें तोफा बंदुका वगैरे आधुनिक शस्त्रास्त्रांचें सामर्थ्य चीनच्या दृष्टोत्पत्तीस आलें व आपलें स्वातंत्र्य टिकवावयाचें असेल तर पाश्चात्य ज्ञान व शस्त्रास्त्रें आत्मसात करणें

जरूर आहे असें चीनच्या सरकारास वाटूं लागलें. यानंतर जपान या लहान पौर्वात्य राष्ट्रानें पाश्चात्य ज्ञान आत्मसात करून बलाढ्य समजल्या जाणाऱ्या रशिया या पाश्चात्य राष्ट्रावर मिळविलेल्या विजयाचा चीनवर मोठा परिणाम झाला, व चीनमध्यें जागृति होऊन पाश्चात्य ज्ञान आत्मसात करण्याचें धोरण चीननें अंमलांत आणिलें.

चीनमधील सुधारणा—पाश्चात्य ज्ञान व कलाविद्या यांचें अध्ययन करण्यासाठीं चिनी विद्यार्थ्यांस अमेरिका, युरोपमधील प्रमुख देश व जपान यांमध्यें पाठविण्यांत आले. देशाचीं औद्योगिक बाबतींत प्रगति व्हावी म्हणून परकीय तज्ज्ञांच्या मदतीनें चीनमध्यें रेल्वे रस्ते बांधणें, तारायंत्र व टेलिफोन सुरू करून यंत्राच्या साहाय्यानें व वाफ, तेल व वीज यांच्या शक्तीनें चालणारे मोठमोठे कारखाने काढणें, खनिज पदार्थांच्या खाणी खोदणें वगैरे कामें सुरू करण्यांत आलीं व परराष्ट्रांनीं त्यांत आपलें भांडवल घालावें म्हणून त्यांस प्रोत्साहन देण्यांत आलें. शाळा-कॉलेजांतून पाश्चात्य विद्या व शास्त्रें त्याचप्रमाणें परकीय भाषा, इतिहास, भूगोल, कायदा वगैरे विषय शिकविण्याची व्यवस्था करण्यांत आली. चीनमधील कायदे, न्यायकोर्टांतील कामकाजाची पद्धत यांमध्येंही सुधारणा करण्यांत आली. युआन शीह-काय (Yuan Shih-Kai) या चीनच्या सेनापतीच्या नेतृत्वाखालीं पाश्चात्य तज्ज्ञांची मदत घेऊन चीनच्या सैन्याची पुनर्घटना करण्यांत आली व तें आधुनिक शस्त्रास्त्रांनीं सुसज्ज करण्यांत आलें. आरमारही प्रबल व संरक्षणक्षम करण्यांत आलें. चीननें स्वीकारलेल्या या धोरणामुळें चीनची प्रगति होऊं लागली. पाश्चात्य विचारांचा चीनमधील शिक्षित लोकांवर पगडा बसून चीनच्या बादशहाच्या हातांतील अनियंत्रित सत्ता नाहींशी होऊन लोकांनीं निवडलेल्या कायदे-मंडळाच्या (पार्लमेंट) सल्ल्यानें त्यानें राज्यकारभार करावा असें लोकांस वाटूं लागलें; व तशा प्रकारच्या सूचना चीनच्या बादशहास करण्यांत आल्या. तेव्हां चीनच्या बादशहानें एक फर्मान काढून लोकांनीं निवडलेल्या पार्लमेंटची स्थापना करण्यांत येईल असें आश्वासन दिलें (१९०६). चीनची राजधानी उत्तरेकडील **पेकिंग** हें शहर होतें. यानंतर लवकरच चीनचा बादशहा मरण पावून पू-यी हा अल्पवयी मुलगा चीनचा बादशहा झाला व तो अज्ञान असल्यामुळें राज्यकारभार त्याच्या पालकाकडे गेला. पण तो अप्रिय असल्यामुळें

चीनमध्यें सर्वत्र अस्वस्थता पसरली व दंगेधोपे व्हावयास लागून ठिकठिकाणच्या प्रांताधिकाऱ्यांनीं सत्ता आपल्या हातांत घेतली. अशी परिस्थिति असतां पाश्चात्य देशांत शिक्षण घेऊन आलेला **डॉ. सन यात सेन** या देशभक्ताच्या नेतृत्वाखालीं चीनच्या दक्षिण भागांत एक जनता पक्ष (People's Party) स्थापन झाला व त्यांनीं चीनमध्यें **नानकिंग** येथें लोकसत्ताक राज्य स्थापन झाल्याचें जाहीर करून डॉ. सन यात-सेन यास त्याचें अध्यक्ष केलें. चीन हा अवाढव्य देश होता व त्यांत ठिकठिकाणीं अंदाधुंदी व खळबळ माजलेली पाहून पू-यी या अल्पवयी बादशहाच्या पालकानें देशांत सर्वत्र स्थिरस्थावरता करण्यासाठीं सेनापती युआन शीर-काय याच्याकडे सर्व सत्ता सोंपविली. त्यानें देशांतील एकंदर परिस्थिति पाहून अल्पवयी बादशहा **पू-यी** यास राज्यत्याग करण्याचा सल्ला दिला, तेव्हां बादशहानें **राज्यत्याग** केला (१९११).

चीनमध्यें लोकसत्ताक राज्य, १९१२—तेव्हां चीनमध्यें लोकसत्ताक राज्य स्थापन झाल्याचें जाहीर करण्यांत येऊन **डॉ. सन यात-सेन** यांस या राष्ट्राचे अध्यक्ष नेमण्यांत आलें (१९१२). यावेळीं राष्ट्रांत एकी असणें जरूर आहे हें पाहून डॉ. सन यात सेन यानें उदार मनानें आपल्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला व **युआन शीर-काय** यास चीनच्या लोकसत्ताक राज्याचा अध्यक्ष नेमण्यांत आलें (१९१२) व उत्तरेकडील **पेकिंग** ही या लोकसत्ताक राज्याची राजधानी करण्यांत आली. युआन शीर-काय हा अध्यक्ष होता पण त्याच्या अरेरावीच्या धोरणानें तो अप्रिय झाला व देशांत अस्वस्थता झाली. याच सुमारास १ लें महायुद्ध सुरू झालें, व जपाननें ग्रेट ब्रिटनच्या बाजूनें युद्धांत भाग घेतला व चीनमध्यें अस्वस्थता व दुफळी असलेली पाहून जर्मनीचें चीनच्या किनाऱ्यावरील किआचिऊ हें ठाणें हस्तगत करण्याच्या निमित्तानें चीनच्या शानटुंग द्वीपकल्पांत आपलें सैन्य पाठविलें व तो प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणला (१९१५). यानंतर युआन शिर-काय हा मरण पावला (१९१६) व ली युआन हंग (Li Yuan Hung) हा चीनच्या लोकसत्ताक राज्याचा अध्यक्ष झाला, पण त्यासही राज्यांत स्थिरस्थावरता करितां आली नाहीं. यावेळीं चीनमध्यें डॉ. सन यात-सेन यानें **क्वॉमिनटांग** (Kuomingtang) हा राष्ट्रीय पक्ष स्थापन केला. जपाननें चीनच्या प्रदेशावर केलेले आक्रमण या पक्षास पसंत नव्हतें, व चीनच्या

पार्लमेंटमध्येंही या पक्षाचें बहुमत होतें. अशी स्थिति होती तरी चीनचा अध्यक्ष ली युआन हुंग यानें पार्लमेंटला न विचारतां आपल्या स्वतःच्याच अधिकारानें १ ल्या महायुद्धांत जपान ज्या बाजूला होता त्या बाजूनेंच भाग घेतला. तेव्हां अध्यक्षाचें हें धोरण क्कॉमिनटांग पक्षास पसंत पडलें नाहीं व त्यानें चीनच्या दक्षिण भागांतील कँटन येथें प्रतिस्पर्धी सरकार स्थापन केलें (१९१७). अशारीतीनें चीनमध्यें पेकिंग व कँटन येथें वेगवेगळीं राज्यें स्थापन झालीं. १९२१ मध्यें डॉ. सन यात सेन यास कँटन येथें स्थापन झालेल्या लोकसत्ताक राज्याचा अध्यक्ष करण्यांत आलें. चीनची दुफळी झालेली त्यास पसंत नव्हती, व चीनचें एकीकरण होऊन एक संघटित व प्रबळ असें राज्य स्थापन व्हावें अशी त्याची इच्छा होती, व त्यासाठीं सुसज्ज सैन्य तयार करण्याची जरूरी होती. तेव्हां डॉ. सन यात सेन यानें कँटन येथें एक सैनिकी विद्यालय स्थापन केलें व सेनापति चांग काय शेक यास त्याचें प्रमुख नेमिलें. या सुमारास रशियामध्यें स्थापन झालेल्या सोव्हिएट राज्याकडून चीनमध्यें कम्युनिस्ट विचारांचा (शेतकरी, कामगार व मजूर यांच्या हातीं सत्ता असणें) फैलाव करण्याचा प्रयत्न करण्यांत आला, व चीनमधील लोक व क्कॉमिनटांग पक्षांतील कांहीं लोक कम्युनिस्ट विचाराचे होऊं लागले व त्यामुळें कारखान्यांत संप व परकीयांविरुद्ध दंगेधोपे होऊं लागले. अशी परिस्थिति असतां डॉ. सन यात सेन हा मरण पावला (१९२५). तेव्हां सेनापति चँग काय शेक हा क्कॉमिंगटांग पक्षाचा प्रमुख झाला. कम्युनिस्ट विचाराच्या लोकांच्या चिथावणीनें होत असलेले संप व परकीयांविरूद्ध दंगेधोपे त्यास पसंत नव्हते व ते विचार दडपून टाकण्याचे त्यानें योजलें. डॉ. सन यात सेनचें धोरण त्यानें पुढें चालविलें, व सर्व चीनचें एक प्रबळ व संघटित राष्ट्र करण्याच्या उद्देशानें उत्तरेकडील प्रदेशावर स्वारी करून १९२८ मध्यें पेकिंग राजधानी हस्तगत केली व अशारीतीनें सर्व चीनचें एकीकरण झालें. यानंतर **नानकिंग** हें मध्यवर्ती ठिकाण चीनच्या लोकसत्ताक राज्याची राजधानी करण्यांत आलें व **चँग काय शेक** यास त्याचा अध्यक्ष नेमण्यांत आलें (१९२८).

चँग काय शेकच्या सुधारणा— हातीं सत्ता आल्यावर चांग काय शेकनें पुष्कळ उपयुक्त सुधारणा केल्या. त्यानें अमेरिकन तज्ज्ञांची मदत घेऊन राज्यांतील आर्थिक घडी नीट पायावर बसविली. बंदरांची डागडुजी केली.

देशांतील दळणवळण वाढावें म्हणून नवे पक्के रस्ते बांधले व जुने दुरुस्त केले व त्यावरून मोटारींची वहातुक सुरू केली. वैमानिक वहातुक सुरू करून देशांतील दूरदूरचीं ठिकाणें एकमेकांस जोडलीं. देशांतील उद्योगधंद्यांस उत्तेजन दिलें. शाळा व कॉलेजें यांची संख्या वाढवून त्यांत आधुनिक शास्त्रांचें ज्ञान व विद्या शिकविण्याची सोय केली. कालवे व पाटबंधारे चांगल्या स्थितींत ठेवून शेतकीच्या नवीन पद्धतींचें ज्ञान शेतकऱ्यांस देऊन शेतकीची पैदास वाढविण्यास त्यांस उत्तेजन दिलें.

जपानचें आक्रमण— अशाप्रकारें चांग काय शेक यानें चीनची भरभराट करण्याचा प्रयत्न केला तरी १९३१–३९ च्या दरम्यान चीनच्या मांचुरिया व त्यानंतर जेहोल या प्रांतावर होत असलेल्या जपानच्या आक्रमणास त्यास प्रतिबंध करतां आला नाहीं, व त्या प्रांतावर जपाननें आपलें वर्चस्व बसवून मांचुरियांत 'मँचिक्यू' हें आपल्या संरक्षणाखालीं स्वतंत्र राज्य स्थापन केलें व चीनमध्यें १९१२ मध्यें राज्यत्याग केलेल्या मांचू घराण्यांतील पू ची या बादशहास त्या राज्याचा राजा केलें. चीननें जपाननें केलेल्या आक्रमणाविरुद्ध राष्ट्रसंघाकडे तक्रार केली पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

सारांश

(अ) **युरोपमधील घडामोडी व संघटित राज्यांची स्थापना—**

(१) **स्वातंत्र्य, राष्ट्रीयत्व व लोकशाही संपादन करण्यासाठीं चळवळी** १८२०–१८४८–व्हिएन्ना येथील परिषदेचें प्रतिगामी धोरण; मेटार्निकचें नेतृत्व; पूर्वीच्या राजकर्त्यांकडे अनियंत्रित सत्ता. नेपल्स व स्पेनमधील चळवळ दडपून टाकण्यांत आली (१८२२).

१८२४ मध्यें फ्रान्सच्या गादीवर आलेल्या १० व्या चार्लसचा अनियंत्रित राज्यकारभार. लोक असंतुष्ट, दंगल व राज्यत्याग. लुई फिलीपी राजा (१८३०–४८), सनदशीर राज्यकारभार पण नंतर अप्रिय. दंगल (१८४८) व राज्यत्याग. फ्रान्समध्यें लोकसत्ताक राज्य, अध्यक्ष लुई नेपोलियन (१८४८–५३), सार्वमतानें बादशहा (१८५३–१८७१). **बेलजमचें** हॉलंडपासून स्वतंत्र वेगळें राज्य (१८३०), **ग्रीसचें** तुर्कस्थानपासून स्वातंत्र्य १८२९. **पोलंडचा** स्वातंत्र्यप्राप्तीचा प्रयत्न (१८३०) रशियानें दडपून टाकला, व पोलंड रशियन साम्राज्याचा भाग, तेथील लोकांची

रशियांत सक्तीनें रवानगी. आस्ट्रियाच्या साम्राज्यांतील **बोहेमिया** येथें व **हंगेरींत** मेगेआर लोकांची बंडाळी (१८४८), पण रशियाच्या मदतीनें तिचा मोड–इटलींतील स्वातंत्र्यप्राप्तीचा प्रयत्न अयशस्वी (१८४८). जर्मनींतील वर्चस्वासंबंधानें आस्ट्रिया व प्रशिया यांमध्यें स्पर्धा.

(२) **इटलीचें एकीकरण व प्रगति** (१८१५–१९१४)–इटली वेगवेगळ्या राज्यांत विभागलेला, कांहींवर परकीय राज्यकर्ते व त्यांची अनियंत्रित सत्ता. इटलींत स्वातंत्र्य व राष्ट्रीय चळवळ, तरुण इटली ही संघटना १८३१, संयुक्त इटलीची स्थापना हें उद्दिष्ट–मॅझिनी व गॅरिबाल्डी यांचें नेतृत्व. १८४८ मधील पिडमाँट–सार्डिनियाचा राजा चार्लस अलबर्ट याच्या नेतृत्वाखालीं व मॅझिनी व गॅरिबाल्डी यांच्या प्रोत्साहनानें इटलीमधील लाँबर्डी व व्हेनिस व इतर संस्थानांनीं आस्ट्रियाचें वर्चस्व झुगारून देण्याचा प्रयत्न अयशस्वी. चार्लस अलबर्टचा राज्यत्याग. २ रा व्हिक्टर इमॅन्यूल हा पिडमाँट–सार्डिनियाचा राजा व काव्हर हा तेथील मुख्य प्रधान. फ्रान्सचा बादशहा लुई नेपोलियन याच्याशीं तह व मदत, आस्ट्रियाशीं युद्ध (१८५९), आस्ट्रियाचा पराभव पण फ्रान्सनें युद्धांतून अंग काढलें, व लाँबर्डी पिडमांट–सार्डिनियास व्हेनिस आस्ट्रियाकडे राहिलें. गॅरिबाल्डीनें नेपल्स व सीसली हें राज्य जिंकलें व तें पिडमॉंट–सार्डिनियास. फ्रेंच सैन्याच्या संरक्षणाखालीं रोममध्यें पोपचें राज्य. १८६१ मध्यें पिडमांट–सार्डिनियाचा राजा २ रा व्हिक्टर इमॅन्यूल यांस रोम व व्हेनीसखेरीज संयुक्त इटलीचें राज्यपद. १८६६ मध्यें व्हेनिस व १८७० मध्यें रोम संयुक्त इटलीस, व रोम राजधानी. रोममध्यें पोप रहात असलेल्या विभागाचें पोपचें स्वतंत्र राज्य–व्हॅटिकन राज्य.

इटलींत लोकनियंत्रित राजसत्ता ही राज्यघटना, पण लोकशाही नाहीं. रेल्वे रस्ते, पक्के रस्ते, बंदरांची डागडुजी, यंत्राच्या सहाय्यानें मोठमोठ्या गिरण्या व कारखाने. औद्योगिक व व्यापारविषयक प्रगति.

(३) **जर्मन साम्राज्याची स्थापना व उत्कर्ष** (१८४८–१९१४)–जर्मनीमधील संस्थानांचा झोलेव्हेरियन हा व्यापारी संघ, रेल्वे रस्ते बांधणी व पुढें १८७० नंतर औद्योगिक क्रान्ति. प्रशियाचा राजा १ ला विल्यम (१८६१–८८) व प्रधान बिस्मार्क (१८६२–९०) यांची प्रशियाच्या नेतृत्वाखालीं जर्मनीचें एकीकरण ही महत्त्वाकांक्षा; त्यासाठीं बिस्मार्कनें सैन्य सुसज्ज व प्रबळ, राजसत्ता अनियंत्रित केली. सॅडोवाच्या लढाईत (१८६६) आस्ट्रियाचा पराभव व जर्मनीच्या राजकारणांतून हकालपट्टी-फ्रान्सचा पराभव व प्रशियाच्या नेतृत्वाखालीं जर्मन साम्राज्याची स्थापना १८७१. जर्मनींत औद्योगिक क्रान्ति १८५०–१९००. वसाहती स्थापण्या-

कडे बिस्मार्कचें दुर्लक्ष. जर्मनीची राज्यघटना, कायदेमंडळास फौर थोडे अधिकार, जर्मन कैसर (बादशहा) याची अनियंत्रित सत्ता. आस्ट्रिया व इटलीशीं तह व २ रा विल्यम हा जर्मन कैसर (१८८८–१९१८). महत्त्वाकांक्षी. सत्ता आपल्या हातांत ठेवण्याची इच्छा, बिस्मार्कला पदच्युत. सैन्य व आरमार वाढविलें. व्यापार, वसाहती व साम्राज्यवृद्धीकडे लक्ष, आफ्रिकेंत जर्मन पूर्व आफ्रिका (टँगानिका) व जर्मन नैर्ऋत्य आफ्रिका या वसाहती. चीनच्या किनाऱ्यावर किआ–चिओ हें ठाणें. बर्लिन–बगदाद रेल्वे योजना, ग्रेट ब्रिटनशीं व्यापार, वसाहती व अंकित प्रदेश या बाबतींत स्पर्धा.

(४) **फ्रान्समधील घडामोडी व तिसरें लोकसत्ताक राज्य** (१८४८–१९१४)–१८४८–५२ फ्रान्सचें लोकसत्ताक राज्य व लुई नेपोलियन अध्यक्ष, महत्त्वाकांक्षी, धूर्त. सार्वमतानें फ्रान्सचा बादशहा (१८५३–७१). उद्योगधंदे व व्यापार यांस उत्तेजन, वसाहती स्थापण्याचा प्रयत्न. चीनशीं युद्ध व व्यापाराविषयक सवलती व इंडोचायनांत ठाणीं. हाईनपर्यंत फ्रान्सचा विस्तार करणें हें उद्दिष्ट. मेक्सिकोमध्यें ढवळाढवळ व अपयश. जर्मनीशीं युद्ध १८७०–७१ पराभव, कैद. पदच्युत. फ्रान्सचें तिसरें लोकसत्ताक राज्य १८७१ पासून.

(५) **आस्ट्रिया–हंगेरीचें साम्राज्य** १८६७–जर्मनीच्या राजकारणांतून अंग काढलें. आस्ट्रिया–हंगेरीचें जोडराज्य. परराष्ट्रीय व लष्करी बाबींखेरीज आस्ट्रियाची व हंगेरीची वेगळी व्यवस्था. हंगेरींतील मेगेयार लोकांचें समाधान पण साम्राज्यांतील स्लाव्ह लोक असंतुष्ट. बाल्कन द्वीपकल्पाकडे लक्ष.

(६) **रशिया, तुर्कस्थान व आग्नेय युरोप** (१८१५–१९१४)

रशिया–झारच्या हातीं अनियंत्रित सत्ता, याविरुद्ध चळवळ करणारांस कडक शिक्षा. लोकांस राजकीय अधिकार नाहींत, साम्राज्याचा सैबेरियांत व इतरत्र विस्तार. साम्राज्यांत निरनिराळ्या वंशाचे, भाषेचे, संस्कृतीचे, धर्माचे लोक, पण बहुसंख्याक लोक स्लाव्ह वंशाचे व रशियन भाषा बोलणारे.

रशियांतील शेतजमीनीवरील कुळें–जमिनीशीं जखडलेले (सर्फ), अर्धवट गुलामगिरींत, त्यांची आर्थिक व सामाजिक स्थिति कष्टप्रद. कर्जबाजारी. १८६१ मध्यें २ ऱ्या अलेक्झांडरचें फर्मान व कुळांकडे असलेल्या जमीनी त्यांस कायमच्या कसण्यास. १९०५ मधील २ ऱ्या निकोलसच्या फर्मानानें त्या जमीनी कुळांच्या मालकीच्या. शेतावरील कुळांची मुक्तता.

झारची दडपशाही व क्रान्तिकारक व दहशतवादी चळवळ–बहुजनसमाज अशिक्षित, व राजकीय हक्काबद्दल उदासीन. शहरांतील शिक्षित व मध्यमवर्गीय लोकांस झारची अनियंत्रित सत्ता अमान्य व त्यांच्यांत लोकशाहीचे विचार. ते दडपून टाकण्याचें सरकारचें धोरण. सनदशीर चळवळीस बंदी व त्यामुळें गुप्त क्रान्तिकारक व दहशतवादी मंडळें, निहीलिझम व त्यांच्या चिथावणीनें अधिकाऱ्यांचे खून.

रशियांत औद्योगिक क्रान्ति (१८८०–१९१४)–यंत्राच्या साहाय्यानें मोठे उद्योगधंदे. लोखंड, तेल, कोळसा यांच्या खाणी. ट्रॅन्स सैबेरियन रेल्वेनें (५४०० मैल) दळणवळणांत वाढ. परकीय भांडवल मिळवून सरकारनें मोठाले उद्योगधंदे सुरू केले. मोठालीं शहरें व तेथें मजुरांच्या कामगारांच्या संख्येंत वाढ. मजुरांची संघटना. राज्यकारभारांत भाग असावा ही मजुरांची इच्छा. राजकीय पक्ष–सनदशीर लोकशाही, सामाजिक लोकशाही, सामाजिक क्रान्तीवादी. सामाजिक क्रान्तिवादी हे कार्ल मार्क्सचे अनुयायी व त्यास कामकरी व मजूर यांचा पाठिंबा. १९०५ मध्यें झारच्या राजवाड्यावर कामगार व मजूर यांचा मोर्चा. त्यावर गोळीबार व नंतर दंगल; व इतर ठिकाणीं दंगेधोपे. झारच्या मंत्र्यांच्या सूचनेवरून 'ड्यूमा' ची (कायदेमंडळ) स्थापना, पण सल्लागार स्वरूपाचे अधिकार. यांत दोन पक्ष जहाल क्रान्तीवादी (बॉल्शाव्हिकी) व नेमस्त विचाराचे. हिच्या मागण्यामुळें बरखास्त. त्यांतील पुढाऱ्यांस तुरुंगवास (१९१४).

रशियाचें परराष्ट्रीय धोरण–साम्राज्यविस्तार करणें, कॉन्स्टांटिनोपल जिंकणें, उबदार समुद्रावरील बंदरें मिळविणें–भूमध्य समुद्र, इराणी आखात. सुवेझ कालव्यास व भारतावरील वर्चस्वास धोका म्हणून ग्रेट ब्रिटनचा विरोध व तुर्कस्थानास पाठिंबा.

क्रीमीयन युद्ध १८५४–५६–तुर्कस्थानच्या साम्राज्यांतील ख्रिश्चन प्रजेवर जुलुम व तिचें पालकत्व आपणाकडे ही रशियाची भावना. ग्रेट ब्रिटन व फ्रान्स यांची तुर्कस्थानला मदत, रशियाचा पराभव. बेसार्बिया प्रांत तुर्कस्थानास.

रशिया व तुर्कस्थान यांमधील युद्ध १८७७–७८—बाल्कन द्वीपकल्पांतील ख्रिश्चनधर्मीय राज्यांची स्वातंत्र्य चळवळ. बल्गेरियांत बंडाळी, पण कडक उपायांनी मोड. रशियाची तुर्कस्थानवर स्वारी, व तुर्कस्थानचा पराभव, बर्लिन येथें तह. मॉंटेनिग्रो, सर्विया व रुमानियास स्वातंत्र्य. बॉस्निया हेर्झेगोव्हिना यांचा कारभार आस्ट्रियाकडे, रशियास बेसार्बिया, ग्रेट ब्रिटनला सायप्रस.

रुसो–जपानी युद्ध १९०४–०५–टॅन्स–सैबेरियेचा मंचुरियांत फाटौ. पोर्ट आर्थर रशियास. कोरियास धोका. युद्ध. पोर्ट ऑर्थर व व्हडिओस्टाकवर जपानचा हल्ला. रशियाचा पराभव. मुकडेन येथें रशियन सैन्याचा पराभव. १९०५ पोर्टस्मथ येथें तह. पोर्ट आर्थरच्या सभोंवतालचा प्रदेश व सॅखलिन बेटाचा दक्षिण भाग जपानला.

रशिया व ग्रेट ब्रिटन यांमध्यें तह १९०७–इराणसंबंधी.

(७) **तुर्कस्थान** १८१५–१९१४—१९ व्या शतकात उतरती कळा. बाल्कन द्वीपकल्पांतील अंकित राज्यांत अस्वस्थता, स्वातंत्र्याची मागणी, व १८७८ पर्यंत कांहीं स्वतंत्र. उत्तर आफ्रिकेंतील अलजेरिया व ट्यूनिस फ्रान्सनें, ट्रिपोली इटलीनें व इजिप्त ग्रेट ब्रिटननें घेतला. १९०८ मध्यें 'तरुण तुर्क' याजकडून तुर्कस्थानांत क्रान्ति. बॉस्निया हेर्झेगोव्हिना आस्ट्रियाच्या साम्राज्यांत. १९१३ मॅसेडोनिया, आल्बेनिया, स्वतंत्र. लष्करी बाबतींत प्रबळ होण्यासाठीं जर्मन तज्ज्ञांची मदत. बर्लिन–बगदाद रेल्वेची योजना.

(८) **बर्लिनच्या तहानंतर युरोपमधील राजकारण** (१८७८–१९१४)–बिस्मार्कनें बाल्कन द्वीपकल्पांतील रशियाच्या महत्त्वाकांक्षेस अडथळा आणला. त्याकडे आस्ट्रियाचेंही लक्ष. जर्मनी व आस्ट्रिया यांमध्यें तह १८७९. नंतर इटलीही सामील व त्रिपुटी संघ (Triple Alliance). या संघाबद्दल फ्रान्स व रशियास भीति व ह्या राष्ट्रांत संरक्षक तह १८९६. फ्रान्स व ग्रेट ब्रिटन यांमध्यें सलोख्याचे संबंध. १९०२ ग्रेट ब्रिटन व जपान यांमध्यें तह. जर्मनी व ग्रेट ब्रिटन यांमध्यें व्यापार, वसाहती, व आरमारवृद्धि या बाबतींत स्पर्धा, जपानकडून रशियाच्या पराभवानंतर १९०७ मध्यें इराणसंबंधीं ग्रेट ब्रिटनचा रशियाशीं तह; व फ्रान्स, रशिया व ग्रेट ब्रिटन यांचें त्रिकूट (Triple Entente १९०७). जगांतील दोन प्रबल गट.

(ब) **ग्रेट ब्रिटन, ब्रिटिश साम्राज्य व कॉमनवेल्थ (ब्रिटिश स्वसत्ताक राष्ट्रांचा संघ)**.–१८२०–१९४५. १८२०–१९४५–ग्रेट ब्रिटनचा वैभवाचा काळ, जगाची बाजारपेठ. बहुजन समाजाचे राहणीचें मान सुखी व समृद्ध.

प्रमुख राज्यकर्ते, राजकीय पक्ष व मुख्य प्रधान–व्हिक्टोरिया (१८३७–१९०१), पांचवा जॉर्ज (१९१०–३६).

कॉझरव्हेटिव्ह (जुन्या परंपरेचे अभिमानी) पक्ष; महत्त्वाचे प्रमुख प्रधान–सर रॉबर्ट पील, डिझरेली बाल्डविन, चर्चिल; धोरण–राज्यघटनेंत उतावीळपणें बदल घडवून न आणणें, संरक्षित व्यापार, साम्राज्य व वसाहती यांत वाढ करणें आणि दरारा व वैभव वाढविणें.

लिबरल (उदार धोरणी) पक्ष–रसेल, पामर्स्टन, ग्लॅडस्टन व लॉईड जॉर्ज हे महत्त्वाचे मुख्य प्रधान, कॉमन्स सभा बहुजन समाजाची प्रतिनिधी बनविणें (पार्लमेंटची सुधारणा) खुला व्यापार, बहुजन समाजाच्या हिताचे कायदे करणें, साम्राज्यविस्तार करून जबाबदारी न वाढविणें. १९०८ च्या सुमारास हा पक्ष मागें पडला. **मजूर पक्ष**–मॅकडोनल्ड व अटली हे प्रमुख मुख्य प्रधान, लिबरल पक्षाप्रमाणें धोरण पण मजूर व कामकरी यांची स्थिति सुधारणेकडे विशेष लक्ष. सध्यां कॉझरव्हेटिव्ह व मजूर हे दोन प्रमुख पक्ष आहेत.

ग्रेट ब्रिटनमध्यें लोकशाही (लोकनियंत्रित राजसत्ता)–(१८३२–१९२८)–पार्लमेंटच्या (कॉमन्स सभेच्या) सुधारणेचे कायदे–१८३२, १८६७, १८८४–८५, १९११; १९१८; १९२८. कामगार, मजूर व बहुजन समाजाच्या हिताचे कायदे–१८३३ व १८४२, फॅक्टरी ॲक्ट. १८४६, खुला व्यापार (स्वस्ताई); ट्रेड युनियन्स कायदेशीर, ७० वर्षांच्यापेक्षा जास्ती वयाच्या गरीब इसमास वृद्धवेतन १९०८, प्राथमिक शिक्षणाचा कायदा १८७०, १८८०–९१ मोफत व सक्तीचें. स्त्रियांच्या मार्गांतील अडचणी दूर, पुरुषांच्या बरोबरीनें हक्क. १८३३ गुलामगिरीची पद्धत ब्रिटिश साम्राज्यांतून बंद.

उद्योगधंदे, व्यापार व दळणवळण यांस उत्तेजन–१८३७ मर्यादित जबाबदारीच्या कंपन्यांसंबंधी कायदा. १८२९ पहिला रेल्वे रस्ता व त्यांत वाढ. १८३८ पहिली आगबोट इंग्लंड ते अ. सं. सं. व त्यांत वाढ. १८३७ तारेनें बातमी, १८६५ युरोप ते अमेरिका केबल्स, १८७६ टेलिफोन १८९०–९६ विजेच्या साहाय्यानें ट्राम, आगगाड्या, कारखाने १९१९ नंतर वैमानिक वहातूक.

ग्रेट ब्रिटन व आयर्लंड (११००–१९४५)–११७१ मध्यें इंग्लंडच्या राजाच्या वर्चस्वाखालीं. इंग्लंडमधून अमीर उमराव व त्यांस तेथें जमीनी पण ते इंग्लंडच्या राजाच्या धोरणानें. १३६७ आयरिश पार्लमेंट. इंग्लंडमध्यें प्रॉटेस्टंट पंथ, पण आयरिश लोक रोमन कॅथलिकपंथीय. इंग्लंडमधून वसाहत करण्यासाठीं गेलेलें प्रॉटेस्टंटपंथीय, तेथील बंडाळीमुळें आयरिश रोमन कॅथलिकांच्या जमीनी जप्त व त्या ग्रेट ब्रिटनमधील प्रॉटेस्टंट पंथीयांस. अल्स्टर प्रांतांत प्रॉटेस्टंट पंथी ब्रिटिश व इतर प्रांतांत रोमन कॅथलिकपंथी आयारिश बहुसंख्याक, पण जमीनी ब्रिटिश लोकांच्या मालकीच्या. आयरिश पार्लमेंटमधील सभासदांस प्रॉटेस्टंट पंथाचे आहोंत ही शपथ. आयर्लंडचें आर्थिक धोरण ग्रेट ब्रिटनच्या हिताच्या दृष्टीनें. बहुसंख्याक

आयरिश लोक, शेतावरील कुळें, मेंढपाळ, किरकोळ उद्योगधंदे. त्यांची आर्थिक स्थिति खालावलेली, कर्जबाजारी. १८०० मध्यें आयरिश पार्लमेंटचें ग्रेट ब्रिटनच्या पार्लमेंटशीं एकीकरण. १८२९ कॅथलिक इमॅन्सीपेशन (कॅथलिक लोकांच्या मुक्ततेचा) कायदा, त्यामुळें त्यांस पार्लमेंटचें सभासद होतां आलें. लिबरल पक्षाची आयरिश लोकांबद्दल सहानुभूति. १८६९ आयरिश प्रॉटेस्टंट चर्चला सरकारी मदत बंद. १८७० आयर्लंड-मधील जमीनीवरील कुळांसंबंधीं कायदा; खंड वाढावण्यास, जमीनीवरून कुळांस काढण्यांस जमीन मालकांस बंदी. ब्रिटिश पार्लमेंटमध्यें आयरिश अल्पसंख्याक तेव्हां आयर्लंडसाठीं वेगळे पार्लमेंट व त्यास जबाबदार असलेला वेगळा राज्यकारभार–होमरूल–असावा ही पार्नेलच्या नेतृत्वाखाली चळवळ. लिबरल पक्षांतील बऱ्याच लोकांची सहानुभूति पण होमरूल बिल पार्लमेंटमध्यें नापास, १९१६ मध्यें आयर्लंडमध्यें सिनफेन पक्षाकडून बंडाळी; पण तिचा मोड. १९१९ मध्यें आयर्लंडचें स्वतंत्र लोकसत्ताक राज्य व डी व्हॅलेरा अध्यक्ष ही सिनफेन पक्षाची घोषणा. ग्रेट ब्रिटनशीं वितुष्ट, अत्याचारी कृत्यें; शेवटीं १९२२ मध्यें ब्रिटिश पार्लमेंटनें अल्स्टखेरीज आयर्लंडच्या इतर भागास होमरूल (स्वराज्य) व त्यास 'आयरिश फ्री स्टेट' हें नांव. कॉसग्रेव्ह पहिला अध्यक्ष २२–३१ खंडित आयर्लंडमुळें डी व्हॅलराचें समाधान नाहीं व तो प्रमुख झाल्यावर राजनिष्ठेची शपथ रद्द (१९३३) व दक्षिण आयर्लंडचें स्वतंत्र लोकसत्ताक राज्य (१९३७) व प्राचीन नांव एअर (Eire).

ब्रिटिश साम्राज्य व कॉमनवेल्थ–प्रदेशविस्तार व लोकसंख्या या दृष्टीनें जगांत सर्वांत मोठें (१९१४), निरनिराळ्या वंशाचे, धर्माचे, वर्णांचे, संस्कृतीचे व चालीरीतींचे लोक. साम्राज्य व कॉमनवेल्थ यांमधील देशांत वेगवेगळ्या राज्यघटनाः–(१) डोमीनियन (२) अंकित प्रदेश (क्राऊन कॉलनीज) व (३) संरक्षित देश.

(क) अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें या राष्ट्राचा उदय, विस्तार व वैभव– (१७८३–१९५२)

राज्यघटना–४ जुलै १७७६ स्वातंत्र्याची घोषणा म्हणून ४ जुलै स्वातंत्र्य दिन. १७८९, संघराज्याची स्थापना. अधिकार–विभागणीच्या तत्त्वाप्रमाणें काँग्रेस, अध्यक्ष व वरिष्ट न्यायकोर्ट यांकडे वेगवेगळे अधिकार, पॅसिफिक महासागरापर्यंत प्रदेशविस्तार व शेवटीं ४८ संस्थानें. उत्तरेकडील व दक्षिणे-कडील संस्थानांचे उद्योगधंदे व हितसंबंध वेगळे. युरोपमधून पुष्कळ लोकांचें आगमन, त्यांस नागरिकत्वाचे हक्क, लोकसंख्येंत वाढ, सर्वांची

भाषा नंतर इंग्लिश. १८६१–६५ गुलामगिरीची पद्धत बंद करण्याच्या व संघ राज्यांतून फुटण्याच्या प्रश्नांवर अंतस्थ युद्ध, दक्षिणेकडील संस्थानांचा पराभव व गुलामगिरीची पद्धत बंद.

औद्योगीकरण–१८७० नंतर मोठेमोठे उद्योगधंद्यांची स्थापना, रेल्वे रस्ते, तारायंत्र व दळणवळणाच्या साधनांत वाढ, औद्योगीकरण, २० व्या शतकाच्या सुरवातीपासून ग्रेट ब्रिटनशीं स्पर्धा, १ ल्या महायुद्धाच्या वेळीं १९१७ पर्यंत जगाला पक्का माल पुरविणें व औद्योगिक बाबतींत प्रमुख राष्ट्र, उद्योगधंदे व व्यापार यामुळें जगांत श्रीमान.

राजकीय पक्ष व धोरण–रिपब्लिक व डेमोक्रॅट. रिपब्लिक पक्षाचें धोरण संघराज्य प्रबल करणें, मोठमोठ्या उद्योगधंद्यांस उत्तेजन व संरक्षित जकात ठेवणें, अलिप्तपणाचें धोरण. डेमोक्रॅट पक्षाचें धोरण–घटक राज्यास शेषाधिकार, खुला व्यापार, अलिप्तपणाचें धोरण न ठेवणें, रिपब्लिकन पक्षाचे प्रमुख अध्यक्ष–जॉर्ज वॉशिंगटन, अब्राहाम लिंकन, हार्डिंज, ऐझनहॉअर. डेमोक्रॅटिक पक्षाचे-जेफरसन, विल्सन, फ्रँकलिन रुझवेल्ट.

परराष्ट्रीय धोरण व जागतिक राजकारणांत प्रवेश–सुरवातीस अलिप्तपणाचें धोरण, राष्ट्र प्रबल व औद्योगिक बाबतींत समृद्ध करणें. मनरोचें तत्त्व १८२३–अमेरिका खंडातील राजकारणांत युरोपमधील राष्ट्रांची ढवळाढवळ नको. १८५४ जपानशीं व्यापारी सवलती पेरी यानें मिळविल्या. कॅरेबियन समुद्रांतील बेटांच्या कारभारांत व दक्षिण अमेरिकेंतील राज्यांच्या राज्यकारभारांत अ. सं. संस्थानांचें दडपण, १८९८ स्पेनशीं युद्ध, व फिलीपाईन बेटें ताब्यांत. १९१७ मध्यें १ ल्या महायुद्धांत भाग, राष्ट्रसंघाच्या स्थापनेंत (१९२०) विल्सनचा मोठा भाग पण काँग्रेसला राष्ट्रसंघांत सामील होणें अमान्य. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या स्थापनेंत फ्रँकलिन रुझवेल्टचा महत्त्वाचा भाग, काँग्रेसला मान्य, रिपब्लिकन पक्षासही मान्य. जगांतील बलाढ्य, उद्योगप्रधान, श्रीमान् व प्रमुख राष्ट्र.

(ड) मध्य व दक्षिण अमेरिकेंतील लोकसत्ताक राज्यें (१८११–१९४५)

लॅटिन अमेरिका–मध्य व दक्षिण अमेरिकेंतील स्पॅनिश व पोर्टुगीज राष्ट्रांच्या स्वतंत्र झालेल्या व लोकसत्ताक राज्यें झालेल्या वसाहती, विस्तृत प्रदेश, तेथें स्पॅनिश व पोर्टुगीज भाषा व त्या लॅटिनोद्भव म्हणून लॅटिन अमेरिका, मिश्र प्रजा व ती बहुसंख्याक. युरोपमधील निरनिराळ्या देशांतील लोकांचें आगमन, त्यांस नागरिकत्व. लोकशाही राज्यघटना, पण सुरवातीस वरचेवर

काय शेक. उत्तरेकडील पेकिंग राजधानी हस्तगत (१९२७). चीनच्या लोकसत्ताक राज्याचा चँग काय शेक अध्यक्ष (१९२८–१९३९ व पुढें). चीनमध्यें सुधारणा. जपानचें मांचुरिया व जेहोल यांवर आक्रमण.

सोव्हिएट रशियाच्या प्रोत्साहनानें चीनमध्यें कम्यूनिस्ट विचारांचा फैलाव. त्यामुळें कारखान्यांत संप, परकीयांविरुद्ध दंगेधोपे. त्यास चांग काय शेकचा विरोध, व ते दडपण्याचा प्रयत्न.

प्रकरण १४ वें

१ लें महायुद्ध व युद्धोत्तर जग

(१९१४ ते १९३९)

पहिलें महायुद्ध (१९१४ ते १९१८)

प्रास्ताविक— १९१४ च्या जुलैमध्यें युरोपमध्यें युद्ध सुरू होऊन तें १९१८ पर्यंत टिकलें. या युद्धांत जगांतील प्रमुख अशीं बहुतेक राष्ट्रें सामील होऊन तें सर्व जगभर पसरल्यामुळें त्यास जागतिक महायुद्ध असें म्हणण्यांत येतें. हें युद्ध चारच वर्षें टिकलें तरी त्यांत उपयोगांत आणलेल्या विध्वंसक साधनांमुळें पूर्वी होऊन गेलेल्या युद्धापेक्षां यांत सर्वांत अधिक मनुष्यहानि व मालमत्ता उध्वस्त होऊन कोट्यवधि रुपये खर्च झाले. हें युद्ध सुरू होण्यास खालील गोष्टी कारणीभूत झाल्या.

महायुद्धाचीं कारणें— (१) जगांतील विशेषतः युरोपमधील प्रमुख राष्ट्रांचीं मनें एकमेकांविषयीं साशंक होतीं, व त्यामुळें युरोपमधील प्रमुख राष्ट्रांमध्यें जर्मनी, आस्ट्रिया-हंगेरी व इटली यांचा त्रिपुरी संघ (Triple Alliance) व फ्रान्स, रशिया व ग्रेट ब्रिटन यांचें त्रिकूट (Triple Entente) असें दोन प्रतिस्पर्धी गट निर्माण झालेले होते.

(२) बाल्कन द्वीपकल्पावरील वर्चस्वासंबंधानें रशिया व आस्ट्रिया-हंगेरी यांमध्यें चुरस होती. फ्रँको-जर्मन युद्धांत जर्मनीनें घेतलेले ॲलसेस व लरेन हे कोळसा व लोखंड यांच्या खाणींसंबंधीं प्रसिद्ध असलेले प्रांत परत मिळवावेत ही फ्रान्सची इच्छा होती. इटलीला आफ्रिका खंडांत आपल्या वसाहती वाढवावयाच्या होत्या. १९ व्या शतकाच्या शेवटीं उद्योगधंदे, व्यापार, वसाहती व अंकित प्रदेश या बाबतींत ग्रेट ब्रिटन हें जगांतील सर्व राष्ट्रांत प्रमुख होतें. उद्योगधंदे व व्यापार या बाबतींत नुकत्याच पुढें आलेल्या व वसाहती व अंकित प्रदेश मिळविण्याच्या बाबतींत फार उशीरा म्हणजे १८९२ नंतर प्रयत्न करणाऱ्या जर्मनी या राष्ट्रास ग्रेट ब्रिटनचा हेवा वाटून २० व्या शतकाच्या सुरुवातीपासून त्याची ग्रेट ब्रिटनशीं स्पर्धा सुरू झाली. जर्मनीचा

काय शेक. उत्तरेकडील पेकिंग राजधानी हस्तगत (१९२७). चीनच्या लोकसत्ताक राज्याचा चँग काय शेक अध्यक्ष (१९२८–१९३९ व पुढें). चीनमध्यें सुधारणा. जपानचें मांचुरिया व जेहोल यांवर आक्रमण.

सोव्हिएट रशियाच्या प्रोत्साहनानें चीनमध्यें कम्यूनिस्ट विचारांचा फैलाव. त्यामुळें कारखान्यांत संप, परकीयांविरुद्ध दंगेधोपे. त्यास चांग काय शेकचा विरोध, व ते दडपण्याचा प्रयत्न.

प्रकरण १४ वें

१ लें महायुद्ध व युद्धोत्तर जग

(१९१४ ते १९३९)

पहिलें महायुद्ध (१९१४ ते १९१८)

प्रास्ताविक— १९१४ च्या जुलैमध्यें युरोपमध्यें युद्ध सुरू होऊन तें १९१८ पर्यंत टिकलें. या युद्धांत जगांतील प्रमुख अशीं बहुतेक राष्ट्रें सामील होऊन तें सर्व जगभर पसरल्यामुळें त्यास जागतिक महायुद्ध असें म्हणण्यांत येतें. हें युद्ध चारच वर्षें टिकलें तरी त्यांत उपयोगांत आणलेल्या विध्वंसक साधनांमुळें पूर्वी होऊन गेलेल्या युद्धापेक्षां यांत सर्वांत अधिक मनुष्यहानि व मालमत्ता उध्वस्त होऊन कोट्यवधि रुपये खर्च झाले. हें युद्ध सुरू होण्यास खालील गोष्टी कारणीभूत झाल्या.

महायुद्धाचीं कारणें— (१) जगांतील विशेषतः युरोपमधील प्रमुख राष्ट्रांचीं मनें एकमेकांविषयीं साशंक होतीं, व त्यामुळें युरोपमधील प्रमुख राष्ट्रांमध्यें जर्मनी, आस्ट्रिया-हंगेरी व इटली यांचा त्रिपुरी संघ (Triple Alliance) व फ्रान्स, रशिया व ग्रेट ब्रिटन यांचें त्रिकूट (Triple Entente) असें दोन प्रतिस्पर्धी गट निर्माण झालेले होते.

(२) बाल्कन द्वीपकल्पावरील वर्चस्वासंबंधानें रशिया व आस्ट्रिया-हंगेरी यांमध्यें चुरस होती. फ्रँको-जर्मन युद्धांत जर्मनीनें घेतलेले ॲलसेस व लरेन हे कोळसा व लोखंड यांच्या खाणींसंबंधीं प्रसिद्ध असलेले प्रांत परत मिळवावेत ही फ्रान्सची इच्छा होती. इटलीला आफ्रिका खंडांत आपल्या वसाहती वाढवावयाच्या होत्या. १९ व्या शतकाच्या शेवटीं उद्योगधंदे, व्यापार, वसाहती व अंकित प्रदेश या बाबतींत ग्रेट ब्रिटन हें जगांतील सर्व राष्ट्रांत प्रमुख होतें. उद्योगधंदे व व्यापार या बाबतींत नुकत्याच पुढें आलेल्या व वसाहती व अंकित प्रदेश मिळविण्याच्या बाबतींत फार उशीरा म्हणजे १८९२ नंतर प्रयत्न करणाऱ्या जर्मनी या राष्ट्रास ग्रेट ब्रिटनचा हेवा वाटून २० व्या शतकाच्या सुरुवातीपासून त्याची ग्रेट ब्रिटनशीं स्पर्धा सुरू झाली. जर्मनीचा

महत्त्वाकांक्षी बादशहा कैसर २ रा विल्यम यानें तुर्कस्थानशीं मैत्री करून बर्लिन बगदाद रेल्वेची योजना आंखली. ही रेल्वे पुढें बसऱ्यापर्यंत जाणार असल्यामुळें इराणच्या आखातांत जर्मनींचें महत्त्व वाढून त्यामुळें हिंदुस्थानांवरील ग्रेट ब्रिटनच्या वर्चस्वास धोका येण्याचा संभव होता. बाल्टिक समुद्रांतून उत्तर समुद्रांत आपलें आरमार ताबडतोब नेतां यावें म्हणून जर्मनीनें कील कालवा खणला. जर्मनीनें आपलें सैन्य व आरमार खूप वाढविलें. यांमुळें जर्मनीच्या हेतूविषयीं ग्रेट ब्रिटनला साशंकता वाटूं लागली.

(३) जर्मनी, आस्ट्रिया, रशिया, इटली, व फ्रान्स या राष्ट्रांनीं आपापल्या राष्ट्रांत सार्वत्रिक लष्करी शिक्षण सुरू करून आपलें सैन्य व आरमार यांत वाढ करून तें सुसज्ज ठेवण्याची पराकाष्ठा केली.

(४) वसाहती, अंकित प्रदेश मिळविण्यासंबंधानें व युद्धाच्या वेळीं एकमेकांस मदत करण्याच्या बाबतींत निरनिराळ्या राष्ट्रांत झालेले गुप्त करार मदारं.

(५) बाल्कन द्वीपकल्पांतील बॉस्निया व हर्झेगोव्हिना हे स्लाव्ह लोकांचीं बहुसंख्या असलेले दोन प्रांत आस्ट्रियाच्या देखरेखीखालीं देण्यांत आले होते, पण आस्ट्रियानें ते आपल्या साम्राज्यास कायमचे जोडले (१९०८) पण या गोष्टीस तेथील लोकांची संमति नव्हती. त्यामुळें बाल्कन द्वीपकल्पांतील स्लाव्ह लोकांची बहुसंख्या असलेल्या सर्बियास आस्ट्रियाबद्दल वाटणारा असंतोष वाढत गेला.

अशी परिस्थिति असतां २८ जून १९१४ रोजीं आस्ट्रिया–हंगेरी साम्राज्याचा वारस आर्च ड्यूक फ्रॅन्सिस फर्डिनंड व त्याची पत्नि आपल्या साम्राज्यांतील बॉस्निया प्रांतांतील सॅराजेव्हो या शहरांतून जात असतां एका सर्बियन तरुणानें त्यांचा खून केला. तेव्हां या कटास सर्बियाचें प्रोत्साहन असावें असें वाटून आस्ट्रियानें सर्बियास एक निर्वाणीचा खलिता पाठविला व दोन दिवसांत उत्तर देण्याचें फर्मावितें.

महायुद्ध सुरू होतें— या खलित्यांतील गोष्टीप्रमाणें वागणें म्हणजे आपल्या स्वातंत्र्यास कमीपणा आणणें होय असें वाटून सर्बियानें त्यांत दिलेल्या मुदतींत उत्तर पाठविलें नाहीं. तेव्हां जर्मनींचें आपणांस पाठबळ आहे हें पाहून आस्ट्रियानें २८ जुलै रोजीं सर्बियाविरुद्ध युद्ध जाहीर केलें. सर्बियांतील लोक वंश, धर्मपंथ यांनीं रशियाशीं निगडित होते व रशिया आपला पाठीराखा आहे हें

पाहून सर्बियानें रशियाची मदत मागितली. तेव्हां रशियानें आस्ट्रियाविरुद्ध युद्ध पुकारिलें. तेव्हां जर्मनीनें रशियाविरुद्ध युद्ध जाहीर केलें. रशियास मदत करण्यास फ्रान्सनें जर्मनी व आस्ट्रिया यांविरुद्ध युद्ध पुकारिलें. (२ आगष्ट). फ्रान्सच्या उत्तरेस व आग्नेयेस तटबंदी असल्यामुळें फ्रान्सवर एकदम स्वारी करितां यावी म्हणून बेल्जमच्या तटस्थपणास व स्वातंत्र्यास मान्यता व हमी दिलेली होती तरी ती झुगारून देऊन जर्मनीनें बेल्जममधून फ्रान्सकडे आपले लढवय्ये सैन्य पाठविलें. बेल्जमच्या तटस्थपणास ग्रेट ब्रिटननें हमी दिलेली असल्यामुळें ग्रेट ब्रिटननें ४ ऑगष्ट १९१४ रोजीं जर्मनीविरुद्ध युद्ध जाहीर केलें. ब्रिटिश साम्राज्यांतील निरनिराळ्या खंडांत पसरलेल्या स्वसत्ताक वसाहती ग्रेट ब्रिटनच्या बाजूनें या युद्धांत सामील झाल्या. हिंदुस्थान हा ब्रिटिश साम्राज्यांतील अंकित देश असल्यामुळें त्याची संमति न घेतां त्यास या युद्धांत ग्रेट ब्रिटनच्या बाजूनें सामील व्हावें लागलें. जपाननें १९१४ मध्यें ग्रेट ब्रिटनच्या बाजूनें युद्धांत भाग घेतला. जर्मनीच्या बाजूनें १९१४ च्या नोव्हेंबरमध्यें तुर्कस्थान, १९१५ च्या पावसाळ्यांत बल्गेरिया हीं राष्ट्रें युद्धांत सामील झालीं. ग्रेट ब्रिटनच्या बाजूस १९१५ च्या मार्चमध्यें इटली, १९१६ च्या आगस्टमध्यें रुमानिया व पुढें १९१७ च्या एप्रिलमध्यें अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें व त्यानंतर दक्षिण अमेरिकेंतील राष्ट्रें व दुसरीं कांहीं राष्ट्रें या युद्धांत सामील झालीं. अशारीतीनें हें युद्ध जगभर पसरलें. या युद्धामध्यें लांब पल्ल्यावरून तोफांचा भडिमार करणें, विमानांच्या साह्यानें टेहळणी करणें, फोटो घेणें, व महत्त्वाच्या ठिकाणीं बाँब फेंकणें, पेट्रोलनें चालणाऱ्या मोटारी, लॉऱ्या व पुढें रणगाडे यांचाहि उपयोग करण्यांत येऊं लागला; त्यामुळें या युद्धांत दोन्ही पक्षांतील लोकांची प्राणहानि, मालमत्तेचा नाश मोठ्या प्रमाणांत झाला.

हें युद्ध सुरू झालें त्यावेळीं ग्रेट ब्रिटनची युद्धासाठीं विशेष तयारी नव्हती. पण यानंतर युद्धोपयोगी साधनसामुग्री, सैन्य व आरमार यांची जमवाजमव करण्याची ग्रेट ब्रिटननें पराकाष्ठा केली. पहिल्यानें लिबरल पक्षाचा आस्किथ हा मुख्य प्रधान होता. यानंतर युद्धासंबंधीं इतर पक्षांतील प्रमुख गृहस्थांची मदत मिळावी म्हणून १९१५ मध्यें आस्किथनें कॉझरव्हेटिव्ह व मजूर या पक्षांतील पुढाऱ्यांस आपल्या प्रधानमंडळांत घेतले व त्यास राष्ट्रीय प्रधानमंडळ म्हणण्यांत आलें. या राष्ट्रीय प्रधानमंडळानें युद्धासाठीं मोठ्या प्रमाणांत सैनिक मिळावेत

म्हणून १९१६ च्या जानेवारींत सक्तीच्या लष्करी नोकरीचा कायदा (Conscription) पास केला. यानंतर आस्किथनें राजिनामा दिला व लिबरल पक्षाचा **लॉईड जॉर्ज** हा मुख्य प्रधान झाला (१९१६).

पश्चिम आघाडी—युद्ध सुरू झालें त्यावेळीं ग्रेट ब्रिटनचें आरमार प्रबळ होतें, पण बेलजममधून फ्रान्सकडे घुसणारा जर्मन सैन्याचा लोंढा थोपवून धरण्यासाठीं फ्रेंच सैन्यास मदत करण्यास पुरेसे सैनिक नव्हते. तेव्हां उत्तम लढवय्ये व सज्ज असलेले २४ हजार हिंदी सैन्य सर जेम्स विलकॉक्स याच्या नेतृत्वाखालीं १९१४ च्या सप्टेंबरमध्यें फ्रान्सच्या रणभूमीवर पाठविण्यांत आलें; व तेव्हांपासून १९१५ च्या मार्चपर्यंत या सैन्यानें जर्मन सैन्याचा लोंढा थोपवून धरण्याची कामगिरी केली. पुढे १९१५ च्या एप्रिलपासून ग्रेट ब्रिटनमध्यें उभारलेलें ब्रिटिश सैन्य फ्रान्समध्यें पाठविणें शक्य झाल्यावर हिंदी सैन्यास पश्चिम आशियामधील मोहिमेवर पाठविण्यांत आलें. शत्रूराष्ट्रांच्या पश्चिम आघाडीवरील सुमारें पांचशें मैलांच्या टापूत दोस्तांचें सैन्य व शत्रूचें सैन्य १९१४ ते १९१८ पर्यंत खंदक खणून त्याच्या आश्रयानें दबा धरून होतें. १९१६ मध्यें जर्मन सैन्यानें व्हर्डूनजवळ दोस्तांच्या सैन्याची फळी मोडण्याचा शिकस्तीचा प्रयत्न केला; पण त्यांस यश मिळालें नाहीं. यानंतर दोस्तांच्या सैन्यानें सॉमेच्या लढाईंत टँकचा (चिलखती मोटार) उपयोग करून शत्रूची फळी मोडण्याचा मोठा प्रयत्न केला, पण त्यांत त्यांस यश मिळालें नाहीं. या दोन्ही लढायांत दोन्ही पक्षाचे मिळून १५ लाखांवर सैनिक ठार झाले.

पूर्व आघाडी—महायुद्ध सुरू झाल्यावर रशियन सैन्यानें आस्ट्रिया व जर्मनी या देशांवर जोराचा हल्ला केला; त्यामुळें आस्ट्रियन व जर्मन सैन्यास माघार घ्यावी लागली, तेव्हां जर्मनीचा सेनापति **व्हॉन हिंडेनबुर्ग** यानें पश्चिम आघाडीवर पाठविण्यांत येणाऱ्या सैन्याच्या कांहीं तुकड्या पूर्व सरहद्दीवरील सैन्याच्या मदतीसाठीं पाठविल्या व रशियन सैन्यावर निकराचा हल्ला करून **टॅनेनबर्ग** या ठिकाणीं रशियन सैन्याचा मोड केला (ऑगस्ट १९१४) व रशियन सैन्यास पिटाळून लावून रशियाच्या वर्चस्वाखालील पोलंड व बाल्टिक समुद्रालगतचा प्रदेश यांवर आपलें वर्चस्व बसविलें (१९१५). १९१५ च्या मे महिन्यांत इटली हें राष्ट्र जर्मनीच्या बाजूनें युद्धांत सामील न होतां ग्रेट ब्रिटनच्या बाजूनें युद्धांत सामील झाल्यामुळें आस्ट्रियाची स्थिति चमत्कारिक

होऊन त्यास आपल्या दक्षिण सरहद्दीकडेही लक्ष द्यावें लागलें. अशी स्थिति असतां जनरल **मॅकेनसन** याच्या नेतृत्वाखालील जर्मन सैन्य आस्ट्रियाच्या मदतीस आलें (१९१५); व त्यानें रशियन सैन्याचा पराभव करून त्यास आस्ट्रियाच्या बाहेर हांकून लाविलें. याच सुमारास बल्गेरिया जर्मनीस मिळालें व त्यानें सर्बियावर स्वारी केली व तेथें वर्चस्व बसविलें. तुर्कस्थान जर्मनीच्या बाजूनें युद्धांत सामील झालें असल्यानें कॉन्स्टाटिनोपलपर्यंत जर्मन सैन्यास जातां येणें शक्य झालें.

रशियास युद्धसामुग्री पाठवून मदत करणें जरूर होतें, तेव्हां डार्डानेल्सच्या मार्गें तसा प्रयत्न करण्याचा ग्रेट ब्रिटननें प्रयत्न केला पण त्यास यश मिळालें नाहीं.

रशियाचा सर्व बाजूंनीं पराभव झाल्यानें रशियन सेनापतीची नालायकी स्पष्ट झाली. रशियन सैन्यामध्यें युद्ध चालविण्यासंबंधीं हुरूप नव्हता. तेथील झारची सत्ता अनियंत्रित असून लोकांस कांहींच हक्क नव्हते व त्यांच्यावर जुलूम होत असे; व त्यामुळें झारविरुद्ध गुप्त क्रांतिकारक कट होत होते. रशियन सैन्याचा ठिकठिकाणीं पराभव झाला आहे हें पाहून तेथील क्रान्तिकारक लोकांनीं बंडाळी केली तेव्हां झार २ निकोलस यानें राज्यत्याग केला. (१९१७ मार्च). यानंतर बाल्शव्हिकी या जहाल क्रान्तिकारक लोकांच्या हातीं सत्ता गेली (१९१७ नोव्हें.). त्यानीं जर्मनी व आस्ट्रिया यांच्याशीं ब्रेस्ट लिटोव्हास येथें तह करून युद्ध थांबविलें (मार्च १९१८).

इटलीनें आस्ट्रियावर स्वारी केली, व तीन वर्षें युद्ध चालविलें (१९१५-१८) व पुढें फ्रेंच व ब्रिटिश सैन्याची मदत मिळाल्यावर आस्ट्रियास माघार घ्यावी लागली व १९१८ च्या नोव्हेंबरमध्यें आस्ट्रियानें दोस्त राष्ट्रांशीं तह केला.

तुर्कस्थान जर्मनीच्या बाजूनें युद्धांत सामील झाल्यामुळें सुएझ कालवा व हिंदुस्थान यांस धोका येण्याचा संभव होता. तसेंच रशियाशीं काळ्या समुद्राकडून दळणवळण ठेवणें जरूर असल्यामुळें डार्डानेल्सच्या सामुद्रधुनीवर आपलें वर्चस्व बसविण्याचा ग्रेट ब्रिटननें खूप प्रयत्न केला (१९१५ एप्रिल ते १९१६ जाने.) पण त्यांस यश मिळालें नाहीं व मनुष्यहानी खूप झाली. याच सुमारास ब्रिटिश सैन्यानें (हिंदी व इंग्लिश) तुर्कस्थानच्या साम्राज्यांतील मेसापोटेमिया-बर हल्ला केला, पण ब्रिटिशांचा पराभव होऊन त्यांपैकीं कांहींस शत्रूस शरण

जावें लागलें (१९१६ एप्रिल) तरी पुढें जनरल मॉड याच्या नेतृत्वाखालील ब्रिटिश सैन्यानें तुर्कस्थानचा पराभव करून बगदाद शहर काबीज केलें.

तसेंच जनरल **अलेन्बीच्या** नेतृत्वाखालील ब्रिटिश सैन्यानें पॅलेस्टाइनवर स्वारी करून जेरुसलेम घेतलें (१९१७ डिसें.) व १९१८ मध्यें सीरिया प्रांतही घेतला. तुर्कस्थान शत्रूस मिळाल्यावर इजिप्त हा देश ग्रेट ब्रिटनचा संरक्षित देश असल्याचें जाहीर करण्यांत आलें, व त्यावर ग्रेट ब्रिटननें आपलें वर्चस्व बसविलें.

अशाप्रकारें पूर्वेकडे तुर्कस्थानचा पराभव झाला व तुर्कस्थानचे कांहीं प्रदेश ब्रिटिशांच्या वर्चस्वाखालीं घेऊन सुएझ कालवा व हिंदुस्थान यांस जर्मनी व तुर्कस्थान यांपासून येणारा धोका नाहींसा झाला (१९१८).

समुद्रावरील युद्धप्रसंग :— युद्ध सुरू झालें तेव्हांपासून ग्रेट ब्रिटनचें आरमार प्रबळ असून तें इतर कोणत्याही दोन प्रबल राष्ट्रांच्या आरमाराएवढें मोठें होतें. त्यामुळें युद्ध सुरू झाल्यापासून ग्रेट ब्रिटननें उत्तर समुद्रावर आपलें वर्चस्व स्थापन करून जर्मन आरमारास आपल्या बंदरापाशीं कोंडून धरलें, व त्यास बाहेर पडण्याचें धाडस करतां आलें नाहीं. त्याचप्रमाणें समुद्रावर ग्रेट ब्रिटनचें वर्चस्व असल्यामुळें आपल्या साम्राज्यांतील दूरदूरच्या प्रदेशांतून सैन्य व युद्धसामुग्री यांची वहातुक करणें व ती फ्रान्स व इतर दोस्त राष्ट्रांस पोहोंचविणें वगैरे गोष्टी करितां आल्या. त्याचप्रमाणें जर्मनीचा समुद्रमार्गें होणारा व्यापार बंद पाडतां आला. त्यामुळें जर्मनीचा कोंडमारा होऊन जर्मनीची चमत्कारिक परिस्थिति झाली. अशी स्थिति असतां ग्रेट ब्रिटननें आपल्या दोस्त राष्ट्रांच्या मदतीनें जर्मनीचे व इतर शत्रु राष्ट्रांचे दूरदूरच्या ठिकाणीं असलेले प्रदेश व ठाणीं काबीज केलीं.

१९१४ मध्यें ग्रेट ब्रिटननें आस्ट्रेलिया, न्यूझीलंड व जपान यांच्या मदतीनें पॅसिफिक महासागरांतील जर्मनीच्या वर्चस्वाखालीं असलेलीं सर्व बेटें हस्तगत केलीं. चीनच्या किनाऱ्यावरील किओ-चिओ हें जर्मन ठाणें जपाननें जिंकून घेतलें. ग्रेट ब्रिटनच्या दक्षिण आफ्रिका या वसाहतीनें जर्मनीची नैऋत्य आफ्रिका ही वसाहत व ब्रिटिश (हिंदी व इंग्लिश) सैन्यानें जर्मनीची पूर्व आफ्रिका (टँगानिका) ही वसाहत जिंकून घेतली (१९१८). तसेंच ब्रिटिश व फ्रेंच

सैन्यांनीं मिळून १९१४ मध्यें टोगोलँड व १९१६ मध्यें कॅमरून हें आफ्रिकेमधील प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणले.

जर्मनीच्या आरमाराचे कांहीं लहान विभाग दूरदूरच्या ठिकाणीं होते. त्यांपैकीं एकानें चिलीजवळ ब्रिटिश काफिल्यावर हल्ला करून त्याचा १९१४ च्या नोव्हेंबरमध्यें पराभव केला, पण पुढें लागलीच १ महिन्यानेंच फॉकलंड बेटांनजीक दुसऱ्या एका ब्रिटिश काफिल्यानें जर्मन जहाजांचा पराभव केला.

आपल्या आरमाराचा कोंडमारा होत आहे हें पाहून जर्मनीचें आरमार १९१६ च्या जूनमध्यें उत्तर समुद्रांत येऊन त्यानें ब्रिटिश आरमारावर जटलंड-नजीक जोराचा हल्ला केला व त्यामुळें ब्रिटिश आरमाराचीं कांहीं जहाजें नादुरुस्त झालीं, तरी ब्रिटिश आरमारानें जोराचा प्रतिकार केल्यामुळें जर्मन आरमारांतील बरींच जहाजें निकामी होऊन त्यास माघार घ्यावी लागली. तेव्हां ब्रिटिश आरमाराशीं समुद्रावर युद्ध न करितां पाणबुड्या बोटींच्या साह्याच्यानें ग्रेट ब्रिटनकडे जाणाऱ्या व्यापारी व इतर जहाजांवर हल्ले करून ग्रेट ब्रिटनचा व्यापारविषयक कोंडमारा करण्याचा जर्मनीनें बेत केला.

जर्मनीची पाणबुड्या बोटींची मोहीम (१९१५–१८)—इंग्लंडचा व्यापारविषयक कोंडमारा करून उपासमार करावी म्हणून जर्मनीनें १९१५ मध्यें पाणबुड्या बोटींची मोहीम सुरू केली. या बोटीस यू बोटी (under sea) असेंही म्हणत. या पाणबुड्या बोटींकडून लढाऊ जहाजांप्रमाणें व्यापारी व प्रवाशांचीं जहाजेंही बुडविण्यांत येऊं लागलीं, व त्यांत कांहीं तटस्थ राष्ट्रांचींही जहाजें असत. १९१५ च्या मे महिन्यांत आयर्लंडच्या किनाऱ्या-नजीक १२०० उतारू असलेलीं 'लूसिटेनिआ' नांवाची ब्रिटिशांची एक मोठी आगबोट पाणबुडीकडून बुडविण्यांत आली. त्यामध्यें अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांचे १०० पेक्षां जास्त नागरिक होते, त्यामुळें जर्मनीच्या या अत्या-चाराबद्दल अ. सं. सं यामधील लोकमत बरेंच क्षुब्ध झालें; व अ. सं. सं. या राष्ट्रानें तटस्थ राष्ट्रांच्या जहाजांस व प्रवासी आगबोटींस पाणबुड्याकडून उपद्रव पोहोंचणार नाहीं याबद्दल खबरदारी घेण्यांत यावी याबद्दल तक्रार केली, पण पाणबुड्या बोटींमुळें ब्रिटिशांचा व्यापारविषयक व अन्नसामुग्री-विषयक कोंडमारा होत आहे हें पाहून जर्मनीनें अ. सं. सं. या राष्ट्राच्या

जावें लागलें (१९१६ एप्रिल) तरी पुढें जनरल मॉड याच्या नेतृत्वाखालील ब्रिटिश सैन्यानें तुर्कस्थानचा पराभव करून बगदाद शहर काबीज केलें.

तसेंच जनरल **अलेन्बीच्या** नेतृत्वाखालील ब्रिटिश सैन्यानें पॅलेस्टाइनवर स्वारी करून जेरुसलेम घेतलें (१९१७ डिसें.) व १९१८ मध्यें सीरिया प्रांतही घेतला. तुर्कस्थान शत्रूस मिळाल्यावर इजिप्त हा देश ग्रेट ब्रिटनचा संरक्षित देश असल्याचें जाहीर करण्यांत आलें, व त्यावर ग्रेट ब्रिटननें आपलें वर्चस्व बसविलें.

अशाप्रकारें पूर्वेकडे तुर्कस्थानचा पराभव झाला व तुर्कस्थानचे कांहीं प्रदेश ब्रिटिशांच्या वर्चस्वाखालीं येऊन सुएझ कालवा व हिंदुस्थान यांस जर्मनी व तुर्कस्थान यांपासून येणारा धोका नाहींसा झाला (१९१८).

समुद्रावरील युद्धप्रसंग :—युद्ध सुरू झालें तेव्हांपासून ग्रेट ब्रिटनचें आरमार प्रबळ असून तें इतर कोणत्याही दोन प्रबल राष्ट्रांच्या आरमाराएवढें मोठें होतें. त्यामुळें युद्ध सुरू झाल्यापासून ग्रेट ब्रिटननें उत्तर समुद्रावर आपलें वर्चस्व स्थापन करून जर्मन आरमारास आपल्या बंदरापाशीं कोंडून धरलें, व त्यास बाहेर पडण्याचें धाडस करतां आलें नाहीं. त्याचप्रमाणें समुद्रावर ग्रेट ब्रिटनचें वर्चस्व असल्यामुळें आपल्या साम्राज्यांतील दूरदूरच्या प्रदेशांतून सैन्य व युद्धसामुग्री यांची वहातुक करणें व ती फ्रान्स व इतर दोस्त राष्ट्रांस पोहोंचविणें वगैरे गोष्टी करितां आल्या. त्याचप्रमाणें जर्मनीचा समुद्रमार्गें होणारा व्यापार बंद पाडतां आला. त्यामुळें जर्मनीचा कोंडमारा होऊन जर्मनीची चमत्कारिक परिस्थिति झाली. अशी स्थिति असतां ग्रेट ब्रिटननें आपल्या दोस्त राष्ट्रांच्या मदतीनें जर्मनीचे व इतर शत्रु राष्ट्रांचे दूरदूरच्या ठिकाणीं असलेले प्रदेश व ठाणीं काबीज केलीं.

१९१४ मध्यें ग्रेट ब्रिटननें आस्ट्रेलिया, न्यूझीलंड व जपान यांच्या मदतीनें पॅसिफिक महासागरांतील जर्मनीच्या वर्चस्वाखालीं असलेलीं सर्व बेटें हस्तगत केलीं. चीनच्या किनाऱ्यावरील किओ-चिओ हें जर्मन ठाणें जपाननें जिंकून घेतलें. ग्रेट ब्रिटनच्या दक्षिण आफ्रिका या वसाहतीनें जर्मनीची नैऋत्य आफ्रिका ही वसाहत व ब्रिटिश (हिंदी व इंग्लिश) सैन्यानें जर्मनीची पूर्व आफ्रिका (टँगानिका) ही वसाहत जिंकून घेतली (१९१८). तसेंच ब्रिटिश व फ्रेंच

सैन्यांनीं मिळून १९१४ मध्यें टोगोलँड व १९१६ मध्यें कॅमरून हें आफ्रिकेमधील प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणले.

जर्मनींच्या आरमाराचे कांहीं लहान विभाग दूरदूरच्या ठिकाणीं होते. त्यांपैकीं एकानें चिलीजवळ ब्रिटिश काफिल्यावर हल्ला करून त्याचा १९१४ च्या नोव्हेंबरमध्यें पराभव केला, पण पुढें लागलीच १ महिन्यानेंच फॉकलंड बेटांनजीक दुसऱ्या एका ब्रिटिश काफिल्यानें जर्मन जहाजांचा पराभव केला.

आपल्या आरमाराचा कोंडमारा होत आहे हें पाहून जर्मनींचें आरमार १९१६ च्या जूनमध्यें उत्तर समुद्रांत येऊन त्यानें ब्रिटिश आरमारावर जटलंड-नजीक जोराचा हल्ला केला व त्यामुळें ब्रिटिश आरमाराचीं कांहीं जहाजें नादुरुस्त झालीं, तरी ब्रिटिश आरमारानें जोराचा प्रतिकार केल्यामुळें जर्मन आरमारांतील बरींच जहाजें निकामी होऊन त्यास माघार घ्यावी लागली. तेव्हां ब्रिटिश आरमाराशीं समुद्रावर युद्ध न करितां पाणबुड्या बोटींच्या साह्याच्यानें ग्रेट ब्रिटनिकडे जाणाऱ्या व्यापारी व इतर जहाजांवर हल्ले करून ग्रेट ब्रिटनचा व्यापारविषयक कोंडमारा करण्याचा जर्मनीनें बेत केला.

जर्मनीची पाणबुड्या बोटींची मोहीम (१९१५–१८)—इंग्लंडचा व्यापारविषयक कोंडमारा करून उपासमार करावी म्हणून जर्मनीनें १९१५ मध्यें पाणबुड्या बोटींची मोहीम सुरू केली. या बोटींस यू बोटी (under sea) असेंही म्हणत. या पाणबुड्या बोटींकडून लढाऊ जहाजांप्रमाणें व्यापारी व प्रवाशांचीं जहाजेंही बुडविण्यांत येऊं लागलीं, व त्यांत कांहीं तटस्थ राष्ट्रांचींही जहाजें असत. १९१५ च्या मे महिन्यांत आयर्लंडच्या किनाऱ्या-नजीक १२०० उतारू असलेलीं 'लूसिटेनिआ' नांवाची ब्रिटिशांची एक मोठी आगबोट पाणबुडीकडून बुडविण्यांत आली. त्यामध्यें अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांचे १०० पेक्षां जास्त नागरिक होते, त्यामुळें जर्मनींच्या या अत्या-चाराबद्दल अ. सं. सं यामधील लोकमत बरेंच क्षुब्ध झालें; व अ. सं. सं. या राष्ट्रानें तटस्थ राष्ट्रांच्या जहाजांस व प्रवासी आगबोटींस पाणबुड्याकडून उपद्रव पोहोंचणार नाहीं याबद्दल खबरदारी घेण्यांत यावी याबद्दल तक्रार केली, पण पाणबुड्या बोटींमुळें ब्रिटिशांचा व्यापारविषयक व अन्नसामुग्री-विषयक कोंडमारा होत आहे हें पाहून जर्मनींनें अ. सं. सं. या राष्ट्राच्या

जावें लागलें (१९१६ एप्रिल) तरी पुढें जनरल मॉड याच्या नेतृत्वाखालील ब्रिटिश सैन्यानें तुर्कस्थानचा पराभव करून बगदाद शहर काबीज केलें.

तसेंच जनरल **अलेन्बीच्या** नेतृत्वाखालील ब्रिटिश सैन्यानें पॅलेस्टाइनवर स्वारी करून जेरुसलेम घेतलें (१९१७ डिसें.) व १९१८ मध्यें सीरिया प्रांतही घेतला. तुर्कस्थान शत्रूस मिळाल्यावर इजिप्त हा देश ग्रेट ब्रिटनचा संरक्षित देश असल्याचें जाहीर करण्यांत आलें, व त्यावर ग्रेट ब्रिटननें आपलें वर्चस्व बसविलें.

अशाप्रकारें पूर्वेकडे तुर्कस्थानचा पराभव झाला व तुर्कस्थानचे कांहीं प्रदेश ब्रिटिशांच्या वर्चस्वाखालीं येऊन सुएझ कालवा व हिंदुस्थान यांस जर्मनी व तुर्कस्थान यांपासून येणारा धोका नाहींसा झाला (१९१८).

समुद्रावरील युद्धप्रसंग :— युद्ध सुरू झालें तेव्हांपासून ग्रेट ब्रिटनचें आरमार प्रबळ असून तें इतर कोणत्याही दोन प्रबल राष्ट्रांच्या आरमाराएवढें मोठें होतें. त्यामुळें युद्ध सुरू झाल्यापासून ग्रेट ब्रिटननें उत्तर समुद्रावर आपलें वर्चस्व स्थापन करून जर्मन आरमारास आपल्या बंदरापाशीं कोंडून धरलें, व त्यास बाहेर पडण्याचें धाडस करतां आलें नाहीं. त्याचप्रमाणें समुद्रावर ग्रेट ब्रिटनचें वर्चस्व असल्यामुळें आपल्या साम्राज्यांतील दूरदूरच्या प्रदेशांतून सैन्य व युद्धसामुग्री यांची वहातुक करणें व ती फ्रान्स व इतर दोस्त राष्ट्रांस पोहोंचविणें वगैरे गोष्टी करितां आल्या. त्याचप्रमाणें जर्मनीचा समुद्रमार्गे होणारा व्यापार बंद पाडतां आला. त्यामुळें जर्मनीचा कोंडमारा होऊन जर्मनीची चमत्कारिक परिस्थिति झाली. अशी स्थिति असतां ग्रेट ब्रिटननें आपल्या दोस्त राष्ट्रांच्या मदतीनें जर्मनीचे व इतर शत्रु राष्ट्रांचे दूरदूरच्या ठिकाणीं असलेले प्रदेश व ठाणीं काबीज केलीं.

१९१४ मध्यें ग्रेट ब्रिटननें आस्ट्रेलिया, न्यूझीलंड व जपान यांच्या मदतीनें पॅसिफिक महासागरांतील जर्मनीच्या वर्चस्वाखालीं असलेलीं सर्व बेटें हस्तगत केलीं. चीनच्या किनाऱ्यावरील किओ-चिओ हें जर्मन ठाणें जपाननें जिंकून घेतलें. ग्रेट ब्रिटनच्या दक्षिण आफ्रिका या वसाहतीनें जर्मनीची नैऋत्य आफ्रिका ही वसाहत व ब्रिटिश (हिंदी व इंग्लिश) सैन्यानें जर्मनीची पूर्व आफ्रिका (टँगानिका) ही वसाहत जिंकून घेतली (१९१८). तसेंच ब्रिटिश व फ्रेंच

सैन्यांनीं मिळून १९१४ मध्यें टोगोलँड व १९१६ मध्यें कॅमरून हें आफ्रिकेमधील प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणले.

जर्मनीच्या आरमाराचे कांहीं लहान विभाग दूरदूरच्या ठिकाणीं होते. त्यांपैकीं एकानें चिलीजवळ ब्रिटिश काफिल्यावर हल्ला करून त्याचा १९१४ च्या नोव्हेंबरमध्यें पराभव केला, पण पुढें लागलीच १ महिन्यानेंच फॉकलंड बेटांनजीक दुसऱ्या एका ब्रिटिश काफिल्यानें जर्मन जहाजांचा पराभव केला.

आपल्या आरमाराचा कोंडमारा होत आहे हें पाहून जर्मनीचें आरमार १९१६ च्या जूनमध्यें उत्तर समुद्रांत येऊन त्यानें ब्रिटिश आरमारावर जटलंड-नजीक जोराचा हल्ला केला व त्यामुळें ब्रिटिश आरमाराचीं कांहीं जहाजें नादुरुस्त झालीं, तरी ब्रिटिश आरमारानें जोराचा प्रतिकार केल्यामुळें जर्मन आरमारांतील बरींच जहाजें निकामी होऊन त्यास माघार घ्यावी लागली. तेव्हां ब्रिटिश आरमाराशीं समुद्रावर युद्ध न करितां पाणबुड्या बोटींच्या साह्याच्यानें ग्रेट ब्रिटनिकडे जाणाऱ्या व्यापारी व इतर जहाजांवर हल्ले करून ग्रेट ब्रिटनचा व्यापारविषयक कोंडमारा करण्याचा जर्मनीनें बेत केला.

जर्मनीची पाणबुड्या बोटींची मोहीम (१९१५–१८)—इंग्लंडचा व्यापारविषयक कोंडमारा करून उपासमार करावी म्हणून जर्मनीनें १९१५ मध्यें पाणबुड्या बोटींची मोहीम सुरू केली. या बोटीस यू बोटी (under sea) असेंही म्हणत. या पाणबुड्या बोटींकडून लढाऊ जहाजांप्रमाणें व्यापारी व प्रवाशांचीं जहाजेंही बुडविण्यांत येऊं लागलीं, व त्यांत कांहीं तटस्थ राष्ट्रांचींही जहाजें असत. १९१५ च्या मे महिन्यांत आयर्लंडच्या किनाऱ्या-नजीक १२०० उतारू असलेलीं 'लूसिटेनिआ' नांवाची ब्रिटिशांची एक मोठी आगबोट पाणबुडीकडून बुडविण्यांत आली. त्यामध्यें अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांचे १०० पेक्षां जास्त नागरिक होते, त्यामुळें जर्मनीच्या या अत्या-चाराबद्दल अ. सं. सं यामधील लोकमत बरेंच क्षुब्ध झालें; व अ. सं. सं. या राष्ट्रानें तटस्थ राष्ट्रांच्या जहाजांस व प्रवासी आगबोटींस पाणबुड्याकडून उपद्रव पोहोंचणार नाहीं याबद्दल खबरदारी घेण्यांत यावी याबद्दल तक्रार केली, पण पाणबुड्या बोटींमुळें ब्रिटिशांचा व्यापारविषयक व अन्नसामुग्री-विषयक कोंडमारा होत आहे हें पाहून जर्मनीनें अ. सं. सं. या राष्ट्राच्या

तक्रारीकडे दुर्लक्ष केलें व पाणबुड्या बोटींची मोहीम जोरानें चालूं ठेविली. तसेंच मेक्सिकोमार्गे अ. सं. सं. यावर हल्ला करण्याचाही जर्मनी कट करीत असल्याचें उघडकीला आलें. त्यामुळें जर्मनीविरुद्ध अमेरिकेंतील लोकमत क्षुब्ध झालें व अ. सं. सं. चा अध्यक्ष विड्रो विल्सन यानें १९१७ च्या एप्रिलमध्यें जर्मनीविरुद्ध व डिसेंबरमध्यें आस्ट्रियाविरुद्ध युद्ध जाहीर केलें.

यानंतर विमानें व झेपेलीन्स यांच्या मदतीनें इंग्लंडमधील दाट लोकवस्तीच्या व औद्योगिक बाबतींत प्रसिद्ध असलेल्या शहरांवर बाँब टाकून सामान्य लोकांस घाबरून टाकण्याचे जर्मनीनें प्रयत्न केले. यामुळें मालमत्ता व घरेंदारें यांचा नाश होऊन बरीच प्राणहानी झाली तरी तोफांचा मारा करून विमानांचा नाश होऊं लागल्यामुळें हें संकट कमी झालें.

अ. सं. संस्थानें या राष्ट्रानंतर मध्य व दक्षिण अमेरिकेंतील व जगांतील इतर ठिकाणच्या पनामा, क्यूबा, ग्रीस, सयाम, ब्राझील, चीन, कोस्टारिका, हंडूरास वगैरे अनेक राष्ट्रांनीं जर्मनी, आस्ट्रिया, तुर्कस्थान व बल्गेरिया या राष्ट्रांशीं १९१७–१८ च्या दरम्यान युद्ध जाहीर केलें व त्यामुळें या युद्धाचें क्षेत्र जगभर पसरलें. अ. सं. सं. हें राष्ट्र युद्धांत सामील झाल्यावर त्या राष्ट्राचा अध्यक्ष **विड्रो विल्सन** यानें 'लोकशाहीच्या सुरक्षिततेसाठीं अ. सं. संस्थानानें युद्धांत भाग घेतला आहे' अशी घोषणा केली, व नंतर युद्धाचें उद्दिष्ट म्हणून १४ मुद्दे जाहीर केले. यांपैकीं खालील मुद्दे विशेष महत्त्वाचे होते व ते म्हणजे (१) राष्ट्रांनीं आपसांत गुप्त करारमदार करूं नयेत (२) समुद्राचा वापर सर्व राष्ट्रांस खुला असावा (३) प्रत्येक राष्ट्रानें आपलें सैन्य व आरमार कमी करावें (४) निरनिराळ्या राष्ट्रांचें वसाहतीसंबंधाचे हितसंबंध तडजोडीनें मिटविण्यांत यावेत (५) आपल्याला कोणत्या राष्ट्राशीं सहकार्य करावयाचें व कोणत्या प्रकारची राज्यघटना असावी हें ठरविण्याचा 'स्वयंनिर्णयाचा हक्क' प्रत्येक राष्ट्रास व लोकसमुदायास आहे. (६) वरील उद्दिष्टें साध्य करून घेण्यासाठीं राष्ट्रसंघ ही संस्था काढण्यांत यावी.

अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें हें राष्ट्र दोस्तांच्या बाजूनें युद्धांत सामील झाल्यामुळें व अ. सं. सं. चा राष्ट्राचें प्रबल आरमार व ताज्या दमाचें अमेरिकन सैन्य

मुबलक शस्त्रास्त्रें, युद्धसाहित्य, अन्नसामुग्री यांसह दोस्तांच्या मदतीस आल्यामुळें दोस्त सैन्यास हुरूप आला. पण याच सुमारास रशियांत राज्यक्रान्ति होऊन तेथील सत्ता क्रान्तिकारक लोकांच्या हातीं जाऊन त्यांनीं जर्मनशीं सुरू असलेलें युद्ध थांबविल्यामुळें पूर्व सरहद्दीवरील जर्मन सैन्य व युद्धसामुग्री पश्चिम आघाडीवर पाठवून दोस्त राष्ट्रांच्या सैन्यावर आपल्या सर्व सामर्थ्यासह निकराचा हल्ला करावा असें जर्मनींच्या लष्करी हालचालीचे प्रमुख व्हॉन हिंडेनबुर्ग व व्हॉन ल्यूडेनडॉर्फ यांस वाटून त्यांनीं दोस्तांच्या सैन्यावर मार्च ते मे १९१८ पर्यंत निकराचे हल्ले केले; त्यामुळें दोस्तांच्या सैन्यानें आपणांकडून पराकाष्ठा केली तरी त्यास कांहीं ठिकाणीं मागें हटावें लागलें.

तेव्हां जर्मनींच्या चढाईस यशस्वीरीतीनें तोंड देण्यासाठीं पाश्चिम आघाडीवरील फ्रेंच, ब्रिटिश व अमेरिकन या दोस्त राष्ट्रांच्या सैन्यांचें अधिपत्य **मार्शल फॉक** या फ्रेंच सेनापतीकडे देण्यांत आलें (एप्रिल १९१८). तेव्हां मार्शल फॉक यानें नव्या दमाचे अमेरिकन सैनिक आपल्या सर्व युद्ध सामुग्रीसह पश्चिम आघाडीवर येत आहेत हें पाहून १९१८ च्या जुलै महिन्यांत चिलखती मोटर (टँक = रणगाडे), तोफा, व लढवय्ये सैन्य यांच्या मदतीनें जर्मन सैन्यावर निकराचा हल्ला केला त्यामुळें जर्मन सैन्याची खूप हानी झाली व तेथें धुमाकूळ होऊन त्यास माघार घ्यावी लागली.

पश्चिम आघाडीवर दोस्त सैन्यास असा जय मिळत असतां पूर्व आघाडीवर शत्रू सैन्याचा सर्वत्र पराभव होत होता. तुर्कस्थानच्या सैन्याचा पराभव करून तुर्कस्थानचें मेसापोटेमिया, पॅलेस्टाईन, व सीरिया हे प्रदेश ब्रिटिशांनीं जिंकून घेतले. आस्ट्रिया–हंगेरीच्या साम्राज्यांतील झेकोस्लाव्ह, युगोस्लाव्ह, पोलंड येथील लोकांनीं बंडाळीं केलीं व आपल्या राजकर्त्यांची सत्ता झुगारून दिली. इटलीनें आस्ट्रियाचा पराभव करून ट्रेन्ट व ट्रेस्टी या प्रदेशांवर आपलें वर्चस्व बसविलें. बल्गेरिया दोस्त राष्ट्रांस शरण आला.

चार वर्षें युद्ध चालूनही जर्मनीस जय मिळाला नाहीं, व ग्रेट ब्रिटननें केलेल्या कोंडमाऱ्यामुळें जर्मनीचा व्यापार बंद पडून दुष्काळग्रस्त व हलाखीची स्थिति आली व या आपत्तीस जर्मनींचा बादशहा कैसर २ रा विल्यम जबाबदार आहे हें पाहून त्याच्याविरुद्ध जर्मनींत बंडाळीं सुरू झाली, व ती फैलावत चाललीं हें

पाहून कैसर २ रा विल्यम यानें राज्यत्याग केला व हॉलंडमध्यें पळ काढला. तेव्हां युद्ध थांबविण्याशिवाय गत्यंतर नाहीं हें पाहून जर्मनीनें युद्ध थांबविण्याची याचना केली, तेव्हां ११ नोव्हेंबर १९१८ रोजीं युद्ध थांबविण्यांत आलें.

व्हर्सेल्सचा तह २८ जून १९१९—यानंतर शत्रूराष्ट्रांशीं करावयाच्या तहाच्या अटी ठरविण्यासाठीं व्हर्सेल्स येथें १८ जानेवारी १९१९ मध्यें दोस्त राष्ट्रांच्या प्रतिनिधींची बैठक भरविण्यांत आली. या परिषदेस ३२ राष्ट्रांचे प्रतिनिधी आलेले होते. या सर्व प्रतिनिधींचे हितसंबंध व दृष्टिकोन वेगवेगळा असल्यामुळें त्यांच्यामध्यें मतभेद होते व सर्वांना समाधानकारक होतील अशा तहाच्या अटी ठरविणें बरेंच अवघड होतें. या परिषदेच्या बैठकींस शत्रू राष्ट्रांतील प्रतिनिधींस बोलावण्यांत आलेलें नव्हतें. या परिषदेमध्यें अ. सं. सं. अध्यक्ष **विड्रो विल्सन,** फ्रान्सचा मुख्य प्रधान **क्लेमान्सो** (Clemenceau) व ग्रेट ब्रिटनचा मुख्य प्रधान **लॉईड जॉर्ज** यांनीं प्रमुख भाग घेतला होता. या परिषदेच्या वाटाघाटी दोन महिने चालू होत्या; व त्या दरम्यान शत्रुराष्ट्रांपैकीं कांहीं राष्ट्रांतील जनतेनें आपल्या राजकर्त्यांचें जूं झुगारून देऊन आपलें स्वातंत्र्य जाहीर केलेलें होतें, तेव्हां त्या परिस्थितीचाही या परिषदेस विचार करावा लागला. शेवटीं शत्रुराष्ट्रांशीं करावयाच्या तहाच्या अटींचा मसुदा नक्की होऊन त्यांस परिषदेची मान्यता मिळाल्यावर जर्मनीच्या प्रतिनिधींना बोलावण्यांत येऊन त्यांच्यापुढें तहाच्या अटींचा मसुदा ठेवण्यांत आला. त्यांपैकीं युद्धाची जबाबदारी जर्मनीवर टाकण्यांत येऊन युद्धामध्यें झालेल्या नुकसानीबद्दल जर्मनीनें पैसा व खनिज द्रव्यें यांद्वारां नुकसानभरपाई द्यावी असें ठरविण्यांत आलें. या अटी जर्मनीच्या प्रतिनिधींस मान्य नव्हत्या, तेव्हां त्याबद्दल आपला विरोध स्पष्ट करून जर्मनीच्या प्रतिनिधीनीं तहाच्या मसुद्यावर सह्या केल्या. यानंतर पुढें वर्ष सव्वा वर्षाच्या काळांत आस्ट्रिया, बल्गेरिया व तुर्कस्थान या राष्ट्रांशींही तह करण्यांत आला. व्हर्सेलच्या तहानें खालील गोष्टी घडून आल्या :—

(१) ॲलसॅस व लरेन हे प्रांत फ्रान्सला मिळाले. त्याचप्रमाणें जर्मनीला आपल्या आणखी कांहीं प्रदेशांस मुकावे लागले.

(२) युद्धामुळें फ्रान्सच्या उत्तर भागांतील प्रदेश उध्वस्त झाला होता त्याची भरपाई म्हणून जर्मनीनें आर्थिक कमिशननें ठरविलेली रक्कम खंडणी म्हणून

दोस्तांना द्यावी व त्यांपैकीं जास्त हिस्सा फ्रान्सनें घ्यावा व तहाच्या अटी पुऱ्या होईपर्यंत लोखंड व कोळसा यांच्या खाणींमुळें समृद्ध असलेला जर्मनीचा सार (Saar) हा प्रांत फ्रान्सकडे असावा.

(३) जर्मनीनें आपलें आरमार दोस्त राष्ट्रांच्या ताब्यांत द्यावें, व देशाच्या अंतस्थ शांततेस जरूर एवढेंच सैन्य ठेवावें.

(४) जर्मनीच्या आफ्रिका खंडांतील वसाहती ग्रेट ब्रिटन व दोस्तराष्ट्रांकडे असाव्यात व पॅसिफिक महासागरांतील ठाणीं जपान, आस्ट्रेलिया व न्यूझीलंड यांकडे असाव्यात.

(५) तुर्कस्थानचे ब्रिटिशांनीं जिंकून घेतलेले मेसापोटेमिया, पॅलेस्टाईन व सीरीया हे प्रदेश दोस्तराष्ट्रांकडे असावेत. यांपैकीं राष्ट्रसंघानें मेसापोटेमिया व पॅलेस्टाईन हे प्रदेश ग्रेट ब्रिटनकडे व सीरीया फ्रान्सकडे देखरेखीसाठीं (Mandatory) दिले.

(६) शत्रुराष्ट्रांच्या ताब्यांत असलेल्या निरनिराळ्या देशांना व तेथील लोकांना स्वतंत्र होण्याची इच्छा असल्यास त्यांस स्वयंनिर्णयाचें (Self-Determination) तत्त्व लावण्यांत आलें. त्यामुळें युरोपमध्यें बरीच नवीन राष्ट्रें निर्माण झालीं.

(७) महायुद्ध झाल्यामुळें भयंकर प्राणहानि, मालमत्तेचा विध्वंस व कोट्यवधि रुपये खर्च झालेले होते. तेव्हां असें युद्ध पुनः उपस्थित होऊं नये, राष्ट्रांराष्ट्रांतील तंटे सामोपचारानें मिटविले जावेत, त्याचप्रमाणें मानवजातीच्या हिताचे सामाजिक, आर्थिक, आरोग्यविषयक व इतर प्रश्न सहकार्यानें सोडविले जावेत या उद्देशानें विड्रो विल्सन याच्या सूचनेप्रमाणें **'राष्ट्रसंघ'** ही संस्था काढण्यांत आली.

युद्धोत्तर जग

(१) राष्ट्रसंघ या संस्थेमार्फत झालेलें कार्य—

व्हर्सेल्सच्या तहांत ठरल्याप्रमाणें राष्ट्रसंघ (League of Nations) ही संस्था १० जानेवारी १९२० मध्यें स्थापन करण्यांत आली. सुरुवातीस दोस्त राष्ट्रांनाच या संस्थेचे सभासद करून घेण्यांत आलें पण पुढें

शत्रुराष्ट्रांसही या संस्थेचे सभासद होतां आलें. या संस्थेचीं दोन मुंडळें आहेत व तीं म्हणजे असेंब्ली व कौंसिल हीं होत. असेंब्लीमध्यें सभासद असलेल्या प्रत्येक राष्ट्राचा प्रतिनिधि असतो. सार्वजनिक हितसंबंधाच्या प्रश्नांची चर्चा या मंडळांत होते. कौंसिल हें या मंडळाचें कार्यकारी मंडळ होय. यांत १४ सभासद असतात. त्यांपैकीं ग्रेट ब्रिटन व फ्रान्स यांचे सभासद कायमचे, बाकीच्या सभासदांची निवड असेंब्लीकडून होते. निरनिराळ्या राष्ट्रांनीं आपसांत गुप्त करार व तह करूं नयेत, निरनिराळ्या राष्ट्रांत वितुष्ट आल्यास त्यांनीं एकमेकांवर आक्रमण करून युद्ध सुरू करूं नये तर तो तंटा सोडविण्याचें काम राष्ट्रसंघाकडे सोंपवावें अशा अटी घातलेल्या होत्या. एखाद्या राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रावर आक्रमण केलें तर राष्ट्रसंघ त्या राष्ट्राविरुद्ध आर्थिक दंडयोजना सुचवितें, व जरूर झाल्यास त्या राष्ट्रास राष्ट्रसंघाचें शत्रु समजून लष्करी दंडयोजनाही सुचवितें. पण राष्ट्रसंघाजवळ स्वतःचें असें सैन्य व आरमार नाहीं, व राष्ट्रसंघानें घेतलेला निर्णय अंमलांत आणणें बंधनकारक नाहीं, त्यामुळें राष्ट्रांराष्ट्रांतील तंटे सामोपचारानें सोडविण्याच्या कामीं राष्ट्रसंघास यश आलें नाहीं, व कांहीं राष्ट्रांनीं राष्ट्रसंघास न जुमानतां इतर राष्ट्रांवर आक्रमण केलें. तरी या राजकीय बाबींखेरीज मादक द्रव्यांचें नियंत्रण, दुष्काळ, धरणीकंप, पूर वगैरे आपत्ति, बौद्धिक सहकार्य, मजुरांच्या हितसंबंधाचे कायदे, सैन्य व आरमार कमी करण्याची योजना वगैरे बाबतींत १९२०–१९३९ च्या दरम्यान राष्ट्रसंघानें महत्त्वाची कामगिरी केली. या संस्थेचें मुख्य ठिकाण स्वित्झर्लंडमधील जेनेव्हा येथें होतें. तसेंच या संस्थेमार्फत **हेग** येथें एक **आंतर्राष्ट्रीय न्यायकोर्ट** स्थापन करण्यांत येऊन त्याकडे आंतरराष्ट्रीय तंट्यांचा निवाडा करण्याचें काम सोंपविण्यांत आलें. तसेंच कामगार व मजूर यांच्या हितसंबंधाचे प्रश्न सोडविण्यासाठीं **आंतर्राष्ट्रीय मजूरसंस्था** (International Labour Organization) ही एक वेगळी संस्था स्थापन करण्यांत आली आहे.

राष्ट्रसंघामार्फत वहातुकीच्या मार्गासंबंधीं कमिटी, चलन, हुंडी व आर्थिक प्रश्नांसंबंधाची कमिटी, मँडेट किंवा मागासलेल्या राष्ट्रांच्या पालकत्व करण्यासंबंधीची कमिटी, आरोग्यविषयक कमिटी, मादक द्रव्यांवर नियंत्रण घालण्यासंबधाची कमिटी, धरणीकंप, पूर, दुष्काळ वगैरे आपत्तिसंबंधीं कमिटी,

बौद्धिक सहकार्यासंबंधीं कमेटी अशा वेगवेगळ्या व महत्त्वाच्या कमिट्या नेमल्या जाऊन मानवी समाजाची सर्व बाजूंनीं उन्नति करण्यासंबंधीं महत्त्वाची कामगिरी झाली.

राष्ट्रसंघ संस्था स्थापन झाली त्यावेळीं सुरुवातीस महायुद्धामध्यें भाग घेणाऱ्या दोस्तराष्ट्रांस त्याचे सभासद करण्यांत आले. पण यानंतर शत्रु-राष्ट्रांसही या संस्थेचे सभासद करण्यांत आले. ग्रेट ब्रिटन, फ्रान्स, इटली जपान, ब्रिटिश साम्राज्यांतील स्वसत्ताक वसाहती व हिंदुस्थान वगैरे ४८ राष्ट्रें यांत सामील झालीं व नंतर त्यांत वाढ झाली. ही संस्था स्थापन करण्याच्या कामीं अ. सं. सं. या राष्ट्राचा अध्यक्ष **विल्सन** यानें जरी प्रमुख भाग घेतला होता, तरी परराष्ट्रीय भानगडींत पडून आपल्यावरील जबाबदारी वाढवूं नये असें अ. सं. सं. या राष्ट्राच्या कायदेमंडळास (काँग्रेस) वाटल्यामुळें अ. सं. संस्थानें या राष्ट्रास या संस्थेचे सभासद होतां आलें नाहीं. त्यामुळें या संस्थेस वैगुण्य आलें, तरी या संस्थेमार्फत नेमण्यांत आलेल्या आर्थिक, सामाजिक, राजकीय व इतर बाबींसंबंधाच्या ज्या कमिट्या नेमण्यांत आल्या त्यामध्यें भाग घेऊन अ. सं. सं. या राष्ट्रानें या संस्थेशीं सहकार्य केलें आहे.

(२) सुरक्षिततेसाठीं तहनामे व करार

महायुद्ध संपल्यावर त्यांत झालेली भयंकर प्राणहानि, युद्धांत भाग घेतलेल्या राष्ट्रांची झालेली कर्जबाजारी स्थिति, मालमत्तेचा झालेला विध्वंस, युद्धांत गुंतलेल्या राष्ट्रांप्रमाणें तटस्थ राष्ट्रांचीही उद्योगधंदे व व्यापार या बाबतींत विसकटलेली घडी यांमुळें युद्ध उपस्थित होऊं नये, युद्ध उपस्थित होण्याचीं कारणें नष्ट व्हावींत, लहानमोठ्या सर्व राष्ट्रांस सुरक्षितता वाटावी अशी स्थिति निर्माण व्हावी असें सर्वांस वाटूं लागलें. निरनिराळ्या राष्ट्रांस एकमेकांच्या हेतूविषयीं साशंकता व भीति वाटते, व त्यामुळें आपल्या संरक्षणासाठीं जरूर म्हणून प्रत्येक राष्ट्र युद्धोपयोगी साहित्य निर्माण करण्यासाठीं व सैन्य व आरमार प्रबल ठेवण्यासाठीं कोट्यवधि रुपये खर्च करतें व निरनिराळ्या राष्ट्रांत या बाबतींत स्पर्धा उत्पन्न होते, तेव्हां त्यास आळा बसावा यासाठीं एखादी योजना आंखणें आवश्यक होतें. राष्ट्रसंघ ही संस्था स्थापन झालेली होती, पण राष्ट्रसंघास स्वतःचें असें सैन्य व आरमार नसल्यामुळें युद्ध उपस्थित झाल्यास तें थांबविण्याच्या कामीं राष्ट्रसंघ कितपत यशस्वी होईल याबद्दल साशंकता वाटत होती. तेव्हां

जगांतील प्रमुख राष्ट्रांनीं सैन्य व आरमार यांच्या नियंत्रणासाठीं व जगांत शांतता राखण्यासाठीं परिषदा भरविल्या व तहनामे व करार केले.

सैन्य व आरमार नियंत्रणासंबंधीं परिषदा— जगांतील प्रमुख राष्ट्रांनीं आपल्या संरक्षणास जरूर तेवढें आरमार ठेवून बाकीचें कमी करावें, तसेंच युद्धोपयोगी साहित्यही कमी करावें म्हणजे एकमेकांच्या हेतूंविषयीं साशंकता वाटणार नाहीं असें वाटून अ. सं. संस्थानांचा अध्यक्ष हार्डिंज यानें १९२१ मध्यें **वॉशिंग्टन** येथें एक परिषद् बोलाविली. या परिषदेस ९ प्रमुख राष्ट्रांचे प्रतिनिधी हजर होते. यांत ग्रेट ब्रिटन, अ. सं. संस्थानें, जपान, फ्रान्स व इटली यांनीं १० वर्षेपर्यंत मोठालीं लढाऊ जहाजें न बांधण्याचें व या राष्ट्रांचें आरमार अनुक्रमें ५ : ५ : १$\frac{3}{5}$: १$\frac{3}{5}$ या प्रमाणापेक्षां जास्ती न करण्याचें ठरविलें. त्याचप्रमाणें विषारी वायूचा युद्धांत उपयोग न करण्याचें व पाणबुड्या बोटी यांचा उपयोग व्यापारी जहाजें बुडविण्याच्या कामीं न करण्याचें कबूल केलें. यानंतर १९३० मध्यें इंग्लंडचा मुख्य प्रधान सर रॅमसे मॅक्डोनल्ड यानें **लंडन** शहरीं आरमारनियंत्रणासाठीं परिषद् बोलाविली. या परिषदेस ग्रेट ब्रिटन, अ. सं. संस्थानें, फ्रान्स, इटली व जपान यांचे प्रतिनिधी हजर होते. या परिषदेमध्यें पाणबुड्या बोटी, विनाशिका बोटी, व क्रूझर यांच्या संख्येंत वाढ करण्याच्या बाबतींत नियंत्रण घालण्यांत आलें. यानंतर १९३२ मध्यें राष्ट्रसंघाच्या सूचनेवरून **जिनेव्हा** येथें एक परिषद् भरविण्यांत आली. या परिषदेस जगांतील बहुतेक सर्व राष्ट्रांनीं आपले प्रतिनिधी पाठविले होते. सैन्य, आरमार, वैमानिक दल या गोष्टी कमी करणें, विषारी वायूचा उपयोग, सक्तीचें लष्करी शिक्षण वगैरे गोष्टी नाहींशा करणें व जगांत शांतता राखण्यासाठीं एक आंतरराष्ट्रीय पोलीस सैन्य ठेवणें वगैरे निरनिराळ्या सूचनांचा या परिषदे-मध्यें विचार झाला, पण या बाबतींत मतभेद असल्यामुळें वरील बाबींसंबंधानें निश्चित योजना ठरली नाहीं, तरी जगांत शांतता राहण्यासाठीं वरील गोष्टींवर नियंत्रण असणें जरूर आहे असें सर्वांस वाटूं लागलें.

जगांत शांतता राखण्यासाठीं तहनामे—लोकॅर्नो पॅक्ट, केलॉग पॅक्ट (पॅरिस पॅक्ट)–जगांतील निरनिराळ्या राष्ट्रांत एकमेकांच्या हेतूंविषयीं साशंकता वाटत होती. तेव्हां निरनिराळ्या राष्ट्रांनीं एकमेकांत वितुष्ट उत्पन्न झाल्यास

युद्धाच्या मार्गाचा अवलंब न करतां ते तडजोडीनें मिटविण्याची व शांतता राखण्याची हमी द्यावी यासंबंधीं तहनामे करण्यांत आले.

लोकॅर्नो पॅक्ट १९२५—ग्रेट ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, बेल्जम, पोलंड व झेकोस्लोव्हाकिया या राष्ट्रांच्या प्रतिनिधींनीं स्वित्झर्लंडमधील लोकॅर्नो या ठिकाणीं तहनामा केला व त्यामध्यें व्हर्सेल्सच्या तहानें ठरविलेल्या सरहद्दीस मान्यता देण्यांत आली व एकमेकांत वितुष्ट आल्यास युद्धाच्या मार्गाचा अवलंब न करतां तो प्रश्न तडजोडीनें सोडविण्याची हमी दिली.

केलॉग पॅक्ट (Kellog) **पॅरिस पॅक्ट १९२८**—अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें या राष्ट्राचा सेक्रेटरी केलॉग यानें फ्रान्सचा परराष्ट्रीय मंत्री ब्रॅंड (Briand) याच्या सूचनेवरून जगांतील प्रमुख राष्ट्रांच्या प्रतिनिधींची परिषद् पॅरिस येथें बोलाविली. या परिषदेमध्यें जगांतील निरनिराळ्या राष्ट्रांनीं आंतरराष्ट्रीय तंटे उपस्थित झाल्यास ते सोडविण्यासाठीं युद्धाचा अवलंब न करतां ते तडजोडीनें मिटविण्याची हमी दिली, व त्यास जगांतील ४५ राष्ट्रांनीं आपली मान्यता दिली.

(३) जागतिक घडामोडी

जगांतील घडामोडीः—१ ल्या महायुद्धानंतर अगोदर विस्तृत असलेल्या ब्रिटिश साम्राज्याच्या वर्चस्वाखालीं आणखी प्रदेश येऊन हें साम्राज्य खूपच वाढलें. तुर्कस्थानच्या साम्राज्यांतील मेसापोटेमिया, पॅलेस्टाईन या प्रदेशाचें पालकत्व राष्ट्रसंघानें ब्रिटिशांकडे सोंपविलें. यापैकीं पॅलेस्टाईन हा प्रदेश ज्यू लोकांची राष्ट्रभूमि (National Homeland) आहे हें ब्रिटिशांचा परराष्ट्र-मंत्री बाल्फोर यानें जाहीर केल्यामुळें जगांतील निरनिराळ्या देशांतील ज्यू लोक या प्रदेशांत येऊं लागून त्यांचें इझाएल (Israel) नांवाचें राष्ट्र तेथें स्थापन झालें. पण या गोष्टीस भोंवतालच्या अरब राष्ट्रांची मान्यता मिळाली नाहीं. त्यामुळें इझाएल या राष्ट्राचे शेजारच्या अरब राष्ट्रांशीं सरहद्दीवरील तंटे सुरू झाले. इजिप्त हा प्रदेश ब्रिटिशांच्या वर्चस्वाखालीं आला. अरबस्थानांतील हेजॅझ प्रदेश (Hejaz) गेलीं चार शतकें तुर्कस्थानच्या वर्चस्वाखालीं होता. त्यास साऊदी (Saudi) म्हणण्यांत येऊन तो स्वतंत्र असल्याचें जाहीर करण्यांत आलें. आफ्रिकेंतील टोगोलँड व कॅमरून यापैकीं कांहीं भाग व जर्मन पूर्वआफ्रिका

जगांतील प्रमुख राष्ट्रांनीं सैन्य व आरमार यांच्या नियंत्रणासाठीं व जगांत शांतता राखण्यासाठीं परिषदा भरविल्या व तहनामे व करार केले.

सैन्य व आरमार नियंत्रणासंबंधीं परिषदा— जगांतील प्रमुख राष्ट्रांनीं आपल्या संरक्षणास जरूर तेवढें आरमार ठेवून बाकीचें कमी करावें, तसेंच युद्धोपयोगी साहित्यही कमी करावें म्हणजे एकमेकांच्या हेतूंविषयीं साशंकता वाटणार नाहीं असें वाटून अ. सं. संस्थानांचा अध्यक्ष हार्डिंज यानें १९२१ मध्यें **वॉशिंग्टन** येथें एक परिषद् बोलाविली. या परिषदेस ९ प्रमुख राष्ट्रांचे प्रतिनिधी हजर होते. यांत ग्रेट ब्रिटन, अ. सं. संस्थानें, जपान, फ्रान्स व इटली यांनीं १० वर्षेपर्यंत मोठालीं लढाऊ जहाजें न बांधण्याचें व या राष्ट्रांचें आरमार अनुक्रमें ५ : ५ : १$\frac{3}{5}$: १$\frac{3}{5}$ या प्रमाणापेक्षां जास्ती न करण्याचें ठरविलें. त्याचप्रमाणें विषारी वायूचा युद्धांत उपयोग न करण्याचें व पाणबुड्या बोटी यांचा उपयोग व्यापारी जहाजें बुडविण्याच्या कामीं न करण्याचें कबूल केलें. यानंतर १९३० मध्यें इंग्लंडचा मुख्य प्रधान सर रॅमसे मॅक्डोनल्ड यानें **लंडन** शहरीं आरमारनियंत्रणासाठीं परिषद् बोलाविली. या परिषदेस ग्रेट ब्रिटन, अ. सं. संस्थानें, फ्रान्स, इटली व जपान यांचे प्रतिनिधी हजर होते. या परिषदेमध्यें पाणबुड्या बोटी, विनाशिका बोटी, व क्रूझर यांच्या संख्येंत वाढ करण्याच्या बाबतींत नियंत्रण घालण्यांत आलें. यानंतर १९३२ मध्यें राष्ट्रसंघाच्या सूचनेवरून **जिनेव्हा** येथें एक परिषद् भरविण्यांत आली. या परिषदेस जगांतील बहुतेक सर्व राष्ट्रांनीं आपले प्रतिनिधी पाठविले होते. सैन्य, आरमार, वैमानिक दल या गोष्टी कमी करणें, विषारी वायूचा उपयोग, सक्तीचें लष्करी शिक्षण वगैरे गोष्टी नाहींशा करणें व जगांत शांतता राखण्यासाठीं एक आंतरराष्ट्रीय पोलीस सैन्य ठेवणें वगैरे निरनिराळ्या सूचनांचा या परिषदेमध्यें विचार झाला, पण या बाबतींत मतभेद असल्यामुळें वरील बाबींसंबंधानें निश्चित योजना ठरली नाहीं, तरी जगांत शांतता राहण्यासाठीं वरील गोष्टींवर नियंत्रण असणें जरूर आहे असें सर्वांस वाटूं लागलें.

जगांत शांतता राखण्यासाठीं तहनामे—लोकॅर्नो पॅक्ट, केलॉग पॅक्ट (पॅरिस पॅक्ट)–जगांतील निरनिराळ्या राष्ट्रांत एकमेकांच्या हेतूंविषयीं साशंकता वाटत होती. तेव्हां निरनिराळ्या राष्ट्रांनीं एकमेकांत वितुष्ट उत्पन्न झाल्यास

युद्धाच्या मार्गाचा अवलंब न करतां ते तडजोडीनें मिटविण्याची व शांतता राखण्याची हमी यावी यासंबंधीं तहनामे करण्यांत आले.

लोकॅर्नो पॅक्ट १९२५—ग्रेट ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, बेल्जम, पोलंड व झेकोस्लोव्हाकिया या राष्ट्रांच्या प्रतिनिधींनीं स्वित्झर्लंडमधील लोकॅर्नो या ठिकाणीं तहनामा केला व त्यामध्यें व्हर्सेल्सच्या तहानें ठरविलेल्या सरहद्दीस मान्यता देण्यांत आली व एकमेकांत वितुष्ट आल्यास युद्धाच्या मार्गाचा अवलंब न करतां तो प्रश्न तडजोडीनें सोडविण्याची हमी दिली.

केलॉग पॅक्ट (Kellog) **पॅरिस पॅक्ट १९२८**—अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें या राष्ट्राचा सेक्रेटरी केलॉग यानें फ्रान्सचा परराष्ट्रीय मंत्री ब्रँअँड (Briand) याच्या सूचनेवरून जगांतील प्रमुख राष्ट्रांच्या प्रतिनिधींची परिषद् पॅरिस येथें बोलाविली. या परिषदेमध्यें जगांतील निरनिराळ्या राष्ट्रांनीं आंतरराष्ट्रीय तंटे उपस्थित झाल्यास ते सोडविण्यासाठीं युद्धाचा अवलंब न करतां ते तडजोडीनें मिटविण्याची हमी दिली, व त्यास जगांतील ४५ राष्ट्रांनीं आपली मान्यता दिली.

(३) जागतिक घडामोडी

जगांतील घडामोडीः—१ ल्या महायुद्धानंतर अगोदर विस्तृत असलेल्या ब्रिटिश साम्राज्याच्या वर्चस्वाखालीं आणखी प्रदेश येऊन हें साम्राज्य खूपच वाढलें. तुर्कस्थानच्या साम्राज्यांतील मेसापोटेमिया, पॅलेस्टाईन या प्रदेशाचें पालकत्व राष्ट्रसंघानें ब्रिटिशांकडे सोंपविलें. यापैकीं पॅलेस्टाईन हा प्रदेश ज्यू लोकांची राष्ट्रभूमि (National Homeland) आहे हें ब्रिटिशांचा परराष्ट्र-मंत्री बाल्फोर यानें जाहीर केल्यामुळें जगांतील निरनिराळ्या देशांतील ज्यू लोक या प्रदेशांत येऊं लागून त्यांचें इझाएल (Israel) नांवाचें राष्ट्र तेथें स्थापन झालें. पण या गोष्टीस भोंवतालच्या अरब राष्ट्रांची मान्यता मिळाली नाहीं. त्यामुळें इझाएल या राष्ट्राचे शेजारच्या अरब राष्ट्रांशीं सरहद्दीवरील तंटे सुरू झाले. इजिप्त हा प्रदेश ब्रिटिशांच्या वर्चस्वाखालीं आला. अरबस्थानांतील हेजॅझ प्रदेश (Hejaz) गेलीं चार शतकें तुर्कस्थानच्या वर्चस्वाखालीं होता. त्यास साऊदी (Saudi) म्हणण्यांत येऊन तो स्वतंत्र असल्याचें जाहीर करण्यांत आलें. आफ्रिकेंतील टोगोलँड व कॅमरून यापैकीं कांहीं भाग व जर्मन पूर्वआफ्रिका

हे प्रदेश ब्रिटिशांना मिळाले. जर्मन नैर्ऋत्य आफ्रिका ही वसाहत ब्रिटिश दक्षिण आफ्रिका या स्वसत्ताक वसाहतीकडे देण्यांत आली. दक्षिण पॅसिफिक महासागरांतील जर्मन बेटें ब्रिटिश व ब्रिटिशांच्या आस्ट्रेलिया व न्यूझीलंड या वसाहतींकडे देण्यांत आलीं.

फ्रान्सला आफ्रिकेंतील टोगोलँड व कॅमरुन्झ या प्रदेशाचा भाग मिळाला व आशियांतील सीरीया या प्रांताचें पालकत्व देण्यांत आलें. जपानला उत्तर पॅसिफिक महासागरांतील जर्मनीच्या ताब्यांतील बेटें मिळालीं. इटलीला ट्रेन्ट, ट्रेस्टि, व इस्ट्रिया हे युरोपमधील प्रदेश मिळाले.

नवीन राष्ट्रांची स्थापना—व्हर्सेल्सच्या तहानंतर जगाचा विशेषतः युरोपचा नकाशा यांमध्यें बराच बदल घडून आला. पूर्वीची हॅप्सबर्ग, रोमॅनॉफ व होहेनझोलार्न हीं प्रसिद्ध असलेलीं राजघराणीं नामशेष झालीं व स्वयंनिर्णय व लोकशाही या तत्त्वांनुसार ठिकठिकाणीं स्वतंत्र लोकसत्ताक राष्ट्रें निर्माण झालीं. हीं राष्ट्रें म्हणजे आस्ट्रिया, हंगेरी, झेकोस्लोव्हाकिया, युगोस्लाव्हिया, पोलंड, लिथुआनिया, लॅटव्हिया, एस्थोनिया, फिनलंड, तुर्कस्थान, स्पेन, इटली, जर्मनी, व रशिया वगैरे होत. हीं लोकसत्ताक राज्यें होतीं, तरी यांपैकीं कांहीं ठिकाणीं लोकशाही स्थापन करण्याचा प्रयत्न यशस्वी न होऊन तेथें सर्वाधिकारी पद्धतीची राज्यव्यवस्था स्थापन झाली.

(४) निरनिराळीं राजकीय तत्त्वें :—

लोकशाही (Democracy)—लोकशाही पद्धतीच्या राज्यघटनेंत राष्ट्रांतील बहुसंख्य लोकांस मताधिकार असून तो संपत्ति किंवा सामाजिक दर्जा यावर आधारलेला नसतो. लोकशाहीमध्यें सर्वांस व्यक्तिस्वातंत्र्य, मतस्वातंत्र्य, संघटनास्वातंत्र्य, वृत्तपत्रस्वातंत्र्य असतें. लोकशाही पद्धतीच्या राज्यव्यवस्थेंत तेथील राज्यकारभार लोकांस जबाबदार असलेल्या मंत्रिमंडळाकडून किंवा अध्यक्षाकडून केला जातो, व हें धोरण जनतेस पसंत नसलें, तर निवडणुकीच्या वेळीं आपणांस मान्य असलेल्या धोरणाच्या पक्षास मत देऊन तें मंत्रिमंडळ रद्द करणें जनतेच्या हातीं असतें; व ही गोष्ट शांततेनें घडून येते. लोकशाही पद्धतींत व्यक्तीसाठीं राष्ट्र असें मानलें जातें.

सर्वाधिकारी पद्धत—मोठमोठीं युद्धें झालीं, म्हणजे त्यासाठीं खूप खर्च

करावा लागतो, व त्यामुळें राष्ट्राची कर्जबाजारी व हलाखीची स्थिति होते. युद्धोत्तर राष्ट्रांत अन्नधान्याचा दुष्काळ, जरूरीच्या वस्तुंची कमतरता, बेकारी वगैरे गोष्टी उत्पन्न होऊन त्यामुळें अस्वस्थता, अंदाधुंदी व दंगेधोपे होऊं लागतात. तेव्हां अशा स्थितीस कंटाळून सर्वत्र स्थिरस्थावरता व व्यवस्थित राज्यकारभार करण्यास कोणी पुढें आल्यास लोक त्यास या कामासाठीं राष्ट्रांतील सर्व सत्ता आपल्या हातीं घेऊं देण्यास तयार असतात. तेव्हां एखादा कर्तबगार, महत्त्वाकांक्षी, धूर्त गृहस्थ या परिस्थितीचा फायदा घेऊन आपणास पाठबळ देणारी एखादी लष्करी धर्तीची संघटना निर्माण करून राष्ट्रांतील सर्व सत्ता आपल्या हातीं घेतो. या गृहस्थास **सर्वाधिकारी** किंवा हुकूमशहा (Dictator) असें म्हणण्यांत येतें. या सर्वाधिकाऱ्याकडून राष्ट्रांतील अंदाधुंदी व अस्वस्थता नाहींशी करून सर्वत्र स्थिरस्थावरता करण्यांत येते, व व्यवस्थित राज्यकारभार सुरू होतो. हा सर्वाधिकारी राष्ट्राचें गतवैभव प्राप्त करून घेणें, राष्ट्राची सर्वांगीण उन्नति करून राष्ट्र प्रबळ करणें हें उद्दिष्ट लोकांपुढें ठेवितो; त्यामुळें त्यास लोकांचें पाठबळ मिळतें. हा सर्वाधिकारी लोकांनीं निवडलेला नसला तरी त्यानें स्वत:कडे घेतलेल्या अधिकारास लोकांची अप्रत्यक्ष मान्यता असते, व त्याच्या व्यक्तिमत्वामुळें लोक भारून गेलेले असतात व त्याच्याकडे आकृष्ट होतात. लोकांस या सर्वाधिकाऱ्याबद्दल प्रेम, आदर व भीतीही वाटत असते. आपल्या हातीं सत्ता आली म्हणजे ती कायम टिकावी असें त्या सर्वाधिकाऱ्यास वाटूं लागतें; व त्यामुळें आपल्या राज्यकारभारासंबंधीं व धोरणासंबंधीं झालेली टीका त्यास आवडत नाहीं. त्यामुळें सर्वाधिकाऱ्याकडून लोकांचें व्यक्तिस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य व वृत्तपत्रस्वातंत्र्य यांवर नियंत्रण घालण्यांत येतें. यासाठीं गुप्त पोलीस व राष्ट्रांतील लष्करी संघटना यांची तो मदत घेतो. अशाप्रकारें सर्वाधिकाऱ्याकडून राष्ट्राचा कारभार व्यवस्थित रीतीनें होत असला, तरी कायदे करणें, राज्यकारभार करणें, धोरण ठरविणें या बाबतींत राष्ट्रांतील जनतेचा किंवा तिनें निवडून दिलेल्या प्रतिनिधींचा कांहींच भाग नसतो. सर्वाधिकाऱ्याचें धोरण व राज्यकारभार लोकांस पसंत नसला तरी जनतेस त्यास आपल्या अधिकारपदावरून दूर करतां येत नाहीं. सर्वाधिकारी पद्धतीच्या राज्यव्यवस्थेंत दोन प्रकार असतात व ते म्हणजे फॅसिस्ट पद्धत (नाझी पद्धत) व कम्युनिस्ट पद्धत हे होत. राष्ट्रांत निरनिराळे वर्ग

हे प्रदेश ब्रिटिशांना मिळाले. जर्मन नैर्ऋत्य आफ्रिका ही वसाहत ब्रिटिश दक्षिण आफ्रिका या स्वसत्ताक वसाहतीकडे देण्यांत आली. दक्षिण पॅसिफिक महासागरांतील जर्मन बेटें ब्रिटिश व ब्रिटिशांच्या आस्ट्रेलिया व न्यूझीलंड या वसाहतींकडे देण्यांत आलीं.

फ्रान्सला आफ्रिकेंतील टोगोलँड व कॅमरून्झ या प्रदेशाचा भाग मिळाला व आशियांतील सीरीया या प्रांताचें पालकत्व देण्यांत आलें. जपानला उत्तर पॅसिफिक महासागरांतील जर्मनीच्या ताब्यांतील बेटें मिळालीं. इटलीला ट्रेन्ट, ट्रेस्टि, व इस्ट्रिया हे युरोपमधील प्रदेश मिळाले.

नवीन राष्ट्रांची स्थापना—व्हर्सेल्सच्या तहानंतर जगाचा विशेषतः युरोपचा नकाशा चांमध्यें बराच बदल घडून आला. पूर्वीची हॅप्सबर्ग, रोमॅनॉफ व होहेनझोलार्न हीं प्रसिद्ध असलेलीं राजघराणीं नामशेष झालीं व स्वयंनिर्णय व लोकशाही या तत्त्वांनुसार ठिकठिकाणीं स्वतंत्र लोकसत्ताक राष्ट्रें निर्माण झालीं. हीं राष्ट्रें म्हणजे आस्ट्रिया, हंगेरी, झेकोस्लोव्हाकिया, युगोस्लाव्हिया, पोलंड, लिथुआनिया, लॅटव्हिया, एस्थोनिया, फिनलंड, तुर्कस्थान, स्पेन, इटली, जर्मनी, व रशिया वगैरे होत. हीं लोकसत्ताक राज्यें होतीं, तरी यांपैकीं कांहीं ठिकाणीं लोकशाही स्थापन करण्याचा प्रयत्न यशस्वी न होऊन तेथें सर्वाधिकारी पद्धतीची राज्यव्यवस्था स्थापन झाली.

(४) निरनिराळीं राजकीय तत्त्वें :—

लोकशाही (Democracy)—लोकशाही पद्धतीच्या राज्यघटनेंत राष्ट्रांतील बहुसंख्य लोकांस मताधिकार असून तो संपत्ति किंवा सामाजिक दर्जा यावर आधारलेला नसतो. लोकशाहीमध्यें सर्वांस व्यक्तिस्वातंत्र्य, मतस्वातंत्र्य, संघटनास्वातंत्र्य, वृत्तपत्रस्वातंत्र्य असतें. लोकशाही पद्धतीच्या राज्यव्यवस्थेंत तेथील राज्यकारभार लोकांस जबाबदार असलेल्या मंत्रिमंडळाकडून किंवा अध्यक्षाकडून केला जातो, व हें धोरण जनतेस पसंत नसलें, तर निवडणुकीच्या वेळीं आपणांस मान्य असलेल्या धोरणाच्या पक्षास मत देऊन तें मंत्रिमंडळ रद्द करणें जनतेच्या हातीं असतें; व ही गोष्ट शांततेनें घडून येते. लोकशाही पद्धतींत व्यक्तीसाठीं राष्ट्र असें मानलें जातें.

सर्वाधिकारी पद्धत—मोठमोठीं युद्धें झालीं, म्हणजे त्यासाठीं खूप खर्च

करावा लागतो, व त्यामुळें राष्ट्राची कर्जबाजारी व हलाखीची स्थिति होते. युद्धानंतर राष्ट्रांत अन्नधान्याचा दुष्काळ, जरूरीच्या वस्तुंची कमतरता, बेकारी वगैरे गोष्टी उत्पन्न होऊन त्यामुळें अस्वस्थता, अंदाधुंदी व दंगेधोपे होऊं लागतात. तेव्हां अशा स्थितीस कंटाळून सर्वत्र स्थिरस्थावरता व व्यवस्थित राज्यकारभार करण्यास कोणी पुढें आल्यास लोक त्यास या कामासाठीं राष्ट्रांतील सर्व सत्ता आपल्या हातीं घेऊं देण्यास तयार असतात. तेव्हां एखादा कर्तबगार, महत्त्वाकांक्षी, धूर्त गृहस्थ या परिस्थितीचा फायदा घेऊन आपणास पाठबळ देणारी एखादी लष्करी धर्तीची संघटना निर्माण करून राष्ट्रांतील सर्व सत्ता आपल्या हातीं घेतो. या गृहस्थास **सर्वाधिकारी** किंवा हुकूमशहा (Dictator) असें म्हणण्यांत येतें. या सर्वाधिकाऱ्याकडून राष्ट्रांतील अंदाधुंदी व अस्वस्थता नाहींशी करून सर्वत्र स्थिरस्थावरता करण्यांत येते, व व्यवस्थित राज्यकारभार सुरू होतो. हा सर्वाधिकारी राष्ट्राचें गतवैभव प्राप्त करून घेणें, राष्ट्राची सर्वांगीण उन्नति करून राष्ट्र प्रबळ करणें हें उद्दिष्ट लोकांपुढें ठेवितो; त्यामुळें त्यास लोकांचें पाठबळ मिळतें. हा सर्वाधिकारी लोकांनीं निवडलेला नसला तरी त्यानें स्वत:कडे घेतलेल्या अधिकारास लोकांची अप्रत्यक्ष मान्यता असते, व त्याच्या व्यक्तिमत्वामुळें लोक भारून गेलेले असतात व त्याच्याकडे आकृष्ट होतात. लोकांस या सर्वाधिकाऱ्याबद्दल प्रेम, आदर व भीतीही वाटत असते. आपल्या हातीं सत्ता आली म्हणजे ती कायम टिकावी असें त्या सर्वाधिकाऱ्यास वाटूं लागतें; व त्यामुळें आपल्या राज्यकारभारासंबंधीं व धोरणासंबंधीं झालेली टीका त्यास आवडत नाहीं. त्यामुळें सर्वाधिकाऱ्याकडून लोकांचें व्यक्तिस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य व वृत्तपत्रस्वातंत्र्य यांवर नियंत्रण घालण्यांत येतें. यासाठीं गुप्त पोलीस व राष्ट्रांतील लष्करी संघटना यांची तो मदत घेतो. अशाप्रकारें सर्वाधिकाऱ्याकडून राष्ट्राचा कारभार व्यवस्थित रीतीनें होत असला, तरी कायदे करणें, राज्यकारभार करणें, धोरण ठरविणें या बाबतींत राष्ट्रांतील जनतेचा किंवा तिनें निवडून दिलेल्या प्रतिनिधींचा कांहींच भाग नसतो. सर्वाधिकाऱ्याचें धोरण व राज्यकारभार लोकांस पसंत नसला तरी जनतेस त्यास आपल्या अधिकारपदावरून दूर करतां येत नाहीं. सर्वाधिकारी पद्धतीच्या राज्यव्यवस्थेंत दोन प्रकार असतात व ते म्हणजे फॅसिस्ट पद्धत (नाझी पद्धत) व कम्युनिस्ट पद्धत हे होत. राष्ट्रांत निरनिराळे वर्ग

असतात. यांपैकीं समाजांतील वरच्या, भांडवलवाल्या, खानदानी व सुखवस्तु वर्गांचें सर्वाधिकाऱ्यांस पाठबळ असलें म्हणजे त्या पद्धतीच्या राज्यव्यवस्थेस **फॅसिस्ट** पद्धत असें म्हणण्यांत येतें. समाजांतील खालचा म्हणजे कामकरी, मजूर, लहान शेतकरी या श्रमजीवी वर्गांचें (बहुजनसमाजाचें) सर्वाधिकाऱ्यास पाठबळ असलें व या वर्गांचेंच हित होईल असें धोरण त्याच्याकडून आंखलें गेलें म्हणजे त्या राज्यपद्धतीस 'कम्युनिस्ट पद्धत' असें म्हणण्यांत येतें. फॅसिस्ट व कम्युनिस्ट या दोन्हीं पद्धतींमध्यें व्यक्तीपेक्षां राष्ट्र महत्त्वाचें आहे व राष्ट्रासाठीं व्यक्ती आहेत असें मानलें जातें म्हणून त्यास सर्वाधिकारी पद्धत (Dictatorship, किंवा Totalitarian system) असें म्हणण्यांत येतें.

सर्वोदय समाज—लोकशाही पद्धतीमध्यें व्यक्ति महत्त्वाची आहे व व्यक्तीसाठीं राष्ट्र असें स्थूलमानानें मानलें जातें. तेव्हां राष्ट्रासाठीं व्यक्ति किंवा व्यक्तीसाठीं राष्ट्र व तें किती प्रमाणांत याचा झगडा सुरू होतो. सर्वोदय समाज या दोन्ही प्रवृत्तीमधील विरोध नाहींसा करून त्यांची सांगड घालून राष्ट्रांतील सर्वांचा उत्कर्ष व्हावा असा प्रयत्न करतो. महात्मा गांधींच्या मृत्यूनंतर त्यांच्या तत्त्वांवर ज्यांचा विश्वास होता अशा त्यांच्या अनुयायांनीं या दोन प्रवृत्तींची सांगड घालण्याच्या उद्देशानें आंतरराष्ट्रीय स्वरूपाचा व विधायक कार्य करणारा 'सर्वोदय समाज' स्थापन केला. जातिरहित व वर्गरहित समाज स्थापन करणें, व संघर्ष टाळून राष्ट्रांतील सर्व घटकांची व वर्गांची सर्वांगीण उन्नति करणें हें या सर्वोदय समाजाचें उद्दिष्ट आहे. संन्याशी व कर्मयोगी या दोन भिन्न वाटणाऱ्या वृत्तींचा मिलाफ करून अहिंसा मार्गानें जातिरहित व वर्गरहित समाजरचना स्थापन करावी असें यास वाटतें. हें उद्दिष्ट साध्य करण्यासाठीं जे उपाय योजावयाचे तेही चांगले असावयास पाहिजेत असें यास वाटतें.

सर्वाधिकारी पद्धतीचीं राष्ट्रें—पहिल्या महायुद्धानंतर रशिया, इटली, तुर्कस्थान, स्पेन व जर्मनी येथें लोकसत्ताक राज्यें स्थापन झालीं, पण तेथें लोकशाही पद्धतीची राज्यव्यवस्था अमलांत न येतां सर्वाधिकारी पद्धतीची राज्यव्यवस्था अमलांत आली.

(५) रशियांतील सोव्हिएट राज्य

(युनियन ऑफ सोव्हिएट सोशालिस्ट रिपब्लिक U. S. S. R.)

१९१७ ते १९५३

रशियांतील राज्यक्रान्ति १९१७—पहिलें महायुद्ध १९१४ मध्यें सुरू झालें. या युद्धामध्यें सुरुवातीस रशियास जय मिळाला, पण १९१५ नंतर रशियाचा ठिकाठिकाणीं पराभव होऊं लागला. त्यामुळें रशियांतील लष्करी अधिकाऱ्यांची नालायकी दृष्टोत्पत्तीस आली, त्याचप्रमाणें रशियाचा राज्यकारभार आंतून किडला गेल्याचें उघडकीला आलें. रशियाचा झार २ रा निकोलस याच्या हातीं अनियंत्रित सत्ता होती, तरी तो आपल्या लोभी, स्वार्थी व पाताळयंत्री सल्लागारांच्या व मंत्र्यांच्या तंत्रानें राज्यकारभार करीत असे. या सल्लागारांत रासपुतीन हा धर्माधिकारी प्रमुख असून त्यानें सर्वांस भारून टाकलेलें होतें. हा नीतिभ्रष्ट, लोभी, पाताळयंत्री व स्वार्थसाधु होता. त्याच्या सूचनेप्रमाणें राज्यकारभारांतील निरनिराळ्या अधिकाऱ्यांच्या जागांवर माणसें नेमलीं जात. हे अधिकारी लोभी, लांचलुचपतीस बळी पडणारे व जुलमी होते. त्यामुळें त्यांच्याबद्दल लोकांस तिरस्कार व द्वेष वाटे. सरतेशेवटीं राजपुतीन याचा सरदारवर्गांतील कांहीं लोकांनीं खून केला. तेव्हां झारनें अधिकच जुलमी मंत्री आपल्या मंत्रिमंडळांत नेमले. रशियामधील जनता अडाणी होती व शेंकडों वर्षें दडपली गेलेली असून झार, त्याचे जुलमी अधिकारी व मंत्री यांच्याकडून होणारा जुलूम, जबरदस्ती व अरेरावी मुकाट्यानें सहन करीत होती. शेतावर व इतरत्र श्रम करूनहि श्रमास योग्य मोबदला मिळत नसल्यामुळें त्यांची कर्जबाजारी स्थिति झाली होती. रशियामध्यें ड्यूमा सभा होती व तिनें या परिस्थितीबद्दल झार व त्याचें नालायक सल्लागार यांस जबाबदार धरून त्यांचा वारंवार निषेध केला व लोकांच्या विश्वासांतील पुढाऱ्यांस झारनें आपले मंत्री नेमावे अशा सूचना केल्या, पण झारनें तिकडे दुर्लक्ष केलें होतें. या ड्यूमा सभेंत '**सोशल डेमोक्रॅट**' हा एक समाजसत्तावादी पक्ष पुढें येऊन **निकोलस लेनिन** हा त्याचा पुढारी होता. पण झारच्या अधिकाऱ्यांकडून पकडले जाऊं नये म्हणून लेनिन यास देशत्याग करावा लागला. तेव्हां त्यानें युरोपमधील इतर देशांत राहून

असतात. यांपैकीं समाजांतील वरच्चा, भांडवलवाल्या, खानदानी व सुखवस्तु वर्गांचें सर्वाधिकाऱ्यांस पाठबळ असलें म्हणजे त्या पद्धतीच्या राज्यव्यवस्थेस **फॅसिस्ट** पद्धत असें म्हणण्यांत येतें. समाजांतील खालचा म्हणजे कामकरी, मजूर, लहान शेतकरी या श्रमजीवी वर्गांचें (बहुजनसमाजाचें) सर्वाधिकाऱ्यास पाठबळ असलें व या वर्गांचेंच हित होईल असें धोरण त्याच्याकडून आंखलें गेलें म्हणजे त्या राज्यपद्धतीस 'कम्युनिस्ट पद्धत' असें म्हणण्यांत येतें. फॅसिस्ट व कम्युनिस्ट या दोन्हीं पद्धतींमध्यें व्यक्तीपेक्षां राष्ट्र महत्त्वाचें आहे व राष्ट्रासाठीं व्यक्ती आहेत असें मानलें जातें म्हणून त्यास सर्वाधिकारी पद्धत (Dictatorship, किंवा Totalitarian system) असें म्हणण्यांत येतें.

सर्वोदय समाज—लोकशाही पद्धतीमध्यें व्यक्ति महत्त्वाची आहे व व्यक्तीसाठीं राष्ट्र असें स्थूलमानानें मानलें जातें. तेव्हां राष्ट्रासाठीं व्यक्ति किंवा व्यक्तीसाठीं राष्ट्र व तें किती प्रमाणांत याचा झगडा सुरू होतो. सर्वोदय समाज या दोन्ही प्रवृत्तींमधील विरोध नाहींसा करून त्यांची सांगड घालून राष्ट्रांतील सर्वांचा उत्कर्ष व्हावा असा प्रयत्न करतो. महात्मा गांधींच्या मृत्यूनंतर त्यांच्या तत्त्वांवर ज्यांचा विश्वास होता अशा त्यांच्या अनुयायांनीं या दोन प्रवृत्तींची सांगड घालण्याच्या उद्देशानें आंतरराष्ट्रीय स्वरूपाचा व विधायक कार्य करणारा 'सर्वोदय समाज' स्थापन केला. जातिरहित व वर्गरहित समाज स्थापन करणें, व संघर्ष टाळून राष्ट्रांतील सर्व घटकांची व वर्गांची सर्वांगीण उन्नति करणें हें या सर्वोदय समाजाचें उद्दिष्ट आहे. संन्याशी व कर्मयोगी या दोन भिन्न वाटणाऱ्या वृत्तींचा मिलाफ करून अहिंसा मार्गानें जातिरहित व वर्गरहित समाजरचना स्थापन करावी असें यास वाटतें. हें उद्दिष्ट साध्य करण्यासाठीं जे उपाय योजावयाचे तेही चांगले असावयास पाहिजेत असें यास वाटतें.

सर्वाधिकारी पद्धतीचीं राष्ट्रें—पहिल्या महायुद्धानंतर रशिया, इटली, तुर्कस्थान, स्पेन व जर्मनी येथें लोकसत्ताक राज्यें स्थापन झालीं, पण तेथें लोकशाही पद्धतीची राज्यव्यवस्था अमलांत न येतां सर्वाधिकारी पद्धतीची राज्यव्यवस्था अमलांत आली.

(५) रशियांतील सोव्हिएट राज्य

(युनियन ऑफ सोव्हिएट सोशालिस्ट रिपब्लिक U. S. S. R.)

१९१७ ते १९५३

रशियांतील राज्यक्रान्ति १९१७—पहिलें महायुद्ध १९१४ मध्यें सुरू झालें. या युद्धामध्यें सुरुवातीस रशियास जय मिळाला, पण १९१५ नंतर रशियाचा ठिकाठिकाणीं पराभव होऊं लागला. त्यामुळें रशियांतील लष्करी अधिकाऱ्यांची नालायकी दृष्टोत्पत्तीस आली, त्याचप्रमाणें रशियाचा राज्यकारभार आंतून किडला गेल्याचें उघडकीला आलें. रशियाचा झार २ रा निकोलस याच्या हातीं अनियंत्रित सत्ता होती, तरी तो आपल्या लोभी, स्वार्थी व पाताळयंत्री सल्लागारांच्या व मंत्र्यांच्या तंत्रानें राज्यकारभार करीत असे. या सल्लागारांत रासपुतीन हा धर्माधिकारी प्रमुख असून त्यानें सर्वांस भारून टाकलेलें होतें. हा नीतिभ्रष्ट, लोभी, पाताळयंत्री व स्वार्थसाधु होता. त्याच्या सूचनेप्रमाणें राज्यकारभारांतील निरनिराळ्या अधिकाऱ्यांच्या जागांवर माणसें नेमलीं जात. हे अधिकारी लोभी, लांचलुचपतीस बळी पडणारे व जुलमी होते. त्यामुळें त्यांच्याबद्दल लोकांस तिरस्कार व द्वेष वाटे. सरतेशेवटीं राजपुतीन याचा सरदारवर्गांतील कांहीं लोकांनीं खून केला. तेव्हां झारनें अधिकच जुलमी मंत्री आपल्या मंत्रिमंडळांत नेमले. रशियामधील जनता अडाणी होती व शेंकडों वर्षें दडपली गेलेली असून झार, त्याचे जुलमी अधिकारी व मंत्री यांच्याकडून होणारा जुलूम, जबरदस्ती व अरेरावी मुकाट्यानें सहन करीत होती. शेतावर व इतरत्र श्रम करूनहि श्रमास योग्य मोबदला मिळत नसल्यामुळें त्यांची कर्जबाजारी स्थिति झाली होती. रशियामध्यें ड्यूमा सभा होती व तिनें या परिस्थितीबद्दल झार व त्याचें नालायक सल्लागार यांस जबाबदार धरून त्यांचा वारंवार निषेध केला व लोकांच्या विश्वासांतील पुढाऱ्यांस झारनें आपले मंत्री नेमावे अशा सूचना केल्या, पण झारनें तिकडे दुर्लक्ष केलें होतें. या ड्यूमा सभेंत '**सोशल डेमोक्रॅट**' हा एक समाजसत्तावादी पक्ष पुढें येऊन **निकोलस लेनिन** हा त्याचा पुढारी होता. पण झारच्या अधिकाऱ्यांकडून पकडले जाऊं नये म्हणून लेनिन यास देशत्याग करावा लागला. तेव्हां त्यानें युरोपमधील इतर देशांत राहून

कार्ल मार्क्स याचें समाजसत्तावादी वाङ्मय आत्मसात् केलें व रशियांत राज्यक्रांति घडवून आणण्यासाठीं रशियांत व रशियाबाहेर गुप्त क्रांतिकारक मंडळें स्थापन केलीं. अशी स्थिति असतां १ लें महायुद्ध सुरू झालें. त्यांत रशियन सैन्याचा ठिकठिकाणीं पराभव झाला व १५ लाखांवर माणसें मृत्युमुखीं पडलीं व ५० लाखांवर जखमी झालीं, व त्यामुळें सर्वत्र हाहाकार पसरला. युद्धामुळें जीवनोपयोगी वस्तू महाग होऊन अन्नधान्य दुर्मिळ झाल्यामुळें लोकांची उपासमार झाली व त्यांची हलाखीची स्थिति झाली. रशियांतील झारची व त्याच्या जुलमी सल्लागारांची व अधिकाऱ्यांची सत्ता उधळून लावून रशियांत राज्यक्रांति घडवून आणण्यास ही अनकूल संधि आहे असें लेनिन व त्याचा सहकारी **ट्रॉटस्की** या सोशल डेमोक्रॅट पक्षाच्या क्रान्तिकारक पुढाऱ्यांस वाटूं लागलें. तेव्हां या पुढाऱ्यांच्या व त्यांनीं रशियामध्यें ठिकठिकाणीं स्थापन केलेल्या गुप्त क्रांतिकारक मंडळाच्या चिथावणीनें १९१७ च्या मार्चमध्यें पेट्रोग्राड हें राजधानीचें ठिकाण व इतर शहरें व उद्योगकेंद्रें या ठिकाणीं संप, दंगेधोपे व दंगल सुरू झाली व ती रशियांत सर्वत्र पसरून मोठेमोठे उमराव, सरदार, सरकारी अधिकारी यांच्यावर अत्याचार होऊं लागले व त्यांच्या घरादारांस आगी लागूं लागल्या. ही दंगल मोडण्यास रशियांतील सैनिक असमर्थ होते व त्यांपैकीं बऱ्याच सैनिकांस दडपल्या गेलेल्या रशियांतील जनतेबद्दल सहानुभूति वाटत होती. तेव्हां ही स्थिति सुधारण्यास काय करावें हें झार व त्याचे सल्लागार यांस सुचेना. तेव्हां आपण राज्यत्याग केल्यास ड्यूमा सभेंतील नेमस्त सोशल डेमोक्रॅट या पक्षाच्या हातीं सत्ता जाऊन त्यांस ही स्थिति सुधारतां येईल असें वाटून झार २ रा निकोलस यानें राज्यत्याग केला. तेव्हां रशियांत राज्यक्रान्ति होऊन (१९१७ मार्च) तेथील सत्ता ड्यूमा सभेंतील लायव्हॉफ व त्यानंतर **केरेन्स्की** या नेमस्त सोशल डेमोक्रॅट पक्षाच्या पुढाऱ्याकडे गेली. त्यास शत्रूशीं सुरू असलेलें युद्ध पुढें चालवावयाचें होतें. पण सोशल डेमोक्रॅट पक्षांतील लेनिनच्या नेतृत्वाखालील जहाल लोकांस हें धोरण पसंत नव्हतें. या जहाल पक्षाचें बहुमत होतें म्हणून त्यास बहुमतवाले किंवा **बाल्शव्हीकी** असें म्हणण्यांत येऊं लागलें. केरेन्स्की यानें सैन्याची जमवाजमव करून आस्ट्रियाविरुद्ध मोहीम करण्याचें ठरविलें, तेव्हां लेनिनच्या प्रोत्साहनानें रशियांत दंगल होऊन सैन्यांतही बंडाळी झाली, व क्रान्तिकारकांचा

पुढारी लेनिन याच्या हातीं सत्ता आली; व त्यानें रशियांत कामगारांचें राज्य स्थापन झाल्याचें जाहीर केलें (नोव्हें. १९१७).

रशियांत कम्युनिस्ट राज्य (१९१७ ते १९५३)— या काळांत रशियामधील सत्ता लेनिन (१९१७–१९२४), व स्टॅलिन (१९२४–५३) यांच्या हातीं होती. त्यांनीं रशियांतील राज्यपद्धत, सामाजिक व आर्थिक धोरण व तें साध्य करण्यासाठीं योजलेले उपाय यांमध्यें क्रान्तिकारक बदल केला व नवीन ध्येयें जनतेपुढें ठेविलीं. त्यामुळें रूढ असलेल्या राजकीय, सामाजिक व आर्थिक कल्पनांस धक्का दिल्यासारखें झालें.

लेनिन— लेनिन यानें रशियाच्या झारच्या अमदानींत रशियाला झालेलें कर्ज फेडण्यास आपण बांधलेलों नाहीं हें जाहीर करून तें रद्द केलें. त्यानें उत्पादनाचीं प्रमुख साधनें जमीन, खाणी, जंगलें, कारखाने, गिरण्या, रेल्वे रस्ते, बँका, यंत्रें या सरकारी मालकीच्या केल्या. जमीनी स्वतः कसणाऱ्या शेतकऱ्यांकडे जमीनी राहूं दिल्या, पण त्यावरील पूर्वीच्या मालकांचा मालकी हक्क रद्द केला. खाजगी मालमत्ता रद्द केली. प्रत्येकानें आपल्या शक्तीप्रमाणें संपत्ति उत्पादन करण्यांत श्रम करावेत व सामुदायिक उत्पादनांतून आपल्या जरूरीप्रमाणें वाटा उचलावा हें जाहीर केलें. शारीरिक कष्ट करणारांस मत देण्याचा अधिकार असून त्यांस राष्ट्राच्या राज्यकारभारांत भाग घेतां येईल हें जाहीर केलें. शारीरिक कष्ट करणारांस व बौद्धिक श्रम करणारांस सारखेंच वेतन देण्यांत येईल असें ठरविलें. अशारीतीनें शारीरिक कष्ट करणाऱ्या सर्व नागरिकांची राष्ट्राच्या उत्पादनावर समाधिक मालकी असावयाची म्हणून या राज्यपद्धतीस **' कम्युनिस्ट राज्य-पद्धत '** हें नांव रूढ झालें. या पद्धतींत राष्ट्रांतील सत्ता शारीरिक कष्ट करणाऱ्या कामगारांच्या हातांत होती, व त्याचें प्रतीक म्हणून राष्ट्राच्या लाल रंगाच्या ध्वजावर ' हातोडा व कोयता ' हें प्रतीक घालण्यांत आलें. राजधानी पेट्रोग्राडहून मास्को येथें नेण्यांत आली. पण या पद्धतीमध्यें जास्ती कष्ट करून मालाची जास्ती पैदास केल्यास ती सरकारजमा व्हावयाची असल्यामुळें अधिक कष्ट करण्यास लोकांना उत्साह वाटेनासा झाला, त्याचप्रमाणें कारखाने व गिरण्या यांतील यंत्रकलेची पूर्ण माहिती कामगारांना नसल्यामुळें कारखाने व गिरण्या यांमधून होणारें उत्पादन कमी येऊं लागलें. तेव्हां जास्ती कष्ट करण्यास लोकांस उत्तेजन मिळावें व उत्पादन वाढावें या हेतूनें लेनिननें नवीन आर्थिक

कार्ल मार्क्स याचें समाजसत्तावादी वाङ्मय आत्मसात् केलें व रशियांत राज्यक्रांति घडवून आणण्यासाठीं रशियांत व रशियाबाहेर गुप्त क्रांतिकारक मंडळें स्थापन केलीं. अशी स्थिति असतां १ लें महायुद्ध सुरू झालें. त्यांत रशियन सैन्याचा ठिकठिकाणीं पराभव झाला व १५ लाखांवर माणसें मृत्युमुखीं पडलीं व ५० लाखांवर जखमी झालीं, व त्यामुळें सर्वत्र हाहाकार पसरला. युद्धामुळें जीवनोपयोगी वस्तु महाग होऊन अन्नधान्य दुर्मिळ झाल्यामुळें लोकांची उपासमार झाली व त्यांची हलाखीची स्थिति झाली. रशियांतील झारची व त्याच्या जुलमी सल्लागारांची व अधिकाऱ्यांची सत्ता उधळून लावून रशियांत राज्यक्रांति घडवून आणण्यास ही अनकूल संधि आहे असें लेनिन व त्याचा सहकारी **ट्रॉटस्की** या सोशल डेमोक्रॅट पक्षाच्या क्रान्तिकारक पुढाऱ्यांस वाटूं लागलें. तेव्हां या पुढाऱ्यांच्या व त्यांनीं रशियामध्यें ठिकठिकाणीं स्थापन केलेल्या गुप्त क्रांतिकारक मंडळाच्या चिथावणीनें १९१७ च्या मार्चमध्यें पेट्रोग्राड हें राजधानीचें ठिकाण व इतर शहरें व उद्योगकेंद्रें या ठिकाणीं संप, दंगेधोपे व दंगल सुरू झाली व ती रशियांत सर्वत्र पसरून मोठेमोठे उमराव, सरदार, सरकारी अधिकारी यांच्यावर अत्याचार होऊं लागले व त्यांच्या घरादारांस आगी लागूं लागल्या. ही दंगल मोडण्यास रशियांतील सैनिक असमर्थ होते व त्यांपैकीं बऱ्याच सैनिकांस दडपल्या गेलेल्या रशियांतील जनतेबद्दल सहानुभूति वाटत होती. तेव्हां ही स्थिति सुधारण्यास काय करावें हें झार व त्याचे सल्लागार यांस सुचेना. तेव्हां आपण राज्यत्याग केल्यास ड्यूमा सभेंतील नेमस्त सोशल डेमोक्रॅट या पक्षाच्या हातीं सत्ता जाऊन त्यांस ही स्थिति सुधारतां येईल असें वाटून झार २ रा निकोलस यानें राज्यत्याग केला. तेव्हां रशियांत राज्यक्रान्ति होऊन (१९१७ मार्च) तेथील सत्ता ड्यूमा सभेंतील लायव्होफ व त्यानंतर **केरेन्स्की** या नेमस्त सोशल डेमोक्रॅट पक्षाच्या पुढाऱ्याकडे गेली. त्यास शत्रूशीं सुरू असलेलें युद्ध पुढें चालवावयाचें होतें. पण सोशल डेमोक्रॅट पक्षांतील लेनिनच्या नेतृत्वाखालील जहाल लोकांस हें धोरण पसंत नव्हतें. या जहाल पक्षाचें बहुमत होतें म्हणून त्यास बहुमतवाले किंवा **बाल्शव्हीकी** असें म्हणण्यांत येऊं लागलें. केरेन्स्की यानें सैन्याची जमवाजमव करून आस्ट्रियाविरुद्ध मोहीम करण्याचें ठरविलें, तेव्हां लेनिनच्या प्रोत्साहनानें रशियांत दंगल होऊन सैन्यांतही बंडाळी झाली, व क्रान्तिकारकांचा

पुढारी लेनिन याच्या हातीं सत्ता आली; व त्यानें रशियांत कामगारांचें राज्य स्थापन झाल्याचें जाहीर केलें (नोव्हें. १९१७).

रशियांत कम्युनिस्ट राज्य (१९१७ ते १९५३)— या काळांत रशियामधील सत्ता लेनिन (१९१७–१९२४), व स्टॅलिन (१९२४–५३) यांच्या हातीं होती. त्यांनीं रशियांतील राज्यपद्धत, सामाजिक व आर्थिक धोरण व तें साध्य करण्यासाठीं योजलेले उपाय यांमध्यें क्रान्तिकारक बदल केला व नवीन ध्येयें जनतेपुढें ठेविलीं. त्यामुळें रूढ असलेल्या राजकीय, सामाजिक व आर्थिक कल्पनांस धक्का दिल्यासारखें झालें.

लेनिन— लेनिन यानें रशियाच्या झारच्या अमदानींत रशियाला झालेलें कर्ज फेडण्यास आपण बांधलेलों नाहीं हें जाहीर करून तें रद्द केलें. त्यानें उत्पादनाचीं प्रमुख साधनें जमीन, खाणी, जंगलें, कारखाने, गिरण्या, रेल्वे रस्ते, बँका, यंत्रें या सरकारी मालकीच्या केल्या. जमीनी स्वत: कसणाऱ्या शेतकऱ्यांकडे जर्मानी राहूं दिल्या, पण त्यावरील पूर्वीच्या मालकांचा मालकी हक्क रद्द केला. खाजगी मालमत्ता रद्द केली. प्रत्येकानें आपल्या शक्तीप्रमाणें संपत्ति उत्पादन करण्यांत श्रम करावेत व सामुदायिक उत्पादनांतून आपल्या जरूरीप्रमाणें वाटा उचलावा हें जाहीर केलें. शारीरिक कष्ट करणारांस मत देण्याचा अधिकार असून त्यांस राष्ट्राच्या राज्यकारभारांत भाग घेतां येईल हें जाहीर केलें. शारीरिक कष्ट करणारांस व बौद्धिक श्रम करणारांस सारखेंच वेतन देण्यांत येईल असें ठरविलें. अशारीतीनें शारीरिक कष्ट करणाऱ्या सर्व नागरिकांची राष्ट्राच्या उत्पादनावर समायिक मालकी असावयाची म्हणून या राज्यपद्धतीस '**कम्युनिस्ट राज्य-पद्धत**' हें नांव रूढ झालें. या पद्धतींत राष्ट्रांतील सत्ता शारीरिक कष्ट करणाऱ्या कामगारांच्या हातांत होती, व त्याचें प्रतीक म्हणून राष्ट्राच्या लाल रंगाच्या ध्वजावर 'हातोडा व कोयता' हें प्रतीक घालण्यांत आलें. राजधानी पेट्रोग्राडहून मास्को येथें नेण्यांत आली. पण या पद्धतीमध्यें जास्ती कष्ट करून मालाची जास्ती पैदास केल्यास ती सरकारजमा व्हावयाची असल्यामुळें अधिक कष्ट करण्यास लोकांना उत्साह वाटेनासा झाला, त्याचप्रमाणें कारखाने व गिरण्या यांतील यंत्रकलेची पूर्ण माहिती कामगारांना नसल्यामुळें कारखाने व गिरण्या यांमधून होणारें उत्पादन कमी येऊं लागलें. तेव्हां जास्ती कष्ट करण्यास लोकांस उत्तेजन मिळावें व उत्पादन वाढावें या हेतूनें लेनिननें नवीन आर्थिक

धोरण अंमलांत आणून सरकारी देखरेखीखालीं लहान प्रमाणांत खाजगी मालमत्ता संपादन करणें, व उद्योगधंदे चालविणें यास मान्यता दिली. लेनिन यानें रशियामधील बहुजनसमाजास रशियांतील सर्व उत्पादनावर त्याची सामुदायिक मालकी आहे ही जाणीव करून देऊन शेंकडों वर्षे झारच्या जुलमी सत्तेखालीं दडपल्या गेलेल्या रशियांमधील लोकांत नवचैतन्य निर्माण केलें, म्हणून त्यास **'आधुनिक रशियाचा जनक'** असें मानण्यांत आलें. अशारीतीनें रशियाची नवनिर्मिति करीत असतां १९२४ मध्यें लेनिन मरण पावला. त्याची आठवण चिरकाल टिकावी म्हणून पेट्रोग्राड या शहरास **लेनिनग्राड** असें म्हणण्यांत येऊं लागलें.

सर्वाधिकारी स्टॅलिन—लेनिनच्या मृत्यूनंतर त्याचे प्रमुख अनुयायी ट्रॉटस्की व स्टॅलिन यांच्यामध्यें स्पर्धा सुरू झाली. ट्रॉटस्की व स्टॅलिन यांनीं रशियांत राज्यक्रान्ति घडवून आणण्यांत लेनिनला मदत केली होती. ट्रॉटस्की यानें लाल सैन्य उभारून कम्युनिस्ट रशियाचें परशत्रूपासून व अंतस्थ बंडाळीपासून संरक्षण केलें होतें. रशियांत झालेल्या क्रान्तीप्रमाणें जगांतील इतर देशांतही कामगारांनीं क्रान्ति घडवून आणून सत्ता आपल्या हातीं घ्यावी असें त्यास वाटत होतें. स्टॅलिन हा मितभाषणी पण कर्तृत्ववान् होता. तो कम्युनिस्ट पक्षाचा सेक्रेटरी जनरल होता. अशा रीतीनें या दोघा अनुयायांत चुरस असतां लेनिननंतर **स्टॅलिन** याची रशियाचा मुख्य प्रधान म्हणून नेमणूक झाली व त्याच्या ठिकाणीं रशियांतील सर्व सत्ता केंद्रित झाल्यामुळें तो **सर्वाधिकारी** झाला (१९२४).

रशियांत कम्युनिस्ट राजवट सुरू झाल्यावर जगांतील इतर प्रमुख राष्ट्रांनीं त्यास मान्यता दिली नव्हती, पण स्टॅलिन हा सर्वाधिकारी झाल्यावर ही स्थिति पालटली व ग्रेट ब्रिटनच्या मजूर मंत्रिमंडळानें १९२४ मध्यें कम्युनिस्ट रशियास मान्यता दिली, व नंतर इतर राष्ट्रांनींही मान्यता देऊन पुढें रशियास राष्ट्रसंघाचेंही सभासद करण्यांत आलें.

पंचवार्षिक योजना (१९२८–३३ व १९३३–३८). रशिया मागासलेला देश होता, व तो मुख्यतः शेतकीप्रधान होता. ही शेतीही जुन्या पद्धतीनें व जुन्या उपकरणांनीं केली जाई. रशिया हा देश औद्योगिक बाबतींत लवकर पुढें

यावा वगैरे जगांतील इतर राष्ट्रांत त्यास मानाचें स्थान मिळावें या उद्देशानें स्टॅलिन यानें दोन पंचवार्षिक योजना अमलांत आणल्या. या योजनेनें यांत्रिक पद्धतीनें मोठ्या प्रमाणांत शेती करणें, लोखंड, तेल व कोळसा यांच्या खाणी खोदणें, रेल्वे रस्ते बांधून दळणवळणाचीं साधनें वाढविणें, यंत्रसामुग्री निर्माण करणें, धरणें बांधून पाटबंधाऱ्यांची वाढ करणें, व पाण्याच्या शक्तीनें मोठ्या प्रमाणांत विजेचें उत्पादन करून तीं रशियांतील कारखान्यांस उपलब्ध करून देणें वगैरे गोष्टी करण्यांत आल्या. तसेंच त्यानें जरूर तेथें परकीय तज्ज्ञ बोलावून त्यांचा सल्ला व मार्गदर्शन मिळविलें, व परकीय भांडवल मिळवून त्याचाही उपयोग केला. तसेंच रशियांतील लोकांस यांत्रिक गोष्टींचें शिक्षण देण्यासाठीं शाळा व कॉलेजें काढलीं. त्यामुळें १० वर्षांत रशियांतील उद्योगधंद्यांची खूप वाढ होऊन पक्या मालाचें उत्पादन वाढलें व रशियाची जगांतील प्रमुख उद्योगप्रधान देशांमध्यें गणना होऊं लागली.

रशियांतील राज्यघटना व तेथील कम्युनिस्ट पक्ष— रशियाची पहिल्यानें १९२४ मध्यें राज्यघटना करण्यांत आली, पण पुढें त्यांत बदल करून १९३६ मध्यें दुसरी राज्यघटना करण्यांत आली. या घटनेप्रमाणें रशिया हें वेगवेगळ्या अनेक राज्यांचें मिळून बनलेलें एक संघराज्य आहे. पण या संघराज्यांत रशिया या एका घटक राज्यानें सुमारें $\frac{5}{6}$ एवढा मोठा प्रदेश व्यापला आहे. या संघराज्यास 'यूनियन ऑफ सोव्हिएट सोशालिस्ट रिपब्लिक्स (U. S. S. R.) (समाजसत्तावादी लोकसत्ताक राज्यांचें संघ राज्य) असें म्हणण्यांत येतें. मध्यवर्ती सरकारकडे संरक्षण, परराष्ट्रीय व अंतर्गत व्यापार, परराष्ट्रीय संबंध, दळणवळण, पैशाचा व्यवहार, बँका, फौजदारी व दिवाणी कर्जे वगैरे बाबी असून बाकीच्या घटक राज्याकडे आहेत.

सुप्रीम कौन्सिल हें संघराज्याचें सर्वांत श्रेष्ठ असें कायदेमंडळ असून याचे कौन्सिल ऑफ युनिअन व कौन्सिल ऑफ नॅशनॅलिटीज असे विभाग आहेत. 'कौन्सिल ऑफ यूनिअन 'मध्यें सर्व संघराज्यांतील प्रतिनिधी येतात. व कौन्सिल ऑफ नॅशनॅलिटीज यामध्यें घटक राज्यांचे प्रतिनिधी असतात. या सुप्रीम कौन्सिलची जोड बैठक वर्षांतून दोनदां भरते. या सुप्रीम कौन्सिलकडून **प्रेसिडियम** (सुमारें २० सभासदांचे), **कौन्सिल ऑफ पीपल्स कमिशनर्स** व **सुप्रीम कोर्ट** हीं तीन मंडळें नेमण्यांत येतात. सुप्रीम कौन्सिलची बैठक नसली

म्हणजे तिचें काम प्रेसिडियमकडून करण्यांत येतें व या मंडळाच्या अध्यक्षास **'राष्ट्राचा अध्यक्ष'** असें म्हणण्यांत येतें. कौन्सिल ऑफ पीपल्स कमिशनर्स हें राज्यकारभार करणारें मंत्रिमंडळ किंवा कॅबिनेट होय. व त्यांच्याकडे वेगवेगळीं खातीं दिलेलीं असतात. या मंडळाच्या अध्यक्षास **प्रीमिअर** किंवा 'मुख्य प्रधान' म्हणण्यांत येतें. स्टॅलिन हा असा प्रिमिअर होता. राशियाच्या राज्यकारभाराचा सर्व अधिकार याच्यामध्यें केंद्रित झाल्यामुळें व इतर कमिशनर्स (मंत्री) यास जबाबदार असल्यामुळें यास सर्वाधिकारी म्हणण्यांत येतें. सुप्रीम कोर्टाकडे न्यायाचें काम सोंपविलेलें आहे. कौन्सिल ऑफ दी यूनिअन व कौन्सिल ऑफ दी नॅशनॅलिटीज यांतील सभासदांच्या निवडणुकी ठिकठिकाणच्या स्थानिक सोव्हिएट (मंडळ) यांमार्फत होतात. यांत मताधिकार पूर्वी शारीरिक कष्ट करणाऱ्यांसच होता, पण १९३६ च्या घटनेप्रमाणें तो सर्वांस देण्यांत आलेला आहे.

कम्युनिस्ट पक्ष व त्याची घटना–राशियांत कम्युनिस्ट हा एकच राजकीय पक्ष आहे. ठिकठिकाणच्या स्थानिक सोव्हिएट (मंडळ) मंडळांमार्फत 'ऑल यूनिअन काँग्रेस' या सभेंतील सभासद निवडले जातात. यांतील सभासद एक 'सेंट्रल कमिटी' नेमते. ही सेंट्रल कमेटी पक्षाच्या निरनिराळ्या कामासाठीं वेगवेगळ्या कमेट्या नेमते. यापैकीं प्रमुख व महत्त्वाची कमिटी म्हणजे **'पोलिट-ब्यूरो'** ही असून ती कार्यकारी कमिटी होय, व ती विशेषत: राजकीय प्रश्नासंबंधीं काम पहाते. या कमिटीच्या अध्यक्षास **सेक्रेटरी जनरल** असें म्हणण्यांत येतें. लेनिन हा प्रीमीयर किंवा सर्वाधिकारी असतांना स्टॅलिन हा सेक्रेटरी जनरल होता.

घटनेमध्यें लोकांस भाषणस्वातंत्र्य, वृत्तपत्रस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य व संघटनास्वातंत्र्य आहे, व न्यायकोर्टामध्यें आरोप शाबीत झाल्याशिवाय कोणास अटकेंत ठेवण्यांत येऊं नये असे हक्क ग्रथित केलेले आहेत. पण सरकारविरुद्ध मतप्रदर्शन करण्यास तेथील लोकांस वेगळा राजकीय पक्ष काढतां येत नाहीं, व सरकारी धोरणाविरुद्ध व्याख्यानांत किंवा वृत्तपत्रांत टीका झाल्यास अटकेंत ठेवण्यांत येतें असें म्हणतात. अशाप्रकारें राजकीय बाबतींत रशियांतील जनतेस स्वातंत्र्य नाहीं तरी तेथील सरकारनें कामगार व सर्वसामान्य जनता यांच्यासाठीं आरोग्यकारक घरें बांधणें व ती अल्प भाड्यांत पुरविणें, कामगारांचा विमा उतरणें, जरूरीच्या व जीवनास उपयोगी अशा वस्तू स्वस्त व ठराविक किंमतींत पुरविणें, गिरण्या व

कारखाने येथें विश्रांति, करमणूक वगैरे सुखसोयी उपलब्ध करून देणें, सामुदायिक शेती करण्यास उत्तेजन देणें, वगैरे बऱ्याच उपयुक्त गोष्टी करून कामकरी व बहुजनसमाजाच्या राहणीचें मान वाढविलें आहे.

१९३९ मध्यें २ रें महायुद्ध सुरू होऊन ते १९४५ पर्यंत टिकलें. या युद्धांत सोव्हिएट रशियानें ग्रेट ब्रिटन, फ्रान्स वगैरे राष्ट्रांच्या बाजूनें जर्मनी, इटली व जपान या राष्ट्रांविरुद्ध भाग घेतला, व युद्ध संपण्याच्या सुमारास संयुक्त राष्ट्रसंघटना ही संस्था काढण्याच्या कामीं भाग घेतला. स्टॅलिन हा १९५३ मध्यें मरण पावला. त्यानंतर मॅलेक्कॉव्ह हा प्रीमियर (सर्वाधिकारी) झाला व सध्यां बुल्गेनीन हा प्रीमियर आहे व **क्रुश्चेव्ह** हा कम्युनिस्ट पक्षाचा सेक्रेटरी जनरल आहे.

---

(६) इटली व तेथील फॅसिस्ट राज्य

(१९१९ ते १९३९)

इटलींत फॅसिस्ट संघटना—१ ल्या महायुद्धांत इटलीनें ग्रेट ब्रिटनच्या बाजूनें भाग घेऊन विजय मिळविला होता, तरी युद्धानंतरच्या तहानें इटलीच्या अपेक्षेप्रमाणें इटलीस फायदा झाला नाहीं. इटलीचें कर्जही बरेंच वाढलें. शेती, उद्योगधंदे, व्यापार बंद पडून बेकारी उत्पन्न झाली व इटलीची हलाखीची स्थिति झाली. त्यामुळें राष्ट्रांत सर्वत्र अंदाधुंदी व अस्वस्थता झाली. या सर्व परिस्थितीस सरकार जबाबदार आहे म्हणून सरकारवर कडक टीका होऊं लागली. राष्ट्रांत प्रबल असा कोणताच राजकीय पक्ष नव्हता. या परिस्थितीमुळें कम्युनिस्ट विचारांचा राष्ट्रांत फैलाव होऊं लागला, व या विचाराच्या लोकांकडून संप, दंगेधोपे व घातपातीं कृत्यें होऊं लागलीं. पण त्यांचा बंदोबस्त करण्यास सरकार असमर्थ होतें. अशी परिस्थिति असतां **बेनिटो मुसलोनी** या एका उत्साही गृहस्थानें पूर्वी सैन्यांत काम केलेल्या सैनिकांचें मंडळ काढलें. यांमध्यें माजी सैनिक, बेकार असलेले बरेच लोक मिळाले. या लोकांची मुसलोनीनें स्वयंसेवक सेना तयार केली व त्यास लष्करी शिक्षण दिलें (१९२१). या सेनेचा काळा शर्ट हा गणवेष ठरविला. या संघटनेस त्यानें **फॅसिस्ट** संघटना (Fascist) हें नांव दिलें. फॅसिस्ट याचा अर्थ लढवय्या संघ हा आहे.

म्हणजे तिचें काम प्रेसिडियमकडून करण्यांत येतें व या मंडळाच्या अध्यक्षास **'राष्ट्राचा अध्यक्ष'** असें म्हणण्यांत येतें. कौन्सिल ऑफ पीपल्स कमिशनर्स हें राज्यकारभार करणारें मंत्रिमंडळ किंवा कॅबिनेट होय. व त्यांच्याकडे वेगवेगळीं खातीं दिलेलीं असतात. या मंडळाच्या अध्यक्षास **प्रीमिअर** किंवा 'मुख्य प्रधान' म्हणण्यांत येतें. स्टॅलिन हा असा प्रिमिअर होता. रशियाच्या राज्यकारभाराचा सर्व अधिकार याच्यामध्यें केंद्रित झाल्यामुळें व इतर कमिशनर्स (मंत्री) यास जबाबदार असल्यामुळें यास सर्वाधिकारी म्हणण्यांत येतें. सुप्रीम कोर्टाकडे न्यायाचें काम सोंपविलेलें आहे. कौन्सिल ऑफ दी यूनिअन व कौन्सिल ऑफ दी नॅशनॅलिटीज यांतील सभासदांच्या निवडणुकी ठिकठिकाणच्या स्थानिक सोव्हिएट (मंडळ) यांमार्फत होतात. यांत मताधिकार पूर्वी शारीरिक कष्ट करणाऱ्यांसच होता, पण १९३६ च्या घटनेप्रमाणें तो सर्वांस देण्यांत आलेला आहे.

कम्युनिस्ट पक्ष व त्याची घटना–रशियांत कम्युनिस्ट हा एकच राजकीय पक्ष आहे. ठिकठिकाणच्या स्थानिक सोव्हिएट (मंडळ) मंडळांमार्फत 'ऑल यूनिअन काँग्रेस' या सभेंतील सभासद निवडले जातात. यांतील सभासद एक 'सेंट्रल कमिटी' नेमते. ही सेंट्रल कमेटी पक्षाच्या निरनिराळ्या कामासाठीं वेगवेगळ्या कमेट्या नेमते. यापैकीं प्रमुख व महत्त्वाची कमिटी म्हणजे **'पोलिट-ब्यूरो'** ही असून ती कार्यकारी कमिटी होय, व ती विशेषत: राजकीय प्रश्नासंबंधीं काम पहाते. या कमिटीच्या अध्यक्षास **सेक्रेटरी जनरल** असें म्हणण्यांत येतें. लेनिन हा प्रीमीयर किंवा सर्वाधिकारी असतांना स्टॅलिन हा सेक्रेटरी जनरल होता.

घटनेमध्यें लोकांस भाषणस्वातंत्र्य, वृत्तपत्रस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य व संघटना-स्वातंत्र्य आहे, व न्यायकोर्टामध्यें आरोप शाबीत झाल्याशिवाय कोणास अटकेंत ठेवण्यांत येऊं नये असे हक्क ग्रथित केलेले आहेत. पण सरकारविरुद्ध मतप्रदर्शन करण्यास तेथील लोकांस वेगळा राजकीय पक्ष काढतां येत नाहीं, व सरकारी धोरणाविरुद्ध व्याख्यानांत किंवा वृत्तपत्रांत टीका झाल्यास अटकेंत ठेवण्यांत येतें असें म्हणतात. अशाप्रकारें राजकीय बाबतींत रशियांतील जनतेस स्वातंत्र्य नाहीं तरी तेथील सरकारनें कामगार व सर्वसामान्य जनता यांच्यासाठीं आरोग्यकारक घरें बांधणें व ती अल्प भाड्यांत पुरविणें, कामगारांचा विमा उतरणें, जरूरीच्या व जीवनास उपयोगी अशा वस्तू स्वस्त व ठराविक किंमतींत पुरविणें, गिरण्या व

कारखाने येथें विश्रांति, करमणूक वगैरे सुखसोयी उपलब्ध करून देणें, सामुदायिक शेती करण्यास उत्तेजन देणें, वगैरे बऱ्याच उपयुक्त गोष्टी करून कामकरी व बहुजनसमाजाच्या राहणीचें मान वाढविलें आहे.

१९३९ मध्यें २ रें महायुद्ध सुरू होऊन ते १९४५ पर्यंत टिकलें. या युद्धांत सोव्हिएट रशियानें ग्रेट ब्रिटन, फ्रान्स वगैरे राष्ट्रांच्या बाजूनें जर्मनी, इटली व जपान या राष्ट्रांविरुद्ध भाग घेतला, व युद्ध संपण्याच्या सुमारास संयुक्त राष्ट्रसंघटना ही संस्था काढण्याच्या कामीं भाग घेतला. स्टॅलिन हा १९५३ मध्यें मरण पावला. त्यानंतर मॅलेंकॉव्ह हा प्रीमियर (सर्वाधिकारी) झाला व सध्यां बुल्गेनीन हा प्रीमियर आहे व **क्रुश्चेव्ह** हा कम्युनिस्ट पक्षाचा सेक्रेटरी जनरल आहे.

---

(६) इटली व तेथील फॅसिस्ट राज्य

(१९१९ ते १९३९)

इटलींत फॅसिस्ट संघटना—१ ल्या महायुद्धांत इटलीनें ग्रेट ब्रिटनच्या बाजूनें भाग घेऊन विजय मिळविला होता, तरी युद्धानंतरच्या तहानें इटलीच्या अपेक्षेप्रमाणें इटलीस फायदा झाला नाहीं. इटलीचें कर्जही बरेंच वाढलें. शेती, उद्योगधंदे, व्यापार बंद पडून बेकारी उत्पन्न झाली व इटलीची हलाखीची स्थिति झाली. त्यामुळें राष्ट्रांत सर्वत्र अंदाधुंदी व अस्वस्थता झाली. या सर्व परिस्थितीस सरकार जबाबदार आहे म्हणून सरकारवर कडक टीका होऊं लागली. राष्ट्रांत प्रबल असा कोणताच राजकीय पक्ष नव्हता. या परिस्थितीमुळें कम्युनिस्ट विचारांचा राष्ट्रांत फैलाव होऊं लागला, व या विचाराच्या लोकांकडून संप, दंगेधोपे व घातपातीं रुत्यें होऊं लागलीं. पण त्यांचा बंदोबस्त करण्यास सरकार असमर्थ होतें. अशी परिस्थिति असतां **बेनिटो मुसलोनी** या एका उत्साही गृहस्थानें पूर्वी सैन्यांत काम केलेल्या सैनिकांचें मंडळ काढलें. यांमध्यें माजी सैनिक, बेकार असलेले बरेच लोक मिळाले. या लोकांची मुसलोनीं यानें स्वयंसेवक सेना तयार केली व त्यास लष्करी शिक्षण दिलें (१९२१). या सेनेचा काळा शर्ट हा गणवेष ठरविला. या संघटनेस त्यानें **फॅसिस्ट** संघटना (Fascist) हें नांव दिलें. फॅसिस्ट याचा अर्थ लढवय्या संघ हा आहे.

या संघटनेमार्फत कम्युनिस्ट विचारांच्या लोकांच्या दंगलीचा मोड करण्याचें त्यानें योजलें. इटलींतील संपत्तिमान् व मालमत्ता असणाऱ्या लोकांस राष्ट्रांतील अंदाधुंदी व गुंडगिरी बंद व्हावी असें वाटत होतें व त्यामुळें त्यांचा या फॅसिस्ट संघटनेस पाठिंबा मिळूं लागला. या संघटनेनें राज्यकारभारांत भाग घेण्याचें योजलें. १९२१ मध्यें इटलीच्या कायदेमंडळांत या फॅसिस्ट संघटनेचे ३५ सभासद् निवडून आले. तसेंच या संघटनेंत बरेच लोक सामील झाल्यामुळें ही संघटना प्रबळ होत गेली व तिच्या शाखा इटलीमध्यें सर्वत्र पसरल्या. इटलीच्या कायदेमंडळांत कोणताही पक्ष विशेष प्रबल नसल्यामुळें तेथें सांमिश्र मंत्रिमंडळ स्थापन होई व तें कमकुवत असें. तेव्हां आपण आपल्या प्रबळ झालेल्या फॅसिस्ट संघटनेच्या जोरावर इटलीमधील सत्ता काबीज करावी असें मुसलोनीनें योजलें. आक्टोबर १९२२ मध्यें देशांतील सर्व शाखांच्या फॅसिस्ट संघटनेमार्फत रोमवर एक मोठा मोर्चा नेऊन इटलीच्या राजाची मुलाखत घेण्याचें मुसलोनी यानें योजलें, व हा मोर्चा नेला. या मोर्चाच्या वेळीं फॅसिस्ट संघटनेची शिस्त, त्यास मिळणारा लोकांचा पाठिंबा वगैरे गोष्टी इटलीच्या राजाच्या दृष्टोत्पत्तीस आल्या व इटलीमधील अंदाधुंदी नाहींशी करून सर्वत्र स्थिरस्थावरता करण्यास मुसलोनी समर्थ होईल असें वाटून त्यानें मुसलोनीस **मुख्य प्रधान** नेमलें; व त्यास मंत्रिमंडळ बनविण्यास सांगितलें. त्याप्रमाणें मुसलोनीनें मंत्रिमंडळ बनविलें व आपल्या हातांत सत्ता घेतली.

मुसलोनी इटलीचा सर्वाधिकारी—कम्युनिस्ट विचारांमुळें होणारे संप व दंगली बंद करून इटलीमध्यें सुव्यवस्थित कारभार सुरू करणें व इटलीला आपलें गतवैभव प्राप्त करून देणें हें आपलें उद्दिष्ट त्यानें जनतेपुढें मांडलें. याचा परिणाम होऊन इटलीच्या पार्लमेंटनें मुसलोनीस सर्वाधिकार दिले. मुसलोनी हा चांगला वक्ता होता व त्याच्या व्यक्तिमत्वामुळें लोक त्याच्याकडे आकृष्ट झाले. तो राष्ट्राचा प्रमुख झाला व त्यामुळें लष्कराचाही प्रमुख झाला. आपल्या हातांत सत्ता आल्यावर राज्यकारभारांतील प्रत्येक खात्यांतील महत्त्वाच्या जागांवर त्यानें आपल्या फॅसिस्ट संघटनेंतील माणसें नेमिलीं. १९२५–२८ च्या दरम्यान पार्लमेंटमध्यें फॅसिस्ट पक्षाचें बहुमत झाल्यावर त्यानें इटलीमधील इतर पक्ष नामशेष करून टाकण्याचें ठरविलें. यासाठीं त्यानें इटली-मधील सर्व सत्ता आपल्या हातीं घेतली. तो इटलीच्या पार्लमेंटला जबाबदार

नसून इटलीच्या राजालाच जबाबदार होता, पण त्यास विरोध करण्याचें सामर्थ्य इटलीच्या राजांत नव्हतें, कारण तसें करण्याचा त्यानें प्रयत्न केल्यास इटलीची राजसत्ताच नाहींशी करण्याचा मुसलोनीचा विचार होता. तेव्हां तो इटलीचा **सर्वाधिकारी** (Dictator) झाला. यानंतर त्यानें सरकारी धोरणावर टीका करणारीं वृत्तपत्रें बंद केलीं. फॅसिस्ट पक्षाखेरीज इतर सर्व राजकीय पक्ष बंद केले. मुसलोनीनें आपल्या अंकित असलेल्या पार्लमेंटकडून आपण काढलेल्या बहुतेक हुकमांस कायद्याप्रमाणें मान्यता मिळविली.

त्यानें सरकारी खर्चांत काटकसर करून उत्पन्न वाढविलें. कामगारांच्या वरचेवर होणाऱ्या संपामुळें, तसेंच गिरणी व कारखाने यांच्या मालकांनीं गिरण्या व कारखाने बंद करून कामगारांना बेकार करणें या गोष्टींमुळें उत्पादन कमी होतें व देशांत अस्वस्थता माजते म्हणून मजुरांनीं संप करणें व गिरणी मालकांनीं गिरण्या व कारखाने बंद ठेवणें या गोष्टी त्यानें बेकायदेशीर ठरविल्या व त्यांस बंदी घातली. मजूर व कामगार यांचे संघ बेकायदेशीर ठरवून ते रद्द केले. १९२६ मध्यें त्यानें निरनिराळ्या उद्योगधंद्यांचीं सिंडीकेटस (मंडळें) स्थापन केलीं. त्यांत कारखाने व गिरण्या यांच्या मालकांचे प्रतिनिधी, त्याचप्रमाणें मजूर व कामगार यांचे प्रतिनिधी यावयाचे असून त्यांनीं सरकारी अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली मजूर व कामगार यांचें वेतन, कामाचे तास, सुट्टीचे दिवस व मजूर व कारखानदार यांच्या हितसंबंधाचे नियम करावेत, वगैरे कामगिरी सोपविली. त्यामुळें राष्ट्रांतील निरनिराळे उद्योगधंदे व्यवस्थितरीतीनें चालूं राहून राष्ट्रांतील उत्पादन वाढलें.

इटलीचे प्रादेशिक विभाग पाडून तेथून निवडून आलेल्यांची चेंबर ऑफ डेप्युटीज ही पार्लमेंटमधील सभा होती, त्याऐवजीं त्यानें राष्ट्रांतील उद्योगधंद्यांचे २१ गट करून त्यांमधून निवडलेल्या लोकांचें एक फॅसिस्ट ग्रँड कौंसिल हें मंडळ बनविलें. मुसलोनीच्या धोरणामुळें औद्योगिक बाबतींत बरींच प्रगति झाली. ठिकठिकाणीं नवीन रेल्वे रस्ते बांधण्यांत आले, पडीक जमीनी लागवडीस आणण्यांत आल्या, जहाजें बांधण्याचे कारखाने, मोटारींचे कारखाने सुरू झाले व इटलीचा व्यापार बराच वाढला व इटली हें सरकारी नियंत्रणाखालीं चालणारें उद्योगधंदे व कारखाने यांचें एक मोठें कॉर्पोरेशन बनल्यासारखें झालें. देशांतील

या संघटनेमार्फत कम्युनिस्ट विचारांच्या लोकांच्या दंगलीचा मोड करण्याचें त्यानें योजलें. इटलींतील संपत्तिमान् व मालमत्ता असणाऱ्या लोकांस राष्ट्रांतील अंदाधुंदी व गुंडगिरी बंद व्हावी असें वाटत होतें व त्यामुळें त्यांचा या फॅसिस्ट संघटनेस पाठिंबा मिळूं लागला. या संघटनेनें राज्यकारभारांत भाग घेण्याचें योजलें. १९२१ मध्यें इटलीच्या कायदेमंडळांत या फॅसिस्ट संघटनेचे ३५ सभासद निवडून आले. तसेंच या संघटनेंत बरेच लोक सामील झाल्यामुळें ही संघटना प्रबळ होत गेली व तिच्या शाखा इटलीमध्यें सर्वत्र पसरल्या. इटलीच्या कायदेमंडळांत कोणताही पक्ष विशेष प्रबल नसल्यामुळें तेथें संमिश्र मंत्रिमंडळ स्थापन होई व तें कमकुवत असें. तेव्हां आपण आपल्या प्रबळ झालेल्या फॅसिस्ट संघटनेच्या जोरावर इटलीमधील सत्ता काबीज करावी असें मुसलोनीनें योजलें. आक्टोबर १९२२ मध्यें देशांतील सर्व शाखांच्या फॅसिस्ट संघटनेमार्फत रोमवर एक मोठा मोर्चा नेऊन इटलीच्या राजाची मुलाखत घेण्याचें मुसलोनी यानें योजलें, व हा मोर्चा नेला. या मोर्चाच्या वेळीं फॅसिस्ट संघटनेची शिस्त, त्यास मिळणारा लोकांचा पाठिंबा वगैरे गोष्टी इटलीच्या राजाच्या दृष्टोत्पत्तीस आल्या व इटलीमधील अंदाधुंदी नाहींशी करून सर्वत्र स्थिरस्थावरता करण्यास मुसलोनी समर्थ होईल असें वाटून त्यानें मुसलोनीस **मुख्य प्रधान** नेमलें; व त्यास मंत्रिमंडळ बनविण्यास सांगितलें. त्याप्रमाणें मुसलोनीनें मंत्रिमंडळ बनविलें व आपल्या हातांत सत्ता घेतली.

मुसलोनी इटलीचा सर्वाधिकारी—कम्युनिस्ट विचारांमुळें होणारे संप व दंगली बंद करून इटलीमध्यें सुव्यवस्थित कारभार सुरू करणें व इटलीला आपलें गतवैभव प्राप्त करून देणें हें आपलें उद्दिष्ट त्यानें जनतेपुढें मांडलें. याचा परिणाम होऊन इटलीच्या पार्लमेंटनें मुसलोनीस सर्वाधिकार दिले. मुसलोनी हा चांगला वक्ता होता व त्याच्या व्यक्तिमत्वामुळें लोक त्याच्याकडे आकृष्ट झाले. तो राष्ट्राचा प्रमुख झाला व त्यामुळें लष्कराचाही प्रमुख झाला. आपल्या हातांत सत्ता आल्यावर राज्यकारभारांतील प्रत्येक खात्यांतील महत्त्वाच्या जागांवर त्यानें आपल्या फॅसिस्ट संघटनेंतील माणसें नेमिलीं. १९२५-२८ च्या दरम्यान पार्लमेंटमध्यें फॅसिस्ट पक्षाचें बहुमत झाल्यावर त्यानें इटलीमधील इतर पक्ष नामशेष करून टाकण्याचें ठरविलें. यासाठीं त्यानें इटलीमधील सर्व सत्ता आपल्या हातीं घेतली. तो इटलीच्या पार्लमेंटला जबाबदार

नसून इटलीच्या राजालाच जबाबदार होता, पण त्यास विरोध करण्याचें सामर्थ्य इटलीच्या राजांत नव्हतें, कारण तसें करण्याचा त्यानें प्रयत्न केल्यास इटलीची राजसत्ताच नाहींशी करण्याचा मुसलोनीचा विचार होता. तेव्हां तो इटलीचा **सर्वाधिकारी** (Dictator) झाला. यानंतर त्यानें सरकारी धोरणावर टीका करणारीं वृत्तपत्रें बंद केलीं. फॅसिस्ट पक्षाखेरीज इतर सर्व राजकीय पक्ष बंद केले. मुसलोनीनें आपल्या अंकित असलेल्या पार्लमेंटकडून आपण काढलेल्या वटहुकमांस कायद्याप्रमाणें मान्यता मिळविली.

त्यानें सरकारी खर्चांत काटकसर करून उत्पन्न वाढविलें. कामगारांच्या वरचेवर होणाऱ्या संपामुळें, तसेंच गिरणी व कारखाने यांच्या मालकांनीं गिरण्या व कारखाने बंद करून कामगारांना बेकार करणें या गोष्टींमुळें उत्पादन कमी होतें व देशांत अस्वस्थता माजते म्हणून मजुरांनीं संप करणें व गिरणी मालकांनीं गिरण्या व कारखाने बंद ठेवणें या गोष्टी त्यानें बेकायदेशीर ठरविल्या व त्यांस बंदी घातली. मजूर व कामगार यांचे संघ बेकायदेशीर ठरवून ते रद्द केले. १९२६ मध्यें त्यानें निरनिराळ्या उद्योगधंद्यांचीं सिंडीकेटस (मंडळें) स्थापन केलीं. त्यांत कारखाने व गिरण्या यांच्या मालकांचे प्रतिनिधी, त्याचप्रमाणें मजूर व कामगार यांचे प्रतिनिधी यावयाचे असून त्यांनीं सरकारी अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली मजूर व कामगार यांचें वेतन, कामाचे तास, सुट्टीचे दिवस व मजूर व कारखानदार यांच्या हितसंबंधाचे नियम करावेत, वगैरे कामगिरी सोपविली. त्यामुळें राष्ट्रांतील निरनिराळे उद्योगधंदे व्यवस्थितरीतीनें चालूं राहून राष्ट्रांतील उत्पादन वाढलें.

इटलीचे प्रादेशिक विभाग पाडून तेथून निवडून आलेल्यांची चेंबर ऑफ डेप्युटीज ही पार्लमेंटमधील सभा होती, त्याऐवजीं त्यानें राष्ट्रांतील उद्योगधंद्यांचे २१ गट करून त्यांमधून निवडलेल्या लोकांचें एक फॅसिस्ट ग्रँड कौंसिल हें मंडळ बनविलें. मुसलोनीच्या धोरणामुळें औद्योगिक बाबतींत बरींच प्रगति झाली. ठिकठिकाणीं नवीन रेल्वे रस्ते बांधण्यांत आले, पडीक जमीनी लागवडीस आणण्यांत आल्या, जहाजें बांधण्याचे कारखाने, मोटारींचे कारखाने सुरू झाले व इटलीचा व्यापार बराच वाढला व इटली हें सरकारी नियंत्रणाखालीं चालणारें उद्योगधंदे व कारखाने यांचें एक मोठें कॉर्पोरेशन बनल्यासारखें झालें. देशांतील

अव्यवस्था व अंदाधुंदी नाहींशी होऊन सुव्यवस्थित राज्यव्यवस्था सुरू झाली. पण त्याबरोबर व्यक्तीपेक्षां राष्ट्र महत्त्वाचें व राष्ट्रासाठीं व्यक्तीनें आपल्या वैयक्तिक हिताचा त्याग केला पाहिजे ही मतप्रणाली पुढें येऊन त्यायोगें लोकांचें व्यक्तिस्वातंत्र्य, वृत्तपत्रस्वातंत्र्य व संघटनास्वातंत्र्य नष्ट होऊन इटलीमध्यें लोकशाही नाहींशी झाली व सर्वाधिकारी पद्धतीची (Dictatorship) राज्यव्यवस्था सुरू झाली.

११ फेब्रुवारी १९२९ मध्यें मुसलोनीनें पोप व इटली यांच्यामध्यें तह करून सलोख्याचे संबंध प्रस्थापित केले. या तहानें पोपनें रोम शहरावरील आपला हक्क सोडला, व रोम राजधानी असलेल्या इटलीच्या राज्यास आपली मान्यता दिली. इटलीमधील सरकारनें रोमच्या ज्या भागांत पोपचें वास्तव्य होतें, तो प्रदेश इटलीच्या राज्यापासून स्वतंत्र आहे व त्यावर पोपची सार्वभौम सत्ता आहे या गोष्टीस, त्याचप्रमाणें पोपचा स्वतंत्र राजाप्रमाणें दर्जा असून धार्मिक बाबतींत तो रोमन कॅथलिक पंथी लोकांचा सर्वश्रेष्ठ अधिकारी आहे या गोष्टीस मान्यता दिली. अशारीतीनें इटलीचें सरकार व पोप यांच्यामध्यें १८७० पासून जें वितुष्ट होतें तें नाहींसें झालें व दोघांमध्यें या वेळेपासून सलोख्याचे संबंध सुरू झाले.

मुसलोनीनें रोमन कॅथलिक पंथ हा इटलीचा राष्ट्रीय धर्म असल्याचें जाहीर केलें.

इटलीचा प्रदेश-विस्तार—मुसलोनी इटलीचा सर्वाधिकारी झाल्यावर त्यानें इटली हें राष्ट्र लष्करी बाबतींत प्रबळ व्हावें या हेतूनें सैन्य, आरमार व वैमानिक दल बरेंच वाढविलें; व त्या जोरावर इटलीचें साम्राज्य व दरारा वाढविण्याचा बेत केला. त्यानें व्होडस व प्रेडसनी बेटें मिळविलीं. युगोस्लाव्हियाबरोबर तह करून फ्यूमचा प्रश्न सोडविला.

आफ्रिकेच्या ईशान्य भागांत इटलीची सोमाली लँड ही वसाहत होती. ही वसाहत व तिच्या पश्चिमेकडील अबीसीनिया हें स्वतंत्र राज्य यांच्यामध्यें सरहद्दीवर तंटे उपस्थित झाल्याचें निमित्त करून त्यानें आपल्या आधुनिक शस्त्रास्त्रांनीं सुसज्ज अशा सैन्यानिशीं १९३५-३६ मध्यें अबीसीनियावर स्वारी केली व तें राज्य जिंकून घेतलें, तेव्हां तेथील राजास पळ काढावा लागला.

इटलीनें अबीसीनियावर आक्रमण करूं नये म्हणून राष्ट्रसंघानें पुष्कळ प्रयत्न केला पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं, तेव्हां राष्ट्रसंघानें इटलीविरुद्ध आर्थिक दंडयोजना आखली पण त्यासही इटलीनें जुमानिलें नाहीं. अशारीतीनें अबीसीनिया जिंकून घेतल्यावर इटलीचा राजा हा अबीसीनियाचा बादशहा असल्याचें जाहीर करण्यांत आलें. यानंतर आफ्रिकेंतील इटलीच्या ताब्यांतील इरिट्रिया, इथोपिया (अबीसीनिया) व इटालियन सोमाली लँड यांचें संघटन करून तो प्रदेश प्रबल करण्याचा त्यानें बेत केला.

तसेंच त्यानें १९२७ मध्यें अल्बेनिया या ॲड्रियाटिक समुद्रावरील देशाशीं लष्करी करार केला व त्यामुळें तें राष्ट्र इटलीचें संरक्षित राष्ट्र असल्यासारखें झालें. १९३७ मध्यें आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट संघटनेविरुद्ध जर्मनी व जपान यांच्या बरोबर तह केला. १९३९ मध्यें त्यानें अल्बेनियाच्या अंतस्थ कारभारांत हात घालून तो प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणला, तेव्हां तेथील कायदेमंडळानें इटलीच्या राजास आपला राजा केलें. अशाप्रकारें मुसलोनीनें इटलीच्या साम्राज्याची वाढ करून इटलीचा दरारा वाढविला.

---

(७) युद्धोत्तर जर्मनी व तेथील नाझी राज्य

(१९१८ ते १९३९)

चार वर्षें युद्ध चालूनहि पश्चिम आघाडीवर जर्मन सैन्यास जय मिळाला नाहीं व पुढें जर्मन सैन्याचा पराभव होऊन त्यास मागें हटावें लागल्यामुळें जर्मनीमधील जनतेस युद्धाविषयीं उदासीनता वाटून शत्रूशीं तह करून युद्ध थांबवावें असें वाटूं लागलें. जर्मनीमध्यें समाजसत्तावादी व लोकशाहीवादी गट होता; व त्यास तेथील बादशहा कैसर २ रा विल्यम याच्या हातीं असलेली अनियंत्रित सत्ता पसंत नव्हती. तो गटही शत्रूशीं तह करून जर्मनीमध्यें लोकशाही पद्धतीची राज्यघटना अमलांत यावी असें प्रतिपादन करूं लागला. दोस्त राष्ट्रांनीं व्यापार-विषयक बाबतींत जर्मनीचा कोंडमारा केल्यामुळें जर्मनीमधील आर्थिक स्थिति चमत्कारिक झाली. अशी स्थिति असतां १९१८ च्या आक्टोबरमध्यें खुद्द जर्मनीमधील सैन्य व आरमार यांमध्यें बंडाळी सुरू झाली. तेव्हां ही परिस्थिति चिघळत चालली आहे हें पाहून जर्मनीचा बादशहा कैसर २ रा

विल्यम यानें ९ नोव्हेंबर १९१८ रोजीं जर्मनींतून पळ काढला व तो हॉलंडला गेला. तेव्हां त्याचा चॅन्सेलर यानेंही जर्मनीच्या लोकसभेतील पुढारी फ्राइटरिच एबर्ट याच्याकडे सत्ता दिली. त्यानें ११ नोव्हेंबर १९१८ रोजीं शत्रूशीं सुरू असलेलें युद्ध थांबविलें व पुढील धोरण आंखण्यासाठीं जर्मनीमधील सर्वांस मताधिकार देऊन राष्ट्रीय लोकसभेची निवडणूक करविली. मध्यंतरी एबर्ट याच्या नेतृत्वाखालीं स्थापन झालेल्या तात्पुरत्या सरकारानें व्हर्सेल्स येथें दोस्त राष्ट्रांशीं तह केला (१९१९). जर्मनीमध्यें निवडणूक होऊन स्थापन झालेल्या लोकसभेची (National Assembly) बैठक वामार (Weimar) येथें भरविण्यांत आली. या सभेनें व्हर्सेल्स येथें करण्यांत आलेल्या तहास मान्यता दिली व जर्मनीची नवी राज्यघटना करून जर्मनीचें राज्य लोकसत्ताक झालें असल्याचें जाहीर केलें. या नवीन घटनेप्रमाणें जर्मनीमधील जनतेनें निवडलेली लोकसभा (Reichstag) व जर्मनीमधील संस्थानें यांनीं निवडलेली राज्यसभा (Reichsrat) अशा दोन गृहांचें पार्लमेंट व त्यांपैकीं लोकसभेस जबाबदार असलेलें मंत्रिमंडळ व ७ वर्षें मुदत असलेला लोकनियुक्त अध्यक्ष अशाप्रकारची व्यवस्था करण्यांत आली (१९१९ ऑगस्ट). या पार्लमेंटमध्यें निरनिराळे राजकीय पक्ष होते, पण त्यांपैकीं लोकशाही (डेमोक्रॅटस), नेमस्त समाजसत्तावादी (सोशालिस्ट) व कॅथलिक्स या पक्षांची एकजूट होऊन त्यांचें तेथील पार्लमेंटमध्यें बहुमत होतें. या पक्षास जर्मनीमध्यें राजसत्ता स्थापन करावी असें म्हणणारा पक्ष व जर्मनीमध्यें रशियाच्या धर्तीवर कम्युनिस्ट पद्धत असावी असें म्हणणारा पक्ष यांचा विरोध होता, पण हे पक्ष अल्पसंख्यांक होते. तेव्हां १९१९–१९३२ पर्यंतच्या काळांत या मध्यवर्ती संमिश्र पक्षाकडे जर्मनीचा कारभार होता. या अवधींत त्याच्या नेमस्त व तडजोडीच्या धोरणामुळें दोस्त राष्ट्रांकडून त्यांस अनेक सवलती मिळाल्या, युद्ध-खंडणीची रक्कम बरीच कमी करून घेतां आली व राष्ट्रसंघ या संस्थेचेही जर्मनीला सभासद करून घेतां आले, तरी युद्धामध्यें झालेल्या अगणित खर्चामुळें, मालमत्तेची हानि झाल्यामुळें, व त्यानंतर आलेल्या जागतिक मंदीमुळें (१९२९) जर्मनीची स्थिति हलाखीची झाली व बेकारीचें प्रमाणही खूपच वाढलें. त्यामुळें ठिकठिकाणीं दंगेधोपे, दंगली होऊं लागल्या. या सर्व गोष्टी व्हर्सेल्सच्या अपमानकारक तहामुळें झाल्या व हा तह घडवून आणण्यास

जर्मनीमधील मंत्रीमंडळ जबाबदार आहे म्हणून मंत्रीमंडळावर कम्युनिस्ट पक्षाकडून व नॅशनल सोशालिस्ट (नाझी) पक्षाकडून कडक टीका होऊं लागली. यांपैकीं नॅशनल सोशालिस्ट हा पक्ष १९२९ पासून विशेष पुढें येऊं लागला. हा पक्ष १९२३ च्या सुमारास स्थापन झाला होता व ॲडॉल्फ हिटलर हा त्याचा एक सभासद होता. हिटलर यानें जर्मन सैन्यामध्यें कार्पोरल म्हणून साध्या अधिकारावर नोकरी केलेली होती. युद्ध संपल्यावर तो बेकार झाला व इतर व्यवसाय करूं लागला. **नॅशनल सोशालिस्ट** (National Socialist) पक्षाचा सभासद झाल्यावर तो त्या पक्षाचा प्रमुख झाला. या पक्षाच्या आद्याक्षरांवरून त्यास '**नाझी**' पक्ष असें म्हणत. जर्मनीस आलेल्या अवनतीस व्हर्सेल्सचा तह व तो घडवून आणणारे पुढारी कारणीभूत आहेत, तेव्हां या तहानें जर्मनीवर लादण्यांत आलेल्या अपमानकारक अटी झुगारून देणें जरूर आहे असें या पक्षाच्या वतीनें हिटलरनें प्रतिपादन केलें; व त्यास लोकांचें पाठबळ मिळून हा पक्ष प्रबळ होत चालला. या पक्षाच्या वतीनें रचण्यांत आलेल्या एक कटांत हिटलरचें अंग असल्यामुळें त्यास आठ महिने तुरुंगवासाची शिक्षा झाली होती. तेथें असतां त्यानें '**माझा झगडा**' (Mein kampf माइन काम्फ) हें पुस्तक लिहिलें. त्यांत त्यानें जर्मनीच्या पुनरुत्थापनासाठीं कोणत्या गोष्टी अमलांत आणावयास पाहिजेत हें ग्रथित केलें होतें.

जर्मनीमध्यें सर्वाधिकारी पद्धत—हिटलरची तुरुंगांतून सुटका झाल्यावर त्याच्या प्रभावी वक्तृत्वामुळें व त्याच्या ग्रंथामुळें जर्मनीमधील जनता त्याच्याकडे आकृष्ट झाली, व देशांत असलेली अंदाधुंदी व कम्युनिस्ट विचारांचा फैलाव नाहींसा करून सुव्यवस्थित कारभार करण्यास व जर्मनीस पूर्वीचें वैभव प्राप्त करून देण्यास कोणी समर्थ असेल तर तो हिटलरच आहे असें लोकांस वाटूं लागलें. त्यावेळीं जर्मनी या लोकसत्ताक राज्याचा अध्यक्ष हिंडेनबुर्क (Hindenburg) हा माजी सेनापति होता. अशी स्थिति असतां १९३३ मध्यें झालेल्या निवडणुकींत नाझी पक्षास बहुमत मिळालें तेव्हां त्या पक्षाचा प्रमुख **अडोल्फ हिटलर** यास हिंडेनबुर्क यानें चॅन्सेलर (मुख्य प्रधान) नेमिलें. चॅन्सेलर झाल्यावर जर्मनीचा उत्कर्ष करण्यास जरूर म्हणुन हिटलरनें पार्लमेंटकडून चार वर्षें सर्वाधिकार मिळविले व त्यामुळें पार्लमेंटच्या संमतीखेरीज कायदे करणें, तह करणें, आपणांस योग्य वाटेल तें धोरण आंखणें वगैरे गोष्टी त्यास करतां येऊं

लागल्या. २ आगष्ट १९३४ मध्यें अध्यक्ष हिंडेनबुर्क याचा मृत्यु झाल्यावर त्यानें अध्यक्षाचें वेगळें पद रद्द करून स्वतःकडे अध्यक्षाचाही हुद्दा घेतला. त्यामुळें तो सैन्यावरचाही मुख्य अधिकारी झाला, व अशारीतीनें जर्मनीमधील सर्व सत्ता त्याच्या ठिकाणीं केंद्रित होऊन तो जर्मनीचा **सर्वाधिकारी** (Dictator) झाला. अशारीतीनें आपल्या हातीं सर्व सत्ता घेत असतां जर्मनीमध्यें आपणांस कोणाकडून विरोध होऊं नये म्हणून त्यानें ज्यू लोक हे देशद्रोही आहेत म्हणून त्यांस सरकारी नोकरींतून काढून टाकलें, त्यांचा नागरिकत्वाचा हक्क रद्द केला, त्यांच्या उद्योगधंद्यावर सर्वांनीं बहिष्कार घालावा म्हणून फर्मावितें, त्यामुळें हजारों ज्यू लोकांस जर्मनी देश सोडून इतर देशांत पळ काढावा लागला. जें जर्मनींत राहिले, त्यांनीं फितुरीचीं कामें करूं नयेत म्हणून त्यांस कांहीं ठराविक भागांत राहणें भाग पाडून त्यांच्यावर सरकारी देखरेख ठेवली व तेथें त्यांचे हाल केले. तसेंच त्यानें जर्मनीमधील वेगवेगळ्या संस्थानांचे विशिष्ट हक्क रद्द करून तेथील कारभार करण्यास आपणास जबाबदार असणारे अधिकारी नेमले. जर्मनीमधील नॅशनल सोशालिस्ट या पक्षाखेरीज इतर पक्षास बंदी केली. नागरिकांच्या खाजगी आचारविचारावर नियंत्रण ठेवण्यासाठीं **गोबेल** याच्या देखरेखीखाली नाझी धोरणाचें प्रचारकार्य सुरू केलें, **हिमलर** याच्या नेतृत्वाखाली गुप्त पोलिसांची 'गेस्टॅपो' ही संघटना काढून सरकारविरुद्ध मत असणाऱ्या लोकांस चौकशीशिवाय अटकेंत ठेवण्याचें धोरण आखलें, व संप होऊं नयेत व गिरणीच्या मालकांनीं गिरण्या बंद करूं नयेत म्हणून संप करणें, व गिरण्या बंद करणें या गोष्टी बेकायदेशीर ठरवून मजूर व मालक यांच्यामधील तंटे सोडविण्यासाठीं अधिकारी नेमले. तसेंच त्यानें शाळा, कॉलेजें व विश्वविद्यालयें यावरही नियंत्रण ठेवलें. हिटलरच्या या अरेरावीच्या व नागरिक स्वातंत्र्याविरुद्ध असलेल्या धोरणामुळें जर्मनीमधील पुष्कळ विद्वान् लोक, शास्त्रज्ञ, लेखक, प्रोफेसर यांस जर्मन देश सोडावा लागला. जर्मनी हा स्वयंपूर्ण करण्यासाठीं त्यानें शेतकी व उद्योगधंदे यांस उत्तेजन दिलें व उत्पादन वाढविण्यासाठीं प्रयत्न केले. अशाप्रकारें खुद्द जर्मनीमध्यें हिटलरच्या सत्तेस कोणाकडून विरोध होणार नाहीं, व तेथील सर्व कारभार यंत्राप्रमाणें चालेल अशी त्यानें व्यवस्था केली.

परराष्ट्रीय धोरण—यानंतर हिटलरनें परराष्ट्रीय बाबींकडे लक्ष देऊन व्हर्सेल्सच्या तहानें जर्मनीवर घालण्यांत आलेल्या अटी झुगारून देण्याचा उपक्रम

सुरू केला. १९३४ मध्यें त्यानें पोलंडशीं अनाक्रमणाचा तह केला, व त्यामुळें व्हर्सेल्सच्या तहानें पोलंड व जर्मनी यांच्या ज्या सरहद्दी ठरविण्यांत आल्या होत्या त्यास मान्यता दिल्यासारखें झालें.

१९३५ मध्यें फ्रान्सकडे असलेल्या सार प्रांतांत सार्वमत घेण्यांत आलें, व त्यांत तेथील लोकांनीं मोठ्या बहुमतानें जर्मनीस मिळण्याचें ठरविल्यामुळें तो कोळशाच्या खाणींसंबंधीं प्रसिद्ध असलेला प्रांत जर्मनीकडे आला.

व्हर्सेल्सच्या तहानें जर्मनीनें सार्वत्रिक लष्करी शिक्षण देऊं नये व आपलें सैन्य व आरमार वाढवूं नये असें जर्मनीवर बंधन घातलें होतें. पण जर्मनीभोंवतालच्या इतर राष्ट्रांनीं आपलें सैन्य व आरमार वाढविलें असल्यामुळें तें बंधन आपणांस इतःपर लागू नाहीं व जर्मनीचें संरक्षण करण्यास सैन्याची जरूरी आहे म्हणून त्यानें जर्मनीमध्यें सार्वत्रिक लष्करी शिक्षण सुरू केलें, व आपलें सैन्य, आरमार व वैमानिक दल यांत वाढ केली (१९३५). हिटलरचें हें कृत्य व्हर्सेल्सच्या तहाच्या विरुद्ध होतें तरी राष्ट्रसंघ या संस्थेनें त्याचप्रमाणें युरोपमधील ग्रेटब्रिटन व फ्रान्स या प्रबल राष्ट्रांनींही जर्मनीस प्रतिबंध केला नाहीं. फ्रान्स व रशिया या राष्ट्रांनीं आपसांत तह केल्यामुळें लोकॅर्नो पॅक्ट आपणांस लागू होत नाहीं म्हणून व्हाईन नदीलगतच्या प्रदेशांत—व्हर्सेल्सच्या तहानें बंदी केली होती तरी—त्यानें आपलें सैन्य नेलें. जर्मनीप्रमाणें इटलीमध्यें मुसलोनीची सत्ता प्रबळ झालेली होती, व त्यानें राष्ट्रसंघास न जुमानतां अबिसिनीयावर आक्रमण करून तो प्रदेश जिंकून घेतला होता. जर्मनीनेंही राष्ट्रसंघाचे नियम मोडले होते. तसेंच अतिपूर्वेकडे जपाननें चीनच्या मांचुरिया व जेहोल या प्रदेशावर आक्रमण केलें होतें. तेव्हां या तिन्ही राष्ट्रांत एकमेकांच्या सहानुभूतीची व पाठबळाची जरूरी होती. तसेंच रशियांतील कम्युनिस्ट राजवटीस त्यांचा विरोध होता. तेव्हां १९३७ मध्यें जर्मनी, इटली व जपान या तीन राष्ट्रांनीं 'ॲन्टी कॉमिंटर्न पॅक्ट' (आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट विरोधी) करार केला. त्यांच्या या धोरणामुळें राष्ट्रसंघांत चर्चा होऊं लागली, तेव्हां त्यांनीं राष्ट्रसंघांतून आपलें अंग काढून घेतलें. नंतर हिटलरनें विशाल जर्मनीची स्थापना करण्याचें आपलें धोरण जाहीर केलें. या धोरणास अनुसरून आस्ट्रियामध्यें ७० लाख जर्मन लोक आहेत व त्यांस मुक्त करावयास पाहिजे हें कारण पुढें करून १९३८ मार्चमध्यें आस्ट्रियावर स्वारी करून तो देश

जर्मनीस जोडला असल्याचें जाहीर केलें. जर्मनीनें हें आक्रमण केलें तरी ग्रेट ब्रिटननें त्यास विरोध केला नाहीं. यानंतर जर्मनीनें झेकोस्लोव्हाकिया या देशांत ३० लाख जर्मन लोक असून त्यांच्यावर जुलुम होतो तेव्हां त्यास मुक्त करणें जरूर आहे ही सबब पुढें करून तेथील सुडेटन प्रांत आपल्या वर्चस्वाखालीं आणला (१९३८); व यानंतर १९३९ मध्यें झेकोस्लोव्हियाच्या इतर प्रदेशावरही आपलें वर्चस्व बसविलें. १९३९ मध्यें डॅन्झिग हें बंदर जर्मनीचें आहे तेव्हां तें आपल्या ताब्यांत द्यावें अशी मागणी केली. जर्मनीच्या या आक्रमक वृत्तीमुळें त्यास आळा घालणें जरूर आहे असें ग्रेट ब्रिटन व फ्रान्स वाटूं लागलें, व यावेळीं जर्मनीला प्रतिबंध केला नाहीं तर पोलंडवर आक्रमण करण्यास जर्मनी मागेपुढें पहाणार नाहीं असें वाटून ग्रेट ब्रिटननें व फ्रान्सनें डॅन्झिक बंदराच्या बाबतींत विरोध केला. पण पोलंडला मदत करावयाची तर रशियाचें साहाय्य मिळणें जरूर होतें. तेव्हां ग्रेट ब्रिटननें रशियाशीं या संबंधीं बोलणें सुरू केलें, पण त्यापूर्वीच जर्मनीनें रशियाशीं अनाक्रमणाचा तह केलेला असल्याचें उघडकीला आलें. तेव्हां यावेळीं स्वस्त बसल्यास पोलंडवर जर्मनीकडून आक्रमण होईल हें पाहून पोलंडवर आक्रमण झाल्यास आपला विरोध होईल हें ग्रेट ब्रिटन व फ्रान्स यांनीं जाहीर केलें.

सारांश

१ लें महायुद्ध व युद्धोत्तर जग (१९१४–१९३९)–

(१) **१ लें महायुद्ध** (१९१४–१८)–कारणें–जगांत दोन प्रतिस्पर्धी संघ. जर्मनी व ग्रेट ब्रिटन यांमधील स्पर्धा, आस्ट्रिया व रशिया यांमध्यें चुरस, आस्ट्रिया–हंगेरीच्या राजपुत्राचा सर्बियन तरुणाकडून खून हें निमित्त. आस्ट्रिया–हंगेरी, जर्मनी, तुर्कस्थान, बल्गेरिया विरुद्ध रशिया, फ्रान्स, ग्रेट ब्रिटन, जपान, अ. सं. संस्थानें व इतर राष्ट्रें युद्धांत सामील. **युद्ध**–जर्मन सैन्याची बेल्जममधून फ्रान्सवर स्वारी. फ्रान्सच्या मदतीला सुरवातीस हिंदी सैन्य व नंतर ब्रिटिश सैन्य. १९१६ पासून लॉईड जॉर्ज हा ग्रेट ब्रिटनचा मुख्य प्रधान. **पश्चिम आघाडीवर** प्रतिस्पर्धी सैन्य खंदकांच्या आश्रयानें.जर्मनीचा व्हर्डूनमार्गे जोराचा हल्ला. पण अयशस्वी, दोस्तांचा सॅमेच्या लढाईत चिलखती मोटारच्या सहाय्यानें हल्ला. भयंकर प्राणी पण अयशस्वी. **पूर्व आघाडीवर** टॅनेन-बर्गच्या लढाईत जर्मनीकडून रशियाचा पराभव. आस्ट्रियांत घुसलेल्या

रशियन सैन्याचा पराभव. १९१७ मार्चमध्यें रशियांत राज्यक्रान्ति. तुर्कस्थानाविरुद्ध डार्डानेल्सवर वर्चस्व बसविण्यांत ब्रिटिशांना अपयश. मेसापोटेमियांत पहिल्यानें अपयश नंतर जय, मॉडनें बगदाद, अलेब्बीनें जेरूसलेम १९१७, सीरीय १९१८. इजिप्त तुर्कस्थानपासून वेगळा, ब्रिटिशांचा संरक्षित. **समुद्रावरील युद्धप्रसंग**–ब्रिटिशांनीं जर्मन आरमार बाल्टिक समुद्रांत कोंडलें; आफ्रिकेंतील जर्मन वसाहती घेतल्या, जपाननें पॅसिफिक महासागरांतील जर्मन बेटें व ठाणीं घेतलीं. जर्मनीची पाणबुडीची मोहीम १९१५–१८. इंग्लंडचा व्यापारी कोंडमारा करणें हा उद्देश. तटस्थ राष्ट्रांच्या जहाजांस व प्रवासी जहाजांस उपसर्ग. अ. सं. संस्थानांची तक्रार, व युद्धांत सामील १९१७. दोस्तांना हुरूप. फ्रेंचांचा मार्शल फॉक यांजकडे दोस्त सैन्याचें अधिपत्य. १९१८ पश्चिम आघाडीवर जोराचा हल्ला, जर्मनीची माघार, तुर्कस्थानचा पराभव, आस्ट्रिया–हंगेरीच्या साम्राज्यांत बंडाळी. जर्मनींत कैसरविरुद्ध बंडाळी, हॉलंडमध्यें पलायन. ११ नोव्हें. १९१८ युद्ध थांबलें. जून १९१९ व्हर्सेल्सचा तह. विल्ड्रो विल्सन, क्लेमँको व लॉईड जॉर्ज हे प्रमुख. युरोपची व जगाची नवी मांडणी. राष्ट्रसंघाची स्थापना १९२०.

युद्धोत्तर जग—

(१) **राष्ट्रसंघ**–आरोग्य, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक बाबींसंबंधी उपयुक्त काम, अंतरराष्ट्रीय न्यायकोर्ट.

(२) **जागतिक घडामोडी**–नवीन राज्यांची स्थापना, ग्रेट ब्रिटन, फ्रान्स यांच्या प्रदेशांत वाढ.

(३) निरनिराळीं राजकीय तत्त्वें (१) लोकशाही (२) सर्वाधिकारी पद्धत (अ) फॅसिस्ट व नाझी पद्धत (ब) कम्युनिस्ट पद्धत (क) सर्वोदय.

(४) **जगांत शांतता व सुरक्षितता स्थापण्यासाठीं तहनामे.**

(अ) वॉशिंगटन १९२१, व लंडन १९३० परिषद आरमार नियंत्रण

(ब) लोकॅर्नो पॅक्ट १९२५; केलॉग पॅक्ट (पॅरिस पॅक्ट) १९२८.

(५) **रशियांतील सोव्हिएट राज्य** (१९१७–१९५३).

रशियांतील सोव्हिएट राज्य–२ रा निकोलस झारची जुलमी कारकीर्द. ड्यूमा संमेत सोशल डेमोक्रॅट पक्ष प्रबळ, व लेनिन त्यांचा पुढारी. झारकडून पकडले जाऊं नये म्हणून देशत्याग. कार्ल मार्क्सचें वाङ्मय आत्मसात. गुप्त क्रान्तिकारक मंडळाच्या रशियाच्या बाहेर व रशियांत शाखा. युद्धामध्यें पराभव, भयंकर प्राणहानि, रशियाची कर्जबाजारी व हलाखीची स्थिति. क्रान्तिकारक मंडळाच्या चिथावणीनें दंगल. निकोलसचा

राज्यत्याग. राज्यक्रान्ति नेमस्त क्रान्तिकारकांच्या हातीं सत्ता (मार्च १९१७). जहाल क्रान्तिकारकांनीं राज्यक्रान्ति घडवून आणली व सत्ता घेतली (१९१७ नोव्हें).

रशियांत कम्युनिस्ट राज्य–(१९१७–१९५३)–लेनिन १९१७–२४; स्टॅलिन १९२४–५३.

लेनिन सर्वाधिकारी–कम्युनिस्ट राज्यपद्धत. उत्पादनाचीं साधनें राष्ट्राच्या मालकीची. खाजगी मालमत्तेस बंदी. शारिरीक कष्ट करणारांस मताधिकार, बौद्धिक व शारिरिक कष्ट करणारांस सारखें वेतन. जास्त काम करण्यास लोकांस हुरूप नाहीं, म्हणून कमी उत्पादन. नवीन आर्थिक धोरण व लहान प्रमाणांत खाजगी मालमत्तेस मान्यता. लेनिन हा आधुनिक रशियाचा जनक. पेट्रोग्राडचे लेनिनग्रॅड, १९२४ मृत्यू.

स्टॅलिन (१९२४–१९५३)–मितभाषणी पण कर्तृत्ववान. पंचवार्षिक योजना १९२८–३३; १९३३–३८. खाणी, कारखाने, दळणवळण यांत वाढ. औद्योगिक बाबतींत रशिया पुढें.

रशियांतील राज्यघटना व तेथील कम्युनिस्ट पक्ष–सुप्रीम कौंसिल (कायदेमंडळ)–(१) कौंसिल ऑफ युनिअन व (२) कौंसिल ऑफ नॅशनॅलिटिज या त्यांच्या सभा. तीन मंडळांची नेमणूक. (१) प्रेसिडियम–सुप्रीम कौंसिलचें काम करणें याचा अध्यक्ष राष्ट्राचा अध्यक्ष. (२) कौंसिल ऑफ पीपल्स कमिशनर्स (कॅबिनेट) यांचा अध्यक्ष–प्रीमियर. (३) सुप्रीम कोर्ट–न्यायकोर्ट.

कम्युनिस्ट पक्ष व त्यांची घटना–स्थानिक सोव्हिएट (मंडळ) मार्फत ऑल युनिअन कौंग्रेस. ती सेंट्रल कमिटी नेमते. ही तीन कमिट्या नेमते, त्यांपैकीं मुख्य पोलीट ब्यूरो. तिचा अध्यक्ष हा सेक्रेटरी जनरल.

(६) इटली व तेथील फॅसिस्ट राज्य–(१९१९–१९३९)

मुसलोनीची फॅसिस्ट संघटना–युद्धानंतर इटलीच्या अपेक्षेप्रमाणें फायदा नाहीं. जनतेंत असंतोष. बेकारी. राष्ट्राचें कर्ज वाढलेलें. कम्युनिस्ट विचारांचा फैलाव. अस्वस्थता. संप, दंगेधोपे. सर्वत्र स्थिरस्थावता करण्याच्या उद्देशानें मुसलोनीनें फॅसिस्ट संघटना काढली. सभासदास लष्करी शिक्षण. संघटनेचा फैलाव, कम्युनिस्ट विरोधी धोरण. फॅसिस्ट पक्षाचे पार्लमेंटांत सभासद. १९२२ मध्यें फॅसिस्टांचा रोमवर मोर्चा, त्यांची शिस्त, लोकांची सहानुभूति, राज्यांत स्थिरस्थावरता करण्यास मुसलोनी समर्थ ही राजाची भावना. त्यास मुख्य प्रधानपद. व्यवस्थित राज्यकारभार व इटलीला गतवैभव प्राप्त करून देणें हें उद्दिष्ट.

मुसलोनी सर्वाधिकारी–राज्यकारभारांत फॅसिस्ट पक्षाची नेमणूक, मुख्य प्रधानाप्रमाणें मुख्य सेनापति व इतर अधिकार पार्लमेंटनें दिले. इतर पक्ष, सरकारविरोधी वृत्तपत्रें बंद. मुसलोनी सर्वाधिकारी. राष्ट्राचें उत्पन्न वाढविलें. मजुरांचे संप व गिरणीमालकांनी गिरण्या बंद करणें यांस बंदी. तंटे मिटाविण्यास सरकारी मंडळें. उद्योगधंद्यांत वाढ. प्रादेशिक विभागांऐवजीं उद्योगधंद्याच्या मंडळामार्फत पार्लमेंटांत प्रतिनिधी. सुव्यवस्थित व कार्यक्षम राज्यकारभार, पण व्यक्ती स्वातंत्र्य, संघटना स्वातंत्र्य व वृत्तपत्र स्वातंत्र्य नष्ट.

पोपशी तडजोड–१९२९. पोपचा रोमवरील हक्क रद्द पण त्याच्या विभागांत तो स्वतंत्र व सार्वभौम.

इटलीचा प्रदेशविस्तार–सैन्य आरमार, वैमानिक दल प्रबल. १९३५–३६ अबिसीनिया जिंकला, १९३९ अल्बेनियावर वर्चस्व.

(७) **युद्धोत्तर जर्मनी व तेथील नाझी राज्य**–जर्मनींत बंडाळी, कैसर २ रा विल्यम याचा राज्यत्याग व हॉलंडमध्यें पलायन. एबर्टच्या मंत्रिमंडळानें युद्ध थांबविलें, व व्हर्सेल्सच्या तहास मान्यता दिली. जर्मनीचें लोकसत्ताक राज्य १९१९ आगस्ट. १९१९–३२ संमिश्र प्रधान मंडळ. देश कजबाजारी, बेकारी, कम्युनिस्ट विचारांचा फैलाव, अस्वस्थता, दंगेधोपे, देशांत वेगवेगळे राजकीय पक्ष, पैकीं नॅशनल सोशालिस्ट पक्षाचा (नाझी) अडोल्फ हिटलर सभासद, प्रभावी वक्ता. १९२९ मध्यें पक्षाचा पुढारी. देशाच्या अवनतीस व्हर्सेल्सचा तह व तो घडवून आणण्यास मंत्रिमंडळ जबाबदार ही टीका. देशांतील अंदाधुंदी नाहींशी करणें व गतवैभव प्राप्त करून देणें हें पक्षाचें उद्दिष्ट; १९३३ मध्यें या पक्षाचें पार्लमेंटांत बहुमत. हिटलर चॅन्सेलर (मुख्य प्रधान), पार्लमेंटकडून ४ वर्षें सर्व अधिकार.

सर्वाधिकारी हिटलर–१९३४ मध्यें अध्यक्षाचा हुद्दा हिटलरकडे, सैन्य व आरमाराचा प्रमुख. संप करणें व गिरण्या बंद ठेवणें यांस बंदी. सुव्यवस्थित राज्यकारभार, पण ज्यू लोक देशद्रोही आहेत हें समजून त्यांचा छळ, गुप्त पोलीस (गेस्टॅपो) व त्यायोगें व्यक्तिस्वातंत्र्य नष्ट.

परराष्ट्रीय धोरण व प्रदेशविस्तार–१९३५ मध्यें सार प्रांत सार्वमतानें जर्मनीस. व्हर्सेल्सच्या तहाविरुद्ध सैन्य व आरमार, वैमानिक दल यांत वाढ १९३५. सार्वत्रिक लष्करी शिक्षण. १९३७ इटली व जपानशीं कम्युनिस्ट विरोधी तह. राष्ट्रसंघांतून अंग काढलें. १९३८ आस्टिया. १९३९ झेकोस्लोव्हाकिया यांवर स्वारी व वर्चस्व. १९३९ १ सप्टेंबर पोलंडवर स्वारी.

प्रकरण १९ वें

२ रें महायुद्ध व युद्धोत्तर जग

(१९३९–१९५२)

(१) २ रें महायुद्ध (१९३९–१९४५)

२ रें महायुद्ध–कारणें—व्हर्सेल्सच्या तहानें जर्मनीवर घालण्यांत आलेलीं बंधनें हिटलरनें झुगारून दिलीं. राष्ट्रसंघ ही संस्था निर्बल आहे हें पाहून १९३८ मध्यें आस्ट्रिया व १९३९ मध्यें झेकोस्लोव्हाकिया हे देश पादाक्रान्त केले. आतां एखादें निमित्तकारण काढून हिटलर पोलंडवर स्वारी करील असें ग्रेट ब्रिटन व फ्रान्स यांस वाटूं लागलें. तेव्हां त्यानें तसें करूं नये म्हणून पोलंडवर स्वारी झाल्यास त्याच्या स्वातंत्र्यरक्षणाची हमी इंग्लंडनें घेतली, व या बाबतींत रशियाशीं बोलणें सुरू केलें, पण जर्मनीनें यापूर्वी रशियाशीं अनाक्रमणाचा करार केला व १ सप्टेंबर १९३९ रोजीं पोलंडवर स्वारी केली. जर्मनीनें पोलंडमधून आपलें सैन्य परत न्यावें म्हणून ग्रेट ब्रिटननें जर्मनीस निर्वाणीचा खलिता पाठविला, पण जर्मनीनें पोलंडमधून आपलें सैन्य परत न नेल्यामुळें ३ सप्टेंबर १९३९ रोजीं ग्रेट ब्रिटन व फ्रान्स यांनीं जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारलें. ग्रेट ब्रिटनच्या स्वसत्ताक वसाहती (डोमीनियन्स), हिंदुस्थान, चीन व दोन वर्षांनीं अ. सं. संस्थानें हें राष्ट्र व इतर कांहीं राष्ट्रें दोस्तांस मिळालीं. जर्मनीच्या बाजूनें इटली व जपान हीं राष्ट्रें युद्ध सुरू झाल्यानंतर वर्ष दीड वर्षांनीं युद्धांत सामील झालीं.

जर्मनीचें युरोपवर वर्चस्व—युद्धांत शत्रूराष्ट्रांवर हल्ला करण्याचें एक नवीन तंत्र हिटलरनें अवलंबिलें. तें म्हणजे सैन्य, तोफा, रणगाडे; विमानें व शस्त्रास्त्रें या सर्व साधनांनीं शत्रुराष्ट्रांवर एकदम व अवचित हल्ला करणें हें होय. या नवीन तंत्रामुळें युद्ध सुरू झाल्यापासून–३ सप्टेंबर १९३९ पासून १ जून १९४१ पर्यंतच्या काळांत–जर्मनीनें युरोपमधील पोलंड, डेन्मार्क, नॉर्वे, हॉलंड, बेल्जम, लक्झेनबर्ग, फ्रान्स, युगोस्लाव्हिया, बल्गेरिया, ग्रीस वगैरे बहुतेक सर्व देश आपल्या वर्चस्वाखालीं आणले. फ्रान्सचा पराभव झाला आहे हें पाहून

इटलीं जर्मनीस मिळाला. अशी परिस्थिति असतां डंकर्क येथें ब्रिटिश सैन्याचा बराच भाग कोंडला गेला होता, पण त्या प्रतिकूल परिस्थितींत तीन लाखांहून जास्त अशा ब्रिटिश व फ्रेंच सैन्याची शत्रूच्या हल्ल्यास न जुमानतां ब्रिटिश आरमारानें सुटका केली. मार्शल पेटॅनचें (Petain) फ्रेंच सरकार जून १९४० अखेर जर्मनीला शरण गेल्यावर **डी गोल** (De Gaulle) ह्या फ्रेंच पुढाऱ्यानें आपल्या कांहीं अनुयायांसह ग्रेट ब्रिटनला पळ काढला व स्वतंत्र फ्रान्सची राष्ट्रीय कमेटी स्थापन करून जर्मनींशीं युद्ध चालविण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें फ्रान्सच्या बाहेर असलेल्या फ्रेंच लोकांस संदेश पाठविले. ग्रेट ब्रिटन हें बेट असल्यामुळें जर्मन सैन्यांस व रणगाड्यांस त्यांवर हल्ला करितां आला नाहीं. ग्रेट ब्रिटनचें आरमारी सामर्थ्य प्रबल असल्यामुळें इंग्लंडवर आरमारी हल्ला करण्याऐवजीं इंग्लंडचा कोंडमारा करावा व इंग्लिश जनतेचें धैर्य खचावें म्हणून इंग्लंडकडे अन्नधान्य व इतर सामुग्री घेऊन जाणाऱ्या जहाजांवर पाणबुड्या बोटींनीं हल्ला करणें, त्याचप्रमाणें इंग्लंडमधील शहरांवर वैमानिक हल्ला करून बाँबचा वर्षाव करणें हें धोरण हिटलरनें स्वीकारिलें. पण १० जून १९४० मध्यें विन्स्टन **चर्चिल** हा ग्रेट ब्रिटनचा मुख्य प्रधान झाला. त्यानें युद्धासंबंधीं सर्व प्रकारची तयारी केली व युद्ध चिकाटीनें चालविणें व ब्रिटिश जनतेचा धीर खचूं न देणें या कामीं महत्त्वाची कामगिरी केली.

उत्तर आफ्रिका व ग्रेट ब्रिटन यांविरुद्ध जर्मनीची मोहीम— १९४० च्या सप्टेंबर महिन्यांत जर्मनी (हिटलर), इटली (मुसलोनी) व जपान यांनीं आपसांत तह केला, व जपाननें संधि सांपडल्यास पूर्वेकडे आपलें साम्राज्य स्थापण्याचें योजलें. युरोपमधील देश पादाक्रान्त केल्यावर उत्तर आफ्रिका व पश्चिम आशिया या प्रदेशावर आपलें वर्चस्व बसविण्याचा जर्मनी व इटली यांनीं १९४०–४१ मध्यें प्रयत्न केला, पण त्यांस या कामीं यश आलें नाहीं. इटलीनें १९३५–३६ मध्यें जिंकून घेतलेला अबिसीनिया हा देश दोस्त राष्ट्रांनीं जिंकून घेतला. तसेंच उत्तर आफ्रिकेंतून इटालियन सैन्यास हुसकावून लाविलें. आगस्ट १९४० पासून इंग्लंडमधील शहरांवर वैमानिक हल्ले होऊन बाँबचा वर्षाव होऊं लागला; पण ब्रिटिश विमान दलानें त्यास यशस्वीरीतीनें तोंड दिलें. या हल्ल्यांत ब्रिटिशांचीं बरींच माणसें मृत्यूमुखीं पडलीं व बरीच जखमी झालीं. युरोपमधील बहुतेक देश जर्मनीच्या वर्चस्वाखालीं असल्यामुळें

१९४१ च्या जूनमध्यें जर्मनीनें रशियावर स्वारी केली, व मास्को व लेनिनग्रेड घेण्याचा प्रयत्न केला. पण रशियानें निकरानें व चिकाटीनें प्रतिकार केल्यामुळें जर्मनीचा हा बेत सफल झाला नाहीं, व डिसेंबरमध्यें जर्मन सैन्यास माघार घ्यावी लागली.

अटलांटिक सनद—अ. सं. संस्थानें हें राष्ट्र तटस्थ होतें, तरी लोकशाहीच्या संरक्षणासाठीं ब्रिटनला लढावें लागत असल्यामुळें त्याची ग्रेट ब्रिटनकडे सहानुभूति होती. ग्रेट ब्रिटनला युद्धसामुग्री व इतर वस्तु अ. सं. संस्थानाकडून घेतां याव्या या उद्देशानें मार्च १९४१ मध्यें अ. सं. सं. नें उधार उसनवार कायदा पास केला. १९४१ च्या आगस्टमध्यें चार्चिल यानें न्यू. फाऊंडलंडजवळ अ. सं. संस्थानांचा अध्यक्ष **रूझवेल्ट** याची गांठ घेतली व दोघांनीं मिळून एक घोषणा जाहीर केली. या घोषणेंत असें जाहीर करण्यांत आलें कीं ग्रेट ब्रिटन व अ. सं. संस्थानें यांचा प्रदेशविस्तार करावा असा हेतु नाहीं, त्याचप्रमाणें जगांतील सर्व राष्ट्रांस आपल्या मर्जीप्रमाणें आपली राज्यघटना ठरविण्याची पूर्ण मुभा आहे. यास अटलांटिक सनद असें म्हणण्यांत आलें.

जपानची साम्राज्यवृद्धि—युरोपमधील राष्ट्रें युद्धांत गुंतलीं असतां पॅसिफिक समुद्रालगतच्या आशियांतील प्रदेशांवर आपलें वर्चस्व बसवावें ही जपानची इच्छा होती. जपाननें ७ डिसेंबर १९४१ रोजीं होनुलुलू बेटावरील **पर्ल हार्बर** येथील अ. सं. सं च्या आरमारी ठाण्यावर अचानक हल्ला केला. त्यामुळें अ. सं. संस्थानें या राष्ट्रानें जपानविरुद्ध युद्ध जाहीर केलें. तसेंच इंग्लंडनें जपानाविरुद्ध व जर्मनी आणि इटली यांनीं अ. सं. संस्थानें याविरुद्ध युद्ध जाहीर केल्यामुळें तें सर्वत्र पसरलें. अशी परिस्थिति असतां जपाननें १९४१ च्या डिसेंबरपासून १९४२ च्या मेपर्यंत पूर्व आशियांतील डचांचा इंडोनेशिया (जाव्हा, सुमात्रा वगैरे), ब्रिटिशांचा मलाया, सिंगापूर, ब्रह्मदेश व फ्रेंचांचा इंडोचायना; त्याचप्रमाणें थायलंड, बोर्नियो, फिलीपाईन बेटें, ब्रिटिशांचें हाँगकाँग व चीनचा पॅसिफिक महासागरालगतचा प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणला. यानंतर आस्ट्रेलियावर स्वारी करण्याचा जपानचा बेत होता, पण अ. सं. सं. नें जनरल **मॅक आर्थर** यास आस्ट्रेलियांत पाठविलें व आरमार व वैमानिक दल त्याच्या मदतीस दिलें. त्यामुळें जपानची आस्ट्रेलियावर स्वारी झाली नाहीं.

युरोपमधील युद्धप्रसंग—युरोपमधील जचावर युद्धाचें भवितव्य अवलंबून असल्यामुळें जर्मनीच्या हल्ल्यांस तोंड देणें व युद्धोपयोगी सामानाची रशियास मदत करणें या गोष्टी दोस्त राष्ट्रांस कराव्या लागल्या. त्याचप्रमाणें ग्रेट ब्रिटननें १९४२ मार्चपासून जर्मनीच्या औद्योगिक केंद्रावर वैमानिक हल्ले करून बाँबचा वर्षाव केला. अ. सं. सं. च्या वैमानिक दलाची ग्रेट ब्रिटनला मदत झाली. अशी परिस्थिति असतां रशियाच्या दक्षिण भागांतील स्टॅलिन-ग्राड या शहरावर हल्ला करून तें जिंकून घेण्याचा जर्मनीनें निकरानें प्रयत्न केला. पण रशियन सैन्याच्या जोराच्या प्रतिकारामुळें जर्मनीला या कामीं यश न मिळून जर्मनीला माघार घ्यावी लागली.

दोस्त राष्ट्रांस विजय—१९४३ पासून ठिकठिकाणच्या आघाडीवर दोस्त राष्ट्रांस विजय मिळूं लागला. आफ्रिकेंमधील शत्रु सैन्यास हुसकून लावण्यांत आलें. यानंतर दोस्त राष्ट्रांनीं भूमध्य समुद्रावर आपलें वर्चस्व स्थापन केलें. यानंतर युरोपवर जर्मनीचें वर्चस्व असल्यामुळें युरोपवर स्वारी करण्याचें दोस्तांनीं ठरविलें. १९४३ च्या जुलैमध्यें दोस्त राष्ट्रांनीं गुप्तता राखून सिसलीवर स्वारी केली व तेथें बरेच सैन्य नेलें. याच सुमारास इटलीमध्यें बंडाळी होऊन इटालियन लोकांनीं मुसलोनीस पदच्युत केलें व मार्शल **बाडॉल्यो** Badoglio) यास मुख्य प्रधान केलें. यानंतर ३ सप्टेंबर १९४३ रोजीं इटली शरण आला. यानंतर जनरल **ड्विट डी ऐझनहावर** (Dwight Eisenhower) यास दोस्त सैन्याचा मुख्य सेनापति नेमण्यांत येऊन तो जानेवारी १९४४ मध्यें इंग्लंडमध्यें आला, व त्याच्या योजनेप्रमाणें १९४४ च्या सुरुवातीपासून शत्रुसैन्यावर व विमान कारखान्यावर दोस्तांचे जोराचे वैमानिक हल्ले होऊं लागले. युरोपमध्यें दोस्तांचें सैन्य गेल्यावर जर्मनीवर सर्व बाजूंनीं हल्ला झाला व ८ मे १९४५ रोजीं जर्मनी शरण आला. याच सुमारास हिटलर मरण पावल्याची वार्ता आलेली होती. जपानच्या ताब्यांतील प्रदेशही दोस्तांनीं जिंकून घेतले. यानंतर ६ आगस्ट १९४५ रोजीं जपानच्या **हिरोशामा** व त्यानंतर १० आगस्ट १९४५ रोजीं **नागासाकी** या प्रमुख शहरांवर अ. सं. संस्थानें या राष्ट्राच्या विमानानें **ॲटम बाँब** टाकल्यामुळें हीं दोन्हीं शहरें उध्वस्त होऊन तेथील लक्षावधि लोक मृत्युमुखीं पडले. तेव्हां ॲटम बाँबसारख्या भयंकर विध्वंसक आयुधानें

जपानचा विध्वंस होण्यास वेळ लागणार नाहीं हें पाहून जपाननें तहाचें बोलणें केलें व २ सप्टेंबर १९४५ रोजीं जपानशीं युद्ध थांबविण्यांत आलें.

ग्रेट ब्रिटन, अ. सं. संस्थानें, रशिया व इतर राष्ट्रें यांनीं जर्मनी, इटली व जपान-यांचा पराभव करण्याच कामीं प्रमुख भाग घेतला होता. पण युद्धानंतर सर्वांस मान्य होईल असा तह ठरविण्याचे बाबतींत कम्युनिस्ट रशिया व लोकंशाही पद्धतीची अ. सं. संस्थानें, ग्रेट ब्रिटन व फ्रान्स या राष्ट्रांमध्यें मतभेद उत्पन्न होऊन तह ठरविण्याचें काम लांबणीवर पडलें. युद्ध चालूं असतां निरनिराळ्या राष्ट्रांतील तंटे युद्धासारख्या मार्गानें न सोडवितां तडजोडीनें व वाटाघाटीनें सोडविण्यांत यावेत त्याचप्रमाणें निरनिराळ्या राष्ट्रामध्यें औद्योगिक, सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक वगैरे बाबतींत सलोख्याचे संबंध असावेत या उद्देशानें राष्ट्रसंघापेक्षां अधिक प्रभावी अशी 'संयुक्त राष्ट्र संघटना' ही संस्था स्थापन करण्याचे दोस्त राष्ट्रांनीं ठरविलें.

---

(२) संयुक्त राष्ट्र संघटना

युद्धांमुळें होणारी हानि व युद्धांस बंदी घालण्याचे प्रयत्न— गेल्या शंभर सव्वाशें वर्षांमध्यें लागलेले शास्त्रीय शोध, निरनिराळ्या दूरदूरच्या राष्ट्रांमध्यें कल्पनातीत रीतीनें वाढलेलें दळणवळण, व्यापार व उद्योगधंदे यांची वाढ यामुळें जगांतील दूरदूरच्या राष्ट्रांमधील लोकांचे संबंध विशेष जोडले गेले आहेत. राष्ट्राराष्ट्रांमधील संघटन जरी विशेष वाढलें गेलें आहे तरी एकमेकांच्या धोरणाविषयीं व हेतूंविषयीं वाटणारी साशंक वृत्ति नष्ट झालेली नाहीं. या नवीन लागलेल्या शास्त्रीय शोधांचा व दळणवळणाच्या साधनांचा उपयोग लोकांच्या सुखसोयी वाढविण्याच्या कामीं जसा करून घेण्यांत आला तसाच तो युद्धाच्या उपयोगी पडणारीं विध्वंसक साधनें तयार करण्याच्या कामींही होऊं लागला. गेल्या चाळीस वर्षांमध्यें झालेल्या दोन जागतिक महायुद्धांमध्यें (१९१४–१८ व १९३९ ते १९४५) निरनिराळ्या राष्ट्रांचीं, वर्णांचीं व धर्मांचीं मिळून सुमारें १½ कोटींपेक्षां जास्ती माणसें मृत्युमुखीं पडलीं, ३–४ कोटी लोक जखमी व पंगू झाले, लक्षावधि लोक निराश्रित होऊन निर्वासित झाले. मोठमोठे प्रदेश व शहरें उध्वस्त झालीं, रोगाच्या साथी सुरू होऊन त्या सर्वत्र पसरल्या. व्यापार,

उद्योगधंदे व पेढ्या बंद होऊन मोठमोठ्या राष्ट्रांची हलाखीची स्थिति झाली. कोट्यवधि रुपयांचा चुराडा झाला. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीं जपानमधील हिरोशामा व नागासाकी या दाट लोकवस्तीच्या शहरांवर ता. ८ व १० ऑगस्ट १९४५ रोजीं टाकण्यांत आलेल्या अणु बाँबनें तर तीं शहरें उध्वस्त होऊन सव्वा लाख माणसें मृत्युमुखीं पडलीं व त्यामुळें अणुबाँबसारख्या नवीन विध्वंसक साधनानें केवढी मोठी हानि होऊं शकते हें सर्वांस कळून चुकलें. राष्ट्रांराष्ट्रांमधील युद्धें अशा प्रकारचीं भयंकर स्वरूपाचीं होऊं लागल्यामुळें अशा प्रकारचें एखादें युद्ध उपस्थित झालें म्हणजे त्याचे अनिष्ट परिणाम युद्धमान राष्ट्रांप्रमाणें तटस्थ राष्ट्रांसही भोगावे लागतात. तेव्हां निरनिराळ्या राष्ट्रांमधील तंटे युद्धासारख्या रानटी मार्गानें मिटविण्याऐवजीं तडजोडीनें व सामोपचारानें मिटविण्यासाठीं एखादी योजना काढणें जरूर आहे असें निरनिराळ्या काळच्या मुत्सद्यांस व राजकारणी पुरुषांस वाटत होतें; व त्यासंबंधाचे प्रयत्नही निरनिराळ्या वेळीं करण्यांत आले. या धोरणानुसार १८९९ व १९०७ मध्यें हॉलंडमधील हेग या शहरीं राष्ट्रांराष्ट्रांमधील तंटे सामोपचारानें मिटविण्यासाठीं एक आंतर्राष्ट्रीय न्यायकोर्ट स्थापन करण्यांत आलें. पण या कोर्टाकडे कज्जा नेण्याचें काम कोणत्याही राष्ट्रावर बंधनकारक नसल्यामुळें या न्यायकोर्टास राष्ट्राराष्ट्रांमधील युद्धें थांबवितां आलीं नाहींत. यानंतर या बाबतींत मोठा प्रयत्न 'अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें' या राष्ट्राचा अध्यक्ष विड्रो विल्सन यानें केला. १ लें जागतिक महायुद्ध थांबविण्यांत आल्यावर विड्रो विल्सन यानें इतर कांहीं गृहस्थांच्या मदतीनें तयार केलेली 'राष्ट्रसंघ' (The League of Nations) ही संस्था स्थापन करण्यांत आली.

१९२० ते १९३९ पर्यंतच्या काळांत राष्ट्रसंघानें महत्त्वाची कामगिरी केली. तरी या काळांत प्रबळ अशा कांहीं राष्ट्रांनीं इतर राष्ट्रांवर केलेल्या आक्रमणास मात्र राष्ट्रसंघास पायबंद घालतां आला नाहीं. राष्ट्रसंघ या संस्थेजवळ स्वतःचें असें सैन्य नव्हतें, व एखाद्या आक्रमक अशा राष्ट्राविरुद्ध लष्करी अशी दंडयोजना करणें जरूर आहे असें राष्ट्रसंघानें ठरविलें तरी राष्ट्रसंघांत सामील असलेल्या इतर राष्ट्रांमार्फतच त्याची अंमलबजावणी व्हावयाची असल्यामुळें व ती केली पाहिजे असें इतर राष्ट्रांवर बंधनकारक नसल्यामुळें १९३५ मध्यें इटलीनें ॲबिसीनीयावर व त्यानंतर अल्बेनिया

केलेलें आक्रमण, जपाननें १९३१ पासून चीनवर केलेलें आक्रमण, जर्मनीनें १९३८ व १९३९ मध्यें आस्ट्रिया, झेकोस्लाव्हिया व पोलंड यांवर केलेलें आक्रमण राष्ट्रसंघ थांबवूं शकली नाहीं व त्यामुळें राष्ट्रसंघ ही संस्था नामशेष झाली. जर्मनीनें १९३९ मध्यें पोलंडवर केलेल्या आक्रमणामुळें २ रें महायुद्ध सुरू झालें व तें १९४५ पर्यंत टिकलें. हें दुसरें महायुद्ध सुरू असतां दोस्त राष्ट्रांपैकीं अ. सं. सं. या राष्ट्राचा अध्यक्ष रुझवेल्ट, इंग्लंडचा मुख्य प्रधान चर्चिल, सोव्हिएट रशिया या राष्ट्राचा सर्वाधिकारी स्टॅलिन व चीनचा प्रमुख चांग काय शेक यांस राष्ट्रांराष्ट्रांमधील तंटे युद्धासारख्या रानटी मार्गानें न सोडवितां तें सामोपचारानें व तडजोडीनें सोडविण्यास समर्थ होईल अशी एखादी प्रभावी संस्था स्थापन करावी असें वाटून, त्यासंबंधीं विचारविनिमय करण्यासाठीं सॅनफ्रॅंसिस्को या ठिकाणीं २५ एप्रिल १९४५ रोजीं जगांतील राष्ट्रांची एक मोठी परिषद् भरविण्यांत आली. या परिषदेमध्यें बराच विचारविनिमय होऊन 'संयुक्त राष्ट्रसंघटना' या नवीन संस्थेच्या घटनेचा मसुदा तयार करण्यांत आला, व त्यास जगांतील निरनिराळ्या ५१ राष्ट्रांची संमति मिळाल्यावर ता. २४ आक्टोबर १९४५ रोजीं 'संयुक्त राष्ट्र संघटना' (United Nations Organization यूनो) ही संस्था स्थापन करण्यांत आली.

संयुक्त राष्ट्रसंघटनेचें उद्दिष्ट व सनद (Charter)—संयुक्त राष्ट्रसंघटना ही जगांतील स्वतंत्र राष्ट्रांनीं स्थापन केलेली एक मोठी जागतिक संस्था आहे. जगांतील सर्व मानवजातीस वंश, धर्म, रंग, भाषा, स्त्रीपुरुष असा भेदभाव न करतां 'मानवी हक्क' ('Human Rights') प्राप्त करून देणें व तें टिकविणें, राष्ट्रांराष्ट्रांतील कलह युद्धासारख्या रानटी मार्गानें न सोडवितां ते तडजोडीनें व सामोपचारानें सोडविणें, आंतरराष्ट्रीय सलोखा व शांतता स्थापन करणें, आंतरराष्ट्रीय महत्त्वाचे असे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक प्रश्न सोडविणें हें या संस्थेचें उद्दिष्ट आहे. हें उद्दिष्ट एका सनदेमध्यें (Charter) ग्रथित केलेलें आहे. हें उद्दिष्ट साध्य करून घेण्यासाठीं संयुक्त राष्ट्रसंघटना या संस्थेनें जनरल असेंब्ली, सुरक्षितता मंडळ, आंतरराष्ट्रीय न्यायकोर्ट, आर्थिक व सामाजिक बाबींसंबंधाचें कौंसिल, विश्वस्त मंडळ, सेक्रेटरीएट (कचेरी) वगैरे मंडळें स्थापन केलेलीं आहेत.

संयुक्त राष्ट्रसंघटना या सनदेमध्यें दुरुस्ती करावयाची असली किंवा

सन्देंतील सर्व कलमांची नवीन मांडणी करावयाची असली तर त्यास जनरल असेंब्लीमध्यें $\frac{2}{3}$ मताधिक्याची जरूरी असते.

सभासदत्व— 'संयुक्त राष्ट्रसंघटना' ही संस्था स्थापन करण्यासाठीं सॅन फ्रॅंसिस्को या ठिकाणीं जी परिषद् भरली होती तीमध्यें भाग घेणाऱ्या सर्व राष्ट्रांस, त्याचप्रमाणें सुरक्षितता मंडळाच्या शिफारशीवरून जनरल असेंब्लीनें मान्यता दिलेल्या कोणत्याही राष्ट्रास या संस्थेचे सभासद् होतां येते. या संस्थेचे सभासद् असलेल्या प्रत्येक राष्ट्रास या संस्थेच्या सनदेस व तीस अनुसरून स्वतःवर येणारी जबाबदारी पतकरण्यास तयार असावे लागते. संयुक्त राष्ट्रसंघटनेचें उद्दिष्ट भंग होईल असें कृत्य एखाद्या राष्ट्रानें केल्यास सुरक्षितता-मंडळाच्या शिफारशीवरून जनरल असेंब्ली या मंडळास त्या राष्ट्राचें सभासदत्व तात्पुरतें किंवा कायमचें रद्द करतां येतें.

जनरल असेंब्ली—'संयुक्त राष्ट्रसंघटना' या संस्थेचे सभासद् असलेल्या राष्ट्रांच्या प्रतिनिधींची ही सभा आहे. या सभेंत लहानमोठ्या अशा सर्व राष्ट्रांचा दर्जा समानतेचा असतो. असेंब्लीची बैठक दरवर्षी २ सप्टेंबर नंतरच्या पहिल्या मंगळवारीं भरते. आंतर्राष्ट्रीय महत्त्वाचा किंवा आंतर्राष्ट्रीय शांततेस धोक्याचा असा एखादा प्रश्न उपस्थित झाल्यास जरूर पडल्यास असेंब्लीची जादा बैठक बोलाविता येते.

असेंब्ली हें सल्लागारमंडळाच्या स्वरूपाचें आहे. या सभेस आंतर्राष्ट्रीय महत्त्वाच्या अशा कोणत्याही प्रश्नासंबंधीं चर्चा करितां येते, व त्यासंबंधीं 'सुरक्षितता मंडळास' शिफारशीविजा सूचना करितां येतें. पण प्रत्यक्ष उपाययोजना करण्याचा अधिकार या सभेस नाहीं. एखाद्या प्रश्नासंबंधीं सुरक्षितता मंडळाचें लक्ष वेधण्याचा अधिकार या सभेस आहे. या सभेस जरी फारसे अधिकार नाहींत, तरी संयुक्त राष्ट्र संघटना या संस्थेच्या सभासद् असलेल्या जगांतील राष्ट्रांच्या प्रतिनिधींची ही सभा असल्यामुळें या सभेंत झालेल्या चर्चेस व सभेनें एखाद्या प्रश्नासंबंधानें घेतलेल्या निर्णयास महत्त्व आहे. खालील प्रश्न विशेष महत्त्वाचे असे ठरविण्यांत आले असून त्यासंबंधीं शिफारस करण्यासाठीं व निर्णय घेण्यासाठीं या सभेस हजर असून मत दिलेल्या सभासदांचें $\frac{2}{3}$ मताधिक्क्य असावयास पाहिजे. हे महत्त्वाचे प्रश्न खालील होत :—

केलेलें आक्रमण, जपाननें १९३१ पासून चीनवर केलेलें आक्रमण, जर्मनीनें १९३८ व १९३९ मध्यें आस्ट्रिया, झेकोस्लाव्हिया व पोलंड यांवर केलेलें आक्रमण राष्ट्रसंघ थांबवूं शकली नाहीं व त्यामुळें राष्ट्रसंघ ही संस्था नामशेष झाली. जर्मनीनें १९३९ मध्यें पोलंडवर केलेल्या आक्रमणामुळें २ रें महायुद्ध सुरू झालें व तें १९४५ पर्यंत टिकलें. हें दुसरें महायुद्ध सुरू असतां दोस्त राष्ट्रांपैकीं अ. सं. सं. या राष्ट्राचा अध्यक्ष रुझवेल्ट, इंग्लंडचा मुख्य प्रधान चर्चिल, सोव्हिएट रशिया या राष्ट्राचा सर्वाधिकारी स्टॅलिन व चीनचा प्रमुख चांग काय शेक यांस राष्ट्रांराष्ट्रांमधील तंटे युद्धासारख्या रानटी मार्गानें न सोडवितां तें सामोपचारानें व तडजोडीनें सोडविण्यास समर्थ होईल अशी एखादी प्रभावी संस्था स्थापन करावी असें वाटून, त्यासंबंधीं विचारविनिमय करण्यासाठीं सॅनफ्रॅंसिस्को या ठिकाणीं २५ एप्रिल १९४५ रोजीं जगांतील राष्ट्रांची एक मोठी परिषद् भरविण्यांत आली. या परिषदेमध्यें बराच विचारविनिमय होऊन 'संयुक्त राष्ट्रसंघटना' या नवीन संस्थेच्या घटनेचा मसुदा तयार करण्यांत आला, व त्यास जगांतील निरनिराळ्या ५१ राष्ट्रांची संमति मिळाल्यावर ता. २४ आक्टोबर १९४५ रोजीं 'संयुक्त राष्ट्र संघटना' (United Nations Organization यूनो) ही संस्था स्थापन करण्यांत आली.

संयुक्त राष्ट्रसंघटनेचें उद्दिष्ट व सनद (Charter)—संयुक्त राष्ट्रसंघटना ही जगांतील स्वतंत्र राष्ट्रांनीं स्थापन केलेली एक मोठी जागतिक संस्था आहे. जगांतील सर्व मानवजातीस वंश, धर्म, रंग, भाषा, स्त्रीपुरुष असा भेदभाव न करतां 'मानवी हक्क' ('Human Rights') प्राप्त करून देणें व तें टिकविणें, राष्ट्रांराष्ट्रांतील कलह युद्धासारख्या रानटी मार्गानें न सोडवितां ते तडजोडीनें व सामोपचारानें सोडविणें, आंतरराष्ट्रीय सलोखा व शांतता स्थापन करणें, आंतरराष्ट्रीय महत्त्वाचे असे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक प्रश्न सोडविणें हें या संस्थेचें उद्दिष्ट आहे. हें उद्दिष्ट एका सनदेमध्यें (Charter) ग्रथित केलेलें आहे. हें उद्दिष्ट साध्य करून घेण्यासाठीं संयुक्त राष्ट्रसंघटना या संस्थेनें जनरल असेंब्ली, सुरक्षितता मंडळ, आंतरराष्ट्रीय न्यायकोर्ट, आर्थिक व सामाजिक बाबीसंबंधाचें कौंसिल, विश्वस्त मंडळ, सेक्रेटरीएट (कचेरी) वगैरे मंडळें स्थापन केलेलीं आहेत.

संयुक्त राष्ट्रसंघटना या सनदेमध्यें दुरुस्ती करावयाची असली किंवा

सनदेंतील सर्व कलमांची नवीन मांडणी करावयाची असली तर त्यास जनरल असेंब्लीमध्यें $\frac{2}{3}$ मताधिक्याची जरूरी असते.

सभासदत्व— 'संयुक्त राष्ट्रसंघटना' ही संस्था स्थापन करण्यासाठीं सॅन फ्रॅंसिस्को या ठिकाणीं जी परिषद भरली होती तीमध्यें भाग घेणाऱ्या सर्व राष्ट्रांस, त्याचप्रमाणें सुरक्षितता मंडळाच्या शिफारशीवरून जनरल असेंब्लीनें मान्यता दिलेल्या कोणत्याही राष्ट्रास या संस्थेचे सभासद होतां येते. या संस्थेचे सभासद असलेल्या प्रत्येक राष्ट्रास या संस्थेच्या सनदेस व तीस अनुसरून स्वतःवर येणारी जबाबदारी पतकरण्यास तयार असावे लागते. संयुक्त राष्ट्रसंघटनेचें उद्दिष्ट भंग होईल असें कृत्य एखाद्या राष्ट्रानें केल्यास सुरक्षितता-मंडळाच्या शिफारशीवरून जनरल असेंब्ली या मंडळास त्या राष्ट्राचें सभासदत्व तात्पुरतें किंवा कायमचें रद्द करतां येतें.

जनरल असेंब्ली—'संयुक्त राष्ट्रसंघटना' या संस्थेचे सभासद असलेल्या राष्ट्रांच्या प्रतिनिधींची ही सभा आहे. या सभेंत लहानमोठ्या अशा सर्व राष्ट्रांचा दर्जा समानतेचा असतो. असेंब्लीची बैठक दरवर्षी २ सप्टेंबर नंतरच्या पहिल्या मंगळवारीं भरते. आंतर्राष्ट्रीय महत्त्वाचा किंवा आंतर्राष्ट्रीय शांततेस धोक्याचा असा एखादा प्रश्न उपस्थित झाल्यास जरूर पडल्यास असेंब्लीची जादा बैठक बोलावितां येते.

असेंब्ली हें सल्लागारमंडळाच्या स्वरूपाचें आहे. या सभेस आंतर्राष्ट्रीय महत्त्वाच्या अशा कोणत्याही प्रश्नासंबंधीं चर्चा करितां येते, व त्यासंबंधीं 'सुरक्षितता मंडळास' शिफारशीविजा सूचना करितां येतें. पण प्रत्यक्ष उपाययोजना करण्याचा अधिकार या सभेस नाहीं. एखाद्या प्रश्नासंबंधीं सुरक्षितता मंडळाचें लक्ष वेधण्याचा अधिकार या सभेस आहे. या सभेस जरी फारसे अधिकार नाहींत, तरी संयुक्त राष्ट्र संघटना या संस्थेच्या सभासद असलेल्या जगांतील राष्ट्रांच्या प्रतिनिधींची ही सभा असल्यामुळें या सभेंत झालेल्या चर्चेस व सभेनें एखाद्या प्रश्नासंबंधानें घेतलेल्या निर्णयास महत्त्व आहे. खालील प्रश्न विशेष महत्त्वाचे असे ठरविण्यांत आले असून त्यासंबंधीं शिफारस करण्यासाठीं व निर्णय घेण्यासाठीं या सभेस हजर असून मत दिलेल्या सभासदांचें $\frac{2}{3}$ मताधिक्य असावयास पाहिजे. हे महत्त्वाचे प्रश्न खालील होत :—

(१) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता (२) सुरक्षितता मंडळांतील कायम नसलेल्या सभासदांची निवडणूक (३) आर्थिक व सामाजिक प्रश्नासंबंधाच्या मंडळांतील सभासदांची निवडणक (४) विश्वस्त मंडळांतील सभासदांची निवडणूक (५) संयुक्त राष्ट्रसंघटना या संस्थेमध्यें नवीन सभासद करून घेणें व एखाद्या राष्ट्राचें सभासदत्त्व कायमचें किंवा तात्पुरतें रद्द करणें (६) सं. रा. सं. या संस्थेच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणें (७) आंतरराष्ट्रीय न्यायकोर्टातील न्यायाधिशांची निवडणूक करणें (८) सं. रा. सं. या संस्थेचा सर्वांत वरिष्ठ असा अधिकारी सेक्रेटरी जनरल याची निवडणूक सुरक्षितता मंडळाच्या शिफारशीनें करणें.

वरील बाबींखेरीज इतर गोष्टींसंबंधानें शिफारस करण्यास किंवा निर्णय घेण्यास सार्धे बहुमत पुरेसें असतें.

जनरल असेंब्ली खालील सहा निरनिराळ्या प्रश्नांसंबंधीं आपल्या सहा कमेट्या नेमते:—(१) राजकीय व सुरक्षितता या बाबींसंबंधाची कमिटी (२) आर्थिक बाबींसंबंधाची कमिटी (३) सामाजिक, सांस्कृतिक वगैरे बाबींसंबंधाची कमिटी (४) विश्वस्त मंडळ कमिटी (५) कारभार व जमाखर्च याची कमिटी (६) कायदा कमिटी.

या प्रत्येक कमिटीवर सं. रा. सं. या संस्थेचा सभासद असलेल्या प्रत्येक राष्ट्राचा सभासद असतो व त्यामुळें प्रत्येक राष्ट्रास वरील कमिट्यांच्या कार्यक्षेत्रांत येणाऱ्या बाबींसंबंधानें तपशीलवार चर्चा करितां येतें.

सुरक्षितता मंडळ— (Security Council) संयुक्त राष्ट्रसंघटनेचें सर्वांत महत्त्वाचे असें हें मंडळ असून यास बरेच अधिकार आहेत. यांत एकंदर ११ सभासद असतात, त्यांपैकीं (१) अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें (२) युनिअन ऑफ् सोव्हिएट रशिया (३) ग्रेट ब्रिटन (४) फ्रान्स (५) चीन या पांच बड्या राष्ट्रांचे प्रतिनिधी कायमचे सभासद असून बाकीच्या सहा सभासदांची दोन वर्षांपुरती निवडणूक जनरल असेंब्ली ही सभा करते. आंतर्राष्ट्रीय शांतता टिकविणें व निरनिराळ्या राष्ट्रांमधील तंटे सामोपचारानें मिटविणें हें महत्त्वाचें काम या मंडळाकडे असतें. एखाद्या राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रावर आक्रमण करून सुरक्षितता मंडळाचा निर्णय मान्य केला नाहीं

तर त्यो आक्रमक राष्ट्राविरुद्ध आर्थिक व जरूर पडल्यास लष्करी दंडयोजना अमलांत आणण्याचा अधिकार या मंडळास आहे. एखाद्या प्रश्नासंबंधानें निर्णय घेण्यास ११ सभासदांपैकीं ७ सभासदांचें अनकूल मत पाहिजे व या सातांमध्यें कायम असलेल्या पांच सभासदांचें अनकूल मत पाहिजे. यांपैकीं एकाचें मत अनकूल नसल्यास सुरक्षितता मंडळास त्या कामीं निर्णय घेतां यावयाचा नाहीं. अनकूल मत न देण्याच्या या अधिकारास "व्हेटोचा" (Veto नकार देण्याचा) अधिकार म्हणतात.

या सुरक्षितता मंडळास आपलें महत्त्वाचें काम वाटेल त्यावेळीं करतां यावें म्हणून या मंडळांतील ११ राष्ट्रांचे सभासद संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या मुख्य कचेरीच्या ठिकाणीं नेहमीं हजर असतात. त्यामुळें वाटेल त्यावेळीं या मंडळाची बैठक बोलावितां येतें. एखाद्या राष्ट्राविरुद्ध लष्करी दंडयोजना अमलांत आणण्याचे ठरल्यास त्या कामीं मदत व्हावी म्हणून (१) लष्करी कमेटी (२) अणुशक्ति कमेटी या कमेट्या नेमण्यांत आल्या आहेत. या महत्त्वाच्या कमेट्यांमध्यें कायम सभासद असलेल्या बड्या राष्ट्रांच्या प्रतिनिधींची नेमणूक केलेली असते. सुरक्षितता मंडळाचा निर्णय संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सर्व सभासदांवर बंधनकारक असतो.

आर्थिक व सामाजिक बाबींसंबंधाची कमेटी—जगांतील निरनिराळ्या राष्ट्रांतील लोकांची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक स्थिति सुधारावी, त्यांच्यांतील सलोखा वृद्धिंगत व्हावा व त्यासाठीं योग्य ते उपाय योजले जावेत यांसाठीं आर्थिक व सामाजिक प्रश्नांसंबंधाचें मंडळ नेमण्यांत आलेलें आहे. या मंडळांत १८ सभासद असून त्यांची निवडणूक जनरल असेंब्लीकडून होते. या कौंसिलची बैठक वर्षांतून तीन वेळां भरते, पण जरूर वाटल्यास जादा बैठकीही बोलाविण्यांत येतात. या कौंसिलच्या कार्यक्षेत्रांत कितीतरी विविध प्रकारचीं कामें येतात, व तीं योग्य प्रकारें व्हावींत म्हणून खालील कमिशनें नेमण्यांत आलीं आहेत. या कमिशनमध्यें बिनसरकारी सभासदांचीही मदत घेण्यांत येते:—(१) आर्थिक व नेमणुका या बाबींसंबंधाचें कमिशन (२) सामाजिक बाबींसंबंधाचें कमिशन (३) निरनिराळ्या राष्ट्रांतील महत्त्वाच्या अशा गोष्टींसंबंधाचे आकडे गोळा करण्याचें कमिशन (Statistics) (४) वहातुकीच्या साधनासंबंधाचें

(१) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता (२) सुरक्षितता मंडळांतील कायम नसलेल्या सभासदांची निवडणूक (३) आर्थिक व सामाजिक प्रश्नासंबंधाच्या मंडळांतील सभासदांची निवडणक (४) विश्वस्त मंडळांतील सभासदांची निवडणूक (५) संयुक्त राष्ट्रसंघटना या संस्थेमध्यें नवीन सभासद करून घेणें व एखाद्या राष्ट्राचें सभासदत्त्व कायमचें किंवा तात्पुरतें रद्द करणें (६) सं. रा. सं. या संस्थेच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणें (७) आंतरराष्ट्रीय न्यायकोर्टांतील न्यायाधिशांची निवडणूक करणें (८) सं. रा. सं. या संस्थेचा सर्वांत वरिष्ठ असा अधिकारी सेक्रेटरी जनरल याची निवडणूक सुरक्षितता मंडळाच्या शिफारशीनें करणें.

वरील बाबींखेरीज इतर गोष्टींसंबंधानें शिफारस करण्यास किंवा निर्णय घेण्यास साधें बहुमत पुरेसें असतें.

जनरल असेंब्ली खालील सहा निरनिराळ्या प्रश्नांसंबंधीं आपल्या सहा कमेट्या नेमते:—(१) राजकीय व सुरक्षितता या बाबींसंबंधाची कमिटी (२) आर्थिक बाबींसंबंधाची कमिटी (३) सामाजिक, सांस्कृतिक वगैरे बाबींसंबंधाची कमिटी (४) विश्वस्त मंडळ कमिटी (५) कारभार व जमाखर्च याची कमिटी (६) कायदा कमिटी.

या प्रत्येक कमिटीवर सं. रा. सं. या संस्थेचा सभासद असलेल्या प्रत्येक राष्ट्राचा सभासद असतो व त्यामुळें प्रत्येक राष्ट्रास वरील कमिट्यांच्या कार्यक्षेत्रांत येणाऱ्या बाबींसंबंधानें तपशीलवार चर्चा करितां येतें.

सुरक्षितता मंडळ— (Security Council) संयुक्त राष्ट्रसंघटनेचें सर्वांत महत्त्वाचे असें हें मंडळ असून यास बरेच अधिकार आहेत. यांत एकंदर ११ सभासद असतात, त्यांपैकीं (१) अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें (२) युनिअन ऑफ् सोव्हिएट रशिया (३) ग्रेट ब्रिटन (४) फ्रान्स (५) चीन या पांच बड्या राष्ट्रांचे प्रतिनिधी कायमचे सभासद असून बाकीच्या सहा सभासदांची दोन वर्षांपुरती निवडणूक जनरल असेंब्ली ही सभा करते. आंतर्राष्ट्रीय शांतता टिकविणें व निरनिराळ्या राष्ट्रांमधील तंटे सामोपचारानें मिटविणें हें महत्त्वाचें काम या मंडळाकडे असतें. एखाद्या राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रावर आक्रमण करून सुरक्षितता मंडळाचा निर्णय मान्य केला नाहीं

तर त्यो आक्रमक राष्ट्राविरुद्ध आर्थिक व जरूर पडल्यास लष्करी दंडयोजना अमलांत आणण्याचा अधिकार या मंडळास आहे. एखाद्या प्रश्नासंबंधानें निर्णय घेण्यास ११ सभासदांपैकीं ७ सभासदांचें अनकूल मत पाहिजे व या सातांमध्यें कायम असलेल्या पांच सभासदांचें अनकूल मत पाहिजे. यांपैकीं एकाचें मत अनकूल नसल्यास सुरक्षितता मंडळास त्या कामीं निर्णय घेतां यावयाचा नाहीं. अनकूल मत न देण्याच्या या अधिकारास " व्हेटोचा " (Veto नकार देण्याचा) अधिकार म्हणतात.

या सुरक्षितता मंडळास आपलें महत्त्वाचें काम वाटेल त्यावेळीं करतां यावें म्हणून या मंडळांतील ११ राष्ट्रांचे सभासद संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या मुख्य कचेरीच्या ठिकाणीं नेहमीं हजर असतात. त्यामुळें वाटेल त्यावेळीं या मंडळाची बैठक बोलावितां येतें. एखाद्या राष्ट्राविरुद्ध लष्करी दंडयोजना अमलांत आणण्याचे ठरल्यास त्या कामीं मदत व्हावी म्हणून (१) लष्करी कमेटी (२) अणुशक्ति कमेटी या कमेट्या नेमण्यांत आल्या आहेत. या महत्त्वाच्या कमेट्यांमध्यें कायम सभासद असलेल्या बड्या राष्ट्रांच्या प्रतिनिधींची नेमणूक केलेली असते. सुरक्षितता मंडळाचा निर्णय संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सर्व सभासदांवर बंधनकारक असतो.

आर्थिक व सामाजिक बाबींसंबंधाची कमेटी—जगांतील निरनिराळ्या राष्ट्रांतील लोकांची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक स्थिति सुधारावी, त्यांच्यांतील सलोखा वृद्धिंगत व्हावा व त्यासाठीं योग्य ते उपाय योजले जावेत यांसाठीं आर्थिक व सामाजिक प्रश्नांसंबंधाचें मंडळ नेमण्यांत आलेलें आहे. या मंडळांत १८ सभासद असून त्यांची निवडणूक जनरल असेंब्लीकडून होते. या कौंसिलची बैठक वर्षांतून तीन वेळां भरते, पण जरूर वाटल्यास जादा बैठकीही बोलाविण्यांत येतात. या कौंसिलच्या कार्यक्षेत्रांत कितीतरी विविध प्रकारचीं कामें येतात, व तीं योग्य प्रकारें व्हावींत म्हणून खालील कमिशनें नेमण्यांत आलीं आहेत. या कमिशनमध्यें बिनसरकारी सभासदांचीही मदत घेण्यांत येते:—(१) आर्थिक व नेमणुका या बाबींसंबंधाचें कमिशन (२) सामाजिक बाबींसंबंधाचें कमिशन (३) निरनिराळ्या राष्ट्रांतील महत्त्वाच्या अशा गोष्टींसंबंधाचे आकडे गोळा करण्याचें कमिशन (Statistics) (४) वहातुकीच्या साधनासंबंधांचें

कमिशन (५) मानवी हक्कासंबंधाचें कमिशन (६) मादक द्रव्यासंबंधाचें कमिशन (७) शैक्षणिक, सांस्कृतिक व शास्त्रीय बाबींसंबंधाचें कमिशन (८) स्त्रियांच्या दर्जासंबंधाचें कमिशन (९) अन्न व शेतकीविषयक प्रश्नासंबंधाचें कमिशन (१०) आंतर्राष्ट्रीय मजूरसंघटना या संबंधाचें कमिशन, अशीं निरनिराळीं कमिशनें नेमण्यांत आलेलीं आहेत व जरूर वाटल्यास आणखीही कमिशनें नेमण्यांत येतात.

विश्वस्त मंडळ (Trusteeship Council)— जगांतील क्षेत्रफळाचा सुमारें $\frac{1}{4}$ भाग व त्यांत राहणारे सुमारे २५ कोटी लोक मागासलेले आहेत व ते स्वसत्ताक नाहींत. यांत ग्रेट ब्रिटन, फ्रान्स, बेल्जम या राष्ट्रांच्या साम्राज्यांत मोडणारे अंकित व मागासलेले प्रदेश येतात त्याचप्रमाणें १ ल्या महायुद्धांत जर्मनी, तुर्कस्थान वगैरे राष्ट्रांकडून त्यांच्या अंकित असलेला जो प्रदेश दोस्त राष्ट्रांनीं जिंकून घेतला त्यांपैकीं कांहीं प्रदेश येतो. या मागासलेल्या लोकांचें पालकत्व ग्रेट ब्रिटन, फ्रान्स, बेल्जम, दक्षिण आफ्रिका वगैरे पुढारलेल्या राष्ट्रांकडे आहे. तेव्हां अशा प्रकारच्या स्वसत्ताक नसलेल्या व मागासलेल्या लोकांसंबंधाच्या प्रश्नासंबंधीं 'विश्वस्त मंडळ' हें कौन्सिल नेमण्यांत आलें आहे. या मागासलेल्या लोकांची सुधारणा व्हावी व ते लोक स्वतंत्र व स्वसत्ताक व्हावेत या उद्देशानें या मंडळानें खालील गोष्टी केल्या आहेत:—

(१) मागासलेल्या लोकांचें पालकत्व ज्यांच्याकडे आहे त्या राष्ट्रांनीं या मागासलेल्या लोकांच्या हिताच्या दृष्टीनें तेथील राज्यकारभार करावा.

(२) या मागासलेल्या लोकांची सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय बाबतींत सुधारणा करून त्यांस स्वसत्ताक व स्वतंत्र करण्याचा प्रयत्न करावा.

(३) या मागासलेल्या लोकांची निरनिराळ्या बाबतींत किती प्रगति होत आहे हें दाखविणारा एक अहवाल दरवर्षी संयुक्त राष्ट्रसंघटनेकडे पाठवावा.

या विश्वस्त मंडळामध्यें किती सभासद असावेत त्याची संख्या ठरलेली नाहीं. पण या मागासलेल्या राष्ट्राचें पालकत्व ज्यांच्याकडे आहे त्या राष्ट्रांचे प्रतिनिधी, सुरक्षितता मंडळांतील कायम सभासदांचे प्रतिनिधी व जनरल असेंब्लीनें निवडलेले प्रतिनिधी असे एकूण १० सभासद सध्यां या कौंसिलमध्यें आहेत.

या मंडळाकडून मागासलेल्या प्रदेशांतील लोकांसंबंधीं आलेल्या अर्जांचा

विचार करणें, त्या प्रदेशांस वेळोवेळीं भेटी देणें, त्या प्रदेशांतील लोकांच्या प्रगतीसंबंधीं माहिती गोळा करणें व या बाबींसंबंधीं सं. रा. सं. या संस्थेच्या जनरल असेंब्लीकडे रिपोर्ट पाठविणें वगैरें कामें करण्यांत येतात.

आंतर्राष्ट्रीय न्यायकोर्ट—राष्ट्रांराष्ट्रांतील तंट्यांचा निवाडा करण्यासाठीं व अशाच प्रकारच्या प्रश्नांसंबंधीं सल्ला देण्यासाठीं आंतर्राष्ट्रीय न्यायकोर्ट (International Court of Justice) स्थापन झालेलें आहे. हें कोर्ट हॉलंडमधील हेग या ठिकाणीं भरतें, पण जरूर वाटल्यास तें इतर कोणत्याही ठिकाणीं भरवितां येतें. संयुक्त राष्ट्रसंघटना या संस्थेच्या सभासद असलेल्या निरनिराळ्या राष्ट्रांतील कायद्याच्या व न्याय देण्याच्या कामांत ज्यांनीं प्राविण्य संपादन केलें आहे अशा १५ न्यायधिशांची निवडणूक सुरक्षितता मंडळ व जनरल असेंब्ली या दोन संस्थांच्या संमतीनें या न्यायकोर्टासाठीं करण्यांत येते. या १५ न्यायाधिशांपैकीं एकाच राष्ट्राचे दोन न्यायाधीश असूं नयेत असें ठरविण्यांत आलें आहे. एकदां निवडणूक झाली म्हणजे ९ वर्षेपर्यंत या न्यायाधिशांना या न्यायकोर्टांत काम करितां येतें. कोणत्याही राष्ट्राच्या उच्चनीच दर्जाकडे न पाहतां आंतर्राष्ट्रीय कायदा, सुधारलेल्या राष्ट्रांमध्यें सर्वसंमत असलेले प्रघात, व तहनामे विचारांत घेऊन योग्य तो न्याय देण्याचें काम हें न्यायकोर्ट करतें. संयुक्त राष्ट्रसंघटना या संस्थेचे सभासद असलेल्या राष्ट्रांनीं एकमेकांशीं वितुष्ट आल्यास आपल्या तंट्याचा निवाडा करून घेण्यासाठीं तो तंटा सुरक्षितता मंडळाकडे नेला पाहिजे असें बंधन आहे. या तंट्याचा निवाडा करण्याचें काम आंतर्राष्ट्रीय न्यायकोर्टाकडे सोंपविणें जरूर आहे असें सुरक्षितता मंडळास वाटल्यास तसें करण्यांत येतें. एखाद्या राष्ट्रानें या आंतर्राष्ट्रीय न्यायकोर्टाचा निर्णय न जुमानल्यास त्या बाबतींत कोणती उपाययोजना करावयाची हें सुरक्षिततामंडळ ठरवितें. सुरक्षितता-मंडळाच्या सूचनेवरून त्या राष्ट्रावर बहिष्कार घालणें, त्या राष्ट्राशीं असलेले सर्व आर्थिक व्यवहार बंद ठेवणें किंवा जरूर वाटल्यास त्या राष्ट्रास सं. रा. संघटनेचे शत्रू समजून त्याच्याशीं युद्ध पुकारणें वगैरे गोष्टी करण्यांत येतात. सुरक्षितता मंडळाकडून बहिष्कार व युद्धाची धमकी यानींच बहुधा हें राष्ट्र वठणीवर येतें.

राष्ट्रांराष्ट्रांतील तंट्याचा निवाडा करण्याचें काम जसें या न्यायकोर्टाकडून करण्यांत येतें, त्याचप्रमाणें जनरल असेंब्ली, सुरक्षितता मंडळ यांनीं विनंती

केल्यास एखाद्या प्रश्नासंबंधीं कायद्याच्या बाबतींत सल्ला देण्याचें कामही या न्यायकोर्टाकडे सोपविण्यांत येतें.

सेक्रेटरीएट कचेरी—सं. रा. संघटनेचे वरील विविध व प्रचंड काम योग्यरीतीनें व्हावें आणि निरनिराळीं मंडळें, कमेट्या व कमीशनें यांमध्यें एकसूत्रता रहावी व या संस्थेकडून होणाऱ्या कामाची जगांतील सर्वांस माहिती व्हावी म्हणून **न्यू यॉर्क** या ठिकाणीं एक मोठी सेक्रेटरीएट कचेरी स्थापन केलेली आहे. या कचेरिमध्यें सं. रा. सं. या संस्थेचे नोकर व या कचेरीच्या देखरेखीखालीं काम करणारे व आपल्या कामांत वाकबगार असलेले असे सुमारे १००० वर स्त्रीपुरुष काम करीत असतात. निरनिराळ्या राष्ट्रांतील हुशार, तज्ज्ञ व वाकबगार अशा लोकांची या कामासाठीं नेमणूक करण्यांत येते. या सेक्रेटरीएटमधल्या सर्वांत मुख्य अधिकाऱ्यास '**सेक्रेटरी जनरल**' म्हणतात, व त्याची निवडणूक सुरक्षितता मंडळाच्या शिफारशीवरून जनरल असेंब्ली या मंडळाकडून करण्यांत येते.

संयुक्त राष्ट्रसंघटना या संस्थेस लागणारा खर्च— जगांत शांतता रहावी व स्वास्थ्य नांदावें म्हणून सं. रा. सं. मार्फत वर निर्देश केलेल्या विविध कामासाठीं खर्चही लागतो. हा वार्षिक खर्च सध्यां सुमारें ७० लाख पौंड किंवा ९० कोटी रुपये आहे. जगांतील सर्व राष्ट्रांच्या लष्करी, आरमारी व वैमानिक बाबींसंबंधाच्या वार्षिक खर्चाच्या मानानें ही रक्कम फारच अल्प आहे. सं. रा. स. लागणारी ही रक्कम या संघटनेंत सामील असलेल्या सुमारें ६० राष्ट्रांकडून त्या राष्ट्रांचा विस्तार, लोकसंख्या, उत्पन्न व महत्त्व या गोष्टी विचारांत घेऊन कांहीं ठराविक प्रमाणांत जमा करण्यांत येते. यांपैकीं सर्वांत जास्त वर्गणी म्हणजे सुमारें १७ कोटी रुपये अ. सं. सं. यांकडून १० कोटी रु. ग्रेट ब्रिटनकडून ५ कोटी रु. सोव्हिएट रशियाकडून घेण्यांत येते.

(३) जागतिक घडामोडी (१९४५-५३)

ठिकठिकाणच्या स्वातंत्र्य चळवळी व नवीन राष्ट्रांची स्थापना— मे १९४५ मध्यें जर्मनी व सप्टेंबर १९४५ मध्यें जपान दोस्त राष्ट्रांस शरण आल्यावर २ रें महायुद्ध थांबविण्यांत आलें, व २४ आक्टोबर १९४५ रोजीं संयुक्त राष्ट्रसंघटना ही संस्था स्थापन झाली तरी जगांत शांतता प्रस्थापित झाली

नाहीं. ग्रेट ब्रिटन, फ्रान्स, डच, पोर्तुगीज, या राष्ट्रांच्या वर्चस्वाखालीं असलेल्या आशिया व आफ्रिका खंडांतील देशांत परकीयांचें वर्चस्व झुगारून देण्यासाठीं स्वातंत्र्य चळवळी सुरू झाल्या व पूर्वीपासून सुरू असलेल्या चळवळीस जोर आला. त्याचप्रमाणें २ ऱ्या महायुद्धांत झालेली भयंकर प्राणहानी, मालमत्तेचा मोठ्या प्रमाणांत झालेला विध्वंस, निरनिराळ्या राष्ट्रांची झालेली कर्जबाजारी स्थिति, उद्योगधंदे बंद पडल्यामुळें वाढलेली बेकारी, अन्नधान्य व जीवनोपयोगी वस्तूंच्या तुटवड्यामुळें उत्पन्न झालेली दुष्काळग्रस्त परिस्थिति यामुळें ठिक-ठिकाणच्या दडपल्या गेलेल्या, गांजलेल्या, श्रमजीवी व कामगार व मजूरवर्गास या परिस्थितींतून सुटका होण्यासाठीं दंगेधोपे करून आपल्या हातीं राज्यसत्ता घेण्याची इच्छा उत्पन्न होऊन त्यांच्यामध्यें कम्युनिस्ट विचारांचा फैलाव होऊं लागला, व या वर्गास लोकशाही पद्धतीच्या कामाचा अनुभव नसल्यामुळें तेथें सर्वाधिकारी पद्धतीची राज्यव्यवस्था स्थापन होईल किंवा अंदाधुंदी व बेबंदशाही निर्माण होईल असें वाटूं लागलें. अशी परिस्थिति निर्माण झाली तसेंच हिंदुस्थानांतील स्वातंत्र्य चळवळीचा जोर व ती आवरतां येणें शक्य नाहीं हें पाहून ब्रिटिशांनीं हिंदुस्थानचें भारत व पाकिस्तान असे दोन विभाग केले व त्यांस स्वराज्याचे अधिकार देऊन १५ ऑगस्ट १९४७ रोजीं हिंदुस्थानांतून सत्तात्याग केला व यानंतर भारत व पाकिस्तान हीं दोन स्वतंत्र लोकसत्ताक राज्यें स्थापन झालीं. त्याचप्रमाणें ब्रिटिशांनीं ४ जानेवारी १९४८ रोजीं ब्रह्मदेशांतून व ४ फेब्रुवारी १९४८ रोजीं सीलोनमधून सत्तात्याग केला व तेथेंही स्वतंत्र लोकसत्ताक राज्यें स्थापन झालीं.

इंडोनेशिया (जाव्हा, सुमात्रा, बाली वगैरे) हा प्रदेश १७ व्या शतकापासून डचांच्या वर्चस्वाखालीं होता. २ ऱ्या महायुद्धांत १९४१-४२ च्या दरम्यान तो जपाननें जिंकून घेतला, व जपानचा पराभव झाल्यावर त्यावर डचांनीं पुनः आपलें वर्चस्व बसविलें. तेव्हां तेथें स्वातंत्र्य चळवळ सुरू झाली, व इंडोनेशियन लोक व डच यांच्यामध्यें किरकोळ युद्धप्रसंग होऊन डचांनीं २७ डिसेंबर १९४९ मध्यें इंडोनेशियाचें स्वातंत्र्य मान्य केलें व तेथें स्वतंत्र लोकसत्ताक राज्य स्थापन झालें. फिलीपाईन बेटें हीं अ. सं. संस्थानें याच्या वर्चस्वाखालीं असून त्यांस बऱ्याच बाबतींत स्वराज्याचे अधिकार होते, व ४ जुलै १९४६ मध्यें त्यांचें पूर्ण स्वातंत्र्य अ. सं. संस्थानें या राष्ट्रानें मान्य केलें.

केल्यास एखाद्या प्रश्नासंबंधीं कायद्याच्या बाबतींत सल्ला देण्याचें कामही या न्यायकोर्टाकडे सोपविण्यांत येतें.

सेक्रेटरीएट कचेरी—सं. रा. संघटनेचे वरील विविध व प्रचंड काम योग्यरीतीनें व्हावें आणि निरनिराळीं मंडळें, कमेट्या व कमीशनें यांमध्यें एकसूत्रता रहावी व या संस्थेकडून होणाऱ्या कामाची जगांतील सर्वांस माहिती व्हावी म्हणून **न्यू यॉर्क** या ठिकाणीं एक मोठी सेक्रेटरीएट कचेरी स्थापन केलेली आहे. या कचेरिमध्यें सं. रा. सं. या संस्थेचे नोकर व या कचेरीच्या देखरेखीखालीं काम करणारे व आपल्या कामांत वाकबगार असलेले असे सुमारे १००० वर स्त्रीपुरुष काम करीत असतात. निरनिराळ्या राष्ट्रांतील हुशार, तज्ज्ञ व वाकबगार अशा लोकांची या कामासाठीं नेमणूक करण्यांत येते. या सेक्रेटरीएटमधल्या सर्वांत मुख्य अधिकाऱ्यास '**सेक्रेटरी जनरल**' म्हणतात, व त्याची निवडणूक सुरक्षितता मंडळाच्या शिफारशीवरून जनरल असेंब्ली या मंडळाकडून करण्यांत येते.

संयुक्त राष्ट्रसंघटना या संस्थेस लागणारा खर्च— जगांत शांतता रहावी व स्वास्थ्य नांदावें म्हणून सं. रा. सं. मार्फत वर निर्देश केलेल्या विविध कामासाठीं खर्चही लागतो. हा वार्षिक खर्च सध्यां सुमारें ७० लाख पौंड किंवा ९० कोटी रुपये आहे. जगांतील सर्व राष्ट्रांच्या लष्करी, आरमारी व वैमानिक बाबींसंबंधाच्या वार्षिक खर्चाच्या मानानें ही रक्कम फारच अल्प आहे. सं. रा. स. लागणारी ही रक्कम या संघटनेंत सामील असलेल्या सुमारें ६० राष्ट्रांकडून त्या राष्ट्रांचा विस्तार, लोकसंख्या, उत्पन्न व महत्त्व या गोष्टी विचारांत घेऊन कांहीं ठराविक प्रमाणांत जमा करण्यांत येते. यांपैकीं सर्वांत जास्त वर्गणी म्हणजे सुमारें १७ कोटी रुपये अ. सं. सं. यांकडून १० कोटी रु. ग्रेट ब्रिटनकडून ५ कोटी रु. सोव्हिएट रशियाकडून घेण्यांत येते.

(३) जागतिक घडामोडी (१९४५–५३)

ठिकठिकाणच्या स्वातंत्र्य चळवळी व नवीन राष्ट्रांची स्थापना— मे १९४५ मध्यें जर्मनी व सप्टेंबर १९४५ मध्यें जपान दोस्त राष्ट्रांस शरण आल्यावर २ रें महायुद्ध थांबविण्यांत आलें, व २४ आक्टोबर १९४५ रोजीं संयुक्त राष्ट्रसंघटना ही संस्था स्थापन झाली तरी जगांत शांतता प्रस्थापित झाली

नाहीं. ग्रेट ब्रिटन, फ्रान्स, डच, पोर्तुगीज, या राष्ट्रांच्या वर्चस्वाखालीं असलेल्या आशिया व आफ्रिका खंडांतील देशांत परकीयांचें वर्चस्व झुगारून देण्यासाठीं स्वातंत्र्य चळवळी सुरू झाल्या व पूर्वीपासून सुरू असलेल्या चळवळीस जोर आला. त्याचप्रमाणें २ ऱ्या महायुद्धांत झालेली भयंकर प्राणहानी, मालमत्तेचा मोठ्या प्रमाणांत झालेला विध्वंस, निरनिराळ्या राष्ट्रांची झालेली कर्जबाजारी स्थिति, उद्योगधंदे बंद पडल्यामुळें वाढलेली बेकारी, अन्नधान्य व जीवनोपयोगी वस्तूंच्या तुटवड्यामुळें उत्पन्न झालेली दुष्काळग्रस्त परिस्थिति यामुळें ठिकठिकाणच्या दडपल्या गेलेल्या, गांजलेल्या, श्रमजीवी व कामगार व मजूरवर्गांस या परिस्थितींतून सुटका होण्यासाठीं दंगेधोपे करून आपल्या हातीं राज्यसत्ता घेण्याची इच्छा उत्पन्न होऊन त्यांच्यामध्यें कम्युनिस्ट विचारांचा फैलाव होऊं लागला, व या वर्गास लोकशाही पद्धतीच्या कामाचा अनुभव नसल्यामुळें तेथें सर्वाधिकारी पद्धतीची राज्यव्यवस्था स्थापन होईल किंवा अंदाधुंदी व बेबंदशाही निर्माण होईल असें वाटूं लागलें. अशी परिस्थिति निर्माण झाली तसेंच हिंदुस्थानांतील स्वातंत्र्य चळवळीचा जोर व ती आवरतां येणें शक्य नाहीं हें पाहून ब्रिटिशांनीं हिंदुस्थानचें भारत व पाकिस्तान असे दोन विभाग केले व त्यांस स्वराज्याचे अधिकार देऊन १५ ऑगस्ट १९४७ रोजीं हिंदुस्थानांतून सत्तात्याग केला व यानंतर भारत व पाकिस्तान हीं दोन स्वतंत्र लोकसत्ताक राज्यें स्थापन झालीं. त्याचप्रमाणें ब्रिटिशांनीं ४ जानेवारी १९४८ रोजीं ब्रह्मदेशांतून व ४ फेब्रुवारी १९४८ रोजीं सीलोनमधून सत्तात्याग केला व तेथेंही स्वतंत्र लोकसत्ताक राज्यें स्थापन झालीं.

इंडोनेशिया (जाव्हा, सुमात्रा, बाली वगैरे) हा प्रदेश १७ व्या शतकापासून डचांच्या वर्चस्वाखालीं होता. २ ऱ्या महायुद्धांत १९४१-४२ च्या दरम्यान तो जपाननें जिंकून घेतला, व जपानचा पराभव झाल्यावर त्यावर डचांनीं पुनः आपलें वर्चस्व बसविलें. तेव्हां तेथें स्वातंत्र्य चळवळ सुरू झाली, व इंडोनेशियन लोक व डच यांच्यामध्यें किरकोळ युद्धप्रसंग होऊन डचांनीं २७ डिसेंबर १९४९ मध्यें इंडोनेशियाचें स्वातंत्र्य मान्य केलें व तेथें स्वतंत्र लोकसत्ताक राज्य स्थापन झालें. फिलीपाईन बेटें हीं अ. सं. संस्थानें याच्या वर्चस्वाखालीं असून त्यांस बऱ्याच बाबतींत स्वराज्याचे अधिकार होते, व ४ जुलै १९४६ मध्यें त्यांचें पूर्ण स्वातंत्र्य अ. सं. संस्थानें या राष्ट्रानें मान्य केलें.

चीनमध्यें कम्युनिस्टांचें राज्य (Central People's Government of China)—चीनमध्यें १९२५ पासून कम्युनिस्ट विचारांचा फैलाव होत होता. १९२८ मध्यें चँग काय शेक हा चीनचा अध्यक्ष झाल्यावर त्यानें चिनी कम्युनिस्टांचा मोड करण्याचा प्रयत्न केला. पण या कामीं त्यास यश आलें नाहीं. २ ऱ्या महायुद्धाच्या वेळीं जपानशीं युद्ध करण्यांत कम्युनिस्टांनीं स्वतंत्ररीतीनें भाग घेतला व युद्ध संपल्यावर त्यांनीं मांचुरियामध्यें आपलें वर्चस्व स्थापन केलें. चीनमधील बहुजनसमाजाचें या पक्षास पाठबळ मिळत गेलें. त्याचप्रमाणें सोव्हिएट रशियानेंहि त्यांस मदत करून युद्धसाहित्य दिलें. हलकें हलकें कम्युनिस्ट लोकांनीं मंगोलिया, चीनच्या उत्तरेकडील प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणले. १९४९ मध्यें त्यांनीं राजधानी पायपिंग (पूर्वीचें नांव पेकिंग), त्यानंतर नानकिंग घेतलें व चीनच्या दक्षिण विभागावरही आपलें वर्चस्व बसविलें व १ आक्टोबर १९४९ रोजीं 'चीनचें मध्यवर्ती जनता राज्य' (Central People's Government of China) स्थापन झाल्याचें जाहीर केलें. माओ–त्से–तुंग (Mao Tse-tung) हा या लोकसत्ताक राज्याचा अध्यक्ष झाला. चिनी कम्युनिस्टांनीं चीनचा बहुतेक सर्व प्रदेश व्यापल्यामुळें चँग कै शेक यानें ७ डिसेंबर १९४९ रोजीं फार्मोसा बेटाकडे पळ काढला व तेथें आपलें सरकार स्थापन केलें. त्यास अ. सं. संस्थानें या राष्ट्राची मदत आहे, व संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सेक्युरिटी कौन्सिलमध्यें फार्मोसा येथील सरकारचा प्रतिनिधी चीनचा प्रतिनिधी म्हणून भाग घेतो. चीनमध्यें स्थापन झालेल्या कम्युनिस्ट राज्यास भारतानें व इतर बऱ्याच राष्ट्रांनीं मान्यता दिली आहे, पण अ. सं. सं. या राष्ट्रानें मान्यता दिलेली नाहीं.

भारताचें स्वतंत्र लोकसत्ताक संघराज्य—भारताचें स्वतंत्र लोकसत्ताक संघ राज्य स्थापन झाल्यावर भारतानें आपली बरीच प्रगति करून जगांतील प्रमुख राष्ट्रांत महत्त्वाचें स्थान मिळविलें आहे. भारतास हे स्थान प्राप्त होण्यास भारताचे मुख्य प्रधान पंडित जवाहिरलाल नेहरू यांचे श्रम पुष्कळ अंशीं कारणीभूत झाले आहेत. जगांत आज अ. सं. संस्थानें या राष्ट्राच्या नेतृत्वाखालीं लोकशाही विचारसरणीच्या राष्ट्रांचा गट व सोव्हिएट रशिया या राष्ट्राच्या नेतृत्वाखालीं कम्युनिस्ट विचारसरणीच्या राष्ट्रांचा गट असे दोन गट आहेत व या गटांमध्यें वैचारिक संघर्ष सुरू आहे.

भारत हें लोकशाही पद्धतीचें लोकसंख्येच्या दृष्टीनें सर्वांत मोठें असें राष्ट्र आहे, तरी वरील दोन गटांपैकीं कोणत्याही गटांत भारत सामील झालेलें नाहीं. सर्वांशीं मैत्री ठेवणें, व आपल्या राष्ट्राची औद्योगिक बाबतींत प्रगति करून घेणें हें भारताचें धोरण आहे. यासाठीं भारतानें दोन पंचवार्षिक योजना आंखल्या आहेत. राजकीय बाबतींत सहिष्णुतेचें धोरण ठेवल्यासच जगांत शांतता स्थापन होईल व संघर्ष निर्माण होणार नाहीं असें भारतास वाटतें. या धोरणास अनुसरून चीनच्या परराष्ट्रीय प्रधानांनीं भारतास नुकतीच भेट दिली होती त्यावेळीं भारतानें व चीननें मिळून जगांत शांतता राहण्यासाठीं **पंचशीला तत्त्वांचा** पुरस्कार केला व त्यांस जगांतील बऱ्याच प्रमुख राष्ट्रांनींही मान्यता दिली. हीं पंचशीला तत्त्वें खालील होत :—

(१) प्रत्येक राष्ट्रानें एकमेकांच्या प्रदेशावरील सार्वभौमत्वाबद्दल मान्यता द्यावी.

(२) एकमेकांच्या प्रदेशावर आक्रमण करूं नये.

(३) राजकीय, आर्थिक, वैचारिक सबबींवर इतर राष्ट्रांच्या अंतस्थ बाबतींत ढवळावळ करूं नये.

(४) सर्वांच्या हितासाठीं एकमेकांशीं बरोबरीच्या नात्यानें वागावें.

(५) निरनिराळ्या मतप्रणालीच्या राष्ट्रांनीं एकमेकांबद्दल सहिष्णुता ठेवून शांततेनें रहावें.

जगांतील संघर्षाचे प्रश्न—लोकशाही व कम्युनिस्ट या दोन विचारसरणींमध्यें भिन्नता आहे व आपल्या विचारसरणीचा फैलाव व्हावा असें या विचारसरणीच्या प्रमुख राष्ट्रांस वाटतें व त्यामुळें त्यांच्यामध्यें संघर्ष उत्पन्न झालेला आहे. त्यामुळें जर्मनी, इंडोचायना, कोरिया या देशांत तेथील सर्व लोकांचें एक राज्य होऊं शकत नाहीं. फ्रेंचांनीं भारतामधील आपलीं ठाणीं सोडून सत्तात्याग केला पण पोर्तुगीजांनीं भारतांतील आपलीं गावे वगैरे ठाणीं सोडलीं नाहींत.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांक. 20422 दि: 31/12/74 अनुक्रमांक 643 नों: दि: 1/12/74

सारांश

(१) **२ रें महायुद्ध** (१९३९–४५)–हिटलरनें जर्मनीवर व्हर्सेल्सच्या तहानें घातलेलीं बंधनें झुगारून दिलीं, व सैन्य, आरमार, वैमानिक दलांत वाढ. १९३८ आस्ट्रिया, १९३९ झेकोस्लोव्हाकिया काबीज व १ सप्टेंबर १९३९ पोलंडवर

आक्रमण. ३ सप्टेंबर ग्रेट ब्रिटन व फ्रान्स यांनीं जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारलें. **दोस्त राष्ट्रें:**–ग्रेट ब्रिटन, फ्रान्स, ब्रिटिश साम्राज्य व कॉमनवेल्थमधील राष्ट्रें, चीन, डिसें. १९४१ मध्यें अ. सं. संस्थाने व नंतर इतर राष्ट्रें. जून १९४० पासून चर्चिल मुख्य प्रधान. **शत्रुराष्ट्रें:**–जर्मनी, १९४० पासून इटली, १९४१ पासून जपान, सप्टें. १९३९ ते जून १९४० पर्यंत हिटलरचें ग्रेट ब्रिटन खेरीज युरोपवर वर्चस्व. १९४०–४१ मध्यें उत्तर आफ्रिकेवर वर्चस्व बसविण्यांत जर्मनी व इटलीस अपयश. ग्रेट ब्रिटनवर पाणबुड्या बोटींनीं व्यापारीं जहाजें बुडविण्याची व वैमानिक हल्ल्याची मोहीम, पण ग्रेट ब्रिटनच्या वैमानिक दलाचा प्रतिकार. १९४१ जर्मनीची रशियावर स्वारी, मास्को व लेनिनग्रॅड घेण्यांत अपयश. १९४२ मध्यें स्टॅलिनग्रॅड घेण्यांत अपयश. ७ डिसेंबर १९४१, १९४१ आगस्ट, रुझवेल्ट व चर्चिल यांची भेट, घोषणा, अटलांटिक सनद. ७ डिसें. १९४१ जपाननें पर्ल हार्बरवर हल्ला केला. अ. सं. सं. युद्धांत सामील. १९४१ डिसेंबर ते १९४२ मे जपाननें पूर्व आशियांतील प्रदेश जिंकला; मॅक आर्थरची आस्ट्रेलियांत रवानगी व जपानला विरोध. १९४२ मार्च पासून ग्रेट ब्रिटनचे जर्मनीवर वैमानिक हल्ले. १९४३ उत्तर आफ्रिका व भूमध्य समुद्रावर दोस्तांचें वर्चस्व. जुलै सिसलवर स्वारी. ३ सप्टेंबर इटली शरण, मुसलेनी पदच्युत व ८ मे १९४५ जर्मनी शरण. आगस्ट १९४५ हीरोशामा व नागासाकीवर ॲटमबाँब. जपानचें तहाचें बोलणें व २ सप्टेंबर युद्ध थांबलें.

कम्युनिस्ट रशिया व लोकशाही अ. सं. सं., ग्रेट ब्रिटन व फ्रान्स यांच्यामध्यें मतभेद, तह ठरविण्याचें लांबणीवर.

(२) **संयुक्त राष्ट्रसंघटना**–पहिले प्रयत्न १९०६–१९२०, राष्ट्रसंघ १९२०–१९३९; रुझवेल्ट, चर्चिल व स्टॅलिन यांच्या पुढाकारानें व इतर राष्ट्रांच्या सहकार्यानें २४ आक्टोबर १९४५ रोजीं संयुक्त राष्ट्रसंघटनेची अमेरिकेंत स्थापना. उद्दिष्ट–राष्ट्रांराष्ट्रांतील तंटे तडजोडीनें मिटविणें, सांस्कृतिक, आर्थिक, आरोग्याविषयक, शैक्षणिक वगैरे बाबतींत सहकार्य करणें असेंब्ली (सर्व सभासद राष्ट्रें), सेक्युरिटी कौंसिल (११ सभासद, पैकीं ५ कायमचे), त्यांस व्हेटोचा (नकार देण्याचा) अधिकार, आर्थिक व सामाजिक बाबींसंबंधाची कमिटी (१८ सभासद), व त्यांच्या इतर कमेट्या, विश्वस्त मंडळ (मागासलेल्या राष्ट्रांसंबंधी कार्य) सेक्रेटरीएट कचेरी. सेक्युरिटी कौंसिल सर्वांत महत्त्वाची कमिटी व तिला जास्ती अधिकार.

परिशिष्ट २

पारिभाषिक शब्दांची यादी

खालीं पारिभाषिक शब्दांची यादी दिलेली आहे. यांपैकीं कांहीं पारिभाषिक इंग्लिश शब्द मराठी भाषेंतहीं रूढ झाले आहेत.

Absolute power—अनियंत्रित सत्ता.

Aristocracy—सरदारांच्या व खानदानीच्या वर्गांच्या हातांत सत्ता आहे अशी राज्यपद्धति.

Armed Neutrality—सशस्त्र तटस्थपणा.

Balance of Power—सत्तेचा समतोलपणा, बलसमत्व.

Ballot Act—गुप्त रीतीनें मत देण्याच्या पद्धतीसंबंधीं कायदा.

Bill of Rights—लोकांच्या हक्कांचा कायदा.

British Commonwealth of Nations—समान दर्जाच्या ब्रिटिश राष्ट्रांचा संघ, स्वसत्ताक वसाहतींचा संघ.

Budget—जमाखर्चाचें अंदाजपत्रक, अर्थसंकल्प.

Cabinet—मंत्रिमंडळ, प्रधानमंडळ.

Communism—संपत्तीच्या उत्पादनाचीं साधनें श्रमजीवी कामगार व मजूर यांच्या हातीं आहे अशी राज्यपद्धति.

Conservative—जुन्या परंपरेचा अभिमानी पक्ष.

Constitution—राज्यघटना.

Constitutional Monarchy—सनदशीर राजसत्ता.

Crusades—ख्रिस्ती व मुसलमान यांच्यामधील धर्मयुद्धें.

Democracy—लोकांच्या हातीं सत्ता आहे अशी राज्यपद्धति, लोकशाही.

Dictator—सर्वाधिकारी, हुकुमशहा.

Dictatorship—सर्वाधिकारी पद्धति.

Divine Right Theory—राजाची ईश्वरदत्त सत्ता हें तत्त्व.

Dominion—ज्यास स्वसत्ताक राष्ट्रांच्या संघांतून फुटून बाहेर निघण्याचा अधिकार आहे असें स्वसत्ताक राष्ट्र.

Executive—अंमलबजावणीचें खातें.

Fascist—इटलीतील एक पक्ष (लढवय्यांचा संघ), समाजांतील वरच्या वर्गांच्या हातांत सत्ता आहे असा पक्ष.

Feudal system—सरंजामी जहागिरीची पद्धत.
Free Trade—खुला व्यापार.
Habeas Corpus Act—व्यक्ति स्वातंत्र्याचा कायदा, 'चौकशीसाठी ताबडतोब न्यायकोर्टापुढें न्या' असें सांगणारा कायदा.
House of Commons—लोकसभा.
House of Lords—अमीरउमरावांची सभा.
Impeachment—मोठ्या अधिकाऱ्याची (मंत्री वगैरे) त्याच्या कारभाराबद्दल चौकशी.
Imperialism—साम्राज्यशाही
Liberal Party—उदार मतवादी पक्ष
Limited Monarchy—लोकनियंत्रित राजसत्ता
Magna Charta—मोठी सनद (लोकांच्या हक्काची)
Monarchy—राजसत्ताक राज्यपद्धति
Ordinance—पार्लमेंटची (कायदेमंडळाची) संमति न घेतां काढलेला हुकूम.
National Socialists (Nazi)—राष्ट्रीय समाजसत्तावादी पक्ष-नाझी (अद्यअक्षरांवरून)
Parliament—कायदेमंडळ, लोकप्रतिनिधींची सभा, लोकसभा.
Protection—संरक्षित व्यापाराची पद्धत, देशांतील मालास संरक्षण मिळावें म्हणून परराष्ट्रांतून येणाऱ्या मालावर जकात बसविण्याची पद्धत.
Proletariat—श्रमजीवी लोकांचा (कामगार, मजूर) यांचा वर्ग.
Reformation—ख्रिस्ती धर्म सुधारणा.
Reform Bill—पार्लमेंटच्या सुधारणेचा कायदा.
Renaissance—प्राचीन कलाविद्यांचें पुनरुज्जीवन.
Revolution—राज्यक्रांति, क्रांति.
Self determination—स्वयंनिर्णय (राज्यपद्धति ठरविण्याबद्दल).
Speaker—कॉमन्स सभेचा अध्यक्ष, अध्यक्ष.
Veto—नकार देण्याचा, संमति न देण्याचा अधिकार.

REFBK-0008062